# संपूर्ण
# ॥ गडकरी ॥

## खंड – दुसरा

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

पुनर्मुद्रण : मे, १९८४

प्रकाशक : यू. द्वा. देशमुख,
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

मुद्रक : मायक्रोग्राफ,
रामदूत, २ रा मजला,
डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव,
मुंबई–४०० ००४.

मुखपृष्ठ : सतीश भावसार

किंमत : रु. ७५/– (खंड १ व २ या दोन्ही खंडांची)

## अनुक्रम


भावबंधन ४६५

संपूर्ण बाळकराम ६२१

वाग्वैजयंती ७९७

परिशिष्टे १०६९

गडकऱ्यांची हस्तलिखिते ११४९

# भाववंधन

श्रीशंकर प्रसन्न

# संगीत भावबंधन

## * नमन

(राग–बिहाग, ताल–त्रिताल.)

करिं नतिच ही स्तवनधी ।
प्रभुवर मौनमयाचि पर्दि ।
वचनें स्तवना क्षम ना साधीं ।
दिव्य वितरिसी सहज सुगुणगण गूढ मनुजह्रर्दि ॥ ध्रु० ॥
करावया प्रकट तया । शुभदा अघसंघा ।
निर्मिसि जरि वाटे खर आधीं ॥ १ ॥

## * दिंडी

स्वजनकृतिचे गुरु दोष झांकुनीया ।
घेति गुणलव जे गोड मानुनीया ।
कृतज्ञत्वें त्यां नमन अष्ट अंगीं ।
महाराष्ट्राच्या रसिकजनांलागीं ॥ १ ॥

## * साकी

कृपाचि ज्यांची कारण केवळ मम पामरवचनातें ।
वंदुनि त्या श्रीपादपद्मांप्रति याया यश कार्यातें ।
नवनाटकरचना । सादर करितों रसिकजनां ॥ १ ॥

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ स्थळ : रस्ता. धुंडिराज व घनश्याम. ]

**घनश्याम** : माझें नांव घनश्याम.

**धुंडिराज** : अस्सें ! आतां आलें सगळें लक्ष्यांत. घनश्याम, तुम्हीं आपलें नांव सांगितल्याबरोबर सर्व हकीकत आठवली. अहो, तुमच्याआमच्या कैक वेळां गांठी पडल्या आहेत ना चांगल्या ! तुमचें नांव घनश्याम एवढें कळलें मात्र, प्रत्येक भेटीचा प्रसंग डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभा राहूं लागला आहे. कुठें बरें आपली भेट झाली होती ?

**घनश्याम** : धुंडिराजपंत, तुमची माझी एखाद्याच वेळीं भेट थोडीच झाली आहे, कीं म्हणून मला अमुकच ठिकाणीं आपली भेट झाली होती असें अचूक सांगतां येईल ? पुष्कळ वेळां आणि पुष्कळ ठिकाणीं घडलेल्या गोष्टींबद्दल निश्चितपणें सांगणें कठीणच नाहीं का ? धुंडिराजपंत, आपले स्नेही धनेश्वरपंत पेढीवाले आहेत ना ? त्यांचा मी मुनीम; तेव्हां धनेश्वरपंतांच्याच घरीं आपल्या भेटी होण्याचा विशेष संभव.

**धुंडिराज** : अगदीं बरोबर ! आतां ठीक बोललां. घनश्याम, धनेश्वरपंत पेढीवाल्याचे तुम्ही मुनीम. तुमचें नांव घनश्याम. धनेश्वरपंताच्या घरीं तुमच्या आमच्या भेटी झाल्या. आतां बोला. उगीच तसे नका बोलूं ! आपलें विचारीत चला. धनेश्वरपंताचे तुम्ही मुनीम. तुमचें नांव घनश्याम. धनेश्वरपंताच्या घरीं तुमच्या आमच्या भेटी झाल्या.

**घनश्याम** : [ स्वगत ] मीं सांगितलेल्याच गोष्टी मला ठांसून बजावून पढवीत सुटला आहे ! माथ्यांत ढिलाईचा भाग बराच आहे.

धुंडिराज : तुम्ही बोलत नाहीं ? हं ! आतां पहिल्यानें अंमळ विलंब लागला ओळखायला ! तें नाहीं घ्यायचें मनावर.

घनश्याम : छेः छेः; वृद्धापकाळामुळें विस्मरण अगदीं साहजिक आहे.

धुंडिराज : नाहीं हं; वृद्धापकाळाचें विस्मरण नाहीं हें. तसें शाबूत आहे काम. होतं काय बघा, वृद्धापकाळ तर आहेच, पण हा आमचा धंदा विजातीय पडला. विमाकंपनीचा एजंट म्हटला म्हणजे सगळ्या जगाचा नातेवाईक ! मिळविल्या माणसांच्या वारसांची त्याला उपजत काळजी ! त्याला रोजीं तेहतीस कोटी देवांचीं दर्शनें घडायचीं ! आणि प्रत्येकाजवळ ही रडकथा सांगायची कीं तुम्ही मेल्यावर मागें तुमच्या मुलाबाळांचें काय होईल, हातपाय चालता आहे तोंवरच सारी मौज, उद्यांचें कुणीं काय बघितलें आहे, मरणाचा काय नेम घ्या. सांगतां काय, घनश्याम, विमाकंपनीचा एजंट भेटला कीं तुमचें पुरें मरणच ओढवलें म्हणून समजा ! अन् संसाराची तोंडमिळवणी करण्यासाठीं आम्हांला रोज उठून नवे चेहरे गांठावे लागतात. म्हणजे बघा आतां ! आधींच आम्हीं डोक्यानें जरा पंगू, त्यांत वाढत्या बयाचें कमिशन कापायचें, अन् अकलेला नव्या चेहऱ्यांचा रोजमुरा ! असें कांहीं होऊन गेलें म्हणतां, एकाचा चेहरा दिसला, कीं तिसऱ्याचा इतिहास आठवतो ! एकाचें नांव अन् दुसऱ्याचें गांव मिळून एकंदर मेळ असा तयार होतो ! बस्स ! अमुक एक इसम ओळखीचा आहे कीं नाहीं हें छातीठोक सांगण्याची सोयच नाहीं ना मुळीं ! हे तुम्ही आतां बोलतां आहां ना ? आतां चेहरेपट्टी ठेवा हीच, अन् नुसता अंगरखाच या बदलून; प्रकरण आलेंच आमच्या अंगाशीं ! त्या अंगरख्याचा एखादा जोडीदार कुणाच्या अंगावर पाहिला असेल, त्याचा इतिहास तुमच्या तोंडाच्या अंगलट यायचा ! मग मी करतों काय, माणसांची ओळख जरी पटली नाहीं तर ओळख पटल्यासारखेंच दाखवितों. हो, म्हणजे न ओळखण्याबद्दल त्याला तरी वाईट वाटत नाहीं !

घनश्याम : इतका घोंटाळा कसा होईल असा ?

धुंडिराज : काय सांगावें तुम्हांला आतां ? अहो, होतो म्हणतों ना ! होतो म्हणजे काय, खरोखरीच होतो. अगदीं अंगरखा बदलला तरी फरक होतो. एक नूर आदमी आणि दस नूर कपडा म्हणून कशाला म्हटलें आहे मग ? आतांच अडचण पडली आहे बघा. धनेश्वरपंताचा भागीदार तुमचा तो कोण ? त्याचा मुलगा मोरेश्वर धनेश्वराकडे आज आला आहे–आला आहे ना ? त्याला भेटावें लागणार आहे आतां ! त्याला पाहून इतकीं वर्षें लोटलीं आहेत, कीं तसें म्हटलें तर

परातींत तेल घालून देवळांत त्याला भेटायला हवें. फार लहानपणीं पाहिलेला एकदां! आणि इथें तर कालची जमा कालच खर्ची. आजला म्हणाल तर शिल्लक बाकी पूज्य. त्याला आतां ओळखावा कसा, बोला!

घनश्याम : जराशी अडचण आहे खरी.

धुंडिराज : नाहीं, नाहीं, नाहीं; तशी तितकी अडचण नाहीं बरें का? कुणीं नेम सांगावा? ओळखीनहि एखादे वेळीं चटकन्. परवांच बघा. झाली काय गंमत; एक आपला गृहस्थ भेटला. पाहतांक्षणीं आम्हीं टाकला मनाशीं कयास बांधून कीं एक फलाण्याचा फलाणा तो हाच म्हणून! झालें! त्याला बघितलें विचारून नुसतें अनमानधपक्यानें–मनांत म्हटलें, बघूं तर खरें! हो गंमतच करावयाची घटकाभर–म्हटलें कां हो बुवा, अमुक अमुक ते आपणच का? झालें बुवा! विचारून तर गेलों! त्यानें म्हटलें होय. म्हणजे काय? सर्दच झालों ना एकदम! खरोखरीच तो म्हणजे तोच! झटक्यास ओळख पटली ना! मग हडसून खडसून सांगितलें – हो त्यानेंच कबूल केलें, मग काय हो?–म्हटलें, गोमाजी तिमाजी ते आपण; अमक्याचे तुम्हीं अमुक. त्याला मुळीं होयच म्हणणें आलें ना! बरें, गंमत ही त्यांत–तुम्हीं म्हणाल नांव नेमकें सांगितलें म्हणून आमचें त्याचें संघष्ट्ण विशेष असेल–नाहीं; तसें म्हटलें तर परिचय नाहीं, ओळख नाहीं, जानपछान नाहीं, न लेवा न देवा! नुसता दहावीस वेळां बघितलेला–कुठें घडी दोन घडी बोलणेंचालणें. बस्स. उपरांत नाहीं. अगदीं हराशिवा! पण ओळखलें एकदम न् काय? बोला, गंमत आहे कीं नाहीं? नाहीं नका म्हणूं.

घनश्याम : [स्वगत] जबर गोष्टीवेल्हाळ गृहस्थ आहे हा! आणखी अशीं पल्लेदार विषयांतरें करितो आहे, कीं संस्कृत श्लोकांवर प्रवचनें करणाऱ्या वक्त्यांनींसुद्धां तोंडांत बोटें घालावींत. याला मूळ पदावर आणणें मोठें कठीण आहे. [ उघड ] धुंडिराजपंत, असें असेल तर मोरेश्वराला ओळखणें कांहीं कठीण नाहीं तुम्हांला.

धुंडिराज : सांगितलें ना तुम्हांला आधींच, कीं कठीण नाहीं न् आहे—ही! बाकी मोरेश्वर तरी मला ओळखील कीं नाहीं हें सुद्धां जरा तेंढंच आहे! स्वारी अगदीं गयाळ आहे. अगदीं सुमार बुद्धीचा. अगदीं म्हणजे—अगदींच. मला पहिल्यापासून माहीत आहे ना! तुम्हीं नाहीं म्हणून मी कुठला ऐकायला! सांगतों बघा तुम्हांला!

घनश्याम : [ स्वगत ] झाली विषयांतराला सुरुवात!

धुंडिराज : बरें का, घनश्याम, एकदां काय झालें, कीं या मोरेश्वराची आजी-- आजी म्हणजे आईची आई नव्हे, बापाची आई. आईची आई बिचारी आहे अजून. आमच्या मेव्हण्याच्या कुणाचीशी ती मावशी लागते, म्हणून मला तरी माहीत एवढें! ती बापडी आजतागाईत सहीसलामत आहे. आपण कशाला उगीच कुणाबद्दल वाईट बोला? आणि बोलून तरी कसें चालेल? कालपरवांकडे कोणसें-कोण पाहा—

घनश्याम : [ स्वगत ] विषयांतरांतून पुन्हा पोटविषयांतर!! छेः छेः छेः! अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींचा एकमेकींशीं जन्यजनकसंबंध रद्द आहे या प्रकारापुढें! हा मालतीचा बापच आहे, आणि तिच्याबद्दल मला मागणी करायची आहे याच आशाळभूत धीरावर, मीं अजून टिकाव धरला आहे! [ उघड ] मोरेश्वराच्या आजीबद्दल—म्हणजे बापाच्या आईबद्दल—सांगत होतां ना कायसें?

धुंडिराज : हो; झाली काय गंमत, कीं याची आजी एकदां वारली—अगदीं लहानपणीं बरें का?

घनश्याम : कुणाच्या? तिच्या लहानपणीं कीं याच्या?

धुंडिराज : ठीक, ठीक, ठीक! घनश्याम, बोलण्यांत सफाई पकडलें खरें! कबूल आहे. असा कोटिक्रम हवा बोलण्यांत! हें आमच्यांत नाहीं. आमचें बोलणें सरास अघळपघळ! म्हणजे काय, पांचपेच नाहीं! आपला ऐसपैस कारखाना! तुमचें बोलणें म्हणजे खुबीदार, प्रासयुक्त! असेंच पाहिजे बोलणें माणसाचें! उगीच गबाळग्रंथी फापटपसारा नाहीं कामाचा! या बोलण्यांत म्हणजे गंमत आहे, मौज आहे अन् मजाहि आहे. आपल्याला आवडलें तुमचें बोलणें. आवडलें म्हणजे अगदीं मनापासून! आमच्या हेडहपिसांत एक क्लार्क आहे. असा तुमच्यासारखाच! अगदीं आंखबंद डोक्याचा मनुष्य! त्याचें बोलणें असेंच प्रासादिक असतें. सगळ्या हेडहपिसांत त्याची—

घनश्याम : आपण हेडहपिसांत शिरलां खरे, पण बोलण्याच्या नादांत मोरेश्वराची आजी बिचारी एकदां लहानपणीं तशीच मरून पडलेली आहे. शिवाय आजी म्हणजे ती सुद्धां बापाची आई. आईची आई नव्हे-ती बापडी आजतागाईत सहीसलामत आहे.

धुंडिराज : छान! सुरेख! पसंत! चांगला टोमणा दिलांत. गंमत वाटली! बरें; इकडे आजी वारली, हा मोरेश्वर लागला रडायला, घरांतलीं माणसें गडबडींत. —अन् गडबडींत असायचींच! हो, माणसासारखें माणूस घराला मुकलें, त्यांना

तरी आपण कोणत्या तोंडानें दोष द्यावा ? हा मोरेश्वर सारखा रडतो आहे, तेव्हां मीं घेतला त्याला चट्दिशीं जवळ; जरा खेळवला झालें. त्याला वाटलें, मी घरांतलाच कुणी आहें म्हणून! फसलान् काय! अशी गंमत झाली· आजी बारली त्या वेळची गोष्ट.

घनश्याम : [ स्वगत ] इतक्या लांबणीनंतर चांगली गंमतच आहे म्हणायची ही! बोलण्याच्या ऐन गर्दीत कुणीं कितीहि भानगडी सांगितल्या तरी शब्द न् शब्द विचारपूर्वक लक्ष्यांत ठेवण्याचा माझा आजपर्यंतचा अभिमान आज याच्या मान्यानें उतरणार असें वाटतें! आतां एकदम विषय काढावा. नाहींतर लग्नाची ही गोष्ट माझ्या आयुष्याच्या शेवटपर्यंत याच्याजवळ काढण्याची मला संधि मिळावयाची नाहीं. आतां जरा वाहवतांना थांबला आहे, तेवढ्यांत वाहत्या गंगेंत हात धुऊन घ्यावा एकदम.

धुंडिराज : हें पाहा घनश्याम; एकदां काय झालें—

घनश्याम : [ एकदम स्वगत ] अरे बाप रे! [ उघड ] धुंडिराजपंत, मध्येंच बोलल्याबद्दल मला क्षमा करा. कांहीं जरुरीच्या कामासाठीं आपल्याशीं निकडीनें बोलण्यासाठीं आलों आहें; आणि काम फारच महत्त्वाचें असलें तरी या वेळीं मला वेळ फारच थोडा आहे आणि म्हणूनच जराशा उतावळ्या उद्धटपणानें आपल्या बोलण्यांत व्यत्यय आणला.

धुंडिराज : छेः छेः छेः! भलतेंच! घनश्याम, उतावळेपणा कसला न् उद्धटपणा कसला! तुम्ही ताजीं माणसें म्हणजे काय गोष्ट आहे! हें बघा, तुम्ही मूलमंडळी अशी आगळीक करूं लागलां म्हणजे आम्हांला बघा काय समाधान वाटतें! खरें सांगूंच का आतां? बघा, बाळगोपाळांच्या बोलण्याचा ज्याला राग आला तो थेरडा म्हणजे चळलाच म्हणून समजा बेलाशक. म्हातारपणीं मन म्हणजे काय पाहिजे! बोलण्याचा राग म्हणजे काय बोलणें आहे! अहो, गंमत सांगूं का तुम्हांला? तुमचें बोलणें म्हणजे बोलणें नव्हेच तें! आमचा प्रभाकर तुम्हांला माहीत असेलच! आमचा म्हणजे तसा जवळचा नव्हे, बरें का? पाहा, प्रभाकर म्हणजे खरें म्हटलें तर -कोण बरें? [ आठवतो. ]

घनश्याम : [ स्वगत ] झालें! आतां "प्रभाकर" घराण्याचा इतिहास! देवा, या घनश्यामाला जन्माला घातलास तो अखेर या सैल जिभेनें ठार मारण्याकरितांच का? काय शब्दांचा वर्षाव करितो आहे! एखाद्या नाटककारानें असें शब्दशूर पात्र जर नाटकांत पांचहि अंकांतून नाचविलें तर दिडाच्या आंत नाटक आटोपण्याची पंचाईतच. रावणाच्या दहा तोंडांवर रामबाण औषध

मिळालें; पण हें तोंड असाध्य आहे.

धुंडिराज : हें बघा, याचा मामा आमच्या दशांतला. लहानपणीं आईबापें वारलीं तशी माया पण जोडून ठेविलेली नव्हती त्यांनीं. मामा पडले उदासीनवृत्ति. आम्हीं आमच्या हिला टाकलें विचारून. होतां होईतों घरांत विचारूनच सगळें केलेलें बरें, असा आमचा आपला पहिल्यापासून शिरस्ता. म्हटलें बुवा, आपल्या घरांत नाहीं मूलबाळ; रिखाश्यासारखे दोन जीव; आयता घराला अलंकार लाभतो आहे तेवढेंच भूषण! झालें; तिलाहि रुचलें तें; आणि आम्हीं या प्रभाकराला घरीं आणला तो रुळला झालें! अगदीं घरच्यासारखा झाला! घटकाभर असेंच म्हणा ना, तुमच्या धनेश्वरपंताच्या घरीं जसा मनोहर आहे ना, तसा हा! आम्हांला प्रभाकर जसा जवळचा नाहीं–म्हणजे नात्यानें–तसा धनेश्वराला मनोहर पण जवळचा नाहीं. प्रभाकर आणि मनोहर म्हणजे अगदीं एकरंगी, एकशिंगी! आतां हें कबूलच केलें पाहिजे, कीं आमचा म्हणजे कांहीं धनेश्वरापंतासारख्या बड्या बारदानाचा कारखाना नव्हे. तें म्हणजे जगड्व्याळ काम! तुम्हांला ठाऊक नाहीं धनेश्वर म्हणजे किती भारीपैकीं असामी आहे तें. घरीं हत्तीघोडे झुलवील ना मनांत आणील तर तो! अहो, पेढीवर एक मुनीमसुद्धां ठेवला आहे ना त्यानें!

घनश्याम : तो मुनीम सध्यां आपल्यापुढें उभा आहे! त्याचें नांव घनश्याम हें-सुद्धां मला माहीत आहे. त्याला आपल्याजवळ कांहीं सांगावयाचें आहे. आणखी खरें सांगूं आपल्याला! आपण त्याला कांहीं सांगूं देत नाहीं.

धुंडिराज : जरासा विषयाला सोडून बोललों खरा! सांगत होतों हेंच, कीं मी धनेश्वरासारखा श्रीमंत नाहीं. कबूल आहे, मीं पुष्कळ म्हटलें कीं मी बुवा मोटा लाखोपति आहें. घनश्याम, सारीं सोंगें आणतां येतील; पण पैशाचें सोंग आणणें मोठें कठीण आहे! आतां तुम्हीं म्हणाल, कीं बाबा रे, तूं जर असा कफल्लक, तर मग या लष्करच्या भाकरी भाजायला तुला कुणीं सांगितलें होतें? प्रभाकराला तूंच कशाला शिकवायला ठेवून घेतलास? हां, हें बोलणें रास्त आहे, हिशेबी आहे अन् मुद्देसूद आहे! आमचें काय उत्तर असेल सांगा बघूं? एक आपली गंमत म्हणून; चला, काय असेल उत्तर?

घनश्याम : [ स्वगत ] निरुत्तर केलें आहे अगदीं या गृहस्थानें! एकच चरण तीनतीनदां घोळवून एखाद्या चिजेला रंग येत असेल कदाचित्; पण एकच गोष्ट तीन तीन शब्दांनीं सांगणारी ही चीज मात्र अजब आहे खरी. नाहीं म्हणायला एका दृष्टीनें नाटककाराला असलें रत्न उपयोगी आहे खरें.

नाटकाच्या पहिल्या प्रवेशांत या स्वारीची योजना केली एकदां, म्हणजे त्याच्या सहज बोलण्याच्या ओघांतच साऱ्या पात्रांशीं प्रेक्षकांची सुरेख ओळख होऊन जायची. शब्दांच्या या खैरातीमुळें मला आतां अशी भीति वाटायला लागली आहे, कीं शेवटीं माझ्या मागणीच्या उत्तरादाखल बोलायला याजवळ एखादा तरी शब्द शिल्लक राहील कीं नाहीं ! आला चेहरा खुलून ! पुन्हा बोलणार वाटतें ! म्हातारपणामुळें याच्या जिभेला बांधलेल्या नाड्याशिरा पार तुटल्या आहेत कीं काय ? बोल, शब्दसृष्टीच्या परमेश्वरा, अगदीं मोकळ्या जिभेनें बोल ! शब्दांनीं शरपंजरीं पडून मरणारा पहिला वीर म्हणून तरी माझा लौकिक होईल.

**धुंडिराज :** जुन्या काळची गोष्ट आहे फार; तुमच्या लक्षातच यायची नाहीं कधीं. मूळ म्हटलें म्हणजे असें आहे, कीं आमच्या लहानपणीं घरची फार गरिबी, अन् चार अक्षरें शिकायची तर मोठी हौस मनाला ! काय सांगावें, महाराजा ! घटका घटका आम्हीं आशाळभूतपणानें नव्या शाळेच्या दाराशीं जाऊन बसावें, आन् आंतल्या आंत तळमळावें, कीं देवराया, काय रे बाबा तुझ्या घरीं असें पाप केलें होतें, म्हणून या तुझ्या देवळांत आम्हांला यायची अशी चोरी व्हावी ? ते दिवस डोळ्यांपुढें उभे राहिले म्हणजे टपाटपा टिपें येतात बरें अजून डोळ्यांतून ! मनांतली इच्छा मनांत गिळून टाकिली बरें त्या वेळीं ! तेव्हांपासून मनाचा आपला कृतसंकल्पच कीं, हातीं पैसा खेळूं लागला रे लागला कीं कुणा तरी गरीब मुलाला विद्या ही शिकवायची म्हणून ! म्हणून या प्रभाकराला पोटच्या पोरासारखा घरीं वागविला आहे. आमचे स्नेहीसोबती हंसले आम्हांला तेव्हां, कीं घरचें झालें थोडें आन् व्याह्यानें धाडलें घोडें म्हणून. बाबा रे, विद्यादान केल्याचा आनंद कांहीं निराळा आहे म्हणावें. प्रभाला इंग्रजींत बोलतांवाचतांना पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं बस्स. बरें, तसा मोठा पायगुणाचा आहे. हा घरांत आल्यावर चारदोन वर्षांनीं आमची मालती झाली, पुढें तिच्या पाठीवर कुसुम, कुसुमच्या पाठीवर कुमुद. तिच्या पाठीवर---

**घनश्याम :** [ स्वगत ] यांच्या पाठीवर मात्र कोरडेच ओढले पाहिजेत आतां. इतक्या वेळां सूचना देऊन व्यर्थ. शहाण्याला शब्दांचा मार ही म्हण मला निराळ्या अर्थानें पटूं लागली आहे.

**धुंडिराज :** हो, कुमुदच्या पाठचीं दोन भावंडें गेलीं; आन् पुढें तीन मुलगे ! बरें, तात्पर्य काय, प्रभाकरानें पाऊल टाकल्यापासून घर आपलें नांदतेंगाजतें झालें !

आज होय नव्हे किमानपक्ष वीस वर्षें झालीं–हो, आला होता तेव्हां किती वर्षांचा होता हा ? हें साल कोणतें बरें ? – थांबा, रोजनिशीच बघूं या अं!
[ रोजनिशी पाहूं लागतो ]

घनश्याम : [ स्वगत ] मला हें चऱ्हाट ऐकत पुढचीं वीस वर्षें घालवावीं लागणार असें दिसतें !

धुंडिराज : रोजनिशी राहिली वरी ! तूर्तास ठोकळ मानानेंच घ्या ना. आला तेव्हां सुमार चारपांच वर्षांचा; पांचसहा म्हणजे डोक्यावरून पाणी अगदीं. पुढें तीनचार वर्षांनीं आमची मालती झाली, आणि आज मालती म्हणजे शके अठरारों—तसें कशाला ? उघडा हिशोब अगदीं –– आमची मालती म्हणजे तुमच्या धनेश्वराच्या लतिकेच्या बरोबरीची. वयांत तफावत नाहीं; स्वभावांत म्हणाल तर आहे. आमची मालण मोठी सात्त्विक; तुमच्या धनेश्वराच्या मनोहराचा मासला ! मनोहर तरी मुलगा मोठा गुणाचा ! हो, पण तुम्हांला ठाऊक असेल, शिकतो काय हो मनोहर ते दगडधोंडे गोळा करून ?

घनश्याम : शास्त्रीय विषयांच्या विद्यार्थ्यांना भूगर्भशास्त्र शिकण्यासाठीं दगडधोंड्यांची चांगली माहिती मिळवावी लागते.

धुंडिराज : काय काय नवीन निघेल कांहीं सांगतां यायचें नाहीं. घ्यायचें काय त्यांतलें – कीं मनोहराच्या मनाची जी ठेवण आहे, बस, तीच आमच्या मालणची. आतां लतिका आहे लक्षाधीशाची मुलगी, त्यांतून एकटी, आन् बाळपणापासून आईविरहित. त्यामुळें तिचा स्वभाव थोडा तापट आहे. बाकी मुलगी मनानें फारच सरळ बरें ! अगदीं आमच्या प्रभाचा नमुना ! तुम्ही एक बोला – त्याचे एकोदरशें झालेच ! हो, तुमच्या बोलण्यावरून निघालें बोलणें, नाहीं का ? आमच्या प्रभाचें बोलणें तुमच्यासारखेंच; पण जरा उतावळें अन् तापट. मनांत कांहीं नसायचें, पण फटकळ म्हणजे काय म्हणतां ! पण आम्ही काय म्हणतों –मनांत हो मात्र – तसा दर्शनी राग दाखवितोंच कधीं मधीं — मनांत म्हणतों, पोराला कोण कोडकौतुक करायला ? आपणच त्याचीं आईबापं. तडकन तोडून बोललें आणि त्याला लागलें तें, तर बघायचें कुणाच्या तोंडाकडे त्यानें बरें ? आपले उपकार का जाणवायचे आहेत त्याला ? आमची ही तर फारच मायाळू ! काय सांगावें तुम्हांला, घनश्याम ! मरावें न् त्या माउलीच्या पोटीं यावें बरें ! आलें लक्षांत आलें ! हंसलांत कां तें आलें लक्षांत ! बस्स ! हेंच आवडतें आम्हांला ! अन् तुम्ही म्हणतां तुमच्या बोलण्याचा राग येईल आम्हांला म्हणून ! अहो, आहेत कुठें अशीं गुणाचीं

बाळें ? तुम्हीं सुद्धां छान केलेंत मोठें ! आईबाप ल्हानपणींच अंतरले – देवाची योजना मोठी कठीण आहे—हं–तरी तुम्ही आपले स्वतःच्या करामतीनें या पदवीला येऊन पोंचला. बेश झालें ! आशीर्वाद आहे आमचा आपला तुम्हांला ! आपला असाच सुखाचा संसार करा, चार पोराबाळांचे धनी व्हा, आनंद करा ! तुमच्या आईबापांना जें वाटलें असतें तेंच आम्हांला वाटेल. आमची ही काय, मी काय, आमचें आपलें एक म्हणणें आहे – काय ? कीं, तुम्हां पोराबाळांचे संसार थाटलेले पाहावेत, एखादे दिवशीं आपले बसल्या जागीं आनंदानें गपकन् डोळे मिटावेत आन् आपलें देवाजीच्या कारणीं पडावें ! घनश्याम, तुम्हीं मंडळींनीं आतां संसार मांडायला हवेत, बरें का ? आम्हीं म्हातारपणीं करायचें काय आतां ?

घनश्याम : आपण वृद्धापकाळीं काय करावें म्हणून विचारतां, आणि आम्हां तरुणांना संसार थाटण्यासाठीं आग्रह करितां ? धुंडिराजपंत; आपला स्वभाव इतका प्रेमळ आहे म्हणूनच मी स्पष्टपणें बोलण्याचें धाडस करतों. आम्हीं तरुणांनीं संसार थाटावा हें उचित आहें खरें; पण त्या कामीं आपणांसारख्या प्रेमळ वृद्धांनीं आम्हांला आशीर्वादापेक्षां अधिक साह्य करायला नको का ? धुंडिराजपंत, माझ्या भावी संसाराची घटना करण्याचें महत्त्वाचें काम केवळ आपल्या हातीं आहे. आपल्या सुशील कन्येची मागणी करण्याकरितां मी आलों आहें. हा प्रकार अंमळ अपूर्व आहे. मुलीच्या बापानें वरसंशोधन करण्यासाठीं हिंडावें; आणि केवळ वडील माणसांनींच या प्रश्नाची वाटाघाट करावी, हा आपल्या समाजांतला रूढ मार्ग आहे. पण माझ्या आणि मालतीच्या विवाहाच्या एकंदर विषयांत दोन्ही पक्षीं वडीलपणा केवळ आपल्याकडेच आहे. धुंडिराजपंत, अनुरूप वधूच्या प्राप्तीबरोबर मला प्रेमळ मातापितरांचाहि लाभ व्हावा असाच सुंदर योगायोग दिसतो. हें सारें आपल्या संमतीवर अवलंबून आहे. माझ्या भाग्यशाली आशेला आपल्या आशीर्वादाचें बळ मिळेल का ?

धुंडिराज : घनश्याम, काय, म्हणतां काय तुम्हीं हें ? वाः, असें स्थळ म्हणजे—

घनश्याम : हां, अशा महत्त्वाच्या गोष्टीबद्दल स्थळकाळाचा मीं विचार केला नाहीं ही गोष्ट मला कबूल आहे. आपल्यासारख्या प्रेमळ पित्याला असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे, कीं अशी रस्त्यावर सहज बोलतां बोलतां मागणी करायला माझी मुलगी काय वाटेवर पडली आहे म्हणून ! पण धुंडिराजपंत, आपण सहृदय आहां. तरुण मनाची उतावळी उत्सुकता लक्षांत

घ्या. प्रभाकरांना विद्यादान देतांना आपण आपल्या बाळपणींच्या सुद्धां भावनांची आठवण ताजी ठेविलीत. मग मला कन्यादान करतांना आपल्या तारुण्याच्या आठवणींची पुन्हा आठवण करणें आपल्याला खात्रीनें सोपें जाणार आहे. वस्तुतः आपल्या सुंदर आणि सद्‌गुणी कन्येची योग्यता इतकी मोठी आहे, कीं तिच्यासाठीं मागणी घालायला येतांना जगद्‌विजयी सार्वभौमानें आपलीं जयवाद्यें शिवेबाहेरच बंद ठेवावीं किंवा जगद्‌गुरूनें आपल्या मशाली विझवून टाकाव्या.

धुंडिराज : जगद्‌गुरूनें लग्नासाठीं यायचें हा दृष्टांत चुकला, बरें का ? का, घनश्याम, आमच्यांतहि डोक्याचें काम आहे कीं नाहीं बोला. बरें तें जाऊं द्या ! घनश्याम, तुम्हीं म्हणतां तें कांहीं खोटें नाहीं. माझ्या मालतीचे गुण मी काय सांगू तुम्हांला ? तुम्हीं तिची निवड केली म्हणून तिच्याच ऐवजीं मी तुम्हांलाच धन्यवाद देईन. काय सांगावें तुम्हांला ? ती जितकी बुद्धिमान आहे तितकीच सरळ आहे. सुंदर आहे तशी साधी आहे. साध्या बोलण्याचालण्यांत बालकापेक्षां अल्लड आणि जबाबदारीच्या वेळीं वृद्धापेक्षांहि पोक्त. आनंदवृत्ति आणि गंभीर. फुलासारखी नाजूक आणि तार्‍यांसारखी तेजस्वी ! जिभेची जरा जड, पण डोळ्यानें बोलणारी ! शुद्ध, विशाळ आणि सोज्वळ दृष्टि ! माझी मालती डोळे भरून माझ्याकडे पाहूं लागली म्हणजे माझ्या आईच्या डोळ्यांतली निर्मळ माया, माझ्या बायकोच्या डोळ्यांच्या ठेवणींत दिसायला लागते ! मालतीच काय, आमचीं सगळींच मुलें मोठीं गुणी. तेवढ्यासाठीं एक म्हणून निश्चय केला आहे, कीं पैसा खर्च होवो; कष्ट पडोत, मुलांना म्हणून गरिबी जाणवूं द्यायची नाहीं ! अहो, हीच आपली धनदौलत ! एरवीं म्हणाल तर असा पैसा आला आन् असा गेला. घनश्याम, थकून भागून संध्याकाळीं असें घरीं येऊन पडावें, आन् भोंवतालीं या आनंदी पाखरांची एकदां गोड गजबज सुरू झाली, म्हणजे सारा शीणभाग हरून जातो अगदीं ! जीव कीं प्राण आहेत माझीं मुलें म्हणजे मला ! आवतींभोंवतीं अशी किलबिल करूं लागलीं म्हणजे जिवाला गार वार्‍यावर चांदण्यांत पडल्यासारखें वाटतें. त्यांतल्या त्यांत आमची मालती म्हणजे केवळ कलिजा आहे सगळ्यांच्या जिवाचा. काय एकेक गुण सांगूं तिचा !

घनश्याम : धुंडिराजपंत, आपल्या आणि माझ्याहि अत्यंत आवडत्या विषयावर आपण बोलतां आहां तरी सुद्धां मी आपणांला अडथळा करीत आहे, यावरून माझ्या प्रश्नाच्या उत्तरासाठीं मी किती अधीर झालों आहे याची

कल्पना करा आणि मला माझ्या भावी भाग्याची कल्पना द्या ! माझ्या विनंतीला आपली संमति आहे का ?

धुंडिराज : हां, तें कठीण काम आहे ! खरें सांगू आतां ? या बाबतींत तुम्ही मालतीचीच आधीं संमति घ्या. तिचा रुकार पडला म्हणजे आमचें काम एवढेंच उरलें, कीं पोरगी पिवळी करून तुमच्या पदरांत टाकायची, आणखी दोन हस्तक अन् तिसरें मस्तक तुमच्या चरणीं ठेवून मोकळे व्हायचे ! हुंडा-पांडा, पोषाखकरणीं मी गरीब बाप काय देणार ? पण आपल्या छंदानें वागून मुलीला तिच्या मर्जीविरुद्ध कुणाच्या गळ्यांत बांधायची हें मात्र आपल्याकडून कदापि होणें नाहीं. जन्मसंबंधांच्या या गोष्टी ! बाप म्हणजे मग बापच तो ! त्यांत लटपट नाहीं उपयोगी ! बापानें मुलीचें मन मोडणें म्हणजे तें उक्त नव्हे, रास्त नव्हे आन् बरें नव्हे; शिवाय तें ठीकहि नाहीं. तेव्हां म्हणतों कीं तुम्ही तिलाच समक्षासमक्ष विचारून टाका. आमच्या मुलीवर आमचा आहे भरंवसा. तिची एकटीची भेट घ्यायला आम्हींच तुम्हांला घरीं नेतों ! चला याच पावलीं घरीं. मालतीनें हो म्हटलें कीं झालें ! आमच्या हिची संमति सुद्धां नको. ती आहे जरा छांदिष्ट. जरा म्हणजे तशी छांदिष्ट नाहीं—साधारण छांदिष्ट – नाहीं, पण छांदिष्टच आहे – आन् फारच छांदिष्ट आहे. पण भ्यायला नको. मालतीच्या मनानें घेतलें हें, म्हणजे आमच्या हिचा बंदोबस्त मी करतों. असें कांहीं असलें म्हणजे मी करतों काय ? दोनचार दिवस वरपांगीं सोंग आणतों रागाचें; जसा कांहीं जमदग्नी ! चारचार दिवस एक अवतार ठेवतों असा कीं काम फत्ते ! तसा गबाळ नाहीं बरें का मी ? तें सोंग करितों वाटेल तेव्हां ! चला तुम्ही आधीं. आतां उगीच बोलण्यानें बोलणें वाढवूं नका. फार बोलणें आन् तेंहि म्हटलें म्हणजे उगाच वाढवून बोलणें हें उचित नाहीं, रास्त नाहीं अन् योग्य नाहीं; शिवाय तें ठीकहि नाहीं. चला घनश्याम. चला म्हटलें म्हणजे मग एकदम चलाच. [ दोघे जातात. ]

## प्रवेश दुसरा

[स्थळ : धुंडिराजाचें घर. पात्रें : मालती, लतिका, मनोहर, इंदु, बिंदु, कुसुम; कुमुद.]

[ मनोहर आणि मालती बुद्धिबळें खेळत आहेत. ]

लतिका : [स्वगत] खरोखरच वल्लभरमणी खेळावयाला बसलीं म्हणजे त्यांची कठीणच अवस्था होत असली पाहिजे !

( राग–बिहाग; ताल–त्रिताल. )

दारुणा स्थिति । ती जाचि तयांप्रती ॥ धृ० ॥

प्रियजनपक्षा स्वीकारावें । न तरी सुख पुढतीं ॥ १ ॥

प्रतिपक्षातें मिळतां न मिळे अंगा स्पर्श रती ॥ २ ॥

तीन, चार आणि पांच ! बरोबर तास झाला ! बुद्धिबळाचा पट मांडून मालती आणि मनोहर एकमेकांकडे पाहात वेड्यासारखीं बसलीं आहेत ! एकमेकांच्या समोर बसल्यामुळें यांना चुकल्यासारखें तर वाटत नाहीं ना ? तसें नव्हेच. कारण मग तसें नसतांना मला चुकल्यासारखें कां वाटत आहे ? वेळेवर यायला प्रभाकर चुकले म्हणून का ? होते आहे ही संसारांत चूक होते आहे का ? का हा संसारच चुकीचा आहे ? त्या दोघांच्या तोंडांतून शब्द निघत नाहीं, आणि आम्हां दोघांच्या तोंडाला खळ पडत नाहीं. प्रेम असें बोलकें आहे कीं असें मुकें आहे ? प्रेमामुळें कलह वाढतो का कलहामुळें प्रेम वाढतें ? प्रेमळ परिचयामुळें अनादर होतो, कीं अनादरापासून परिचय प्रेमळ होतो ? सौंदर्याच्या ठिकाणीं गुण दिसूं लागतात, कीं गुणाच्या ठिकाणीं सौंदर्य दिसूं लागतें ? पांच वाजल्याची पांच वेळां खणखणीत वर्दी देऊन घड्याळ एकदम बंद झालें; पण हृदयाच्या एकेका धडकीबरोबर जगाच्या नजरबंदीचें एकेक सुंदर कोडें माझ्या हृदयांत धडकूं लागलें. या सुंदर कोड्यांचीं उत्तरें देणारा एखादा जादूगार भेटला तर माझ्या पांची प्राणांच्या मोलांनीं–हो, पण तो जादूगार भलत्यासलत्या स्वरूपानें येऊन कामा नये ! त्या जादूगारानें प्रभाकराच्या रूपानें—नको, नाहींतर प्रभाकरच त्या जादूगाराचा रूपानें आले तर काय वाईट ? [ प्रभाकर येतो. ] प्रभाकरांना अगदीं शंभर वर्षें आयुष्य आहे. पण हीं शंभर वर्षें ते कुणाच्या सहवासांत घालविणार आहेत बरें ? या प्रश्नाचें एकरूप उत्तर मी, आणि माझ्या सर्व कोड्यांचीं एकवटलेलीं उत्तरें म्हणजे प्रभाकर.

प्रभाकर : वाः मनोहरा, या वेळीं खेळ पण खेळ शोधून काढलास. एका बाजूला मनोहर आणि एका बाजूला मालती, ही लतिका, कुसुम, कुमुद शिवाय इंदु आणि बिंदु, आणि इतक्यांच्या भरतीला शेजारपाजारचें सुंदर साह्य. खेळाच्या संग्रामांत स्त्रियांसारखे गोड प्रतिस्पर्धी सांपडायाचे नाहींत.

( राग-भीमपलास; ताल-त्रिताल. )

स्त्रिया रणिं बद्धपरिकरा । स्नेहबद्धशा प्रिय गमति नरां ॥ ध्रु० ॥
रंगक्रीडेमधिं रमणीया ॥ क्रीडारंगीं तेंवी रुचिरा ॥ १ ॥
संसाराच्या खुलविति खेळा ॥ खेळाच्या नटविति संसारा ॥ २ ॥

मनोहरा, या सुंदर गराड्यांत सांपडल्यामुळें तुझा घाबरा चेहरा पाहिला म्हणजे तूं नुकताच एखाद्या रोगांतून–निदान देवीच्या रोगांतून उठल्यासारखा किंवा निदान देवीच्या हृद्रोगानें पछाडल्यासारखा तरी दिसतोस. मनोहरा, तुला काडीची अकल नाहीं. म्हणूनच तूं बुद्धिबळें खेळायला तयार झालास. बघूं या कुणीं कुणावर काय डाव केला आहे तो. [ पाहून ] वाः, तुझा राजा समोरच्या सैन्याच्या जास्त पकडींत आहे, कीं तूं स्वतः या सुंदर सैन्यांच्या जास्त पकडींत आहेस, हें सांगतां येणें फार कठीण ! तुझ्या डावाची अशी दुर्दशा कां व्हावी हें कांहीं कळत नाहीं. कारण इतक्या सुंदर प्रतिपक्ष्यांशीं एकट्यानें लढण्याइतका गाढवपणा केल्यामुळें तुझ्या बाजूला हत्तीघोड्यांपेक्षां टाकाऊ कां होईना, पण तुझ्यासारख्या एका मोहऱ्याची अधिक भरती झाली आहे. मालतीकडेच लक्ष गेल्यामुळें हा प्रकार झाला नाहीं ना ? पण तसें म्हणावें तर तितक्याच मूढ वृत्तीनें मालतीचें लक्ष तुझ्याकडे वेधलें आहे ! लतिके, हीं जनावरें नाचविण्याची आणि हीं दोन एका ठिकाणीं बांधून टाकण्याची कुशलता तुझी आहे तर मग ?

मनोहर : छेः, तूं ठिकाणावर नव्हतास म्हणून तिची बुद्धीहि ठिकाणावर नव्हती.

लतिका : दादा, तूं सुद्धां बोलायला लागलास ? प्रभाकर, तुम्हीं का थांबलांत बोलतांना ? प्रारंभ कसाहि केलांत तरी शेवटीं शेवटीं एखाद्या विषयावरचें तुमचें बोलणें मोठें सुंदर होतें !

प्रभाकर : लतिके, या वेळीं मात्र शेवटीं शेवटीं माझ्या बोलण्याचा विषय सुंदर होता. सुंदर विषयावर सुंदर कोण बोलणार नाहीं ? कोणताहि विषय आपल्या उपासकाला तद्रूप केल्याखेरीज सोडत नाहीं. भूगर्भशास्त्राच्या निमित्तानें दगडाधोंड्यासारख्या जड पदार्थांचा विद्यार्थी मनोहरसुद्धां जर दगडासारखाच

निर्विकार होतो, तर मग सौंदर्यासारख्या जिवंत आणखी चंचल विषयानें मलाहि तद्रूप करून टाकलें तर त्यांत काय नवल? तुमच्या सुंदर समूहांत पाऊल टाकल्याबरोबर बिचाऱ्या तरुणाची काय दशा होते याची तुम्हांला कल्पनाहि नसते! एकीकडे भ्रूधनुर्भंग, तर एकीकडे नयनबाणांचा वर्षाव! शिस्तीसाठीं वाखाणलेल्या अशा इंग्रजी सैन्यांतूनसुद्धां नवख्या वाटसरावर शस्त्रांचा मारा करण्यापूर्वी कोण काय याची चौकशी करण्याची तरी वहिवाट असते; पण मदनाच्या या सुंदर सैन्यांत अनोळखीपेक्षां ओळखीवरच जास्त मारा असतो! अंतरंगींचा हा ओळखीचा चोर जीवें न सोडी अशापैकीं प्रकार करून सोडतो, आणि आपल्या पांची प्राणांवर दरवडा पडत असतांना संसार-यात्रेचा तरुण मुशाफर या चोराच्या तोंडाकडे नुसता टकमका पाहात राहतो. लतिके, इंग्रज सरकारनें आम्हां तरुणांना कायद्यानें निःशस्त्र केलें; पण स्त्रियां-विषयींचा इंग्रजी पक्षपात स्त्रियांच्या या शस्त्रास्त्रांना तर हात लावीत नाहींच, पण विद्यादानानें उलट त्यांना अकलेची जोड मात्र देत आहे.

**लतिका :** कायद्याच्या कलमांनीं तुमच्या या वाग्बाणांची तीव्रता कांहीं कमी झाली नाहीं.

**मनोहर :** या युद्धाच्या समाप्तीसाठीं आम्हीं तटस्थांनीं काय करावें हें कळत नाहीं.

**लतिका :** एकमेकांकडे पाहात तटस्थ बसलें म्हणजे झालें.

**मालती :** लतिके, प्रेमविषयाची भेट म्हणजे निवडक मुक्ताफळांची ओवाळणी असें तर नाहीं ना तुला वाटत? प्रभा, आलास तसा वेड्यासारखा बोलायला लागलास! कुठें आणि काय बोलावें याचा विचार तुला फार थोडा राहतो.

**प्रभाकर :** ताई, तुझ्या मनाप्रमाणें असावयाला पाहिजे ती गंभीर मूर्ति या मनोहराची आहे; प्रभाकराची नव्हे. पाहा, जणूं काय तुम्हां दोघांच्या गंभीर प्रेमाचें संगमरवरी स्मारकच करून ठेवलें आहे कोणीं! ताई, सौंदर्य हें परमेश्वरस्वरूप आहे; आणि परमेश्वर वाचाळाला मुका करतो, आणि मुक्याला वाचाळ करतो. हा मनोहर जरासा मुखस्तंभ आहे तर इतक्या दिवसांच्या याच्या परिचयानं मुक्याला वाचाळता कशी येते हा प्रीतिशास्त्रांतला पहिला धडा तुला तोंडपाठ झाला असता!

**लतिका :** हें काय हो? तुम्ही काय बोलतां याचा विचार केलांत का? भारीच चंचल तुमची जीभ! तुमच्या बोलण्याचा अर्थ अगदीं भलता होतो.

**मालती :** लतिके, नुसती जीभ चंचल आहे का तोंडहि चंचल आहे?

मनोहर : प्रभा, तरुणींच्या पुढें नेहमीं मर्यादशील रीतीनें वागावें! लतिकेच्या तोंडावर अशी मुक्याची मीमांसा करतांना तूं जरासा विचार करायला हवा होतास.

प्रभाकर : या अविचाराला कारण हिचें तोंड! हें पाहा, मनोहरा, नुसत्या पक्षाभिमानामुळें मालतीच्या प्रेममंदिरांतली पाषाणमूर्तिसुद्धां बोलूं लागली. मग माझा काय अपराध आहे? मी तर वाङ्मयाचा विद्यार्थी. सरस्वतीच्या वाहनाभोंवतीं सुंदर नेत्रांची प्रभावळ असते. आराध्यदेवतेवरची नजर ढळून तरुण भक्तांची दृष्टि जर या सुंदर अलंकारांकडे जडली तर तो अपराध कोणाचा? माझ्या भोंवतालीं सौंदर्याच्या क्रीडांनीं काय गौडबंगाल मांडलें आहे त्याची तुला कल्पना तरी आहे का? पाहा भोंवतालच्या या मुखमंडलांकडे. प्रेमादरानें पाहण्याचा सन्मान केल्यामुळें एका मुखमंडलावरची भ्रुकुटी विनयशील लज्जेनें खालीं वळते आहे, तर न पाहण्याच्या अनादरामुळें दुसऱ्या मुखमंडलावरची भ्रुकुटी तितकीच वर चढत आहे! तीव्र दृष्टीच्या किरणांनीं एका गालावर लाजाळू जखम होते आहे, तर दुसरीकडे उपेक्षेमुळें त्या जखमेच्या तीव्र वेदना उत्पन्न होत आहेत! लोभी दृष्टीमुळें एका मुखाला आपला अधर दुसऱ्या अधरानें दाबून धरावा लागत आहे, तर दुसऱ्या मुखानें मत्सरामुळें आपलेंच अधरखंडन चालविलें आहे! विरक्त दृष्टीनें पाहिल्यामुळें झालेल्या अनादरानें एका हृदयावरचा पदर निराशेच्या जड निःश्वासानें हालत आहे, तर नजरेला नजरेची ओळख पटल्यामुळें दुसऱ्या हृदयावरचा पदर उत्कंठेच्या दणदणाटामुळें हादरत आहे! एका मूर्तीला स्पर्श न केल्यामुळें मत्सरानें कंप सुटत आहे, तर दुसरीकडे स्पर्शाच्या कल्पनेमुळें — कीं लतिके, अस्पर्श्यवृत्तीच्या कल्पनेमुळें? —

मनोहर : सरस्वतीच्या तरुण उपासका! तुझ्या देवीच्या मंदिरांत हा भ्रष्टाकार होत आहे.

प्रभाकर : मनोहरा, भलत्या टीकेंत काय अर्थ आहे? नुसत्या काकदृष्टीच्या स्पर्शमात्रानें सौंदर्याची मनोमयी मूर्ति दूषित झाली, तर मला त्यांत आनंदच वाटेल. तरुणाला आनंददायक यापेक्षां दुसरी गोष्ट तरी कोणती आहे? लतिके, सौंदर्याच्या उन्मादानें वाणी बेताल झाली तर तो सुंदर दोष कुणाकडे?

लतिका : तुम्हांला पुन्हा सांगतें, कीं बोलतांना तुम्हांला भान राहात नाहीं. मघांपासून मनोहर तुम्हांला हंसत होता.

प्रभाकर : हंसेना मला.

लतिका : आणि मलाहि हंसत होता.

मनोहर : प्रभा, मधांच्या तुझ्या बोलण्यांत तूं जो विरोध दाखवीत होतास, त्यांतल्या प्रत्येक वाक्याच्या पूर्वार्धांत तुझ्या कृपादृष्टीचा विषय इथून तिथून तुझ्या बोलण्याचा सुंदर विषयच होता. अवकृपेची वांटणी मात्र निःपक्षपातानें होत होती खरी.

(राग–तिलककामोद; ताल–दीपचंदी.)

स्वसखीस्तुतिचें ध्रुवपद तूझें।
प्रिय तिजवांचुनि गमत न दूजें ॥ ध्रु० ॥
त्या खुलवाया कडवें म्हणसी परनिंदापर हो जें।
सार्थ नाम त्याचें कीं रसना पुनरुच्चारा लाजे ॥ १ ॥

प्रभाकर : मनोहरा, दगडांवर मतें देतां आलीं म्हणजे सौंदर्यासंबंधीं बोलण्याचा अधिकार येत नाहीं. नक्षत्रांच्या पसाऱ्यांतून नेमक्या चंद्रावर दृष्टि खिळून राहिली, तर त्यांत चूक कोणती झाली? लतिका सर्वांत सुंदर आहे हें म्हणणें म्हणजे दुसऱ्याचा अपराध होतो का? अकालीं वृद्ध झालेल्या गंभीर पुरुषा, मालतीची निर्विकार मूर्ति आणि तिचें निर्विकार चित्र यांतला भेद तुला तरी सांगतां येईल का? आतां लतिकेकडे पाहा! कवितेचा व्यासंगी म्हणून कपोलकल्पित वर्णन तुला सांगत नाहीं. पाहा या गालाकडे

(राग–झिंझोटी मांड, ताल–केरवा.)

वदनफलाचें ! आहे वेष्टन साचें ॥ ध्रु० ॥
तांबुस वर्णे सुचित्रिति दंतांसी। पक्क असे सुरसाचें ॥ १ ॥
दंतमण्यांची माला झांकित कीं। रक्तावरणचि तीचें ॥ २ ॥

यौवनाच्या पहिल्या प्रहरांत प्रीतीच्या मंदिराभोंवतीं गालाच्या गुलाबी ठाण्यावर लज्जेचा नाजूक पहारा असतो. बदलत्या ऋतुमानाचे–सोडून दिला हा विषय–बदलत्या वयोमानाचे फेरफार आधीं गालावर पाहावयाला सांपडतात. सौंदर्याच्या चढत्या कादंबरीचें हें कपोलकल्पित तात्पर्य सत्यापेक्षांहि सुंदर असतें. हिंदुस्थानचा इतिहासभूगोल आहे का तुझ्या लक्ष्यांत? आपल्या भरतभूमीचें स्त्रीदेहांत एक चित्र रेखाटलेलें आम्हीं एकदां पाहिलें होतें. योगायोगामुळें गालाच्या ठिकाणीं पानिपतची रणभूमि होती. इतिहास आणि भूगोल या दोन्ही दृष्टींनीं भारतभूमीचा पानिपत हाच कपोलप्रदेश ठरतो. भारतीय युद्धानें द्वापारयुगाचा शेवट केला तो पानिपतावर! रजपुतांची सत्ता अफगाणांच्या ताब्यांत पानिपतानें दिली! मोंगलाई सिंहासन पानिपतावर

स्थापन झालें ! आणि मराठेशाहीचा मोड करून इंग्रजी सत्तेला मार्ग मोकळा करून देण्यासाठीं अहमदशहानें हिरवें निशाण रोवलें तेंहि पानिपतावर! बाल्यावस्थेंतून यौवनावस्था स्त्रीदेहांत संचरूं लागली म्हणजे तिच्या विजयाचें नवें निशाण आधीं गालावर फडकूं लागतें. यौवनाचा, दुबळ्या वृद्धापकाळांत शेवट करण्यासाठीं काळाचा कठोर घाव गालावरच्या सुरकुत्यांनीं दिसूं लागतो. तें बघ. आपल्या वृद्धापकाळाची मूर्ति मीं कल्पनेपुढें उभी केली कीं काय म्हणून, लतिका रागानें माझ्याकडे पाहूं लागली. तें बघ. बदलत्या मनोविकाराची नवी निशाणी अगोदर गालावरती दिसूं लागली.

**मनोहर :** या वेळीं किती रागाच्या नजरेनें ती तुझ्याकडे पाहते आहे ! गालावरून दृष्टि उठवून जरा वर नजरेकडे तर लाव. जरा वर पाहा—

**प्रभाकर :** गालाच्या वरची पायरी नजरेची, तर वर्णनासाठीं एक पायरी वर जाऊं. गालासाठीं भूगोल झाला तर दृष्टीसाठीं खगोल घेऊं. या दृष्टींत मंगळाची आरक्तता आहे, तर शुक्राची प्रेमळता आहे. विशाल नेत्रांना गुरूची गंभीरता आहे, तर बुधाची चंचलता आहे. ही दृष्टि रविकिरणांप्रमाणें तेजस्वी प्रकाश-दायिनी आहे, तर चंद्राची शीतलताहि देणारी आहे. सर्व ग्रहांच्या सारांश-रूपानें एकवटलेल्या या नेत्रांच्या तारामैत्रकांवरूनच षडाष्टकखडाष्टक पाहायचें सोडून देऊन उरलेल्या राहूकेतूंच्या शिताफीनें आमचे वाडवडील अनुरूप वधुवरांची योजना करण्यासाठीं कागदाचे कपटे जुळवीत बसतात हा केवढा चमत्कार आहे ! तो पाहा, नेत्रांचीं शुभ्र किरणें अधोमुखानें गालाच्या गुलाबी रंगाच्या ऊर्ध्वमुखी किरणांशीं जिथें एकरूप होतात, त्या सीमारेषेवर असलेला, मनोहरा, एकच काळसर तीळ. सौंदर्याचें हें चालतेंबोलतें काव्य सर्वांगपरिपूर्ण केल्यावर, काव्यरसाची सीमा झाली हें दाखविण्यासाठीं विधात्यानें या तिळाचा गालावर हा सुंदर पूर्णविरामच देऊन ठेवला आहे.

**लतिका :** आज माझ्या वर्णनांत अगदीं तीळ उणा पडूं द्यायचा नाहीं, असा तुमचा संकल्प दिसतो.

**प्रभाकर :** असलें सुंदर काव्य आपल्या तोंडीं असावें अशी कोणता रसिक इच्छा करणार नाहीं ?

(राग – खमाज, ताल - त्रिताल.)

करि मोहवश ना कसा । हा । नवकाव्यागम रसिकमानसा ॥ ध्रु० ॥
रमवि सुखिं न त्या वरुनि मुखरता ।
शमवि न सुरतें कवण रसरता । हृदयपिपासा ॥ १ ॥

लतिका : बरें हें रामायण आटोपणार तरी केव्हां ?

प्रभाकर : नवरामावर्णनपर एक सुंदर कांडच या रामायणांत असल्यामुळें तें तितकें कंटाळवाणें व्हायचें नाहीं. तुला माझ्या बोलण्याचा राग येतो; पण नव-यौवनाची तरळ लीला नाजूक विनोदावांचून वर्णन करितां येईल का ? आणि आपल्या सुंदर विनोदाचा नवयुवतीच्या सलज्ज स्मितांकडून सत्कार करविण्या-साठीं रसिक तरुण कोणता अपराध करायला तयार होणार नाहीं ? लतिके, तुम्हां सर्वांचा सुंदर मेळा बाल्यावस्थेची सीमा ओलांडून यौवनाच्या अनोळखी प्रदेशांत पहिलें पाऊल टाकायला तत्पर झाला आहे. यौवनाच्या नव्या देणग्या त्यांचें मोल कळल्यामुळें दृष्टिआड करण्याची प्रौढ सावधगिरी या वयांत आलेली नसते. नव्या वैभवाचा अभिमान बाळपणाच्या शेवटच्या चपळपणानें नकळत व्यक्त होतो, आणि यौवनाच्या पहिल्या लाजाळूपणामुळें पुन्हा अदृश्य होतो ! हा सुंदर चमत्कार पूर्वीं आणि नंतर केव्हांहि दिसत नाहीं. या सुंदर लपंडावांत मनोवृत्तींना अचूक हुडकून काढतांना भांबावलेल्या तरुणाचे प्राण शेवटीं डोळ्यांत उतरण्याचा प्रसंग येतो. आणि प्राणरक्षणासाठीं त्याला अमृताची जरुरी भासते.

लतिका : सारखें इकडे पाहून असें वेडेंबांकडें बोलूं नका. लहानपणाप्रमाणेंच आतांसुद्धां मोकळ्या धिटाईनें कुणाच्या तोंडाकडे पाहणें चांगलें का ?

प्रभाकर : गरजवंताला अक्कल नसल्यामुळें धीटपणाचें अवलंबन करावेंच लागतें. सौंदर्याची खरी किंमत कळण्याच्या वयांत आरशांत आपलें सौंदर्य पाहतांना आपलें वैगुण्य लक्षांत येऊन ओशाळेपणामुळें तरुणाचें तोंड दिवसेंदिवस काळवंडत जातें. आणि सौंदर्यासाठीं त्याला स्त्रियांच्या तोंडाकडे पाहावयाचा प्रसंग येतो. धांदलीच्या वेळीं नाइलाजानें धीट कोण होत नाहीं ? या वेळीं वृत्ति किती तदाकार होते म्हणून सांगूं ? सौंदर्य, प्रेक्षकाला तद्रूप करून सोडतें यांत काय नवल ? कुटिल केशपाशावरून कुटिल विचारांकडे ओढा वळतो तर विशाळ वक्षःस्थळामुळें विशाल अंतःकरणाची उदारता येते. मदिराक्षीच्या निरीक्षणानें दृष्टि धुंद होते तर मीनाक्षीच्या कटाक्षामुळें जीव माशासारखा तळमळूं लागतो.

लतिका : आल्यापासून एखाद्या भाटासारखे बडबडत आहांत.

प्रभाकर : ठीक आहे, हा एकदम गप राहिलों. आतां तोंडाला तोंड दिलेंस तर मुक्याचें व्रत सोडणार नाहीं.

लतिका : शंभर अंक मोजतें हां मी आतां, अगदीं सावकाश मोजतें. बघूं बरें

गप राहतां का ?

प्रभाकर : हं.

इंदु : बिंदुताई, पाहिलेंस ना हें ? आपल्याला वाटत होतें कीं आपण सुंदर नाहीं म्हणून; पण आज प्रभाकरांनीं सरसकट सर्वांनाच सुंदर म्हटलें व आपल्याला कांहीं वगळलें नाहीं.

बिंदु : भलतेंच कांहीं तरी ! मी पण सुंदर नाहीं, आणि तूं पण नाहींस.

इंदु : अग, निदान दोघी मिळून तरी एका सुंदर मुलीसाठीं सामग्री नाहीं का आपल्या तोंडावर ?

बिंदु : सुंदरपणासाठीं अशी वर्गणी जमा करून का कुठें होतें ? सुंदरपणाचा सलंग वाण असावा लागतो.

इंदु : मला नाहीं खरें वाटत हें. प्रभाकरांनाच विचारतें मी. [ प्रभाकराजवळ जाते. ] प्रभाकरदादा, मी आपलें मुद्दाम विचारतें तुम्हांला. आत्तां तुम्हीं सगळ्या-जणींना सुंदर म्हटलेंत, त्यांतून आम्हांला वगळलें होतें का ? का आम्हांलाहि सुंदर म्हणालांत ?

प्रभाकर : [ स्वगत ] मदनाच्या सुंदर सैन्याशीं तोंड देतां देतां अखेर बाजार-बुणग्यांशीं गांठ येऊन पडली. नयनांच्या बाणांतून निभावलों, पण या वांकड्यातिकड्या भिवयांच्या विळ्याकोयत्यांतून पसार होणें फार कठीण आहे.

इंदु : काय म्हणतें मी ? मी सुंदर आहें का ? बिंदुताई सुंदर आहे का ?

प्रभाकर : [ स्वगत ] यंदा संक्रांत तरुण पुरुषांवर आहे कीं काय ? [ उघड ] लतिके, झाले का शंभर अंक मोजून ? इकडे माझी शंभर वर्षे भरायची वेळ आली आहे.

इंदु : हें काय गडे प्रभाकरदादा असें ? आमचें ना तुम्ही ?

प्रभाकर : [ स्वगत ] बाय जोव्ह, फ्रेल्टी इज दाय नेम, ओ वूमन ? मूर्ख मनुष्याची कोटी आणि कुरूप पोरीचा लडिवाळपणा अशी बेढब जोडी आमच्या हिंदु समाजांतसुद्धां सांपडायची नाहीं. [ उघड ] काय म्हणतेस, इंदुताई ?

इंदु : नाहीं, म्हटलें मघांपासून तुम्हीं सगळ्याजणींना सुंदर सुंदर म्हणत आहांत त्यांत आमचीहि जिम्मा झाली का ? मालतीताई आणखी लतिकाताई यांच्या पलीकडेच आम्ही दोघी बसलों होतों.

प्रभाकर : मी जरासा अविचारी असल्यामुळें इतक्या दूर दृष्टीनें मी कधींच बोलत नाहीं. चुकून तुम्हांला सुंदर म्हणून गेलों असेन तर मला क्षमा करा.

लतिके, हीं कोळशांतलीं माणकें उघड्यावर टाकूं नकोस म्हणून आपल्या बाबांना बजावून सांग.

लतिका : आम्ही सगळ्या एकाच कुळांतल्या आहोंत. त्या तशा असतील तर मीसुद्धां कोळशांतलें माणिकच आहें.

प्रभाकर : अगदीं बरोबर आहे! मात्र जरा निराळ्या अर्थानें! कोळशाच्या खाणींतच हिरकणी सांपडते हा जगाचा अनुभव आहे. हीं रत्नें कुणाच्या गळ्यांत पडणार आहेत कुणास कळे! यांच्या लग्नानंतर वर्षाच्या आंत दोन तरुण संन्यासी जन्माला येतील, दोन आईबापांच्या जोड्या पुत्रांवांचून परदेशी होतील, आणि अन्नवस्त्राचे दोन खटले सरकारांत दाखल होतील.

लतिका : माझ्या माणसांना असें वेडेंवाकडें मी बोलूं देणार नाहीं.

प्रभाकर : या वेडेंवांकडेपणाबद्दल ब्रह्मदेव जबाबदार आहे. सौंदर्य प्रेक्षकाला तद्रूप करतें हा माझा सिद्धान्त एकाहून अधिक अर्थांनीं खरा आहे. किलकिल्या डोळ्यांकडे पाहतांना तरुणांनीं जराशी डोळेझांक केली, तिरक्या नाकाकडे पाहून नाक मुरडलें, काळें तोंड पाहून तोंड काळें केलें, तर ती त्या सौंदर्याशीं तदाकार वृत्ति नाहीं का? जगाची गंमत पाहण्यासाठीं ओठांच्या सज्जांत येऊन बसलेल्या दांतांची प्रभावळ पाहतांना कोण दांतओठ चावणार नाहीं? मानेवर मस्तकाची कथली बैठक पाहून कुणाचें डोकें ठिकाणावर राहील? भुरक्या केंसांचें छत पाहिल्यावर माथ्यांत राख न घालण्याइतकी शांतता एखाद्या साधूच्या ठिकाणींसुद्धां असंभवनीय आहे. तुझ्या माणसांची मी हेटाळणी करतों असें नाहीं. या मुलींना पाहण्याकरितां म्हणून जे नवरदेव येतील, त्यांचे चेहरे मात्र पाहण्यासारखे होतील.

लतिका : त्यांचीं लग्नें करण्याची जबाबदारी माझ्या बाबांच्यावर आहे. माझे बाबा कांहीं दुसऱ्या कुणासारखे गरीब नाहींत.

प्रभाकर : हा काय माझ्या गरिबीला टोमणा मारला वाटतें?

लतिका : राग आला वाटतें तुम्हांला? मघांच्या दोन संन्याशांपैकीं एक आतांच अवतरणार असें वाटतें. बाकी तुमच्या गरिबीला असा फकिरी बाणा चांगला शोभून दिसेल!

प्रभाकर : लतिके, हें तुझें प्रेमाचें बोलणें नव्हे.

लतिका : हें माझं बोलण्याचें प्रेम आहे. कुणीं सांगितलें तुम्हांला माझें तुमच्यावर प्रेम आहे म्हणून? माझें कांहीं तटलें नाहीं इतक्या गरिबीनें प्रेमाचा सवदा ठरवायला!

प्रभाकर : लतिके, मी गरीब असलों आणखी तुझा बाप लक्षाधीश असला, तरी माझ्या प्रेमाचा असा बाजार तुला करूं देणार नाहीं.

लतिका : आणि मघाशीं त्या बापड्या पोरींच्या चेहरेपट्टीचा मीनाबाजार मांडतांना तुम्हांला नाहीं कांहीं वाटलें ? तुमची नको का शोभा व्हायला ?

मालती : ताई, बोलण्यानें बोलणं वाढवून दोघांचीहि शोभा करून घ्यायची आहे का ? प्रभाकराला असें बोलणें तुला शोभतं का ? इतका तोंडाळपणा मुलीच्या जातीला बरा नव्हे.

लतिका : मला शहाणपणा शिकवायला तूं नकोस ! [ प्रभाकराला ] अहाहा, तुम्हांला फार आनंद होत असेल आतां, नाहीं ? मनोहरदादा, मालती मला शिकवायला आली. माझी कड घेऊन तूं कां नाहीं सांगत कुणाला कांहीं तरी ?

प्रभाकर : तो काय सांगणार दगड ? लतिके, एकदम सांग. तुझें माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं ? नाहीं कीं होय तेंच सांग !

लतिका : नाहीं.

प्रभाकर : मग इतके दिवस खोटें कां सांगितलेंस ?

लतिका : मूर्खाला फसविण्यापासून किती करमणूक होते माहीत तरी आहे तुम्हांला ?

प्रभाकर : लतिके, आज इतके दिवस त्याच करमणुकीचा अनुभव घेतों आहें मी ! तुझा चंचलपणा मला माहीत नाहीं कीं काय ? नीट लक्षांत ठेव, माझें-सुद्धां तुझ्यावर कधींहि प्रेम नव्हतें.

लतिका : असें का ? मग तोंड दुखेपर्यंत मघाशीं माझ्या तोंडाची तारीफ करीत होतां, ती कां ?

प्रभाकर : तोंडापुरतें बोलायला मला काय हरकत आहे ? लतिके, तूं सुंदर असशील, पण तुझें तोंडसुद्धां पाहूं नये. लक्षाधीशाची मुलगी असशील, पण कवडी किमतीची तुझी योग्यता नाहीं.

लतिका : [ रडत ] प्रेमाचें सोंग आणलेंत, तें हीं मुक्ताफळें उधळायला वाटतें ?

प्रभाकर : हो; एरवीं हीं डोळ्यांतल्या आसवांचीं मुक्ताफळें कशीं दिसलीं असतीं ?

मनोहर : प्रभाकर, मला हंसतां हंसतां आज दगडधोंड्यांचा अभ्यास तूं चालविला आहेस वाटतें ? लिहितांना अक्षरें मोत्यासारखीं असलीं म्हणजे साजरा दिसतात; पण तोंडांतून निघतांना अशा मुक्ताफळांना दगडाधोंड्यांचें रूप येतें. विनाकारण तिला रडविलीस खरी.

प्रभाकर : काय मूर्ख मनुष्य आहेस! तिला रडविण्याकरितां मी बोलेन? लतिके, खरें सांग, तूं कां रडायला लागलीस? माझें तुझ्यावर इतकें प्रेम आहे, तें तुला रडविण्याकरितां का?

लतिका : मला नाहीं माहीत! मालतीताई, हंसूं नकोस. मनोहरदादा, माझ्या रडण्याचें असें हंसें व्हायला नको आहे.

प्रभाकर : नाहीं, पण मी तुला कठीण काय बोललों तें सांग.

लतिका : मी कधीं म्हणालें असें?

प्रभाकर : ऐक मनोहरा; झाली खात्री तुझी? माझें तिच्यावरचें प्रेम अढळ आहे. रागाच्या भरांत कठीण शब्द बोलेन ते कांहीं खरे नाहींत. शिवाय लतिका आधीं कठीण बोलली, म्हणून मला बोलण्याचा प्रसंग आला. ती जराशी चंचल आहे.

लतिका : मी चंचल?–आणि तुम्ही अगदीं दगडासारखे स्थिर असाल?

प्रभाकर : झाली पुन्हा सुरुवात! लतिके, खरें सांगूं, तुझ्याजवळ बोलण्याची सोयच नाहीं मुळीं.

लतिका : तुमच्याजवळ सोयीचें बोलणेंच नाहीं मुळीं.

मालती : प्रभा, गोड शब्दांनीं बोललें तर काय होईल बरें?

प्रभाकर : सहा न चार दहा पावसाळे तुझ्यापेक्षां जास्त पाहिलेले आहेत.

मालती : आणि हा अकरावा पाहिलास आतां! पहिल्यासारखे दोन] मायेचे शब्द बोललास, तर वाईट का होईल कांहीं?

लतिका : ताई, ती सारी शब्दाची माया होती. मला यांचा स्वभाव पहिल्यापासून माहीत आहे.

प्रभाकर : म्हणून माझ्यावर प्रेम करीत होतीस वाटतें?

लतिका : प्रेम नाहीं म्हणून म्हटलें आहे ना मीं?

प्रभाकर : साफ खोटें आहे हें. तुझें प्रेम खात्रीनें माझ्यावर आहे. मघांशीं रडलीस कशी मग? जाळावांचून कड नाहीं आणि मायेवांचून रडूं नाहीं.

लतिका : प्रेमासाठीं रडलें वाटतें तुमच्या? डोक्यांत दगड घातला तर साता जन्मांचा वैरीसुद्धां रडायला लागेल. माझ्या आईची आठवण होऊन रडलें मी! माझी आई आज असती तर माझे असे धिंडवडे कां निघाले असते?

प्रभाकर : साता जन्मांचा वैरी म्हणून तुझे धिंडवडे काढण्याची माझी इच्छा नाहीं, पण पुढच्या सात जन्मांचा सलोखा करण्यासाठीं तुझी वरात काढण्याची—

लतिका : लोक हंसतात त्याचें तुम्हांला कांहींच का वाटत नाहीं? कांहीं तरी

बोलून जातां, आणि हंसायला होतें.

प्रभाकर : हंसेनात! लोकांच्या हंसण्यानें संसार कांहीं चढत नाहीं, आणि रडण्यानें पडत नाहीं. आपल्याला काय त्याचें ?

लतिका : हो खरेंच. मनाची एकदां लाज सोडल्यावर—

प्रभाकर : जाऊं दे तें! आतां पुन्हा विचारतों. आतां पहिल्यासारखें कांहीं तरी उत्तर देऊं नकोस.

लतिका : तुम्हीहि आतां पहिल्यासारखे कांहीं तरी प्रश्न करूं नका. तुमचा प्रश्न मला ठाऊक आहे.

प्रभाकर : तुझें उत्तरहि मला ठाऊक आहे. प्रीति कधीं जिभेनें बोलत नाहीं. ती ओंठांवर थरथरते, गालांवर रंगते आणखी डोळ्यांतून तरंगते.

लतिका : हें हळूं बोललां असतांत तर मला कळलें नसतें का ?

प्रभाकर : आपल्या इष्टमित्रांनीं याच गोष्टींच्या आठवणी करून देऊन वृद्धापकाळीं संसार रंगवायचा असतो. लतिके, खरें सांग, तुझें माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं ? जिभेनें नाहीं म्हण म्हणजे झालें.

मनोहर : तुझ्या उत्तराचा खरेपणा पटला नाहीं का तुला अजून ? शेवटीं तिला रागावतांना पाहून तुझी त्रेधा उडून तिला पूर्णपणें शरण गेलास.

प्रभाकर : मग त्यांत काय झालें? न वांकायला मी का दगडाचा पुतळा आहें ! लतिके, चित्रासारखें सौंदर्य पाहिल्यानंतर चित्राप्रमाणें कोण तटस्थ होत नाहीं ? मनोहरा, जिथें गुणांचें आकर्षण असतें, तिथें सतरा वेळां भांडणें झालीं तरी पुन्हा ओढून जाण्याची पंचाईत पडत नाहीं. जिथें असें आकर्षण नसतें, तिथें मात्र तुमच्याप्रमाणें न भांडण्याची पहिल्यापासून खबरदारी घ्यावी लागते.

(राग — खमाज, ताल — त्रिताल.)

स्नेहें सुगम पंथा नराचा। क्षोभ कलहजलधीचा।
शमवी साचा। शांतवीतो भवरथाच्या वैरभाव चक्रांचा॥ ध्रु० ॥
दीप अंधकारीं विपदेच्या प्रकटे उज्ज्वल देहें॥
मोक्षमार्ग सुचतातीं स्नेहें ॥ १ ॥

मालतीताई, तूं हंसूं लागलीस. लतिकेसाठीं मी तर काय, सारें जग वेड्यासारखें होईल. तुला याचें प्रत्यंतर सगळ्यांत जास्त आलें असेलच. तुझ्या प्रेमाची याचना करायला या निर्विकार मनोहराखेरीज दुसरा एक तरी उमेदवार येतो कीं काय बघूं या बरें. [ धुंडिराज व घनश्याम येतात. ]

धुंडिराज : कुसुम, कुमुद, इंदु, बिंदु, आज एक गंमत होणार आहे, बरें का? पण कुणाजवळ बोलायचें नाहीं. सांगायचें नाहीं, कळवायचें नाहीं हां! अगदीं गप्प. आज आमच्याबरोबर कोण आलें आहे हें कुणाला सांगितलें तर रागवणार बरें का आपण? मालतीताईजवळ तर अगदीं अवाक्षर काढायचें नाहीं, चकार शब्द काढायचा नाहीं कीं ब्र काढायचा नाहीं. आज कोण आलें आहे आमच्याबरोबर? कशाला आलें आहे? थट्टा करायची आहे आज एका माणसाची. हो, आणखी एका माणसाची पण थट्टा करायची आहे. हां, पण कुसुम, ती थट्टा आपण करायची, कीं प्रभाकराला सांगायचें? सांगूं तुला त्या माणसाचें नांव?

लतिका : काका, केलीत माझी थट्टा?

धुंडिराज : प्रभाकराचें नांव घेतलें म्हणजे तुझी थट्टा कशी होते, बेटा? तुला राग आला का?

प्रभाकर : काका, एखाद्याचा हक्क जर आपण घेतला तर त्या माणसाला राग कां नाहीं येणार?

धुंडिराज : तुलासुद्धां राग आला का, प्रभा? तुला जर राग आला असेल तर हें पाहा तोंड बंद केलें.

प्रभाकर : [ स्वगत ] बोलण्याच्या भरांत मी इतकें वेड्यासारखें बोलून गेलों, कीं त्याचा अर्थ चांगल्या मार्मिकालासुद्धां कळूं नये. [ उघड ] काका, तुमच्या बोलण्याचा राग कसा येणार?

घनश्याम : [ स्वगत ] संसाराच्या पाशांतून याला आतां कसा ओढून आणूं?

धुंडिराज : प्रभा, राग कां येणार नाहीं? राग यायला पाहिजे, आलाहि पाहिजे आणि आलाहि आहे. खरें सांग, रागावला आहेस कीं नाहीं?

घनश्याम : धुंडिराजपंत–[ स्वगत ] पुढें काय बोलूं आणि कसें बोलूं? वाहता ओघ थांबविण्यासाठीं नुसता नांवापुरता अडथळा पुरेसा होतो का बघूं या! [ उघड ] धुंडिराजपंत, अहो धुंडिराजपंत—

धुंडिराजपंत : भले शाबास! काय गाढव आहें मी! घनश्याम, राग खरें म्हटलें तर तुम्हांला यायला पाहिजे. बोलण्यांत एखाद्या वेळीं घसरतों तो असा बरें! बाकी मनांत आणलें–आन् कामाची तशी निकड पाहिजे, असें बोलणें एकदम थांबवितां म्हणतां; कीं बोलण्याची सोय नाहीं. बोल म्हणतां बोलणें बंद. एकदां काय झाली गंमत, एक गृहस्थ निकडीच्या कामांत; फारच कामांत होता––

घनश्याम : तसा हल्लीं मी आहें.

धुंडिराज : यस, राईट, बरोबर आहे. बोलणं दिलं सोडून. घनश्याम, ही पाहा माझी मालती. आतां मात्र बोलणार! मालती, घनश्याम, ज्या प्रसंगाला मी भीत होतां आणि ज्या प्रसंगाची आनंदानें वाट पाहात होतों, तोच हा प्रसंग. कन्यादानप्रसंगींचे अश्रु आनंदाचे असतात कीं दुःखाचे असतात, हें सांगणें मोठें कठीण आहे, राया! सुस्थळीं पडलेल्या मुलीची कन्यादानानें कायमची बोळवणी करितांना जें दुःखाचें समाधान वाटतें, जें आनंदाचें दुःख वाटतें, त्याची कल्पना मुलीच्या बापाखेरीज कुणाच्या बापालाहि यायची नाहीं. तुमचा मोठा फत्तर असेना, दगड का असेना, धोंडा का ध्यानात, काय सांगावें घनश्याम, नदीला सासरीं पाठवितांना पर्वताचें-सुद्धां पाषाणहृदय फुटल्याखेरीज राहात नाहीं. ही पोरींची जात फार दुःख-दायक! आनंदानें नटवितांनासुद्धां दुःखदायक! नथीच्या शोभेचा आनंद पाहण्यासाठीं आधीं कोवळें नाक टोंचावें लागतें. कानाला कर्णफुलें लाभण्या-पूर्वीं आनंदानें ते वेधून काढावे लागतात. पतिरूपी खरा अलंकार कुंकवाच्या सौभाग्यानें नांवानिशी रेखाटण्यासाठीं आधीं कपाळाचें मातापितरांचें सुख पुसून काढावें लागतें. घनश्याम, ही माझी धनदौलत, माझ्या घराचें भूषण, माझ्यासारख्या गरीब बापाची गरीब, साधीभोळी आणखी सुशील मुलगी; तिच्यांत असा मोठा गुण तो कोणता असणार?

प्रभाकर : काका, असें म्हणूं नका. आपण धनानें कदाचित गरीब असाल; आणि साधारण आहांत हेंच आपल्याला मोठें भूषण आहे! आपल्या उदार मनोवृत्तीचें सुंदर फळ गरिबीमुळें कमी योग्यतेचें आहे असें आपल्याला कां वाटूं लागलें? त्या मनोवृत्ति गरिबींतहि फलद्रूप होतात. खोल पाताळांत गाडलेल्या हिऱ्यांच्या खाणींतून आकाशांतल्या ताऱ्यांच्या तोडीचे हिरेच बाहेर येत असतात.

घनश्याम : धुंडिराजपंत, कन्यादानाच्या उदकाची आपण ही डोळ्यांनीं सुरुवात केली आहे. त्यामुळें या वेळीं आपणांला मालतीचे गुण दिसत नाहींत. हेंच खरें कन्यादानाचें उदक! आपला धर्म रुक्ष मनाच्या ऋषींनीं रचलेला असल्यामुळें संसारी लोकांना न पटणारे कांहीं विधि त्यांनीं सांगून टाकले आहेत. कन्यादानाची सांगता, बापाच्या डोळ्यांतून पाण्याची धार वाहात असतांना, निराळ्या उदकानें करण्याची काय जरुरी आहे? तसेंच या शुष्क वृत्तीच्या धर्मसिंधूंनीं प्रिय जनांच्या मृत्यूची बातमी ऐकतांच सचैल

स्नान करण्याची धर्माज्ञा करून ठेवली आहे. अश्रूंच्या मंगल स्नानानें तें कार्य आधींच होत नाहीं का?

धुंडिराज : नका बोवा, घनश्याम, सुतकाफितकांचें अमंगळ बोलणें नका काढूं या वेळीं. त्यांचें कांहीं प्रयोजन नाहीं या वेळीं.

प्रभाकर : बरें काका, कन्यादानाचें तरी बोलणें काढण्याचें काय प्रयोजन आहे समजलें नाहीं.

धुंडिराज : हो, तें तसेंच राहिलें, म्हणजे मुख्यच! मालती, हे घनश्याम तुला पाहावयाला आलेले आहेत.

प्रभाकर : म्हणजे? मालती पाहण्यालायक वस्तु कधीं झाली?

धुंडिराज : प्रभा, अशा वेळीं फटदिशी बोलणें म्हणजे तें शिस्तवार नाहीं, बंदिस्त नाहीं, अन् व्यवस्थेशीर नाहीं. शिवाय साजून कुठें दिसतें तें? अशा वेळीं लाघवी बोलणें असावें. ते मालतीला पाहावयाला आले आहेत. हो, तुम्ही काय म्हणालांत मघांशीं? जरा कानाला नवीन वाटलें. काय बरें? ओ यस, बरोबर; 'मागणी घालायला.' हे मालतीला मागणी घालायला आले आहेत. बरोबर आहे ना, घनश्याम?

प्रभाकर : म्हणजे? बरोबर काय आहे कपाळ?

धुंडिराज : अरे, अरे, अरे! अरे प्रभा, अरे, काय रे हें? बोलूं नकोस म्हणून सांगितलें ना? हां, घनश्याम, तुम्हांला काय मागणी घालायची ती बोला. ही मालती. आमची फुल परमिशन आहे. हो, आमचा संकोच वाटेल नाहीं का तुम्हांला? आतां जो कण्वासारखा इष्टीला म्हणून जातों तो एकदम पाठविणेचे वेळीं आशीर्वादाला हजर. अण्णा किर्लोस्कराच्या शाकुंतलांतली गंमत बरें का ही? अण्णाला बघितलें नसेल तुम्ही? जबर पुण्याईचा मनुष्य! आणि हा एकेक दंड! तें ऋषीचें सोंग घेतलें म्हणजे ऋषीसारखाच दिसायचा ना! तो धाकटा ऋषी होत असे, बरें का? हा म्हणजे शकुंतलेचा बाप नव्हे; शकुंतलेचा बाप म्हणजे कण्व.

घनश्याम : कीं ज्याच्याप्रमाणें आपण इष्टीला जाण्याकरितां म्हणून--

धुंडिराज : चांगलें सुचविलेंत! का हो, बोलणें जरा नादानें वाढतें का आमचें? हंसूं नका! मी तर जातोंच! पण तुमच्या भोंवतींची ही पोराबाळांचीहि गर्दी कमी करतों. तुम्हां तरुण मंडळीच्या संसारांत म्हातारचळाप्रमाणें पोरकटपणा असूनहि उपयोगी नाहीं. चला, कुसुम, कुमुद, सगळे छोटे बाबा लोक; चला एकदम हो, आम्ही लग्नाची ही नवीन इंग्रजी पद्धत काढली. मग हो मुलांना

बाबालोक कां म्हणायचें नाहीं ? चला सगळेजण. [ जातात. ]

**प्रभाकर :** [ स्वगत ] काकांनीं काय मांडलें आहे कांहीं कळत नाहीं. या घनश्यामाच्या माथ्यांत हा बूट कुठून निघाला ? वा:, काय सुंदर प्रसंग आहे ! हा घनश्याम मागणी घालायला आला आहे ! हा मनोहर येथेंच आहे ! बिचारी मालती चकितच झाली आहे मुळीं ! [ उघड ] घनश्याम, मालतीला मागणी घालायला सुरुवात नाहीं केलीत अजून ?

**लतिका :** मी आपली वेड्यासारखी पाहतें आहे मघापासून ! ही मालतीची मागणी म्हणजे काय ? तिच्यासाठींच घनश्यामच काय आले आहेत ? का हो घनश्याम, मालतीची मागणी म्हणजे मालती का भिक्षा आहे, का जोगवा आहे, का गोग्रास आहे ?

**घनश्याम :** ताईसाहेब, आपण अशी थट्टा आरंभिलीत तर मी अधिकच बुचकळ्यांत पडणार आहें. हें पाहा—चुकितलेंत ? आपल्याला, कीं तुम्हांला, कीं तुला ?—मी फार गोंधळून गेलों आहे. शिष्टाचाराच्या रीतीप्रमाणें आपणाला मालतीबाई म्हणावें, कीं भावी नात्याच्या कल्पनेनें मालती म्हणावें, कीं या प्रसंगाच्या चमत्कारिक अपूर्वतेमुळें कांहींच म्हणूं नये ?

**प्रभाकर :** तसें केलेंत तर फारच उत्तम होईल.

**घनश्याम :** देशमुख, आपण या वेळीं मला मदत करायला पाहिजे. मालती, वधुवरांच्या वडिलांनीं बोलायच्या या गोष्टी, काळाच्या निर्दयपणामुळें आणि तुझ्यावर वडिलांच्या मायाळूपणामुळें, बोलण्याचा आज माझ्यावर प्रसंग आला आहे. ही पाश्चात्त्य विवाहपद्धति आमच्याकडे अगदींच अपूर्व असल्यामुळें अशा प्रसंगीं तिकडच्या तरुणीपेक्षांहि आमच्या इकडच्या तरुणांना अधिक लाजल्यासारखें होऊन गेल्यास त्यांत काय नवल आहे ?

**मालती :** आमच्या सुशिक्षित तरुणांना ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

**घनश्याम :** आपल्या उत्तेजनानें मला अंमळ धीर आला असला, तरी प्रथम आपल्याला काय प्रश्न विचारावा हा मोठा प्रश्नच आहे.

**लतिका :** आणि मालतीनें काय उत्तर द्यावें हाहि मोठा प्रश्नच आहे.

**घनश्याम :** ताईसाहेब, आपण माझी विनंती विसरलां. मालती, हा मी तुझ्यापुढें उभा आहें. माझा प्रश्न स्पष्टपणें विचारण्याचें कारणच नाहीं. प्रश्नावांचून आतां उत्तर द्यायला हरकत नाहीं.

**प्रभाकर :** घनश्याम, तुमच्याबद्दल माहिती फारच थोडी सांगितलीत. मिळकतीची टांचणें, वंशवृक्षाच्या फांद्या, कुंडल्यांचीं पानें, सद्गुणाची खानेसुमारी यांच्या-

बद्दल बोलला नाहींत कुठें ? तुमचें गोत्र, प्रवर, रास, नांव, जन्मनक्षत्र—

**लतिका :** जन्मनक्षत्राच्या उपजत जोरावरच नक्षत्रासारख्या मुली मिळविण्याचे दिवस गेले ते. जन्मकाळाच्या ग्रहावरून वधुवरांचें भविष्य ठरविण्याऐवजीं वधुवरांच्या परस्परांबद्दलच्या ग्रहांवरून जन्माचे दिव्य भविष्य ठरविण्याचा हा काळ आहे. घनश्याम, ही मागणी घालतांना तुम्हीं नीटसा विचार केलेला दिसत नाहीं.

**घनश्याम :** लतिकाताई, आपण आणि देशमुख मला फार निरुत्साह करीत आहांत. ताईसाहेब, आपल्या नोकराचा उपमर्द करणें हें धन्याला शोभत नाहीं आणखी मला वाटतें, हें जरा अप्रासंगिकहि आहे.

**लतिका :** घनश्याम, नोकरानें धन्याचा उपमर्द करणें हें त्यापेक्षां अप्रासंगिक नाहीं का ?

**घनश्याम :** काय समजूं मी या बोलण्याचा अर्थ ?

**लतिका :** तुम्ही आमचे नोकर; मालती माझी मैत्रीण; आज मालतीला मागणी घातलीत, उद्यां माझ्याशीं लग्न करायला तयार व्हाल. वेड नाहीं ना लागलें तुम्हांला ? जा. मालतीच्या लग्नाच्या वेळीं तुम्हांला हजर राहावें लागेल तें नवरदेव म्हणून नव्हे, तर लग्नाच्या सामानाची यादी करण्याकरितां.

**घनश्याम :** आपण जरा जास्त बोलत आहांत. मनोहरपंत, तुम्ही मघांपासून बोलत नाहीं. बाबासाहेबांपर्यंत हें बोलणें गेलें, उद्यां तुम्हांला मी साक्षीला म्हणून बोलावीन. लतिकाताई, हे देशमुख आणखी आपण एकमेकांशीं सलगीनें बोलतांना या सर्व गोष्टींचा पुरता विचार करीत असाल, नाहीं ?

**लतिका :** लहान तोंडीं फार मोठा घांस घेतलात हा. दुसऱ्याच्या उठाठेवी कशाला हव्यात ?

**घनश्याम :** माझ्या उठाठेवी दुसऱ्यांना हव्यात म्हणून. लतिकाताई, माफ करा. आपल्या वडिलांच्या टीचभर कचेरींत मी आपला नोकर आहें. जगाच्या उघड्या मैदानांत – [ स्वगत ] मी जास्त बोलत चाललों. [ उघड हंसून ] लतिकाताई, आपण माझ्यांतला दोष नाहीं सांगितलात ?

**लतिका :** फार सोपा प्रश्न विचारलात. तुमच्या सद्‌गुणांबद्दल विचारलें असतें तर माझें तोंडच बंद झालें असतें. पहिला दोष पहिल्या प्रतीचें दारिद्र्य. दुसरा दोष दुसरें तुम्हांला कोणी नाहीं.

**प्रभाकर :** आंकडेवारी हवी कशाला ही ? शिक्षणाच्या नांवानें पूज्य, न घर ना दार, आईबापांचा ठाव ना ठिकाण–

घनश्याम : देशमुख, आईबाप नाहींत हा दोष खरा. तुमचासुद्धां हा दोष आहेच. पण तुमची कर्तबगारी अचूक! तुम्ही आईबाप मिळवून त्यांच्या आश्रयानें शिक्षणसुद्धां मिळवलेंत. माझ्यांत ही कर्तबगारी नाहीं. मी एकल-कोंड्यासारखा आपला मार्ग कापीत सुटलों. देशमुख, शाळूपोपटपंचीच्या भरांत नादानपणानें तुम्ही काय बडबडत आहांत तुम्हांला कल्पना तरी आहे? लतिका-ताई, मालतीला आपण आपल्या दृष्टीनें उपदेश करीत आहांत पण आपण श्रीमंत आहांत; दुसऱ्याच्या आश्रयावर वाढलेल्या या देशमुखांना आपण पति या नात्यानेंसुद्धां आजन्म संभाळूं शकाल. गरीब बिचाऱ्या मालतीच्या बापाला असा घरबैठा घरजांवई म्हणजे कसा संभाळतां येईल? आपल्या वडिलांच्या गजान्त लक्ष्मीला हा सयामाचा पांढरा हत्ती चांगला शोभेल. ताई-साहेब, माफ करा अं! माझी बेसूर बडबड आपल्या मनाला लागली असें वाटतें. परक्याच्या घरट्यांत वाढलेल्या या बाळकोकिळांचें गोड गाणें मला कोठून साजणार?

लतिका : सर्पासारखे तुम्ही उलटून असें विष ओकूं लागलांत? तुमचे दांत पाडून तुम्हांला निर्विष करायला मला वेळ लागायचा नाहीं.

घनश्याम : ताईसाहेब, जें म्हणाल तें थोडें आहे. पण मानवी सर्पाचे दांत पाडले म्हणजेच तो दंश धरतो हें विसरूं नका. आपल्याला वाईट वाटलें; आतां मलाहि वाईट वाटतें. आपण या बाबतींत बोलायलाच नको होतें.

लतिका : अमर्याद मनुष्या, तुझी कर्तबगारीची कल्पना फार बेसुमार आहे. घनश्याम, तुम्ही उद्दाम आहांत हें मला पुरतेपणीं माहीत आहे. बरें झालें, तुम्हीं मला मागणी घातली नाहींत.

घनश्याम : आणि असें असूनहि आपण उत्तर देत आहांत. मालती, तुझ्या-कडून उत्तराच्या कृपादृष्टीची मी अपेक्षा करूं का?

लतिका : पुन्हा मीच उत्तर देईन. मालती माझी जिवाभावाची मैत्रीण आहे. मी सुखी व्हावें अशी जशी माझी इच्छा आहे तसेंच मालतीनें सुखी असावें अशी माझी इच्छा आहे. मालतीचा बाप गरीब आहे म्हणून हें मागणी करण्याचें धाडस करूं नका. मालती आणि लतिका यांना निराळीं विशेषणें लागतच नाहींत.

मालती : ताई, उगीच शब्दाला शब्द किती वाढवितेस! घनश्याम, तुम्हीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर मला विचारानें द्यायला हवें हें खरें; पण कधीं कधीं असे प्रश्न मनापुढें उभे राहण्याच्या पूर्वींच त्यांचीं उत्तरेंहि सांपडलेलीं असतात.

घनश्याम : तुमचें उत्तर जरासें संदिग्ध नाहीं का ?

मालती : आपण पुरुष असून प्रश्न अडखळत विचारलांत; मग कुमारिकेच्या बोलण्यांत आपण संदिग्धता हा गुण समजणार नाहीं का ? हें पाहा, हृदय ही एकच वस्तु जगांतल्या सर्व सुखांची हेतुभूत आहे. आणि ही एकच वस्तु अशी आहे, कीं जी देऊन देतां येत नाहीं आणि मागून मिळत नाहीं. पुष्कळदां तर हृदय दिल्यावर किंवा मिळाल्यावर नंतर कळतें.

घनश्याम : मालतीबाई, आपल्या भाग्यशाली कृपाविषयाचें नांव मला कळेल का ?

मालती : मला वाटतें, आपल्या प्रश्नाला मीं सांगितलें तेवढें उत्तर पुरें झालें.

घनश्याम : आपलें हें उत्तर कायमच आहे ना ?

मालती : ऐकणाराला अप्रिय उत्तर देणें हें आनंदाचें काम आहे असें का आपल्याला वाटतें ?

घनश्याम : मालती, माझ्या मागणीचा अनादर होईल अशी मला कल्पना नव्हती.

मालती : आपण मागणी कराल अशी मलाहि कल्पना नव्हती. मी लतिकाताईसारखें कठीण कधीं बोलत नाहीं. पण मला या विषयाचा तिच्यापेक्षांहि कंटाळा आला आहे.

घनश्याम : मालतीबाई, माझ्या जीवितांतील अत्यंत महत्त्वाची आशा आपल्याला केवळ कंटाळवाणी वाटली ?

मालती : माझ्या जीविताच्या आशेच्या दृष्टीनें. माझ्या सौजन्यामुळें आपण आतां मला विशेष त्रास देत आहांत, असें नाहीं का आपल्याला वाटत ?

मनोहर : घनश्याम, मला असें वाटतें कीं तुमच्या प्रश्नाचें पाहिजेल तितकें उत्तर तुम्हांला मिळालें. तें अनुकूल नाहीं यामुळें तुम्हांला विषाद वाटणें स्वाभाविक आहे. पण प्रतिकूल उत्तराची उगीच ओढाताण केल्यानें त्याला अनुकूल स्वरूप कसें येणार ?

घनश्याम : ठीक आहे; मालतीबाई, मी आपला निरोप घेतों.

लतिका : तिनें तुम्हांला मघांशींच निरोप दिला आहे.

घनश्याम : तुम्हां सर्वांना माझ्याकरितां फार कष्ट पडले. मालतीबाई, तुमचा संसार सुखाचा व्हावा एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

[ घनश्याम जातो. ]

लतिका : मालती, किती जड तोंडाची आहेस तूं ? एका शब्दाला कांहीं ही पीडा

तुला टाळतां आली नाहीं. प्रभाकर, मनोहरदादाला कदाचित् आवडलें असेल पण मालतीची ही बोलण्याची रीत तुम्हांला आवडली का? आपल्या मनांत असेल तें स्वच्छ शब्दांनी बोलून दाखविणें हेंच मनुष्याचें कर्तव्यकर्म असतें.

प्रभाकर : अगदीं बरोबर आहे तुझें बोलणें.

मनोहर : प्रभा! या स्पष्ट बोलण्याच्या कर्तव्यकर्मामुळेंच, तुम्हां दोघांत नेहमीं इतकी कर्मकटकट चालत असते हें तूं विसरतोस. तिच्या म्हणण्याचा चांगला विचार केलास का?

प्रभाकर : मनोहरा, तुझ्या अंगांत दाक्षिण्य सुतराम् नाहीं. अरे, स्त्रियांच्या सुंदर सिद्धान्ताला सत्यापेक्षां सौंदर्याचें जास्त साह्य असतें.

लतिका : म्हणजे? मी विचार केल्यावांचून बोलतें वाटतें? ऐक मालतीताई –

प्रभाकर : ती काय ऐकणार? ती बोलल्यावांचून विचार करते. मीं म्हटलें तें कांहीं खोटें नाहीं अगदी. माझ्या म्हणण्याचें एकंदर तात्पर्य–

लतिका : आतां या वेळेस या वळसेवेलांट्या नकोत. माझें म्हणणें खोटें असतें हें खरें ना? उगीच लपवाछपव करूं नका.

प्रभाकर : लपवाछपव करूं नका म्हणजे? खरें बोलायला मी तुला भितों असा तुझा समज झाला कीं काय? माझीं जीं मतें आहेत तीं आहेतच.

लतिका : अगदीं माझ्यासाठींसुद्धां तुम्ही आपल्या मतांत फेरफार करणार नाहीं ना?

प्रभाकर : तुझ्यासाठीं माझ्या मतांत एक केंसभर फेरफार करायला मी तयार नाहीं. तुझ्यासारखीं मतें फिरवायला मला तुझ्याकडून आधीं थोडा थिल्लरपणा शिकायला हवा.

लतिका : तुम्हीं माझ्याकडून थिल्लरपणा शिकणार? चला झालें! अहो, हें सावलीजवळून हातवारे शिकण्यासारखें होत आहे. तुम्ही म्हणजे थिल्लरपणाचे मूर्तिमंत अवतार!

प्रभाकर : मी थिल्लर आहें नाहीं का? लतिके, तुझ्या संथपणाची, गंभीरपणाची मला काडीइतकी जरूर नाहीं.

लतिका : पाहा बरें; मग पश्चात्तापांत पडाल!

प्रभाकर : अहाहाहा! पश्चात्ताप करायला काय सद्‌गुणांची पुतळी लागून गेली आहे! विवाहमांगल्याची मंगल मूर्ति–

लतिका : खबरदार भलतेंसलतें बडबडाल तर! तोंडसुद्धां बघूं नये तुमचें!

प्रभाकर : काय त्रास आहे पाहा! जसें कांहीं हिला तोंड दाखविलें नाहीं तर मग

जगांत तोंड दाखवायला जागाच कुठें उरणार नाहीं !

लतिका : आतां जर तोंड दाखविलेंत तर तोंड पाहणार नाहीं तुमचें.

मनोहर : प्रभाकर, बस कर बोलणें आतां. मघांचे गुलाब, कमळें सारीं कोमजलीं वाटतें ? आतां बोलतां बोलतां मघांच्यासारखीं पुन्हा तिचीं आर्जवें करायला लागशील ?

प्रभाकर : चार पैशाचा फुलांचा पुडा आणला तर त्यांत बावन्न गुलाब व छप्पन कमळें येतात. अरे, मानली तर सारी बागशाही; नाहीं तर कोण्या झाडाचा पाला ! मनोहरा, तुला एक मोठें तत्त्व सांगून ठेवतों. संसाराच्या संगीताचा नेहमीं बागेश्रींत प्रारंभ होऊन वैभवांत शेवट होत असतो. मंगलाचरणाला एकजीवाचा एकताल आणि भरतवाक्याला रुद्रताल हा ठेवलेला. ठीक आहे; लतिके, यापुढें माझें तोंड तुला कधींहि दाखविणार नाहीं. हीच माझी प्रतिज्ञा.

मालती : लतिकाताई, चल तूं माझ्याबरोबर आंत.

लतिका : चल ताई. ऐकलास ना बोलण्याचा प्रकार ? म्हटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं —

(राग – यमनकल्याण, ताल – दादरा.)

कठिण कठिण कठिण किती पुरुषहृदय बाई ।
स्त्रीजातीप्रति झटतां अंत कळत नाहीं ॥ ध्रु० ॥
रंगुनि रंगांत मधुर मधुर बोलती ।
हंसत हंसत फसवुनि हृद्बंध जोडिती ।
हृदयांचा सुंदरसा गोफ गुंफिती ।
पदर पदर परि शेवटिं तुटत तुटत जाई ॥१॥

[ जातात. ]

मनोहर : अखेर भांडणांत निकाल केलास.

प्रभाकर : मला सर्व ठाऊक आहे. सांगू तुला आतां ? एक मोठी थोरली ट्रॅजेडी होणार आहे.

मनोहर : ट्रॅजेडी कसली तुझ्या कपाळाची ! अशा सुंदर प्रारंभाचा विपर्यास करावयाला परमेश्वर एखाद्या नाटककारासारखा लहरी नाहीं.

प्रभाकर : बरें काय रे, तुझें लक्ष होतें कां ? जातांना तिनें किंचित् हंसल्यासारखें केलें, तें मनापासून होतें का तिरस्कारानें होतें ?

मनोहर : माझें तितकें लक्ष नव्हतें तिकडे.

प्रभाकर : बरोबर आहे. तुझें लक्ष असेल त्या मालतीकडे. प्रेमानें बहकलेल्या तरुणांना मनांत भरलेल्या पोरींचे चेहरे पाहण्यापलीकडे काय काम असतें ? जाऊंदे; मला त्या गोष्टीची शहानिशा करून घेतली पाहिजे. मनोहरा खरेंच सांग, मी जरासा तापट आहें का रे ?

मनोहर : तुम्हां दोघांची एकच चूक होते. मनुष्यस्वभावाच्या मुख्य मुख्य गोष्टींत भिन्न मनांची मिळणी झाल्यावर परस्परांचा क्षुद्र विषयावरचा मतभेद मनावर न घेण्यानेंच प्रेमाचा परिपोष होत असतो. क्षुल्लक बाबतींत पटेनासें झालें म्हणजे एकदम प्रेमाची कसोटीच पाहूं लागणें हा फारच मोठा अविचार आहे. या दृष्टीनें मार्गक्रमण करूं लाग; म्हणजे पांच अंक मोजण्याच्या आंत तुझ्या दृष्टीस पडेल कीं ही एक कॉमेडी आहे म्हणून. चल. [ जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : धनेश्वराचें घर ]

धनेश्वर : [ स्वगत ] पाप धृतराष्ट्रासारखें आंधळें आहे, आणि शंभर पुत्रांना जन्म देणारें आहे. धृतराष्ट्रानें ही करामत उभ्या जन्मांत एकदांच केली; पण पाप मात्र प्रत्येक पळाला आपल्या पिलांच्या प्रसववेदना भोगीत असतें. मात्र या जन्मकाळच्या वेदना माझ्यासारख्या पापी जीवांना प्राण-संकटासारख्या वाटतात एवढेंच. भागीदाराला बुडविण्यासाठीं तयार केलेले हे खोटे दस्तऐवज इंद्रायणीच्या डोहांत बुडविले तर तुकारामाच्या गाथेप्रमाणें ते परमेश्वर पुन्हां बाहेर काढल्याशिवाय राहणार नाहीं. मी जर श्रीकृष्णाच्या अमदानींत जन्मलों असतों, तर मात्र हे खोटे दस्तऐवज यमुनेच्या डोहांतल्या कालियाच्या तोंडांत कोंबून ठेवले असते. माझ्या भागीदारानें स्वतःपेक्षांहि मूर्ख असा आपला मुलगाच पाठवून दिला आहे, म्हणून बरें झालें. मोरेश्वराला फसविणें हें कांहीं मोठेंसें कठीण नाहीं. पण अशानें कायमची काळजी दूर होत नाहीं ती नाहींच. छे, कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी माझा विचारच बरोबर वाटतो. लतिका मोरेश्वराला दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. पेढीवरच्या भागीदारींत केलेले लपंडाव दडविण्यासाठीं माझ्या भागीदाराच्या संसारांत भागीदारी सुरू केल्या-

खेरीज आतां भागायचें नाहीं. अन् तसें म्हटलें तर लतिकेचें तरी काय नुकसान होणार त्यांत ? पुढें पैसा मिळविण्याजोग्या तरतरीत बुद्धिवानाला पोरगी दिली काय, आणि गर्भश्रीमंत गाढवाच्या गळ्यांत बांधली काय, परिणाम दोहींचा सारखाच. व्याहीसंबंधानें त्याच्या हातांत हात घातला, म्हणजे माझ्या हातांत हातकड्या घालतांना त्यालाहि थोडीशी भागीदारी पत्करावी लागणारच. [ घनश्याम येतो. ] या, घनश्याम. घनश्याम, कोणी कांहींहि म्हणो; पण लतिका मोरेश्वराला देणें हें मोठें कल्याणप्रद वाटतें बोवा.

**घनश्याम :** [ स्वगत ] हा इरसाल थेरडा अशा आडवाटेनें कां जातो आहे ? तसें म्हटलें तर हा कांहीं चळणाऱ्यांपैकीं नव्हे. याच्या मनाचा टाव काढण्यासाठीं याच्या पोटांत शिरण्याचा रस्ताच सांपडत नाहीं.

**धनेश्वर :** तुम्ही जरा बुचकळ्यांत पडलांत ? तरुणाच्या तरतरीत बुद्धीला एखाद्या गोष्टीचा पोक्त विचार करतां येत नाहीं. हें असें एखादे वेळीं प्रत्ययाला येतें. देऊं का हा विषय तुम्हांला नीट समजावून ?

**घनश्याम :** मला वाटतें, लतिकाताईनाच या ज्ञानाची फार जरुरी आहे.

**धनेश्वर :** घनश्याम, पोरवयांत तुम्हीं बरीच कमाई करून ठेवली आहे. भाविक अजागळांपेक्षां तुमच्यासारखीं पाजी मनाचीं माणसेंच मला फार आवडतात.

**घनश्याम :** एखादे वेळीं आपली नोकरी सोडण्याचा प्रसंग आला, तर आपल्याजवळ लायकीचा दाखला मागण्याची सोयच नाहीं मुळीं.

**धनेश्वर :** तें राहूं द्या तूर्त. लतिकेला बोलवायला सांगितलें होतें ना तुम्हांला

**घनश्याम :** ही पाहा सर्व मंडळी इकडेच येत आहेत.

[ लतिका, मालती, मनोहर व मोरेश्वर येतात. ]

**धनेश्वर :** या. सगळे असे ओळीनें बसा. मोरेश्वर, बसा असे लतिकेच्या समोर. लतिके, लाजली नाहींस तूं कुठें ?

**लतिका :** बाबा, मला तुमची लाज वाटते. मांडलें आहे काय तुम्हीं हें ?

[ प्रभाकर येतो. ]

**धनेश्वर :** बसा, प्रभाकर. लतिके, प्रीतिविवाह हिंदु समाजाला अनिष्ट आहे. मोरेश्वरांचें आणि तुझें लग्न लागलें म्हणजे आपल्या दोन्ही घराण्यांचे पूर्वापार संबंध कायम राहून लौकिक वाढणार आहे; निदान लौकिक कायम तरी राहील. मी किती दूरदृष्टीनें विचार करतों आहें याची तुला कल्पना नाहीं. तुला हें लग्न कां आवडत नाहीं कळत नाहीं.

**मालती :** काका, मी सांगतें तें कारण. लग्नाला प्रीति आवश्यक असते; खरें ना ?

धनेश्वर : भलतेंच. लग्नाला एक बोहलें, वाजंत्रीं, मांडव, एक भट आणि एक नवरा, इतकी सामुग्री बस्स झाली. प्रीति हें काय खूळ आहे, हेंच आपल्याला कळत नाहीं.

लतिका : बाबा, प्रीति हा एक नेत्ररोग आहे.

धनेश्वर : म्हणजे त्यानें काय डोळे येतात का ?

लतिका : नाहीं बाबा, प्रीतीनें डोळे जातात.

धनेश्वर : मग छान. ही आंधळ्याची माळ मोरेश्वराच्या गळ्यांत घातली म्हणजे झालें. वेडे पोरी, तरीच तुला मोरेश्वराच्या घरचें जडजवाहीर दिसत नाहीं.

लतिका : बाबा, या रत्नासारखं जडजवाहीर मला नको आहे. ही धोंड माझ्या गळ्यांत बांधून संसाराच्या समुद्रांत मला लोटून देण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे हो ?

धनेश्वर : माझा अधिकार विचारतेस ? लतिके, मीं तुला जन्म दिलेला आहे.

लतिका : हो बाबा, हो. आईबापांना मुलांना जन्म देतां येतो, त्यांना मरण देतां येत नाहीं. लग्नाचें सोंग करून तुम्ही मुक्या जनावराप्रमाणें माझा गळा कापणार आहां वाटतें ?

( राग – पिलु, ताल – दादरा. )

समजतां यज्ञाचि का दुहितृविवाहा ।
यज्ञशाला स्वीय गेहा ॥ ध्रु० ॥
वर मानित आराध्यदेवता ।
गणितसां पशु तैसें तनुजादेहा ॥ १ ॥

प्रभाकर : आपल्या आर्यधर्मांत मातापितरांना हा अधिकार असतो खरा. मंत्रतंत्राच्या धार्मिक आधारावर सात्त्विक ब्राह्मणाला यज्ञांत मुक्या जनावरांच्या आणि आईबापांना लग्नविधींत वधुवरांच्या जन्मांचा सत्यानास करण्याची पुरी मुभा आहे. या धर्माच्या जोरावर मुरळ्या वाहण्याच्या निमित्तानें दगडाच्या मूर्तीला मुली वाहण्याचा प्रकार ऐकला होता. पण अशा मूर्तिमंत दगडाला मुलगी अर्पण करणारा बाप अगदीं फरसबंदी दिलाचा फत्तरच असला पाहिजे. मनोहरा, दगडाचे हे नमुने नीट लक्षांत ठेव.

लतिका : तुम्ही आपलें तोंड दाखविणार नव्हतां ना ? मग कां तोंड घालतेंत या विषयांत ! माझ्या बाबांना असे कठीण शब्द बोललेले मला नाहीं खपायचें.

प्रभाकर : बरोबर आहे. कोंवळ्या बापाची, कोंवळ्या मनाची मुलगीच कीं नाहीं तूं ! लतिके, तुझ्या बापाच्या हलक्या प्रकृतीच्या पचनीं पडतील असे

पथ्याचे शब्द कोठून आणूं मीं ?

धनेश्वर : पण हा धोंडा तुझ्या माथ्यावर दिला आहे कोणीं ? प्रभाकरा, देवासारखें, अगदीं दगडाच्या देवासारखें गप्प बसायचें असेल तर बस. तुमच्या तरतरीत बोलण्याचें कौतुक रिकाम्या वेळीं करायचें असतें. लतिके, साडेतीन हात देहाचा तुझा बाप म्हणून विचारतों आहें. या घरीं तुला दिली तर तुझें काय नुकसान होणार आहे ? चांगली धन-दौलत आहे, जमीनजुमला आहे, मोठें थोरलें घर आहे, घरामागें बाग आहे, बागेंत खाशी मोठी विहीर आहे.

लतिका : त्या घरीं दिलीत तर त्या घरापेक्षां त्या विहिरीचा जीव द्यायला उपयोग होईल खरा !

धनेश्वर : पण असा वैताग करायचं कारण काय ?

मालती : काका, असें रागावूं नका ! हल्लींच्या सुशिक्षित मुलींना इतर गोष्टीं-पेक्षां शिक्षणाचेंच जास्त महत्त्व वाटलें तर तो दोष आहे का ? आपली लतिका अशी इतकी शिकलेली, अन हे–

प्रभाकर : मालतीताई, चुकतेस तूं. या मोरेश्वराचाहि शिक्षणाशीं बराच संबंध आहे. याच्या दाट परिचयाचा एक विद्यार्थी प्रवेशपरीक्षेच्या वर्गात आहे ना ! ही अशी विदुषी आहे–

लतिका : तर हे असे विदूषक आहेत.

धनेश्वर : वः, लतिके, फारच मर्यादशील मुलगी तूं ! वडिलांनी निवडलेला नवरा–

लतिका : तसा वयोवृद्ध असता म्हणजे वडिलांइतकाच पूज्य मानला असता.

धनेश्वर : मला नाहीं वाटत, विद्या नसली म्हणजे मनुष्य लग्नाला नालायक होतो असें. शिकलेल्या मुलाला जर न शिकलेली मुलगी चालते; तर शिक-लेल्या मुलीला न शिकलेला मुलगा तरी कां चालू नये ? नवराबायकोच्या जोडींत एक कोणी तरी शिकलेलें असलें म्हणजें झालें.

प्रभाकर : क्वाइट राइट ॲन्ड ओरिजिनल ! लतिके, दॅट्स आर्ग्यूमेंट. इटीज सेन्स.

लतिका : प्रे. शट अप युवर नॉनसेन्स. इटीज ब्रूट्ल्.

प्रभाकर : तें कसें ? नीट विचार केला नाहींस. अग, स्त्रीस्वातंत्र्याची कैवारी म्हणून तर हें लग्न तुला फारच आवडायला पाहिजे. अज्ञानाच्या अंधारांत ठेवून पुरुषांनीं बायकांना गुलामाप्रमाणें वागविलें. तुझ्यासारख्या सुशिक्षित

स्त्रीला या अक्षरशत्रू गुलामाला जन्माचा गुलाम करून या गोष्टीचा सूड घेणें इष्ट नाहीं का ? इटीज लॉजिक वुइथ आ व्हेंजन्स ॲन्ड क्वाइट लाइक आ डॉटर ऑफ् ईव्ह.

लतिका : यू हार्टलेस् सर्पंट ! जास्त बोलाल तर तुमच्या पायाशीं आतां डोकें फोडून घेईन. माझे बाबा माझ्या जन्माचे धनी आहेत. माझ्याबद्दलची उठाठेव तुम्हांला करण्याचें कांहीं कारण नाहीं.

प्रभाकर : गुड् !

लतिका : प्रभाकर, अगदीं सीरियस्ली, अगदीं मनापासून सांगतें-

घनश्याम : [ स्वगत ] दॅट्स फर्स्ट क्लास टॉमफुलरी. आय वंडर, हा थेरडा अजून ट्रॅजिक मूडमध्यें कसा जात नाहीं ?

प्रभाकर : काय सांगणार होतीस सीरियस्ली ?

लतिका : हेंच सांगणार होतें, माझा प्राण जात असला आणि तुमचाहि प्राण जात असला तरी पुन्हा आपलें तोंड दाखवूं नका ! तुम्हांला अगदीं माझ्या गळ्याची शपथ आहे. बाबांना उपदेश करणारे तुम्ही कोण ?

प्रभाकर : असें ? डन ॲन्ड डन वन्स फॉर ऑल.

धनेश्वर : शाबास, लतिके ! हा खरा कन्याधर्म !

लतिका : आणि या मोरेश्वराच्या गळ्यांत मला बांधणारा हा तुमचा पितृधर्म वाटतो ? बाबा, मी निक्षून सांगतें – माझ्या अमर्यादपणाची मला क्षमा करा – या विषयाची बाटाघाट इथें क्षणभर चालविली तर मी इथल्याइथें जीव देईन. बाप आहांत कीं कसाब आहांत ?

धनेश्वर : फाजील लाड केले आणि तुला शिक्षण दिलें त्याचीं हीं फळें काय ? मनोहरा, तूं कांहीं या लोकांसारखा उच्छृंखल नाहींस. तुला माझें करणें बावगें वाटतें का ?

मनोहर : माझ्या मौनाला आपण संमति किंवा विनयाच्या अतिशयाला ज्ञानाचा कमीपणा समजत असाल, तर जरासा गैरसमज होत आहे.

धनेश्वर : काय एकाचढीं एक कारटीं निपजलीं आहेत ! तुमच्या शिक्षणामुळें मला मात्र एवढें ज्ञान झालें, कीं झाली ही सगळी चूक झाली. स्त्रीशिक्षण काय ! प्रीतिविवाह काय ! घनश्याम, हा सुधारणेचा पाचकळपणा बंद करणें इष्ट आहे कीं नाहीं, बोला ?

घनश्याम : पहिल्या पिढींत सुधारणेचा शुकपाठ झाला तो पुरा झाला. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रथमदर्शनकाळीं तिची नुसती तोंडओळख करून घ्यावयाची

होती. आज आतां ग्राह्यांश ठरविण्याची वेळ आली आहे.

**घनेश्वर :** अगदीं बरोबर. लतिके, आजपासून शिक्षणाला सोडचिठ्ठी. घरांत हा तरुणांचा तांडा जमवायचा नाहीं. हीं प्रेमाचीं पाचकळ मराठी पुस्तकें बंद. फक्त धर्मपुस्तकांचा अभ्यास. घनश्याम, या उर्मट पोरीचा सगळ्या जगाशीं संबंध तोडला पाहिजे. मराठी भाषा म्हणून ज्याला ज्याला येत असेल त्याला त्याला आपलें घर वर्ज्य. थट्टेनें सांगत नाहीं, किंवा माथेफिरूपणानें सांगत नाहीं; आचारीपाणक्यासुद्धां मराठी बोलणारा असतां नाहीं कामा! द्या रजा सर्वांना. परदेशी आणा. गुजराथी आणा. कानडी अप्पा, वाटेल तर हिब्रू आणा; पण आतां मराठी माणसें घरांत नकोत. छापील पुस्तक घरांत नको! लतिके, ही आज्ञा मोडलीस तर चालायचें नाहीं! प्रभाकर, चला सगळी मंडळी आपापल्या घरीं.

**प्रभाकर :** [ स्वगत ] काय प्रसंग आला पाहा! लतिकेनें मघांशीं जो त्रागा केला तो खरा होता का खोटा, हें पडताळून पाहण्याचा मार्गच खुंटला. हा करारी म्हातारडा बोलल्याप्रमाणें वागूं लागला – आणि हा वागणारच – म्हणजे लतिकेला भेटायचीच चोरी झाली. काय करावें? माझी मराठी जीभ कोणी कापून टाकील तर काय बहार होईल!

**घनेश्वर :** प्रभाकर, मीं तुझी थट्टा केली नाहीं.

**प्रभाकर :** ठीक आहे. आपली आज्ञा आम्हां सर्वांना मान्य आहे. मालतीबाई, चला. [ स्वगत ] कांहीं हरकत नाहीं! भेटायची चोरी झाली तर चोरून भेट घेईन! आणि मराठीला मज्जाव झाला, तर एखादा गुजराथी शामळो होईन, कानडी अप्पा होईन, नाहीं तर एखादा परदेशी सैंय्या होऊन येईन! प्रेमा-वांचून परदेशी होण्यापेक्षां प्रेमासाठीं परदेशी झालेलें काय वाईट!

**घनेश्वर :** लतिके, ही भुतावळ घरांत आणलीस तशी बाहेर नेऊन पोहोंचीव. घनश्याम, सांगितलेल्या योजनेंत एक अक्षर चुकलें तर लक्षांत ठेवा.

**लतिका :** बाबा, मरावें आणखी तुमच्या पोटीं यावें.

[ घनेश्वर व घनश्याम यांखेरीज सर्व जातात. ]

**प्रभाकर :** [ स्वगत ] किंवा मरावें आणखी भूत होऊन मानगुटीं बसावें.

**घनश्याम :** आपली आज्ञा अंमळ विचित्रच नाहीं का?

**घनेश्वर :** हजार हेतु आहेत त्या आज्ञेमध्यें. घनश्याम; घरांत कुणी वडील माणूस नाहीं म्हणून हा पोरखेळ होत आहे. या लतिकेची आई वारल्या-पासून जें नुकसान झालें आहे तें कांहीं भरून येत नाहीं. लोक चंचल म्हणतील,

पण या विचारामुळें अलीकडे झोप येईनाशी झाली आहे.

**घनश्याम :** [ स्वगत ] म्हाताऱ्याचें हें खरें स्वरूप आज माझ्या लक्ष्यांत आलें. मला संशय होताच! [ उघड ] ठीक आहे; आपला हुकूम चमत्कारिक असला तरी मी हुकुमाचा तावेदार आहें. [ जातो. ]

**धनेश्वर :** [ स्वगत ] हा प्रकार या मूर्खांना वाटतो तितका हास्यास्पद नाहीं. चार दिवस जांचांत राहिली, म्हणजे लतिका आपोआप मोरेश्वराशीं लग्न लावायला तयार होईल. आणि हें लग्न झालें तरच माझा भागीदार मला जिता सोडील. जमा केलेला वसूल खासगी खातेवहींत घालून दिवाळें काढण्याच्या बेतांत आणली आहे, याचा हा लेखी पुरावा कोणाला दिसला तर प्राणावर गदा येईल ना माझ्या! मोरेश्वराशीं लग्न लावलें म्हणजे लतिकेचें कांहीं नुकसान होत आहे अशांतला प्रकार नाहीं. आमचा भागीदार घरचा अगदीं भुकेबंगाल आहे अशांतला भाग नाहीं. स्वतःच्या आणखी पोरीच्या दुहेरी हितासाठींच मुद्दाम वेड पांघरून मला हें रुद्रावताराचें अकांडतांडव करावें लागत आहे. या खातेवह्यांतल्या हिशेबाच्या दृष्टीनें माझें करणें अगदी हिशेबी आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. [ जातो ]

## प्रवेश चवथा

[ स्थळ : रस्ता. महेश्वर हातांत पत्र घेऊन प्रवेश करतो. ]

**महेश्वर :** [ पत्र पाहात ] हेंच घनश्यामाचें पत्र. " प्रिय मित्र महेश्वर यास " – माझ्या नांवापलीकडे पुढें एक अक्षर लागेल तर शपथ! या घनश्यामाचें अक्षर लहानपणीं इतकें वेडेवांकडें राहिलें? का माझें वाचण्याचें ज्ञान लहानपणा इतकें वेडेवांकडें राहिलें? या प्रेमासाठीं आणि लग्नासाठीं काय एकेक आपदा भोगाव्या लागतात पाहा! बाबांनीं लहानपणीं नेहमीं म्हणावें, कीं बाळा महेश्वरा, चार अक्षरांनीं हात धड झाला नाहीं तर दोन हाताचे चार हात करणें मोठें जड जाणार आहे. बाबांची बत्तिशी पुरेपूर वठली! पण आतां मेलेल्या म्हाताऱ्यावर दातओंठ चावण्यापेक्षा चार घरीं दांतांच्या कण्या करून टाळक्यावर अक्षता उधळून घेतल्या पाहिजेत. आमच्या गावांत आम्हांला कोठें स्थळच मिळेना! या घनश्यामाच्या तरी प्रयत्नाला यश येवो

म्हणजे झालें. बाकी हा खटपटी मनुष्य आहे; देईल जुळवून कोठें तरी लग्नाचें. काय गंमत आहे पाहा! घर आहे, दार आहे, एवढा थोरला मी आहें, पत्रिका आहे, पण लग्नाला अजून ठिकाण नाहीं. परमेश्वरा! लग्नाच्या अशा पेंचांत पकडण्याऐवजीं मनुष्यप्राण्यांतसुद्धां पाखरांप्रमाणें प्रेमाच्या उपजत जोड्या कां निर्माण केल्या नाहींस? [ घनश्याम येतो. ] [ उघड ] शाबास, घनश्याम! पत्रांत वेळ सांगितलीस एक, आणखी—

**घनश्याम :** कोण, महेश्वर? आलास केव्हां येथें?

**महेश्वर :** मित्रा घनश्यामा, विरहिणीवांचून झुरणारा एखादा विरही, लग्नावांचून विधुर झालेला एखादा हतभागी, कारणावांचून शोक करणारा एखादा कमनशिबी तूं कधीं पाहिला आहेस का? घनश्याम, तसा हतभागी तरुण पुरुष सांप्रत तुझ्यापुढें उभा आहे. या प्रणयी पुरुषाचें नांव महेश्वर. दोस्त, मी विरहानें अगदीं वेडा झालों आहें! काय सांगू तुला? जिवलग मित्रा, ही विरहावस्था मोठी कठीण आहे बरें! विरहावस्थेचा काळ तिन्ही काळांचा कट्ट काढाच आहे म्हणेनास? विरहावस्थेंत पावसाळ्याच्या अखंड धारा आहेत; उन्हाळ्याप्रमाणें ताप आहे, आणि हिंवाळ्याप्रमाणें लांब रात्री आहेत! हंसूं नकोस! इंग्रजी राज्यांत सूर्य कधीं मावळत नाहीं तसा मदनाच्या राज्यांत चंद्र कधीं मावळत नाहीं. आणि गंमत ही, तो मुखचंद्र डोळ्यांसमोर असला तरी भोंवतालचा अंधार कमी होत नाहीं! घनश्याम, तुझा जिगर दोस्त प्रस्तुत अशा विरहांत सांपडलेला आहे. या कविजनांनीं अगदीं भरमसाट गोंधळ करून ठेवला आहे.

**घनश्याम :** महेश्वरा, तुझें लग्नच जर झालें नाहीं म्हणतोस, तर मग ही विरहावस्था कोठून उत्पन्न झाली?

**महेश्वर :** चुकलेल्या तरुणा, विरहावस्था ही सहा प्रकारची असते! एक बायको अजिबात मेल्यामुळें उत्पन्न होणारा चिर-विरह! हा सगळ्या विरहांचा मोंगल बादशहा! या अवस्थेच्या जुल्मापुढें मोंगलाई म्हणजे कांहींच नाहीं! घरांतल्या घरांत बायको आजारी पडून जो विरह भोगावा लागतो तो प्रत्यक्ष-विरह! बायको माहेरीं गेल्यामुळें परोक्ष-विरह भोगावा लागतो! किती झाले? चिर-विरह, प्रत्यक्ष-विरह, परोक्ष-विरह! घरांतल्या घरांत तंटाबखेडा होऊन अबोला झाला म्हणजे वाङ्मय-विरह सुरू होतो! बायको जराशी नजरेआड झाल्यामुळें जो विरह वाटतो तो क्षणिक-विरह! आणि मुळींच लग्न न झाल्यामुळे बायको नाहीं म्हणून जो विरह भोगावा लागतो तो प्रारंभ-विरह! विरहांची

ही नांवनिशी, मीं उलट्या अनुक्रमानें तुला सांगितली हें लक्षांत ठेव म्हणजे झालें! घनश्याम, प्रणयाच्या संसारांतले हेच मुख्य षड्रिपु. सांप्रत मी पहिल्या म्हणजे प्रारंभ-विरहाची अवस्था भोगीत आहें. विरहाची अवस्था कोणतीहि असो, तळमळणाऱ्या जीवाला काम मात्र एकच असतें, कीं विरहाच्या भयाण अंधकारांत एकट्यानें बसावयाचें आणि आपल्या प्रिय मुखचंद्राचें चिंतन करायचें!

घनश्याम : पण या लग्नापूर्वीच्या विरहावस्थेंत, चिंतनाच्या वेळीं प्रियेचा मुखचंद्र कधींच न पाहिल्यामुळें; जराशी गैरसोय होते नाहीं का?

महेश्वर : नाहीं! काव्यप्रदेशांतल्या नवख्या मुशाफरा, मुळींच नाहीं. कवींच्या कृपादृष्टीमुळें ही गैरसोय कधींच उद्‌भवत नाहीं. प्रणयाच्या सृष्टींत कवींच्या कर्तबगारीमुळें सगळ्या सुंदरींचीं तोंडें चंद्राच्या वळणाचीं तरी असतात किंवा कायमचीं 'कमल' छापाचींच असतात; म्हणून ठोकळ मानानें चेहरा पुढें उभा करायला हरकत पडत नाहीं! मित्रा, मी या विरहावस्थेमुळें बेजार होऊन गेलों आहें! आणि एकदांचें लग्न जमवून टाकून या मुखचंद्राची पीडा टाळण्यासाठीं तुझ्या तोंडाकडे आशेनें पाहात आहें! मित्रा, या संकटांत मला हात दे, आणि एखाद्या तरुणीचा हात माझ्या हातांत दे.

घनश्याम : स्थूल मानानें त्या तरुणीची रूपरेखा कशी असावी याबद्दल कांहीं अटी आहेत का?

महेश्वर : अटी आतां नव्यानें काय ठरवावयाच्या? काव्यसृष्टींतले सर्व कायदे-कानू पूर्वींच कायमचे ठरून गेले आहेत! सांगितलें ना तुला, काव्यसुंदरी नेहमीं एकरूपच असते.

घनश्याम : अशी काव्यांतली नायिका मिळविण्यासाठीं काव्यांतील नायकांप्रमाणें तुला धाडसें करावीं लागतील. आहे तुझी तयारी?

महेश्वर : धाडस? जगांतल्या जगांत वाटेल तें धाडस करायला सांग. माझा एकच वुइक पॉइंट आहे; आणखी तो म्हणजे स्मशान. स्मशानांत जायचें नांव काढलेंस, कीं प्राणसंकट वाटतें बघ! लहानपणापासून एवढी काय ती दहशत मनाला बसली आहे. स्मशानांत पाऊल टाकल्याबरोबर माझा मुडदा झालाच म्हणून समज! जीव गेला तरी मी एकटा म्हणून स्मशानांत जायचा नाहीं. एवढी एक गोष्ट वजा कर आणि या जित्या जगांत वाटेल ती गोष्ट करायला सांग.

घनश्याम : आणि ती गोष्ट वाईट असली तर? समज, तें एखादें सामाजिक

पातक असलें तर? फसगत झाली तर तुरुंगांत नेऊन ढकलण्याजोगें असलें तर?

**महेश्वर :** मित्रा, मी विरहावस्थेचा मलूलपणा टाकून देऊन जरा बोलतों. प्रेमाच्या सृष्टींत कसलें आलें आहे पाप? प्रेम सदा सर्वकाळ पवित्र असतें. प्रेमाचा बंदिवान् तुरुंगांत जायला तयार असतो. आणि पातकाविषयीं म्हणशील तर प्रणयी पुरुषांनीं कोणतीं पापें करायचीं बाकी ठेवलीं आहेत? अरे, नुसत्या दशकुमारांतल्या दहा नायकांचीं पापें निस्तरण्यासाठींच परमेश्वराचे दहा अवतार अपुरे पडतील! सांग, मकरंदाप्रमाणें वेषांतर करूं, शर्विल्काप्रमाणें चोरी करूं, का दुष्यंताप्रमाणें मृगबालकांचा खाटीक बनूं? का बागेंत बसून भुंगे, माश्या मारूं? मालतीसाठीं माधव स्मशानांत गेला तेवढें एकच साहस काय तें आपल्याकडून होणार नाहीं.

**घनश्याम :** ठीक आहे – तूं सांगितलेल्या धर्तीचीं कामें मीं तुझ्याकडे देणार आहें. मात्र यांपैकीं कोणत्याहि गोष्टीची वाच्यता होतां कामा नये. दे पाहूं असें वचन.

**महेश्वर :** हें घे. त्या भावी प्रणयिनीची शपथ घेऊन सांगतों, कीं तूं सांगशील त्यांपैकीं एक अक्षरसुद्धां तोंडून फुटणें शक्य नाहीं. सांग मला काय करावें लागेल तें.

**घनश्याम :** शर्विल्काप्रमाणें चोरी करावी लागेल; मकरंदाप्रमाणें नाटकी वेषांतर करावें लागेल; फार काय, आधुनिक नाटककारांप्रमाणें भाषांतरहि करावें लागेल. डोळे उघडे ठेवून आंधळ्यासारखें वावरावें लागेल. आहेस तयार?

**महेश्वर :** प्रेम आंधळें असतें ही गोष्ट जगजाहीर आहे. तूं सांगशील ती प्रत्येक गोष्ट करायला मी तयार आहें.

**घनश्याम :** ठीक आहे. माझ्या विचाराला तुझी अनुकूलता असेल तर तो घडवून आणण्यासाठी यापुढें तूं आणि मी खऱ्या स्वरूपांत एकत्र असणें योग्य नाहीं. हा पत्ता घे. या ठिकाणीं जाऊन आपल्या राहण्याबसण्याची सोय कर. मात्र एक अक्षर कुठें बडबडलास तर असा चतुर्भुज होण्याऐवजीं तसा चतुर्भुज होशील, लक्षांत ठेव.

**महेश्वर :** त्याबद्दल तूं काळजीच सोड.

**घनश्याम :** आपल्याला काय काय करावें लागणार तें मी एकदां नीटपणें ठरवून टाकतों.

**महेश्वर :** असेंच का म्हणेनास, कीं आपल्या ह्या कपटनाटकाचें तूं आतां प्लॉटिंग जमविणार आहेस. मात्र वेळ उगीच फुकट जाऊं देऊं नकोस. मी

विरहानें किती आतुर झालों आहें, याची तुला कल्पना आहेच.

धनश्याम : तुझ्या आवडत्या भाषेंत बोलायचें म्हणजे यापुढील आपल्या पहिल्या प्रवेशापासून ॲक्शनला सुरुवात करायची. बरें. चल तूं आतां पुढें.

महेश्वर : वाः, कोणत्याहि नाटकांतला व्हिलन आणि हीरो इतक्या सलोख्यानें कधींच बोलले नसतील! [ जातो. ]

धनश्याम : या मूर्खाला हें कळत नाहीं, कीं या कपटनाटकांत चांगला उपयोग करून घेण्यासाठींच मीं या विनोदी पात्राची योजना केली आहे. मात्र याच्या म्हणण्याप्रमाणें एक गोष्ट खरी आहे, कीं हा धनश्याम या नाटकांतला व्हिलन आहे. मी असें दुष्ट कां होऊं नये? नाटकांतल्या नीच पात्रांच्या धूर्त बुद्धि-मत्तेनें आपले बेत कां रचीत बसूं नये? लतिके, मालती सुखी व्हायला पाहिजे आणखी तूं सुखी व्हायला पाहिजेस, नाहीं का? उद्यां तुम्ही माझ्याशीं लग्न कराल! कालपर्यंत मालती मला दुर्मिळपणामुळें मिळविण्याजोगी वाटत होती. पण धनेश्वराच्या उर्मट पोरीनें तें माझें मानी मन आज आपल्याकडे ओढून घेतलें आहे. एकदां मला असें ओढल्यावर पुढें माझ्या मगरमिठींतून मीं कुणाला अजून सुटूं दिलें नाहीं. एकट्या तुझ्या लग्नाचेच धिंडवडे काढून माझें समाधान व्हायचें नाहीं. तुझ्याबरोबर मालतीहि दुःखांत पडायला पाहिजे. महेश्वराच्या गळ्यांत मालतीची धोंड बांधली तर? प्रेमकल्पनांनीं पिसाळलेला तो मूर्ख मुलगा तिला कदाचित् गळ्यांतला तन्मणी करील. नाहीं, लतिके, हें समाधान मी तुला लाभूं देणार नाहीं. पहिल्या प्रतीच्या मानी लतिकेला जसा पहिल्या प्रतीचा मी, तसा मालतीसाठीं दुय्यम बदमाष कोण शोधून काढूं? अहाहा, लतिके, तुझा पाजी आणि रंगेल बाप असल्यावर दुसरा कोण कशाला पाहिजे? धुंडिराज भित्रा आहे. ओळखीला दुबळा आहे आणि मनाचा प्रेमळ आहे. अनोळखी महेश्वराची ओळख लावून धुंडिराजाला चोरीसारख्या गुन्ह्यांत गुंतवितों म्हणजे झालें. – नुसत्या कल्पनेनेंच काय मी ब्रह्मानंदांत रंगून गेलों आहें! कर्तबगार बुद्धिमत्तेच्या नीच वृत्तीची निशा और आहे. यांत वाईट होतें आहे तें एकच होतें आहे. या सर्व प्रकारच्या मुळाशीं असलेली धुंडिराजाच्या स्वभावाबद्दलची माहिती त्यानें आपण होऊन मला सांगितली आहे. मीं आपल्या अक्कलहुषारीनें ती मिळविली नाहीं, एवढाच काय तो कमीपणा आहे. देवि बुद्धिमत्ते! एवढ्या मुर्दाड माणसाचा बळी दिल्याबद्दल तुझ्या एकनिष्ठ भक्ताला माफ कर. लतिकेसाठीं मालती, आणि मालतीसाठीं धुंडिराज अशी ही दावण मला बांधावीच लागणार. मालतीला

उचलतांना धुंडिराजाचें प्रेमळ मन दुखावलें तर त्याबद्दल जगाची जन्मकुंडली जबाबदार आहे. कळी कुस्करतांना गुलाब दुखावला तर मी त्याला काय करूं ? या आटोपशीर जगांत संसाराच्या सुखाची रचनाच अशी चमत्कारिक झाली आहे, कीं कधीं कधीं लग्नाच्या मांडवांतली आरास साजरी करण्यासाठीं एखाद्या जित्या जिवाची चिता भडकवावी लागते ! [ जातो. ]

## प्रवेश पांचवा

[ स्थळ : वेटिंगरूम. पात्रें : धुंडिराज – भोंवतालीं उतारू. ]

**धुंडिराज :** कांहीं नाहीं म्हटलें तरी गाडीला अजून दोन कलाक अवकाश आहे. तेव्हां गाडी सांपडावी असा अंदाज वाटतो बुवा ! पण काय नेम सांगावा ? गाडी निघून तर गेली नसेल? नाहीं, मी येण्याच्या पूर्वी गेली ती बाराची आणि ही दुसरी तिहीची ! अहो पहारेकरी, तिहीची गाडी गेली तर नाहीं ना ? आतांशा एक झाला आहे !

**पहारेकरी :** मघांच गेली !

**धुंडिराज :** म्हणजे ? तिहीची गाडी गेली आणि ती केव्हां ?

**पहारेकरी :** बारा वाजतांना !

**धुंडिराज :** अन् बाराची ?

**पहारेकरी :** बाराची गाडी आतां तिहीला येईल ! म्हातारबुवा, बसा बेफिकीर जरासे अन् जरा हुशार राहा. हल्लीं चोराचिलटांचा इथें फार त्रास आहे. [ जातो. ]

**धुंडिराज :** काय माणूस आहे ! जो तो आपल्याच ह्याच्यांत असतो ! बाकी अशा मुशाफरखान्यांत असलींच माणसें पाहिजेत ! काय मुशाफरखाना हा ! घटकेच्या वसतीसाठीं आलेल्या माणुसप्राण्यानें अशा चांगल्या जगांत किती घाण करून ठेविली आहे, याचें आटोपशीर स्वरूप या मुशाफरखान्यांत पाहायला मिळतें ! जाऊं द्या, आपल्याला काय करायचें आहे ! जरा हातपाय आवरून मुकाट्यानें पडावें झालें ! झोंप तर नाहीं ना लागायची ? म्हणजे मात्र गाडी अंगावरून येऊन गेली तरी कळायचें नाहीं ! या बारक्या घड्याळांना गजर असायला पाहिजे होता ! बाकी स्टेशनवरची घंटा म्हणजे राजघंटाच

ती ! लवंडतोंच जरा, बघूं या तरी खरी काय गंमत होते ती !

[ पडतो. एका बाजूनें पोलिसवेषांत घनश्याम व महेश्वर येतात. ]

घनश्याम : महेश, विसरूं नकोस कांहीं. नांव मोरेश्वर. आजीच्या गोष्टीची आठवण द्यायची. तो बघ अनायासें एका बाजूला पडला आहे. आणि पहारेकरी पेंगायलासुद्धां लागला तिकडे. आटोप लवकर ! मोरेश्वराला तिकडे नेऊन मी बसविलाच आहे. थोड्या वेळानें इथून गेल्यावर त्याला इकडे परत लावून दे.

महेश्वर : तूं पोलिसासारखा कांहीं दिसत नाहींस !

घनश्याम : काय, पागल आहेस काय ? मी तसा दिसूं लागलों तर खोऱ्या पोलिसानें या म्हाताऱ्याला पकडण्याऐवजीं खरा पोलीस मलाच पकडील ! बाकी, प्राणांवरच जर आलें तर परजिल्ह्यांतली केस आहे म्हणून सांगूं म्हणजे झालें ! ते खोटे दागिने आहेत ना नीट ?

महेश्वर : लुक हियर. खोटे दागिने, खोटा पोलीस, खोटें काम ! – घनश्याम, खरें सांगूं एकच तुला ? या जगांत प्रेम हें एकच खरें आहे !

घनश्याम : चूप ! आपल्या कामाला लाग ! [ जातो. ]

धुंडिराज : झाली झोंप ! आतां 'कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती '—

महेश्वर : ओहोहो ! कोण ? काका ? इथें कुठें तुम्ही ? [ जवळ जाऊन बसतो. ]

धुंडिराज : [ स्वगत ] हा कोण बरें ? आली पंचाईत ! [ हंसून ] जरा गाडीनें जायचें आहे; या, बसा–असे सतरंजीवर या ! बरें झालें बुवा भेटलांत ! कोणी ओळखीचें असल्याखेरीज बघा वेळ जात नाहीं !

महेश्वर : काका, तुम्ही मला अहोजाहोसुद्धां म्हणायला लागलांत ! फार वर्षांनीं भेटलों म्हणून कीं काय ?

धुंडिराज : [ स्वगत ] फार वर्षांपूर्वींची ओळख आहे ! आणखी बराच सलगींतला आहे ! नांव काय पण याचें ? पोरीबाळींच्या हातांवर रामनाम गोंदवतात किंवा पुरुषांच्या हातावर नाम रेखतात, त्यापेक्षां नांव कपाळावर कोरायची कां नाहीं वहिवाट निघाली ! [ उघड ] अहो-जाहोच म्हणायचें आतां ! तुम्ही लोक आतां मोठे झालांत. हें बघ आतां तुम्हांला— तुला— लहानपणाच्या नांवानें हांक मारायची— पण तुझें लहानपणचें नांव तोंडांतून मी काढायचा नाहीं !

महेश्वर : काका, पहिल्यासारखें मोरूच म्हणावें लागेल !

धुंडिराज : [ स्वगत ] मोरू ! हा बहुतेक मोरेश्वरच ! [ उघड ] भलतेंच ! अहो,

मोरू असें म्हणून कुठें भागतें आहे का ?

**महेश्वर :** असें कां बरें म्हणतां, काका ? एवढासा तर तुम्हीं मला खेळविला आहे ! तुम्ही विसरलां असाल; माझी आजी वारली त्या वेळीं —

**धुंडिराज :** बरोबर ! तुला आठवण आहे का रे अजून ? फार लक्ष्यांत ठेवलेंस ! आणि आम्ही तुला जड डोक्याचा म्हणत होतों ! सांगू तुला आतां ? काल-मानाप्रमाणें माणसाला अक्कल वाढत जाते बरें का ! आतां चांगला वडिलांचा कारभार पाहण्याजोगा झालास ! वडील बरे आहेत ? घरचीं माणसें खुशाल ? आमच्या बरोबरचीं माणसें बरें का तीं ! थकले असतील आतां वडील तुझे ! आतां कामकाज सगळें तुलाच पाहावें लागत असेल ! कांहीं कामाकरितांच निघाला असशील ? आणि काय रे हें ? बरोबर सामान नाहीं सुमान नाहीं ! हें पाहा बुवा, प्रवासांत अशी फटिंग वृत्ति कामाची नाहीं ! अंथरायचें, पांघरायचें ज्याच्या त्याच्याबरोबर पाहिजे !

**महेश्वर :** माझें सामान पलीकडच्या –त्या जागेंत आहे.

**धुंडिराज :** आणि तूं इथें ? अरे, काय म्हणावें काय तुम्हांला ? चोराचिलटांचा फार उपद्रव आहे बरें ! मला माहिती आहे ना ! माहिती आहे म्हणजे पोलिसानेंच सांगितलें ! जा घेऊन ये सामानसुमान सगळें. सामानसुमान जवळ पाहिजे ! नाहीं गड्या ! म्हटलें तें खोटें नाहीं, अकलेचे तुम्ही आपले असेच पहिल्यासारखेच ! तोंडवळा मात्र बदलला आहे. तूं जर सांगितलें नसतेंस तर तुला ओळखायची माझ्या बापाची–अरे वेडा आहेस का ? तुझ्या बापाची-सुद्धां ताकद नव्हती ! जा, आण सारें सामान.

**महेश्वर :** जातों. पण हें एवढें जोखमीचें सामान आहे तें ठेवा तुमच्याजवळ म्हणजे तें सामान घेऊन येतों ! दागदागिने आहेत याच्यांत बरें का ! जरा जपा म्हणजे झालें ! जाऊं मी ?

**धुंडिराज :** अरे जा रे, आमची बुद्धि म्हणजे कांहीं पोरा बुद्धि तेरा नव्हे ! आम्ही जुनीं माणसें म्हणजे लंचांडांत सांपडणारीं नव्हे बरें का !

**महेश्वर :** गॉड ब्लेस यू ओल्ड फूल ! [ जातो. ]

**धुंडिराज :** ( स्वगत ) हें वळकटींत ठेवलें पाहिजे ! ह्या पोरांना म्हणजे सुमारच नसतो ! आपले भाजीपाल्यासारखे उघडच घेऊन हिंडत होता ! जोखमीचें म्हणजे जोखमीचें काम ! [ घनश्याम व मोरेश्वर येतात. ]

**घनश्याम :** पुढें या जरा. या गृहस्थाचें नांव काय ?

**मोरेश्वर :** धुंडिराज. आमचे धोंडूकाका हे.

घनश्याम : तुमचें नांव काय ?

मोरेश्वर : मोरेश्वर.

घनश्याम : काय हो, या गृहस्थाला तुम्ही ओळखतां ?

धुंडिराज : हो, मोरू तर तो कोण ? मोरूच ना तूं ?

मोरेश्वर : हो, काका !

घनश्याम : मोरेश्वर, तुम्ही आपल्या जागीं जाऊन बसा. [ मोरेश्वर जातो. ] तो कोण हें तुला पाहिजे नाहीं का ? तो कोण आहे हें तुला माहीत आहे, तूं कोण आहेस हें त्याला माहीत आहे, आणि तुम्ही दोघे कोण आहांत हें मला माहीत आहे ! अरे थेरड्या, गलथानपणाचें सोंग पांघरून अशा बदमाषा करतां काय ? गरिबीच्या पांघरुणाखालीं अशा चोऱ्या फार दिवस लपत नाहींत ! तुझ्या बापाचा माल आहे का हा ? काय आहे ह्यांत बोल ?

धुंडिराज : दागदागिने आहेत यांत.

घनश्याम : कुठून आणलेस ?

धुंडिराज : हें एका इसमानें मजजवळ ठेवायला दिले आहेत.

घनश्याम : त्याचें नांवगांव सांग—

धुंडिराज : मला वाटतें त्याचें नांव मोरेश्वर आहे म्हणून.

घनश्याम : तुझा बाप आतां गेला तो मोरेश्वर ! म्हातारड्या, मुकाट्यानें कबुलीजबाब दे. पलीकडच्या वेटिंगरूममधून तूं आणि तुझ्या त्या साथीदारानें त्या मुलतान्याचे हे दागिने चोरलेले मला माहीत नाहीं कीं काय ? ही पाहा चोरीच्या मालाची यादी, आणि हा चोरीचा माल ! त्यानें चोरले आणि तूं आपल्याजवळ दडविलेस. फार दिवसांनीं दोघे सांपडलांत. आतां जास्त वडबड करूं नकोस.

धुंडिराज : आकाश कोसळलें हो माझ्यावर ! काय बोलतां आहांत हें ?

घनश्याम : अक्षर बोलूं नको म्हणून सांगितलें ना ? मुकाट्यानें चौकीवर चल. आणि कबुलीजबाब लिहून दे. तुला काय बोलायचें असेल तें कोर्टांत माजिस्ट्रेटपुढें बोल.

धुंडिराज : मी पोराबाळांचा धनी आहें हो ! मला चौकीवर नेऊं नका. माझी काय चूक झाली असेल तर आपले पाय धरतों. मी एक अब्रूदार गरीब मनुष्य आहें. मला चौकीवर नेऊं नका. मला इथं आपल्या पायांपाशीं शासन करा. पण माझी अब्रू घेऊं नका. साहेब, माझ्या कच्च्याबच्च्यांचे बाप व्हा.

घनश्याम : खरें सांग; केलीस कीं नाहीं चोरी ?

धुंडिराज : मी काय बोलूं ? माझी बोबडी वळली ! आपणच माझ्याबद्दल बोला आणि कसें तरी करून माझीं मुलेंबाळें वांचवा. आपल्या हातीं अब्रूनिशी मला माझ्या मुलाबाळांत नेऊन सोडा एकदांचा. मी लबाड मनुष्य नाहीं हो.

घनश्याम : मग काय त्या हरामखोराच्या संगतीनें फसलास ?

धुंडिराज : नशिबानें फसलों खरा ! पण साहेब, आपण माझे धर्माचे आईबाप आहांत. मला सोडवा हो कसें तरी. माझ्या मुलांना हें जर कळलें तर तीं जागच्याजागीं तडफडून पटापट प्राण सोडतील. अगदीं लहान लहान आहेत हो सगळीं !

घनश्याम : तुझ्यावर दया करायला—पण तसा मोकळा तरी सोडावा कसा तुला ? थांब, पहिल्यानेंच पकडला आहे नाहीं का तुला ? पूर्वी कुठें शिक्षा झाली आहे का तुला ?

धुंडिराज : मी कुटुंबवत्सल मनुष्य आहें हो ! सरकारदरबार आम्हांला माहीत-सुद्धां नाहीं.

घनश्याम : थांब, संशयाचा फायदा तुला देतां येण्यासारखा आहे. आजच्या अपराधाचा कबुलीजबाब लिहून दे, आणि पुनः असें करूं नकोस. पुनः अशा बदमाषींत सांपडलास तर मात्र दोन्ही वेळचा खटला भरण्यांत येईल. सहीसाक्षीनिशीं कबुलीजबाब लिहून देत असलास तर एक वेळ तुझ्यावर दया करीन.

धुंडिराज : देतों लिहून वाटेल तो जबाब. पण माझ्यावर कांहीं येणार नाहीं ना ?

घनश्याम : नाहीं येणार. मी पण पोराबाळांचा बाप आहें. पोराबाळांचें नांव काढलेंस म्हणूनच एक वेळ गय केली. हा घे कबुलीजबाबाचा नमुना. यांत तुझें नांव, गांव, तारीख एवढीं बदलून आपल्या हातानें नक्कल तयार कर. थांब, एक साक्षीदार बोलावतों, त्याच्या देखत लिही. हो — पण हें तिसऱ्याला कळून उपयोगी नाहीं. नाहीं तर फुकट मरशील. दम खा. मसुद्यांत फेरफार काय करायचा तेवढें लक्ष्यांत आलें ?

धुंडिराज : आलें आहे, सरकार !

घनश्याम : मग मी साक्षीदार बोलावून आणतों, त्याच्या देखत सुकाळ्यानें नक्कल कर म्हणजे झालें. कबुलीजबाबाला तुझा दस्तुर पाहिजे. लाग, लिहायला लाग. हें घे लिहायचें सामान. [ धुंडिराज लिहूं लागतो. ] [ मोठ्यानें ] ए मोरेश्वर, इकडे ये. लाग लिहायला लाग तूं. लवकर लिही. अजागळाप्रमाणें

मध्येंच कांहीं विचारूं नकोस. [ मोरेश्वर येतो. ] मोरेश्वर, तुझ्या देखत हा म्हातारा लिहीत आहे. त्याची सही झाली म्हणजे त्याच्याखालीं साक्ष घाल. [ मोरेश्वर सही करतो व घनश्याम कागद हातीं घेतो. ] मोरेश्वर, तुझें काम झालें. जा आपला रस्त्यानें. [तो जातो. ] धुंडिराज, पुनः असें करणार नाहींस ना? एवढ्या गुन्ह्याबद्दल भिऊं नकोस. घरीं जायला तूं मोकळा आहेस.

**धुंडिराज :** सरकार, आपले उपकार मीं जन्मभर विसरणार नाहीं.

[ पायांवर डोकें ठेवतो. गाडीची घंटा होते. ]

**घनश्याम :** एक पस्तीस– अप ट्रेन आली वाटते ?

*अंक पहिला समाप्त*

## अंक दुसरा

### प्रवेश पहिला

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : लतिका व मालती. ]

**धनेश्वर :** हं, लतिके, मी म्हणतों असें हें झालेंच पाहिजे. मोरेश्वराशींच तुझें लग्न करायला हवें.

**लतिका :** बाबा, मीं नेहमीं मनांत असेल तें बोलून दाखवतें; पण असें बोलूं नये म्हणून ही मालतीताई कालपासून सारखी बजावते आहे. एवढ्यासाठीं मीं अधिक बोलत नाहीं. तरी पण तुम्हांला अगदीं निक्षून सांगतें, कीं हें लग्न मला नको आहे.

**धनेश्वर :** लतिके, तुला विचार नाहीं, दूरदृष्टि नाहीं, व्यवहारज्ञान नाहीं म्हणून तूं अशी बडबडत सुटली आहेस. माझ्यासारख्या व्यवहारपंडिताची तूं मुलगी. आणि तुला हें एवढें कसें कळत नाहीं कुणास कळे !

**लतिका :** बाबा, काय सांगूं मीं तुम्हांला ! आईबापाच्या गुणांवर जायचें भाग्य सगळ्याच मुलांच्या कपाळीं थोडेंच असतें ! गुण सर्वत्र वंशपरंपरागतच असतात का ?

[ राग – तिलंग, ताल – त्रिवट. ]

कुलगुण सकलां न सर्वदा ॥<br>
विधिसुघटित परि जगतिं गुणमान ॥ ध्रु० ॥<br>
विमल पंकजा, पंक मलिन जरि<br>
स्थिर, गिरितट तटिनी न स्थिरचि तरि ।<br>
जन्यजनक नच गुणीं समसमान ॥ १ ॥

**धनेश्वर :** लतिके, शिक्षणामुळें वायफळ बोलायला मात्र शिकलीस ! या चटोर

चोपड्यांनीं तुझें डोकें अगदीं फिरून गेलें आहे; त्यामुळें तुला डोळ्यांसमोरच्या गोष्टी दिसत नाहींत. माझ्या डोक्यांत या लग्नाची कल्पना येईपर्यंत, तुझ्या कपाळीं किती सुख आहे याची मलाहि कल्पना नव्हती ना ! हें पाहा, लतिके, चार अक्षरें वाचतां आलीं म्हणजे ललाटींचा लेख वाचतां येतोच, असें मात्र नाहीं.

लतिका : बाबा, ललाटींचा लेख वाचतां आला नाहीं, तरी आम्हां मुलींना कपाळींचें कुंकू नीट रेखून लावायचें लहानपणापासून कळत असतें.

धनेश्वर : हं, शिक्षणामुळें हें फटकळासारखें बोलायला मात्र येतें ! चार अक्षरें हस्तगत झालीं, कीं हा परिणाम ठेवलेला ! हें शिक्षण फार फार वाईट आहे.

लतिका : बाबा, हा ज्याचा त्याचा हातगुण असतो. यांत बिचाऱ्या शिक्षणाचा काय दोष ? चार अक्षरें वाचतां आलीं म्हणजे चांगलेंहि बोलतां येतें आणि वाईटहि बोलतां येतें. चार अक्षरें लिहितां आलीं म्हणजे त्रिकालाबाधित सुंदर सत्येंहि लिहितां येतात, आणि पांढऱ्यावर काळें करून खोटे दस्तऐवजहि लिहितां येतात.

धनेश्वर : हा रिकामा वादंग नकोच आहे मुळीं ! यानेंच तर बोलण्याची मर्यादा सुटत जाते ! मुलींनीं असें उर्मटपणानें बोलायला सुरुवात केली म्हणजे बापाच्या संसाराचा शेवट झालाच म्हणून समजावें !

लतिका : आणि बोलायला सुरुवात केली नाहीं तर मुलींच्या संसाराचा शेवट व्हायचा !

धनेश्वर : लतिके, तुला एकवीस वर्षें कांहीं उलटलीं नसतील. सामान्य मनुष्यांत-सुद्धां सरकारनें अज्ञानाच्या वयाची मर्यादा संस्थानिकांप्रमाणें एकवीस वर्षां-चीच ठेवायला हवी होती ! मांजरीच्या पिलांचे डोळे दहाव्या दिवशीं आणि कुत्रीच्या पिलांचे डोळे एकविसाव्या दिवशीं उघडतात; पण माणसाच्या पोरांचे डोळे मात्र एकविसाव्या वर्षापर्यंत उघडत नाहींत !

लतिका : इतकेंच काय, पण कधीं कधीं डोळे कायमचे मिटायची वेळ आली तरी उघडत नाहींत ! त्यामुळें आपल्या पायांखालीं काय जळतें हेंसुद्धां माणसाला दिसत नाहीं.

धनेश्वर : तुझें बोलणें ऐकलें म्हणजे अशी तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोंचते.

लतिका : म्हणूनच शेवटीं माथ्यांत राख घालायची अशी वेळ येते ती !

धनेश्वर : बस ! अगदीं अखेर झाली—कारटीला डोक्यावर बसविली त्याचा

हा परिणाम !

मालती : लतिकाताई, काय हें बोलणें बरें ? विनयाची मर्यादा सोडून बोलणें केव्हांहि हितप्रद नसतें. तोंडाळपणामुळें कुणाचें कधीं बरें झालें आहे का ? वडिलांना कुठल्याहि प्रसंगीं असें बोलूं नये.

धनेश्वर : ऐक तिचा उपदेश. मालती, मुलीनें बापाला काय बोलावें हें सांग तिला एकदां नीट.

लतिका : बाबा, मालती कधीं धुंडिराजकाकांना उलट बोलत नाहीं, आणि मीं सुद्धां त्यांना कधीं बोलत नाहीं.

मालती : ताई, खरें विचारशील तर तुझ्या बोलण्याचा मलासुद्धां राग आला होता. बोलतांना कधींच विचार करायचा नाहीं म्हणजे काय ? जनरीत कांहीं आहे कीं नाहीं ?

धनेश्वर : शाबास, मालती, तूं मोठी गुणांची मुलगी आहेस. मुलगी कसची तूं! चांगली पोक्तीपुरवती बायकोच म्हणावें लागेल तुला. केवढी प्रौढ बुद्धि आहे तुझी ! एखाद्याच विस्कटलेला संसारसुद्धां सुरळीतपणें सांभाळण्याची अकल आहे तुझ्या अंगांत ! लहानपणापासूनच तूं अशी विचारी आहेत. आमच्या या लतिकेप्रमाणें एखादी लहानशी अजाण मुलगी या दृष्टीनें तुझ्याकडे पाहावेसें मला कधींच वाटलें नाहीं.

लतिका : बाबा, साठी उलटली का हो तुमच्या वयाला ?

धनेश्वर : माझे आई, तुझ्याशीं बोलण्याची तुझ्या बापाची तर काय, पण माझ्याहि बापाची छाती नाहीं ! पुरे झालें हें बोलणें. मला एवढें ठाऊक आहे, कीं तुझें त्या मोरेश्वराशीं लग्न लावून टाकायचें. [ स्वगत ] पातकी माणसाचीं पोरेंबाळेंसुद्धां त्याचा कसा अनादर करितात यांचें मूर्तिमंत चित्र आहे आमचें घर म्हणजे ! दिवसाढवळ्या घरांत अगदीं नाटक चाललें आहे जसें कांहीं !

[ कानडी वेषांत प्रभाकर वृद्धरूपानें प्रवेश करितो. इंदु व बिंदुहि प्रवेश करितात. ]

इंदु : काका, हे कोणसे तुम्हांला भेटायला आले आहेत. कुणी म्हातारे आहेत वाटतें.

धनेश्वर : इंदु, यांची टीचभर पांढरी दाढी पाहूनसुद्धां तुला हे म्हातारे आहेत असें नुसतें वाटतेंच आहे ना ? हे म्हातारे नाहींत, मग काय म्हाताऱ्याचें सोंग घेऊन आले आहेत वाटतें ? या, बसा मिस्टर !

प्रभाकर : [ स्वगत ] हें कानडी सोंग आणलें आहे खरें मीं; पण नुसत्या

दाढीमिशांनीं म्हातारपण सजविण्यांत पोरकटपणा तर नाहीं ना होत हा? बाकी, सोंग उघडकीस आलें तर फार झालें तर थोडासा हंशा होईल एवढेंच. आमच्या दोन घरांचा आज इतके वर्षांचा ऋणानुबंध लक्षांत घेतला म्हणजे या सोंगाकडे इतकें लक्ष देण्याचें कारणच नाहीं. एका घरांतल्या घरांत मुलें एकमेकांना फसविण्यासाठीं सोंगें घेतात त्यापेक्षां या गोष्टीचा फारसा बागुलबुवा वाटण्याचें काय प्रयोजन आहे? तसें म्हटलें तर लतिकेला यांच्या-देखत भेटण्याची चोरी आहे थोडीच!

धनेश्वर : हं, कोण, काय, कुठले तुम्ही? काय काम आहे?

प्रभाकर : आपण धनेश्वरमहाराज? ठीक! [ पत्र देऊन ] हें पत्र एक लोक देतो.

धनेश्वर : [ पत्र वाचून ] कानडी पंडित आहां आपण? असें! आमच्या लतिकेला शिकविण्यासाठीं ठेवावें म्हणता? का हो, तुम्हांला कुणीं सांगितलें, कीं आम्हांला कानडी इसम हवा आहे म्हणून?

प्रभाकर : एक मोरेश्वर गृहस्थ, आगगाडीचे डब्यांत भेटलों. सर्व बोलतो हे हकीकत. आम्ही कळलों तर पत्र घेतला-आलें.

धनेश्वर : मराठी येते का?

प्रभाकर : थोडें; लोक बोलतो तो समजतो. हिंदुस्थानी थोडें. जन्मतो कन्नड, पुढें काशीगुरु शास्त्र शिकवलों. षट्शास्त्र, वेदवेदान्त वाचलों. फार पारंगत! केवळ मुखोद्गत!

धनेश्वर : लतिके, यांना संस्कृतांत नांव विचार पाहूं?

लतिका : पुराणपुरुष, एते मे तातचरणा भवतो नामधेयं ज्ञातुमिच्छन्ति.

प्रभाकर : [ स्वगत ] नांव काय सांगूं आतां? कानडी नांव-[उघड] गिरसाप्पा. महामहोपाध्याय गिरसाप्पा. भवति, अपूर्वः कोऽयमस्माकमुत्साहः, यद् भवत्या सम्यक् प्रतिपन्नमादृग् गीर्वाणभाषाप्रावीण्यम्।

लतिका : नहि नहि, महाशय, अत्यल्पमेव तत्। तदपि-काय ग मालतीताई, प्रॅक्टिस नाहीं म्हणजे काय? हो- अनभ्यसनात् तदपि विस्मृतप्रायम्. सुटलें बाई एकदांची, संस्कृत नाटकांतून बायकांना प्राकृत भाषा कां बोलायला लावली आहे हें मला आज कळलें.

धनेश्वर : छान आहे. गिरसाप्पा, कांहीं इंग्रजीबिंग्रजी?

प्रभाकर : नॉट मच; लिटल्. प्रॅक्टिस नास्ति.

धनेश्वर : ठीक आहे बरें गिरसाप्पा, तरुणांच्या दृष्टीनें अत्यंत नीरस, रुक्ष, खूप मोठा, फार अवघड असा संस्कृत शास्त्रग्रंथ कोणता आहे?

प्रभाकर : योगवासिष्ठ बृहद् योगवासिष्ठ ! बहोतही बडा ग्रंथ ! षष्टिलक्ष ग्रंथ, नीरस व्हेरी मच. एक पंडित काशीघाट पारायण केलो, तर तीन तरुण लोक गंगेंत जीव दिले, दोन लोक जागेवर मेलो. कंठाळला.

धनेश्वर : आलें, आलें लक्षांत ! हें बघा, गिरसाप्पा, ही आमची मुलगी लतिका. शिक्षणाच्या ललित वाङ्मयामुळें हिची प्रकृति थोडीशी बिघडली आहे. तेव्हां हिची प्रकृति ताळ्यावर आणण्यासाठीं तुमच्या योगवासिष्ठांचीं सात पारायणें तिला पाजा योगवासिष्ठाच्या औषधाचें हिंदुस्थानी रांकटपणांतून इंग्रजी जोडाक्षरांतून आणि संस्कृत अनुस्वारांतून कोळून एक सातरें दिलें म्हणजे झालें. मधूनमधून न शिजण्याजोगे तुमचे कानडी खडे चारले तर उत्तमच आहे ! एकेक इलाज करून पाहायचा.

( घनश्याम महेश्वराला घेऊन येतो; महेश्वराजवळ तंबोरा. )

धनेश्वर : या, घनश्याम.

घनश्याम : हे एक कानडी गवई आहेत. अगदीं दोन्ही डोळ्यांनीं आंधळे आहेत. मराठीचा अगदीं गंध नाहीं. भक्तिरसाचींच पदें तेवढीं येतात यांना. घरदार कांहीं नाहीं. लतिकाताईच्या धर्मशास्त्राच्या अभ्यासाला ही भक्तिरसाची जोड कांहीं वाईट नाहीं.

धनेश्वर : ठीक आहे. हे सद्गुरु पण कानडीच आहेत. का हो गिरसाप्पा, मराठींतल्या इतक्या बारकाया कळत नाहींत ना ? बरें गिरसाप्पा, या तुमच्या देशबांधवांचें नांवगांव विचारा.

घनश्याम : [ स्वगत ] अरे बाप रे ! ही खरी फजीतीची वेळ ! नांवापुरताच प्रश्न आहे, तेवढा महेश्वराला धनेश्वराच्या बोलण्यावरून समजला; पण पुढें कसें निभायचें आतां ?

महेश्वर : [ स्वगत ] अरे बाप रे ! ही खरी फजीतीची वेळ ! याला उत्तर काय देऊं कपाळ !

प्रभाकर : [ स्वगत ] अरे बाप रे ! ही खरी फजीतीची वेळ ! याला प्रश्न काय करूं कपाळ ? काय त्रास आहे हा ! ठीक आहे. ऐंशीं टक्के अक्षरें कठोर दडपतों; आणि सांगतों, कीं माझें प्रौढ कानडी या गांवढळाला कळत नाहीं म्हणून. दॅट इज् ए सिच्युएशन इंडीड ! सुंदर स्त्रियांच्या पवर्गाशीं तोंडमिळवणी करण्याकरितां म्हणून येथें आलों, तर या कानडी कांस्यां-कुट्यांची धन झाली ! बस, हेंच खरें कीं या कानडी मारवाड्यांचा टवर्ग, लतिकेसारख्या सुंदर स्त्रियांचा पवर्ग, आणि पवर्गाच्या आशेनें या टवर्गांत

पडणाऱ्या आम्हां तरुणांचा ढवर्ग.

**धनेश्वर** : गिरसाप्पा, नांव विचारतां ना त्यांना ?

**प्रभाकर** : रुंडु गुंडु कुंडू ?

**महेश्वर** : कामण्णा.

**प्रभाकर** : नांव कामण्णा ! [ स्वगत ] हा घुणाक्षरन्यायानें या कटकटींतून खरोखरच नांव विचारण्याचा कानडी प्रश्न उमटला कीं काय ?

**धनेश्वर** : गिरसाप्पा, आतां त्यांना आणखी—

**प्रभाकर** : [ स्वगत ] गिरसाप्पा कोसळला नऊशें फुटांवरून खालीं ! [प्रकट ] आमच्या कन्नड संस्कृतप्राय ! हे गवई गांवढळ राहतो ! भवति, अस्माकं विदग्धवाङ्मयात्मिका नागरभाषा ! न सा एवंविधैर्ग्राम्यैर्विना कष्टेन अवगम्यते !

**लतिका** : पीडा कुठली ! तुमचा दुभाषीपणा करायला माझें अडलें नाहीं.

**घनश्याम** : माझ्या लक्षांत आलें. हें पाहा, काकासाहेब, या गवईबुवांची सगळी माहिती मला आहे. शिवाय बोलण्याचालण्याची अडचण पडली तर याला गुजराथी थोडेंसें येतें. आपल्याला माहितीच आहे, कीं मला गुजराथी चांगलेंत येतें. जवळजवळ माझी मातृभाषाच गुजराथी आहे. त्यामुळें तितकी अडचण पडणार नाहीं.

**धनेश्वर** : फार चांगलें. तुम्ही गुजराथी बोला यांच्याशीं. मराठी आहे, इंग्रजी, संस्कृत, कानडी, हिंदुस्थानी, तुमचें गुजराथी, एकदम इतक्या भाषा घरांत सुरू करा. संसारयात्रेचा सगळा प्रवास एखाद्या आगगाडीच्या डब्यांत बसूनच केल्यासारखा वाटणार आहे या भाषावैचित्र्यामुळें ! बरें घनश्याम, याला कांहीं म्हणायला सांगा. गाण्यांत गोडी, मोहकपणा असला तर खपायचा नाहीं.

**घनश्याम** : कामण्णा, तारा ध्यानमां आव्युं केशुं करवानुं ते छे ? कर शरुवात एकदम. जो तारी गुजरातीए आपणी नवलख लाज राखी छे.

**महेश्वर** : भाई, फिकर जेवूं कइं नथी. पण हवे तुं हवे अहीं न रहेतो. मारो ताल ज्योई ले.

**घनश्याम** : बस. वधारे बोल ना ! काकासाहेब, त्याला गावयाला सांगितलें. उगीच माझी लाज घालवूं नको म्हणून पढवावा लागला. बरें, हें गाणें मला माहीत आहे. याचें पद आटोपतें आहे तों मी टपाल पाहून येतों. [ जातो. ]

**महेश्वर** : [ स्वगत ] आतां असा रेंकून गातों, कीं ऐकणाऱ्याच्या जिवाच्या ताराच काय, पण तंब्रोऱ्याच्या तारा तुटून पडतील ! [ मीराबाईचें पद गातो.]

**प्रभाकर** : [ स्वगत ] काय नुसता जनावरासारखा ओरडतो आहे ! गाण्यानें पशु

मोहित होतात हें या गवयांच्यावरूनच जास्त सिद्ध होतें.

धनेश्वर : पसंत पडलें आपलें गाणें आम्हांला. ही पद्धति कुठची ?

महेश्वर : श्रीदाक्षिणात्यसंगीतपद्धति.

लतिका : मालतीताई, ऐकलास माझ्या लग्नाचा हा बेंडबाजा ? आणि आतां तो नवरदेव यायचा ! नंतर याच्या म्हातारड्या मंत्रांचा मारा ! एक आसन्नमरण झाल्यामुळें मंददृष्टि, तर दुसरा शून्यदृष्टीमुळें आसन्नमरण ! कोण केव्हां मरेल याचा नेम नाहीं ! नुसतें बघत राहावें यांच्याकडे !

महेश्वर : [ स्वगत ] हीं मुख्य दोन चित्रें, आणि या बाजूला दोन सावल्या. या दोघींना पाहिल्यामुळें माझ्या आंधळेपणाचें सार्थक झालें !

लतिका : मालतीताई, हा पुराणपुरुष मला मोक्षमार्ग दाखविणार आणि त्या वाटेवर हा कानडी कावळा भक्तिरसाची पाणपोई बांधणार ! आणि तूं म्हणतेस बाबांना उलट उत्तरें देऊं नयेत म्हणून !

धनेश्वर : हं लतिके, आपल्या या गुरुजनांची नीट व्यवस्था कर. हे श्रीस्वामी आणखी ते शिष्यस्वामी—

लतिका : बाबा, आतां मला जायचें आहे मालतीताईकडे. पुढें माझ्या कपाळीं काय सुख आहे तें दिसूं लागलेंच आहे ! तूर्त इंदुबिंदूची जोडी द्यावी ह्यांच्या ताब्यांत. आणि स्वच्छ सांगतें, कीं मला त्रास दिलात तर मी जीव देईन. यू योगवासिष्ठ, आमच्या या बिंदुताईबरोबर चला; आणखी मीराके प्रभु, तुम्ही इंदुताईबरोबर चला. इंदुताई, ने या धृतराष्ट्राला सांभाळून.

[ ते जाऊं लागतात. ]

महेश्वर : [ स्वगत ] तरी मी घनश्यामाला सांगितलें होतें, कीं मी उघड्या डोळ्यांच्या आंधळ्याचें सोंग घेतों म्हणून. खरें म्हटलें तर या सुंदरीकडे पाहतांना इंद्राच्या सहस्र नेत्रांनासुद्धां चुकल्यासारखें वाटलें असतें. आणखी या घनश्यामानें मला धृतराष्ट्र बनविलें आहे ! बाकी एका अर्थी उघड्या डोळ्यांच्या चंचल दृष्टीमुळें हिला पाहतांच माझें सोंग उघडकीस आलें असतें. बरें, तूर्त या तंबोऱ्याला जपलें पाहिजे. नाहीं तर याच्यासकट कुठें तरी आमच्या भ्रमाचा भोपळा फुटायचा ! या माझ्या मार्गदर्शक कंदाशिणीचें तोंड पाहण्याचा प्रसंग टळला, हा काय आंधळेपणाचा थोडा फायदा झाला ?

लतिका : आपण उठा. आपले आंधळे जोडीदार गेलेसुद्धां ! आपल्या वासिष्ठगोत्राशीं माझें पटेल असें का आपल्याला वाटतें ? मालतीताई, प्रभाकरांनीं या म्हाताऱ्याचें कानडी सोंग पाहिलें तर त्यांना हंसतां हंसतां

पुरेवाट होईल, नाहीं ?

प्रभाकर : [ जातां जातां ] प्रभाकराचें हें कानडी सोंग कुणीं पाहिलें तर त्याला मात्र पळतां पळतां पुरेवाट होईल !

लतिका : मालती, मी येतेंच यांची व्यवस्था करून. आज थंडी आहे, मला ओव्हरकोटहि घालायचा आहे.

[ चौघेहि जातात. ]

धनेश्वर : थिल्लरपणानें नको जाऊं अशी.

लतिका : थिल्लरपणानेंच जाणार. एकदां माझी मान कापा म्हणजे सुटलांत !

[ जाते. ]

धनेश्वर : मालती, लतिकेला शिक्षण दिलें, त्याचे हे दुष्परिणाम !

मालती : मी जरा अधिक बोललें तर आपल्याला राग येणार नाहीं ना ? शिक्षणामुळें लतिकाताईनें कोणता दुष्परिणाम दाखविला ! नीटनेटका पोषाख करणें, जरासें लडिवाळपणानें बोलणें याला आपण दुष्परिणाम म्हणतां का ? अशी बुद्धिमान् आणि निर्मळ मुलगी पाहूं जातां कोठें सांपडायची नाहीं. बोलण्याचें प्रमाण नेहमीं असेंच राहणार आहे, असें का आपल्याला वाटतें ? अशा सुंदर स्वभावाला शिक्षणानें शोभा येते, कीं दूषण येतें बरें ? क्षुल्लक कारणावरून स्त्रीशिक्षणाविरुद्ध अशी सगळ्यांनींच हांकाटी केली तर कसें होईल बरें ?

( राग – बहार; ताल – त्रिताल )

हृदयरत्नाकरिंचा हा फेन असे । सतत वसे । ज्यां कालीं ।
ज्ञानरज्जु भ्रमवी मतिला अति दिव्य रत्न उदधिमुखें वमवि खासें ॥ ध्रु० ॥
क्षोभ दावा अंतरिंचा न दिसे सामान्य जलीं जैसा ॥
जड जल न चळे चेतन खवळे रत्नगर्भ धरि फेंसा ॥
लघु नच त्यातें किमपि गणावें ॥
परि शुभशकुन म्हणोनि करावें । स्वागत हासें ॥ १ ॥

धनेश्वर : आतां काय सांगावें मालती, तुला ? बाकी एखादे वेळीं वाटतें, कीं मनांत असेल नसेल तें सारें तुजजवळ सांगून टाकावें. ही आली आमची कन्या ! काय पोषाखाची तऱ्हा ही !

लतिका : प्रे, मालती, लुक् ॲट मी ॲंड टेल् मी इफ् आय् डू नॉट लुक् ए नाइस मेरी लिटल् गर्ल ऑफ सेव्हन्टीन्. जस्ट् कन्फेस, मालती, डोंट् यू वुइश यू वेअर ए—

मालती : यू वेअर ए व्हॉट् ? यू नॅस्टी लिटल् थिंग्, यू आर क्वाइट डेव्हिलिश.

लतिका : आणखी बाबा, असलें कन्यारत्न तुम्ही वाटेल त्याच्या गळ्यांत बांधीत आहांत ! लतिका तुमची लाडकी नाहीं का ? काय म्हणावें तुम्हांला ? " माया जळली का । तिळहि ममता नाहीं का । आली पोटीं पोर एकटी तीही विकितां का ? "

धनेश्वर : काय ? काय म्हणालीस ?

लतिका : सो, डियर फादर, यू वॉंट् इट् अगेन ? [ " माया जळली का " इत्यादि पूर्वोक्त. ] मालतीताई, चल. [ जातात. ]

धनेश्वर : [ स्वगत ] असें येतें मनांत, कीं श्रीमुख रंगवून काढावें ! आतां तर माझी खात्रीच होत चालली, कीं हिला मोरेश्वराला देणें हाच एक इष्ट मार्ग आहे. कन्यारत्न म्हणे ! प्राणावर दरोडा पडायची वेळ आली म्हणजे रत्न देऊन प्राण वांचवावा लागतो. तीच कन्यारत्नाची गोष्ट ! कोणी कांहींहि म्हणो, सबसे प्यारा जीव आहे. उद्यां माझ्या भागीदारानें प्रसंग आणला, तर रत्न पोटांत गिळून जीव देण्यापेक्षां पोटचें कन्यारत्न देऊन जीव वांचविलेला काय वाईट ? ही आमची योजना ठीक झाली. योगवासिष्ठाच्या सात पारायणांपेक्षां मोरेश्वराबरोबर सात जन्म संसार पुरवला, असें लतिकेला ताबडतोब वाटायला लागेल. गोष्ट हातची गेली. आधीं शिक्षणच द्यायला नको होतें. [ घनश्याम येतो. ] या, घनश्याम. घनश्याम, या शिक्षणाच्या दुष्परिणामांनीं माझें डोकें अगदीं भंडावून गेलें आहे. ही लतिका, प्रभाकर, मनोहर; शिक्षणानें सारींच कशीं हो बिघडलीं ?

घनश्याम : दुष्परिणामांचीं कारणें हुडकीत बसण्यांत काय लाभ होणार ?

धनेश्वर : बरें, मग एखादा उपाय तरी सांगा.

घनश्याम : वाः रोगाच्या निदानासह औषधाची योजना अवगत असल्यावर वैद्याची आवश्यकता कुठें राहिली ?

धनेश्वर : घरांत असा बखेडा कां माजला आहे बरें ?

घनश्याम : आपणच सांगितलें होतें ना, कीं घरांत कुणी वडील माणूस नाहीं म्हणून ?

धनेश्वर : बरें मग ?

घनश्याम : आपण अद्याप अनुभवसिद्ध सावधपणानें बोलतां आहां, मी एकदम आडपडदा सोडून बोलतों. मात्र आपला हितचिंतक या नात्यानेंच मी हा अतिप्रसंग करीत आहें.

धनेश्वर : स्वच्छ, स्वच्छ बोला. घनश्याम, आणि झटदिशीं बोला. हं–

घनश्याम : घरांत कुणी वडील माणूस नाहीं, तें आणायला पाहिजे.

धनेश्वर : अहो, वडील माणसें झाडाला का लागतात ?

घनश्याम : अकलेच्या मोलानें जगाच्या बाजारांत मिळतात. स्पष्टच सांगतों. आपण लग्न करायला तयार आहां का ? या वयांत लग्न करायला आपली हरकत आहे का ?

धनेश्वर : या वयाची दूरदृष्टि नाहीं तुम्हांला, घनश्याम ! वरपक्षाची कधीं हरकत असते लग्नाला ? हें पाहा, आम्ही आहों सध्यां पन्नाशीच्या घरांत, तेव्हां आमच्या घरांत मुलगी द्यायला वधूपक्षाची हरकत असणार. खरें सांगूं ? हीच अडचण एवढी नडण्याजोगी आहे. बाकी माझ्याविषयीं म्हणाल तर माझी लग्नाची इच्छा आहे, जवळ पत्रिका आहे, सगळें आहे.

घनश्याम : मग आपण लग्न करायला तयार आहां एकूण ?

धनेश्वर : कां असूं नये मीं तयार ? संसारांत किती अडचणी आहेत बरें ! घरांत वडील माणूस नाहीं हें तर तुम्हीच म्हणतां आग्रहानें – बरें नाहीं, मीं प्रथम सुचविलें; पण तुम्हांला पटलें तर खरें ना ? –झालें, उद्यां लतिकेचें लग्न निघालें, म्हणजे देवकें बसवितांना शेजारीं पाटावर सुपारी का बसवूं अभद्रासारखी ? तेवढ्यापुरती आसपास उसनवार करतां येते थोडीच ! का एकुलत्या एक पोरीचें कन्यादान तिसऱ्याकरवीं चटावर करून घेऊं ? बापासारखा बाप मी, मला काय वाटेल बरें ?

घनश्याम : आपण माझें समाधान करण्यासाठीं उगीच कष्ट घेतां आहां ! बरें, वधूची निवड कशी करणार आपण ? म्हणजे साधारणपणें वयोमान, रूपरेखा, गुणावगुण या दृष्टीनें –

धनेश्वर : हें बघा, वधू वयानें प्रौढ, पुष्कळशी सुंदर आणि सद्‌गुणी असली म्हणजे झालें. मग उगीच फार चिकित्सकपणा नको. या अटी टाकण्याचीं तशींच करणें आहेत, बरें का ! वधू प्रौढ वयाची एवढ्याकरितां पाहिजे, कीं मी बाला-वृद्धविवाहाला जरासा प्रतिकूल आहें. आतां वधूवरांच्या वयांतलें अंतर कमी करण्यासाठी माझ्या पन्नाशींतून वजावट करण्याची सोयच नाहीं. तेव्हां वधूच शक्य तितकी प्रौढ असलेली बरी. शिवाय आपल्याला वडील माणूस घरांत आणायचें आहे.

घनश्याम : कबूल आहे आपलें म्हणणें. बरें, ती सुंदर असली पाहिजे, होय ना ?

धनेश्वर : सुंदर नसून कसें चालेल ? एरवीं उद्यां लोकांत काय बोलवा होईल

बरें ! म्हणतील, म्हातारा लग्नाला उतावळा झाला होता,—जी कळीबिंद्री मुलगी मिळाली, तीच पत्करून मोकळा झाला झालें ! घनश्याम, वेडीविद्री मुलगी पत्करून ही का आतां शोभा दाखवायची आहे ? या वयांत लग्न फार पोक्त विचारानेंच करायला हवें. हीं का पोराबाळांचीं लग्नें आहेत ? त्यांच्या लग्नांना कुणीं नांवें ठेवीत नाहींत; तेव्हां वधू सुंदर असायलाच पाहिजे.

**घनश्याम :** हेंहि पटलें. पण वधु सद्‌गुणी कशाला हवी ? केवळ कारण ऐकण्याच्या कौतुकानेंच विचारतों.

**घनेश्वर :** कौतुकानें कारण विचारतां; पण कारणाचें कौतुकच कराल. ऐका, वधू प्रौढ आणि सुंदर आहे, आणि सद्‌गुणी नाहीं; परिणाम काय होईल ? अनुरूप वधूवरांना निष्ठेनें वागायला परस्परांचे गुणच पुरेसे होतात. परंतु विषम वयांच्या जोडप्यांत ही जबाबदारी एकट्या पत्नीवरच असते. तेव्हां ती निरपेक्ष सद्‌गुणांची मूर्तीच असायला पाहिजे. तात्त्विक दृष्टीनें पाहिलें तर विवाहांतल्या एकनिष्ठेच्या शपथांची विषम विवाहालाच फार जरुरी असते. लग्नविधींत या शपथांना इतकें महत्त्व दिलेलें पाहून माझी अशी समजूत होत चालली आहे, कीं आपल्या या पवित्र आर्यावर्तात पूर्वीं विषम वयाच्या बालावृद्धविवाहाचाच काय तो एकटा प्रचार होता.

**घनश्याम :** प्राचीन आर्यपरंपरेचेंच अभिमानानें अनुकरण करायचें असेल तर या आपल्या पन्नाशीपलीकडच्या वयांत आपण संन्यास घ्यायला हवा.

**घनेश्वर :** काय ? वेडे आहांत का—घनश्याम ? यांत अभिमान कुठें राहिला ? संन्यास घ्यायच्या वयांत संन्यास घेतला, लग्न करण्याच्या वयांत लग्न केलें, या गोष्टींत कौतुकानें अभिमान कशाला करायचा ? उपजत्या जीवाची जन्मपत्रिका करायची, तरुणांनीं हृदयपत्रिका लिहायच्या, म्हाताऱ्यांनीं मृत्युपत्रें खरडायचीं, या जगरूढीच्याच गोष्टी झाल्या. तरतरीत तरुणानें संन्यास घेतला किंवा एखाद्या ऐन वृद्धानें गुडघ्यांतून मान काढून गुडघ्याला बाशिंग बांधलें तर अभिमान ! तरुण द्वारकाधीशानें सोळा हजार एकशें आठ बडील माणसें घरांत आणलीं त्याचें गोळाबेरजेचें मोजमाप सांगण्यापलीकडे जगानें काय कौतुक केलें ? पण त्याच श्रीकृष्णानें राधेसारख्या एकाच वडील माणसाचा संसार थाटून दिला तर त्या अलौकिक चमत्काराचें अजून कोडकौतुक चाललें आहे. तेंच वृद्धापकाळींच्या लग्नाचें भूषण. परवां आमच्या वकीलसाहेबांनीं आमचें मृत्युपत्र करून टाकण्याचा आग्रह केला. तेव्हां संथपणानें त्यांना बसविलें तसेंच; आणि आमच्या जोशीबुवांना बोलावून आणि वकील-

साहेबांच्या देखत माझी जन्मपत्रिका तयार करून घेतली. लहाणपणीं मला मंगळ होता. काय बदल होतो हो बाळपणाच्या आणि आत्तांच्या सृष्टींत ! आणि आतां तुम्ही म्हणतां मी संन्यास घेईन म्हणून ! छातीठोक सांगितलें ना तुम्हांला, कीं मी लग्नाला तयार आहें म्हणून ? एकदां शब्द दिला तो दिला. घनश्याम, गोष्ट प्रथम तुम्हीं काढली; पण आतां तुम्हांलाच माघार घ्यावी लागणार ! का हो, कुठें पाहणार हो आमच्यासाठीं अशी वधू आतां ?

**घनश्याम :** पुन्हा आपण माझ्याकरितां कष्ट घेऊं लागलां ! वधू शोधून काढण्यासाठी मला ड्रेस घातलेंच पाहिजे असें नाहीं. सुचवूं का मी आपल्यासाठीं एका वधूचें नांव ?

**धनेश्वर :** सुचवा बघूं.

**घनश्याम :** आपल्या धुंडिराजपंतांची मालती ! -- पसंत आहे माझी सूचना आपल्याला ?

**धनेश्वर :** काय भलतंच बोलतां हें घनश्याम ?

**घनश्याम :** भलतेंच कसें ?

**धनेश्वर :** पण तुमची कोणती सूचना मला पसंत पडली नाहीं, सांगा पाहूं ? अहो, आपल्या हितचिंतकाच्याच सूचना फेटाळून टाकल्यावर मग माणुसकी कुठें राहिली ? पसंत आहे तुमची सूचना. मीं मघाशीं सांगितलेले गुण तर तिच्या अंगीं आहेतच.

**घनश्याम :** आपल्या लतिकाताईची ती मैत्रीण आहे म्हणून—

**धनेश्वर :** वा: ! समजा, एखादी अनोळखी सावत्र आई लतिकेचा छळवाद करू लागली, तर तें बरें होईल का ? मालती करील का तसें कधीं ? लतिकेचा स्वभाव ओळखून तिच्याशीं प्रेमळपणानें वागणें मालतीला मुळींच कठीण नाहीं. शिवाय असा लोकापवाद यायला नको, कीं आपण परक्याच्या पोरीचा गळा बांधला म्हणून ! आपल्या इष्टमित्रांची मुलगी असल्यावर लोकांना बोलायला तोंडच राहणार नाहीं मुळीं ! पण का हो; तो थेरडा म्हातारा रुकार देईल का लग्नाला ?

**घनश्याम :** तें माझ्याकडे लागलें. मी आपलें अन्न खातों आहें. आपला सर्वस्वीं अभिमान मला आहे. वाटेल त्या प्रयत्नानें आपलें हित करणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. आपल्याच शब्दांत सांगतों, कीं एकदां शब्द दिला तो दिला. आपण आहांत ना लग्नाला तयार ?

**धनेश्वर :** एकदां सोडून दहा वेळां !

**घनश्याम :** ठीक आहे. मग मी घाईघाईनें जरी आपला निरोप घेत असलों तरी एवढें मात्र खात्रीनें सांगतों, कीं हें कार्य मी घडवून आणल्यावांचून राहणार नाहीं. लागूं ना या कार्याला ?

**धनेश्वर :** माझा तुम्हांला आशीर्वाद आहे. [ घनश्याम जातो. ] [ स्वगत ] हा घनश्याम बोलल्याप्रमाणें करील का ? हा पिळदार, करारी आणि बुद्धिवान आहे, तेव्हां उगीच कांहीं तरी बोलायचा नाहीं खास ! पण धुंडिराजाकडून हा संमति कशी मिळवणार ? तो म्हातारा तर अशा लग्नाचें नांवसुद्धां काढूं द्यायचा नाहीं. मग घनश्याम कशाच्या जोरावर मला इतकें आश्वासन देऊन गेला ? धुंडिराज म्हाताऱ्याला या घनश्यामानें एखाद्या जाळ्यांत तर पकडून ठेवलेला नाहीं ना ? नाहीं पण, तसें नसावें. कारण तसें असतें तर या घनश्यामानें स्वतःच मालतीशीं विवाह करून टाकला असता. कदाचित् असें असेल, कीं धुंडिराज असेल पैशाच्या अडचणींत, आणि या घनश्यामाला कांहीं मध्यस्थी कबूल करून हा श्रीमंत जांवई गांठायची त्यानें युक्ति काढली असेल ! हां, असेंच असलें पाहिजे. काय मनुष्यस्वभाव आहे पाहा ! पैशासाटीं म्हाताऱ्याला मुलगी द्यायला लोक तयार होतात हं ! मग या जगांत पंचप्राणांसाठींच आपली मुलगी मूर्खाला तें–सुद्धां लक्षाधीश मूर्खाला–देणें म्हणजे अपराध आहे असें कोण म्हणेल ? बस. वाटेल त्या उपायानें लतिकेचा मोरेश्वराशीं विवाह घडवून आणायला कांहींएक हरकत नाहीं. नाहीं तर माझीं पापें मला उभा जाळूनपोळून काढतील. पापाचीं फळें गोड असलीं तरी पचायला फार जड हेंच खरें ! [ जातो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : धुंडिराजाचें घर; पात्रें : धुंडिराज व घनश्याम. ]

**घनश्याम :** [ स्वगत ] कां कुणास कळे, या थेरड्याला बघतांक्षणींच मला दिडाच्या आंत नाटक आटपण्याची कल्पना तावडतोब आठवते. याच्या मनमोकळेपणाला उगीच मोकळें सोडण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं. [ उघड ] धुंडिराजपंत, एका फार महत्त्वाच्या बाबतींत आपणांशीं मला थोडें बोलायचें आहे; आणि तें बोलणें सर्वस्वीं गुप्त राहावें हें आपल्यालाच हितप्रद आहे,

म्हणून मी मुद्दाम एकान्त साधून आपली भेट घेतों आहें. नीट लक्ष देऊन मी काय म्हणतों तें ऐकून घ्या. लक्ष्य आहे ना नीट? धुंडिराजपंत, माझ्या एका अधिकारी मित्रानें मजजवळ एक कागद दिलेला आहे. हा पाहा तो कागद. नीट लक्ष्य आहे ना? [कागद दाखवितो.]

**धुंडिराज** : अरे बाप रे! हा तर–

**घनश्याम** : आपला तर्क बरोबर आहे; पण हें भेदरणें मात्र बरोबर नाहीं. मीं सांगितलें ना, कीं नीट लक्ष्य द्या म्हणून? मी आपणांला भयचकित करून सोडण्यासाठीं आलों नाहीं. सध्यां फार बोलायला मला वेळ नाहीं आणि मी आपणांलाहि वेळ देणार नाहीं. धुंडिराजपंत, हा आपला चोरीबद्दलचा कबूल-जबाब, आपल्या खऱ्या स्वरूपाची रूपरेखा यांत स्पष्ट रेखाटलेली आहे. मला वाटत होतें तितके आपण चांगले नाहीं, आणि आपणांला वाटतें तितका मी पण चांगला नाहीं. धुंडिराजपंत, आतां मी काय बोलतों तें नीट, फार नीट लक्ष्य देऊन एकदांच ऐकून घ्या. समजा, हा कागद मीं कोणाला दाखविला, तर त्याचा काय परिणाम होईल बरें? एका क्षणांत सरकारचे लोक तुम्हांला अटक करतील. चारचौघांकडून तुमच्यावर बेरड, बदमाष, चोर यांसारख्या शेलक्या शिव्यांचा मारा होईल. तुमच्या अपराधाला योग्य अशी शिक्षा भोगण्यासाठीं तुम्हांला तुरुंगांत जाऊन पडावें लागेल. तुम्ही तुरुंगांत जातां-क्षणींच तुम्हांला जीव कीं प्राण वाटणारीं तुमचीं पोरेंबाळें अन्नावांचून थयथया करतील. तुम्ही म्हणाल, कीं तुमच्या पश्चात् प्रभाकर तुमच्या मुलाबाळांचें योग्य संगोपन करील म्हणून; पण खाण्यापिण्याची तूर्त त्यांना अडचण न पडली तरी कैद्याचीं मुलें म्हणून त्यांना समाजांत अगदीं खालच्या पायरीवर जाऊन पडावें लागेल. जो तो तुमच्या मुलांकडे बोट करून म्हणेल, कीं हीं कैद्याचीं मुलें, हीं म्हातारड्या बेरडाचीं पापी पोरें, हीं त्या साळसूदपणाच्या नांवाखालीं डाके पाडणाऱ्या दरोडेखोराचीं कमजात कारटीं! धुंडिराज, क्षणार्धांत तुमच्या भरलेल्या संसाराची अशी दुर्दशा करून टाकायचें हें साधन माझ्या अधिकारी मित्रानें वाटेल तो उपयोग करण्यासाठीं माझ्या हातीं देऊन ठेवलें आहे.

**धुंडिराज** : शिव हर! कैलासनाथ! कैलासनाथ! काय रे प्रसंग आणलास हा माझ्यावर! घनश्याम, घनश्याम! तुम्ही कांहीं खात्रीनें अशी वेळ माझ्यावर आणणार नाहीं.

**घनश्याम** : धुंडिराज, देवाचीं नांवें आळविण्याइतकेंच या घनश्यामाच्या

धांवानें टाहो फोडणेंहि व्यर्थ आहे! देवांच्या सबंध मूर्ती दगडाच्या केलेल्या असतात, घनश्यामाचें नुसतें मनच दगडाचें आहे. घनश्याम जवळ जवळ तुमच्या निर्विकार देवाइतकाच दयाळू आहे. धुंडिराज, अगदीं शांत मनानें तुमच्यावर असा प्रसंग आणायला मला कोणती हरकत आहे? मी तीच वेळ तुमच्यावर आणणार आहें आणि तेंच सांगण्यासाठीं आतां मी आलों आहें. मी निश्चयपूर्वक तुम्हांला सांगून ठेवतों, कीं मला दयामाया बिलकुल नाहीं, आणि मी बोलेन तें करीनच असा माझा बाणा आहे.

धुंडिराज : नका हो नका! घनश्याम, माझ्या पोराबाळांकडे पाहा. नका हो असे निष्ठुर होऊं! तुमचे पाय धरतों, माझ्या गरीब बाळांना असें देशोधडीं लावूं नका!

घनश्याम : हें पाहा धुंडिराज, मीं सांगितलें ना, कीं मला खरोखर दयामाया मुळींच नाहीं म्हणून? या आळवण्याविनविण्यांचा आणि रडण्याओरडण्याचा माझ्या मनावर कांहींएक परिणाम व्हायचा नाहीं. माझें मन निःश्वासांनीं हलायचें नाहीं, आसवांनीं भिजायचें नाहीं, किंकाळ्यांनीं हादरायचें नाहीं, किंवा शिव्याशापांनीं जळायचें नाहीं. मी सांगेन त्याप्रमाणें मुकाट्यानें वागाल तरच तुमच्यावर हें संकट मीं आणणार नाहीं, मात्र नसते वादविवाद करण्याची माझी तयारी नाहीं हें मी आधींच सांगून ठेवतों. माझें म्हणणें अक्षरशः पाळायला तयार आहांत कां?

धुंडिराज : तुमचें जें काय म्हणणें असेल तें मला मान्य आहे, कबूल आहे; पण माझ्यावर एवढी दया कराच हो!

घनश्याम : पुन्हा बोलायला लागलां! धुंडिराज, आधीं तुमची बडबड एकदम बंद करा! ऐका आतां. तुम्हीं आपली मालती धनेश्वरांना दिली पाहिजे. अजागळासारखे चेहरे काय बदलतां? धनेश्वरपंत लग्नाला तयार आहेत. तुम्ही आपली मुलगी मालती त्यांना द्यायला तयार असाल तरच तुमची अब्रू निभावेल.

धुंडिराज : अहो, काय बोलतां हो हें? नाहीं, माझा प्राण गेला तरी मी माझ्या मालतीच्या जन्माची अशी माती करणार नाहीं. मेलों तरी—

घनश्याम : ठीक आहे; मग मी मालतीसकट – तुमच्यासकट तुमच्या सगळ्या मुलाबाळांच्या जन्माची माती करून टाकतों. धुंडिराज, तुमची अक्कल कुठें गेली तर नाहीं ना?

धुंडिराज : अक्कल गेली म्हणून तर या पेंचांत आलों. घनश्याम, धनेश्वरपंत

तरी म्हातारपणांत लग्न कसे करताहेत ?

घनश्याम : म्हातारपणीं चोऱ्या करण्यापेक्षां कांहीं वाईट नाहीं तें !

धुंडिराज : नाहीं हो ! मीं खरोखरीच चोरी केली नाहीं ! हा माझ्यावर निव्वळ अपरवाद आहे.

घनश्याम : हा तुमचा ललाटलेख काय बडबडतो आहे मग? इतकी बडबड हवी कशाला ? धुंडिराज, एका क्षणाचाहि विलंब लावल्यावांचून एकदम सांगा, मालती धनेश्वरांना द्यायला तुम्ही तयार आहां कीं नाहीं ? नाहीं तर तुमच्या घरादाराचा विद्ध्वंस झालाच म्हणून समजा. आहांत कीं नाहीं तयार ? बोला.

धुंडिराज : बोलूं काय कपाळ माझें ! मालतीचा गळा कापूं, कीं पोराबाळांच्या मानेवरून सुरा फिरवूं ?

घनश्याम : लवकर सांगा म्हणून सांगितलें आहे मीं.

धुंडिराज : कबूल आहे तुमचें म्हणणें मला. मालती ! माझी मालती ! जीव कासावीस होतो आहे अगदीं ! घनश्याम, मी काय करूं हो ?

घनश्याम : मुकाट्यानें मालती धनेश्वरांना द्या !

धुंडिराज : कोणत्या तोंडानें हें मालतीला सांगूं मी ? घरांतलीं माणसें मला काय म्हणतील ?

घनश्याम : हं, तें सर्व निर्विघ्नपणें कसें उकरायचें तें मी सांगतों. तुम्हीं मला त्या दिवशीं सांगितलेंच होतें, कीं तुम्हांला चार चार दिवस जमदग्नीचा सोंगापुरता अवतार धारण करतां येतो म्हणून ! तसें सोंग आणा. हा विवाह घडवून आणण्याचा तुमचा दूरदृष्टीमुळें पूर्ण निश्चय झालेला आहे असें घरांत सर्वांना बजावीत सुटा. कोणी विरुद्ध बोलूं लागलें तर लागलीच, एकेरीवर या. धनेश्वर गर्भश्रीमान् असल्यामुळे आपल्या मुलांच्या शिक्षणाला त्यांच्या द्रव्याचा फार उपयोग होण्यासारखा आहे, म्हणून कांहीं झालें तरी हें लग्न उरकून घेण्याचा तुमचा दृढनिश्चय आहे असें ठासून सांगा. शिवाय वृद्ध, श्रीमंतांना मुलगी दिल्यानें खर्च कमी येतो हेंहि एक कारण सांगा. तुमच्याजवळ पैसा नाहीं ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहेच. ही गोष्ट तुम्हीं आपण होऊन करीत आहां असें भासविण्यासाठीं उत्साहानें वागा; कारण हें खऱ्या प्रकारासह कोणाला जर कळलें तर तुमच्या गळ्याला फांस बसेल हें विसरू नका. ही मुख्य मुद्द्याची गोष्ट आहे. तुमच्या स्वतःच्याच मनानें ही गोष्ट घेतली आहे हें सर्वांच्या मनांत नीटपणें बिंबवून द्या. खरी गोष्ट षट्कर्णी होतांच तुमचा कान लोकांच्या हातीं सांपडेल हें नीट लक्षांत ठेवा. धनेश्वर-

पंताची श्रीमंती हें त्याचें मुख्य कारण. कोणाला खरें- म्हणजे या कागदा-विषयीं- कांहीं कळवायचें नाहीं. याप्रमाणें प्रत्येक गोष्ट मनांत बागवून माझ्या म्हणण्याप्रमाणें बागायला तुम्ही तयार आहांत ना ?

**धुंडिराज** : तयार न होऊन करूं काय ? घनश्याम, अहो असे कसे हो कसाबासारखे–

**घनश्याम** : ठरलें ना हें कायमचें ? मग मला कसाब, राक्षस, दैत्य काय वाटेल तें म्हणा ! आतांच घरांत या गोष्टीबद्दल बोलणें सुरू करा. जाऊं मी ? तुमच्या मनांत बदल झाला तर तुम्हांला माहीत आहेच परिणाम काय होईल तो ! नीट हुशारीनें वागा. जाऊं मी ?

**धुंडिराज** : हूं. ( घनश्याम जातो. ) ( स्वगत ) अरेरे ! परमेश्वरा, काय भयंकर प्रसंग आणलास हा माझ्यावर ! मालती ! मालती ! बेटा, मालती, तुला हें कोणत्या तोंडानें सांगूं आतां ! देवा, यापेक्षां यापूर्वींच माझे डोळे कां मिटले नाहींस ! [ स्वस्थ बसतो. कुसुम व कुमुद येतात. ]

**कुमुद** : बाबा, बाबा, ही कुसुमताई म्हणते, की मी तुमची लाडकी नाहीं म्हणून ! आहें ना हो बाबा, मी तुमची लाडकी ?

**कुसुम** : आणि बाबा मी हो ?—

( राग– भूप, ताल– एक्का. )

लाडकी असेंच थोर । नावडती कीं अघोर
नलगे मुलिं समोर । सांगा आम्हां ॥ ध्रु० ॥
मायेची देत जोड । पुरवितसां सकल कोड ।
देतां खायासि गोड । तोंड न प्रेमा ॥ १ ॥

**धुंडिराज** : [ दोघींना पोटाशीं धरून, स्वगत ] अरेरे, या लाडक्या चिमण्या जीवांसाठीं काय वाटेल तें करायला मला तयार झालेंच पाहिजे. हंसत खेळत माझ्या मालनचा गळा माझ्या हातानें कापायला मला सिद्ध झालें पाहिजे. [ उघड ] कुसुम, तूं माझी लाडकी आहेस; कुमुद, तूं पण लाडकी आहेस, आणि आपली मालतीताई, पण माझी लाडकी आहे.

**कुसुम** : बाबा, ती पाहा मालतीताई, लतिकाताई इकडे येताहेत !

**कुमुद** : आणखी बाबा हे बघा इकडे प्रभाकरदादा आणि मनोहरदादा येत आहेत.

**धुंडिराज** : [ स्वगत ] अजागळ थेरड्या धुंडिराजा, पोटच्या पोरीचा घास मिळण्यासाठीं आतां हंसण्याच्या मिषानें थोबाड पसरून काळासारखा उभा

राहा. [ एकीकडून मनोहर आणि प्रभाकर व एकीकडून माल्ती, लतिका, इंदु व बिंदु येतात. ]

लतिका : [ स्वगत ] प्रभाकरांना पाहिल्याबरोबर त्या कानडी सोंगाचीच आठवण होऊन मला हंसायला येतें. हो, पण बाबांनीं यांच्याशीं न बोलण्याची मला ताकीद केलेली आहे ! शिवाय मींसुद्धां यांचें तोंड न पाहायची प्रतिज्ञा केलेली आहे.

प्रभाकर : [ स्वगत ] रोज या कानडी सोंगाचा उपद्व्याप मोठा कठीण आहे काल पहिल्यानेंच सोंग घेतलें त्या मानानें बतावणी ठीक झाली. पण तोंडावर सुरकुत्या रेखाटायच्या तशाच राहिल्या. आतां पुन्हा नीट सावधगिरी घेतली पाहिजे. शिवाय माझें राहण्याचें जेवण्याचें तुमच्या दक्षिणी घरांत जमायचें नाहीं म्हणून धनेश्वरपंतांना सांगून टाकलें हेंहि बरें झालें. नाहीं तर चोवीस तास त्यांच्या घरांतच डांबून बसावें लागलें असतें, आणि इथें घरीं बोभाटा झाला असता.

धुंडिराज : अरे वा ! लतिकाताई, कोणीच कसें बोलत नाहीं ? तुम्हांला कांहीं कमजास्त कळलें आहे कीं काय ?

लतिका : कमजास्त काय कळायचें काका ?

धुंडिराज : [ स्वगत ] थेरड्या, कर आतां मनाचा धडा आणि हो तयार. [ उघड ] मग आम्ही सांगतों तुम्हांला कांहीं कमजास्त. प्रभा, आपल्या माल्तीताईच्या लग्नाचें जमलें.

प्रभाकर : म्हणजे ?

लतिका : लग्नाचें जमलें ? आणि तें कधीं ?

धुंडिराज : असे गडबडून जाऊं नका ! बसा नीट सारींजणें. माझ्या मनांत आली एक कल्पना—कल्पना म्हणजे काय- निश्चयच झाला आहे माझ्या मनाचा ! आपली मालती—बरें का, प्रभा ! धनेश्वरपंतांना द्यायची. अगदीं ठरला सिद्धान्त हा !

प्रभाकर : म्हणजे ? म्हणतां काय तुम्ही काका हें ?

लतिका : कुणाला द्यायची म्हणालांत ?

मालती : [ स्वगत ] बाबा माझी थट्टा तर करीत नाहींत ? पण ही अशी वेडीवांकडी थट्टा तरी ते कशी करतील ! देवा, मग प्रकार आहे तरी काय ?

मनोहर : [ स्वगत ] काय ऐकलें हें मीं ?

धुंडिराज : तुम्हांला यांत इतकें नवल कशाचें वाटलें ? धनेश्वरपंतांना मालती द्यायची यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे ?

प्रभाकर : काका, यापेक्षां आश्चर्य तरी कोणतें दुसरें ? काका, थट्टा तर करीत नाहीं तुम्ही ?

धुंडिराज : अरे, थट्टा कसली यांत ? धनेश्वरपंतांना मालती द्यायची असें माझ्या मनानें पुरतेपणीं ठरविलें आहे.

लतिका : आणि बाबा कबूल आहेत का या लग्नाला !

धुंडिराज : हो. धनेश्वरपंत तयारच आहेत या लग्नाला.

प्रभाकर : आणि तुम्हीहि तयार आहांत म्हणतां ?

धुंडिराज : मी तर त्यांना मुलगी द्यायला तयार आहें; इतकेंच नव्हे, तर इकडचा सूर्य इकडे आला तरी माझा निश्चय आतां ढळायचा नाहीं ! तुम्हांला यांत एवढें गैर काय वाटतें कुणास कळे !

प्रभाकर : खरें आहे ! काका, बालावृद्धविवाहापेक्षां गैर असें जगांत आहे तरी काय ?

( राग – दरबारी, ताल – त्रिताल )

जरठबाला । योग असा ।
भूस्तरीं योग्य व्याकरणिं तसा ।। योग असा ।। ध्रु० ।।
हिरा तईं दिसे उपलें मघवा श्वानें तुलियेला ।। १ ।।
न गलरवि त्या बुडत्या । विधुसी संमुख चिर ठेला ।। २ ।।

बाकी एका अर्थी साठीच्या सुमारांतला नवरदेव आणि आठीच्या आटोक्यांतली नवरी मुलगी अशी जोडी परस्परांना अनुरूप तर खरीच ! बालवधू गुडघ्यांत मान घालून बसलेली, आणि वृद्ध वराच्या वयोभारामुळें गुडघ्यांत मान आलेली ! कंबरेची कमान झाल्यामुळें दोघांची उंचीहि सारखीच ! वराच्या अंगाला वार्धक्यामुळें कंप सुटत असतो, तर त्या बापड्या बालिकेच्या अंगाचा भीतीनें थरकांप होत असतो ! इकडे वधूचे दुधाचे दांत पडूं लागतात, तर तिकडे वराचे कायमचे दांत पडत असतात ! वधुवरांची अनुरूपता यापेक्षां ती आणखी कोणती असायची ?

लतिका : वृद्ध वराच्या थेरड्या थोबाडाच्या बोळक्याची बालवधूच्या चूळबोळक्यांच्या चिमुकल्या साजांत भर पडेल, हा सुद्धां एक लाभच म्हणायचा !

धुंडिराज : सारें खरें, पण या संबंधामुळें आपल्याला द्रव्यदृष्टीनें किती फायदा

होणार आहे याची तुला अजून कल्पना नाहीं. आपल्या मुलांच्या शिक्षणाला धनेश्वरपंतांची केवढी मदत होईल बरें ?

प्रभाकर : काका, काका, काय बोलतां हें ? आज इतकीं वर्षे जिवापाड जपून तुम्हीं या प्रभाकराचा पिंड पोसून साडेतीन हात वाढविला आहे, तो केवळ उगाच का ? काका, मुलांच्या शिक्षणाची चिंता करण्याचें तुम्हांला यापुढें काय कारण आहे बरें ? माझ्या हाडांचीं काडें करीन, पण आपल्या माणसांच्या केंसालाहि धक्का लागूं देणार नाहीं. आपल्या घराभोंवतीं माझ्या पांचहि प्राणांचा पहारा उभा करायला मी कधीं तरी माघार घेईन का ? काका, एवढ्यासाठीं मालतीताईचा अशा राक्षसी रीतीनें बळी द्यायची बुद्धि तुम्हांला कुठून आठवली ? हमाली करीन, जन्माची गुलामगिरी पत्करीन, पण खर्चाची तोशीस कधीं पडूं देणार नाहीं.

धुंडिराज : हा एक फायदा झाला; शिवाय अशा लग्नांत खर्च किती कमी येतो याचा विचार कर पाहूं एकदां ? खर्चाचा सगळा बोजा आपल्यामाथीं घ्यायला धनेश्वर तयार आहेत. घरांतली तनसडीसुद्धां बाहेर जायला नको.

प्रभाकर : काका, क्षमा करा. पण ही अगदीं अमानुष वृत्ति आहे !

[ राग – मारवा, ताल – त्रिताल. ]

नच तुला अशा कृतिलागिं लोकिं ॥
करुं म्हटतां कशि तीच घातकी ॥ ध्रु० ॥
स्वधना न दवडाया तनुजेसि गर्तिं दवडितसां ।
हत धिग् नरासि । किति पापराशि ।
प्रभुवर सुमतिसि दे तयासि कीं ॥ १ ॥

खर्च फार कमी येईल यांत शंकाच नाहीं. मुलीच्या आसवांच्या मोत्यांचे सर सरत असतांना मोत्यांची मुंडावळसुद्धां आणायला नको. तिच्या डोळ्यांत लग्नप्रसंगीं गंगायमुना असल्यावर भटांना मंगलाष्टकांच्या आरोळ्यांनीं गंगासिंधु सरस्वतींना साक्षीसाठीं बोलावण्याचेंहि कारण नाहीं. काका, कठोर बोलल्या-वांचून या वेळीं राहावत नाहीं. घरांतली तनसडीसुद्धां बाहेर जायला नको ! अगदीं खरें आहे. अशा बालावृद्धविवाहांत मुलगीसुद्धां आपल्या घराबाहेर जायची धास्ती नको ! कारण मुलगीसुद्धां चार दिवसांनीं पुन्हा आपल्याच घरीं परत यायची. काका, काका, काय मांडलें आहे तुम्हीं हें ?

धुंडिराज : जें काय मांडलें आहे तें पूर्ण विचार करूनच मांडलें आहे. प्रभा, मला हा पोरासोरीं कारभार आवडत नाहीं. मी घराचा मालक आहें, आणि

मला सर्व कांहीं कळतें आहे ! धनेश्वराच्या श्रीमंतीची किंमत मला चांगली माहीत आहे.

प्रभाकर : ठीक आहे ! मी हा असा जाऊन त्या म्हाताऱ्याला विचारतों, कीं गोरगरिबांना पाजीपणानें पिळून मिळविलेल्या पैशाच्या जोरावर अनाथ जीवांची अशी खरेदी करतांना तुला शरम वाटत नाहीं का म्हणून ! त्या पाजी थेरड्याची चारचौघांत फट्फजीति न करीन तर नांवाचा प्रभाकर नव्हे–

मालती : थांब, दादा, माझ्यासाठीं असे धाडस करूं नकोस ! असें साहस करूं लागलास तर उद्यां तुला लतिका अंतरणार नाहीं का ? लतिका तुला देणें न देणें हें सर्वस्वीं त्यांच्या – मला मागणी. घालते वेळीं त्या दिवशीं घनश्याम पुरुषासारखे पुरुष असून मला हांक मारतांना अडखळले; मग आज माझी दशा विचित्र झाली तर काय नवल ? लतिकाताई, त्यांना – तुझ्या वडिलांना- आज मी काका म्हणूं कीं धनेश्वरपंत म्हणूं, कीं—

लतिका : ताई, माझ्या बाबांना खाटीक, कसाई, मांग, काय तुझ्या तोंडांत येईल तें म्हण ! तुझ्या तोंडाला मी कोणत्या तोंडानें आळा घालूं ?

मालती : ताई, अशी वैतागून बोलूं नकोस. भांबावल्यामुळें मीं तुला सहजगत्या विचारलें. प्रभादादा, तुझ्या बोलण्यामुळें लतिकाताईला राग आला पाहा ! माझ्यासाठीं तूं जर धनेश्वरपंतांना वाटेल तें बोलूं लागलास तर कसें होईल बरें ? तुझ्या जन्माचें सुख लतिकेच्या वडिलांच्या हातीं आहे हें विसरूं नकोस !

प्रभाकर : ताई, भलत्या प्रसंगीं काय भलतें काढलेंस हें ? माझ्या जन्माच्या सुखाची मला तुमच्या क्षणभराच्या सुखापुढेंसुद्धां कांहीं किंमत वाटत नाहीं. मालतीताई, हा प्रभाकर म्हणजे धुंडिराजपंतांच्या घरच्या उष्टावळीवर वाढलेला तुम्हां सर्वांचा एक जन्माचा गुलाम आहे. तुझ्या आईबापांनीं आई-बापाविरहित पोरका झालेल्या, अन्नाला मोताद होऊन भटकणाऱ्या अशा एका अनाथाला अन्नाला लावलें, आणि त्या भणंग पोराचा समाजाला हा सुशिक्षित प्रभाकर करून दाखविला. ताई, तुमच्या सुखासाठीं मला वाटेल ते कष्ट करायला नकोत का ? धनेश्वर पाजीपणानें तुझ्या जन्माचें मातेरें करायला तयार झाला असतां लतिकेच्या लोभानें या वेळीं मी तोंडाला खीळ घालून बसूं ? लतिका मला जीव कीं प्राण आहे; ब्रह्मांडाच्या तुलनेनें मी तिचें मोल करीन; पण माझ्या मालतीताईच्या सुखापुढें मात्र मला लतिकेची आठवण-सुद्धां व्हायची नाहीं. या वेळीं गप्प बसण्याबद्दल मला लतिकेसारखा सुंदर

लांच धनेश्वरानें देऊं केला तरी तें मला नको आहे. मालतीताई, लतिकेसारख्या नखशिखान्त सर्वांगसुंदर अर्धांगीला या वेळीं माझ्या दृष्टीनें तुझ्या नखाचीहि सर येत नाहीं. माझ्या ताईच्या सुखाच्या होळींत हृदय होरपळून निघत असतांना लतिकेच्या प्रेमळ दृष्टीची चंद्रिका मला काय सुख देणार? लतिका आणि प्रभाकर यांच्या लग्नांतला लाजाहोम मालतीताईच्या सुखाची चिता पेटवून मी उरकून घेऊं का? नाहीं, ताई, तुला निर्वाणीचें सांगून ठेवतों, कीं मालतीच्या क्षणमात्राच्या सुखावरून लक्षावधि लतिका आणि कोट्यवधि प्रभाकर नुसते ओंवाळून फेंकून द्यायला मी केव्हांहि तयार आहें.

लतिका : [ स्वगत] शाबास, प्रभाकर ! एवढ्यामुळेंच तुमची योग्यता मला किती तरी मोठी वाटते! बघूं का यांच्याकडे एकदां डोळे भरून? हो, पण यांचें तोंड न पाहण्याची प्रतिज्ञा मोडायची नाहीं का अशानें? पण तसेंहि नव्हे; कारण तोंड दाखविणार नाहीं अशी प्रभाकरांची प्रतिज्ञा आहे; मला त्यांच्याकडे पाहायला काय हरकत आहे? पण नको; यांच्याकडे पाहिलें तर या वेळीं यांच्याशीं बोलण्याचा मोह मला आवरणार नाहीं, आणि बाबांनीं मला कोणाशीं बोलूं नकोस म्हणून बजाविलें आहे. असा त्यांचा आज्ञाभंग करणें योग्य नाहीं. शंभर अंक मोजून हा आनंदाचा आवेग नाहींसा केला पाहिजे. [ उघड ] एक, दोन, तीन, चार---

मालती : लतिकाताई, राग आला म्हणून शंभर अंक मोजायला लागलीस वाटतें?

लतिका : [ स्वगत ] राग गेला म्हणून मात्र शंभर अंक मोजतें आहें खरी.

मालती : दादा, पाहिलेंस? तुझ्या बोलण्यानें ताईला वाईट वाटलें.

प्रभाकर : त्याला कोण काय करणार! जाऊं देत. काका, आजवर या प्रभाला तुम्ही मुलाप्रमाणें वागवीत आलां, त्या हक्कानेंच मी आतां तुम्हांला बजावून सांगतों, कीं कर्तासवरता मनुष्य या नात्यानें घराची सगळी जबाबदारी आतां माझ्यावर आहे. मालतीताईचें असें लग्न मी होऊं देणार नाहीं. ताई, तूं निश्चित ऐस. असा त्या धनेश्वराकडे जातों. त्या पाजी हरामखोराचीं हजारों पापी कुलंगडीं बाहेर काढून त्याचे दांत त्याच्या घशांत कोंबतों.

मालती : दादा, माझ्यासाठीं असें कांहीं करशील तर माझ्या गळ्याची शपथ आहे; आईच्या आणखी बाबांच्या पायांची तुला शपथ आहे.

प्रभाकर : मालती, काय घातकी मुलगी आहेस तूं! भलत्या वेळीं अशी शपथ घालायला--

धुंडिराज : मालती, प्रभा, धनेश्वरांच्या मनाला जर कुणीं दुखविलें तर घरावर तुळशीपत्र ठेवून मला कुठें तरी काळें करावें लागेल हें नीट लक्ष्यांत ठेवा. मी आतां उणेंअधिक बोलत नाहीं; पण तुम्ही पोरें मला विष खायची पाळी आणणार असें मात्र आतां मला वाटायला लागलें आहे. [ जातो. ]

मालती : दादा, अखेर बाबा रागावले खरे! जा, आधीं जाऊन त्यांची समजूत घाल पाहूं!

प्रभाकर : ठीक आहे! [ स्वगत ] मालतीताईनें मला शपथ घातली तरी हरकत नाहीं; कानडी वेषानेंच घरांत वावरून त्या धनेश्वराची खोड मोडतों, आणि हें अनन्वित लग्न फिसकटवून टाकतों. [ जातो. ]

लतिका : मालतीताई, मीं पण जातें; नाहीं माझ्यानें आतां तुझ्याकडे पाहवत.

मालती : जा, पण उगीच जीवाला त्रास करून घेऊं नकोस.

लतिका : नाहीं. [ स्वगत ] आतां जातें आणि बाबांची भेट घेतें. बाबांना काय म्हातारचळ भरला कीं काय? [ जाते. ]

मालती : तुम्ही असे स्तब्ध कां? बोलत कां नाहीं?

मनोहर : मालती, झाला हा प्रकार झाल्यावर तुझ्याशीं मी काय बोलूं? मला जें विचाराचें आहे तें तुला कोणत्या शब्दांनीं विचारूं? मालती, मी तुला काय विचारूं हें मला नीट समजावून दे. माझ्या मनःस्थितीची तूंच मला नीट कल्पना करून दे.

मालती : तुम्हांला असें विवंचनेंत पडण्याचें काय कारण आहे बरें?

मनोहर : कारण? अवघ्या जीविताचें जें कारण तेंच कारण! मालती, झालेल्या प्रकारामुळें मी मोठ्या आपत्तींत येऊन पडलों आहें. माझ्या मनोवृत्तींचा आवेग इतका तीव्र झालेला आहे; कीं तो कसा व्यक्त करूं हेंच मला कळेनासें झालें आहे. मालती, माझी आपत्ति म्हणजे कांहीं राष्ट्रीय आपदा नव्हे किंवा एखादें सामाजिक संकट नव्हे. प्रस्तुत परिस्थितींत हिंदी तरुणांची जबाबदारी मी पूर्णपणें जाणून आहें. प्रेमामुळें उद्भवलेले वैयक्तिक शोकावेग मुक्तकंठानें व्यक्त करण्याचा हा काळ नाहीं हें मला पटतें. पण राष्ट्रीय संकटांच्या विचारांत व्यक्तींचीं दुःखें अजिबात भासेनाशीं होतात असें मात्र मुळींच नाहीं. सर्वांग व्याधीनें विकल झालेलें असलें तरी करंगळी कापल्याचें दुःख तिचें तिला व्हायचें तें होतेंच. मालती, तुझ्या वडिलांच्या आतांच्या उद्गारांवरून माझ्या भावी आयुष्याची कल्पना मला एकाएकीं भयाण वाटूं लागली आहे.

मालती : मनोहर, मी लतिकाताईसारखी नेहमीं बोलत नसलें तरी माझ्या मनाची परीक्षा तुम्हांला अजून झालेली नाहीं का ? बाबांनीं कांहीं जरी मनांत आणलें, तरी माझ्या विनंतीचा ते अगदींच अनादर करतील का ?

मनोहर : मालती, या संसारांत अगदीं सामान्य सत्येंच अनुभवाच्या कडवट-पणानें कधीं कधीं आपल्या प्रत्ययाला येत असतात. हजारों वेळां कानांवरून गेल्यामुळें त्या सत्य सिद्धान्ताचे शब्द आपल्या मनाशीं अगदीं रुळल्यासारखे होऊन बसतात, आणि त्यामुळें त्या सत्याची उग्र तीव्रता आपल्याला अनुभवा-वांचून मुळींच वाटत नाहीं. पण अगदीं ओळखीच्या वाटेवरच्या धोंड्याची सहज चालतांना पायाला जशी जबर ठेंच लागते, त्याप्रमाणें संसाराच्या प्रवासांतहि एखादे वेळीं अशा साध्या सत्यावर जीव अनुभवानें ठेंचाळून पडतो, आणि आजन्म प्राणान्तिक यातना भोगीत राहतो. मालती, माझ्या भावी आयुष्यांत मलाहि अशा एका सामान्य सत्याचा पडताळा पटण्याची माझ्या मनांत आज भीति उत्पन्न झाली आहे.

मालती : कोणतें असें सत्य तें ?

मनोहर : मालती, स्पष्टोक्तीची क्षमा कर. स्त्रियांचा स्वभाव चंचल असतो हेंच तें सत्य. मालती, मालती, हें सत्य व्यवहारज्ञ जरी खऱ्या नाण्याप्रमाणें उपयोगांत आणीत असले तरी मी आजपर्यंत त्यास खोटेंच मानीत आलों आहें–

( राग – जंगला, ताल – त्रिताल. )

या चंचल नारी । वदती नर गमति सर्व ते तामसी भारी ॥ ध्रु० ॥
स्वदाक्षिण्या देति न थारा । दुरितें धरा मळवीति ते सारी ॥ १ ॥
स्वमानपर्गेचं दृषविती ते । वितता दिशा जरि निर्मला चारी ॥ २ ॥

मालती, मालती, या सत्याचा विषारी अनुभव मला येणार नाहीं ना ?

मालती : पुरुष अधीरप्रकृति असतात या सत्याचा मला मात्र अनुभव आला खरा.

मनोहर : मालती, एकाएकीं मन बावरल्यामुळें विचारसरणींत कुठें चूक होत असेल तर मला क्षमा कर. मालती, तुझ्या वडिलांचा आजचा आग्रही निश्चय आणि तुझी प्रेमळ पितृभक्ति हीं एकदम लक्षांत घेतलीं म्हणजे मनाला असें वाटूं लागतें कीं, एखादे वेळीं तूं वडिलांच्या मनाला दुखविण्यापेक्षां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागायला तयार होशील. मालती, हा विचार मनांत आला म्हणजे भावी कालाची भीषण कल्पना डोळ्यापुढें उभी राहून चित्तवृत्ति अगदीं व्याकुळ होऊन जाते. मघांपासून या मनःक्षोभानें मी इतका विषण्ण झालों आहें; कीं एकाएकीं जीविताचे सर्व प्रयत्न मला नीरस वाटूं लागले आहेत.

तुझ्या वडिलांनीं आपला आग्रह शेवटास नेला तर माझ्या आशेचाहि शेवट झालाच म्हणून समज !

मालती : मनोहर, असें बोलणें आजच्या स्थितीला शोभण्यासारखें नाहीं खरें, पण तुम्हांला धीर देण्यासाठीं म्हणून जरा निर्भीडपणानें मी बोलतें; तुमच्याशीं विवाह करण्याचें तुम्हांला शपथपूर्वक वचन दिलें तर माझ्या मनोवृत्तीबद्दलचा तुमचा अविश्वास दूर होईल का ?

मनोहर : माझ्या अधीर मनाच्या समाधानाला एवढा एकच खात्रीचा आधार आहे. मालती, असें उदार वचन तूं मला देशील का ?

मालती : मोठ्या आनंदानें ! मनोहर, या संसारांत प्रेम हेंच परमेश्वरस्वरूप आहे. त्या परमेश्वरस्वरूप प्रेमाची शपथ घेऊन तुम्हांला हें वचन देतें, कीं ही मालती, आजन्म आपल्या चरणांची दासी आहे.

( राग – गौडमल्हार, ताल – त्रिताल. )

हृदयसुमन हें वाहतसें । धवल जें दिसे ।
युत मृदुपणें असे । परिमळें रसें ॥ ध्रु० ॥
मिसळुनि रेणु चरणरजिं अपुल्या ।
समरसचि व्हाव्या जिव शिवीं तसें ॥ १ ॥

वचनासाठीं हस्तस्पर्श न केल्याबद्दल कुमारिकेच्या संकोचवृत्तीला क्षमा करा. ही वचनाच्या निश्चयाची दुर्बलता नसून अभिजातवृत्तीची प्रबलता आहे. मनोहर, मालती आपल्याखेरीज दुसऱ्याला वरणार नाहीं. या वचनाला प्रत्यक्ष परमेश्वर साक्ष आहे. [ दोघेंहि जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : तंबोरा घेऊन बसलेला महेश्वर. ]

महेश्वर : [ स्वगत ] या घनश्यामाच्या कारस्थानामुळें काय विचित्र परिस्थितींत येऊन पडलों आहें मी ! हे खेळ करायला या सैतानाला मी बरा रिकामटेकडा सांपडलों ! भरलेल्या पोटाच्या भांडवलावर रिकाम्या डोक्यांत सैतान आपला कारखाना घालतो, हें या एकंदर प्रकारावरून मला खरें वाटायला लागलें आहे. या धनेश्वराची लतिका मला मिळवून देण्याचें कबूल करून

त्यानें या घरांत मला आणून सोडला खरा; पण अजून एकदां तरी ती लतिका दृष्टीस पडली असेल तर शपथ ! इथला कार्यक्रम अगदींच निराळा होऊं पाहात आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेवटच्या चरणाला 'मीराके प्रभु गिरिधर नागर' जोडून रंगल ढुंबऱ्या भक्तिरसांत कोळायच्या आणि आंधळ्याप्रमाणें दिवसाची रात्र करायची ! जिभेला कानडी कुलूप ! सेवेला ऋद्धिसिद्धीसारख्या या इंदु आणि बिंदु ! काय एकेकीचें रंग-रूप आहे पण ! स्त्रियांच्या सौंदर्यातल्या सर्व वैगुण्यांचीं स्मरणासाठीं हीं विधात्यानें टांचणें तर करून ठेवलेलीं नसतील कदाचित् ? त्यांचीं तीं नाकें, ते डोळे, तो काळाकुळकुळीत रंग ! छेः छेः ! कोणा तरुणांचे गळे कापण्यासाठीं परमेश्वरानें हीं कृष्ण कारस्थानं करून ठेवलीं आहेत नकळे ! या दोघींच्या कचाट्यांत दिवस काढणें मोठें कठीण आहे. आणि धनेश्वराचे ते कागद लांबविल्याखेरीज हा वनवास आटपायचा नाहीं आणि लतिका लाभायची नाहीं, असें तर घनश्याम सारखा बजावीत सुटला आहे ! आतां या आंधळ्या अवतारानें वावरून हें चौर्यकर्म उरकायचें कसें ? चला, आली ही इंदुनामक काळी कर्मकटकट ! आतां अगदीं विचारमग्न असल्यासारखें बसावें झालें. [ इंदु प्रवेश करिते. ]

इंदु : [ स्वगत ] मेली कटकट म्हणतात ती ही अशी ! धनेश्वरकाका आमच्या लग्नाची तर कधीं गोष्ट काढीत नव्हतेच, पण अलीकडे निदान लतिकाताईच्या लग्नाची तरी वाटाघाट करूं लागले होते; पण आतां तें सारें मागें पडून काका स्वतःचेंच लग्न लावायचा बोजवारा मांडून बसले ! आतां लतिकाताईच्याच लग्नाचें जिथें नांव निघत नाहीं तिथें आमच्या लग्नाचा काय पाड ! तरी बिंदुताईला मी नेहमीं सांगत आलें; कीं आपलीं लग्नें आपणच जमविलीं पाहिजेत ! आतां काय होईल तें होवो, मी तरी आपलें लग्न जमविणार झालें !

[ राग – बिहाग, ताल – त्रिताल. ]

मिळवितें त्वरितचि नवरदेव । हृदयिंची गमत सकल जणु ठेव ॥ ध्रु० ॥

गुरुजन लाविति विवाह तोंवरि । निवे धीर नच मातें ॥ १ ॥

या मेल्या रूपाची अडचण पडते, त्यामुळें अगदीं नाइलाज झाला आहे. कुठें स्थळ बघावें हेंच कळत नाहीं मेलें ! हे दोन कानडी बरे आले आहेत आयते घरीं चालून. पण यांच्यांत आधीं कुणाला विचारावें बरें ? तो ढोलस म्हातारा, कीं तो आंधळा तरुण ? त्या ढोलसापेक्षां हेच बरे. कारण आपलें रूप नाहीं चांगलें; आणि तें कांहीं यांना दिसायचें नाहीं. तेव्हां यांच्याजवळच काढावी गोष्ट झालें. [ जवळ जाऊन ] कामण्णा, अहो कामण्णा, अहो

काकांच्या लग्नाचें ठरलें.

महेश्वर : कुणाच्या लग्नाचें ठरलें ? काय म्हणालीस तूं ?

इंदु : अगबाई ! तुम्ही चांगलें मराठी बोललांत आतां ! मराठी येत नव्हतें ना तुम्हांला ?

महेश्वर : [ स्वगत ] घात झाला ! [ उघड ] इंदुबाई, जीभ जरा चांचरली इतकेंच. बाकी मला मराठी मुळींच बोलतां येत नाहीं. देवाशपथ मला मराठी एक अक्षरसुद्धां बोलतां येत नाहीं.

इंदु : अहो, अजूनसुद्धां मराठींत बोलतां आहांत ना चांगलें ! दम खा, आतां अशी जाऊन बाबांना सांगतें, कीं या गवईबुवांना मराठी चांगलें बोलतां येतें म्हणून.

महेश्वर : थांब इंदु, असा माझा गळा कापूं नकोस ! तुझ्या पायां पडतों. काय वाटेल तें झालें तरी हें धनेश्वरांना सांगूं नकोस.

इंदु : नाहीं सांगायची; पण एका अटीवर.

महेश्वर : कोणती अट ?

इंदु : तुम्हीं माझ्याशीं लग्न केलें पाहिजे.

महेश्वर : [ स्वगत ] अरे बाप रे ! घातवार, व्यतिपात, संक्रांत, किंक्रांत, मरीआई, बारावा बृहस्पति, साडेसाती, सारीं एकदम उपटलीं !

इंदु : काय हो, कबूल आहे का ही अट तुम्हांला ? करतां का कबूल माझ्याशीं लग्न करण्याचें ? नाहीं तर अशी या पावलीं काकांकडे जातें—

महेश्वर : तुझे पाय धरतों; मला विचार करायला तरी वेळ दे.

इंदु : विचार कसला करायचा त्यांत ? मी का म्हातारीकोतारी आहें ? का रूपानें वाईट आहें ?

महेश्वर : [ स्वगत ] अवदसा काय डोळ्यादेखत थापा मारते आहे ! पण आतां हिच्या रूपाकडे डोळेझांक केलीच पाहिजे; नाहींतर हा आंधळेपणाहि हिच्या नजरेस यावयाचा. ठीक आहे, तूर्त हिला थाप द्यावी झालें. आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षां घटकाभर हा जुलमाचा रामराम पत्करला.

इंदु : कां ? कसला विचार करतां ? मी सुंदर नाहीं असें का वाटतें तुम्हांला ?

महेश्वर : वः ! तुला सुंदर न म्हणायला माझे डोळे फुटले का आहेत ?

इंदु : मग आतां अडचण कोणती राहिली ?

महेश्वर : तूंच आतां विचार कर नीट ! अग, मी असा आंधळा. आंधळा नवरा चालेल का तुला ?

इंदु : मला आंधळा नवरा चालेल, मुका चालेल, पांगळा चालेल. कसा क असेना, मला कुंकवाला धनी पाहिजे.

महेश्वर : शिवाय मुख्य अडचण दुसरीच आहे. तूं अशी गरीब; मी तर बोलून-चालून भिकारी; त्यांतून असा आंधळा ! आपला चरितार्थ तरी कसा चालायचा पुढें ?

इंदु : अगदीं भिक्षा मागून पोट भरूं प्रसंग आला तर. तुम्हांला गातां येतें चांगलें. कुठेंहि एकतारी घेऊन बसलों तरी पोटापुरतें मिळेल आपल्याला. शिवाय तुम्ही आंधळे असल्यामुळें लोकांना तुमची दया पण येईल तितकी.

महेश्वर : लोकांना दया यायला आंधळेपणाची कांहीं जरूर नाहीं. नुसता तुझा नवरा या नात्यानें जो पुरुष उभा राहील त्याची साऱ्या जगालाच दया येईल म्हणा !

इंदु : हं, हें कुत्सितपणाचें बोलणें कां निघालें आतां ? तुम्हांला कुणीं सांगितलें आहे वाटतें, कीं मी दिसायला आपली अशीतशीच आहें म्हणून ?

महेश्वर : कोणीं कांहीं सांगितलेलें नाहीं मला. आणि समज, तूं फारच कुरूप असलीस, तुझा रंग काळाकुळकुळीत असला, तुझी नजर तिरळी असली, तुझी मान तिरपी असली, तुझ्या तोंडावर तेहतीस कोटी देवांचा कबिला मुक्कामाला उतरला असला, तुझे डोळे एकदां नीट बसवल्यावर बाहेर काढून ब्रह्मदेवानें पुन्हा वरच्यावर अलग ठेविल्यामुळें बटबटीत असले, तुझी हनुवटी शेवटाशीं दीडदोन बोटें चौकोनी कापून काढल्यासारखी असली, तुझे हातपाय धडाला खिळ्यांनीं ठोकून चिकटवल्यासारखे लुले दिसले—

इंदु : सांगितलें कुणीं हें सारें यथांबुज वर्णन तुम्हांला ?

महेश्वर : समज म्हणून म्हटलें होतें ना मीं ? मी म्हणत होतों, कीं समज, तूं जरी अशी असलीस, तरी मला काय वाईट वाटायचें त्यांत ? आंधळ्याच्या दृष्टीनें पद्मिनी आणि शूर्पणखा ही विजोड जोडी एकरूपच असते.

इंदु : बरें, मग माझ्याशीं लग्न करण्याचें शपथेवर वचन देतां ना ? पाहा, नाहीं तर अशी निघालें काकांकडे !

महेश्वर : (स्वगत) आमची प्रीतिविवाहाची पुरी हौस फिटण्याचा रंग दिसतो ! नायकानें नायिकेच्या संकटाची भीति दूर केल्यामुळें प्रीतिविवाह घडून आल्याचीं नाटककादंबऱ्यांतून कैक उदाहरणें सांपडतील; पण नायिकेनें नायकाला संकटाची भीति घालून घडवून आणलेला हा पहिला प्रीतिविवाह आहे !

इंदु : कामण्णा, कबूल करतां कीं नाहीं एकदम ? घेतां कीं नाहीं शपथ ?

महेश्वर : घेतों, घेतां शपथ ! ऐक नीट—

इंदु : नुसतें ऐक नाहीं. हातावर हात ठेवून शपथ घेऊन, वचन द्या. देवाब्राह्मणांची शपथ घ्या चांगली.

महेश्वर : ( तिचा हात धरून ) दे तुझा हात पाहूं ? हं ! हे स्वर्गस्थ देवांनो आणि हे स्वर्गाखेरीज दुसरीकडे खितपत पडलेल्या पितरांनो, तुमच्या साक्षीनें या इंदूला मी तिच्याशीं लग्न करण्याचें वचन देतों. इंदु, झालें ना तुझ्या मनासारखें ? बोलत कां नाहींस ?

इंदु : मी आतां लाजलें आहें ! या वेळीं माझ्या गालांवर गुलाबी रंग चढला आहे.

( राग – काफी, ताल – धुमाळी. )

किति दुर्भाग्य तुमचें दृष्टिच अंधा झाली ॥ ध्रु० ॥
नच पळ आरक्त या गालिं अभागी खिळली ॥ १ ॥
नच तारुण्याचिया क्षण प्रभातीं रमली ॥ २ ॥
नच उकलाया कशी कूट गुलाबी झटली ॥ ३ ॥
दृक्शल्याविण या स्वल्प गुलाबा न मुळीं ॥ ४ ॥

महेश्वर : हें बघ, दृष्टीलाच कळण्याजोगे हे जे शृंगारिक फेरफार होत जातील ते यापुढें वेळेवर मला शब्दानें कळवीत जा. बरें, पण मला मराठी येतं हें कुणाला सांगणार नाहींस ना ?

इंदु : आतां कशी सांगेन मी ? चला आतां, अगदीं निर्धास्त राहा. [ जाऊं लागतात. ] ( स्वगत ) आतां हें लग्न जमल्याचें बिंदुताईला केव्हां सांगेनसें झालें आहे मला ! हें ऐकतांच बिंदुताईला मत्सरानें सुचेनासें होईल अगदीं ! काय आनंदाचा दिवस उगवला तरी हा आज ! ( उघड ) हं, असे जपून चला.

महेश्वर : चला, ( स्वगत ) मीराके प्रभु गिरिधर नागर ! तुझ्या नांवावर फसून काय संकटांत येऊन पडलों हा मी ! बाकी घरांतली माहिती मिळवायला हें चांगलें साधन हातीं आलें आहे. धनेश्वराचे कागद हस्तगत करायला आतां वेळ लागणार नाहीं.

इंदु : चला सावकाश. ( स्वगत ) बिंदुताई कुठें भेटेल कुणाला ठाऊक !

[ जातात. ]

[ स्थळ : धुंडिराजाचें घर; पात्रें : मालती व धुंडिराज. ]

धुंडिराज : मालती, मालण, मालती !

मालती : काय, बाबा ?

धुंडिराज : मालती, बेटा, तूं, बोलत कां नाहीस ? बाळ, माझ्यावर रागावली का आहेस ?

मालती : बाबा, मी बोलूं का ? बोलतेंच मी. तुम्ही फटदिशी बोलूं नकोस म्हणायच्या आधींच मला बोलायचें तें बोलूं का ? म्हणजे तुमचें सांगणें मोडण्याचें तरी माझ्या कपाळीं यायचें नाहीं. पण बाबा, मी तुम्हांला बोलूं तरी काय ?

[ राग – केदार, ताल – त्रिताल. ]

भाव विरोधी प्रकट व्हावया । झटति शब्दरूपें वदनीं या ॥ ध्रु० ॥
वदन सदन हें नच शांतीचें युद्धक्षेत्र सजे या समया ॥ १ ॥
शब्द न सजविति एकमेकां झुंजति बधिती शमती वाया ॥ २ ॥

माझे जन्मदाते म्हणून तुमच्या गळ्यांत 'बाबा' म्हणून प्रेमानें मिठी मारूं कीं माझ्या गळ्याला फांस बांधायला तयार झालां म्हणून तुमच्यापासून दूर तोंड लपवून बसूं ? आजवर प्रेमानें माझी जोपासना केलीत त्याबद्दल तुमची उतराई कोणत्या शब्दांनीं होऊं ? उद्यां माझ्या जन्माचा सत्यानास करत आहां म्हणून तुम्हांला कठोर तरी कोणत्या शब्दांनीं बोलूं ? तुमच्या तोंडाकडे रागानें पाहीन म्हटलें तर तुमची आतांपर्यंतची उदार माया आठवून डोळ्यांत आसवें उभीं राहतात, आणि तुमची मुलगी म्हणून पायांवर डोकें ठेवूं लागलें तर आतांच्या बोलण्यावरून तुम्हीं मला पायांखालीं तुडवून टाकाल अशी धास्ती वाटते. तुमच्यापासून दूर उभी राहिलें तर मायेनें माझ्या डोळ्यांतलीं आसवें पुसून टाकायला दुसरें कोणी नाहीं म्हणून वाईट वाटतें, आणि तुमच्या पदराखालीं तोंड लपवायला आलें तर ममतेनें तोंडावरून हात फिरवितां फिरवितां चटकन् माझ्या कपाळाचें कुंकू पुसून टाकाल अशी भीति वाटते. बाबा, माझें लग्न जमवितां आहां या आनंदानें मी तुमच्या गळ्यांत मिठी मारूं, कीं आपल्या गळ्यांतल्या ताइतासारखी मालती वृद्ध पतीच्या गळ्यांत बांधूं नका म्हणून तुमच्या पायांशीं मिठी मारून बसूं ? कपाळीं कुंकूं लाभतं

आहे म्हणून हंसायला लागूं, कीं कपाळ फुटलें म्हणून रडत बसूं? बाबा, तुमचें मन इतकें प्रेमळ, आम्हां मुलांना आईपेक्षांहि तुमचा ओढा अधिक; आणखी आज एकाएकीं असे निर्दय, असे कठोर, निष्ठुर, पाषाणहृदयी कसे हो झालां? ही कसाबकरणी तुम्हांला कुणीं हो शिकविली?

धुंडिराज : [ एकदम मालतीला साष्टांग नमस्कार घालून, मुक्तकंठानें ] मालती, बेटा! मला क्षमा कर. मालती, मी तुझा अनंत अपराधी आहें. मालती, मला क्षमा कर.

मालती : बाबा, हें काय. उठा. माझ्या पायां पडतां? उठा, बाबा.

धुंडिराज : बाळे, मला अभय दिल्याखेरीज मी तुझे पाय सोडणार नाहीं. मालती, मला क्षमा कर.

मालती : बाबा, बाबा, हें काय? बरें असें? माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला! बाबा, हा काय प्रकार आहे? मला सांगा तरी. [ धुंडिराज उठून उभा राहतो. ]

धुंडिराज : मालती, तुला काय सांगूं आणि कोणत्या तोंडानें सांगूं? बाळे मालती, मालती, आपल्यावर आकाश कोसळलें ग! आपल्या घरावर आगीचा पाऊस पडला! बाळे, आपण ठार बुडालों! बाळे, माझ्याच्यानें बोलवत नाहीं. मालती, मालती, मी काय करूं? कुठें जाऊन तोंड दडवूं? मालती, बाळे, हें काय झालें!

मालती : पण बाबा, हें काय झालें तें मला सांगा तरी. बाबा, रडूं नका. बाबा, मला भीति वाटते हो! बाबा, मला सांगा काय झालें तें आधीं!

धुंडिराज : बाळे, घरांतल्या घरांत मोठ्यानें बोलायची सुद्धां चोरी झाली आहे. एक अक्षर कुणाच्या कानावर गेलें तर आपल्या घरादाराचा सत्यानास होईल. बाळे, इकडे ये. [ तिच्या कानांत सांगतो. ] त्या दिवशीं टेशनावर हा प्रकार झाला. तो कबूलजबाबाचा कागद त्या अधिकाऱ्यानें घनश्यामांच्या हातीं आणून दिलेला आहे. आणखी आतां घनश्याम म्हणताहेत कीं मालती घनेश्वरपंतांना दिली नाहींत तर तो कागद मी उघडकीस आणीन. बाळे, असें झालें तर आपल्यावर ब्रह्मांड कोसळल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून आपल्या हातीं नेऊन तुला खाटकाच्या घरांत लोटावी लागते! बाळे, मी माझ्या मरणाला भीत नाहीं. मला तुरुंगांत घातला, फांशी दिली तरी तुझ्या सुखासाठीं मला कशाचें कांहीं वाटणार नाहीं. पण माझ्या एकट्याच्या मरणानें भागत नाहीं. मी तुरुंगांत गेल्यावर आपल्या मुलाबाळांचें काय होईल? कैद्याचीं मुलें

म्हणून जो तो त्यांना दूर लोटील! लोक आपल्याला हिडिसफिडिस कां करतात हेंसुद्धां त्या बापड्यांना कळायचें नाहीं. बाळे, हें अपेश टाळण्यासाठीं मला अंगचोरपणानें मागें राहून तुला आपल्या हातीं विहिरींत ढकलावी लागते. तरच त्या घनश्यामांचें समाधान होईल.

मालती : बाबा, काय सांगतां हें तुम्ही! असें कसें हो झालें?

धुंडिराज : बाळे, तुला सांगितलें हें सारें खरें आहे. एरवीं तुझा असा गळा कापायला खाटीक आहें का कसाई आहें? पण बाळे, मी लाचार आहें! मालती, मी या जगांत चोर ठरलों! दरोडेखोर ठरलों! [ मालतीला पोटाशीं धरून ] बाळे, तुझ्यासारखीं अशीं रत्नें ज्याच्या हातापायांपाशीं पडलीं आहेत तो मी चोरी करीन का? कुबेराचें भांडार दारावरून जाऊं लागलें तरीसुद्धां ज्यानें तें नुसतें पाहण्यासाठीं तुमच्यावरून क्षणभर नजर हालविली नसती तो दीडदमडीच्या दागिन्यांचा लोभ करील का? बाळे, मीं अपराधी नाहीं, मी नाडलों आहें. मी लबाड नाहीं, चोर नाहीं, बाळे, मीं कोणाचा कांहीं अपराध केलेला नाहीं. बाळे, बाळे, आल्या जन्मांत माझा एकच अपराध झालेला आहे! या व्यवहारी जगांत, या धूर्त जगांत, बाळे, मी भोळाभावडा आहें, मी साधा आहें, मी वेडाबगडा आहें, एवढाच काय तो माझा अपराध आहे. माझ्यांत पांचपेंच नाहींत एवढाच काय तो माझा गुन्हा झाला? आणखी म्हणून बाळे, मला असा भुर्दंड भरावा लागतो आहे. बाळे, तुझ्या जन्माची माती या माझ्या हातांनीं कशी ग करूं? बाळे, तूं मला काय म्हणशील? जग मला काय म्हणेल? मालती, मालती, मी भांबावून गेलों आहें! मी काय करूं? या संकटांतून कसा ग मुक्त होऊं? माझ्या कच्च्याबच्च्यांना कसा वांचवूं?

मालती : बाबा, हें मला आधींच कां नाहीं सांगितलें? बाबा, मला कांहीं माहीत नव्हतें म्हणूनच मी तुम्हांला वाईटसाईट बोललें. वेडेंवांकडें बोलून मी तुमच्या काळजाला घरें पाडलीं. बाबा, बाबा, मला क्षमा करा. बाबा, ही मालती मोठी निष्ठुर आहे, चांडाळीण आहे. बाबा, मला ठाऊक नव्हतें हो! मी तुम्हांला नाहीं नाहीं तें टाकून बोललें. बाबा, हें पाप मी कुठें हो फेडूं?

धुंडिराज : बेटा मालती, बाळे, तूं काय पाप केलें आहेस असें? कांहीं नाहीं, कांहीं नाहीं. बाळे, मीच तुझा गळा कापायला तयार झालों आहें. मालती, आतां आपलीं पोरेंबाळें कुठें लपवून ठेवायचीं? मी करूं काय? मालती, मला कांहीं सुचेनासें झालें आहे. जिवाला उकडल्यासारखें झालें आहे. माझी

कुसुम, माझी कुमुद, माझीं बाळें! मालती, मी काय करूं? यांतून कसा सुटूं? माझा धीर खचला ग!

मालती : बाबा, मुळींच धीर सोडूं नका! ही पाहा मालती तुमच्या पायांशीं उभी आहे. आपल्या मुलांबाळांचे जीव राखण्यासाठीं माझ्या जिवाचे हाल करून घ्यायला मी तयार आहें. धनेश्वराशीं लग्न करायला मालती तयार आहें म्हणून खुशाल घनश्यामांना सांगून पाठवा. प्रेमानें पोसलेल्या या मालतीच्या देहाच्या रगतभाताचे घांस चारा; पण माझ्या भावंडांची उपासमार होऊं देऊं नका. बाबा, मी तुमची मुलगी आहें. आमच्या सुखासाठीं तुम्हीं काय काय केलें नाहीं? मग माझ्या गोजिरवाण्या भावंडासाठीं मलसुद्धां माझ्या सुखावर पाणी सोडायला नको का? बाबा, कांहींएक काळजी करूं नका. तुमचा गुंतलेला गळा मोकळा करण्यासाठीं, आपल्या लहान लहान भावंडांच्या सुखासाठीं, ही मालती धनेश्वरांच्याच काय पण एखाद्या प्रेताच्या-सुद्धां गळ्यांत माळ घालण्यासाठीं स्वतःचें सुख पायांनीं तुडवीत आनंदानें चालून जाईल.

[ राग -- मियाचा मल्हार; ताल – एका. ]

स्वसुख तृणचि मानितें।
जरि तें स्वजनसुखातें विघ्न घडवितें।
सिद्ध तुडविण्यातें ॥ ध्रु० ॥
मत्कुलतरुसुफलांचें अन्न न करितां तें।
अपहारी जीवनरस उत्पाटन उचित तरि तयातें ॥ १ ॥

धुंडिराज : शाबास, बेटा मालती, शाबास! तुझ्यावरचें हें अरिष्ट टाळण्यासाठीं माझ्या प्राणांचा सत्यानास करून घ्यायला मी केव्हांहि तयार आहें; पण मीं मेल्यानें आपल्या लेंकरांचें मरण टळत नाहीं. आणि म्हणूनच तुझा बळी द्यायला मी तयार झालों आहें! मालती, मालती, किती उदारपणा तुझ्या मनाचा हा!

मालती : बाबा, मी तुमची मुलगी आहें. जा, मी समाधानानें, आनंदानें, संतोषानें धनेश्वरांशीं लग्न करायला तयार आहें असें घनश्यामांना आतांच जाऊन सांगा.

धुंडिराज : पण मालती, एक गोष्ट लक्ष्यांत ठेवायला मात्र विसरूं नकोस. घन-श्यामाच्या जुल्मामुळें आपण अशा लग्नाला तयार झालों आहों असें कुणाला कळतां उपयोगी नाहीं. चिकित्सकपणानें चौकशी करितांना फट्दिशीं कुणाला

त्या कागदाचें कारण समजलें तर एकदम सारा घात होईल. आपणच आपखुषीनें या लग्नासाठीं धडपडतों आहों असें लौकिकांत आपण दाखवायला पाहिजे. खरी गोष्ट बोलण्याची आपल्यालाच चोरी आहे.

**मालती :** बाबा, त्याची तुम्ही मुळींच काळजी करूं नका. धनेश्वरांची श्रीमंती मला हवी म्हणून सांगायला मी तयार आहें. लोक काय वाटेल तें म्हणोत ! बाबा, आतां आपण निःसंग झालों ! दैवीं आलें तें सोंग साजरें करून दाखविलें पाहिजे. बाबा, तुम्ही आतां कांहींएक मनांत ठेवूं नका.

**धुंडिराज :** बाळे, मग या कामासाठीं जाऊं का म्हणून तुझा कसा निरोप घेऊं ?

**मालती :** हो बाबा, तुमच्याजवळ माझें एक मागणें मात्र आहे काय तें !

**धुंडिराज :** बाळ, काय मागणें आहे तुझें [ मालती खाली पाहते. ] वेडा, बोलत कां नाहींस ? काय मागणें आहे बाळ तुझें ?

**मालती :** एकदां मनोहरांना भेटण्याची मला परवानगी द्या. बाबा, तुम्हांला सर्व माहीत आहेच.

**धुंडिराज :** खुशाल मनोहराला भेट ! जाऊं मी आतां ?

**मालती :** थांबा, थांबा, आणखी एक मागणें राहिलें. बाबा, मघाचें माझें सारें निष्ठुर बोलणें मोठ्या मनानें विसरून जा, आणि आपल्या लाडक्या मालतीला तोंड भरून एकदां आपला आशीर्वाद द्या; म्हणजे मनोहरांना भेटायला मला धीर येईल. बाबा, मला तुमचा आशीर्वाद द्या.

**धुंडिराज :** आशीर्वाद ? मालती, हा घे [ मालती धुंडिराजाच्या पायांवर डोकें ठेवते. ] माझा आशीर्वाद !

> शास्त्राभ्यास नको, श्रुती पढं नको, तीर्थास जाऊं नको ।
> योगाभ्यास नको, व्रतें मख नको, तीव्रें तपें तीं नको ।
> काळाचें भय मानसीं धरूं नको, दुष्टाशीं शंकूं नको ।
> ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥

देवराया तुझ्या राज्यांत असा काय रे अपराध आम्हीं केला कीं आम्हांला आपल्या दाराशीं आज असें पतितांसारखे ओढून आणीत आहेस ? कुणाच्या कपर्दिकेचा कधीं लोभ धरला नाहीं, कुणाच्या मनाला कधीं दुखविलें नाहीं. मिळाली ती मीठभाकरी खाऊन दुसऱ्यांना मोकळ्या मनानें आशीर्वाद दिले. दुसऱ्याचा पाय लागला तरी आधीं आमचा नमस्कार घडला. त्या आमचीं कां रे अशी दैना व्हावी ? हें नष्टचर्य आमच्या ललाटीं कां लिहून ठेवलेंस ? अवघ्या पुण्याईचें हेंच का निर्वाणीचें फळ ? ऊठ मालती, माझी साधीभोळी

पुण्याई अंगांत संचरून मी बोलतों आहें ! बेटा मालती, खुशाल धनेश्वराशीं लग्न लाव. तुझें लग्न होतांच देवादारीं धरणें धरून बसेन, आणि मरून तुझ्या पोटीं येईन. बेटा मालती, अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ! जा, म्हाताऱ्या धनेश्वराशीं लग्न कर, नाहींतर अगदीं एखाद्या प्रेताशीं लग्न लाव, तुझा संसार सुखानें साजरा होईल. मालती, हृदय फोडून, रक्त आटवून तुझ्या बापानें तुला आशीर्वाद दिलेला आहे ! तो खोटा करण्याची साक्षात् देवाच्या बापाची प्राज्ञा नाहीं ! चल, हुशार हो, आणखी पुसून टाक तीं आसवें. [ तिचीं आसवें पुसतो. ]

मालती : बाबा, इतक्या प्रेमाचा आणखी पुण्याईचा हात आसवें पुसायला तयार असल्यावर घटकोघटकीं रडायला कोण तयार होणार नाहीं ? संसारांत रडण्याचें दुःख कधीं वाटत नाहीं; पण ऐन वेळीं अधिकारानें आसवें पुसायला कोणी नसतें म्हणून वाईट वाटतें.

धुंडिराज : शिवहर, कैलासनाथ ! कैलासनाथ ! [ जातो. ]

मालती : [ स्वगत ] काय ऐकलें, काय पाहिलें, आणि काय झालें हें ? झालें ! आतां काय राहिलें ? मनोहरांना भेटायचें, त्यांची तसबीर – त्यांच्या प्रेमाची खूण – त्यांना परत करायची, त्यांचा निरोप घ्यायचा – संसाराचा निरोप आणि सुखाचाहि निरोप – घ्यायचा ! एवढा माझा धीर कसा होईल ? धनेश्वरांच्या श्रीमंतीसाठीं मी तुम्हांला लाथेनें झुगारून देत आहें असें मनोहरांना कोणत्या शब्दांनीं सांगूं ? सुखाच्या भरल्या संसारांतून आपल्या पावलीं कशी निघून जाऊं ? देवा ! मला या वेळीं धीर द्या ! [ कुमुद येते. ] कुमुदताई, कां रडतेस बाळ ?

कुमुद : ताई, कुसुमताईनें हें बघ माझें कुंकू विसकटलें ! नीट रेखून लाव पाहूं ?

मालती : लावतें बरें. बाळ, जा कुंकवाचा करंडा घेऊन ये.

कुमुद : मी नाहीं जात करंडा आणायला ! वाटेंत कुसुमताई उभी आहे. तुझ्याच कपाळींचें थोडें कुंकू काढून माझें कुंकू नीट कर.

मालती : [ स्वगत ] कुमुदताई, किती वेळेवर मला सावध केलेंस ! [ उघड. ] लावतें अं, हलूं नकोस जरा. [ आपल्या कपाळाचें कुंकूं तिच्या कपाळीं लावते. ] असें ! पळा आता; जा खेळायला.

कुमुद : ताई, अग, तुझें कुंकू विसकटलें पण ! करंडा आणून लाव नीट पुन्हा बरें का ? जाते.

मालती : तथास्तु ! [ स्वगत ] कुमुदताई, तूं करंडा आणायला जाऊं लागलीस

म्हणजे आपली कुसुमताई आड येते, पण मी कुंकवाचा करंडा आणूं लागलें तर माझें दुर्दैव आड उभें राहातें. विसकटलेल्या कुंकवानेंच मला आतां माझें सौभाग्य शृंगारायचें आहे! मनांत रामराज्य योजून ठेवलें होतें; पण नशिबाला असा वनवास आला! संपला सारा संसार! सगळ्या सुखाचें, आशांचें, प्रेमाचें ब्रह्मांड लोपून गेलें! आतां माझ्याजवळ काय राहिलें? एक हा एवढा एकान्तांतला एकच अश्रु! बाबा निघून गेले; हा अश्रु आतां कुणीं पुसायचा बरें? वेडे मालती, हा एकान्तांतला अश्रु आतां गालावरच्या गालावरच वाळायचा!

( राग – पिलू, ताल – दीपचंदी. )

आलें नशिबिं या निःसार।
मनें सांत्वन अपुलें आपण करणें ॥ ध्रु० ॥
श्वासा श्वास न मिळतां अंतरि। प्राण असे आतां विरणें ॥ १ ॥
नयनजला नच कुणी चुंबाया। शोकदाहि उरलें सुकणें ॥ २ ॥

[ जाते. ]

## प्रवेश पांचवा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : महेश्वर कांहीं कागद पाहात बसला आहे. ]

**महेश्वर** : [ स्वगत ] हेच ते कागद याबद्दल शंकाच नको. घनश्यामानें ज्या खाणाखुणा सांगितल्या त्या एकसारख्या जमताहेत तर खऱ्या! हे कागद म्हणजे लतिकेचें खरेदीपत्र, इंदूची सोडचिठी, माझी लग्नकुंडली, काय वाटेल तें! घनश्याम बुद्धिवान् खरा! अंदाजानें या कागदपत्रांचा पत्ता काय नेमका सांगून टाकला त्यानें! मोजून टाकावेत हे सारे एकदां कागद झालें!

[ कागद चोरून मोजूं लागतो. मागाहून हळूच बिंदु येते. ]

**बिंदु** : [ स्वगत ] मनाला कसा चटका लागून राहिला आहे सारखा! होय नव्हे म्हणतां म्हणतां इंदूनें आपल्या लग्नाचें जमवूनच टाकलें आपलें. आंधळा असो, कानडी असो, पण कसा झाला तरी तो नवरदेवच! डोळे नसले म्हणून मुंडावळ्या बांधतां येत नाहींत किंवा कानडी आहे म्हणून वरात काढतां येत नाहीं असें थोडेंच आहे! उद्यां तिचें लगीन उभें राहिलें म्हणजे माझें पापच उभें राहिलें म्हणायचें! त्यांतून मी वडील बहीण! आतां कसें खालीं मान

घालणें आलें मला ! या कार्टीनें काय खटपटी केल्या त्या कांहीं कळत नाहींत! मी बघतें विचारून त्या कानडी म्हाताऱ्याला. पण नाहीं, इंदूचा तोरा अशानें नाहीं कमी व्हायचा. का कामण्णाचेंच स्थळ लाभलें पाहिजे! पण हा काकांच्या खोलींतून गेला केव्हां बाहेर ? मीं सारखी पाळत ठेवली ती फुकटच गेली वाटतें ? [ पाहून. ] अगबाई ! हा तर इथे कसलेसे कागद घेऊन – अगबाई ! चांगला दोन्ही डोळ्यांनीं पाहात बसला आहे. आंधळा नव्हे हा ! अन् काकांचें मराठी कागद वाचतो आहे! बरा दुहेरी तिहेरी सांपडला आहे आतां ! [ हळूच त्याच्यामागें जाऊन उभी राहते. ] कामण्णा, अहो कामण्णा, काय करितां हो हें ?

महेश्वर : [ स्वगत ] अरे बाप रे ! [ कागद लपवून व डोळे मिटून गाऊं लागतो. ] ' मीराके प्रभु गिरिधर नागर '

बिंदु : आतां गाण्याचा आव घालतां काय ? काका, अहो काका !

महेश्वर : [ तिला नमस्कार घालून ] " दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं। अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी " बिंदुबाई, एका गरीब, परदेशी आंधळ्यावर दया करा ! ' मुके आंधळे पांगळे आणि थोटे ' या दुर्बळांच्या यादींत आम्हीं आंधळे दुय्यम दर्जाचे अधिकारी आहोंत. कोणीहि खुशाल डोळे मिटून आम्हां आंधळ्यांवर दया करावी.

बिंदु : ही आंधळी कोशिंबीर पुरे करा ! या आंधळ्या सोंगानें मी कांहीं आतां फसायची नाहीं. तुम्ही आंधळे पण नाहीं, आणि तुम्हांला मराठी पण चांगलें येतें ! काकांचे मराठी कागद चोरून चांगले दोन्ही डोळ्यांनीं पाहात होतां ते ?

महेश्वर : हा प्रमाद माझ्याकडून अगदीं नजरचुकीनें झाला. निव्वळ नजरचूक! बिंदुबाई, माणसाच्या हातून अशी नजरचूक होत नाहीं का कधीं ?

बिंदु : तर तर ! तुमच्या स्वतःच्या नजरचुकीनें नव्हे, तर दुसऱ्यांची नजर चुकवून तुम्ही हा कारभार करीत होतां.

महेश्वर : बरें, माझ्याकडून अपराध झाला खरा; पण तुम्ही मला क्षमा करणार नाहीं का ?

बिंदु : करीन क्षमा; पण माझ्याशीं लग्न करण्याचें वचन द्याल तर क्षमा करीन.

महेश्वर : [ स्वगत ] अरे बाप रे! हिला लग्नाचें वचन द्यायचें आतां! मी गिरणीच्या धुराड्यांत पडून कासावीस होत आहें कीं आगगाडीच्या रुळाखालीं गळा सांपडून चेंगरून मरत आहें ? ज्वालामुखीच्या अग्निरसांत शिजून निघत आहें कीं उत्तर ध्रुवावरच्या बर्फामुळें गोठून जात आहें ? आकाश

दुभंगून मी सदेह वैकुंठाला जात आहें कीं धरणीकंपांत गडप होऊन मी अमेरिकेंत प्रकट होत आहें ?

बिंदु : काय म्हटलें मीं ? तुम्हीं माझ्याशीं लग्न करण्याचें वचन देत असाल तरच तुम्हांला क्षमा करीन; नाहींतर तुमचीं शंभर वर्षें भरलींच म्हणून समजा !

महेश्वर : ती कसली क्षमा ? अहो, तुमच्याशीं लग्न करण्यापेक्षां अधिक भयंकर शिक्षा ती कोणती उरली ? माझीं शंभर वर्षें भरल्याची तुम्हीं मला भीति घालतां आहां; पण मी म्हणतों शंभर वर्षांचें दीर्घायुष्य तुमच्यासारख्या सोव्रतिणीच्या सहवासांत घालविण्यापेक्षां तशी तडकाफडकीं संसारयात्रा आटपलेली काय वाईट ?

बिंदु : ही तुमची बोलण्याची कारवाई नको आहे मला. घटकाभर असेंच म्हणा ना कीं मी आपली कुरूपच आहें म्हणून—

महेश्वर : घटकाभर ? मी तर तुम्हांला घटकाभर सोडून जन्मभर कुरूप म्हणायला तयार आहें. बिंदुताई, आपण आरशांत डोकावलें आहे का ?

बिंदु : हातच्या कांकणाला कशाला हवा आरसा ? आहें, मी अगदीं कुरूप आहें; पण इंदुताईला लग्नाचें वचन देतांना तुमचे डोळे फुटले होते वाटतें ? इंदुताई तेवढी तुमच्या नजरेंत भरली आणि—

महेश्वर : चुकतां आहां तुम्हीं बिंदुताई, इंदु नजरेंत भरली तेव्हां मी तिच्याकडे आंधळ्याच्या दृष्टीनें पाहात होतों हें विसरतां तुम्हीं !

बिंदु : पण खरोखरचे आंधळे कांहीं नव्हतां तुम्हीं ! इंदुताईपेक्षां मी रूपानें वाईट आहे ?

महेश्वर : तुम्हीं दोघी सख्ख्या बहिणी ! तुमच्यांत सरसनिरस कसें ठरवितां येणार ? प्रत्येक व्यंगाला व्यंग आणि काळ्या रंगाला हा काळा रंग दोघींच्या ठिकाणीं हजर आहेच. एक नूरजहान तर दुसरी मस्तानी ! फार गोरेपणामुळें विडा खातांना मस्तानीच्या गळ्यांतून पिक उतरतांना दिसत असे म्हणतात. त्याप्रमाणें बिंदुताई, तुम्हीं जर डांबराचा रस गिळलात तर या तुमच्या काळ्या रंगामुळें तोसुद्धां खुलवटीनें घशाखालीं उतरतांना स्पष्ट दिसेल ! बरें, जो प्रकार तुमचा तोच इंदूचाहि. खरें म्हटलें तर, पूर्वीचे मोंगल बादशहा फार चांगलेपणाच्या कल्पनेनें आपल्या मुलींना बेगमा बनवीत असत तशा, फार वाईटपणामुळें तुम्हीं दोघींनींसुद्धां बेगमाच राहायला हवें. तुम्हीं दोघी टवकारून पाहू लागल्यावर तरुणांची तर गोष्टच नको, पण निर्जीव आरशांची भिंगें तडकतील, आणि घड्याळांचे कांटेसुद्धां जागच्या जागीं थबकतील. तेव्हां

तुम्हां दोघींत फरक तो काय करावयाचा ? नाहीं म्हणायला फार बारकाईनें पाहायचें म्हटलें तर तोंडावरच्या या देवीच्या वणांची संख्या काय कमी जास्त असेल तेवढीच ! तुमच्या कुरूपपणाची तुलनेनें मोजदाद करतांना सूक्ष्म दृष्टीनें या देवीच्या दशांशस्थळापर्यंत गणिताला हांकलीत नेण्याखेरीज उत्तर सांपडायचें नाहीं !

बिंदु : तुमचा हा पांचकळपणा बंद करा पाहूं ! देतां कीं नाहीं लग्न करण्याचें वचन ?

महेश्वर : अहो, पण मी इंदूला वचन दिलें आहे ना ?

बिंदु : तें मला काय सांगतां ? तिला दिलेलें वचन मोडा ; नाहींतर आम्हां दोघींशीं लग्न करा.

महेश्वर : खासा उपाय सुचविलांत ! बाकी दोघींशीं लग्न केल्यावर तुमच्या काळ्या रंगाच्या आधारावर, जन्माचें गुजराण मात्र व्हायला हरकत नाहीं ! पांढरीं पातळें नेसवून उन्हातान्हांतून तुम्हांला घाम येईपर्यंत फिरवून आणावें आणि तीं पातळें खुशाल काळ्या चंद्रकळा म्हणून विकीत सुटावें ! किंवा तसें कशाला ? तुमच्या काळ्या रंगाच्या भांडवलावर ब्रह्मदेवाकडून निदान हबसाणांची एक तरी पिढी रंगवून काढण्याचा मक्ता घ्यावा झालें ! आणि उद्यां काळ्या रंगाच्या पोराबाळांनीं घर भरलें म्हणजे गोऱ्या लोकांना शिद्दी बनवून युरोप खंडाची आफ्रिका करणें म्हणजेसुद्धां हातचा मळ होईल माझ्या ! आणि आपला हा रंगाचा कारखाना श्वेत समुद्रांत काढला, मग तर तुमच्या दोन बुचकळ्यांनीं रशियाच्या दक्षिणेप्रमाणें उत्तरेलाहि एक काळा समुद्र निर्मून चांगल्या भूगोल पंडिताची सहज दिशाभूल करून दाखवितां येईल ! तुमच्या खग्रास मुखचंद्राचा धनी मनांत आणील तर इकडचा सूर्य-सुद्धां तिकडे करून टाकील !

बिंदु : तुमची बडबड वाढायला लागली ! हें बघा मी तुम्हांला बजावून सांगतें कीं मुकाट्यानें माझ्याशीं लग्न करण्याचें वचन द्या. इंदुताईला काय वाटेल तें सांगून निरोप द्या. नाहींतर इथल्या इथें आरडून ओरडून सारें घर जमा करीन. काकांना तुम्हीं अजून ओळखीत नाही ! त्यांना सांगतें कीं तुम्हांला मराठी चांगलें येतें. तुम्हीं आंधळे नाहीं, आणि शिवाय तुम्हीं खाजगी खोलींतून हे कागद चोरून आणले आहेत म्हणून. काका असेच्या असे तुम्हांला चौकीवर नेऊन पोंचवतील; आणि अखेरीस जाल चांगले काळ्या पाण्यावर. करतां लग्न कीं लागूं ओरडायला ?

महेश्वर : [ स्वगत ] काय नशीब कोलांट्या उड्या मारतें आहे पाहा ! ती बया कशी तरी वाटेला लाविली, तेव्हां वाटलें कीं सारी अलाबला टळली म्हणून. पण लागलीच ही दुसरी बला पुढें येऊन उभी राहिली ! माझ्या लग्नकुंडलींतले सगळे शुभ ग्रह प्लेगमुळें बाहेरगांवीं राहायला गेले आहेत कीं काय ?

बिंदु : अजून तुम्ही कबूल होत नाहीं ? करूं का तुमची व्यवस्था एकदांची ?

महेश्वर : तुमचें अंतःकरण तुमच्या बहिरंगापेक्षांहि जास्त काळेंकुट्ट आहे म्हणायचें !

बिंदु : आतां उत्तर द्या एकदांचें पाहूं ?

महेश्वर : [ स्वगत ] घनश्यामानें या संकटांत घालते वेळीं मला फक्त काळ्या डगल्याच्या पोलिसाचीच भीति घातली होती; पण इथें पाहतों तों मदनाच्या राज्यांतला या काळ्या रंगाच्या पोलिसांशीं गांठ येऊन पडली. आतां काय करावें हेंच कळत नाहीं. जन्मठेप काळ्या पाण्याचा चोर होऊं का जन्मठेप काळ्या रंगाचा मालक होऊं ! जाऊं द्या; इंदुप्रमाणेंच ही पीडा पण टाळली पाहिजे.

बिंदु : काय झालें ? आहांत का कबूल लग्नाला ? का करूं आरडाओरड ?

महेश्वर : बस्स. बिंदु, शरण आहें तुला मी ! " घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनीं पाहीन । रूप तुझें ! " मग तें कैदाशिणीचें रूप असलें तरी चालेल.

बिंदु : शपथ घ्या पाहूं अशी !

महेश्वर : देवाब्राह्मणांची शपथ घेऊन सांगतों कीं, मी तुझ्याशीं लग्न करायला केव्हांहि तयार आहें ! या माझ्या शपथेंत अंतर होणार नाहीं. पण बिंदु, आतां माझा घात मात्र करूं नको.

बिंदु : आतां या वचनानें माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें ! आतां मी आपल्या अर्ध्या वचनांत राहीन. पण इंदूला दिलेलें वचन मात्र तुम्हीं मोडायला हवें हो ?

महेश्वर : इंदूला माझें मराठी बोलण्याचें गुपित माहीत झालें आहे, म्हणून इतक्यांतच तिला बिथरवून उपयोगी नाहीं; म्हणून तिच्याशीं जरा सावधगिरीनें वाग. तसेंच मी बाह्यात्कारीं आंधळा आहें हें विसरूं नकोस. शिवाय या कागदांच्या चोरीचा तर कुणाला मागमूससुद्धां लागतां कामा नये.

बिंदु : पण या असल्या चोरीवांचून अडलें होतें काय ? उगीच गळ्याला फांस !

महेश्वर : हें बघ, हें चौर्यकर्म अगदीं सात्त्विक पद्धतीचें आहे. हे कागदपत्र

धनेश्वरपंतांच्या कामाचे आहेत. ते सांपडत नाहींसे झाले म्हणजे धनेश्वरपंत आपले हे कागद सांपडून देणाराला बक्षीस लावतील. या गोष्टीची वर्तमान-पत्रांतून जाहिरात येईल; आणि मग आपण कागद धनेश्वरपंतांना नेऊन देऊं, आणि आपल्याला हजारपांचशांचें बक्षीस देतील. यांत कुणाचें काय नुकसान झालें? तूर्त ही गोष्ट कुणाजवळ बोलूं नकोस म्हणजे झालें. इंदूला लग्नाचें वचन दिलें तेव्हां चरितार्थाच्या सोईसाठीं मीं ही युक्ति योजून काढिली, ती अनायासें तुझ्या उपयोगी पडणार आतां! पण आतां कुठें कांहीं बोलणार नाहींस ना?

बिंदू : नाहीं बोलायची; पण तुम्हीसुद्धां इंदूशीं जास्त बोलत जाऊं नका. चला आतां.

महेश्वर : चला. आतां मी पुन्हा आंधळा होतों! [ स्वगत ] जय मीराके प्रभु गिरिधर नागर! कृष्णावतारीं आपण एकच कुब्जा सांभाळली; पण तुमच्या कृपेनें आज मी दोन कुब्जांचा धनी झालों! ( जातात. )

## प्रवेश सहावा

( स्थळ : धुंडिराजाचें घर; पात्रें : मालती. मनोहरची तसबीर पुढें आहे. )

मालती : ( स्वगत ) प्रेमाच्या मंगल चित्रा, प्रीतीच्या पवित्र परमेश्वरा, आज मी तुझा निरोप घेणार! मस्तकावर हात ठेवणाऱ्या माझ्या पितृस्वरूप परमेश्वराच्या आज्ञेनें, गुडघ्याला मिठ्या मारणाऱ्या गुडघ्याएवढ्या गोजिरवाण्या जगाच्या सुखासाठीं ही मालती आजवर प्रेमानेंच पाहिलेल्या, मनानें जोपासलेल्या, जिवापाड जपून ठेवलेल्या हृदयस्थ भावबंधनाचे धागे निर्दयपणें आज तडातड तोडून टाकीत आहे, प्रेमळ चित्रा, मालती जड जिभेची आहे. मालती बोलत नाहीं हा केवळ लोकापवाद होता. लबाड चित्रा, आपल्यासमोर खिळवून मालतीला चित्रासारखी तटस्थ कोणीं करून ठेवली होती?

( राग-हमीर, ताल-त्रिताल. )

त्वां मजला भारिलें। मंत्रबल मतिला मोहियलें।
अपुलेंसें केलें अचल बनविलें ॥ ध्रु० ॥

स्वसम सुजन करी निज संसर्गे !
ताचित्रहि तरि चित्र न झालें ॥ १ ॥

प्रेमाच्या नवरंगांनीं नटलेल्या देवा, तुझ्याकडे पाहतांना डोळ्यांनीं, आत्मा चरणीं अर्पण करतांना मालतीनें मनःसंकल्पानें काय बोलायचें बाकी ठेवलें होतें ? आपल्या चिमुकल्या डोळ्यांत प्रेमाचें ब्रह्मांड उभारून चित्रदृष्टीनें टक लावून आपण माझ्याशीं बोलत होतां, त्या वेळीं जिवाची जीभ करून अणु-रेणूंच्या बोलांनीं ही मालती प्रत्युत्तरें देत सुटली नाहीं का ? सजीव चित्रा, आज तुमची आमची शेवटची भाषा होणार ! सांग, तुला समजणाऱ्या नेत्रपल्लवीनें आतांच माझें मनोगत तुला सांगून ठेवूं का ? संसाराचा खोटा खेळ मांडण्यासाठीं घटकाभरानें निर्बुज जगाच्या भाषेनें मी तुला या हातानें फेंकून देणार आहे. मालतीच्या संसारसुखाच्या मांडणींत, सुंदर चित्रा, आज आपण अडगळ म्हणून ठरलां आहां. चित्रस्वरूप परमेश्वरा, मी टाकून देतांना माझ्या मुक्त मनाची करपल्लवी आपल्याला समजेल का ? प्रीतीच्या मंदिरांत चिरंजीवरूपानें राहिलेल्या प्रेमळ तरुणींनो; मालतीनें कृत्रिम रागानें फेंकून दिल्यावर या चित्राला आपल्या हृदयाच्या जाळ्यांत वरच्यावर झेलून धरा. पण नको; या मालतीचें दुर्दैवी हृदयच मनोहरांना समाधानाचें सर्वस्व म्हणून वाटत आहे. तुमच्या दिव्य हृदयांचा स्पर्शसुद्धां या त्यांच्या छायेला आवडणार नाहीं. मीच हें चित्र मनोहरांच्या पायांवर जाऊन पडेल असें टाकीन म्हणजे त्या चरणांशीं जडवून ठेवलेल्या मालतीच्या पंचप्राणांच्या जाळ्यांत तें सुखानें जाऊन पडेल. या मुखानें मी आपल्या मूळ स्वरूपाला आज दुखविणार आहें; म्हणून या मुखाचा शेवटचा श्वास किती कोमल आणि नाजूक होता याची आपल्या मुखमंडलावर एकदां कल्पांतापर्यंतची साक्ष वठवून ठेवतें. मनोहर चित्रा आपल्या मुक्या प्रेमाची ही शेवटची तोंडमिळवणी—पण नाहीं—तितका तरी अधिकार आतां मला कुठें आहे ? या देहानें, मनानें, जिवानें, दृष्टीनें दृष्टीच्या अखेरच्या आशेनें, आशेच्या नुसत्या कल्पनेनें, कल्पनेच्या स्वप्नानें, स्वप्नांतल्या कल्पनेनेंसुद्धां ही मालती आज दुसऱ्याची झाली ! धनेश्वरांच्या भावी धर्मपत्नीला मनोहरांच्या चित्राचें तरी चुंबन घेण्याचा काय अधिकार उरला आहे ? पातकी जगाच्या निःश्वासांनीं हलणारीं हीं झाडें लागलींच पानांच्या हजारों जिभांनीं माझी निंदा बडबडायला लागतील. मग नुसतें एकदां डोळे भरून पाहून तरी घेऊं का ? पण मेलेल्या प्रेमाला तेंहि सुख नाहीं. निष्ठुर दुर्दैवानें माझ्या डोळ्यांवर पाण्याचा पडदा बांधून सुखाचें

चित्रसुद्धां माझ्या दृष्टिआड केलें आहे. निर्दय देवा, हजारों धर्मांकडून हजारों उपचारांनीं आपली पूजा होत आहे; पण प्रेमाच्या जगांत स्त्रीधर्मानें वागतांना आपल्या हातानें फोडून टाकलेल्या मूर्तीची पूजा बांधायचा एकादा प्रकार आपल्याला माहीत आहे का ? मालतीच्या प्रेमस्वरूप परमेश्वरा, हृदयाच्या मनोहर देवा, आपल्यावांचून बोध मला कोण देणार ? [ मनोहर प्रवेश करतो. ] [ स्वगत ] मनोहर, दगडाच्या सगळ्या जातींचा आपण अभ्यास केलांत. पण आपला मनोभंग करणारा हा स्त्रीहृदय नांवाचा दगड आपल्या दृष्टीस पडणार आहे. प्रेमाच्या परमेश्वरा, आजवर प्रीतीच्या कोमल प्राणपुष्पांनीं आपली चरणसेवाच करीत आलें; आणि आतां तर कठीण दगडधोंड्यांनीं मी आपल्या हृदयाचा भेद करणार आहे !

मनोहर : मालती, कशाला बोलाविलेंस मला ? तुझा निरोप ऐकतांच मी निघून आलों.

मालती : तुम्हांला कायमचा निरोप देण्याकरितां.

मनोहर : तूं काय बोलतेस हें मला समजत नाहीं.

मालती : माझें मलाच जिथें नीटसें समजत नाहीं तिथें तुमचा तरी काय अपराध ? मनोहर, मनुष्याला हृदय असतें अशी तुमची कल्पना आहे का ?

मनोहर : मालती, आपणां दोघांना तरी या प्रश्नाचें उत्तर खात्रीनें माहीत आहे.

मालती : योग्य कारण मिळालें तर माणसाचें मन बदलतें का ? बदललेलें मन दुसऱ्याला स्पष्टपणें सांगितलें तर तो अपराध होतो का ? प्रेमाचा विश्वासघात करणें हें खरोखरीच पातक आहे का ? नुसत्या शब्दांच्या वचनानें माणूस जन्माचें बांधलें जातें का ? तुमचें प्रेम तुमच्या अंगावर परत फेंकून दिलें तर मला कोणी विचारणार आहे का ? वाटेल त्या वेळीं राक्षसाप्रमाणें निर्दय व्हायचा मनुष्याला थोडे सुद्धां अधिकार नाहीं का ?

मनोहर : कोण विचारतें आहे हें सारें ?

मालती : मालती नांवाची एक सुंदर आणि चंचल स्वभावाची स्त्री.

मनोहर : मालती, तुला हें बोलायला कोणीं शिकविलें ?

मालती : स्त्रीहृदयानें.

मनोहर : मालती, मी एकदम दिङ्मूढ झालों आहें. माझ्या बधिर बुद्धीला समजून येईल अशा शब्दांनीं तुझें म्हणणें नीट सांग.

मालती : [ पत्र देऊन ] हें घ्या, वाचून पाहा.

मनोहर : [ पत्र वाचतो. ]

मालती : [ स्वगत ] स्पष्ट शब्दांनीं हृदयें जोडण्याचा भाव सांगतां येईना म्हणून शकुंतलेनें प्रणयपत्रिका लिहिली, आणि स्पष्ट शब्दांनीं हृदय तोडण्याचा भाव व्यक्त करितां येईना म्हणून मालतीनें ही प्रणयपत्रिका लिहिली.

मनोहर : मालती, मालती, काय लिहिलें आहेस तूं ?

मालती : जें सांगायचें होतें पण सांगतां येईना, तें ! शरीराप्रमाणेंच मनानें दूर झालेल्या व्यक्तीलाहि आपलें हृद्गत पत्रद्वाराच कळवावें लागतें.

मनोहर : मालती, मी दरिद्री म्हणून तूं माझा त्याग करणार, आणि धनेश्वरांच्या —काकांच्या श्रीमंतीसाठीं तूं त्यांच्याशीं लग्न करणार ?

मालती : यांपैकीं पहिली गोष्ट मी करून चुकलें आहें, आणखी दुसरी लवकरच करणार आहें. [ स्वगत ] बोलण्यानें बोलणें वाढवून दोघेहि दुःखी होण्यापेक्षां यांच्याशीं नाइलाजानें इतकें कठोर बोललें पाहिजे कीं यांना एकदम माझा तिटकाराच येईल.

मनोहर : असें करण्याचें कारण काय ?

मालती : या संसारांत वैभव हेंच एक सुखाचें साधन आहे; आणि मला पाहिजे तितकें वैभव आज तुमच्याजवळ नाहीं किंवा उद्यांहि तुम्हांला मिळण्याचा संभव नाहीं.

मनोहर : प्रथम तुझे विचार असे नव्हते. इतक्या थोड्या अवकाशांत इतका फरक कसा झाला ?

मालती : विचार बदलण्याला कालावधीची आवश्यकता मुळींच नसते. ज्या जगांत क्षणमात्राच्या धरणीकंपानें पर्वतांच्या जागीं सरोवरें निर्माण होतात, त्यांत एखाद्या व्यक्तीच्या विचारांत क्रांति व्हायला फार वेळ लागला नाहीं, ह्यांत नवल तें कोणतें ?

मनोहर : मालती, तूं मला वचन दिलें होतेंस !

मालती : हो, आणि तें मी आज मोडणार आहें.

मनोहर : मालती, मालती, ही निष्ठुरता तुझ्या अंगीं कोठून आली ? त्या वचनाच्या आनंदाच्या भरांत काल रात्रीं त्यांतल्या एकेका अक्षराची मी आकाशांतल्या चांदण्यांशीं तुलना करीत बसलों होतों; तेव्हांची ती मनःस्थिति व आतांची मनःस्थिति यांच्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडावें ना ? त्या तारका आज पुन्हा तितक्याच तेजानें उजळ माथ्यानें मिरवतील, आणि त्या वचनांतल्या अक्षरांना मात्र तूं निर्दयपणानें पायदळीं तुडवून मातीला मिळवीत आहेस ! कठोर, निर्दय, मालती ! या अघटित प्रकाराला म्हणावें तरी काय ?

मालती : या अग्रहित स्थित्यंतरांच्या समूहालाच संसार असें म्हणतात. रात्रीच्या प्रशांत वेळीं मनुष्य आकाशांतल्या तारा एकमेकींना जोडून आशावादीपणानें सुखाचीं सत्तेज स्वप्नचित्रें जुळवीत बसतो, आणि सकाळीं दिवस उगवल्यामुळें तीं स्वप्नें मावळतांच पायांखालचे खडे तुडवीत रखडत फिरतो.

मनोहर : मालती, त्या वचनाबद्दल माझा कठोर तर्क शेवटीं खरा ठरला!

मालती : त्याला मी तरी काय करूं? प्रेमभरांत दिलेलीं वचनें प्रेमाभावीं दुःखवृद्धीला मात्र कारणीभूत होतात. दिवसाच्या उजेडांत रस्त्यावरच्या खुणा पटवून देणारे दगड रात्रीच्या अंधारांत ठेंचाळण्याचें दुःख मात्र देतात. तशींच हीं प्रेमाचीं वचनें दुःखकालीं आठवणीला कठीण काय तीं होऊन बसतात.

मनोहर : मालती! मालती! अशी निष्ठुर होऊन जन्माची निराशा करूं नकोस. आपल्या साऱ्या सुखमय आयुष्याचें नीट स्मरण कर.

मालती : त्या गत आयुष्याचें विस्मरण पाडायचें ही एकच गोष्ट भावी आयुष्यभर मला स्मरणांत ठेवायची आहे. मनोहर, तुम्हीं मला वेळोवेळीं लिहिलेलीं पत्रें उद्यां तुमच्याकडे पाठवून देईन.

मनोहर : प्रेमाचा नाश झाल्यामुळें अनुभवांचा आपलेपणा नाहींसा होतांच प्रणयपत्रांना गोड शब्दांनीं भरलेल्या कादंबरीच्या छापील पत्रांचीसुद्धां किंमत उरत नाहीं.

मालती : आणि मनोहर, ही तुमची तसबीर! ही आठवणीसाठीं तुम्हीं मला नजर केली होती; पण आतां माझ्या दृष्टीनें हिच्यावर नजर टाकणें म्हणजे निव्वळ पाप आहे. ही घ्या परत.

[ चित्र टाकून देते. मनोहर चित्र उचलतो. ]

मनोहर : तुझ्या चरणीं अर्पण केलेलें हें चित्र शेवटीं माझ्याच पायांवर पडलें ना? पण जिथें मूळ स्वरूपाचीच पायमल्ली झाली तिथें बिचाऱ्या चित्राची काय कथा? मालती, मनुष्यांना परमेश्वरानें अशीं चंचल हृदयें देण्यापेक्षां या चित्राप्रमाणें त्रिकालाची बाह्य एकरूपताच देऊन ठेविली असती तर किती चांगलें झालें असतें! हें चित्र त्या वेळीं जसें होतें तसेंच आजहि आहे! त्या आशापूर्ण प्रेमाचें हें चित्र —

मालती : मनोहर, तें आशापूर्ण प्रेम म्हणजे एक वेड होतें.

मनोहर : वेड होतें? मालती, काय म्हणतेस? तें सारें वेड होतें?

मालती : वेड नाहीं तर काय? तुमच्या दारिद्र्याची – तुमच्या परिस्थितीची

नीटशी कल्पना बांधल्यावांचून तुम्ही मनाचे मनोरे बांधून वाटेल त्या प्रेम-मूर्तीची त्यांत स्थापना करीत बसलां, हें वेडच नाहीं का? माझ्या स्त्रीगुणांची यथार्थ कल्पना आल्यावर मीं वैभवशाली संसाराची इच्छा कां करूं नये? जा मनोहर, माझ्या प्रेमाचें हें भलतें वेड मनांतून काढून टाका.

मनोहर : खरें आहे! मालती, माझें प्रेम म्हणजे एक वेडच होतें. मालती, आपल्या भाग्यशाली संसाराच्या सुखोपभोगांत मग्न होऊन एखाद्या उंच इमारतीच्या गच्चीवर बसून जगाची गंमत पाहतांना हा दरिद्री मनोहर रस्त्यावरून रखडतांना तुझ्या दृष्टीस पडला म्हणजे आपल्या भोंवतालच्या श्रीमंत मैत्रिणींना हंसविण्यासाठीं केवळ करमणूक म्हणून मनोहराच्या दरिद्री वेडाची कहाणी सांग. हंसतां हंसतां शेवटीं तुझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आले म्हणजे तुला क्षणभर थांबावें लागेल. त्या एका क्षणांत चटकन तुला आपल्या गत जीविताची दुःखमय स्मृति होऊन आनंदाश्रूंनीं डबडबलेल्या तुझ्या पापण्या किंचित् करुणाश्रूंनीं भिजून निघतील. तेवढ्यांत इतकें सांगायला मात्र विसरूं नकोस कीं, मनोहराचें वेड दरिद्री होतें, हंसण्यासारखें होतें; पण शेवटीं सांग कीं मनोहराचें हें वेड खरें होतें. मालती, संपली माझी वेडी बडबड! मला आणखी कांहीं सांगायचें आहे?

मालती : आतां सांगायचें कांहीं उरलें नाहीं एवढेंच आतां सांगायचें उरलें आहे!

मनोहर : मग कुठें जायचें हें माहीत नाहीं, पण इथून तरी जातों मी आतां.

[ जाऊं लागतो. ]

मालती : थांबा, मनोहर शेवटीं एक मागणें उरलें आहे. विरहांत प्रेमाची स्मृति कायम ठेवायची असली म्हणजे गोड शब्दांनीं निरोप घ्यावा लागतो; पण प्रेमस्मृतीचा नाश करण्यासाठीं शेवटीं कठोर शब्दांची जरुरी असते. मी तुम्हांला कठोर बोलल्यामुळें तुमच्या मनांत यापुढें माझी आठवण नेहमीं कडवटपणानें होत जाईल. माझ्या हृदयांतली तुमच्याबद्दलची कल्पना कडू करून ठेवण्यासाठीं तुम्हींहि जातां जातां माझ्यावर विषारी शब्दांचा वर्षाव करून जा. मनोहर; मनोहर, [ त्याच्या पायांवर मस्तक ठेवून ] मला तुमच्या आशीर्वादाची अपेक्षा नाहीं: पण तुमच्या चरणीं मस्तक ठेवून मी शापाची याचना करीत आहे. मनोहर, मला एक शेवटचा शाप देऊन जा.

मनोहर : मालती, आजन्म तुझ्या सुखासाठींच प्रयत्न करण्याची मीं प्रतिज्ञा केलेली आहे. मी तुला शापकठोर शब्द कसा ऐकवूं?— मालती, तुझी

विनंती मला मान्य आहे. मालती क्षमा कर! तुझ्या प्रेमानें पवित्र झालेला मनोहर तुला शाप द्यायला तयार आहे! मालती, ऐक माझा शाप! प्रत्येक सुखाचा प्रसंग यापुढें मला विषासारखा वाटणार आहे, म्हणून माझ्या दैवीं विधात्यानें भावी कालीं जे सुखप्रसंग योजून ठेवले असतील त्या सर्वांचा तुला लाभ होवो! हे दयाघन परमेश्वरा—

* ( राग – भूप, ताल – झपताल. )

विनति अंतिम असे ईश्वर तव पदा ॥ ध्रु० ॥
मार्लि मम रेखिला । अखिल सुखलेख जो ।
अंकित प्रीतिच्या चरणतलिं करिं सदा ॥ १ ॥
दुःख खरतर वितरि । प्रभुवरा मम शिरिं ।
देईं इजसी परी सकल सुखसंपदा ॥ २ ॥

मालती : [ स्वगत ] एक मनोहर स्वप्न संपलें! ललाटींचा मनोहरचरणस्पर्श मालतीला दुरावला! मनोहर, मनोहर, असेच जलदीनें माझ्या हांकेच्या आटोक्याबाहेर जा, म्हणजे— आतां नाहीं ना माझी हांक ऐकू येणार?— म्हणजे त्रिवार मोठ्यानें हांक मारतें. [ उघड ] मनोहर, मनोहर, मनोहर! मनोहर नादब्रह्म वाऱ्यावर विरून गेलें! – झालें मनोहर दिसेनासे झाले! सर्वस्वाची मनोहर सृष्टि दृष्टिआड झाली! एक मनोहर स्वप्न सर्वतोंपरी संपलें. जिवाला चिमटा बसून जागें झाल्यावर आतां पुढें काय पाहायचें? – गळ्यांत मगरमिठी मारण्यासाठीं वृद्ध धनेश्वराच्या रूपानें पुढें आलेल्या क्रूर काळ-पुरुषाचे पसरलेले बाहू! आणि माझ्या प्रेमळ पित्याचे आशीर्वादासाठी उभारलेले बाहू! मालती, देवाचें नांव घेऊन संसारांत पहिलें पाऊल टाकायला तयार हो. परमेश्वरानें नेमून दिलेलें कर्तव्य प्राणिमात्राला प्रेमाच्या भरानें पार पाडावें लागतें. संसारांत पडण्यापूर्वी तरुण जीवाला वाटत असतें कीं, प्रेम परमेश्वरस्वरूप आहे. पण शेवटीं प्रत्ययास येत जातें कीं परमेश्वर प्रेमस्वरूप आहे. संसारांतला हा पहिला आणि सरता धडा या मालतीला सुरवातीसच शिकावा लागला. जन्माला येऊन आशाळभूत मानवी जीवानें संसाराच्या शाळेंत एवढाच पाठ शिकवायचा असतो कीं—

* ( राग – मांड, ताल – धुमाळी. )

मोह नसावा । त्याग ठसावा
भावहि हृदयीं विरावा ॥ ध्रु० ॥
आशामय हें स्वप्नचि आहे ।
हा भवि अनुभव यावा ॥ १ ॥
जीव निदानीं । नयनजलांनी
ब्रह्मार्पणाचि करावा ॥ २ ॥

[ जाते. ]

## अंक दुसरा समाप्त

## अंक तिसरा

### प्रवेश पहिला

[ स्थळ : स्मशान. पात्रें : घनश्याम खड्डा खणीत आहे. ]

घनश्याम : [ स्वगत ] कल्पनेनें खेळ बसवला, आणि तसा होतहि चालला आहे. महेश्वरानें काम मात्र चोख बजाविलें खरें ! मला फार धास्ती होती कीं, या फटिंगाच्या हातून एवढें जबाबदारीचें काम कसें उरकेल म्हणून ! बस झाला हा खड्डा ! या संध्याकाळच्या वेळीं या स्मशानांत अशा अवतारानें वावरतांना मला कोणी पाहिलें तर छाती हबकून जाईल बघणाराची ! वस्तुतः हे कागद या स्मशानांत आणून दडविण्याचें तितकें कारण नव्हतें; पण या कागदांचें रहस्य या महेश्वराला माहीत आहे; तो कदाचित् या बाबतींत दुखावला जाण्याचा संभव आहे; आणि असें झालें म्हणजे न जाणो तो हे कागद हुडकायच्या नादाला लागायचा. आजच कांहीं त्याला माझ्या घरीं मज्जाव करतां येत नाहीं. तेव्हां इथेंच हे कागद पुरून ठेवले म्हणजे भीती-मुळें महेश्वर स्मशानांत यायची भीति बाळगायला नको ! त्यांतल्या त्यांत मुलें पुरण्याच्या बाजूच्या विरुद्धची ही स्मशानाची बाजू तर फारच भयाण आहे ! या बाजूचीं हीं पडकीं भिंताडें, हे भेसूर वृक्ष, सारें कांहीं पिशाचांनीं पछाडल्या-सारखें दिसतें आहे ! अश्रूंच्या सिंचनानें पोसलेल्या आणि दुःखनिःश्वासांनींच हलणाऱ्या या स्मशानवृक्षांना आनंद म्हणून काय पदार्थ आहे याची जाणीव तरी असेल का ? एखाद्या मत्सरी मनुष्याला सूडाच्या त्वेषानें भार-लेल्या दुबळ्या देहाच्या राखेवर बसून सैतानी समाधानानें हसतांनाच काय तो या वृक्षांनीं पाहिलेला असेल ! दुःखाचें मात्र यांना कांहीच वाटत नसेल ! पाहा, किती संथपणानें हे वृक्ष त्या जळत्या चितेकडे पाहात आहेत ! तेच

आम्हां जित्या जीवांना या चितेकडे पाहतांच काय वाटतें ? त्या प्रेतदेहापेक्षां आमच्या मनालाच या चिताग्नीचा जास्त चरका बसत असतो. केवढा का कर्तबगार प्राणी असेना, शेवटीं सरणावर भाजून निघण्याचें मरण कांहीं त्याला टळत नाहीं. लाकडांच्या शेजेवर गोवऱ्यांच्या गिरद्या रचून, थंडगार पडलेल्या अंगावर आगीची भरजरी शाल पांघरून मलाहि कधीं तरी या उघड्या रंगमहालांत काळझोंप घ्यावी लागणारच ! वाः ! काय भलत्या कल्पनांचें काहूर उत्पन्न झालें ! हृदयाची क्रिया बंद पडल्यामुळें एका क्षणाची आगाऊ सूचना दिल्यावांचून तडकाफडकीं, जगाची भाडोत्री वस्ती सोडून जाणाऱ्या जीवाच्या प्रेतासाठीं रचलेलें सरण ढांसळतांना नीट करीत करीत-सुद्धां कांहीं लोक चिरंजीवांच्या संघटित सामर्थ्यानें इमलेइमारती बांधण्याचा बेत करतात, तर लतिकेच्या शृंगारमंदिराचा हा पाया खणीत असतांना मी तितक्याच वेडेपणानें या उघड्या रंगमहालांतल्या अखेरच्या झोंपेचें स्मशान-वैराग्य मनांत आणीत आहें ! तूर्त या विचारावांचून कांहीं अडलेलें नाहीं. मघांचा तो हिरवा दगड कुठें पडला ? ठीक, आतां हा धुंडिराजाचा कबूली-जबाब, धनेश्वराचे हे खोटे कागद आणि माझी ही रोजनिशी ठेवावी या डब्यांत ! हो, पण हे कागद माझ्या हातीं आहेत याची धनेश्वराला साक्ष पटवून देण्यासाठीं ही एखादी खोटी हुंडी विसारादाखल जवळ ठेवलेली बरी ! [ एक कागद खिशांत ठेवतो व बाकीचे डब्यांत ठेवतो. ] वाः, या एवढ्याशा जस्ती डब्यांत दोन थेरडे, दोन तरुण आणि दोन पोरी इतक्याजणांचीं कमनशिबें कोंबून भरलेलीं आहेत ! आतां याची समाधि बांधून मोकळें व्हावें. [ खड्ड्यांत डबा पुरतो. ] आतां हा हिरवा दगड अर्धवट पुरून ठेवावा यांत; म्हणजे हजारों दगडांच्या या माळरानांत या जागेची खूण पटायला केव्हांहि हरकत नाहीं. बस, झालें हें काम व्यवस्थेशीर. आतां धनेश्वराकडे जाऊन मोकळ्या मनानें लतिकेबद्दल मागणी घालावी. त्याचप्रमाणें लवकरच महेश्वराला त्या घरांतून बाहेर काढला पाहिजे. नाहीं तर बेवकूफपणानें तो भलतेंच करून बसायचा ! परमेश्वरानें त्याला डोकें दिलेलें आहे तें उपयोगासाठीं नसून केवळ मनुष्यदेहाची परंपरा सांभाळावी म्हणूनच ! चला, हिरव्या दगडाची ही ठळक खूण असल्यावर या जागेच्या जास्त खाणाखुणा बारकाईनें पाहात बसण्याची कांहीं जरूर नाहीं.

[ जातो. ]

प्रवेश दुसरा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : महेश्वर आंधळ्याप्रमाणें येतो. ]

महेश्वर : [ स्वगत ] या पोरींनीं भंडावून सोडलें बुवा ! लहान मुलांच्या उत्सुकतेनें प्रत्येकजण माझ्या हृदयांतलें आपलें प्रेमाचें रोप शाबूत आहे कीं नाहीं हें घटकेघटकेनें येऊन पाहून जात आहे ! झालें, आली काळ्या रंगाची एक उधळपट्टी ! [ इंदु हळूच लपत लपत येते. ]

इंदु : [ स्वगत ] आतां पाठीमागून हळूच जाऊन यांचे डोळे झांकावेत; म्हणजे यांना खूप आनंद होईल !

महेश्वर : [ स्वगत ] ही हळूच माझा घांस घेणार आहे कीं काय ? [ तंबोरा एकदम फिरवितो. ]

इंदु : हें काय हें ? लागलें असतें ना मला ?

महेश्वर : कोण ? इंदु ? मला काय माहीत तूं येथें आहेस म्हणून ? अशी लपत छपत कां आलीस ?

इंदु : मी हळूच मागून येऊन तुमचे डोळे झांकणार होतें; म्हणजे तुम्हांला दिसलें नसतें कोण आहे तें. असें गुपचूप डोळे झांकणें हा प्रेमाचा एक प्रकार आहेसें म्हणतात !

( राग – काफी, ताल – त्रिताल. )

प्रणय अंध करितो । तदनुकृतिकुशल युवति करिं
मिटित नयनयुग पटुमति करि निज रमण अंध तो ॥ ध्रु० ॥
मृदुलकरकमल-मृदुस्पर्श कीं । शीघ्र सुचवि निज धनिन वराकी ।
अपजयहि गणित । विजय ती मुदित ॥ १ ॥

महेश्वर : पण आंधळ्याचे डोळे झांकण्यांत कुठें प्रेम उरलें ? जन्मांधाच्या डोळ्यांना चष्मा लावून जसा कांहीं फायदा नाहीं; तसे डोळे अजिबात झांकल्यानें नुकसानहि होत नाहीं.

इंदु : दम खा; बिंदुताई आली. [ बिंदु येते. दोघी एकमेकींकडे बघतात. ]

महेश्वर : आली ? बरें झालें ! [ स्वगत ] ही दुसरी अवकळा आली ! ज्या स्त्रीजातीच्या नामकरणासाठी ललना, रमणी यांसारख्या ललित शब्दांची योजना झाली, त्याच सुंदर वर्गावर अवदसा, कंजारीण या शब्दांची आग कशी पाखडण्यांत आली असावी या गोष्टीचा खुलासा या दोघींकडे पाहिलें म्हणजे

ताबडतोब होतो ! विधात्यानें आधीं शूर्पणखा, हिडिंबा, कुब्जा हीं विद्रूप वळणें गिरवून कसलेल्या हातानें या दोन, परीक्षेसाठीं पुस्त्या काढल्या असाव्यात असें दिसतें ! एकेकीच्या चेहऱ्याकडे बघतांक्षणींच मुळीं मनुष्य अर्धामेला होऊन जातो ! यांचे आईबाप इतक्या लवकर कां मेले हें सांगणें कांहीं मोठेंसें कठीण नाहीं ! आईबाप आणि कुणीतरी दोन तरुण अशा चौघांच्या मुळावर या दोन पोरी जन्मास आल्या असाव्यात ! परमेश्वरा, तीन वर्षांच्या आंतील पोरें हातोहात हातावेगळीं करण्याची विद्या या काळ्या कार्ट्यांच्या लहानपणीं तुझ्या हस्तगत झाली नव्हती का ? काय रागानें एकमेकींकडे पाहताहेत पण ! आतां या काळ्याकुट्ट कोकिळांना कर्कश कंठ केव्हां फुटणार ?

बिंदु : काय हो कामण्णा, पुन्हा तुम्ही इंदूशीं बोलत बसलांतच ?

महेश्वर : [ स्वगत ] आली कंबख्तीची वेळ ! ही राक्षसीण बचकभर तोंड उघडून बोलायला लागली म्हणजे खायला उठल्यासारखी वाटते ! हा काळा कोळसा पण धुमसतोच आहे ! आतां पायांखालीं वणव्याची आग भडकावी आणखी टाळक्यावर वीज कडकडावी अशांतली दशा होणार माझी ! मीराके प्रभु, सांभाळा आता आपल्या गुलामाला !

इंदु : काय ग, काय झालें माझ्याशीं न बोलायला ग ? मग काय तुझ्याशीं बोलायचें का ?

बिंदु : हो, हो; मला टाकून हिच्यासारख्या कुब्जेशीं बोलत बसायला तुमचे डोळे फुटले का आहेत ?

इंदु : इकडे बघा हो – म्हणजे इकडे तोंड करा. ही तुम्हांला हिणवायला लागली बरें !

महेश्वर : [ इंदूकडे ] मी काय पाहाणार ? तूंच पाहा आतां. [ बिंदूकडे बळून डोळे उघडून ] आंधळ्याला असें हिणविणें चांगलें का ?

बिंदु : झालें काय तुम्हांला आंधळे व्हायला ?

इंदु : ही का कुणाच्या हातची गोष्ट आहे वाटतें ? अहो, तुम्ही तिकडे बघूंच नका. आपले माझ्याकडे पाहा म्हणजे झालें !

महेश्वर : [ इंदूकडे ] तुझ्याकडे तरी काय पाहणार कपाळ ! माझ्या कपाळीं मुळीं कुणाकडेच पाहणें नाहीं !

बिंदु : झालें, दोन लघळ शब्द बोलल्याबरोबर तुमची नजर बदलली !

महेश्वर : [ बिंदूकडे डोळे उघडून ] माझी नजर कशी बदलणार ? मी आंधळा आहे हें रागाच्या भरांत विसरलीस वाटतें बिंदु तूं ?

बिंदु : [ स्वगत ] खरेंच, भलतेंच बोलून जात होतें मी ! [ उघड ] कामण्णा, मला बोलायचें भानच राहिलें नाहीं ! तुम्ही खरेखुरे आंधळे नसतां तर हिच्याशीं एक शब्द तरी बोललां असतां का ?

इंदु : इतकी मी वाईट आहें वाटतें ? नाहीं हो, कामण्णा ! माझें तोंड किनई कमळासारखें आहे !

बिंदु : हो, कृष्णकमळासारखें ! मग माझें तोंड तर चंद्रासारखें आहे !

इंदु : पण त्या चंद्राला खग्रास ग्रहण बरीक लागलें आहे तेवढें !

बिंदु : हिची मान वांकडी आहे, बरें का हो ?

इंदु : अग, मी तुझ्या वांकड्या मानेचें वेडावणें दाखवितें आहें.

बिंदु : खरें हो खरें ! मात्र जन्मापासून ही मला असें वेडावीत सुटली आहे, आणि ही जित्याची खोड मेल्यावांचून मात्र जायची नाहीं आतां !

इंदु : कामण्णा, ही कांहीं तरी सांगते आहे हो तुम्हांला ! खरें पाहाल तर मी एखाद्या अप्सरेसारखी सुंदर आहें !

महेश्वर : [ स्वगत ] मात्र चौदा रत्नांबरोबर अप्सरांचा तांडा क्षीरसमुद्रांतून बाहेर आला, आणि ती गर्दी टाळण्यासाठीं ही काळ्या समुद्रांतून वर आली !

बिंदु : अहाहा ! अप्सरेचा अवतार बघा ! अग, तूं जर अप्सरेसारखी असशील तर मला तर रतीसारखें समजावें लागेल !

महेश्वर : [स्वगत] रतीसारखी कां ? प्रत्यक्ष रतीच आहेस तूं ! मात्र शंकरानें मदनाला जाळलें त्या वेळीं पतिभक्तीच्या भरांत फार जवळ गेल्यामुळें त्या आगीच्या लोळांत तूं नखशिखांत करपून निघालीस, एवढेंच ! बाकी शंकरानें त्या वेळीं मदनदहनाची उगीच घाई केली ! आपल्या सैन्यांत या दोघींची भरती झालेली पाहून मदनाच्या अंगाचा खास भडका उडाला असता ! काय तावातावानें शिरा ताणून भांडताहेत एकमेकींशीं ! अशांत एकीचा रागानें दम कोंडून प्राण गेला आणि दुसरी त्या धक्क्यानें हृदयाची क्रिया बंद पडून मेली तर काय बहार होईल ! अहाहा, मृत्यु हा केवढा आधार आहे जगाला ! मृत्यूनें कधीं तरी या पीडा टळणार आहेत या कल्पनेनें काय समाधान वाटतें मनाला ! पुढली पिढी किती भाग्याची !

बिंदु : का हो, तुम्ही कां बोलत नाहीं ? तुम्हीच सांगा पाहूं आमच्यांत कुणाचें रूप चांगलें तें ?

महेश्वर : मी काय बोलूं दगड ? जी. आय् पी. आणि बी. बी. यांच्या दुहेरी धूमधडाक्यांत सांपडलेल्या मुंबई शहराप्रमाणें माझ्या मनाची स्थिति झाली

आहे ! शिवाय बिंदु, तुला मी एकदां सांगून टाकलें आहे ना, कीं तुमचीं हीं काळीं कोडीं आपल्याला उलगडत नाहींत म्हणून ?

इंदू : ते कांहीं का सांगेनात, मी कुठली ऐकायला ! असें यांचें बकोटें धरून फरफटीत ओढीत नेतें इथून यांना ! ही बघ !

बिंदु : मी वरी गप राहीन ! यांची शेंडी धरून इथल्या इथें डांबून ठेवीन यांना !

महेश्वर : अरे बाप रे ! धांव रे रामराया । किति अंत पाहसी ! प्राणान्त मांडियेला न ये करुणा कैशी । धांव रे रामराया ।। बायानों, माझी अशी दैना करायला मी कांहीं एकीचाहि नवरा झालों नाहीं अजून ! हें पाहा, तिलोत्तमेसाठीं सुंदोपसुंद झगडून मेले. त्याप्रमाणें तुम्ही माझ्यासाठीं आधीं द्वंद्वयुद्ध खेळा. तोंपर्यंत कुंवारपणाला न शोभण्याजोगें मी कुणाला कांहीं करूं देणार नाहीं. बिंदु, तुला काय म्हणावें हेंच कळत नाहीं ! मला डोळे नाहींत म्हणून माझ्यावर दया करायची हें विसरलीस वाटतें ? इंदु, चल पाहूं मला घेऊन इथून !

इंदु : चला ! [ त्याचा हात धरून नेऊं लागते. ] काय करावें ! तुम्हांला डोळे असते किनई म्हणजे या बिंदुताईची चांगली गंमत पाहिली असती आपण !

महेश्वर : चल. उद्यां चार पोरें झालीं म्हणजे मला दृष्टि मिळविण्यासाठीं गुलबकावलीचें फुल आणायला पाठवूं त्यांना ! चल. [ स्वगत ] लतिकेसारखी चटकचांदणी लाभावी म्हणून इथें यावें, आणि या दोन नक्षत्रांनीं असें राशीस बसावें ! याला म्हणतात ग्रहयोग ! जय मीराके प्रभु ! [ इंदू व महेश्वर जातात. ]

बिंदु : [ स्वगत ] हे इंदूला फसवीत आहेत कीं मला ? धड कांहींच कळत नाहीं मेलें ! बघावें बघावें, नाहीं तर यांचा नाद द्यावा सोडून, आणि त्या गिरसाप्पांना लग्नाचें विचारावें झालें. ते म्हातारे असले तरी यांच्याइतके दुटप्पी तरी खास नसतील. इथें मेला सारा संशयाचा गोंधळ !

[ जातो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : लतिका. ]

लतिका : ( स्वगत ) वेडी मालतीबाई बिचारी ! मलाच ती वेडी समजते

एखाद्या माणसाचा बोलका स्वभाव असला म्हणजे त्याच्या बोलण्यांत कधींच का अर्थ नसतो ? मी दिसतें तशी खरोखरीच नुसती बेजबाबदार बडबड करणारीच का आहें ? या वयांत बाबा लग्न करायला तयार झाले; आणि आतांसुद्धां त्यांना तोडून बोलूं नको का ? माझें बोलणें कडू असलें तरी त्याला कारण बाबांची करणीच ना ? बाबांना उणीं उत्तरें बोलतें म्हणून लोक मला नांवें ठेवतील; पण पापाची उपेक्षा किती दिवस करायची ? पातकाबद्दल मनांत आदर कसा ठेवावयाचा ? बाबांनीं गोरगरिबांना पिळून पैसे मिळविले, खोट्यानाट्या हुंड्या करून इष्टमित्रांना बुडविले, आपल्या भागीदाराची फसवणूक केली, तें पाप निस्तरण्यासाठीं मला मोरेश्वरांच्या गळ्यांत बांधायाला तयार झाले हें सारें मला कळत का नाहीं ? या साऱ्या वैभवाचा मला कसा वीट आलेला आहे ! तरी मी तोंडाला कुलूप घालून बसतें ! पण आज बाबा मालतीचा गळा कापायला उभे राहिले ! अजून, अजूनसुद्धां मी गप्पच बसूं का ? माझ्या मनाचा कोंडमारा झाला आहे त्याची मालतीताईला कल्पना तरी आहे का ?

(राग–मांड बिहाग, ताल–केरवा.)

अंतरीं होत महाक्षोभ हलवितो या देहा ॥ ध्रु० ॥
या भावनोर्मिबळें व्योमिं चढवितो वेगें हा ॥
हृदया चूर्ण करी या धर्मा संदेहा ॥ १ ॥

जित्या जिवांच्या राखेंत वाढलेल्या स्मशानवृक्षांची पालवी धुरकटलेली दिसली तर त्यांत तिचा काय दोष ? तोच माझ्या कडू वाणीचा प्रकार [ प्रभाकर कानडी वेषांत येतो.] [ स्वगत ] हा कडु कानडीचा काढा आला !

प्रभाकर : भवति, पोथी आणलों. योगवासिष्ठ ! भवति ऐकतो का ? वकत है ?

लतिका : माझ्याभोंवतीं ही ग्रहदशा कुठून उद्भवली ! हें पाहा तुमच्या वासिष्ठ गोत्राशीं माझें कांहीं पटायचें नाहीं.

प्रभाकर : फिर पोथी तशी राहतो ! काय करावा ?

लतिका : त्या कोपऱ्यांत बसा, आणि त्या पोथीचीं पानें मोजून काढा. सगळीं मोजून झालीं म्हणजे पुनः पहिल्यापासून मोजायला लागा; आणि इतक्याउप्पर जिवंत राहिलांत तर जीव जाईपर्यंत मोजीत बसा !

प्रभाकर : जसा मर्जी आसतो. [ कोपऱ्यात बसतो. मालती येते. ]

लतिका : ये मालतीताई. पण या घरांत तुला 'ये' म्हणून म्हणायला तोंडच येत नाहीं आतां. आमचे बाबा पडले पुण्यश्लोक !

मालती : हां ताई, लागलीस तूं बोलायला! मला नाहीं खपायचें असलें बोलणें! हजार वेळा आजेवून सांगितलें कीं, वडिलांचा असा उपमर्द करणें, बरें नाहीं म्हणून! हें काय हें?

लतिका : अग, वडील झाले म्हणून काय झालें? या वयांत तुझ्याशीं लग्न करून स्वतःची बेअब्रू आणि तुझ्या जन्माचा सत्यानास करायला बाबा तयार झाले तरी मी कांहींसुद्धां बोलूं नको? काय या करूं वेळीं प्रभाकर इथें नाहींत! मालती, मला आतां प्रभाकरांची फार वेळां आठवण होतें! प्रभाकर यायचे नाहींत का? कुठून त्यांच्याशीं भांडलें असें झालें आहे मला!

मालती : अग, आपलें आवडतें माणूस जवळ नसलें म्हणजे असेंच होतें. प्रेमाविषयी असें म्हटलें आहे कीं—

(राग – पिलू, ताल – धुमाळी.)

रमते सहवासें प्रीति विलासीं। परि विरहें येत भरासी ॥ ध्रु० ॥<br>
चमके रवितेजें हीरशलाका। घनतिमिरीं द्युति परि अधिका ॥<br>
तळपे किरणीं त्या कांचहि तैशी। तमिं विसरे परि तेजासी ॥<br>
मिथ्या प्रीतीच्या चंचल जाति। विस्मरणें पावति विरति ॥ १ ॥

लतिका : मला काय समजून तूं हें म्हणून दाखविलेंस? प्रभाकरांबद्दल माझ्या मनांत कितीहि प्रेम असलें तरी या प्रसंगीं तेवढ्यामुळें झुरत बसण्याइतकी राक्षसीण नाहीं मी! बाबांशीं मनांत असेल नसेल तितकें कठोर बोलून टाकतांना प्रभाकरांनीं मला किती धीर दिला असता! पण या वेळीं प्रभाकरांच्या ऐवजीं हें कानडी सोंग बघायचें कपाळीं येऊन बसलें आहे! का हो, गिरसाप्पा, अन्यायानें एखाद्या पोरीशीं म्हातारपणीं लग्न लावायला कुणी तयार झालें तर त्याची कानउघाडणी करायला नको का?

प्रभाकर : खुशाल बोलना! डरना नहीं! लग्न तर प्रेम म्हटलें. तो प्रेम फार नाजूक!

लतिका : या पिकल्या पानांत बराच हिरवटपणा आहे!

मालती : पण गिरसाप्पा, वडिलांना बोलण्यापेक्षां, जरा दम खाल्लेला बरा, नाहीं का?

प्रभाकर : दम खाना, लेकिन थोडा खाना.

लतिका : कशाला कपाळाला दम खाना लेकिन थोडा खाना? सोंग नाहीं तर! बाबांनीं बंदी केली आहे, नाहीं तर अशी प्रभाकरांना घेऊन आलें असतें, आणि दोघांनीं मिळून बाबांना इतकें बोलून घेतलें असतें कीं बोलण्याची सोय नाहीं! मनाला तळमळ लागली आहे सारखी! या वेळीं प्रभाकर तेवढे इथें

पाहिजे होते !

**प्रभाकर :** [ एकदम दाढी व पागोटें काढून ] शाबास ! लतिके—

**लतिका :** अगबाई, हें काय ?

**प्रभाकर :** लतिके, हा पाहा प्रभाकर तुझ्यापुढें हजर आहे.

**लतिका :** आणि तुम्हीं हें सोंग घेतलें होतें ?

**प्रभाकर :** हो, तुझ्या मनाची कसोटी पाहण्याकरितां. पण प्रेमाच्या या परीक्षेंत तुझी मनोवृत्ति अढळ पाहून मला संतोष झाला.

**लतिका :** माझी परीक्षा पाहण्याकरितां हें सोंग घेतलेंस ? मला हिणवायचा बेत होता नाहीं का तुमचा ? का हो, माझी परीक्षा पाहण्याचा तुम्हांला कुणीं अधिकार दिला हो ? अशीं सोंगें घेऊन दुसऱ्याच्या घरांत शिरतां काय ? दम खा, आतां सरकारी शिपाई बोलावून आणवितें आणि खोड मोडतें तुमची चांगली ! मालतीताई ! बाई, तें दार तरी लावून घे तेवढं ! हें सोंग कुणीं बघितलें तर तिकडूनहि पंचाईत व्हायची !

**मालती :** दार लावून घेतल्यावर शिपाई कसे येणार आंत ?

**प्रभाकर :** अग, ती काय बोलाविते शिपायांना ! तिचा वकूब समजला मघाच्या बोलण्यावरून ! मनाला तळमळ लागली आहे सारखी; आणि ही शिपाई बोलाविणार !

**लतिका :** [ स्वगत ] सांपडलें खरी बोलण्यांत यांना ! [ उघड ] शिपाई बोलवायला मला चोरी आहे वाटतें तुमची ? माझें बोलणें खोटें होतें हो सारें ! [ स्वगत ] आतां खोटेंच बोलणें चांगलें. [ उघड ] तुमचें सोंग मीं पहिल्यानेंच मुळीं ओळखलें होतें. तुम्हांला फसविण्यासाठीं मी मघांचे उद्गार काढिले होते बरें ! मला असें तुमच्यासारखें वेड नाहीं लागलें ! मला कुणाची पर्वा नाहीं. अशी बहुरूप्यासारखी प्रेमाची भीक मागणारी मी नव्हे !

**प्रभाकर :** मोठी कुबेरकन्याच कीं नाहीं तूं ! मला तरी काय पर्वा आहे तुझी ?

**लतिका :** तें दिसतेंच आहे ! माझ्यासाठीं मतांत केसभरसुद्धां फेर करायला तर नव्हतां तयार, तें अखेर या दाढीमिशांचे जंगल बांधून आलांत इथें ! आतां मुकाट्यानें हा बाळसंतोष घेऊन जातां कीं बाबांना बोलावूं ?

**प्रभाकर :** हा चाललों मी ! पुन्हा तोंड नाहीं पाहायचा तुझें.

**लतिका :** हं, निघालांत ? आतां काय जीव देणार का रागाच्या भरांत जाऊन ?

**प्रभाकर :** ज्याच्या अंगांत जीव नसेल त्यानें जीव द्यावा ! तशी निर्वाणीची वेळ आली तर श्रीकृष्णानें सोळाहजार एकशें आठ बायका खाडदिशीं

कृष्णार्पण करून टाकल्या तसा चालता होईन.

लतिका : पाहा बरें ? मग म्हणत याल, कीं लतिके, तुझ्यामुळें हें जग एक सुंदर काव्य वाटतें !

प्रभाकर : जग हें सुंदर काव्य असलें तरी शेवटीं पटलें कीं तें एक निर्यमक काव्य आहे. त्या जगाची आणि त्या घराची मला मुळींच जरूर नाहीं लतिके, हा निघालों मी. याउप्पर या घरांत एक क्षणभर सुद्धां राहण्याची माझी इच्छा नाहीं. लतिके, एक विशिष्ट कार्य घडवून आणण्यासाठीं— किंवा एक विशिष्ट अकार्य घडत असलेलें टाळण्यासाठीं या वेषानें आणखी कांहीं दिवस मात्र या घरांत राहण्याची माझी इच्छा आहे.

लतिका : राहा नाहीं तर नका राहूं !

प्रभाकर : तोंपर्यंत माझ्या वेषांतराबद्दल आपल्या वडिलांच्या कानांवर वर्दी नेऊन पोंचवूं नका.

लतिका : मला कुणीं सांगितलें आहे एवढें ? [ बाहेर धनेश्वर ' लतिके, अग लतिके ' ] अगबाई, बाबा आले ! झाला का पुरता घात आतां ! थांबा, या दरवाज्यानें चला बाहेर; नाहीं तर भलतेंच होईल आतां ! [ दुसरा दरवाजा उघडते. ] हं निघा. [ प्रभाकर जातो व लतिका दरवाजा बंद करून घेते. ] [ स्वगत ] प्रभाकर गेले आणि बाबा आले, त्याबरोबर ओंठावर दाबलेलें हंसूं आपोआप मावळलें आणि डोळ्यांत आसवें येऊन उभीं राहिलीं. चमत्कारिक जगता, काय म्हणावें तुला ! इकडे एकीसाठीं तरुणानें वृद्धाचें सोंग घ्यावें, तर दुसरीसाठीं वृद्धानें तरुणासारखें वागायला जावें !

[ दार उघडते. धनेश्वर येतो. ]

धनेश्वर : [ स्वगत ] मालती स्वतांच आपण लग्नाला तयार असल्याचें सांगायला आली आहे म्हणून घनश्यामानें सांगितलें, तें खरेंच कीं काय ?

लतिका : काय बघतां, बाबा ?

धनेश्वर : मालती आली आहे ना ? हो, बरें झालें ! मालती, मला तुझ्याशीं थोडें बोलायचें आहे.

लतिका : थांबा बाबा, तुमचा चष्मा आणून देतें; म्हणजे पन्नाशीपलीकडच्या या वयांत निदान चाळिशीच्या दृष्टीनें पाहिल्यामुळें तुम्हांला स्पष्ट ओळखूं तरी येईल, कीं तुम्हीं पाहायला आणलेली मुलगी कोणती आणखी तुमची स्वतांची मुलगी कोणती म्हणून !

मालती : ताई, लागलीस पुन्हा वेडेंवांकडें बोलायला !

धनेश्वर : म्हणजे पाहा आतां ! माझ्या बोलण्याचा मालतीला राग येत नाहीं, आणि ही उगीचच थैमान करीत सुटली आहे ! [ स्वगत ] रागानें लतिकेचें देहभान नाहींसें झाल्यासारखें झालें आहे. आतां मला हिच्या बोलण्याची इतकी भीति कां बरें वाटूं लागली आहे ? गुडघ्याएवढ्या मालतीशीं लग्न करायला तयार झालों, या पातकामुळें तर मन कच्चरत नसेल ?

लतिका : काय बोलूं बाबा आतां तुम्हांला ? मालतीला राग न यायला ती का वेडी आहे का एखादें जनावर आहे ?

धनेश्वर : अग, मालतीला कां राग यावा ? लग्नासंबंधाच्या गोष्टींनीं मुलींना आनंदच होतो !

लतिका : हो, पण हें कसलें लग्न ? जिथें लग्नाच्या घटकेबरोबरच जन्माच्या सुखाचीहि घटका भरण्याची वेळ, तें कसलें लग्न ? अशा लग्नाच्या गोष्टींनीं मालतीला आनंद होणार ? गुदगुल्यांनीं एरवीं हंसूं येतें; पण बाबा, अस्वलीच्या गुदगुल्यांनीं श्वास कोंडून प्राण जातो !

धनेश्वर : या पोरीला काय म्हणावें हेंच कळेना ! अग वेडे, कसें झालें तरी लग्न तें लग्नच ! लग्न हा आयुष्यांतला अत्यानंदाचा सण असतो.

लतिका : सण असतो खरा; पण हा सुतकांतला सण आहे, बाबा ! यानें रोजच्यापेक्षां रडायलाच जास्त यायचें !

धनेश्वर : मग मला कांहीं तारतम्य ज्ञानच नाहीं वाटतें ? माथ्यावर काळ्या केसाचे पांढरे झाले तें कांहीं आल्यावांचून का ?

लतिका : काय म्हणावें ह्या मनुष्यस्वभावाला ? वयोमानामुळें एखाददुसरा पांढरा केंस डोकावूं लागला म्हणजे दूषण समजून त्यावर कलप करायचा आणि अति झाले म्हणजे त्यांच्यावर शहाणपणाची भिस्त टाकून भूषण म्हणायला लागायचें !

धनेश्वर : लतिके, बस कर तुझें बोलणें ! तुला कांहीं कांहीं कळत नाहीं !

लतिका : बाबा, मला काय काय कळत नाहीं सांगा पाहूं ? तुम्हांला पंचावन्नावें वर्ष लागलें हें मला कळत नाहीं ? मालती तुमच्या मुलीच्या सारखी हें मला कळत नाहीं ? या लग्नानें तिच्या जन्माची माती होईल हें मला कळत नाहीं ? चारचौघांत तुमची बेअब्रू होईल हें मला कळत नाहीं ? सांगा बाबा, सांगा एकदां मला काय कळत नाहीं ? तें तरी सांगा ! बाबा, बाबा, लोकांत तोंड तरी कसें दाखवायचें आतां ? बाबा, तुम्हांला एकाद्या गरीब अर्भकाचा गळाच कापायचा असेल तर सरळ एक सुरा घ्या, आणि आपल्या पोरीच्या मानेवरून फिरवा ! परक्याच्या बाळाचा असा गळा कां कापतां ? बाबा, माझें मस्तक

भ्रमण करायला लागलें! बाबा, आणखी बोलूं का तुम्हांला ?

मालती : लतिकाताई, काय हा आततायीपणा असा ! जीव तोडून तुम्हांला सांगितलें — निर्भीडपणानें आणखी किती सांगूं ? लतिकाताई, मला हेंच स्थळ हवें आहे. या लग्नानेंच माझ्या मनाला आनंद होणार आहे. आतां जास्त बोलशील तर माझ्या गळ्याची शपथ आहे तुला !

लतिका : काय वाटायचें आहे या तुझ्या शपथेचें ? जिथें तुझी तूंच गळ्याला फांस लावायला तयार आहेस तिथें दुसऱ्यानें तुझ्या गळ्याकडे कां बघावें ?

मालती : लतिकाताई तुझ्याशीं कसें बोलायचें बरें आतां ? [ धनेश्वरास ] हें पाहा, बाबांना आपला निरोप आला तो त्यांनीं मला सांगितला; आपली योजना आम्हांला — मलासुद्धां आवडली !

लतिका : चांडाळणी, कां असा छळवाद मांडला आहेस ? आपल्या हातीं आपल्या संसाराला आग लावायला कां तयार होतेस ? आमच्या घरांत जीव देऊन मरण्याचा तुझा नवस असेल तर आमच्या बागेतल्या विहिरी-तळ्यांत पडून मर, बाबांच्या गळ्यांत पडून मरूं नकोस ! त्या तळ्याच्या कांठीं बसून, माझी मालती इथें मेली म्हणून रात्रंदिवस आसवें ढाळीत बसण्याचें तरी समाधान मिळेल ! पण बाबांच्या तोंडाकडे पाहण्याचा मला कसा धीर होईल ? ताई ! ताई, इतक्या मोठ्या मनानें आजवर या तुझ्या वेड्या लतिकेचे लाड केलेस; मग तुझ्यासाठीं जन्मभर रडायची तरी जोड मला देणार नाहींस का ग ? तुझ्या मागें कुणाच्या पदराखालीं मला असें तोंड लपवायला जागा मिळेल ? ताई, ताई, तशी आई होऊं नकोस, अशी आई हो !

[ तिच्या पदराआड तोंड झांकून रडते. ]

मालती : लतिकाताई, काय बरें वेड्यासारखें करावें असें ! वर पाहा पाहूं !

[ तिचे डोळे पुसते. ]

लतिका : माझीं आसवें पुसायला लागतेस ! मी कुणाची मुलगी आहें आहे ना ठाऊक तुला ? तुझ्यासारख्या गरीब गाईचा गळा कापणाऱ्या — ताई, माझें तोंड पाहिलेंस तरीसुद्धां तुला पाप लागेल ! माझ्यावर कसली दया करतेस !

* [ राग — सारंग, ताल — धुमाळी. ]

शांत मनिं या । न धरिं कधिं दया । न धरिं कधिं माया ॥
पदिं तुझ्या विनति ही । न सखि सुख हें कधिं पाहि बाई ॥ ध्रु० ॥
ही कृतान्ताची । क्रिया ज्याची । सुता त्याची ।
म्हणुनि याची । न सखि सुख हें कधिं पाहि बाई ॥ १ ॥

धनेश्वर : लतिके, बेटा, ये इकडे ! किती जिवाचा संताप करून घेशील!

[ लतिका एकदम धनेश्वराच्या गळ्यांत मिठी मारते. ]

लतिका : बाबा, लतिकेची तुम्हांला दया येते, आणि आपल्या मालतीताईची कां हो दया येत नाहीं तुम्हांला ? पाहा, बाबा, बापडी कशी गरिबासारखी दिसते ती ! लहानपणीं घेतलेल्या माझ्या ताटलींतला दूधभाताचा घांस अजून तिच्या गळ्याखालीं उतरला नसेल तोंच तुम्ही त्यावर सुरा फिरवायला उभे राहिलां ! असे निष्ठुर कसे हो झालां ? बाबा, तुमच्या मनाला कशानें करुणा येईल हो ? हातभर जीभ काढून तोंडास येईल तें बोलत सुटूं कीं जीभ हांसडून तुमच्या-समोर प्राण देऊं ? तुमच्या पायांवर संतापानें डोकें फोडून घेऊं, कीं हृदय फोडून तुमच्या चरणांना रक्ताचा अभिषेक करूं ? [ त्यांचे पाय धरून ] बाबा, दया करा, आणि हा राक्षसी विचार सोडून द्या. या दीन गरीब मालतीला सुखानें तिच्या घरीं नेऊन सोडा; तोंपर्यंत तुमचे पाय मी सोडणार नाहीं ! बाबा, मला मोरेश्वरांना द्या, मला विहिरींत नेऊन लोटा; पण माझ्या मालती-ताईला नका हो छळूं ! तुमची ही निर्दय करणी पाहून देवाघरीं माझ्या आईला काय वाटत असेल हो ? बाबा, बाबा, तुम्हांला कांहींच कशी दया नाहीं हो ? आई ग, या तुझ्या पोरक्या पोरीवर मायेचें पांघरूण घालण्यासाठीं तुला कधीं वर बघून हांक मारली नाहीं; पण आज बाबांच्या अब्रूवर पांघरूण घालण्या-साठीं मात्र तुला टाहो फोडून हांक मारतें ! आई, का ग इतक्या लवकर आम्हांला टाकून गेलीस ? बाबा, मी काय करूं हो ?

[ त्यांच्या पायांवर डोकें ठेवून रडते. ]

धनेश्वर : ऊठ, लतिके, ऊठ ! बाळे, रडूं नकोस !

लतिका : रडूं नको तर काय करूं ? बाबा, उघड्या डोळ्यांनीं हें सारें पाहूं तरी कसें ?

धनेश्वर : बाळ, ऊठ ! मीं हा लग्नाचा विचार सोडून दिला.

लतिका : खरें, बाबा ?

धनेश्वर : हो, बेटा ! हा पाहा तुझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगतों, यापुढें मालतीशींच नाहीं, पण मला मुळींच लग्न करायचें नाहीं ! तुझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगतों !

लतिका : बाबा, बाबा, तुम्ही किती, किती चांगले आहां ! ताई, पाहिलेंस ना माझे बाबा किती विचारी आहेत तें ? तरी मी माझ्या मनाला सांगतच होतें. बाबा, अशी जाऊन ही आनंदाची बातमी काकांना सांगून येऊं का ?

धनेश्वर : जा, बाळ, मोठ्या आनंदानें जा ! मालती, सुखानें आपल्या घरीं जा !

लतिका : आणखी बाबा, ओव्हरकोट घालून जाऊं ना ? नाहीं तर म्हणाल लतिका थिल्लरच आहे म्हणून !

धनेश्वर : जा बेटा ! नाहीं म्हणायचा ! [ लतिका जाते. ]

मालती : आपले उपकार मी—

धनेश्वर : माझे कसले उपकार ! मालती, माझ्या सद्‌गुणी मुलीनें मला आज सद्‌बुद्धि शिकविली ! मालती, माझी लतिका शिकलेली आहे म्हणून इतकी शहाणी आहे, नाहीं ?

लतिका ! [ येऊन ] ताई, चल लौकर. का गाडी जोडायला सांगूं, बाबा ? काकांना हें केव्हां सांगेन असें झालें आहे मला !

धनेश्वर : हो, आणखी एका माणसाला सांग कीं, मी लतिका मोरेश्वराला देण्याचा विचार रहित केला आहे ! त्या माणसाला आनंद वाटेल नाहीं बाळ, हें ऐकून ? बरें लौकर जा; नाहीं तर तें माणूस फिरायला जाईल.

लतिका : बाबा, थट्टा नाहीं करायची अशी ! हें काय ? डियर फादर, यू आर व्हेरि काइंड. यू आर व्हेरि गुड. बट यू आर व्हेरि, व्हेरि, व्हेरि बॅड. चल ताई.

( राग – सोरट, ताल – केरवा. )

पद सुखीं स्थलिं या न जरा ठरे ॥

मन उतावीळ हो स्थिरता नुरे ॥ ध्रु० ॥

मनुजीं कोपून गति ' धरि पदिं कीं ।

मंदचि शोकीं । परि सुखी करि दूर तया त्वरें ॥ १ ॥

[ मालती व लतिका जातात. ]

धनेश्वर : [ स्वगत ] माझी लतिका म्हणजे एक निर्दोष, आनंदी, गोजिरवाणें फुलपाखरूं आहे ! हंसतां हंसतां रडते आणि लगलीच रडतां रडतां हंसते ! लतिके, सद्‌गुणी मुली, जन्मजन्मांतरीं अशीं काय संचितें करून ठेविलीं होतींस तेवढ्यासाठीं या पातकी धनेश्वराच्या पोटीं आलीस ? नाहीं, लतिका मोरेश्वराला द्यायची नाहीं हा मनाचा निर्धार झाला ! तसेंच मालतीशीं लग्न मला कर्तव्य नाहीं म्हणून घनश्यामाला सांगून टाकतों. लतिके, तुझ्या सदुपदेशानें, मी एकदा पातकी, पण आज सद्‌गुणी झालों !

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश चवथा

[स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : बिंदु. ]

बिंदु : [ स्वगत ] या कामण्णाचा मुळींच भरंवसा देववत नाहीं ! आतां एक बोलणें आन् घटकेनें एक बोलणें ! मिळून काय कशांत काय आणि फाटक्यांत पाय तशांतली गत ! या स्थळाचा नादच सोडून द्यावा झालें ! ते गिरसाप्पा-शास्त्री कुठें भेटतच नाहींत. त्यांना गळ घालावी हेंच बरें आपलें ! अग बाई, आलेच कीं अगदीं नांव काढल्याबरोबर ! [ प्रभाकर येतो. ] आतां बोलूं कसें यांच्याशीं ?

प्रभाकर : [ स्वगत ] धनेश्वराचा नवा निश्चय मालतीनें सांगतांच मला किती मोकळ्यासारखें वाटायला लागलें ! आतां लतिकेची खोड मोडण्याचा प्रयत्न करून बघायला कांहीं हरकत नाहीं. स्त्रियांच्या मनोवृत्तीची परीक्षा पाहण्याचा मत्सरजागृतीइतका अचूक उपाय दुसरा कोणताहि नाहीं. या बिंदूवर प्रेम करण्याचा बहाणा केला म्हणजे लतिकेच्या मनाचा ठाव तेव्हांच लागण्या-जोगा आहे. ही बिंदु इथेंच उभी आहे. [ उघड ] बिंदुताई– [ स्वगत ] बिंदुताई काय ? बोलण्यांत परभाषेची सामान्यरचना पाहिजे. [ उघड ] बिंदुताई, काय करितो म्हटलें ?

बिंदु : कांहीं नाहीं ! करायचें काय आहे असें ?

प्रभाकर : [ स्वगत ] ही आतांशा अशी उद्विग्न कां दिसते ? [ उघड ] बिंदुताई, सांप्रत आपण दुःख करतो का ? प्रकृति काय होतो ? आम्ही मनांत वाईट वाटतो ! कष्ट होतो !

बिंदु : [ स्वगत ] मोठा प्रेमळ दिसतो बिचारा ! [ उघड ] हें पाहा. मी हल्लीं मोठ्या दुःखांत आहें.

प्रभाकर : अय्ययो ! कोण दुःख ?

बिंदु : तुमच्याजवळ बोलतें स्पष्ट. पण तुम्ही कोठें बोलणार नाहीं ना ?

प्रभाकर : नहि, नहि, नहि ! कसा बोलते ? तो मोठा पाप राहतो. आपण स्पष्ट बोल्ना.

बिंदु : मी आहें माझ्या लग्नाच्या काळजींत. कुठें स्थळच मिळत नाहीं. आपले ते कामण्णा गवई आहेत ना ? त्यांनीं माझ्याशीं लग्न करायचें कबूल केलें

होतें. पण आतांशा त्यांची वृत्ति जरा चंचल झाल्यासारखी दिसते. म्हणून मी मोठ्या विवंचनेंत पडलें आहें.

( राग – खमाज, ताल – त्रिवट. )

मम का पावति आशा नाशा ॥ ध्रु० ॥
ठेवि धनुसि शर एकचि त्याची । हो निराशा ॥ १ ॥

प्रभाकर : फार खराब ! दुष्ट गोष्ट !

बिंदु : [ स्वगत ] आतां करावा धीर झालें ! आपलें हित बघायला आहे कोण काळजीचें दुसरें ? [ उघड ] हें पाहा, आपलें झालें आहे का लग्न ?

प्रभाकर : आम्ही लग्न नाहीं झालों ! विद्याभ्यास ! आतां कुटुंबिनी तपासतों ! प्रगल्भ वधू योग्य !

बिंदु : आणि ती रूपानें बरी नसली तर ?

प्रभाकर : चालतो ! भार्या रूपवती शत्रू ! वेदवाक्यं प्रमाणम् ! सुंदर ते शत्रु राहतो ! ताप !

बिंदु : मग मला पदरांत—

प्रभाकर : फार आनंद होतो ! लग्न मान्य ! पण आपण प्रेम त्या गायकाला असतो. तो पुनरपि येतो तर आपण आम्हांस वचन मोडतो ?

बिंदु : नाहीं, अगदीं देवाशपथ नाहीं ! त्या कामण्णाशीं लग्न आतां मला मुळींच नको आहे ! अहो, तुम्ही किती प्रेमळ, किती पोक्त ! तो कामण्णा कसला ! माणूस का म्हणायचें त्याला ?

प्रभाकर : वाईट, दुष्ट असतो काय ?

बिंदु : अहो, नाहीं तर काय ? अहो, तो कामण्णा मोठा भयंकर माणूस आहे. —कुणाजवळ बोलूं नका सध्यां, अहो, तो मराठी चांगलें बोलतो. तो आंधळा नाहीं.

प्रभाकर : मराठी बोलते ? आंधळा नसते ? काय सांगतो ?

बिंदु : अहो, इतकेंच काय; [ स्वगत ] आतां कामण्णानें कागद चोरल्याचेंहि सांगून टाकावें म्हणजे यांचा माझ्यावर विश्वास बसेल. पण नको ! अशी त्यांची अगदीं आशा सोडणें इतक्यांत बरें नाहीं. हे फटदिशीं बोलायचे कुणाजवळ ! आंधळेपणाचें उगीच सांगितलें यांना !

प्रभाक :र इतकाच काय ?

बिंदु : कांहीं नाहीं; तो माणूस चांगला नाहीं इतकेंच. तें राहूं द्या ! पण तुमचा विचार कायम राहील ना ?

प्रभाकर : स्थिर निश्चय ! चिंता नको ! चल.
बिंदु : चला. पण हें कुणाजवळ बोलूं मात्र नका.
प्रभाकर : नाहीं. [ स्वगत ] हा काय घोंटाळा आहे कळत नाहीं. लतिकेच्या कानावर ही गोष्ट घातलीच पाहिजे.

[ दोघें जातात. ]

## प्रवेश पांचवा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : लतिका व महेश्वर. ]

महेश्वर : [ स्वगत ] किती चतुर आणि मर्यादशील मुलगी आहे ही ! एक शब्द स्पष्टपणें बोलल्यावांचून किती स्पष्टपणानें माझ्याशीं लग्न करण्याची आपली इच्छा व्यक्त केली ! नाहीं तर त्या कैकाडणी ! प्रेमाची मंडई मांडली आहे नुसती ! पण त्यांच्याप्रमाणेंच हिनेंहि माझ्याशीं लग्नाला तयार असावें हें यांच्यांतलें साम्य मात्र चमत्कारिक आहे. मी हिच्यापुढें एक गरीब, आंधळा, कानडी म्हणून उभा आहें. मग हिचें माझ्यावर कां प्रेम बसावें ?
लतिका : आपण गप्प बसलां ?
महेश्वर : आश्चर्य करतों ! आम्ही अंध दरिद्र कन्नड ! भाषा हे ! तुम्ही प्रेम, लग्न बोलतो ! काय ? आश्चर्य फार !
लतिका : आपण बरोबर विचारलें ! हें पाहा, मी आहें फार लहरी ! श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी ! लहानपणीं माझी आई वारल्यामुळें बाबांनीं मला अतिशय लाडांत वाढविलें तेव्हां साहजिकच मला एवढासा विरोध खपत नाहीं. हे डोळस तरुण रूपावर लुब्ध होऊन माझ्या अर्ध्या वचनांत वागायचीं वचनें देतात; पण रूप क्षणभंगुर असल्यामुळें यापैकी कोणालाहि असें वचन आजन्म पाळतां येणार नाहीं, आणि पुढें मला त्रास होईल. म्हणून मला असा लग्नसंबंधच आवडूं लागला आहे. आपण खात्रीनें जन्मभर माझ्या आज्ञेंत वागाल अशी माझी खात्री आहे. आपल्यासारख्यांना त्यांखेरीज गत्यंतरच नाहीं. शिवाय आपण पडलां दरिद्री, आणि मी पडलें लक्षाधीशाची मुलगी. आपला प्रतिपाळ माझ्या संपत्तीमुळें होत गेल्यानें तोहि आपल्यावर माझा उपकार होत जाईल. समजतें ना माझें बोलणें नीट ?

**महेश्वर :** सहवास मराठी येथें होतो. भाषा समजतो. आपला संकल्प सयुक्तिक! योग्य ! आम्ही लग्न संमत ! यावच्चंद्रदिवाकरौ दास होतों ! हें निश्चय अचल काय ?

**लतिका :** अगदीं अचल निश्चय आहे माझा ! पण तुम्हांला जन्माची गुलामगिरी पत्करावी लागेल !

[ इंदु प्रवेश करते. ]

**महेश्वर :** आज्ञा प्रमाण !

**इंदु :** ताई, घनश्याम तुला भेटायला आले आहेत.

**लतिका :** मग त्यांना पाठवून दे इकडे. आणखी हें पाहा इंदूताई, जातांना या कामण्णांना आंत घेऊन जा बरें !

**इंदु :** चला, कामण्णा !

**महेश्वर :** [ जातां जातां स्वगत ] बरें, पण हा घनश्याम कशाला भेटतो आहे हिला ? माझ्यासाठीं मागणी घालायलाच कीं काय ? बाकी मला आतां त्याची काय फिकीर आहे म्हणा ! लतिका स्वतांच पाणिग्रहणाला तयार झाल्यावर घनश्यामाच्या ओंजळीनें पाणी पिण्याची मला काय जरूर आहे ? आज मी घनश्यामाला रामराम ठोकायला अगदीं मोकळा आहें ! [इंदु व महेश्वर जातात.]

**लतिका :** [ स्वगत ] याच्याशीं असें भलतेंसलतें बोलायचें किती जिवावर आलें होतें माझ्या ! पण एरवीं प्रभाकरांच्या डोळ्यांत अंजन कसें पडलें असतें ? माझ्या मनांत चलबिचल उत्पन्न करण्यासाठीं त्यांनीं बिंदूवर प्रेम करण्याचा आव घातला आणि मुद्दाम तें सारें माझ्या कानांवर घालण्याचा प्रयत्न केला काय ? अशा सोंगानें फसायची नाहीं मी ! आतां मी या आंधळ्याशीं लग्न लावायला तयार झाल्याचें कळलें म्हणजे त्यांचीं बोटें चांगलीं त्यांच्याच डोळ्यांत जातील ! हा त्रास कशाला आला कुणास कळे ! [ घनश्याम येतो. ]

**घनश्याम :** [ स्वगत ] महेश्वर फसतां फसतां पुरतेपणीं माझ्या हातीं सांपडल्यामुळेंच आज लतिकेच्या हाताची मागणी करण्यापर्यंत माझी मजल येऊन ठेपली. [ उघड ] लतिकाताई, मी आलों आहें.

**लतिका :** चमत्कार आहे मोठा ! तुम्हीं या उप्पर माझी गांठ घेण्यासाठीं याल हें मला स्वप्नांतसुद्धां अशक्यच वाटलें असतें.

**घनश्याम :** हें जग इतकें चमत्कारिक आहे कीं त्यांत एका वेळीं अशक्य वाटणाऱ्या गोष्टी दुसऱ्या वेळीं सहज घडून येतात. रामावतारीं श्रीरामाचें नांव घेण्याची एखाद्या स्त्रीची प्राज्ञा नव्हती; पण तेंच रामनाम आज पोरीबाळींच्या-

सुद्धां हातीं सांपडलेलें पाहायला मिळतें ! लतिके —क्षमा करा हं; आपल्या मोठ्या नांवाला आटोपशीर एकवचनांत —पण तेंच मी सांगणार आहें— लतिके, त्या दिवशीं तुझें नांव काढण्याची माझी योग्यता नव्हती; पण तुला आज माझ्या नांवानें नटविण्याकरितां मी आलों आहें. लतिके, तुझे शब्द तुला आठवतच असतील—'उद्यां तुम्हीं मला मागणी घालाल!' ती उतावळी उद्यां आजच उगवली आहे. लतिके, आज मी तुला मागणी घालण्यासाठीं तुझ्यापुढें उभा आहें.

**लतिका :** घनश्याम, तुम्हीं बोलतां याचा तुम्हांला अर्थ तरी समजतो आहे का ?

**घनश्याम :** मूर्ख पोरी, माझ्या बोलण्याचा अर्थ समजण्याची तुला मात्र नवेपणा-मुळें जरा पंचाईत पडेल. पुन्हा नीट समजून घे. लतिके, हा घनश्याम तुला मागणी घालण्यासाठीं तुझ्यापुढें उभा आहे. उगीच शब्दांचा पाल्हाळ मला नको आहे. एका शब्दांत सांग. मात्र आधीं सर्व परिस्थितीचा नीट विचार कर. माझ्या मागणीचें मला उत्तर दे पाहूं !

**लतिका :** नीट विचार कसला करायचा त्यांत ? घनश्याम, इथून चालते व्हा आधीं; नाहीं तर बाबांना हांक मारून तुम्हांला या घरांतून कायमचा निरोप देवतीन !

**घनश्याम :** आपण कशाला ही तसदी घेतां ? मीच आपल्या वडिलांची भेट घेणार आहें; आणि ती याच कामासाठीं ! वा: ! जुन्या पद्धतीनें मालतीला मागणी घालण्यासाठीं तिच्या वडिलांना भेटलों तों त्यांनीं संमतीसाठीं मालती-कडे बोट दाखविलें; म्हणून या वेळीं नव्या पद्धतीप्रमाणें मागणीसाठीं प्रथम आपणांकडे आलों आणि आपण वडिलांच्याकडे जायला सांगतां आहां ! आपल्या लग्नाची गोष्ट मीं आपल्या वडिलांजवळ काढली तर काय होईल असा आपला उर्मट अंदाज आहे बरें ?

**लतिका :** माझ्या लग्नाबद्दलचीं मुक्ताफळें तुमच्या तोंडून निघतांच बाबा हातोहात तुम्हांला वाटाण्याच्या अक्षता देतील.

**घनश्याम :** आपल्या वडिलांपाशीं माझें किती वजन आहे याची आपल्याला कल्पना नाहीं. तुमचा हात मात्र ते हातोहात माझ्या हातीं देतील !

**लतिका :** माझा प्राण गेला तरी मी माझा हात तुमच्या हातीं देणार नाहीं.

**घनश्याम :** शिष्टसंप्रदाय सोडून बोलायचें म्हणजे तूं हात दिला नाहींस तर तुझा बाप तुझा हात माझ्या हातीं देईल.

**लतिका :** असें कल्पान्तीं व्हायचें नाहीं ! आणि इतक्याउप्पर तुम्हांला सांगून

ठेवतें कीं, फार झालें तर बाबा माझा हात तुमच्या हातीं देतील, पण माझें हृदय तुमच्या हातीं देणें हें बाबांच्या हातीं तर नाहींच, पण माझ्याहि हातीं नाहीं. लग्नाच्या जुलमानें माझा हात तुमच्या हातीं येईल; पण हातापासून हृदय दोन हात असतें; माझ्या हृदयांत तुम्हांला जागा मिळणें शक्य नाहीं !

**घनश्याम :** बरोबर आहे ! तुम्हां नटव्या पोरींच्या हृदयांत स्थळ मिळविण्या-साठीं तरुणाच्या मूर्तीला प्रतिबिंबरूपानें डोळ्यांतून उतरावें लागतें, आणि डोळ्यांतून उतरण्यासाठीं आधीं डोळ्यांत भरावें लागतें. लतिके, तुझ्या दृष्टीनें मी लग्नाला नालायक आहे खरा; पण तुझ्या बापाच्या दृष्टीनें या लग्नाचा चमत्कार कसा दिसतो तो पाहा ! लतिके, जातों मी. [ जातो. ]

**लतिका :** [ स्वगत ] काय बेमुर्वतखोर मनुष्य आहे ! माझें मस्तक अगदीं फिरायला लागलें आहे. आतां अशी जाऊन बाबांना सांगतें कीं आधीं या उन्मत्त मनुष्याला आपलें घर बंद करा ! काय बोलायची तऱ्हा ही !

( राग – बागेसरी, ताल – दादरा. )

कोप मानुं का नीचचेष्टा बघोनी ॥
चेष्टा बघोनी हांसुं का मोकळोनी ॥ ध्रु० ॥
फुगवोनी उदर बहुत वृषभसाम्य करुं पहात ।
दर्दुर निज अंतिं अंत । मूर्ख घे करोनी ॥ १ ॥
उभवुनी फणा फणीहि । स्वामीतें दंशुं पाहि ।
पाडुनि निज दंत घेइ । मूढता वरोनी ॥ २ ॥

[ जाते. ]

## प्रवेश सहावा

[ स्थळ : धनेश्वराचें घर, पात्रें : मनोहर. ]

**मनोहर :** [ स्वगत ] मालती ! मालती ! मालतीबरोबर माझ्या जगांतली रमणी-यताहि मला अदृश्य झाली, आणि जीवित जड होऊन बसलें आहे. मालतीच्या सहवासांत काळ किती नकळत निघून जात असे ! तरुण प्रणयी जनांच्या सुखसंवादाच्या वेळी कुलीन आणि गंभीर वृत्तीचा काळपुरुष मर्याद-शीलपणानें ओशाळून चोरट्या पावलीं भराभर चालता होतो, दुःखप्रसंगीं

कधी जीवाचें सांत्वनपर समाधान करण्यासाठीं थोर मनानें त्याच्याजवळ तिष्ठत बसतो. दुःख जितकें मंदगति आहे तितकेंच सुख चंचल आहे. या मृत्युलोकाच्या वस्तींत सुखाचा संसार इतका क्षणभंगुर आहे कीं, कधीं कधीं पहिल्या चुंबनानें गालावर लाली येते न येते तोंच ती शेवटच्या वियोगाच्या अश्रूंनीं धुऊन काढण्याची घाई होते. सुखाच्या आयुष्याप्रमाणें गुणधर्महि चंचलवृत्ति असतात. सुखाच्या सृष्टींतला प्रेमाचा घोट ओठांना अमृताचा आस्वाद देतो, आणि जिभेवर जाण्यापूर्वीच जहराप्रमाणें जाळायला लागतो. सुंदर तारा अक्षय आहेत पण दुर्लभ आहेत; आणि सहज लाभण्यासारखीं फुलें क्षणिक आहेत; म्हणून मानवी सृष्टींत सुखस्थिति पाहण्याच्या लोभानें विधात्यानें त्या दोघांचे प्रमाणशीर गुण घेऊन स्त्रियांचे सुंदर नेत्र निर्माण करून पाहिले तर त्यांत त्याची सर्वस्वीं निराशा झाली ! त्या गुणांऐवजीं स्त्रियांच्या सुंदर नेत्रांत तारांची दुर्लभता आणि फुलांची क्षणभंगुरता मात्र दिसून येऊं लागल्या ! वा:, प्रभाकराला हंसतां हंसतां परिस्थितीमुळें आज मीच तारापुष्पांचीं काव्यें करायला लागलों.

[ प्रभाकर कानडी वेषांत घाईघाईने येतो. ]

प्रभाकर : मनोहरा, हें बघ—

मनोहर : म्हणजे ? हा काय—

प्रभाकर : मी प्रभाकर आहें. हें रूपांतर कां केलें तें मग सांगेन.

मनोहर : प्रभा, तुझ्या बहिरंगाइतकेंच माझ्या अंतरंगाचें रूपांतर झालेलें आहे. आज मी तुझ्यासारखा तारापुष्पांचा कवि झालों आहें !

प्रभाकर : आणि मी तुझ्यासारखा ठगडांशीं झटापटी करण्याइतका व्यवहारी झालों आहें ! तूं मी काव्यमय मनःस्थितींत नाहीं. मला आतां अगदीं वेळ नाहीं. मनोहरा, धनेश्वरपंतांच्या घरांत कांहीं घोंटाळा चालला आहे असा माझा तर्क आहे. तो कानडी गवई म्हणजे सोडवण्यासारखें एक कोडेंच आहे. त्या लबाड आंधळ्याची नजर साफ नाहीं; आणि त्याला घनश्यामानें घरांत आणून सोडलेला आहे. त्या दोघांचें खास कांहीं तरी संगनमत आहे. हल्लीं घरांत जे दुःखदायक चमत्कार होत आहेत त्यांच्या मुळाशीं या दोघांची खट-पट असावी अशी माझी खात्री होत चालली आहे. धनेश्वरपंतांच्या हितासाठीं हें रहस्य आपल्याला हुडकून काढणें अवश्य आहे. कदाचित् यांत मालतीच्या—

मनोहर : हां प्रभा, एक्स्क्यूज ! या विषयावर कोणाशीं एक अक्षरहि न बोलण्याची मीं शपथ घेतलेली आहे.

प्रभाकर : बरें, राहिलें ! पण धनेश्वरपंतांची काळजी तरी आपल्याला घ्यावयाला नको का ?

मनोहर : बरें, मग काय सांगतोस मला ?

प्रभाकर : सध्यां तसें निश्चयात्मक काय सांगतां येणार ? तूर्त मी या गवयाचा गळा धरून बसतों, आणि तूं घनश्यामाच्या मागावर राहा. मात्र तो फार धूर्त आहे, तेव्हां त्याच्यावर दुरूनच पाळत ठेवीत जा. याचा परिणाम काय होईल हें आतां सांगवत नाहीं; पण हें काम फार महत्त्वाचें आहे एवढें मात्र विसरूं नकोस. घनश्यामाच्या हालचालीवर नीट नजर ठेव.

मनोहर : म्हणजे काय होईल ?

प्रभाकर : सांगतों ना, आज कोणत्या रस्त्यानें जायचें एवढेंच आपल्याला दिसतें आहे; तें कां जायचें हें सध्यां कळत नाहीं. सांगितल्या कामाची हेळसांड मात्र करूं नकोस. सध्या मी वाईत आहें. कांहीं कमजास्त कळलें, तर ताबडतोब मला येऊन सांग. जरा काळजीनें मात्र वाग, बरें का ? [ जाऊं लागतो. ]

मनोहर : ठीक आहे. तूं अगदीं काळजी करूं नकोस.

प्रभाकर : [ परतून ] आणखी हें बघ, या वेषांतराच्या अवस्थेंत मला या घरीं भेटूं नकोस. आमच्या घरीं माझी भेट घे, बरें का ? [ जातो. ]

मनोहर : ऑल राइट. [ स्वगत ] धनेश्वरांच्या सुखासाठीं ! माझ्या सुखाची ज्यांनीं होळी केली त्या धनेश्वराच्या सुखासाठीं ! मालतीचें हरण करून ज्यांनीं माझ्या प्रेमांत विष कालविलें, आणि माझ्या जन्माचा सत्यानाश केला --पण त्यांनींच आजन्म माझें पालनपोषणहि केलेलें आहे ! माझ्या अन्नदात्यांशीं मला कृतज्ञतेनें वागायला नको का ? नाहीं, प्रेमासाठीं मी कर्तव्य सोडणार नाहीं ! अरेरे ! प्रेमा, तूं अमृतमय आहेस कीं विषमय आहेस ? तुझ्या संसर्गामुळें दूषित झालेल्या हृदयांत कृतज्ञतेसारख्या दैवी गुणालासुद्धां जागा मिळण्याची पंचाईत पडते काय ? किती भयंकर आहेस तूं !

* ( राग -- भीमपलास, ताल -- धुमाळी. )

सुखा पारखा झाला । अभागी जो या त्याला ।
भरला का प्रेमाचा हा विषारी ऐसा प्याला ।। ध्रु० ।।
नवरसलीला कोमल जाळुनियांच रस हा भाषण केला ।
हृदयदहन करि दुरुनिच हा । पळभरि अधरिं न जो ठरला ।। १ ।।

[ जातो व पडदा पडतो. ]

## प्रवेश सातवा

[ स्थळ : धनेश्वराचा दिवाणखाना. पात्रें : धनेश्वर कागद शोधीत आहे. मागें बराच दूर हातांत एक कागद घेऊन घनश्याम उभा आहे. ]

धनेश्वर : [ स्वगत ] म्हणजे ? झाले काय कागद ?

[ इकडे तिकडे शोधतो. ]

घनश्याम : काकासाहेब, आपल्याला जें पाहिजे तें हें पाहा !

[ धनेश्वर मागें पाहतो. ]

धनेश्वर : काय आहे तें ? [ जवळ येऊन कागदाकडे पाहतो. ] काय पाहतों आहे हें मी ?

घनश्याम : हें आम्हांला नवीन आहे; आपल्याला याचा पूर्ण परिचय आहे. काकासाहेब, ही आपण तयार केलेली एक खोटी हुंडी ! तुम्हां सर्वांच्या स्वैर इच्छांचें मृत्युपत्र. माझ्या इच्छेची जन्मकुंडली ! हुशार हातीं पडल्यामुळें हिचा बाजारभाव आपल्या घरादाराच्या किमतीपेक्षांहि हल्लीं जास्त चढलेला आहे ! हा एकच कागद पाहिल्याबरोबर आपले डोळे पांढरे होतील, म्हणून उगाच बाकीचे कागद बरोबर आणण्याची मीं तसदी घेतली नाहीं. बाकी या हुंडीच्या जोडीचे आणि तोडीचे सारे कागद — आपल्या सर्व खोट्या हुंड्या आणि खोटे दस्तऐवज हल्लीं सुरक्षितपणें माझ्या कबज्यांत आहेत. दंगाधोपा करून फार झालं तर हा एकच कागद आपण मजकडून हिसकावून घ्याल !

धनेश्वर : कसे मिळाले हे कागद तुला ?

घनश्याम : [ हंसून ] हे कागद मीं आपल्या घरांतून चोरले.

धनेश्वर : चोर, हरामखोर ! हंसत हंसत हें सांगायला तुला लाज वाटत नाहीं का ? तुझ्या जिवाला कांहीं भयभीति आहे कीं नाहीं ?

घनश्याम : माझा काय संबंध यांत ? या गोष्टीची सारी लाजलज्जा आपल्या मनाला आणि भयभीति आपल्या जिवाला वाटायला हवी ! त्याच्याच भरांत आरडाओरडा कसला करितां आहां ? काकासाहेब, आपण कुठें आहां आणि काय करितां आहां — निदान आपण हें काय केलें आहे, आणि यामुळें कुठें जाऊन पडाल याचा विसर पडला आहे वाटतें आपल्याला ? करा पाहूं आरडाओरडा ! जमवा चारचौघांना ! हा चोरीचा मुद्देमाल ! यासकट या

आपल्या चोराला सरकारी शिपायांच्या ताब्यांत द्या पाहूं ; करून पाहतां का ही मौज जरा ? मेहेरबान, ही अशी चमत्कारिक चोरी आहे कीं, जी मुद्देमालानिशीं उघडकीस आली तर चोराऐवजीं मालकालाच भुर्दंड भरीत बसावें लागेल. बेअकलीपणामुळें कधीं कधीं चोरासाठीं तिऱ्हाईत संन्याश्यालाच सुळीं जावें लागतें; पण अकलेच्या कसरतीनें चोराबद्दल मालकालाच सुळावर चढवितां येतें तें असें ! याच त्या चोराच्या उलट्या—

**धनेश्वर :** उलट्या काळजाच्या राक्षसा—

**घनश्याम :** बस, धनेश्वरपंत ! आतां शब्दांच्या देवघेवी करायला मला वेळ नाहीं. तुमच्यावर वेळ काय आली आहे ती नीट ओळखा, आणि माझें म्हणणें नीट ऐकून घ्या. मालतीच्या आणि आपल्या लग्नाचा तिथिनिश्चय केव्हां करायचा ?

**धनेश्वर :** यापुढें लग्न न करण्याचा मीं निश्चय केलेला आहे.

**घनश्याम :** [ कागद दाखवून ] या लग्नकुंडलींत तसा योग दिसत नाहीं. आपण मालतीशीं लग्न केलेंच पाहिजे.

**धनेश्वर :** म्हणजे ?

**घनश्याम :** ही माझी इच्छा ! आपल्याला काय वाटलें ? आपल्या लग्नाच्या खटपटींत मी पडलों तो आपल्या थेरड्या शोकासाठीं ? मालतीच्या जन्माचा सत्यानाश करायचा हा माझ्या प्रतिज्ञेचा एक भाग आहे. आपल्या अमर्याद मुलीनेंच मला या प्रतिज्ञेच्या भरीस पाडलें; आणि तिच्याशीं – आपल्या लाडक्या लतिकेशी – माझें लग्न लावणें हा त्या प्रतिज्ञेचा उत्तरार्ध. धनेश्वरपंत, या दोन्ही गोष्टी बिनबोभाट घडून आल्याच पाहिजेत.

**धनेश्वर :** नीचा, काय, म्हणतोस तरी काय हें ! चल जा, मला तुझें म्हणणें कबूल नाहीं !

**घनश्याम :** ठीक आहे. मग मी आपला निरोप घेतों. [ जाऊं लागतो. ]

**धनेश्वर :** थांब चांडाळा ! काय करण्याचें योजलें आहेस मनांत तूं ?

**घनश्याम :** आपण जाणतच आहां कीं मी पाजी मनाचा मनुष्य आहे म्हणून—मी काय करणार आहे होय ? बेचाळीस पिढ्यांसकट आपल्याला मातीला मिळवणार आहें मी !

**धनेश्वर :** दम खा, घनश्याम. जरा थोर मनानें विचार करा—

**घनश्याम :** धनेश्वरपंत, ही दर्शनी हुंडी आहे. ही नाकारून तर चालत नाहीच पण वायदेसवलतींचीसुद्धां अळंटळं केल्यावांचून पाहतां क्षणींच पटवावी

लागते. मणि हरपल्यामुळें सापाप्रमाणें नुसती आपलीच फणा आपटीत बसाल, तर नाहक प्राणाला मुकाल, पण आपणांला माझें बोलणें रुचत नाहींसें दिसतें ! उगीच आपण मला परत बोलाविलें. [ जाऊं लागतो. ]

**धनेश्वर** : निर्दया, थांब ! तुझा हुकूम मला कबूल आहे.

**घनश्याम** : ठीक आहे. मात्र एवढें लक्षांत ठेवा, आपण जरा हालचाल केलीत कीं या गळफासांची सरकगांठ ओढून मीं आपला गळा आंवळलाच !

**धनेश्वर** : तुमचें म्हणणें मला अक्षरशः कबूल आहे.

**घनश्याम** : मग हीं दोन्ही लग्नें तीन दिवसांच्या आंत उरकलींच पाहिजेत.

**धनेश्वर** : पण मीं मालतीला वचन दिलें आहे कीं—

**घनश्याम** : तें मोडून टाका वचन ! हं, ही आपली लतिका येते आहे. आतांच हिचें भविष्य हिला सांगून टाका. तुमच्या लग्नाचाहि निश्चय तिला सांगा. एकेका शब्दानें एकेक कामांतून पार पडा. गोडीगुलाबीनें तिची समजूत घालणें किती दुरापास्त आहे हें आपल्याला मजपेक्षां जास्त माहीत आहे. यांत चूक झाली तर— [ लतिका येते. ]

**लतिका** : बाबा, या उद्दाम मनुष्याला आधीं—

**धनेश्वर** : लतिके, उगीच कांहीं तरीं बोलत सुटूं नकोस ! लतिके, मालतीशीं लग्न करण्याचा माझा विचार पुन्हा कायम झालेला आहे.

**लतिका** : बाबा, काय बोलतां हें ?

**धनेश्वर** : पोरी, आणखी काय बोलतां तें ऐकून घे आधीं. तुझें लग्न या घनश्यामाशीं करायचें मीं कायमचें ठरवून टाकलें आहे. हीं दोन्हीं लग्नें तीन दिवसांतच व्हायचीं.

**लतिका** : माझी मान कापली तरी मी याच्या गळ्यांत माळ घालणार नाहीं !

**धनेश्वर** : मग माझी मान काप ! लतिके, मीं सांगितलें तसें झालेंच पाहिजे ! माझ्या नांवाची, घरादाराची, कुळाची तुला कांहीं चाड असेल तर मुकाट्यानें तुला घनश्यामाशीं लग्न केलेंच पाहिजे ! चला, घनश्याम. [ दोघे जाऊं लागतात. ]

**लतिका** : घनश्याम, थांबा जरा !

**घनश्याम** : काकासाहेब, आपण व्हा पुढें; मी आलोंच [ धनेश्वर जातो. ] काय म्हणणें आहे आपलें ?

**लतिका** : आपण आपलें म्हणणें शेवटास नेलें तरी माझें हृदय आपल्याला मिळेल असें का वाटतें आपल्याला ?

**घनश्याम** : आपल्या हृदयाची किंवा संमतीची या लग्नाला काडीइतकीहि

जरूर नाही, रविकराच्या स्पर्शानें उषेचें तोंड फिकें पडतें तद्वत् माझ्या हस्तस्पर्शानें आपलें तोंड गोरेंगोरें झालें काय किंवा रंगाऱ्याचा हात लागल्याप्रमाणें माझ्या हातांनीं आपलें श्रीमुख रंगून निघालें काय, मला दोन्ही प्रकार सारखेच वाटणार आहेत. लतिके, गुलाबाचा वास कसाहि घेतला तरी गुलाबासारखाच यायचा; आसवांच्या दंवानें झाली तर रंगाची खुलावट तेवढीच जास्त मात्र होईल ! लतिके, या रंगेल गोष्टी बोलायला पुढें पुष्कळ वेळ आहे. तूर्त मला आपल्या लग्नसमारंभाच्या व्यवस्थेला लागलें पाहिजे. [ जरा पुढें जाऊन व पुन्हा मागें फिरून ] हो, ही तुझ्या लग्नाची व्यवस्था झाली. मालती तुझी जिवाभावाची मैत्रीण; तेव्हां तुझ्या जिवाबरोबर तिचीहि दैना कशी होणार हें कळलेंच तुला ! बाईसाहेब, त्या दिवशीं धनीपणाच्या धुंदींत आपण मला मालतीच्या लग्नांत सामानाची यादी लिहिण्यासाठीं हजर राहण्याला फर्माविलें होतें ! आपल्या हुकमाप्रमाणें मालतीच्या लग्नाची एकंदर यादी तयार आहे. ही पाहा, ऐका नीट [ एक कागद वाचीत ] प्रथम श्रीकार आहे. ' मालतीच्या लग्नाच्या सामानाची यादीः—तपशील एक नवरदेव, धनेश्वर नांवाचा एक रंगेल, स्वार्थी, पंचावन वर्षांचा म्हातारा ! ' बाईसाहेब, पुढें सगळी यादी मालतीच्या आसवांनीं पार धुऊन निघाली आहे ! लतिके, त्या वेळीं तुला कल्पनाहि नसेल, कीं मालतीच्या लग्नाची यादीच नाहीं, पण तुम्हां सर्वांचे ललाटलेखसुद्धां खरडण्याचें या घनश्यामाच्या हातीं आहे म्हणून ! [ जातो. ]

लतिका : [ स्वगत ] देवा, काय होऊं पाहात आहे हें सारें ?

( राग – सारंग, ताल – दादरा. )

खल छलित कसा धरुनि दंशा । जडवित सकलां कपटपाशा ।। ध्रु० ।।
समसुखी सखी ती । होई समाप्ति । सुख का विचारांत ऐशा ।। १ ।।

[ जाते. ]

**अंक तिसरा समाप्त**

## अंक चवथा

### प्रवेश पहिला

[ स्थळ : स्मशान, पात्रें : मनोहर. ]

मनोहर : [ स्वगत ] प्रभाकराचा स्वभाव जरासा तऱ्हेवाईक खराच! काय कल्पनेच्या भरांत त्यानें मला घनश्यामावर पाळत ठेवायला सांगितलें हेंच कळत नाहीं! बरें, त्याचें म्हणणें न ऐकलें तर लागलीच माथ्यांत राख घालून बसायचा! एव्हांपर्यंत नीट पाहिलें, घनश्याम रोजचे व्यवहार रोजच्याप्रमाणेंच करीत आला. नाहीं म्हणायला रोजच्या राबत्यांतला रस्ता सोडून आतां या स्मशानांतल्या ओसाडीवरून गेला एवढेंच! पण इतक्यांत घनश्याम नाहींसा झाला कसा? पुन्हा गांवांत तर गेला नाहीं? असेंच असेल; कारण या उघड्या जागेंत कुठें दडून बसायला एखादा आडोसाहि नाहीं. घनश्याम तांतडीनें गांवांत गेला; पण मला तितकी घाई करून गांवांत जाण्याचें काय कारण उरलें आहे? या शांत स्मशानांत मनाला अंमळ विश्रांति मिळणार नाहीं का? अरेरे, माल्ती, तुझ्या अवकृपेमुळें विश्रांतीसाठीं मला हें स्मशान प्रिय वाटण्याची वेळ यावी ना? झाली त्या दुःखदायक विचाराची सुरुवात! छेः, स्मशानांत सुद्धां विसाव्याची आशा नाहीं.

( राग – बहार, ताल – त्रिवट. )

व्यग्र चित्त झालें जरि या स्थलीं पसरली शांति मूर्ता ॥ ध्रु० ॥
चिरनिद्रेच्छा येथ धरुनि जन पहुडति हो तीं पूर्ण पूर्ता ॥ १ ॥
विस्मृति पडते अभंग येथें दुःखांधांची आर्तधूर्ता ॥ २ ॥

देहासुद्धां मनानें जिवंत असतांना जित्या जगाच्या जांचण्या चुकविण्याच्या हेतूनें आयुष्याचें शेवटचें टोंक गांठण्यासाठीं जितेपणींच एकदम या स्मशानांत येऊन बसणें म्हणजे लवकर कालक्षेप करण्यासाठीं घड्याळाचे कांटे पुढें

सरकवण्याइतकेंच हास्यास्पद आहे! पण आतां माझ्यांत जिवंतपणा तरी काय राहिलेला आहे? मालतीनें त्याग केल्यामुळें हा मनोहर तिनें फेंकून दिलेल्या या त्याच्या चित्राइतकाच निर्जीव झाला नाहीं का? [ चित्र खिशांतून बाहेर काढतो. ] दुर्दैवी चित्रा, तुझी आणि माझी सजीवता सारखीच. पण हें चित्र तरी मीं कशाला जवळ ठेवलें आहे? एका निर्जीव चित्रानें आठवणीसह दुसऱ्याचा भार कशाला बाळगावा? हें चालतेंबोलतें देहाचें चित्र मला आज टाकतां आलें नाहीं तरी हें चित्र या स्मशानांत कुठें तरी पुरून टाकून जितेपणींच एक प्रकारें स्वतःची स्मशानयात्रा उरकतां येण्या-सारखी आहे. देतों एखाद्या दगडाखालीं ठेवून झालें! [ इकडे तिकडे पाहून ] अरे, पण या काळ्या दगडाच्या माळरानांत तो हिरव्या जातीचा दगड कुठला? काय बरें या दगडाच्या जातीचें नांव? [ हंसून ] पण मला आतां या शास्त्रीय ज्ञानाशीं काय करायचें राहिलें आहे? प्रेमाचा संसार सजविण्यासाठीं मनुष्याला ज्ञानाची आवश्यकता असते, माझी प्रेमाची सृष्टि जळून गेल्यामुळें या माझ्या ज्ञानाची तरी मला काय अपेक्षा आहे? जाऊं देत! हें चित्र या हिरव्या दगडाखालींच पुरून टाकून माझ्या प्रेमाच्या सृष्टींतील ही शेवटची साक्ष आणि ज्ञानाच्या संपर्काचा हा शेवटचा विषय या दोघांचा एकवाक्यतेने कायमचा निरोप घेतों. आतां प्रेमहि नको आणि ज्ञानहि नको! [ हिरव्या दगडाकडे जातो. ] वा: ! माती काढायला हा मोडका लोखंडी तुकडा बरा मिळाला! काय गंजलेला आहे! [ दगड उचलून जमीन उकरूं लागतो. ] किती भुसभुशीत जमीन आहे ही! अरे बाप रे, हा कसला आवाज? हें काय आहे? [ डबा काढून ] हा जस्ताचा डबा आहे! [ उघडतो. ] आणि यांत कांहीं कागद आहेत! [ कागद पाहून ] प्रभाकराचा तर्क बरोबर आहे. घनश्यामचींच हीं सारीं कुलंगडीं! आणि हेंच पाहून जाण्यासाठीं घनश्याम स्मशानांतून गेला! किती चमत्कारिक कल्पना डोक्यांत एकदम खेळूं लागल्या! आधीं हें सर्व घेऊन प्रभाकराकडे जावें. [ उठून ] माझ्या आशेसाठीं खड्डा म्हणून खणायला गेलों, तो सुदैवानें तिचा पाळणा मात्र ठरूं पाहात आहे! लोकांच्या संसारसुखाचा स्मशानांत शेवट होतो; पण या मनोहराच्या संसारसुखाचा स्मशानांत जन्म व्हावा अशी तर दैवी योजना नसेल ना? चला. अरे, पण मी वेडा तर नाहीं? हा दगड पुन्हा जशाचा तसा ठेविला पाहिजे. नाहीं तर घनश्याम पुन्हा इकडे फिरतांच सारा प्रकार त्याच्या लक्ष्यांत यायचा? [ खळगा पुन्हा भरूं लागतो. पडदा पडतो. ]

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : धनेश्वर. ]

धनेश्वर : [ स्वगत ] पातकांच्या भयप्रद जाणिवेनें तळमळणाऱ्या अंतःकरणाचें ओझें वागविण्याइतकी भयंकर शिक्षा नरकयातनांत तरी असेल का ? एका इंग्रज प्रवासिनीनें एका ज्वालामुखी पर्वतावरचें धडाडलेलें अग्निसरोवर आणि गिरसाप्प्याचा धबधबा हीं दोन स्थळें बघायला फार भयाण आहेत असा आपला अनुभव लिहून ठेवला आहे. कड्यावरून या दोन्ही ठिकाणीं डोकावून पाहतांना तिला घेरी आली ! या धनेश्वराच्या पातकी मनांत तिनें जर क्षणमात्र डोकावलें असतें तर तिला त्या अग्निसरोवराच्या ज्वालामय लाटा आणि धबधब्याची अखंड धडकी हीं दोन्हीं एके ठिकाणीं दिसून आलीं असतीं. आणि धाडसीपणा बाजूला राहून हृदयाला धक्का बसून ती तावडतोब गतप्राण झाली असती ! बिचाऱ्या कोमलवृत्ति लतिका आणि मालती आपापल्या परीनें माझ्या हृदयतापामुळें दुरूनहि पोळून निघत आहेत ! नाही. मी लतिकेलाहि जळूं देणार नाहीं आणि मालतीलाहि जळूं देणार नाहीं, माझी गुंतलेली मान सोडविण्यासाठीं या हरामखोर घनश्यामाच्या गळ्यांत मी माझ्या लाडक्या मुलीला तिच्या मनाविरुद्ध -- पण नाहीं, ही बापाची दया नाहीं ! हा घनश्यामाबद्दलचा माझ्या मनांतला पीळ आहे. माझा जीव वांचविण्यासाठीं मीं लतिकेचें मोरेश्वराशीं लग्न लावून द्यायला तयार झालों नव्हतों का ? त्या वेळीं लतिकेच्या मनाची मीं काय कदर केली ? अरेरे, त्या वेळीं त्या बिचारीला किती दुःख झालें असेल ! पण मग मालती माझ्याशीं लग्न करायला आपखुशीनें कशी तयार झाली ? माझ्याप्रमाणेंच या घनश्यामानें धुंडिराजपंतालाहि एखाद्या अडचणींत पकडलें नसेल ना ? तर काय धुंडिराजसारखा प्रेमळ बापहि आपल्या संरक्षणासाठीं या नीच मनाच्या धनेश्वराप्रमाणेंच स्वतांच्या पोरीचा बळी द्यायला तयार होतो ? छेः छेः! मालतीच्या जन्माचें मातेरें करण्याऐवजीं धुंडिराज अशा अडचणींतून स्वतःचा जीव देऊन – काय भयंकर कल्पना मनांत आली ही एकदम !– मग लतिकेसाठीं मीं कां जीव देऊं नये ? मी जगांतून नाहींसा झालों तर माझ्या पातकांमुळें पीडलेले किती तरी जीव एकदम दुःखमुक्त होतील ! लतिका,

मालती – छे; या विचारानें कांहींच्या कांहींच व्हायला लागलें! आधीं मालतीला बोलावितों आणि ती माझ्याशीं लग्न करायला कशी तयार झाली याची शहानिशा करून घेतों. आज माझी लतिका दुःखांत पडल्याची मला जाणीव झाली, तेव्हां मालतीच्या मनःस्थितीची मला आठवण झाली! परमेश्वरा, तशी वेळ आलीच तर प्रसंगीं आत्मह – देवाधिदेवा, मी पातकी आहें, भेकड आहें, स्वार्थी आहें; मला इतकें बोलण्याचा धीर कुठून होणार? पण आपण सर्वज्ञ आहां!

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : मालती. ]

मालती : [ स्वगत ] काल तसा प्रकार आणि आज असा प्रकार! देवाची गति कोणत्या दिशेनें होत आहे हेंच कळेनासें झालें आहे!

[ राग – देसकार, ताल – झपताल. ]

विधिचें हृदय लोल चल जेंविं कल्लोल।
कमलाहि हिंदोल-गत चंचला ती ॥ ध्रु० ॥
लतिकाजनक होइ विधिकंठमणि जेंविं।
कमलाहि त्याठायिं बहु पक्षपाती ॥ १ ॥
मति चंचला म्हणुनि त्याचीहि ये दिसुनि
फिरवीत हेतु मनिं शतशा क्षणांतीं ॥ २ ॥

लतिकेच्या वडिलांनीं हें मांडलें आहे तरी काय? [ धनेश्वर येतो. ] आपण मला बोलावणें पाठविलें होतें?

धनेश्वर : हो, मला तुझ्याशीं बरेंच बोलायचें आहे. पण आधीं एका गोष्टीचा खुलासा करून टाकूं. तुला कळलेंच असेल कीं, तुझ्याशीं लग्न करण्याचा विचार मीं पुन्हा कायम केला आहे?

मालती : हो!

धनेश्वर : या वचनभंगामुळें तुला माझा तिरस्कार वाटूं लागला असेल?

मालती : [ स्वगत ] वचनभंगामुळें दुसऱ्याचा तिरस्कार करण्याचा या मालतीला

काय अधिकार आहे ?

धनेश्वर : तूं बोलत नाहींस ? या वचनभंगानंतरहि तूं या लग्नाला पहिल्याप्रमाणें तयार आहेस का ?

मालती : काल आपणच होऊन हा विचार रहित केला होता ! आपली इच्छा असली म्हणजे मी केव्हांहि या लग्नाला संतोषानें तयार आहेंच.

धनेश्वर : हेंच सध्यां मला गूढ वाटत आहे. मालती, कोणत्या मोहानें तूं या लग्नाला आनंदानें तयार होत आहेस ?

मालती : काय विचारलेंत आपण हें ! किती किती बरें वेडावांकडा प्रश्न आहे हा ! प्रसंगांत सांपडलेल्या मुलीनें काय उत्तर द्यावें या प्रश्नाला ? माझे वडील गरीब आहेत, पण कुलीनहि आहेत. वाईट विचारलेंत आपण मला. [ रडूं लागते. ]

धनेश्वर : मालती, तुझ्या मनाला दुखविण्याच्या इच्छेनें मीं हा प्रश्न टाकला नाहीं. तुझ्या वडिलांचा उपमर्द करण्याच्या हेतूनें किंवा मिळालेल्या उत्तराचा कांहीं दुरुपयोग करण्याच्या बुद्धीनें मी बोलत नाहीं. सर्वांच्या कल्याणासाठीं मी बोलत आहें. मीं शपथ मोडली आहे, वचन मोडलें आहे, म्हणून माझ्या शब्दावर तुझा विश्वास बसणार नाहीं. पण मीं अगदीं शुद्ध मनानें विचारतों आहें, या लग्नाला तूं कां तयार झाली आहेस ? धुंडिराज एखाद्या संकटांत का सांपडले आहेत ? तुझ्या वडिलांना संकटमुक्त करण्यासाठीं तूं या संकटांत उडी टाकीत आहेस का ?

मालती : स्वतः संकटमुक्त होण्यासाठीं माझे वडील मला संकटांत टाकतील ? छेः छेः, असें कधीं-कधींहि व्हायचें नाहीं. आपल्याजवळ खरें सांगायला हरकत नाहीं, माझ्या लहानग्या भावंडांवर आलेलें जन्माचें संकट टाळण्यासाठीं मी या संकटांत उडी टाकत आहें. सामान्य स्थितींत राहिल्यामुळें माझे बाबा किती उदार मनाचे आहेत याची आपल्याला नीटशी कल्पना व्हायची नाहीं. आम्हा मुलांच्या एवढ्याशा सुखासाठींसुद्धां बाबा आपला जीव देतील.

धनेश्वर : [ स्वगत ] मुलांच्या एवढ्याशा सुखासाठींसुद्धां बाबा आपला जीव देतील ! नीच मनाच्या धनेश्वरा, हें ऐकूनसुद्धां आतां कसला विचार करीत आहेस अजून ? लहानग्या भावंडांसाठीं मालती जिवावर उदार झाली, मालतीसारख्या मैत्रिणीसाठीं लतिका मोरेश्वराशींहि लग्न करायला तयार झाली आणि या बिचाऱ्या कोंवळ्या जीवांच्या हत्या टाळण्यासाठीं तुला म्हातारडी आत्महत्या करायला धीर होऊं नये ? बस. ठरला माझा विचार. आत्महत्या

कितीहि उग्र असली, भयावह असली तरी तिनें माझ्या पातकी जीविताचा शेवट करायला आतां मी तयार आहें. [ उघड ] मालती, मला तुझ्याकडून एक वचन हवें आहे. तें वचन तुझ्या मनोवृत्तीइतकें पवित्र आहे. तें वचन कायावाचामनसा देण्यासाठीं क्षणमात्र माझ्या पातकी हस्तस्पर्शाला तूं तयार होशील का ?

मालती : असें हिणविण्यासारखें विचारण्याचें काय कारण आहें ? ज्या हातांत जन्माचा हात देण्यासाठीं मी तयार झालें त्या हाताच्या नुसत्या वचनापुरत्या स्पर्शाला माझी काय हरकत असणार ? मजपासून असें कोणतें वचन हवें आहे आपणांला ?

धनेश्वर : मालती, तें वचन तूं मनापासून दिलेंस तर मला तुझ्याशीं लग्न करण्याचें कारण राहणार नाहीं, आणि लतिका घनश्यामाला देण्याचेंहि कारण उरणार नाहीं !

मालती : माझ्या सुखाची मी किती पर्वा करितें हें आपण जाणतच आहां. माझ्या बालिश आत्मप्रौढीची मला क्षमा करा — पण माझ्या लतिकाताईच्या सुखासाठीं मी आपल्याला नुसतें शब्दाचेंच वचन काय, पण माझ्या प्राणांचे वचनसुद्धां द्यायला तयार आहें.

[ राग — ललत, ताल — त्रिताल. ]

प्राणांहुनि लतिका प्रिय जिवासि ।
तिजवरि संकट लघुहि ये तरी ।
हरिन त्या तनु त्यजुनि कीटशी ॥ ध्रु० ॥
अपूर्णता तत्सुखिं जरि कांहीं ।
पूर्ण करिन तें देऊनि ममही ।
नवल न, आत्मा गणित तियेसी ॥ १ ॥

या गरीब मालतीवर आपल्या उदार कन्येचे उपकारच तसे आहेत. काय वचन हवें आपल्याला ?

धनेश्वर : मला तुझ्यापासून एवढेंच वचन हवें, कीं माझ्या पश्चात् तूं आणि तुझ्या पतीनें माझ्या लतिकेचें सर्वतोंपरी संरक्षण करावें. कसल्याहि संकटांत, कुठल्याहि प्रसंगीं तुम्हीं तिला अंतर देऊं नये. मालती, मालती, माझा सर्व नीचपणा विसरून जाऊन उदार मनानें मला एवढें वचन देशील का ?

मालती : देवानें अशी वेळ मुळीं आणूंच नये; पण माझ्याकडून असें वचन मागण्याचें आपणांला कांहींच कारण नव्हतें. हें घ्यावें वचन ! माझ्या प्राणांचे

पाय साक्षीला स्मरून सांगतें कीं आपली आज्ञा मला प्रमाण आहे. [ वचन देते. ] आणखी आपणांला ही कल्पना तरी कां आली ? लतिकेवर कसलें संकट येणार ? आपल्याशीं असें वैर तरी कोण धरणार ?

धनेश्वर : समज उद्यां हा घनश्यामच तिच्यावर संकट कशावरून नाहीं आणणार ? मालती, कुणाजवळ बोलूं नकोस– आपल्या लतिकेनें या घनश्यामाला बोलण्यानें केव्हातरी दुखविलेलें आहे, आणि म्हणून तो तिच्याशीं लग्न करण्याच्या हट्टास पेटलेला आहे. आतां आपण आग्रहानें लतिकेला दुसऱ्या स्थळीं दिली तर असला खुनशी मनुष्य कोणत्या वेळीं काय करील हें कुणीं कसें सांगावें ? मला त्याची फार भीति वाटते. माझ्यामागें तुमच्या घराचाच काय तो लतिकेला आधार ! मी आतां म्हातारा झालों. मनुष्यदेहाचा काय नेमानेम सांगावा ! आज आहे उद्यां नाहीं !

मालती : आपली ही भीति अगदीं निराधार वाटते मला.

धनेश्वर : [ हंसून ] भिण्यासारखें कांहीं नाहींच ! बरें, मालती, मी जातों. तुझ्या वचनामुळें धीर येऊन मी किती निश्चिंत झालों ! मात्र मालती, मीं तुला एकदां दिलेलें वचन मोडलें हें मनांत आणून या तुझ्या वचनाची हेळसांड करूं नकोस. कांहीं झालें तरी तुझ्याशीं लग्न करणार नाहीं असें तुला आज मीं पुन्हा वचन दिलें आहे. हें वचन किती पवित्र निश्चयानें पाळतों तें पाहा. पण कांहीं झालें तरी तूं मात्र आपलें वचन विसरूं नकोस. तुझ्या वचनाचाच काय तो माझ्या मनाला आधार वाटतो. माझ्यामागें लतिकेला तुमच्याखेरीज आपलें म्हणायला कोणीहि नाहीं. मालती, माझी लतिका अगदीं लहान आहे. अल्लड आहे. मालती, जातों मी. [ जातो. ]

मालती : [ स्वगत ] पहिल्यानें मला नुसता तुरळक संशय आला, पण शेवटीं खात्रीच झाली माझी. जातां जातां आधीं हंसल्यासारखें करून बोलले, आणि शेवटीं यांचे डोळे पाण्यानें भरून आले. यांच्या निर्वाणीच्या बोलण्यावरून खास यांनीं आत्महत्येचा निश्चय केला आहेसें वाटतें. घनश्यामांचीच यांनाहि भीति वाटते. बाबांच्याप्रमाणें यांचाहि गळा घनश्यामांनीं गुंतविला आहे कुठें तरी ! कां बरें घनश्याम असा सर्वांचा गळा कापायला तयार झाले ? माझें लग्न यांच्याशीं ठरविण्याचासुद्धा घनश्यामांचाच दुराग्रह दिसतो. इतका दुष्टावा करण्याचें घनश्यामांना काय कारण ? दुसरें काय ! यांनीं सांगितलें तेंच कारण ! यांना तें पुरतें माहीत नाहीं, पण मला त्याच वेळीं कळून आलें होतें. त्या दिवशीं लतिकाताई, घनश्यामांना विनाकारण नाहीं नाही तें तोंडून

बोलली, त्याबद्दल घनश्याम हा सर्वांवर सूड उगवीत आहेत. तरी लतिका-ताईला मी सारखी सांगत होतें ! लतिकाताई, लतिकाताई, हा सारा तुझ्या फटकळ बोलण्याचा परिणाम !

[राग – भैरवी, ताल – पंजाबी.]

तव रसना आणी गुरु संकट तें ॥ ध्रु० ॥
चपला रसना शस्त्र दुधारी ॥
उलटत निज शिरिं पुरतें ॥ १ ॥
निजवाक्पाटवफलरस घेणें प्राप्त कधीं तिज होतें ॥ २ ॥

बिचारे घनेश्वर कसे दीनासारखे झाले आहेत ! कांहीं होवो, अजून तरी लतिकाताईला चांगलें बजावून ठेविलें पाहिजे. पण आतां उपयोग काय ? घातवेळा तर येऊन ठेपलीच ! तरी पण तिला उपदेश करायचा तो केलाच पाहिजे. [ लतिका येते. ] ताई, नीट बैस अशी. मी काय बोलतें तिकडे चांगलें लक्ष दे. मी तुला आज वाईट बोलणार आहें; फार-फार-फार वाईट बोलणार आहें; अगदीं मनापासून रागानें बोलणार आहें. मी माझ्या सुखा-साठीं बोलत नाहीं, पण तुझ्या सुखासाठीं बोलतें आहें. माझ्या बोलण्यांत एखादी चूक कुठें सांपडते ती शोधून काढण्यासाठीं ऐकूं नकोस. सांपडलेल्या चुकीचें काय उत्तर द्यावें हें ठरविण्यासाठीं ऐकतांना मधून मधून विमनस्क होऊं नकोस. माझ्या बोलण्यांत जेवढें खरें असेल तेंच ऐकून घे; आणि शांत मनानें त्याचाच विचार कर. ताई तुझ्या गुणाचें मोल माझ्यासारख्या गरीब आणि साध्या मुलीला कसें करतां येईल ? मला तुझ्या सांवलीचीसुद्धां सर येणार नाहीं. तूं वैभवसंपन्न आहेस, रूपसंपन्न आहेस, बुद्धिसंपन्न आहेस, प्रेमळ आहेस, सुशील, कुलीन आहेस, सर्वांचा जीव कीं प्राण आहेस. ताई, हें झालें; आतां इतकें असूनहि आज तूं कोणत्या परिस्थितींत आहेस तें पाहा. आतांच तुझे वडील मला भेटून गेले. त्यांचें तें निर्वाणीचें बोलणें, ती दीन मुद्रा, ती निराश वृत्ति–त्यांच्याकडे अगदीं पाहवेना मला ! तूं अशी सदाची हंसतमुख, पण तुलासुद्धां रडूं कोसळलें असतें. त्यांनीं आज आत्महत्येचा निश्चय – अशी संशयानें बघूं नकोस, माझा तर्क अगदीं अगदीं खरा आहे, आत्महत्येचा निश्चय तर आहेच; त्याबद्दल शंकाच नाहीं–पण माझी इतकी-सुद्धां खात्री आहे कीं आज रात्रींच ते आत्महत्या करणार आहेत, आणि म्हणून आज तुमच्या घरून माझें पाऊल बाहेर निघत नाहीं. माझ्यामागें माझ्या लतिकेचा सांभाळ कर असें त्यांनीं मला किती काकुलतीनें कळवळून

सांगितलें ! किती अजीजीनें हातांपायां पडून त्यांनीं माझ्याकडून तसें वचन घेतलें ! घनश्यामांनीं तुझ्या बाबांना आणि माझ्या बाबांना कसल्या तरी अडचणींत पकडलें आहे. तेवढ्यासाठीं माझ्या बाबांना मला तुमच्या घरीं देणें भाग पडलें. तुझ्या वडिलांना स्वतःच्या इच्छेविरुद्ध माझ्याशीं लग्न करण्याचें कबूल करावें लागत आहे. केवळ माझ्यापुरतीच ही गोष्ट होती, म्हणून मीं आजवर तुला या गोष्टीची ओळखहि दिली नाहीं. पण आज स्वतः तुझ्यावर प्रसंग आला आहे. घनश्यामांच्या हुकमाबरहुकूम तुझें त्यांच्याशीं लग्न करून टाकायलाहि तुझ्या वडिलांना आज तयार व्हावें लागत आहे. आणि या साऱ्या अपेष्टा टाळण्यासाठीं जीव देण्यापलीकडे तुझ्या वडिलांना दुसरा इलाज सांपडत नाहीं. कैक जीवांचा आणि दोन भरल्या घरांचा असा सर्वस्वीं सत्यानाश करायला घनश्याम इतक्या त्वेषानें कां बरें झटत आहेत ? आपणां सर्वांवर अशी आग पाखडण्याइतके घनश्याम कां निष्ठुर झाले ? लतिकाताई, घनश्याम मला पाहायला आले त्या दिवशीं तूं आणि प्रभाकरदादा त्यांना जें सारखें टाकून बोलत होतां तें — तुझ्या वडिलांनीं या गोष्टीचें हेंच कारण सांगितलें. ताई, हा सारा अनर्थपात म्हणजे निव्वळ तुझ्या बोलण्याचा परिणाम. किती तुटून पडून तुम्ही दोघे घनश्यामांच्या काळजाला घरे पाडीत होतां ! त्या परक्या माणसानें असा तुमचा काय अपराध केला होता बरें ? आपलेपणामुळें तुमची मालती तुम्हांला अधिक असेल; पण सामान्य स्थितींतल्या घनश्यामांनीं सामान्य स्थितींतल्या मालतीला पाहावयाला यावें यांत असें अघटित तें काय होत होतें ? हुरूपानें आलेल्या अभ्यागतावर एवढ्यासाठीं तशा बोलण्याचा मारा करायचा ? बोलतां येतें म्हणूनच बोलत सुटायचें ? आपल्या बुद्धीचा तरतरीतपणा दाखविण्याच्या भरांत वाटेल त्याला, वाटेल त्या वेळीं आणि वाटेल तें बोलायचें ? सारासार विचार म्हणून कसा तो नाहींच का ? काय बोलावें याच्यापेक्षां जें मनांत येईल तें कसें बोलावें याचाच विचार करणें म्हणजे विचार झाला का ? प्रसंगाच्या तीव्रतेलाच शोभण्याजोगें बोलणें, बुद्धीची तीव्रता दाखविण्यासाठीं बोलायचें, एकमेकांच्या चढाओढीनें कोटिक्रम लढविण्यासाठीं तिसऱ्याच्या हृदयावर घाव घालायचे हाच तुमच्या बुद्धीचा, शहाणपणाचा आणि ज्ञानाचा सारांश वाटतें ? सरळ साध्या संसारांत अष्टौप्रहर अशा आडव्यातिडव्या कोटिक्रमानें बोलण्याजोगे प्रसंगच कोणते आहेत असे ? कुणाच्या मनाला दुखविल्यावांचून एखाद्या वेळीं सहजगत्या बोलण्यांत चटकदार कोटिक्रम होऊन गेला तर त्याची शोभा ! पण सदान्‌कदा तोच प्रकार ?

आपलें बोलणें दुसऱ्याला पटलें नाहीं तर तें चांगल्या शब्दांनीं नीट समजावून द्यायचें का लागलीच त्याच्यावर निर्दय कोटिक्रम करीत सुटायचें ? गळ्यांत सरी बसत नाहीं म्हणून मान कापून सरी बसवायची ? नेहमीं असें बोलणें चांगलें का ? आम्ही तुझ्या जिव्हाळ्याचीं माणसें, म्हणून तुझ्या बोलण्याचें कौतुक करीत आलों; पण लोक काय बोलतील अशा बोलण्यामुळें ? हेंच म्हणतील कीं श्रीमंत बापाची, लाडानें शेफारलेली एकुलती मुलगी घरांत वळण लावायला आई नाहीं, कुणी हटकायला नाहीं; तेव्हां बेफाटपणानें वाटेल तसें वागायला लागली, बेजबाबदारपणें बडबडायला शिकली, आणि स्वच्छंदी निघाली ! आतांच पाहा तुझ्या बोलण्यानें कशी वेळ आली आहे ती ! माझे बाबा मला विहिरींत लोटायला तयार झाले, माझा संसार अशा पंथाला लागला, मनोहरांचा हिरमोड झाला, माझीं लहान लहान भावंडें संकटांत सांपडलीं ! पण मी तुला बोललें नाहीं; पण आज तुझ्या बोलण्यामुळें तुझ्या स्वतःच्या संसारांत दुःखाचा शिरकाव झाला, तुझ्या बाबांना जीव देण्याची पाळी आली, तुझें घनश्यामांशीं लग्न लावण्याची वेळ आली ! एक नुसतें बोलणें, लतिकाताई, बेजबाबदारपणाचें बोलणें नडतें आहे हें सारें !

लतिका : मालतीताई, किती, किती कठोर बोलते आहेस तूं !

मालती : अजून कठोर बोलूं नको का ? अजूनसुद्धां तुझी चूक तुला दाखवायला नको का ? तुला वेळेवर इतकें कठोर बोलायला माझ्याखेरीज दुसरें कोणीहि नाहीं. पण पुढें तरी सावधगिरीनें वागायचें तुला समजायला हवें ना ? म्हणून लाडके लतिकाताई, म्हणूनच बरें मी अशी निर्दयपणें तुझ्याशीं बोललें आहें. पुन्हा एवढें मात्र लक्ष्यांत ठेव कीं, आमच्या दुःखामुळें मी तुला बोलतें नाहीं; तुझ्यासाठींच इतकें बोलण्याचा प्रसंग आला. ताई, मला क्षमा कर. पण केव्हां तरी तुला हें सांगणें भाग होतें.

लतिका : ताई, जा तूं आतां; मला एकटीला कांहीं वेळ बसूं दे.

मालती : जातें मी; पण रागाच्या भरांत—

लतिका : तुझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगतें कीं तुला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. पण तूं आधीं जा कशी ! मला अगदीं कोंडल्यासारखें झालें आहें.

मालती : [ स्वगत ] इंदुताईला बसायला सांगतें हिच्याजवळ जरा.

[ मालती जाते. ]

लतिका : [ कांहीं वेळ गेल्यावर, स्वगत ] मी अशींच्या अशी वहिरून तर गेलें नाहीं ना ? एकदम सारें सुन्न कां झालें ? ' श्रीमंत बापाची लाडानं शेफारलेली

एकुलती मुलगी, घरांत वळण लावायला आई नाहीं, कुणी हटकायला नाहीं; तेव्हां बेफाटपणानें वाटेल तसें वागायला लागली, बेजबाबदारपणानें बडबडायला शिकली आणि स्वच्छंदी निघाली!' मालतीताई, मालतीताई, एकदम इतकें सारें खरें कां ऐकवून गेलीस? स्वच्छंदी, लाडानें शेफारलेली, वळण नाहीं, बेफाट, बेजबाबदार! लतिके, लतिके, काय तुझ्या नांवाची शोभा ही! [ हातांनीं तोंड झांकून रडूं लागते. कांहीं वेळ गेल्यावर; स्वगत ] असें रडून काय होणार! जन्मभर अशी रडत बसलें तरी कांहीं होणार आहे का? कांहींच होणार नाहीं का? माझ्या बोलण्यानें ज्यांना धाईधाई रडत बसण्याची पाळी आली आहे त्यांच्या जन्माचा रडण्याचा पत्कर मीं एकटीनें घेतला तर देव त्यांच्या नशिबींचें रडणें टाळणार नाहीं का? पण नुसत्या माझ्या रडण्यानें काय होणार? मग या सर्व जीवांच्यावरचें संकट टाळण्यासाठीं मी आतां करूं तरी काय? [ कांहीं वेळ स्वस्थ बसून ] घनश्यामांना दीनपणें शरण जाऊं? या दुखावलेल्या निर्दोष जीवांसाठीं त्यांच्याजवळ करुणा भाकूं? हो, मानी लतिके, हो, याखेरीज दुसरा मार्गच नाहीं तुला. माझ्या बोलण्यानेंच घनश्यामांना दुखविलें, आणि म्हणूनच ते हट्टाला पेटले आहेत. आतां माझ्या बोलण्यानेंच सारें निस्तरायला हवें. घनश्यामांना शरण गेल्याखेरीज — घनश्यामांना शरण! घनश्यामांना शरण! देवा, देवा, काय ही वेळ आणिलीस माझ्यावर!

( राग – भीमपलास, ताल – त्रिताल. )

उलटा हा काळ कसा आला ॥ ध्रु० ॥
शिर लत्तादानार्थ जयाचें । न पदस्पर्शें गमे कधि साचें ।
तच्चरणीं शिर वांकविणें अति नम्रपणें; ये दैवाला ॥ १ ॥

[ तोंड झांकून बसते. कांहीं वेळानंतर इंदु प्रवेश करिते. ]

इंदु : लतिकाताई, लतिकाताई, अशी काय बसली आहेस? बसूं का जराशी तुझ्याजवळ? का आपली फटदिशी रागावशील कीं अशी वेडीविद्री दिसतेस आणि जवळ कशाला बसतेस म्हणून? मला तुझ्या बोलण्याची भारी भीति वाटते.

लतिका : [ स्वगत ] माझ्या बोलण्याची भीति! ज्याला त्याला माझ्या बोलण्याची भीति वाटते. पण आतां मलाच माझ्या बोलण्याची भीति वाटूं लागली आहे.

इंदु : ताई, बोलत कां नाहींस?

लतिका : इंदूताई, आज जरा माझें डोकें दुखतें आहे.

इंदु : मग डोकें चेपूं का थोडा वेळ ?

लतिका : नको. हें पाहा, अशीच जा आणि घनश्याम कुठें असतील त्यांना म्हणावें. मीं बोलावलें आहे, जरा येऊन जा. लवकर पाठवून दे त्यांना !

इंदु : बरें; पण डोक्यासाठीं कांहीं औषध आणूं का ?

लतिका : नको. [ इंदु जाते. स्वगत ] घनश्यामांच्या पायांवर डोकें ठेवणें हेंच औषध काय तें माझ्या कपाळीं आहे. घनश्यामांना मीं बोलवायला पाठविलें खरें, पण हें कडू जहर औषध माझ्याच्यानें घेववेल का ? पण आतां नाहीं म्हणून कसें चालेल ? सुस्थितींतल्या उन्मादांतील बडबड या कालकूट औषधा-खेरीज कमी व्हायची नाहीं. कोणत्या प्रसंगांत येऊन पडलें ही मी ! दीन अनाथासारखें घनश्यामांना शरण जायचें ? सारा स्वाभिमान सोडून- पण हा कसला स्वाभिमान ? ज्या स्वाभिमानानें स्वतःची उन्नति होण्याऐवजीं आस-पासच्या जीवांची तिसऱ्याच्या हातीं पायमल्ली होते तो कसला स्वाभिमान ? शहाणपणाची दिवटी पाजळण्याच्या भरांत सर्वांच्या मुखाला आग लावली, आणि लाडक्या जीवांना आंच मात्र लावली ! जळो तो माझा स्वाभिमान आणि जळो ती बुद्धिमत्ता ! माझ्या बुद्धिमत्तेमुळें प्रियजनांवर संकटें आलीं ! ही लतिका सर्वांच्या दुःखाला कारणीभूत झाली ! अभिमानी लतिके, दुसऱ्यांचे जीव तुझ्यामुळें पिळवटून निघत असतांहि मनाचा पीळ उलगडून तुला तुझा निर्जीव स्वाभिमान सोडतां येऊं नये का ? इतकीसुद्धां उदारता तुझ्या ठिकाणीं नाहीं का ?—नाहीं; हा भलता स्वाभिमान सोडून दिला ! माझ्या जिभेला प्रायश्चित हें मिळालेंच पाहिजे. लतिका स्वतःच्या सुखासाठीं कांहीं स्वाभिमान सोडीत नाहीं. स्वतःच्या जिवाच्या भीतीनें अशी गाई-सारखी गरीब झाली नाहीं. तर केवळ माझ्या बोलण्यामुळें दुखावलेल्या जीवांना संकटमुक्त करण्यासाठीं. माझ्या उद्दामपणामुळें सालस, निर्दोष, प्रिय-जनांवर आलेली आपत्ति टाळण्यासाठींच मी स्वाभिमान सोडून घनश्यामांच्या चरणीं देह अर्पण करायला तयार झालें, याच गोष्टीमुळें मला आनंद वाटूं लागला आहे ! नुसता आनंदच नव्हे, तर मला या वेळीं अभिमानाचा आनंद वाटत आहे ! घनश्यामांशीं विवाह करून – घनश्याम ! घनश्याम ! घनश्याम ! ज्यांच्या नांवाचासुद्धां मनोभावानें तिटकारा केला त्यांच्याच नांवानें नटून, पतिस्वरूपांत परमेश्वर समजून त्यांची आजन्म पूजा तरी कशी करतां येईल मला ? त्यांचा मनोमय द्वेष करीत राहणें– पण स्त्रीधर्माला हें कसें

शोभेल ? नाहीं; तसा प्रसंग आलाच तर त्यांच्यावर प्रेम करायला, भक्तिभावानें त्यांची पूजा करायला मला शिकलें पाहिजे. लतिके, आपल्यामुळें दुसऱ्यांना दुःखांत पाडण्यापेक्षां आपणच दुःखद्वेष पोटांत गिळायला तयार होणें बरें नाहीं काय ? देवा ! देवापितरांच्या साक्षीनें लग्नाची माळ गळ्यांत घालतांक्षणींच पहिल्या तरल स्पर्शामुळें माझ्या हृदयाला एकदम इतका धक्का बसू दे कीं, त्यासरशीं साऱ्या गेल्या गोष्टींची आठवण नाहींशी होईल, आणि पुनः डोळे उघडतांच मला घनश्यामांच्या मूर्तीच्या ठिकाणीं, देवा, तुझी प्रेमस्वरूप मूर्तीच दिसूं लागेल.

( राग – बिहाग, ताल – पंजाबी. )

सकल चराचरीं या तुझा असे निवास ॥ ध्रु० ॥
पाषाणाच्या असलि जरी मूर्तिमधीं ।
उपलहृदयीं बसासि खास ॥ १ ॥

[ घनश्याम येतो. ]

घनश्याम : आपण पुनः मला बोलावणें पाठविलें ! मला तूर्त आपल्याला भेटण्याची किंवा आपल्याशीं बोलण्याची कांहींच गरज नव्हती. आलों म्हणून आलों झालें !

लतिका : आपल्याला तसदी दिल्याबद्दल क्षमा करा. आपल्याला माझ्याशीं बोलण्याची गरज नाहीं, पण आज मला आपणांशीं बोलण्याची गरज आहे.

घनश्याम : काय बोलणार आहां तुम्ही ?

लतिका : माझ्या सर्व प्रियजनांचे प्राण आपल्या हातीं आहेत हें मला माहीत आहे. माझ्या उद्दाम भाषणांमुळें खवळून आपण सर्वांचा छळ करण्यास तयार झालां आहांत. घनश्याम, आज आपल्यापुढें सारा उद्दामपणा, सारा स्वाभिमान मीं सोडून दिला आहे. माझ्या निरपराधी प्रियजनांवर दया करा अशी आज मी तुमच्या चरणीं दीनपणानें याचना करीत आहें. माझ्या बोलण्याच्या प्रायश्चित्तासाठीं मी आपल्या देहाचें दान करायला तयार आहें.

घनश्याम : पण हें दान मी काय म्हणून घेत बसूं ? जें आज मला हातानें हिसकावून घेतां येतें त्याच्यासाठीं हात पसरण्याचें मला काय कारण आहे ? शिवाय आपल्या देहाचें दान कोणत्या नांवानें घेऊं ? भिक्षा म्हणून, जोगवा म्हणून कीं गोग्रास म्हणून घेऊं ?

लतिका : भिक्षा म्हणा, जोगवा म्हणा किंवा गोग्रास म्हणा; काय वाटेल तें म्हणा. पण पुनः पदर पसरून सांगतें कीं, मला माझ्या अपराधासकट पदरांत घ्या,

[ राग – पूर्वी, ताल – त्रिताल. ]

करिं याचना चरणांप्रती । अवमानुं ती नका ही हो विनंति ॥ ध्रु० ॥

देहा या व्हा पति । इष्ट त्या द्या गति । त्याची मज न क्षिति ॥ १ ॥

मद्दोषाचे धनी । आप्त ते मानुनि । न छळा अदयमति ॥ २ ॥

घनश्याम : पण मला वाटतें आपणांला पदरांत घेतलें तरी आपल्या हट्टी हृदयाचा तरी मला लाभ होणार नाहीं. आपण मला असें बजावून सांगितलें आहे. आपल्या मनाचा पीळ तसाच राहणार ! कालपर्यंत आपली कुरकुर चालूच होती ! हें मला कसें खपेल ? मी तर असा बेपर्वाईनें वागणारा ! पायांतली वहाण पायांतच वाळगणारा व्यवहारी मनुष्य मी ! आज आपले डोळे उघडल्यासारखे दिसतात !

लतिका : कालच्या बोलण्याची मला क्षमा करा. नव्यानें पायमली होऊं लागली म्हणजे मेल्या कातड्याची वहाण सुद्धां थोडी कुरकुर करिते; मग मी तर जित्या रक्तामांसाची मुलगी आहे ! मला पायांतली वहाण म्हणा किंवा कांहीं म्हणा ! नाहीं हो, लतिका इतकी दीन कुणापुढेंहि झाली नाहीं; लतिकेनें स्वाभिमान सोडला नव्हता; पण प्रियजनांच्या सुखासाठीं मी वाटेल तो कमीपणा घ्यायला तयार झालें आहें. पायांतली वहाणच काय, पण माझ्या अपराधामुळें माझ्या निर्दोष प्रियजनांना आपण पायांखालीं तुडवून टाकूं नये म्हणून आपली पायधूळ व्हायलासुद्धां मी तयार आहें. माझ्या बोलण्यामुळें नाहक दुःख भोगणाऱ्या जीवांसाठीं मी स्वाभिमानशून्य झालें आहें. सांगा, घनश्याम सांगा, तुम्हांला आणखी किती लाजिरवाण्यासारखी शरण येऊं ?

घनश्याम : आपल्या मनातला खराखुरा पीळ अजून जसाच्या तसाच आहे. तुमच्याआमच्यासारखीं बाणेदार माणसें स्वतःच्या सुखदुःखाची फारशी पर्वा करीत नाहींत, हें मी स्वानुभवानें जाणतों. त्या दिवशींसुद्धां आपला अभिमान आपल्या प्रियजनांना सुखी करण्याबद्दलच होता. आजहि त्याच हेतूनें आपण या स्वार्थत्यागाला पिळदारपणानें तयार होत आहां. लतिके, तुझ्या प्रियजनांना सुखी व्हायला सवड करून देऊं काय ? नाहीं. स्वार्थत्यागाचें हें अभिमानी समाधान मी तुला लाभूं देणार नाहीं. तुझ्या प्रियजनांच्या सुखाची माती माती केल्याशिवाय मी राहणार नाहीं.

लतिका : घनश्याम, घनश्याम, कां हो असे निष्ठुर होतां ? असा छळ कां करतां ? असें दुःख कां देतां ?

घनश्याम : गरजवंताला अकल नसते म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आपल्याला

माझ्याशीं बोलण्याची गरज आहे; पण बोलण्याची अक्कल मात्र नाहीं. मी असा निष्ठुर कां होतों, असा छळ कां करतों आणि असें दुःख कां देतों असें विचारतां होय ? शरम नाहीं वाटत असें विचारायला ? त्या दिवशींच्या आपल्या वाग्बाणांचा आपणांला विसर पडला वाटतें ? लतिके, बाण जिथून सुटतो तिथें त्याची कांहींच साक्ष राहत नाहीं; पण जिथें जाऊन भिडतो तिथें जखम होते आणि जखम बरी झाली तरी कायमचा व्रण तरी राहतोच. कुठल्याशा आजारांत रोगी देहासाठीं वाटेल त्या दुसऱ्या देहाच्या जित्या मांसाचा पुरवठा केलेला चालतो म्हणतात; पण हृदयाची जखम भरून काढण्यासाठीं मात्र वैरी हृदयाच्याच तडफडत्या तुकड्यांची भर करावी लागते. त्या दिवशीं आपल्या शिकलेल्या कळपांतून एकाद्या नवशिक्या जनावराप्रमाणें माझी हकालपट्टी करितांना आपण कांहीं तरी विचार केला का ? असा काय मोठा अपराध केला होता मीं आपला ? मी हलक्या दर्जाचा असेन, सर्पाप्रमाणें दुष्ट असेन किंवा वाघाप्रमाणें क्रूर असेन; पण म्हणून मला सुखदुःख, मनोवृत्ति हीं कांहींच नसतील का ? बेजबाबदार मुली, शस्त्रानें वाघाचे सुळे पाडतांना किंवा दगडानें सापाचें डोकें ठेचतांना माणसाला काय वाटतें कीं त्या प्राण्यांना दुःखच होत नाहीं म्हणून ? दगडाला सापाच्या डोक्यांतलें विष लागलें तर त्याबद्दल जबाबदार कोण ? या प्रश्नाचा आपल्या मनाशीं नीट विचार करा, आणि मग मला आपले बेअकली प्रश्न करा.

लतिका : आपलें सारें बोलणें सर्वस्वीं मान्य आहे. मी आपल्याला अतिशय कठोर बोललें खरी; पण त्याबद्दल माझें मलाच शासन करा एवढीच आपल्याजवळ प्रार्थना आहे. माझ्या बोलण्याबद्दल शासन त्या गरीब, सालस, निर्दोष माणसांना कां देतां ? माझ्या वडिलांनीं आपला काय अपराध केला होता ? मालतीनें आपल्या मनाला कधीं दुखविलें ? एकाच्या अपराधासाठीं दुसऱ्याला शिक्षा करण्याचें काय कारण ? आपले पाय धरतें; पण त्या बिचाऱ्यांना क्षमा करा.

घनश्याम : काळ्याकुट्ट अंधाराप्रमाणें काळ्या अंतःकरणांतहि अमक्यातमक्याचा भेद उरत नाहीं; आणि धगधगीत निखाऱ्यावर पाणी टाकलें म्हणजे त्याचा सर्वस्वी कोळसा होतो, पण तेजस्वी माणसाच्या आशेवर पाणी पडूं लागलें तर त्याचें अंतःकरण तेवढें काळें ठिक्कर पडतें; या दोन गोष्टींचा एका मेळानें विचार करा म्हणजे झालें ! आणखी सांगूं का, एकाच्या अपराधासाठीं दुसऱ्याला शिक्षा करण्याचें काय कारण तें ? एकीला मागणीसाठीं विचार-

लेल्या प्रश्नांची दुसरीनें उत्तरें देत सुटण्याचें जें कारण तेंच!

लतिका : घनश्याम, इतकें आर्जवून जीव तोडून सांगितलें तरी दयामाया कशी हो येत नाहीं?

घनश्याम : काय संबंध दयामाया येण्याचा? ज्या गोष्टींचा मला मुळींच अनुभव नाहीं तिचें मी दुसऱ्याला कसें प्रत्यंतर पटवून देऊं? कोणी कधीं माझ्यावर दयामाया केली आहे म्हणून मोबदल्याखातर मी दुसऱ्यावर दया करूं? कोणत्या मनुष्यानें माझ्यावर निरपेक्ष, शुद्ध, असंबद्ध दया केली आहे? टीचभर उघडयानागडया देहाच्या देणगीखेरीज मानवजातीनें आजवर या एकलकोंडया घनश्यामावर काय उपकार केले आहेत? जिथेंतिथें मला अनादर तिरस्कार, सहाय्यशून्यता आणि परकेपणा यांचाच अनुभव येत गेला आहे. अनुदारवृत्तीच्या स्वार्थपरायण अशा या जगांत शुद्ध स्वरूपाची दया कुठेंच पाहायला मिळत नाहीं. स्वार्थानपेक्ष, हेतुशून्य दयेचा एक शब्द मला कुणीं दिला असता तर मी त्याचा सात जन्मांचा ऋणी होऊन बसलों असतों. नाहीं, घनश्यामाला अजून कुठें अशी दिव्य दया दिसली नाहीं. बापानें मुलाला पोसायचें, आईनें मुलीला जपायचें किंवा नवऱ्यानें बायकोला नटवायची, ही काय निरपेक्ष दया झाली? स्वार्थासाठीं एकमेकांना साह्य करायचें, सुखाच्या वेळीं नांवलौकिकासाठीं दुबळ्यांना हात द्यायचा, हीं दयेचीं दरिद्री सोंगें आहेत. माणसाची मादी आपल्या भुकेल्या पिलांना दूध पाजते, आणि राक्षसीण आपल्या पोरांचा फराळ करून आपली भूक भागविते! मग एकीला राक्षसवृत्ति कां म्हणायचें, आणि दुसरीला माणुसकीचा दाखला कां द्यायचा? लतिके, दयामाया हे सारे शब्द रिकामटेकडया भाषापंडितांनीं कोशाच्या खोगीरभरतीसाठीं तयार केले आहेत. निर्व्याज दयेची हुंडी जगाच्या बाजारात ओळखीवांचून व्यवहारी मनाला पटत नाहीं.

लतिका : घनश्याम, तुम्ही अलौकिक बुद्धीचे पुरुष आहात. अशी निरपेक्ष दया जगाला अजून दिसली नसेल तर तुम्ही दाखवा; आणि या पहिल्या यशाचे भाग्यशाली अधिकारी व्हा. घनश्याम, क्षमा करा, दया करा! माझ्या प्रिय आप्तांच्या सुखासाठीं, बेजबाबदार बडबडण्याच्या प्रायश्चित्तासाठीं, हें पाहा, तुमच्या पायांवर मी मस्तक ठेवितें. घनश्याम, माझ्या दीनदुबळ्या दुनियेकडे दयार्द्र दृष्टीनें पाहिल्यावांचून मी तुम्हांला जाऊं देणार नाहीं. तुमच्या हृदयाला दयेचा पाझर फुटेपर्यंत तुमच्या चरणांवरचा हा अश्रूंचा अभिषेक मी थांबवणार नाहीं. [त्याला नमस्कार करते.]

**घनश्याम :** असल्या बेवकूब सोंगानें मी फसायचा नाहीं. माझ्या हृदयाला पाझर ! हृदयाची क्रिया बंद पडल्यामुळें मनुष्य तात्बडतोब मरतो हा वैद्य-शास्त्रांतला सिद्धान्त माझ्या बाबतींत सर्वस्वीं चुकीचा ठरलेला आहे. हृदयाची क्रिया तर काय परंतु मला मुळीं हृदयच उरलें नाहीं. बुद्धिमत्तेच्या विजयांतच सुख मानायची पहिल्यापासून संवय लागल्यामुळें, विचाराप्रमाणेंच माझे विकार, इच्छा, भावना यांचा उद्भवहि माझ्या बुद्धिप्रधान मस्तकांत होत असतो; आणि त्या मस्तकाचा अंत आपणांला कधींच लागायचा नाहीं. आपला नुसता हात धरल्यामुळें आपलें हृदय ज्याप्रमाणें माझ्या हातीं लागण्यासारखें नाहीं, त्याप्रमाणें नुसते माझे पाय धरल्यामुळे आपल्याला माझें मस्तकहि मिळायचें नाहीं. कारण हातापासून हृदय दोनच हात दूर असतें; तर पायांपासून डोकें साडेतीन हात अंतरावर असतें ! लतिके, ज्या तोंडानें हे अकलेचे तारे तोडीत होतीस; त्याच तोंडाला असे खडे चारतांना मला कल्पान्तापर्यंतसुद्धा दया येणार नाहीं. लतिके, जातों मी. [ जातो. ]

**लतिका :** [ उठून; स्वगत ] हृदयाच्या चिंधड्या आणि मनाची माती करून घेऊन असें खडतर प्रायश्चित्त जीवाभावानें भोगलें, पण व्यर्थ गेलें ! पण सर्वस्वीं व्यर्थ गेलें का ? केलेली तपश्चर्या कां म्हणून फुकट जाईल ? या प्राय-श्चित्तामुळें माझ्या मनाला तरी किती समाधान वाटतें आहे ! माझ्यामुळें दुखावलेल्या जीवांच्या सुटकेसाठीं जितकें करतां आलें तितकें मीं केलें. माझ्या प्रामाणिक प्रयत्नाला यश आलें नाहीं ही परस्वाधीनची गोष्ट आहे. अभिमानाच्या भरांत घनश्यामांना दुखविलें आणि त्यामुळें सर्वांना संकटांत लोटलें. आज अभिमान सोडून देऊन घनश्यामांच्या जवळ मोकळ्या मनानें क्षमा मागून आणि सर्वांच्यासाठीं दीनवाणी करुणा भाकून माझ्या बेजबाबदार पातकाच्या ओशाळवाण्या ऋणांतून मी मुक्त झालें. आतां उघड्या डोळ्यांनीं देवाच्या मूर्तीकडे पाहून त्याच्याजवळ दयेची याचना करण्याचा माझ्या मनाला अधिकाराचा धीर आला. देवा, अजून – अजून किती अंत पाहतां ? लतिकेनें आणखी किती प्रायश्चित्त भोगायला पाहिजे ? प्राणिमात्र परमेश्वराचें स्वरूप असतें असें म्हणतात; मग देवा, अजूनही माझ्यापुढें या घनश्यामांच्या निर्दय अवतारानें कां उभे राहतां ? अनंतस्वरूप लीलावतारी परमेश्वरा, या दीन हीन लतिकेला एखाद्या प्रेममय दयाशील, सौम्य स्वरूपांत दर्शन कां देत नाहीं ? आपल्या इतक्या प्रेमळ दर्शनांपैकींच एखादें दर्शन या लतिकेला द्या.

[ प्रभाकर येतो. ]

प्रभाकर : [ स्वगत ] त्या गवयाची लबाडी सांगण्यासाठीं लतिकेशीं बोलावें कीं नाहीं ? पुष्कळ विचार करूनसुद्धां ठाम निर्णय होत नाहीं. बोलावें झालें. ( पाहून; उघड ) लतिके, लतिके ! ( ती रडूं लागते) लतिके, लता, हें काय ? रडायला काय झालें असें एकदम ?

लतिका : आज हा रडका दिवस कुठून उगवला आहे कुणास ठाऊक !

प्रभाकर : पण असें दिवसभर रडत बसण्यासारखें संकट तरी तुझ्यावर कोणतें आलें आहे ? आणि कांहींहि झालें असलें तरी तें आपल्या माणसाजवळ सांगायला नको का ?

लतिका : क्षमा करा प्रभाकर ! मीं सर्वांचाच अपराध केलेला आहे; पण त्यांतल्या त्यांत तुमची तर मी फारच अपराधी आहें. प्रभाकर, आजवर तुम्हांला प्रेमाचीं अगदीं वेडीं वचनें देऊन आज मीं तुमचा विश्वासघात केलेला आहे. प्रभाकर, माझ्या बेजबाबदार बडबडण्यामुळें माझ्या प्रियजनांवर आलेलीं संकटें दूर करण्यासाठीं, त्यांचे गुंतलेले गळे सोडविण्यासाठीं, अगदीं नाइलाज होऊन मीं माझा देह विवाहाच्या वचनानें दुसऱ्याच्या चरणीं अर्पण केला आहे. या पापिणीनें आपणां दोघांचाहि पूर्ण प्रेमभंग केलेला आहे. प्रभाकर, तुमचा असा विश्वासघात करण्यापूर्वीं मीं तुम्हांला नुसतें एका शब्दानें कळविलेंसुद्धां नाहीं. प्रभाकर ! – माझ्या बाळपणापासूनच्या जिवलग मित्रा ! अशा विश्वासघातकी, प्रेमघातकी, लतिकेची यापुढें साध्या आदरानें तरी आठवण करणें शक्य आहे का ? प्रभाकर, मी तुम्हांला कसें तोंड दाखवूं ? माझ्या नांवाचासुद्धां तुम्ही तिटकारा करायला लागाल.

प्रभाकर : मुळींच नाहीं. तूं काय म्हणतेस हें मला जरी स्पष्टपणें कळलेलें नाहीं तरी तूं हा स्वार्थत्याग आपल्या प्रियजनांसाठीं करीत आहेस; लतिके, यामुळें तुझ्याबद्दल मला तिटकारा न वाटतां उलट आदरपूर्ण अभिमान वाटेल ! भावी कालीं संसारांत संन्यस्त वृत्तीनें कधींकाळीं फिरतांना तुझ्या घरावरून जाण्याचा प्रसंग आला, तर माझ्या शेजारून येणाऱ्या-जाणाऱ्या अनोळखी मनुष्याला-सुद्धां क्षणभर थांबवीन. तुझी मूर्ति दाखवून त्याला आपल्या प्रेमभंगाची सर्व कथा सांगेन. ' या सर्वगुणसंपन्न प्रेमळ बाळेनें केवळ आपल्या प्रियजनांच्या सुखासाठीं आपल्या बाळपणापासून रचीत आणलेली प्रेमाच्या संसाराची मांडणी धैर्यानें आपल्या हातानें मोडून टाकली ! प्रियजनांसाठीं हिनें स्वतःच्या सुखावर पाणी सोडलें ! ' त्याला थांबविल्याबद्दल शेवटीं क्षमा मागून मीं अभिमानानें सांगेन कीं, ही माझ्या प्रेमाची निवड होती ! लतिके, दुर्दैवाच्या

ताऱ्यांत सांपडलेल्या या जगांत मनोभंग, प्रेमभंग आणखी आशाभंग या गोष्टी अगदीं साहजिक होऊन बसल्या आहेत. या चंचल जगांत प्रेमाचे खेळ इतक्या तीव्र त्वरेनें चालत असतात कीं, कधीं कधीं पहिल्या चुंबनानें रंगलेले गाल तत्क्षणींच शेवटच्या विरहाच्या अश्रूंनीं धुऊन टाकण्याची पाळी येते. लता, सौंदर्याचा प्रत्यक्ष लाभ होणें हें तर या जगांत अतिशय विरळा आहेच; परंतु खऱ्या सुंदर वस्तूंची मार्मिकपणानें पारख करण्याचें भाग्यसुद्धां फार थोड्यांच्या कपाळीं असतें. स्वार्थत्यागानें जरी तूं मला अंतरलीस तरी निवडीबद्दल मला अभिमान वाटत राहील !

[ राग – काफी, ताल – त्रिताल ]

धन्यता गणीं । त्या सुखीं जें मद्भाललाटीं ॥ ध्रु० ॥
उज्ज्वलदिव्यरूपगुणमंडित मिळत रत्न निरखाव्रया।
मूल्य तयातें पारखण्याचें भाग्य थोर लाभेहि या ।
समाधान यांताचि या हृदया । तिळ न विषाद शिवे तया ।
विलसें तें जरि अन्यशिरोहृदिं, उक्ति मानि नच खोटी ॥ १ ॥

पण लतिके, सर्व दृष्टींनें विचार करूनहि हा स्वार्थत्याग अवश्यच आहे का? या संकटावर काही उपाय नाही कां ?

**लतिका :** नाहीं हो; आपल्या त्या दिवशींच्या बेजबाबदार बडबडण्यामुळें बाबा इतक्या संकटांत सांपडले आहेत, कीं त्यांची इच्छा नसतांना ते मला परक्याच्या पदरीं बांधायला तयार झाले आहेत.

**प्रभाकर :** [ स्वगत ] मोरेश्वराला त्या दिवशी वाटेल तें बोलतांना मलासुद्धां वाटतच होतें, कीं यानें हें आपल्या बापाला सांगितलें तर त्याचा परिणाम ठीक लागणार नाहीं म्हणून. अर्थात्च, मुलाच्या झालेल्या अपमानामुळें त्याच्या बापानें आपल्या भागीदाराला आपल्या मुलाला मुलगी न दिल्यास सारीं कुलंगडीं निर्दयपणानें बाहेर काढण्याची भीति घातली असेल. पेढीच्या बाबतींत धनेश्वरकाकांच्याबद्दल बोभाटा आहेच. [ प्रकट ] लतिके, या संकटाला दुसरा कोणताहि उपाय नाहींच का ?

**लतिका :** अगदीं कोणताहि नाहीं. घनश्यामांनीं बाबांना काय दहशत घातली आहे न कळे, कीं ते अगदीं आत्महत्येपर्यंत –

**प्रभाकर :** घनश्याम ? यांत घनश्यामाचा काय संबंध ?

**लतिका :** मग हीं संकटें कोणीं आणलीं असें तुम्ही समजतां ? आपल्या दोन्ही घरांना – तुम्हांला कसें कळलें नाहीं कुणास कळे ! घनश्यामच अशी आग

लावायला तयार झाले आहेत.

प्रभाकर : अस्सें ! जरा थांब. माझी खात्री नसली तरी खात्रीचा तर्क तरी आहे खास, कीं घनश्यामानें आणलेल्या या संकटांना दूर करण्यासाठीं देहार्पणाखेरीज दुसरा इलाज खात्रीनें आहेच आहे. लतिके, त्या आंधळ्या कानड्याच्या पोटांत शिरण्याची कांहीं युक्ति आहे का ?

लतिका : त्यानें काय होणार ?

प्रभाकर : नीट आठवण कर. धनेश्वरकाकांनीं मराठी माणसांना बंदी केली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं मी आणि कानडी आंधळा दोघेहि तुमच्या घरीं आलों. प्रेमाच्या उतावळेपणामुळें आणि उपजत उतावळ्या स्वभावामुळें माझें येणें स्वाभाविक होतें. पण मला सांग, घनश्याम अशा पडत्या फळाच्या आशेनें दुसऱ्याच दिवशीं त्या आंधळ्याला कां घेऊन आला ? त्या आंधळ्याला गुजराथी येतें हें घनश्यामाला माहीत होतें. एवढ्यावरून घनश्यामाची आणि त्याची थोडी तरी पहिली ओळख शाबीत होते. आतां दुसरी गोष्ट – बिंदुताईनें मला खात्रीनें सांगितलें कीं, त्याला मराठी चांगलें येतें आणि तो आंधळाहि नाहीं म्हणून. घनश्यामानें धनेश्वरकाकांना बजावून सांगितलें होतें कीं याला मराठी येत नाहीं म्हणून. तिसरें, हा तोतया आंधळा घरांत आल्यापासून थोड्याच दिवसांनीं हा प्रकार सुरू झाला. या सर्व गोष्टींच्या एकदम मिश्रणानें अनुमान काढ पाहूं ? सरळ सरळ एवढ्याच गोष्टी निघूं शकतात कीं हा गवई आंधळा नाहीं, याला मराठी येतें हें सारें घनश्यामाला माहीत आहे, घनश्यामानें धनेश्वरकाकांना पेंचांत आणिलें तें याच्या मदतीनें. म्हणून म्हणतों कीं, या आंधळ्याचा अंत लागला तर काकांच्यावर घनश्यामानें आणलेल्या संकटाचें स्वरूप खात्रीनें लक्ष्यांत येईल. त्याला मनमोकळेपणानें बोलायला लावणें शक्य आहे का ?

लतिका : इतकी सोपी दुसरी गोष्ट कोणतीच नाहीं. तें माझ्याकडे लागलें.

प्रभाकर : तर मग याच पावलीं त्याच्याकडे जा. चल, सगळी हकीकत मला स्पष्टपणें सांग. मालतीताई किंवा मनोहर यांना यांपैकीं कांहीं माहीत आहे का ?

लतिका : मालतीताईला माझ्यापेक्षां या सगळ्या गोष्टींची जास्त माहिती आहे.

प्रभाकर : मी तिला बोलवावयाला पाठवितों. आधीं त्या गवयाकडे चल. लतिके, वेळ मुळींच घालवूं नको.

[ जातात. ]

## प्रवेश पचथा

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : महेश्वर बसलेला. ]

महेश्वर : [ स्वगत ] कंटाळा आला बुवा या आंधळेपणाचा ! या जगांत खरेंखुरें आंधळें असून वावरतां येत नाहीं. डोळस असलें तर डोळसाप्रमाणेंच नेहमीं वागणें हें त्याहिपेक्षां कठीण जातें. पण डोळे असून आंधळ्याप्रमाणें वागणें हें शिकंदर काम आहे. नकली आंधळेपणाची खात्री किती ठिकाणीं पटवून द्यावी लागते ! काल दुपारींच तो बिचारा म्हातारा नोकर निजला होता; आंधळेपणा शाबूत करण्यासाठीं मला त्याच्या पोटावर पाय देऊन पुढें जाण्याचा प्रयत्न करावा लागला ! बाकी आम्हीं नोकरांनीं एकमेकांच्या पोटावर पाय आणण्याचा प्रयत्न केला तर तें गैरशिस्त नाहींच म्हणा ! बरें, हें झालें; शिवाय कांचसामानाशीं किती लीला करावी लागते त्याची मोजदादच नाहीं. जमिनीवर असलेले बहुतेक कांचेचे पदार्थ मला पायांनीं जमीनदोस्त करावे लागले. माझी नजर आतां धनेश्वराच्या त्या आरशीवर आहे. [ पाहून ] अरे बाप रे ही लतिका आली वाटतें ! चला, डोळे बंद ( लतिका येते. )

[ महेश्वर तंबोऱ्याशी कारभार करतो. ]

लतिका : गवईबुवा, तो तंबोरा ठेवा खालीं. तुमची माझ्याबद्दल सहानुभूति आहे म्हणतां, मग हें आंधळ्याचें सोंग कां चालू ठेवलेंत माझ्यासमोर ? इंदुताईकडून मला कळलें आहे कीं, तुम्हांला मराठी चांगलें येतें; आणि बिंदुताईनें मला सांगितलें कीं, तुम्ही डोळस आहां म्हणून. अशी प्रतारणा कां बरें करतां ? उघडा डोळे एकदम !

महेश्वर : [ स्वगत ] अखेर या दोघी कारस्थांनीं या कानापासून त्या कानापर्यंत गळा अगदीं साफ कापला !

लतिका : उघडतां ना डोळे ?

महेश्वर : तुम्हांला फसविल्याबद्दल क्षमा करा. हे पाहा उघडले डोळे ! [ डोळे उघडतो. पाहून. ] पण हें काय, लतिकाबाई ? तुमचे डोळे किती तांबडे लाल झाले आहेत ! एखाद्याला वाटेल कीं, सगळा दिवसभर आज तुम्ही रडत होतां म्हणून.

लतिका : खरोखरीच मी रडत होतें. बाबांच्यावर आणि स्वतः माझ्यावर

घनश्यामांनीं इतकीं संकटें आणलीं आहेत कीं नकोसें झालें आहे; आणखी या कामांत तुम्ही त्यांना साह्य करतां आहां !

महेश्वर : लतिकाबाई, मी तुमच्याजवळ खोटें बोलत नाहीं; तुम्ही म्हणतां तें खरें आहे. तुमच्यावर घनश्यामांनीं संकट तरी काय आणलें आहे ?

लतिका : महेश्वर, काय सांगू तुम्हांला ? बाबांना कसलीशी भीति घालून घनश्यामांनीं त्यांना असा गळ घातला आहे, कीं माझें बाबांनीं घनश्यामांशीं लग्न लावून द्यावें; आणि हें लग्नसुद्धां दोन दिवसांच्या आंतच घडवून आणण्याचा कृतनिश्चय झालेला आहे.

महेश्वर : घनश्याम स्वतःच तुमच्याशीं लग्न करणार आहे ? तुमची खात्री आहे ?

लतिका : क्षणभरांत वाटलं तर तुमचीसुद्धां खात्री करून देईन.

महेश्वर : [ स्वगत ] ठीक. घनश्यामानें माझा उपयोग तर चांगला करून घेतला ! आंधळ्यानें पीठ दळण्यापैकींच हा प्रकार झाला ! पण यापुढें असल्या मनुष्यासाठीं या बिचाऱ्या सद्‌गुणी कुटुंबाशीं दगलबाजी करीत असण्याचें मला काय कारण आहे ! [ प्रभाकर येतो. ] [ उघड ] बरें लतिकाताई, आतां मला सांगा, माझ्याकडून तुम्हांला काय साह्य हवें ? मात्र माहिती देण्यापलीकडे माझ्याकडून आपणांस फारशी मदत होणार नाहीं.

प्रभाकर : मी— तुमचें खरें नांव काय ?

महेश्वर : महेश्वर.

प्रभाकर : महेश्वर, मी लतिकेच्या अगदीं विश्वासांतलाच आहे. माझ्याशीं तितक्या मनमोकळेपणानें बोलायला हरकत नाहीं. प्रथम हें सांगा, घनश्यामानें तुम्हांला या घरांत आणल्यानंतर तुमच्याकडून काय कामगिरी करून घेतली, आणि धनेश्वरकाकांना घनश्यामानें पेचांत तरी कोणत्या पकडलें आहे ?

महेश्वर : इथें आल्यापासून त्यानें मजजवळून एकच काम करून घेतलें; आणि तें म्हणजे काकासाहेबांच्या खासगी कागदांतले कांहीं कागद चोरणें हेंच होय. माझी समजूत अशी आहे कीं, त्या कागदांतच सर्व कांहीं आहे.

प्रभाकर : कशावरून ?

महेश्वर : ही चोरी करण्यापूर्वीं मी जेव्हां आपल्याला किंचित् भीति वाटल्यासारखें दाखविलें तेव्हां त्यानें मला तीनतीनदां बजावून सांगितलें कीं, कागद हस्तगत होईपर्यंतच काय ती तुला भीति आहे. एकदां कागद आपल्या हातीं आल्यानंतर आपली चोरी राजरोस उघडकीला आली तर त्यापासून आपल्याला कांहींएक भय नाहीं. यावरून मला वाटतें कीं, ते कागदच सर्व भानगडीच्या

मुलाशीं असले पाहिजेत. ह्या कामगिरीबद्दल माझा लतिकाताईशीं विवाह लावून देण्याचें त्यानें मला वचन दिलें होतें; आणि मीसुद्धां मूर्खाप्रमाणें फसून शेवटीं चोरी करायला तयार झालों, स्वार्थामुळें मनुष्य अगदीं आंधळा होतो तो असा !

प्रभाकर : कागदांबद्दलचा तुमचा तर्क अगदीं बरोबर आहे. लतिके, तुझ्या सगळें लक्षांत आलें असेलच ?

लतिका : हं ! मला ही धास्ती पहिल्यापासून होतीच.

प्रभाकर : महेश्वर, एवढ्यामुळें सगळ्यांची सुटका होत नाहीं. काय करावें आतां ? धनेश्वरकाकाच जर कागद चोरीस गेल्याबद्दल बोभाटा करीत नाहीत तर आपणांला तरी कसा करतां येणार ? धनश्यामाचें दुसरें एखादें कुलंगडें हुडकून काढण्याशिवाय इलाज नाहीं.

महेश्वर : मी सांगतों आणखी एक. पोलिसाचा वेष घेऊन एकदां यानें धुंडिराज नांवाच्या वृद्ध गृहस्थाजवळून असाच एक कसलासा कागद लिहून घेतला आहे.

प्रभाकर : धुंडिराज ? म्हणजे काकासुद्धां धनश्यामाच्या पेंचांत सांपडले आहेत तर ! लतिके, फार गोष्टी उघडकीला येतीलसें वाटतें. महेश्वर, या माहितीचा मात्र उपयोग होण्यासारखा आहे खास. पोलिसाचा वेष घेऊन हिंडणें हा चांगलाच सरकारी गुन्हा आहे; पण त्या वेषांत तरी त्याला आपल्याला पुन्हा कसें पकडतां येईल ? कारण मागच्या वेळच्या गोष्टीचा आपल्याला कांहींच उपयोग होण्यासारखा नाहीं. तिथें काका संकटांत पडण्याची धास्ती वाटते.

[ घाईनें मालती येते. ]

मालती : बघितलेंस लतिकाताई ? तुझ्या वडिलांनीं आत्महत्येची आजच तयारी केली आहे. [ थक्कत ] हें बघ त्यांनी आपलें मृत्युपत्र तयार करून ठेवलें आहे, आणि माझ्या बाबांना ट्रस्टी नेमलें आहे. मृत्युपत्रावर तारीख आजचीच आहे. लतिकेला सांभाळा हें मात्र मला आणखी बाबांना तें मधून मधून सारखे काकुळतीनें सांगते होते. आजची रात्र त्यांच्यावर अगदीं सारखी नजर ठेवली पाहिजे.

प्रभाकर : [ क्षणभर विचार करून, एकदम ] ताई, धनेश्वरकाका आज खरोखरीच आत्महत्या करणार आहेत का ? महेश्वर, आत्महत्या करून धनेश्वर आज आपल्या हातून कायमचे जात आहेत असें जर धनश्यामाला खात्री-पूर्वक कळलें तर तो काहीं तरी उपायानें आत्महत्या थांबविण्याकरितां पुन्हा पोलीसवेषांत येईल का ? कठीण आहे. नेमका पोलीसवेषांतच कां यावा ?

महेश्वर : तो मी आणतों. तें काम माझ्याकडे लागलें. त्याला असल्या गोष्टीची फार हौस आहे. पण त्यानें होणार काय ?

प्रभाकर : आपण खरोखरीच्या फौजदारांना आणून ठेवावें, आणि आत्महत्येच्या ऐन वेळीं काकांना पकडण्यासाठीं घनश्याम पोलीसवेषानें पुढें आला म्हणजे त्याला फौजदारसाहेबांच्या ताब्यांत—व्वा—वा—तसें नाहीं; घनश्याम पोलीसच्या ताब्यांत सापडेल खरा, पण काका मात्र आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल खोट्या पोलिसाऐवजी खऱ्या पोलिसाच्या हातीं खरोखरीच सांपडतील. मोठीच पंचाईत आहे.

लतिका : ती नाहीं पंचाईत इतकी. त्याचा उपाय मी सांगतें. हं, ऐका. [ मालतीच्या कानांत कांहीं सांगते. ] अन् आयत्या वेळीं सांगावें कीं सरबत आहे म्हणून. यांत कठीण काय आहे ?

प्रभाकर : जमली तर ठीक आहे ही युक्ति ! बरें पुन्हा मोठी अडचण आलीच. अशानें काका सुटले आणि एकटा घनश्याम सांपडूं लागला तर तो जिवावर उदार होऊन त्वेषानें काकांना गुंतविण्यासाठीं ते कागद पुढें करील. छेः, ते कागद हातीं येईपर्यंत घनश्यामाशीं वैर करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

[ मनोहर येतो व डबा पुढें ठेवतो. ]

मनोहर : हा पाहा एक चमत्कार ! या चमत्काराचा जन्म स्मशानांत दगडाच्या पोटीं झाला ! [ प्रभाकर, मालती, लतिका डबा उघडून पाहतात व कागद वाचतात. ]

महेश्वर : हेच ते कागद. अन् जो दुसरा कागद तो धुंडिराजजवळून पोलीसवेषांत लिहून घेतलेला.

प्रभाकर : सगळेंच काम झालें. पण कागद सगळे आहेत का हो ? दम खा, [ मोजतो. मोजून झाल्यावर ] का हो महेश्वर, किती होते कागद ?

महेश्वर : एकवीस !

प्रभाकर : बरोबर एकवीसच आहेत. मनोहर, हा परमेश्वर तुला कुठें पावला ? एका झटक्यासरशीं सर्वांचीच संकटांतून मुक्तता झाली. आतां असें करा—

लतिका : थांबा आधीं. मालतीताई, तूं बाबांच्यावर नजर ठेव; आणि बाबा काय काय आणतात, कुठें कुठें ठेवतात त्याच्यावर अगदीं सूक्ष्म दृष्टीनें पहारा ठेव.

प्रभाकर : महेश्वर, तुम्ही घनश्यामाला पोलीसवेषांत आणण्याची खटपट करा, अन् काय होतें तें ताबडतोब कळवा.

लतिका : अन् नंतर येऊन मला भेटा. आणखी एक काम आहे तुमच्याकडे !

प्रभाकर : मालतीताई, महेश्वर, आतां वेळ दवडूं नका. आपापल्या कामाला लागा. केवढा सोन्याचा दिवस दाखविला परमेश्वरानें !

लतिका : जगन्नाथा, तुझी कोणत्या शब्दानें स्तुति करूं !

(राग – हिंडोल, ताल – त्रिताल.)

स्तव तुझा न करूं शकें ।
पडताति कोश रिते किं ।। ध्रु० ।।
तव गुणकीर्तनिं । हतबल हरसुनि ।
पटु मति थके, रसनादि सुके ।। १ ।।

(सर्व जातात. पडदा पडतो)

*अंक चवथा समाप्त*

# अंक पांचवा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : धनेश्वराचें घर; पात्रें : इंदु व बिंदु. ]

बिंदु : अग, तो म्हातारा शास्त्री, मेला कुठें काळेंच करून गेला म्हणे ! त्यानें आणाशपथा वाहिल्या होत्या ना चांगल्या ! पुरुष हे असेच !

इंदु : अग, तो तसाच लबाड होता. आणि दिसायचा तरी किती वाईट, नाहीं ? काय त्याचें तें रूप !

बिंदु : अग रूपाचें राहूं देत. नसतें एखाद्याला चांगलें रूप ! तुझें कुठें रूप अगदीं वांया चाललें आहे ?

इंदु : अन् तूं अगदीं पद्मिणीसारखी असशील ? साती अप्सरा ओंवाळून टाकाव्या तुझ्यावरून ! दुसऱ्याचें बरें बघवत नाहीं तर आपले डोळे फोडून घ्यावेत; लोकांना कां नांवें ठेवावीं ? [ महेश्वर–आंधळा प्रवेश करतो. ]

बिंदु : तूंच घे आपले डोळे फोडून ! जोडी तरी चांगली शोभून दिसेल त्या आंधळ्या गवयाची आणि तुझी ! तो बघ, आलाच.

इंदु : ( महेश्वरास ) अहो कामण्णा, तुम्ही असे एकटे कां हिंडतां ?

बिंदु : कुणाला सांगावें रस्ता दाखवायला ?

महेश्वर : [ स्वगत ] गांठलें या काळ्या पोरींनीं ! बाकी लतिकेचा आधार असल्यावर आतां या देवींची पत्रास ठेवायला नको. [ उघड ] तुम्ही आहांतच ना दोघी ?

बिंदु : ( स्वगत ) आज यांना अखेरचें विचारतें; नाहीं तर टाकतें सांगून सगळ्यांना यांचें चरित्र ! ( उघड ) तुमच्या वचनाची तुम्हांला आठवण आहे ना ?

इंदु : बिंदूताई, लागलीस चोंबडेपणा करायला ! नका बोलूं हो तुम्ही तिच्याशीं.

महेश्वर : तुझी आज्ञा मला मान्य आहे.

बिंदु : तिच्याशींच नका बोलूं तुम्ही.

महेश्वर : तुझी आज्ञा मला मान्य आहे.

इंदु : म्हणजें काय हें ? दोघींशींहि बोलणार नाहीं तुम्ही ? तसें नाहीं, कुणा तरी एकीशीं बोललें पाहिजे.

महेश्वर : ' तसें नाहीं, कुणातरी एकीशीं बोललें पाहिजे ! ' पण ती एक कोणती हें नक्की करा ना एकदां ! हें बघा, मी एखादा स्वयंवराचा पण लावूं का ? जी आधीं पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल तिच्याशीं मी लग्न करीन.

इंदु : हें काय कांहीं तरी बोलणें ?

महेश्वर : तर काय करायचें ! मी आपला उगीच पाहतों आहें नुसती गंमत ! तुम्हांला कांहीं दयामाया, विचार, कांहीं आहे कीं नाहीं ? तरुणांना जीवच नसतो कीं काय ? पुष्कळ ऐकून घेतलें तुमचें ! आतां चला, दोघेहि एकदम चालत्या व्हा पाहूं ? होतां कीं नाहीं ? चला एकदम ! त्रास नाहीं तर !

इंदु : असे निष्ठुर होऊं नका हो ! माझ्या डोळ्यांतल्या गंगायमुना तुम्हांला दिसत नाहींत का ?

महेश्वर : [ डोळे मिटून इंदूस ] कशा दिसतील ? अग, मी आंधळा आहें ना ? डोळे मिटून पुरांत जीव द्यायचा नाहीं ना ?

बिंदु : माझ्या डोळ्यांतल्या गंगायमुना तरी दिसत आहेत ना ?

महेश्वर : [ डोळे उघडून; बिंदूस ] तुझ्या गंगायमुना दिसताहेत. पण उघड्या डोळ्यांनीं आगींत उडी टाकायची नाहीं ना ? मीं आंधळा का आहें ?

इंदु : आंधळे नाहीं मग डोळस का आहां ?

बिंदु : [ स्वगत ] पुष्कळ धीर धरला; आतां आंधळेपणाचें गुपित फोडल्या-खेरीज यांच्या डोळ्यांत अंजन पडायचें नाहीं. ( उघड ) अग इंदूताई, यांचें खरें रूप तुला ठाऊक नाहीं. कायसें म्हणतात ना; दाखवायचे दांत निराळे, तशांतला यांचा लंपडाव आहे सारा ! यांचे दाखवायचे डोळे निराळे आहेत आणि पाहायचे डोळे निराळे आहेत ! हे कांहीं खरेखुरे आंधळे नाहींत. चल, आतां हा प्रकार काकांच्या नजरेला आणूं म्हणजे यांचे डोळे चांगले उघडतील.

महेश्वर : चला, जा. आतां मला सत्पक्षाचा जोर आहे. आतां तुम्हां दोघींकडे पाहण्याचा दृष्टिकोन मीं बदललेला आहे. बघ, बिंदु, माझे डोळे उघडले तरी मी तुझ्या भीतीकडे अशी डोळेझांक करीत आहें.

[ इंदूकडे वळून ] आणि इंदु, माझें आंधळें प्रेम आज तुझ्याकडे असें डोळे वटारून पाहात आहे.

इंदु : अगबाई, खरेंच ! हे आंधळे नाहींत ! [ लतिका येते. ]

महेश्वर : लतिकाबाई, मी तुमचा जन्माचा गुलाम व्हायला तयार आहे कीं नाहीं म्हणून तुम्हीं विचारलें होतें ना ? भ्रमराच्या त्रासांतून वांचविल्यामुळें शकुंतला ज्याप्रमाणें दुष्यंताची जन्माची दासी झाली त्याप्रमाणें बायकांच्या सद्दीच्या दिवसांत तुम्ही जर माझ्या भोंवतालच्या या दोन गांधीलमाश्या पिटाळून लावाल तर मलासुद्धां जन्माची गुलामगिरी कबूल आहे.

लतिका : इंदूताई, बिंदूताई, मला यांच्यांशीं थोडें बोलायचें आहे.

बिंदु : [ स्वगत ] आतां आमचें बोलणेंच राहिलें मुळीं ! [ उघड ] इंदूताई, चल. जगांत गुणांची कुठें पारखच नाहीं. साऱ्याची नजर तेवढी रूपावर !

इंदु : लतिकाताई, यांना काकांच्या तावडींत देऊं नको बरें !

[ इंदु व बिंदु जातात. ]

लतिका : हं, सांगा पाहूं काय झालें तें ? सरकारी पोषाखांत येताहेत का घनश्याम ?

महेश्वर : हो. काय असेल तें असो, मीं नुसतें सुचविलें आणि क्षणभर थांबून त्यानें तावडतोब सरकारी पोषाखांत येणें पसंत केलें. तें काम बहुशः झालें.

लतिका : बरें, आतां दुसरें काम असें राहिलें — ही सरबताची कुपी तुमच्या-जवळ ठेवा; आणि बाबांनीं पिवळ्या कपाटाच्या चवथ्या खणांत — चवथ्या किंवा पांचव्या असेल — विषारी औषधाची लहानशी कुपी आणून ठेविली आहे; आतां असें करा, हळूच बाबांच्या दिवाणखान्यांत जा; आंधळेपणामुळें बाबा तुम्हांला फिरकतांना पाहून भ्यायचे नाहींत; शिवाय बाहेर उभी राहून मी तुम्हांला सावध करीनच बाबा आले तर; किंवा दुसरीकडे मी बाबांना तास दीडतास थांबवून ठेवितें; हो, हेंच बरें ! आतां तुम्हीं एवढें करायचें कीं त्या विषाच्या ऐवजीं त्या कुपींत हें सरबत भरून ठेवायचें. मात्र, फारच जोखमीचें काम असल्यामुळें थोडासा अविश्वास दाखवितें या बद्दल क्षमा करा. पण ही रिकामी कुपी घेऊन ठेवा बरोबर आणि तें विष या कुपीत मला दाखवायला आणा. झालें, आतां काय ? हो, दोन, चार, पांच वेळां विषाची कुपी आधीं सरबतानें धुऊन टाका. हें सारें बिनबोभाट होईलना ?

महेश्वर : मीं कागद किती शिताफीनें काढले तुम्हांला ठाऊक आहेच आतां !

लतिका : बरें, जा मग तुम्ही.

**महेश्वर :** ठीक. [स्वगत] छेः बुवा, या बुद्धिमान् मुलीबरोबर लग्न म्हणजे खरोखरीच जन्माची गुलामगिरी! किती बारकाईनें पाहते प्रत्येक गोष्टीकडे!

[जातो.]

**लतिका :** आतां राहतां राहिलें एवढें कीं, हें ऐन वेळीं बाबांना कळवायचें कसें? नाहीं तर बाबांची फसगत व्हायची! कसें कळवावें हें त्यांना त्या वेळीं? (विचार करून) हो हो! आजच मोरेश्वर आले आहेत; तेव्हां सर्व हकीकतीचें थोडक्यांत एक पत्र माझ्या सहीचें लिहून काढतें, त्यांवर बाबांचा पत्ता लिहितें आणि तें मोरेश्वरांच्या जवळ देऊन ठेवतें. त्यांना नीट पढवून ठेवतें कीं त्यांच्या वडिलांनीं हें बाबांना द्यायला सांगितलें आहे म्हणून. आत्महत्येचा प्रश्न उभा राहिलाच तर आयत्या वेळीं मोरेश्वरांना तें पत्र बाबांजवळ द्यायला पुढें करावें म्हणजे झालें! वर अर्जंट म्हणून लिहिलें म्हणजे बाबा तें आधीं वाचून पाहतीलच; म्हणजे सर्व भानगड मिटली! शिवाय घनश्यामांच्या हातीं गेलेले कागदहि आपल्याजवळ सुरक्षित आहेत असेंहि कळविलें म्हणजे बाबांना कसलीच भीति उरणार नाहीं! हो, हीच युक्ति बरी. आणखी महेश्वरावर नजर ठेवायला मालतीताईला सांगावें म्हणजे त्याहि गोष्टींत मन निःशंक झालें!

(जाते.)

[पडदा पडतो.]

## प्रवेश दुसरा

(स्थळ : धनेश्वराचें घर. पात्रें : घनश्याम, धुंडिराज; प्रभाकर, मनोहर, मालती, लतिका, मोरेश्वर, फौजदार वगैरे.)

**फौजदार :** घनश्याम, कांहीं झालें तरी आतां तुमच्या कपाळाची शिक्षा चुकत नाहीं! तुम्ही पेंचांत पाडलेल्या या गरीब लोकांच्यापैकीं एकालाहि पकडण्याचा प्रयत्न करूं नका, आणि स्वतः सुटण्याचा मुळींच यत्न करूं नका! धुंडिराजपंतांची ही लेखी साक्ष तुमच्याविरुद्ध असतांना तुमचें काय चालणार? हिनें आतां तुमच्या जन्माचा सत्यानाश होण्याची वेळ आली!

**धुंडिराज :** काय? माझी साक्ष? ती कोणती? आणि तिच्यामुळें घनश्याम संसारांतून उठणार? छे! असें कदापि होणें नाहीं!

**फौजदार :** [ कागद हातीं घेऊन ] हा पाहा ! हा, तुमच्याजवळून लिहून घेतलेला खोटा कबूलजबाब !

**धुंडिराज :** आहे खरी पंचाईत !

**प्रभाकर :** [ हळूंच धुंडिराजास एकीकडे ] काका, गोंधळांत कसलें पडलां ? याला वाचवावयाचें ठरलेंच का ? तेवढा कागद फाडून टाका म्हणजे झालें. म्हणजे घनश्याम सुटला. [ धुंडिराज कागदाचे तुकडे करतो. ] गेला का हो पुरावा ?

**फौजदार :** काकासाहेब, काय केलेंत हें ! पंचनाम्यांत सांपडलेला केवढा पुराव्याचा कागद फाडलांत ! केवढा गुन्हा झाला हा !

**धुंडिराज :** मग त्याबद्दल शिक्षा भोगायला मी तयार आहें ! मुलांना का पुढें करावयाचें ? अहो, घनश्याम झाला तरी आमच्यापैकींच– आमच्या धनेश्वरांचा मुनीम !

**घनश्याम :** काकासाहेब काय केलेंत हें ? लतिकाताई, ही खरी दया ! ही निरपेक्ष दया ! प्राणिमात्र गोगलगाय बनतो तो याच दयेमुळें ! फौजदारसाहेब, काय वाटेल तें होऊं द्या, पण या सत्पुरुषाच्या केसालसुद्धां धक्का लागूं देऊं नका !

**फौजदार :** त्याला तुमच्या वांकड्या मार्गाची मदत नको आहे !

**घनश्याम :** आतां मला आपल्या टोंचून बोलण्याचा राग कां यावा ? मीं एकदांच सांगितलें कीं माझा स्वाभिमान गेला !

**महेश्वर :** अरेरे, आमचा व्हिलन पार पाडला ! धनेश्वरमहाराज, न विचारतांना आपल्या घरांत मीं इतका गोंधळ घातला आहे कीं अखेर पेशवाईत त्रिंबकजी डेंगळ्यानेंसुद्धा इतका घोंटाळा माजविला नसेल ! मला एक क्षमा करा म्हणजे झालें ! आतां हेंच उदाहरण पुढें चालूं ठेवायचें म्हणजे व्हिलनचा पश्चात्ताप हें नाटकाचें एक अंग झालें. त्यावर दुसरें अंग प्रसन्न झालेल्या नायिकेच्या बापानें आपल्या मुली नायकांना देणें. काकासाहेब ! एक नायकांची जोडी आणि एक नायिकांची जोडी येथें आहेच. तेव्हां हा समारंभ उरकून टाकावा म्हणजे झालें ! आमची खात्री झाली कीं आम्हीसुद्धां आतां नायक नव्हे. आमचे जे साथीदार मोरेश्वर तें नुसतें नांवापुरतें बोलणारें पात्र आहे. घनश्याम कसचा नायक ? त्याचे मुळीं पाय मोडले. तर आतां काकासाहेब, प्रभाकरपंत आणि मनोहरपंत यांना एकदां आतां नायक करून भरतवाक्य म्हणा म्हणजे झालें.

**धनेश्वर :** त्याचा निर्णय मी करतों. [ पडदा पडतो. ]

## ईशप्रशंसा

( राग – भूप, ताल – झपताल. )

प्रभु जगतिं आधार । तोच हरि भवभार ।
चिंता न निस्स्सार । बालांसि शोभे ॥ ध्रु० ॥
गगनिं ताराप्रसर । पंक्ति मुक्तानिकर ।
तरि शुभ्र संसार । उभयांहि लाभ ॥ १ ॥
न्याय सदयचि करी । प्रभु अयाचित जगीं ।
याच्ञा न योग्य तरि । अति मात्र लोभें ॥ २ ॥
भवदाविं तपनाधि । सुखवील निरवधि ।
तोचि करुणानिधि । सकलां कृपांभें ॥ ३ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

*अंक पांचवा समाप्त*

# संपूर्ण बाळकराम

# रिकामपणची कामगिरी

## वरसंशोधन

अडला हरि गाढवाचे पाय धरी ॥

—व्यवहारकोश

वसंत ऋतूंत आपल्या सृष्टीमध्यें केवढाले फेरफार घडून येतात हें नव्यानें कशाला सांगावयाला पाहिजे? झाडांना पालवी फुटते, आंब्याला मोहोर येतो, वेलींना फुलें येतात, ठिकठिकाणच्या वक्त्यांना शब्द फुटतात, पांढऱ्या सशांना पोरें होतात, मेंढयांवरची लोंकर कातरतात, कोकिळेला कंठ फुटतो, छप्यांवर नवे अभ्रे चढतात, शहराबाजारांतून खेडेगांवच्या पाहुण्यांना ऊत येतो, मोराला नवा पिसारा फुटतो, कुत्र्यांना लूत लागते, तोरणां-करवंदांचें पेंव फुटतें, कलिंगडें विकावयास येतात, वगैरे हजारों घडामोडींनीं चराचरसृष्टि अगदीं गजबजून जाते. या चमत्कारसृष्टींतच आणखी एका चमत्कारमय फेरफाराची गणना करावयास पाहिजे. वसंतोत्सवाच्या सुमारास अनेक फेरफारांप्रमाणेंच नवऱ्या मुलांचीं व त्यांच्या आईबापांचीं माथीं फिरत असतात! पिसाळलेलें कुत्रें चावलेला मनुष्य ज्याप्रमाणें आगोटीच्या मेघांचा गडगडाट ऐकतांच पुन्हा पिसाळतो, त्याप्रमाणेंच मुंजीच्या वाजंत्र्यांचा कडकडाट कानीं पडतांच 'उपवधु' मुलांच्या व त्यांच्या वाडवडिलांच्या अंगीं भिनलेलें अहंपणाचें विषही तडाक्यासरशीं उचल खात असतें. क्षणार्धांत त्यांना आपल्या स्थितीचा, आपल्या किंमतीचा, आपल्या योग्यतेचा, किंबहुना आपल्या स्वतःचाही विसर पडून ते अंकगणिताचें पुस्तक रचणाऱ्या संख्या-पंडिताप्रमाणें सरसहा मोठमोठाल्या रकमा बडबडूं लागतात, आणि बिचाऱ्या मुलींच्या बापांना हीं अवघड उदाहरणें सोडवावीं लागतात. ईश्वराच्या दयेनें मला स्वतःला मुलगी नाहीं! परंतु कांहीं स्नेह्यासोबत्यांबरोबर करमणुकीखातर खेटे घालून या बाबतींत मीं जो अनुभव मिळविला आहे, त्याचा फायदा मीं उदार बुद्धीनें वाचकांना देण्याचें योजिलें आहे.

या सुमारास प्रत्येक 'नवरबापा'चें मन म्हणजे थोरथोर ऐतिहासिक पुरुषांच्या गुणविशेषांचें प्रदर्शनच बनून जातें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. महंमद गिजनीच्या धनलोभानें तो स्वार्थपरायण होतो, नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेनें तो आपल्या मुलाकडे पाहतो, नाना फडणिसाच्या व्यवहारकौशल्यानें तो मुलाची किंमत ठरवितो, शिवछत्रपतींच्या धाडसानें वाटेल त्या विजापुरकरावर तो त्या रकमेचा मारा करतो, आणि नादिरशहाच्या क्रूरपणानें ही रक्कम वसूल करून घेतो. त्या एकाच हृदयांत रजपुतांचा शिपाईबाणा आणि मराठ्यांचा गनिमी कावा हे एकाच वेळीं उचंबळत असतात. अष्टवसूंच्या अंशांपासून उत्पन्न झालेल्या भीष्माचार्यांप्रमाणें, अनेक ऐतिहासिक पुरुषांचा हा मानसपुत्रही, मुलाचा अव्वाच्या सव्वा हुंडा घेण्याची भीष्मप्रतिज्ञा करतो, आणि तितक्याच नेटानें ती तडीसही नेतो. स्वतः नवरामुलगा तर हरभऱ्याच्या झाडावरच रात्रं-दिवस मुक्काम करून 'बापसे बेटा सवाई' ही म्हण वाजवीपेक्षां फाजील खरी करून दाखवीत असतो. आपल्या अंगच्या लोकोत्तर गुणांनीं अनेक म्हणींची नायिका होऊन बसलेली वरमाई तर– परंतु 'अनिर्वर्णनीयं नाम परकलत्रम् !'

अशा प्रकारच्या मनोवृत्तींच्या लोकांशीं प्रसंग पडत असल्यामुळें एका मुलीचें लग्न जमविणें म्हणजे आपली एखादी कविता एखाद्या प्रमुख मासिक-पुस्तकांतून छापवून आणण्याइतकेंच कठीण कार्य होऊन पडतें ! कविता व कन्या या जोडींतलें हें साम्य लक्षांत आलें, म्हणजे कवितेला कवीची कन्यका म्हणणाऱ्या पहिल्या कल्पक मनुष्याची खरोखर तारीफ करावीशी वाटते !

एकदोन पिढ्यांपूर्वी मुलीच्या बापावर मुलाची परीक्षा पाहण्याची जबाबदारी असे. साधारणतः या परीक्षेस अक्षर काढणें, श्लोक म्हणणें, एक भलें मोठें पागोटें डोकीवर घालून व लांबलचक अंगवस्त्र अंगाभोंवती लपेटून भावी सासऱ्यासमोर आपला तोल संभाळून नीट बसणें, पत्रावळी लावणें, हेच विषय असत. आमच्या आधुनिक विद्वानांना ही विषयांची यादी पाहून हसूं येईल; परंतु या विषयांच्या मुळाशीं केवढें व्यवहारज्ञान दडी मारून बसलें आहे, याची मात्र त्यांना कल्पनाही होणार नाहीं. अक्षर काढणें व श्लोक म्हणणें या विषयांच्या आवश्य-कतेबद्दल सांगावयास नकोच. सुधारलेल्या स्वरूपांत हे प्रकार हल्लींही आपल्यांत वावरत आहेत, हें थोडा विचार केल्यास पटण्यासारखें आहे. पागोट्याचा प्रश्न मात्र जरा डोक्याला शीण देण्यासारखा आहे खरा; सबब त्याचें स्पष्टीकरण देणें जरूर आहे. एवढें थोरलें बोजड पागोटें जो डोकीवर घेऊन नीट बसतो तो नवरामुलगा पुढेंमागें बायको डोईजड झाली, तरी तिला नीटपणें वागवून घेणारच,

हें या बाबतीवरून उघड होतें. पत्रावळी लावण्यांत मुलांचें व्यवहारोपयोगी ज्ञान दिसून येत असे. पूर्वीच्या चंचल वैभवाच्या काळीं वडिलोपार्जित मिळकतीवर आजन्म अवलंबून राहणें खात्रीचें नसे; तेव्हा अर्थातच अशा प्रसंगांत सांपडल्यास मुलास कांहीं रोजगारधंदा येतो किंवा नाहीं, हें पाहण्यासाठीं पत्रावळी लावण्यास सांगत असत. इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांतून राजपुत्रांना, त्यांच्या मुख्य ( राज्य करण्याच्या) धंद्याखेरीज अडीअडचणीच्या प्रसंगासाठीं पायमोजे विणण्याचा, जोडे शिवण्याचा, किंवा असाच एखादा ( पोट भरण्याचा ) धंदा शिकविण्याची वहिवाट आहे. हें लक्षांत घेतलें, म्हणजे आमच्या पत्रावळ्या पूर्वजांना हसण्याचें कांहींच कारण उरत नाहीं. आतां येथें कोणी असा आक्षेप काढतील कीं, या एकाच धंद्याकडे सर्वांचें लक्ष कां लागावें ? आमच्या आक्षेपकांना आम्ही त्या काळच्या समाजस्थितीचा विचार करण्याची विनंती करितों. पत्रावळी लावण्याचा उपक्रम सनातन नाहीं; त्याचा जोरानें प्रचार पेशवाईत– विशेषतः पेशवाईच्या उत्तर अमदानींत– सुरू झाला असावा. पेशवाईत जेवणावळींना राजाश्रय मिळाल्यामुळें त्या सर्व देशभर प्रचलित होत्या; समाजाचा मोठा भाग त्या वेळीं जेवण व तद्विषयक भानगडींत गुंतलेला असे. अर्थात्, जेवणावळीच्या उपकरणांना नेहमी जोराची मागणी असायची; त्यामुळें पत्रावळीसारख्या महत्त्वाच्या वस्तूच्या व्यापारांत जितके लोक गुंततील तितके थोडे होते. पत्रावळींच्या व्यापाराला मी हें फाजील महत्त्व देतों असें मात्र कोणीं अनुमान बांधूं नये. एकंदर भोजनकलेचीच त्या वेळीं चलती होती. सवाई माधवराव-साहेबांच्या लग्नप्रसंगीं तर सामानसुमानाची यादी करतांना बारभाईंनीं जी बारकाईची मुत्सद्देगिरी दाखविली आहे, तीवरून, आणि दुसऱ्या बाजीराव साहेबांच्या अमदानींत, ताक किंवा पापड, लोणचें चांगलें केल्याबद्दल कैकांना गांवच्या गांव इनाम मिळाल्याबद्दलच्या ज्या कर्णकथा आहेत, त्यावरून माझ्या म्हणण्याची यथार्थता सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

प्रस्तुत हें परीक्षणाचें वेड नाहींसें झालें आहे. असें होण्याचें कारण शोधून काढणें मात्र फारच कठीण आहे. एवढें मात्र खरें कीं, हल्लीं जांवयाची परीक्षा घेत बसून भागावयाचें नाहीं. पत्रावळी लावण्याच्या कसोटीचा आग्रह धरला, तर बहुशः गुरवाखेरीज कोणाची निवड होणें शक्य नाहीं; आणि आजकालच्या या टोपीच्या अमदानींत पगडबंद जांवयासाठीं हट्ट घेतला, तर तो साठी उलटून गेलेल्या पोक्त नवऱ्या-मुलाच्या प्राप्तीनेंच भागवावा लागेल! हल्लीं जो माल मिळेल तो पदरांत पाडून घेण्याकडेच मुलीच्या बापाची अनिवार प्रवृत्ति दिसून

येते. नवरामुलगा पुरुषजातीचा असला म्हणजे झालें. मग तो 'नायकांच्या बंडांतील जागरुकाच्या म्हणण्याप्रमाणें, परंतु अगदीं निराळ्या अर्थानें, 'चुकून पुरुषाच्या जन्माला' आला असला तरीसुद्धां, न खलु तद्वाच्यं वधूबंधुभिः!

लग्नाचे मुहूर्त शुक्रोदयकाळींच सांपडत असल्यामुळें वर्षांतून लग्नाचा हंगाम दोनदां येत असतो. पहिला मोसम मार्गशीर्षादि तीन महिने चालतो, व दुसरा बार वैशाख-ज्येष्ठ या महिन्यांत उडत असतो. या हंगामाच्या आधीं कांहीं दिवस उपवर वधूंचे बाप वरसंशोधनाच्या मोहिमेवर निघतात. या कामगिरी-प्रीत्यर्थ ज्या येरझारा घालाव्या लागतात, त्यांना 'जोडे फाडणें' ही लाक्षणिक संज्ञा दिलेली आहे. पयःप्राप्ति होण्यासाठीं प्रथम गाईच्या सडांना लावण्यासाठीं थोडें पय (पक्षीं पाणी) खर्चीं घालावें लागतें. त्याप्रमाणें एक जोडा जमविण्या-साठीं आधीं एक जोडा (पक्षीं खेटर) फाडावा लागतो. हेंच यांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अमुक एके ठिकाणीं एखादा सजातीय अविवाहित मुलगा आहे, असें कळल्यानंतर तत्प्राप्तीच्या खटपटीची जी स्थिति असते तिला 'नाद असणें' किंवा 'गळ असणें' असें पारिभाषिक नांव आहे. लग्न जमवितांना वधूवरांकडे मुख्यतः धार्मिक, व्यावहारिक व शारीरिक अशा तीन दृष्टींनीं पहावयाचें असतें. पत्रिका पाहणें व गोत्र जमणें या दोन गोष्टींचा धार्मिक बाबींत, आणि हुंडा, कुलशील या गोष्टींचा व्यावहारिक बाबींत समावेश होऊन मुलगी पाहण्याची गोष्ट शारीरिक बाबींत जमा होते. लग्ननिश्चयाच्या या पंचांगांत वरपक्षाची वधूपक्षानें खातरजमा करून द्यावयाची असते आणि या त्रिविध विचारामुळें मुलीची व मुलीच्या बापाची कशी त्रेधा उडते, हेंच वाचकांनीं आतां क्रमशः पहावयाचें आहे.

ज्या गृहस्थाच्या घरीं आपल्याला जावयाचें असतें, त्याच्या आणि आपल्या सामान्य ओळखीचा एखादा 'पित्त्या' गांठून त्यांच्यामार्फत प्रथम चंचुप्रवेश करून घ्यावयाचा असतो. 'नमन' आणि 'प्रास्ताविक विलास' वगैरे झाल्यावर आपला 'पित्त्या' मूळ विषयाला सुरवात करतो. त्या वेळीं तो मुलीच्या बापाबद्दल थोडक्यात माहिती देऊन "आपल्या बाळासाहेबांकरितां हे आले आहेत" असें सांगतो. आपला दुभाषी वरील माहिती सांगत असतांना मुलीच्या बापानें नवरबापाच्या तोंडाकडे अगदीं गरिबीच्या, सौजन्याच्या, आशेच्या आणि कुलीनतेच्या मुद्रेनें पहावयाचें असतें.

वधूपक्षाच्या दुभाष्यामार्फत या अर्जाची सुनावणी होतांच वरपक्षाकडून त्या

विनंतीच्या अकल्पितपणाबद्दल आश्चर्य दाखविण्यासाठीं पहिले छूट "यंदा आम्हांला कर्तव्य नाही," असा जबाब मिळतो. बाजारांत तिन्ही त्रिकाळीं भरपूर मागणी असल्यामुळे आणि इतर कोणत्याहि कारणानें भाव उतरण्याची धास्ती नसल्यामुळे आपला माल पडून राहणार नाहीं, अशी मुलाच्या बापाची खात्री असते! पाय धरणीचा पाया एकदोन अंशांनी वर चढविण्यासाठींच ही चढेल बेपर्वाई तो दाखवीत असतो. मुलीच्या बापाला या ओढून आणलेल्या चंद्रबळाची जाणीव असते; तरीसुद्धां त्यानें हा जबाब ऐकून कमालीची केविलवाणी निराशा तोंडावर पसरून आपल्या 'पित्या'कडे पहावयाचें असतें. यानंतर मध्यस्थानें व मुलीच्या बापानें हुंड्याची साधारण कल्पना देऊन व आसपासचीं उदाहरणें सांगून 'यंदा कर्तव्य असल्या'ची आवश्यकता पटवून द्यावी लागते. मात्र हुंड्याची कल्पना मुद्दाम सांगावयाची असली, तरी ती ओघाओघाच्या स्वरूपानेंच करून द्यावी लागते. अशा प्रकारें बरीचशी मिनतवारी झाली, म्हणजे हे 'कर्तव्यशून्य' महात्मे अंमळ धडपणें बोलूं लागतात, आणि हें वरपांगी अवसान लक्षांत येत असतांहि मुलीच्या बापाला आर्जवाचें सोंग आणावें लागतें. 'गरजवंताला अक्कल नाही' म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं!

वर सांगितलेल्या म्हणीची आठवण होतांच आम्हां पौर्वात्यांच्या आणि पाश्चात्य इंग्रजांच्या आचारविचार-कल्पनांत जें दक्षिणोत्तर अंतर आहे, तें ध्यानांत आल्यावांचून राहत नाहीं. इकडे आम्ही 'गरजवंताला अक्कल नाहीं' असें म्हणतों, तर तिकडे इंग्रज लोक 'गरज ही शोधकतेची आई आहे!' असें म्हणून त्याबरहुकूम गरजेचा मारा चुकवितात. आणि उलट 'अक्कलवंताला गरज नसते!' असा आमच्या म्हणीचा व्यत्यास सिद्ध करून दाखवितात. आमच्या हाडींमासीं खिळलेला दुबळा दैववाद, आणि इंग्रजांचा पराक्रमी प्रयत्नवाद इतक्या उठावणीनें अन्यत्र कोठेंहि दिसून येणार नाहीं. त्यांच्या—आमच्या आचारधर्मांतहि हाच फरक! सभामंडपांतून, देवळांतून आदरबुद्धि व्यक्त करण्यासाठीं आम्ही शरीराचें तळाचें टोंक उघडें टाकतों, तर ते वरचें टोंक उघडें टाकतात. फार कशाला, ज्या लग्नविषयक बाबतीबद्दल मी प्रस्तुत लिहीत आहे, तींतसुद्धां आमच्याकडे मुलीच्या बापानें मुलाकडे धांव घ्यावयाची आणि त्यांच्याकडे मुलानें मुलीच्या बापापुढें तोंड वेंगाडावयाचें असतें.

'यंदा आम्हांस कर्तव्य नाहीं!' हें उत्तर वरपक्षाच्या तोंडीं इतकें बसून गेलेलें असतें कीं, तें उच्चारतांना बोलणारा त्यांतल्या शब्दाची मुळींच परवा करीत नाहीं! अशा चढेलपणाच्या बेदरकारीपणामुळें कधींमधीं या वाक्यांत

मौजेचे फेरफार घडून येतात. माझे मित्र तिंबूनाना यांच्या ठकीचें लग्न जुळ-विण्यासाठीं गेलीं दोन वर्षे मी तिंबूनानांबरोबर देशोधडीं खेटे घालीत असतां एका ठिकाणीं मला खालील चमत्कार पाहावयास सांपडला—

एका गरीब गृहस्थाच्या घरीं त्याच्या 'उपवधू' भावाबद्दल गळ घालण्याकरितां मी व तिंबूनाना उभयतां गेलों होतों. या गृहस्थाची व माझी साधारणतः ओळख होती; परंतु त्याच्या घरीं जाण्याइतका मोठेपणा मीं त्याला त्यापूर्वी कधींच दिलेला नव्हता! मला पाहतांच सानंद लगबगीनें उठून तो म्हणाला, "ओहोहो! या बाळकराम! आज कोणीकडे पायधूळ झाडली ही?"

आम्ही आंत शिरताच, त्या धांदली यजमानानें एका मूळच्या चौकोनी, पण जुनेपणामुळे कोपरे फाटून जवळजवळ लंबवर्तुळ होत आलेल्या सतरंजीवरील केर एका बुरणुसानें झाडून आम्हां दोघांना लोडवजा ठेवलेल्या वळकटीजवळ मोठ्या मानानें नेऊन बसविलें. तिंबूनानांना वळकटीशीं टेकून बसवून मी सतरंजीवर शक्य तितकीं भोंकांचीं बेटें चुकवून बसण्याचा प्रयत्न केला. वळकटींतल्या कापसाचाही सपाट पसरटपणा जाऊन हजारों गुठळ्यांमुळें ठिकठिकाणीं त्यांचे संघ निर्माण झाले होते. वळकटीच्या या उंचसखल पृष्ठभागाशीं आपल्या सपाट पृष्ठभागांचा कसा तरी सलोखा संभाळून तिंबूनाना स्वस्थ बसण्यासाठी सारखे चळवळ करीत होते. जवळच एक जुनाट आरामखुर्ची उपयोगशून्यतेमुळें स्वतःच आराम घेत पडून आपल्या नांवाची सार्थकता करीत होती. तिच्या तुटलेल्या वेताचें जाळें अजागळ मनुष्याच्या शेंडीप्रमाणें–पण–अधोमुख–लोंबकळत असून, बसावयाच्या जागीं एक पायमोडका पाट आडवा टाकलेला होता. सतरंजीच्या त्या बेटांमधून निघून, हिंदु व इंग्रजी अशा दोन्ही आसनांच्या त्या जुनाट संगमाचा फायदा घ्यावा असेंही माझ्या मनांत एकदां येऊन गेलें; परंतु मीं स्वीकारलेल्या पोक्त कामाच्या मोठेपणाला अशी हुच्चपणाची थारेपालट शोभणार नाहीं, म्हणून तो बेत रहित केला.

नमस्कारचमत्कार होऊन हवापाणी वगैरे अनावश्यक बाबतींबद्दल बरेंच बोलणें होईपर्यंत तो गृहस्थ माझ्याशीं इतक्या अदबीनें व आर्जवानें बोलत होता कीं मला मिळत असलेल्या या सन्मानाचा तिंबूनानांवर काय परिणाम होत आहे, हें पाहण्यासाठीं त्यांच्याकडे चारसहा वेळां नजर टाकल्यावांचून मला राहवेना! पुढें मीं आमच्या येण्याचें कारण सांगितलें मात्र, आणि सारा मनु एकदम पालटला! त्राटिका नाटकांत कमळेशीं लगट करणाऱ्या पुराणिकाप्रमाणें, सदरील गृहस्थानें अंगविक्षेपांच्या एकदोन हेलकाव्यांमध्यें गादी काबीज करून तिंबूनानांना तेथून

पदच्युत केलें ! त्या गृहस्थाचा मूळचा भाटीसारखा गोल चेहरा महत्त्वनिदर्शनासाठीं लागलाच नाना फडणिसाच्या चेहऱ्यासारख्या लंबोत्तर झाला. त्याची मानी दृष्टी आमच्यासारख्या क्षुद्र जीवांवरून निघून स्वतःच्या मालकीच्या त्या मोडक्या खुर्चीकडे कळली. तो विचाराने ओथंबलेले जड निःश्वास टाकूं लागला. फाटकी सतरंजी, वळकटीची बेबंदशाही, मोडकी खुर्ची, अंगठे तुटलेल्या वहाणा, स्वतःचें काळेंमिचकुट धोतर, घरांत मावेनासें झालेलें दारिद्र्य, वगैरे ऐहिक गोष्टींचा क्षणैक विसर पडून तो उच्च विचारांत भराऱ्या मारूं लागला ! अखेर त्याला मृत्युलोकाच्या वस्तीची आठवण करून देण्यासाठीं मीं विचारलें, "मग काय मानस आहे तुमचा ?"

फारच मोठा सुस्कारा टाकून चिरमुटलेल्या व काळ्याकुट्ट ओठांचें वर्तुळ करून, भुंवया आडव्यातिडव्या उडवून मान किंचित् उजवीकडे कलते करून तो प्राणी प्रत्येक शब्दानंतर विसावा घेतघेत म्हणाला, "या जन्मीं आम्हांस कर्तव्य नाहीं !"

वाचकहो ! वरपक्षाला स्वतःचें किती विस्मरण पडतें, याची तुम्हीच कल्पना करा !

देशकालपरत्वें जगाच्या पाठीवर निरनिराळ्या बाबतींबद्दल चालीरीतींचें जें विचित्र वैधर्म्य दिसून येतें, त्यांत मानवी लग्नवैचित्र्याइतकें चमत्कारिक दुसरें कांहींच सांपडणार नाहीं ! एकाच काळी, एकाच देशांत एकीकडे एका पुरुषाला अनेक बायका करतां येतात, तर दुसरीकडे एकाच स्त्रीला अनेक पति करितां येतात ! एकीकडे श्रीकृष्ण परमात्मा सोळा सहस्र एकशें आठ तरुणींच्या अंतःपुरांत गुजगोष्टी करीत बसले आहेत, तों दुसरीकडे पांच नवऱ्यांचा संसार संभाळून सती द्रौपदी अबलाजातीला ललामभूत होऊन बसत आहे. इकडे ब्राह्मणकन्या देवयानीला क्षत्रिय ययातीच्या गळ्यांत अडकविणारें कचाचें वचन तर तिकडे 'द्वारकेचा राणा' अस्वलाच्या पोरीशीं लग्न लावून मोकळा होत आहे ! श्रीकृष्ण परमात्म्याच्या या पशुवृत्तींतसुद्धां 'बसू बिला'च्या सुधारणेची परमावधि दिसून येते, हें माझ्या धर्माभिमानी बंधूंनीं अवश्य लक्षांत ठेवावें. 'बसू बिला'च्या मसुद्याचें वाचन झालें, त्या वेळी कौन्सिलमध्यें भगवान् हजर असते, तर त्या बिलाला उचलून धरण्यासाठीं त्यांनीं आपले चारी हात वर केले असते अशी माझी खात्री आहे. एका हिंदुधर्मानेंच विवाहविधीचे आठ सामान्य प्रकार नमूद केले आहेत; याखेरीज वैयक्तिक स्वातंत्र्याची परवानगी होती ती वेगळीच !

लग्नविषयक प्रत्येक निर्बंधाचीं अशींच विविध रूपें चालू काळीसुद्धां दिसून

येतात. हिंदुस्थानच्या तिकोनी तुकड्यावर लग्नसंबंधानें वधूवरांना सात जन्म जोडून टाकण्यांत येतें, तर आमच्या विरुद्ध भूपृष्ठावरील अमेरिकन लोकांत सातसात दिवसांच्याच करारानें लग्न लावण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. हिंदुधर्माला पिढ्या तुटलेलींसुद्धां सगोत्र वधूवरें पसंत नाहींत, तर मुसलमान, पारशी यांना चुलत बहीणभावंडांचा विवाहही मान्य होतो. महाराष्ट्रांतच पाहा ना, कोंकणस्थाला मामाच्या गोत्राची वधू खपत नाहीं, तर सारस्वत, कायस्थप्रभृति ज्ञातींत मामाच्या मुलीला वधुत्वाचा प्रथम मान देण्यांत येतो. पांढरपेशा ज्ञातींत मुलीचा हुंडा द्यावा लागतो, तर कुणब्यामाळ्यांत मुलाला पदरमोड करावी लागते. आमच्याकडे आठ वर्षांच्या मुलीला चोवीस वर्षांचा नवरा पाहावा लागतो, आणि कांहीं गुजराती जातींत आठ वर्षांच्या मुलाच्या गळ्यांत चोवीस वर्षांच्या मुलीची घोरपड बांधण्याची वहिवाट आहे. वैवाहिक वैचित्र्याची यापुढची पायरी म्हणजे मुलांमुलांची, किंवा मुलीं-मुलींचींच लग्नें लावणें हीच होय, असें वाटत नाहीं का ?

आमच्याकडे लग्ननिश्चयाचीं, विशिष्ट जातिपरत्वें ठळक पुसट स्वरूपाचीं पण सामान्यतः सार्वत्रिक अशीं, अंगें पांच आहेत, हें मागे सांगितलेंच आहे. कुलशील पाहणें, गोत्र जमणें, पत्रिका जमणें, मुलगी पाहणें आणि हुंडा ठरविणें असा या पंचांगांचा सामान्य अनुक्रम देतां येईल.

कुलशीलाच्या बाबतीचा बहुतेक उल्लेख वधूपक्षीय दुभाषी आपल्या प्रास्ताविक, भाषणांतच करीत असतो. मात्र कुलशीलाच्या शाब्दिक बडबडीवरून, वरपक्ष आपल्या कुळाशीं समानगुण अशा कुळाची अपेक्षा करीत असतो, असें मात्र वाचकांनीं सुतराम् समजूं नये! लग्नखर्चाच्या नक्की रकमेचें अंदाजपत्रक कळण्या-साठींच वरपक्षाची ही धडपड असते. वधूपक्ष बराचसा दरिद्री दिसला, म्हणजे वरपक्ष ' यंदा आम्हांस कर्तव्य नाहीं ' याच निश्चयाला चिकटून बसतो.

यानंतर गोत्र जमतें कीं नाहीं हें पहावयाचें असतें. सगोत्र वधूवरें असून मुळींच चालावयाचें नाहीं, हा या बाबतींत मुख्य नियम आहे. याशिवाय कांहीं गोत्रांचें परस्परांशीं पटत नाहीं. अशीं न पटणारीं गोत्रेंही अर्थात परस्परांना वर्ज्य! कांहीं पोटजातींत तर मामाच्याही गोत्राला पटेल, असें प्रतिगोत्र पहावें लागतें. कोंकणस्थांसारख्या कमी गोत्रांच्या जातींत बापाच्या गोत्राशीं आणि मामाच्या गोत्रांशीं दुहेरी सलोखा संभाळून असणारीं गोत्रें हुडकून काढतांना फारच यातायात पडल्यास नवल नाहीं. गोत्रागोत्रांचें परस्परांचें न पटण्याचें कारण माझ्या मतें, त्या त्या गोत्रांच्या कुलपति ऋषींतील प्राक्कालीन तंट्यांतच

असलें पाहिजे. अर्बुद गाईच्या विनिमयालासुद्धां कबूल न होणाऱ्या वसिष्ठाची गाय ज्या विश्वामित्रानें अखेर दरोडा घालून नेली, त्याच विश्वामित्राच्या कुळांतील कन्या, मग तिच्याबरोबर एक सोडून छप्पन गाई आंदण मिळाल्या म्हणून पत्करावयाला कोणता वसिष्ठगोत्रोत्पन्न तरुण तयार होईल? आम्हां आर्यांच्या या ऋषिकालीन गोत्रजा'द' वैराच्या चिकाटीकडे पाहिलें म्हणजे 'रोमिओ अँड ज्युलिएट'मधील सरदार घराण्यांचें, 'शिरक्याभोंसल्यांचें, किंवा 'या अहमद-शहाच्या आज्यानें माझ्या काकाचा खून केला,' म्हणून जळफळणाऱ्या राणा भीमदेवाचें द्राविडी-प्राणायामाचें वैरसुद्धां कमकुवत वाटूं लागतें!

गोत्रानंतर पत्रिकेचा मान असतो. कांहीं दिवसांपूर्वी माझें पत्रिकेचें ज्ञान इतकें मर्यादित होतें कीं, आमच्या घरच्या कार्यांतून नेहमीं पत्रिका जमविणाऱ्या आबाभटजींनासुद्धां त्या बाबतींत माझ्यापेक्षां जास्त कळत असे, असें म्हटलें तरी चालेल. पण गतवर्षी लिंबूनानांच्या ठकीचें लग्न जमविण्याच्या खटाटोपानें, हल्ली मीं पत्रिका जमत नसल्यास तीमध्यें बेमालूम फेरफारच्या लबाड्या करण्या-इतकें ज्ञान संपादन केलें आहे. गोत्र जमवितांना काळाच्या बाबतींत जी दूरवर नजर फेकावयाची असते, तीच दूरदृष्टि पत्रिका जमवितांना स्थलाच्या बाबतींत वापरावयाची असते. युगांतरींच्या वसिष्ठवामदेवांचे तंटे अद्यापि चालू ठेवण्या-साठीं जसें गोत्रभेदाकडे पाहण्याचें आम्हीं व्रत पत्करलें आहे, तसें पत्रिकेच्या वाटाघाटींत आमच्यापासून आणि परस्परांपासूनही कोट्यवधि कोसांवर भटक-णाऱ्या ग्रहगोलांचें हाडवैर चालावयाचें आहे. फरक एवढाच कीं, पहिल्या वैराची जबाबदारी साऱ्या कुळावर असते. आणि दुसरें फक्त व्यक्तिपर असतें.

पत्रिका जमविण्याचा प्रकार अंमळसा विश्वविद्यालयाच्या परीक्षांप्रमाणेंच आहे. सर्वोत्कृष्ट पत्रिका जमविण्यास एकंदर ३६ गुण जमावे लागतात; परंतु असा योग क्वचितच येतो, म्हणून कमींत कमी १८ गुण मिळाले तरी चालेल, अशी सवलत ठेवण्यांत आली आहे. मात्र हे शेंकडा पन्नास गुण मिळवितांना एखाद्या पत्रिकेच्या पोटविषयांत नापास होऊन चालत नाहीं. हे पोटविषय आठ असून त्यांच्या गुणांची आकडेवारी ठरलेली आहे; ती येणेंप्रमाणें—वर्णगुण १ वश्यगुण २, तारागुण ३, योनिगुण ४, ग्रहगुण ५, गणगुण ६, राशिगुण ७, आणि नाडीगुण ८. यांतील प्रत्येकाच्या बारकाया सांगू लागलों, तर आधीच आवांक्याबाहेर घसरत चाललेला हा लेख भलतीकडे वाढेल; म्हणून केवळ ग्रहापुरतेंच लक्ष देण्याचें ठरविलें आहे.

ग्रहांची आपसांत तंटे करण्याची शक्ति इतकी जबर आहे कीं, आम्हीं हिंदु लोकांनींसुद्धां त्यांच्याकडून धडे घेतले पाहिजेत! वस्तुतः त्यांना भांडण्याचें

कोणतेंच कारण दिसत नाहीं. मंगळाखेरीज बाकीच्या कंगालांजवळ आमच्या पृथ्वीप्रमाणें वातावरणाचें पांघरूणसुद्धां नाहीं! आकाशांतल्या पोलिसलोकांनीं या भटक्या मंडळींवर उडाणटप्पूचा खटला भरला, तर त्यांपैकीं एकालाही उदर-निर्वाहाचें योग्य साधन दाखवितां येणार नाहीं. नाहीं म्हणावयाला, आम्हां हिंदूंवर कडी करण्यासाठीं आमच्याप्रमाणेंच काळ्या रंगाच्या आणि उघड्या अंगाच्या शनीनें मात्र, अन्नवस्त्राची तरतूद न करतां, अडीअडचणीच्या वेळेसाठीं हातांत दोन सलकडीं ठोकून ठेविलीं आहेत!

ही ग्रहांची सांपत्तिक स्थिति झाली. परंतु अशा स्थितींतही त्यांचीं भांडणें सारखीं चाललेलींच आहेत. तसेंच, आठ परदेशी आणि नऊ चुली, या म्हणीप्रमाणें आमच्या पूर्वजांनी ग्रहांचा तंटेखोरपणा लक्षांत घेऊन, पत्रिकेंत नऊ ग्रहांसाठीं बारा घरें बांधून ठेविलीं, तरी त्यांना सुखासमाधानानें राहतां येत नाहीं! एखाद्या वेळीं सारे ग्रह दोनतीन घरांतच दाटीदाटीनें वसति करून व बाकीचीं घरें ओसाड पाडून पत्रिकेला विजापूर हंपीसारख्या उजाड पडलेल्या प्राचीन शहराचें वैभव आणतात; तर एखाद्या वेळीं, इंग्लिशमन-प्रमाणें एकेका घरांत एकेकजण राहून पत्रिकेला लोणावळें, महाबळेश्वर यांसारख्या हवाशीर ठिकाणांचा नकाशा बनवितात. पण असें दूरदूर राहिल्या-मुळें ग्रहांतलीं भांडणें कमी होतात, असें मात्र मुळींच नाहीं! एकाच घरांत असलेले ग्रह परस्परांवर ज्या प्रमाणें सहजच पुरी नजर ठेवून असतात, त्याप्रमाणें ते दूरदूर असले तरीसुद्धां त्रिपाद, द्विपाद किंवा एकपाद अशा प्रकारच्या वांकड्या नजरेनें एकमेकांकडे पहावयास सोडीत नाहींत. ग्रहांच्या शुभमित्रभावाचीं कारणेंही अनादिसिद्ध असून आता त्रिकालाबाधित अशींच आहेत. उदाहरणार्थ, चंद्रानें गुरुपत्नीशीं केलेला गर्ह्य प्रकार गुरूनें आकल्पान्त विसरणें शक्य नाहीं. ग्रहांच्या शत्रुमित्रत्वाचा जोर त्यांच्या राहत्या घराच्या परिस्थितीवरच अवलंबून असतो. तथापि कमीअधिक प्रमाणावर त्यांचे तंटे अव्याहत चालूच असतात. दहाबारा वर्षांखाली आपल्याकडे कांहीं ठिकाणीं रक्ताचा पाऊस पडल्याची भुमका उठली होती. पुष्कळांनीं त्या गोष्टींची भाकडकथेंत जमा केली; परंतु माझी मात्र अजून अशीच समजूत आहे कीं त्या वेळी सप्तग्रहीसारखा ग्रहसंमीलनाचा एखादा योग असावा. ग्रहांचा स्वभाव लक्षांत घेतला, म्हणजे वरील गोष्टींत अशक्य असें कांहींच वाटत नाहीं. त्यांतल्या त्यांत, मंगळाची वागणूक इतर ग्रहांहून फारच हेकडपणाची असते. आधी त्याचा ताळमेळ पाहून मग बाकीच्या मंडळीचा सलोखा जमवावा लागतो. युरोपियन

पुराणांतरीं मंगळाला वीररसाधिपति म्हटलें आहे, तें फारच अनुरूप आहे. इतर ग्रहांप्रमाणें हा शिपाईगडी मठाभिक्षुकांच्या मध्यस्थीनें दानें, जप, वगैरे अटींवर तहनाम्याला कधींच तयार होत नाहीं. सर्व ग्रहांचे स्थानानुरूप परस्परसंबंध लक्षांत घेऊन, वधूवरांच्या दोन पत्रिकांवरून लग्न निश्चित करतांना बिचाऱ्या जोशीबुवांना सर्व राष्ट्रांचे हिताहितसंबंध डोळ्यांसमोर ठेवून दोन राष्ट्रांचा तह घडवून आणणाऱ्या मुत्सद्याइतकीच सावधगिरी बाळगावी लागते.

पत्रिका पाहण्याच्या व गोत्र जमविण्याच्या या धार्मिक खटाटोपाचा फोलपणा दाखविण्यासाठीं सुधारक लोक पुढील सारांशाचा युक्तिवाद करीत असतात. युरोपियन किंवा इतर लोकांमधील वैवाहिक संबंध, गोत्रांकडे लक्ष दिल्यावांचून आणि ग्रहांच्या गुणधर्मांऐवजीं वधूवरांचे गुणधर्म पाहून, घडवून आणलेले असतात, तरीही त्यांची वैवाहिक स्थिति आमच्याइतकी, किंबहुना आमच्या-हूनही अधिक सुखावह होत असते; त्याचप्रमाणें आमचें ज्योतिःशास्त्र स्वतःच ओरडत असतें कीं, जन्मवेळेची नोंद घेण्यांत एका क्षणाची चुकामूक झाल्यास पत्रिकेंत जमीनअस्मानाचे फरक घडून येतात, आणि आमच्याकडे तर मुलाच्या जन्मकाळासंबंधीं जन्मवर्षच काय तें साधारणतः बरोबर सांगतां येतें! अर्थात् मुलाच्या जन्मानंतर दोनचार वर्षांतच पत्रिका करण्याचा सुयोग आला, तरच जन्मशक तरी बिनचूक हातीं लागण्याचा संभव– पुढें तोही नेमका सांपडणें दुरापास्तच! आतां आईबापें मुलाचा जन्ममाससुद्धां एखादें वेळी नेमका सांगतात; परंतु हें केवळ अपवादात्मक आहे. कधीं कधीं मुलाचा जन्म दिवसाच्या कोणत्या वेळीं झाला, याचा अंदाज लागून वर्ष–वार–तिथि हीं सारीं अंतरतात. पुराणांतरीं श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, वगैरे पुण्यपुरुषांच्या जन्मवेळा याच सूक्ष्म-पात्रदर्शक तत्त्वावर नमूद करून ठेविलेल्या आहेत. महिना, तिथि, वार, घटका, पळें, वगैरे सूक्ष्मतम कालभेद 'बारदशांश स्थळांपर्यंत' बिनचूक देऊन, पुराण-मुनींनीं वर्षाच्या बाबतींत ढोकळमानानें शतकाचें तर नांवच नको, सहस्रकाचा किंवा दशसहस्रकाचासुद्धां उडता उल्लेख केलेला नाहीं! (मथुरेच्या कारागृहांत असतांही, श्रीकृष्णाच्या गुप्त जन्माचा बेचूक काल वसुदेवानें कसा माहीत करून घेतला, हें कोडें मात्र माझ्या मनाला सारखें डाचत असतें.) हल्लींही खेडे-गांवांतून मुलाच्या जन्मकालासंबंधीं हीच पुराणरीति प्रचलित आहे. "गाई गोठणीवर आल्या असतील", "गड्याची न्याहारी शेतावर गेली नव्हती" किंवा "मामंजी असे पोथी वाचून उठले असतील" यासारख्या वारेमाप गोष्टींच्या नियमितपणावरूनच बाबूची किंवा ब्रगीची पत्रिका तयार करावी

लागते. यामुळें अगदीं दहा वर्षांच्या मुलाचा जन्मकाल ठरवितांनासुद्धा कालिदास, भवभूति, होमर यांसारख्या ऐतिहासिक विभूतींच्या जन्मकालाबद्दल परस्पर हवाला देण्यांत येतो. आमच्या गांवच्या म्हाळसाकाकूंच्या नाऱ्याची जन्मवेळ विचारली, म्हणजे त्या म्हणतात कीं, "खालच्या आळींतल्या रखमाकाकूंच्या गोंद्याची पांचवी होती, त्या दिवशीं असा पडत्या प्रहरीं माझा नाऱ्या झाला." आणि रखमाकाकूंना विचारलें, तर त्या म्हाळसाकाकूंच्या नाऱ्याचा हवाला देतात!

अशा रीतीनें, आमच्याकडील कुडमुड्या जोशीबुवांवर, त्रैराशिकांतील दोनच राशी हातीं पडल्यामुळें बावचळलेल्या विद्यार्थ्याप्रमाणें, येन केन प्रकारेण पत्रिका तयार करण्याचा अनेक वेळां प्रसंग येतो, आणि अशा अंदाजपत्रिकांवरूनच मुलांच्या लग्नकाळीं धुमाकूळ घालायचा असतो!

पत्रिका पाहण्याच्या बाबतींत कांहीं बाप इतका फाजील चोकसपणा दाखवितात, कीं, स्वतःच्या दुष्कृत्याप्रमाणें मुलाची पत्रिकाही कधीं चारचौघांपुढें मांडीत नाहींत! आणि 'सांगून आलेल्या मुलींची' पत्रिका स्वतः किंवा स्वतःच्या विश्वासांतील ज्योतिषाच्या सहाय्यानें त्या गुप्त पत्रिकेशीं ताडून पाहतात. परंतु गरजवंतांच्या सोईसाठीं हें येथें सांगून ठेवतों कीं, अशा अडचणीच्या प्रसंगीं क्वचित् त्या जोशीबुवांस 'नक्कलफी' देऊन हस्तगत करून घेतां येतें. कधीं कधीं तर, वधूपक्षाचें आणि वरपक्षीय जोशीबुवांचें अशाच ऐहिक मार्गानीं सख्य जमून येतांच, पहिल्या मुकाबल्यास एकमेकांशीं मुळींच न पटून घेणाऱ्या उभय पत्रिकांतील ग्रहांचेंही पुढें शक्य होतें. ग्रहांचा आमच्यावर जसा परिणाम होत असतो, तसा आमचाही ग्रहांवर होत असतो, यांत मुळींच संशय नाहीं!

त्याचप्रमाणें गोत्रांच्या अडचणींतून सफै पार होण्यासाठीं आमच्या धार्मिक कामधेनूनें सवड ठेवली आहे. आपली मुलगी एखाद्या भिन्नगोत्रीय मुलाला दत्तक देऊन अगदीं सगोत्र वधुवरांचासुद्धां विवाह घडवून आणतां येतो. आमच्या धर्मांतल्या निर्बंधाचा कडकपणा आणि त्यांतून मोकळीक मिळविण्याचे मार्ग, हीं दोन्ही मानवी मतीला खरोखर कुंठित करून सोडणारीं आहेत!

या तीन कलमांतून पसार झाल्यानंतर मुलगी पाहण्यावर मजल येऊन ठेपते. या वधूपरीक्षेंत साधारणतः गाय, म्हैस किंवा घोडीं घेतांना दाखविण्याइतकीच व्यावहारिक अपूज्यबुद्धि दाखवावयाची असते. मात्र ही परीक्षा नवऱ्यामुलाच्या बापानें किंवा दुसऱ्या कोणीं तरी करावयाची असते. स्वतः वराचा यांत कांहींएक

संबंध असतां कामा नये ! आणि तें गैर आहे, असें धर्मलंड सुधारकांखेरीज कोण म्हणणार ? उघडच आहे. गाय किंवा घोडी घेतांना ज्याप्रमाणें गड्याला किंवा मोतद्दाराला विशेष अधिकार नसतो, त्याप्रमाणें या बाबतींत मुलालाही फाजील उठाठेवी करावयाचा हक्क रूढीनें दिलेला नाहीं. वधूपरीक्षेच्या धोरणांत आमच्या पूर्वजांची व्यवहारकुशलता ओतप्रोत दिसून येते. अशी रूढी नसती तर प्रत्येक नवऱ्यामुलानें 'मला ही बायको नको', 'मला ती आवडत नाहीं' असा पोरखेळ चालवून विवाह जमविण्याचें काम दुष्कर करून ठेविलें असतें. लग्न जमविण्याच्या साऱ्या भानगडींत हा एवढाच भाग काय तो सुकर आहे, असा माझा सार्वत्रिक अनुभव आहे. इंग्लंडातील बॅरिस्टरांच्या परीक्षेतील विद्यार्थ्यांप्रमाणेंच पाहण्यास आणलेली मुलगीही सहसा नापास होत नाहीं !

परंतु, बॅरिस्टरच्या परीक्षेस बसण्याची पात्रता येण्यासाठीं ज्याप्रमाणें आधीं चांगलाच हात सोडावा लागतो, त्याप्रमाणें वरसंशोधनाच्या बाबतींत हुंड्यासाठीं पिशवीचें तोंड अगदीं मोकळें सोडावें तेव्हांच वरपक्षाचें इतर बाबतींत कुरकुर करणारें तोंड बंद होतें ! या कार्यक्रमांत हुंडा ही अनुक्रमानें शेवटची व महत्त्वाच्या दृष्टीनें अगदीं पहिली बाब आहे. या बाबतींत प्रतिपक्षाचें तडजोडीनें समाधान करणें शक्य नाहीं. 'करणी' ही हुंड्याची अर्धांगी असून 'पोषाख' हें या सुवर्णमय जोडप्याचें पिल्लूं होय ! साधारणतः मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या मुलाची किंमत सुमारें एक हजार रुपये असून भिन्नभिन्न जातिपरत्वें ती वाढत जाते; परंतु मुलगा घरचा फारच गरीब– अगदीं अन्नास मोताद– असा असला, तर मात्र त्याच्या शिक्षणासाठीं, म्हणजे आणखी चार वर्षें दरमहा फक्त पंचवीस-तीस रुपये द्यावे लागतात. शिक्षणाच्या मानानें ही रकम हजार रुपयांपासून पुढें दोन तीन हजारा-पर्यंत उड्या मारीत जाते. कांहीं कांहीं जातींतून या हुंड्याच्या दडपशाहीमुळें मुली आजन्म अविवाहित ठेवण्यापर्यंत पाळी येऊन ठेपली आहे. हुंडा देण्याची चाल ऋषिकालीन असून 'एक गाय' देण्यापासून तिची सुरुवात झालेली आहे. कोणी किती हुंडा द्यावा याबद्दल सामान्य नियम कधींच घालतां येणार नाहीं. परंतु या बाबतींत पिढीजाद सुशिक्षित गरिबांतच विशेष हावरटपणा– अगदीं निर्दय हावरटपणा–दिसून येतो. कॉलेजांतील विद्यार्थ्यांना स्वतःची किंमत सोळाशें सतराशें सांगण्यांत कांहींच वाटत नाहीं. मग घरची स्थिति कुबेराच्या उलट टोकाशीं असली तरी हरकत नाही ! अबदागिरीच्या जहागीरदारापेक्षां चौपदरीच्या जहागीरदारालाच उलट जास्त अवसान येत असतें. हुंड्याची वाटाघाट चाल-वितांना साधारण बाजारहाटांतली 'बेपारी' भाषाच वापरण्यांत येते. ठराविक

रक्कम उकळून घेण्याचीं अनेक कारणें सांगण्यांत येतात. कोणी कुळाचाराची सबब पुढें आणितात, तर कोणी मुलाच्या विद्वत्तेचे गोडवे गातात. कोणाला चारपांच मुलींसाठीं स्वतः दिलेल्या रकमेची, स्वतःच्या एकाच मुलाच्या हुंड्यांत भरपाई करून घ्यावयाची असते, तर कोणाला मुलाच्या शिक्षणाचा सारा खर्च वसुल करावयाचा असतो. एका गृहस्थानें तर मुलाच्या शिक्षणाच्या खर्चाचें इतक्या बारकाईनें व बिनचूक टिपण ठेविलें होतें कीं मनुष्याच्या यत्किंचित् कृत्यांचा जमाखर्च ठेवणाऱ्या चित्रगुप्तानेंसुद्धां त्यापासून जमाखर्चपद्धतीचे धडे घ्यावे! एक पैशाच्या दुध्या पेन्सिलीपासून तों कॉलेजच्या फीपर्यंत सर्व रकमांची त्यानें नोंद ठेविली होती. याशिवाय एकविसाव्या वर्षापासून मुलाला दरमहा किती पगार मिळूं शकला असता, त्याचा अंदाज बांधून 'प्रमोशन' सकट त्या रकमेची जमेकडे भरती केली होती. सदर रकमेला मारवाडी दृष्टीनें चक्रवाढ-व्याजाची जोड देऊन या सर्व आंकडेमोडीसाठीं कारकुनाच्या मेहनतीबद्दल- ती कामगिरी स्वतःच पत्करल्यामुळें व साधारण कारकुनापेक्षां आपली लायकी बरीच जास्त असल्याची त्याची दृढ समजूत असल्यामुळें पगाराचें मान वाढणें अर्थात्‌च स्वाभाविक होतें- दरमहा पन्नास रुपयांनी या कारभाराला मदत करण्यांत येत असे. अर्थात् लग्नमितीपर्यंत या रकमेचा फुगारा वाढत राहून तत्पूर्वी पूर्ण हिशेब होणें अशक्य होतें; आणि त्यामुळें या व्यावहारिक अपूर्णांकाकडे पाहण्याचीसुद्धा एखाद्या मुलीच्या बापाची छाती होत नसे! सरते शेवटीं, मुलगा वयाच्या दृष्टीनें 'टाईमबार' झाल्यामुळें, त्याचा भाव उतरून सलंग रकमेच्या भरपाईबद्दल म्हाताऱ्याची पूर्ण निराशा झाली. आणि त्याच निराशेच्या भरांत त्यानें चार आण्यांची अफू खाऊन जीव दिला. म्हाताऱ्यानें मृत्यूपत्र करून ठेविलें नसल्यामुळें, मुलाप्रीत्यर्थ आपण खाल्लेल्या अफूचे चार आणे त्या रकमेत जमा करण्यास त्यानें सांगितलें होतें किंवा नाहीं हें समजण्यास आतां मार्ग नाहीं!

हुंडा वसूल करून घेण्याचे वरपक्षाचे अनेक मार्ग आहेत; परंतु ते सारे सर्रहा जहाल असून, 'दाराशीं धरणें घेणें', 'पायाशीं कपाळ फोडून घेणें', 'उपासमारीनें ऋणकऱ्याच्या दारीं जीव देणें' यांसारखे त्राग्याचे नेमळट उपाय, या हमखास उपायांपुढें तुच्छ वाटतात. 'टांच', 'जप्ती', 'हुकूमनामा' यांसारख्या सरळ मार्गांचीसुद्धा इतकी किंमत वाटेनाशी होते. वराच्या गळ्यांत माळ पडण्यापूर्वी हुंड्याची रकम हातांत पडली नाहीं, तर वरपक्ष कधीं वधूच्या गांवापर्यंत आलेल्या आपल्या गाड्या नदीजवळ थोपवून धरून फिरविण्याची

धमकी घालतो, तर कधीं, सीमान्तपूजनाच्या वेळी अडून बसतो; कधी मुलाचा बाप ऐन वेळी लग्न फिसकटविण्याचा दम भरतो, तर कधीं नवरामुलगा मुहूर्ताच्या वेळीं लग्नालाच उभा राहत नाहीं. अशा वेळीं अवघड मान्यांत सांपडलेला मुलीचा बाप आपल्या स्थावरजंगम मिळकतीची वाटेल त्या पडत्या भावानें वासलात लावून एकदांचा कसा तरी त्या विश्वामित्राच्या जाचांतून अग्निशीं बाहेर पडतो.

मुलाच्या लग्नाच्या वेळीं हवा तसा जबरदस्त हुंडा हव्या तशा अरेरावीनें वसूल करून घेतां येतो, यामुळेंच आमच्याकडे पुत्रजन्मामुळें बेचाळीस कुळांचा उद्धार होतो, असें समजण्याची वहिवाट पडली असावी. पुत्रजन्मामुळें स्वतःच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होत नसला तरी निदान व्याहीपक्षाच्या बेचाळीस पिढ्या ठार बुडवतां तरी येतात, हें खास! एक मुलगा झाल्याबरोबर त्याचीं आईबापें हुंड्याच्या रकमेवर काय काय गोष्टी कावयाच्या, याचा विचार करूं लागतात. हल्लींप्रमाणें प्रमाणाबाहेर हुंडा घेण्याची चाल पौराणिक काळींही प्रचलित असती, तर भारतीय युद्धासारखा प्रचंड अनर्थ बिनबोभाट टळला असता, अशी माझी खात्री आहे. कारण शंभर राजबिंड्या मुलांचा हुंडा येण्याची खात्री असल्यावर, हस्तिनापुराच्या टीचभर राज्यासाठीं, असल्या कुलक्षयकर युद्धाला धृतराष्ट्रानें कधींही संमति दिली नसती! नुसत्या हुंड्यावर त्यानें तसलीं छप्पन राज्यें फरोक्त घेतलीं असतीं. परंतु, दुर्दैवानें हुंड्याची चाल त्या वेळीं जोरांत नव्हती. पेशवाईंत मात्र हुंड्याचें मान बऱ्याच वाढत्या प्रमाणावर असावें, असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. कारण, एरवीं, गोपिकाबाईसारखी महत्त्वाकांक्षी स्त्री, माधवरावसाहेब लहान असतांही पानपतावर जावयास निघाले असतां, त्यांना आड आलीच नसती! लग्न झालेल्या अर्थात् हुंड्याची भरपाई करून चुकलेल्या विश्वासरावांस गिलच्यांवर चालून जाण्यास मनमोकळेपणें परवानगी देऊन, कुमार श्री. माधवरावसाहेब व नारायणरावसाहेब या "उभयतां स्वारियांनीं मोहिमेवर चालोन जाणें, यासाठीं बाळहट्ट घेतलिया वरी बाईंनीं पुढें होवोन, बहुतां प्रकारीं खातरजमा केलियाहि मूलपणानें मनास आलें नाहींसें जाणोन, अखेरीस जीवेंभावें आणभाक केली जे, पोरबुद्धि न करोन श्रीमंत मुलांनीं वाडियांतच राहणेंचें करावें.§" श्रीमती

§ ज्या ऐतिहासिक कागदपत्रांतून प्रस्तुत उतारा घेण्याचें धाडस केलें आहे, त्याची अस्सल प्रत कोरी असतांनाच वाण्याच्या दुकानीं पुडा बांधण्यांत कामास आली. आमच्या ऐतिहासिक कागदपत्रांची केवढी ही शोकदायक दुर्दशा! बाळकराम

गोपिकाबाईसाहेबांना धोरणी व मुत्सद्दी म्हणतात तें उगीच नाहीं! दुसरा एखादी बाई असती तर सोन्यासारखी–सारखीच कां? अगदीं भरोभर सोन्याच्या मोलाचीं–दोन्ही पोरें पानपतावर तोफेच्या तोंडीं देऊन, एवढ्या थोरल्या हुंड्याला आंचवली असती! याप्रमाणें पेशवाईत हुंड्याचें अस्तित्व सिद्ध झाल्यामुळें, तूर्त मी तत्पूर्वी म्हणजे मराठेशाहींत हुंड्याचें मान कितपत होतें हें ठरविण्यासाठीं ऐतिहासिक कागदपत्रें चाळत आहें. श्रीशिवछत्रपतींनीं एकामागून एक पांचसहा लग्नें केलीं, याचें कारण माझ्या मतें त्यांच्या तुटपुंजा खजिन्यांतच सांपडणार आहे! छत्रपतीसारखा जांवई मिळत असतांना ते बिजवर किंवा तिजवर आहेत अशा क्षुल्लक कारणामुळें, त्यांना भरपूर हुंडा द्यावयास मागेंपुढें कोण पहाणार! या बाबतींत सत्यही माझ्या तर्काबरहुकूमच असल्यास शिवछत्रपतींच्या आधारावर मी बिजवर तिजवरांना भरहुंडा देण्याची वहिवाट पाडण्यासाठीं साऱ्या महाराष्ट्रभर जारीनें चळवळ सुरू करणार आहें.

वरील शेवटल्या शेवटल्या शब्दावरून मी हुंड्याच्या चालीला उचलून धरणारांपैकीं आहें हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. मी या मताचा असण्याची अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं एकच येथें दिलें असतां वाचकांचें समाधान होण्यासारखें आहे. हिंदुस्थानसारख्या कमी व्यापाराच्या देशांत, लोक स्थावर मिळकतीला पिढ्यान्‌पिढ्या चिकटून असतात, आणि अशा प्रकारचें संपत्तीचें एकस्थायित्व अर्थशास्त्राच्या दृष्टीनें, देशाच्या समृद्धीला मोठें घातुक आहे. आतां मुलीचा हुंडा देण्यासाठीं दरसाल हजारों लोकांना घरेंदारें विकून मोकळे व्हावें लागतें, ही गोष्ट महशूर आहे. आणि यामुळें आमच्या देशांतला पैसा या हातांतून त्या हातांत सारखा खेळत राहतो. आतां यांत अगदीं अडल्या वेळीं सौदा केल्यामुळें व्यक्तिशः प्रत्येकाचा थोडासा तोटा होत असेल हें खरें; परंतु देशकल्याणासाठीं स्वार्थत्यागाला तयार असणें हें प्रत्येक देशभक्ताचें कर्तव्य आहे!

अशा या उपयुक्त चालीलादेखील जारीनें आळा घालण्याचे कांहीं जातींतील लोकांनीं प्रयत्न केल्याचें ऐकिवांत आहे; परंतु सनातनाभिमानी पक्षाकडून अशा प्रयत्नांची चांगलीच पिछेहाट होते, ही त्यांतल्या त्यांत संतोषाची गोष्ट आहे. पांढरपेशांतील एका जातीनें तर स्वजातीय परिषदेंत हुंडा न घेण्याचा ठराव करून लोकांकडून त्याबरहुकूम शपथाही घेवविल्या. या जातीचे उपरिनिर्दिष्ट प्रयत्न कांहीं लोकांच्या हाडीं खिळलेल्या हुंडेबाजीमुळें सफे फसून अखेर सनातन रूढीचा विजय झाला, हें सांगण्यास मला अत्यंत संतोष वाटत आहे! कारण या शपथा

घेणारांपैकीं एका पुढारी सभासदानें त्याच वर्षी मुलाचा चरचरीत हुंडा घेऊन, तत्समर्थनार्थ असें कारण सांगितलें कीं, "काय करावें, व्याही ऐकेनात; ते म्हणाले, निदान पंधराशें तरी आपण घ्याच!" अरेरे, काय करणार बिचारा अशा प्रसंगांत! अगदींच $लाज नाहीं! कित्येक ग्रामकंटकांनादेखील नाटक-वाल्यांच्या हट्टाच्या अत्याग्रहामुळें 'फुकट पास' पतकरावे लागतात, तो तरी अशांतलाच दुधर प्रसंग!

मुलीच्या पक्षानें मुलाला हुंडा द्यावयाचा सार्वत्रिक प्रघात आहे. कोठें कोठें याच्या उलट प्रकार असल्याचेंही वर नमूद केलेंच आहे. पैकीं गुजरातेंतील 'भाटेले' नांवाच्या एका लहानशा पोटभेदाची प्रमुखत्वानें आठवण होते. या जातींत बायको मिळविण्यासाठीं इतका जबरदस्त भुर्दंड भरावा लागतो कीं, एखाद्या घरांत चारपांच भाऊ असले, तर त्यांतील फार तर एखाददुसऱ्याचेंच लग्न होऊं शकतें. कधीं कधीं तर त्यांच्यांत 'साटींलोटीं' करण्याचे बादरायण मासले आढळून येतात. एखाद्या गुलाबदासाला कानजीच्या मुलीशीं लग्न करावयाचें असलें, म्हणजे तो आपल्या मामेबहिणीची किंवा मावसभावाची मुलगी तिसऱ्याच एखाद्या भिकाभाईच्या भावास देतो, भिकाभाई मोबदल्याखातर आपली मुलगी नरोत्तमाच्या काकाला देतो, नरोत्तम मग आपली आतेमेहुणी कानजीच्या मामेभावाला देववितो, आणि कानजीचा मामभाऊ, आपला वशिला लावून, कानजीची मुलगी गुलाबदासाला देववून हा पंचक्रोशीचा वळसा पुरा करितो! सामान्यतः ही सर्व जात निर्धन असल्यामुळें, तिच्यांत रोखीच्या सरळ देण्याघेण्याऐवजीं, अशा प्रकारच्या 'नातवानें-तवानें' देण्याघेण्याचीच जारीनें वहिवाट दिसून येते.

हुंडा घेण्यास तयार नसलेला असा आणखी एक सर्वजातिसामान्य वरांचा वर्ग आहे, त्याचाही येथेंच उल्लेख करावा लागेल. पन्नाशीच्या आणि साठीच्या पलीकडले नवरमुलगे या वर्गांत मोडतात. असे नवरमुलगे बहुधा हुंडा द्यावयालाच तयार असतात, आणि यामुळेंच, कधीं कधीं फारच सुंदर स्त्रिया या वर्गांतील उदारधींच्या वांट्यास येतात. एक सत्तर वर्षांचा कोंवळा नवरमुलगा तर हुंडा घेण्याच्या इतका विरुद्ध होता कीं, त्याचा तरुण नातू हुंड्यावांचून लग्न करण्यास

---

*$ शुद्धिपत्र—खिळे जोडणाऱ्याच्या खिळ्याएवढ्या चुकीमुळें येथें मुळांतील 'इलाज' या शब्दाबद्दल हा भलताच शब्द छापला गेला आहे, त्याला इलाज नाहीं. वाचक योग्य शब्दाची योजना करतीलच.

—बाळकराम

कबूल होईना तेव्हां आजोबांना स्वतःला जरी लग्न कर्तव्य नव्हतें, तरी केवळ हुंड्याची घातुक रूढि मोडण्याविषयीं समाजाला योग्य उदाहरण घालून द्यावें, व यथाशक्ति सामाजिक सुधारणा घडवून आणावी, या स्तुत्य हेतूनें नातवाला सांगून आलेल्या मुलीशीं आजोबानें स्वतःच लग्न केलें !

याप्रमाणें वरसंशोधनाचा साधारण कार्यक्रम आहे, आणि याच कारणामुळें कन्याजन्माची बातमी ऐकल्याबरोबर कित्येकांना मरणप्राय दुःख होत असतें. कांहीं कांहीं जातींत मुलीला 'सात जन्मांची वैरीण !' समजण्यापर्यंत पाळी येऊन ठेपली आहे. इतकेंच नाहीं, तर मुलीच्या जन्मवृत्तानें धक्का बसून बापाचें मरण झाल्याचें कोणी सांगितल्यास मला त्यांत काहींच आश्चर्य वाटणार नाहीं ! उलटपक्षीं, उपवर मुलीच्या आकस्मिक मरणानें बापाच्या मनास आनंद वाटल्यास तोही क्षम्यच आहे !

चारपांच वर्षांखालीं आमच्याकडे एक प्रसिद्ध ज्योतिषी आले होते. 'चेहरा पाहून कुंडली मांडण्याबद्दल' त्यांची मोठी ख्याति असे. त्यांची भेट होण्यापूर्वीं 'चेहरा पाहून कुंडली मांडण्याबद्दल' माझी कल्पना अगदींच निराळी होती. त्यांना चेहऱ्यावरून बावळट मनुष्याची परीक्षा करून त्याची कुंडली मात्र बिनधोक मांडतांना, व साधारणतः चलाख चेहऱ्याचा मनुष्य दिसला, कीं अळंटळं करतांना पाहून, 'चेहरा पाहून कुंडली मांडण्याचा' खोल अर्थ लक्षांत येऊन, माझी पहिली भ्रामक कल्पना दूर झाली. असो. सदरहू जोशीबुवांनीं आमच्या आळींतल्या एका गृहस्थाबद्दल, त्यांना त्या वर्षीं महान् लाभयोग असल्याचें भाकित केलें होतें. गृहस्थमजकुरांचा प्राक्कालीन इतिहास व वकूब आम्हांला पूर्णपणें माहीत असल्यामुळें, त्यांच्या भावी लाभयोगाची आम्हांला कल्पनाच करतां येईना ! अखेर मुदतीचें वर्ष संपावयाला दोनचार दिवसच उरले होते, तोंच एके दिवशीं सदर इसम आमच्याकडे येऊन अस्पष्ट शब्दांनीं सांगूं लागले कीं, "आमच्या चिटकीला प्लेग झाला कीं हो !"

अविवाहित चिटकी बाराचौदा वर्षांची होती. दोनतीन दिवसांतच, कवडी-सुद्धां हुंडा घेतल्यावांचून यमानें चिटकीला पदरांत घेतलें, आणि जोशीबुवांचें भविष्य खरें झालें !

त्याचप्रमाणें तिंबूनानांच्या ठकीचें लग्न जमविण्यासाठीं, मी व तिंबूनाना पुणें मुक्कामीं कांहीं दिवस तळ देऊन राहिलों होतों. आम्हां दोघांचे परममित्र श्रीयुत मांबुराव हे त्यांची 'मंडळी' गरोदर असल्यामुळें गांवींच राहिले होते. त्यांच्या 'मंडळी'चें तें पहिलेंच बाळंतपण असल्यामुळें आम्हींही मांबुरावांना घरींच राह-

ण्याचा आग्रह केला होता. कांहीं दिवसांनंतर एकदां रात्रौ आम्ही बोलत बसलों असतां भांबुरावांकडून थाडदिशीं तार येऊन थडकली, कीं "I am ruined, letter follows— माझा सर्वस्वी सत्यनाश झाला; मागाहून सविस्तर माहितीचें पत्र येत आहे."

अरेरे! बिचाऱ्या भांबुरावावर प्रसंग कोसळला! एकुलती एक बायको आणि तिचा असा शेवट व्हावा! आम्ही सड्या स्वारीनिशीं निघालेले असल्यामुळें, असल्या महत्त्वाच्या व भयंकर तारेच्या योग्यतेप्रमाणें एकदम अट्टाहासानें रडावयास आमच्याबरोबर कोणी बायकामंडळीही नव्हती. मृताची बातमी ऐकून रडावें असें बायकांनींच! तरी मीं आपल्याकडून रडक्या सुरांत वहिनींचे गुण आठवीत दोनचारदां नाक शिंकरीत व मधूनमधून जमिनीवर हात टेंकीत, सुरेल रडण्याचा प्रयत्न केला; पण माझें रडणें किती झालें तरी मर्दानी; त्यांत जनानी थाटाची झांक कुठून येणार? अशा रडण्याचें हंसें व्हावयाचीच भीति विशेष! तिंबूनाना मात्र निर्विकार चेहऱ्यानें स्वस्थ बसून राहिले होते. शाबास त्यांची!

"विकारहेतौ सति विक्रियन्ते
येषां न चेतांसि त एव धीराः!"

शेवटीं तो दिलदार दोस्त ताडकन् उठून उभा राहिला आणि निश्चयाच्या गंभीर वाणीनें म्हणाला, "बाळक्या! प्रसंग येऊं नये, आला! पण आतां आपणच भांबूला धीर दिला पाहिजे. उद्यांच्या उद्यां भांबूला तार ठोक. म्हणावें, 'Don't fear! Thaki is—भिऊं नको! ठकी आहे.' माझी ठकी मी त्याला देईन. मी आणि भांबू कांहीं दोन नाहींत. प्रसंगीं उपयोगी पडत नाहीं तो मैत्र कशाचा?"

सकाळीं ठरल्याप्रमाणें मी तार करावयास जाणार, तोंच डाकवाल्यानें भांबुरावाकडील पत्र हातीं दिलें. त्यांत पुढील मजकूर होता:—

"काल रात्रौ सौ० ची सुखरूप सुटका झाली. बाळंतीण खुशाल आहे; परंतु मुलगी झाली आहे. तिंबूनाना आज तीन वर्षें ज्या बनवासांत दिवस काढीत आहेत, त्याची आठवण झाली म्हणजे धीर खचतो. झोपेंतूनसुद्धां सारखा दचकून जागा होत असतों." वगैरे वगैरे.

आम्हां दोघांनाही फारच वाईट वाटलें. तिंबूनानांना तर विशेषच खेद झाला. उघडच आहे, कन्यादानासारख्या स्वार्थत्यागानें स्नेहाची कसोटी दाखविण्याची आयती चालून आलेली संधि जावी, यापरतें दुर्दैव तें कोणतें? नंतर त्याच

दिवशीं आम्ही भांबुरावाला दुखवस्याचीं पत्रें, सहानुभूतिपर तारा वगैरे पाठवून कर्तव्यांतून मोकळे झालों.

वाचकहो! कन्याजन्माचें दुःख इतकें जबरदस्त आहे! अशाच कारणामुळें एकदां तिंबूनाना सर्वस्वी व मी अंशतः कसे संकटांत सांपडलों होतों, तें सांगून हा लांबलेला लेख आटोपतां घेतों.

गेल्या सालीं आम्ही ठकीच्या लग्नाच्या पहिल्या मोहिमेवर असतांना एके दिवशीं सायंकाळीं बोलण्यावरून बोलगें निघून, मुलीच्या लग्नकालीन वयाबद्दल बराच वादविवाद झाला. सदरहू वादांत आम्ही दोघे अमर्याद वयोमानाची तरफदारी करीत असून, प्रतिपक्ष "अष्टवर्षा भवेत्कन्या" या सूत्राचें समर्थन करीत होता. त्याच दिवशीं रात्रीं आम्हाला आमच्या एका स्नेह्याकडे वराती-बरोबर मिरवायला जावें लागलें. आमच्या या स्नेह्याच्या जातींत वरात घरीं आल्यावर नवीन जोडप्याच्या हातून शिष्टमंडळीस साखर देवविण्याची वहिवाट आहे. तीवरहुकूम क्रमाक्रमानें तिंबूनानांनाही वधूहस्तें साखर देवविण्यांत आली. बिचाऱ्या नानांच्या डोक्यांत संध्याकाळच्या वादांतले मुद्याचे शब्द अजून सारखे घोळत होते; आणि त्या नादाच्या भरांतच त्यांनीं नववधूला 'अष्टकन्या सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला.

वाचकहो! या आशिर्वादामुळें– आशीर्वाद कसला, शापच तो!–त्या ठिकाणीं तावडतोब केवढा गोंधळ उडाला. याची तुम्हांला कल्पना करतां येणार नाहीं! त्या जातींत कन्याप्राप्तीमुळें आईबापांच्या घरादारानें वाटोळें होण्याचा खात्रीचा संभव असतो. आणि तिंबूनानांच्या तोंडून ते अभद्र शब्द असल्या मंगल प्रसंगीं निघालेले! मग काय विचारतां! बायकामंडळींत रडारड सुरू होऊन पोक्त्यापुरवत्या बाया नवऱ्यामुली व पोरांशीं धरून कुरवाळूं लागल्या. इकडे पुरुषमंडळी रागानें लाल होऊन आमच्याशीं लगट करून दंगल करूं लागली. तिंबूनाना एखाद्या निर्दावलेल्या 'डांबिस'प्रमाणें कावऱ्याबावऱ्या नजरेनें इकडे-तिकडे पाहत होते. मी मधूनमधून ओरडत होतों कीं, "अंगाला हात लावूं नका कायदेशीर इलाज करा!" पण माझें म्हणणें त्या गर्दीत ऐकतो कोण? अखेर मोकळ्या हातानें धक्काबुक्की सुरू होऊन माझी व तिंबूनानांची कणिक चांगलीच तिंबून निघण्याचा रंग दिसूं लागला. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट इतकीच कीं, प्रतिपक्षीय तीस-चाळीस इसमांची प्रत्येकीं आमच्यावर हात चालविण्याची अनिवार इच्छा असल्यामुळें आम्हांला कांहीं तडाखे मुखत्यारामार्फत ध्यावे लागले! कारण गर्दीमुळें, आम्हां दोघांपर्यंत सर्वांचेच हात पुरणें शक्य नव्हतें.

अर्थात् हे मुखत्यार प्रतिपक्षांतलेच होते. तिंबूनाना शक्य तितका मारा चुकवून एखाद्या वीराप्रमाणें गर्जू लागले कीं 'बाळक्या! पळ, धूम ठोक!' शेवटीं पागोट्याचा मांडवास अहेर करून आम्हीं मांडवपरतण्याचा समारंभ पार पाडला, आणि पळतां पळतां आमचें राहतें बिऱ्हाड एकदांचें गांठलें. घरीं आल्यावर, माझा अपराध नसतांही उगीचच्या उगीच मीं मार खाल्ल्याबद्दल तिंबूनाना माझ्यावर रागावूं लागले. शेवटीं त्यांची समजूत घालण्यासाठीं मी म्हणालों कीं, "नाना! उगीच कां बरें संतापतां? मीं हौशीनें का मार खाल्ला इतका?"

तिसऱ्या दिवशीं 'तिंबूनाना विरुद्ध क्ष' या खटल्यांत ज्या अर्थीं तिंबूनाना हे आरोपी नंबर एक होते, व ज्या अर्थीं मी साक्षीदार नंबर एक होतों, त्या अर्थीं दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां कोर्टात हजर होण्याविषयीं आम्हांला 'समान्से' लागलीं. खटल्यांतील न्यायाधीश दुर्दैवानें त्याच जातीचे असून त्यांनाही दोन-चार मुली होत्या. त्यामुळें तिंबूनानांच्या तोंडच्या मुक्ताफळांची त्यांना बरोबर किंमत ठरवितां येऊन त्यांनीं पुढीलप्रमाणें शिक्षा ठोठावली—

"आरोपी तिंबूनाना, तुमच्यावर हा आरोप शाबीद झालेला आहे... म्हणून मी तुम्हांला, विविधज्ञानविस्तारांतील 'क्रितो व फिदो', ज्ञानप्रकाशांतील 'स्थानिक सहकारी पतपेढ्यां'संबंधी सारे अग्रलेख, व 'ब्रह्मज्ञानप्रदीप' हें आध्यात्मिक गद्यनाटक वाचण्याची, 'मानापमान' नाटकांतील प्रत्येक पदाचा अन्वयार्थ लावण्याची शिक्षा फरमावितों. हें सर्व वाचन होईपर्यंत तुम्हांला पुण्यांतल्या एखाद्या खाणावळींत जेवावें लागेल. आणि दर आठवड्यास 'विकएंड' तिकि काढून सदर्न मराठा रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून पुण्याहून मिरजेपर्यंत प्रवास करावा लागेल. यापेक्षां कमी शिक्षा तुम्हांला करतांच येत नाहीं."

बिचारे तिंबूनाना खटल्याचा हा निकाल ऐकतांच डोळे पांढरे करून बेशुद्धच पडले! मी फारच गयावया करून नानांची तरफदारी करूं लागलों. तेव्हां न्यायाधीशसाहेबांना थोडीशी दया येऊन त्यांनीं आम्हांला वरिष्ठ कोर्टांत अपील लावण्याची परवानगी दिली.

अपील चालते वेळीं, आम्हीं प्रतिपक्षाचें भावी नुकसान भरून देण्याचा न्यायमूर्तींसमोर कबूलजाब लिहून दिला. यदाकदाचित् नानांची बत्तिशी बढून त्या मुलीला आठ मुली झाल्याच, तर त्यांपैकीं नानांनीं चौघींचा हुंडा देण्याचें व एकीशीं विनहुंड्यानें स्वतः लग्न करण्याचें व एकीशीं त्याच शर्तीवर मीं लग्न करण्याचें कबूल करून त्या अर्थाचा करारनामा कोर्टासमक्ष प्रतिपक्षाच्या सुपूर्द केला. तेव्हां न्यायमूर्तींनीं दयाळूपणानें पहिली भयंकर शिक्षा रद्द करून, तिच्या

मानानें कांहींच नाहीं अशी, म्हणजे तीन वर्षें सक्तमजुरी व एक हजार रुपये दंड एवढ्यावर नानांची मुक्तता केली. त्यासरशी आनंदाच्या भरांत येऊन नाना वेड्या-पणानें नाचूं लागले. त्यांच्या तशा वर्तनानें कोर्टाची बेअदबी होण्याची मला भीति वाटूं लागली, व त्यांचा आनंद आटोक्यांत आणण्यासाठीं मीं म्हटलें, "नाना, ठकीचें लग्न जमलें नाहीं, तोंपर्यंत तीन वर्षें तरी तुम्हांला कैदेंत कसें राहतां येईल ?"

हें ऐकतांच तिंबूनाना काळेठिक्कर पडून न्यायमूर्तींकडे पाहूं लागले. न्यायमूर्तींची मुद्रा प्रसन्नशी पाहून मीं मोठ्या अदबीनें, मुलीचें लग्न जमेपर्यंत कैदीस जामिनावर सोडण्याबद्दल तोंडी अर्ज केला; परंतु न्यायाधीशसाहेब पांच हजारांचा जातमुचलका मागूं लागले; तेव्हां मीं पुन्हा मोठ्या विनयानें म्हटलें, "साहेब, असा भारी जातमुचलका घेण्याचें कारणच नाहीं. कैदी हे कांहीं जातिपळते नाहीत. सद्यःस्थितींत त्यांना फरारी होतां येणें शक्यच नाहीं ! कारण, तिंबूनाना म्हणजे कांहीं एखादे कळकळीचे लोकसेवक, मार्मिक लेखक किंवा प्रतिभाशाली कविही नाहींत, कीं त्यामुळें त्यांचें नांव मेल्यानंतरच प्रसिद्ध होईल, आणि जिवंतपणीं त्यांना लोकांच्या नजरेआड एखाद्या कोनाकोपऱ्यांतच पडून राहावें लागेल. साहेब, प्रस्तुत कैदी हे हिंदुसमाजाचे घटक असून एका उपवर मुलीचे बाप आहेत ! आज त्यांचें नांव त्यांच्या आसपासच्या आबाल-वृद्धांच्या आणि बायकापोरांच्या तोंडीं सारखें गाजत आहे. भोंवतालीं चालणाऱ्या चर्चेवरून त्यांना वाटेल त्या वेळीं हुडकून काढतां येईलच. अशा मनुष्याला गुप्त रीतीनें राहतां येणें आमच्या समाजांत तरी शक्य नाहीं ! शिवाय, मुलीचें लग्न जमलेंच, तर चर्चा कमी होऊन त्यांची चारचौघांत बोलवा कमी होईल खरी; पण हुंड्याच्या रकमेची भरपाई करण्यासाठीं दरोबस्त स्थावरजंगम मिळकतीचें खरेदीखत लिहून देण्यासाठीं त्यांना रजिस्टर-कचेरींत यावें लागणारच; आणि तेथेंच त्यांना त्या वेळीं गिरफदार केलें म्हणजे झालें."

न्यायमूर्तींना माझें म्हणणें तंतोतंत पटून त्यांनीं तिंबूनानांना मोकळें सोडलें आणि आम्हीं ठकीचें लग्न जमविण्याच्या उद्योगाला लागलों.

प्रस्तुत लेखांतील वरसंशोधनाचा कार्यक्रम पाहून हें काम किती बिकट आहे, याची वाचकांस थोडी तरी अटकळ आलीच असेल. आमच्याकडे मुली खंडोबाला वाहण्याच्या, किंवा त्यांचीं निदान कट्यारींशीं लग्नें लावण्याच्या चाली, उपवर मुलींच्या वैतागलेल्या बापांनीं प्रथम पाडल्या असाव्यात, असा माझा समज आहे. श्रीयुत देवलांची 'वल्लरी' म्हणते कीं, "देवा, नको रे हा मेला पोरींचा

जन्म!" याबद्दल मला कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं! परंतु एवढें मात्र मी खात्रीनें सांगू शकतों कीं, 'मेला' हा शब्द वापरण्याची पुरुषांनाही सवलत दिली तर प्रत्येक उपवर मुलीचा बाप अट्टाहासानें म्हणेल कीं,—

"देवा, नको रे हा मेला पोरीच्या बापाचा जन्म!"

# लग्नाच्या मोहिमेची पूर्वतयारी

वर शोधाया जाण्यापूर्वी किती तयारी लागे ॥

—बाळकराम

कोणत्याही महत्कार्याला सुरुवात करण्यापूर्वी त्याची आधीं किती तरी पूर्व-तयारी करावी लागते, याचें थोडक्यांत चटकदार वर्णन शिरोभागीं दिलेल्या अर्ध्या साकींत कवीनें दिलेलेंच आहे! परीक्षेचे कागद तीन तासांत चट्दिशीं लिहून काढण्यासाठीं आलेला उमेदवार आधीं वर्षभर पूर्वतयारी करीत असतो. एखाद्या दिवशीं सकाळीं पेढीच्या दारावर दिवाळें फुंकून मोकळें झाल्याची नोटिस अचानक लावणाऱ्या पेढीवाल्या भागीदारांना चारचार महिने आधीं खलबतें करावीं लागतात. त्याचप्रमाणें माझे मित्र तिंबूनाना यांच्या ठकीसाठीं नवरामुलगा शोधण्यासाठीं पुण्यास येऊन ठेपण्यापूर्वी आम्हांला आधीं किती पूर्वतयारी करावी लागली, याची वाचकांना या लेखांत थोडक्यांत माहिती करून देण्याचें योजिलें आहे.

सौंदर्यपरीक्षणाच्या अनेक दृष्टीपैकीं अत्यंत तीव्र अशा स्त्रीदृष्टीनें पाहिलें तरीही ठकीचें सौंदर्य अलौकिक होतें असें प्रांजलपणानें कबूल करावें लागेल! ठकीची अंगकांति सुवर्ण रंगाची आहे; मात्र ही सुवर्णरचना सोनेरी किंवा तांबड्या शाईनें करून भागावयाचें नाहीं. या रंगामुळें ठकीच्या बहुतांशीं गैरहजीर भोंवयांची उणीव, किंवा धांदरटपणानें डोळ्याबाहेर येऊन भोंवतालच्या प्रदेशांत वागडणाऱ्या काजळाचा फाजीलपणा, हीं दोन्हीही तिऱ्हाइताच्या चटकन् लक्षांत येत नसत. महाकवि कालिदासानें शकुंतलेच्या सौंदर्यसर्वस्वाची जी लतिकेशीं तुलना केली आहे, तीच ठकीच्या बाबतींतही सत्याला न सोडतां करून दाखवितां येईल. इतकेंच नव्हे, तर एखाद्या लतेशीं पूर्ण सदृश न व्हावयाला शकुंतलेच्या ठिकाणीं जी एक मोठी उणीव होती, तीसुद्धां ठकीच्या वर्णनांत भरून निघाली आहे. कारण, शकुंतलेप्रमाणेंच ठकीचे 'बाहू दापे लतिकेचे' व 'कर पल्लव साचे' असून शिवाय एखाद्या लतिकेप्रमाणें ठकीच्या

एका डोळ्यांत फूलही आहे! त्याचप्रमाणें, सुंदर स्त्रीला अप्सरेची किंवा देवांगनेची उपमा देऊन तिला 'देवी' या संबोधनानें पाचारण्याचा प्रघात आहे; या दृष्टीनें पाहिलें तरी, ठकीचें सौंदर्य कसोटीस उतरण्यासारखेंच होतें. तिच्या तोंडाकडे पाहतांच हजारों देवींचें दर्शन घेतल्याचा साक्षात्कार होऊन शिवाय भाविक वारकऱ्याला तर आळंदीच्या वांकड्या विठोबाची आठवण होत असे. कारण, ठकीची मान स्वभावतःच उजव्या बाजूकडे जराशी कलती असल्यामुळें ती नीट उभी राहिली असतांही समोरून पाहणारास परेड करतांना 'आइज राइट'च्या पवित्र्यांत उभ्या असलेल्या शिपायासारखी दिसत असे. एखादे वेळीं कंबर कसून अशा लष्करी पेशांत ठाण मांडिलेल्या ठकीकडे पाहिलें, म्हणजे उजव्या सोंडेचा गणपति किंवा डाव्या तोंडाचा मारुति, यांसारख्या दुर्मिळ दैवतांप्रमाणेंच तिचें अपूर्व कौतुक करावेंसें वाटल्यावांचून राहत नसे.

सौंदर्याकडे पाहावयाच्या दृष्टि अनेक असल्यामुळें, कवितेप्रमाणेंच सौंदर्याचीही व्याख्या करतां येणें शक्य नाहीं, हें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. काशीच्या अयोध्याप्रसादाच्या अर्धांगीला आपल्या पतिराजाच्या दाढीमिशी टोपाच्या जंगलांत सृष्टिसौंदर्याचें माथेरान दिसत असतें, तर रामेश्वरच्या बिजरंगय्याची बायको आपल्या पतिराजाच्या खांद्यावरील सर्वस्वीं तासून काढलेल्या नारळी सागरगोट्याच्या संन्यस्त स्वरूपांतच सौंदर्याची परमावधि पाहत असते. हिंदुस्थानच्या पूर्वेकडच्या प्रदेशांत चीनांगना लिहंगचंगाच्या गजानें मोजण्याजोग्या शेंडीच्या पाशांत गुरफटून जाते; तर पश्चिमेकडे कोणी हबशीण आपल्या शिद्दी मकांड्याच्या डोक्यावरील उगवत्या जागींच मुरकुंडी मारल्यामुळें मुंगळ्यांसारख्या दिसणाऱ्या केशगुच्छावर फिदा असते. महाराष्ट्रभामिनीची कुंदकळ्यांसारख्या शुभ्र दंतपंक्ति पाहून ब्रह्मी सौंदर्य आपली रंगवून काळी केलेली बत्तिशी उपहासानें व्यक्त केल्यावांचून राहणार नाहीं! त्याचप्रमाणें पीतवर्ण चिनी लोखंडी पट्ट्यांनीं आपल्या सहधर्मचारिणीच्या पावलांची वाढ खुंटलेली पाहून खूष होतो! श्वेतवर्ण युरोपियन चामड्याच्या पट्ट्यांनीं आपल्या अर्धांगीच्या कटिबंधाची वाढ थांबविण्यांत आनंद मानतो, तर कृष्णवर्ण हिंदु अज्ञानाच्या पट्ट्यांनीं आपल्या गृहदेवतेच्या डोक्याची वाढ थांबविण्यांत धन्यता मानतो.

सौंदर्यनिरीक्षणाच्या पद्धति देशदृष्टीप्रमाणेंच व्यक्तिदृष्ट्याही बदलत असतात. उदाप्रमाणें अठरा अंगांनीं वांकडेपणा दाखविणाऱ्या व विश्वसौंदर्याचें गालबोट म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुब्जेकडे पाहून, करोडों गोपींवरून फिरून आलेली श्रीकृष्णाची चंचल दृष्टि जादूनें खिळल्यासारखी स्थिर झाली; रघुवीराच्या घोर-

पद्याच्या शाईप्रमाणें लिहितांना निळ्या रंगावरच सीतामाई बहाल होत्या; यथार्थनामा अष्टावक्राच्या स्त्रीनें किंवा सुपाएवढ्या नखांच्या शूर्पणखेच्या पतीनें आपापल्या प्रेमपात्रांबद्दल गवगवा केल्याचा पुराणांतरीं कोठेंही दाखला नाहीं! नागकन्या उलूपीनें गळ्यांत मिठी मारतांना तिच्या शेपटाकडे पाहून, अर्जुनानें आपल्या गळ्यांत ही घोरपड कशाला हवी अशा अर्थाची कुरकुर कधींच केली नाहीं, किंवा श्रीमती सौ. हिडिंबेच्या ताडमाड लांबीच्या सुळ्या-दांतांकडे व 'विक्राळ दाढांकडे' पाहूनही युवराज भीमानें तिला 'दंतव्रण करि गाला' असें म्हणतांना तसुभर माघार घेतली नाहीं. फार कशाला, आपल्या अनुगुणरूप अर्धांगीला देशोधडीं लावून गेल्या पिढींतल्या शिळ्यापाक्या जीवनरसाची लयलूट करणारीं रंगेल नरमौक्तिकें आमच्या टीचभर महाराष्ट्रजनसमुद्राच्या चिखलांतच इतकीं सांपडतील कीं, त्यांची भली लांबलचक वैजयंती सहज करतां येईल सारांश, सौंदर्याची व्याख्या अमर्याद व अंधुक असल्यामुळेंच काळेबेंद्रे व नकट्या नाकाचे कुब्जेचे वंशज घटकाघटका आरशासमोर उभे राहून माकड-चेष्टा करतांना दृष्टीस पडतात.

याप्रमाणें सौंदर्याच्या बाबतींतही 'भिन्नरुचिर्हि लोकः' असल्यामुळें, माझ्या कित्येक वाचकांना ठकीचें सौंदर्य न पटून किंबहुना हास्यास्पदही वाटून, ठकीचें लग्न इतके प्रयत्न करूनसुद्धां न जमण्याचें कारण तिचें लावण्यच असावें, असा तर्कही ते करूं लागतील; परंतु धर्म, हरिश्चंद्र यांसारख्या पौराणिक पुरुषांच्या सत्यप्रियतेचें स्मरण करून मी वाचकांना पूर्वीच सांगून ठेवतों कीं, यद्यपि ठकीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें येत गेलीं, तथापि तिच्या सौंदर्यामुळें तिला कोणीं नाकारल्याचें माझ्या स्मरणांत नाहीं! अडचण पडे ती नेहमीं हुंडा, पोषाख, पत्रिका यांसारख्या महत्त्वाच्या बाबतींतच! नाहीं म्हणावयास एका तरुण वयाच्या टारगट सुधारकानें मात्र पत्रिका जमत असूनही केवळ मुलगी पसंत नाहीं अशा क्षुल्लक कारणामुळें आम्हांला निरोप दिला! अर्थात आजकाल वडीलधाऱ्या माणसांची लग्नासारख्या धार्मिक गोष्टींतसुद्धां अवज्ञा करण्याचें जें तरुण खूळ माजलें आहे, त्यावर मखलाशी करण्यासाठींच त्या पोरानें ही पोरकट सबब पुढें आणली, हें उघड उघड दिसतेंच आहे.

अरेरे! बरेंवाईट समजूं लागण्यापूर्वीच लग्नाच्या शृंखलेंत स्वतःला बांधून घेऊन मोकळे होणारे, किंवा हुंड्यापाड्यांची नीट व्यवस्था लागतांच वडिलांनीं तारेनें तिथिनिश्चय कळविल्याबरोबर एखाद्या वीराप्रमाणें लग्नमंडपांत सुमुहूर्तीं येऊन थडकणारे ते आमचे पितृभक्तिपरायण आर्य नवरदेव आज कोठें गेले?

सुधारकमतकुरांना मुलगी देण्याची चूक आमच्या हातून झाली नाहीं, याबद्दल पुढें आम्हांला मोठें समाधान वाटलें; कारण कांहीं दिवसांनीं मशार-निल्हे टारगट, एका इराण्याच्या दुकानांत राजरोसपणें चहा घेतांना दृष्टीस पडले. जातीचा हिंदु, पण हाडाचा मात्र नाहीं! सदरहु दुकानांत आम्हीं एका कोपऱ्यांत बसलेले असल्यामुळें स्वारीच्या मुळींच दृष्टीस पडलों नाहीं! बशींतल्या ऊन चहावर फुंकर टाकण्याच्या मिषानें तिंबूनाना त्या पापभ्रष्ट सुधारकाबद्दल निराशेचे दीर्घ निःश्वास टाकूं लागले. नानांच्या मनोभावाला शाब्दिक स्वरूप देण्यासाठीं मी म्हणालों, "नाना, बरें झालें या कर्मनष्टाच्या गळ्यांत आपण ठकी बांधली नाहीं! सुधारकाला पोर देणें म्हणजे पोरीचा पुनर्विवाह लावण्यासारखेंच मी समजतों! मग धडधडीत एखाद्या गुत्त्यांत नेऊन पोरीला दारूच्या पिंपांत कां लोटूं नये! ('सुधारक' या शब्दानें तिंबूनानांना दारू व पुनर्विवाह यांखेरीज कसलाही बोध होत नसे!) अरे, चांगले हिंदु म्हणवतां, आणि इराण्याच्या दुकानांत! नाना, स्वारीची जरा उडवतोंच आतां! (मोठ्यानें) "अहो शिष्ट! आपले वडील हिंदुच होते ना?"

प्रश्नाचें उत्तर दिल्यांवाचून स्वारी येथून चालती झाली. प्रश्नांत थोडी खोंच होतीच; तिनें स्वारी वरमली आणि दुसरें काय? आमच्या शेजारच्या बांकावरचे दोनचार मुसलमान या वेळीं हंसावयास लागले. उघडउघड ते आमच्या धर्मग्लानीलाच हंसत असावेत! त्यांच्या हंसण्यानें बिचारे तिंबूनाना मात्र ओशाळल्यासारखे दिसूं लागले. बरोबरच आहे, कां दिसणार नाहींत? आमच्या सनातन समजांतलीं जातिबंधनें याप्रमाणें तटातट तुटतांना पाहून कोणाचें हृदय तसेंच तुटणार नाहीं? आमच्या धर्मरक्षकांनीं इकडे जरूर लक्ष घालावयास पाहिजे. प्राचीन काळीं द्वैतमताचें खंडन करून अद्वैताची स्थापना करणाऱ्या आद्य शंकराचार्यांनीं आपल्या एकट्याच्या सामर्थ्यानें भगवंतांनीं निर्मिलेल्या चार वर्णांच्या एकदम अठरा जाति केल्या; आणखी आज शेंडीस रुपया वसूल करण्यासाठीं उभ्या वर्षांतून अवघे पांचदहा तरी शंकराचार्य येत असून सर्वांना मिळून या अठरापगड जातींचे पदर उलगडून आणि अठराशें जातींच्या चिंध्यापांध्या करतां येत नाहींत. तिकडे सुधारक लोक कोंकणस्थ-देशस्थांतला भेद केवळ प्रांतिक म्हणून मोडण्याच्या खटपटींत आहेत, तोंच इकडे आपण कोंकणस्थांत रत्नागिरे, कुडाळे, किंवा देशस्थांत नगरी, सोलापुरी, पुणेरी यांसारखे जिल्हेवारीनें भेद करून, किंबहुना कुटुंबागणिक जाति निर्माण करून व सर्वांमधून इथूनतिथून रोटीबेटीव्यवहाराचे निर्बंध पसरून सनातन धर्माला मजबुती

कां वरें आणूं नये? अशा प्रयत्नानें सुधारकांचा तेव्हांच पाडाव होईल. पण लक्षांत कोण घेतो? एका आधुनिक कवीनें म्हटलें आहे, '**धर्मगुरु ते निःसत्त्व दंडधारी**' तें कांहीं खोटें नाहीं!

वरील धर्मविषयक विषयांतराबद्दल वाचकांची माफी मागून व या सुधारकी अपवादाखेरीज ठकीच्या सौंदर्याला कोणींही नांवें ठेवलीं नाहींत असें पुन्हा सांगून मी पुढच्या मार्गाला लागतों.

पहिल्या दोनतीन वर्षांतल्या आमच्या पुण्यावरच्या वैवाहिक मोहिमा हिंदुस्थानभर एकामागून एक सतरा धांवत्या स्वाऱ्या करूनही अखेरीस असंतुष्ट राहणाऱ्या गिझनीच्या महंमदाच्या उनाड धोरणावर करण्यांत आल्या होत्या. आम्ही मोठमोठाल्या शहरीं चारसहा दिवसांच्या येऊन जाऊन खेपा घालीत असूं. या खेपेस आम्हीं आमचें धोरण बदलून महंमद घोरीच्या चिरस्थायी तत्त्वाबरहुकूम पुण्यांत चारसहा महिने कायमचा तळ देण्याचा मनसुबा केला; पावसाळ्याचे चार महिने आम्हीं आमच्या गांवीं राहून विवाहविषयक वाङ्मय वाचण्यांत घालविले. हेतु हाच कीं, गोत्र, पत्रिका, जात, कूळ वगैरे सर्व बाबींबद्दल आमचें आम्हांलाच कळून, पुढें उगीच वेळाचा अपव्यय होऊं नये! या विचारास अनुसरून आम्हीं मनुस्मृति, विवाहविधि, नवरदेवाची जोडगोळी, पाराशरस्मृति, मेन्स हिंदु लॉ, मिताक्षरटीका, जबरीचा विवाह, लग्नसंस्था वगैरे विवाहविषयावरील ठळक ठळक पुस्तकें वाचून टाकिलीं. मीं तर पुनर्विवाहावरील एकदोन पुस्तकेंसुद्धां हातावेगळीं केलीं. त्याचप्रमाणें गुदस्तां खटपटी करतांना ज्या अडचणींचा अनुभव आला होता त्याचें यंदां आधींपासून निराकरण करण्याचा निश्चय केला. विषयाला सुरुवात होण्यापूर्वीच आडनांवांमुळें गोत्रांचा '**प्रथम ग्रासे मक्षिकापातः**' होऊं नये म्हणून आधीं आम्हीं दोघांनींही आमचीं मूळचीं आडनांवें बदलून अनुक्रमें देशपांडे व कुळकर्णी हीं संदिग्ध स्वरूपाचीं सामान्यनांवें घेतलीं; आणि ठकीच्या गृहस्थपेशाच्या मामाला त्याच्या नकळत जोशी बनविलें. ज्येष्ठांत ज्येष्ठ मुलाचें लग्न करण्याचा प्रघात नाहीं असें कळल्यामुळें, ज्येष्ठ मुलाच्या बापाला ज्येष्ठांत लग्न करण्याची गळ घालण्यांत फुकट वेळ न घालविण्याचें ठरविलें. इतकेंच नाहीं, तर एखाद्याला वाजवीपेक्षां अधिक मुलें असलीं, तर त्याच्याकडे अधिक महिन्यांत जावयाचें नाहीं, असाही निश्चय केला. एके ठिकाणीं आमचे कपडे पाहूनच आमच्या दारिद्र्यासकट हुंड्याची अटकळ बांधुन एका श्रीमंतांनीं आम्हांला देवडीवरूनच निरोप दिल्यामुळें, या खेपेस पुण्यास गेल्याबरोबर आम्ही दोघांसाठीं उंची पोषाख करण्याचें 'बजेट'

मंजूर करून घेतलें. तिबूनानांच्या कुटुंबाश चार वर्षांखालीं देवाशा झाली होती, तें व्यंगसुद्धां एके ठिकाणीं आड आलें होतें. बहुतेक बाबतींत उभयपक्षांचें चांगलें जमूनही वरपक्षानें अखेर मुलाला साधू नाहीं, या कारणामुळें लग्न फिसकटविलें होतें. त्या प्रकारची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून नानांनीं पहिल्या मुहूर्तालाच स्वतःला चतुर्भुज करून घेऊन ' चक्षुर्वै सत्यम् ' या न्यायानें प्रतिपक्षाचें समाधान करण्यासाठीं आपल्या नूतन कुटुंबाला बरोबर घेण्याचें ठरविलें. कांहीं जुन्या मतांचीं माणसें मुलीचें वय जास्त असलें म्हणजे कांकू करतात, हें लोकविश्रुत आहेच. ही अडचण दूर करण्यासाठीं पूर्वी चित्रगुप्ताच्या जमाखर्चावर दरोडा घालून ठकीचें वय चोरण्याचा आमचा परिपाठ असे; परंतु अशी लबाडी उघडकीस आल्यामुळें एकदां आम्हांला हातीं आलेलें स्थळ दवडावें लागलें; म्हणुन यंदा आम्हीं निराळीच तजवीज केली. ठकीच्या वयोवर्णनाला तिखटमीठ लावण्याऐवजीं आम्हीं सालमजकुरीं ठकीचें मीठ अजिबात तोडून व तिला एकभुक्त ठेवून तिच्या वयांत बरीच काटकसर केली. आमचे मित्र चिंतोपंत यांच्या सूचनेप्रमाणें माजोरी बैलप्रमाणें ठकीला ऊन पाण्याचा रतीबही सुरू केला होता.

असाच समजुतीचा घोटाळा एकदां पत्रिकेच्या बाबतींतही झाला होता. ठकीला मंगळ आहे किंवा नाहीं, याविषयीं मी सेमिरामीस राणीची पहिली मंगळागौर कोणत्या सालीं झाली, या प्रश्नाइतकाच माहितगार होतों. एखाद्या पत्रिकेकडे पाहून मला डॉक्टरनें लिहून दिलेल्या प्रिस्क्रिप्शनकडे पाहण्यापेक्षां जास्त बोध होत नसे. मंगळवारीं जन्मलेल्या मुलालाच काय तो मंगळ असतो, अशी माझी अंधुक समजूत असे. एके ठिकाणीं सर्व गोष्टी बिनबोभाट पटून मुलगा अमंगळ असल्यामुळें मुलीलाही मंगळ नसल्याची खात्री होतांच तिथिनिश्चय करण्याचें त्याच्या बापानें कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं आम्हीं ठकीची एक बनावट जन्मपत्रिका तयार करून तिच्यांतून मंगळाला अजिबात अर्धचंद्र दिला, व ती त्या गृहस्थाच्या स्वाधीन केली. पत्रिकेकडे बराच वेळ निरखून पाहून अखेरीस मंगळाचा उल्लेख करावयाचा चुकून राहिल्याबद्दल त्यांनीं शंका प्रदर्शित करितांच मी अजाण बालकाच्या निर्दोष हास्यमुद्रेनें म्हणालों, " चुकून राहिला नाहीं ! मुलीलाच मुळीं मंगळ नाहीं, मग पत्रिकेंत कोठून येणार ! "

हें उत्तर ऐकतांच त्या गृहस्थानें संतापानें पत्रिका जमिनीवर फेकली. त्याच्या तांबड्यालाल डोळ्यांच्या जागीं एक सोडून दोन मंगळ दिसूं लागले. अशा मंगलदृष्टीनें तो गृहस्थ आमच्याकडे पाहात असतांहि आम्ही शनीसारखे

काळेठिकर पडलों, व अखेरीस आम्हीं मंगळाची जी दशा केली होती तीच त्या गृहस्थानें आमची केली! या अनुभवामुळें बनावट मृत्युपत्राप्रमाणें बनावट जन्मपत्रें करण्यालासुद्धां निर्ढावलेला धंदेवालाच लागतो अशी खात्री होऊन या वर्षी आम्हीं आमच्या आबाभटजींनाच बरोबर घेतलें होतें. यंदा लग्न पार पाडल्याखेरीज फिरावयाचें नाहीं अशी आम्हीं प्रतिज्ञा केली असल्यामुळें चातुर्मासांत सुद्धां जमल्यास कार्य उरकून घेतां यावें म्हणून, पुढीलप्रमाणें दूर-दर्शीपणाची तरतूद ठेविली. व्यंकटगिरीस जाऊन चातुर्मासांत किंवा कृष्णानर्मदा यांमधील प्रदेशाखेरीज इतरत्र कोठेंही अगदीं सिंहस्थांतसुद्धां लग्न करावयास हरकत नाहीं अशा अर्थाचा मजकूर जुनाट जुनरी सुडाच्या कागदावर शिन्याच्या शाईनें लिहून जास्त जुनाट रंग देण्यासाठीं तो कागदाचा फळका मंदाग्नीनें तव्यावर जरासा परतून घेतला, व त्याला जुन्या धार्मिक आज्ञापत्राचें पूर्ण स्वरूप देण्यासाठीं त्याखालीं भृगुसंहितेंतहि ज्यांच्या पत्रिका नमूद केल्या नाहींत अशा काल्पनिक वेदोनारायणांचीं नांवें घालून शेवटीं माहुलीचे रामशास्त्री प्रभुणे व काशीकर गागाभट्ट यांच्याही सह्या ठोकून दिल्या.

गेल्या सालीं पुण्यांतल्या टांगेवाल्यांशीं भाडें ठरविण्याची घासाघीस करण्यांतच आमची अर्धीअधिक शक्ति खर्च होऊन जात असल्यामुळें मुलांच्या बापाशीं हुंड्याबद्दल घासाघीस करण्यापुरता जीवच आमच्यांत उरत नसे. यासाठीं यंदां आम्हीं नानांची थोरली तट्ट्याची गाडी पुण्यास नेण्याचें ठरविलें; व एक चांगलासा मुहूर्त पाहून तिबूताना, आमच्या नव्या वहिनी, ठकी, नानांचा चिमण्या, आबाभटजी, रंगू गाडीवाला, दोन बैल व मी आपआपल्या सामानसुमानासकट गाडी घेऊन निघालों. आमच्याबरोबर सामानसुमान पुष्कळच होतें. ठकीचीं व नव्या वहिनींचीं वासनें, वेणीफणीचीं बाक्सें, पेट्या, आमचीं बोचकीं, दोनचार वळकट्या, आंबाडा औषधांचा झोळणा, तंबाखूचा बटवा, भजनाचा पखवाज, त्रिनखुंट्यांची व तुटक्या तारांची एक सतार, चिमण्याची 'शिलेटपेनसल', रंगूची घोंगडी, गोधड्या, आमचीं भांडींकुंडीं, चार महिन्यांच्या बेगमीचा दाणागोटा वगैरे सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या वैचित्र्याचें आमच्या गाडींत एक लहानसें प्रदर्शनच झालें होतें.

पुण्यास आल्याबरोबर प्रथम आम्ही पोशाखाचें 'एस्टिमेट' करावयास लागलों. उद्धारक किंवा सुधारक यांपैकीं कोणाच्याही घरीं प्रवेश होण्यास मज्जाव नसावा म्हणून नानांनीं जुन्या चालीचा व मीं नव्या थाटाचा पोषाख करावयाचें ठरविलें. साधारणपणें दोघांचा 'कंप्लीट आउटफिट' व्हावयास

अदमासें पाऊणशें रुपयांच्या घरांत जाईल असा माझा अभिप्राय ऐकतांच आम्ही मोकळ्या मैदानांत असूनही तिंबूनाना जीव गुदमरल्याचा अभिनय करूं लागले! नानांना हंसतहंसत टोमणा देण्याच्या उद्देशानें मी म्हणालों, "नाना! आतां पाऊणशें रुपयांचा पोषाख घ्यावयाला कचरतां; मग उद्यां जांवयासाठीं पोषाख करतेवेळीं काय करणार तुम्ही?"

नानांनीं गंभीरपणानें उत्तर दिलें, "बाळकराम, वेड्या उगीच पैसे पाण्यांत घालण्यांत काय हंशील? तुझ्या पोषाखाचा खर्च म्हणजे निव्वळ बुडीत खर्च! जांवई पोषाखाबरोबर ठकीलाही पत्करील हें तूं विसरतोस! तेव्हां त्याच्यासाठीं कां नाहीं हवा तसा खर्च करणार! चल; पत्कर तूं ठकीला आणि—"

नंतर चार दिवसांनीं मी सावध झालों!

एका दवाखान्यांत पांढऱ्या सफेत चादरीच्या बिछान्यावर मला निजविलें होतें. माझ्या लोखंडी खाटेच्या उशाल्गतच तिंबूनाना बसले होते. माझ्या अंगांत फणफणलेला ताप टीचभर थर्मामिटरच्या काबूंत येण्यासारखा नसल्यामुळें डिगऱ्यांची मोजमाप करण्यासाठीं वांव-दीडवांव लांबीची तीनचार ब्यारोमिटरें आणून ठेविलीं होतीं. जवळच दहावीस जणांचा घोळका बसला होता. त्यांच्याकडे मीं जिज्ञासापूर्वक पाहतांच नानांनीं पुढील माहिती दिली.

ठकीच्या लग्नाच्या खटपटींत मला नानांबरोबर बरेच हेलपाटे घालणें आवश्यक असल्यामुळें, प्रस्तुत प्रसंगाप्रमाणें थट्टेच्या बोलांनींसुद्धां माझ्या हृदयाला असे धके बसूं लागले, तर कामांत वारंवार व्यत्यय येण्याची भीति होती. सबब माझें नाजुक हृदय (Heart) काढून टाकून त्याच्याऐवजीं अशा प्रसंगीं टकर देण्याजोगें कठीण हृदय बसवून घेण्यासाठीं नानांनीं चार साधे डॉक्टर, तीन देशी वैद्य, एक गुरांचा डॉक्टर, दोन वैदू, एक खाटीक व एक चांभार, एवढ्यांची एक कमिटी बसविली. कमिटी हल्लीं त्या विषयाचा खल करीत होती. कमिटी मधून मधून मजकडे पाहत होती; जो-तो आपल्या परीनें इलाज सुचवीत होता. माझें मूळचें हृदय कापून काढण्याबद्दल सर्वांचें एकमत होतें. वादविवाद फक्त बदली देण्याबद्दलचा होता. डॉक्टर लोकांनीं एखाद्या मेलेल्या माणसाचें चांगलेंसें हृदय पाहून तें बसविण्याची सूचना पुढें आणिली. खाटकाच्या मनांतून बकऱ्याचें काळीज वापरावयाचें होतें. वैद्य मंडळानें तळहाताएवढी कुरेदाची शाळुंखा करून बसविण्याचें योजिलें. सालंमिस्री आणि सफेदमिस्त्री यांची समभाग पुरचुंडी कोल्ह्याच्या कातडींत गुंडाळून माझ्या हृदयाच्या जागीं ठेवावी, असें वैदूचें म्हणणें होतें. गुरांचा डॉक्टर पिसाळलेल्या कुत्र्याच्या जिभेचा तुकडा वापरण्याचें

शिफारस करीत होता, आणि चांभार तर माझ्या नाजुक हृदयालाच जुन्य जोड्यांतला सुखतळ दोन्ही बाजूंनीं शिवून घेतला म्हणजे आणखी दोन वर्षें तरी पाहावयास नको, असें छातीला हात लावून सांगत होता. शेवटीं डॉक्टरांचा विजय झाला; कमिटीनें आपला अभिप्राय नानांना कळविला.

त्या दिवशीं दवाखान्यांत एका शास्त्र्याचें, एका तरुण सुधारकाचें व एका दरोडेखोराचें अशीं तीन प्रेतें येऊन पडलीं होतीं. शास्त्रीबोवांच्या घरीं त्यांच्या तीन विधवा मुली, दोन तरुण विधवा बहिणी व उत्तरवयांत केलेल्या दोन पोरसवदा स्त्रिया, याप्रमाणें सारी बायकामंडळीच असल्यामुळें स्मशानयात्रेची तरतूद करून ठेवण्यासाठीं दूरदर्शीपणानें ते होऊनच मरायला दवाखान्यांत आले होते; साऱ्या जन्मभर सुधारणेच्या लांबलांब बाता मारल्यावर एकाएकीं पत्नी परलोकवासी झाल्यामुळें स्वतःवर आलेला पुनर्विवाहाचा प्रसंग टाळण्यासाठीं सुधारकानें अफू खाऊन जीव दिला होता; आणि दिवसाढवळ्या एके ठिकाणीं दरोडा घालीत असतांना गवगवा झाल्यावर चौथ्या मजल्यावरून उडी टाकल्यामुळें दरोडेखोराला मरण आलें होतें. तिघांचींही प्रेतें फाडून पाहतां सुधारकाचें हृदय माझ्या हृदयापेक्षांही कमकुवत होतें, असें ठरलें. सूक्ष्मदर्शक यंत्रानें शोधून पाहतांही शास्त्रीबुवांच्या हृदयाचा थांग न लागल्यामुळें त्यांना हृदयच नव्हतें, असें सिद्ध झालें; आणि दरोडेखोराचें हृदय काळजासकट उरफाटें लोंबकळत असलेलें आढळून आलें. अखेर सर्वानुमतें त्याचीच निवड झाली. पुढें मला दोन दिवस कोकाईनच्या पिंपांत भिजत घातल्यावर माझें हृदय कापून काढून त्याच्या जागीं त्या दरोडेखोराचें उफराटें हृदय सुल्टं करून चिकटवून दिलें, आणि त्याची क्रिया अव्याहत चालण्यासाठीं एक रास्कोप सिस्टिम लिव्हर वॉच कायमची किल्ली देऊन त्यावर बसविलें. याप्रमाणें हें 'ऑपरेशन' सुखरूप पार पडलें, व आम्ही आपल्या कार्याला लागलों.

वरील हकीकतींत वाचकांना एखादादुसरा शब्द अतिशयोक्तीचा आहे असें वाटण्याचा संभव आहे; परंतु ईश्वराला स्मरून मी प्रतिज्ञा करतों कीं वरील मजकुरांत एक अक्षर वावगें लिहिलें असल्यास, ज्या टांकानें मी लिहीत आहें त्याची बोथी झडून जावो !*

नानांनीं स्वतःसाठीं जुन्या दक्षिणी तऱ्हेचा गुढघ्याशीं गोष्टी सांगणारा मलमलीचा अंगरखा बरोबर आणलेला होताच. त्याचे हात चुण्याचे असून त्यापैकीं

* मी नवी दुसरी आणीन. – बाळकराम.

एकेकाची लांबी इतकी होती कीं, दोहींचे नेहमींच्या हाताएवढाले तुकडे पाडले असते तर हजार हातांच्या सहस्रार्जुनालाही त्या अंगरख्याच्या बाहेरची तसूभर धांदोटी लावल्यावांचून उपयोग करून घेतां आला असता. नानांच्या फार तरुण-पणीं त्यांनीं एकदां ' विदाउट तिकीट ' प्रवास करून पाहिला होता, त्याप्रसंगीं ' मिशार निव्हे ' अंगरखा त्यांच्या अंगांत होता. बोरीबंदर स्टेशनवर तिकिट-कलेक्टरला ' पास ' असें सांगून झटक्यासरशी बाहेर येताना त्यानें आपला हात धरल्याचें गिरगावांत येईपर्यंत नानांना कळलें नाहीं, असें ते सांगत असतात! थोडक्या वेळांत चुमण्याच्या हातावरून पत्ता काढीत येऊन तिकिट कलेक्टरानें नानांजवळून योग्य ते पैसे वसूल करून घेतले! हा अंगरखा अंगांत असला म्हणजे इंद्रायणी, मुळामुठा या नद्यांना नाना ' हातभर लांबीचे झरे ' असें तुच्छतापूर्वक म्हणत असत. नानांच्या आजोबांच्या लग्नप्रसंगीं त्यांना पोषाखावर मिळालेलें दीडशें हात लांबीचें व मूळच्या तांबड्या व जुनेपणाच्या काळ्या अशा दोन्ही रंगावर सारखाच हक्क दाखवणारें पागोटें मुहूर्तार्थ म्हणून नानांनीं बरोबर आणलें होतें. मात्र तें पुन्हा बांधून देण्यासाठी पुण्यांतल्या साऱ्या पगडबंदांनीं मिळून कमींत कमी एक वर्षाची मुदत मागितल्या-मुळे आणि खडकवासल्याच्या धरणांत कपडे धुण्याची परवानगी नसल्या-कारणानें धोबी लोकांनीं ' टाटास्कीम 'चा तलाव तयार होईपर्यंत धीर धरावयास सांगितल्यामुळें नानांनीं तें पागोटें जुन्या स्वरूपांतच वापरण्याचा निश्चय केला. या पागोट्याला मधून विसावा देण्यासाठीं नानांनीं स्वतःचा जुना रुमालही आणला होता. वस्त्रसृष्टींतले लागेबांधे प्राणिसृष्टींतल्या लाग्या-बांध्यांप्रमाणें काळाबरोबर दृढ न होतां उलट तुटत जात असतात, या न्यायाला अनुसरून, नानांच्या रुमालाचें व त्याच्या जरीच्या कांठाचें अलीकडे नीटसें सूत जमत नसल्यामुळें, त्यांचें परस्परांशीं इतक्या तुटकपणाचें वर्तन असे कीं, तें दुरून पाहणाराच्याही दृष्टीला येई. त्यांचा तात्पुरता सलोखा संभाळण्यासाठीं रुमाल बांधून झाल्यावर त्याचे लोंबकळणारे कांठ वरून गुंडाळून घ्यावे लागत असल्यामुळें तो रुमाल चापूनचोपून बांधल्यानंतर गुजराती नाटकातल्या राजांच्या मंदिलाप्रमाणें शोभिवंत दिसे, आणि एखादे वेळीं सारे कांठ उलट्या पद्धतींत बसले म्हणजे त्यांत ओतारी लोकांच्या बेढौल पागोट्यांतली साधेपणाची झांक दिसून येई. नानांच्या पोषाखांत वीतभर रुंदीच्या करवतीकांठी नागपुरी उपर-ण्याचा उल्लेख केला, म्हणजे त्याचें वर्णन पूर्ण होतें. विरल चाललेल्या पोतामुळें नॉटिंगहॅमच्या जाळीदार विलायती कापडांतला पारदर्शकपणाचा अपूर्व गुण या

पौर्वात्य कारागिरींत अलीकडे स्वतः दिसून, पलीकडचे पदार्थही स्पष्ट दाखवूं लागला होता. मळक्या जुनेपणामुळें निळसर झालेल्या या अंबरपटाच्या भर मध्यावर अगदीं नव्या हारकचें जाड ठिगळाचें पूर्ण चंद्रबिंब चमकत होतें. ही चंद्रकळा दिवसाढवळ्या पुरुषाच्या अंगावर दिसूं नये, म्हणून नानांना उपरणें ठाकठीक उभें चुणून केवळ कांठांचा कमरपट्टा कंबरेभोंवती गुंडाळावा लागे !

माझ्या पोषाखाची धाटणी सुधारलेल्या बाण्याची होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे; परंतु नवाईनें नटण्याच्या हुच्चपणानें जुन्याला अजिबात चाट देण्याइतके अनुकरणांध मात्र आम्ही झालों नव्हतों ! बुटाचे लेस व खिशांतले हातरुमाल यांखेरीज बाकीच्या दरोबस्त चिजा जुन्या असून त्यांपैकीं बहुतेक तर जुन्या बाजारांतूनच घेतल्या होत्या, हें सर्व सांगावयास मला अभिमान वाटतो ! प्रथम पगड्यांची टूम निघाली त्या वेळीं नानांच्या वडिलांनीं एक सुबक पिवळी पगडी घेतली होती. तिचा माझ्यासाठीं जीर्णोद्धार करावयाचा नानांनीं निश्चय केला. नवेपणीं शंकराच्या जटेंतून निघणाऱ्या गंगामुखाप्रमाणें वर डोकावणारी पगडीची कोकी काळपुरुषाच्या बोजड पायांखालीं चिरडून पगडीच्या घेराच्या पातळीशीं समांतर झाली होती. तिचा जर काळाठिक्कर पडल्यामुळें नारळाच्या चोडासारखा किंवा पार करपलेल्या करंजीसारखा दिसूं लागला होता. थोर घराण्यांतल्या कुलवधूप्रमाणें तिलाहि आज कैक वर्षें सूर्याचें ऊन कसें तें माहीत नव्हतें. अर्थात् अशा कुलवधूची आपल्या मालकाच्या डोक्यावर बसण्यापेक्षां त्याच्या पायाशीं लोळण घेण्याची विशेष प्रवृत्ति दिसल्यास नवल नाहीं. शेवटीं आर्य नवरदेवाचे पूर्ण हक्क घेऊन मीं कातड्याच्या ल्हानशा वादीनें इंग्रजी टोपीच्या धर्तीवर पगडीला डोक्यावर खिळून टाकली. माझा तांबड्या रेघांचा कफचा सदरा आंत घालून त्याची मूळची पडती कॉलर असूनही तिला एका नव्या कॉलरीची जुलुमाची जोड दिली. जुन्या बाजारांत एका काबुल्याजवळून एक खाकी रंगाची इजार व सोजिराचा तांबडा बनातीचा कोट अगदीं सस्तांत मिळाल्यामुळें नवीन मालाच्या दगदगींत मुळींच पडावें लागलें नाहीं. कोटाची शिवण ठिकठिकाणीं उसवल्यामुळें एखाद्या मुलानें फाजील हुंड्याची मागणी करतांच खांकाबगला वर करून मोकळें होण्याची चांगलीच सोय जमून आली होती. बिचारीच्या डाव्या पायाला मात्र गुडघ्यापासून खालीं जाजमाच्या जुन्या खारव्याची जोड दिली असल्यामुळें, लांबून पाहणारास माझा एक पाय लांकडाचा असावा असा भास होत असे. आम्हीं रहावयास जें बिऱ्हाड घेतलें होतें, त्या जागीं आमच्या आधीं राहणाऱ्या पलटणींतल्या एका परदेशी पेन्शनर

जमादारानें, घर सोडतांना आपल्या जुन्या बुटांचा जोड टाकून दिला होता, तो अनायासेंच आमच्या उपयोगी पडला. बुटांत तळवे साफ गेलेला एक पायमोजांचा जोडही सांपडला. मोज्यांना तळवे नसल्यामुळें एकपरी बरेंच झालें होतें! कारण, जुनें धोरण न सोडतां होता होईतों 'अप्टुडेट फॅशन'मध्यें असण्याचा माझा विचार असल्यामुळें, मी विजार मूळची थोडीशी लांडी असतांही तिला चारचार बोटें दुमडून घेत असें, व अशा रीतीनें उघड्या पडलेल्या पोटऱ्या बूट घातल्यावरही मोजे हवे तितके अलग वर ओढून घेऊन झांकून न टाकतां येत असत. नानांच्या उपरण्याचेंच जुळें भावंड माझ्याही कटिखांद्यावर खेळत असे. माझ्या हृदयांतच घड्याळ असल्यामुळें बाह्यात्कारी मीं एक शेंडाच खिशांत लटकावून दिला होता. अर्थात् या घड्याळाकडे मला अध्यात्मदृष्टीनेंच पाहावें लागत असे, हें सांगणें नकोच. उपरण्याचे कांठ अस्ताव्यस्त होऊं नयेत म्हणून टांचण्यांनीं मीं त्याला लांबलचक गळपट्याचें स्वरूप दिलें होतें. खिशांतला हातरुमाल वारंवार धुण्याची दगदग पडूं नये म्हणून त्याची सुरेख घडी घालून एका बाजूला टिपकागदाचा एक बेताचा तुकडा टांचण्यांनीं अडकवून टाकिला. घाम पुसते वेळीं अर्थातच मीं टिपकागदाचा उपयोग करून हातरुमाल जशाचा तसा ठेवीत असे. याप्रमाणें काळे बूट, पांढरे पायमोजे, खाकी तुमान, तांबडा कोट आणि पिवळी पगडी, अशा विविध रंगाचा साज घातल्यावर मी अक्षरशः पंचरंगी पोपटाप्रमाणें दिसत असें, व कधींकधीं तर उपरणें गळ्याभोंवतीं गुंडाळून ऐटीनें दोन्ही सोगे टाकून कंठ फुटल्याची खूणही पटवून देत असे.

'एक नूर अदमी और दस नूर कपडा' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं! कारण, एकच तिंबूनाना, पण कपड्यांत जराजरा फेर केला, कीं निरनिराळे दिसूं लागत! पांढरा स्वच्छ पायघोळ अंगरखा न कमरेभोंवतालचा उपरण्याचा कंबरपट्टा चढवून वर मोठें पागोटें ठेवलें, म्हणजे त्यांच्याकडे पाहतांच कृष्णशास्त्री चिपळूणकर, सर दिनकररावराजे राजवाडे, केरूनाना छत्रे वगैरे गेल्या शतकांतल्या त्या मध्यान्हीच्या तेजोभास्करांची आठवण होई; पगडी काढून पांढरा फेटा नीटनेटका बांधतांच तेच तिंबूनाना रेल्वेस्टेशनावरील रिफ्रेशमेन्ट रूमच्या दरवाज्यावरच्या 'वेटर'सारखे दिसूं लागत. आणि रुमाल काढून बोडके राहतांच देशी मिशनऱ्यांसारखे दिसत; रुमाल जरासा अस्ताव्यस्त बांधून गादीवर बसतांच अयोध्येच्या नबाबासारखे किंवा मशीर उल्मुल्कासारखे शोभूं लागत. मीसुद्धां कमरेला उपरणें गुंडाळून व बूट काढून उभा राहतांच गाडीमागें उभ्या

राहणाऱ्या 'सइसा' सारखा दिसत असें.

माझें ऑपरेशन व आमचे पोषाख होईपर्यंत गेलेला वेळ आम्हीं पूर्वतयारीच्या किरकोळ बाबती उरकून घेण्यांत घालविला. पूर्वतयारींत कोणतेंही न्यून म्हणून राहूं द्यावयाचें नाहीं, अशी आमची भीष्मप्रतिज्ञा होती. हुंड्यापांड्याचें जमून ऐन वेळीं रकम उभी करावयास अडचण पडूं नये म्हणून आबाभटजींना गांवीं पाठवून नानांच्या स्थावरजंगम मिळकतीचें तपशीलवार टांचण व खतेंपत्रें आणविलीं होतीं. खानेसुमारीच्या ऑफिसांत जाऊन हिंदुस्थानांतील लहानमोठ्या अविवाहित हिंदु लोकांचा नक्की आंकडा आणविला. भद्रेश्वर दीक्षितांचा पुण्यांतला सारा गोतावळा जमवून वरसंशोधनार्थ दाही दिशांकडे उधळून दिला. तमाम न्हावी लोकांना हजामती करतांना आपापल्या यजमानांजवळ आमच्याबद्दल गोष्टी काढण्याची पगारी कामगिरी सांगून टाकिली; ठळक अक्षरांत काढिलेल्या चार शिळांच्या मोठमोठ्या जाहिराती छापून साऱ्या भिंताडांवरुन व बुरुजांवरून फडकवून दिल्या. जाहिरातींतील मजकूर :—

येणार! येणार!! येणार!!!

गेल्या वर्षीचीच मंडळी पुन्हा येणार!!

नवीन पोषाख! नवीन मंडळी!!

ठकीच्या लग्नासाठीं!

पुढील महिन्यांत!

ठकीसह तिंबूनाना!

आबाभटजींसह झिमण्या!

जांवयास पोषाखासह नानाचें मुहूर्ताचें —

पासपोर्ट बक्षीस.

वि. मा. ह. प. पाहा.

मॅनेजर, बाळकराम.

या जाहिरातीनें पुणें शहरभर आमचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. लागलीच आम्हीं त्यांच्याही पुढें जाऊन ठिकठिकाणच्या वृत्तपत्रांतून व मासिक पुस्तकांतूनही पुढील आशयाची जाहिरात झळकावयास लाविली.

लग्नास तयार !

वर पाहिजे ! वधूपक्षाची कसलीही अट नाहीं ! ! मुलगी उत्तम, सुरेल, नाकींडोळीं नीटस. वयानें तिच्या पाठच्या भावापेक्षां थोडी मोठी. शरीरानें मुदद, बाळबोध वळणाची. हुंडा भरपूर. पत्रिका हव्या तितक्या. मुलीच्या सौंदर्याची आम्हींच तारीफ करण्यांत अर्थ नाहीं. अगदीं अम्बाधानेंसुद्धां [तिच्या रूपानें चकित होऊन शून्यदृष्टीनें तिजकडे पाहात रहावें. दोन मुली एकदम करणारास एक मुलगी इनाम ! ही सवलत तिघूलानांच्या धाकट्या चारी मुलींची लग्नें होईपर्यंत देण्यांत येईल ! त्वरा करा ! तीन दिवसांत हटकून लग्न.

गरजूंनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावें, अगर बाजूस दिलेल्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. टपालहशील माफ.

| | |
|---|---|
| तारेचा पत्ता :—'बाळक्या'<br>टेलिफोन नंबर :—११।।<br>ग्रामोफोन नंबर :—२०३४२१७ | बाळकराम गणेश<br>पत्ता:—घर नंबर १०९,<br>गुरुवार पेठ, पुणे. |

जाहिरातीचा मसुदा पाहून नाना निहायत खूप झाले; परंतु मुलीच्या सौंदर्याच्या उल्लेखाबद्दल मात्र ते जरा कच खाऊं लागले. तेव्हां मीं त्यांची समजूत केली कीं, "नाना, हा जाहिरातींचा काळ आहे ! आजकाल जाहिरातींतून अचुक गुणकारी औषधांची भरकेदार वर्णनें येतात, त्यांच्यांत औषधापुरतें तरी सत्य सांपडण्यासारखें असतें काय ? मग आपल्यालाच लोकांच्या भोळेपणाचा फायदा घ्यावयाला कोणती हरकत आहे ?"

याप्रमाणें सर्वतोपरी तयारी झाल्यावर आमची गाडी दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत पुणें शहराच्या पेठांपेठांतून, आळीआळींतून आणि गल्लीगल्लींतून फिरूं लागली. पुणें शहराच्या या दिग्विजयांत आम्हांला काय काय अनुभव आले त्याची माहिती पुढील खेपेस देण्याचें (कोणीं न मागतांच) अभिवचन देऊन तूर्त वाचकांची रजा घेतों.

# लग्न मोडण्याचीं कारणें

"आतां एक विचार, कोणी नवरा; त्याशीं समर्पूं म्हणे।"

मानवी बुद्धीच्या आटोक्यात येणाऱ्या कोणत्याही विषयाच्या ज्ञानाचीं, सामान्यतः तात्त्विक ( Theoretical ) व व्यावहारिक ( Practical ) अशीं दोन अंगें असतात. यांपैकीं कोणत्याही एकाचाच परिचय होऊन भागत नाहीं. त्यांपैकीं कोणतेंही एक दुसऱ्यावांचून भटकतांना दिसलें, म्हणजे विरहावस्थेंतील प्रणयीजनाप्रमाणें बेवकूब ठरून तें उपहासाला पात्र होतें. पहिल्याला 'पुस्तकी विद्या' हें नांव मिळून दुसऱ्याची आडमुठेपणांत जमा होते. 'बारीक तांदूळ तितके चांगले', हें पुस्तकी सूत्र पाठ म्हणणारा पक्वपंडित व्यावहारिक ज्ञानाच्या अभावीं, बारकांतले बारीक तांदूळ म्हणून कण्याच घेऊन घरीं येतो! पोहण्याच्या पुस्तकांतील नियम हृदयांत सांठवून, समोर मोठ्या मेजावर ठेवलेल्या बशीभर पाण्यांतल्या बेडकाबरहुकूम हातपाय पाखडणारा तितींपुबारा वर्षें असें अध्ययन करूनही शेवटीं स्नान करितांना झोंक जाऊन बालदीभर पाण्यांत बुडून मेल्यास नवल नाहीं! चोवीस वर्षांच्या एका नवरदेवाऐवजीं बाराबारा वर्षांचे दोन बिचवे चालतील किंवा नाहीं, ही शंका काढणारें डोकेंही केवळ एकांगी ज्ञानानेंच एकीकडे कलतें झालें असलें पाहिजे. उलटपक्षीं, संथपणें चाकूनें पोट चिरून, वाढलेली पानथरी वेताची कापून पुन्हा जागच्या जागीं चिकटवून चांगल्या लडीच्या दोऱ्यानें पोट शिवून जरीच्या तसें आरावंद केलें असतांही रोगी मेल्याबद्दल आश्चर्यचकित होणारा नाकाडोळ्याचा वैदू तात्त्विक ज्ञानाचें अज्ञान दाखवितो. तात्पर्य, ज्ञानाच्या या दोन्ही बाजू मनुष्याला अवगत असल्याखेरीज कोणत्याही बाबतींत त्याची खरी वाहवा होत नाहीं; आणि याच कारणामुळें, पहिल्या लेखांकांत वसंशोधनाचें तात्त्विक ज्ञान वाचकांपुढें ठेवून, मागील खेपेला कबूल केल्याप्रमाणें प्रस्तुत ज्ञानाची व्यवहारांत

अंमलबजावणी कशी होते, हें सांगण्याचा मनसुबा आहे.

गांवांत नवीन दिसूं लागणाऱ्या कोणत्याही गोष्टीची गांवगुंडांकडून पहिली हजेरी होते, व पुढें शिष्ट लोक तिची संभावना करितात, हा सार्वत्रिक नियमच आहे. आमची गाडीही या नियमाला अपवादभूत झाली नाहीं. गाडीरस्त्यानें पुणें शहराच्या सरहद्दीजवळ येऊन ठेपतांच आम्हां हिंदु लोकांच्या उपजत व्यवहार-शुद्धीला अनुसरून, आमच्या भरल्या गाडीची जकात चुकवून टोलनाक्यावरून राजरोस कसें जावें याचा आम्ही विचार करूं लागलों. हमरस्ता सोडून गाडी टोलनाक्याच्या पाठीकडून नेऊन थोड्या अंतरावर गेल्यावर रस्त्याला मिळवून घ्यावी, असें माझें मत होतें; सर्वजणांनीं शक्य तितका बोजा स्वांघावर घेऊन चालत गेल्यानें रिकाम्या गाडीला जकात पडणार नाहीं, असें नानांचें म्हणणें पडलें; आणि एखाद्यानें पुढें जाऊन नाकेदाराला पानतंबाखूच्या नादांत गुंतवून गाडी मुकाट्यानें हाकून न्यावी, असा गनिमी कावा आबाभटजी सुचवीत होते. या गनिमी काव्यांत पुढाकार घेऊन नाकेदाराशीं जाऊन भिडण्यांत आबांचा एक तल्फ भागविण्यापुरता आपलपोटेपणाचाच हेतु होता, हें सांगणें नकोच! बराच वेळ भवति न भवति होऊनही आमचें एकमत होईना. अखेर या तिरंगी सामन्याच्या भरांत वादविषयक लबाडीचाही विसर पडून आम्ही मोठमोठ्यानें वादविवाद करावयाला लागतांच हळुहळू आमच्याभोंवतीं गांवगुंडांचें एक भरीव कडें जमूं लागलें, आणि त्यांच्यांत आमच्याबद्दल हमरीतुमरीची कुजबुज सुरू झाली. गाडींतल्या सामानाच्या विविधतेमुळें आमच्याबद्दल त्या लोकांची भलतीच समजूत झाल्यास तींत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यांतील अगदीं मागासलेला वर्ग, आम्हांला 'खजिनदार संगीत मंडळी'च्या जामदार-खान्यांतील रत्नें ठरविण्याचा प्रयत्न करीत असून, दुसरा पक्ष एका स्त्री-संगीत नाटक मंडळींतून फुटून नवीन मंडळी काढल्याचें श्रेय आमच्या पदरीं बांधीत होता. खोबरेल तेलानें चबचबलेल्या आणि बऱ्याच वाढलेल्या केंसांचा ठकीच्या मानेपेक्षांही तिर्कस भांग काढणाऱ्या, आणि घरीं धुतल्यामुळें म्हाताऱ्या माणसाच्या चेहऱ्याप्रमाणें सुरकुतलेल्या खमिसावर बिनगुंड्यांचा मळकट पांढरा अंगरखा घालणाऱ्या एका मुलानें तर स्त्री-संगीतवाल्या पक्षाला जोराचा दुजोरा देऊन, गेल्या महिन्यांत मुंबई मुक्कामीं, तिंबूनाना 'मृच्छकटिकां'त मांगाचें, मला 'सत्य-विजयां'त भुताचें आणि आबाभटजींना 'रामराज्यवियोगां'त मंथरेचें काम करतांन पाहिल्याचें प्रतिज्ञेवर सांगितलें! शेवटीं, त्यानें स्वतः आबांवर गंडेऱ्यांचा वर्षाव केल्याचें सांगतांच सर्वांची खात्री होऊन आम्ही एकमतानें एका नाटक मंडळीचे

चालक व मालक ठरलों. जातां जातां एका धाडशी इसमानें पुण्यास आमचा पहिला खेळ कोणता व कधीं होणार, एवढें विचारण्यापलीकडे यानंतर कांहीं विशेष घडलें नाहीं. डाव्या मिशीला चाई लागल्यामुळें आलेला तोंडाचा विद्रूपणा घालविण्या-साठीं आबाभटजी क्षौरकर्माच्या धार्मिक सवलतीचा फायदा घेत असल्यामुळें त्यांना मंथरेचें सोंग करण्याचें प्रायश्चित्त मिळालें असावें, असें आम्ही तेव्हांच तरकलों. प्रायश्चित्तामुळें क्षौर करण्याऐवजीं क्षौरामुळें प्रायश्चित्त भोगण्याचा हा प्रसंग आबाभटजींना मात्र फारसा रुचला नाहीं, असें त्यांनीं मंथरेच्या सवाई हावभावांनीं आमच्या निदर्शनाला आणून दिलें. अखेर अशा प्रकारच्या चिकित्सेला भिऊन जकातीचा लकडा चुकविण्यापेक्षां आधीं या गांवगुंडांचा लकडा चुकविलेला बरा, अशा विचारानें आम्हीं जकातीची भरपाई करून गाडी एकदांची गांवांत आणली.

आमच्या आगमनाची कारणासकट प्रसिद्धि साऱ्या शहरभर होण्यासाठीं आम्हीं काय काय प्रयत्न केले, त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन गेल्या खेपेला केलेलेंच आहे. कांहीं दिवस पुण्यास घालविल्यानंतर प्रसिद्धीचे एकदोन ठळक मार्ग राहिले होते, त्यांचाही उपयोग करून घेतला. रस्त्यांत दोन माणसें एकमेकांशीं भांडतांना दृष्टीला पडलीं, म्हणजे रिकामटेकड्या चौकसांची त्यांच्याभोंवतीं केवढी गर्दी जमते, याचा अंदाज होतांच, नाना, आबाभटजी व मी आपसांत जोड्या ठरवून वेळीं-अवेळीं भरचवाठ्यावर लटकीं भांडणें निकरानें भांडून मधून मधून आमच्या नांवांचा भरपूर उल्लेख करूं लागलों. मात्र, या सर्व भांडणांतून '**ठकीचें लग्न**' हें एकच कारण ठेवण्याबद्दल आम्ही कांटेतोल सावधगिरी ठेवीत होतों! या मार्गानें साऱ्या शहराची आमच्याशीं तोंडओळख झाली.

याप्रमाणें जय्यत तयारी झाल्यावर आम्हीं प्रत्यक्ष कार्याला सुरवात केली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आमची ही फेरणी सारखी चालूं असे. शाळा, कॉलेजें, ऑफिसें, कचेऱ्या, हॉटेलें, दवाखाने, फिरावयाला जाण्याच्या जागा, नदीकांठ, तालमी, आखाडे, देवळें, बाजारचौक, गिरण्या, कारखाने, व्याख्यानस्थळें, नाटकगृहें, खाणावळी-सारांश, जेथें जेथें तरुण मंडळी येण्याचा संभव असतो, तेथें तेथें जाऊन वराचा तपास करण्याचा धूमधडाका मांडला. आमची विशेष मदार शाळांवर असल्यामुळें सर्व प्रकारच्या शाळांची हजिरी घेण्याची आम्हीं शिकस्त केली. मराठी शाळा, इंग्रजी शाळा यांपासून तहत वेदशाळा, वेध-शाळांपर्यंत झाडून साऱ्या शाळा, पालथ्या घातल्या; धर्मशाळासुद्धां आम्हीं सोडल्या नाहींत. येरवड्याच्या बेकार मुलांच्या शाळेंतूनसुद्धां एक चक्कर घेऊन

येण्यास चुकलों नाहीं. इतकेंच नव्हे, तर एका आदितवारीं तर शाळांना सुट्टी असल्यामुळें शेवटीं पांजरपोळांतील गोशाळासुद्धां आम्हीं नजरेखालीं घातली. या शेवटच्या शाळेंत एक विशेष आढळून आला तो नमूद केल्यावांचून राहवत नाहीं. इतर प्रकारच्या शाळांतील विद्यार्थी बुद्धिबळाच्या बाबतींत बहुतेक या शाळेंतल्या रहिवाशांच्या लायकीचे असूनही त्यांची हुंड्याची धांव हजारपांचशांच्या पैकीं असावयाची, आणि या शाळेंत मात्र हुंड्याची हुंडी पांचपन्नासापलीकडे जातांना दिसली नाहीं; तथापि होतां होईतों दोन पायांचें जनावरच गांठण्याचा आमचा संकल्प असल्यामुळें, गोशाळेंतल्या स्वस्ताईचा फायदा आम्हांला घेतां येईना. दवाखान्यांचीही अशीच शिरगणती करण्याचा ठराव केल्यामुळें आम्हांला शेवटीं वेड्यांच्या दवाखान्यांतही मुलांची चौकशी करण्यासाठीं शिरकाव करण्याचा प्रयत्न करावा लागला. आमच्या येण्याचें कारण ऐकतांच आमच्या इच्छेबर-हुकूम त्या दवाखान्यावरच्या अधिकारी लोकांनीं आम्हांला आंत शिरण्याची परवानगी दिली; परंतु त्यांच्या एकंदर झोकावरून त्या दवाखान्याशीं आमचा निराळ्याच प्रकारचा संबंध जोडण्याचा त्यांचा मानस आमच्या ताबडतोब लक्षांत आला. मुलीचें लग्न जमविण्याच्या नादानें आमची मार्थी फिरल्याचा आरोप आमच्या माथीं मारून, आम्हीं त्यांच्या त्या समाजाविरुद्ध गडबड करतांच विशेष खात्री झाल्यामुळें आमचे मेंदू तपासण्यासाठीं त्यांनीं आमची थोरल्या दवाखान्यांत रवानगी केली. तेथें सुद्धां नानांच्या फाजील आविर्भावांमुळें व आबामटजींच्या चेहऱ्यावरील सफै विकारशून्यतेमुळें थोरल्या डॉक्टरसाहेबांचीही आमच्याबद्दल नजर फिरलेली दिसूं लागली. तरी बरें झालें, मला ऐन वेळीं बुद्धि सुचली! नाहीं तर नानांनीं आणखी एक घोंटाळा करून ठेवला असता. डॉक्टरमजकूर नानांचा मेंदू तपाशीत असतां त्यांचें डोकें एका तरुण विद्यार्थ्यानें धरून ठेवलें होतें, तेवढ्यांत नानांनीं त्याचे पाय धरून पोरीला पदरांत घेण्याची विनंती करावयास सुरुवात केली; परंतु या विनंतीचा चालू तपासणीवर फारच अनिष्ट परिणाम होईल, हें लक्षांत येतांच मीं नानांना दटाबिलें. अखेर डॉक्टर-साहेबांनीं आमचा मेंदू शाबूत आहे, असें ठरवून आम्हांला सोडून दिलें, आणि सतत तीन वर्षें मुलीच्या लग्नाच्या विवंचनेंत असूनही आम्ही खरेखरे वेडे कसे ठरलों नाहीं, याबद्दल आश्चर्य करीत आम्ही घराकडे वळलो. विचारांतीं डॉक्टरी विद्येवरचा माझा विश्वास पार उडाला.

या सुमाराला पुणें शहरांत आमच्यासारखे अनेक तेलंग भिक्षुक अनेक ठिकाणांहून येऊन वरसंशोधनाचा खटाटोप करीत होते. वऱ्हाडांतून आलेले

एक गृहस्थ कोणाशीं ओळखपाळख नसल्यामुळें एखाद्या चुकलेल्या वासराप्रमाणें रोज वाचनालयांत जाऊन बसत, व आल्यागेल्याजवळ मुलाची चौकशी करीत. एक कुलीन मराठे गृहस्थ कॉलेजांतल्या एका स्थळाच्या नादीं भरून सारखे हेलपाटे घालीत होते. सदर स्थळाच्या व त्यांच्या दरम्यान झालेल्या सहामाहीभराच्या पत्रव्यवहाराचें भलें मोठें बाड ते बरोबर बाळगीत असत. या स्थळानें प्रथम मामूल हुंडा घेण्याचें कबूल करून ते पुढें सहा महिने सारखी चालवाचालव केली. व अखेर बेसुमार हुंड्याच्याच अटीमुळें गृहस्थमजकुरांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या. या बिचाऱ्या थोर गृहस्थांनीं तो सारा पत्रव्यवहार मला वाचून दाखविला. यावरून मागासलेल्या जातींनींसुद्धां हुंड्यापांड्यासारख्या बाबतींत तरी आम्हां उच्च म्हणविणाऱ्या जातींच्या बरोबरीनें चालीस चाल ठेविली आहे, हें पाहून मला साभिमान कौतुक वाटलें! एक म्हातारी देशस्थ विधवा इतर कोणी जबाबदार आप्तसंबंधी नसल्यामुळें आपल्या बारा चौदा वर्षांच्या दोन उपवर नातींना बरोबर घेऊन साऱ्या गांवभर भटकत होती. पोरी अगदीं नक्षत्रासारख्या सुंदर – पण बाई पडली गरीब! ज्याच्यात्याच्याजवळ तोंडवेंगाडणी करून शेवटीं दोन महिन्यांच्या रिकाम्या रखडपट्टीनें कंटाळून त्या हतभागी जीवानें परत आपल्या गांवचा रस्ता धरला. दाखविण्यासाठीं म्हणून आणलेल्या त्या दोन सुंदर बालिकांसह त्या म्हातारीला उन्हातान्हांतून दारोदार उंबरठे झिजवितांना पाहिलें, म्हणजे आमच्या वैवाहिक चालीरीतींबद्दल मला मोठा अभिमान वाटे! आम्ही आमच्या बायकांना घरांतच कोंडून ठेवतों, त्यांच्या शहाणपणाला चुलखंडांतच होमून टाकतों, वगैरे बाष्कळ बडबड करणाऱ्या चारगट सुधारकांनीं या गोष्टींकडे जरूर लक्ष द्यावें. त्या आईच्या शहाणपणाला गांवगन्ना मोकळें सोडून व त्रिखंड धुंडाळायला लावून सारी गंमत निर्विकार मनानें पाहणाऱ्या समाजानें बायकांवर आणखी कोणतीं जबाबदारीचीं कामें टाकावयाला पाहिजेत?

मुली दाखवायला नेण्याची वहिवाटही विविध रूपाची आहे. कोठें बापाच्या मित्राच्या कारकुनानें वधूपक्षाच्या उपाध्यायाची टाचशी पाहूनही मुलगी पाहण्याचा कार्यभाग उरकतो, तर कोठें स्वतः मुलगा आपल्या इष्टमित्रांच्या उपदेशमंडळा-(Board of advisers) सह मुलीची मानसिक व शारीरिक व्यंगांबद्दल कसून खातरी करून घेतो. मुलीची परीक्षा घेण्याचे जुन्या वळणाचे मार्ग इथूनतिथून गनिमी काव्याचे असतात. कर्णेंद्रियाची परीक्षा हलक्या आवाजांत एखादें काम सांगून घेण्यांत येते. डोळ्यांची परीक्षा घेण्यासाठीं मातकुणांतून दोरा ओवावयाला सांगण्याची वहिवाट आहे. अलीकडे सुधारलेल्या

रीतीप्रमाणें हे मार्ग मार्गे पडून वाचन, संभाषण आणि विशेषतः रूपनिरीक्षण या गोष्टींवरच विशेष भिस्त ठेवण्यांत येते. कधीं मुलगी पाहावयाला मुलीच्या घरीं येतात, तर कधीं मुलीला घेऊन गांवपरगांव करावे लागतात. आमच्याप्रमाणें कित्येक गरजवंत, कोणी खिशांत मुलीचा फोटो घेऊन तर कोणी मुलगीच खांकोटीला मारून फिरत असलेले आम्हांला ठिकठिकाणीं आढळून येत. स्वतः मुलानेंच-त्यांतल्या त्यांत जरा शिकलेल्या मुलानें मुलगी पाहण्याचा प्रसंग आला म्हणजे एखाद्या वेळीं मोठे मासलेवाईक प्रकार नजरेला पडतात. आपल्यापुढें गुडघ्यांत मान घालून बसलेल्या त्या हतभागी प्राण्याची जी हेटाळणी चालते आणि जें अनादरपूर्वक फिदिफिदी हांसणें उकळतें, तें पाहून त्या चवेल चटोराचा व त्याच्या सल्लागारमंडळाचा तिटकारा आल्यावांचून राहत नाहीं. त्या वेळीं स्वतःची बुद्धिमत्ता व चाणाक्षपणा दाखविण्यासाठीं त्या गरीब जनावरावर वाटेल त्या प्रश्नांचा मारा होतो. या बाबतींतील कांहीं कांहीं आचरट व अत्यंत निंद्य प्रकार वेळोवेळीं पाहिल्यावरही त्यांबद्दल दोन शब्द लिहिल्यावांचून कसें राहावेल? अशा अवघड परीक्षेत सांपडलेल्या त्या मुक्या अर्भकाच्या मनाची काय दशा होत असेल बरें! 'अडकली गाय आणि फटके खाय!' अशा वृत्तीनें धरणीमातेला दुभंग व्हावयाला- आपल्या हृदयाप्रमाणेंच दुभंग व्हावयाला- ती विनवीत नसेल काय? बाजारांत आठ्ठारा आण्यांची निर्जीव बाहुली विकत घेण्यापूर्वी ती पाहतांना तिच्या कपड्यांना मळके हात न लाव-ण्याची आम्ही जपून सावधगिरी घेतों आणि जन्माची सोबतीण पाहतांना तिच्या हृदयाच्याही चिंध्याचिंध्या करतांना आम्ही मागेपुढें पाहत नाहीं! माझ्या दयाशील वाचकभगिनींनो! स्त्रीजातीचा अभिमान धरा! अगदी नाइलाजामुळें का होईना- पण अशा रीतीनें आपल्या पोटच्या गोळ्याचें प्रदर्शन करावयाला तयार होणाऱ्या 'घर'च्या मंडळींच्या आड या, आणि दुसऱ्याच्या आंतड्यांची अशी हेटाळणी करावयास सरसावणाऱ्या आपल्या उच्छृंखल मुलांमावांना आळा घाला! वर जे दोन शब्द लिहिले, ते तुमच्या पवित्र नांवाचा उपमर्द करण्या-साठीं नाहींत; तर त्याच्याशीं दांडगाई करणाऱ्या हुच्चपणाला हाणून पाडण्या-साठींच! ज्या मंगलमयी मूर्तीला 'गृहदेवता' म्हणून घरांत आणावयाची, तिला पाहतांना मांवुर्ड्यांच्या गुरांच्या बाजारांत गाई-म्हशींची खरेदी करतांना दाखविण्यांत येणारी आस्था व पूज्यबुद्धिही ज्या कांहीं नरपशूंच्या ठायीं दिसून येत नाहीं, त्यांचा उल्लेख चांगल्या रीतीनें करावयाचा तरी कसा? त्याचप्रमाणें वधूवरांच्या जाहिराती लावण्याची अपमानास्पद व हलकेपणाची चाल

प्रचारांत येण्याचा उपजता आरंभ होत आहे, तोंच तिची पीछेहाट करण्यासाठीं जर अंमळ कडक थट्टा केली, तर तीमुळें फाजील सभ्य नाकांनीं मुरडीवर मुरडी पलटविल्या तरी हरकत नाहीं; पण भगिनींनो ! तुम्ही तरी बिचाऱ्या बाळकरामाच्या हेतूचा विपर्यासानें अर्थ करणार नाहीं, असा भरंवसा आहे. जीवाभावाच्या मोलाच्या पोटच्या गोळ्याच्या नांवाच्या, दीडदमडीच्या औषधांच्या गोळ्यांप्रमाणें, खरेदीविक्रीसाठीं जाहिराती लागलेल्या तुम्हांला तरी आवडतील काय ?

युनिव्हर्सिटीच्या मंडपांतून अवघड 'पेपर'मुळें अर्धीमुर्धी गचांडी खाऊन बाहेर निघालेले विद्यार्थी ज्याप्रमाणें आशावादीपणानें आपल्या सजातीयांशीं आपापल्या प्रश्नांचीं उत्तरें ताडून पाहतात, त्याप्रमाणें आमच्यांत व वरील मंडळींतही वरसंशोधनाबद्दल विचारपूस व बाटाघाट होत असे. आमच्या मानानें त्या लोकांनीं स्वतःच्या प्रसिद्धीसाठीं केलेले प्रयत्न आम्हांला अगदीं कमकुवतपणाचे वाटत. आमचा खाक्या अगदींच निराळा ! आपल्या हेतूच्या प्रसिद्धीसाठीं कोणतीही गोष्ट करावयाला कसूर म्हणून करावयाची नाहीं, हा आमचा बाणा होता. दुकानदाराच्या दारावरील पाट्या पाहतांच आमच्याही दरवाजावर आम्हीं 'बाळकराम आणि मंडळी'ची एक पाटी लटकावून दिली. नागरमंडळा-( Municipal committee ) च्या निवडणुकीच्या वेळीं निरनिराळे उमेदवार आपापल्या मतदारांची नेआण करण्यासाठीं गुंतविलेल्या टांग्यांवर व्हिक्टोरियांवर आपापल्या नांवांच्या पाट्या लावतात; हें पाहतांच आमच्या गाडीच्या तट्टयालाही आम्हीं आमची पाटी लोंबकळवून दिली. फार काय सांगावें, एका ठिकाणीं ओळख पटविण्यासाठीं भांवुराव आमच्या गांवाहून पुण्याला आला असतां आम्हीं त्याला आणण्यासाठीं आमची गाडी स्टेशनावर नेली, व येते वेळीं गाडीचे बैल सोडून आम्हीच ती ओढावयास लागलों. जरासा गाजावाजा करतांच आमच्याभोंवतीं चांगली गर्दी जमली. अशा प्रकारच्या माझ्या कल्पकतेमुळें पुणें शहरांत 'बाळकराम' हें नांव ज्याच्यात्याच्या तोंडीं झालें !

मुलांची चौकशी करितांना आम्हीं पंक्तिप्रपंच मुळींच केला नाहीं व कसला संकोचही ठेवला नाहीं. केव्हांही, कोठेंही, कोणताही तरुण दृष्टीस पडला, कीं आम्ही "यंदा कर्तव्य आहे का ?" "हुंड्याचा काय मानस आहे ?" "पत्रिका पाहणार काय ?" वगैरे प्रश्नांचा मारा सुरू करून थेट मुलगी दाखविण्यापर्यंत मजल नेऊन ठेवीत होतों. पुण्यांतल्या यच्चयावत् तरुण सृष्टीला आम्ही याप्रकारें प्रश्नचिन्हांकित करीत चाललों होतों. विद्यादेवीला डोक्यावर

घेऊन नाचणाऱ्या कॉलेजकर तरुणांपासून तों तिला पायांखालीं तुडविणाऱ्या तालीमबाजांपर्यंत, तक्क्याशीं टेंकून बसलेल्या शेठजींपासून तों हॉटेलांतील कपबशा धुणाऱ्या हरकाम्यापर्यंत, खाकीचा पोषाख करणाऱ्या पालखीपदस्था-पासून तों तहत खाकीचा युनिफॉर्म घालणाऱ्या टांगेवाल्यापर्यंत जो जो म्हणून 'लग्नाला योग्य' असा तरुण दृष्टीला पडे, त्याला त्याला आम्ही आमच्या प्रश्नांच्या जाळ्यांत गुरफटवून टाकीत होतों. कितीही नकार मिळाले तरी तिळमात्र हिय्या न खचूं देतां, सारख्या नेटानें नित्य नव्या किंवा त्याच त्याच वृत्तपत्रांवर व मासिकपुस्तकांवर आपल्या लेखांचा भडिमार करणाऱ्या नवीन लेखकाच्या ताज्या दमानें आम्हीं वाटेल त्यावर हल्ला करण्याची चिकाटी सोडिली नाहीं. अल्पावकाशांतच आमची गाडी सर्वांच्या नीट लक्षांत ठसून ती समोर दिसूं लागतांच जो तो तरुण तोंड चुकवावयाला लागला. प्रत्येकाला आमची भीति वाटूं लागली. पुढें पुढें तर तरुण मंडळी आमच्या वाऱ्यालाही उभी राहीनाशी झाली. रानांत पारध्याची चाहूल ऐकतांच झुडुपांखालीं दबा धरून बसणाऱ्या ससाप्रमाणें, स्वैर भटकणारे तरुण आमच्या गाडीची घंटा कानीं पडतांच जागच्या जागींच दडी मारून बसत. कोणत्याही तरुणाच्या अंगीं कसलाही दांडगा सैतान संचारला असला, तरी आमच्यापुढें त्यांची क्षणमात्रही मात्रा चालत नसे. मामूल वहिवाटीप्रमाणें पोरासोरी खच्चून भरलेलीं पुण्यांतलीं सभा-स्थानें आम्हीं आंत पाऊल टाकतांच ओसाड पडून जिकडेतिकडे शुक्र होऊन जात असत. एखाद्या शाळेच्या दाराशीं आमची गाडी उभी राहतांच सर्व शाळाभर एकदम शुकशुकाट होऊन इन्स्पेक्टरची तपासणी आल्याप्रमाणें शाळेंत शांतता होत असे. कित्येक कच्च्या दिलाचे तरुण तर रात्रींअपरात्रीं दडपल्या-सारखे होऊन आमच्या नांवानें बरळत दचकून उठत. आमच्या तोंडाला तोंड देण्यापेक्षां वाटेल त्या संकटाला तोंड देण्याची तरुणांची तयारी दिसूं लागली. एकदां तर नदींत डुंबत असलेल्या एका तरुणानें आम्हांला घाटावर पाहतांच तोंड चुकविण्यासाठीं तळाशीं बुडी मारून कायमची जलसमाधि घेतली. खेडे-गांवांतून काळीजकाडे आल्याची बातमी पसरली, म्हणजे पोरांची जी पळापळ होते, तीच 'बाळक्या आला रे आला!' या आरोळीनें होऊं लागली.

या रीतीनें तिन्हीत्रिकाळ सारखी टेहळणी चालू असतांना, आमचे प्रयत्न सर्वस्वींच फसत असत, असें नाहीं. कधींकधीं आमचे प्रयत्न मोहरण्याच्या सुमाराला त्यांच्यावर आभाळ येई, तर कधीं आमच्या प्रयत्नांचें फळ ऐन पाडाला येऊन डागळावयाला लागे. एखादें लग्न जमवितांना विघ्नांचें बाहुल्य किती असतें,

या गोष्टीची आम्हांला या वेळीं चांगली जाणीव पडली. पत्रिकांच्या भानगडींत एखाद्या वेळीं मंगळ आडवा पडे, आणि एखाद्या वेळीं शनीची साडेसाती भोंवे. कधीं एकनाड येई ! तर कधीं एक रास जमून येई. या ठिकाणीं ग्रहांचें षडाष्टक निवावें तों त्या ठिकाणीं माणसांचें खडाष्टक व्हावें ! कोठें देवगणाचा राक्षसगणाशीं सामना जुंपे, तर कोठें राक्षसगण मनुष्याला गिळावयाला तयार होई. कोठें गोत्राशीं बस्तान बसावें, तों मामाचें गोत्र अड्डन बसे ! कोठें पत्रिका जमल्या, तर हुंड्याची उडी अजीबात आमच्या डोक्यावरून जाई ! एक ठिकाणीं काय तर म्हणे, वरणभात होतो, तर दुसरीकडे बादरायणसंबंधानें परतवेल होते. एका मुलानें हुंडा घेण्याचें उदार मनानें नाकारलें; पण तो विलायतेला जाऊन दोन वर्षें राहण्याचा खर्च मागूं लागला. हा खर्च दिला असता तर त्याची विलायतेंत राहण्याची उत्तम सोय झाली असती; पण मग तिंबूनानांना मात्र हिंदुस्थानांत राहावयाची सोय उरली नसती. हुंड्यावर असेंच पाणी सोडणारा दुसरा एक महात्मा मोटरसाठीं हटून बसला. त्याला मोटर घेऊन दिल्यावर सर्वसंगपरित्याग करून नानांना त्याच मोटरीखालीं सांपडून मरण्याखेरीज गत्यंतर नव्हतें ! तिसऱ्या एका उदारधीनें हुंड्यापांड्याबद्दल अवाक्षर न काढतां दोन्हीकडून नानांनीं कार्य करून घेतल्यास लग्नाची कबूलजबाबी दिली. दोन्हीकडून लग्न करावयाच्या प्रसंगीं पोरीला दूधभात घालून पिवळी केली व मणिमंगळसूत्र बांधलें म्हणजे आटोपलें, अशा समजुतीनें या कराराला नाना तेव्हांच तयार झाले. परंतु सदर नवरदेव उच्चकुलीन असल्यामुळें लग्नसमारंभ मात्र त्यांच्या इभ्रतीला साजेसा झाला पाहिजे, अशी त्यांनीं अट घातली होती. त्यांच्या मानापानाबरहुकूम खर्चाचा कच्चा खर्डा पाहतांच नानांच्या पोटांत धस्स होऊन त्यांनीं तो नाद सोडून दिला. कारण, त्या बेतानें खर्च केल्यानंतर मिरवणुकीच्या प्रसंगीं नानांना निराळा बँडबाजा आणण्याचें प्रयोजनच राहिलें नसतें ! त्याचप्रमाणें एका मुनिमानें हुंड्याबद्दल अगदीं विरुद्ध बोलून करणीपोषाखासाठीं मात्र एवढ्या जबर रकमेची मागणी केली, कीं, '**करणी कसाबाची व बोलणीं मानभावाचीं**' ही म्हण थोडीशी बदलून '**करणी जांवयाची व बोलणीं मानपानाचीं**' या स्वरूपानें लग्नकार्यांतून तिचा उपयोग करावा, असें मला वाटूं लागलें. स्वतःला पोषाख चढविण्यांत नानांना साफ नागविण्याचा त्याचा निर्धार झालेला दिसत होता. याप्रमाणें बेसुमार मागण्या मागतांना भावी बायकोच्या बापाचा माल म्हणजे आपल्याच बापाचा माल, अशी या चढेल कर्णाची समजूत झालेली दिसून येते. एका ठिकाणीं सर्व गोष्टी यथासांग जुळून शेवटीं मुलानें आपलें लग्न

पूर्वींच झाल्याचें सांगून टाकलें. दुसऱ्या एका आचरटानें सारें ठरवून अखेर आपली मळती न जात असल्याचें सांगितलें. तिसऱ्या एका फारच जुन्या – अगदीं बुरसलेल्या – वळणाच्या मनुष्यानें ठकीची अत्यंत धार्मिक रीतीनें परीक्षा घेऊन लग्नाला प्रथम रुकार दिला. अगदीं मनूच्या वचनाप्रमाणें मुलीला तारांपैकीं, नद्यांपैकीं किंवा फुलांपैकीं नाव ठेवलेलें नाहीं, हें सुद्धां या धर्ममूर्तीनें चौकस रीतीनें पाहून घेतलें. हें स्थळ जवळजवळ कायमचें ठरल्यासारखें झाल्यामुळें ठकीचें अगदीं बार्डेमरडें रासवट नांव ठेवल्याबद्दल आम्ही आपल्याला धन्यवाद देऊं लागलों; परंतु अखेर, मुलगी असली म्हणजे तिचे मोकळे केंस जमिनीला लागतात, आणि हें लक्षण माहेरकरांना वाईट असतें, अशा रूढ कारणामुळें त्याच्या घरच्या बायकांनीं लग्न मोडून काढिलें! माहेरकरांना वाईट असलेल्या लक्षणामुळें भावी सासरकरांनीं पोर नाकारणें, आणि जमिनीवर लोंबणाऱ्या केंसांमुळें माहेरकरांचा सत्यानाश होणें, या दोन कार्यकारणभावांत बलवत्तर कोणता, हें ठरविण्याचें काम मी माझ्या वाचकांवरच सोंपवून मोकळा होतों. मुलीची जीभ नाकाला लागते किंवा मधलें बोट मागें वाकविलें तर मनगटाला लागतें, यासाठींसुद्धां लग्नें फिसकटल्याचीं उदाहरणें एक दोन जागीं आढळून आलीं. एका माउलीनें तर ठकीला जेवावयाला बसवून जेवतांना मुलगी एक बोट वळवते, एवढ्यावरच आम्हांला निरोप दिला. आणखी एका ठिकाणीं असाच बायकांनीं मोडता घातला. आम्हीं सारी इमारत अगदीं कळसापर्यंत चढवीत नेल्यावर ऐन गृहप्रवेशाच्या वेळींच बायकांनीं इमारतीचा पायाच खचवून टाकला. ठकीच्या मामीच्या सावत्र सख्ख्या भावजयीच्या आतेबहिणीची चुलतनणंद पहिलीं एकदोन वर्षें सासरीं नांदत नव्हती, अशी बिनतारायंत्राची बातमी कोठून मिळाल्यामुळें मुलीच्या माहेरकरांचें वळण वाईट असल्याबद्दल सरांस शेरा मारून त्यांनीं लग्न फिसकटवून टाकलें! एकदां मुलाच्या मामाच्या मोलकरणीच्या मुलाची व आमच्या गाडीवाल्याच्या दत्तक बापाची एक नाड जमल्यामुळें लग्न जमेना, व दुसऱ्यांदां तर प्रत्यक्ष मुलाच्या बापाची आणि आमच्या गाडीच्या पवळ्या बैलाचीच एक रास जमल्यामुळें हातचें स्थळ दवडावें लागलें! अशा रीतीनें लग्नें मोडावयास वाटेल तीं कारणें पुरतात, असें आमच्या अनुभवाला पूर्णपणें येऊन चुकलें! अखेर अखेर तर; आबाभटजींच्या कानांत अतिशय केंस असल्यामुळें, माझ्या एका बुटाला धोतराच्या कांठाचा लेस लावलेला असल्यामुळें, चिमण्याच्या कुरळ्या केंसांचा योगानें त्याचें डोकें उफराट्या पिसांच्या कोंबडीप्रमाणें दिसत असल्यामुळेंसुद्धां एखाद्या जवळजवळ

कायम होत आलेल्या स्थळाखालीं धरणीकंप होतो कीं काय अशीही आम्हांला भीति वाटूं लागली. आतां आणखी एका ठिकाणचा अनुभव देऊन लग्न फिसकटण्याच्या कारणांची ही यादी पुरी करितों.

या ठिकाणीं आम्हीं आमच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें कुटुंबकबिल्यासह जाऊन तळ घातला. सर्व प्रकारच्या तडजोडी होऊन अखेर मुलगी पाहण्याचा समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. मुलीला आई असल्याची साक्ष पटविण्यासाठीं आमच्या नूतनपरिणीत नव्या वहिनीही हजर होत्याच! सर्वतोपरी पटल्यावर उभयपक्षांकडील तयारी होऊन 'सीमांतपूजना'चा समारंभही पार उरकला. मात्र सदर समारंभाच्या वेळीं विहीणबाईच्या नात्यानें तेथें आलेल्या नव्या वहिनींकडे पाहून व्याह्यांनीं जरा संशययुक्त मुद्रेनें त्यांच्या तेथे येण्याबद्दल कारणाची पृच्छा केली. आम्हींही द्विगुणित आश्चर्यानें 'चहूंकडे अशीच चाल आहे, त्यांत नवल तें कशाचें?' असें उत्तर देऊन मोकळे झालों. व्याही यानंतर कांहीं विशेष बोलले नाहींत; परंतु शेवटीं 'वाङ्निश्चयाच्या समारंभासाठीं ती मंडळी आमच्याकडे येतांच सारें कोंडें उलगडलें. ठकीला वधूच्या जागीं व नव्या वहिनींना विहिणीच्या जागीं बसलेल्या पाहतांच व्याही ताड्कन उठून उभे राहिले व विचारूं लागले कीं, "या दोहोंतली तुमची मुलगी कोणती?" आम्हीं ठकीकडे बोट केलें आणि नव्या वहिनींची नीट माहिती दिली. "असें काय? मग आम्ही यांनाच वधू समजलों. मुलगी पहावयाच्याच वेळीं तुम्हीं हें सांगावयास हवें होतें. तिंबूनानांच्या कुटुंबालाच नवरीमुलगी समजून आम्हीं रुकार दिला. आतां या मुलीशीं आम्हांला लग्न कर्तव्य नाहीं." असें खणखणीत उत्तर देऊन व्याहीमंडळीनें घरचा रस्ता धरला.

लग्न फिसकटण्याचीं कारणें आणखी देत बसलों तर एक महाभारत रचून काढावें लागेल! दिलेल्या उदाहरणांवरून हें काम किती बिकट आहे, याची वाचकांना कल्पना होईलच. अशा प्रकारें बहुतेक स्थळें हातचीं गेल्यामुळें तूर्त स्थलसंकोचास्तव येथेंच मुक्काम करणें भाग पडत आहे. पुढील खेपेला ठकीच्या लग्नासाठीं केलेल्या मोहिमेंतील ठळक स्वाऱ्यांची सविस्तर माहिती देऊन अखेर ठकीचें लग्न एका आकस्मिक कारणामुळें कसें अचानक जमून आलें, तें सांगण्याचा संकल्प आहे. सत्यसंकल्पाचा दाता भगवान्!

# स्वयंपाकघरांतील गोष्टी

" राष्ट्राचें खरें जीवन स्वयंपाकघरावरच अवलंबून आहे. "

—स्वामी विवेकानंद

" फ्रान्सच्या सिंहासनावरून पदच्युत झाल्याबरोबर माझ्या मुलानें भटारखाना उघडावा; म्हणजे त्याला अन्नाचा तुटवडा पडणार नाहीं. "

—नेपोलियन बोनापार्टचा आपल्या मुलाला उपदेश

" प्रत्येक पुरुषानें जेवणाच्या गोष्टीकडे प्रथमच लक्ष पुरविलें पाहिजे. मला जर कधींच पोटभर जेवावयास मिळालें नसतें, तर माझ्या हातून इतकीं पुस्तकें लिहून होण्याचा सुतराम् संभव नव्हता. "

—हर्बर्ट स्पेन्सर

" अन्नाद्भवन्ति भूतानि । ( असतील शितें तर जमतील भुतें. ) "

—श्रीमद्‌भगवद्‌गीता

प्रस्तुत लेखाचा मथळा वाचून लगेच लेखकाच्या नांवावर नजर टाकतांच माझ्या सान्या वाचकभगिनी एकदम थबकतील, आणि मला स्वयंपाकघरांतून हांकलून लावण्याचा ठराव करूं लागतील! माझ्या भगिनीवर्गानें आपल्या या गरीब भावंडावर अशी आग पाखडण्यापूर्वी पुढील चार शब्द वाचून पाहण्याची कृपा करावी. माझ्या सुशिक्षित भगिनीजनांच्या विचारशीलतेची मला खात्री असल्यामुळें, या शब्दाकडे त्यांचें रागावलोकन होणार नाहीं, अशी मला पूर्ण उमेद आहे. बाकी एखाद्या निरक्षर बाईनें मात्र हे चार शब्द वाचण्याची तसदी घेतली असती किंवा नाहीं, याची शंकाच आहे! बहुधा पहिल्या दोन ओळींवरच नजर फेकून तिनें माझा लेख चुलींत टाकला असता, आणि तापलेल्या कालथ्याच्या किंवा जळत्या कोलिताच्या साहाय्यानें मला स्वयंपाकघरांतून पिटाळून लावलें असतें.

यद्यपि प्रत्येक समाजानें आपापल्या परीनें स्त्री-पुरुषांसाठीं भिन्नभिन्न कामें नेमून दिलीं आहेत; तथापि प्रसंगविशेषीं एका मनुष्यभेदाच्या प्राण्याला दुसऱ्याचें हक्क घेण्यापुरती सवलत देण्यांत येते. स्त्री-पुरुषांमध्यें खरोखर म्हटलें असतां 'जो भेद विधीनें केला' आहे, त्याचें वाजवीपेक्षां फाजील स्पष्टीकरण एका सुप्रसिद्ध मराठी नाटककारानें एकाच पद्यांत केलेलें वाचकांच्या माहितींत असेलच. त्याव्यतिरिक्त स्त्री-पुरुषांच्या हक्कांचें वर्गीकरण निव्वळ मनुष्यनिर्मित असून पुष्कळ वेळां त्यांत अतिव्याप्ति झालेली दिसून येते. सर्कशीच्या रंगणांत वाघाच्या तोंडांत मर्दानी हिमतीनें मान देऊन नायका धीट पुरुषांनाही थक्क करून सोडतात, तर नाटकगृहांतल्या रंगस्थलावरचे स्त्री नट आपल्या हावभावयुक्त मुरक्यांनीं वारांगनांनाही लज्जेनें पहावयास लावतात. एकीकडे विश्वविद्यालयीन उच्चतम परीक्षांतल्या यशस्वी उमेदवारांच्या नामावलिकेला आपल्या नांवांनीं नटविणारीं अभिमाननीय रमणीरत्नें आहेत, तर दुसरीकडे आपल्या नांवाच्या चार अक्षरांसाठींसुद्धां दुसऱ्याचा दस्तुर ठोकून, आर्यसंस्कृतीनें स्त्रियांसाठींच आंखलेल्या अज्ञानवर्तुलाच्या अगदीं मध्यस्थानीं चमकण्याजोगीं उच्च जातीचीं नररत्नेंही आहेत ! लग्नप्रसंगीं, अक्षतीसारख्या मिरवणुकींत, पुरुषांचा नेहमींचा पुढारीपणाचा मान आपल्याकडे घेऊन महिलासमाज घराबाहेर पडत असतो, त्या वेळीं रिकाम्या झालेल्या स्वयंपाकघरांत पुरुषवर्गातल्या स्वयंसेवकांचें पथक काम उरकीत असतें. कधीं कधीं तर निसर्गाच्या कृतींतसुद्धां स्त्री-पुरुषभेदाबद्दल दिलाई दिसून येते ! दाढीमिशीला मुकलेले आजन्म संन्यासी कितीतरी वेळां दृष्टीला पडतात; आणि शारीरशास्त्रविषयक पुस्तकांतून दाढीमिशीच्या मुरक्यांनीं कलंकित झालेल्या स्त्री-मुखचंद्रांचीं चित्रेंही बहुश्रुत वाचकांनीं पाहिलीं असतील. याप्रमाणें स्त्री-पुरुषांनीं परस्परांना आपापल्या कार्यक्षेत्राचें एखाद्या वेळीं सीमोल्लंघन करितांना पाहिलें, तर उगाच हकाटी करीत असण्याचें कारण नाहीं.

इतक्याउपरही इंग्लंडांतील चालू नायकांच्या बंडाचे प्रवेश रोज वाचल्यामुळें आपल्या हक्कांना विशेष जपणाऱ्या एखाद्या करारी भगिनीनें मला स्वयंपाक-घरांत शिरण्यास मज्जाव केला, तर तिचेंही पुढील युक्तिवादानें समाधान करतां येण्यासारखें आहे. स्त्रियांना पुरुषाप्रमाणें शिक्षण देवविण्यासाठीं अट्टाहास करितांना, प्राचीन आर्यावर्तांतल्या स्त्री-शिक्षणाचीं उदाहरणें देण्यासाठीं सुधारकांनीं गार्गी, मैत्रेयी यांच्याकडे धांव घेतली, त्याप्रमाणें माझ्या या विधानाच्या प्राचीनतेलाही विराटराजाच्या घरीं बल्लवाचें काम बारा महिने करणाऱ्या भीमाचा बळकट पाठिंबा आहे. स्त्री-शिक्षणापासून सुपरिणामांचीच निष्पत्ति होते, हें

दाखविण्यासाठीं सुधारकांना युरोपांतल्या स्त्रियांकडे बोट दाखवावें लागलें; परंतु पुरुषांच्या हातून पाकनिष्पत्ति चांगली होते, याची साक्ष मी देशांतल्या देशांत पटवून देईन ! आज प्रत्येक श्रीमंताच्या घरीं चाललेल्या अन्नयज्ञांतून होतृपदाचा मान आम्हां पुरुषांनाच मिळत नाहीं काय? 'पंचाग्निसाधन व धूम्रपान' अशा बाण्यानें ठिकठिकाणीं बसलेले आचाऱ्यांचे अड्डे आजच ओस पडले आहेत काय ? पेशवाईत पर्वतीवरचे वरणाचे व भाज्यांचे हौद ज्यांच्या कृतींनीं भरून निघाले, त्या वीरांच्या हातांतले झारे-पळे आज गंजत पडले आहेत असें आम्हांला वाटतें काय ? नाहीं भगिनींनो, नाहीं ! त्यांच्या वंशजांच्या हातांत ते झारेपळे आज तींच कामें करीत आहेत ! अशा प्रकारें झाऱ्यापळ्यांच्या शस्त्रास्त्रांनीं सायुध झालेली आचारी, पाणके, वाढपी, वाढपी आणि खटपटी यांची चतुरंग सेना भांगेनें धुंद होऊन, खोकल्याच्या किंकाळ्या मारीत व चिलमीच्या धुराचे लोट सोडीत, स्वयंपाकघराच्या किल्ल्यावर आपल्या साधनांचे यशोध्वज फडक-विण्यासाठीं सज्ज झाले असतां, तुम्हीं स्वयंपाकघराचें रक्षण कसें करणार ? तो पाहा, तो खटपटी वीर, आपल्या वज्रमुष्टींनीं कणिक तिंबून काढीत आहे ! खांद्यावर घागर घेऊन धांव ठोकणाऱ्या त्या पाणीदार वीरानें तर अंगणांत नुसता चिखल माजवून दिला आहे ! तसाच तो तिसरा वीर केळीच्या आगोतल्या सारला कापीत चालला आहे ! आणि सर्वांच्याही पुढे आघाडी मारून आगींत तोंड घालण्यासाठीं थेट चुलीपर्यंत जाऊन भिडलेला तो जवानमर्द ब्राह्मणभाई तर आवेशाच्या एका फुंकरानें उडालेल्या राखेच्या लोटांत पार दिसेनासा झाला आहे ! भगिनींनो ! अजून तरी ऐका आणि आम्हां पुरुषांनाही स्वयंपाकाचे समान हक्क द्या !

याप्रमाणें साऱ्या पुरुषजातीसाठीं स्वयंपाकघराचीं दारें मोकळीं करून घेतल्यावर, मीं आंत पाऊल टाकण्यापूर्वी स्वतःच्या लायकीबद्दल येथें थोडीशी प्रस्तावना करणें जरूर आहे, म्हणून अगोदर तिकडे वळतों.

पाकशास्त्रांतील नैपुण्याबद्दल आमच्या घराण्याचा पूर्वापार लौकिक चालत आलेला आहे. आमच्या पंचक्रोशींत होणारीं प्रयोजनें, सहस्रभोजनें, श्राद्धकर्में, गांवजेवणें वगैरे लहानमोठ्या प्रमाणांचीं सार्वजनिक भोजनकार्यें आमच्या घरचा एक तरी पुरुष स्वयंपाकाला असल्याखेरीज सहसा तडीला जात नसत. गेल्या सात पिढ्यांत आमच्या घरांत बायकांना स्वयंपाक करण्याची सक्त मनाई होती. माझ्या आजोबांच्या अमदानीपर्यंत हा लौकिक अव्याहतपणें कायम होता. माझ्या वडिलांनीं मात्र पूर्वपरंपरा सोडून विद्याभ्यास, नोकरी यांसारखे नसते धंदे

करण्यांत साऱ्या आयुष्याची माती केली! माझ्या आज्यानें पुण्याला एक नमुनेदार खाणावळ घातली होती. तिजबद्दल लोकप्रियता इतकी जबरदस्त वाढली होती कीं, कांहीं विशेष कारणाकरितां, खाणावळीचा दरवाजा कायमचा बंद करून एकाएकीं माझे आजोबा निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं जेवणाच्या वेळीं पंक्तिबारगिरांचा एक तांड्याच्या तांडा खाणावळीला गराडा घालून आपापल्या परीनें हळहळूं लागला! अर्थात्, लोकांचा लकडा चुकविण्यासाठीं, आजोबांना कोणाला कळविल्यावांचून रातोरात जावें लागलें होतें! आपली लोकप्रियता खरी आहे, कीं लोक नुसत्या नांवावरच जातात हें नीट अजमावून पाहण्यासाठीं, आजोबांनीं पुढें एका अगदीं अनोळखी शहरांत नांव बदलून दुसरी खाणावळ काढली व तिच्यांतहि अखेरीला पहिल्यासारखें नांव मिळविलें. माझ्या वडिलांनीं यद्यपि आपला पिढीजाद धंदा सोडून दिला होता, तरी माझ्याबरोबर आमच्या घराण्याच्या स्वयंपाकनैपुण्यानें पुन्हा जन्म घेतला. मला स्वयंपाकाचें उपजत वेड होतें. तिसऱ्या-चौथ्या वर्षींच माझ्या बहिणीशीं चूलबोळक्यांसाठीं भांडावयास लागून मी आजोबांची प्रीति संपादन केली. आजोबांनीं मला लहान लहान भांड्याकुंड्यांचा सबंध 'सट' आणून दिला होता. खेळांतल्या चूलबोळक्यांचा आमच्या घराइतका मोठा संग्रह साऱ्या आळींत मिळून नव्हता! पांचव्या सहाव्या वर्षी तर माझ्याकडून आमच्या आळींत भातुकलीचा एकही समारंभ पार पडत नसे. या वयांत मी समवयस्क सवंगड्यांबरोबर उनाडण्यांत दिवस न घालवितां, आईजवळ स्वयंपाकघरांत बसून तिच्या भाकरी करण्याकडे, किंवा भाजी फोडणीला टाकण्याकडे, घटकाघटका लक्षपूर्वक पाहत असें. तिखटमिठाच्या डब्यांतून ते ते पदार्थ वेळोवेळीं आईला काढून देण्याच्या सरावामुळें तद्विषयक बारीकसारीक माहिती मला त्या वेळींच झाली होती. अशा एखाद्या प्रसंगीं माझ्याकडे पाहून आजोबांना गहिंवर दाटून येई व मला पोटाशीं धरून ते म्हणत कीं, "वडिलानें कुलाचार सोडला; पण हा मात्र कुलदीपक होणार खास! बाळक्या, बेट्या, तूं मोटमोठ्या लोकांच्या घरीं दिवस काढ!"

आजोबांच्या अशा उत्तेजनपर शब्दांनीं मला स्फुरण चढून, मी थोडेंसें पीठ घेऊन भाकरी करावयाला, किंवा उरापोटीं वरवंटा उचलून कांहींतरी वांटावयाला मोठ्या आवेशानें सरसावत असें. लौकरच मला स्वयंपाक करण्यांत बरेंच कळूं लागलें. एकदां तर आईनें संध्याकाळचा स्वयंपाक माझ्या हातून करवून घेतला! आजोबांनीं तर त्या दिवशीं खाण्याचा असा सपाटा सुरू केला, कीं माझ्या पाक-

कौशल्याची बातमी ऐकून बाबांनीं संतापानें न जेवण्याचा निश्चय जर केला नसता, तर आईसाठीं मागें घांसभरसुद्धां अन्न उरलें नसतें! दुसऱ्या दिवशीं या खाण्यानें आजोबांची पोटदुखीची व्यथा उपटून अखेर त्या प्रेमळ म्हाताऱ्याचा त्यांतच अंत झाला! जातांजातां येथें एवढें सांगणें योग्य वाटतें कीं, मीं केलेल्या भाताचा पिंड देईपर्यंत म्हाताऱ्याच्या पिंडाकडे कावळ्यांनीं ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं! असो.

आज मला माझ्या या आवडत्या विषयासंबंधीं दोन शब्द लिहिण्याची स्फूर्ति माझ्या भगिनींचे एतद्विषयक लेख वाचून झालेली आहे, हें कबूल केलें पाहिजे. सदर लेखांतून दिलेलीं पक्वान्नांचीं कांहींकांहीं नांवें पाहून प्रथम माझें लक्ष या विषयाकडे वळलें. या नांवांकडे लक्ष देतांच काव्यशास्त्राप्रमाणेंच पाकशास्त्रांतही काव्यालंकारांना बराच वाव मिळालेला आहे, असें वरवर पाहणारालाही दिसून येईल. 'स्वयंपाकघरां'तल्या बऱ्याचशा गोष्टींतून, 'मोहन' हा नायक असावा असें वाटतें! माझ्या पाकशास्त्रांतून मीं याला असूयेनें हद्दपार केल्याचें वाचकांना दिसून येईलच. 'दुधाचा रस्सा', 'दह्याची भाजी', 'कांद्याच्या करंज्या' किंवा 'तिखटमिठाच्या मेसूरवड्या' हीं स्वयंपाकघरांतल्या काव्यशास्त्रांतील विरोधाभास अलंकाराचीं उदाहरणें असून 'भोपळ्याच्या बियांचे अनारसे' अद्भुतरसाच्या कोटींत जमा होतात. 'अलिजाबहादुर' हें पक्वान्न वीररसाचें एकलकोंडें उदाहरण असून 'फजिता' हें हास्यरसाचें अपत्य असावें. 'मुरक्की', 'मुरळी होळगी' हीं पात्रें परभाषावाचक असून संगीत 'मृच्छकटिकां'तल्या बौद्ध भिक्षूप्रमाणें किंवा 'शारदे'तल्या मुसलमान शिपायाप्रमाणें हास्यरसाचाच उठाव करणारीं आहेत. अशा प्रकारची नामावलि पाहून माझ्या माहितींत असलेलीं आमच्या घराण्यांतलीं पिढीजाद पाकरहस्यें वाचकांच्या फायद्यासाठीं पुढें दिलेलीं आहेत. हीं पक्वान्नें कित्येक वाचकांना कदाचित् माहीत असण्याचाही संभव आहे; परंतु असे वाचक फार थोडेच सांपडतील अशी मला आशा आहे. 'स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्थे'विषयीं प्रथम 'चार शब्द' लिहिल्यानंतर कांहीं पक्वान्नांची माहिती देऊन वाचकांची सप्रेम रजा घेण्याचा माझा संकल्प आहे.

### स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्था

माझ्या एका भगिनीनें म्हटलें आहे कीं, "स्वयंपाकघरांत आधीं चांगला उजेड पाहिजे." ही गोष्ट अगदीं बरोबर आहे; परंतु या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्याची तिची सूचना मात्र मला कबूल नाहीं! स्वयंपाकघरांतल्या कोणत्याच

गोष्टीकडे अजिबात लक्ष न दिलें, म्हणजे अनायासेंच कामाचा चांगलाच उजेड पडतो, हें उघड आहे. दुसऱ्या एका भगिनीनें स्वयंपाकघर अगदीं आरशासारखें स्वच्छ ठेवण्याविषयीं सूचना केली आहे. तीसुद्धां जराशी चुकीचीच आहे. माझ्या मतें आठपंधरा दिवसांनीं घरांतला केर काढणें फार उत्तम ! अशानें वेणीफणी करतांना उघडेंच टाकून दिलेलें ' बाकस ' वेळींअवेळीं लाथाडल्यामुळें त्यांतून चोहींकडे उधळलेले मणी, ठिकल्या, घुंगऱ्या किंवा याच प्रकारचें किडूक-मिडूक आठपंधरा दिवसांत एखाद्या वेळीं पायदळीं सांपडून पुन्हा मिळण्याचा संभव असतो. झालेला केर कोंपऱ्यांत गोळा करण्यापूर्वीं तिकडच्या धोतराच्या ओलवलीचा बोळा एकीकडे ठेवलेला बरा; नाहींतर केराचा लेप बसून धोतराला कुबट्याची कळा येते आणि मग धुणीं धुवावयाच्या वेळीं आपल्याला धोतर शोधून काढण्यासाठीं उगीच घरभर येरझारा घालाव्या लागतात. एका बाईला तर अशा रीतीनें गडप झालेला धोतराचा बोळा शोधून काढण्यासाठीं ' तिकड'च्या खिशांतलें पैशाचें पाकिटसुद्धां उचकून पाहण्याची तकलीफ घ्यावी लागली ! त्याचप्रमाणें लोटे, गडवे, पाट वगैरे इकडे तिकडे पडलेल्या चिजा केराबरोबर न जाऊं देण्याची खबरदारी घ्यावी. कारण केर भरून टाकतांना मग उगाच जिवापाड ओझें उचलावें लागतें. मी तर म्हणतों, कीं रांगतीं पांगतीं मुलेंसुद्धां केरांत जाऊं देऊं नयेत. कोपऱ्यांतून बाहेर गडगडतांना तीं पुन्हा केर करून ठेवतात. मुलांच्या बाबतींत एकंदरीनेंच जास्त लक्ष दिलेलें कांहीं वाईट नाहीं. गतवर्षीं आमच्या गांवीं एका बाईनें गडबडींत आपलें चारपांच वर्षांचें निजलेलें मूलसुद्धां बिछान्यांत गुंडाळलें आणि अखेर बिछान्याच्या वळकट्यांच्या उतरंडीखालीं तें पोर अक्षरशः चेंगरून मेलें ! सकाळीं झालेली ही गोष्ट अकरा वाजतां जेवतेवेळीं तिच्या लक्षांत आली. झालेल्या प्रकरणांत जरासा हलगर्जीपणा झाला, असें म्हणण्याचें मी धाडस करितों. कारण, नऊ साडेनऊ वाजतांच मुलाची एकदां चौकशी केली असती, म्हणजे मग त्याच्यासाठीं केलेलें सपाट वाटीभर कण्यांचें खिमट फुकट गेलें नसतें ! एवढ्यासाठींच मुलांकडे जरा विशेष लक्ष पुरविण्याची मी सूचना करीत आहें. ऐन घाईच्या वेळीं पोळी लाटतांना किंवा वरण घाटतांना सकाळपासून भुकेलेला बाळ्या सारखा रडत आला, तर आसक्तपणानें ' मर मेल्या ' म्हणून त्याच्याकडे हातांतलें लाटणें किंवा पळी फेंकून मारूं नये. संतापाच्या भरांत बाळ्यावरचा नेम चुकून त्याचीं हाडें मोडण्याऐवजीं पाट्यावर आपटल्या-मुळें लाटणें किंवा पळी मोडून चार आण्यांचें नुकसान झाल्याचीं अनेक उदाहरणें घडलेलीं आहेत. तसेंच घाईघाईनें भाजी चिरून झाल्यावर, रांगतें मूल जवळपास

असल्यास विळीचें पातें उभेंच ठेवूनच दुसऱ्या कामाला लागूं नये. पोराच्या जातीनें सहजगत्या हातपाय कापून घेतल्यामुळें पुन्हां विळीचें काम लागल्यास धुऊन घेण्याची यातायात करावी लागते. गडबडीच्या वेळीं होतांहोईतों ' जळ्ळं मेलं कारटं 'तिकड'च्या समोर आदळून बसवावें, हें उत्तम. तिकडून ऑफिसचें काम घरीं पाहत बसण्याचें सोंग चाललेलें असतें, तिकडे लक्ष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आंघोळीला पाणी उपसून देतांना गंगाळाच्या तळाशीं भाताच्या शितांचा थर बसविण्याची काळजी घ्यावी. पेंढयाच्या काड्या, कोळसे, मातीचीं ढेंलें वगैरे योग्य मिश्रण असल्यानें घरांतली काडीसुद्धां फुकट जात नाहीं, अशी ' तिकड 'ची खात्री होते. जरल्यास आंघोळीचें पाणी उपसल्यावर प्रथम केर काढावा व नंतर आंघोळीला ' खालीं ' घोल्वावें. अशा रंगीबेरंगी पाण्यामुळें, आपण लुगडेंबिगडेंसुद्धां धुऊन घेतल्याचा 'तिकडे' संशय येऊन उलट आपल्या कामाचा उरक लक्षांत येतो आणि तळचा शितांचा थर पाहिल्याबरोबर भात झाल्याची खूण पटून ' तिकडे ' ऑफिसांत वेळेवर जावयाला मिळण्याची खात्री वाटूं लागते. वेणीफणी स्वयंपाकघरांतच करण्याचा सराव ठेवला, म्हणजे मग भाकरी करतांना पिठांत केंस गेल्यावांचून राहत नाहींत आणि अशी ' केशाकर्षणा'नें बनलेली भाकर उभ्याओणव्यानें ताटांत टाकिली, तरी सहसा तिचे तुकडे होत नाहींत. एका भगिनीनें सुचविल्याप्रमाणें ' वाढतांना ताटांत गर्दी करूं नये, पदार्थ थोडथोड्या प्रमाणानें वाढावे, म्हणजे ताट पाहूनच जेवणाराचें समाधान होतें.' विशेषतः पाव्हणेरावळे असल्यास ही सूचना जरूर अमलांत आणावी. मागून घेण्याची सोय नसल्यामुळें पाहुण्यांना ' ताटाकडे पाहूनच समाधान ' मानण्यांवाचून अशा प्रसंगीं गत्यंतर नसतें !

यावांचून स्वयंपाकघरांतल्या साधारण व्यवस्थेखेरीज पुष्कळ गोष्टी सांगण्यासारख्या आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव येथेंच आटोपतें घेऊन मला माहीत असलेल्या मुख्य मुख्य पदार्थांच्या कृति देऊं लागतों :—

### चापटपोळ्या

स्वतःच्या खेरीज दुसरी चांगलीशी पाठ घ्यावी. आपल्या हाताचीं बोटें नीट पसरून हात खूप जोरानें त्या उघड्या पाठीवर आपटावा. असेंच चारसहा वेळां करावें. चांगल्या चापटपोळ्या होतात.

### धम्मकलाडू

वरच्याप्रमाणेंच, फक्त हाताची चांगली भक्कम मूठ करावी. याच पदार्थाला कोठेंकोठें ' मुष्टिमोदक ' असेंही म्हणतात. हे दोन्ही पदार्थ वेळीअवेळीं मुलांना

खावयाला चांगले असतात.

### कणिक तिंबणें

हव्या तशा हातानें दुसऱ्यावर माराचा वर्षाव केला, म्हणजे त्याची कणिक तिंबून निघते. हें फार आटाआटीचें पक्वान्न आहे.

### विहिणीची रेवडी

मोठ्या मानापानानें विहीणबाईना बसावयास बोलवावें. शेजारच्या पाजारच्या बायकांना बोलावणें असावेंच. मग वेळ पाहून उखाळ्यापाखाळ्या काढाव्या व घालूनपाडून बोलावयास सुरुवात करावी. विहीण चांगली तापून निघेपर्यंत उणीं-पाणीं काढावयाचें सोडूं नये. लौकरच साऱ्या बाया हंसावयास लागतात व विहिणीची शोभा होऊन चांगली रेवडी होते. मात्र यांत आपल्याकडे वरमाई-पणाचें नातें असलें पाहिजे.

### पोळ्या लाटणें

माझ्या भगिनींनीं या कामांत फारच मर्यादशील वृत्ति ठेवल्यासारखी दिसते. पोळ्या, कधीं कधीं पुऱ्या व सटीसामासीं पापड लाटण्यापलीकडे त्यांच्या मनाची धांव जात नाहीं. खरें म्हटलें असतां सवड सांपडल्यास कोणताही पदार्थ लाटा-वयास मागेंपुढें पाहूं नये! अर्थात्, संकोचवृत्तीच्या सासुरवाशिणींना या बाबतींत थोडें जपून वागलें पाहिजे. त्यांनीं माझ्या एका भगिनीच्याच शब्दांत म्हणावयाचें असल्यास, "पोळी फार मोठी लाटूं नये, पुरीसारखी लाटावी," व इकडे तिकडे कोणी नाहींसें पाहून "हलक्या हातानें तव्यावरून काढून घ्यावी." ताजी मिळते, दुसरें काय! बाकी झाकून ठेवलेली पोळी लाटावयास-सुद्धां हरकत नाहीं. या कामीं तरतरीपणा विशेष लागतो.

### बर्फीची चटणी

चांगली शेर, दीडशेर सुरती बर्फी घ्यावी व सहज हाताला लागेल अशी उघडी ठेवावी. स्वयंपाक करतांना अगर येतांजातां तिचा एकेक बकाणा भरीत जावें. घटकेच्या आंत सगळ्या बर्फीची चटणी होते. माझ्या एका भगिनीनें कुर-कूर केली आहे कीं, "दररोज नवीन चटणी करण्यास फार अडचण होते." माझ्या मतें कोणत्याही आवडत्या पदार्थांची तेव्हांच चटणी करून टाकतां येते.

### थंडा फराळ

दुपारचीं जेवणें झालीं म्हणजे खुशाल तणावून द्यावें व चुलीला वाटाण्याच्या अक्षता द्याव्या. संध्याकाळीं 'तिकडून' कामकाज करून कंटाळून घरीं येणें

झाल्यावर आजाराची खबर सांगावी. 'तिकडे' बहुतकरून चुलीची आराधना करण्याचा कंटाळा असतोच! अशा वेळीं हजार हिस्यांनीं 'थंडा फराळ' करून वेळ भागवावी लागते; हा पदार्थ उपासालासुद्धां चालतो.

### अंगाचा तिळपापड

बहुतेक प्रकार वरच्यासारखाच. मात्र 'तिकडून' ज्या दिवशीं दोनचार स्नेही-सोबती संध्याकाळीं फराळाला बोलवायचें झालें असेल, त्याच दिवशीं हा पदार्थ करतां येतो. ऐन वेळीं चुलखंडांत जिकडेतिकडे सामसूम पाहून तिकडच्या अंगाचा तिळपापड होतो. पण चारचौघांदेखत बोलावयाचें मात्र नाहीं. कदाचित् दुसऱ्या दिवशीं हा तिळपापड आपल्या अंगावर शेकून घ्यावा लागतो.

### पाठीचें धिरडें

सारी तयारी पुन्हा वरच्यासारखीच. पाहुणा मात्र एकच असावा आणि 'तिकडून' विचारणें झालें, म्हणजे आपण जळफळूं लागावें. 'तिकडून' एखादादुसरा शब्द तोंडांतून काढतांच आपण तोंडाला तोंड द्यावें. 'तिकडून' हातघाईवर येणें होतें आणि लौकरच आपल्या पाठीचें चांगलें धिरडें होतें. हें पोटाला बाधत नाहीं.

### हाडाची पूड

नेहमीं कैदाशिणीप्रमाणें वागणें ठेवावें. वेळ-अवेळ पाहिल्यावांचून तोंडाला येईल तें भकावें. 'तिकड'च्या माणसांना शिव्यागाळी कराव्या. कांहीं म्हणतां कांहीं ऐकूं नये. साऱ्या घराला सळो कीं पळोसें करावें. एखाद्या दिवशीं तरी आपल्या हाडांची चांगली पूड होते! हें पक्वान्न नेहमीं करावयाला सोपें नाहीं.

### मनांतले मांडे

आपल्या जन्मजन्मांतरीं मिळणार नाहींत असे दागिने अंगाखांद्यावर घालून आपण मिरवत असल्याची नेहमीं कल्पना करीत बसावें. यालाच 'मनांतले मांडे खाणें' असें म्हणतात. गरिबांच्या संसाराला हा पदार्थ वाटेल तेव्हां करतां येण्यासारखा आहे.

### माणसांचें मेतकूट

घरची चांगली श्रीमंती असल्याखेरीज हा पदार्थ होत नाहीं. घरांत चाकर-माणसें पुष्कळशीं असलीं म्हणजे आपण त्यांच्यावर मुळींच लक्ष ठेवूं नये. दळण बाजारहाट, शिधा वगैरे गोष्टी होतील तशा होऊं द्याव्या. लौकरच साऱ्या माणसांचें छान मेतकूट जमतें. अर्थात् हें उघड्यावर येईपर्यंत टिकतें.

### घरादाराचें खोबरें

'तिकडे' बाटलीबाईसारखें एखादें व्यसन लागलेलें पाहातांच आपण वैराग्यानें चाकरमाणसांवर घर टाकून माहेरची वाट धरावी. वर्षसहा महिन्यांत सान्या घरादाराचें खोबरें होतें. हा पदार्थ जन्मांत एखाद्या वेळेला करतां येतो.

### अकलेचा कांदा

आपलें चांगलें आठदहा वर्षांचें पोर घ्यावें. त्याची तिन्हीत्रिकाळ सारखी वाखाणणी करावी. तो बोलेल तें त्याला बोलूं द्यावें. 'तिकडून' त्याच्यावर जरा रागवायचें झालें, कीं पोराला पोटाशीं धरून दिवसभर रडत बसावें. त्याचे मळमळते लाड मनापासून पुरवावेत. वर्षा दोन वर्षांत पोराचा चांगला अकलेचा कांदा तयार होतो. पुढें याला बाहेरच्या लोकांनीं चांगला फोडून काढतांना पाहिलं म्हणजे मात्र खरोखरीच डोळ्यांना पाणी येतें!

### गुळाचा गणपति

आपलेंच तीनचार वर्षांचें पोर घ्यावें. त्याला नेहमीं स्वयंपाकघरांत बसवून ठेवावें. नेहमीं त्याच्या हातावर गोडधोडाचें कांहींतरी ठेवीत जावें. त्याला इकडची काडी तिकडे करूं देऊं नये. शाळेंतसुद्धां जाऊं देऊं नये. खायला हवें तें घालावें; पण जागचा हलूं देऊं नये. लौकरच बसल्या जागीं मुलगा अगदीं गुळाचा गणपति होतो. हा पुष्कळ वर्षे टिकतो.

यांशिवाय, 'डाळ शिजविणें', 'नाकाला मिरच्या लावणें', 'वाटाण्याच्या अक्षता', 'पुराणांतील वांगीं', 'वाटेल त्या कामाचा खिचडा', वगैरे पुष्कळ पुष्कळ लहानसान पदार्थ सहज करतां येण्याजोगे आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव त्यांची माहिती देत बसणें शक्य नाहीं. तूर्त दिले आहेत, तेवढ्या पदार्थांचेंच माझ्या भगिनींनीं मोकळ्या मनानें चीज केलें म्हणजे स्वतःला धन्य समजेन. त्यांनीं माझ्या या गुणाचें सहृदयपणानें कौतुक करावें, एवढेंच या भोळ्या-भाबड्या व गरीब भावंडाचें मागणें आहे.

# कवींचा कारखाना

उत्तिष्ठोत्तिष्ठ राजेंद्र मुखं-प्रक्षालयस्व ट : ।
प्रभाते रोदिती कुक्कु-चवैतुहि चवैतुहि ॥ १ ॥

—सुभाषित

ऐशीं काव्यें कराया
इकडुन तिकडुन आणलेली बुद्धि दे चक्रपाणी ।

—स्मरणांतून

या जगतीतलावर अखिल मानवजातीच्या सुखसमाधानाचीं जीं जीं साधनें आहेत, त्या सर्वांत काव्याला सर्व राष्ट्रांनीं, सर्व धर्मांनीं आणि सर्व जातींनीं एकमतानें अग्रस्थान दिलेलें आहे. काव्यांत राष्ट्राचें बुद्धिवैभव आणि कर्तृत्व-शक्ति इतिहास आणि संस्कृति, विकारोत्कर्ष आणि नीतिमत्ता, अशीं जोडपीं एकाच वेळीं विहरत असल्यामुळें राष्ट्राचें सर्वस्व त्याच्या काव्यांत प्रतिबिंब होत असतें. ज्यांना लिपी नाहीं, अशीं राष्ट्रें थोडीबहुत सांपडतील; परंतु लौकिक काव्याविरहित राष्ट्र कधींही सांपडणार नाहीं. लेखनकलेच्या अभावीं इलियडसारखीं महाकाव्यें केक पिढ्यांपर्यंत नुसतीं जिभेच्या शेंड्यावर नाचत आलीं होतीं. कवितेचा व राष्ट्रोत्कर्षाचा परस्परांशीं निकट संबंध आहे. कवितेनें वीरांना आणि प्रणयीजनांना उत्साह दिला आहे, आणि वीरांनीं व प्रणयीजनांनीं कवितेला विषयांचा पुरवठा केला आहे; सुंदर स्त्रियांनीं कवितेला वरच्या दर्जाला चढविलें आहे, तसेंच कवितेनें सुंदर स्त्रियांना चढवून ठेविलें आहे. कवितेनें किती तरी लोकांना शुद्ध वेडें केलें आहे, तर शुद्ध वेड्यांनीं किती तरी कविता केली आहे ! आणि म्हणूनच या महत्त्वाच्या विषयावर चार शब्द लिहिण्याचा आज मी प्रयत्न करून पाहणार आहें.

कविता हा एकच शब्द उच्चारल्याबरोबर किती तरी गोष्टी एकदम डोळ्यां-

समोर येऊन उभ्या राहतात! तें समासप्राचुर्य, ती रचना, ती प्रतिमा, त्या भराऱ्या, ती वैदर्भी रीति, तें हृदयंगम, त्या डोळ्यांतून अश्रुधारा, तें मार्दव, तो रसपरिपोष, तें अरसिकेषु कवित्वनिवेदनम्, तें शब्दसौष्ठव, तें कवीला अगम्य, ती प्रियतमा, तीं कमलें, ते लाटानुप्रास, ते निरंकुशाः कवयः, तें ओज, ते प्रवाह, तीं स्वर्गारोहणें, तीं तादात्म्यें, त्या स्फूर्त्या, तीं वेडें – बस्स! एकाद्यादुकट्या माणसाला खरोखरीच या हलकल्लोळांत वेड लागावयाचें!

कविता! कविता!! कविता करणें जितकें सोपें आहे, तितकेंच कवितेची व्याख्या करणें अवघड आहे! विषयव्यापकतेचा पसारा डोळ्यांपुढें ठेवून कवितेची व्याख्या करणेंही भिन्नभिन्न पदार्थांशीं संलग्न होणाऱ्या पाण्याचा रंग ओळखण्याप्रमाणें, किंवा चार खंडांतून पसरलेल्या इंग्रजी राज्याच्या सरहद्दी सांगण्याप्रमाणेंच मानवी मतीच्या आटोक्याबाहेरचें आहे. कवितेच्या विषयांची यादी विराट्स्वरूपवर्णनालाही लाजविण्यासारखी आहे. मेरुमांदारापासून मृच्छकटिकांतील ओझ्यांतल्या खड्यापर्यंत यच्चयावत् पाषाणसृष्टीला कवितेच्या प्रांतांत जागा मिळालेली आहे. ज्वालामुखीच्या तेजस्वी रसगंगेंत उजळलेली तिची अंगकांति चिलमीच्या धुरानें धुरकटलेलीही आहे. स्वर्गलोकांतून पाताळाकडे अमृतकुंभ नेणाऱ्या गरुडाबरोबर हिनें भरारी मारली आहे. 'तशी लालबागेच्या सगुण पोरटां'बरोबर वेवेड्याची आटली घेऊन भरकण्यांतही हिनें मागेंपुढें पाहिलें नाहीं. राधाकृष्णाच्या रासक्रीडेप्रमाणें रातुमैनेचे रागरंगही कवितेनें आळविलेले आहेत. शिखंडीप्रमाणें रणांगणांत व बृहन्नडेप्रमाणें बायाबापड्यांत हिचा करवा नाच झालेला आहे. रामरावण, अकिलिसपॅरिस किंवा कर्णार्जुन यांच्यामधील महायुद्धांत थैमान करून ही थकली, तशी नाऱ्यासुभाऱ्या, चिगीरंगी किंवा सोम्यागोम्या यांच्यांतले अटीतटीचे सामनेही हिनें साजरे केले आहेत. त्रिकालदर्शी व सर्वतोगामी ऋषीच्या गंभीरतेनें जिनें त्रिकालाच्या अनंत ब्रह्मांडांत भराऱ्या मारल्या आहेत, तीच लहान मुलाच्या उत्सुकतेनें सनावळी किंवा मुंबई इलाख्यांतील तालुक्यांची यादी गात बसली आहे. एकीकडे संसारांतल्या अनुरूप वधूवरांच्या विवाहासाठीं मंगलाष्टकें म्हणत आहे, तर दुसरीकडे खेळांतल्या चिल्लिकचीं गुलाम-राण्यांचीं विजोड जोडपीं जमविण्यासाठीं 'फुलवर-राणी पहा बदामाला' असे नियम ठरवून देत आहे. घटकेंत एकान्तांतल्या योगाभ्यासी जनाला अचल समाधीचें रहस्य सांगते आहे, तर घटकेंत बडोद्याच्या जुम्मादादाच्या तालमींतल्या बाळगोपाळांना 'जंपिंग म्हणजे उडि मारावी जोडि मुद्गलाची फिरवा। सेक्शन सहा मोजुनी पहा'। असा कसरतीचा

उपदेश करीत आहे. सर्कशींतल्या नायिकेप्रमाणें वाघसिंहांशीं लगट केल्यानंतर ही मागीलदारच्या मोलकरणीप्रमाणें कुत्र्यामांजरांबरोबर खरकट्यांत यावें लागतें. हिमालयवर्णनानंतर तिनें चव बदलण्यासाठीं ग्रांटरोडवर्णन केलें आहे. सहस्रदल कमळापासून दगडफुलापर्यंत, सीतेसारख्या साध्वीपासून साळूसारख्या गांवगोरीपर्यंत, क्षीरसागरांतील पारिजातपुष्पापासून डबक्यांतल्या फुलापर्यंत, चवरीपासून केरसुणीपर्यंत, सहस्राक्ष इंद्रापासून आंधळ्या मुलापर्यंत, संतांच्या नामावळीपासून जी. आय्. पी. स्टेशनच्या शिरगणतीपर्यंत, भास्कराचार्यांच्या लीलावतीपासून तात्यापंतोजीच्या तोंडच्या हिशेबांच्या चालीपर्यंत, पुराणपुरुषाच्या सहस्रनामापासून आधुनिक कवींच्या खानेसुमारीपर्यंत, फार काय सांगावें, तुळशीच्या बुंध्यापासून रामाच्या शेंडीपर्यंत, सर्वत्र कवितेनें आपलें एकछत्री साम्राज्य पसरून ठेवलें आहे. सर्वांभूतीं, सर्वांघटीं पसरलेल्या परमात्म्यापेक्षांही कवितेची व्यापकता मोठी आहे. पुरुषसूक्तांतल्या नायकाची सत्ता जें अस्तित्वांत आहे तेवढ्यावरच काय ती असते; पण कवितेनें जें आहे तें तर आपलेंसें केलेंच आहे, पण जें नाहीं तेंही आपलेंसें केलें आहे–अगदीं जें नाहीं नाहीं तेंही करून ठेवलें आहे.

याप्रमाणें कवितेचें स्वरूप यद्यपि रंग उडालेल्या तसबिरीप्रमाणें पुसट असलें, तथापि तिनें कार्य मात्र लहानसहान केलेलें नाहीं! कवितेच्या कर्तृत्वाचा थोडासा उल्लेख प्रारंभीं केलेला आहे. तिच्या उपकारांचें साकल्यानें वर्णन करावयाचें असल्यास आजपासून काळाच्या शेवटापर्यंत सर्व भावी काव्यें त्या एकाच विषयावर करावीं लागतील. कवितेनें जगावर उपकारांचें ब्रह्मांडच्या ब्रह्मांड करून ठेवलेलें आहे. गद्याच्या गचाळ अमर्यादपणाला कवितेनें आटोपशीर आकारांत आणून मनुष्य जातीच्या स्थळकाळाची विलक्षण बचत केली आहे. एका समग्र गद्य ग्रंथाच्या मोकाट मैदानांत एखाद्याला आपल्या एका घटकेचा मूर्खपणासुद्धां नीटसा फिरवून दाखवितां येणार नाहीं, तेंच कवितेंत एका श्लोकाच्या बंदिस्त चौकांत तो आपल्या आजन्म मूर्खपणाचें प्रदर्शन करून मोकळा होईल! तसेंच, गद्यांतल्या लेखांतून मल्याबुऱ्याची सेळभेळ असल्यामुळें बरेवाईटपणाबद्दल खात्री करून घेण्यासाठीं प्रत्येक लेख आपल्याला बहुधा निम्माअधिक तरी वाचावाच लागतो; आणि बराच वेळ गेल्यावर त्यांतील फोलपणा आपल्या लक्षांत येत जातो. मासिक पुस्तकें वाचतांना कित्येकदां तरी आपली अशी फसगत होऊन उगाच वेळ फुकट जातो. कवितेच्या बाबतींत अशी फसवणूक बहुतेक होत नाहीं! कविता दिसली, कीं आपण तिकडेच

मुळीं पाहतच नाहीं ! त्याचप्रमाणें गद्याच्या नियमशून्यतेमुळें 'आव जाव घर तुमारा' अशांतला त्याचा प्रकार होऊन बसला आहे. गद्यलेखकाच्या मनांत आलें कीं, तें कसेंबसें तरी कागदावर उतरतेंच; आणि त्यामुळेंच गद्याचें गांठोडें मर्यादेबाहेर फुगत जात असतें. परंतु गणमात्रायमकांसारख्या अडचणीं-मुळें आज किती तरी लोकांच्या कविता करण्याच्या कल्पना वाऱ्यावर विरून जगाच्या मागचा जंजाळ चुकलेला आहे. तात्पर्य, गद्यापेक्षां काव्याचा मनुष्य-जातीला अतोनात जास्त फायदा होत आलेला आहे.

वस्तुतः पाहतां प्रस्तुत लेखकासारख्या सामान्य मनुष्याला सदरहू विषयावर अधिकारयुक्त वाणीनें बोलतां येणें अशक्य कोटीच्याहीपलीकडचें कार्य झालें असतें; परंतु अलीकडे कवितादेवीच्या शिखरावर-नव्हे, कवितामंदिराची लपवड-तसेंही नाहीं,-काव्यामृताची स्वैरलकेरी- छे:, नाहीं साधत ! कवितेची रचना व टीकांचा भडिमार हीं दोन्हीही इतक्या अमर्याद प्रमाणावर वाढत चाल्लीं आहेत कीं, नियतकालीन वाङ्मयाकडे नुसतें धावतां धावतां पाहणारालाही तद्विषयक बरीचशी माहिती झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यांतून मला तर मित्रत्वाच्या नात्यानें उभयपक्षींच्या वाग्भटांच्या जिवंत वाणीचाही लाभ होत असल्यामुळें 'अधिकस्याधिकं फलम्', होऊन बसलें आहे. आणि म्हणूनच आप

*ल्या तावडींत सांपडलेल्या हरिणाला जसा चित्ता ।
बघतो तशा प्रकारें तत्परतेनें व पूर्ण समचित्ता ॥ १ ॥
नें वाचक जर माझा प्रस्तुतचा लेख नीट बघतील ।
तर त्यांना कवितेचें पुष्कळसें ज्ञान खास होईल ! ॥ २ ॥

जगांतील एकंदर काव्यसंपदेकडे निरखून पाहणाराला तिचे दोन अगदीं ठळक भाग करतां येण्यासारखे आहेत. एक जगांतील लहानमोठ्या घडामोडीं-मुळें सुचलेली कविता व दुसरी अशा प्रकारची कविता वाचल्यामुळें किंवा एखाद्या

---

*गद्य व पद्य यांचे परस्परभिन्न रचनानियम बहुतेक कांटेतोल सावधगिरीनें संभाळून हें 'काव्यगद्य' निर्माण केलेलें आहे. गद्य व कविता– अतएव निसर्ग व कला– यांच्या एकजीव तादात्म्याचें हें पहिलें उदाहरण आहे अशी उमेद आहे. लांबलांब संस्कृत समास व कोंवळे कोंवळे शब्द यांच्या जाळ्यांतील शाब्दिक उपमांची जी एक गुंतावळ अलीकडे 'एक गद्यकाव्य' म्हणून लोकांसमोर मांडण्यांत येते, तिच्यावरून या काव्यगद्याची कल्पना सुचलेली आहे. — बाळकराम

कवीशीं बराच परिचय झाल्यामुळें केलेली कविता. पहिल्या प्रकारची कविता व्हावयाला एखाद्या 'कवी'खेरीज दुसरें कांहीं लागत नाहीं. दुसऱ्या प्रकारच्या एखाद्या कवितेचें सोळा सोपस्कार व्हावयाला मात्र, पहिल्या प्रकारची एखादी चांगलीशी कविता, तिचा अर्थ न समजणारा आणि स्वतःला 'कवि' समजणारा एखादा ब्रह्मदेव, त्या काळीं एखादी लोकप्रिय झालेली चाल, कवितेंत नेहमीं दिसून येणारे कांहीं संस्कृत शब्द, 'जनि', 'जगीं', 'खचितचि', 'ग', 'या काळी' यांसारखे कांहीं उडाणटप्पू शब्द, कांहीं बेकार शुद्धशब्दयोगी अव्ययें, हव्या त्या ठिकाणीं सांपडणाऱ्या थोड्याशा उज्ज्वल उपमा, या सर्वांचा अचुक उपयोग करण्याची हातोटी, धाडस व अज्ञान, असल्या काव्यनिष्पत्तीच्या परिणामाबद्दल बेफिकीरपणा, वाटेल त्या ढोबळ चुकीला दुर्बोध गुणांच्या कोटींत ढकलण्याइतका निस्सीम आत्मविश्वास, हा एकंदर खटाटोप उरकण्याला पुरेसें रिकामपण, प्रसिद्ध मासिक पुस्तकांतील परतवाणाला मतभेदाच्या गंभीर स्वरूपाखालीं ऐसपैस जागा देणारें एखादें मासिक पुस्तक, या कर्त्यांचें नुसतें नांव किंवा फार तर दोन ओळींचा मासला पाहिल्याबरोबर तें पान बदलणारे थोडेसे वाचक, पुढें कांहीं कारणामुळें जुन्याच्या अभिमानाचें सोंग घेऊन कुठल्या तरी वृत्तपत्रांत तिच्यावर खरमरीत थोबाडसुख घेणारा त्याच किंमतीचा एखादा टीकाकार, त्या टीकेवर कविराजांच्या तोंडच्या असंबद्ध शिव्यागाळींचा भडिमार, भाविक अजागळपणानें ऐकणारे त्याचे सलगींतले सोबती, त्याच मुक्ताफळांतल्या तुटपुंज्या तयारीनें प्रतिटीका करणारा एखादा जानी दोस्त आणि अखेरीला बारा महिन्यांतून केव्हां तरी एखाद्या सभेंत या कवीचा त्याच्या जातगोतासकट वर्षश्राद्ध करणारा त्याच्याच देशांतला दुसरा उपटसुंभ इतकी सामुग्री जमावी लागते!

याप्रमाणें दुसऱ्या प्रकारच्या कवितेसाठीं साधनबाहुल्याची गरज असल्यामुळें तिची निष्पत्ति मर्यादित प्रमाणावर होते, असें मात्र मुळीच नाहीं. भरण्याच्या (Quantity) दृष्टीनं पाहिलें असतां मिठाईच्या पुड्यांत पेढ्यांचें बत्ताशांशीं, मोरीसाठीं केलेल्या मिश्रणांत फेनाइलचें शुद्ध पाण्याशीं, माळ्याच्या पुड्यांत गुलाबांचें कण्हेर फुलांशीं, पूना मेलच्या प्रवासांत थांबावयाच्या स्टेशनांचें न थांबावयाच्या स्टेशनांशीं, मोठमोठ्या ऑफिसांतून वरिष्ठ अधिकाऱ्यांचें कारकुनांशीं, क्लबांच्या बैठकींतून त्या बाटल्यांचें सोडालिमलेटच्या बाटल्यांशीं, प्रेमयाचनेच्या संवादांतून रमणीच्या शब्दांचें वल्लभाच्या शब्दांशीं, किंवा एकंदर समाजांत शहाण्यांचें मूर्खांशीं जें प्रमाण असतें, तेंच पहिल्या

प्रकारच्या कवितेचें दुसऱ्या प्रकारच्या कवितेशीं असतें.

आतांच केलेल्या उत्पत्तिविवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल, कीं जन्यजनकसंबंधामुळें दुसरीचें सामान्यस्वरूप अगदीं पहिल्यासारखेंच असतें. वरवर पाहणारांना या दोन प्रकारच्या कवितांचा भेद चांगलासा लक्षांतसुद्धां येत नाहीं. उलट दुसऱ्या प्रकारांत रागरंगाची रेलचेल आणि अलंकारांचा अमर्याद भरणा जास्तच दिसून येत असल्यामुळें सामान्य वाचक पुष्कळदां फुचकळ्यांत पडल्यावांचूनही राहत नाहीं. नैसर्गिक फलसृष्टीपेक्षां गोकाकची लांकडी करामत रंगेलपणांत फाजील भडक व खऱ्या राजांपेक्षां त्यांच्या नाटकी प्रतिनिधींच्या उरावर पाहणाराचा ऊर दडपून टाकणारी मोत्यांची कंठाळ बेसुमार प्रमाणाची असावयाची हा रोजच्या पहाण्यांतला खेळ आहे! दुसऱ्या प्रकारच्या कवितेचा फारपणा याप्रमाणें अवाढव्य असल्यामुळें, प्रस्तुत लेखांत आपणाला तिच्याबद्दल ऊहापोह करावयाचा आहे. पहिल्या प्रकारच्या कवितेशी आपणाला मुळींच प्रयोजन नाहीं, असें म्हटल्यास चालेल; आणि म्हणूनच सदरहू लेखांतून पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या लेखकांसाठीं अनुक्रमें 'सत्कवि' व 'कवि' असे तात्पुरते पारिभाषिक शब्द वापरण्याचें योजिलें आहे, एवढें लक्षांत ठेवण्याची वाचकांनीं सादर करावी. मराठी भाषेच्या सुदैवानें व दुर्दैवानें सध्यांचे सारेच काव्यलेखक दुसऱ्या प्रकारचे नाहींत.* कांहीं सत्कवि आपल्या मातृभाषेची वंदनीय सेवा करीत आहेत; अर्थात् प्रस्तुत लेखांत त्यांच्याबद्दल कांहीं एक लिहिण्याचें कारण नाहीं.

मात्र आतां आतां यांच्याबद्दल एवढें म्हणून ठेवल्यावांचून राहवत नाहीं कीं, यांच्या काव्यरचनेपासून सुदैवानें जसा आनंद होतो, तसाच दुर्दैवानें त्यांच्या शतपट धास्ती होतो; कारण, यांच्या एकेक कवितेपासूनच, एकाचे एकवीस आणि पांचाचे पंचवीस याप्रमाणें कवितेची कमअस्सल पैदास होत असते. यांच्या कविता व्हावयाच्या बंद झाल्या, तर आपल्या नकली नाण्याच्या टांकसाळीही खडाखड बंद होतील. मोराचा नाच डोळ्यांसमोर नसला म्हणजे लांडोरीच्या अंगांत उसनें अवसान येत नाहीं आणि गंगेला पूर आला नाहीं

---

*माझ्या कविवाचका! तुझ्या भोळ्या मनाच्या समाधानासाठीं मी मुद्दाम या मोघम शब्दाची योजना केलेली आहे. गोड फसवणीच्या भरांत माझ्या योजलेल्या अंदाजाबाहेर आणखी एक वळकटी तू या बेदाद धर्मशाळेंत हळूच टाकून टाकणार आहेस हें मला आतां उघड उघड दिसत आहे. —बाळकराम

म्हणजे ‘ गांवगंगानाही तुंबा ’ बसण्याचें कारण उरत नाहीं. एखाद्या सत्कवीच्या कवितेची पालखी छबिन्यासाठीं बाहेर पडल्याबरोबर तिच्या पाठोपाठ तिचीं जुनेरीं नेसणाऱ्या जाफराबादी छबेल्यांच्या भिडकांची धांदल पाहणाराला आकाशांतल्या मेघांची गंभीर गर्जना होतांच त्याच्या कृपाजलाचे चार थेंब न पचविण्याइतक्या हलक्या पोटाच्या बेडकांच्या आरोळ्यांची, हुबळी-धारवाडाकडे पोळ्याच्या दिवशीं वर्खानें शिंगें शोभविणाऱ्या मोठमोठया बैलांच्या मागून आपल्या टीचभर शिंगांवरही तिचीच बेगडी मखलाशी करून निघालेल्या बोकडांच्या तांड्याची, किंवा पुण्यासाताऱ्याकडे दसऱ्याच्या दिवशीं झेंडूच्या माळा घालून मिरविणाऱ्या जातिवंत घोड्यांच्या पिनीला लागून रंगीबेरंगी पट्यांनीं नटून चालणाऱ्या कुंभारी गा–– धौतेश्वर ! अशा प्रसंगीं मात्र या सत्कवींच्या काव्यानंदाचाही क्षणभर विसर पडून त्रासलेल्या मनाला हल्लीं मोठ-मोठ्या शहरांतून ‘ तीन वर्षांच्या आंतील मुलें ’ हातोहात नाहींशीं करण्याची युक्ति परमेश्वराला या सत्कवींच्या लहानपणीं न सांपडल्याबद्दल एक प्रकारची हळहळ वाटूं लागते ! तो एखाददुसरा मोरही नको आणि त्याच्या मागचा लाखों लांडोरींचा तो कळपही नको, असें होऊन जातें !

या दोन प्रकारच्या कवींच्या कृति सकृद्दर्शनीं सारख्या स्वरूपाच्या भासल्या तरी त्यांत सूज बाळशाइतकें अंतर असतें. सत्कवीच्या कवितेंत नवनव्या कल्पना विहरत असतात व आपल्या दोस्त कवीच्या बेसूर बडबडींत, येथून तेथून त्याची स्वतःची आपण कवि असल्याची एकच कल्पना दिसून येते. पहिल्याला रसि-कांच्या शुंडीच्या शुंडी शोधीत असत, दुसरा रसिकांच्या तपासांत फिरत असतो; एकाला त्याचे वाचक तो कवि असल्याचें वारंवार सांगत असतात, दुसरा आपल्या वाचकांना आपण महाकवि असल्याचें सांगत असतो; एकाच्या कवितेंत परस्पर असंबद्ध गोष्टींतून सुसंबद्ध तत्व काढलेलें दिसून येतें, तर सुसंबद्ध गोष्टींना असंबद्ध रूपानें दाखविण्यांत दुसऱ्याची कविता पटाईत असते; एकाची कविता वाचतांच तिला मस्तकीं धारण करावी असें वाटतें, तर दुसऱ्याची कविता पाह-तांच माथें फिरावयाला लागतें; पहिल्या प्रकारच्या कवितेंत कधींकधीं उघड दिसणाऱ्या अर्थाच्या आड गमतीचा गूढार्थही दृग्गोचर होतो. तर दुसऱ्या कवितेंत कांहींच अर्थ नसतो; एक गरिबाच्या झोपडींतसुद्धां स्वर्गसुख तुच्छ वाटा-वयास लावितो, तर दुसऱ्याच्या कवितेंतलीं स्वर्गसुखाचीं वर्णनें ऐकतांना नरक-यातना भोगण्याइतका त्रास होतो; थोडक्यांत आणि स्पष्ट सांगावयाचें झाल्यास एक खराखुरा कवि असतो आणि दुसरा शुद्ध नंदी शिव–शिव ! बोलण्याच्या

भरांत केवढें बाईट काम करीत होतों मी ! परनिंदा ! अतिशयोक्तीच्या नादानें या यमकमित्रांची किती नालस्ती केली ही ! क्षमा करा, गणदासांनो, क्षमा करा महाकवींत आणि तुमच्यांत मी म्हणतों तितकें विशेष अंतर नसून खरें पाहतां तें अगदीं दुर्लक्ष करण्याइतकें थोडें, केवळ दोन बोटांइतकें आहे ! महाकवि अगदीं वर्गात मराऱ्या मारीत असतात, आणि प्रासपुत्रांनो ! तुम्हांला स्वर्ग केवळ दोन बोटें उरलेला असतो, एवढेंच !

प्रयोजनाची आणि भातुकलीची परिभाषा बहुतांशीं एकरूप असते. त्याच-प्रमाणें गोरगरिबांच्या गौरीपुढील मांडणावळींत ज्याप्रमाणें त्या त्या आळींतील श्रीमंतांच्या घरची आरासच ज्याच्या त्याच्या पतीप्रमाणें दिसून येते, त्याप्रमाणें चालू काळच्या सत्कवींच्या कवितेच्या अलंकारांनींच बहुतेक कवींच्या कविता नटतथटत असतात; कारण पहिल्या प्रकारच्या कवितेंत योग्य कारणामुळें आलेल्या बहुतेक गोष्टी पहिलींत त्या आल्या एवढ्याच कारणामुळें दुसरींत उतरत असतात; भूतकाळाचा सबंध जामदारखाना याप्रमाणें आपल्यासमोर उघडा सांपडल्यामुळें कवीला काव्यसाधनाची मुळींच वाण पडत नाहीं; परंतु या वडिलोपार्जित मिळकतीची मांडणी मात्र फारच अस्ताव्यस्त स्वरूपाची असते. आणि त्यामुळें आकाशांत फिरणाऱ्या ढगाप्रमाणें पहिलींत खरोखरीच पाणी खेळत असतें; एखाद्या जलाशयांतील त्याच्या प्रतिबिंबाप्रमाणें दुसरीची सारी करामत पाण्यांत पडलेली असते. अलीबाबानें पाहिलेल्या चाळीस चोरांच्या गुहेंत अगणित अलंकारांची जिन्नसवार जुळणी तरी केलेली असेल, बारा घरच्या तुकड्यांनीं भरलेल्या मधुकरीच्या ताटांतसुद्धां ठोकळ मानाची कांहींतरी शिस्त सांपडेल, चौकीवर पडून राहिलेल्या बेवारशी सामानाची व्यवस्थाही अगदींच अाडमाप नसेल; पण कवितेच्या या रचनेंत मात्र जुन्यानव्या काळचा सारा चांगुलपणा चोरबाजारांतल्या लिलांववाल्यांच्या दुकानांतील सामानाप्रमाणें अगदींच गैर-शिस्तपणें कोंबून भरण्यांत येत असतो. खऱ्या कवितेपासून नकली कवितेचा भेद स्पष्टपणें दाखविणें अद्यापि अगदीं दुष्कर असलें, तरी त्याची कांहीं ठळक लक्षणें देतां येण्यासारखीं आहेत. तयार सांठ्यांतून मनोसोक्त उचल व्हावयाची असल्या-मुळें असल्या कवीच्या कवितेंत रूढ शब्द, कल्पना किंवा अलंकार या सर्वांचा विलक्षण भरणा झालेला असतो; मात्र यांचा उपयोग करण्यांत मालकीच्या सरावांतील मनमोकळेपणाच्याऐवजीं पाहुण्याच्या स्वागतसमारंभासाठीं शेजारच्या श्रीमंतांकडून आणलेल्या रुप्याचांदीच्या भांड्यांचा वापर करतांना आपलेपणाचा छाप बठविण्याच्या हेतूनें हलक्या मानाचा मनुष्य जो फाजील बेफिकीरपणा

दाखवीत असतो, तोच या कवितांतून येथून तिथून येत असतो. ठिकठिकाणीं क्षुल्लक वर्णनासाठीं निर्वाणीच्या, व उत्कट रसपोषणासाठीं अगदींच निर्जीव शब्दांचा उपयोग झालेला असतो. यामुळें या कविता तयार कपडे विकावयाच्या मोठमोठ्या इंग्रजी दुकानांतून दाराशीं नखशिखान्त सजवून ठेवलेल्या पुतळ्यांच्या खड्या थाटांत असलेल्या दिसतात.

आहे, वाचकहो! उपमादृष्टांताच्या या फाजीलपणामुळें त्रासलेल्या तुमच्या मनाची स्थिति माझ्या लक्षांत आहे! त्याचप्रमाणें प्रस्तुत लेखाचें लांबलचक चऱ्हाट कवितेइतकेंच कंटाळवाणें होत चाललें आहे, हेंही मी पुरेपूर जाणून आहें; पण इलाज नाहीं. लेखाचा विषय कविता असल्यामुळें माझ्या अंगांत या वेळीं ती गद्यरूपानें संचरली आहे; तेव्हां उपमा वगैरे अलंकारांची गर्दी ही व्हावयाचीच! तसेंच तुमच्या दृष्टीला दिसणारें हें चऱ्हाट विश्वव्यापी कविता-देवीच्या गंगावनांतील गोफालासुद्धां पुरावयाचें नाहीं.

भिन्नभिन्न उपमा, कल्पना किंवा शब्दप्रयोग यांचें एका वाक्यांत मिश्रण हें या भेदाचें दुसरें स्पष्ट लक्षण होय. उदाहरणांनीं हें लक्षण सुबोध करावयासाठीं वैयक्तिक टीकादोषाला प्राप्त होणें अपरिहार्य असल्यामुळें प्रस्तुत लेखांतील ' कवितादेवीचें शिखर' वगैरे प्रारंभींची वाक्यरचना वाचकांना पुन्हा पाहण्याची शिफारस करून मी मोकळा होतों. एकीचें पूर्वार्ध दुसरीच्या उत्तरार्धाशीं सांधून सजलेली मिश्र कल्पना पाहतांच अर्धमीनाकृति सागरसुंदरी पाहणाऱ्या ग्रीक खलशाप्रमाणें, किंवा कमरे-पर्यंत फत्तराच्या व वर मानवी देह धारण करणाऱ्या बकावलीपरीला पाहणाऱ्या ताजुलमुलकाप्रमाणें बिचाऱ्या वाचकाला गोंधळून गेल्यासारखें होत असतें. तिसरी खूण रचनेच्या स्वरूपाबद्दलची असते. कोणत्याही विषयावर कविता करावयाला बस-तांच आपल्या कवीला प्रथम स्वाभाविकपणेंच इतरांच्या त्या विषयावरील उत्तमोत्तम कल्पना आठवतात. यांचा उपयोग झाल्यानंतर दुसऱ्या प्रतीच्या कल्पनांच्या पल्ट-णीची हजिरी होते. याप्रमाणें उतरत उतरत शेवटीं स्वतःच्या रद्दड कल्पकतेची पुर-वणी जोडण्यांत येते. यामुळें सहजच रसपरिपोष, कल्पनासौंदर्य वगैरे बाबतींत आपल्या कवीची कविता नेहमीं उतरत्या भांजणींत केलेली दिसून येते. प्रारंभींच्या दोनचार ओळींशीं शेवटल्या ओळींची तुलना करून पाहतांच ही गंमत वाचकांच्या चटकन् लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. अशी कविता पाहणाराला पहिल्या दुसऱ्या वर्गांच्या डब्यांना जोडवूनच मालचे डबे ओढणाऱ्या सदर्न मराठा रेल्वेच्या गाडीची, किंवा कॉलर नेक्टायपर्यंत सुधारलेल्या पोषाखानंतर कमरेभोंवतीं पिढीजाद रुमालाचा फडकाच लावून काल्यांच्या जत्रेंत मिरविणाऱ्या

कोळीदादाच्या मूर्तीची आठवण होत असते. अलीकडे कांहीं मासिक पुस्तकांतून कवितेच्या प्रारंभींच कवीचें नांव देण्याची वहिवाट पडत आहे, ती या दृष्टीनें पाहतां अस्थानीं आहेशी वाटूं लागते. कारण शेवटच्या भागावर कवीची खरीखुरी मालकी असल्यामुळें त्याचें नांव शेवटीं येणेंच रास्त आहे. याशिवाय विशेषणाचा दुरुपयोग, कल्पनेची चोरी छपविण्यासाठीं मूळच्या साध्या शब्दां-ऐवजी संस्कृतांतल्या आडरस्त्यावरच्या शब्दांची योजना, इत्यादि बारीकसारीक लक्षणेंही सांगतां येण्यासारखीं आहेत. सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास लांबलांब संस्कृत समास वापरण्याच्या रीतीचा उगमही असल्या छपवाछपवीच्या इच्छेपासूनच झालेला आहे, असें दिसून येईल.

कोणत्याही काळीं कवींचा एक भला मोठा कळप समकालीन सत्कवींची री ओढून अशा प्रकारची कविता करण्यासाठीं सारखा झटत असतो. नवे नवे सत्कवि उदयाला येतील, तसतशी यांच्या काव्यरचनेची पद्धति बदलत जात असते. मोटमोठ्या कचेऱ्यांतून वरचा अधिकारी वेळोवेळीं बदलला जाऊन कारकूनपेशाचे कारागीर मात्र अगदीं बुढेपणांतही आपल्या जागीं तितक्याच आज्ञाधारक लघुवृत्तीनें काम करीत असतात, तद्वत् या कवींच्या मेळ्यांची स्थिति असते. कोणीकोणी कवि उभ्या आयुष्यांत एखादुसरी कविता नीटशी समजतांच तिच्या भिन्नभिन्न शिळ्या आवृत्ति काढण्याचा उपक्रम सुरू ठेवीत असतात. जगाच्या अमुद्रित काव्यसंग्रहांत अशा शिळ्या छापाचें कामच विशेष असल्याचा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. अष्टौप्रहर चालू करून ठराविक वर्तुळांतच गिरक्या खाणाऱ्या चक्राळांतील कांट्यांप्रमाणें यांची कटकट अखंड चालू असते. मात्र घोडकेसांच्या झाडणीचे केंस जसे कितीही काळ गेला तरी पांढरे होण्याचा संभव नसतो, तसा वाढत्या कालमानाप्रमाणें यांच्या पोरकटपणाचेंही ज्ञानवृद्धत्वांत कधीं पर्यवसान होण्यासारखें नसतें. आतां आपल्या चालू काळच्या कवीचा साधारण नकाशा काय असतो, हें पाहण्याचा थोडाबहुत प्रयत्न करून पाहूं.

प्राणिसृष्टींतील इतर घटकांप्रमाणेंच 'कवि हा जन्मावा लागतो.' मडकें, वस्तरा, गुडघानी वगैरे पदार्थांसारखा तो 'करून होत नाहीं.' सर्व जगाशीं याचें बंधुत्वाचें नातें असल्यामुळें जातिभेदाच्या अभावीं हा अगदींच विजातीय असतो. याचें आयुष्य बाल्यावस्था, तारुण्यावस्था, व विरहावस्था या तिहींनीं विभागलेलें असतें, कवि म्हातारा मात्र असल्याचें अजून ऐकिवांत नाहीं. याचें बाळपण मोठ्या सुखांत गेलेलें असतें; परंतु तारुण्य मात्र तितकेंच दुःखपूर्ण असतें. याच्या जीविताची श्वसनक्रिया आजन्म दीर्घ निःश्वासांनींच होत असते. याच्या

अंतरीं कसली तरी आग भडकलेली असते. हा रानावनांतून, डोंगरांवरून, जलाशयाच्या तटांवरून किंवा बागबगीच्यांतून नेहमीं फिरत असतो. आनंदांत निमग्न असणें, रडणें, तंद्रींत पडणें, किंकाळ्या मारणें, आलोचन जाग्रणें करणें; स्वप्नें पाहणें, भ्रांतिष्टासारखें भटकणें, अश्रूंच्या पुरांत वाहून जाणें, फुलपांखरांच्या मागें लागणें, जगावर लाथ मारणें यांसारख्या करमणुकीच्या प्रकारांत हा आपला फावला वेळ घालवीत असतो याला फुलांची दांडगी आवड असते. मात्र हा लहरी स्वभावाचा असल्यामुळें गाण्याबजावण्याचाही याला बराच शोक असतो याचा मुख्य आहार म्हणजे अमृत होय. तें आणण्यासाठीं हा हरघडीं स्वर्गापर्यंत येरझारा घालीत असतो. वर्णनावरून पाहतां अमृताचा रंग पांढरा असावा. या अमृतपानामुळें हा जिवंतपणीं मेल्यासारखा असतो, तरी मरणोत्तर चिरंजीव होण्याची याला खात्री असते. आपली कविता पुढल्या पिढीला आवडण्याबद्दल हा वाटेल तशी हमी देत असतो याची एकंदर वृत्ति एखाद्या बालकासारखी असते. कवीच्या वस्त्रप्रावरणाबद्दल बहुतेक कोठेंही उल्लेख केलेला नाहीं. 'अरसिकेषु कवित्वनिवेदनम्', 'निरंकुशाः कवयः', 'तान्प्रतिनैष यत्नः' आणि 'कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर' या चार बुरजांच्या किल्ल्यांत याचें वास्तव्य असतें. जगाच्या कल्याणाची जबाबदारी यानें आपल्या टाळक्यावर घेतलेली असते. व्यवहाराच्या सोईसाठीं यानें गुणविभागशः मनुष्याच्या दोन जाती पाडिलेल्या असतात. आपली कविता वाखाणणारी शेलकी मंडळी 'रसिक' वर्गांत बसवून हा बाकीच्या सर्वांना जाल्या 'अरसिक' कोटींत टकलून देतो. (ही विभागणी वैयक्तिक तत्त्वावर होत असल्यामुळें एका कवीचा रसिक दुसऱ्याच्या हिशेबी अरसिकांत जमा व्हावयाला कांहीं हरकत नसते.) पैकीं रसिकांशीं याची जिवाभावाची दोस्ती असून अरसिकांशीं मात्र याचें हाडवैर असतें. कवीचें व्याकरणाशींही असेंच दांडगें शत्रुत्व असतें. कांहीं कांहीं कवि तर जवळ जवळ अक्षरशत्रूही असतात. याशिवाय गंधर्व, अप्सरा इत्यादि परलोकच्या रहिवाशांशींही कवीची थोडीबहुत पैछान असते. याचें सर्व जगभर प्रेम असतें. हा विलक्षण मत्सरी असतो. आपल्या कवितेविषयी बोलतांना तो पंढरपुरच्या वारकऱ्यांच्या धिंगाण्यानें गर्जत असतो; तसेंच दुसऱ्यांच्या कवितेविषयीं बोलणें निघतांच त्याच्या तोंडावर समाधिष्ठाची स्तब्ध गंभीरता पसरते. कवि स्थल-कालाविषयीं बिलकुल पर्वा करीत नाहीं; नाहीं म्हणावयाला मासिक पुस्तकाच्या संपादकाजवळ मात्र 'पुढच्याच महिन्यांत' 'आपल्या कविते' ला स्थळ देण्याविषयीं तो कधींमधीं अजीजी करीत असतो. कीर्तीविषयींही तो असाच बेफिकीर असतो. एखाद्यानें आपली कविता वाचल्या-

वर हा आतुरतेनें ती कशी काय असल्याबद्दल चौकशी करितो, ती केवळ वाचकाची रसिकता पाहण्यासाठीं. हा घरचा अतिशय दरिद्री असतो. मात्र अस्सल गर्भश्रीमंतांना आपल्या गजान्तलक्ष्मीबद्दल वाटत नसेल इतका कवीला आपल्या दारिद्र्याचा अभिमान असतो. आकाशांत गिरक्या घेणाऱ्या गिरकेबाज कबुतराला गरिबीच्या गिलोलानें कोलमडून तडफडतांना पाहिलें, म्हणजे जगाची काळजी वाहणाऱ्या या जिवाचे असे हाल करणारा परमेश्वर मोठा निर्बुद्ध असला पाहिजे, असें तिऱ्हाइतालासुद्धां कधींकधीं वाटण्याचा संभव असतो; परंतु प्रत्येक कवीच्या घरीं मासिक पुस्तकांकडून परतलेल्या कवितांचें द्रव्याभावामुळें न छापलेलें बाड पाहणाराला मात्र कवीपेक्षां परमेश्वरालाच जगाची जास्त काळजी वाटते, असें प्रांजलपणें कबूल करावें लागतें. कवीचें अंतःकरण आरशासारखें असतें! अर्थात् अशा हृदयांत समोर असेल त्या काव्याचें जसेंच्या तसें प्रतिबिंब वठत असल्यास तें रास्तच आहे. अगदीं लहानपणापासूनच याला कविता करण्याचा रोग जडलेला असतो. हा रोग कोणत्याही उपायानें हटण्यासारखा नसतो. एकदां हालूं लागलेला दांत सोन्याच्या तारेनें कांहीं काळ तरी बांधून स्थिर ठेवितां येतो, पांढरा झालेला केंस कलपानें तात्पुरता तरी काळा होतो; परंतु कवि मात्र सोन्याची रास पुढें ठेविली, किंवा टीकांमुळें ठिकठिकाणीं काळाठिक्कर पडला, तरी कविता करावयाचा थांबत नाहीं. कवीचें नांव बहुधा त्याच्या आप्तेष्टांच्या नांवांशीं संलग्न असतें. नांव मिळविण्याइतकी अक्कल नसल्यामुळेंच कवीला सग्यासोयऱ्यांच्या नांवावर भिस्त ठेवावी लागत असेल, अशी क्षुद्र कल्पना लढवून कोणी कोणी या प्रघाताला नांवें ठेवण्याचा प्रयत्न करतात; परंतु त्यांत नांवापुरतेंसुद्धां तथ्य नसतें. पुढेंमागें कवितेमुळें आपलें नांव घालविण्याची भीति असल्यामुळें आप्तेष्टांना दूरदृष्टीनें पुढें लोटणाऱ्या कवीला अक्कल नाहीं, असें कोण म्हणेल! शिवाय दांतांवरुन जाणत्यांना घोड्याचें वय ओळखतां येतें, त्याप्रमाणें दरदी मनुष्याला कवीच्या या नांवावरून त्याचें काव्यारंभाच्या काळचें वय हुडकून काढतां येण्याचीही या पद्धतीनें थोडीशी सोय होते. पुत्र किंवा बंधु या अर्थाच्या शब्दांनीं नांवाचा शेवट करणारा कवि बहुधा बाळपणींच कविता करण्याला शिकलेला असतो, असा अंदाज करणें फारसें चुकीचें होणार नाहीं. कारण प्रणयाची लज्जत कोंवळ्या वयांत समजण्याजोगी नसल्यामुळें मुलाच्या प्रेमाची मर्यादा आईबाप, बहिणभाऊ यांच्यापुरतीच पसरलेली असते. 'भ्रमर', 'मयूर' वगैरे काव्यसृष्टींतल्या परक्या मंडळीच्या नांवावर विकावयाला तयार झालेल्या उमेदवाराला बाल्य व तारुण्य यांच्या सीमारेषेवर उभा करतां येईल.

या वयांतील प्राणी जन्मदत्त नातेवाइकांच्या प्रेमाला तृप्तीमुळें कंटाळलेला, स्त्रीविषयक प्रेम न जाणणारा; परंतु त्याची अंधुक कल्पना असल्यामुळें तें शोधावयाच्या मार्गाला लागलेला असा असतो; आणि म्हणून या भटकण्यांतच त्याची वरील मंडळीशीं ओळख घडून येत असते. रमणाच्या नात्यानें सरसावणारा प्रणयी वीर तरुण वयाचा असतो, हें सांगावयाला नकोच. यापुढील वयांत कविता प्रसिद्ध करायला लागलेला कवि स्वतःच्या संपूर्ण नांवानें, किमान पक्षीं 'यशवंत', 'सदाशिव' याप्रमाणें एकतृतीयांश नांवानें तरी पुढें येऊं लागतो. कवीचें सर्वच जीवन जगाविरहित असल्यामुळें नात्याच्या बाबतींत त्याच्या कल्पनांतून कधींकधीं विसंगतपणा दिसून येतो. आपल्या कवितेला हा कधीं कन्या कल्पून तिला वाटेल त्या रसिकांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं झटत असतो, तर कधीं तिला आपलीच वल्लभा ठरवून तिच्याभोंवती नाचत सुटतो! बाकी एका अर्थी कवीच्या विश्वबंधुत्वामुळें या विरोधाचें सहज खंडन होण्याजोगें आहे.

साऱ्या जन्मभर कविता करणें हा जरी कवीचा व्यवसाय असला, तरीही वर सांगितलेल्या अवस्थात्रयीमुळें त्याच्या जीवनक्रमांत वेळोवेळीं महत्त्वाचे फेरफार घडून येत असतात. बाळपणीं आईच्या मांडीवर लोळत राहणें, फुलांत उठणें-बसणें, पतंग फुलपांखरांच्या बरोबर बागडणें, हाच त्यांचा मुख्य रोजगार असतो. पुढें लवकरच याला कविता करण्याची कला प्राप्त होते. या वयांत शकुंतलेच्या सखीप्रमाणें याला 'भेलें विषयासंबंधीं वारें 'ही लागलें नसल्यामुळे अर्थातच हा कवितेसाठीं विषयसुद्धां उघड उघड प्रसिद्ध कवितांतीलच घेत असतो. या वयांतील त्याची कविता स्थलवर्णनांत किंवा नीतिपर तत्त्वें हुडकण्यांत गढलेली असते. षड्रिपूंशीं सामने, संसाराच्या भोवऱ्यांत सांपडल्याबद्दल खेदप्रदर्शन, चौऱ्यायशीं लक्ष योनींचा फेरा चुकविण्यासाठीं ईश्वराची प्रार्थना वगैरे भानगडी याच वयाच्या कवितेंत उरकून टाकण्यांत येतात. कवि काळाच्या पुढें असतो, ही गोष्ट सर्वत्र महशूरच आहे. तिला अनुसरून जरासें वयोमान वाढतांच आपला कवि शृंगाराकडे वळतो. या अल्पवयस्क अवस्थेंतील त्याची सारी कविता बहुतकरून शृंगारालाच वाहिलेली असते. या वेळीं हा सुखसागरांत पोहत असतो. यानंतर बहुतेक लवकरच त्याचें लग्न झाल्यामुळें विरहावस्थेचा काळ सुरू होतो. साधारण दहा-जणींसारखी बायको मिळाल्यामुळे त्याच्या भ्रमाचा भोंपळा फुटून हा सुखसागरांतच गटंगळ्या खाऊं लागतो. बायको मिळाल्यामुळें विरहाला प्रारंभ होणें हा कवीच्या आयुष्यांतील सर्वांत मोठा विरोधाभास अलंकार होय. कवीचें लग्न जरी एकदांच होत असतें, तरी त्याला दोन स्त्रिया असतात. एक संसारकामांत

रावणारी बायको व दुसरी कवितेंत नाचणारी प्रिया. यांपैकीं बायको घरांतल्या घरांत काबाडकष्ट करून पोराबाळांच्या खस्ता खात असते, आणि प्रिया कवीला गुंगारा देऊन कोठेंतरी दडून बसलेली असते. बायकोशीं याचें चारचौघांसमक्ष राजरोस लग्न झालेलें असतें, प्रियेशीं हा गांधर्वविवाहानें संबंध जोडूं पाहत असतो. ती याच्या इष्टमित्रांनीं कधीं पाहिलेली नसते, किंबहुना यानेंही पाहिलेली नसते. तिला आळविण्यासाठीं हा परोपरीनें रडत असतो. कधीं कधीं हा छातीवर फुलें ठेवून पडलेला असतो. याच्या डोळ्यांतून अश्रूंचे अलोट पूर वाहत असतात. आमच्या तिंबूनानांनीं तर आगीसाठीं बंब ठेवण्याच्या आटा-आटीपेक्षां विरहावस्थेंतील कवींचाच उपयोग करण्याची आमच्या म्युनिसि-पालिटीला शिफारस करण्याचें मनांत आणिलें होतें; परंतु कवीला आपल्या अलोट पुरानें स्वतःच्या हृदयांतील विरहाग्नीच्या ज्वाळा विझवितां येत नाहींत, असें पाहून नानांनीं आपला हा बेत रद्द केला. या अवस्थेंत कवीच्या सभोंवार भयाण अंधार पडलेला असतो. या अंधारांत बसून तो सिनेमाथिएटरांतील प्रेक्षकांप्रमाणें कल्पनातीत गोष्टी पाहत असतो. पृथ्वीवरील लहानसहान गोष्टींच्या वर्णनासाठींसुद्धां याला स्वर्गापर्यंत भरारी मारावी लागते. उंटावरून शेळ्या वळण्यापेक्षांही वरच्या दर्जाच्या या करामतींत कवीकडून कधीं कधीं गमतीचा वस्तुविपर्यास होत असतो. एका कवीनें मोराच्या मधुर गायनाची शिफारस केली आहे. दुसऱ्याला आश्विनमासाचे दिवस विलक्षण शांतीचे वाटून जमीन हिरव्या कुरणांनीं मंडित झालेली दिसली आहे. तिसऱ्यानें बोरघाटांत हंसाची वसाहत करून ठेविली आहे. कोणी फुलपांखराचें गाणें ऐकिलें आहे. कोणी काकडभुंग्याला सकाळीं सूर्याला सामोरें जाऊन स्वागतपर गातांना पाहिलें आहे. एकानें आपण बोलूनचालून स्पष्ट रोडकेच असलों, तरी आपला तिरस्कार न करण्याबद्दल आपल्या प्रियेला विनवणी केली आहे; जणूं काय सुंदर स्त्रियांच्या डोळ्यांत भरण्यासाठीं तरुणांच्या अंगीं गलेलठ्ठपणा हा गुण अवश्यच आहे! या व याच धर्तीच्या अनेक आचरट चुका पाहून वाचकांना राग येण्याचा संभव आहे खरा; परंतु हे सारे शोध कवीनें स्वर्गांत भरारी मारून तेथून केलेले आहेत, असें कळल्यावरून तरी ते क्षम्य वाटावयाला हरकत नाहीं, असें वाटतें. स्वर्गाच्या खालोखाल कवीला स्मशानाची आवड असते. यामुळें भुतांखेतांशींही त्याची बरीच जानपछान झालेली असते. विरहावस्थेंत कवि मरणाची सारखी अपेक्षा करीत असतो; परंतु बहुधा त्याच्या काव्यनिर्माणशक्तीला वचकूनच यम त्याची ही प्रार्थना होतांहोईतों ऐकत नाहीं. मला वाटतें, प्राणिमात्राच्या यच्च-

यावत् हालचालींची नोंद ठेवणाऱ्या चित्रगुप्तानेंसुद्धां, आपल्या आधुनिक कवींच्या कवितांच्या नकला करण्यापुरती देवाजवळून सवलत मागून घेतलेली असेल. आमचा भांबूराव ( याच्या व आबाभटजींच्या कवित्वाचें विस्तृत वर्णन पुढें येणारच आहे. ) आपल्या विरहावस्थेच्या काळांत मरण्यासाठीं असाच आतुर झाला होता. या एकाच [विषयावर त्यानें इतक्या कविता केल्या कीं, अखेर नानांनीं कंटाळून त्याच्या टेबलावर अफू, सोमल वगैरे द्रव्यांची साऱ्या आधुनिक कवींना पुरून उरण्याइतकी रास आणून ठेविली होती ! विरहदुःख भोगीत असतांना आयुष्याच्या शेवटच्या टोंकाप्रमाणें प्रारंभींच्या टोंकावरही कवि मधूनमधून नजर टाकीत असतो. चालू काळाच्या दुःखामुळें त्याला बालपण विशेषच सुखाचें वाटूं लागतें ! शिवाय बाळपण मूळचेंच सुखप्रद असल्याबद्दल सर्व जगाचीच एकवाक्यता आहे ! वाचकहो ! आपलें बाळपण कोणाला रमणीय वाटत नाहीं ? मोठमोठ्या कवींनींसुद्धां 'बाळपणाचा काळ सुखाचा', 'रम्य तें बाळपण देईं देवा फिरुनि' किंवा 'बाळपणींच्या नाना तऱ्हा' अशांसारखे बाळपणाचे पोवाडे गाइलेले आहेत ! अहाहा ! तें बाळपण आणि त्या लीला ! तें अर्ध्या तिकिटानें प्रवास करणें ! तें निम्म्या दरानें नाटक पाहणें ! तें सर्वांनीं कौतुक करणें ! माझ्या लहानपणीं शेजारपाजारच्या बायकांनीं पटापट चुंबनें घेऊन माझे लाड पुरवावेत; पण तेंच आतां—! वाचकहो, बाळपणींचें सुख अवर्णनीय आहे, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं !

यानंतर कवीच्या अंगच्या मुख्य गुणाचें वर्णन करावयाचें आहे. हा गुण म्हणजे कवीचें वेड होय. कवीच्या वेडासाठीं स्वतंत्र टप्पा (पॅराग्राफ) न राखणें निव्वळ वेडेपणाचें होईल. कवि हा उपजत वेडा असतो. लेखाच्या तोंडांतच कवीचा व वेडाचा संबंध उडत्या उल्लेखानें दर्शविलेला आहे. कवीचें हें वेड घालविण्याचा प्रयत्न करणें तर दूरच राहिलें, परंतु तें नाकबूल केल्यानेंसुद्धां आपल्याशीं कवि उभा दावा धरील. या वेडाच्या भरांत कवि वाटेल तो विलक्षण चमत्कार करून दाखवितो. एका कवीनें आपल्या कुटुंबांतील सारीं माणसें मेल्याचें एका सद्गृहस्थाला पत्र पाठविलें आणि दुसऱ्या दिवशीं सर्वांच्या खुशालीचें दुसरें पत्र पाठवून त्यांत पहिल्यांतील सर्व गोष्टी आपण वेडाच्या भरांत लिहिल्याबद्दल खुलासा केला ! जगाला उपदेश करावयाला तयार झालेला हा महात्मा स्वतः वेडापीर असतो, हें साहित्यशास्त्रासंबंधी सत्य, पदार्थमात्राला दृष्टिगोचर स्वरूप देणारा प्रकाश स्वतः अदृश्य असतो या पदार्थशास्त्रांतील तत्त्वालाहि लाजविण्याजोगें आहे ! कोणाला पैशाचें वेड लागतें, कोणाला कीर्तीचें

वेड लागतें. एका बाईला आपण पोस्टाचें तिकिट असल्याबद्दलचें वेड लागलें होतें; एका गृहस्थाला आपण प्रमाणाबाहेर लठ्ठ असल्याचें व दुसऱ्याला अक्षय पाऊस पडत असल्याचें वेड लागलें होतें; परंतु कवीला आपण वेडे असल्याचेंच वेड लागलेलें असतें! प्रत्येक कवि आपल्याला निर्भेळ वेड लागल्याबद्दल अट्टाहासानें दवंडी पिटीत असतो. लोकांना हें वेड खरें वाटण्या-साठीं तो भर दोन प्रहरींच फिरावयाला निघतो, केंसांच्या झिंज्या पसरतो, चारचौघांत बोलतांना मध्येच स्वगत भाषणाला सुरुवात करितो, पंक्तींत जेवतांना 'दुग्धीं भिजू' पिळणाऱ्या अर्जुनालाही शहाणा म्हणवितो, (एकानें तर एकदां आपल्या शेजारीं जेवावयाला बसलेल्या एका वृद्ध गृहस्थालाच प्रिया-मजकूर समजून त्याच्या तोंडांत घांस भरविण्यालाहि कमी केलें नाहीं.) कोटाचीं बटनें उघडीं टाकतो, टाळक्यावरची टोपी सवा हात मागें ठेवितो, किंवा भर-रस्त्यांत मध्येंच बैठक मारतो. इस्पितळांतील वेड्यांच्या आणि कवींच्या तांड्यांची थोडीशी तुलना करणें फारसें वावगें होणार नाहीं. इस्पितळांतील प्रत्येक वेडा तिऱ्हाइताला स्वतः खेरीज तेथील बाकी सर्व रहिवाशी वेडे असल्याबद्दल बजा-वीत असतो, आणि कवींच्या टोळींतील प्रत्येकजण हा हक्क स्वतःपुरताच राखून ठेवीत असतो. वेडा उगीच झाडव्यातिडव्या उड्या मारितो, तर कवीच्या स्वर्गापर्यंत उड्या चाललेल्या असतात! तो लोकांना धोंडे मारितो, तसा हा रसि-कांच्या अंगावर धूळ उडवितो, तर दुसरा लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं झटत असतो! या कवींच्या स्वर्गापर्यंतच्या साऱ्या उड्या केवळ त्यांच्या वेडाच्या जिवावर चाललेल्या पाहून मात्र स्वर्गाच्या सरहद्दीवरील बंदोबस्त फारच ढिलाईचा होत चालला असावा, असें वाटूं लागतें! हे स्वर्गस्थ देवांनो, आम्हां आर्यांचीं टीकांचीं बाडें मासिक पुस्तकांचीं कपाटें फोडून तुमच्या कानांवर येऊन आदळत नाहींत काय? स्वर्गप्राप्तीचे ते कडक निर्बंध आज कोठें गेले? आपल्या विधवेच्या केंसानें किंवा जानव्याच्या सुतानें स्वर्गास जाणाऱ्या आमच्या आर्य-कल्पना लयाला जाऊन नुसत्या वेडाच्या कल्पने-नेंच आतां स्वर्गसुख मिळणार काय?

कवीच्या आणखी एका गुणाचा उल्लेख करून त्याचें हें लांबलेलें वर्णन पुरें करूं. कविता करण्याइतकाच त्याला आपल्या कविता दुसऱ्याला वाचून दाखविण्याचाहि हव्यास असतो. अर्थात् नव्या कवितेचा पहिला मारा कवीच्या निकटच्या मित्रांवरच होत असतो. कांहीं कवि आपलें बाड बरोबर घेऊन हिंडत असतात, आणि कांहीं तर साऱ्या कविता पाठ म्हणून दाखवीत अस-

तात. या कवितांतील लहानसहान गुणांचें सविस्तर स्पष्टीकरणसुद्धां श्रोत्याला एकावें लागतें! माझ्या एका कविमित्रानें मला कविता ऐकविण्याचा इतका त्रास दिला कीं, ज्यांचें नांव तें! कोठेंहि व केव्हांहि तो भेटला, कीं त्याच्या सगळ्या वेगम कवितांचा मला नजराणा केल्यावांचून राहात नसे! एकदां भरबुधवारांत त्यानें तालसुरावर आपल्या कविता म्हणून दाखवायला सुरुवात केली. हळूहळू आमच्याभोंवतीं तमासगिरांचा तांडा जमूं लागला! लोक आपणाला वेडे समजतील, असें मीं त्याला सुचवितांच त्याला दुप्पट अवसान येऊन रंग चढत चालला. शेवटीं बुधवार चौकांत येईपर्यंत आमच्या मागें इतका बेताल घोळका जमला कीं, ज्याचें नांव तें! त्याच रत्नानें आणखी एकदा माझा असाच कोंडमारा केला होता! त्या वेळीं मी एका निकडीच्या कामांत गढून गेलों होतों. अशांत कोठल्याशा आप्ताच्या मरणाबद्दलचें आपलें शोकरसप्रधान छांदेखानी काव्य आणून त्यानें माझ्या सेवेला सादर केलें. मला त्या वेळीं फुरसत नसल्यामुळें पुढें केव्हां तरी स्वतःच तें वाचून पाहण्याचें अभिवचन देऊन तूर्त माझा वेळ न घेण्याबद्दल मी मोठ्या काकुळतीनें त्याची विनवणी केली. बराच वेळ नाखुषीनें आढेवेढे घेऊन शेवटीं त्या काव्यांतील निदान सत्रावें कडवें तरी आपल्या तोंडूनच ऐकण्याचा मला आग्रह केला. माझा रुकार मिळतांच त्यानें तें कडवें अगदीं टाईत आळवून आळवून म्हणण्याला प्रारंभ केला. त्यांतील गुणांच्या विवेचनांत मागील संदर्भ माझ्या लक्षांत येण्यासाठीं त्यानें सोळावें कडवें म्हणून दाखविलें! सोळाव्याच्या स्पष्ट बोधासाठीं पुन्हां पंधराव्याची साक्ष! याप्रमाणें अरेबियन् नाइट्समधील गोष्टींतून गोष्ट निघण्याच्या तत्त्वाबरहुकूम आम्हीं मागल्या पावलीं जात जात पहिल्या कडव्यावर जाऊन ठेपलों! आणि तेथून संगतवार शेवटपर्यंत आलों. गुणांच्या सूक्ष्म शोधासाठीं याप्रमाणें त्या काव्याचीं आम्हीं एकंदर तेरा पारायणें केलीं. शिवाय प्रत्येक वेळीं प्रत्येक चरण नीट कळण्यासाठीं तो चारचारदां घोळून म्हणत होता, तें वेगळेंच! मधून मधून आत्मस्तुतिपर मल्लिनाथीचा माराही सारखा चालू होताच. आमच्या संवादांतील चारसहा वाक्यें नमुन्यासाठीं पुढें दिलीं आहेत.

तो– लक्षांत नाहीं आलें तुमच्या! ही या चरणांतली मुख्य मखळी आहे.

मी– आलें लक्षांत! फार मार्मिकपणानें तुम्हीं हें वर्णिलें आहे खरें!

तो– माझ्यांत हेंच तर विशेष आहे! दृष्टीचें सूक्ष्म अवलोकन! तुमच्या सामान्य दृष्टीला जिथें कांहीं दिसत नाहीं तिथें मला हजारों गोष्टी दिसतात.

मी– तुमची कविताच याबद्दल साक्ष देईल! ( त्याच्या कवितेंत मला एकही गुण दिसत नसून त्याच्या दृष्टीनें मात्र तिच्यांत गुणांनीं गजबजलेली शहरेंच्या शहरें दिसत होतीं. मात्र माझ्या या वाक्यांतील खोंच त्याच्या लक्षांत आली नाहीं. पण त्याची कविता ऐकण्याचा कंटाळा मी माझ्या तोंडावर स्पष्टपणें दाखवूनही जेथें त्याच्या सूक्ष्मदर्शक यंत्राच्या आटोक्यांत आला नाहीं, तेथें त्या गर्भित सूचनेचा काय पाड ? )

तो– उगीच अशी कविता नाहीं होत! अंतःकरण सृष्टीशीं एकजीव झालें पाहिजे! बस्स, कवीला हृदय पाहिजे! कवीला डोक्याची कांहीं जरूर नाहीं!

मी– अगदीं बरोबर! आपल्या पुष्कळशा कवींना विधात्यानें डोकें दिलें आहे, तें उपयोगाकरितां नसून केवळ मनुष्यदेहाची परंपरा संभाळण्याकरितांच असावें असा माझा समज आहे!

तो– तुमचा समज अगदीं खरा आहे! माझेंच उदाहरण घ्या कीं! हृदय मृदु नसतें, तर अशी कविता होती का? अहो, हृदयच काय, माझा हात पाहा, कविता लिहून लिहून किती मऊ झालेला आहे तो! स्वर्गापर्यंत भराऱ्या एरवीं साधत नाहींत!

नुसता हात मऊ झाल्यानें स्वर्गापर्यंत जाण्याचें त्याला सामर्थ्य आलेलें पाहून पाठीचींसुद्धां हाडें मऊ करून त्याला अजिबात स्वर्गवासी करण्याची परोपकारबुद्धि क्षणभर माझ्या मनात येऊन गेली! हें काव्यवाचन चाललें असतांना तो त्या मेलेल्या आसाबद्दल मधून मधून रडतही होता! मीही मयत-मजकूर अगदीं अवेळीं मेल्याबद्दल मनापासून दिलगिरी प्रदर्शित केली! पुढें तो शोकानें ओक्साबोक्शीं रडूं लागतांच मी किंकाळ्या मारावयाला लागलों, आणि शेवटीं दुःखावेगाच्या भरांत बेशुद्ध झाल्याचें सोंग करून धाड्‌कन् धरणीवर अंग टाकलें! माझ्या अंदाजाप्रमाणें डॉक्टर वगैरे आणण्याच्या खटपटींत न पडतां तो आपल्या शीघ्रकवित्वाच्या जोरावर अश्रुजलानेंच मला सावध करूं लागला! कांहीं वेळ श्वासोच्छ्वास साफ बंद ठेवून मी तसाच निपचित पडून राहिलों त्या वेळीं मात्र आपल्यावर कांहीं किचाट येईल, या भीतीनें तो आपलें चंबूगबाळें आवरून घाईघाईनें निघून गेला, आणि मी एकदाचा त्या जाचांतून सुटून अस्वलाच्या तावडींतून वाचलेल्या इंग्रजी प्रवाश्याप्रमाणें मोकळेपणानें आपल्या कामाला लागलों! प्राणायामाचें महत्त्व या वेळेपर्यंत मला नीटसें समजलें नव्हतें!

काव्यवाचनाबद्दल कवीचा लकडा इतका चिकाटीचा असल्यामुळें त्याच्याशीं

ओळख होणें हें दुर्दैवाचें लक्षण आहे. माझा तर असा तर्क आहे, कीं वाल्मीकीच्या शतकोटि रामायणाचे तीन तुकडे तीन लोकीं वांटून देऊन स्वतः-साठीं ' राम ' हीं दोनच अक्षरें ठेवण्यांत भगवान् कैलासनाथाचा हाच लोक-हितपर हेतु असला पाहिजे, कारण एवढें मोठें काव्य वाचण्याची जबाबदारी कोणत्याही एकाकी लोकावर टाकणें केवळ निर्दयतेचें झालें असतें. (मात्र एका सबंध काव्याचे तीन तुकडे केल्यानंतरहि प्रत्येक तुकडा टाकठिकीनें सलंगच्या सलंग कसा राहिला, हें माझ्या बाळबोध मनाला न सुटण्याजोगें कोडें आहे. त्या दिवशीं शृंगीभृंगी वगैरे गणांनी थंडाई थोडी विशेष कुसरीनें केली असावी असें वाटतें.) कांहीं लोकांचा आमच्या आधुनिक कवींवर असा आरोप आहे, कीं त्याना महाकाव्यें करतां येत नाहींत. मी हा कवींचा दोष नसून उलट गुण समजतों. त्यांच्या इवलाल्या फुट काव्यांनींच वाचकांना बेजार करून सोडिलें आहे, मग महाकाव्यें निघूं लागलीं, तर काय प्रलय होईल न कळे! छे; छे! कवीश्वरांनो! भलत्या भरीला पडून तुम्ही महाकाव्यें रचण्याच्या नादीं मात्र मुळींच लागूं नका! नुसत्या छऱ्यांनीं जमीनदोस्त होणारांवर कवतोफांची सरबत्ती कशाला हवी! कांहीं कवींना आपल्या कवितेंत प्रेतांनाहि उठविण्या-इतकी धमक असते, असें वाटत असतें, तें बहुतकरून याच जोरावर! खरो-खरीच स्मशानांत एखाद्या कवीनें लांबसें काव्य जोरानें वाचावयाला प्रारंभ केला तर खात्रीनें प्रेतें खडाखड उठून उभीं राहतील! मात्र तीं तें काव्य ऐकायला एक क्षणभर तरी थांबतील किंवा नाहीं, एवढाच प्रश्न आहे! चालू महायुद्धांत सरकारनें हिंदी शिपायांच्या इतक्या पलटणी नेल्या, त्याऐवजी आधुनिक कवींची लहानशीच तुकडी पुढें घातली असती तर शत्रूची ताबडतोब पांगापांग झाली असती, अशी माझी बालंबाल खात्री आहे!

आपल्या कविमित्राचा निरोप घेण्यापूर्वी कांहीं भाग्यशाली कवींचें अभि-नंदन केल्यावांचून माझ्याने राहवत नाहीं. या कवींच्या घरांतूनही कवितेचा वावर चाललेला असतो. कोठें कोठें तर कवितेची सांथ थेट पोराबाळांपर्यंत पसरलेली आढळून येते. नामदेवाच्या कुटुंबाप्रमाणें हल्लीं महाराष्ट्रांत बरींच घरें कविता करण्यांत रमलेलीं आहेत. आमच्या मांबूरावांचा धाकटा मुलगा तर उपजतांक्षणींच स्रग्धरावृत्तांत रडत असल्याचें तो शपथेवर सांगत असतो. याप्रमाणें सहकुटुंब सहपरिवारें स्वर्गापर्यंत भराऱ्या मारणाऱ्या आमच्या आधु-निक कवींपुढें एकटादुकटा सदेह स्वर्गाला जाणारा तुकाराम अगदींच फिका पडतो, हें पुराणाभिमानी लोकांनाही कबूल करावें लागेल!

अशा प्रकारें चालत्या जमान्यांतल्या कविवर्गाचें वर्णन केल्यानंतर दुसऱ्या एका वर्गाकडे न वळणें केवळ अन्यायाचें होणार आहे. हा वर्ग आधुनिक कवींच्या आक्षेपकांचा होय. आजकाल कवितेच्या कारभारांत पडलेल्या लोकांचे मतभेदानुरूप दोन स्पष्ट विभाग पडलेले आहेत. यांपैकीं एका वर्गाला ' नव्याचे सोयरे ' व दुसऱ्या कंपूला ' जुन्याचे सुतकी ' अशीं नांवें देतां येतील. पहिला पंथ कोणत्याही नव्या गोष्टीचें अभिनंदन करीत असतो, आणि दुसरा प्रत्येक जुन्या गोष्टीबद्दल हळहळत असतो ! एकाच्या मतें हिंदुस्थानचें उष्टावण अजून व्हावयाचें आहे, तर दुसऱ्याच्या दृष्टीनें त्याच्या उत्तरक्रियेसाठीं भाताचे पिंड वळावयाचेंच काम तेवढें राहिलेलें आहे ! यांची हीं सोयरसुतकें केव्हांही फिटण्याजोगीं नसतात. आपल्या बहुतेक कविमित्रांचा सोयऱ्यांत समावेश होत असून त्यांचे आक्षेपक सुतक्यांच्या थव्यांत सामील झालेले असतात. मात्र आनंदाच्या स्मितहास्यापेक्षां दुःखाच्याच किंकाळ्या नेहमीं तीव्र असल्यामुळें सोयरेमंडळीपेक्षां सुतक्यांचीच मुजोरी जास्त जोराची असते. नव्या पक्षाला जुनी कविता इथूनतिथून कमकुवत वाटत असते, आणि जुन्या पंथाला नवी कविता बाटग्या स्वरूपाची भासत असते. या सुतक्यांचीं कांहीं मतें पुढें मासल्यासाठीं दिलेलीं आहेत. भक्ति व कविता एकच होत, हें त्यांचें अत्यंत लाडकें मत होय. अर्थात् सर्व इंग्रजी कविता, बहुतेक चांगली संस्कृत कविता, आणि नलोपाख्यानासारखी बरीच मराठी कविता यांच्या दृष्टीनें बाष्कळ ठरून मोकळी होते ! भक्तीखेरीज कविता नाहीं आणि भक्तिविषयक जें कांहीं असेल, तें पूर्वजांनीं म्हणून ठेवलेलेंच आहे. त्यामुळें नव्या कवींनीं मुळींच कविता करूं नये हा यांचा पहिला सिद्धान्त होय ! प्रीतीसारख्या पाचकळ विषयावरील कविता अश्लील असावयाचीच, हें यांचें आवडतें मत असतें ! लग्नसमारंभावर अश्लीलत्वाचा आरोप करण्याला यांची सेना अजून कशी सरसावत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. मेघदूतासारखीं चटोर काव्यें, आणि शाकुंतलासारखीं चवळ नाटकें यांच्या डोळ्यांदेखत राजरोस मिरवत आहेत, हें यांच्या उजळ ब्रीदाला अगदीं लांच्छनास्पद आहे ! प्रीतिविषयक कविता करावयाच्या झाल्या, तर त्यांना पुराणाची थोडीशी फोडणी तरी असावी असा यांचा आग्रह असतो ! प्रणयकल्पनांची किळसवाणी बडबड सोडून देऊन, यशोदेजवळ गाऱ्हाणीं सांगावयाला आलेल्या गोपींजवळून पांच वर्षांच्या निर्दोषवृत्ति कृष्णानें आपला चेंडू काढून घेण्यांत जें हृदयंगम हस्तकौशल्य दाखविलें, त्याचें वर्णन करावयाला अर्थात यांची आडकाठी नसते ! नावडत्या गोष्टीवर तुटून पडतांना देवादिकांचीं आणि

साधुसंतांचीं पथकें पुढें केल्याखेरीज यांचें नीट जमत नाहीं ! हल्लीं चोहींकडे अधर्म, भ्रष्टाकार आणि पीछेहाट जारीनें सुरू आहे, हें यांचें जन्मवेड असतें. नव्या कवींना किंवा त्यांच्या कविता छापणाऱ्या मासिक पुस्तकांवर लोक अद्यापि सार्वत्रिक बहिष्कार कसा घालीत नाहींत याचें या वर्गाला मोठें गूढ वाटत असतें. परमेश्वराचा अकरावा अवतार बहुधा या सत्कार्याकरितांच होणार, असा यांचा आवडता होरा असतो. आधुनिक कवींना महाकाव्यें करितां येत नाहींत, हा यांचा तिसरा आक्षेप असतो. चवथा आक्षेप असा आहे, कीं आधुनिक कवींना मुळींच ज्ञान नसतें. आधुनिक कवींना वेडाची 'सोल एजन्सी' घ्यावीशी वाटते, तर हा आक्षेपक वर्ग सर्वज्ञतेचा मक्ता आपल्याकडेच ठेवूं पाहत असतो. भूमध्यरेषेच्या एका टोंकावरील उत्तरध्रुवाप्रमाणें दुसरीकडील दक्षिणध्रुवाच्याही माथ्यावर विधात्यानें बर्फाच्या घड्या घातलेल्या आहेत, हें लहानसें तत्त्व मात्र यांच्या सर्वज्ञतेंत सामील व्हावयाचें चुकून राहिल्यासारखें वाटतें ! आधुनिक कवि मोठें गंभीर तत्त्वज्ञान सांगतात; पण त्याप्रमाणें स्वतः वागत नाहींत, हा यापुढील आक्षेप आहे. या दृष्टीनें पाहतां ज्या वैराग्यपर भक्तिभावाच्या काव्याचें यांना पूर्ण रहस्य समजलेलें आहे, त्याच्या उपदेशाबरहुकूम अंगाला राख फांसून निघालेला यांचा भला मोठा तांडा आपल्याला कधीं तरी पाहावयाला मिळ-ण्याची आशा वाटूं लागते. कलियुगांत चांगले कवि होणें शक्य नाहीं, हा यांनीं सहावा सिद्धान्त ठरवून ठेवलेला आहे. अर्थात् कलियुगाचा आरंभकाल मात्र आपली कविता किंवा लेख अलीकडच्या मासिक पुस्तकांकडून परत आल्या दिवसापासून ज्याचा त्यानें स्वतंत्र दृष्टया मोजावयाचा असतो. मागील सात-आठच शतकांत सुमारें आठदहा चांगले कवि निर्माण होऊन गेल्या पन्नास वर्षांच्या लांबलचक अवधींत शेंपन्नासुद्धां उत्तम कवि होऊं नयेत, हें वरील विधानाचें बिनतोड प्रत्यक्ष प्रमाण आहे. हल्लींची कविता टिकाऊ नसते, हें या वर्गाचें खरें म्हणणें असतें, आणि हा मुद्दा मात्र माझ्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. जुन्या बाडांचा पसारा केला, तर त्यांतून गतकवींच्या चारचारशें वर्षांच्या मुरलेल्या कविता किती तरी काढून दाखवितां येतील; परंतु आजकालच्या एकाही कवीला आपली कविता शंभर वर्षांपेक्षां जास्त टिकली आहे, असें म्हणतां येणार नाहीं ! ही क्षणभंगुरता खरोखरी लाजिरवाणी आहे !

रस्ता चुकून वाळवंटाच्या फंदांत पडलेल्या या दोन वर्गांचें परस्परांशीं जें हाडवैर असतें, त्यांच्या मानानें अहिनकुलांचें, देवदानवांचें, कोडताची पायरी चढलेल्या सख्ख्या भावांचें वैरसुद्धां गुण्यागोविंदाच्या वागण्यासारखें निर्दोष

ठरेल. दोन्ही पक्ष आपआपल्या ( गैर ) समजुतीप्रमाणें नेटाचे प्रयत्न करीत असतात. त्यामुळें मायभाषेला कवितेच्या काव्याबरोबर टीकांच्या निकाव्याचाही भरपूर पुरवठा होत असतो. एक पक्ष मराठी कवितेला नवाईनें बाटगी बनविण्याचा प्रयत्न करितो, तर दुसरा तिला फक्त बारकन्यांबरोबर तीर्थक्षेत्रांवर पाठवून अगदीं सोंवळी करण्यासाठीं धडपडत असतो. पहिल्याचा पुढील पिढीवर भरंवसा, तर दुसऱ्याची मागील लोकांवर भिस्त ! एक भविष्यपुराणवादी आणि दुसरा तर सारींच पुराणें उराशीं बाळगणारा ! जगांतील चैतन्य आपल्या कवितेमुळेंच उत्पन्न होत असतें. हा पहिल्याचा अभिमान तर प्रळयकाळ लांबणीवर पडण्याला केवळ आपली पुण्याईच कारण असल्याबद्दल दुसऱ्याची खातरजमा ! या आक्षेपक वर्गाची जुन्यालोकांबद्दलची आस्था, चालू काळच्या तरुण मंडळीविषयींची कळकळ आणि पुढील पिढीसंबंधीं हळहळ हीं पाहिलीं, म्हणजे त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागतो ! आधुनिक कवितेच्या धुडगुसामुळें आम्हां आर्यांच्या आर्यत्वाचें, इतिहासाचें, व्याकरणाचें, धर्माचें, प्रासयमकांचें, नीतिमत्तेचें, सर्वस्वाचें पार वाटोळें होणार अशी यांच्या मानानें हाय खाल्लेली दिसते. भिऊं नका, जरीपुराण्यांनो ! भिऊं नका ! आधुनिक कविता कितीही बोकाळली, तरी तिनें आपलें कांहींच नुकसान होणार नाहीं ! त्या कवितेनें पुढच्या पिढीचें अहित होणें हें तुमच्या टीकांनीं आधुनिक कवींना धोका पोहोंचण्याइतकेंच दुरापास्त आहे. त्यांचीं चट्सारीं काव्यें तुमच्या स्वतःच्या अप्रसिद्ध कवितांप्रमाणें ( हो, हें सांगावयाचें राहिलेंच ! सार्वभौम चमत्कार असा आहे कीं, या आक्षेपकांपैकीं बहुतेकांजवळ मात्र आपापल्या कवितांचें थोडेंबहुत भारताड हटकून असतेंच. ) कोणालाही न कळवितां पचनीं पाडावयाला काळ समर्थ आहे ! सरस्वतीच्या सदावर्तात बेकार दुकाळी पाहुण्यांना सदर परवानगी असते, त्याप्रमाणें तुमच्या-सारख्या सोवळेकऱ्यांची सोय होणेंही अवश्य आहे ! आपापलें मत संभाळून तुमच्या त्यांच्या खडाजंगी अशाच जोरानें चालूं द्या ! मात्र हल्लींच्या कांहीं सत्कवींनाही सरसकट लाथाडण्याचें जोखीम तुम्हीं आपल्या अंगावर न घेतल्यास बरें; कारण हा वाद त्रिकाळ चालू असल्यामुळें तुमच्या पूर्वजांना, भवभूतीला छळतांना कालिदास वगैरेंच्या कविता जशा उपयोगी पडल्या, तुकारामाचे अभंग बुडविण्यासाठीं ज्ञानेश्वरादि कवींचीं काव्यें आधारभूत झालीं, तशा आजच्या सत्कवींच्या कविता उद्यांपरवांच्या आधुनिक कवींच्या बोकांडीला बसतांना तुमच्या वंशजांच्या कामीं येणार आहेत ! आधुनिक कवींचा लौकिकही तुमच्या घराण्या-प्रमाणेंच पूर्वापार चाललेला आहे ! पंडितराजाच्या काळच्या ' नृत्यति पिनाक-

पाणी ' वगैरे उक्ति, रामदासांची ' धीटपाठ ' काव्यांचीं वर्णनें, किंवा तुकोबारायाचें 'घरोघरीं जाले कवि' यांसारखे उद्गार सध्यांच्या कवींना उद्देशून केलेले नसावेत असा तर्क करण्याची मी तुमच्याजवळ नम्रपणें परवानगी मागतों! स्वतःची टिमकी वाजविण्याच्या हेतूनें लोकांच्या भाविक पूर्वजप्रियतेचा फायदा घेण्यासाठीं साधूकवींच्याभोंवतीं तुमच्यासारख्या स्वार्थसाधूंनीं मांडलेला सुळसुळाट, आणि नव्या-जुन्यांतून आपली शिधासामुग्री काढणारी सालोमालोसारख्या उचल्यांची हातचलाखी, काळाप्रमाणें अनाद्यनंत आहेत! तुमच्या या धक्काबुक्कींत सत्कवींनासुद्धां थोडासा उपद्रव झाल्यास यांनीं दिलगीर होण्याचें कांहीं कारण नाहीं! कधींकाळीं एखाद-दुसऱ्यालाच आंत घेण्यासाठीं उघडणाऱ्या सरस्वतीमंदिराच्या दरवाजानें प्रत्येक सत्कवीच्या प्रवेशकालीं पहिल्यानें थोडी कुरकूर करणें अगदीं साहजिकच आहे!

येणेंप्रमाणें मतभेदाच्या धांदलीमुळें चालू काळी मराठी कविता अगदीं संकीर्ण स्वरूपाची होऊन बसली असल्यास काहीं नवल नाहीं. इंग्रजी कविता, संस्कृत कविता, आणि जुनी मराठी कविता, या तिघांचाही तिच्यावर थोडाथोडा अंमल बसलेला आहे. फोटो घेण्याच्या कॅमेऱ्यांतील आधीं अर्धवट उघडलेल्या कांचेवर दुसऱ्यावेळी ज्याप्रमाणें चमत्कारिक मिश्राकृति उमटते, त्याप्रमाणें आमच्या आधुनिक कविहृदयावरही उपरिनिर्दिष्ट छिन्नभिन्न काव्यसंस्कृतींमुळे विलक्षण वर्णसंकराच्या भावनांचा छाप बठत असतो. त्यामुळें सध्यांच्या कवितेच्या स्वरूपाची एकरूपता पार नाहींशी होऊन गेली आहे. संस्कृतांतील मुग्ध श्रृंगारकल्पना इंग्रजीच्या उत्तान रीतीनें प्रकट करितांना मराठी कविता सर्कशीच्या रंगणांत उतरलेल्या मर्दानी थाटाच्या पोरीसारखी उघडी दिसते. आणि इंग्रजी ढंगानें सांगतांना तिला झगा पोलका घालून शेतकाम करणाऱ्या बारदेशगोव्यांकडील किरिस्ताविणीची कळा येते. कधीं शुद्ध मराठी गोष्टीवर इंग्रजी कल्पनेचें टोपण घालून वरलीदादरकडे शिमग्याच्या दंगलींतून साडीचोळीच्या साजावर टोपी चढवून नाचणाऱ्या गोमीप्रमाणें ती बागडू लागते, तर कधीं मराठी वेदान्त इंग्रजी गंभीरतेनें सांगण्याच्या भरांत, मडमेची नक्कल करणाऱ्या देशी दाईप्रमाणें किळंजून बोलत असते. अशा बकाली अवस्थेमुळें तिचे गुणधर्म इतके संख्यातीत बनले आहेत कीं, त्यांचा नुसता नामनिर्देश करणेंही एका लेखाच्या आवाक्याबाहेरचें काम आहे. त्यांतून माझ्या कवींच्या कारखान्याचा पसारा टाटा कंपनीच्या लोखंडी कारखान्यापेक्षाही वाढत चालल्यामुळें मराठी कवितेची अगदीं लांबून डोळेभेट घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

कवितेंतील वर्णभेद आम्हां हिंदु लोकांनाही लज्जेनें खाली पहावयाला लावण्याजोगा आहे. रचनापरत्वें कवितेचा जातिभेद उभयविध आहे. संस्कृतांतून सरळ जन्म झाल्यामुळें श्लोक आणि आर्या यांची फार उच्च जातींत गणना होते. भिन्नभिन्न वृत्तांमुळें यावरील वर्गांत गोत्रभेदाचीही सोय झालेली आहे. अभंग, ओव्या, पोवाडे ही मंडळी कनिष्ट वर्गात असून लावण्या, छकडी वगैरे अस्पृश्य जातींत जमा होतात. उखाणे, म्हणी, आहाणे यांना गद्य व पद्य यांच्यामधील सरहद्दीवर राहणाऱ्या बिनआकारी टोळ्या म्हटल्यास चालेल. हुतुतूहमाम्यांसारख्या खेळांतून म्हणावयाचीं समर्पक वाक्यें किंवा 'अलीकडे गंगा पलीकडे गंगा' सारखून त्याच्याकरवीं शब्दब्रह्मांत पातकांचा उद्धार करविणाऱ्या शिमग्यांतल्या फाका, हीं वरील वर्गाचीं अत्यंत रानटी उदाहरणें होत. यांखेरीज गायकी धर्तीच्या कवितेचा संग्रह फार मोठा आहे. त्यांच्यांतही चालीरीतींचे लक्षावधि भेदभाव आहेत. युरोपियन लोकांच्या निकट सहवासानें ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील मूळच्या अगणित जातींत युरेजियन, गोवानीज वगैरे नवीन भर पडली आहे, याप्रमाणें इंग्रजी कवितेच्या वशिल्यानें आमच्या इकडे चतुर्दशकें, वैणिकें, इत्यादि नवनवे प्रकार प्रचारात येत आहेत. शिवाय, मनुष्याच्या मागें जसे राक्षसगण, मनुष्यगण या प्रकारचे उपजत उपद्व्याप लागलेले असतात, तसे अक्षरांतही कोमल, कठोर वगैरे भेद जात्याच ठरून बसलेले आहेत. इतकेंच नाहीं, तर संस्कृत साहित्यशास्त्रानें निरनिराळ्या गणांचीं आणि अक्षरांचीं कायमचीं शुभाशुभ लक्षणेंही ठरवून टाकलेलीं आहेत.

वर्ण्यविषयपरत्वेंही कवितेचे असेच अनेक प्रकार झालेले आहेत. महाकाव्याची रचना फार मोठी असून त्यांतील लोकांना राष्ट्रहितैकपर समाजशासनपद्धतीबरहुकूम वागणाऱ्या स्पार्टन लोकाप्रमाणें व्यक्तिशः जीवितस्वातंत्र्य मुळींच मिळत नाहीं. खंडकाव्यें तशाच वळणाचीं, पण लहान असल्यामुळें त्यांची उभारणी नागपुरांतील बोहरी लोकांच्या मेहेंदीबाग संस्थेसारखी दिसते, एवढेंच! मासिक पुस्तकांतून येणाऱ्या छोट्या कविता अविभक्त कुटुंबपद्धतीच्या वळणावर जातात. आपलें सर्वस्व बरोबर वागविणाऱ्या सुभाषितांचा कंपू यद्यपि एकोप्यानें हिंडत असतो, तरी त्यांपैकीं कोणालाही मागापिछा नसल्यामुळें त्याला वैराग्यांच्या तांड्याची उपमा देतां येईल. धावे, पाळणे ही पडदानशीन मंडळी असते. तशाच मंगलाष्टकांचा मेळाही कधीं लग्नमंडपाच्या बाहेर पडत नाहीं. भूपाळ्या पहाटेलाच म्हटल्या जात असल्यामुळें मला त्यांबद्दल विशेष माहिती नाहीं. आरत्या, मुरळ्यांप्रमाणें केवळ देवांना वाहिलेल्या असतात. शिवाय संस्कृत कवितेच्या

मार्मिक अनुकरणामुळें कूट प्रश्न, कर्तृगुप्तें क्रियापदें, कर्मगुप्तें, भावगुप्तें इत्यादि अनेक अवघड काव्यप्रकारही मराठींत उतरतांना दिसून येतात. परंतु यांचा प्रचार अतिशय थोड्या प्रमाणावर असल्याकारणानें माझ्या तद्विषयक कल्पना बऱ्याच अंधुक असण्याचा फार संभव आहे; म्हणुन पुढील माहिती साशंकवृत्तीनेंच स्वीकारण्याची वाचकांना विनंती आहे. कूटप्रश्नांत एखादें कोडें सांगितलेलें असतें. उत्तर हुडकून काढण्यासाठीं 'पग्मासिचा बायदा' सवलतीदाखल देणारे 'विचित्र पुतळा' किंवा 'विलक्षण वधू' यांच्यासंबंधीचे मराठी कूटश्लोक बहुश्रुत वाचकांना ठाऊक असतीलच. शिवाय ज्या कविता वाचून पाहिल्यावर कवीला काय म्हणावें, याचें वाचकांना मोठें कोडें पडतें, त्यांचीही मी याच सदरांत गणना करितों. कर्मगुप्तांत किंवा क्रियागुप्तांत अनुक्रमें कर्म किंवा क्रियापद शब्दांच्या संधिसमासांत दडवून ठेविलेलें आणि तें वाचकानें हुडकावून काढा-वयाचें असतें. कर्तृगुप्तांत कर्ता नापत्ता होण्याचा प्रयत्न करीत असतो. अलीकडे आपण कविता करून स्त्रीशिक्षणपर सहानुभूतीचा फायदा घेण्यासाठीं बायकांच्या नांवानें त्या छापावयासाठीं पाठविण्याचा शिरस्ता पाडूं पहात आहे तोच कर्तृ-गुप्ताचा मराठी मासला असावा! भावगुप्तांतून भावार्थ सहसा लक्षांत येत नाहीं. हल्लींची बहुतेक मराठी कविता या सदराखालीं येते. इंग्रजी कवितेचाही नवा पायंडा अलीकडे पडूं लागला आहे. 'मिस्टिक' कवितेंत अत्यंत गहनार्थ फारच अंधुक रीतीनें ध्वनित केलेला असतो. वाच्यार्थांतून तो अंशतः शोधून काढा-वयाचें काम वाचकांकडे सोंपविलेलें असतें; पुष्कळ प्रसंगीं कवि 'मूर्ख, भ्रमिष्ट, अजाण' वगैरे ही विशेषणें स्वतःकडे लावून घेत असतो, तीं सत्यार्थानें अथवा शालीनतेनें, याचा वाचकांना नीटसा उलगडा होत नाहीं. ही सारी 'मिस्टिक' कविता होय. 'पॅस्टोरल' कविता धनगराच्या जीवनक्रमाला वाहिलेली असते. अशा धनगरी कवितेचें मराठी 'मेंढ्यांवरी लोकर दाट भारी' हें एकच उदाहरण काय तें ऐकण्यांत येतें!

मराठी कवितेच्या एका बऱ्याच मोठ्या भागाचें वर्णन करावयाचें चुकून राहिलें आहे. हा भाग म्हणजे संगीताच्या वशिल्यानें नाटकांत घुसलेल्या पदांचा होय. मात्र, इतर प्रकारची कविता जसजशी जास्त मुरेल तसतशी नॉर्वे देशांतील भाकरीप्रमाणें अधिकाधिक रुचकर होत जाते; तसा यांचा प्रकार नाहीं. नाटकी पदांचा जमाना सारखा बदलत असतो. पहिल्यापहिल्यानें रसपोषासाठीं यांच्यांत काव्यसौंदर्याचा उत्कर्ष साधण्याकडे लेखकाची प्रवृत्ति असे. परंतु नाट्यसंगीताचा गायकी चालींकडे मोर्चा वळल्यामुळें अलीकडे मात्र कोठेंही पाहिलें, तरी पण

नाहीं मी बोलत आतां ! कारण लौकरच नाटकविषयासंबंधीं स्वतंत्रपणें लिहिण्याचा माझा इरादा आहे.

कविता करतां येण्याला गणमात्रांचें ज्ञान अतिशय अवश्य आहे. अक्षरांच्या ऱ्हस्वदीर्घत्वाप्रमाणें तीं लघु किंवा गुरु ठरत असून 'लघूची तों एक मात्रा गुरूच्या दोन मानिती' हा तद्विषयक मुख्य नियम आहे. याशिवाय कांहीं किरकोळ नियमही आहेत. आर्या, गीति वगैरे मात्रागणवृत्तांतून व पद्यांतून मात्रांची मोजदाद ठेवायची असते, आणि श्लोकाच्या रचनेला तीनतीन अक्षरांच्या गणांची आवश्यकता असते. गुजराती कवितांतून दीर्घ अक्षरांना मारून मुटकून लघुत्व देण्यासाठीं किंवा लघु अक्षरांना गुरुपदीं बसविण्यासाठीं त्यांच्या डोक्यांवर अनुक्रमें ˘ आणि – अशा खुणा ठेवण्याचा रिवाज आहे. यामुळें वर ओळीचा बांध नसल्यामुळें गद्यांत जीं गुजराती अक्षरें देशावरच्या धाब्याच्या घरांसारखीं दिसतात तींच कवितेंत या खुणांच्या योगानें, रिकाम्या टोपल्या वाहणाऱ्या मुंबईतल्या हेलकऱ्यांसारखीं किंवा नारळींच्या चोडांची ने-आण करणाऱ्या मलबारी मजुरांसारखीं दिसावयाला लागतात. मराठी कवि मात्र असा खुणांखुणांचा अजागळपणा कधींच दाखवीत नाहींत. कारण त्यांना बहुतकरून गणमात्रांची मुळींच माहिती नसते !

कवितेला नटविण्यासाठीं अलंकारांची जरूर असते. त्यांचे शब्दालंकार व अर्थालंकार असे दोन स्थूल भेद असून प्रत्येकाचे कोट्यवधि सूक्ष्म पोटभेद आहेत. अर्थालंकारांपैकी एकट्या उपमेचे चौऱ्यांयशी प्रकार आहेत, असें म्हणतात. तूर्त आपणांला या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत पडण्याचें कांहींएक कारण नाहीं. ठोकळ नगांची माहिती झाली म्हणजे बस्स आहे. शब्दालंकारांत यमक व प्रास यांना मुख्य महत्त्व मिळालेलें आहे. यमकें देशादेशाच्या रिवाजाप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. मराठी-गुजराती कवितांना सबंध अक्षराचें यमक जुळविण्याची आटाआट असते; इंग्रजींत शेवटच्या स्वराशीं स्वर जमला म्हणजे यमकाची पूर्णता होते. संस्कृतांत स्तोत्रें, अष्टकें वजा जातां, अन्यत्र कोठेंही यमकें नाहींत; तर फारसी वाङ्मयांत पद्याप्रमाणें गद्य वाक्यांचींही यमकें जमवितात. मराठींत संस्कृतांतील सयमक अपवादाइतकाच भाग, फार झालें तर निर्यमक असेल. इंग्रजी यमकांचा मुळींच विधिनिषेध नाहीं. (मराठींतील हा निर्यमक भाग अगदीं आधुनिक कवींनींच केलेला आहे. जुन्या कवितेंत थोरल्या शास्त्रीबुवांच्या 'उपाची स्पर्धा' इत्यादि श्लोकांचे शेवटचे व 'गोविंद गोपाळ हे दोन बंधू या श्लोकांतील पहिले चरण, निर्यमक उदाहरणें आहेत.) मराठींत अनुष्टुभ

श्लोकाला मात्र नजरचुकीनें निर्यमक फिरण्याची सवलत मिळालेली असून आर्यांच्या दुसऱ्या-चवथ्या चरणांचीं यमकें जोडण्याचा विलक्षण प्रघात पडला आहे. इकडे इंग्रजी-मराठींत यमकाक्षरें एकाच शब्दाचीं असून चालता नाहींत, तर तिकडे उर्दू-फारशींत दहादहा चरणांच्या शेवटीं एकच शब्द यमकांची बाजू राखीत असतो. आमच्यांतही पोथींतल्या ओवीच्या तीन चरणांचीं यमकें जमून चौथा आडमाप असतो, तर बायकांच्या ओंव्यांतून दुसऱ्यातिसऱ्या चरणांचेंच यमक दिसून येतें. मराठींतून यमकें साधण्याच्या व्यासंगाचीं उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. पैकीं 'अनलसमीहित' हीं दोन्ही एकरूप चरणाची आर्या एका टोंकावर असून, 'ल, ळ' 'त, ट' 'ह, व, य, अ' यांसारख्या अक्षरांचीं यमकें जुळविण्याच्या सवलतीचा फायदा घेणारीं उदाहरणें दुसऱ्या टोकांशीं पडलेलीं आहेत. प्रास हें यमकाचेंच जुळें भावंड होय. त्याच त्याच अक्षरांच्या पुनरावृत्तीनें प्रास तयार होत असतो. व्यवहारांतील उदाहरण घ्यावयाचें असल्यास, मुंबईच्या रस्त्यांवरून चारचार पांचपांच घरें टाकून चहाच्या दुकानांचा प्रास साधला आहे असें म्हणतां येईल. श्लेषालंकार हाही शब्द व अर्थ या दोघांच्याही मदतीनें तयार होतो. श्लिष्ट शब्दाला दोन अर्थ असल्यामुळें तद्युक्त वाक्यांकडे, एकीकडून कृष्णाच्या रासक्रीडेचें आणि दुसरीकडून रामपंचायतनाचें, अशीं एकाच कागदावर दोन चित्रें दाखविणाऱ्या तसबिरीप्रमाणें निरनिराळ्या दृष्टींनीं पहावयाचें असतें. शब्दालंकारांत चित्रबंध, पद्मबंध वगैरे हजारों करामती असतात. या प्रकारच्या कौशल्यांत भूमितीचीं वर्तुळें, ज्योतिषांतील कुंडल्या, कमळाच्या पाकळ्या वगैरे सर्वच प्रकार सामील झाल्यामुळें प्रेक्षकाला गणितविद्या, चित्रकला, कविता, ज्योतिःशास्त्र या सर्वांच्या प्रीतिभोजनाचा भास होतो. संस्कृत काव्यांत कांहीं श्लोकांतून दोनच आणि कांहींतून तर फक्त एकाच अक्षरावर सारी कसरत करून दाखविलेली पाहण्यांत येते. या सर्व प्रकारच्या शब्दच्छलाची यद्यपि तज्ज्ञांनीं अधमकाव्यांत गणना केली असली, तरी त्याचा व्यामोह मात्र फारच जबरदस्त आहे. मोठमोठ्या सत्कवींनाही या सैतानानें पछाडलेलें आहे. रसाळ वाणीच्या वामनपंडितासारख्या थोर सत्कवीनेंसुद्धां रसिकांना 'वंशी नादनटी तिला कटितटीं' या प्रकारच्या 'टीपाऱ्या' देऊन 'यमक्या' ही पदवी कमविली आहे! अर्थालंकारांच्या सम्यग्ज्ञानापोटीं वाचकांना थोडक्यांत एवढें सांगतां येईल कीं, "काव्यप्रकाश वाचा."

# नाटक कसें लिहावें ?

नाटकाच्या धंद्यांत मोरावळ्याप्रमाणें मुरलेल्या माझ्या एका सन्मान्य मित्रानें मराठी नाट्यदिदृक्षु लोकांस 'नाटक कसें पाहावें ?' हें सांगण्याचा यत्न केला आहे. हेच गृहस्थ भावी मराठी लेखकांना 'नाटक कसें लिहावें' याविषयीं कांहीं धडे देणार आहेत असें माझ्या कानांवर आलें आहे. त्यावरून सदरहू विषयासंबंधाचे माझे विचार मी सध्यां प्रसिद्ध करीत आहें. वर सांगितलेल्या गृहस्थांस किंवा या विषयावर लिहूं इच्छिणाऱ्या दुसऱ्या कोणासहि माझ्या या विचारांचा मनमुराद फायदा घेतां यावा म्हणून मीं मुद्दाम या विचारांचे "१८६७ च्या २५ व्या आक्टान्वयें सर्व हक्क राखून ठेविले नाहींत !" नाटक लिहूं इच्छिणाऱ्या भावी तरुणांस तर हा लेख फारच उपयोगी आहे. यांतील सूचनांच्या योग्य विचारानें जें नाटक लिहिलें जाईल तें सध्यांच्या नाटकग्रंथांच्या मालिकेंत बसावयास पात्र झाल्याखेरीज राहणार नाहीं.

नाटक लिहावयाचा विचार कायम ठरल्यानंतर सहा महिनेपर्यंत रोज या विचाराच्या निश्चयाबद्दल निजावयाचे पूर्वी तीन तास विचार करावा. कोणतीहि गोष्ट पूर्ण विचारांतीं करावी असें वृद्धांचें म्हणणें आहे. अशा प्रकारें वागत गेल्यानें केवळ नाटक लिहिण्याचा आपला हेतु पूर्ण विचारांतीं ठरविण्यांत आलेला असतो; इतकेंच नाहीं, परंतु या सहामाहींतील झोंपसुद्धां दररोज तीन तासांच्या पूर्ण विचारांतीं घेतली जाऊन एका दगडानें दोन पक्षी मारल्याचें श्रेय पदरीं येतें. सहा महिने हा निश्चय जर कायम राहिला तर मग पुढील कार्यक्रमास सुरवात करावी आणि जर निश्चय सहा महिन्यांच्या आंतच ढांसळून पडला, तर पुढें नाटक न लिहिण्याचा निश्चय करून टाकावा व हा दुसरा तरी कायम राहतो कीं नाहीं याबद्दल पुन्हा सहा महिने खात्री करून घ्यावी. सहा महिनेपर्यंत एकाच निश्चयाला चिकटून बसण्याइतकें स्थैर्य मनाला नसलें तर पुन्हा हींच विचारांचीं आवर्तनें चालू ठेवावींत. वर्षाच्या एका सहामाहींत

दक्षिणेच्या एका टोंकाला पोंचून पुन्हा हळूहळू उत्तरेकडे मोर्चा फिरविणाऱ्या व दुसऱ्या सहामाहींत याच्या उलट प्रवास करणाऱ्या सूर्यनारायणाप्रमाणें आपल्या मनाला असें विचारांच्या क्रान्तीमधून फिरवीत गेल्यानें कांहीं काळानें तरी ( अर्थात् आपण मध्येंच मेलों नाहीं तरच ) आपला कोणता तरी एक विचार कायम होतो.

घटकाभर असें धरून चालूं या, कीं नाटक लिहावयाचा आपला विचार एकदांचा कायम झाला आणि इतक्या अवधींत आपण मेलोंहि नाहीं; मग पुढें काय करावयाचें ? सबंध नाटक आपल्या हातून पूर्ण होईपर्यंत आपण खास मरत नाहीं अशी एखाद्या ज्योतिर्विदाकडून चांगली खात्री करून घ्यावी. कां कीं, असें अपूर्ण नाटक टाकून गेल्यानें तें पूर्ण करण्याची पुष्कळच लोकांस अनावर इच्छा उत्पन्न होते आणि शेवटीं आपल्या नाटकाची दुर्दशा होते. उदाहरणार्थ, बिचारें ' रामराज्यवियोग 'च घ्या ना ! एखाद्या छानदार पतंगाचें शेपूट अपुरतें झालें म्हणजे मुलें त्याला उकिरड्यावर पडलेल्या दोनचार लांब लांब घांदोड्या बांधतात; त्याप्रमाणेंच त्या बिचाऱ्या सुंदर नाटकाच्या तीन अंकी देहाला दोन दोन अंकी चारपांच शेंपटें लावण्यांत आलीं आहेत. हा सारा अकालीं मरण्याचा परिणाम ! खरोखर, बिचाऱ्या किर्लोस्करांना जर पूर्वींच कळतें, कीं आपल्या आवडत्या शेवटच्या नाटकाचा शेवट असा होणार आहे, तर त्यांनीं आपला स्वतःचा शेवट इतक्या लौकर कधींहि होऊं दिला नसता. असो.

याप्रमाणें जगण्याची खात्री झाल्यावर आपल्याला बालबोध लिहितांवाचतां येतें कीं नाहीं याची आपल्याशींच नीट चौकशी करावी. येत नसल्यास शिकावें. त्याखेरीज स्वतःचें नाटक लिहितां येणार नाहीं व दुसऱ्यांचीं नाटकें वाचतां येणार नाहींत. शुद्धलेखनाच्या नियमांची फारशी माहिती नसली तरी चालते; कारण त्याबद्दलच्या चुकांचें खापर छापखानेवाल्याच्या डोकीवर फोडतां येतें. जेवतांना ताटाच्या आजूबाजूस पडलेल्या शितांची जबाबदारी जशी वाढणाराच्या माथीं लादावयाची रीत आहे तशीच पुस्तकांतील शुद्धलेखनाच्या चुकांची जबाबदारी टाईप जुळविणाऱ्याच्या माथीं लादावयाची वहिवाट आहे; म्हणून कंपॉझिटरला कसें तरी वाचतां येण्याजोगें लिहितां व दुसऱ्याच्या नाटकांतून साधारण विचार चोरतां येण्याजोगें वाचतां येऊं लागलें म्हणजे पुढें इंग्रजी अभ्यास सुरू करावा. याचा उपयोग पुढें कळेल. शाळेंतल्या मढ विद्यार्थ्यांना साधारण इंग्रजी बोलतांचालतां (इंग्रजी चालायचें कसें ? )

यायला जरी पांच वर्षें लागत असलीं तरी आपल्याला शिक्षकाच्या मदतीवांचून उत्तम इंग्रजी २०।३० दिवसांतच येण्याचे राजमार्ग अलीकडे कांहीं पुस्तक-कर्त्यांना सापडले आहेत. वीसतीस दिवसांत एखाद्या परक्या भाषेचें ज्ञान होणें अशक्य आहे असें कोणास वाटेल; पण असें वाटण्याचें कारण नाहीं. याहीपेक्षां मोठाल्या गोष्टी अगदीं थोड्या मुदतींत आटोपल्याचीं उदाहरणें आहेत. एवढें मोठें भारती युद्ध पण सार्‍या अठरा दिवसांतच आटोपलें ! आपल्या 'नाटक्यां'चा राजा कालिदास इतकें सारें शिक्षण एका रात्रींतच शिकला. आपणही पर्यायानें त्याचेच 'बच्चे' आहोंत हें विसरतां कामा नये. आपले राजमार्ग शोधून काढणारे बहाद्दरसुद्धां कालिदासांच्या आख्यायिकेंतील नायिका जी 'काली' तिला हार जाण्याजोगे नाहींत. परंतु या पुस्तकांवरून इंग्रजी शिकलेला कोणी आधुनिक 'कालिदास' मात्र अजून दिसून आला नाहीं. असा जर कोणी असेल तर त्याची योग्यता मात्र लांकडाच्या द्रोण-गुरूपासून धनुर्विद्या शिकणाऱ्या किराताइतकी आहे यांत शंका नाहीं. या रीतीनें इंग्रजी भाषा साध्य करून घ्यावी. आपल्या मराठी भाषेची आई जी संस्कृत ती आपोआपच येते असें म्हणतात; आणि तें खरेंहि असावें; कारण ती आपली 'मोठी आईच' असते.

हें ज्ञानसंपादन झाल्यावर नाटक लिहिण्यासाठीं थोडे कोरे कागद, लेखण्या, शाई, दौत वगैरे सामान बाजारांतून विकत आणावें. हें मात्र कोणाचें चोरलेलें नसावें. कारण असा माल चोरल्याबद्दल खटला होऊं शकतो. ही तयारी नेहमीं जय्यत असावी. कवीला स्फूर्ति केव्हां होईल याचा नेम नाहीं.

इतकी बाह्य व्यवस्था झाल्यानंतर नाटकाच्या अंतर्गत व्यवस्थेकडे लक्ष देण्यास ठीक पडतें. कोणत्याहि ग्रंथास प्रस्तावना ही असावीच लागते. हिंदु-स्थानच्या नकाशांत खुद्द हिंदुस्थानच्या जोडीला जशी लंका असावयाचीच तशी पुस्तकाच्या मुख्य भागाला प्रस्तावनेची जोड ही असावयाचीच. 'प्रस्ताव' 'हेतु' 'उद्देश' 'धर्म' 'हार्द' 'हृद्गत' 'दोन शब्द' आणि 'आधीं इकडे पाहा' हीं प्रस्तावनेचीं निरनिराळीं नांवें आहेत. यांतील शेवटलीं तीन ग्रंथकाराची सुधारणाप्रियता व जुन्या चालीरीतींबद्दल तिटकारा दाखविणारीं आहेत. प्रस्तावनेला आतांच सिलोन बेटाचा दृष्टान्त दिला आहे त्याच्या समर्थनार्थ प्रस्तावनेचें व बेटाचें असलेलें विशिष्ट साधर्म्य पुढें नमूद केलें आहे. प्रस्तावनेची व्याख्या पुष्कळशी बेटाच्या व्याख्येच्या स्वरूपाची आहे. "दोन्ही बाजूंस कोरीं पानें असून मध्यें जीं मजकुरानें भरलेलीं पानें असतात त्यांस

'प्रस्तावना' असें म्हणावें." यापेक्षां प्रस्तावनेची अधिक मर्यादित व्याख्या करणें शक्य नाहीं. कारण प्रस्तावनेंतील मजकूर अमुकच एक प्रकारचा असावा अशांतला कांहीं निर्बंध नाहीं. ग्रंथ लिहिण्याचें कारण, प्रकाशकानें दिलेला त्रास, आपल्या घरची स्थिति, आपल्यावर कोसळलेले प्रसंग, प्लेगाचा त्रोटक इतिहास, इंग्रजी राज्यापासून आम्हांस झालेले फायदे, हिंदुस्थानची सामान्य माहिती, गुलामांचा व्यापार, एकंदर जगांतील चालू भानगडींचें आटोपशीर स्वरूप, किंवा थोडक्यांत म्हणावयाचें असल्यास आपल्या नाटकाची भर करून बाकी उरलेलें आपलें सर्व ज्ञान प्रस्तावनेंत ढकलून देण्याची पूर्ण मुभा असते. प्रस्तावनेची लांबीरुंदी अनियंत्रित आहे. कमींत कमी एक शब्द आणि जास्तींत जास्ती आपणाला लिहवेल तितकें हेंच काय तें तिचें प्रमाण आहे. कांहीं कांहीं प्रसंगीं तर मूळ पुस्तकापेक्षां प्रस्तावनेचाच पसारा जास्त दिसून येऊन 'धन्याचें नांव गण्या आणि चाकराचें नांव रुद्राजी' या म्हणीची आठवण होते. अशा ठिकाणीं पुस्तकासाठीं प्रस्तावना कीं प्रस्तावनेसाठीं पुस्तक ह्या बिकट प्रश्नाचें उत्तर वाचकांच्या कल्पनाशक्तीशीं लपंडाव खेळल्याखेरीज राहात नाहीं. एका प्रसिद्ध इंग्रजी नाटकाच्या मराठी भाषांतराला तर अशी प्रस्तावना आहे कीं, त्या विद्वान् ग्रंथकाराला त्याच्या भाषांतरापेक्षां त्या प्रस्तावनेबद्दल अधिक शाबासकी द्यावीशी वाटते. या भाषांतरासंबंधीं बोलत असतांना मंडळी जेव्हां "भाषांतर आहे साधारण, पण प्रस्तावना काय झोंकांत लिहिली आहे" असें म्हणून खुष होत असते; त्या वेळीं, 'मुलगी आहे साधारणच, पण हुंडा-करणी मात्र चोख आहे' असें म्हणून व्याह्यांचें अभिनंदन करणाऱ्या वऱ्हाडी मंडळींची अल्पसंतुष्टता मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभी राहते. प्रस्तावनेंत अमुकच गोष्टी असल्या पाहिजेत अशांतला कांहीं नियम जरी नसला, तरी कर्त्यानें कांहीं गोष्टी स्वतःच्या फायद्याकरितां म्हणून अवश्यमेव नमूद कराव्या. "कर्त्याच्या कांहीं विद्वान् मित्रांस हें नाटक पसंत पडल्यावरून..." या आरंभाचें एक वाक्य प्रस्तावनेंत असावें. आपले सर्व मित्र आपल्यासारखेच (!) असल्यास त्यांना नाइलाजास्तव 'विद्वान्' ही पदवी द्यावी. आपण नाटक गोगलगाईच्या गतीनें लिहिलें असलें तरी देखील "घाईघाईनें शेवटचे प्रवेश लिहून" तें छापून काढिलें आहे असें स्पष्ट म्हणावें. या वाक्याच्या जोरावर नाटकाच्या निदान शेवटच्या भागाच्या गचाळपणाबद्दल टीकाकारांशीं भांडतां येतें; निदान टीकाकारांना तरी आपली दया येते. शिवाय टीकाकारांचें निर्बीज करण्याचा आणखी एक मार्ग आहे. आपल्या नाटकाची हस्तलिखित प्रत टीकाकार होण्या-

जोगे जे लोक असतील त्यांच्याकडे पाठवावी व नंतर प्रस्तावनेंत "कित्येक उपयुक्त सूचना करून परोपरीनें साह्य केल्याबद्दल" त्यांचे आभार मानावेत; म्हणजे ते लोक आयतेच गप्प बसतात. पुस्तक छापून झाल्यावर त्यांना एक एक प्रतीची खंडणी पाठविण्यास मात्र चुकूं नये. आभाराच्या मसुद्यांत "कर्त्यांचे कांहीं विद्वान् उच्चपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत)" हे शब्द असलेले विशेष शोभादायक होतात. या आभाराच्या मालिकेंत जितके मणि जास्त तितके उत्तम. लिहितांवाचतां येणाऱ्या सर्वच लोकांचा समावेश जर तिच्यांत करतां येत असेल तर सोन्याहून पिवळें! कारण मग टीकाकारांचें भय मुळींच उरत नाहीं. एका ठिकाणीं तर ही यादी इतकी लांबलचक होती कीं, हीं नांवें आगाऊ प्रती घेणारांचीं असावींत असेंच मला वाटलें, व त्या दृष्टीनें ती यादी साधारण लहानच वाटून कर्त्याच्या दुर्दैवाबद्दल मला वाईट वाटलें; परंतु खरा प्रकार कळतांच त्याच्या जगन्मित्रत्वाबद्दल उलट आनंद वाटला. त्याचप्रमाणें फुकट प्रती वांटण्याचाहि फायदा मोठा आहे. माझ्या एका नाटककार मित्रानें आपल्या एकूण एक शत्रूंना व बहुतेक मित्रांना नाटकाची एक एक प्रत पाठवून दिली. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या पुस्तकावर एकही प्रतिकूल टीका आली नाहीं, परंतु 'भेटी' देण्यांत पहिली आवृत्ति सबंध संपून विक्रीसाठीं त्याला तावडतोब दुसरी आवृत्ति काढण्याची पाळी आली आहे. येवढें मात्र यांत थोडें गौण झालें आहे. असो. प्रस्तावने-संबंधीं इतकी माहिती पुरे आहे. अर्पणपत्रिका असली नसली तरी सारखीच. असल्यास मात्र तिच्यांत 'परवानगीवांचून' हा शब्द असावा.

याप्रमाणें प्रस्तावनेदाखल 'प्रस्तावने'पर्यंतच लिहून प्रस्तुत पत्र आतां पुरें करितों. पुढील 'ईशस्तुती' पासून सुरवात करीन.

आपला

'सवाई नाटकी'

ता. क– 'सवाई नाटकी' हें माझें नांव पाहून 'मनोरंजनां'तील 'नाटकी' कदाचित् रागावतील; परंतु 'सवाई' हा शब्द मीं 'नाटकी' यांच्यावर ताण करण्यासाठीं वापरला नाहीं. एका नांवाचा एक मनुष्य होऊन गेल्यावर त्याच नांवाचा दुसरा कोणी असल्यास त्या नांवाला 'दुसरा (the second)' हें शेंपूट जोडण्याचा प्रघात आहे; पण ही इंग्रजी रीति आहे. 'बहिष्कार'-योगाचे वेळीं हिचा उपयोग करणें इष्ट नाहीं म्हणून मीं मराठी रीत उचलली

आहे. 'थोरल्या' माधवरावांनंतर 'सवाई' माधवराव झाले ही गोष्ट सर्वांस महशूरच आहे. त्या प्रकारांत चढाओढ नव्हती हें कोणीहि कबूल करील.

'स. ना.'

# ईशस्तुति

ईशस्तुतीला सुरुवात करण्यापूर्वी वास्तविक पाहतां नाट्यकथानक ( Plot ) वगैरे कांहीं गोष्टींचा विचार करावयास पाहिजे होता; पण मागील खेपेस वचन देऊन चुकल्यामुळें ' ईशस्तुती ' पासूनच सुरुवात करणें भाग पडत आहे. म्हणून कथानक वगैरेंचा विचार मागाहून होईल.

ईशस्तुतीपासून खुद्द नाटकाच्या कथाभागाला सुरुवात होईपर्यंत जो भाग जातो त्यालाही प्रस्तावनाच म्हणतात. आपल्या थोरल्या बहिणीप्रमाणें या छोट्या प्रस्तावनेच्या कांहीं गोष्टी अगदीं ठराविक आहेत. या प्रस्तावनेचा नायक सूत्रधार असतो. सूत्रधारानें पडदा उघडतांक्षणींच ' गुलाल व पुष्पें उधळून ' ईशस्तुति म्हणावयास सुरुवात करावयाची असते. या ईशस्तुतीचा विषय कोणताहि देव असूं शकतो. परंतु वहिवाटीप्रमाणें पाहतां शंकर व ' गुरुदत्त निरंजन ' या दोघांचाच हक्क विशेष आहे, आणि हा हक्क वाजवीहि आहेच. शंकर तर बोलून चालून अर्धनारीनटेश्वर ! पुरुषानें स्त्रीवेष घेण्याची कल्पना प्रथम त्यानेंच शोधून काढिली आणि या कल्पनेवर तर नाटकवाल्या मंडळींचें सारें जीवन ! एवढा त्याचा नाट्यकलेशीं दांडगा संबंध असल्यावर त्याच्या हक्काबद्दल तक्रार करणें योग्य नाहीं. हा संबंध व्यक्त करण्यासाठीं ईशस्तुतीच्या तोंडाशीं ' नटवर ' ' श्रीनटनायक ' अशा अर्थाचे शब्द मात्र जरूर ठेवून द्यावेत. याशिवाय तोंडाला पिवडी चोपडण्याची कलाही शंकराच्या भस्मलेपनावरूनच निघाली असावी. सूत्रधाराच्या पगडीचा उगमही गंगेप्रमाणें शंकराच्या जटेंतूनच झालेला आहे. शंकराच्या चित्रमय स्वरूपांतील सदेह गंगेचें डोकें व पगडीची कोकी यांतील साम्य लक्षांत घेतलें असतां वरील विधानाचें सत्यत्व सहज कळून येईल. याप्रमाणें शंकराचे नाट्यकलेवर हस्तें परहस्तें अनेक उपकार झाले आहेत; म्हणून नाटकांत त्याला इतर देवांपेक्षां अधिक मान मिळाल्यास फारसें नवल नाहीं.

दत्तात्रेयाचा प्रस्तावनेंत प्रवेश ' समानशीले व्यसनेषु सख्यम् ' या न्यायानें आलेला आहे. तामसवृत्तीच्या लोकांना जर रुद्र हें दैवत आवडतें व सात्त्विक वृत्तीला जर विष्णु प्रिय वाटतो तर मग महिनापंधरवड्यांत सारखी धारेपालट करीत असणाऱ्या प्रवासशील नाटकमंडळ्यांना, आपल्या नाटकाचें अधिदैवत, सकाळीं प्रयागीं स्नान करून दोन प्रहरीं कोल्हापुरास मिळविलेली भिक्षा कावेरी-तीरीं भक्षण केल्यावर माहुरास जाऊन झोंप घेणारा दत्तात्रेय हेंच असावें असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. दत्तात्रेयाचें व नाटकवाल्या मंडळीचें दुसरें मोठें साम्य हें आहे कीं, गुरुदत्तात्रेयही अविवाहित आणि नाटकमंडळ्यांचे बहुतेक घटकहि अविवाहितच! दत्तात्रेयापासून भुतें दूर पळतात तर नाटक-वाल्यापासूनही भूतमात्राचा दूर राहण्याचा प्रयत्न असतो. सच्छील लोक दत्त-गुरूचें नांव ऐकतांच जसे त्याला नमस्कार करितात तसे नाटकवाल्याचेंहि नांव ऐकतांच त्याला नमस्कार ठोकितात. मात्र पहिला नमस्कार दत्ताला मान देण्या-साठीं असतो व दुसरा ' दुर्जनं प्रथमं वंदे ' या तत्वाला मान देण्यासाठीं असतो. परंतु कारण कांहीं का असेना; परिणाम मात्र एकच असतो यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें बहुतेक नाटकमंडळ्यांतील मुख्य मुख्य पात्रांना खडावा घालण्याचा नाद असतो, त्यांतहि आपल्या अधिदैवताचें अनुकरण करण्याची दांडगी इच्छा दिसून येत नाहीं असें कोण म्हणेल? शिवाय दत्तात्रेयाची स्तुति करण्यांत थोडासा प्रमाणशीरपणाहि दिसून येतो. सूत्रधार व दोन पारिपार्श्वक अशा तीन व्यक्तींनीं एकच स्तुति करावयाची, मग ती तीन देव मिळून झालेल्या एकाच देवाची केल्यास अनायासें त्रैराशिकालाहि मान दिल्यासारखें होत नाहीं काय? याप्रमाणें या दोन देवांचा नाटकांतील ईशस्तुतीवर हक्क आहे.

पूर्वी नाटकाची सुरुवात करण्याची कामगिरी गणपतीकडे होती. कवीनें त्याला ' मम स्तवना देउनि माना सभेसि यावें ' अशी विनंति सूत्रधारामार्फत करितांच विघ्नहर्ता स्वतः ताबडतोब रंगभूमीवर येत असे. त्यानें येऊन सूत्र-धाराला सरस्वतीस बोलाविण्याची सूचना करावयाची व सूत्रधारानें ती सूचना लागलीच अमलांत आणावयाची. सूत्रधाराची दीन वाणी श्रवण करितांच सर-स्वतीहि पित्याच्या अंकभागावरून उठून त्या स्थळाप्रत प्राप्त होत असे. तिच्या कृपेनें सूत्रधाराचीं बालकें अज्ञान असत तीं सज्ञान होऊन बृहस्पतिवत् भाषणें करूं लागत. सरस्वती ही स्वतः विद्याच असल्यामुळें बृहस्पतीच्या ज्ञानाविषयीं तिची इतकी हलकी कल्पना असणें अगदीं साहजिक आहे. ही कामगिरी

आटोपल्यावर सरस्वतीनें नृत्य करीत करीत (मोरावर बसली असूनही) नाकीं गमन करावयाचें. धूर्त विदूषक या वेळीं आपलें नाक दाबून धरीत असे. न जाणो ती एखादे वेळीं याच्याच नाकीं गमन करावयाची!

अशी नाटकाची जुनी व्यवस्था असे; पण एका सूत्रधाराच्या खुनशीपणामुळें नाटककारांची ही सोय नाहींशी होऊन त्यांना दुसऱ्या देवांची प्रार्थना करण्याची वेळ आली. याविषयीं कथा अशी आहे:–एका सूत्रधाराचें व गणपतीचें नाटक मंडळींतील मनुष्यें या नात्यानें वांकडे होतें. गणपतीला चांगला हात दाखविण्यासाठीं त्याच्या पाया पडतेवेळीं सूत्रधार त्याच्या पायाच्या आंगठ्याला कडकडून चावला. विघ्नेशानें हें विघ्न टाळण्यासाठीं आपली सोंड उपटून सूत्रधाराच्या पाठीवर आपटली. थोड्याच वेळानें तो दंगा व तें नाटक हीं दोन्हींहि थांबलीं; परंतु तेथून गणपति मात्र नाटकास येईनासा झाला. पुढें नाटककारांनीं इतर देवांस आमंत्रणें देऊन पाहिलीं परंतु कोणीहि येईना. प्रत्यक्ष विघ्नहराचीच अशी दैना झाल्यावर दुसरा कोणता देव रंगभूमीवर येण्यास धजेल? अखेर नाटककारांनीं शंकराकडे धांव घेतली. हें दैवत मात्र खरें! सर्व देवांनीं मंथनविष घेण्याचें नाकारिलें तेव्हां आयत्या वेळीं शंकरांनींच पुढें होऊन तें प्राशन केलें. त्याचप्रमाणें येथेंही सर्व देव घाबरले असें पाहून शंकरांनीं नाटककारांवर कृपा करण्याचें कबूल केलें.

ही हकीकत पुष्कळांस खोटी वाटेल; परंतु मीं तिच्यांत तिळमात्रही बदल केलेला नाहीं आणि मी तरी खोटें कशाला सांगूं? जें ऐकलन् तेंच सांगितलन्!

असो. आतां स्तुति कशी करावयाची हें पाहूं. शंकराचें वर्णन आणि स्तुति हीं करण्याचे श्रम आपण स्वतः घेण्याचें कांहीं कारण नाहीं. किर्लोस्करांच्या शाकुंतलांतील 'पंचतुंड नररुंडमालधर' व 'अष्टमूर्ति परमेश' या दोन खाणी कायम आहेत तोंपर्यंत नवीन नाटककाराला ईशस्तुतिपर शब्दरत्नें* शोधावया-

---

* किर्लोस्करांच्या शब्दरत्नांवर दरोडा घालणाऱ्या बहादुरांपैकीं एकानें तर इतकी तन्मयता दाखविली आहे कीं, किर्लोस्करांची शब्दयोजना, पदांच्या ओळी, वगैरेची चोरी करूनच न थांबता, त्यानें किर्लोस्करांच्या नांवावरहि हल्ला केला आहे. किर्लोस्कर कांहीं पदांच्या शेवटीं 'बलवत्' असा स्वतःचा नामनिर्देश करीत हें पाहून या भक्तानेंही स्वतःच्या 'बाळकृष्ण' या नांवाला वेडींवांकडीं वळणें देऊन त्याचें 'बलवत्' हें रूप बनविलें आहे. हा प्रकार पाहून हंसावें कीं रडावें हें माझ्या वाचकांनींच ठरवावें.

—स. ना.

साठीं दूर जावयास नको. अण्णांनीं आपलीं नाटकें करण्याची जशी सर्व नाटकमंडळ्यांना सदर परवानगी देऊन ठेविली आहे तशी सर्व नाटककारांनाहि आपल्या नाटकांतून वाटेल तें चोरण्याची परवानगी देऊन ठेविली आहे. बहुतेक नाटकांतून अण्णांच्या पदांसारखीं पदें, शब्दयोजनेसारखी शब्दयोजना, वाक्यांसारखीं वाक्यें वगैरे प्रकार-प्राचुर्यानें दिसून येतात याचें कारण ही परवानगीच होय.

ईशस्तुतीचीं एक किंवा दोन पदें झाल्यावर 'झालें इतकें ईशस्तवन पुरें आहे' या ठराविक वाक्यानें तिचा शेवट करावा. नाटकांत नायकनायिका नसली तरी चालेल; परंतु या वाक्यावांचून मात्र चालणार नाहीं. ईशस्तुतीचा शेवट करण्याचा किर्लोस्करांनीं शोधून काढलेला हा सडेतोड मार्ग त्यांच्यानंतर होणाऱ्या साऱ्या नाटककारांना इतका आवडला आहे कीं, थोडथोड्या फरकानें हें वाक्य बहुतेक नाटकांतून दृष्टोत्पत्तीस येतें.

ईशस्तुति ही फक्त संगीत नाटकांसाठींच आहे. 'गद्य' नाटकांत तिला थारा नाहीं. सबब आपल्याला जर संगीत नाटक गद्यांत लिहावयाचें असेल तर परमेश्वरापाशीं तोंड वेंगाडण्याचें (नाटककारानें नव्हे; पण गातांना सूत्रधारानें) कांहीं कारण नाहीं. असो. झालें इतकें ईशस्तवन पुरें आहे.

## प्रस्तावनेच्या इतर बाजू

जिल्हानिहाय गौरकाय अधिकारी, जिल्ह्यांच्या विस्तृत पटांगणांत कलेक्टर, मॅजिस्ट्रेट व प्रसंगीं पोलिटिकल एजंट या तीन निरनिराळ्या रूपांनीं वावरत असतो; त्याचप्रमाणें बार्शी लाइट रेल्वेचा अर्धगौर गार्ड, गाडी चालत असेपर्यंत गार्ड, स्टेशनावर उभी राहावयाचें बेतांत असतांना उतारूंजवळून तिकिटें घेणारा तिकिट कलेक्टर, गाडी उभी असेपर्यंत स्टेशनावर झपाट्यानें येरझारा घालणारा स्टेशनमास्तर व शेवटीं गाडी सुटावयाचे वेळीं बावटा दाखविणारा पोर्टर, हे चार निरनिराळे हुद्दे संभाळून असतो. सकृद्दर्शनीं यांची कर्तबगारी मोठीशी वाटते खरी; परंतु नाट्यसृष्टीमधील गौरमुख सूत्रधार त्याच्या उज्ज्वलतेस कालिमा लाविल्याखेरीज राहणार नाहीं. हा प्राणी प्रस्तावनेच्या आकुंचित जागेंतच पांच निरनिराळ्या नात्यांनीं वावरत असतो. बोलण्याच्या भरांत कोणतीहि गोष्ट सहज विसरणारा अजागळ, घरांतील सर्व भानगडींबद्दल बेदरकार राहून हमेशा नाटकांच्या जाहिराती ठोकणारा लोकरंजनाचा मक्तेदार, ग्रंथकार व नट यांच्याबद्दल देवाजवळ व प्रेक्षकांजवळ वकिली करणारा स्वयंसेवक, एका सदैव उपवर पोरीचा दैववादी बाप व नाटकांचा तिटकारा करणाऱ्या एका हट्टवादी बायकोचा निश्चयी नवरा, हीं सूत्रधाराचीं पांच अंगें आहेत. यथाछंद यांचा थोडथोडा विचार करूं.

ईशस्तुति संपून दोन्ही पारिपार्श्वक दोन बाजूंनीं ( हे दोघे दोन निरनिराळ्या बाजूंनीं कोठें जातात ? ) निघून जातांच सूत्रधार कायदेशीर 'सूत्रधार' होतो असा नाट्यशास्त्राचा नियम आहे. 'गांवांतला एक सभ्य ब्राह्मण' या नात्यानेंच त्यानें ईशस्तुति करावयाची असते. यावरून पाहतां मनुष्यस्वभावाच्या उद्दामपणाची चांगलीच प्रचीति दिसून येते. जो मनुष्य एका क्षणापूर्वीं प्रेमळ शब्दांनीं परमेश्वराला आळवीत असतो तोच सूत्रधाराचा अधिकार हातीं येतांच आपलें ताकापुरतें रामायण आटोपतो, व लागलांच बेमुवर्तपणानें म्हणावयास

लागतो कीं, " पुरे पुरे, हा सभाजनांचा रसभंग करणारा खटाटोप कशाला पाहिजे ?" मागील कृत्यांबद्दल मनुष्य किती बेदरकार असतो ? जमलेल्या लोकांची हांजीहांजी करण्यासाठीं हा गृहस्थ खरोखरीच मोठ्या खटाटोपानें केलेल्या ईशस्तुतीला बिनदिक्कत 'खटाटोप' म्हणून मोकळा होतो ! माझी खात्री आहे कीं, प्रत्येक प्रयोगाच्या पूर्वीं इतक्या प्रेमळपणानें ईशस्तुति केली तर वाटेल तो देव मूर्तिमंत रंगभूमीवर येऊन उभा राहील; निदान भोळा शंकर तरी खास येईल ! पण मध्यंतरीच हा प्रकार होत असल्यामुळें असें झालेलें कधीं दिसून येत नाहीं. शंकराच्याही भोळेपणाला कांहीं मर्यादा आहेच. तोंडावर केलेली ही अमर्यादा न समजण्याइतका कांहीं तो भोळा नाहीं. स्तुतीचा प्रेमळपणा ऐकतांच गजचर्म पांघरून यायला निघावें आणि पुढली भानगड ऐकतांच पुन्हा मागें फिरावें याप्रमाणें दर शनिवारीं-बुधवारीं त्याची धांदल होत असावी असा माझा अंदाज आहे.* आतां व्यवहारज्ञानदृष्ट्या पाहिलें तर मात्र सूत्रधाराचेंच करणें बाजवी दिसतें. कारण ज्याच्या अस्तित्वाबद्दलसुद्धां वाद चालू आहेत त्या ईश्वराच्या येण्यासाठीं इतका सायास करण्याच्या भानगडींत प्रत्यक्ष चार आणे खर्चून आलेल्या प्रेक्षकांस कंटाळून परत घालविण्यांत काय शहाणपणा आहे ?

यानंतर प्रेक्षकांना 'हंसक्षीरन्याया'नें गुणग्रहण करण्याबद्दल विनंति करण्याची वहिवाट आहे. हा 'हंसक्षीरन्याय' बहुतेक नाटककारांचा मोठा आवडता पदार्थ दिसतो; आणि खरें म्हटलें असतां दुधाच्या चार थेंबांची आशा दाखवून व प्रेक्षक-वाचकांना आपल्या नाटकरूपी समुद्रांत खूप धडपडायला लावून नंतर त्यांची निराशाजन्य तारांबळ पाहणें कोणाला आवडणार नाहीं ? प्रत्येक नाटकांत हा न्याय हजर असल्यामुळें माझ्या अनुशासनाप्रमाणें नाटक लिहिणाऱ्या होतकरू नाटककारांना याचा उपयोग करावयाचा उपदेश मीं अवश्य केला असता; परंतु पूर्वपरंपरेनें वागण्याचा आपला संकल्प जरी प्रचलित नाटकांतील सबंध पदेंच्या पदें व प्रवेशच्या प्रवेश आपल्या नाटकांत

---

* येथें इतकें म्हटलेंच पाहिजे कीं, इतका प्रकार होत असूनही या भोळ्या दैवताचा नाटकवाल्यांकडे पक्षपात आहेच. प्रत्यक्ष निंदा होत असतांनाही स्वतःच जाणें जनरीतीला वाईट दिसेल म्हणून निदान आंतून तरी नटवर्गाबद्दल सहानुभूति दाखविण्यासाठीं या दैवतानें आपल्या अनुचरगणाला पाठवून दिलें आहे; हें सध्यां रंगभूमीवर थैमान करणाऱ्या भूत, पिशाच, समंध, वेताळ, ब्रह्मराक्षस वगैरे मंडळीवरून सिद्ध होतें.

घुसडून देण्याइतका मोठा असला तरी या बाबतींत नाइलाजास्तव आम्हां आर्यांच्या चर्वितचर्वणप्रियतेला क्षणभर बाजूस ठेवणें उचित दिसतें. ज्याला ज्या गोष्टीची वार्ताही नाहीं त्यानीं त्या गोष्टींत परीक्षा घेण्याच्या भरीस पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मुंबई युनिव्हर्सिटीच्या एका विद्वान् परीक्षकानें स्वप्रदर्शनार्थ "His verticality went into his horizontality" ( साधा अर्थ– तो पडला ) या अवाढव्य वाक्याचें संस्कृत रूपांतर करावयास सांगितलें होतें असें म्हणतात. त्याच मासल्याचा 'हंसक्षीरन्याया' चाही प्रकार आहे. लोकांना या न्यायाची माहिती खात्रीनें नाहीं. ही विद्या जर त्यांना माहिती असती तर दुधांत पाणी घालणाऱ्या गवळ्याबद्दल घरोघरीं इतकी कुरकुर व पात्रोपात्रीं इतक्या कौट्या कधींच सुरू झाल्या नसत्या. लोक मुकाट्यानें हंसक्षीरन्यायानें वागावयास लागले असते. पण त्यांना त्यांत गम्य नाहीं. मग उगीच त्यांना त्या न्यायानें जाण्याच्या भरीस पाडण्यांत काय अर्थ आहे ? आतां मथुरेच्या 'सुखसंचारक' मंडळीनें तयार केलेल्या दूध मोजणाऱ्या यंत्राच्या साह्यानें हें गुणदोषनिरीक्षण करण्याची एखाद्या नाटककारानें शिफारस केल्यास माझी हरकत नाहीं. परंतु जुन्या कवींच्या हजारों कल्पना बेवारसी हजर असल्यावर उगाच या खटाटोप करण्यांत तरी काय हंशील आहे ! नवीन कल्पना शोधून काढणें हें आपलें ब्रीद नव्हे, खरें कवित्व त्यांत नाहीं. उगाच एखादा टीकाकार संतापून म्हणावयाचा कीं, " ही कल्पना दुसऱ्या कोणत्याही नाटकांत दिसत नाहीं; सबब ती चुकीची असली पाहिजे; तसें नसतें तर आमच्या एखाद्या तरी जुन्या कवीला ती आठवलीच असती ! "

याप्रकारें ग्रंथकाराच्या तर्फेनें ही वकिली झाल्यानंतर सूत्रधारानें आपल्या 'भार्येचें अनुमोदन' घेण्यासाटीं 'वेषसिद्धता झाली असल्यास तिला इकडे बोलवावी. येतांक्षणींच तिनें 'काय आज्ञा आहे' म्हणून विचारावें. पुढें सूत्रधारानें एका साकींत ( येथें साकीच असावी लागते. आजपर्यंत या कामीं जवळजवळ तीनचारशें साक्या खर्ची पडल्या आहेत.) नाटकाचें नांव, ग्रंथकाराचें नांव, त्याच्या गोत्राचें नांव वगैरे हकीगत जाहीर करावी. एका कुशल लेखकानें तर आपलें नांव, बापाचें नांव, आडनांव, टोपणनांव, मूळगांव, हल्लीं वस्तीचें गांव, तालुक्याचें नांव, जिल्ह्याचें नांव, प्रांताचें नांव, पोस्टऑफिसाचें नांव व अगदीं जवळच्या रेल्वे स्टेशनाचें नांव इतक्या गोष्टी एका पद्यांत खेचून भरून त्या पद्याचा जवळ जवळ एक नकाशाच बनविला आहे ! या लेखावरही

ताण करण्यासाठीं माझ्या एका नाटककार मित्रानें आपल्या एकाच पद्यांत वर सांगितलेल्या गोष्टींच्या भरतीस जी. आय्. पी. रेल्वेच्या सर्व स्टेशनांचीं नांवें, आपल्या लग्नाच्या वेळीं जमलेल्या करवल्यांचीं नांवें, पानपतच्या लढाईवर गारद झालेल्या सर्व वीरांचीं नांवें, इराणच्या राजाच्या तीस हजार आवडत्या मांजरांचीं नांवें, मटेरिया मेडिकामधील सर्व औषधांचीं नांवें व विलायतच्या मेलनें येणाऱ्या उतारूंचीं नांवें देण्याचा निश्चय केला आहे. हा अमरकोश लौकरच बाहेर पडेल. आगाऊ गिऱ्हाईक होणारासही आपलें नांव या संगीत यादींत गुंफलेलें पाहण्याचा लाभ करून देण्यांत येईल.

त्याचप्रमाणें या सार्कीत स्वतःबद्दल व स्वतःच्या कृतीबद्दल वाटतील त्या थापा मारण्याची ग्रंथकाराला पूर्ण मुभा असते. कालिदासासारख्यानें स्वतःचा कमीपणा दाखविण्याचा प्रयत्न ठिकठिकाणीं केलेला दिसून येतो. हा त्याचा भित्रेपणा होय. सध्याच्या कायद्याच्या कडक युगांत कोणाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं. फार झालें तर आपणच आपल्या कवितेची स्तुति केल्याबद्दल एखादा अलंकारिक टीकाकार "कवित्व केलें कविनायकानें" एतदादि श्लोकाच्या आधारें "कवि आपल्याच कन्येवर लुब्ध झाला" असें म्हणेल एवढेंच. पण त्यांतहि कांहीं वावगें नाहीं. सर्व सृष्टीचा शहाणासुरता विधाता जर आपली कन्या सरस्वती इचा अभिलाष धरावयाला चुकला नाहीं म्हणतात, तर मग शब्दसृष्टीचा विधाताच आपल्या सरस्वतीभोंवतीं घिरट्या घालूं लागल्यास कोठें चुकतें ?

'आपला नवरा नाटक करणार' हें समजतांच नटी खूप रागावते व त्याला नानाप्रकारें बोध करून पाहते; परंतु तिचें म्हणणें सूत्रधाराला कधींही पटत नाहीं व पटून उपयोगही नाहीं, कारण, नाटकाच्या जाहिराती निदान चोवीस तास आधींच लागलेल्या असतात. यानंतर हीं नवराबायको आपसांत भांडतात. एकमेकांना शाब्दिक देतात, एकमेकांचीं मतें खोडून काढितात, घरांतल्या भानगडींची वाटाघाट करितात, एकमेकांच्या करमणुकीसाठीं गातात, मध्येंच अगदीं साध्या गोष्टीही विसरतात आणि पुन्हां एकमेकांस विसरलेल्या गोष्टींच्या आठवणी करून देतात. या सर्व गोष्टी होईपर्यंत प्रेक्षकांनीं घरांतल्या निरुपद्रवी देवांप्रमाणें निर्विकार मनानें स्वस्थ बसावयाचें असतें. सरतेशेवटीं कोणाची तरी चाहूल लागतांच सूत्रधार एखाद्या भुरट्या चोराप्रमाणें नटीसह निघून जातो. या बाबतींत हा लाजाळूपेक्षांही जास्त भेकड असतो. हा इतका माणूसघाण्या कां असावा हें समजत नाहीं. पण मी चुकलों. या दोघांच्याविषयीं कोणती गोष्ट

नीटशी समजली आहे तर हीच एक समजावयाची राहिली आहे ? प्रस्तावनेच्या दोनचार पानांतच या जोडप्याच्या परस्परविरोधी विसंगत वाक्यांची इतकी गर्दी असते कीं, त्याच्यावरून या दोघांचें स्वभावचित्र रेखाटतांना शेक्स्पीयरच्या सदतीस नाटकांतल्या विविध भूमिकांचें सम्यक् निरीक्षण करणारा जर्विनसुद्धां आपलें अनुभविक कलम निराशेनें खालीं ठेवील. नटी ही वस्तु मानी असते, घट्टेखोर असते, मूर्ख असते, कल्पक असते, संसारदक्ष असते, सांगकामी असते, नवऱ्याचा स्वभाव ओळखणारी असते व तशीच न ओळखणारीही असते. वेषसिद्धि झाल्यावर हमेषा आपला नवरा आपल्याला हांक मारतो हें पूर्णपणें ठाऊक असतांहि दर प्रयोगाचे वेळीं त्याच्या बोलावण्याची वाट पाहात बसते. यावरून ती मोठी मानी तरी असावी किंवा वहिवाटीच्या कायद्याला बगलेंत गुंडाळणारी तरी असावी असा तर्क होतो. बरें; रंगभूमीवर प्रवेश केल्यानंतर तरी कांहीं शहाणपणा असतो म्हणावा तर तोही नाहीं. तेथें गेल्यावर तरी नवऱ्याचा पोषाख, दिव्यांचा चकचकाट, प्रेक्षकांची दाटी, (तबलजी, पेटीवाला) वगैरे गोष्टी पाहिल्यावरच तिला ' बहुतेक प्रकार ' ताडतां येतो. नवरा वेषसिद्धि करावयास सांगतो त्यावरून तिला कांहींच कल्पना करितां येत नाहीं. बरें उलट-पक्षीं उगीचच्या उगीच नवऱ्यानें सोंग सजविण्यास सांगितलें असावें अशा समजुतीवर ती स्वस्थ बसली असावी असें म्हणावें तर नवऱ्याला वेड लागल्या-बद्दलचा संशयही ती कधीं दर्शवीत नाहीं.

जगांत प्रत्येक मनुष्य अनुभवापासून शहाणपणा शिकत असतो आणि याच कारणामुळें इतिहास लिहिले जात असतात; परंतु नटी या गोष्टीला अपवाद आहे. हजारों वेळां नवऱ्यानें झिडकारून टाकिलें असतांहि दर नाटकांत ही अनुभवाला विसरणारी व हट्टी स्त्री पुन्हां आपलें चऱ्हाट सुरू करिते व नवऱ्याला नाटकाचा धंदा सोडून देण्याविषयींची मसलत देत असते. तोही अगदीं ठराविक शब्दांनीं तिचें समाधान करतो. सतत पंचवीस वर्षें भिक्षांदेहीचें फलरहित व्रत चालवूनही निराश न होणाऱ्या राष्ट्रसभेंतील राजकीय भिकाऱ्यांच्या-पेक्षां हजारों वर्षें एकच भीक मागणाऱ्या नटीची चिकाटी हजारों पटींनीं मोठी आहे हें सांगणें नकोच. हिंदुस्थानांत स्त्री-पुरुषांना समान हक्क देण्याचा कायदा पसार होतांक्षणींच मी नटीला अध्यक्षस्थानीं बसविण्याची सूचना पुढें आणणार आहें. जहाल नाटककारांनीं वाटेल तर आपल्या नटीला ' अडवणुकीचे मार्ग ' सुचवावेत; परंतु सध्यांची ' मवाळ ' नटी कित्येक वर्षेंपर्यंत तरी आपला प्रयत्न-वादीपणा सोडणार नाहीं.

नाटकाचा धंदा सोडण्यासाठीं पुढें केलेल्या कारणांपैकीं मुलीच्या लग्नाबद्दल दिरंगाई हें एक कायमचें कारण आहे. शंकराचें व कंचुकीचें वार्धक्य, पार्वती व गंधर्वकन्या यांचें तारुण्य आणि ध्रुव व उपमन्यूचें बाल्य यांच्याप्रमाणेंच कार्तिकस्वामी व सूत्रधाराची मुलगी यांचें कौमार्य अक्षय्य आहे. ही सदैव उपवर असते. काळाचा हिच्या वयावर परिणाम होत नाहीं किंवा हिला कोणी नवराही मिळत नाहीं. हिच्यांत कांहीं तरी खोड असल्यामुळें म्हणा, किंवा ही नाटकवाल्याचीं मुलगी असल्यामुळें म्हणा, हिला पत्करावयास कोणीही तयार नाहीं. हिचा बापही या बाबतींत बेफिकीर राहतो. प्रेक्षकांच्या मनोरंजनाच्या अगदीं नित्याच्या व साध्या कर्तव्याबद्दल अगदीं चिंतातुर होऊन प्रयत्नवादीपणाच्या मार्गास लागणारा सूत्रधार या कन्येच्या लग्नासारख्या नैमित्तिक आणि महत्त्वाच्या कर्तव्याबद्दल मात्र देवावर भरंवसा टाकून पूर्ण दैववादी बनतो! मग कदाचित् 'रोज मरे त्याला कोण रडे' अशांतला प्रकार येथें झाला असल्यास न कळे! हा प्रकार हमेशा पाहून कंटाळलेल्या प्रेक्षकांतूनच कोणी परोपकारशील 'कोदंड' उत्पन्न होऊन या मुलीचें पाणिग्रहण करील तरच बाकीच्या प्रेक्षकांच्या मागची ही पुराणश्रवणाची कटकट चुकण्याचा संभव आहे. एरवीं दुसरा मार्ग कांहीं दिसत नाहीं.

सूत्रधार हा सदैव निपुत्रिकच असला पाहिजे. याला पुत्र होतच नाहीं म्हणून म्हणा किंवा माकडांच्या टोळीपैकीं हुप्या नवीन जन्मलेल्या पुल्लिंगी वानरबालकांना मारून टाकितो तशी प्रवृत्ति या सूत्रधारांत असेल म्हणून म्हणा पुत्रसुख याच्या दैवीं नसतें. नाटकें पाहूं लागल्यापासून व पुढें लवकरच वाचूंही लागल्यापासून मला पुष्कळ दिवसपर्यंत आशा असे कीं, एखादा तरी सूत्रधार मुलासह प्रवेश करील किंवा एखादी तरी नटी कन्याविवाहाच्या नेहमींच्या काळजींतून मुक्त होऊन आपला मुलगा स्कूल फायनलच्या परीक्षेंत नापास झाल्याबद्दल खेद करीत असलेली दिसेल; परंतु अनुभवांतीं त्या आशेचेंही सूत्रधाराप्रमाणेंच निसंतान झालें आहे.

नाहीं म्हणायला एका नाटकांत मात्र सूत्रधाराचा एक मुलगा दृष्टीस पडतो; पण तो प्रकार हिशेबांत घेण्याच्या लायकीचा नाहीं. 'वीरतनयां'त बकुलानें, 'शुभसेनाचें काळीजच उलटें असल्यामुळें त्याला सर्व गोष्टी सहजच उलट्या दिसाव्यात' असें म्हटलें आहे. त्याच धर्तीचा प्रकार तेथेंही झालेला आहे. त्या ग्रंथकाराचा सर्वच प्रयत्न हेतूसह उलटा आहे. आधीं हरिश्चंद्र राजाच्या दुःखमय कथेंतून हास्यरस उत्पन्न करण्यासाठीं हें नाटक निर्माण

झालें आहे. पुढें बोबडें बोलण्याचें अनुकरण करण्यासाठीं एका लहानशा पात्राला अस्पष्ट वर्णोच्चाराऐवजीं अगदीं स्पष्ट परंतु उलटी भाषा बोलावयास लाविलें आहे! या व अशाच इतर प्रकारांमुळें हें नाटक ग्रंथकाराच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरीच ' हास्यरसप्रधान ' झालें आहे, एवढें येथें सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं.

सूत्रधार इतक्या वेळां आपल्या दृष्टीस पडतो; परंतु जातगोताविषयीं आपणाला कांहींच माहिती मिळावयाचा संभव नसतो; अपवादाखातर एका सूत्रधाराच्या भाच्याचें नांव ' चंद्रकांत ' एवढेंच आजपर्यंत कळलें आहे. परंतु येवढ्या आधारावरून असा तर्क करितां येईल कीं, सूत्रधाराच्या गणगोताच्या माळेचें सूत्र ' चंद्रकान्त, सूर्यकान्त ' यांसारख्या मण्यांनींच युक्त असावें. एखाद्या एथ्नालॉजिकल * कमिटीला याची वंशपरंपरा शोधून काढण्यासाठीं नेमल्यास चालण्यासारखें आहे.

—' सवाई नाटकी. '

* या शब्दाच्या खरेपणाबद्दल माझी खात्री नाहीं. कदाचित् ' एथ्नाग्राफिकल ' असाही खरा शब्द असूं शकेल.

—' स. ना. '

# छोट्या जगूचा ' रिपोर्ट '

धाकटा जगू कळूं लागल्यापासून एका नाटक मंडळींतच होता. एकदां मंडळीच्या मालकाबरोबर एक लग्नसमारंभ पाहून आल्यावर त्यानें आपल्या समवयस्क मित्रांना खालीं लिहिल्याप्रमाणें ' रिपोर्ट ' दिला—

खेळ मुद्दाम बांधिलेल्या मांडवांत झाला. स्टेज मातीचेंच केलें होतें आणि फारच लहान होतें. ' सीन ' जंगलाचा होता असें वाटतें; पण जंगलाच्या ' झालरी ' मुळींच नव्हत्या म्हणून त्याच्याबद्दल स्टेजवर झाडांचा पालाच बांधला होता. पडदे स्टेजच्या भोंवतीं न बांधतां सगळ्या थेटरभोंवतीं गुंडाळले होते. खेळाचे ' पास ' फुकट वांटले होते. खुर्च्याबिर्च्या कांहीं नव्हत्या. सगळ्यांना जाजमावरच बसावें लागलें. ' कुलीन ' स्त्रियांसाठीं स्टेजच्या आजूबाजूस जागा राखून ठेविली होती; पण गर्दी फार झाल्यामुळें त्यांना उभ्यानें सगळा खेळ पाहावा लागला. वेश्यांसाठीं जागा मुळींच ठेविली नव्हती आणि त्या आल्याही नव्हत्या. मॅनेजर लोकच पानविडीतंबाखू घेऊन ऑडिअन्समध्यें फिरत होते. पण ते कुणाजवळून पैसे घेत नव्हते. सोडालिंबूची कांहींच सोय नव्हती. पेटीतबल्याबद्दल सनया आणि ताशे ठेवले होते. त्या लोकांचीं कामें केव्हां केव्हां होतीं हें सुद्धां त्यांना ठाऊक नव्हतें म्हणून त्यांना मधून मधून ' वाजवा ' ' वाजवा ' म्हणून सांगावें लागत होतें. आम्ही गेलों त्या वेळीं स्टेजवर मुख्य पुरुषपार्टी, मुख्य स्त्रीपार्टी व एक भटाचें सोंग घेतलेला मनुष्य यांचीं कामें चाललीं होतीं. फक्त मुख्य पार्टी लोकांनींच रंग लावला होता. तो सगळ्या आंगभर होता. रंग फारच वाईट—अगदीं हळदीसारखा— होता. भटानें रंग लावला नव्हता; पण त्याचें सोंग अगदीं हुबेहूब झालें होतें. त्याची ' नकल ' अगदीं चोख होती; परंतु तो फार घाईनें बोलत होता. म्हणून त्याचें बोलणें ऐकूं येत नव्हतें. मुख्य पुरुषपार्ट्यांचा आवाज बसला होता; कारण त्यानें सगळीं पदें सोडून दिलीं होतीं. शिवाय

त्या दोघांच्या ' नकला ' मुळींच पाठ नव्हत्या; म्हणून भट त्यांना स्टेजवरच ' प्रॉम्ट ' करीत होता. प्रॉम्टिंग ऑडिअन्समध्यें स्पष्ट ऐकूं येत होतें. भटाचें ॲक्टिंग छान होतें. राजाराणींना ॲक्टिंग मुळींच येत नव्हतें. स्त्रीपार्ट्याचें हें पहिलेंच काम होतें असें वाटतें; कारण तो फार घाबरून मान खालीं घालून होता. बोलतांनासुद्धां तो चांचरत होता; पण ऑडिअन्स फारच चांगलें होतें. एकानेंसुद्धां टाळ्या दिल्या नाहींत. शेवटीं त्या दोघांचें लग्न झालें आणि त्या वेळीं सातआठ जणांनीं ' कोरस ' म्हटला आणि खेळ आटोपला. राजाराणी ' कोरसां 'त म्हणत नव्हतीं.

# नाटक कसें पाहावें ?

## पूर्वार्ध

कांहीं वर्षांपूर्वी 'केसरी' पत्रांत एका पुस्तकाबद्दल विनोदात्मक, परंतु मनन करण्यासारखा अभिप्राय आला होता. त्या पुस्तकाचें नांव 'जेवावें कसें' हें होतें. केसरीकारांनीं त्या पुस्तकाच्या बरेवाईटपणाकडे फारसें लक्ष न देतां त्याच्या अकालदर्शनाबद्दल मात्र अभिप्राय दिला होता. सध्यां लोकांपुढें 'जेवावें कसें' हा प्रश्न नसून 'जेवावयाचें मिळवावें कसें' हा आहे. अशा आधारानें केसरीकारांनीं त्या पुस्तकाच्या अप्रयोजकतेचा उल्लेख केला होता. कधीं कधीं अनुभवी मनुष्याकडून वरील लेखकाप्रमाणें मौजेच्या चुका घडून येतात. 'रंगभूमी'च्या संपादकांनीं 'ग्रंथसार' या नात्यानें हीच चूक केली आहे. 'नाटक कसें पाहावें ?' या प्रश्नाचा ऊहापोह करण्यासाठीं त्यांनीं संबंध एक पुस्तक लिहिण्याचे श्रम घेतले आहेत; पण दिलगिरीची गोष्ट आहे कीं, त्यांनीं या प्रश्नाची केवळ उत्तरार्धाचीच बाजू घेतली आहे आणि मूळ महत्त्वाची बाजू तशीच ठेविली आहे. नाटकगृहांत शिरल्यानंतर या प्रश्नाची बाजू प्रेक्षकांसमोर येते ती इतकी सोपी असते कीं, एखादा पांच वर्षांचा पोरसुद्धां तिचा उलगडा करील. 'डोळे उघडे ठेवून' हेंच या प्रकारच्या प्रश्नाचें सोपें आणि सरळ उत्तर आहे; परंतु नाटकगृहांत प्रवेश होण्यापूर्वी, नाटक पाहण्याच्या इच्छेला दाबून टाकणारा हा प्रश्न जेव्हां भावी प्रेक्षकांच्या पुढें उभा राहतो तेव्हां मात्र याचें उत्तर फार बिकट वाटतें. तें उत्तर शोधून काढण्याचा सडेतोड मार्ग म्हटला म्हणजे रा. मुजुमदारांचें सहा आण्यांचें पुस्तक घेणें हा नसून ,पारसहा आण्यांचें नाटकाचें तिकीट घेणें हा असतो; परंतु शाळेंत गणिताचें उत्तर

जसें दोन रीतींनीं शोधून काढितां येतें त्याप्रमाणें प्रस्तुत प्रश्नाचें उत्तरही दोन रीतींनीं शोधून काढितां येतें. गणिताचा पहिला प्रकार जसा स्वतःची अक्कल खर्चून उत्तर शोधून काढणें, तसा या प्रश्नाचा पहिला प्रकार स्वतःचे पैसे खर्चून उत्तर शोधून काढणें; परंतु दुसरा व्यवहारज्ञानाचा प्रकार शेजारच्या पाटीवर नजर फेंकून काम साधणें, आणि नाटकी गणिताच्या उत्तराचा दुसरा प्रकार शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या वशिल्यानें काम साधणें हा होय. या रीतीनें नाटक पाहण्याचे अनेक मार्ग आहेत. ते सर्वच येथें नमूद करण्याचा विडा मी उचलीत नाहीं. नाटकाच्या धंद्यांत पडल्यामुळें, जे अगदीं टळक रीतीनें माझ्या निदर्शनास आले आणि ज्यांच्या सफलतेबद्दल माझी खात्री झालेली आहे ते शेलके मार्गच माझ्या वाचकांच्या फायद्यासाठीं सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहें. यांखेरीज अन्य मार्ग शोधून काढण्याचा माझ्या वाचकांनीं प्रयत्न केल्यास माझी आडकाठी नाहीं. रा. मुजुमदारांनीं हातीं घेतलेल्या प्रश्नाचा प्राथमिक विचार मी करीत असल्यामुळेंच मीं माझ्या निबंधाच्या मथळ्याला 'पूर्वार्ध' ही संज्ञा दिली आहे. एखाद्या पुस्तकाचा उत्तरार्ध आधीं निघून नंतर पूर्वार्ध निघाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे, हेंही वाचकांना त्यांतल्या त्यांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पैसे खर्चून नाटक पाहावयाचें नाहीं आणि नाटक पाहिल्यावांचून तर राहावयाचें नाहीं असा दुहेरी निश्चय केल्यानंतर संध्याकाळीं सात वाजण्याचे सुमारास आपल्या इष्ट देवतेचें स्मरण करून घराला रामराम ठोकावा. ही इष्टदेवता अर्थात् नाटक दाखविण्याजोग्या व्यक्तीखेरीज दुसरी कोण असणार? घरांतून निघते वेळीं खिशांतून पैशाचें पाकीट — अर्थात् असेल तरच — काढून ठेवावयास कधींहि विसरूं नये. कारण नाटक पाहण्याची हौस कांहीं अंशीं समुद्राच्या भरतीप्रमाणें असते. साडे नऊ वाजेपर्यंत ती एकसारखी वाढत असते आणि अगदीं साडे नऊ वाजतां तर तिची 'समा' होते! सर्व प्रकारच्या प्रयत्नांची पीछेहाट झाली तरी या वेळीं नाटकगृहाच्या दरवाजापासून दूर व्हावेंसें वाटत नाहीं! असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं कांहींतरी दैवी चमत्कारानें आपल्याला नाटक पाहायला मिळणार अशी निराश आशा या वेळीं मनांत उत्पन्न होते. पुराणांतल्या द्रौपदीवस्त्रहरणासारख्या अद्भुत कथांवर आपला विश्वास नसूनहि तशाच एखाद्या प्रसंगाची आपण आतुरतेनें अपेक्षा करीत असतों! येणाराजाणारांपैकीं प्रत्येकांकडे आपण ओळख पटविण्याच्या तीव्र दृष्टीनें न्याहाळीत असतों! नाटकाच्या 'मॅनेजर'नें सहज

आपल्यावर दृष्टि टाकिली तरी तो आपल्याला बोलावण्याकरितांच पाहता आहे असा आपल्या वेड्या मनाला भास होतो. आपण उत्सुकतेनें त्याच्याकडे पाहूं लागतों आणि तोंडावर कृतज्ञतादर्शक हंसण्याची पेरणी करतों ! इतकेंच नाहीं, परंतु शकुंतलालोलुप दुष्यन्ताप्रमाणें बसल्या जागींच आपल्याला त्याच्याजवळ गेल्यासारखें वाटतें ! अशा या आशेच्या हेलकाव्यांत अगदीं साडे नवाचा सुमार होतो ! तिकडे नाटकाची पहिली घंटा होते; इकडे आपल्या हृदयांत उत्कंठेचा दणदणाट सुरू होतो ! तिकडे सूत्रधार पडद्या-बाहेर येतो; इकडे आपला प्राण शरीराबाहेर येऊं पाहतो ! सारांश, ही वेळ मोठ्या आणीबाणीची असते ! आणखी अशा वेळेस अखेर निराशेनें बेफाम होऊन आपण साहजिक पैसे खर्चून नाटक पाहण्याच्या मागास लागतों ! पण मुळींच पैसे बरोबर न घेण्याची आधींपासूनच सावधगिरी ठेविली म्हणजे या अत्याचारामुळें आपल्या हातून प्रतिज्ञाभंगाचें पातक घडत नाहीं आणि फुकट नाटक पाहण्याच्या इच्छेप्रमाणेंच पैसे खर्चून नाटक पाहण्याची इच्छाही त्याच कारणामुळें दबली जाते ! एवढ्यासाठीं अशा रीतीनें नाटक पाहा-वयास निघतांना नेमाने पैसे घरींच ठेवावेत; त्याप्रमाणेंच पैशाबरोबरच लाजलज्जा, भीडमर्यादा, अंतःकरण, वाईट वाटण्याची मनाची शक्ति वगैरे सर्व भानगडीसुद्धां घरींच ठेवाव्या; कारण 'दरवाज्या' वरील धक्काबुक्कींत असल्या नाजूक मालमत्तेचा संभाळ करणें जड जातें ! त्यांच्याऐवजीं निर्लज्ज-पणा, कोडगेपणा यांसारख्या ढाली घेतलेल्या असल्या म्हणजे नाटकगृहाच्या ' पहारेकऱ्यानें शब्दशस्त्रांचा कसलाही मारा केला तरी त्यांतून निभावून जात येतें ! असो !

अशा प्रकारें 'सशस्त्र तयार' होऊन बाहेर निघाल्यानंतर आपल्या ओळखीचा नाटकवाल्यांशीं संबंध कसा जोडतां येईल याविषयीं विचार करावा. हा संबंध जोडण्याचे दुवे पुढें चढत्या भाजणीच्या क्रमानें दिले आहेत. परीट, दूधवाला, माळी, दुकानदार, छापखानेवाला, पोस्टमन, म्युनिसि-पालिटीचे नोकर, कचेरींतील कारकून, थेटरवाला, रेल्वेकडील लोक व पोलिस अधिकारी. ही खानेसुमारी सर्वांगपरिपूर्ण करावयाची असल्यास, नाटक-वाल्यांचे स्नेही व दूरदूरचे आप्त, त्यांना औषध देणारा डॉक्टर, नाटक मंडळींत पूजार्चनासाठीं जाणारा ब्राह्मण, नाटकगृहांतला चहावाला, त्याच्या शेजारचा विडीवाला, स्टेशनवरचा हमाल, गांवांतले सुप्रसिद्ध गांवगुंड, भांडीवाली मोलकरीण आणि दळणवाली या साऱ्या बाजारबुणग्यांची वरील यादींत

भरती करावी लागेल ! इतक्या लोकांच्या मध्यस्थीनें होतकरू प्रेक्षकाला नाटकगृहांत प्रवेश करून घेतां येतो. अर्थात् या सर्व लोकांना तर फुकट नाटक पाहण्याचा हक्कच आहे असें मी समजतों; म्हणून आजच्या लेखांत मी या हक्कदार लोकांकडे विशेष लक्ष देत नाहीं. ज्यांचा नाटक मंडळीशीं प्रत्यक्ष संबंध नसून, जे केवळ भूमितीच्या पहिल्या प्रत्यक्षप्रमाणाच्या मदतीनें नाटक पाहतात, त्यांच्या सोईसाठींच आजचा प्रयत्न आहे हें वाचकांनीं विसरता कामा नये.

या हक्कदारांपैकीं ज्याचा आपला संबंध असतो त्याच्या योग्यतेच्या मानाप्रमाणें नाटक मंडळींत आपली कमीअधिक संभावना होते. उघड उघड या सर्वच हक्कदारांची योग्यता सारखी नसते. नाटक मंडळीला त्यांच्यापासून होणाऱ्या उपयोगाच्या मानानें यांचे हक्क स्थापित होत असतात. हल्लीं आपल्या अगदीं रोजच्या परिचयांतलें उदाहरण घेऊन या हक्कदारांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास सध्यांच्या हिंदी राजकीय परिस्थितीचा उपयोग करून घेतां येईल. स्वराज्य मिळविणें आणि नाटक पाहण्याची परवानगी मिळविणें यांतील सादृश्य मान्य केलें तर ही उपमा काव्यप्रकाशाच्या केशभेदक व्याख्येबरहुकूम अगदीं पूर्णोपमा होते. स्वराज्याचा हक्क देणारें सरकार आणि नाटक पाहण्याची परवानगी देणारी नाटक मंडळी यांचें कितीतरी साधर्म्य आहे. स्वराज्याचा हक्क मागणाऱ्या लोकांचे त्यांच्या शक्तीप्रमाणें निरनिराळे भेद पाडितां येतात. कमीपणापासून सुरुवात केली तर राष्ट्रसभेसारख्या लौकिक सभांच्याद्वारें मिष्ठास भाषेचे अर्ज व विनंति करणारे राजकीय भिकारी पहिल्यानें पुढें येतात. परीट, दूधवाला, भांडीवाली मोलकरीण, ब्राह्मण, आप्तइष्ट, विडीवाले वगैरे मंडळी नाटकी चळवळींतील मवाळ होत. ( येथें एक सूचना देणें भाग आहे. या सर्व प्रकारच्या हक्कदारांचा स्वतः नाटक पाहण्याचा हक्क अचिन्त्यच असतो. त्यांच्याबरोबर येणाऱ्या त्यांच्या दोस्तांना हा हक्क मिळवून देण्यासाठींच ही स्वदेशी चळवळ चाललेली असते. एवढयासाठीं इंग्रजींतील Transfer of Epithet अलंकारान्वयें आपण त्या त्या हक्कदारांचीं नांवें त्यांच्या उपग्रहांना देऊं. ) वरील नाटकी मवाळांना स्वराज्याचा हक्क अर्थातच फार जपून मागावा लागतो. नाटकगृहांत फारशी गर्दी नाहीं, मॅनेजरसाहेबांची मर्जी सुप्रसन्न आहे, वगैरे वगैरे गोष्टींची तरतूद लक्षांत घेऊन हे नाटकी मवाळ आपल्या मागणीचा अर्ज अत्यंत नम्र भाषेनें, परिणत अंगानें, हंसतमुद्रेनें मॅनेजरपुढें

टाकतात. राजकीय मवाळांना सरकार एखादे वेळीं स्थानिक स्वराज्य, कौन्सिलांत मुकाट्यानें बसण्याचा हक्क वगैरे फोलपटें देण्याची मेहेरबानी करतें, त्याप्रमाणें नाटक सरकारसुद्धां आपल्या मवाळांना कधीं 'पिट' मध्यें बसण्याचा, कधीं पडदे ओढण्याच्या माडींत बसण्याचा, तर कधीं दरवाजांतच बसून खेळ पाहण्याचा हक्क देत असतें. दरवाज्यावरील व्यवस्थापकांना माळ्याकडून येणारे फुलांचे गजरे, चहावाल्याकडून मिळणारा चहा, विडीवाल्यानें दिलेल्या पानाच्या पट्टया, या गोष्टी हिशेबांत घेतल्या म्हणजे मवाळ लोकांकडून अधिकारी साहेबांना होणाऱ्या 'टी'पार्ट्या, पानसुपाऱ्या यांची उणीव भरून येणार आहे. या नाटकी मवाळांची नम्र भाषा, कितीहि वेळां हांकून दिलें तरी पुनः पुन्हा येण्याचा लोंचटपणा, कठीण शब्दांच्या मारालाही दाद न देणारा मोंडपणा, नाटक 'खलास' होण्याची वेळ झाली तरी चिकाटी धरून बसलेला आशावादीपणा या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे राष्ट्रीय सभेंत बसल्याचा भास झाल्यावांचून राहात नाहीं. हें साम्य इतकें परिपूर्ण आहे कीं, कधीं साहेबांच्या बंगल्यावर मिळणाऱ्या लाथांचा नमुनासुद्धां नाटकगृहाच्या दरवाजावर दृष्टीस पडतो. एखादा माथेफिरू 'डोअरकीपर' या लोंचट भिकाऱ्याला एखादे वेळीं गचांड्यासुद्धां देत असतो. असो. यंदांच्या लाहोरच्या कॉंग्रेसचा टाहो घेणाऱ्या राजकीय भिकाऱ्यांना शनिवार-बुधवारीं नाटकगृहाच्या दरवाजावर येऊन या नाटकी मवाळांपासून कार्यक्रमाचे धडे घेण्याची शिफारस करून आमच्या नाटकी सृष्टींतल्या स्वराज्यासाठीं भीक मागणाऱ्या या 'जवानमर्द भिकारभाई'चा तिरस्कारपूर्वक निरोप घेऊं.

या मवाळांत आणखी एका वर्गाचा समावेश न करणें अन्यायाचें होणार आहे. पांचसात इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें करून विद्वान् ठरलेले लेखक, केवळ लोकांच्या करमणुकीसाठीं लेखणी शिणविणारे ग्रंथकार, जन्मभर संस्कृत भाषेंत रुळून शेवटीं राजकीय प्रकरणांत शिरणारे पेन्शनर वगैरे जसे राजकीय मवाळांत असतात त्याप्रमाणें नाटकी मवाळांतही पांच-सात नाटकांतल्या चोऱ्या करून वेडींवांकडीं नाटकें लिहिणारे लुंगेसुंगे नाटककार, नाटकवाल्यांच्या स्तुतीचीं श्लोकात्मक अष्टकें करून आणणारे कवि वगैरे स्थानिक हक्कदार असतातच! यांच्या वशिल्यानेंही प्रसंगवशात् नाटकगृहांत प्रवेश करून घेतां येतो. मुक्कामाच्या गांवचे गवईसुद्धां याच वर्गांत ओढितां येतील. यांचें तोंड बंद करण्यासाठीं अर्थात् घरीं येऊन कर्कश सुरांत गात बसतील या अर्थानेंच- पासाचा बोळा यांच्या तोंडांत कोंबावा लागतो. यांना पास न दिले

तर हे गांवभर निंदेचें रडगाणें सुरू करितात. मात्र यांच्या स्तुतिपर संगीतांत आणि निंदात्मक गद्यांत अधिक कर्कश कोणतें हें मला अजून ठरवितां येत नाहीं.

यानंतर ' निःशस्त्र प्रतिकारा 'चा मार्ग स्वीकारणारे नाट्यसृष्टींतले ' जहाल ' लोक येतात. पोस्टमन, म्युनिसिपालिटींतले नोकर, रेल्वेकडील अधिकारी गांवांतल्या ठिकठिकाणच्या अड्डयांतले प्रमाणीभूत प्रमुख वगैरे लोकांचा या ' जहाल ' वर्गांत समावेश होतो. अप्रत्यक्ष प्रतिकार करण्याच्या बाबतींत हे पूर्णपणें वाकबगार असतात. कलकत्त्याच्या राष्ट्रसभेपासून गाजत असलेले, मवाळांना थरथर कांपविणारे आणि अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत सलणारे राष्ट्रीयपक्षाचे चार कंटाळी ठराव * या नाटकी जहालांजवळ वेड्या-बांकड्या रूपानें हजर असतात. नाटकवाल्यांनीं आपल्याला नाटकाला फुकट सोडलेंच पाहिजे ही यांची स्वराज्याची कल्पना, गांवच्या गडबड्या लोकांचा धुमाकूळ ही यांची स्वदेशी चळवळ, लोकांना नाटकाचीं तिकिटें न घेण्याचा उपदेश करणें हा यांचा बहिष्कारयोग आणि नाटक चाललें असतां दंग्या-धोप्यांना उत्तेजन देणें हेंच यांचें राष्ट्रीय शिक्षण! क्वचित् प्रसंगीं नाटक-गृहाभोंवतीं लोकांना न येऊं देण्याचें ' पिकेटिंग ' सुद्धां अमलांत येतें! यांच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गाचे कांहीं नमुने नमूद करितो. नाटक सुरळीत चाललें असतां मध्यंतरीं ' वन्समोर–नोमोर ' चा धुमाकूळ घालणें; पोस्ट-मननें नाटक मंडळीचीं पत्रें उशिरां आणून देणें किंवा अजिबात फाडून टाकणें; म्युनिसिपालिटींतील लोकांनीं नाटकमंडळीच्या राहत्या घरीं व नाटकगृहांत पाण्याची टंचाई करून सोडणें; रेल्वेकडील लोकांनीं पार्सलें अडकवून ठेवणें, सामानाचे डबे मध्यंतरींच ' सिक ' करणें किंवा भलत्याच स्टेशनवर रवाना करणें, वगैरे हे किंवा यासारखे अडवणुकीचे मार्ग राजकीय जहालांच्या प्रयत्नांपेक्षां शतपट फलदायक असतात हें येथें नमूद करणें केवळ जरुरीचें आहे. या नाटकी जहालांनासुद्धां पिटमध्यें बसण्यासारखें हलक्या प्रतीचें ' वसाहतींतील स्वराज्य ' नको असतें. अगदीं इंग्लिशमनप्रमाणें – अर्थात् पैसे खर्चणाऱ्या लोकांप्रमाणें– नाटकगृहांत ' निर्भेळ स्वराज्य ' मिळविणें हें यांचें अंतिम साध्य असतें.

---

* या चार ठरावांचा असा दुरुपयोग करितांना मला मनापासून वाईट वाटत आहे.
–सवाई नाटकी

यानंतर माझ्या वाचकांनीं माझ्या मागोमाग फार जपून येण्याची खबरदारी घ्यावी. कारण आतां आपणाला प्रत्यक्ष प्रतिकार करणाऱ्या छातीठोक वर्गाशीं भिडावयाचें आहे. तुर्कस्तान, इराण वगैरे देशांतील सशस्त्र प्रजाजनांप्रमाणें राज्यकर्त्यांना सामन्यांत जेरीस आणून त्यांच्याकडून स्वराज्य हिसकावून घेणारे लोकसुद्धां नाटकी सृष्टींत आहेत. पोलीस व त्यांचे अधिकारी, मॅजिस्ट्रेट व त्यांचे अनुयायी वगैरे अधिकारी लोक या वर्गांत मोडतात. खेळ बंद करणें, खेळाला मुळींच परवानगी न देणें, प्रेक्षकांतील दंगा मोडण्याच्या निमित्तानें कायदेशीर दंगा करणें यासारख्या मर्दानी मार्गांनीं नाटकवाल्यांशीं हमखास लढून, त्यांना दांतीं तृण धरावयास लावून शरण आणणारा हा वर्ग फारच बलवान् असतो. ' मॅग्नाचार्टावर ' सही करणारा ' किंग जॉन ' जसा गोगलगाय बनला होता तसाच नाटकाचा मॅनेजर या महात्म्यांपुढें नरम पडतो. हे लोक आपल्या परिवारासह नाटकगृहांत येऊं लागले म्हणजे मॅनेजरच्या अरेरावीपणाला आळा पडून दरवाजावरील राजसत्तेला ' नियंत्रित राजसत्तेचें ' ( Limited Monarchy ) स्वरूप येतें. या वर्गाचा दरारा इतका विलक्षण असतो कीं इतर वर्गांशीं जुलमी राजसत्ता चालविणारा मॅनेजर यांना पाहतांच आपल्या सिंहासनाचा-- खुर्चीचा-- सक्तीचा राजीनामा देतो; नाहीं तर यांनीं अधिकाराचें शस्त्र वापरलेंच म्हणून समजावें ! हा सारा सशस्त्रतेचा प्रभाव आहे.

आतां राहतां राहिला अराजकांचा- निहिलिस्टांचा - वर्ग ! वर सांगितलेले, राजकीय किंवा नाटकी तीन वर्ग या नात्यानें तरी आपला हेतु सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांचे प्रयत्न आशेच्या पायावर होतात ! पण अराजक म्हणजे वैतागलेले निराशावादी ! इष्ट हेतूकडे यांचें फारसें लक्ष नसतें. परंतु केलेल्या प्रयत्नांच्या निष्फळतेमुळें सूडासारखा फलहीन परंतु भयानक मनोविकार यांचा स्वामी असतो. निराशेचा बेफामपणा यांच्या हातून मोठमोठाले अत्याचार घडवून आणितो. स्पेन, पोर्तुगाल, रशिया वगैरे देशांत हे अराजक लोक पूर्वीपासून आहेत. हिंदुस्थानांत मात्र हे महात्मे अलीकडेच उदयास येत आहेत. बॉंबसारख्या स्फोटक द्रव्यांची फेंक सुरू करून हे अराजक स्वतः गुप्त राहतात. राजकीय वातावरणांत हे लोक हिंदुस्थानांत जरी नुकतेच दिसत असले तरी नाटकी सृष्टींतले अराजक मात्र फार प्राचीन काळापासून आहेत. दगड, धोंडे यांसारख्या स्फोटक- डोकीं फोडणाऱ्या - द्रव्यांचा नाटकगृहावर वर्षाव करून हे आपल्या मनोवृत्तीचें

समाधान करीत असतात. राजकीय अराजकांचे प्रयत्न जसे सहसा यशस्वी व्हावयाचे नाहींत तसे यांचे धोंडेही फार करून कोणाला लागत नाहींत हें सुदैवच समजलें पाहिजे. स्पेन, पोर्तुगाल, सर्विया वगैरे देशांतल्या राज्य-कर्त्यांवर कैक वेळां बॉंबगोळे टाकण्यांत येतात; परंतु ते बहुधा चुकतात! नाटकी अराजकांनाही कधीं यश येत नाहीं. उलट अतिपरिचयामुळें हा धोंडे मारण्याचा प्रकार अलीकडे हास्यास्पद होऊं पाहात आहे! नाटकाच्या मॅनेजर मंडळीला त्यांचें आतां कांहींच वाटेनासें झालें आहे. बंगालचे पोलिस बॉंबच्या आवाजानें दचकल्याच्या बातम्या ऐकून पत्र्यावर पडलेल्या धोंड्यांचे आवाज शांतपणानें ऐकणारे नाटकाचे मॅनेजर त्या पोलिसांना हंसत होते. दारूचीं पोतीं पेटवून पार्लमेंटच्या सभागृहाला आग लावण्याची कल्पनासुद्धां आमच्या नाटकी वातावरणांत अमलांत येऊन गेली आहे. चाळीसगांवच्या कित्येक 'गायफॉक्स' नीं राजापुरकर मंडळीचें नाटकगृह जाळण्यांत यश मिळवून 'गनपावडर प्लॉट' मध्यें सांपडलेल्या अर्धवट अरा-जकांना लज्जेनें खालीं पाहावयास लाविलें आहे. अर्थात् बेछूट तालीमबाज, पोलिसच्या नजरेंत भरलेले उडाणटप्पू यांसारखी शेलकी मंडळीच या अरा-जक वर्गांत असते हें सांगावयास नकोच! त्याचप्रमाणें मनुष्यपणाला काळोखी आणणारीं हीं कृत्यें काळोखांतच होतात हेंही साहजिकच आहे! येथेंच आपली एका गोष्टीचा उल्लेख करणें योग्य आहे! शरीराचे जसे धर्म आहेत तसे मनाचेही तेच धर्म आहेत. कित्येक शरीरानें सुदृढ असतात तर कित्येक मनानें सुदृढ असतात. उलटपक्षीं कोणी शारीरिक उडाणटप्पूही असतात, तर कोणी मानसिक उडाणटप्पूही असतात आणि वरील अराजकांत या दोन्ही तऱ्हांच्या उडाणटप्पूंचा भरणा असतो. फरक एवढाच कीं, शारीरिक अराजक स्वतःची विचारसरणी यथातथ्यानें आचारांत आणितात आणि मानसिक अराजक तिचा नुसता उच्चारच करून थांबतात! दुबळ्या शरीरांत राहणारें अराजक मन कमकुवतपणामुळें खुनासारख्या कृत्यासाठीं हत्याराऐवजीं लेखणी-कडे धांव घेतें आणि हा खून पाडण्यांत त्याच्या हातावर रक्ताऐवजीं शाईचे डाग पडतात. सारांश, कमताकद अराजकांचे अत्याचार धमकीच्या पत्रांपली-कडे जात नाहींत; राजकीय भानगडींत जशीं हीं धमकीचीं व शिव्याशापांचीं निनांवी पत्रें आहेत तशीं तीं नाटकांतही आहेत. प्रत्येक नाटकमंडळीला अशीं पत्रें यावयाचींच! परंतु हे कागदी बॉंबगोळे कधींच त्रासदायक होत नाहींत. यांच्या जन्मदात्या हलक्या मनाच्या समाधानासाठीं यांना मानसिक बॉंब

किंवा भाववाचक बॉंब अशीं दिसण्यांत भयंकर परंतु अगदीं निःसत्त्व नांवें देतां येतील. या पत्रांतून आचरट विधानें, असंभाव्य बेत, धाडसाच्या धमक्या आणि अत्यंत घाणेरड्या शिव्या हा मालमसाला ठेंचून भरलेला असतो. हे बॉंब तावडतोब फाडून ( फोडून! ) टाकण्यांत येतात. परंतु परोपकाराच्या दूरदृष्टीनें येथून पुढें तरी मानसिक अवनतीचा हा किळस जपून ठेवण्याची मी प्रत्येक मंडळीच्या व्यवस्थापकाला नम्र सूचना करितों. कारण, पुढेंमागें स्त्री-शिक्षण सार्वत्रिक होऊन बाजारबसव्यांनासुद्धां शिव्यांचें शिक्षण देण्याच्या शाळा निघाल्या तर त्या वेळीं या मानसिक उकळ्यांचीं बाडें वाङ्मयादाखल ( Classical Literature ) उपयोगी पडण्याचा संभव आहे, किंवा आपल्या बाजूवर प्रकाश पाडण्यासाठीं समर्थनार्थ प्रमाणांऐवजीं प्रतिपक्षांना सरास अचकटविचकट शिव्या देणाऱ्या सध्यांच्या कांहीं मवाळ पत्रांनाही हे अपशब्दांचे कोश उपयोगी पडतील! असो!

येथपावेतों फुकट नाटक पाहणारे बरेवाईट हकदार सांगितले. आपली यांची ओळख असली म्हणजे आपलें काम झालें. परंतु नाटकगृहांत प्रवेश करण्याचा हा फक्त एक मार्ग झाला. खरें म्हटलें तर कोणताही किल्ला स्वाधीन करुन घेण्याचे तीन मार्ग असतात. एक समोरासमोर लढून किल्ला घेण्याचा; दुसरा गनिमीकाव्यानें छापा घालण्याचा; आणि तिसरा फंदफितुर करण्याचा. नाटकगृहाचा किल्ला पाडाव करण्यालासुद्धां हे तिन्ही मार्ग मोकळे आहेत. इतका वेळ विवेचन केलें तें केवळ पहिल्या मार्गाचें! उघड उघड वशिला लावणें आणि छातीस छाती लावून लढणें हीं दोन्हीं सारख्या छातीचीं कामें आहेत. आतां गनिमीकाव्यानें कसें लढावयाचें तें पाहा.

गनिमीकाव्याची लढाई म्हटली म्हणजे फारच अकलेची, धीमेपणाची आणि गुप्तपणाची! तींत अखेरपर्यंत लढणाऱ्याच्या हेतूचा मागमूसही लागत नाहीं आणि छापा येतो तो असा अचानक, कीं शत्रूला बेसावधपणामुळें प्रतिकारच करितां येऊं नये! इतिहासांत गनिमीकाव्याची लढाई छत्रपति शिवाजी, नेपोलियन, मल्हारराव होळकर यांसारख्या कसलेल्या वीरांनाच साधली आहे. नाट्यकलेंत मात्र ही बरीच सुसाध्य आहे. प्रथम आपल्या एखाद्या मित्राच्या किंवा चुलत मित्राच्या बरोबर नाटकमंडळीच्या बिऱ्हाडीं जायचें; तेथें पहिल्याच भेटींत एक दोन प्रमुख व्यक्तींशीं मित्रत्वाचा संबंध जोडावयाचा आणि एखादें दुसरें काम अंगावर घ्यावयाचें व पुढें त्या कामाच्या पूर्ततेसाठीं येऊन दुसरें काम अंगावर घ्यावयाचें! अरबी भाषेंतील सुरस गोष्टींची, एका दिवशीं एकीचा

शेवट व दुसरीचा आरंभ अशा गुंतागुंतीच्या तत्त्वावर रचना केली आहे; तीच रचना या भेटींच्या हेतूमळें कितीतरी दिवस मोठ्या सावधगिरीनें ठेवावी लागते ! आठ दहा दिवस हा क्रम चालला असतां मध्यंतरीं होणारीं नाटकें पैसे खर्चून पाहावीं लागतात ! एखादे दिवशीं खेळ चालला असतां मध्येंच नेपथ्यांत जाऊन गप्पा मारीत बसावें. आपल्या ओळखीचा पारा कितपत वर चढला आहे हें पाहण्याचीं हीं सारीं साधनें आहेत! एखाद वेळीं नाटक चालू असतां नाटकाचा मुख्य मॅनेजर बसला असेल त्याच्याशीं कांहीं निराळ्याच विषयावर बोलत बसावें ! या गोष्टीमुळें आपल्याला नाटक पाहण्याचा फारसा हव्यास नाहीं असा नाटकवाल्यांचा ग्रह होतो. स्वार्थत्यागाचा हा छाप बसवीत असतांना मधून मधून स्तुतीचे 'डोस' देण्यास चुकूं नये ! खेळ चालला असतां लोकमताचे 'टेलेग्राफ' नटमंडळीस नेऊन पोंचवीत असावें ! अर्थात् या 'ताज्या तारा' कोणत्या धोरणाच्या असाव्या लागतात हें सांगणें नकोच ! याप्रमाणें सर्व तयारी झाली म्हणजे एके दिवशीं छाप्याला सुरुवात करावी ! छापा केवळ चांचणी करण्यापुरताच असतो. एखाद्या खेळाच्या दिवशीं तिकिट न काढतां नाटकगृहांत शिरण्याचें धाडस करावें ! नाटक बहुधा साडेनऊ वाजतां 'उभें राहतें' आणि नऊ वाजल्यापासून लोकांची गर्दी साधारणपणें जमूं लागते ! परंतु नाटकाचे व्यवस्थापक व नट आठ वाजतां नाटकगृहांत जातात. म्हणून आपला छापा सव्वाआठ साडेआठच्या सुमारास घालावा ! ही वेळ पसंत करण्याचें कारण इतकेंच कीं, अजून लोकांची गर्दी नसल्यामुळें व्यवस्थापक लोकांस आपल्याशीं बोलावयास वेळ असतो आणि त्याच कारणानें आपलें येणें त्यांच्या नजरेसही ठळकपणें येतें. छाप्याच्या मोहिमेचें स्वरूप घाईचें असावें ! एकंदर प्रकार पाहून कोणीतरी आपल्याला 'कारणबोधक' प्रश्न विचारतो आणि याच प्रश्नाचा स्वरूपावरून, आणि हेतूवरून आपल्या नाटकी कारकीर्दीचें पुढील धोरण ठरवायचें असतें ! या प्रश्नाचा एकंदर प्रकार समाधानकारक असला म्हणजे झालें ! किल्ला सर झाल्याची मुहूर्तमेढ खुशाल ठोकावी ! या प्रश्नाचें आजपर्यंतचें ठराविक आणि योग्य उत्तर नवशिक्या लोकांपुढें शब्दशः देतों. "आतां कांहीं नाटकाला आलों नाहीं. अजून जेवणसुद्धां झालें नाहीं. त्या आमच्या यांच्याकडे इतका वेळ बसलों होतों, आतां आंत त्या आपल्या त्यांच्याकडे जाऊन येतों. मग घरीं जाणार, जेवणार आणि इतक्यावर नाटकाला येणार ! बाकी आज यायला सांपडेल किंवा नाहीं याची शंकाच आहे." वर्तमान, भूत, भविष्य या तिन्ही काळचें आपलें धोरण

सांगणारें, उन्मदात्या प्रश्नाकडे लक्ष न देतां आपल्याच मार्गानें जाणारें, लांब-लचक, क्वचित् प्रसंगीं अप्रासंगिक परंतु अपरिहार्य असें हें आपलें उत्तर मात्र हंसत हंसत दिलें पाहिजे ! या उत्तरावर जर नाटकवाल्यांनीं मोकळ्या मनाची उत्साहवर्धक, आशाजनक आणि विनोदी टीका केली तर आपल्या मनाशीं विजयाची खूणगांठ बांधावी आणि तें लुटुपुटीचें काम करें तरी आटोपून घरीं चालतें व्हावें ! आणि वाटेल तर त्याच दिवशीं किंवा दुसऱ्या प्रयोगाच्या दिवशीं खुशाल तिकीट न काढतां नाटकगृहांत प्रवेश करावा आणि आपला जय झाल्याबद्दल द्यावा हरहर महादेवाचा घोशा उडवून ! यापुढें त्या मंडळीचीं नाटकें पाहण्याचा तहहयात हक्क आपल्याला मिळतो ! पुढें कर्तबगारीच्या जोरावर आपल्याला प्रत्यक्ष किल्लेदाराची – दरवाज्यावर पास देण्याची – जागासुद्धां मिळवितां येते. थोड्याबहुत फरकानें गनिमीकाव्याच्या लढाईचें हें कायमचें स्वरूप आहे. मी नाटकाच्या धंद्यांत शिरून फक्त साडेतीन वर्षे झालीं आहेत. परंतु इतक्या अल्प अवधींत आणि फक्त आमच्याच मंडळींत किती तरी लोकांना या रीतीनें कायमचे हक्कदार होतांना पाहिलें आहे ! नाटकी मित्रत्वाची वाढ मीं अगदीं लक्ष लावून पाहिली आहे. हिच्या यशस्वितेबद्दल माझी बालंबाल खात्री झालेली आहे, आणि म्हणूनच मी या रीतीची वाचकांना शिफारस करीत आहें !

आतां फंदफितुरीच्या मार्गाकडे वळूं ! फंदफितुरी ही नेहमीं एकट्या दुकट्या मनुष्याला एकीकडे गांठून त्याच्यामार्फत करावयाची असते ! इतिहासाकडे नजर फेंकल्यास त्यांतल्यात्यांत असें दिसून येईल कीं, फंदफितुरीच्या बाबतींत पुरुषांपेक्षां प्रेमळ स्त्री जातीचाच जास्त उपयोग होत आला आहे. नाटकी सृष्टीही या अनुभवाच्या विरुद्ध नाहीं. आतां अर्थात् या सृष्टींतल्या स्त्रीजातींत स्त्रीवेष घेणाऱ्या नटांचीच योजना केली पाहिजे. येवढी तरतूद लक्षांत ठेवून पुढें कार्याला सुरुवात करावी. फंदफितुरीसाठीं प्रथम कांहीं भांडवल खर्च करावें लागतें. हें भांडवल पुन्हां मिळण्याचा संभव नसतो. परंतु त्याच्यावर रेल्वे कंपनीच्या शेअरप्रमाणें व्याज मात्र दामदुपटीपेक्षां अधिक मिळवितां येतें ! फंदफितुरीला सुरुवात रस्त्यावर करावयाची असते. संध्याकाळीं नाटकवाले बहुधा फिरावयास जातात अशा वेळीं त्यांच्या बिऱ्हाडावर पाळत ठेवून एखादें भोळसरसें सावज एकटेंदुकटें दिसलें, कीं त्याच्यावर झडप घालावी. हा फसवणुकीचा विषय नाटकांत साधारण तरी महत्त्वाचा असावा; अगदीं पडदे ओढणारा गडी किंवा ' कोकिले 'चें काम करणारा छवडा असा

उपयोगी नाहीं. नवीन ओळख पाडण्याचे दोन प्रकार आहेत. एक, नवी ओळख या खऱ्या स्वरूपानें आणि दुसरा, जुन्या ओळखीच्या जीर्णोद्धाराच्या स्वरूपानें. दोन्ही मार्ग सारखे सुसाध्य असून सारखे फलप्रद आहेत. प्रथम नवीन ओळखीबद्दल विचार करूं. आपलें इष्ट सावज घरांतून बाहेर निघाल्याबरोबर आपणही रेंगाळत त्याच्यामागें चालूं लागावें! मध्यंतरीं तो कोणाशीं बोलावयास थांबला तर आपणही लघ्वीसारख्या निमित्तानें कालक्षेप करावा. परंतु जर का त्याच्याशीं बोलणारा इसम सुदैवानें आपल्याही ओळखीचा असला तर काम झालेंच! लागलीच 'द्वाभ्यां तृतीयः' होऊन पुढें बरोबर चालण्याइतकी ओळख करून घ्यावी आणि तो मध्यस्थ आपल्या मार्गानें जातांच त्याच्याबद्दल बोलणें सुरू करून ओळखीच्या मात्रेचे दोन वेढे जास्त द्यावेत! ओळख करून देणाऱ्या मनुष्याबद्दल 'याची तुमची कुठली ओळख?' हा प्रश्न विचारावा आणि त्याच्या उत्तराबरहुकूम पुढील कार्यक्रम ठरवावा. त्याच्या उत्तरानंतरच्या आपल्या धोरणाचे नमुने 'प्रिस्क्रिप्शन फार्म'च्या धर्तीवर पुढें दिलेले आहेत.

| नमुना | नटाचें उत्तर | आपलें धोरण | मिश्रणाचें प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | याची आमची फार ओळख मोठा छान मनुष्य आहे! | त्याची आपली सलगी दाखविणाऱ्या व्याख्यानाचा एक भरपूर डोस देणें. | तीन भाग त्याची स्तुति व एक भाग आपली स्तुति | दुसरे वेळीं गांठ पडल्यास बोलण्याइतकी ओळख झाली |
| २ | आहे झालें असाच एक हलकट | तेंच औषध चालू. सलगीऐवजीं मात्र माहिती. | दोन भाग त्याची निंदा व दोन भाग आपली स्तुति. | दाट ओळख निंदेच्या जोरावर झाली. |

मध्यस्थाच्या मदतीनें अशा प्रकारें ओळख झाली तर ठीकच झालें. परंतु असा कोणी उपयुक्त महात्मा नच भेटल्यास आपण स्वावलंबनाचा मार्ग सोडूं नये. नाटक मंडळीचें बिऱ्हाड दिसत असेपर्यंत त्या सावजाच्या मागें रेंगाळत चालावें. बरेंच लांब गेल्यामुळें किंवा आडवळणाच्या फायद्यामुळें तें बिऱ्हाड

दिसेनासें झालें, कीं आपली गति त्याच्याशीं समांतर ठेवावी. पुढें एकदांची त्याची आपली नजरानजर होतांक्षणींच पुढील प्रश्नांचा मारा करावा.

प्रश्न १– पुढला खेळ कोणता ?

प्रश्न २– तुमचें काय काम आहे त्यांत ?

प्रश्न ३– येथें किती दिवस मुक्काम आहे ?

प्रश्न ४– पुढला मुक्काम कोठें होणार ?

महाकवि कालिदासानें स्पष्ट म्हणून ठेविलें आहे कीं, ' संबंधमाभाषणपूर्वमाहुः ' या महातत्त्वाच्या आधारानें आपला आणि त्या नटाचा या चार प्रश्नोत्तरांनंतर स्नेहसंबंध झाला असें मानायला कांहीं हरकत नाहीं. उपर्युक्त श्लोक म्हणणाऱ्या दिलीपाचा नि सिंहाचा स्नेहही एवढ्याच आधारावर उभारलेला होता. असा स्नेह झाल्यानंतर नानाप्रकारचे विषय काढून स्नेहाचें दृढीकरण करणें हें केवळ आपल्या हातीं असतें. त्यांतल्यात्यांत चालू दिवसाची त्याची फिरावयाला जावयाची जागा फारशी उत्तम नसून तिच्यापेक्षां चांगली जागा आपणांस माहीत आहे हें सांगण्यास व दुसरे दिवशीं आपल्या सोबतीनें त्या बाजूला फिरावयास येण्याचें त्यास आमंत्रण देण्यास मात्र विसरूं नये. मध्यंतरी चहाकॉफीचें दुकान आढळतांच त्यांतल्या वस्तूंची लांच देण्यांत कसूर होतां कामा नये! लांच म्हणजे फंदफितुरीचा जीव आहे. हें स्नेहाचें दोरखंड नाटकवाल्या लोकांची व आपली ' टग ऑफ वॉर ' झाली तर तुटणार नाहीं अशी खात्री होईपर्यंत हा चहाकॉफीचा खुराक चालू ठेविलाच पाहिजे. याशिवाय दोन्ही बाजूंचें वजन जोखून मधून मधून बिडी, पानतंबाखूपासून तहत दारू, चरस, अफू, बचनाग यांसारख्या चैनीच्या पदार्थांचाही मारा करीत गेल्यास फायदेशीर आहे. इष्ट उंचीपर्यंत स्नेहाची परमावधि झाली म्हणजे या फितुरी पात्राच्या मध्यस्थीनें नाटकगृहाच्या किल्ल्याचा दिंडीदरवाजा मोकळा करून प्रवेश करून घेतां येतो. असो. जुन्या ओळखीचा जीर्णोद्धार करण्याच्या स्वरूपानें नवीन ओळख पाडण्याचा प्रकारही असाच सुकर आहे. एकदम हंसत हंसत बोलण्यास सुरुवात केली तरीसुद्धां शेंकडा नव्याण्णव पूर्णांक नव्याण्णवशतांश हिस्स्यानें यश येतेंच येतें! अतिशय परिचयामुळें नाटकवाल्याला आपल्या मित्रांची व ओळखीच्या प्राण्यांची खरोखरीच मोजदाद नसते! उलटपक्षीं नवीन स्नेह करण्याकडे त्याची प्रवृत्ति जास्त असते. या दोन्ही गोष्टींचा परिणाम आपल्या धाडशी प्रयत्नाला पथ्यकरच होतो. हा फंदफितुरीचा मार्ग इतक्या विस्तरतः वर्णीत बसण्याचें कारण इतकेंच कीं,

वरील दोन्ही मार्गांपेक्षां हा मार्ग श्रेयस्कर असून यांत हिंदुपणानें वागल्याचेंही श्रेय मिळतें. अनादिकालापासून फंदफितुरी आमच्या आर्यराष्ट्रांत प्रचलित आहे. ज्या फंदफितुरीच्या जोरावर श्रीरामचंद्रांनीं लंकेची राखरांगोळी केली; ज्या फंदफितुरीच्या जोरावर दिल्लीची दौलत शहाबुद्दीन घोरीनें मातींत मिसळून टाकिली; ज्या फंदफितुरीच्या जोरावर पेशवाईचें वाटोळें झालें; त्या फंदफितुरीच्या जोरावर – प्रियवाचक, असे कंटाळू नका. फंदफितुरी आम्हां हिंदु लोकांचा आत्मा आहे! बिभीषण, जयचंद, मीर–जाफर, उमीचंद, मुरारीराव, रायगडचा रायनाक महार यांसारख्या महात्म्यांचा ज्या अलौकिक गुणामुळें उत्कर्ष झाला त्याचें योग्य वर्णन करावयास नको का! फाटक्या पानांनींच भरलेल्या आमच्या इतिहासांत पदोपदीं काळ्या डागाखालीं ' फंदफितुरी ' हींच अक्षरें दिसून येतील! याच गुणानें आम्ही मातीला मिळालों; हाच गुण आमच्या हाडींमासीं खिळून राहिला आहे! आणि म्हणूनच या आर्यमार्गानें जाण्याची मी माझ्या प्रत्येक आर्यवाचकाला विनंति करीत आहें! नाटकी सृष्टींतसुद्धां या आर्यगुणानें मोटमोठालीं कार्यें घडून आलीं आहेत. म्हणून अशा मार्गानें एखादें पात्र आपल्या स्वाधीन करून ठेविलें म्हणजे झालें! आपल्या सुदैवानें जर का मुख्य स्त्रीपार्टीच आपल्या हातीं लागला तर मग विचारावयासच नको! कित्येक महात्म्यांनीं अशा प्रकारें चांगल्या चालल्या मंडळ्या नामशेष करण्याचासुद्धां प्रयत्न केल्याचें माझ्या ऐकिवांत आहे!

याशिवाय घोरपड लावून किल्ला सर करण्याचा एक बिकट मार्ग आहे. परंतु नाटकांत आणि इतिहासांत हा अगदीं क्वचित् दिसून येतो; नाटकाच्या किल्ल्यावर घोरपड लावणें म्हणजे घोरपडीप्रमाणें मॅनेजरच्या पायाला घट्ट मिठी मारून अर्थाअर्थी संबंध नसतांही नाटक फुकट पाहण्याची आळ घेणें! हा मार्ग अगदीं निर्वाणीचा आहे! आमच्या मंडळींत एकदां एक गृहस्थ येऊन दरवाजावर अशीच आळ घेऊन बसले. स्वारीचा पोषाख साधारण चांगला असून बोटांत एक आंगठीसुद्धां होती. या राजेश्रीचें प्रतिज्ञावाक्य पुढील शब्दांत दिलें आहे, " जवळ पैसा नाहीं; नाटक पाहण्याचा तर निश्चय केला आहे! बापानें घरांतून हांकून दिलें आहे; तुम्ही लाथेनें दूर लोटून द्या, पोलिसच्या ताब्यांत द्या; पण प्राण गेला तरी नाटक पाहिल्यावांचून राहणार नाहीं; तरी या अशा पावसांत रात्रभर अस्सा पडून राहीन. " विशेष शोधाअंतीं असें कळून आलें कीं, जिवावर उदार होऊनही निर्वाणीचे शब्द बोलणारा हा महात्मा रेल्वेवरील एक स्टेशनमास्तर आहे! भडाभड पैसे

खर्चून नाटक पाहणारे माझे उधळे वाचक या सडेतोड मार्गाकडे लक्ष देतील काय? "ब्राह्मणांचा स्वधर्म भिक्षा। ओम् भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे।" हें समर्थांचें वचनही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे! ब्राह्मणांबद्दल तक्रारच नाहीं; आणि वेदोक्ताचे अधिकार मागणाऱ्या क्षत्रियादिकांनीं इतर अधिकारांबरोबर याही अधिकाराची मागणी केली म्हणजे झालें!

यानंतर वेष पालटून तात्पुरता प्रवेश करण्याच्या मार्गांचा विचार करूं. नाटकवाल्याच्या मित्रत्वाचा वेष पुरेनासा झाला म्हणजे कोणी पोलिसचा वेष घेऊन येतो, कोणी रेल्वेचा हमाल होऊन येतो, कोणी थेटरवाल्याचा कामचलाऊ आप्त होतो, कोणी नाटकवाल्याच्या नातेवाइकाचा वेष घेतो आणि कोणी चहावाल्याच्या हाताखालचा असिस्टंट होतो! एवंच, नाटकगृहाच्या आंत नटांची सोंगासाठीं वेष बदलण्याची क्रिया आणि बाहेर या आशाळभूतांची या प्रकारें वेष पालटण्याची क्रिया सारख्याच जोरानें चालू असते. नातें लढविण्याचे आणि ओळखी पटविण्याचे मार्ग अनेक आहेत. कधीं कधीं हे नात्याचे अणुरेणु इतके बारीक असतात कीं, साध्या डोळ्यांनीं ते दिसतच नाहींत. आमच्या गणूच्या एका प्रेमळ नातेवाइकानें ही नात्याची तार इतकी लांबविली होती कीं, तिच्या वेढ्यांत आमचा गणूचसा काय; पण पृथ्वीवरील यच्चयावत् प्राणीही सांपडले असते! त्या गृहस्थाच्या चुलत्याची मेव्हणी आमच्या गणूच्या मामेभावाला देण्याचें ठरलें होतें; परंतु पत्रिका न जमल्यामुळें हें लग्न शेवटीं फिसकटलें हेंच त्या गृहस्थाच्या आणि गणूच्या नात्याचें स्वरूप होतें! कांहीं दिवसांमागें आमच्या मंडळींत एक माकड बाळगिलें होतें. एक दिवस एक गृहस्थ डार्विन्साहेबांचें 'ऑरिजिन ऑफ स्पेसीस' पुस्तक घेऊन दरवाज्यावर आले. त्या पुस्तकांतले आधार दाखवून त्यांनीं त्या माकडापासून आपली उत्पत्ति आहे हें सिद्ध करून दाखविलें! आणि त्या नात्याच्या जोरावर फुकट नाटक पाहण्याची परवानगी मागूं लागले! त्यांच्या कांहीं अंगविक्षेपांवरून त्यांच्या म्हणण्याला दुजोरा मिळाला आणि आमच्या मंडळींतील एका प्राण्याचे आप्त म्हणून आम्हीं त्यांना नाटकास फुकट सोडिलें! मात्र दुसऱ्या प्रयोगाच्या दिवशीं त्या माकडाचा वंशवृक्ष इतका फोफावला कीं, त्याच्या शाखांवरून उड्या मारण्यासाठीं त्या माकडास कायमचें सोडून देणें भाग पडलें! असो! या वेषांतराच्या भानगडींत विषयांतर होत चालल्यामुळें आपण या माकडाचा येथेंच निरोप घेऊं!

या माकडचेष्टांत वेषांतराचा एक महत्त्वाचा प्रकार चुकून तसाच राहात

होता! प्रत्येक नाटक मंडळी बहुधा दर मुकामास 'विद्यार्थ्यांसाठीं निम्मे दरानें' एक खेळ लावीत असते! त्या दिवशीं अगदीं गांवगुंडाला सुद्धां विद्यादेवीच्या भक्तीचा उमाळा येतो! चार चार विद्यार्थ्यांचे बापसुद्धां त्या दिवशीं टोपी घालून विद्यार्थी बनतात! आपल्या 'भुजंगनाथी' चेहऱ्याकडे शारदादेवी ढुंकूनही पाहणार नाहीं; आपल्या ओंटावरच्या केरसुण्या शाळेची झाडलोट करण्यासाठीं मात्र योग्य आहेत असल्या विरोधक गोष्टींबद्दल ते अगदीं बेदरकार असतात! डोक्यांत विद्या नसली तरी चालेल; पण डोक्यावर टोपी असली कीं झाला विद्यार्थी! अशा रीतीनें आधीं स्वतः टोपी घालून मग नाटकवाल्यांना टोपी घालवयास तयार होणारे विद्यार्थी बहुधा प्रत्येक गांवीं आढळतात! विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासारख्या फंदांत पडण्यापेक्षां सरकारनें सर्व नाटकवाल्यांना प्रत्येक खेळ 'विद्यार्थ्यांसाठीं निम्मे दरानें' लावण्याचा हुकूम केल्यास जास्त यश येण्याचा संभव आहे! असो. नेहमीं जोडा घालणारे रावबहादुर वगैरे लोक नामदारसाहेबांच्या धूळभेटीसाठीं बूट मिळविण्याच्या खटपटीस लागतात, तद्वत् या दिवशीं नाटकवाल्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं गांवगुंडांची टोप्या जमविण्याची खटपट चालू असते. (धूळभेट आणि धूळ टाकणें यांतील सादृश्य मुद्दाम जुळवून आणलेलें नाहीं.) तसेंच, या दृष्टान्तांत शरीराच्या दोन निरनिराळ्या टोंकांबद्दल जरी भिन्नत्व आहे तरी दोहोंतही क्रियानुकरण दिसून येतें हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सारांश, या दिवशीं गांवभर टोप्यांची देवघेव चाललेली असते! संध्याकाळीं नाटकगृहाभोंवतीं जिकडे तिकडे टोप्याच टोप्या दिसून येतात आणि हिंदुस्थानांत टोपीवाल्यांचें राज्य आहे ही गोष्ट वाजवीपेक्षां फाजील खरी वाटूं लागते! किंवा 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीचाही अक्षरशः प्रत्यय येतो! असो. या प्रकारांत नाटकवाल्यांकडून अप्रत्यक्ष रीत्या विद्यावृद्धि घडत असते. आतां फुकट नाटक पाहण्यासाठीं गांवगुंड जसे चांगल्या वर्गांत शिरूं पाहतात तसे चांगले लोकही वाईट वर्गांत शिरतील काय, या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं निवळ 'हलकट लोकांसाठीं निम्मे दरानें' एखादें नाटक लावण्याची मीं एकदां आमच्या मॅनेजरांस विनंति केली होती. परंतु आमच्या मॅनेजरांचें माझ्याबद्दल फारसें चांगलें मत नाहीं आणि अतएव मी आपल्या मित्रमंडळीसाठीं ही तजवीज करीत असेन अशा समजुतीनें त्यांनीं माझ्या विनंतीकडे दुर्लक्ष केलें!

ताज्या घोड्याभोंवतीं गोमाशा असतात, तशींच बारीक बारीक चिलटेंही असतात. ढेंकणांपेक्षां त्यांच्या अदृश्यकल्प पोरांचाच सुळसुळाट अधिक जाणवतो. हाच नियम मनुष्यांनाही लागू! जेथें कायद्यांत आलेल्या मनुष्यांची इतकी हमखास गर्दी तेथें बेकायदा पोरांची दंगल ही असावयाचीच! मुलांचे नाटकांत घुसण्याचे मार्ग अगदीं निराळ्या धर्तीचे असतात! आळींतल्या कोणातरी हक्कदार प्रेक्षकाचीं माणसें घेऊन येणें; नाटकवाल्यांच्या बिन्हाडाभोंवतीं रखडून शेवटीं हँडबिलें वांटण्याची कामगिरी मिळविणें; व्यवस्थापकाला दया येईपर्यंत केंविलवाण्या मुद्रेनें नाटकाच्या दरवाजासमोर उभें राहणें; निदान चहावाला, विडीवाला यांच्या दुकानांतले 'सेल्समन' म्हणून पानपट्टया विकावयास नाटकगृहांत शिरणें; हे सामान्य मार्ग आहेत; कधीं कधीं मुलांची मजल त्याच्याहीपुढें गेलेली आढळून येते! थोडेंसें नाटक पाहून घरीं जाणाऱ्या एखाद्या प्रेक्षकाचा 'पास' मिळवून 'एकाचा पास दुसऱ्यास चालणार नाहीं' या नाटकी पिनल कोडाच्या कलमाला चळविण्यासारखा, किंवा अंक सुटल्यानंतर प्रेक्षकांच्या आवकजावक गडबडीचा फायदा घेऊन गर्दींत अगदीं खालीं वांकून नाटकगृहांत घुसण्यासारखा नजरबंदीचा खेळही कांहीं चलाख मुलें मधून मधून करीत असतात. परंतु या सर्व मार्गांपेक्षां एक मार्ग फारच कल्पनेचा आणि यशस्कर आहे! आईबापांना न जुमानणारे कांहीं बालपुंडलीक नाटकांत राहावयाचें म्हणून नाटकमंडळींतच मुक्काम देतात! दिवसभर वाटेल तिकडे हिंडण्याची परवानगी नाटकवाल्यांकडून तेव्हांच मिळवितां येते! 'घरीं जाऊन येतों' म्हटलें कीं झालें! या स्वैर भटकण्यानें आपल्या नेहमींच्या कार्यक्रमांत फरक झालेला आपल्या ग्रामस्थांना कळत नाहीं! नाटकवालेही कांहीं तावडतोब 'सोंग' देत नाहींत! त्यांच्या मतें नवीन मुलगा कांहीं दिवस नाटकांत 'मुरावा' लागतो. परंतु हा 'मोरांबा' तयार होईपर्यंत बहुधा त्यांचा मुक्काम बदलण्याची वेळ येते; यामुळें सोंग घेण्याच्या त्रासांतूनही हा बालप्रेक्षक मोकळा असतो! याप्रमाणें नाटकवाल्यांचा मुक्काम असेंतों फुकट नाटक पाहण्याची, शिवाय त्यांच्याकडे जेवणाखाण्याचीहि सोय होऊन आपला कार्यभाग बाजवीपेक्षां जास्त सफल होतो! पुढें नाटक मंडळी मुक्काम बदलण्याच्या बेतांत आली म्हणजे आपणही आपला मुक्काम बदलून आपला घराचा रस्ता धरावा! या प्रकारांत आपले इष्ट हेतु तर परिपूर्ण होतातच; परंतु आपल्या ग्रामस्थ सोबत्यांच्या दृष्टीनें आपण किती तरी महत्पदाला चढलेले असतों! या महत्त्वमापनाचें साधारण शब्दचित्र

काढून पहूं या! खेळाच्या दिवशीं संध्याकाळीं नाटकांतील मुलें नाटकगृहाकडे चाललीं आहेत; आपणही त्यांत आहोंत, तीं आपसांत बोलत आहेत; त्यांचें आपल्याकडे लक्ष नाहीं; पण आपल्या ओळखीचे लोक जातां येतां आपल्याकडे पाहात आहेत; आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून नाटकवाल्यांच्या गोष्टीकडे आपलें लक्ष आहे असें दाखवीत आहों; आपले सारे उनाड सोबती आपल्यामागून येत आहेत; ते आपल्याशीं सलगी करूं पाहात आहेत; आपण नाटकी मुलांना चिकटून राहण्याचा प्रयत्न करीत आहों; त्या नाटकी मुलांनीं तबला, डग्गा, तंबोरा यांसारखी रोज घरून थिएटरांत न्यावयाची ब्याद आपल्या गळ्यांत अडकविली आहे; पण इसापनीतींतल्या चावऱ्या कुत्र्याप्रमाणें आपल्याला त्या धोंडेचाच अभिमान वाटत आहे; आपल्या भाग्यशाली कामगिरीकडे आपले जुने सोबती मत्सरानें पाहात आहेत; त्यांची ती दृष्टि ओळखल्यामुळें आपण मनांत आनंदमय होत आहों; आजपर्यंत आपल्या सोबत्यांसह कित्येक वेळां आपण या नाटकी मुलांकडे उत्सुकतेनें पाहात होतों; पण आज आपण अखेर त्यांच्यापैकीं एक झालों आहों आणि आपले सोबती पूर्वीप्रमाणें आपल्याकडे पाहात आहेत, यांसारख्या विचाराच्या भरांत आपण तुरतुर चालत आहों. आपल्या कमनशीब सोबत्यांची कींव येऊन आपण मधून मधून त्यांच्याकडे सदय तुच्छतेनें पाहात आहों आणि आपले सोबतीही आपला कमीपणा ओळखून निराशेच्या उत्सुकतेनें आपल्याकडे पाहात आहेत! अहाहा! कोण मनोहर स्थिति ही! माझ्या उनाड बालवाचकांनो! तुमच्यांत असा कोण फत्तर आहे कीं, जो या स्थितींत पडण्याची इच्छा करीत नाहीं? उद्यांच्या भावी गांवगुंडांनो, या तर आईबापांना झुकांडी आणि शिरा पाहूं भराभर नाटकांत!

याप्रमाणें नाटकगृहांत शिरण्याचे हे बेकायदेशीर मार्ग संक्षेपानें नमूद करण्याचा येथवर प्रयत्न केला आहे! आठ वाजल्यापासून नाटकाच्या दरवाजासमोर हे सर्व प्रकार एकसारखे चालू असतात. निरनिराळ्या पंथांचे लोक आपआपल्या उक्त मार्गानें नाटकगृहांत शिरण्यासाठीं धडपडत असतात. दरवाजावरचे यमदूत या होतकरू प्रेक्षकांना धक्के देतच असतात! कोणी पोलिसांच्या वहाणा घालून पोलीस होत असतात; त्यांचें कपट ओळखून व्यवस्थापक त्यांना वहाणांच्या भरतीस जोडेही देत असतात! घरून एका शिपायानिशीं बाहेर निघालेले विशिष्ट अधिकारी नाटकगृहाजवळ येईपर्यंत एका लहानशा टोळीचे नाईक होतात! कारण गांवचे कित्येक 'लेंडवोहोळ'

या ' वाहत्या गंगेचा ' फायदा घेण्यासाठीं तिच्यामागें लागतात. ही फलटण आंत शिरूं लागतांच तिकिटांचे धनीसुद्धां मागें सरकतात! कधीं कधीं पुढा-कार घेणाऱ्या अधिकाऱ्याला आपल्यामागें पसरलेल्या या शेंडेनक्षत्राच्या लांबीची कल्पनाहि नसते आणि म्हणूनच, बिळांत घुसणाऱ्या सापाचें निदान शेंपूट तरी तोडण्याचा लोक यत्न करितात त्याप्रमाणें नाटकगृहांत घुसणाऱ्या या सर्पांचेंही शेंपूट तोडण्याचा नाटकवाले प्रयत्न करीत असतात. इकडे ' धारकरी ' पंथाचे वीर असे तलवार चालवीत असतात, तर ' वारकरी ' पंथाचे भिक्षेकरी तिकडे तोंड वेंगाडीत असतात. एका घटकेच्या अवधींत नाटकाच्या दरवाजापुढील आकुंचित क्षेत्रांत जितकें खोटें बोलण्यांत येतें तितकें उभ्या वर्षांत अति पवित्र क्षेत्रांतले ब्राह्मणसुद्धां बोलत नसतील. कित्येकांच्या मुद्रा इतक्या केंविलवाण्या आणि सुक्या दिसतात कीं, तशा मुद्रा एखाद्या साहेबाच्या मरणाबद्दल भरलेल्या दुःखप्रदर्शक सभेस जमणाऱ्या मवाळांनासुद्धां साधावयाच्या नाहींत! चिकाटीच्या, दीर्घ प्रयत्नाच्या वगैरे बाबतींतसुद्धां नाटकी सृष्टि इतर सर्व सृष्टिभेदांपेक्षां अद्भुतरम्य आहे! बारा हात खंदक पैलपार होणारी लक्ष्मीबाई झांशीवाली इतिहासाच्या सृष्टींत क्वचितच दिसते; पण नाटकगृहाभोंवतालच्या गटारांवरून ताड ताड उड्या मारणारे किती तरी महात्मे नाटकी सृष्टीच्या वांटणीस आलेले आहेत! तिकडे वसईच्या किल्ल्यांत निदान माझें मस्तक तरी पडूं द्या असें म्हणणारा चिकाटीचा चिमाप्पा एखादाच सांपडला, तर इकडे निदान ' कोरसा ' च्या वेळच्या गडबडींत तरी माझा देह नाटकगृहांत जाऊन पडो असें म्हणणारे कैक चिमाप्पा पोलीसच्या तडाक्यांत सांपडत असतात! मुद्दाम अद्भुत म्हणून निर्मिलेल्या काव्यसृष्टींतसुद्धां प्रेमासाठीं भिंत ओलांडणारा रोमियो एकच आहे; पण इकडे, नाटकगृहाभोंवतालचीं पडकीं भिंताडें ओलांडून आवारांत शिरणारे रोमियो रोमागणित आढळतात! उलटपक्षीं, त्यांचे प्रतिपक्षी म्हणजे दरवाजावरचे लोकही कांहीं कमी नसतात! थर्मापिलीच्या घाटांत असंख्य पर्शियन लोकांना अडवून धरणारा स्पार्टन सेनानी लिऑनिडास, रोमच्या अगणित शत्रूंना टायबर नदीच्या पुलाच्या तोंडाशीं थोपवून धरणारा एकाकी रोमन वीर होरेशिअस्, पावनखिंडीच्या तोंडाशीं हजारों यवनांच्या तोंडांत माती घालणारा हिर्डसमावळचा लढवय्या बाजी देशपांडे यांनीं जो पराक्रम केला तोच पराक्रम शेंकडों बदमाषांना एकटा अडवून धरणारा नाटकाचा द्वाररक्षक दररोज करीत नाहीं असें कोण म्हणेल? रजपुतांचें साहस

इंग्रजांची चिकाटी, कोंकणस्थांचा कावा, मिशनऱ्यांचा मुर्दाडपणा वगैरे यच्चयावत् विशिष्ट गुणांचा या वेळीं नाटकगृहासमोर बाजार भरतो! आघात आणि प्रत्याघात यांनीं दाही दिशा दुमदुमून जातात. याप्रमाणें गडबडीचे एकदोन अंक संपल्यावर नाटकवाले नाटकगृहाचीं दारें लावून घेतात; परंतु तरीही प्रेक्षक हिंमत सोडीत नाहींत. बंदोबस्तानें लाविलेल्या मच्छरदाणीभोंवतीं जसे मार्गशोधक डांस घिरट्या घालीतच असतात तसे नाटकगृहाच्या मच्छरदाणीभोंवतीं हे लोचट डांस फिरतच असतात. यद्यपि ते डांस गाणें ऐकवितात आणि हे नाटकी डांस गाणें ऐकतात तरी कार्य-भिन्नत्वामुळें त्यांच्या त्रासदायकपणांत तिळमात्र अंतर नसतें. सरोवरांत एक खांबाचा सभामंडप करून बंदोबस्तानें राहणाऱ्या परीक्षिति राजाला ज्याप्रमाणें तक्षकानें अखेर बोरांतली अळी होऊन गाठलें, त्याप्रमाणें प्रेक्षकांपैकीं कांहीं दीर्घोद्योगी तक्षक हजारों वेळां झालेल्या अपमानाला न जुमानतां कांहीं अकल्पित मार्गानें नाटकगृहांत शिरून आपला डाव साधीत असतात. असो.

आतां वर सांगितलेल्या मार्गांचें अवलंबन कोणीं करावें याबद्दल कांहीं नियम आहेत काय याचा विचार करून नाटकगृहांत शिरणाऱ्या अधिकाऱ्यांच्या 'पुरवणी' प्रमाणें लांबलेल्या या लेखाचा समारोप करूं, नियम, निर्बंध या धर्तीचे शब्द ऐकतांच आपण आतां या हक्काला मुकतों कीं काय, अशा कल्पनेनें माझे कांहीं वाचक भीतिग्रस्त होतील; परंतु वाचकहो, तुमची भीति निराधार आहे! अशा प्रकारचा निर्बंध कांहींएक नाहीं! कोणत्याही मनुष्याला यांपैकीं पटेल तो व साधेल तो मार्ग स्वीकारतां येतो! राजापासून रंकापर्यंत धर्मासाठीं झटणाऱ्या 'श्री' च्या अनुचरांपासून धर्माला पायांखालीं तुडविणाऱ्या सुधारकांपर्यंत, दंगा करणाऱ्या गांवगुंडापासून दंगा मोडणाऱ्या पोलिसांपर्यंत, दांत पडलेल्या थेरड्यांपासून दांत न आलेल्या अर्भकांपर्यंत, वाटेल त्याला फुकट नाटक पाहण्याचा प्रयत्न करण्याची समाजानें मोकळीक ठेविली आहे. नाटकवाल्यांना हलकट म्हणणारा समाज आपल्या पोरांबाळांसुद्धां नाटकवाल्यांच्या दारीं हलकटपणा करण्याची पूर्ण मुभा देत आहे! नाटकाला फुकट जाण्यासाठीं नीतिविषयक फाजील कल्पनांना रजा देण्यास धर्माचीही आडकाठी नाहीं! निंदेच्या भरांत नाटकवाले आणि वेश्या यांच्यांत कल्पनासाहचर्य उत्पन्न करणारे धर्मात्मेसुद्धां नाटकवाल्यांनीं 'फुकट पास' देतांच यांचे स्तुतिपाठक होतात! माराभर धर्माचीं बाडें उपसणाऱ्या एका वेदोनारायणानें धर्मासाठीं अवतरलेल्या आपल्या चोपड्यांत नाटकवाल्यांची

स्नानसंध्या केल्याबद्दल पाठ थोपटल्याची हकीगत चाणाक्ष वाचक अजून विसरले नसतीलच! यांच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे एखाद्या वेश्येनें सायंकाळीं शिवदर्शन घेतलें तर तिचीं पापें विसरून तिच्या घरीं दक्षणेसाठीं जावयाला हे धर्माधार मागेंपुढें पाहणार नाहींत असें वाटतें! क्षुद्र तिरस्करणीय मानिलेल्या नाटकवाल्यांच्या द्वारीं रात्रीं थोडक्यासाठीं खोटें बोलणारे, तोंड वेंगाडणारे, स्वाभिमान सोडून धक्क्याबुक्क्या खाणारे, दोन आणे वांचविण्यासाठीं दोन आणे लांच देणारे, मॅनेजर नाहींत तितक्या वेळांत मला मुकाट्यानें सोड म्हणून आपल्या ओळखीच्या 'डोअरकीपर'ला सांगणारे, आपली सदसद्विवेकबुद्धि पायांखालीं तुडवून क्षुल्लक किंमतीच्या नाटकासाठीं दुसऱ्यालाही त्याच संकटांत पाडणारे सद्गृहस्थ दुसऱ्या दिवशीं उजळ माथ्यानें समाजांत नाटकवाल्यांची अवहेलना करितांना दिसले म्हणजे मात्र तिरस्कारानें असेच उद्गार तोंडांतून निघतात कीं, "हा समाजा, हीच का तुझी नीतिमत्ता, हाच का तुझा मनुष्यपणा! नाटकासारख्या क्षुल्लक बाबतींत जर आम्ही आमच्या मनोदेवतेला अशी पायांखालीं दडपून टाकितों तर महत्त्वाच्या गोष्टींत आमचा क्षुद्र स्वार्थ आम्हांला काय करावयाला लावणार नाहीं!" शिक्षणक्रम सोडून देऊन नाटकाच्या धंद्यांत पडल्यानंतर कांहीं दिवसांनीं माझी व पूर्वाश्रमांतील माझ्या एका विद्वान् मित्राची गांठ पडली. जवळ जवळ पदवीधर झालेल्या या माझ्या मित्रानें माझी अशी कानउघाडणी केली कीं, "हा हल्का मार्ग पत्करून तुम्हीं आपली योग्यता कमी करून घेतलीत... तुमच्या मित्रांना आतां तुमच्याशीं मित्रभाव ठेवण्यांत लाज वाटेल." अशा प्रकारच्या वाग्बाणांनीं माझें हृदय विदारण केल्यानंतर हा नीतिपाठ ओकणारा महात्मा शांत झाला; पण शांत होतांक्षणींच या नैतिक मेरूनें मला हंसत हंसत विचारिलें कीं, "आतां आम्हांला कोणतें नाटक दाखविणार?" काय म्हणावें या प्रकाराला! त्याच्या विसंगतपणाची अखेर मलाच लाज वाटली! पुढें माझे असे हितचिंतक बरेच आहेत असें मला आढळून आलें! त्यांनीं नाटकवाल्यांना निंद्य मानिलें तर त्याबद्दल कोणाचें कांहीं म्हणणें नाहीं. हा व्यक्तिविषयक प्रश्न आहे. पण लागलीच त्याच नाटकवाल्याजवळ मेहेरबानीची याचना करणें लाजिरवाणें नाहीं काय? एखाद्या शेजाऱ्यानें दारूचें दुकान काढल्याबद्दल आधीं त्याची खरडपट्टी काढून, नंतर त्याच दमांत त्याचेजवळ फुकट दारूचा घोट मागणें किंवा एखादी स्त्री वेश्या झाल्याबद्दल तिला बोध करून नंतर...पण जाऊं द्या, उगीच कोळसा उगाळून

आपल्या हाताला काळें कोण लावून घेतो.

वरील मार्गांत रुळलेल्या हकदारांना माझें आजचें लिहिणें आवडणार नाहीं; धंद्यांतलीं रहस्यें उघडकीस आल्यामुळें त्यांचा माझ्यावर रोष होईल हें मी जाणून आहें; परंतु त्याला माझा नाइलाज आहे. त्यांच्याप्रमाणेंच माझ्या वाचकांनाही या मार्गांचा लाभ व्हावा अशी माझी सदिच्छा आहे. परोपकारासाठीं लेखणी उचलणाऱ्या माझ्यासारख्या व्रतस्थांनीं लोकापवादा-कडे मुळींच लक्ष देतां कामा नये.

—'सवाई नाटकी'

दीडपानी नाटकमाला

# संगीत मूकनायक!

लेखक— **दीडशहाणा**

रूढीच्या शिळाछापांत छापिलें.
[ मनुस्मृतीच्या ॲक्टान्वयें या नाटकासंबंधीं सर्व हक्क हिंदुसमाजासाठीं कायमचे राखून ठेविले आहेत. ]

## प्रस्तावना

नाटक हें संसाराचें चित्र आहे.

—**नाटककर्ता**

### भरतवाक्य

**लेखक**— हे सर्वसाक्षिन् भगवान्! सर्वमान्य 'संगीत मूकनायक' नाटकाची कोणत्या तरी अर्थानें कुचेष्टा करण्यासाठींच हें नाटक लिहिलेलें आहे असा कोणाचा भलताच गैरसमज मात्र तुझा प्राण गेला तरी होऊं देऊं नकोस!

**आकाशवाणी**— आमेन! आमेन!! आमेन!!!

# संगीत मूकनायक

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ स्थळ : विक्रांताच्या घरांतील माजघर. पात्रें : ठमाबाई, उमाबाई, भीमाबाई, चिमाबाई वगैरे बायका व आवडी, बगडी वगैरे परकऱ्या पोरी, बाळंतपदर घेतलेली व पिवळीफिक्कट अशी विक्रान्ताची आई, मध्यंतरीं टांगलेला पाळणा*; पाळण्यांत बारा दिवसांचा विक्रांत. ]

**सर्व बायका :**

पद-[ चाल–हजारों वर्षें चालत आलेलीच. ]

गोविंद घ्या कुणी । गोपाळ घ्या कुणी ।
गोविंद घ्या कुणी । गोपाळ घ्या कुणी ॥

[ 'नाहीं मी बोलत नाथा' हा चरण जितके वेळां म्हणण्याचा साधारणपणें प्रघात आहे तितके वेळां हेंच एकसारखें, प्रेक्षकांस कंटाळा येईपर्यंत घोळून म्हणतात. ]

**ठमाबाई :** ( उमाबाईच्या कानाशीं कुजबुजतात. ) उमाबाई, बख्खळ पोरें बघितलीं, पण असलें चिन्ह नव्हतें बघितलें बाई कधीं ! चांगलें बारा दिवसांचें पोर– पण रडतसुद्धां नाहीं अजून ! आज बारसें ना ?

**उमाबाई :** ( तसेंच करून ) नसेल रडत मेलें. रडेल उद्यां चार दिवसांनीं !

---

*टीप : हें पात्राचें नांव नाहीं.

–नाटककर्ता

जीवासारखा जीव-काय रडल्यावांचून राहील ?

चिमाबाई : ( की ज्यांनीं हा संवाद आगंतुकपणानें ऐकिलेला आहे, त्याही तसेंच करून ) अहो, कुठलें रडतें आहे तें ? उमाबाईंना आपलें कांहींतरी संपादून घ्यायला हवें ! म्हणे रडेल ! रडायला जीव आहे कुठें त्या पोरांत ? अन् म्हणे रडेल ! बरें रडेल तें ? रडेल म्हणे रडेल !

भीमाबाई : ( विक्रांताचे आईस ) नांव काय ठेवायचें म्हणालांत ?

विक्रांताची आई : विक्रांत !

ठमाबाई : हें असलें कसलें बाई नांव ?

विक्रांताची आई : तिकडून सांगायचें झालें आहे ना !

[ तें नांव ठेवतात. पडदा पडतो.

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : सरकारी मराठी शाळा. पात्रें : हेडमास्तर, विक्रांताचा बाप; हातांत एक लहानशी कोरी पाटी घेऊन व डोक्याला पांढरी कानटोपी घालून उभा असलेला विक्रांत, उमर वर्षे ५. ]

विक्रांताचा बाप : आपल्या चरणावर घातला आहे, आतां जरा लक्ष—

हेडमास्तर : बिगारींत बसवा नेऊन त्याला !

विक्रांताचा बाप : बरें.

[ विक्रांतासह जातो. पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : विक्रांताच्या घरांतील माजघर, संध्येची सामग्री घेऊन बसलेला व सोवळ्याची लंगोटी नेसलेला विक्रांत – उमर वर्षे ७॥. ]

विक्रांत : (हातवारे करीत मनांतल्या मनांत संध्येतील शब्द पुटपुटतो.)

(कांहीं वेळ गेल्यावर)

विक्रांताची आई : (स्वयंपाकघरांतून) ) अरे विकू, पान वाढलें रे !

विक्रांत : (घाईघाईनें दोन आचमनें टाकून पळत जातो; वाटेंत चिरगुटावर पाय पडतो; तो घाबरून इकडे तिकडे पाहतो व तसाच स्वयंपाकघराकडे जातो.)

[ पडदा पडतो.

## प्रवेश चौथा

[ स्थळ : रस्ता. पात्रें : पाटीदप्तरें घेऊन शाळेंतून घरीं जात असलेला विक्रांत प्रतोद, वगैरे मुलें. ]

(विक्रांत–उमर वर्षे १२. विक्रांत अजागळासारखा चालत आहे. मध्येंच प्रतोदला त्याचा धक्का लागतो व प्रतोदची दौत पडते.)

प्रतोद : विकऱ्या, लेका दौत सांडलीस, नाहीं !

विक्रांत : (केंविलवाण्या नजरेनें प्रतोदाकडे पाहतो.)

प्रतोद : (कांहीं न छापण्याजोगे [ अप ] शब्द हांसडून) डोळे फुटले होते का ? (विक्रांताच्या दोनतीन थोतरींत ठेवून देतो.)

विक्रांत : (मोठ्यानें रडूं लागतो.)

प्रतोद : (होल्किासंमेलन कमिटीच्या सभासदांना न रुचणारे शब्द वापरून) रड लेका. आणखी एक तडाखा घेऊन ठेव तिसऱ्या प्रहरच्या फराळासाठीं अन् हवा तसा रड ! (थप्पड मारावयास जातो.)

विक्रांत : (सुं वाल्या ठोकतो.)

प्रतोद : हट् लेका भागूबाई ! [ पडदा पडतो.

प्रवेश पांचवा

[ स्थळ : विक्रांताच्या घराची ओटी. पात्रें : विक्रांत, विक्रांताची बहीण रोहिणी, तिचा नवरा शरच्चंद्र, शेजारची वेत्रिका, विक्रांताला दाखवायसाठीं आणलेली सरोजिनी, सरोजिनीच्या गळ्यांत तिच्या आईची गळसरी, कानांत प्रमदरेच्या मोठ्या बुगड्या, डोळ्यांत फारच काजळ. ]

वेत्रिका : अग सरे, अशी गुडघ्यांत काय मान घालतेस ? अंमळ वर बघ तरी ! तो बघ– समोर होता कोनाडा– त्याच्याकडे बघ.

रोहिणी : अरे विक्रू, तूं तरी असा इकडे तिकडे काय बघतोस ? सरीकडे पाहा एकदां ! आज ती तुला दाखवायला आणली आहे.

शरच्चंद्र : हं, विक्रांत, सांग लवकर, पसंत आहे ना ती तुला ही मुलगी ?

( एकदम माजघरांतून विक्रांताचा बाप येतो. )

विक्रांताचा बाप : अग रोहिणी, हा काय पोरखेळ मांडला आहे नसता ? लग्नाआधीं मुलानें मुलगी बघितल्याचें बघितलें आहे का अजून कुणी ? शरोबा, असलें भलतेंच केलें तर जनरीत सुटेल ना ?

शरच्चंद्र : नाहीं, म्हटलें आपलें अलीकडच्या रीतीप्रमाणें मुलानें मुलगी बघून पसंत केली म्हणजे जरा —

विक्रांताचा बाप : अहो, म्हणजे जरा काय ? लग्नाच्या गोष्टी पोरासोरीं का ठरवावयाच्या आहेत ? अहो, मी याचा बाप ना ?. प्रत्यक्ष मीं पसंत केली ना मुलगी– मग याचा बाप पसंत करील मुलगी ! अन् ए हणगोबा, तुला तरी असा जेठा मारून बसायला लाज नाहीं रे वाटली ? ऊठ.

[ सर्व जाऊं लागतात. आधीं विक्रांताचा चेहरा व मग पडदा पडतो. ]

[ स्थळ : लग्नमंडप. पात्रें : अशा वेळीं साधारणपणें लागण्याइतकीं. ]

भिक्षुक : तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव !......शुभलग्न सावधान !*

[ मंडळी अंदाजानें अक्षता उधळतात, भिक्षुक अंतरपाट काढून घेतात, शरच्चंद्र विक्रांताची मानगूट वांकवितो. प्रमद्वरा सरोजिनीला उचलते. सरोजिनी विक्रांताच्या डोक्यावर माळ टाकिते. ]

बरेचजण : ( आवेशानें व कोल्हेकुईनें ) अरे, वाजवा रे ! [ पडदा पडतो.

*अंक पहिला समाप्त*

---

* माझी पुरी खात्री आहे कीं, ऐन गडबडीमुळें या श्लोकाचे पुढील दोन चरण अजून कोणींही नीटसे ऐकलेले नाहींत. —नाटककर्ता.

## अंक दुसरा

### प्रवेश पहिला

[ स्थळ : सरकारी मराठी शाळा. पात्रें : दिपोटी, जरा बाजूस हेडमास्तर, त्यांच्या मागें उत्कंठित असा विक्रांताचा बाप. मुलांची परीक्षा चालली आहे, विक्रांत दिपोटीच्या पुढें उभा आहे. ]

**दिपोटी :** वांदिवाशची लढाई कधीं झाली ?

**विक्रांत :** ( बुचकळ्यांत पडतो. )

**दिपोटी :** काळीचा वसूल करण्याची अकबराची रीत काय होती ?

**विक्रांत :** ( काळा पडतो. )

**दिपोटी :** छट्टू कधीं मेला ?

**विक्रांत :** (त्याला मेल्यापरीस मेल्यासारखें होतें.)

**दिपोटी :** पेशवाई बुडविल्याचें खापर कोणाच्या माथीं फुटतें ?

**विक्रांत :** ( डोकें खाजवितो. )

**दिपोटी :** पिवळा समुद्र कुठें आहे ?

**विक्रांत :** (त्या समुद्रांत बुडाल्याप्रमाणें गुदमरतो.)

**दिपोटी :** पाणलोट कशाला म्हणतात ?

**विक्रांत :** ( डोळ्यांतून घळघळां पाण्याचे लोट वाहूं लागतात. )

**दिपोटी :** ( कांहीं लिहीत ) आपल्या जागेवर जाऊन बसा.

**विक्रांत :** ( मटकन् खालीं बसतो. )

**विक्रांताचा बाप :** ( हेडमास्तरांस एकीकडे ) काय झालें ?

**हेडमास्तर :** ( हळूंच ) नापास!

**विक्रांताचा बाप :** हत दळभद्र्या !

[ पडदा पडतो.

[ स्थळ : विक्रांताच्या घरांतील एक खोली. पात्रें : विक्रांत–उमर वर्षे १७. खोलीच्या बाहेर थोडी कुजबूज. थोडा वेळ गेल्यावर कोणीं बाहेरून खोलींत ढकललेली सरोजिनी प्रवेश करिते. ]

**सरोजिनी :** ( मुळुमुळू रडते. )

**विक्रांत :** ( गोंधळून जातो. )

[ पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

स्थळ : मामलेदार कचेरी. पात्रें : गादीवर ऐसपैस हातपाय पसरून पडलेले अजस्र रावसाहेब मामलेदार. हात जोडून उभा असलेला विक्रांताचा बाप; जवळच हातपाय गळून गेले आहेत ज्याचे, असा विक्रांत– उमर वर्षे २०. ]

**विक्रांताचा बाप :** परीक्षा वगैरे कांहीं नाहीं साहेब; पण—

**मामलेदार :** मग इथें काय कळी द्यायची आहे! जा, पोसवत नसला तर पांजरपोळांत नेऊन घाला!

**विक्रांताचा बाप :** रावसाहेबांनीं थोडी दया केली तर होण्यासारखें आहे! कुठें उमेदवारींत चिकटवून दिला—

**मामलेदार :** कशानें चिकटवून देऊं? गोंदानें का सरसानें? अरे, तुम्हां लोकांना नोकरी म्हणजे का परड्यांतील भाजीबिजी वाटते कीं काय?

**विक्रांताचा बाप :** रावसाहेबांची आम्हांस मोठी आशा आहे; बापूसाहेबांनीं हें पत्र दिलें आहे आपल्याजवळ द्यायला! ( एक पत्र देतो. )

**मामलेदार :** ( पत्र वाचतांच त्यांचा चेहरा निवळत जातो. )

**विक्रांताचा बाप :** ( आशेनें त्यांच्याकडे पाहातो; त्यांच्या चेहऱ्याशी याच्या चेहऱ्याचें जमत जमत जातें. )

**मामलेदार :** अरे, मग हें आधीं कां नाहीं दाखविलेंस पत्र? ठीक आहे. उद्यां-

पासून बारनिशीकडे लावतों याला.

विक्रांताचा बाप : (आनंदानें मामलेदाराचे पाय धरतो.)

[पडदा पडतो.

## प्रवेश चवथा

[स्थळ : विक्रांताचें घर. पात्रें : विक्रांत-उमर वर्षे ४०. कचेरींतील काम घरीं करण्यासाठीं आणलेलें पांहात बसला आहे. त्याच्या बायकोला वेळोवेळीं मिळालेला संततिविषयक आशीर्वाद संख्येच्या दृष्टीनें सफळ झालेला आहे. त्या आठ पोरांची मधून मधून आवकजावक.]

विक्रांत : (पुढें पडलेल्या कागदांकडे पाहात आहे.)

पोर नं. ३ : बाबा, मला भूगोलपत्रक आणायचें आहे!

पोर नं. २ : मला एक कचकड्याची फणी पाहिजे.

पोर नं. १ : माझीं धोतरें फाटलीं आहेत.

पोरें नं. १ ते ८ : (पालटून पालटून राष्ट्रीय सभेच्या एका वर्षाच्या ठरावांइतक्या मागण्या पुढें करितात.)

विक्रांत : (सरकारप्रमाणें तटस्थ असतो.)

सरोजिनी : (स्वराज्याच्या मागणीपेक्षांहि जरा जोराच्या निकडीनें) आज तांदूळ नाहींत, संध्याकाळला.

विक्रांत : (पार्लमेंटपेक्षांही शांतवृत्तीनें मूग गिळून बसतो.) [पडदा पडतो.

## प्रवेश पांचवा

[स्थळ : कचेरी. पात्रें : अजम रावसाहेब मामलेदार आणि विक्रांत.]

मामलेदार : इतकीं वर्षे काम करीत आहां तरी ही अशी चुक अजून होतेच

आहे तुमच्या हातून. काय म्हणावें तुम्हांला ?

**विक्रांत** : ( मुंडी खालीं घालतो. )

**मामलेदार** : अहो, ही चूक म्हणजे काय समजतां तुम्ही ? ह्रिचा परिणाम काय होतो माहीत आहे का ?

**विक्रांत** : ( भेदरतो. )

**मामलेदार** : फार, फार मोठी गंभीर चूक आहे ही !

**विक्रांत** : ( सर्द होतो. )

**मामलेदार** : केवढा दंड होतो अशा गाढवपणानें ठाऊक आहे ?

**विक्रांत** : ( सर्दी वाढते. )

**मामलेदार** : एक महिन्याचा पगार दंड होतो खाड्दिशीं !

**विक्रांत** : ( सर्दीची जोराची वाढ. )

**मामलेदार** : शिवाय, खटलासुद्धां करतां येतो अशानें.

**विक्रांत** : ( गोठूं लागतो. )

**मामलेदार** : अहो, आहांत कुठें ? वर्ष दीड वर्षाची ठेप व्हायची ना एकादे वेळीं ?

**विक्रांत** : ( आइस्क्रीम होतो. )

**मामलेदार** : आतां आम्हीच आहों म्हणून बरें आहे.

**विक्रांत** : ( बर्फाचें पुन्हां रक्तमांस होऊं लागतें. )

**मामलेदार** : जा, पुन्हां काळजीनें लिहून आणा तें सगळें !

**विक्रांत** : ( पहिल्यासारखा शाबूत. )

**मामलेदार** : ( कागदांचें बिंडोळें टाकतात, विक्रांत तें उचलूं लागतो. )

[ पडदा पडतो.

**अंक दुसरा समाप्त**

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : कचेरी. पात्रें : विक्रांत– उमर वर्षे ५०. इतर कारकून कामांत. ]

विक्रांत : ( पेन्शनींत येतो. )

( विक्रांत पेन्शनचा हुकूम घेऊन जातो. पडदा पडतो. )

## प्रवेश दुसरा

[ स्थळ विक्रांताचें घर. पात्रें : आजारी पडलेला विक्रांत– उमर वर्षे ५५. भोवतालीं आप्तइष्ट मंडळी, वैद्य. ]

आप्त : ( दुसऱ्यास हळूच ) आतां आशा दिसत नाहीं, कांहीं सांगावयाचें आहे का विचारावें आतां !

२ आप्त : विचारतों बरें मीच. ( उठूं लागतो. )

वैद्य : ( अगदीं हळू पण जरा दटावून ) अहो, आतां काय विचारतां ? वाचा बंद पडलीसुद्धां !

३ आप्त : ( ह्याच्या नाकाशीं धरलेलें सूत काढून अर्थपूर्ण नजरेनें इतरांकडे पाहतो, सुस्कारा टाकतो व जरा डावीकडे मान चढवून खूण करतो. बायकांत एकदम रडारड, पुरुष मंडळी त्या मुड्यापेक्षांही गंभीर. ) [ पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : मसणवटी. पात्रें : ताटी वर करून उचलून सरणावर घातलेला विक्रांत, इतर मंडळी सरण पेटवितात. ]

**मंडळी नं. १ :** चला झालें ! संपला त्यांचा आपला ऋणानुबंध !

**मंडळी नं. २ :** एक चांगला मनुष्य गेला ! कोणाच्या अध्यांत ना मध्यांत ! कधीं खटखट नाहीं कीं कधीं ठकठक नाहीं ! उभ्या जन्मांत याच्या हातून चारचौघांनीं नांवें ठेवण्यासारखें कांहीं झालें नाहीं तेवढ्या आठ मुलांखेरीज. ( चिता धडकते. तिच्या जाळानें पेटून पडदा जळतो. )

खेळ खलास !

## दीडपानी नाटक

[ स्थळ : घरासमोरील अंगण. वेळ— चांदण्या रात्रीचा पहिला प्रहर. पात्रें : भोकाड पसरून रडणारा आठ दहा महिन्यांचा बाबू. बाबूची समजूत घालीत असलेले त्याचे वडील— तर्कालंकारचूडामणी प्रोफेसर कोटिबुद्धे. ]

प्रो. कोटिबुद्धे : ( गंभीर वाणीनें ) बाबू, रडूं नकोस ! रडण्यानें स्वतः रडणाराला कांहींच फलप्राप्ति होत नसून, आसमंतात्भागीं वास्तव्य करणाराला-म्हणजे निकटतरवर्ती जनसमुदायाला मात्र कर्णकर्कश रुदनध्वनीपासून महत्तम त्रास होण्याचा संभव असतो. किंबहुना खात्री असते, असेंही म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं.

बाबू : ( जोरानें ) ह्या—आ—ह्या—आ—आँ—आँ—

प्रो. कोटिबुद्धे : ( विशेष गांभीर्यानें ) अरे रडूं नकोस ! बाबू, आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनेंसुद्धां, दीर्घक्रंदन प्रकृतीला अत्यंत अपायकारक आहे, हें भूमितीच्या प्रत्यक्ष प्रमाणासारखें स्वयंसिद्ध आहे ! आक्रोशामुळें अंतःस्नायूंच्या ज्ञानमज्जा विस्तृत होऊन त्यामुळें बाह्यस्नायूंचीं रेषावलयेंही अत्यंत वेगानें इतस्ततः आकर्षिलीं जातात ! श्वासनिरोधामुळें रुधिराभिसरणक्रिया जिला इंग्रजींत ( Blood circulation ) असें म्हणतात-मंदतम होत्साती, रुधिरलोह-पिंडाच्या स्वैरगतीला प्रतिबंध झाल्यामुळें अंतर्गत चलनवलन-व्यापाराची अप्रत्यक्षरीत्या नियंत्रणा होते. त्याचप्रमाणें तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंही रुदनाचीं व्यंगें दिसून येतात, श्रीमद्‌भगवद्गीतेंत प्रत्यक्ष भगवंतांनीं असें सांगितलेंच आहे कीं, "अतस्त्वं च महाबाहो नैनं शोचितुमर्हसि" ! पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांचा मुकुटमणि सुप्रसिद्ध हर्बर्ट स्पेन्सरसुद्धां कंठरवानें हेंच प्रतिपादन करीत आहे, कीं —

बाबू : ( दुसऱ्या सप्तकाचे सूर काढीत ) हां—हां-एं—एं-

प्रो. कोटिबुद्धे : ( चढत्या गांभीर्यानें ) रडूं नये, बाबू रडूं नये ! तो बघ

सिंहराशींतला जोडतारा! त्यांतल्या दोन ताऱ्यांच्या परस्परांभोंवतीं पूर्ण प्रदक्षिणा व्हावयास छत्तिसशें बेचाळीस वर्षें, सात महिने, तीन दिवस, चार प्रहर, छपन्न मिनिटें व अठरा पूर्णांक सात दशलक्षांश पळें लागतात. दशांशाचीं शेवटलीं पांच स्थळें आवर्त दशांशांत आहेत, असें सुप्रसिद्ध आर्यज्योतिषी भास्कराचार्यांचा दत्तकपुत्र वराहमिहिर यानें इसवी सनापूर्वी छत्तिसाव्या शतकांत केवलव्यतिरेकी अनुमितिप्रमाणानें सिद्ध केलें आहे. त्याप्रमाणें – रडूं नकोस, बाबू! – ते दोन तारे तेथून जरी अन्योन्यसंलग्न भासत असले, तरी तो स्थलपरिणामात्मक दृग्भ्रम असून तदंतर्गत वास्तविक अंतर अनेक कोटि योजनांचें आहे. त्याकडे पाहा आणि रडूं नकोस—

बाबू : ( बेगुमानपणें तिसऱ्या सप्तकाच्या शेवटच्या पट्टींत ) ह्यां–ह्यां–ह्यां–आँ–एँ–यों—

प्रो. कोटिबुद्धे : ( संगमरवरी पुतळ्याच्या गंभीरपणानें ) बाबू, तो चंद्रमा पाहा! सूर्यकिरणांच्या परावर्तनानें त्याला प्रकाशप्राप्ति होऊन पृथ्वीच्या कक्षेत सूर्यास्तानंतरहि पर्यायानें सूर्यप्रकाशाचा संचार होतो. या प्रकाश-प्रत्यक्षाला चंद्र हें निमित्तकारण आहे. याला वेदांतून 'सोम' या नांवानें संबोधिलें असून त्याचें वनस्पतींचा पति असेंहि नामकरण केलें आहे. त्यावरून वनस्पति-शास्त्राची एके काळीं आपल्या देशांत किती प्रगति झाली होती, याचें स्वयंप्रकाश प्रत्यंतर मिळतें! या दृष्टीनें चंद्राकडे पाहिलें म्हणजे जणुं काय तो आपल्या प्रकाशानें अज्ञानयुगावरचीं कालपटलें भेदून आमच्या पूर्वजांच्या अगाध ज्ञानावरच प्रकाश पाडीत आहे असें वाटतें!–पाहा, त्याच्याकडे विचारपूर्ण दृष्टीनें पाहा. असा रडूं नकोस—

बाबू : ( कोणत्याहि सप्तकाच्या आटोक्यापलीकडच्या सुरांत ) यां – ह्या–भें—

प्रो. कोटिबुद्धे : ( स्वगत ) Oh! nonsense! whatever shall I do now? ( काय त्रास आहे हा! आतां करावें तरी काय? )

[ दहाबारा वर्षांची मनुताई येते.

मनुताई : बाबा, द्या बाबूला इकडे! मी खेळवतें त्याला!

[ बाबूला कडेवर घेते.

मनुताई : ( कांहींतरी निरनिराळे सूर काढून ) बाबुड्यारे, छकुल्यारे, सोनुल्यारे? बाबूराया, तो बघ चांदोमामा! मा–म्मा!

बाबू : ( रडें आटपून पाहतो ) आ–आ! ( हात पसरतो. )

मनुताई : चांदोबा चांदोबा भागलास का।

निंबोणिच्या पानामागें लपलास का ।
निंबोणिचें पान करवंदी ।
मामाचा वाडा चिरेबंदी ॥

मनुताई : ( त्याला खालीं ठेवून बोटें पुढें करून ) चाल चाल बाळा! सोन्याचा वाळा! चाल चाल बाळा! सोन्याचा वाळा!

बाबू : ( आनंदानें हायपाय हालवीत ) आ ऽ आ ऽ ऽ ऽ!

[ बाबू उत्कट आनंदानें एक दोन पावलें टाकून हंसत हंसत मनुताईच्या गळ्यांत झेंप टाकितो. मनुताई त्याचे दोन चार मुके घेते. प्रोफेसरसाहेब टेबलाजवळ जाऊन नोटबुकांत लिहितात. ]

प्रो. कोटिबुद्धे : ( थोडक्यांतच जगाचा प्रलय होण्याची खात्रीची बातमी कळली असून, आपला कांहीं इलाज नाहीं, असा विचार करणाऱ्या मनुष्याप्रमाणें हताश व सखेद मुद्रेनें लिहितात. ) " आमच्या स्त्रीवर्गाच्या तोंडीं बसलेलीं अर्थशून्य, विसंगत व वेडींवाकडीं गाणीं ऐकिलीं म्हणजे मानस व्यग्र, झाल्यावांचून राहात नाहीं! गीता व उपनिषदें यांचे पाठ या केव्हां म्हणणार? वाङ्मयांतही हेंच ! गंभीर तत्त्वज्ञानाचीं, शास्त्रसाहित्याचीं पुस्तकें फार तयार न होतां दरवर्षी नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी यांनीं भरलेल्या पुस्तकांचाच वाढता भरणा होत आहे ! लोकांना उच्च ज्ञानाची प्राप्ति कशी होणार, हा प्रत्येक विद्वानापुढें मोठा प्रश्न आहे. "

भरतवाक्य

वाग्देवी : जिते रहो, पठ्ठे ! जिते रहो !

[ पडदा पडतो.

प्रस्तावना : सभांतून, व्याख्यानांतून, संमेलनांतून, वर्तमानपत्रांतून, वाङ्मयविषयक सिंहावलोकनांतून कित्येक पक्वपंडित हेंच म्हणतात व लिहितात कीं, " आमच्या वाङ्मयांत तत्त्वज्ञानविषयक, शास्त्रीय वगैरे गंभीर पुस्तकें थोडीं तयार होऊन 'नाटकें-कांदबऱ्यां 'चाच विशेष भरणा होत आहे! अज्ञानें लोकशिक्षण कसें होणार, हा प्रत्येक विद्वानापुढें मोठा प्रश्न आहे!" आणि या दीडशहाण्यांना काय म्हणावें, हा प्रत्येक सामान्य वाचकापुढें मोठा प्रश्नच आहे !

—नाटककर्ता

## सकाळचा अभ्यास

[ दामू कोशांतून शब्द काढीत आहे; एका बाजूला दिनू भूगोल घोकीत आहे; प्रत्येकाजवळ पुस्तकें व वह्या पडल्या आहेत आहेत; जवळच कपडे पडले आहेत. ]

दामू : ( डिक्शनरींत पाहतो ) एफ् ए बी एल् ई, एफ् ए—

दिनू : (मोठ्यानें) खानदेश जिल्ह्यांतील तालुके—( तीनदां घोकतो. ) धुळें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें. धुळें, अमळनेर, एरंडो ऽ ल–

दामू : एफ् एबी एल् ई फेबल म्हणजे कल्पित गोष्ट. [ लिहूं लागतो.

दिनू : धु-ळें, अमळनेर–

दामू : दिन्या, हळू घोकनारे ! माझा शब्द चुकला कीं इकडे ! हें बघ, फेबल म्हणजे कल्पित नेर झालें आहे. हळू घोक. ( शब्द पाहूं लागतो ) बी ई ए यू—

दिनू : धुळें, अमळनेर, एरंडोल–

दामू : लागलास का पुन्हा ओरडायला ? ( वेडावून ) धुळें, अमळनेर– मोठा आला आहे भूगोल करणारा ! हळू घोक.

दिनू : अन् तूं मोठा आला आहेस शब्द काढणारा ! नाहीं घोकीत हळू जा ! तुला वाटेल तर माजघरांत जाऊन बैस. धुळें–अमळनेर–

दामू : ऐकत नाहींस ? - नाहीं ?–देऊं का भडकावून एक श्रीमुखांत ?

दिनू : कां रे दादा त्रास देतोस ? ए आईग, हा दादा बघ मला उगीच मारतो आहे. धुळें— अमळनेर.

दामू : मारतो कारे ? नाहींग आई. हाच. मोठमोठ्यानें ओरडतो आहे सारखा अन् अभ्यास करूं देत नाहीं. आतां ओरड तर खरा, कीं सांगतों कसें काय आहे तें ! बी ई ए यू–

[ डिक्शनरी चाळूं लागतो.

दिनू : ओरडेन, ओरडेन ! तुला भिईन कीं काय ? धुळें, अमळनेर—
दामू : दम खा ! काढतोच तुझें ' धुळें-अमळनेर ! '

[ त्याला मारावयास धावून जातो; तो पळूं लागतो.

दिनू : आई, बघ ग हा दादा ! धुळें अमळनेर— [ घरांत पळून जातो.

दामू : पळून गेलास, नाहींतर दाखविला असता स्वारीला चांगला इंगा ! धुळें-अमळनेर करतो मोठा ! येऊं दे आतां बाहेर बच्चंजीला ! म्हणजे काढतों सारा खानदेश जिल्हा. ( जागेवर येऊन बसतांना पेन्सिलीवर पाय पडतो. ) अरे, अरे, अरे ! गडबडींत पेन्सिल मोडून दोन तुकडे झाले तिचे; पण हें बरें झालें ! एक तुकडा हरवला तर दुसरा आहेच ! अन् आज पाटीवर शुद्ध-लेखन काढावयाचें आहे कुठें ? हे एवढे शब्द काढले कीं झालें काम ! अबब ! केवढा लांबलचक शब्द हा ! ( डिक्शनरी उघडतो ) बी ई ए यू–

[ दिनू येतो.

दिनू : दादा, तुला आईनें--

दामू : आलास का पुन्हां त्रास द्यायला ! बी ई ए यू—

दिनू : तुला आईनं चहा घ्यायला बोलाविलं आहे, यायचं असेल तर ये नाहीं, तर नको येऊं.

[ दिनू जातो.

दामू : अरे चोरा ! नको येऊं काय ? म्हणजे एकट्यालाच चहा प्यायला ! मग काढीन मी शब्द !

[ दामू जातो. जगू दुसरीकडून येतो.

जगू : ( धापा टाकीत ) दादा-दादा, अरे ती बघ तिकडे— ( पाहून ) अरेच्या ! दादा कुठं गेला ? इथं तर दादाही नाहीं आणि दिनूही नाहीं ! हां– हेंच तें चित्रांचें पुस्तक ! ( रीडर उचलतो. ) कशीं छान चित्रं आहेत रंगीबेरंगी ! बरं सांपडलं आहे आयतंच ! शेजारच्या रघूला दाखवितों आत नेऊन ! असं लपवून न्यावं; नाहींतर दादा पाहील एखादा ! आलाच दिनू !

[ जगू दामूचें रीडर घेऊन जातो. दिनू येतो.

दिनू : धुळें, अमळनेर–पुढें काय बरं ? किती तालुके आहेत हे ?-धुळें, अमळनेर —पण पुढचा कोणता तालुका ?

[ भूगोलांत पाहतो. दामू येतो.

दामू : अरे ! माझं रीडर काय झालं इथलं ? आतां होतं कीं इथें ! दिन्या, रामोशा, एवढ्यासाठीं आधीं धांवत आलास काय ? तरीच, आण माझं

रीडर ! देतोस कीं नाहीं ?

दिनू : अरे वा ! मला रे काय ठाऊक तुझं रीडर नि फिडर ? मी आपला भूगोल पाठ करीत बसलों आहें. मी कशाला घेऊं रीडर ?

दामू : भूगोल पाठ करीत होतास नाहीं का ? कसा देत नाहींस रीडर तेंच पाहातों ! [ त्याच्याकडे धांवून जातो.

दिनू : ( मोठ्यानें ओरडून ) कां रे मारतोस दादा ? आई —

दामू : दिन्या, हात तरी लावला आहे का तुला ? नाहीं ग आई, दिन्या उगीच कांगावा करतो आहे. यानं माझं रीडर लपवून ठेवलं आहे, अन् आतां देत नाहीं.

दिनू : मी शप्पत घेईन ! पाहिलंसुद्धां नाहीं तुझं रीडर मीं ? तूंच कुठं तरी टाकून दिलं असशील आणि मला विचारतो आहेस !

दामू : कुठं तरी टाकून दिलं ! आतां इथं नव्हतं का ? तुझ्या देखत तर शब्द काढीत होतों.

दिनू : मी नव्हतों पाहात तुझ्याकडे. मी माझा भूगोल करीत होतों.

दामू : मग झालं काय बुवा रीडर ! आतां शब्द कसे काढायचे !

दिनू : अरे, त्या गादींतबिदींत असेल ! रात्रीं तूं पडल्या पडल्या वाचीत नव्हतास का ?

दामू : खरं रे खरं ! चल आपण या गाद्या उलगडून पाहूं.

दिनू : चल. धुळें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें.

दामू : तो शब्दसुद्धां मी विसरलों. हां, बी ई ए यू—

[ दोघेही बिछाने उलगडतात.

दामू : बी ई ए यू— बिछान्यांत तर नाहीं कुठें !

दिनू : मग गुंडाळून ठेवूं हे बिछाने ? धुळें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें.

[ बिछानें गर्दीनें गुंडाळून ठेवितात; त्यांतच दामूचे कपडे व टोपीही गुंडाळून ठेवितात. दोघेही आपापल्या जागीं बसतात. ]

दामू : बी ई ए यू-आतां शब्द कसे करावे बुवा ?

दिनू : ( हंसत ) भलं झालं; आतां एका माणसाला मार बसणार. धुळें, अमळनेर—

दामू : हंसतोस काय ? तूंच लपविलं आहेस पुस्तक ! आण पाहूं तुझी पिशवी ? मला तुझा झाडा घ्यायचा आहे !

दिनू : तर- तर ! आणीत नाहीं जा !

दामू : आणीत नाहींस ? बघूं या बरं गंमत ! आण पिशवी

(त्याच्या अंगावर धावून जातो, तोंच पाय पडून दिनूची पाटी फुटते.)

दिनू : फोडलीस का माझी पाटी ? आतां आईला सांगतों.

दामू : सांग, सांग जा ! मुद्दाम पाय दिला का पाटीवर ? तूंच मुद्दाम पाटी वाटेंत ठेवलीस ! मीच सांगतों आईला, कीं या दिन्यानं माझं रीडर लपविलं आहे ! आण इकडे ती पिशवी.

[ पिशवीची ओढाताण होते. बंद तुटतो.

दिनू : धुळें–अमळनेर. सोड पिशवी–सोड ना रे ! धुळें–

दामू : रीडर दे ! नाहीं सोडीत पिशवी !

दिनू : धुळें, अमळनेर–सोड, पिशवी सोड. (जोरानें पिशवी ओढतो, बंद तुटतो, दिनू पडतो.) तोडलास का बंद पिशवीचा ? आतां आईला सांगतों.

दामू : मीं तोडला का बंद ? मीं नुसती पिशवी धरून ठेविली होती. तूंच जोरानें ओढलीस अन् माझं नांव घेतोस का ?

दिनू : येऊं दे बाबांना आतां ! म्हणजे चामडीच लोळवायला सांगतों ! धुळें, अमळनेर — (दोघेही आपापल्या जागेवर बसतात.)

दामू : कोणता तो मोठा शब्द ? बी ई ए यू — पण आतां शब्द करायचे कसे ! रीडरच नाहीं मुळीं !

दिनू : ( वेडावीत ) टाइमटेबल गेलं रीडरमध्यें ! ठेवावं कशाला रीडरमध्यें ? मास्तर सांगतात रोज, कीं टाइमटेबल भिंतीला लावावं, तें उगीच का ? घ्या आतां. छडी लागे छम् छम्—

दामू : दिन्या, तुला रे कोणी चोमडेपणा सांगितला आहे हा ? जाऊं दे माझं टाइमटेबल गेलं तर !

दिनू : तुला बोलतों आहें का मी ! आम्ही आपले मनाशीं बोलतों.

दामू : असं आहे का ? दाखवूं का एकदां इंगा ?

दिनू : हो, हो दाखीव. धुळें, अमळनेर–आईला सांगेन–टाइमटेबल गेलं रीडरमध्यें—

दामू : शेजारच्या गणूला अभ्यास विचारून येतों. [ जाऊं लागतो.

दिनू : मी बाबांना सांगेन, कीं एक मनुष्य अभ्यास टाकून खेळायला गेला होता.

दामू : सांग जा— खेळायला जातों आहें का मी ? [ जातो.

दिनू : गेला कीं दादा बाहेर ! अरेरे ! माझं टाइमटेबल हरवलं असतं तर मी

गेलों नसतों असा ? धुळें—अमळनेर. [ शिटी वाजवीत जगू येतो
दिनू : जग्या, कुठली रे शिटी ही ? माझी वाटतें ?
जगू : हो, आली आहे तुझी ! शेजारच्या रघूला मीं चित्रें दाखविलीं त्यानं दिली मला ही शिटी. [ शिटी वाजवितो.
दिनू : जगू, आपल्याला दे बुवा ही शिटी. मी तुला चित्रांचें पुस्तक देईन. मग पाहूं बरं कोण देतो शिटी ? ( डोळे मिटतो व हात पसरतो. ) जगू देतो का दामू देतो ? जगू देतो का दामू देतो ?
जगू : जगू देतो. पण तूं पाहातोस डोळे उघडे ठेवून ! अगदीं डोळे मिटून घे !
दिनू : हं, हे घे अगदीं डोळे मिटून घेतले ! आतां कोण देतें पाहूं. जगू देतो का कोण देतें ? [ जगू जवळ येतो.
जगू : बघूं नकोस हं ! हं ही घे शिटी ! ( त्याच्या हातावर हात मारून पळून जाऊं लागतो. ) मिळाली शिटी ?
दिनू : अरे चोरा, फसवतोस काय ? आतां घेतोंच शिटी
[ जगू व दिनू पळून जातात. दामू येतो.
दामू : दुसऱ्या तासाला भूगोल आहे. इंग्लंडमधलीं शहरें करायचीं आहेत. काल झालीं त्याच्या पुढें ! पण काल किती झालीं हें कुणाला ठाऊक ? (भूगोल काढतो.) इंग्लंडमधील शहरें ! (दोनदां घोकतो.) काय आहे हें नांव ! हं, आक्सफर्ड आणि केंब्रिज—विद्यालयाकरितां प्रसिद्ध. आक्सफर्ड केंब्रिज. कें-ब्रि-ज—
[ दिनू येतो व आपल्या जागेवर बसवतो.
दिनू : बस म्हणावें आतां रडत ! आणलीच कीं नाहीं शिटी ! धुळें—अमळनेर
[ शिटी वाजवितो.
दामू : दिन्या, शिटी आहे काय रे ? बघूं या बरें कशी आहे ती ! आक्सफर्ड–
दिनू : आतां कशाला बघूं या बरें ? काल आम्हांला भवरा दाखवीत नव्हतास नाहीं का ? आतां घे शिटी !
[ शिटी वाजवितो व आपल्याजवळच ठेवतो.
दामू : नाहीं तर नको देऊं जा ! आम्ही दुसरी आणूं चांगली ! आक्सफर्ड आणि केमरीज— [ घरांत जातो.
दिनू : धुळें– अमळनेर– एरंडोल– पाचोरें– फार तालुके आहेत या जिल्ह्यांत ! (ऐकून) जग्या शिटीसाठीं अजून रडतोच आहे वाटतें ! ( शिटी वाजवितो. )
[शिटी वाजवून खालीं ठेवतो. तोंड पुशीत दामू येतो व आपले जागेवर बसतो.]

दिनू : दादा, काय खात होतास रे आतां ?

दामू : कुठें ? कांहीं नाहीं ! मी आईजवळ गेलों नाहीं, आईनें मला लाडू दिला नाहीं, मीं तो खाल्ला नाहीं ! कांहीं नाहीं ! आक्सफर्ड आणि केमरीज-विद्यालयाकरितां प्रसिद्ध- [ दिनूकडे पाहून हंसतो. ]

दिनू : हंसूं नकोस कांहीं ! मी पण घेतों आईजवळून लाडू. धुळें-अमळनेर-एरंडोल—

दामू : कसा फसविला चोराला ! आतां ती शिटी घ्यावी तेवढी.

[ जाऊन शिटी घेतो व जागेवर बसतो.

दामू : आक्सफर्ड आणि केमरीज-आक्सफर्ड आणि केमरीच-आक्सहर्ड आणि केमरीच ( दिनू येतो. ) मिळाला लाडू ? – घम्मक लाडू दिला असेल आईनें ! लाडू पाहिजे नाहीं का ? आक्सहर्ड आणि केमरीच —

[ दिनू जागेवर बसतो.

दिनू : नसुं दे लाडू नसला तर ! धुळें-अमळनेर-एरंडोल-अरे ! एथली शिटी काय झाली ? आतां इथ होती कीं ! [ दामू शिटी वाजवितो.

दामू : आक्सहर्ट आणि केमरिच—

दिनू : अरे चोरा ! शिटी चोरलीस काय ? चोर कुठला !

दामू : दिन्या, गाढवा ! मी तुझा दादा, अन् मला चोर म्हणतोस ? काल भरतभाव पाठ केलास, त्यांत हेंच शिकलास वाटतें ? भरत असा रामाला चोर म्हणत नव्हता !

दिनू : पण रामसुद्धां असा भरताच्या शिट्या चोरीत नव्हता ! मोठा आला आहे राम व्हायला ! आण माझी शिटी.

दामू : देत नाहीं जा ! मला चोर म्हणतोस नाहीं का ?

दिनू : कसा देत नाहींस पाहूं ? धुळें, अमळनेर-

[ त्याच्या अंगावर धांवून जातो; दोघांची मारामारी होते; जगू येतो. ]

दामू : ( दिनूला खालीं पाडून ) शिटी पाहिजे का ? देऊं का एक शिटी तोंडांत ?

दिनू : जग्या, ओढ त्याचा पाय ! ाच घेतों ही बघ !

[ शिटी घेऊन जगू जातो.

दामू : पाहिजे का शिटी ? बोल ! ्हणशील का चोर आतां ?

दिनू : आई, बघ ग हा दादा कसा बोकांडीं बसला आहे !

दामू : बोकांडीं बसलों आहें का रे ? तूंच मला मारायला आलास; शिटी

पाहिजे ! [ दोघेही आपापल्या जागेवर जाऊन बसतात.

दिनू : तुला तरी कुठें मिळाली ? तुला नाहीं मला नाहीं. घाल कुत्र्याला ! धुळें–अमळनेर–एरंडोल–पाचोरें–पाचोरें.

दामू : आस्कहर्ट आणि केपरीच–आस्कहर्ट आणि केपरी–आस्कहर्ट आणि केपरी, आस्क– ( कुत्र्याचें ओरडणें ऐकूं येतें. दामू घोकीत खिडकीजवळ जातो. ) आस्कर आणि खेपरी, आस्कर आणि खेपरी. दिन्या ही बघ कुत्र्यांची भांडाभांडी. आरकर आणि खेपरी. चास्कर आणि– आपला मोत्या पण आहे ! खेपरी, चास्कर आणि खेपरी-चास्कर, मोत्या छूः ! छूः मोत्या ! चास्कर आणि खेपरी. दिन्या, बघ तर खरा ! मोत्या छूः !

दिनू : कुठें रे ? कुठें पाहूं ? धुळें–अमळनेर ! ( धांवत खिडकीकडे जाऊं लागतो. वाटेंत पाय लागून दामूची दौत सांडते. ) दादा, दौत सांडली रे !

दामू : कशी सांडली ? केलास सारा घोंटाळा ! वर्डबुकावर सगळी शाई सांडलीस ! आज इन्स्पेक्शन् आहे तेथें काय दाखवूं आतां ?

दिनू : मीं काय केलं रे ? तूंच दौत उघडी टाकलीस ! वर्डबुक असं पसरून ठेवलंस ! मी नुसता येत होतों, तर पाय लागला फक्त माझा !

[ हातानें शाई भरूं लागतो.

दामू : आतां चाकू तरी दे ! म्हणजे वर्डबुकावरची शाई तरी खरडून टाकतों !

[ जगू येतो व शिटी वाजवितो.

जगू : दादा, दिनू, जेवायला चला लौकर. चल दिनू, दादा, ऊठ !

दामू : आलों रे बुवा ! सगळा घोंटाळा झाला !

[ तिघेहि घरांत जातात. पांडू गडी येतो.

पांडू : तीन मुलं आहे, पण तीन तऱ्हेचीं आहेत ! घर झाडतां झाडतां नकोसें होतें ! काय कागद ! काय चिंध्या ! काय बुकें ! नुसता उकिरडा करून ठेविला आहे ! दामूरावाचे कपडे या गादींत ! आणि शाळेंत जातांना कपडे कुठें आहेत म्हणून ओरडेल आतां ! असूं देत गादींतच कपडे ! हीं बुकें एवढीं पिशव्यांतून ठेवावीं म्हणजे झालें ! कोणाचीं बुकें कोणतीं हेंही समजत नाहीं ! सगळीं बुकें गोळा करून, अर्धीं एकाच्या पिशवींत आणि अर्धीं दुसऱ्याच्या पिशवींत ठेवावीं. मग घेतील आपलीं पाहून !

[ सर्व पुस्तकें दोघांच्या पिशव्यांतून भरतो व जातो. दामू व दिनू येतात.

दिनू : धुळें-अमळनेर–

दामू : अरे, आतां राहूं दे तुझं धुळें-अमळनेर ! कपडे घाल लौकर ! घंटेची

वेळ झाली. अरे ! माझीं पुस्तकं काय झालीं ? पिशवींत एवढींच सारीं ! दिन्या पाहूं दे तुझी पिशवी !

दिनू : मी नाहीं दाखवीत जा !

दामू : तुझी पिशवी मोठी रे कशानं झाली ? माझीं पुस्तकें घेतलींस वाटतं ! पाहू पिशवी !

दिनू : नाहीं दाखवीत ! आतां दुसरा बंद तोडायचा आहे वाटतं ! सारा घोंटाळा केला आहेस माझा ! पिशवीचा बंद तोडलास ! पाटी फोडलीस !

दामू : आणि तूं काय कमी केलं आहेस ? दौत सांडलीस ! वर्डबुक चिघडविलंस रीडर लपविलंस ! पुस्तकं चोरलींस ! अरे, पण माझे कपडे कुठं आहेत ? सकाळीं मी येथें ठेवले होते ! काय करावं, शाळेची तर वेळ झाली ! आणि कपडे नाहींत. दिनू मी शाई तयार करतों, दोघांनाहि होईल ! तूं आईला सांग, म्हणावे दादाचे कपडे सांपडत नाहींत पांडूनं केरांत नेलेन् वाटतं. तर आतां पेटींतून नवे कपडे काढून दे ! ( दिनू जातो. ) पांडू अगदीं आंधळा आहे ! केरांत कपडेसुद्धां दिसले नाहींत त्याला ! शाईची बाटली कुठं आहे बुवा ?

[ दिनू येतो.

दिनू : दादा, आई म्हणते, तिला काम आहे. आज तूं माझे कपडे घाल आणि मी जगूचे घालतों.

दामू : तुझे कपडे मला रे कसे होतील ? लांडे नाहींत का होणार ? जा, नीट सांग आईला. ( दिनू जातो. ) काय घर आहे पाहा ! शाईची बाटली-सुद्धां सांपडत नाहीं ! हं: ! ही पाहा सांपडली एकदांची. आतां दोघांच्या दौती भरून घ्याव्या.

[ दिनू येतो.

दिनू : दादा, आई म्हणते, नाहीं तर मर !

दामू : बरं तर मग ! दे तुझे कपडे मला आणि तूं जगूचे घे !

दिनू : हे घे. ( आपले कपडे त्याला देतो. ) जगू, अरे जग्या, मला तुझी टोपी आणि कोट दे पाहूं ! आण रे लवकर !

जगू : ( आंतून ) आणतों रे.

[ दामू कपडे घालतो.

दामू : हं दिन्या, ही बाटली घे. आतां मी दौत धरतों; तूं शाई ओत.

[ दिनू शाई ओततो. जगू हळूच कपडे घेऊन दिनूच्या मागें उभा राहतो. ]

दामू : हं अस्सं ! ओत आणखी ! आतां ही दुसरी दौत. ओत हिच्यांत !

जगू : ( एकदम ओरडून ) हे घे कपडे !

[ दिनू घाबरतो. हातांतून बाटली पडते. दामूच्या कपड्यांवर शाई पडते. ]

दिनू : केवढ्यानं ओरडलास रे जग्या ? भ्यालोंना मी !

दामू : अन् तूं माझ्या कपड्यांवर शाई सांडलीस ती ?

दिनू : तुझे नाहींत कांहीं कपडे ते ! माझे आहेत ! (कपडे घालतो.)

दामू : बरें, चला आतां लौकर ! नाहींतर उशीर होईल ! आज आणखी इन्स्पेक्शन आहे !

दिनू : इन्स्पेक्शन आहे, अन् तुझा पोषाख हा असा !

दामू : अरे पोषाख राहूं दे. इतका वेळ सारखा अभ्यास केला तरी अभ्यास-सुद्धां झाला नाहीं. चल, चल, लौकर. [ तिघेही जातात.

# दिवाळसणावर संक्रांत

मनुष्याचें मन सदासर्वदा उत्सवप्रिय असतें. यद्यपि, कैक नाटककादंबऱ्यांच्या प्रस्तावनांचा आरंभ या वाक्यानें झाला असला, पुराणाभिमानी लोकांनाही हें मत मान्य असलें, 'दक्षिणा प्राइज कमिटीनें' बक्षिसास पात्र ठरविलेल्या पुस्तकांतही जरी हें वाक्य एखादे वेळीं दिसून आलें, फार कशाला हें वचन शाळाखात्यानें सुद्धां मंजूर केलें असलें तरीसुद्धां तें सर्वांशीं खरें आहे. हवा, पाणी, अन्न, झोंप, खोटें बोलणें, बालविवाह, होमरूल, वगैरे बाबतींप्रमाणें या उत्सवप्रियतेचीही मनुष्यप्राण्याच्या जीवनाला महत्त्वाची आवश्यकता असते. मात्र परमेश्वरानें या उत्सवप्रियतेची कांहीं नैसर्गिक बाह्य योजना करून ठेवलेली नसल्यामुळें मनुष्यजातीला कृत्रिम साधनें निर्माण करावीं लागलीं आहेत. ज्या परमेश्वरानें माशाच्या पोराला उपजत पोहावयाला शिकवून मात्स्यान् पोहण्यासाठीं पाण्याचाही भरपूर पुरवठा करून ठेवला, पक्ष्याच्या पिलाला भराऱ्या मारावयास शिकवून त्या विद्येला अवसर मिळण्यासाठीं आडमाप आभाळाचें छतही खूप उंचावर टांगलें, माणसाच्या बच्चाला उपजतांच खोटें बोलावयास शिकवून, असत्याच्या स्वच्छंद संसाराला सोईस्कर अशी समाजरचनाही करून दिली, त्याच परमेश्वरानें मानवी मनांतही उत्सवप्रियता प्रस्थापित करून ठेवून, तिच्या समाधानासाठीं निसर्गसिद्ध साधनें निर्माण करून ठेवूं नयेत हें मोठें आश्चर्य आहे! ही गैरसोय दूर करण्यासाठीं मनुष्यानें काळाच्या एकरूप ओघाला निरनिराळीं वळणें देण्याचा आपल्या परीनें पुष्कळसा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. सण, श्राद्धें, पक्ष, जयंत्या वगैरे सर्व प्रतिसृष्टि यात्र प्रयत्नांचा परिणाम इ. इ. कार्यकारणभावाचा विशेषसा विचार न करतां मनुष्यानें तीनशेंसाठ दिवसांपैकीं, कांहींना कमी व कांहींना अधिक महत्त्व देऊन तुलनात्मक उत्सवसाधनें निर्माण केलेलीं आहेत आणि हजारों वर्षांच्या संस्कारांनीं या करामतीला निसर्गाचें स्वरूप प्राप्त झालेलें

आहे! दसऱ्याच्या दिवसाला पंचवीस, किंवा व्यतिपातयुक्त दिवसाला तेवीस तास नसतांही आम्हीं एक प्रयाणाला अति अनुकूल आणि दुसरा तितकाच प्रतिकूल समजतों! देवादिकांच्या जन्मदिवसाप्रीत्यर्थ आपण खडखडीत उपास करितों तर वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त खीर ओरपीत असतों (त्या दिवशीं वडिलांच्या मिळकतीचा कबजा आपल्याकडे आल्यामुळें झालेल्या आनंदाच्या भरांत तर कदाचित ही गोड योजना केलेली नसावी?) विक्रमसंवताच्या मरणदिवशीं, दिवाळीच्या पक्वान्नांनीं भरलेलीं पानें उठवून तोंड गोड करावयाचें आणि शालिवाहन शकाचा वाढदिवस साजरा करण्यासाठीं कडुलिंबाचीं पानें खाऊन तोंड कडू करून घ्यावयाचें! अमावास्या आणि प्रतिपदा हीं तर काळाचीं पाठोपाठचीं अपत्यें ना? मग एकीच्या सकाळीं आपल्या नांवावर एखादी व्ही. पी. आल्याचा त्रास व दुसरीच्या सकाळीं मनीऑर्डर आल्याइतका आनंद अगदीं निष्कारण वाटतो तो कां? आपल्या पितरांच्या उद्धारासाठीं ( खरें म्हटलें तर अवतारासाठीं, ) भरभाद्रपदांतला काळा पंधरवडा कां निवडावयाचा आणि दुसऱ्यांचीं पितरें उद्धरण्यासाठीं शिमग्यापुनवेचें चांदणें कां पसंत करावयाचें हें सांगावयाला स्वर्गांतले पितरच खालीं आले पाहिजेत. तात्पर्य हेंच कीं, एखाद्या दिवसाला, उत्सवहेतु व्हावयाला स्वाभाविक कारणाची मुळींच अपेक्षा नसते.

वरील सर्व उत्सवहेतुप्रकारांत सणांना बऱ्याच कारणांमुळें अग्रस्थान द्यावें लागेल; आणि त्यांतल्यात्यांत दिवाळीचा सण म्हणजे सर्वांत उच्च दर्जाचा! दिवाळी! दिवाळी! दिवाळी येण्यापूर्वीं महिना दीडमहिना आधींपासूनच समाजांत केवढी गडबड उडून जाते! 'दिवाळीकरतां मुद्दाम सवलतीचे दर!', 'दीपावलीप्रीत्यर्थ!' वगैरे मथळ्याच्या जाहिरातींतून दिवाळीसाठीं लागणाऱ्या सामानाच्या पाट्या झळकूं लागतात! 'सवा रुपयांत दिवाळी', 'साडे तीन आण्यांत दिवाळी', 'पैशापासरी दिवाळी' यासारख्या आरोळ्या कोणीं ऐकिल्या नाहींत असें! वर्तमानपत्रांतून सुवासिक तेलें, उटणीं, अर्गजे, मसाले यांच्या जाहिरातींचा इतका आनंदी घमघमाट सुटलेला असतो कीं, त्यामुळें आसपासच्या इसब, नायटे, चट्टे यांबद्दलच्या जाहिरातींतली किळसवाणी घाण तर मरतेच मरते पण आंतल्या मजकुराच्या घाणेरडेपणाबद्दल सुद्धां कांहीं वाटेनासें होत असतें. सवलतीच्या या सुळसुळाटांत दिवाळीशीं ज्यांचा कांहीं अर्थाअर्थी संबंध नाहीं अशा प्रकारचे पुस्तकें, लांकूडकाम यांसारखे पदार्थही दिवाळीनिमित्त सवलतीच्या दरानें विकावयास निघतात. रूळपट्टीचे नकाशे,

नारूवर वस्ताद, मिशांचा कल्प यांसारख्या चिजांना दिवाळीच्या हंगामांत वृत्त-पत्रांच्या रकान्यांतून आडदरानें भटकतांना पाहिल्याचें मला स्मरतें. दिवाळीच्या मोसमापुरते विम्याचे दरही कमी झाल्याचें ऐकिवांत आहे. आमच्या गांवच्या मसणवटींतल्या लक्कडवाल्यानें तर चुरशीच्या भरांत 'मरतिकाचें साम्यान' आणि गोवऱ्यासुद्धां दिवाळीच्या दिवसांत कमी दरानें देण्याचा पुकारा केला होता असें म्हणतात.

इतका जिच्या आनंदाचा नुसता पूर्वरंग, त्या दिवाळीचा ऐनरंग म्यां कोठवर वर्णावा? घरांत पक्वान्नांची रास आणि घराबाहेर दिव्यांची आरास! माहेरीं आलेल्या मुली, शाळांना सुट्टया झाल्यामुळें बेकार आनंदांत असलेलीं मुलें, कचेऱ्यांना रजा असल्यामुळें सुखावलेलीं वडील माणसें! सर्वांस कोणालाच ना काम ना धंदा! कालक्षेप हाच या दिवसांतला मुख्य व्यवसाय.

## धडा सहावा

वसंत ऋतूचे दिवस! हे दिवस चहूंकडेच वर्णनीय स्वरूपाचे असतात त्यांतून ( मी काल येथें येऊन पुन्हां उद्यांच पुण्यास जाणार असलों तत्रापि ) आमच्या या मुंबई शहरांत तर हे दिवस विशेष– गंमतीचे वाटतात. वृक्षसृष्टींत शेंकडा पंचविसांना नवी पालवी फुटत आहे. माझ्या समोरच्या बारा झाडांपैकीं पांच, खेड्यांत होणाऱ्या लग्नांतील वऱ्हाडी मंडळीप्रमाणें जुन्यापान्या पानांवरच गुजराण करीत असून चार झाडांजवळ झब्बू खेळतांना आधीं सुटलेल्या गड्याप्रमाणें शपथेला सुद्धां एखादें पान नाहीं; फक्त तीन झाडें मात्र कोंवळ्या पालवीमुळें ' नुक्तीच मिसूर फुटलेल्या ' तरुण घोडेस्वार कादंबरीनायकाप्रमाणें शोभतांना दिसल्यामुळेंच झाडपाल्यासंबंधीं वरील विधान केलेलें आहे. पुष्पसृष्टीची साक्ष पटविण्याला भावड्याच्या टोपीवरील वेलबुट्टींतील फुलांचा बराच आधार मिळण्यासारखा आहे. दोनप्रहरच्या उन्हाच्या रखरखीत सलगीमुळें गांवांतल्या होळ्या अजून साफ विझल्या नसाव्या असें मनाला वाटत आहे. छपरांच्या वळचणींतून विसांवणाऱ्या पारव्यांकडे पक्षीगणाचें प्रतिनिधित्व आलेलें आहे. शिवाय, कोकिळांचे शहरांत बसणारे दूधभाऊ मधून मधून मंजूळ कावकाव करीत आहेत. हिडिंबेच्या माहेरच्या नात्याची एक मोलकरीण समोरच्या नळावर मर्दानी पेशानें भांडीं घांशीत असली तरी मनोहर युवतिसमूहाचें प्रस्तुत प्रसंगीं एकच उपलब्ध उदाहरण या दृष्टीनें महत्त्वाची वाटत आहे. गिरण्यांतून व कारखान्यांतून खपणारे कामगार चालू लढाईंत खपणाऱ्या हिंदी सैनिकांचा हेवा करीत आहेत. ठिकठिकाणच्या उपाहारगृहांतून व विश्रामालयांतून समयोचित शीतपानांत गढलेल्या भाग्यशाली लोकांकडे बाहेरूनच आशाळभूत नजरेनें पाहणारे रिकामटेकडे बालचारुदत्त, दारांपुढें पडलेल्या बर्फाच्या भुशावर पायांच्या आंगठ्यांनीं आपल्या ललाटींच्या कंगाल रेघोट्यांचीं चित्रें काढीत आहेत. शेजारच्या मोटारींच्या आणि टिनच्या कारखान्यांतील कारागिरांची

करामत बंगाली वक्त्याच्या जहाल अवसानानें ठणाणून दुपारच्या झोंपेसाठीं तडफडणाऱ्या माझ्या मनाला इतकी सतावून सोडीत आहे, कीं त्या साऱ्या हल्यारांचे ठोके एकदम माझ्या टाळक्यावर आपटल्यानें सुद्धां मला असा त्रास होणार नाहीं. तशांतून, असा टोणप्याचा मार चुकवून पळभर झोंपेची झांपड डोळ्यांवर पडलीच तर मध्येंच ट्रामगाडीची कठोर घरघर, उचलजागत्या मनाला स्वतःला काळझोंपेची घरघर लागल्याचें भेसूर स्वप्न दाखवून जागें करावयाला तयार! आणि नंतर, जणुं काय या क्षणमात्र जागृतीचा फायदा घेण्यासाठीं टपून बसलेला समोरच्या हॉटेलांतील 'छोकरा' कर्कश आवाजांत 'दोन इसम तीन आणे, चार इसम सवादोन आणे' वगैरे ओरडून आपल्या पाहुण्यांची किंमत ठरवून मोकळा होत आहे व मला त्याच्याइतक्या कर्कश, पण शतपट भेसूर आवाजानें 'विविधा'च्या उदाहरणांतल्या रकमा ओरडणाऱ्या आमच्या तिसऱ्या इयत्तेवरच्या मास्तरांची बुद्रुक आठवण करून देत आहे. या आठवणीनें विचारांचीं विषयांतरें इतक्या अचाट वेगानें —वाचकहो! माफ करा! मनोरंजनाच्या संपादकांनीं मला 'वसंत' अंकासाठीं कांहीं तरी लिहिण्याची आज्ञा केल्यामुळें जुन्या नटीसूत्रधारवादांतील सूत्रार्थानुरूप 'सध्यां नुकत्याच लागलेल्या या ऋतूस अनुसरूनच' कांहीं लिहिण्याचा माझा संकल्प नाइलाजामुळें असा अर्धवटच सोडावा लागत आहे! येथपर्यंत कसें तरी ओढलें, पण आतां पुढें 'वसंतऋतू' संबंधीं काय लिहावें मुळींच सुचत नाहीं. वसंत-ऋतूचें वरील वर्णनही कविसांप्रदायाला थोडेंसें सोडून असण्याचा संभव आहे; कारण, तूर्त मी तिरस्थळीं असल्यामुळें माझा मराठी कादंबऱ्यांचा सर्व संग्रह घरीं राहिला आहे आणि म्हणून, वर्णनासाठीं केवळ प्रत्यक्षावलोकनावरच भिस्त ठेवावी—

## कवींचा कारखाना

वर सांगितल्याप्रमाणें कवितेंत शब्दांच्या सोंवळ्याओंवळ्यांकडे करड्या नजरेनें पाहणाऱ्या मंडळीवरून मला भांबूरावाच्या वडिलांची आठवण झाली. चिंतूकाकांचें सोंवळेंओंवळें इतकें कडक होतें कीं, पूजाअर्चा करितांना ते भलत्या शब्दांचा कधींहि उच्चार करीत नसत. मात्र रागीटपणामुळें त्यांचें तोंड फारच शिवरें असल्याकारणानें एखादे वेळीं ते विलक्षण अडचणींत सांपडत असत. तंटेबखेडे टाळण्याकरितां भांबूला त्यांनीं शेजारघरीं जाण्याची एकदां सक्त मनाई केली होती. दुसऱ्याच दिवशीं चिंतूकाकांच्या संध्येच्या वेळीं भांबूराव भोकाड पसरून शेजारच्या मुलाबद्दल कागाळी करूं लागला. त्याबरोबर चिंतूकाका खवळून ओरडले, "अरे पण इराणी घोड्या, तूं कां तिकडे गेलास श्रावणी करायला ?" शेणखाण्यासाठीं कर्मठ म्हाताऱ्यानें अशा रीतीनें तोंडसुख घेतल्याचें कुशल वाचकांच्या ध्यानांत येईलच.

जुन्या संप्रदायांतील ठळक ठळक मतांच्या दृष्टीनें विचार केला असतां अलीकडे गणपति पोंचवितांना म्हणण्यांत येणारें काव्य सर्व दृष्ट्या पसंतीस उतरण्यासारखें वाटल्यावरून तें येथें नमूद केल्यावांचून राहवत नाहीं.

* साधू संतनका मेला । बोला शिरी गजानन् बोला ॥

ज्या मुसलमानी कडव्यावरून हें भजनी काव्य जन्मास आलें आहे तें लोकविश्रुतच आहे. प्रास, यमक इत्यादि बाबतींत हें पद्य धुतल्या तांदळासारखें असून भक्तिरसाला त्यांत ओतप्रोत ऊत आलेला आहे ! शिवाय, विधर्मी हसन-

* पाठभेद :— साधूसंतांचा मेळा ! भाषादृष्ट्या हा पाठ विशेष शुद्ध वाटला तरी, गृहीत पाठांतील "मेला" हा शब्द कल्पनासाहचर्यामुळें चालू भजनाचेंच भावंड शोभण्याजोग्या प्रेतयात्राप्रसंगींच्या महामंत्राची आठवण करून भक्तिबरोबर स्मशान-वैराग्याचाही लाभ करून देत असल्यामुळें माझी योजना विशेष समर्पक आहे असें वाटतें.

—बाळकराम

हुसेनांच्या जागीं आपले साधुसंत बसलेले पाहून माझ्या धार्मिक बंधूंना अथणीच्या एका जुन्या मशिदींत कुठल्याशा —श्वराला, पाहिल्याप्रमाणेंच विजयानंद वाटण्याजोगा आहे. भजनाच्या गर्दीत झालेली 'श्री'ची ओढाताणही भक्तिमार्गाच्या भोळ्याभाबड्या भाविकपणाला साजेशीच आहे. आतां भक्तीच्या भरांत गजाननाचा पाय जरा जाया झालेला आहे खरा, पण हा मुद्दा अगदींच गौण आहे. भक्तांनीं एकदंत बनविला तरी ज्या दयाधनाला उलट प्रेमाचें अधिकच भरतें येतें. तोच एकचरण झाल्यामुळें अगदीं एकेरीवर येऊन त्यांना हत्तीच्या पायाखालीं तुडविण्याची शिक्षा फर्मावील हें खात्रीनें संभवनीय—
**अत्र क्रियापदं गुप्तं यो जानाति स पंडितः ।**

आमच्या आठवणीपासून आमच्या गांवांतील आद्यकवित्वाचा मान आबा-भटजींसच देण्यांत येत आहे. तिंबूनाना, चिंतूकाका, मोरबा वगैरे सर्व वडील मंडळींचें आबांच्या काव्यनैपुण्याबद्दल थोर एकमत होतें. सर्वांना सरसकट नांवें ठेवणारे विसूभाऊसुद्धां आबांना कवि समजत असत. शनिमहात्म्य, व्यंकटेशस्तोत्र वगैरे ग्रंथांतून फडाफड दाखले देण्याबद्दल आबांची साऱ्या गांवांत मोठी ख्याति असे. दासबोध एकदोनदां नजरेखालून घातल्याचें श्रेयही आबांनीं मिळवून ठेविलें होतें. इतकेंच नव्हे तर, एकदां वादाच्या भरांत 'करोमि यत्र सकलं परस्पर नारायणायेति समर्पयामि' या संस्कृत श्लोकार्धाचासुद्धां अर्थ लावून आबांनीं अजरामर कीर्ति संपादून ठेविली होती. आमच्या गांवच्या जागत्या बहिरोबासाठीं शेजारती ( मुद्दाम वहिवाट पाडून म्हणण्यासाठीं ) आबांनींच केलेली होती. मोठ्या मंडळींत आबांच्या काव्याची फारच तारीफ चालत असे. परंतु आम्हां मुलांच्या ( त्या वेळच्या ) मनावर मात्र आबांच्या या कवित्वाचा फारसा पगडा बसलेला नव्हता. आम्हांला सखाराम भगताच्या अंगांत देव खेळत असल्यामुळें त्याच्याविषयीं आदर, गमना पिताजीनें लखोबांच्या पगारा-वर टांच बसविल्याचें ऐकून त्यांच्याबद्दल सादर जिज्ञासा किंवा हिरनाकानें 'सहा महिने' भोगल्यामुळें त्याबद्दल सकौतुक विस्मय वाटत असे. तशापैकीं कांहीं एक प्रकार आबांच्या कवि असण्याबद्दल झाल्याचें मला स्मरत नाहीं. एकदां आम्ही बरेचजण या गोष्टीचें रहस्य जाणण्यासाठीं, आबांच्या कवितेविषयीं सांगोपांग चाललेली चर्चा तब्बल दोन घंटे ऐकत बसलों; परंतु शेवटीं, त्यापेक्षां शाळेंत बसलेलें एक वेळ पुरविलें असा अनुभवानें सर्वांचा अभिप्राय पडला नाहीं. म्हणावयास, मेळ्यांची हूल प्रथम आमच्या गांवीं आली, त्या वेळीं मात्र आबांची योग्यता थोडीशी आमच्या प्रत्ययास आली. 'श्रीगजानना' इत्यादि

सुप्रसिद्ध पद्य आपापल्या गांवालाही सोईस्कर करून घेण्यासाठीं शेवटच्या कडव्यांतील 'पुण्यग्रामीं' या शब्दाबद्दल योग्य तो फरक करून घेण्याची तेव्हांची वहिवाट, आमच्या गांवच्या लांबलचक नांवामुळें निरुपयोगी ठरून सर्वांचा विरस होण्याची वेळ आली; तेव्हां आबांनीं सदर ठिकाणीं 'आमच्या ग्रामीं उत्सव तुझा' असा बदल करून सर्वांकडून वाहवा मिळविली. आबांच्या कवित्वाचा लौकिक बरींच वर्षें असा अव्याहतपणें चालत आला होता.

याप्रमाणें आमच्या वाल्मीकीचा मान यद्यपि आबांच्या वांट्यास आला होता, तत्राप पुढें आमच्या गांवांत जें कवितेचें वेडें पीक निघालें त्याचें श्रेय मात्र भांबूराबालाच दिलें पाहिजे. पुण्यामुंबईस कांहीं दिवस घालवून परत येतेवेळीं भांबूराव नव्या कवितेचें बियाणें घेऊन आला. आरंभीं आरंभीं हें आमच्या गांवांत रुजलें नव्हतें. भांबूरावच्या या नव्या करामतीची बहुतेक ठिकाणीं उपेक्षा व कोठें कोठें तर हेटाळणी होत होती. परंतु एवढ्यानें भांबूराव निरुत्साह होण्यासारखा नव्हता. वाटेंत येईल त्या पदार्थावर हातीं आलेली कुऱ्हाड चालविणाऱ्या वाशिंग्टनप्रमाणें भांबूराव वस्तुमात्रावर आपल्या विद्येचा प्रभाव दाखवूं लागला. त्या अवधींत गांवांत असा कोणताही प्रकार घडला नाहीं कीं ज्यावर भांबूची कविता झाली नव्हती! मेलेल्याच्या आप्तांचें सांत्वन, उपजल्यांच्या सग्यासोयऱ्यांचें अभिनंदन, लग्नांतून वधूवरांस आहेर, वास्तुशांतीचें शुभाष्टक, आजाऱ्यांचें आरोग्यचिंतन, शुश्रूषुजनांना धीरोत्तेजन— सारांश गांवांतल्या बारीकसारीक घडामोडींचें चित्रगुप्ती टांचण भांबूरावांच्या कवितेंत होऊं लागलें. नदीचा पूर, वावटळ, टोळधाड यासारख्या सार्वत्रिक महाप्रसंगापासून तहत एखाद्यास ठेंच लागणें, आलेली शिंक अर्धवट बंद होणें, चहा पितांना चोध्यासारखी साय मिशीला चिटकणें, अशा हलक्या दर्जाच्या खाजगी भानगडीपर्यंत, झाडून सर्वांवरून कवितेची कृपादृष्टि फिरून आली! आम्हां तरुणांना भांबूरावाचें अर्थातच कौतुक वाटत असे. सुरवातीला, भांबूनें कविता करण्याची खोटी, आम्हां रसिकांना घोळका तिचा आस्वाद घ्यावयाला तयार! भांबूची सारी सुरावट नेहमीं तिसऱ्या सप्तकांत चालत असल्यामुळें त्याच्या कविता आम्हांला सहजच कमताकत वाटूं लागल्या. सौभाग्याला मुकलेल्या बालविधवेबद्दल किंवा बंद तुटलेल्या वाहणेबद्दल भांबूराव एकाच चढ्या सुरांत रडत असे. गांवहोळीच्या धडधडलेल्या कल्लोळाला आणि बाळंतिणीच्या बाजेखालील शेगडीच्या मंदाग्नीला एकाच प्रळयाग्नीची उपमा चालत असे. कविता केल्यानंतर तिचें वाचन व नंतर गुणवर्णन हीं लागोपाठ

उरकून घेण्याची भांबूरावची वहिवाट होती. प्रथम जुन्या मंडळीच्या हेटाळणीस हाणून पाडण्याकरितां आमच्या कंपूनेंही भांबूच्या कवितांचे गोडवे गाण्याचा जोराचा तडाका सुरू केला होता. परंतु पुढें पुढें भांबूच्या कवितेचें प्रमाण बेसुमार वाढत चालल्यामुळें मामला बराच बिघडत चालला. भांबूच्या कवितेच्या ओघाची वाचकांस थोडीशी कल्पना येण्यासाठीं त्याच्या एकाच दिवसाच्या ठळक कर्तबगारीचा तपशील नांवनिशीवार पुढें दिलेला आहे. कवितांचीं नांवें– प्रभात, संध्या, वैश्वदेव, आकाशांत उडणाऱ्या थिंगरास, निखळलेली पायरी, ईश्वरैक्य, लठ्ठालठ्ठी, जोडाजोडी, काष्ठकोळिकष्ट, चेंदामेंदा, भान्यधन्यक, विंचू-वंचना, मर्दोपमर्द, तर्कसर्कस, क्रैंचक्रौंच, पुनरैक्य अटलः, करुणाष्टक, खडाष्टक, फोडणी देतांना पाहून सुचलेला विचार, एका –स पाहून सुचलेला अविचार, मोटारखालीं सांपडून मरतांना, आणि देवा सोडीव या जाचांतून! रसाचा असा रतीब पचनीं पाडण्याइतकें सामर्थ्य आमच्या रसिक मंडळांत कोठून असणार? आस्ते आस्ते काव्यलोलुप मंडळी भांबूला भेटावयास कचरूं लागली. कोणताही समारंभ चालला असतां सर्वांचें लक्ष सारखें भांबूकडे लागून राही. आतां हा प्रसंगमजकुराबद्दल केलेली कविता म्हणावयास उठतो कीं काय अशी प्रत्येकाच्या मनांत धाकधूक होई. लग्नमंडपांत भटजींबरोबर आणि स्मशानांत कार्ट्यांबरोबर भांबूराव तितक्याच बेचूकपणानें हजर राहूं लागला. गांवकीच्या गोष्टी चोरून मारून उरकण्याचा प्रयत्न केला तरी भांबूराव कसातरी ऐन वेळीं येऊन धडकत असे. याप्रमाणें भांबूरावच्या कवितेनें उभ्या गांवाला सळो का पळोसें करून सोडिलें असतां, पुढील चमत्कारिक प्रसंग घडून आला. मोरबांचें कुटुंब प्रसूत होऊन त्यास उपजत मेलेलें मूल झालें! हा प्रकार पाहून मात्र भांबूराव कुंठीत झाला; मूल झाल्याबद्दल मोरबांचें अभिनंदन करावें कीं, तें मेल्याबद्दल सांत्वन करावें याचें त्याला मोठें कोडें पडलें! भांबूरावाच्या या विवंचनेची भूमिका बाहेर फुटतांच मोरबांच्या दाराशीं गर्दी जमूं लागली. आमच्या गांवांतील कोणत्याही कार्यासाठीं एवढा मोठा समाज एकोप्यानें जमलेला कधीं कोणाच्या ऐकिवांत नव्हता. त्या मेलेल्या मुलाच्या दर्शनासाठीं धक्काबुक्कीची दंगल होऊन अखेर प्रेतयात्रा एकदांची बाहेर पडली. सर्वांच्या तोंडावर एक प्रकारचा अपूर्व उत्साह दिसत होता. इतकें लहान मूल वस्तुतः परड्यांतच पुरण्याची वहिवाट मोडून सदरील प्रेत वाजत-गाजत थेट स्मशानांत नेण्याचें ठरविण्यांत आलें. समारंभाचा कार्यक्रम आणि तत्संबंधीं इतर गोष्ट नीटपणें ठरवून पार पाडण्यासाठीं प्रमुख नागरिकांची

एक कमिटी स्थापन करण्यांत आली. त्या दिवशीं साऱ्या गांवचें जेवणसुद्धां स्मशानांतच व्हावयाचें ठरलें. उत्तम पोशाख करुन सर्व लोक स्मशानाच्या रस्त्याला लागले. स्मशानांत दुकानें, चहाचीं हॉटेलें, पाळणे वगैरे प्रकारांची जत्रेला शोभण्यासारखी गर्दी जमली होती. एका बाजूस कोल्हाट्यांचे व गारुड्यांचे खेळ चालले होते; दुसरीकडे 'सजीव यमपुरी' चे देखावे दिसत होते. स्मशानाशीं या गोष्टीचा निकट संबंध लक्षांत घेतां, इतर प्रसंगीं प्रेक्षकांचें स्मशानवैराग्य दुणावल्यावांचून राहिलें नसतें; परंतु चालू समारंभांत त्या गोष्टीनेंही मनाला आनंदच वाटत होता. बायकापोरांच्या ठिकाणीं विलक्षण हुरूप दिसून येत होता. दिवसाढवळ्या ठिकठिकाणीं आरास करण्यांत आली होती. मात्र मुलांनीं दुहेरी रांगेत चालतांना प्रसंगोचित पद्यें म्हणण्याची सूचना एकानें कमिटीपुढें आणण्याचा अर्धा उल्लेख करितांच अध्यक्षांनीं त्याचा तिथल्यातिथें गळा दाबून प्राण घेतला. त्या मुलाच्या स्मारकासाठीं मोठा फंड निर्माण करण्याचें ठरून भराभर वर्गण्यांचे आंकडेहि पडूं लागले. त्या दिवशीं गांवांत भांबूरावाखेरीज कुत्रेंसुद्धां राहिलें नाहीं. बायका आपलीं तान्हीं मुलें प्रेताच्या पायावर घालीत होत्या. आजारी मनुष्यांना मुलाच्या नांवानें अंगारा लावण्यांत येत होता. असो. अशा प्रकारें सर्व एकदांचे स्मशानांत येऊन थडकले. कांहीं स्वयंसेवक खड्डा खणावयास लागले; आणि शेवटची मोठी सभा भरुन, चिंतूकाकांच्या अध्यक्षतेखालीं विसूनाना बोलावयास उठले!

"ग्रामबांधवहो, आज ज्या महोत्सवाकरितां आपण येथें जमलों आहों त्याची संपूर्ण माहिती आपणांपैकीं सर्वांस अर्थात् पोरेंबाळें मी वगळीत आहे-आहेच. आज बरेच दिवसांनीं आपल्या गांवांत हा पहिला प्रकार घडत आहे, कीं ज्याच्याबद्दल भांबूरावांची कविता नाहीं! (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट) मी पुन्हां म्हणतों कीं, आज भांबूरावच्या कवितेच्या जाचांतून गांवाला थोडी सोडवणूक मिळाली आहे! हा उत्कट लाभ आम्हांला मोरबांनीं मिळवून दिलेला आहे. त्याबद्दल आपली कृतज्ञताबुद्धि व्यक्त करण्यासाठीं तूर्त मी हा हार आपणां सर्वांच्या परवानगीनें आणि माझी खात्री आहे कीं, आपणां सर्वांच्या वतीनें, मोरबांच्या गळ्यांत घालतों. (टाळ्या. जयघोष. मोरबांच्या डोळ्यांतून या वेळीं आनंदाश्रूंच्या धारा वाहात होत्या.) मित्र हो, या अति आनंदाच्या, उत्कट हर्षाच्या या-को-कोण...तो..."

विसूनाना धाडकन् खालीं पडले. अध्यक्षांनीं डोळे पांढरे केले! दिशा धुंद झाल्या! दिवसां उल्कापात होऊं लागले! अशनिपात सुरू झाला! कोण कोण

तो? होय तोच— भांबूरावच तो! आणि त्याच्या हातांत तें पाहा कागदाचें चिटोरें! त्यांत दुसरें काय असणार? कविता! एरवीं तो असा धापा टाकीत कशाला धांवत सुटेल?

क्षणार्धांत चोहींकडे पळापळ सुरू झाली. ज्याला जिकडे रस्ता फुटेल तिकडे तो पळूं लागला! त्या मेलेल्या मुलानेंसुद्धां आपण होऊन आपल्या खड्ड्यांत दडी मारली! माझ्याखेरीज त्या जागेवर कोणीही उरलें नाहीं. जें स्थळ एका क्षणापूर्वी आनंदी जनसंमर्दानें गजबजून गेलें होतें तेंच आतां एखाद्या स्मशाना-सारखें— हो, पण तें स्मशानच होतें नाहीं का! असो.

लौकरच भांबूराव मजजवळ येऊन उभा राहिला. मोरबांच्या मुलाच्या जन्ममरणाच्या एकरूप प्रकाराप्रमाणेंच भांबूनें आपली कविताही अभिन्न स्वरू-पाची केलेली होती. कागदाला लहान लहान उभ्या मुरडी पाडून ती कविता लिहिलेली होती. सलग वाचतांच तिच्यांतून पुत्रप्राप्तीबद्दल अभिनंदनपर अर्थ निघून, कागदाच्या मुरडी ओढतांच कांहीं शब्द फुटल्यामुळें तीच कविता पुत्र-हानिविषयक सांत्वनपर व्हावी अशी भांबूची योजना होती. आर्या एकच होती आणि कागदाप्रमाणेंच अर्थाचीहि बरीच ओढाताण करावी लागत होती; तथापि, एकंदरींत भांबूच्या कल्पकतेचें कौतुक केल्यावांचून मला राहवलें नाहीं. वाचकांच्या अवलोकनासाठीं हें यंत्र जसेंच्या तसें देण्याचा प्रयत्न केला आहे.

> वंशतरुमूळ जळ तें बाळकरीं बहुत पाहिला भास।
> हा तें सुख कां यन घे बघुनी स्वगृहा गतासु तनयास ॥ १ ॥
> आंबेमोहर काय भाव? — असडी सत्ताविसानें दिला।
> बोला; एकच गोष्ट हा मण दिला, आत्ताच गोमाजिला ॥
> जातों. माल जरा पहा तर खरें; भावांत सव्वीस घ्या।
> साडे पंचविस घ्या. हं घ्या. कितिकसा? पल्ला. चला माप घ्या ॥ १ ॥

उपरोक्त काव्य बाह्यतः जरी शार्दूलविक्रीडिताचा एक श्लोक आहे असें दिसतें तरी तें एका व्यावहारिक संभाषणांत पूर्णपणें बसूं शकतें असें आम्हांस आढळून आल्यावरून "धान्यधन्यक" या नांवाच्या कवितेप्रमाणेंच भांबू-रावाची ही एक मासलेवाईक कर्तबगारी असावी आणि कवींच्या कारखान्यांत या कवितेचा कोठेंतरी उपयोग करण्याचा कै. गडकऱ्यांचा उद्देश असावा असें आम्हांस वाटल्यामुळें प्रस्तुत श्लोक वर दिला आहे. तो पूर्णपणें एका गद्य संवादांत खालीलप्रमाणें बसूं शकतो हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

**भांबूराव** – आंबेमोहोर काय भाव ?

**दाणेवाला** – असडी सत्ताविसानें दिला

**भांबूराव** – बोला; एकच गोष्ट.

**दाणेवाला** – हा मण दिला, आत्ताच दिला गोमाजिला.

**भांबूराव** – जातों.

**दाणेवाला** – माल जरा पाहा तर खरें; भावांत सव्वीस घ्या.

**भांबूराव** – साडे पंच्विस द्या.

**दाणेवाला** – हं घ्या. कितिकसा ? ( हवा )

**भांबूराव** – पल्ला.

**दाणेवाला** – चला, माप घ्या.

# कवींचा कारखाना

कवितेच्या एकंदर बाबतींचा बाजार असा अव्यवस्थ आणि बेकार असल्यामुळें कित्येकांच्या तत्संबंधीं कल्पना अगदीं भरमसाट भटकत असल्यास त्यांत आश्चर्य कोणतें ? कांहीं कांहीं लोकांच्या कल्पना तर कल्पनेबाहेर एकेका बाजूकडे झुकलेल्या असतात. कोणाकोणाच्या मतें जुन्या काळाच्या अलंकारांनीं कवितादेवीला नटवून टाकिली कीं कवींचें काम आटोपलें; मग त्यास त्यास अलंकारांच्या सोईसाठीं आधींच त्या बिचारीचे कान तांबूल धुण्याच्या दुरडी-सारखे आणि नाक सोनाराच्या तर ओढण्याच्या जंतरपट्टीसारखें झालेलें असलें तर बेहेत्तर ! कोणी नुसत्या गणमात्रांचा ताळेबंद जमला कीं खूष असतात. या कद्रू लोकांच्या हिशेबी आंकडेमोडीस कवितेंत मुख्य मान मिळतो. उलटपक्षीं, कांहीं या बाबतींत इतक्या सढळ हाताचे असतात कीं गणमात्रा म्हणजे त्यांच्या खिसगणतींतच नसतात. कवीच्या निरंकुशत्वाच्या जोरावर हे मात्रांची मुळीं मात्राच चालूं देत नाहींत. एखाद्या अडचणीच्या प्रसंगीं, मात्रांचा अतिशय सुकाळ झाला, तर त्यांतील कांहींना कंसांत कोंडून ठेवण्याला किंवा अजिबात एकीकडे बाळीत टाकण्यालाही हे कवि मागेंपुढें पाहात नाहींत. आमच्या गांवच्या हणम्यानें एका ईशभक्तिपर कवितेंत मित्रप्रेमाखातर धोंडभटाच्या कृष्णाच्या नांवाचीं आद्याक्षरें साधण्याच्या प्रयत्नांत पुढील श्लोक तयार केला.

कृपाछत्र तुझें करी वृष्टि देवा ।
( ठ )ष्णताप थीजेच करुनाहि तेव्हां ॥
राजीव–अक्षा तुझे पाय ( दाख )वयाला ।
( f )वलंब कां लावतोशी दयाळा ॥ १ ॥

दुसऱ्या चरणाच्या माथीं बळेंच ' ठ ' मारून कवीनें ष्णकारादि शब्दांची गरज भागविली आहे. श्लोकाचा तिसरा चरण नीट करण्यासाठीं कवीला देवाचा पाय मोडावा लागला आहे. या चरणानें दोन अक्षरांचा फाजीलपणा

पोटांत घातलेला आहे. प्रारंभींच्या समासाच्याहि पोटावर पाय आलाच आहे. पहिल्या चरणांतील छत्राचा वृष्टीशीं संबंधही कवीचें लौकिकज्ञान दाखवीत आहे. इतक्या कष्टाच्या या चतुष्पाद कृतीनंतरही देवानें दर्शनाला विलंब लावावा हें मोठेंच आश्चर्य आहे; कदाचित् तिसऱ्या चरणांतील दुखापतीचाच हा परिणाम असावा! असो. कांहींजणांना फक्त यमक जमल्यानें काव्यसिद्धी झाल्यासारखी वाटते. कवितेनें उठल्यासुटल्या घारीगिधाडांप्रमाणें– चुकलों!–गरुडाप्रमाणें आकाशांत भराऱ्या मारण्यापेक्षां चिमणीप्रमाणें जोडीजोडीनें पावलें टाकण्यालाच शिकावें, असा यांचा आग्रह असतो. एखादी उत्कृष्ट कवितासुद्धां निर्यमक असली कीं बिनसलें! तिच्यापेक्षां 'काळा विंचू कवडे पाय, उत्तर विंचू पातालकू जाय' अशा मंत्रांतच यांना कवितेची खरी जादू दिसून आल्यास नवल नाहीं. कांहींना कवितेचे पंचप्राण प्रत्येकीं प्रासाच्या एकएक अक्षरांतच घुटमळत असल्यासारखे वाटत असतें. या दृष्टीनें पाहतां तारायंत्रांतील 'कडकट्ट, कडकट्ट' हें जगांतील अत्यंत सरस काव्य ठरतें. अशा सवलतीच्या दृष्टीनें कवितेकडे पाहणारांसाठीं अगदीं शेवटपर्यंत जावयाचें असल्यास, ओळीच्या शेवटीं अशा ॥ उभ्या रेघा असल्या म्हणजे कविता झाली असें समजणारांनाही वगळून चालावयाचें नाहीं. अर्थात् अशा अर्धवटांना मात्र त्यांच्या इष्ट लाभाचा रस्ता दाखविणें हें कोणाचेंही कामच आहे. या लोकांनीं 'नवनीता'सारखीं पुस्तकें सोडून अंकलिपींतील पावकी–निमकी किंवा अंकगणितांतील रेघांचे अपूर्णांक पाहात बसण्यांतच त्यांचें विशेष हित होईल! वाक्यरचनेच्या साध्या नियमांची मोडतोड केल्यानें कविता होते, असें मानणारांची संख्याही कमी नाहीं! इकडचा शब्द तिकडे, तिकडचा पलीकडे, पलीकडचा अलीकडे आणि अलीकडचा भलतीकडे! या पलीकडे कांहीं नाहीं! कवितादेवी, कवितासुंदरी म्हणजे केवळ अष्टावक्रा वाक्यरचना! शब्दांची नुसती फिरवाफिरव करणाऱ्या या माथेफिरूंना, शिस्तीनें चालणाऱ्या पलटणीच्या लढाईच्या ऐन भरांतल्या हालचालींत आणि पेंढारी लोकांच्या उपजत दंगलींत कांहींच फरक न दिसल्यास त्यांना दोष कोण देणार? पुण्याच्या रस्त्यांवरील पावसाळी चिखलांतून ब्राह्मणी जोडे घालून जाणाऱ्या एखाद्या घटिंगणाच्या सावकाश चालींत गजगति आणि एखाद्या तिरळ्याच्या स्वाभाविक दृष्टिदोषांत कटाक्षांची रमणीयता या दृष्टीनें पाहाणाराला दिसण्याचा पुष्कळसा संभव आहे! भिन्न भिन्न प्रकारच्या रसांचा पोष होण्यासाठीं विशिष्ट शब्दांचा बारेमाप नाच करण्याकडेच कांहींजणांच्या मनाचा कल असतो. अशा

कवींच्या निरनिराळ्या रसांच्या कविता नाना ढंगांनीं ठुमकत मुरडत असतात. वीररसपर कवनांतील आडदांड शब्द नवरात्रांतील दर पहांटेला चतरशिंगीवरून 'बजरंगबलीकी' करीत बोकाळणाऱ्या पुणेंकर तालीमबाजांप्रमाणें धूमधडाक्यानें आरडाओरड करीत धांवत असतात, तर करुण कवितेंतील शब्दांचा थवा प्रेतयात्रा उरकून परतलेल्या मुडदेफरासांप्रमाणें उदास वृत्तीनें चाललेला असतो. कांहीं लोकांनीं तर ठराविक शब्दांनाच कवितेंत शिरण्याची परवानगी दिलेली असते. हे शब्द बहुतेक संस्कृत भाषेंतील असतात. यामुळें मराठी कविता संस्कृत होते, असें यांचें म्हणणें असतें आणि तें कांहीं खोटें नाहीं. अशा किती तरी कविता आजमितीला पाहावयास सांपडतील कीं, ज्यांच्यांत रिकामटेकडीं पादपूरकेंसुद्धां थेट संस्कृतांतून आणिल्यामुळें त्या कोणत्या भाषेंतल्या आहेत, याचा कोणालाच निर्णय करतां येणार नाहीं! या मताच्या मंडळीला मातृभाषेचे शब्द दुस्मानासारखे वाटत असतात. 'बागेंत फुलें फुललीं' तरी यांना 'पुष्पांचा मधुवास' घेतां येत नाहीं. गार वाहणाऱ्या वाऱ्याशींसुद्धां हे भांडत बसतील; पण मंदमंद वायूच्या भरांत मात्र यांची हवी तशी बडबड चालते. यांच्यांत पाणी नसल्यामुळें यांना 'वाताच्या कूपांतील जलाचा'च उपयोग करणें भाग पडतें. खाण्याच्या कमीपणामुळें हे अन्नान्न करतील! याप्रमाणें मराठी शब्दांशीं यांचा उभा दावा असतो. मराठी शब्दांविषयींचा यांचा तिरस्कार पाहिला म्हणजे मनाला मोठें आश्चर्य वाटतें. अथवा यांत आश्चर्य तरी कसलें! जेथें सहा कोटी माणसांसारखीं माणसें समाजाच्या स्पर्शाला अपात्र ठरून पडलीं आहेत, तेथें कवितेला नालायक ठरलेल्या नुसत्या शब्दांचा कोण केवा!

# माझ्या मासिकाचा खास अंक

मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यच्च चिंतयेत् ।

—संस्कृत सुभाषित.

परमेश्वराच्या या विविधविषय विश्वविद्यालयांत प्राणिमात्राला आजन्म अनुभवाच्या शिक्षणक्रमांतून पसार व्हावें लागत असतें. आणि या आयुर्व्यापी अभ्यासांत प्रत्येकाला त्रिकालाबाधित सत्यांपैकीं कोठल्या ना कोठल्या तरी प्रमेयाचा कुल्य सिद्धान्ताच्या स्वरूपानें यथाबुद्ध्या प्रत्यय येत असतो. कोणाला 'सत्यमेव जयते नानृतम्' या तत्त्वांतल्या सत्याची समज पडते तर कोणाची 'नरो वा कुंजरो वा' यासारख्या दुटप्पी बोलण्यावांचून जगांत निभावणी होत नाहीं, अशी खातरजमा होत जाते. एकाला या हातावरचें झाडे या हातावर देण्याचा खरेपणा हातीं येतो तर, दुसरा चित्रगुप्ताच्या खातेवहींत पुष्कळदां चूकभूल होत असल्याबद्दल बिनचूक टांचण करून ठेवितो. याप्रमाणें प्रत्येकाला ह्या ना त्या तत्त्वाचें अनुभवजन्य ज्ञान मिळत असतें. परंतु त्यांतल्या त्यांत कांहीं सत्यतत्त्वें अशीं व्यापक स्वरूपाचीं आहेत कीं, त्यांचा प्रत्यय प्रत्येकाला उभ्या आयुष्यांत एकदां तरी येतोच येतो. चालू लेखाच्या मथळ्यावर दिलेल्या श्लोकांतील सूत्रात्मक सत्य हें असल्या सर्वव्यापक तत्त्वांचें उत्तम उदाहरण आहे. 'आपण चिंतितों एक आणि दैव करितें एक' हा अनुभव आपणांपैकीं सर्वांना लहानमोठ्या, बऱ्यावाईट रूपानें आल्यावांचून राहात नाहीं. आम्हां पौर्वात्यांचें आणि पाश्चिमात्यांचें बहुतेक बाबतींत हटकून पूर्व-पश्चिम असतें, परंतु या तत्त्वाच्या स्वीकारांत त्यांची आमची एकवाक्यता— बहुतेक एका शब्दांतच— झाली आहे असें त्यांच्यांतील 'Man proposes God disposes' या सूत्रावरून दिसून येतें. कधीं कधीं इच्छा आणि तिची

अर्थ— योजितो मनुष्य घडवितो ईश्वर. —बाळकराम

तृप्ति यांच्या परिणामस्वरूपांत इतका विपर्यास दिसून येतो कीं, चांगल्या लोकोत्तर बुद्धीच्या लोकांनासुद्धां त्यांचा कार्यकारणभाव जमवितांना आपआपल्या मतानुसारें, दैव, देव, यदृच्छा किंवा पूर्वसंचित यांपैकीं कशाचा तरी हवाला देऊन मोकळीक करून घ्यावी लागते. मात्र हे इच्छेशीं विसंगत असणारे परिणाम सदैव विघातक वळणाचेच असतात अशांतला नियम नाहीं. वर सांगितलेल्या भिन्न नांवांनीं ओळखली जाणारी ही अनोळखी शक्ति इच्छेची प्रवर्तक होऊन गुणकाप्रमाणें इष्टफलाची वृद्धि करिते आणि कधीं इच्छेला विरोधी भावानें भागून फलच्छेदामुळें असमाधानतेला कारण होते. कधीं कधीं तर इच्छातृप्तीच्या प्रयत्नांना शून्यवृत्तीनें गुणून परिणामाला अजिबात शून्याकार बनविते. इच्छेच्या प्रयत्नांशीं एकरूप होऊन जितक्यास तितकीच फलप्राप्ति करून दिल्याचीं उदाहरणें मात्र विरळा पाहावयास सांपडतात. तात्पर्य, इच्छा व पूर्ति यांच्यांतील बेबनावाकडे शुभाशुभाच्या दृष्टीनें पाहावयाचें नसून त्यांच्या विपर्यस्त स्वरूपापुरतेंच बघावयाचें असतें. टोपलीभर मासे धरण्यासाठीं टाकिलेल्या जाळ्यांत हमेषा कांटेकुटे येऊन कोळ्यालाही पोटांत कांटे भरण्याची पाळी येत असते असें नाहीं; एखादे वेळीं टोपलीच्या ऐवजीं दोन टोपल्या भरूनही मासे सांपडतील आणि एखादे वेळीं आंत कोंडलेल्या राक्षसासकट एखादा हंडाच पाण्यांत सांपडून कोळ्याचे घरांत पाण्याप्रमाणें पैसा खेळू लागेल. फक्त नेमकें मागितलें दान मात्र पडत नाही. 'केला संकल्प सिद्धीस' गेल्याचीं उदाहरणें इतकीं तुरळक आढळून येतात कीं, तसला योगायोग संसारांत अभिमाननीय गोष्टींत जमा करण्याची मनुष्यमात्राची प्रवृत्ति होऊन बसली आहे. इच्छेचा हेतु सत्स्वरूपाचा असला म्हणजे तरी नेमकी फलप्राप्ति होते अशांतलाही प्रकार नाहीं. अगदीं 'सत्यसंकल्प' असला तरीही दातृपदीं साधुसंतांनीं 'भगवान' योजून ठेविलेला आढळतो. या बहुतांशीं निरपवाद नियमाचीं उदाहरणें पुराणांतून, इतिहासांतून व वर्तमान परिस्थितींतून हवीं तितकीं आढळून येतील. स्ट्राटफर्डच्या खाटकानें आपल्या पोराला नाटकमंडळींतून लावून देतेवेळीं मनांतली पोराच्या उत्कट उत्कर्षांबद्दलची भावी कल्पना रंगभूमीवर तालांत नाचण्यापलीकडे फारशी गेलेली नसेल; परंतु चिरंजीवांनीं सदतीस नाटकें लिहून जगांतल्या उत्तमोत्तम नटांनाच नव्हे तर अगदीं प्रौढतम विद्वानांनासुद्धां बेताल नाचायला लावून स्वतःला अक्षरशः चिरंजीवपदीं बसवून घेतलें. स्वतः गोल्डस्मिथ कवीची मनःप्रवृत्ति एखाद्या पलटणींत जाण्याची किंवा वैद्य होण्याची असून त्याच्या

आतांची इच्छा त्यानें धर्मोपदेशक व्हावें अशी होती; परंतु विधिलेख असा होता कीं, त्यानें लेखनकलेंत जगमान्य व्हावें! एका सदऱ्यानिशीं रोजगारावर धाडलेल्या बेननें मळकीं लुगडीं धुण्याच्या साबूचें एखादें लहानसें तरी स्वतंत्र दुकान काढलें म्हणजे तृप्त होणारी त्याच्या बापाची इच्छा, साऱ्या अमेरिका खंडावर युरोपने उडविलेले शितोडे धुऊन टाकण्यासाठीं देशभूमीतर्फे यशस्वी वकिलात करणाऱ्या बेंजामिन फ्रांकलिननें किती विपर्यासानें पुरी केली बरें! (इ. सन) १७५० त, फोर्ट सेंट जॉर्जच्या कारकुनी कोठडींत कोंडून घेतलेल्या बॉबीला, भोंवतालच्या कारकुनांना अडविणारी एखादी हिशेबी चूक स्वतःला सोडवितां येण्यांत आपल्या भावी उत्कर्षाची परमसीमा दिसत होती आणि सन १७५१ त राबर्ट क्लाईव्ह कसलेल्या सेनानीची अडवणूक करणारा, त्रिचनापल्लीचा वेढा उठवून देऊन लॉर्ड क्लाईव्ह होण्याच्या पंथास लागला होता. आत्महत्या करण्याचे तीन प्रयत्न करूनही त्याला ज्या आपल्या डोक्यांत नेमकी गोळी सोडतां आली नाहीं त्याच डोक्यांतून अल्पावकाशांत शत्रूवर नेमकी गोलंदाजी करण्याचे बिनचूक हुकूम निघूं लागले. हबसाणांतून घर सोडून कुठें तरी पोट भरण्यासाठीं निघालेल्या बाळाजी विश्वनाथांनीं परक्या प्रांतांत पेशवाईचें पद पटकावून सारा देश आपल्या कीर्तीनें भरून काढिला आणि त्यांच्या तिसऱ्या पिढींत रुमशामसारख्या परखंडांत भगवा झेंडा फडकविण्यासाठीं निघालेले भाऊ घरच्याघरींच पानपताच्या गर्दींत मातींत मिळाले. इंग्लंडवर राज्य करण्यासाठीं आपल्या नांवाचीं नाणीं पाडून मोकळा झालेला नेपोलियन इंग्लंडचा कैदी या नात्यानें मरण पावला. आदले दिवशीं संसार-सुखाच्या भावी कल्पनांत गुंगलेल्या नारायणानें 'सावधान' शब्द ऐकल्या-बरोबर उत्सुकतेनें अक्षता हातांत घेऊन उभे असलेल्या आप्तेष्टांच्या हाता-वर तुरी देऊन संसाराला वाटाण्याच्या अक्षता दिल्या. पुढील आयुष्यक्रमच नव्हे; पण नांवसुद्धां बदलून रामदासरूपानें ब्रह्मचारी मंडळांत अग्रेसरत्व मिळविलें. खानदेशांतल्या काशीरावदादांना आपल्या गोपाळाला नांवाप्रमाणें घरचीं चार गुरेंढोरें कशींबशीं वळतां आलीं म्हणजे मिळविली असें वाटत होतें; परंतु वरच्या उदाहरणाप्रमाणेंच गोपाळाचा पूर्वाश्रम नांवाप्रमाणेंच नापत्ता होऊन, बडोद्याचे तख्तनशीन प्रभु, श्रीमंत सरकार सेनाखासखेल समशेरबहाद्दर श्रीसयाजीराव महाराज लक्षावधि लोकांचे पोशिंदे होऊन व असंख्य निरक्षर नरांचे नारायण करून आपल्या अंगच्या अलौकिक गुणांमुळें अखिल भारतवर्षांतल्या मोठमोठ्या नामधारकांनाही आज आदर्शभूत होऊन

बसलेले आपण डोळ्यांनीं पाहात आहों. धाकट्या रघूला कोंकणांतून नेऊन चार अक्षरें शिकविल्यावर स्कूल फायनलच्या परीक्षेस बसविणारीं त्यांच्या कर्वेप्रभृति हितचिंतकांची इच्छा, फार झालें तर, रघुनाथाला तो परीक्षा पसार होऊन, एखाद्या हपिसांत ' अंब्ली ऐण्ड रिस्पेक्टफुली ' उभें राहण्यांत तीसतीस रुपये किंमतीचें यश मिळवितांना पाहून तृप्त झाली असती !– दैवयोग निराळा होता. तत्कालीन राणीसाहेबांच्या राजमुकुटांत इंग्रजी अलंकारांमध्यें अग्रस्थानीं चमकणाऱ्या हिंदुस्थानी हिऱ्याप्रमाणेंच, केंब्रिजच्या शारदादेवीच्या यशोमुकुटांत खचिलेल्या वित्रद्रत्नांत अग्रेसरत्वानें लकाकून, मेकॉलेसारख्या अहंमन्यांनीं आमच्या मातृभूमीच्या नांवावर आणिलेली निर्बुद्धपणाची नसती काळोखी आपल्या तेजानें पार घालविणारा हिंदुस्थानच्या बुद्धिवैभवाचा कोहिनूर, सीनियर रँग्लर, विद्यामृताचें अन्नसत्र होऊन असलेल्या व महाराष्ट्रीय कर्तबगारीचें कौतुक म्हणून गाजलेल्या फरग्यूसन कॉलेजांत अगदीं अल्पवयांत प्रमुखपदीं बसणारे प्रिन्सिपॉल परांजपे, नेक नामदार गव्हर्नरसाहेबांच्या खुर्चीला खुर्ची भिडवून बसलेले नामदार परांजपे०

या सिद्धान्ताची भूमितीच्या एखाद्या सिद्धान्तासारखी सत्यता पटवून देत आहेत ! महिना एकदोन रुपयांसाठीं पूना जिमखान्याच्या पटांगणावर इकडचे चेंडू कसे तरी तिकडे टाकण्यासाठीं साहेबांसमोर सारखें नाचणाऱ्या चांभाराच्या पोरानें तिथल्या मुकादमांत भावी आशादृष्टीनें काय पाहिलें असेल ! आणि परवांच्या विलायती पटांगणावर आपले चेंडू टाकण्याचें कौशल्य पाहून नाचणाऱ्या साहेबांत श्रीयुत पी. बाळू यांनीं काय पाहिलें असेल ! माझ्या सिद्धान्ताची सत्यता ! अगदीं परवांचीच गोष्ट घ्या ! मरहूम शेठ चुनीलाल सरैय्या यांची धंदा करण्याची सुरुवात व शेवट हीं दोन्हीं अकल्पित विधिघटनेचीच साक्ष देतील. एल्. एम्. एस्.च्या परीक्षेस ते बसले असतील त्या वेळीं उघड उघड डॉक्टरी करण्याची त्यांची इच्छा असली पाहिजे; परंतु त्यांनीं धंदा केला पतपेढीचा ! अखेरीस स्पीसी बँकेची इभ्रत न्यायाच्या अदालतींत शहाजोग दाखवून बाहेर पडल्यावर त्या दिवशीं भागीवाल्या लोकांनीं त्यांच्या गळ्यांत

० नामदारांचा भावी उत्कर्ष नमूद करण्यासाठीं वाचकांची नम्रपणें परवानगी घेऊन मी वरील जागा मोकळी ठेवीत आहें. परमेश्वर ही मानाची सोपानपरंपरा आमच्या अपेक्षेपेक्षांही उत्कर्षकर रीतीनें रचून काढून नामदारांना तिचा उपभोग घेण्यासाठीं निरामय दीर्घायु देवो !

नामदारांबद्दल अत्यंत अभिमान बाळगणारा —बाळकराम

हार घातला त्या वेळीं त्यांना भविष्यकाळाची काय कल्पना झाली असेल बरें! दुसऱ्याच दिवशीं काळानें त्यांच्या गळ्यांत इतका जोराचा फांसा घातला कीं, त्याच्या आवळीनें त्यांच्या भागीदाऱ्या दोस्तांनाही गळफांस बसल्यासारखें झालें! यजमानाचे पाय धुण्यासाठीं मान वांकवून पाणी ओततांना रामा शागीर्द धन्याच्या कानांतल्या चौकड्यांसारखा दिसणारा खोट्या मोत्यांचा चौकडा मिळाल्यानेंही खूप झाला असता; आणि त्या यजमानाच्याही यजमानाला पापक्षालनार्थ डोकें मारण्याची शिक्षा फर्माविणाऱ्या रामशास्त्र्यांनीं, लांचलुच-पतीखातर पायांपुढें लोटांगण घालणाऱ्या कुबेरभांडारावरही लाथ मारिली!—

अशा प्रकारें उदाहरणांची शिरगणती करावयाचा आणखी प्रयत्न करूं लागल्यास लेखाचें मूळचें योजिलेलें स्वरूप बदलून भलत्या पर्यवसनामुळें तोहि या विधानाच्या सत्यतेचें एक उदाहरण होऊन बसेल! वस्तुतः वरील तत्त्वाच्या समर्थनासाठीं लांबलांबच्या उदाहरणांची गरजच नव्हती; आजवर आपण तयार केलेल्या मनोरथांना आधीं आंखलेल्या मार्गांपासून कितीकदां व कसकशा रीतीनीं चळावें लागलें व त्यांपैकीं कितीकांनीं नेमका मुक्कामाचा पल्ला गांठला याची वाचकांनीं आपापल्या मनाशीं प्रांजळपणें चौकशी केली तर घरबसल्याच या सिद्धान्ताच्या सत्यतेची सहज साक्ष पटण्यासारखी आहे. फार कशाला, माझ्या कंपूंतल्या तिंबूनाना वगैरे मंडळींच्या लहानपणच्या इच्छा व हल्लींची वस्तुस्थिति परस्परांशीं ताडून पाहतांच वरील विधानाचा पटकन् पडताळा पडेल. संन्यस्त वृत्तीनें आश्रम बांधून गाई, म्हशी वगैरे जनावरांना पोटच्या पोराप्रमाणें वागवून दाखवून पूर्वीच्या ऋषींची या युगांत साक्ष पटविण्याची इच्छा करणारा आमचा भांबूराव पंचविशीच्या आंतच संसाराच्या लवेद्यानें काढून जाऊन हल्लीं पोटच्या पोरांना मात्र जनावरांप्रमाणें झोडपतांना दिसून येतो. तिंबूनानाची लहानपणची स्वगत कल्पना 'फारीष्ट रोणगार्ड' होऊन आमच्या गांवालगतच्या डोंगरावरून खाकी पोषाखांत भटकावें आणि कुणब्यामाळ्यांचे विळेकोयते जप्त करून गांवचीं गुरें कोंडवाड्यांत नेऊन गुदरावीं ही होती; पण ऐन उमेदीच्या वयांत हातापायांचे सांधे धरल्यामुळें घरकोंबड्याप्रमाणें स्वतःला कोंडून घेऊन खरखरलेलीं रत्नें पायाखालीं तुडविण्याची हौस त्यांना गरम निर्गुडीच्या पाल्यानें पाय शेकण्यावरच कैक दिवस भागवीत बसावें लागलें; आणि संधिवातानें आयत्या वेळीं अशी संधि साधल्यामुळें पुढें त्यांना कायमचा गृहस्थाश्रम स्वीकारणें भाग पडत गेलें. बिचाऱ्या आबाभटजींच्या निराशेचा विषय तर तिऱ्हाइताच्याही डोळ्यांना पाणी आणण्यासारखा आहे. पेशवाईच्या पळत्या

पावकांत पापड लोणचीं, चटण्या-कोशिंबिरी चारुन कांहीं लोकांनीं ब्राह्मण बादशहाजवळून गांवच्या गांव इनाम मिळविल्याच्या गोष्टी ऐकून आबांच्या तत्कालीन पूर्वजानें मोठ्या कुसराईनें कांद्याचीं भर्जी व लसणीची चटणी तयार करुन पुण्याच्या सदरेला नेली. परंतु त्या अकलेच्या कांद्यानें ते पदार्थ आपल्या गांवींच तयार करुन पुण्यापर्यंत नेल्यामुळें प्रवासाच्या शेवटीं भज्यांना मोटेला लावावयाच्या कातडी ठिगळांचें वातड स्वरुप प्राप्त झालें व चटणीचा गोळा कढईच्या पेंडीसारखा किंवा आजकाल जुनाट पेवांच्या कोठारांतून सांडणाऱ्या दाण्यांच्या खड्यांसारखा दिसूं लागला होता. शिवाय जोशीवृत्ति करीत असूनही त्या आंधळ्यानें त्या दिवशीं एकादशी होती हें पाहण्याइतकीसुद्धां दूरदृष्टि ते पदार्थ नजर करितांना वापरली नाहीं. अशा एकंदर प्रकारामुळें खवळून जातिवंत बादशहावरही ताण करणाऱ्या ब्राह्मण बादशहांनीं तलवारीनें न तुटण्यासारखीं भर्जी करण्याची कल्पना काढणारें तें डोकेंच तलवारीनें धडापासून वेगळें केलें! (ऐतिहासिक पुराव्याची अठरा अक्षौहिणी सेना डोळ्यांसमोर असतांही आबाभटजींचें घराणें पेशवाई बुडण्याचें कारण सदरील ब्रह्महत्येच्या पातकांत आहे असें आग्रही श्रद्धेनें आजतागाईत प्रतिपादित आलें आहे.) पूर्वज मजकुरांची ही अपुरी राहिलेली आशा तडीस नेण्याचा त्याच्या पिंडदानाचे वेळीं सर्व सपिंडांनीं संकल्प केला; आणि आबाभटजींच्या बाळपणच्या आशेचा उगमही याच संकल्पापासून झालेला होता. अर्थात् पेशवाई बुडाल्यामुळें व इंग्रजींत गांवें इनाम देण्याची वहिवाट नसल्यामुळें, आबांच्या या आनुवंशिक प्रतिज्ञेतून वैशिष्ट्य नाहींसें होऊन तिला राज्यकर्त्यांकडून कांहींतरी बक्षिस मिळवावयाचें हें सामान्य स्वरुप प्राप्त होणें अगदीं अपरिहार्य होतें. आजीच्या तोंडून पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकतांना आमच्या छोटेखानी आबानें आपल्या चिमुकल्या मनांत ही पूर्वप्रतिज्ञा शेवटास नेण्याचा निर्धार केला आणि एवं प्रकारें 'कलेक्टरा'च्या किंवा निदान 'फट्टा'च्या तरी भटारखान्यांत देशी बुटणेराची जागा पटकावावयाची, त्याला कांद्याचीं भर्जी व लसणीची चटणी चारुन त्याच्याकडून कांहींतरी बक्षिस उपटावयाचें ही आबाभटजींची लहान-पणची महत्तम मनीषा होऊन बसली होती! परंतु लौकरच गांवचें जोशीपण गळ्यांत पडल्यामुळें आबाची बालकल्पना जागच्याजागींच मावळून गेली.

सदरहू गोष्ट लिहितांना मी नुकत्याच घडलेल्या एका रजपूत घराण्याच्या ऐतिहासिक कथेचेंच सामाजिक रुपांतर करीत आहे असें कोणास वाटण्याचा संभव आहे! एका नांवाजलेल्या रजपूत घराण्याच्या प्रतापशाली पूर्वजानें

अशीच दिल्ली शहरावर तोफ लावून आपलें निशाण उभारल्याखेरीज त्या शहरांत पाऊल टाकावयाचें नाहीं अशी प्रतिज्ञा मुसलमानी अमदानींत केली होती. परवां दिल्ली-दरबारच्या वेळीं सदरील घराण्यांतील विद्यमान राजश्रियास त्या समारंभाप्रीत्यर्थ तो निषिद्ध नगरप्रवेश करण्याची पाळी आल्यामुळें, आपल्या पूर्वजप्रतिज्ञेस जागून त्या नरसिंहानें, दिल्ली शहरच्या रोखानें नुसती नांवापुरती वायबाराची तोफ उडवून मग आंत प्रवेश करण्याची परवानगी मिळण्यासाठीं इंग्रज सरकारांकडे तहाचें बोलणें सुरू केल्याचें बहुश्रुत वाचकांच्या लक्षांत असेलच! आपल्या आवांक्याबाहेर भडाभड प्रतिज्ञा करणाऱ्या या नरवीरानेंच मोंगलांच्या हातीं गेलेली आपली राजधानी स्वाधीन होईपर्यंत तृणशय्येवर निजण्याची, पर्णकुटिकेंत राहण्याची व कदान्न खाण्याची अशीच आणखी एक जीवाअगोचर प्रतिज्ञा करून ठेविली होती. हीही निष्फलतेमुळें आजतागाईत उपरिनिर्दिष्ट राजघराण्याला वंशपरंपरेनें बाधत असल्याकारणानें, वर सांगितलेले भीष्माचार्य आपल्या गुडघ्याएवढ्या मऊ बिछान्याखालीं एक गवताची काडी ठेवण्याचा, सातमजली वाड्याच्या टाळक्यावर गवताच्या पेंढीचा तुरा बांधण्याचा व पंचपक्वान्नांचें ताट साफ केल्यावर शेवटीं भाकरीच्या तुकड्यानें मुखशुद्धि करण्याचा परिपाठ चालवीत असल्याचेंही पुष्कळांना ठाऊक असेलच. सदरील गोष्टीवरूनच मी आबाभटजींची कहाणी रचून सांगत आहें असें कांहीं वाचकांस वाटण्याचा संभव आहे; परंतु अशा शंकेखोर वाचकांनीं "इतिहासाची हमेष पुनरावृत्ति होत असते" ( History repeats itself ) हें तत्त्व लक्षांत ठेवावें. मोंगली किंवा ब्राह्मणी सत्तेच्या भरांत केलेल्या प्रतिज्ञा इंग्रजी अमलांत निर्जीवपणानें निरतरीत बसण्याचा प्रकार आमच्या इकडे तरी अगदीं नवीन नाहीं खास! रामावतारीं ( अहि किंवा महि-) रावणाच्या कुटुंबाला फसविल्याबद्दल भगवंतानें कृष्णावतारीं प्रायश्चित्त भोगल्याचें पुराणप्रसिद्धच आहे. असो. याप्रमाणें आबाभटजींची बालपणाची आशा वस्तुस्थितींत अवतरली नाहीं. खुद्द माझी निराशा कोणत्या प्रकारची झाली हें माझ्या 'स्वयंपाकघरांतील गोष्टी'च्या वाचकांना तरी आठवत असेलच. एखाद्या कॉलेजांतल्या रेसिडेन्सी क्लबाचा मुख्य स्वयंपाकी होण्याचा किंवा साधल्यास स्वतंत्र खाणावळ काढण्याचा माझा मुख्य हेतु होता हें सांगण्याचें कारण नाहीं. शिवाय, लहानपणीं कांहीं क्षणभंगुर पोट-हेतुही होतेच. कडकलक्ष्मीचा डोल्हारा वागवून, सर्वांगावर जुन्या काळच्या राजांप्रमाणें झगा चढवून, कपाळभर भला खासा मळवट भरून, लांबलचक केंस अस्ताव्यस्त पसरून व आपल्या

आगाभोंवतीं फडाफड कोरडे उडवून, आळींतल्या बायकापोरांची दाणादाण करून सोडण्याची माझी अगदीं लहानपणची हौस होती. पुढें कांहीं दिवसांनीं हातांत हिरवा कंदील किंवा बाव्हटा घेऊन 'ठेशणावर' मोठमोठ्यानें 'ओरा-ईट' म्हणत येरझारा घालणारा 'पोटर' होण्याकडे माझ्या मनाचा कल झुकला. दैवाची जराशी थप्पड बसतांच तोहि नाहींसा होऊन, माझ्या भावी इच्छामय चित्राला सर्कशींतल्या विदूषकाचें गंभीर स्वरूप प्राप्त झालें. याप्रमाणें अनेक बुडबुडे उत्पन्न झाले व लयाला गेले. तथापि, एवढी गोष्ट मात्र निर्विवाद आहे कीं, या प्रकारची एखादी आगंतुक इच्छा येऊन गेली म्हणजे माझी स्वयंपकी होण्याची इच्छा हमेषा दुप्पट जोरानें उठाव घेत असे. परंतु वडीलांचा हेकडपणामुळें या आशेची निराशा होऊन माझें आनुवंशिक शहाण-पण केवळ लाक्षणिक अर्थानेंच धुळींत कसें गेलें हें वाचकांना दुसऱ्यांदा सांगत बसण्याची कांहीं जरूर नाहीं. तात्पर्य, 'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यच्च चिंतयेत्' हें तत्त्व आपणांस नेहमीं खरें ठरलेलें भल्याबुऱ्या स्वरूपांत पाहाव-यास सापडतें. कर्माचें विदान कांहीं तरी अघटित असतें ! साहेबाच्या बवरजी-खान्यांत अष्टौप्रहार कांदे चिरीत बसल्यामुळें डोळ्याला सारखें पाणी येत असतांहेही आबाभटजींची इच्छा आणि जोशीवृत्तीमुळें उभ्या वर्षांत एखाद-दुसऱ्यावेळीं चोरूनमारूनसुद्धां कांद्यालसणाची गांठ मोठ्या मुष्किलीनें पडून एरवीं कांदे न कापल्यामुळें त्यांच्या डोळ्याचें पाणी खळूं नये हा तिचा शेवट व्हावा; आकाशाशीं गोष्टी सांगणाऱ्या डोंगरांच्या माथ्याची जंगलतोड करण्याचें आपल्या हुकमतींत ठेवण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा त्या तिंबूनानांना स्वतःच्या माथ्यावरची जंगलतोड करण्यासाठीं मान वांकवून न्हाव्याच्या पायांवर डोकें ठेवण्याचा प्रसंग यावा आणि क्लबचा आचारी किंवा खाणावळीचा मालक या नात्यानें विद्यार्थिदशेंतल्या भावी मुन्सफ-मामलेदारांच्याही पोटापाण्याची काळजी करूं पाहणाऱ्या बाळकरामाला केवळ स्वतःच्याच पोटाखातर मूळचें नांव घालून एखाद्या मासिकासाठीं खर्डेघाशी केल्यामुळें हास्यास्पद होणें भाग पडावें य प्रकाराला काय म्हणावें ? **कर्मणो गहना गतिः ।**

वरीलसूत्रांतील सत्य जवळ जवळ एखाद्या प्रत्यक्ष-प्रमाणाइतकेंच स्वयंसिद्ध असतांहीत्याच्या विशदीकरणासाठीं बसूच्या बीजगणितांत साध्या उपपत्तीसाठीं रेटून उदाहरणें देण्यांत दिसून येणारी सढळ हाताची कंटाळवाणी उदारता गिरविण्याचा हेतु एवढाच आहे कीं, प्रस्तुत सूत्र एखाद्या म्युनिसिपालिटीच्या मेंबरलाही आंगोपांग समजून यावें आणि या सत्याच्या जाळ्यांत सांपडलेल्या

सावजाला कोणीही उपहासाचे खडे मारण्याइतकी अनुदारता दाखवूं नये. इतके उघड उघड सांगितल्यानंतर, मला खात्रीची आशा आहे कीं, थोड्या दिवसांपूर्वी एखादें सर्वमान्य मासिक पुस्तक अबाधित चालवून दाखविणें हें आमचें 'मनास चिंतितमेकं' असून 'दैवमन्यत्र चिंतयेत्' या श्लोकाच्या आक्टान्वयें, सदरहु काल्पनिक मासिकाचा एकही अंक आमच्याकडून बाहेर पडला नाहीं. हें आमच्या कंपूचें गुपित जाहीर केलें तर आमच्या अक्कलेच्या या प्रदर्शनाच्या स्वागतार्थ माझे सहृदय वाचक हस्तीदंती कामचें प्रदर्शन उघडणार नाहींत. सदर मासिक काढण्याचा बेत करण्यांत व अखेर तें न काढण्यांत वरील सूत्रांतील दोन्ही कलमांचीं कारणें सांपडून येणार आहेत. कल्पक मनाचा जोरकसपणा व आपल्या सामान्य मनाची दुबळीक या दोन विरोधी गुणांमुळें आपण कोणत्याही गोष्टीला 'मनसा चिंतितं' या कोटींत आणीत असतों; व आपल्या अंगीं दृढनिश्चयाचा पुरा अभाव असल्यमुळें आपल्या चिंतिलेल्या बाबतींत ढवळाढवळ करावयाला दैवाला सवड सांडत असते! एखादी गोष्ट करण्याविषयींची आपली हौस, ती घेड्यावांकड्या रूपांतहि सिद्धीस न नेतां येण्याजोगें आपलें तद्विषयक अज्ञान व त्या अज्ञानाचें आपल्याला पूर्ण अज्ञान या त्रयीचाही, आपल्या मनांत भलतीच इच्छा उत्पन्न करून देऊन तिची पर्यवसानानें पूर्तता करण्यांत उपयोग होत असतो. आपल्या अज्ञानापेक्षां आपल्या अज्ञानाबद्दलचें अज्ञानच आपल्याला जास्त नडत असतें. विश्वांतल्या प्रचंड घडामोडींचें यथातथ्य ज्ञान होण्यासाठी जी विलक्षण शक्ति आपण खर्च करीत असतों तिचा अगदीं दुर्लक्ष करण्याइतका अंश जरी आपण स्वतःचें सम्यग्ज्ञान करून घेण्याकडे वापरूं लागलों तर हेंच दुःखपूर्ण जग एकदम सुखाचें माहेरघर होऊन बसेल! जगांत काम आहे व कामकरीही आहेत; पण योजकः तत्र दुर्लभः! चिकणमातीचा गोळा व एक लांकडाचा तुकडा, एवढ्या सामग्रींतून भात शिजविण्याचें एक भांडें व कुत्रे हांकलण्यासाठीं एक छडी करावयाची असल्यास तुमच्या आमच्यापैकीं शेंकडा नव्याण्णव योजक आपल्या उपजत अप्रयोजकतेला अनुसरून त्या लांकडाचे लहान लहान तुकडे चकत्यांप्रमाणें एकमेकांशीं मोठ्या कुशलतेनें व प्रयासानें जोडून एक कसेंबसें भांडें व तितक्याच प्रयासानें त्या चिकणमातीची कशी-बशी काठी निर्माण करतील आणि शेवटीं कुत्र्यावर उगारतांच काठीचा तुकडा पडलेला पाहून व या क्षणावधींत तिकडे चुलीवर ठेविलेलें तें लांकडी भांडें जळून गेलेलें पाहून, इतक्या प्रयासाची अशी राखाडी झाल्यामुळें दैवलाच

दोष देत असतील! याप्रमाणें कार्यांशीं देहभावानें चिकटून राहणाऱ्या समवायि कारणाची निवड करितांना, विवाहाच्या ठिकाणीं मृतासाठीं अश्मा उचलण्याइतकी सारासार बुद्धि दाखवून, असमवायि कारणासाठीं मात्र आपण मृताचें प्रेत तिरडीवर बांधण्यापेक्षांही जास्त नेटाची मव्यवस्था वापरीत असतों.

मासिक पुस्तक काढण्याच्या कल्पनेचा आमच्या डोक्यांत जन्म कसा झाला हें प्रथम सांगून नंतर तिची उत्तरक्रिया उरकून घेईन. अनुकरण हा मनुष्य-जातीचा मोठ्यांत मोठा गुण किंवा दोष आहे! याच्याइतका व्यापक मनुष्य-धर्म दुसरा कोणताच नाहीं. अर्थात् देहधर्मांखेरीज-कोणताच नाहीं असें म्हटलें तर खात्रीनें अतिव्याप्ति होणार नाहीं. मनुष्याची उत्पत्ति माकडापासून आहे हें दाखविण्यासाठीं कुशाग्र बुद्धीचा डार्विन 'ऑरिजिन ऑफ स्पीसीस' या पुस्तकांत दिसून येणारी अवाढव्य खटपट करीत बसला ही त्यानें शोधिलेल्या उत्क्रान्तितत्त्वापेक्षांही विशेष आश्चर्याची गोष्ट आहे! माकडांच्या अंगीं असलेला अनुकरणरूप मुख्य गुण आबालवृद्ध मनुष्यांच्याही ठिकाणीं किती प्राचुर्यानें दिसून येतो याच्यावर नुसती धांवती नजर टाकली तरीसुद्धां अगदीं हट्टवादी मनुष्यालाही मनुष्यमर्कटांचा जन्यजनक संबंध कबूल करावा लागेल. जगांतल्या लक्षावधि घडामोडींकडे पाहतांक्षणींच त्यांच्या आदिभूत एकस्थाना-पुरती कल्पकता असून पुढील शून्यांच्या पलटणींत त्याच किंमतीच्या अनुकृतींची भरती झालेली असल्याचें कोणाऱ्याही चटकन् ध्यानांत येईल. (सृष्टिरूप अजस्र पुस्तकांत आपण नेहमीं कमीअधिक प्रमाणानें स्थलकालपात्रें बदलून, 'टोपी-वाला आणि माकडें' हीच गोष्ट वाचीत आहों असें मार्मिक वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.) एखाद्याला एखाद्या गोष्टींत यश येतेंसें दिसूं लागतांच सर्वत्र त्याच्या नकला सुरू होतात; अर्थात् या नकला बाह्यांगा-पुरत्याच असतात हें सांगणें नकोच. कोणत्याही प्रथमपुरुषाला यशस्वी होण्याला ज्या निसर्गदत्त किंवा निसर्गदत्त व पुढें प्रयासानें परिणत केलेल्या गोष्टी कारणी-भूत होतात, त्यांचें अनुकरण मात्र कधीं होत नाहीं, किंबहुना होणें शक्य नसतें म्हटलें तरी चालेल. कुठेंही आणि केव्हांही पाहा, एक मोर नाचूं लागतांच किमानपक्षीं नऊशें नव्याण्णव लांडोरींच्या नाचासाठीं वेडेंवांकडें अंगण रिकामें ठेवावेंच लागतें! अंगण मूळचें वेडेंवांकडें नसलें तरी नाचणाऱ्यांच्या कर्तबगारी-मुळें त्याच्याभोंवतीं नसता बांकडेपणा तरी येतोच येतो. सेनसेनशीं तोंड देऊन लोक विसांवतात न विसांवतात तोंच त्यांच्या तोंडावर जीनतानचा गोळीबार सुरू

झाला; ( काल परवांना हातातोंडाशीं येण्याजोगा झालेला सेशीनतान हा याच जपानी घराण्यांतला तिसरा पुरुष होय; अद्याप याची आमची तशी तोंडओळख झालेली नाहीं ! या धर्तीच्या हिंदुस्थानी भावी गोळकासाठीं ' किनतान् ' हें नांव अजून रिकामें आहे. ) आतंकनाग्रह गोळ्यांची रुग्णांच्या वतीनें पहिली फैर झाडून काळाची थोडी पिच्छेहाट झाली नसेल तोंच काळाच्या बाजूनें, वैद्यनामधारी त्याच्या हजारों दूतांनीं रोग्यांवर गोलंदाजी सुरू केली. आंग्ल्यांस आर्यमहौषधालयाचा नुसता पायासुद्धां नीट बसला नाहीं, इतक्यांत तळकोंकणच्या कैक गांवांनीं आर्यधन्वन्तरीप्रीत्यर्थ बारावरच्या इमारतीचा कळस उठवून दिला ! रंगभूमीवर तुकारामानें ब्रह्मानंदीं टाळी लावतांच, प्रक्षकांनीही टाळीला टाळी मिळविलेली पाहून, ज्ञानेश्वर-नामदेवांसारख्या ईश्वरमान्य साधूपासून कानफाट्या गोसाव्यापर्यंत प्रत्येकाला मिरजेच्या मिरासाहेबासमोर हजिरी देणाऱ्या गुणिजनाइतक्या अगत्यानें एकेकदां रंगदेवतेला खडी तालीम देऊन जावें लागलें. राणा भीमदेवाच्या आरोळीबरोबर प्रेक्षकांनाही आनंदातिशयानें ओरडतांना ऐकल्यावर रणांगणावर पडलेल्या सर्व राजस्थानी मुडद्यांनीं आजाणजांचीं वैरें साधण्यासाठीं, अंगरख्याचे बंद तडातड तोडण्यासाठीं, स्वर्गाचीं कपाटें फोडण्यासाठीं व कानठाळ्या बसविणाऱ्या आवाजांत त्रिवार ' सूड, सूड, सूड ' घेण्यासाठीं रंगभूमीवर जोरांची कवाईत दाखविली. महाराष्ट्र रंगभूमीला ललामभूत झालेले नामांकित नट रा. गणपतराव जोशी यांनीं हॅम्लेटसारखी भूमिका वठवितांना योग्य रीतीनें कपाळावर हात मारितांच मार्मिकांच्या माना डोललेल्या पाहून गद्यनाटकांतले लुंगेसुंगे नायकसुद्धां वेळीं-अवेळीं आपल्या हातानें कपाळमोक्ष करून घेऊं लागले. आपल्या संगीत-माधुर्यानें रंगदेवतेलाही रंगवून—

[ अपूर्ण ]

# वाग्वैजयंती

# अर्पण पत्रिका

सत्—
चित्–हृत्–महत्
आनंद–पदवी–प्रदान–वदान्या ॥ १ ॥

प्रीतीची पवित्रता, चिरंतनाची चरित्रता,
सृष्टीची सचित्रता,
विश्वाची विविधता, अनंताची अगाधता,
ईश्वराचें अस्तित्व
या सर्वांच्या
अचल ऐक्याची
प्रत्यक्ष निदर्शना ॥ २ ॥

भूतकालांतली भावजीवना, वर्तमानांतली वरतराशा,
भवितव्यांतली भाग्यदेवी ॥ ३ ॥

हृदयाची स्फूर्ति, इच्छेची पूर्ति,
मांगल्याची कीर्ति
श्री
हृदयशारदा
ही
सर्वस्वानें अर्पिलेली

**'वाग्वैजयंती' सदैव कंठांत धारण करो!**

*'गोविंदाग्रज'*

791

## वाचकांस विज्ञापन

शार्दूलविक्रीडित

जें जें या समयीं मनांत भरलें स्वच्छंद नानास्थळीं,
तें तें त्या समयीं जपून धरितां ही होय गंगाजळी !
मित्रा ! ही कविता – न गद्य – इजला निर्बंध कैचा बरें ?
सारें हें मनिं आणुनी मग धरीं ' वाग्वैजयंती ' करें ॥ १ ॥

वसंततिलका

प्रेमें, सख्या धरिं हिला हृदयीं सदाही,
दे टाकुनी; तुडविं ही अथवा पदांही !
मातें दशा समचि या गमतात दोन्ही
माझी मलाच लखलाभ सदा असो ही ॥ २ ॥

## तडजोड *

एका एक कधीं जसें दिसतसे स्वांतीं विकारांतरें,
अन्या तें न दिसे तसेंच; असतें ज्याचें तयातें खरें;
चित्तैक्यास्तव सर्वथा फुकट कां हेका धरावा मग ?
एका शून्य जगीं दिसे, तरि दिसे शून्यांत अन्या जग ! ॥ ३ ॥

* ' गोविंदाग्रजा ' शीं ज्यांचा विचारभेद होईल त्यांना या तडजोडीनें समाधान वाटावयाला काय हरकत आहे ?

—राम गणेश गडकरी

## माझी पहिली कविता

[ आमचा एक वृद्ध गुजराथी शेजारी, रोज दुपारीं जेवण झाल्यावर आमच्या घरीं येऊन गप्पागोष्टी सांगत बसत असे, त्याचें पुढील आर्येत वर्णन केलेलें आहे. माझे वडीलबंधु ती. विनायक गणेश गडकरी यांनीं या काव्याला थोडी मदत केली होती. मु. गणदेवी, प्रांत नवसारी, संस्थान गायकवाडी. १८९६ जून किंवा जुलै. ]

आर्या

चष्मा लावुनि डोळ्यां डोकिस पागोटि तांबडी घाली ।
काटी टेंकित टेंकित येऊनि बैसे पथारिच्या खालीं ॥ १ ॥

## नदीस पूर आलेला पाहून

[ मुठा नदीस एकदां फार पूर येऊन श्रीओंकारेश्वराचे मंदिरांत पाणी शिरलें होतें. ]

[ चाल : नृपममता रामावरती ]

विरहोत्सुक सागर झाला ।
प्रियसखीस भेटायाला ॥ मज गमे ॥

निजमित्र मेघ पाठविला ।
गिरिराज श्वशुर-सदनाला ॥ मज गमे ॥

सरिता ही सागरजाया ।
त्यासवें निघाली जाया ॥ मज गमे ॥

आकांत । करित अत्यंत । ठेवितां तात ।
तिजसि उतरोनि ।
भूवरती तटकटिवरुनि ॥ मज गमे ॥ १ ॥

तो प्रसंग जणुं बघवेना ।
म्हणुनी रवि झांकी नयनां ॥ मज गमे ॥

घन गाळिति अश्रुधारा।
दुःखें नच वाहे वारा ॥ मज गमे ॥

शिवमंदिरिं भगिनी गिरिजा।
भेटे तिस सागरभाजा ॥ मज गमे ॥

यापरी। सिंधुमंदिरीं। जात सुंदरी।
पूर्ण जलसरिता।
शिवगिरिजा दर्शनमुदिता ॥ मज गमे ॥

१९०१, पुणें.

## मोगऱ्याचा हार

[ चाल : नृपममता रामावरती ]

मुलगा— हा हार शुभ्र किति आई।
किति कोमल सुंदर पाहीं ॥ क्षणभरी ॥

किति वास मधुर या येई।
मम चित्त ओढुनी घेई ॥ बघ तरी ॥

कशिं फुलें डंवरलीं असतीं।
किती अलंकार त्यापुढती ॥ बहुपरी ॥

भूवरी। जन्म घे तरी। वास जनशिरीं।
कसा हा मिळवी।
जनमनें कशानें वळवी ॥ वद तरी ॥ १ ॥

आई — मधुवासें प्रिय हा सकलां।
स्वगुणांनीं तूं हो बाळा ॥ त्यापरी ॥

हा धवलत्वें सुंदरसा।
चारित्र्यें शोभे तैसा ॥ तूं तरी ॥

हा दिपवि जसा नगभारा।
तेज तूं लोपविं धीरा ॥ त्यापरी ॥

यापरी । वागशिल जरी । सकल जन तरी
तुजसि मम तनया ।
शिरिं धरितिल हारासम या ॥ कधिं तरी ॥

१९०३, पुणें.

## काळ

कोठें असे सकलपंडितमुख्य भोज ?
कोठें शिकंदर जगद्विजयी सुराज ?
कोठें स्वधर्मपरिपालक श्रीशिवाजी ?
कोठें तदीय यशवर्धक वीर बाजी ? ॥ १ ॥

ते राजकारणपटूत्तम धीट नाना
कोठें न कां दिसति ओटित कोण त्यांना ?
लोकैकवीर रणधीर मुरारबाजी
कोठें लपोनि बसले कळतें न आजी ॥ २ ॥

कोठें असे मयसभा स्पृहणीयशोभा ?
निस्तेज कां मज कधीं पृथुची यशोभा ?
धारा कुठें सकळ लोक ललामभूता ?
तें हस्तिनापुर कुठें हरि ज्यास त्राता ? ॥ ३ ॥

गेले कुठें सुकवि जे प्रिय शारदेसी ?
नेलें कोणीं अखिल भारतसंपदेसी ?
गेलें कुठें बहुल वैभव पेशव्यांचें ?
व्यापार-कौशल्य कुटें लपलें चिनाचें ? ॥ ४ ॥

कां श्मशानमया बनलि रोमकराजधानी ?
कां ग्रीकराष्ट्रमहतीहि न येत कानीं ?
केलें कुणी परमर्दीन दमास्कसातें ?
नेलें कुणी मिसरच्या सुयशोधनातें ? ॥ ५ ॥

वाजीगजादि नवरत्नसुजातकोष,
प्राचीन वैभव नितान्त तसें अशेष;

स्तंभादि वीरजयसूचक वस्तुजात
केलें कुणी सकल हें स्मृतिमात्र ज्ञात ? ॥ ६ ॥

स्थित्यंतरा करित कोण असा विदेही ?
कीं नामरूप गुणवर्णन त्यास नाहीं ?
छे; सर्व हें वितथ; नाश तयास आहे—
तो ' काळ ' जो करितसे स्थितिभेद या हे ॥ ७ ॥

१९०३, पुणें.

## कोणी कोणास तरी

[ आपल्या रूपाचाच अभिमान धरणाऱ्या एका आचरटास उद्देशून. ]

[ चाल : श्रीहरीच्या वेणुनादें ]

तुज बघुनी वाटतें कीं भ्रम पावे विधिमती
पुरुषातें अर्पि कसा मधुरा ही स्त्र्याकृति ।
कोमलता, वर्णशोभा; तनु तनुला ही अति
जरि असतीं स्त्रीप्रती सार्थकता पावती ॥ १ ॥

१९०५, पुणें.

## सगुण स्वरूप

[ पंढरीस पांडुरंगाची पायभेटी झाली त्या वेळीं या चार पाकळ्या अर्पण केल्या होत्या. ]

[ चाल : नाहिं सुभद्रा या वार्तेतें ]

**धन्य पंढरी ! धन्य भीवरा ! धन्य चंद्रभागा !**
**भक्तांसाठीं वैकुंठींचा नाथ जिथें जागा ॥ ध्रु० ॥**

**स्वानंदाचा गाभा, शोभा ब्रह्मांडळाची ।**
**वैरागरिचें रत्न मनोहर, आशा पुण्यांची ॥**

कैवल्याचें निधान केवळ, माता संतांची ।
तो प्रभु झाला सगुण सांवळा गोकुळिंच्या रंगा ॥ धन्य० ॥ १ ॥

भक्तराज तो पुंडलीक या जगीं एक जाणा ।
हांक जयाची ऐकुनि धांवे लक्ष्मीचा राणा ॥
करावयास्तव जगत्रयाच्या अखंड कल्याणा ।
कटिं कर, समपद, विटेवरी करि उभा पांडुरंगा ॥ धन्य० ॥ २ ॥

स्वच्छंदें सच्चिदानंदपद रमे वाळवंटीं ।
'जय जय विठ्ठल' नाद एक हा संतांच्या कंठीं ॥
पहावया स्वानंदसोहळा सुर करिती दाटी ।
'पुंडलीकवरदा हरि विठ्ठल' रंगवि दिग्भागा ॥ धन्य० ॥ ३ ॥

१९०८, महाद्वार पंढरी.

## नट मित्रास पत्र *

दिंडी

ज्येष्ठ बंधो ! साष्टांग नमस्कार !
बांधवाचा घे आधिं गुणाधार ।
मान्य करुनी ही विनंती विशेष
वृत्त ऐकें सप्रेम मम अशेष ॥ १ ॥

पत्र पूर्वी तुज पाठविलें त्याचें
त्वरें प्रत्युत्तर खास यावयाचें ।
असें आधीं घेतलें मन्मनानें
परी ठरलें भलतेंच अनुभवानें ॥ २ ॥

पाहुनियां परि गद्य पत्र याचें
कठिण तुमचें मन, कठिण द्रवायाचें ।

* कै. गोविंदाग्रजांनीं हें पत्र सुप्रसिद्ध नट रा. रा. गणेश गोविंद बोडस यांस पाठविलें होतें.

शब्दसुमनांचा म्हणुनि करुनि झेला
पाठवीं मी; हा तरी वरिच झेला ॥ ३ ॥

जरा तुमच्या मी दृष्टिआड होतां
सृष्टिआडहि झालोंच काय आतां ?
वाढलें हें जरि अंतर स्थळाचें
काय प्रेमांतहि तेंच व्हावयाचें ? ॥ ४ ॥

आळसानें कीं हा प्रकार झाला ?
पात्र किंवा मी नसें उत्तराला ?
राग अथवा का अजुनि नाहिं गेला ?
प्रेमसिंधुच कीं मुळीं शुष्क झाला ? ॥ ५ ॥

निकट असतां जो स्नेह दाखवीला
भासला तो तें सत्य सम्मतीला ।
आजि कळला परि खरा अर्थ त्याचा
भासला कीं तो तुझ्या अभिनयाचा ! ॥ ६ ॥

खरा नट तूं, रे नटवरा, खराच
तारतम्याचें ज्ञान परि न साच ।
अभिनयाची तुज शक्ति तर असावी
समय पाहुनि ती परी दाखवावी ॥ ७ ॥

रंगभूमी अभिनयें भूषवावी
तीच वृत्ती सर्वत्र परि नसावी ।
कालपट जरि दृष्टीस आड आला
तरि न विसरावें कधीं मित्रतेला ॥ ८ ॥

एकट्यासाचि तुज दोष देत नाहीं
वृत्ति सर्वांची हीच दिसत पाहीं ।
कांहिं काळें भेटतां तुम्हां कोठें
ओळखीसहि विसराल असें वाटे ॥ ९ ॥

ओघ कवितेचा येथवरी चाले
पत्र तुमचें इतक्यांत हेंच आलें ।
खिन्न माझें मन सु-प्रसन्न होत
प्रवाहाचा बदलुनी रोख जात ॥ १० ॥

पुढिल कार्यक्रम अजुनि ठाम नाहीं
परस्वाधिन ही गोष्ट असे पाहीं।
छत्रपतिच्या पत्रांत परि तयाचा
कांहिं केला उल्लेख तोच वाचा ॥ ११ ॥

लिखनाचें कौशल्य फार माझें
तुझा उपहासच त्यास योग्य साजे।
लिहित असणें तुम्हांस नित्य पत्रें
लिखनाचें कौशल्य हेंच सारें ॥ १२ ॥

असें वरचेवर पत्र पाठवावें
आणि प्रकृतीतें नित्य जपत जावें।
उण्या-अधिकाचा राग नच धरावा
भूतकालासह तोहि भूत व्हावा ॥ १३ ॥

बहुत लिहिणें यद काय पाहुनीहि
विनति नित्याची लोभ असावा ही।
काव्यदेवीतें द्यावया विराम
घेइ आज्ञा—

आपला—

मित्र,

'राम' ॥ १४ ॥

ओवी

मुक्काम-नागपूर शहर
वार-पवित्र गुरुवार।
तारीख-एकोणीस नोव्हेंबर
एकोणीसशें आठवी ॥ १ ॥

१९ नोव्हेंबर १९०८, नागपूर.

क्षणभर येश्या प्रेमा थांब !
अंधिर मनासह जासी कोठें ?
चुकशिल—संकटिं पडशिल धारे,
जग हें सारें बा रे खोटें !
हृदया सोडुनि; मजला म्हणोनी, जाई न कोठें लांब !

क्षणीं पांढरा, क्षणींच काळा
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुलाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग ?

जग सगळें हें देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें !
स्मशान कीं हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भावडें, सरळ रोकडें, शरांत करिशिल काय ?

प्रेमा येथं शपथ लागते !
प्रासावांचुनि कविता अडते !
कर्त्यांवांचुनि कार्यहि घडतें !
देव बिचारा, तया न थारा, तुझी कथा मग काय ?

तुझ्यासारख्या तुला सोबती—
मिळेल का या अफाट जगतीं ?
—संकुचितहि हें अफाट जरि अति—
आणी न मना, अशी कल्पना, अगदीं भोळा सांग !

कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारहि दिसेल कोठें,
अपमानाचेंही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग !

टाकिल कुणि तुज धिक्कारानें,
रक्षिल किंवा उपहारानें,

 

फसविल नकली कीं मालानें,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग !

म्हणुनि लाडक्या ! कुठें न जाई,
या हृदयांतचि लपुनी राही,
योग्य मित्र नच सुख तरि नाहीं !
कुसंगतीहुनि, वेड्या ! मानीं, फार बरा एकान्त !

१९०९

केशवसुत मेले ?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले !
इंग्लंद भूमि शेलेची माहेर जडाचें बनलें,
सन्देश गूढ जे त्याचे तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या या बघतां मानस हंसलें !

देवांचे हेतु न पुरले,
अर्धेच कार्य जें उरलें,
ते येथें करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले ! केशवसुत गाउनि गेले !

एकेका शब्दें भरले काव्याचे अद्‌भुत पेले !
ज्यांसाठीं मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले—
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुतहृदयीं झेले !

अनुभवुनि निजानंदानें
मग त्यांचें केलें गाणें,
श्वासाच्या कारंज्यानें
चहुंकडे उधळुनी दिधलें ! केशवसुत गाउनि गेले !

हे तुषार पडतां अंगीं बिंदूंचे सिंधू झाले !
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेलें !
मरणासचि आलें मरणें, मग केलें त्यानें काळें !

तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सांपडलें !
स्वच्छंद अचेतन झालें !
नश्वर तें ईश्वर केलें ! केशवसुत गाउनि गेले !

भेदभाव विलया गेला, सूक्ष्मांत स्थूल मिळालें !
गगनाचे फाटुनि पडदे दिसलें जें व्यापलिकडलें !
मरणाचें मूळच तुटलें, जन्माचें नातें सुटलें !
वस्तूंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आलें,
ब्रह्मही ब्रह्मसें ठरलें ! केशवसुत गाउनि गेले !

कळलें कीं 'आम्ही कोण', *'हरपलें श्रेय' सांपडलें;
आत्मा हो 'वेडापीर', सृष्टींत 'भृंग'सा रंगे;
मारुनियां 'गोंफण' काळा निज 'निशाण' नभिं फडकविलें !
ऐकतांच विजयि 'तुतारी'
हो चिरंजीव 'म्हातारी'
मग वाजवितांच 'सतारी'
सर्वत्र 'अपूर्णा' झालें ! केशवसुत गाउनि गेले !

या स्थितींत त्या ब्रह्माची ब्रह्माशीं मिळणी घडली,
जें चिरंतनाच्यासाठीं सांगता तयाची झाली.
परि जनता वेडी कुठली, "केशवसुत मेले" वदली !
परि जन्ममरण हें वारें
कल्पनाच नाचवि सारें !
मूर्खांनो ! रडतां कां रे,
कीं "केशवसुत ते मेले !" केशवसुत गाउनि गेले !

जे एकाठायीं होते, ते सर्वांठायीं भरले;
सर्वांच्या हृदयीं भरले सर्वांच्या जीवीं भिनले;
विश्व स्थिर ज्यांनीं केलें कां वदतां तेच निमाले ?

* हीं केशवसुतांच्या कवितांचीं नांवें आहेत. अरेरे ! हेंहि सांगावें लागतें !

लीलेनें त्यांनीं गातां
ही सजीव केली जडता,
अणुरेणूंमधुनी आतां
निघतील सर्यांचे चेले! केशवसुत गाउनि गेले

सर्व ठायिं सर्वहि काळीं सर्वांनीं ज्यास पहावें,
पाहतां पाहतां वाटे डोळ्यांनीं ज्यास गिळावें,
तो विषय होई मरणाचा जन बोले काय करावें?

जे चकव्यावांचुनि चकले,
जरि ते कुणि कांहीं भकले,
तरि 'गोविंदाग्रज' बोले
केशवसुत कसले मेले? केशवसुत गातचि बसले!

लेखनकाल : १९ फेब्रुवारी १९११. प्रसिद्धिकाल : ऑगस्ट १९१३.

## श्रीमत् राजाधिराज पांचवे जॉर्ज हिंदुस्थानचे बादशहा यांच्या राज्यारोहणानिमित्त पदें

(अभिवादन करीत)

अभिनंदन करितों प्रांजलि । मंगल काळीं ॥ ध्रु० ॥

प्रजाजनांच्या मंगल वचनीं ॥ वाद्यें वाजति सकलहि भुवनीं ॥
शुभलक्षीं सुमनोहारांनीं ॥ श्रीवसुंधरा तुज वरती ॥ पावन झाली ॥ १ ॥

पितामहीसम अमरसुखातें ॥ सेवि भूवरी त्रिभुवननृपते ॥
जी शोभा दे तव जनकातें । शांत वृत्तिला त्या हातें ॥ वसवीं भालीं ॥
क्षमादयागण किरणीं रमवी । सदाहि भूपा वसुधा देवी ॥
जन सारे सदया करि तेवीं । तव कृपाचंद्रिकाजालीं ॥ वैभवशाली ॥

(दावर दादार)

विनति नाहिं इतर कांहीं, सदाहि स्वजनकसम तूंहि पाहिं नाट्यकलानिरत जनां कृपेक्षणांहि ॥ ध्रु० ॥ कुंठित गति होति न जरि नृपकरीं ॥ ललितकला

सकला ॥ भूपाल तरि तयाला ॥ द्रुततर गति वितरुनि अति पसरवि यश दशदिशांहि ॥ १ ॥ चंद्रबिंब कांति पसरि जगभरि ॥ तिमिर जी निवारी ॥ होई न तापकारी ॥ शमधन जनिं उधळि सतत तदमृतकण निजकरांहि ॥ २ ॥

२२ जून, १९११, पुणें.

## स्मृतिगीत

[ माझ्या 'प्रेमसंन्यास' नाटकांतील नायिकेच्या तोंडीं हें गाणें ठेविलें आहे. उत्तररामचरित्रांतील 'तेहि नो दिवसा गताः' एतदन्त सुप्रसिद्ध श्लोकाची लीलेच्या— नायिकेच्या— कोमल हृदयावर पडलेली ही विततच्छाया आहे अशी कल्पना करून तिनेंच हें गाणें जोडलें आहे असें दाखविलें आहे. एरवीं भाषांतर करण्याची माझी इच्छा नव्हती. ]

( चाल : चंद्रकांत राजाची )

आठवतो का सांग, सखे ! तो काळ विवाहाचा
बाळपणाचा, मुग्धपणाचा, निर्मळ भावाचा ?
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेच जीव
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव !
पाहत होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या ।
जपति परोपरी प्रसन्नहृदया पुण्यमया माता ।
गेले ते दिन, सीते, यापरि, हा ! बघतां बघतां ॥

बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी ।
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकूं धुवुनी ।
तूं सीता ती; राम तोच मी; त्याच आज माता ।
परि जे गेले दिन ते आतां येतिल का हाता ?
कशास आशा नसती आतां–झालें तें गेलें !
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनीं भिजलें !

१९११

## गुलाबी कोडें

[ संध्याकाळीं सूर्य पश्चिम दिशेस असतांना पश्चिम तर तांबडी होतेच; पण पूर्व दिशेवरहि त्याच रंगाची छटा दिसते, हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. ]

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिम दिग्भागीं,
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.

परी पश्चिमाहृदयीं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे.

विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निज नाथा,
" शास्त्रज्ञा, पंडिता, उलगडा हें कोडें आतां !

अपरा वदनीं रमते लाली रविसहवासानें,
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें ?

रंग इकडचा तिकडे वळला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ? "

विनोदपंडित पति कौतुकला, हंसे तसा थोडें;
ओठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें !

वदे तिला, " हें रहस्य असलें कथीन कानांत ! "
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात !

ओढुनि जवळी, ऐकविला तिस मुकाच कानांत,
—गालावरचें गीत कसें तें वळवूं गानांत !

दूर सरकतां लज्जित बाला, प्राणनाथ बोले
" बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझें डोले !

रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गालीं !
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं.

चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं,
सांग वल्लभे ! नाचतसे कां त्यावरिं ही लाली !

रंग इकडचा तिकडे वळला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ? "

" कांट्यानें काढावा कांटा ", शास्त्रज्ञ ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें ?
हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ !
ओठगोष्ट मग कशीं बोललीं तीं मिटलीं तोंडें,
' गोविंदाग्रज ' रसिकां टाकी गुलाबीच कोडें !

सप्टेंबर, १९११.

## मनांतली पाल

[ कांहीं विचार मनांत आला आणि तितक्यांत पाल चुकचुकली म्हणजे मनाला धक्का बसतो; तसेंच कांहींहि अलौकिक करावयास जा, आधींच कसेसें वाटतें ! ]

( चाल : कसें मीं मारूं ? माझें नवलाचें पांखरूं० )

करितां कार्या । चुकचुके पाल ही वायां ॥ ध्रु० ॥

क्षणैक भरतें भलतें वारें । संभ्रमिं बुडतें जग हें सारें ।
कारागृहिंचीं उघडति दारें । समयिं अशा या ।
चुकचुके पाल ही वायां ॥ १ ॥

सजीवतेची उकळी फुटते । बेडी पायांमधली तुटते ।
नसती लाज जनाची सुटते । तोंच भिववाया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ २ ॥

ओळख निजरूपाची पटते । क्षणभर भेकड वृत्तिहि हटते ।
शक्तिहि सर्वस्वानें नटते । जीव तों घ्याया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ३ ॥

दृष्टिहि अनंत ठायीं शिरते । बघतां बघतां उलटी फिरते ।
चहूंकडे वा ठायिंच जिरते । विरते माया ।
चुकचुके पाल तों वायां ॥ ४ ॥

मर्यादेच्या सीमा सरती । अणूंत सर्वस्वाची वसती ।
'मी तूं' शून्यामाजीं रमती । वायुमय काया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ५ ॥

जडतां पारदर्शि जों होई । स्फूर्तिस पद अवकाशहि देई ।
कल्पकता जडरूपा घेई । ब्रह्मसयं माया ।
चुकचुके पाल तों वायां ॥ ६ ॥

अंधुक जें जें तें लखलखतें । 'असतें' सहजचि हातीं बसतें ।
नसतें तेंहि मग दिसतें । ठाव ना शून्या ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ७ ॥

होतों सुखी सदा ज्या गांवीं । पुन्हां आठवण त्याची व्हावी ।
नसती ब्याद टाकुनी द्यावी । निघावें जाया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ८ ॥

न दिसे कोठें अंतःकरणीं । नाहीं तैशी वातावरणीं ।
नाहीं कधीं पाहिली कोणीं । ज्या त्या ठायां ।
चुकचुके पाल परि वायां ॥ ९ ॥

न कळे चांडाळिण ही कुठली । निशिदिनिं अडवायातें उठली ।
कर्तव्याची चालच खुटली । मार रे मार ।
पाल ही प्रभो अनिवार ! ॥ १० ॥

मार्च, १९१२.

## पहिलें चुंबन

[ पहिलें फूल, पहिलें मूल— सर्व कांहीं पहिलें म्हणजे पहिलेंच ! तसेंच पहिलें चुंबन ! पहिल्याची अजब जादू दुसऱ्यांत नाहीं ! ]

( चाल : श्रवणांत पेरणि केली इ० )

जें मनास शिवलें नाहीं । ठावें न कल्पनेलाही । सुख असें ।
जें दिसे न कवण्या जागीं । जें अवर्ण्य वाणीलागीं । सुख असें ।
कविताही प्रतिभाशाली । कल्पितां जयातें थकली । सुख असें ।

एकदां | कष्टतां सदा | पुढतिं नच कदा- |
अनुभवा येई | तें पहिलें चुंबन देई | सुख असें ॥ १ ॥

चित्रासम रमणी बसली | नवयौवनशोभा ठसली | तन्मुखीं |
करिं ठेवुनि कोमल गाला | करि विचार न कळे कसला | सारखी |
डोले ना अथवा हाले | मग कुठलें बोले चाले | चित्र तें |
रंजना | मुग्धयौवना | करित कल्पना |
भावि कालाची | ( तुज अवें ) त्या दिवसाची | दिवस तो ॥२ ॥

चित्र हें पाहुनी असलें | नेत्रांचें सार्थक झालें | वाटलें |
परि तरंग अद्भुत उठले | अनुभवा न पूर्वी आले | जे कधीं |
जाउनी चोरट्या चालीं | झांकिले नयन करजालीं | न कळतां |
संभ्रमें | दचकली रामे | त्वरित विभ्रमें |
असवि कर दोन्ही | काढाया नयनांवरुनी | मम करां ॥ ३ ॥

तों वळुनी उजव्या गाला | उन्माद मानसीं भरला | स्वैरसा |
संमोह पडे नयनांला | मज विसर जगाचा पडला | क्षणभरी |
ठेवुनि मुख सखिच्या गालीं | आणिली गुलाबी लाली | त्यावरी |
हांसली | फार लाजली | दूर जाहली |
एक निमिषांत | झिडकारुनि माझा हात | हंसतची ॥ ४ ॥

हा खेळ एक निमिषाचा | एकदांच अनुभव त्याचा | नच पुन्हां |
तें वारें आलें गेलें | जन्माचें सार्थक झालें | परि रामे |
तें निमिष, स्थिति ती, सुख तें | चित्ताच्या दृष्टिस दिसतें ॥ सारखें ! ॥
स्वानंद— | कमलमकरंद | सुधानिस्यंद |
भुवरी आणी | जें वर्णावें तें कोणी | सुख तसें ॥ ५ ॥

एकदांच अनुभव त्याचा | आरंभ अंत सौख्याचा | एकदां |
आयुष्य न त्याला क्षणही | जन्महि पुन्हां त्या नाहीं | एकदां |
मनिं चटका लावायासी | पाठवी दैव जणुं त्यासी | एकदां |
निशिदिनीं | वाटतें मनीं | नित्य जन्मुनी |
मरण सोसावें | परि पहिलें चुंबन घ्यावें | फिरुनिही ॥ ६ ॥

एप्रिल, १९१२.

## आंधळयांची माळ *

रानोमाळ। *आंधळ्यांची चाले माळ ॥ ध्रु० ॥

दृष्टि न यांतिल एकालाही। एकामागें दुसरा जाई।
अर्धा डोळस रस्ता दावी। करी संभाळ। आंधळयांची...॥ १ ॥

तुकड्यासाठीं करिती ओरड। पैशासाठीं सारी धडपड।
तोंडीं हरिनामाची बडबड। हातीं टाळ। आंधळयांची...॥ २ ॥

यांना साजे नांव भिकारी। थोड्यासाठीं लोंचट भारी।
धरुनी धरणें बसती दारीं। उठवि कपाळ। आंधळयांची...॥ ३ ॥

यांना दिसतें केवळ 'आज'। नाहीं कांहिं 'उद्यां'ची लाज।
मिळेल कैशी अगदीं वांझ। सायंकाळ। आंधळयांची...॥ ४ ॥

येइल 'उद्यां' जरी एखादी। ठेवूं दृष्टि मिळवुनी आधीं।
न तरी येइल ही कर्मामधिं। पुन्हां जंजाळ। आंधळयांची ॥ ५ ॥

अशा विचारें देवापाशीं। मागति कधीं ही दृष्टि न खाशी।
काय म्हणावें या मूर्खांशीं। प्रभो संभाळ। तूंच ही आंधळी माळ ॥ ६ ॥

मे, १९१२.

## एखाद्याचें नशीब

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनी बैसती प्रभुपदीं पावावया बारि तें,
एकादें फुटकें नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारितें!
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हेमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;

* मात्रादोष येथें अगदीं अपरिहार्य आहे.

कोणाला वनदेवता वरिवसे मोदांत जी नाहते,
एकाद्यास्तुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !

झाडें ओढुनी पत्रयुग्म कुठें मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;

सारी पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी

पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला,
देवा ! तूं तरि ढाळि अश्रु करुनी, त्यासाठीं तो तापला !

जून, १९१२.

## राजहंस माझा निजला !

[ पतिनिधनानंतर अल्पावधींतच बापडीवर एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम होणार नाहीं ? ]

( चाल : उद्धवा शांतवन… )

हें कोण बोललें बोला ?
' राजहंस माझा निजला ! '

दुर्दैवनगाच्या शिखरीं । नवविधवा दुःखी आई !
तें हृदय कसें आईचें । मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होइ—

हें कुणी कुणां सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें—

मग ऐकावें या बोला । ' राजहंस माझा निजला ! '

मांडीवर मेलें मूल । तो हृदया धक्का बसला ।
होउनी कळस शोकाचा । भ्रम तिच्या मानसीं बसला ।
मग हृदय बधिरची झालें । अति दुःख थिजवि चित्ताला !
तें तिच्या जिवाचें फूल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल—
वाटतची होतें तिजला । ' राजहंस माझा निजला ! '

जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला ।
तो काळ नाथनिधनाचा । हतभागि मना आठवला ।
तो प्रसंग पहिला तसला । हा दुसरा आतां असला !
तें चित्र दिसे चित्ताला !
हें चित्र दिसे डोळयांला !
निज चित्र चित्तनयनांला,
मग रडुनि वदे ती सकलां । ' राजहंस माझा निजला ! '

करूं नका गलबला अगदीं । लागली झोंप मम बाळा !
आधींच झोंप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा !
जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा घेइल आळा !
वाजवूं नका पाऊल !
लागेल तया चाहूल !
झोंपेचा हलका फूल !
मग झोंपायाचा कुठला ! राजहंस माझा निजला !

हें दूध जरासा प्याला । आतांसा कोठें निजला !
डोळ्याला लागे डोळा । कां तोंच भोंवतीं जमलां ?
जा ! नका उठवुं वेल्हाळा । मी ओळखतें हो सकलां !
तो हिराच तेव्हां नेला !
हिरकणीस आतां टपलां !
परि जिवापलिकडे याला—
लपवीन ! एकची मजला ! राजहंस माझा निजला !

कां असलें भलतें सलतें । बोलतां अमंगळ याला ?
छबकड्यावरुनि माझ्या या । ओंवाळुनि टाकिन सकलां !
घेतें मी पदराखालीं । पाहूंच नका लडिवाळा !

मी गरीब कितिही असलें ।
जरि कपाळ माझें फुटलें ।
बोलणें तरी हें असलें—
खपणार नाहिं हो मजला ! राजहंस माझा निजला !

हें असेंच सांगुनि मागें । नेलात जिवाचा राजा ।
दाखविलाहि फिरुनी नाहीं । नाहिंत का तुम्हां लाजा ?
न्यावयास आलां आलां । राजहंस राजस माझा !

हा असा कसा दुष्टावा ?
कोणत्या जन्मिचा दावा ?
कां उगिच गळा कापावा—
पाहुनी गरिब कोणाला । राजहंस माझा निजला !

हे काळे कुरळे केश । खेळतात डोक्यावरतीं ।
ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी ही असती ।
हें तेज अशा रत्नांचें । झालें का आहे कमती ?

कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल—
मी असाच झांकिन याला । राजहंस माझा निजला !

या अर्ध्या उघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं !
या अर्ध्या उघड्या तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ?
अर्थ या अशा हंसण्याचा । मज माझा कळतो बाई !

हें हंसें मुखावर नाचें !
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे !
इतुकेंहि कळे न कुणाला— । राजहंस माझा निजला !

या माझ्या मानससरसीं । सारखें प्रेमजल वाही ।
त्या तरंगलहरींवरतीं । राजहंस पोहत राही ।
सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही !

नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकसुमणी,
मी दिले तया काढोनी,
मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !

ते वैकुंठेश्वर गेले । पदिं त्यांच्या अर्पायाला ।
ही अखंड या अश्रूंची । वैजयंति मोहनमाळा !
मी करित असे केव्हांची । धरुनिया उराशीं बाळा ।

कौस्तुभ हा माळेमधला !
हृदयाचें कोंदण झाला !
तो चोराया कां आला ?
दैत्याहुनि दैत्यचि झाला ! राजहंस माझा निजला !

हें असें जाहलें म्हणतां । तरि देवचि निजला कां हो ?
जरि निर्दय होउनि निजला । आळवीन फोडुनि टाहो ।
कीं असा पोटचा गोळा । पोटांतचि देवा राहो !

ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,
हा तुमचा कावा सगळा ! राजहंस माझा निजला !

जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला ।
ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला ।
हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला ।

मी मुका असा घेतांना—
हा पहा—पुन्हां हंसलाना !
कां अशा फिरवितां माना ?
सुख खुपे काय डोळ्यांला ? राजहंस माझा निजला !

हें सर्वस्वाचें फूल । त्या भंवतीं झाला गोळा ।
मी बघतें– कधिंचा आहे । त्यावरतीं तुमचा डोळा !
एकदां करावा त्याचा । वादानें चोळामोळा !

सर्वांच्या मनिंचा लाहो,
हाच ना ? स्पष्ट बोला हो,
मी इतकी वेडी का हो—

कीं हेंहि कळेना मजला । राजहंस माझा निजला !

जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं !
पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई !
तो देह खांच दगडांत–छे: । नको नको ग बाई !

हृदयाची खणुनी खांच,
झांकिन मी बाळ असांच,
दु:खांचे फत्तर साच !

जा ! जाउनि सांगा काळा । ‘ राजहंस माझा निजला ! ’

जरि काळाचाही काळ । बाळाला न्याया आला !
तरि नाहीं मी द्यायाची । या जीवाच्या जीवाला !
सारखीं गाउनी गाणीं । निजवीन कल्पवर याला !

जा ! करा आपुलें काळें !
माझेही दमले डोळे !
प्राणांचें पसरुनि जाळें—

मी निजतें घेउनि याला ! राजहंस माझा निजला !

* * *

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी ।
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदां फिरुनी ।
पाहिलें नीट निरखोनी । क्षणिं तीही गेली निजुनी !

मग पुन्हां कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली ?
परि मति या प्रश्नें हटली—

“ बोलेल कोण या बोला । राजहंस माझा निजला ! ”

मग मातापुत्रांवरि त्या । तरु गाळिति कोमल पानें ।
ढाळिति लता निज सुमनें । पशुपक्षिहि रडती गानें ।
दशदिशा दगडही कढती । मन दुभंगुनी शोकानें ।
दुमदुमतें स्थळ तें अजुनी,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं !
ऐकाल याच बोशला —' राजहंस माझा निजला ! '

जुलै, १९१२

## वेडा

[ कुणाला कशाचें वेड लागेल आणि त्याचा शेवट कशांत होईल, हें कोणीं सांगावें ? ]

वेडा कोणि जगास सोडुनि पळे बाहेर गांवाचिया,
मैदानांत भयाण जाउनि उभा राही; न कांहीं बघे
संध्यारंग नभःपटांत रमती गांवीं न ते त्याचिया
वेडाचे नवरंग चित्तफलका रंगाविती; तेच घे.

त्याचें वेड कशांतुनी उपजलें कोणास हें नाकळे —
त्याचें त्यासहि नाकळे, मज गमे देवाहि ना ठाउकें !
त्याची ती विमनस्कता नच वदे कांहीं जरी आगळें,
वेड्याच्या हृदयास आपण तरी कैसें म्हणावें मुकें ?

व्हावें काय तयास हें समजण्या रस्ता न कांहीं उरे,
शून्या दृष्टि गमे तिच्यांत दिसलें कोणांविशीं प्रेम न !
तोंडाचा पडदा विकार विसरे; बेरंग सारा स्फुरे;
होतें का मग भावशून्य नुसतें ओसाड त्याचें मन ?

छेः ! मैदान उजाड तें; तरि तिथें हा वायु आहेच ना ?
वारें कांहिं तरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना !

[ २ ]

तारा एक तशांत पश्चिमदिशा फोडून बाहेरली.
संध्या कुंकुमिं दिग्वधूच टिकली लावी रुपेरी जणूं!

वेड्यानें तिजला भकास नयनीं येतांक्षणीं हेरली;
हांसे भेसुर तो; सबेंच अपुलें हृद्‌गान ल.गे म्हणूं!

वाटे कीं पटली तिला बघुनियां त्या खूण कांहीं तरी.
तोंडाच्या पडद्यावरी उमटले चित्तांतले खेळ ते!

कांहीं वेळ तसाच पाहि तिजला; एकाग्रता ती खरी
आशा प्रीति तसेंच वेड असलें, यांनाच ती साधते!

तारा आड ढगां–जरा क्षणभरीं झांकून राहे जर
वेड्याच्याहि तरी विषण्ण वदनीं काळीच छाया दिसे!

केला कांहिं विचार – निश्चय; वठे तच्चित्र तोंडावर,
भासे दीपसम स्मशानतिमिरीं तें निश्चयाचें पिसें!

नैराश्यादि विकार तीव्र करिती हा खेळ ऐसा पहा—
आश्चर्यें बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा!

[ ३ ]

किंचित् मस्तक हालवी; पुटपुटे तोंडांतची कांहिंसें
तारास्थानपथें सवेग मग तो चालावया लागला;

हातीं तीस धरीन– निश्चय दिसे; धांवे पुढें तें पिसें!
टाकी तारलि पावलें झपझपां; नाहीं मुळीं भागला!

काळी घोर निशा; उदास हृदयीं तैशी निराशा जडे—
तारा तारक त्या तमीं; मनिं जसा तो एक आशाकण,

पायांखालुनि जाति डोंगर नद्या– पाही न मार्गे पुढें;
वर्षें कैक असाच चालत तरी लाभे न तारांगण!

वेडा यापरि जातजात पुढतीं झाला कुठें नाहिंसा!
तारा ती दिसते अजून! परि हो पत्ता तयाचा कसा!

काळाच्या उदरीं कधीं भटकतां कोणा कुठेंही कसा
वेडा सांपडतां, कथा मज– पुढें झालें तयाचें कसें?
त्याचें वेड तरी कुणास मिळतां द्या तें मला आणुनी;
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी!

ऑगस्ट, १९१२.

## मुरली

[ प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून भक्तीच्या मोकळ्या भरारींत भक्त-भगवंतांचें पूर्णैक्य होत असतें, हें दाखविण्यासाठीं स्त्रीहृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवत कवींनीं 'राधा गौळण' कृष्ण-परमात्म्यासमोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळांत भोळ्या भाबड्या भक्तिप्रीतीच्या संयोगाचें इतकें ठळक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सांपडणार नाहीं. म्हणून या गीतांत राधारूपानें भक्तजीवात्मा दाखवून प्रीतिभक्तीच्या बदलत्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदां तरी येतोच कीं, ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटतें. आणि तेव्हां मात्र, बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची–प्रत्युत्तराची–याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मात्र मनुष्य पुन्हां भोंवऱ्यांत गुरफटतो. या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिति (कडवीं १४।१८।२१।३२। ३७) दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे— ]

'गोविंदाग्रज'

ही एक आस मनिं उरलि ॥
कन्हया! बजाव बजाव मुरली! ॥ ध्रु० ॥

जरि फुटले दोन्ही कान ॥ नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥
बघ वृत्ति वृत्तिमधिं मुरली ॥ कन्हया! बजाव० ॥ १ ॥

कां गाणं मजला व्हावें ॥ चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टीला केवि दिसावें ॥
मम आस नसे परि पुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २ ॥

मी अगदीं भोळी राधा ॥ तूं माधवजी ! नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनि झुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३ ॥

चांदणें चहूंकडे खुललें ॥ फत्तरही सारे फुलले ॥
आनंदें विश्वहि झुललें ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४ ॥

तीनेंच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥
जगतींच सारी जणुं जिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ५ ॥

अणुरेणुहि देहीं स्थैर ॥ भिन्नता विसरली वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥
प्रेमाची दुनिया उरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ६ ॥

बुद्धीचा तुटला धीर ॥ आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥
बघबघतां दृष्टिहि विरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ७ ॥

कथुं काय काय मज वाटे ॥ आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥
शून्यांत परार्धें भरलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ८ ॥

जन्माचें झालें चीज ॥ कायमची मेली नीज ॥
विश्वांचें गवसे बीज ॥
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ९ ॥

मायेची मेली विजली ॥ परि खऱ्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥
सुकलेलीं बिजें भिजालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १० ॥

कोसळति सरींवर सरी ॥ लहरींवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥
अवकाशें तुडुंब सगळिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ११ ॥

पुष्पाविण येई वास ॥ वाऱ्याविण चाले श्वास ! ॥
हर्षविण आतां हास ॥
मरणाविण सुटका झाली ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १२ ॥

ब्रह्मगोल त्वन्मय झाला । चहुंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥
मी मला शून्य या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १३ ॥

सांवळ्या यशोदाबाळा ! बंधाला पडला आळा ॥
स्वैराचा वाढे चाळा ॥
बावरी राधिका बनलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १४ ॥

किति करूं कन्हय्या ! धावा ॥ गा, नाच, वाजवि पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥
यावांचुनि इच्छा नुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १५ ॥

एकेका ऐकुनि सूर ॥ दुःखाचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥
न कळे ही लागे कसलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १६ ॥

तूं मनांतला चंडोल ॥ मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल ॥
तरि खोल हृदय या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १७ ॥

बोल, बोल तव बिनमोल ॥ जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥
नातरी राधिका मुकलि ॥ कन्हय्या बजाव० ॥ १८ ॥

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा धरुनी सोल ॥
बघ मागुन राधा आलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १९ ॥

मुरलीची प्यालें भांग ॥ धडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥
आनंदवृत्ति पाझरलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २० ॥

उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणुं तुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २१ ॥

ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥
तुज भेटाया जणुं आलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २२ ॥

तिजमुळें होउनि दंग ॥ वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यांमाजि नादची मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २३ ॥

हृदयाचे ढोंक पडती ॥ अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥
मग एकच धडकी सगळि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २४ ॥

मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हांका मारित सुटली ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २५ ॥

सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २६ ॥

जीवाच्या कमळा भुलवी ॥ निजगुंजारवि त्या डुलवी ॥
पाकळी पाकळी खुलवी ॥
झुलवी त्या पाडुनि भुरळि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २७ ॥

कृष्णजी ! त्यांत तू भृंग ॥ त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करि उत्तुंग ॥
ही मोहरात्र ओसरलि ॥ कन्हय्या ! बजाव०  ॥ २८ ॥

चांदणं खुले दिलरंगी ॥ हो एक नादरसरंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २९ ॥

या रसीं देहकण न्हाले ॥ जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥
बघ फुलें तयांचीं झालि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३० ॥

करुनि त्या फुलांचा शेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥
शेला मज, आलें जवळि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३१ ॥

श्रृंगाररसानें नटली ॥ तुज राधा रमवूं झटली ॥
जन्मांची ओळख पटली ॥
कृष्णांत राधिका रमलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३२ ॥

बांकड्या अधरिं हा पावा ॥ वाकडाच डोला डावा ॥
किती वेळ असाच पहावा ?
अव खेळ करो वनमालि ! कन्हय्या ! बजाव० ॥ ३३ ॥

श्वासें मज हृदयीं भरवीं ॥ नादें कीं ओढुनि नेईं ॥
चुंबनें च दीं मज बनवी ॥
नव ओंठावरली लालि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३४ ॥

दृढ आलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावां ॥
तव देहिं देह मम जिरवि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३५ ॥

बघ आतां वटका भरली ॥ बोलाची पोशी सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥
ठायींच शुद्धिही हरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३६ ॥

जीवाचा पंछी प्यारा ॥ मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुंकडेच राधा झुकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३७ ॥

उरलें न शीत वा उष्ण ॥ कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥
जयनाद गात ही मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३८ ॥

चहुंकडेच आतां शांत ॥ विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥
मुरलींत शांतता भरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३९ ॥

भोगुनी तापमय उष्णा ॥ मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णां ॥
ही साक्ष मनोनन मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४० ॥

ही अखंड मुरली वाजे ॥ सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदाया लाजे ?— ॥
'कीं धन्य धन्य ही मुरलि' ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४१ ॥

त्या नादरसाचे प्याले ॥ मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥
मग गानिं वाजविति मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४२ ॥

सप्टेंबर, १९१२.

## हृदयशारदेस

[कोणी कवीनें आपल्या कवितेस 'शब्दशारदा' व प्रणयिनीस 'हृदय-शारदा' अशीं नांवें देऊन हें म्हटलें आहे.]

हृदयशारदे ! या कवनाचे बोल ऐक माझे !
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे,
तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागीं ठरवीलच फोल !

नवशब्दांचे धुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं.

तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग कांहीं,
तरि जादूनें जादूगारच काय फसुनि जाई ?

जरी शिरावर कुणीं बांधिला अमोल शिरपेंच,
दिसतो का तो ज्याचा त्याला ? स्तुतिचेंही हेंच !

शब्दांचा बाजार बदलतां जीवाची वेट;
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेठ !

प्रेमाच्या जिवलगे ! जिव्हाळा करितां रसस्फुरती
भिन्नरंगिं हजार रंग रंगति उचंबळुनि निवती !

शब्दचित्र परि काढूं जातां त्यांचिं उल्हासें,
रंग तयांचे उडुनी जाती निःश्वासासरसे.

जनिं जें दिसतें, मनिं जें बसतें, हृदयीं जें सलतें,
तें बोलावें— तंव हें वदतें भलत्याचें सलतें !

रस तारांचा नभीं पाझरे, भूवर नच येई;
शुष्क होउनी खालीं येतां शीतलता राही.

मूर्तरसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती;
नाद विरे परि नभींच; उतरे वारा भूवरतीं

हा मोत्यांचा सडा घातला वरतीं आकाशीं,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशीं !

आशीर्वचनीं शब्द तेवढे धांवुनि येतात;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयांत.

तीच दशा मम होते तुजला जावें जों गाया,
हृदयभावना मूर्तिमती तूं ! कविता तव छाया !

सुकला सुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां
हृदयशारदे ! शब्द-शारदा नको मला आतां !

धरी सांवरुनि कविता पडल्या हृदयाचा तोल !
मरत्या जीवा परी वांचवी तुझा प्रणयगोल !

प्रीतीचीं पाउलें उमटलीं जीं या हृदयांत,
जीवस्वामिनि ! किती दिवस वद वसूं तींच गात ?

प्रणयतटिनि ! तूं दूर न राहीं– करपलाच जीव;
हृदयसाक्षिणी ! प्राणरक्षिणी ! न कां येत कींव ?

तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते,
नेत्रयुग्म हें तीवर खिळतें; नच कधिंही हलतें !

तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरतीं,
जीव कोंडला वांचविण्याचें बळ त्याच्या हातीं.

अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामीं !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामीं !

वस्तुवस्तुवर नेत्र वठविती तव मूर्तिच एक !
जग ताराया जणूं प्रीतिचा त्वन्मय अभिषेक !

नामाचा जप तुझ्या सारखा; अश्रूंची स्मरणी—
प्रतिक्षणीं प्रतिनामें वाढे तिच्यांत एक मणी !

ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहानें,
कधिं येशिल, कधिं घेशिल मजला हृदयीं प्रेमानें ?

प्रीतीनें रंगलीं पावलें हृत्पटिं नाचीव;
प्रेमामृत पाजुनी, देवते ! भक्ता वांचीव !

प्रेमदृष्टिनें, प्रिये ! मिळवितां डोळ्याला डोळा,
पंचप्राणहि होतिल माझे नयनीं क्षणिं गोळा !

हृदयीं जडवीं; चरणीं तुडवीं, मग त्यां ओढुनियां,
सोक्षमोक्ष करि, तार मार वा, प्रेमाची दुनिया !

हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयीं दे स्थान,
वक्षःस्थळिं तव पडतां पडतां येऊं दे मरण !

या प्रेमाचीं, तुझ्या यशाचीं गाणीं या नादीं
गाइन; जाइन गात गात तीं तुजसह ईशपदीं.

प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला !

त्या प्रीतीला कविनें पुसतां, " गाऊं काय गडे ? "
प्रीति म्हणे, " जा तिलाच गाई जी तव हृदयिं जडे ! "

हृद्या, नयनां, ध्याना, गाना, जिनें जिंकिलेंस,
' गोविंदाग्रज ' गाइल त्या तुज हृदयशारदेस !

ऑक्टोबर, १९१२.

चित्तकोकिला ! प्रेमा गाया जगद्गायनाला
पंचप्राणांचा पंचम तव लावि याच काला.

हृदयवसंतहि भुलला, भुलला जीव तुझ्या ग
वृत्तिलता वहारल्या, फुलांनीं विखरविलीं भा

प्रेमाश्रूंच्या मधुबिंदूंच्या करूं सेचनातें,
संतोषाच्या श्वासाच्या या मंदमंद वातें.

प्रेमरसाच्या या वर्षावें भूदेवी हृदयीं,
तृणांकुरांच्या रोमांचांची पेरणीहि व्हावी

चला मनाच्या मळ्यांत पेरूं प्रीतीचीं बीजें;
चित्तगीत-पुष्पें मग उधळूं; कोण उगिच लाजे ?

आज जगाची लाज सोडुनि होऊं या वेडे !
प्रीतिपटाच्या खालीं दडवूं जें जें मनिं तेढें.

पहा नदीच्या जलांत संध्यारंग उडवा घाली !
हृदयनदाच्या जलीं पडूं द्या प्रीतीची लाली.

दीप तटींचे जलीं करविती किरणांचा नाच,
नयनदीपकिरणांस नाचवा हृदयजलीं साच.

काळ्या काळ्या ढगांढगांवरि संध्येची लाली,
काळीं हृदयें तशीं रंगतिल प्रेमें जरि धुतलीं.

उषा-संगमीं तप्त-करांचा रवि होई गार,
तद्विरहें तापतां जगावरि गाजवि अधिकार !

त्या मंगल संगमीं रंगले सृष्टीचे गवई,
मंजुळ गुंजारवें प्रीतिच्या गुणगुणती कांहीं !

आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या या,
वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या !

कळया कोंवळया, हलती कानीं डूल मजेदार;
उषा-वधूवरि सुमाक्षतांही करिती भडिमार,

नवरदेव नाचरा निघाला, ती पाठोपाठ—
लाजुनि झाली उषा दूर; कुणि या पदरा गांठ.

नव तेजाची साखर वांटित कोठें तीं लपलीं ?
स्त्रीपुरुषांची जोडी किंवा एकरूप झाली ?

श्रीमंतांच्या घरीं चालती खेळ असे फार,
परी गरीबां, प्रीतिदेवते ! तुझाच आधार !

क्षयी कलंकी चंद्रासाठीं, प्रेमा ! ऊठ तरी,
वसुंधरेशीं लग्न तयाचें लावी शीघ्र करीं.

दिशेदिशेच्या दिक्पालांनो ! सावधान सगळे !
संध्यापट-पीतांबर काढा; तारावल जमलें.

प्रेममंगलाष्टकें स[illegible]खीं जगीं गाजवा हो;
मेघांचा चौघडा [illegible]गनिंचा जगीं वाजवा हो.

नक्षत्रांच्या करा [illegible]ता, शुभ मंगल बोला;
सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनिं सकलां.

दुग्धचंद्रिका जिकडे तिकडे नवरदेव ओती,
पुष्परेणु-शर्कराकणांची पृथ्वी करि भरती !

त्रिभुवनीं साऱ्या दुग्धशर्करा वांटा ही असली.
म्हणेल जग मग ' दुधांत कीं या साखर ही पडली '

हृदयदीपिके ! प्रीतिदेवते ! मार्ग असा दावी,
जिकडे तिकडे शुभलग्नें हीं सारखींच लावीं !

चराचरांनो केवळ खेळा प्रेमाचे खेळ !
दुसरें तिसरें नकोच कांहीं करा हृदय-मेळ !

दिनरजनींची जोडी एकच, चांदणें न तिसरें —
त्या दोघांचें संमीलन हें जमलें एकसरें !

एकएकट्या फिरतां कां ग, तारांनो ! गगनीं ?
जमवा जोड्या प्रेमाच्या मग गा फिरतीं गाणीं !

निळ्या नभाला द्या ग उजळा शुभ्र चांदण्याचा,
प्रेमासाठीं प्रेमसागरीं खुशाल मग नाचा !

महासागरा ! उगाच लाटा उधळतोस कां रे ?
विझवी वडवानलासि पिउनी प्रेमाचें वारें !

नदामुखाचें चुंबन घेतां ज्या लाटा उठती,
त्याच तेवढ्या नाचूं दे; त्या प्रेमपाठ गाती !

हृदय सळसळे, फेंस उसळला, टाकुं नको खालीं,
त्या फेंसाचे गेंद रुपेरी नदीपदीं घालीं !

नदीनदीच्या पदीं गांधुनी प्रेमाचे चाळ,
नाचूं दे तुजभंवतीं त्यांना या रानोमाळ !

वनांत लपलेल्या वेलींनो ! या ग बाहेर !
वृक्षांचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे घेर

गवताचा गालिचा कोंवळा हळू हळू चाला,
पायघड्या पसरल्या– फुलांचा सडा वरतिं घाला.

वाऱ्यावरतीं वरात काढा जीवाभावांनीं,
वनदेवींच्या मुलींनो ! या ग, या लौकर नटुनी !

कुणि गुलाबी पातळ नेसा, शालू कुणि हिरवा,
कुणि मोत्यांची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा !

चला चला ग फुलाफुलाला देऊं या नांव !
जसा जयाचा येइल दिसुनी प्रेमाचा भाव !

शोभापुष्पें कमलें; नुसती शोभा त्यां ठावी !
काव्यपुष्पपदवीही दे त्यां सरस्वती देवी !

सूर्यकमल दिनपुष्प साजिरें दिवसभरीच फुले,
निशापुष्प तव आलक कुमुदिनि चंद्रा बघुनि खुले!

उषा-पुष्प जास्वंदीवरतीं तसा रंग त्याचा,
प्रथमपुष्प दिवसाचें भावहि अस्फुट वासाचा!

फुलें गुल्बशीवरतिं विहरती तांबुस अंगाचीं
संध्यापुष्पें संध्यासमयीं संध्यारंगाचीं.

तीन रंग दिवसांतुनि दावित फूल तेरड्याचें,
बालपुष्प तें; बालवृत्तिचे भडक रंग त्याचे!

यौवनपुष्पाचा निशिगंधा दिधला अधिकार;
हृदय खळबळे, वास दरवळे जों अपरंपार!

सुरकुतलें कोरांटीवरि जें कांठ्यांतिल फूल,
जरठ्पुष्प तें रजःकणांची वृथा उठवि धूळ!

एकलकोंडा नीरस भावहिं या धत्तूराचा,
स्मशानस्थ शिव सदा हावरा स्मशानपुष्पाचा!

धड न पांढरें, लालहि नाहीं, वासहि उग्र तसा,
गर्वपुष्प हें कण्हेर दावी, गर्वाचाच ठसा!

व्यर्थ पसारा वासावांचुनि या मखमालीचा,
दंभ-पुष्प परि नको, पथ न हा प्रेमळ चालीचा!

उगाच नांवें अशीं कशाला कुणास ठेवावीं!
मंगलकाळीं मंगलवदनीं मंगलताच हवी.

लीला-पुष्पें खुल्या दिलाचीं या शेवंतीचीं,
मुग्धा-पुष्पें हीं जाईचीं कोमल वृत्तीचीं;

शुभ्र मोगरा दंतनिदर्शक हंसऱ्या तोंडाचा,
हास्य-पुष्प तें; शुभ्र रंग हा दावित हास्याचा.

लालि गुलाबी जी लज्जेची रमणीच्या वदनीं;
गुलाब दावी लज्जापुष्पापरि ती निज सुमनीं.

मदपुष्पें हीं आम्रावरचीं मत्त मना करितीं,
पुण्य-पुष्प तुलसीदळिं साधी पुण्य मंजरी ती.

श्वासानें जें सुमन करपतें पारिजातकाचें,
हृदयपुष्प अतिकोमल तें अतिकोमल वासाचें.

सुकलें तरिही सुवास राखी; दढतेचा भाव;
प्रेमपुष्प बकुलाचें वसवी प्रेमाचा गांव !

त्या गांवाचा, त्या नांवाचा कायमदायमचा
रहिवाशी हा जीव गातसे प्रेमपाठ तुमचा !

वनदेवींनो ! तुम्हांसाठिं हा थाट बारशाचा !
फुलाफुलांचें नांव दाखवी भाव आरशाचा !

फुलें तुम्ही घ्या, फुलें मला द्या, प्रेमाची टेव,
कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देवघेव !

चला लतांनो ! मुलें बसवुनी कटिखांद्यावरतीं,
लग्न निसर्गासह लावी कविहृदयस्था प्रीति !

सृष्टिदेवता माता तुमची, कार्य तिच्या घरचें,
लग्न निघे माहेरघरीं मग आळस काय रुचे ?

हृदयपटावरि निजलज्जेचा लाल रंग उधळा,
प्रेमपल्लवीं लिहुनी कुंकुमपत्रें द्या सकलां.

प्रीतिदेविचें आज निघालें लग्न निसर्गाशीं;
वऱ्हाड जमलें, मुहूर्त भरला, धीर न कोणाशीं,

वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर म्हणुनी,
पराग उधळित, सुवास पसरित, कोमल हातांनीं !

हिमवंतींच्या जलीं मिसळुनी मरंदमय तेला,
स्नान सुमंगल घाला कोणी प्रीतिदेवतेला !

शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्यारंगांनीं,
अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणीतरी विणुनी.

हिमगिरिशिखरीं स्फटिकशिलांतरिं रविकिरणें शिरतीं,
प्रतिकिरणें पाझरती भराभर, अति कोमल असती.

मुग्ध अधरिंच्या गुलाबि रंगीं रंगवुनी त्यांना
त्या सूत्रांची काचोळी कुणि नवरीला द्याना !

पराग कोळुनि करुनि हरिद्रा उटी तिला लावा,
इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा.

शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्याचीं
वेढिंविरोदीं; सौभाग्याचीं लेणीं पायांचीं

रात्रीचें तम, उषा-रक्तिमा, कांहिं नका टाकूं;
प्रीतिदेविच्या सौभाग्याचें हें काजळकुंकूं !

मणिमंगलसूत्रांत चांदण्या चंद्र चटकदार,
तिला तिच्या भाग्याचा भगवान् निसर्ग देणार !

संध्याकालीं संध्यापटिं जो असे सूर्य गगनीं,
भरा प्रीतिची ओटी असल्या खणांनारळांनीं.

मयासुराची माया शिकुनी कविकल्पकतेनें,
मंगलभूषणरचना मग ही करा शीघ्रतेनें

मुक्या मनाचीं म्हणा मंगलाष्टकें, जीं न सरतीं
हृदयाश्रूंच्या दिव्य अक्षता वधूवरांवरतीं !

खुल्या दिलांचा मिलाफ घडवा मुहूर्त हा सरतां,
अंतरंगिचा अंतःपटही दूर करा आतां !

शुभमंगल वच तूंच बोल श्रीमहन्मंगला रे !
हृदयाचा चौघडा वाजवुनि विश्व भरा सारें !

पाउल त्यांचें एक एक मग जन्माजन्माचें,
सात पावलें सात जन्मभर सप्तपदी नाचे !

पतिव्रतांनो ! मंगल विश्वचि तुमचें माहेर,
वधूवरांना मांगल्याचा कराच आहेर !

सकल वेलिनो ! वगत त्यांनी चला चला पाहूं,
ही सोन्याची संधी ! मागें नका कुणी राहूं !

लाजाळू लाजते कुणाला ? नका तिला रुसवूं !
चला चिमुकल्या करवलीस त्या जाउनिया हंसवूं.

वंशतरुवरा ! असाच गा रे प्रेमाचे सूर !
हृदयस्था हृदयाशिं धरा कुणि; नका राहुं दूर !

जनिं कीं रानीं, जलीं स्थलीं, वा गगनीं पाताळीं,
जिवाजिवाला बांधा पसरुनि प्रेमाचीं जाळीं !

जलदेवींनो ! स्थलदेवींनो ! गगनदेवतांनो !
सकलां शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनो !

हृदयशारदे ! हृदयिं राहुनी करि मज प्रेमकवी !
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी !

पशूस करशिल मानव ! मानव नेशिल देवपदा !
देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूंच सदा !

प्रेमतरंगें चित्त तरंगे, आम्हाही रंगे !
जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें !

चराचरांनो ! स्थिरास्थिरांनो ! नश्वर ईश्वर वा,
प्रेमें जिंका ईशा; साक्षात् कीं परमेश्वर व्हा !

हृदयसंपुटीं स्नेहिं पाजळुनि जीवाच्या ज्योती,
प्रीतीच्या गंगेंत सोडुनी गा मंगल अरती !

हृदयाचीं राउळें उघडुनी हृदयदेवतेला,
पंचेन्द्रियकृत प्रभावळीमधिं वरच्यावर झेला !

इतर वृत्तिंचा देवीभवतीं चालूं द्या नाच;
जीवेंभावें तिच्या पुढें गा प्रेमपाठ हाच !

चित्ताच्या ताटामधिं अर्पा निजपंचप्राणां;
त्या नैवेद्यें हृदयदेवता-तृप्त होय जाणा !

प्रेम नसे तर जीव नको हा ! प्रेमें जग चाले !
प्रेमावांचुनि धिग् जीवन हें असे आज झालें !

प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेमपाठ बोले,
मनांतलें हें गाणें माझें जनांतलें झालें !

प्रियमित्रांनो ! प्रेमरंगणीं प्रेमानें नाचा !
मुक्या मनाला फुटली आतां प्रेमाची वाचा !

प्रेमपाठ हा सदैव गा रे प्रेमानें ताज्या,
आण घालितों अशी तुम्हांला गळ्याचीच माझ्या !

चला गड्यांनो ! या प्रेमाचीं ऋणें आधिं फेडा,
हेंच मागतों हात जोडुनी प्रेमाचा वेडा !

प्रेमपाठ हा सरता झाला, मन हो बेताल !
प्रेमरसें गुंगलें यावरी फुकट शब्दजाल !

त्या गुंगीच्या भरांत गातों पडुनि मना भूल !
क्षमा करा हो गातांना जरि होइ चूकभूल.

प्रेमपाठ हा रुचे कुणाला, न रुचे कवणाला,
एक नसे; जगिं आवडनावड तों ज्याची त्याला !

तशांत हें तर बोलुनिचालुनि मन वेडं झालें !
बंधन कसलें मग त्या ? गाई जें सुचलें रुचलें !

परवा न तया; हंसा रुसा, वा निंदा, कीं वंदा,
मी प्रेमाचा बंदा ! माझा हाच असे धंदा !

स्तुतिनिंदेचा भेदचि अवघा प्रेमजलीं जिरला,
भेदाभेदचि, न परि जीवही प्रेमांतचि विरला !

हृदयशारदा हृदयमंदिरीं चित्तरंग तारा,
छेडित बसली त्या गीताचा वाहे प्रेमझरा !

देहभरी त्या निर्झरलहरी थरथरुनी भिनल्या,
वृत्तिवृत्ति त्या गायननादें प्रेममयी बनल्या !

भाव बहिरला, जीव बहिरला, बहिरलाच आत्मा !
प्रेमरूपची, प्रेमलभ्यची, रमला परमात्मा !

त्या दोघांच्या या ऐक्याचा गाया जयवाद,
घुमत सारखा बधिरवृत्तितुनि प्रेमगीतनाद !

कायावाचामनसा होउनि प्रेमाचा भाट
'गोविंदाग्रज' आळवीत मग सदा 'प्रेमपाठ' !

नोव्हेंबर, १९१२.

करमत नव्हतं म्हणुनि एकदा असाच गेलों रानीं ॥
वसंत का– परि ऋतु दुसरा कधि कुणीं पाहिला कवनीं ? ॥
समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी ॥
बोलुनि चालूनि कवि पडलों मी— सहजचि त्याला लक्षीं ॥
वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें; पक्षि आणि कविराय ॥
तुम्हीच सांगा रसिका, आतां हवें आणखी काय ? ॥
सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया ॥
नवल वाटतें सांगण्या परि–कीं तें गेलें वायां ॥
" वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांहीं गाणें गाच ॥
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच ॥
बंधु तुझा मी— माझ्यासाठीं गळ्या लाग तूं गाया ॥
हें बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया ॥
स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत ॥
चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत ॥
गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर ॥
कीं शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर. " ॥
अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनी साच ॥
भिकारडें तें कांहीं केल्या परंतु ऐकेनाच ॥
गा म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती ॥
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती ॥
" एक मारितों दगड असा कीं पडेल वासुनी चोंच ॥ "
म्हणुनि वाकलों तसाच खालीं आवेगानें तोंच—
लगबग दिसले स्नेही माझे– संपादक त्या -ह्याचे ॥
म्हणूं लागले, " भले ! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें ? ॥
या अंकाचा चालू तक्ता ( फर्मा ) होत नाहिं भरपूर ॥
कामाचा खोळंबा झाला, द्या कांहीं ' मजकूर ' ॥

वसंत-अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल ॥
परंतु झटदिशिं करा; नातरी काम उगिच लांबेल ॥

सरासरी या खरडुनि ओळी अठरापासुनि वीस " ॥
ऐकिलें न हें तों कवनाची झाली स्फूर्ति कवीस ॥

झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं ॥
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनी ध्यानीं ॥

वसंतकाळीं त्या वर्णाया वनांतुनी माघारी ॥
'गोविंदाग्रज' कवीश्वराची घरीं परतली स्वारी ॥

१०-१२-१९१२, पुणें.

## अभिनंदनपर वर्धापन

[ श्रीयुत चिन्तामणि द्वारकानाथ देशमुख, I. C. S., मुंबई विश्वविद्यालयाच्या सन १९१२ च्या प्रवेशपरीक्षेत पहिले आले. त्या प्रसंगावर खालील 'शब्दपुष्पहार' कै. गोविंदाग्रज यांनीं गुंफिला होता. ]

धन्य ! धन्य ! बा, तव सुयशाची होतां जाणीव,
सहर्ष वर्षत आशीर्वच कवि " वत्स, चिरं जीव. "

परिचय नसतां करित अतिक्रम कविमानस माझें,
राग नसावा त्याचा, बाळा ! क्षमा इथें साजे.

आनंदाचे भरांत नाचे मन्मानस, बाळ !
कशास त्याला उगीच सांगूं " शिष्टनियम पाळ ? "

हर्षदर्शना नियम न कांहीं; हृदयहि अनिवार;
गुण आकर्षणकारण; परिचय केवळ उपचार !
अथवा कविला बंध न कोठें मनिं आणुनि हेंची—

क्षमा करावी, बाळ ! माझिया पुरोभागितेची.
विद्येच्या दरबारीं मिळतां तुज पहिला मान,
तुझ्या कुळाला, जातीलाही त्याचा अभिमान.

पारितोषिकें त्रिविध गौरवी श्रीविद्या तुजला,
स्वानंदानें उधळूं आम्ही सहजचि अश्रुजला !

स्वज्ञातीचें नांव उजळिलें आज, महाभागा !
भरुनी जाइल दुथडी म्हणुनी तुझी जातगंगा !

समाधानमय निःश्वासाच्या वातें तुजवरती
उत्कटाश्रुजललहरी उडवुनि सुखविल शतधा ती !

गरीब माझी रसवंती; परि होतां अतिहृष्ट
शब्दमौक्तिकें ओवाळुनि तुजवरुनि, काढि दृष्ट.

ममत्वमय दोषाचें लावुनि तुला गालबोट,
सदा सदिच्छासदनीं तुजला जपूं कडेकोट.

धरिलें आम्हीं शिरिं तुज पाहुनि तुझा गुणासार,
परी तुझ्याही शिरिं भार नव तसाच देणार.

वंश, जाति तव, समाज, त्यापरि महाराष्ट्रभाषा,
आजपासुनी सर्वांनाही तुझी फार आशा.

दिव्य अलौकिक जें जें दिसलें ईशें मनुजाला,
ईश्वरांश तें सदा लावणें ईश्वरकार्याला.

ईश्वररूपा जगीं रमे श्री मानवता देवी,
निजदिव्यांशा जीवेंभावें तिच्या पदीं ठेवी !

गुढी पाडवा आज तुझ्या हा यशोजीवनाचा,
वर्षोवर्षी असाच उगवो चढत्या मानाचा.

दंभ, गर्व, अभिमान तुडवुनी पायांनीं अरतीं
निजपुण्यबळें असा सारखा जा वरतीं वरतीं.

प्रतिक्षणीं वर जातां दृष्टी व्यापकतर होई,
क्षितिजवर्तुलासह वाढूं दे स्वार्थ-वर्तुलाही !

" मी, माझें कुळ, माझी जाती, समाज माझा हा,
श्री मानवता देवी माझी, ईश्वर मीच अहा ! "

अशा भावना मनिं ठेवुनियां जा वरतीं वरतीं,
हृदयसागरा सदा येउं दे अमर्याद भरती !

उंच भराऱ्या गगनीं तुजला पाहुनि घेतांना,
परस्परांना दावूं इथुनी डोलवून माना.

धन्य धन्य तूं त्रिवार धन्यचि; धन्य पिता-माता!
हर्षाश्रूंनीं न्हाणित असतिल ते तुजला आतां!

फुला उमलल्या! वास यशाचा नित्य नवा पसरी,
दरवळुनी मोहुनी गुंगवी ही दुनिया सारी!

" विजयी भव, महदायुष्मान् भव, चढवि यशोनाद!"
खेळतील तुजभंवति आमुचे हे आशीर्वाद!

पाप, अमंगल, अनिष्ट किंवा अभद्र जें कांहीं,
स्पर्श तयाचा कधीं न होवो तव छायेलाही.

जें जें मंगल, दिव्य तसें जें, पुण्यहि जें जगतीं,
वृष्टि तयाची होवो, बाळा, सदैव तुजवरती!

नभीं चकाके सकल कलांची तारामय सृष्टि,
करो तुझ्यावर निजतेजोयुत दिव्यपुष्पवृष्टि!

श्रीपरमात्मन्! मागतसों हें तुजपाशीं एक,
करिं बाळावर कृपादृष्टिचा अखंड अभिषेक.

असो; असों दे ओळख बाळा, लोभहि राहूं दे,
नित्य नवा उत्कर्ष तुझा या नयनां पाहूं दे.

बालमित्र तव जमले असतिल सर्व तुझ्याभंवतीं,
अथवा चिमणीं भावंडेंही असतिल आवडतीं.

किंवा कौतुक करीत असतिल तात गोड वचनीं,
असेल जननी तुज कुरवाळित सजल अशा नयनीं.

अशा सुखाच्या काळीं आलों घटकाभर आड,
क्षमा तयाची करि; कविता ही अशीच रे द्वाड!

हृदयदर्शना कसाबसा हा शब्दउपहार—
' गोविंदाग्रज ' धाडी प्रेमें, बाळा, स्वीकार.

१९-१२-१९१२

## घुंगुरवाळा

[ जगाच्या संगीतांत शब्दमय काव्यापेक्षां निःशब्द– किंबहुना, नादशून्यसुद्धां –काव्यांचाच भरणा विशेष आहे. अल्लड मातेला सातआठ महिन्यांच्या चिमुकल्यानें उत्कट आनंदानें वाळा वाजविला म्हणजे एकाग्रतेनें ऐकत राहावेंसें वाटतें, तें याच कारणामुळें. ]

वाजिवरे वाळा ! वेल्हाळा ! रुम्झुम् घुंगुरवाळा ! ॥ ध्रु० ॥
अस्फुट विश्वाचें । प्रेमाचें । गाणें आनंदाचें—
वदलों जें नादीं । संवादीं । तुझिया जन्माआधीं—
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । कांहींसे भीतीचे,

वाळा ! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल.
रात्रीच्या काळीं । जो बसली । ब्रह्मानंदीं टाळी,
मानें तेव्हां वाणे । जें गाणें । अस्फुट मंजुळवाणें,
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणें तें गाया !

वदलों मग पाहीं । दोघेंही । लाजूनी कांहीं कांहीं !
हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें !
गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्याभंवतें !
वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदे डोलूं दे.

एकच हा चाळा । वेल्हाळा । घे रे तान्ह्या वाळा !
एकच पायाचा । वाळ्याचा । नाच गोड बाळाचा—
ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे !
'गोविंदाग्रज' ही । कवनांहीं । त्या छंदावर गाई !

फेब्रुवारी, १९१३.

## चिमुकलीच कविता !

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा,
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा ?

हात चिमुकले, पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी-स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा ?

धवल वर्ण हा देहावरती फुलत्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !

त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओठांची जोडी !

सडा पसरला आंत कोंवळ्या बारिक मोत्यांचा,
ओंठाआडचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !

इवलीशी हनुवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदयिंच उतराया वर्तुळ मुख जणुं लांबवि ही !

सरळ नासिका चांफेकळिचा जणुं अंतर्भाग,
दळांआड दडला परागमय अवकाशांग.

कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?

किंचित खुलत्या भिंवया-चिमणीं धनुर्ध्येच साचीं
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांचीं ?

नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती, त्याखालीं,
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !

फुलें बसविलीं वेलीवरतीं, गगनीं तारांना,
त्याच मुहूर्ती त्याच करें का विधि करि या नयनां !

किरणां किरणां टाकुनी भंवतीं या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी !

अभ्यासास्तव सोडित उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट बाण !

केंस कोंवळे सरळचि काळे, कुरळेही कांहीं,
तुळतुळीत मोकळे, मनासम नच बंधन त्यांही !

गालिं लोळती कांहीं, कांहीं कानांवर पळती,
पवनीं खेळति कांहीं किंवा मानेवर ढळती;

पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती,
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती !
बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणीं अशी द्यावी ?
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरीं पाप कोण बसवी ?

तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागीं,
उंच सखलशा सुटल्या वेणीच्या बंधनभागीं.
झुळझुळ मंजुळ वाहे चिमणा ओघ जसा कांहीं,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णाबाई !

गाल कोवळ्या गुलाबकळिचीं रूपें विधिमनिचीं,
पदार्थसंसर्गाविण नुरल्या चिंतनमय खनिचीं !
लज्जा निर्मीयाची स्फूर्तिच विधिनयनीं चमके,
त्या नयनांनीं बघतां गालीं लाली ही फडके !

चुंबन घेतां येतिल गालचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबन ओठांसह खासे
सहज मुखावर हंसें खेळतां गालीं गोड खळ्या,
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या !

ओठ कशाचे –देंठचि फुलत्या पारिजातकांचे;
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे !
कां हंसते सारखी अशी ही ? नेत्रहि हंसती कां ?
फुलें झेलि चालती बोलती ललितदला लतिका !

कीं भावी प्रणयाचें अत्तर हृदयपुष्प पिळुनी —
बालमदन करि; उडे हास्यमय सुवास दरवळुनी.
किंवा कांहीं क्रियाच इजला येत नसे दुसरी
निष्कारण म्हणुनीच सदाची मुद्रा ही हंसरी ?

नखें पदतलीं, कीं वर्खाच्या टिकल्या चकचकल्या !
कापुनि कच्चीं पोंवळींच मृदु केल्या का चकल्या !
करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा !

तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे,
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगाचे ?

निळ्या नभीं कर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळ्याशा तारांचा खेळ !

इचा उरांचा धनी कोण, हें ठरवावें म्हणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशचिन्हांनीं !

लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत !

रक्त कपाळीं दिला रक्ततर कुंकुमतिलक बरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा !

चिमण्या देहा शोभविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनी हिस कोण कुठें धाडी !

घालित बाला चित्रिंचेच का चित्र अलंकार ?
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार ?

केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टीचभरचि नमुना,
नवतीर्थांस्तव हिंडति संगततनु गंगायमुना ?

गर्भजन्म या उपाधि भोगी कीं ही तद्तीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता ?

उषा-चंद्रिका जणूं भेटल्या; त्या संगमकाळीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली !

किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !

महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही
बलवत् भावें स्फुटतर होउनि वस्तुरूप वाही ?

पहा थांबली विभ्रमललिता सलीलगति बाला,
बालभाव मनिं विमल, जोडि करयुग परमेशाला,

अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिनें आत्मा सारा देहीं कीं खेळे !

देवमनीं निजभक्ताविषयीं वसे भावना जी
भावरूप ती काय खेळते या हृदयामाजीं ?

शुद्ध भाव हा तिच्याच मनिंच्या पुण्याचा वारा,
हाच भाव, भगवंता ! आतां जगत्त्रयीं पसरा.

हात जोडुनी विमले बाले ! मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच कीं पावित्र्याच्या नत झाला काय !

जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति ?

तुझ्या मनींचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं
दगडाचा देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !

स्वर्गहि तुजवर धरिल सारखी दिव्याची गळती !
स्वदर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !

तीर्थें, पुण्यें, देवदेवता ज्यां पाहुनि पळती,
तसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळतीं !

टाक नजर एकदां तरी ती या पाप्यावरती—
स्वर्गिं सहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती.

शुद्धभाव-परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊं दे,
कवित्व पावन करून घ्याया जराच राहूं दे.

ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूं दे.
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे.

मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
त्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले !

कवनस्फूर्ती, मंगलमूर्ति, जराच थांब गडे !
दिव्य सुधारस वर्षूं जगतीं ये जिकडेतिकडे !

अहा ! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं !

नवल न तिजसह नेत्र जरी मन हे भिरभिर फिरती,
भुलतें, खुलतें, डुलतें विश्वचि तिजभवंतीं !

पावित्र्याची उषा काय, कीं कळी पूर्णतेची?
आशीः कीं ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची!

किंवा कांहीं तरल कल्पना कुणास आठवली,
नटवावी कशि कवनीं ती या विचारिं मति रमली.

तोंच चुकवुनी डोळा धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दाची शाल!

पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति?
बाला कसली?—खास तीच ही नवकवनस्फूर्ति!

भरभर फिरते नग वाऱ्यावर ताराया जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकलीच कविता!

मूर्तिमती कविताच यापरी हृदया हालवितां
'गोविंदाग्रज' ही गाई मग चिमुकलीच कविता!

सप्टेंबर, १९१३.

## दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा. ]

चला आज हा आला दसरा!
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमध्यें सण हाच खरा!

चौमासांला आतां विसरा!
मुसळधार तो पाऊस वरला,
तुडवित पायांखालीं चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला,
येतां आनंदाचा दसरा!

पहिल्या दुभत्या गाई विसरा!
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा!

करा जरासा मुखडा हंसरा!
आतां कां हीं तोंडें रडवीं?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा!

चला रूढिवर आतां घसरा!
टाकुनि सीमा मृत धर्मांच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या
सीमोल्लंघनकालचि दसरा!

जुन्या मतांचा जाळा कचरा
नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा!

नका हातचा दवडूं दसरा!
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा!

श्रुतिस्मृतींना आतां विसरा!
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा!
पाताळीं तो नेउनि गाडा!
करा साजरा यापरि दसरा!

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालचि दसरा !

जुन्यापुराण्या चिंध्या विसरा;
जरि पटका घ्या सुधारणेचा !
भगवा शेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज,
चला जमूं द्या जमाव तुमचा.

काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला भमीन टांचा
वाऱ्यावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !

चला निघूं द्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां, त्या आधीं हाणा !
द्या कृष्णाची करीं 'तुतारी' *

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
'आगरकरां'ची झडवा नौबत !

---

* या गाण्यांत 'केशवसुतां'च्या 'तुतारी' या सुधारणाप्रेरक जोरदार गीताचा उल्लेख 'कृष्णाची तुतारी' या नांवानें केलेला आहे.

'भागवतां'ची धराच हिंमत !
'केशवचंद्रां'चें घ्या चिलखत !
फुंका 'कृष्णा'चीच 'तुतारी.'

रूढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा.
असा साजरा कराच दसरा !

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें ?
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले !
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटे,
खोटें ठरतें तत्त्व आज तें,
पूर्वज संतत पुढें चालते
घायकूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग.
दीनपणाला गर्वें छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर घ्याया नच जें वळतें
उचल्या त्या लावा आग !

थांबा, ऐका देउनि कान—
सुकल्या हातीं बाला कोमल,

तशाच विधवा करिती तळमळ;
फत्तर फुटतिल येउनि कळकळ.
कुठला पोकळ गताभिमान ?

चला उठा रे बांधा कंबर !
तुमच्या पुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हें अवडंबर !

गेल्या धर्माचें हें भूत
पाहुनि बसलां करि भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत,
नातरि रडते व्हा राऊत !

अनंतकाळाचें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करि तलवार,
चित्साक्षीची ढाल बयार,
घोडा फिरवा रानोरान !

सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशी,
भिडवा नेउनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होईल दसरा छान !

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्यांचे गाउनि सूर
'केशवपुत्रा 'चा महशूर
'गोविंदाग्रज ' चेला सच्चा !

ऑक्टोबर, १९१२.

## जगाचें गाणें

[ केव्हांहि पहा, जग उगवत्या सूर्याला अर्घ्य देत असतें. ]

नमोऽस्तु ते ! धन्य एक सकल जगीं तूंच ! उगवत्या रवे !

भावगुणीं जी अतुला । भक्तीनें अर्घ्य तुला,
स्वीकारी या ऋतुला । पुण्य ज्यांत सांठवें.

गगनिं सदा जरि असती । तरि अधुच्या नयनांसी
काल न तूं दिसलासी ! आज तुझे कर नवे ।

थोर हृदय परि तव हें । अपराधा नच पाहे,
गतवृत्त न मनिं राहे । फिरुनि कधिं न आठवे !

मावळले काल रवि । वार्ताही ती न हवी !
तेज तुझें त्यां लपवी । स्वकर पसरि नवनवे !

जो प्रकाश काल रमे । आतां तो तिमिर गमे !
हा प्रकाश कधिं न शमे । तव करिं जो संभवे.

थोर तूंच ! धन्य तूच ! तेजोनिधि दिव्य तूंच !
नयनिं मनीं एक तूंच । इतर कांहिं नाठवे !

झालें मनिं हेंच ठाम । कीं रवि तुजलाच नाम !
तेजाचें तूंच धाम । सांगावया का हवें ?

स्तुति आतां इतरांची । कधिं नाहीं व्हायाची !
वंदन हें तुजलाची । सतत, उगवत्या रवे !

जुलै, १९१४.

## ती कोण ?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे;

भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें !
जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे !

मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकाते होतों परी,
कांकीं या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे !
ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें— सांगू कुणाला परी,
अश्रू हे नयनींहि— माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनि रितें हृदयही— देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ— हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?
जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही; आधार जी जीवनीं
देवा ! भेटवि — दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं ?

ऑगस्ट, १९१४.

## अरुण

अहा ! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला,
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला,

जसा उडवि हा अरुण चहुंकडे गगनीं रंगाला !
तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त-तरंगाला !

विश्वसूत्रधर सारुनिया करिं पडदा रजनीचा
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा ?

करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा,
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा !

पूर्वदिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी ?
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी ?

रविसदनाच्या गवाक्षास ही काय लाल कांच ?
पलथाड लपलें तोंड तयाचें, दिसेल आतांच !

प्रातःकाळीं गगनपुष्प कीं सूर्याचें फुललें ?
सुगंधमकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले ?
सदा सर्वदा जगदुद्धार धरिती ज्या घेर
त्या मंगल सरितांचें आहे का हें माहेर ?
कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता ?
गत पुण्याच्या पुष्करिणींतुनि तेज काढण्याला
उडी रवीनें घालितांच कां फेस उचंबळला ?
अखंड सौभाग्याची सरिता माझी भूमाता
काय लाविते कपाळभर ती हा मळवट आतां ?
कीं सोडुनि जी अम्हां चालली कष्टे निस्तुळ
महाराष्ट्र-लक्ष्मीची त्या ही दिसे पायधूळ ?
भरतें स्वर्गीं ये पितरांच्या करुणारसरंगा,
अम्हां आळशांवर मग ये कीं पूर्वपुण्यगंगा !
कल्पलतांवर फुलें बहरता सडा परागाचा
काय तरंगे स्वर्गंगाजलिं तांबुस रंगाचा ?
दिनरजनींच्या फटींतून या फार दूर ओंड
दिसतें कीं हें कालगर्भिच्या स्वर्गाचें तोंड ?
हा रजनीच्या उदरीं दिसतो गर्भचि दिवसाचा,
कीं काळाचा बाळ नवा हा नव्याच नवसाचा
दिनरजनींचा, शुभाशुभांचा, पापपुण्यांचा,
मंगल संगम रंगपटचि हा दावित गगनाचा !
काय निघाला मानसपुत्रचि विराट पुरुषाचा
विश्वैक्यास्तव मिरवित हा ध्वज विश्वसमत्वाचा !
विश्वहितास्तव रोज सोडि जो रविला गगनांत;
पुराणपुरुषाचा कीं उघडा पळता तळहात ?
विश्वहितपरा ही ख्रिस्ताची रक्तमया माया,
महंमदाच्या पैगामाची किंवा ही काया ?

शांत रसा या अभंग वाणी प्रसवे तुकयाची,
दया परतली कीं बुद्धाच्या उदार हृदयाची ?

दिव्य भावना भक्तमनीं ज्या त्यांची ही मूर्ति,
भावि कवींच्या रसवंतीची कीं अस्फूट स्फूर्ति ?

आज निपजल्या प्रीतीचा हा मंगल अभिषेक,
जगदिशाच्या कृपावृष्टि ची कीं पहिली फेक ?

पतिव्रता गतसती जयांचें अग्निशयनिं निजणें
अखंड सौभाग्याचें त्यांचें किंवा हें लेणें ?

यज्ञकालची ही रामाची सोन्याची सीता,
येत्या अवताराची छाया, कीं रक्तस्फीता ?

कीं, भवितव्या या देवीच्या या विमल दुग्धधारा
धांवत सुटल्या, परितोषाया विश्व शुद्ध सारा ?

उद्धाराया पुन्हां धांवली किंवा भवभीतां
श्रीकृष्णाच्या मनिं उरलेली श्रीभगवद्गीता ?

भावि काळचें हें स्वर्गाचें स्वप्न असे काय ?
ब्रह्मस्वाचा भावि सगुण कीं तेजोमय काय ?

विश्व रची जी आधीं, करि मग वृद्धि पुढें त्याची,
'आज' रचाया आली का ती इच्छा ईशाची ?

ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडके जरिपटका ?
चिरंतनाची सनद मानावां, तिचा ताम्रपट का ?

अंत न पाही भगवंताला आली काय दया ?
चिन्मंगल मग उभें नभीं हें भूवरिं उतराया ?

अहा ! तयाच्या स्पर्शें होई शुद्ध हृत्तरंग,
दिव्य दृष्टिला पुरता कळला अरुणाचा रंग !

मना ! कल्पना पुरे ! प्रभूची हीच असे जाण
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण !
प्रीतिरसाच्या, सौंदर्याच्या, देवींच्या मूर्ति
नित्य निर्मि ही परमेशाची अरुणमया स्फूर्ति !

आज उद्यांच्या महाकवींनो ! हृदयिं नीट ठेवा
प्रेमरसाचा, मांगल्याचा हा अद्‌भुत ठेवा !
अरुण-रसानें याच रंगवा मनिंचीं परि चित्रें !
रंगवीत जा तशीं उद्यांच्या देवींचीं चित्रें !
या रंगानें रंगवितों मी माझ्या हृदयाला,
पडद्यापडद्यावरी काढिलें चित्राचित्राला !
एका पडद्यावरि परि रंगे प्रेमचित्र एक;
हृदयाच्या हृदयांतिल माझ्या तोच शिलालेख !
त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर;
त्या चित्रांतिल देवीचा मी विकला शाहीर !
मरतां मी, तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा;
त्या देवीचा झालों अगणित जन्मांचा बंदा !
तिच्या गालिंचा अरुण सारखा, लज्जे ! वाढूं दे !
'गोविंदाग्रज' कविच्या 'अरुणा' त्यांतच राहूं दे !

सप्टेंबर, १९१४.

## निद्रागीत

नीज गुणी बाळ क्षणीं शान्त, यावरी—
गाउं किती ? कुंठितमति, नीज झडकरी !
विश्वाच्या स्नेहरसीं मग्न जाहलें,
प्रेमाच्या अश्रुजलें बाळ नाहलें,
मायेची तीट गालिं, चित्र जणुं हलें,

सुयशाचें दुग्धपान गोड त्यावरी !
हृदयाचा केला हा पाळणा नवा,
बांधाया ममतेचा पाश मग हवा,
हस्तरंग हलवि तया करुनि मृदु रवा,
ब्रह्म सगुण बाळरूप रमत अंतरीं !

माता करि मंगलमय गायना अहा !
प्रेमभरें विश्व त्यांत रंगलें पहा;
सोड नखरा ! हट्ट तुला शोभतो न हा,
अजुनि तुजसि नीज न ये—सांग का तरी ?

नोव्हेंबर, १९१४.

भीमकबाळा

[ माझ्या 'वेड्यांच्या बाजारांत' एका उपवर मुलीच्या तोंडीं हें साधें गाणें तिचीच स्थिति वर्णन करण्यासाठीं घातलें आहे. गाणें त्या मुलीनेंच केलें आहे अशी कल्पना आहे. माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते. ]

( चाल : यादवराया भाई याहो )

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ।
निश्चय केला बंधुवरानें वरावी शिशुपाळा ॥

विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा ।
शोकभरानें विव्हळ झाली, शोष देइ भाळा ॥

" अजुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा ।
काळवेळ ही जवळी आली, संकट हें टाळा ॥

ऐन समयिं का निष्ठुर झालां ? काय असें केलें ?
दीनांवरिचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ?

कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ।
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां ?

कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ?
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ?

नका करूं छळ याहुनि माझा अजुनी वननीला ।
वाट बघूं किति घेउनि हातीं अश्रूंची माला ?

किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला ।
तरी यावया अजुनी माझा माधव कां चुकला ?

सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं ।
—कीं विषपानें प्राण तरी हा पद्‌कमला वाहूं ।

मीच अभागी; म्हणुनी आपण अजुनी नच आलां ।
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला !

रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई ।
उर भरूनि ये—शब्द न चाले— कवन विरुनि जाई ॥ १ ॥

१९१४.

## ओसाड आडांतील एकच फूल

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेंसा, कधिंचा, विशेष नव्हता कोणास तो माहित;

होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया बसे,
नाहीं जात कधीं तिथें कुणि जिथें नाहीं स्वतांचें हित !

होता आड खरोखरीच अगदीं तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;

घेतो कोण उगाच कष्ट इतके लोकीं खुशाखातर !
' आहे भूत तयांत खास ! ' वदती ऐसेंहि कोणी तर

बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वदंता जरी,
लोटी सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गावर,

टाकीना नुसती जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेंहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी !

देवाला करणें—विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही,
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतहि !

[२]

पानांची गरदी लता करिति त्या आडाचिया भोंवतीं,
वाटे अंथरलें जणूं कफन तें जीवंत तोंडावरी;
काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधें खोल ती,
आडांतील जलांतही मिसळुनी त्यालाहि काळें करी!

आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;
केव्हांही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी;
काळोखांतिल तेवढेंच जग तें होतें तयाभोंवतें.

पुष्पाचें वळलें असे मुख सदा पाण्याकडे खालती,
श्वासानें जणुं त्याचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती;
केव्हां तन्मकरंदबिंदु पडतां जीं वर्तुलें चालतीं,
धालाया रमणीकरांत बघतां तेव्हांच मागाल तीं!

येई एक कसाबसा तरि सदा तेथें रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब तो जलिं करी त्यालागिं दृग्गोचर.

[३]

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादृशा पाहणें—
हा नित्यक्रम भावड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असे;
त्याला सर्वहि वाहणें, विरुनिया त्याच्यामधें राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसे.

त्याचा वास असे मनोहर सदा, शंका नसे याविशीं,
या भावें परि गंध जो दरवळे त्यारीच त्याची मजा!
केव्हांही हलतांच फूल पवनें खेदास देते रजा,
प्रेमानें डुलतां परी करितसे वृत्तीस वेडीपिशी!

हांसे फूल जलांतल्या बघुनियां त्या स्वीय चित्राकडे,
हांसे तेंहि तसेंच तों अधिक हें हांसें तसें बापडें;
नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामधें बागडे,
'माझा भाव तयाप्रती कळतसे' मानीत हें बापडें;

जोडीचा महिमा असा चहुंकडे; धिक् सर्व जोडीविणें
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें ?

[४]

खालीं तोंड करून चंचल जलीं पाहून वेड्यापरी
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी;

घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणीं,
हांसूं मात्र नका म्हणून कधिंही माझ्या फुलाला कुणी !

त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा—
वाऱ्यानें करपून जातिल अशीं व्हावीं फुलांचीं मनें;

चित्रें चंचल जीं अदृश्य उघड्या डोळ्यांस भावाविणें
पाहायास तयांस नीट तुमचे डोळे फुलांचे करा !

भावाचे अपुल्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेड्यावगळ्या फुलांतच असे का तेवढ्या दोष हा ?

मोठे पंडित काय लाविति दिवे, ते एकदांचे पहा,
कोणीं काय कधीं कुठें बघितलें जें ये विकारांत ना ?

जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निःश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा !

[५]

कांहीं काळ असाच फूल गमवी, आशा पुढें वाढली;
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी;

वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों, तैसेंच आशेवरी !

त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां,
नाहीं तें हंसलें पुन्हां ! विकसलें नाहीं पुन्हां तें कदा !

आशेनें दुसऱ्या दिनीं फिरुनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर.

पाण्यामाजि पुढें गळून पडलें तें फूल वेडें पिसें,
पाताळांत कुठें असेल दडलें का प्रेमनिर्माल्य तें ?

छे: छे: ! प्रेममय स्वरूप धरुनि भूतापरी हिंडतें,
कोठें आज उजाड जें, अजुनिही तेथें कधीं तें दिसे !

तें मेलें म्हणुनी उणें न ठरतें; मच्चित्त त्याला भुले;
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें !

नोव्हेंबर, १९१४

## फुलें वेंचिली पण–

[ प्रेमस्थान नाहीं अशा मनुष्याला चांगल्यानेंसुद्धां खेद होतो. ]

पन्हाळगडचा पठार सगळा घालुनि पायांखालीं ।
फुलें जमविलीं तऱ्हेतऱ्हेचीं जीं जीं हातीं आलीं ॥

शेवंतीचा गेंद हांसरा, शुभ्र मोगरा फुलला ।
मदनबाण हा पाहुनि असला पुष्पबाणही भुलला ॥

नाजुक जाईचीं हीं बाळें; गुलाब ताजा छान ।
हीं इवलालीं रानफुलेंही रंगें हरितीं भान ॥

ही तुळशीची मंजुळ, तैसा सबजा महंमदाचा ।
भू-कमळें हीं, अनंत फुलतां औरच वास तयांचा ॥

किती आणखी सांगूं नांवें—आणि कशाला नुसतीं ?
हेंच पुरें कीं सगळीं होतीं जीं वासें घुसमुसतीं ॥

फुलवंतीनें ओंजळ माझी भरुनी लागे शीग ।
सुगंधि सौंदर्याचा नाचे हातावरतीं ढीग ॥

काव्यभरानें तरुण नयन हे नवतेजानें न्हाले ।
प्रणयरसानें हृदयहि माझें उचंबळुनि वर आलें ॥

" फुलें वेंचिलीं— पण-आतां हीं द्यावीं कोणालागीं ! "
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणांत झाली जागी ॥

" हतभागी हा जीव एकला; प्रीतिदेवता नाहीं ।
मोडुन पडलें हृन्मयमंदिर शतधां आघातांहीं ॥

निष्प्रेमाचें जीवन माझें रुक्ष चिंतनीं जावें ।
संकल्पचि हा वरला उरला; कां तें दैवा ठावें ।
कांट्यांवरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर ।
कुठें फुलांची धनीन माझी दिली दवडुनी दूर ?
कृतकर्माचीं फळें भोगणें अवश्य जीवा जगिं या ।
गुदस्त तें गुलदस्त; नको तें पुनः तुम्हां मनिं याया '' ॥

अभंग निश्चय अशा प्रकारें कितीकदां जरि केला ।
या पुष्पांसम मृदुहि कारणें दुभंगती परि त्याला ॥

वृत्ति बावरी झालि, आंतल्या आंत बिचारी रडली ।
जीवाचीं नयनांतुनि पुष्पें त्या पुष्पांवरि पडलीं ॥

जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंहि जड झालीं ।
'' फुलें वेंचिलीं पण–पण–आतां देतों टाकुनि खालीं ॥

चिरंमृताच्या हवा कशाला हा कसला हव्यास ?
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास !

डोळे असुनि अंध असा कुणि तुडविल यांना पायीं ।
रसिक कुणी प्रेमांध उचलुनी अर्पिल रमणीहृदयीं ॥

ज्या देवानें असे मांडिला असला निष्ठुर खेळ ।
असेल त्याला बसवायाचा तसाच कांहीं मेळ ॥

त्याचीं त्याला फेंकुनि देतों; हें ब्रह्मार्पणमस्तु ।
कुठेंहि पडतां पावतील त्या विश्वचि त्याचें वास्तु ॥

नाजुक असलीं फुलें अशा या माझ्या हृदयासाठीं ।
देवाजवळी दाद मागतिल लागुनि त्याच्यापाठीं. ''

देत उचलुनि फुलें अर्पितां देवा चहूंकडेही ।
' गोविंदाग्रज ' तशीं फुलें हीं रसिकां तुम्हां देई ॥

जानेवारी १९१४, अथणी.

'दिव्य प्रेमाची जाति'

संध्यापट गगनीं पसरी ।
तारांची राणी हंसरी ॥
कधीं गालिचा अरुणाचा ।
करि ती तेजस्वी नाचा ॥
शुक्रतारका अशी नभा ।
नवी नवी देई शोभा ॥

तारा गगनीं
परि भूवरती;
बघतां नयनीं
जी संचरते हृदयीं, ती ।
दिव्य प्रेमाची जाति ॥ ध्रु० ॥ १ ॥

न मिळे अवसर अभिलाषा ।
'दे घे'ची नाहीं भाषा ॥
भाव आमचा थरारला ।
तरि दादहि त्याची न तिला ॥
एकाद्या किरणापुरता ।
प्रेमबंध होतो पुरता ॥

जिच्या जिवाला
तिळ मोबदला
नकोच कसला;
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति ॥ २ ॥

प्राण चंद्र ज्या कुमुदांना ।
काय जाणतो तो त्यांना ?
फुलें हंसति पाहुनि रविला ।
कळे न परि त्याचें त्याला ॥

चंद्रकांत मणि पाझरती ।
चंद्र फिरे वरच्यावरतीं ॥
कवि कोठेंतरि,
तत्कवितापरि
फिरे दिगंतरिं,
रसिकमनें मग कविवरतीं ।
करितो ती दिव्य प्रीति ॥ ३ ॥

सौंदर्याचा उत्कर्ष ।
कुठें असे तरि दे हर्ष ॥
दिशाकाल होउनि सान्त ।
त्या वृत्तित विरघळतात ॥
दर्शन— किंवा स्मरण पुरें ।
तन्मयता देहीं प्रसरे ॥
प्रभुची शोभा
दिव्य यशोभा
हरिते लोभा;
तदाकार करिते वृत्ति ।
दिव्य प्रेमाची जाति ॥ ४ ॥

सौंदर्याच्या ज्या श्रेणि ।
तीं देवाघरचीं लेणीं ।
जिवास होतां जाणीव ।
देहाची सांडी शींव ॥
उदास वृत्तीचा प्रसर ।
स्वार्थाचा पाडी विसर ।
सौंदर्यानें
ऐश्वर्यानें
रंगुनि जाणें
दिव्य जीवनें तीं लोकीं ।
तच्चिंतनीं तदालोकीं ॥ ५ ॥

प्रेमविषय अपरंपार।
सूक्ष्म-रूप भव्याकार ॥
निरभिलाष तन्मयता ती।
दिव्य प्रेमाची जाति ॥
कौतुक, विस्मय आश्चर्य।
शून्यवृत्ति किंवा सभय ॥
अनेक परिचीं
त्या प्रेमाचीं
रूपें साचीं
आविष्करणीं जाणविती।
दिव्य प्रेमाची जाति ॥ ६ ॥

फेब्रुवारी १९१४, म्हापसें.

## पुनर्विकसन

दयाघना! विनति करित मन तुज हें चिरविरहें तापतां!
धन्य विश्वरचना ही। यथासांग सर्व कांहिं
न्यून तींत मुळिं नाहीं। मत्सरेंहि पाहतां!
वस्तुवस्तुमात्राला। नाशकाल जरि दिधला,
तरि फिरुनी उदयाला। काल असे तत्त्वतां!
अस्तंगत सूर्याला। सुप्रभात उदयाला,
शुक्लपक्षिं चंद्राला। फिरुनि वरी पूर्णता!
वर्षाऋतु समयाला। प्रतिवर्षी ये चपला,
प्रतिवसंत वृक्षाला। जन्म नवा आणिता!
भरतीचा नियतकाल। जलधिचे हरित हाल
रात्रीं नक्षत्रजाल। वरि नवी अपूर्वता!
पाहुनि हें नवविकसन। सुप्रसन्न होई मन,
परि विचारि दीनवदन। बालक हा नेणता!

या मदीय चिरनिराश। जीवन्मृत माणसास
पुनरपि उमलावयास। काल दिला कोणता ?

डिसेंबर, १९१४.

## हालत्या पिंपळपानास

[ राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचें पान वाऱ्यानें सारखें फडफडत होतें. परमेश्वराच्या इच्छेवांचून पानसुद्धां हालत नाहीं; या लौकिक श्रुतीवरून पुढील विचार सहजच मनांत वावरूं लागले. ]

कोंवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हालताना !

निजशाखेच्या या शेवटच्या टोंकाशीं
कां इकडुनि तिकडे सांग सारखें फिरशी ?
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांहीं;
तूं भिरभिर फिरतां स्पष्ट भेद नच राही.

या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळ्या सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्र रंगानें झळकसी,

तुजकडेच माझें लक्ष सारखें लागे,
बांधिलें तयाला गूढ कांहिं अनुरागें।

जीं गूढ अप्सरागीतें नभिं पाझरतीं,
तीं वहात येतीं खालीं वाऱ्यावरतीं।
ऐकुनी तयांचे सूर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?

कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामाजिं भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा, कोमला,

थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा ?

हें तुझ्याच दुःखें हृदय असें तडफडतें ?
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडते ?
तूं स्वयें हालसी, कीं तुज कोणी हलवी ?
सुखदुःखी झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?

कळतसें तुझें तुज का हें हालणें ?
कीं दुसऱ्यासाठीं आहे चालणें ?
कीं भावावांचुनि पाहे डोलणें ?

तव अस्तित्वाचें ज्ञान असे कां तुजला ?
तुज इच्छातृप्ति क्रियाभेद का कळला ?

तुजभंवत जी ही सृष्टि असे पानांची,
कल्पना असे का तिला तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुम्हांमधूनी वाही—
सुखदुःखभाव ही जोडि तुम्हां कीं नाहीं ?

विश्वेंच्या विश्वें सारीं यापरीं
स्थलिं भिन्न, भिन्न आकारीं, भूवरीं
नांदती गळ्या कांतारीं कितितरी !

जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
जीवैक्य असे कीं, भिन्न भिन्न जग सारें ?

क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?
परिणाम करित का सृष्टीवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून ठेवित आहे ?
कीं स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?

हें अवश्य जग चालाया कां असे ?
कीं नसल्याहुनिही वायां हें पिसें ?
स्फूर्तिची कुणाच्या काया हलतसे ?

मम नयनिं चित्रसम जाउनि बैसायाचें,
इतुकेंच कार्य का सांग तुझ्या नाचाचें ?

मम करीं कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
मजसाठिं लिहिति चिरदु:खभोग हा पेशा !
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
दु:खही असे का तितुकें त्यांच्या संगीं ?

कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरीं ?
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं—

निजनादब्रह्मीं गुंग होउनी डुलसी ?
तें गीत आंतल्या आंत ऐकुनी खुलसी ?

कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति व्रण जातां ना ?
खालतीं पडुनि मग मातींत मिसळुनि जाया,
तूं फडफड करिशी अशी भूमिवर याया ?

परि थांब ! जरा गा गाना, तोषदा,
ऐकवीं माझिया कानां एकदां;
स्थिर राहिं न, पिंपळपाना ! तूं कदा.

मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदु:ख सारखें सेवूं मानसरंगें !

संबंध असो वा नसो आपणांमाजीं,
मी एक कारणासाठीं तुजवर राजी—
नवबालाहृदयीं प्रीति नवी हलतांना
तच्छिरीं हलसि तूं तसाच पिंपळपाना !

जीं हृदयकंपनें सारीं मानसीं,
तीं आम्हांतें बाहेरी दाविशी !
निर्दोष मनानें भारी हालसी !

कुणि बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखेंच होइन मीही पिंपळपान !

डिसेंबर, १९१४

## हा क्षण

रमणि ! स्मरणीं आमरणचि या हृदयपटावर ठसा
सदाचा ठेविला हा क्षण असा !
भूतभविष्यांमधें तरलतर वर्तमान ज्यापरी
चंचल सीमारेषा धरी;
गतदुःखाच्या भावि सुखाच्या मधें तसा सुंदरी !
क्षण हा संशयरेषेपरी !
गतकालाच्या दुःखाचें हें पळतें पाऊल !
सुखाची येत्या चाहूल !
जरि संशय माझ्या क्षणास या दूषवी,
तरि आयुष्यातें अवघ्या क्षण भूषवी,
करि दुभंग जीवनदास दे गति नवी;
अनंत सौख्याचा हा होइल आदिकालची तरी,
नातर अंत तरी सुंदरी !

जुलै, १९१५.

## मागें पाहणें

( चाल : नोहे हा पवन जवन० )

चालतसे सारखीच ही मुशाफरी ॥
जहांगीर या फकीर हा पिशापरी ॥ ध्रु० ॥
जिकडे मज मार्ग फुटे। न नकळत मी फिरत सुटे ॥

नच कसलीही माया । पायबंः बांधाया ।
मागुनि मज शोकवशा । पाहि । कुणी आशा ।
मग मागें वळुनी कां । पाहणें तरी ? ॥ १ ॥

२०-७-१९१८, पुणें.

## फुटकी तपेली

[ आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतो त्र. ]

नको तपेली फुटकी असली !
जीव बोलतो पाणी पाणी
चिरकालाची तहान लागुनि;
अशी तपेली मजला देउनि, थट्टा करितां तेथें कसली ?

प्रवास करणें फार दूरवर !
आद्याच्या पर्यंतापासुनि
अंताच्या आरंभामधुनी —
एक अनंतें माप घेउनी, कैक अनंतें जाणें भरभर !

विश्व कशाचें घेउनि बसलां ?
विश्व मला जें दिसतें, त्यांतिल
विश्वें तुमचीं अणुसम होतिल;
निजक्षणीं तें तुमच्या जिरविल, काळांचा बाजारच सगळा

प्रवास माझा असा भयंकर !
या विश्वाच्या मागुनि जाणें,
मागुनि सुटुनी पुढें धांवणें,
अथवा सर्वांठायिं पसरणें, आद्यंताचें कापुनि अंतर !

कडक कायदा धांवायाचा !
पाउल एकादें जरि चुकणें,
पहिल्यापासुनि पुन्हां धांवणें !
आपुल्याच या भंवतीं फिरणें ! मागें कुठुनि मग सरावयाचा ?

आधीं असते पुष्कळ सोबत;
कितीक 'मी, मी' मजला दिसती,
पुढें चालतां भरभर मरती;
मरुनी माझ्या ठायीं जगती, माझीच मला उरते संगत!

माझें मीपण फारच मोठें!
दुज्या रहाया जागा नाहीं,
एकलकोंडा म्हणुनी राही,
खोटें 'मी' ही अंगींच पाहीं, राहिल सोबत मग तो कोठें?

मज जाणाया मीच विचक्षण!
नसते परक्रे आधिं जाणतों,
असल्या मलाच न परी बघतों;
मज ओळखतां इतर विसरतों, माझें सर्वच फार विलक्षण!

तऱ्हाच माझी विचित्र असली!
असला मी— तो प्रवास तसला!
कडक कायदा त्याचा असला,
तशा प्रवासीं मजला, अशी तपेली देतां कसली?

अनंततेची तहान माझी,
मिळतां पाणीं वाढे उलटी,
अधिकचि पाणी—अधिकचि मोठी;
जलब्रह्म या परि तिजसाटीं, तरीच होइल मग मी राजी!

भांडीं असलीं कां मज देतां?
भरतांना जीं होति रिकामी,
भरुनि ठेविलीं तरि कुचकामी,
पडतिल कोणाच्या तीं कामीं? कधीं परत बोला हो घेतां!

वागविण्याचें उगाच ओझें!
करी प्रवासामाजीं खोटी,
फुटकि तपेली तुमची खोटी,
मृगजळ नसतें दावी खोटी, कधीं तिच्यांतुन नच गळलें जें!

मायेची ही खरी तपेली;
मृगजळ प्याया आंत उतरतों,
अफाट तरि मी त्यांतच बुडतों,
नसल्यामाजीं असतां जिरतों; नको मला ही असली मेली!

ब्रह्मांडाची करा तपेली!
माझी ओळख पाणि तिच्यांतिल,
कैक अनंतें तयांत जिरतिल,
माझ्यावांचुनि सारे विरतिल, शिरे तपेली ही अशा जलीं!

ब्रह्मांडाची खरी तपेली;
करा रिकामी तरिही भरली,
भरुनी भरणें भरवुनि उरली,
जिरतिल विश्वें कितीक असलीं, कांठबरी जरि आधीं भरलीं!

माझी ओळख विचित्र पाणी;
जुनि ओळख मग नवीस आणी,
पाण्या वी अव्याहत पाणी,
पाण्यांतहि मग खेळे पाणी, हाय! कसें हें कोणि न जाणी!

ब्रह्मांडाची करा तपेली;
तृषा नाहिंशी तिनें करीन,
तपेलीसही जालें भरवीन;
प्रवासही जालें जिरवीन, नको मला ही असली मेली!

प्रकार घ्या हा मनिं एकंदर;
सर्वस्वाची करा तपेली;
माझ्या पाण्यानें भरलेली,
पाहुनि तिजला तीन्ही काळीं, खुबी ओळखा क्या है अंदर!

जुलै, १९१५

## मनांतली दिवसरात्र

अनंत नभ हें वरी पसरलें न मर्या तया;
अनंत मनहि तसें जरि लघु शरीरांत या;
सदैव नभिं खेळती दिनदिशा लपंडाव हा;
मनांतहि तशाच या दिवसरात्र दोन्ही पहा !

उषा विरुनि जात तों प्रकटतो नभीं भास्कर;
नवा दिवस नाचतो नवनव्या जगाच्या वर !
मनात उगवे तसा क्षणिं नवीन आशारवि;
प्रफुल्ल तर कल्पनेप्रति नवीन ये पालवी !

फिरे दिनभरी रवि; प्रकट होई संध्या पुढें;
गमे उदयकाळशी, रविच तो बिचारा बुडे !
तशीच मनिं सारखी वरिवरीच आशा चढे;
गमे क्षणच जाहली सफल, तोंच खालीं पडे !

तमास पसरी निशा मग जगांत जातां रवि;
दिसें सकल शून्यसें, तम नव्या तमा मात्र वी !
विषण्ण हृदयीं तशी भयकरा निराशा जडे;
तमोमय रसा गिळी मन मनीं विचारें रडे !

तशांत गगनामधें दिसत दूर तारा परी—
मनांतहि सहस्रधा फिरत कल्पना बावरी !
पुन्हां उगवतां रवि प्रभवतो प्रकाशा नव;
निराश मनिंही पुन्हां करि तशीच आशा रव !

असें सतत चालतें अनि तसें मनीं सारखें;
असे हृदयिं आज जें गमत तें उद्यां पारखें !
नको दिवसरात्र तीं न सरती कधीं जी पहा.
सरेल कधि तो सरो हृदयिंचा लपंडाव हा !

ऑगस्ट, १९१५.

## गीत—विरक्ति

देवी दर्शनदुर्लभ झाली
आशालेशहि नच कांहीं;
संसाराची होउनि माया
जीवनकवनांतुनि वाही !

प्रतिवस्तूचा शब्दचि उरला
भावमया जगतीं राही;
त्या शब्दांचा अर्थ कुणातें
वस्तुज्ञानाविण नाहीं !

गूढार्थचि तो अलिखित भागीं
मत्कवनीं भरुनी जाई;
नसतां परि संकेत जिवाचा
उमगेना तें कवणाही !

गीत कळावें जीस नसे ती
दिशा शोधिल्या जरि दाही;
' गोविंदाग्रज ' सहजचि कवनें
जाळि निराशा खर दाहीं !

नोव्हेंबर, १९१५.

## सुभाषित

### खरें औषध

जे जे रोग मनास होति, हृदया संताप जो जाळतो,
जे जे घाव जिवास लागुनि जगा तो नित्य कंटाळतो;

त्या त्या विस्मृति हेंच औषध खरें आहे गमे एक तें;
जें लोकीं नसतें तरी मग कुणी जीवंत ना राहतें!

२५-११-१९१५, पुणें.

## दुर्दर्शन

नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता विच्छिन्न प्रेतावलि,
भूकंपादि अनर्थ, दैवघटितें हीं सर्वही पाहिलीं;
त्यांहीं खिन्न न चित्त होत, परि तें होतें तदा ज्यापरी
विश्रब्ध प्रणयास वंचित यदा सौंदर्य स्वार्थास्तव!

२-१२-१९१५, पुणें.

## त्याच तारकेस याचना

थांब जरा, तारके! जरा तरि थांब, सखे सुंदरि!
कुणिकडे नेशी मज यापरी?

तव किरणांच्या सुंदर कोमल आधारावरि सखे!
केलें माझें मज पारखें!

स्वर्गसुखाची आशा लावुनि ओढिसि मजला गडे!
थांबचि— सांग परी कुणिकडे?

अति दुःखांच्या सतत अनुभवें हळवा जिव जाहला,
सुखाची सवय नाहिं त्याजला!
परि आशा लावुनि नेशी मज वरिवरी,

देशील टाकुनी स्वर्गांतुनि मज जरी,
तो अधःपातही या उन्नतिच्या परी !

उन्नतेस या योग्य न मी तरि स्वप्रेमें सांवरी,
याचना ' [illegible] न ' करी.

२८-१२-१९१५, पुणें.

—स

प्रेमें जीं कुसुमें दिलींस मजला
तूं, प्रेमले ! धाडुनी,

कोमेजून उद्यांच जातिल— सुखें
जावोत कोमेजुनी !

नाहीं वाटत खेद लेश, उलटा
आनंद वाटे मना;

प्रेमाची स्मृति त्या जिवास जडुनी
आजन्म राहील ना !

जानेवारी, १९१६

## एका जुन्या श्लोकाची आठवण

" डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों ।
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचें अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाल काम करितों—·विश्रांतिही घ्यावया ।
घेतों झोंप सुखें— फिरून उठवों ही ईश्वराची दया. " ॥ १ ॥

पूर्वी पूर्वंवयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला ।
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचिला ॥
साध्या बाळमनास अर्थ पटला— आनंदही वाटला ।
आतां का करुणारस स्मृतिबळें त्याच्या असा दाटला ? ॥ २ ॥

डोळ्यांनीं बघणें, ध्वनी परिसणें इत्यादि सर्व क्रिया ।
आतांही घडती; उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या ॥
जेव्हां जीव थकून पाहत परी विश्रांतिही घ्यावया ।
नाहीं झोंप सुखें— अहो, हरपली ती ईश्वराची दया ! ॥ ३ ॥

सौंदर्यें भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे ।
जीवानें जगिं काय कार्य करणें श्लोकांत नाहीं कुठें ॥ ४ ॥

१२-२-१९१६, मुंबई

## निर्वाणीची विनवणी

( चाल : धाडुनि दिधले )

पाहसि आतां अंत असा कां ? पीडिसि कां या दीना ?
सुंदरि, पदरीं मदीय हृदया घेसि न कां पदलीना ?

क्षणैक हंससी, क्षणभर रुससी; निष्ठुर चंचलता ही;
संदिग्धा ही वृत्ति व्याकुल करित मनाप्रति पाही.

लाजुनि अजुनी स्वजना हा जन जवळी कां नच केला ?
किंवा हृदया द्वेषचि दूषवि मजविषयींचा पहिला ?

सुंदर वदनीं तव निर्दयता हृदय विदारत माझें;
पडुं दे श्रवणीं ती शुभ वाणी मौन न हें तुज साजे.

प्रत्युत्तर दे प्रश्ना कांहीं; अंत वृथा न पहावा;
विनोदवचनीं थांबवि नच त्या, प्रश्नें परतवि नच वा.

संशयविष हें जाळित जीवा अधरसुधा दे रमणि;
करी विनवणी निर्वाणीची गोविंदाग्रजवाणी !

२-३-१९१६, मुंबई.

## हृदयास

जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली कां असली ?
लाथ मार त्या चंचल जगता— प्रेमाचीं सोंगें कसलीं !

चंचल, लहरी, रंग बेगडी सुंदरतेच्या मोहानें,
कां वाटेवर पडसी हृदया विकुंनी कवडीमोलानें ?

तुझ्या जिवाच्या बोलासाठीं हपापले हे रसिक पहा।
स्वागत करिं जा त्यांचें— त्यांना हर्ष किती होईल अहा !

नटव्या सोंगामागें लागे जें, त्या सौंदर्यासाठीं
नवलाखाचें मोल देसि कां ? कशास या आटाआटी ?

जिथें गुणांची चाड न कांहीं— कमअस्सल जें जातीचें;
सौंदर्यचि तें कसलें ?—– केवळ एक बाहुलें मातीचें !

विद्यावैभव कुठें तुझें !—– तो ज्ञानाचा गौरव कोठें !
आणि कुठें रंगीत खेळणें !—– नवल खरोखरि हें मोठें !

उदारता तव विशाल पाहुनि देवांनाही मोह सुटे;
आणिक असलें खोटेंनाटें नकली नाणें सांग कुठें !

गर्वाचें घर खालीं पडुनी खुशाल मिळू दे मातींत;
रसिकांच्या मृदुहृद्यमंदिरीं रहा, निजयशा मिरवीत !

दितांडसी कां दिव्य जिवाचें पाण्यावरच्या रेघांनीं ?
' गोविंदाग्रज ' सांगे तुजला ' रहा त्याहुनी स्वस्थानीं ' !

९-३-१९१६, मुंबई

## एका शब्दासाठीं विनंति

क्षमा करी, जिवलगे ! क्षमा करीं ! न लावितां अवधि ॥
कोमल हृदया कठोर वचनीं छळि हा अपराधी ॥ १ ॥

क्षमा करावी मी तुज, बाले, आणि तूंहि मातें ॥
असेंच आतां जडलें आहे दोघांचें नातें ॥ २ ॥

परस्परांस्तव आपण ऐसा प्रत्ययही आला ॥
तुजवांचुनि मज सुचेरुचेना; मजविणही तुजला ॥ ३ ॥

क्षणमात्राचा राग अनावर– स्वभाव दोघांचा ॥
समजुनि हें मग राग धरावा कोणीं कवणाचा ? ॥ ४ ॥

जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा ॥
पिसामागुनी पिसें काढणें, मार्ग न सुज्ञाचा ॥ ५ ॥

पश्चात्तापें हृदय हलवितां अश्रूंच्या धारा ॥
वाहुनि त्याला लाभूं दे तो मोत्यांचा चारा ॥ ६ ॥

जें झालें तें विसरुनि, सखये ! टाकुनि इतराजी ॥
भला बुरा मी मान्य करुनिया होशिल ना माझी ? ॥ ७ ॥

' गोविंदाग्रज ' आणुनि नयनीं जीवाचें तोय ॥
विनवित; बाले ! लिहीं स्वहस्तें तूंच पुढें—॥ ८ ॥

२४-३-१९१६, मुंबई.

## प्रेम आणि मरण

" जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ॥

—श्रीहोनाजी बाळ.

कुठल्याशा जगीं देख ।
मैदान मोकळें एक ॥ पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत ॥ सारखा ॥
चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें ॥ तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली ॥ माजती ॥
रोज तीं । कैक उपजती । आणखी मरती ।
नाहिं त्या गणती । दादही अशांची नव्हती ॥ त्याप्रती ॥

त्यासाठीं मैदानांत ।
किति वेली तळमळतात ॥ सारख्या ॥
परि कर्माचें विंदान ।
कांहीं तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं ।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ॥ न कळतां ॥

तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला ॥ त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥

मुसळधार पाउस पडला ।
तरि कधीं टवटवी त्याला ॥ येइना ॥
जरि वारा करि थैमान ।

तरि हले न याचें पान ॥ एकही ॥
कैकदा कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या ॥ परि कधीं ॥
तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला ।—लागतें जगावें त्याला ॥ हें असें ! ॥

ही त्याची स्थिति पाहुनिया ।
ती दीड दीतीची दुनिया ॥ बडबडे ॥
कुणी हंसे कुणी करि कींव ।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनीं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिती । कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला न कळत जगणें ॥ वरिवरी ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याच्यिा मना ॥
भाव त्या टाकी । देवांतुनि दगडचि बाकी ॥ राहतो ॥

यावरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥
इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । "वरं ब्रूहि" झाली वदती ॥ त्याप्रती ॥

" तप फळास आलें पाही ।
माग जें मनोगत कांहीं ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाही ।
कल्पवृक्ष दुसरा होई ॥ नंदनीं ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवरा ॥ "
तो वदे । " देवि सर्व-दे, । हेंच एक दे– ।
भेटवी मजला । जीविंच्या जिवाची बाला ॥ एकदा ॥ "

सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ॥ मग तया ॥
" ही भलती आशा बा रे ॥
सोडिं तूं वेड हें सारें ॥ घातकी ॥
स्पर्शासह मरणहि आगी ।
ती तुझ्या जिवाची रागी ॥ त्या क्षणीं ॥
ही अशी शुद्ध राक्षसी । काय मागसी ।
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं ॥ जें कधीं ॥ "

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेंच वदला त्रासें ॥ त्यांप्रती ॥
" निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाहि मिळतें ॥ धिक् तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढें ॥ "
निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ॥ वृक्ष तो ॥

तो निग्रह पाहुनि त्याचा ॥
निरुपाय सर्व देवांचा ॥ जाहला ॥
मग त्याला भेटायाला ।
गगनांतील चंचल बाला ॥ धाडिली ॥
धांवली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ॥ त्याकडे ॥

कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला ॥ त्या क्षणीं ॥

दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ॥ एकदा ॥
हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारीं ॥ हांसलीं ॥
त्या कळ्या सर्वही फुलल्या ॥
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥ अजुनिही ॥

तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ॥ हें असें ॥

अनुष्टुभ्

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठीं ' गोविंदाग्रज ' पाठवी ॥

एप्रिल, १९१६.

## परमाणूंचें कार्यमाहात्म्य

गिरिशिखरें खरतांना त्यांतुनि कण वाळूचे पडतात,
महासागरोदरीं तेथुनी विश्रांतीस्तव दडतात;
कालमापनास्तव जन त्यांना घटिकायंत्रीं भरतात,
क्षणाक्षणासह एक एक ते खालीं भरभर झरतात.
गिरिस्वरूपा उन्नतिच्या ते करिती देहाची घटना,
विस्तारास्तव शय्यारचना मग करणें लागे त्यांना;
झटति अनंतर अनंतांतही शोधायास्तव परिमाणा,
कालस्वरूप कालाचीही मोजिति घटका भरतांना;
निजकवनाचें मसिलेखन हें, पुसुनि न जावें क्षुद्र तरी,
' गोविंदाग्रज ' यास्तव त्यावरि वाळूचे कण हे पसरी !

६-४-१९१६.

## कांहीं इंग्रजी कविता वाचून—

[ स्वयंपूर्णतेची जाणीव सुद्धां साधुवृत्तीला बाधक म्हणून म्हटली आहे. मग तिच्या अभावीं केवळ नुसत्या अभिमानाकडे पाहून आपलेपणाला काय वाटत असेल बरें ? ]

पिठांत पाणी घालुनि केलें दूध भलें निष्ठुर काळें,
पितात गरिबांचीं बाळें.

अम्हां मराठी शाहीरांच्या कवनाचा वाहे पूर,
समाधान त्यांतच चूर !

पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी;
कवीश्वरें चढलीं भारी !

गरिबीला बोलणें नसे हें, दोष दरिद्री गर्वाला—
हात घालि जो स्वर्गाला !

बाष्कळ बडबड ऐकुनि चित्तीं हास्याचे ध्वनि उठतात,
—आणि आंतडीं तुटतात !

खेद वाटला— तोंच आठवे बालकवीची रसवंती;
धीर जरा वाटे चित्तीं.

नव्याजुन्यांचा प्रेमळ पाइक ' गोविंदाग्रज ' नमन करी—
भल्याबुऱ्यांना एकसरीं.

मे, १९१६.

## निर्दय बालेस

( चाल—- मला शांत मुनि भासतो )

अखेर झाली आतां ॥ घे हा ॥ प्रणाम जातां जातां ॥ ध्रु० ॥

जिंकुनि तुजला प्रेमें होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा ॥ १ ॥

नजर जराशी तुझी बदलतां थोडा थोडा होई ॥
वेडा माझा जीव बुडविला तूं शोकाच्या डोहीं ॥ २ ॥

होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच ॥
जीवांच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच ॥ ३ ॥

रूप मनोहर असलें, बुद्धिहि तीव्र लाभली तुजला ॥
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला—॥ ४ ॥

वेडी आशा अशी धरुनिया घडा जिवाचा केला ॥
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला, अनुभव भलता आला ॥ ५ ॥

केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलांसाठीं ॥
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठीं ! ॥ ६ ॥

जग सगळें हें डोळ्यांपुरतें, रूप जिवाला पुरतें ॥
उदार हृदया परि निर्दय जन दगडाखालीं पुरतें ॥ ७ ॥

ज्या देवानें जग हें केलें, ज्या प्रेमें हें चाले, ॥
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां, बाले ॥ ८ ॥

जगावांचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें ॥
तुझ्यावांचुनी जग हें आतां असून झालें नसतें ! ॥ ९ ॥

दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा ॥
परतायाचें नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा ॥ १० ॥

होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें ॥
नांव घेतल्यावांचुन आतां मनांत झुरणें आलें ॥ ११ ॥

( अपूर्ण )

मे, १९१६.

## शेवटचें प्रेमगीत

( चाल : मला शांत मुनि भासतो )

तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां । टाकितां तूं असें या अनाथा ॥ ध्रु० ॥

सात वर्षें, सखे ! हर्षद स्वप्न जें । पाहिलें, भोगिलें तेंच आतां ।
घोरतिमिरा निशा सहज भय देतसे । जीव हा एकला आज उरतां ॥

अश्रुधारा पहा वाहती निर्भरा । चित्त विव्हल; नसे वृत्ति शांता ।
नयनजाळीं नाहतां, त्यासवें वाहतां । पाहिना तुजविना जीव जगता ॥

जीवनव्याप हा व्यर्थ वाटे पहा । नयनविषयाच ही विश्वसंस्था ।
कांहिं नाहीं पुढें, जीव तिमिरीं बुडे । स्तिमित वा बधिर वा जात अंता ॥

नाश तरि सर्वथा होउं दे एकदां । आपदा लोपवी रे कृतांता !
कष्टला जीव हा दुःखामालावहा । शून्यता जीविताप्रति वहातां ॥

यत्न केले सखे ! रत्न तुजसारखें । कधिं तरी व्हावया प्राप्त हातां ।
अन्य घटना परी नाकळे कां करी । देव कीं दैव कीं तो विधाता ! ॥

जन्म हा व्यर्थसा होत ! होवो तसा । सर्वथा शिवपरा ईशसत्ता ।
प्रेमयज्ञाप्रति प्रथम ही आहुति । अपरिहार्याच जी जीवजाता ॥

एक आशा उरे–( तीच परि मज पुरे ) । तिजसवें जीव करि एकमयता ।
" जन्मजन्मांतरीं एकदां क्षणभरी । प्रेम लाभो तुझें शोकघाता " ॥

अनुष्टुभ्

भावोल्लेखार्थ आलेखी कष्टदें शोकनिग्रहें ।
" गोविंदाग्रज " हें बोले ! अंतिम प्रेमगीत हें ॥

१–६–१९१६, मुंबई.

## कधीं ?

चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी;
रंग कधीं वठतील परी ?

कानाला आनंद देति हे झुळझुळ गाउनि गोड झरे;
अर्थ कधीं कळणार बरें ?

अंधुक अंधुक गोड भावना डोकावति कविमनाकडे;
शब्द कधीं होतील खडे ?

सतेज वचनें देई तारा, परी लकाके नभामधीं;
खालीं येईल परी कधीं ?

झांपड पडते डोळ्यांवरती— चिंता छळिता ह्रदंतरीं;
झोंप कधीं येईल परी ?

प्रतिरात्रीं हीं स्वप्नें दाविति इच्छाचित्रें जीवाचीं;
सृष्टि कधीं होइल त्यांची ?

अंधनयनिं ही बघते आशा विश्वचि हें रम्याकार;
जगीं कधीं तें दिसणार ?

—आणि वल्लभे ! दिलींस वचनें; गोड अहा तीं किती तरी !
खरी कधीं होणार परी !

'गोविंदाग्रज' जें जें आळचि कवनीं– आणिक– मनामधीं;
पटेल तें तें सांग कधीं ?

जून, १९१६.

## अंधाला दृष्टिलाभ

[ आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन; कधीं कधीं हा उपकार असेल; नेहमींच मात्र नाहीं. ]

अंधपणें मी पाहत होतों माझ्या प्रेमाची मूर्ति ॥
जीवनदेवी, जी हृदयातें देई दिव्याची स्फूर्ति ॥
मम अंधत्वा वाटत होती ती सौंदर्यें अप्रतिमा ॥
अमर्याद आशेच्या राज्याचीही उलंघी सीमा ॥
न कळे निर्दय दया कुणाला मजविषयीं ही कां आली ॥

प्राणघातपर उपकाराची इच्छा कोणाला झाली ? ॥
अमोघगुणदिव्यांजन दुर्लभ— हाय ! तेंहि परि सांपडलें ! ॥
विनायत्न या उभयहि नयनीं नेमकेंच कां हो पडलें ? ॥
स्पष्ट दृष्टि मज अंधाप्रति ही कशी लाभली अवकाळीं ॥
सतेज निजकिरणांनीं जी मृदु जीवा जगता जाळी ॥
कृष्णवर्ण हा- प्रमाण कांहीं अवयवास या मुळिं नाहीं ॥
कुरूप दर्शनतापद असली बाला ही पुढती राही ॥
दृष्टि लाभतां मूर्तिभंग हा—मनोभंगही जन्माचा ! ॥
शतविध हानीहूनही असला लाभचि दुःखप्रद साचा ! ॥
दृष्टि लाभतां पहावयाचें असें तेंच उरलें न परी ॥
'गोविंदाग्रज' अंधत्वास्तव विलाप आतां सदा करी ॥

२५-९-१९१६, पुणें.

## प्रेमाची प्रामाणिकता

[ महाकवि बायरन् एके ठिकाणीं प्रणयीजनास असा उपदेश करीत आहे कीं, " प्रेमविषयापासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवा म्हणजे तुमच्या इच्छेची पूर्तता होईल. " प्रस्तुत लेखकाच्या एका बुद्धिमान् मित्रानेंहि त्याच्याजवळ अशाच अर्थाचें विधान केलें होतें. या दोन्ही प्रसंगीं या लेखकाला जरा चमत्कारिक वाटलें होतें. ]

सख्या ! सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा ॥
व्यवहाराच्या परी संगती प्रीति होईना सुखावहा ॥

दळादळाची पुरी खुलावट फूल उमलतें जरी ॥
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेंसें तदंतरीं ॥

मेघांआडुनि रविकिरणें जरि स्पष्ट दर्शनें नच देती ॥
फुलें खालतीं काय उमलती ? किंवा रसरंगा येती ?

मूठ झांकली लाखाची ती भरिते जरि चालू तूट ॥
दैव उद्यांचें पाहावया परि उघडावी लागे मूठ ॥

गंगास्नानें पावन व्हाया इच्छा झाली जरी मना ॥
देहावरचें वस्त्र वस्त्र तरि दूर करावें लागे ना ? ॥

प्रीतीची रसगंगा बघतां जीव विकारी असे जरी ॥
शिष्ट कल्पना त्यजुनि तयाच्या होतो आत्मा अविकारी

हृदयार्पण जरि करणें आहे स्पष्ट दान तरि करावया ॥
अश्रुजलासह अर्पावें या पुण्यमार्ग एकच सखया ॥

स्वप्रेमातें लपवायाचा बोध तुझा लाभो तुजला ॥
' गोविंदाग्रज ' वाहिल प्रेमा हृदयासह निजअश्रुजला ॥

१५-११-१९१६,

## इच्छा, उपभोग व विषय

[ या तिघांचा अन्योन्यपोषक त्रिवेणीसंगम स्वर्गात तरी असेल काय

अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी ।
उडती लकेर झरतां, जीवा ! नादचित्र केवळ लक्षी ॥ १ ॥

जनसंमर्दी अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकांतीं तच्चिंतन करणें; दुःखावेगीं विस्मरणें ॥

दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सर्वेच धुवुनी काढावीं ॥

अवश्य जीवश्वसनें निर्दय निःश्वासांनीं योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥

आद्यंतींचे क्षण सोडुनिया अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥

पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥

आयुष्याचा क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे !
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर जीवन हें ॥

रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी।
स्थलकालाच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं ॥
क्षणाक्षणाला जननमरण हें प्राणिमात्र भोगित राही।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ॥
फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरतां।
'गोविंदाग्रज' म्हणे,–'जीविता! लाभ तुझा नच यापरता!' ॥

२२ नोव्हेंबर, १९१६

## तीन तरी

[ जीवनाच्या काव्यांत 'जर, तर, पण, परंतु' हीं इच्छेला विरोध करणारीं उभयान्वयी अव्ययें दुबळ्या मनुष्याला विश्वनियंत्या ईश्वराशीं जोडीत असतात. ]

चल, सख्या जिवा रे, पुन्हां घरीं। कां उगाच फिरसी पिशापरी? ॥ ध्रु० ॥

पाय लागुनी कांच तडकली। पुन्हा जोडणें कुणीं तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ १ ॥

कळस देवळावरला ढळला। पुन्हां बसविणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ २ ॥

वेजीं उतरे मोतीदाणा। पुन्हां सांधणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ३ ॥

हार घेउनी धार पळाली। पुन्हां आणणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ४ ॥

लवून गेली बहार बिजली। पुन्हां पाहणें कुणी तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ५ ॥

लाट जळांतरिं पळांत जिरली। पुन्हां चढविणें कुणीं तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ६ ॥

सूर विराला वाऱ्यावरतीं । पुन्हां छेडणें कुणीं जरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ७ ॥

पळे सपाटीवरतीं पारा । पुन्हां बांधणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ८ ॥

घडूं नये तें घडून गेलें । पुन्हां घडविणें कुणीं तरी,
तें कसें तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ९ ॥

'गोविंदाग्रज' बघे सदाही । या संसारीं नवलपरी,
कीं तरीमागुनी तीन तरी ॥ चल० ॥ १० ॥

१९-४-१९१७, पुणें.

## चिन्तातुर जन्तु

" निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला ।
काय म्हणावें त्या देवाला ?—" " वर जाउनि म्हण जा त्याला." ॥ १ ॥

" तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या ।
उधळणूक ती बघवत नाहीं—" " डोळे फोडुनि घेच गड्या." ॥ २ ॥

" हिरवी पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कां ही ।
मातींत त्यांचें काय होतसें ?—" " मातिस मिळुनी जा पाहीं ! " ॥ ३ ॥

" पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात ।
काय करावें जीव तळमळे—" " उडी टाक त्या पूरांत. " ॥ ४ ॥

" ही जीवांची इतकी गरदी जगांत आहे का रास्त ।
भरती मूर्खांचीच होत ना ? " " एक तूंच होसी जास्त." ॥ ५ ॥

देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी ।
या चिन्तातुर जन्तूंना एकदां मुक्ति द्या परी ॥ ६ ॥

९-११-१९१७, पुणें.

## फल ना फुलाची पाकळी

शहा नहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची।
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची ॥

चुकल्या तरुणा! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे।
कालिदासकृत शाकुंतल परि सरस्वतीच्या कंठि असे ॥

खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्ह्याचे फुटले सारे।
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें ॥

गोकुळांतल्या चोराचा नच गोपींना आतां त्रास।
श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरल्या उल्हास ॥

गडगडणें, काळोख, विजा हीं गेलीं वळवाच्या मागें।
अन्नब्रह्मची साक्ष तयाची द्याया हें राही जागें ॥

कांटे सुकले फांदीवरतीं– धन त्यांची झाली राना।
गुलाब देवा, तुम्हां वाहिला, गोड करुनि तो कां घ्याना ॥

दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असें।
तुम्हीं आम्हीं कष्टी होणें हा कुठला मग न्याय असे? ॥

[ अनुष्टुभ् ]

'गोविंदाग्रज' अर्पी ही स्वभावें चरणांवरी।
रसिका, घ्या फूल नाहीं फुलाची पाकळी तरी ॥

२४-११-१९१७, पुणें

## एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं ॥
घरांतुनी बाहेर निघालों; घाई जाण्याची सगळी ॥

तोंच धडकली समोर येऊनि वृद्धा विधवा दारांत ॥
अपशकून हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत ॥
" वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती ॥
या विद्रुप अवदसा सारख्या अशा चहुंकडे वणवणती " ॥

*  *  *

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारे शोकांत ॥
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत ॥
अडवुनि बोले, " वाचुनि दावा दाया कागद हा इतुका " ॥
त्रासुनि वदलों, " बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहिंत का ? " ॥
गिचमिड ओळी- भिकार अक्षर; लावित बसणें हें कोणीं ? ।
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी ॥
येईना वाचतां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार ॥
कां करितां मग उगाच हा अव्यापारेषुव्यापार ? " ॥
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरती टाकून ॥
चालू झालों गप्पा मारित कांहीं कांहीं हांसून ॥

*  *  *

जातां किंचित पुढें आढळे- नांव न घेणें कवनांत ॥
डोकीवरतीं पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात ॥
त्या घाणीनें मस्तक फिरलें- रागहि आला भरपूर ॥
बोलत कांहीं आम्ही झालों त्यापासुनि थोडीं दूर ॥
" इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात ॥
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात ।
उर्मट तर हे इतके असती— बेमुर्वत देतिल धक्का ॥
बंदोबस्तच या लोकांचा केला नाहीं कुणिं पक्का " ॥

*  *  *

जातां जातां पुढें यापरी एक दिसे पिंपळपार ॥
दत्ताचें देवालय खालीं छोटेसें शोभे फार ॥
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवतालीं ॥
निरखुनि बघतां-हरहर ! होती विधवा ती बाला असली ॥

उचंबळुनी ये करुणारस– नेत्रहि अश्रूंनीं भिजले ।।
निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारें तें थिजलें ।।
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच ।।
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ? ।।
" धिग् धर्माला–धिग् रूढीला–तेतिस कोटी देवांना –" ।।
किती बोललों– नको सांगणें ! पाठ असे तें सर्वांना ।।
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मग हृदयांत—।।
" सुधारणा होणार तरि कधिं या दुर्दैवी देशांत ? "

अनुष्टुभ्

प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां
' गोविंदाग्रज ' प्रार्थी–-' कीं समस्या पूर्ण ही करा ' ।।

११-१०-१९१७, पुणें.

## दैवाची निर्दयता

श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें ।
प्राणिमात्र नच केवळ, परि तें यमुनेचें जळही जळतें ।।
कळे सकळ हें श्रीगोपाळा कळवळुनी मनिं आणि दया ।
धाडुनि दिधला व्रजांत उद्धव प्रियजनसांत्वन करावया ।।
सत्वर हरिचा निरोप घेउनि उद्धव भेटे सकळांतें ।
वृत्तश्रवणा क्षणांत जमलें गोकुळ सारें त्याभवतें ।।
हें नंदाला, यशोदेस हें, कोणाला कांहीं कांहीं ।
निरोप सांगे सांत्वनपर तो; सुनें कुणी उरलें नाहीं ।।
या गोपीला, त्या गोपीला, गोड शब्द दे वांटुनिया ।
राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया ।।
प्रेमकथांच्या संस्मरणानें जल सर्वांच्या ये नयनां ।
व्याकुळ विव्हळ झाली राधा, सांवरितां हो पुरे जनां ।।

सुखदु:खांच्या मिश्र सागरीं निमग्न गोकुळ सर्व असे ।
परि दुर्दैवी एक जीव तो त्या काळीं त्या स्थळीं नसे ॥

अष्टावक्रा, काळी, कुबडी, कुब्जा तेथें नच दिसली ।
दीन बिचारी एकटीच ती कुठें तरी जाउनि बसली ॥

स्मरण कशाचें तिचें कुणाला जी बघवेना डोळ्यांनीं ।
गजबजतां जग आनंदानें दुर्दैवी पळती रानीं ॥

तोंड झांकुनी, ओंठ दाबुनी, रडे आंतल्या आंत मनीं ।
पुसुनी टाकी आणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं ॥

" प्रेमळ देवा, जिवलग देवा, माझ्या जीवाच्या देवा, ।
कसे विसरलां या दासीला ? देवा हो, एकच देवा ! ॥

कशी विचारूं उद्धवजींना क्षेम तुझें या लोकांत ? ।
म्हणेल कोणी काय मला हें त्या न कळे भर आनंदांत ? ॥

सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठीं ।
परी कुठें मी ? आणि कुठें तूं ? लोकसुंदरा जगजेठी ॥

रडायासही मुक्तकंठ हा देवा रे जीवचि लाजे ।
श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होईल माझें ! " ॥

अनुष्टुभ्

घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचूनि कोणतें ।
हंसायानेंच न परी रडायानेंहि लागतें ॥

असावें लागतें भाग्य हंसायातें न काय तें ।
रडायातेंही जीवाचें या लोकीं भाग्य लागतें ॥

२-१-१११८, मुंबई.

## फणसाचें पान

साकी

सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान ॥
सवेंच कवनाचें हृदयींच्या चढत चाललें मान ॥

फणसाच्या त्या पानावरतीं दिसल्या ज्या मज रेषा ॥
कधींकाळच्या उघडुनि दाविति मनिंच्या आंतरवेषा ॥

लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथा गोड जी पानीं ॥
पुन्हां वाचिली; —आणि जाहला सखेद हर्षहि रमणि !

दोनच नयनीं नीट दिसेना; अंधुक जग हें अवघें ॥
प्रीतीच्या उपनेत्रांवांचुनि –पुढें बोलणें नलगे ॥

डोळे झांकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती ॥
हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगती ॥

गांव कुणाचें ?–नांव कुणाचें ?–आणि कुणाचें पान ? ॥
सरोवराला परका मधुकर करित रसाचें पान ॥

वाऱ्यासरशीं अंगावरतीं येउनि पडतीं पानें ॥
नेमधर्म त्यां कसला ? अथवा नेम देव तो जाणे ॥

सुंदर चित्रा ! मदपूर्णा ती कथा-तुझी आठवते ॥
बाले ! रमणी ! प्रणयभरानें हृदय किती खळबळतें ॥

सळसळती हीं आजहि सखये, भंवतीं हिरवीं रानें ॥
'गोविंदाग्रज' परी शोधितो तीं फणशीचीं पानें ॥

१०-२-१९१८, बोरिवली.

## जुंन्या कवितांची आठवण

साऱ्या त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यापरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ॥
**! वाहतसे भरुनि दुथडी 'उल्हास[1]' तेव्हां जशी ।
गेला वाहुनि काळ तो, सकळ तीं सौख्येंहि त्यांचीं तशीं ॥ १ ॥

१. ही नदी बोरघाटांत खंडाळ्याच्या तळ्यांत उगम पावून कर्जतनेरळहून वाहत जाऊन कल्याणच्या खाडीस मिळते.

आनंदें भरलें असें जग तसें आताहि**! पहा।
**ही असनीळ त्यापरि किती लोकांत रम्य अहा॥
प्रेमाचीं नवजीवनेंहि दिसतीं स्वच्छंद चोहींकडे।
ज्याचें त्यास नसे तरी जगभरी शून्यत्व ये रोकडें॥ २॥

बाले, दृष्टि मनोहरा मजवरी तूं टाकिली ज्या क्षणीं।
गेला तो क्षण सांग सांप्रत कुठें ? हें शल्य राही मनीं॥
काळाच्या उदरांत खोल दडला जाऊनि कोठें तरी।
**! शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरीं॥ ३॥

विद्यार्जनि नसे विशेष गति त्या बाल्यांत आम्हां तशी।
प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसीं॥
**! तीं वचनें मरून पडलीं; पद्यांत त्यां पाठवी।
"गोविंदाग्रज" आज विव्हल मनें, **! तुला आठवी॥ ४॥

१३-२-१९१८, बोरिवली,

## माझा मृत्युलेख

यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आप्तांप्रती नीटसें।
मित्रांतेंहि कळे न गूढ — न कळे माझें मलाही तसें॥
अज्ञाता! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें॥
कोठें आणि कधीं तरी जगतिं मी होऊन गेलों असें॥ १॥

An April Fool's Work. १-४-१९१८.

## गोफ

[ घटनेपेक्षां विघटना सुकर असते, हा व्यवहारी जगाचा सिद्धान्त आहे. हृदयाच्या ब्रह्मांडांतहि ज्यांना हेंच सत्य पटलें आहे, ते भाग्यशाली ! ]

पदर आणिले तुझे कांहिं तूं, माझे आणीं मीहि तसा ॥
हांसत खेळत गोफ गुंफिला, कळलें नाहीं कधीं कसा ॥ १ ॥

एकामेकांभंवतीं फिरतां, गिरकी जीवांना आली ॥
चढत चालला खेल जसा तो, नजरहि धुंद तशी झाली ॥ २ ॥

कुणीं निंदिलें, कुणीं वंदिलें, कुणि हंसलें, रडलेंहि कुणी ॥
नाहिं पाहिलें आम्हीं तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणीं ॥ ३ ॥

परि दैवाचा खेळ निराळा — खेळ नकोसा तुज झाला ॥
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला ॥ ४ ॥

गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येउनि थडके ॥
हाय, वदावें काय ? जिवलगे, ऊर तेवढा हा धडके ॥ ५ ॥

हळूहळू ओढणें हळु जरा ओढायाची कां घाई ? ॥
भलता धागा ओढितांच तूं, जीव जिवलगे, हा जाई ॥ ६ ॥

थांब, उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धिनें सखे असा— ॥
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा ॥ ७ ॥

ना तरि होईल हानि आपुली आणि जगाचें हंसें तसें ॥
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें ? ॥ ८ ॥

कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग ॥
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग ॥ ९ ॥

मनापासुनी जें केलें, जें मान्य जिवांनाही झालें ॥
विमनस्कपणें परी आज तें निस्तरणें नशिबीं आलें ॥ १० ॥

कठिण जोडणें, परी तोडणें सुकर वाटतें जनांप्रती ॥
उलटा अनुभव आला आम्हां, गुंग जाहली इथें मति ॥ ११ ॥

अनुष्टुभ्

खेळतां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला ॥
' गोविंदाग्रज ' सांगेना— कीं त्याचा पीळ राहिला ॥

## एक शंका

नाहीं राहत वास-लेश कुसुमीं कोमेजतां तें खरें,
होतें पात्रहि कोरडेंच घडिचा तो पूर जों ओसरे,
कां प्रेमस्मृति राहते हृदय हें दुःखें दुभंगे तरी ?
आशा वावरते उगाच मग कां ही माझिया अंतरीं ?

## हुरहूर

काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रींचा शेवट,
आणी मोहकता तिला तरि कसा दुष्प्राप्य तारागण ?
अज्ञेयांतुनि आरपार न दिसे दिक्काल यांचा तट,
चित्ताच्या नयनीं दुरून खुपती कां दिव्य आशाकण ?
मी श्वासास धनी, अखंड फिरतो वारा भरारा जरी,
आधीं बारिक वाडगें तरि तया हीं कुंपणें घातलीं !
या वाऱ्यावर बांधणार कधिं मी उंची मनोरे परी ?
केव्हां नांगरणार ताल उवडी ही माळरानांतली ?
जें दृष्टीस दिसे न, तेंच पटुनी वाटेल चित्ता कधीं ?
बुद्धीला जिरवीन भावजलिं कां ?—आशा न मातें दुजी
तेजाला हुडकीन कां लपलिया या अंधकारामधीं ?
केव्हां मस्तक लोपुनी हृदयिं या होईल उंची खुजी ?
माझें होइल सर्व हें कधिं, मला जें आजला पारखें !
माझें चित्रच नाचवीन नयनीं माझ्या कधीं सारखें ?

प्रेमाचे ते जीव ।। दयाळा ।। आज कुठें दाखीव ।।
काय न ये तुज कींव ।। ध्रु० ।।

प्रेमरसाचे हृदयभूवरीं वाहत होते पाट ।।
पाट कोरडे आज; खडकाची चिखलाचे वनदाट ।। १ ।।

प्रेमनदासह आज बाळपण वाहुनि गेलें दूर ।
जें सुखकारण तेंच दुःख दे; स्मरण लावि हुरहूर ।। २ ।।

अश्रु वाहती, दुःखस्मृतिचें मूर्तरूप हें जाण ।।
शोधुनि बघतां त्यांत जीव ते, नलगे ठावठिकाण ।। ३ ।।

नवतेचा बाहेर आड हा! स्मृतिची हृदयीं विहीर ।
दीन मनानें कुठें लपावें ? प्रभो, तुटे रे धीर ।। ४ ।।

दुःखद जीवन आज कंठितों; पुढेंहि दिसतें तेंच ।।
अमृतसुखाचा बालकाल तो; प्रभु, ने मज मागेंच ।। ५ ।।

प्रेमनदाचीं पात्रें हृदयीं वाळुनि झालीं कोळ ।।
नातरि त्यांतचि जाउनि मरतों करुनि जिवाचा घोळ ।। ६ ।।

तारुण्याचें सौख्य निराळें असेल बहु तें गोड ।।
बाळसुखाच्या स्मृतिचीही तरि अधिक जिवाला ओढ ।। ७ ।।

या सौख्यातें सेवित असतां सेवनींहि ये वीट ।।
त्या सौख्याची दुःखस्मृति वरि; दगडाहुनि मउ वीट ।। ८ ।।

हृदयस्मशानिं मृत लीलांना जाळुनि केल्या खाक ।।
दीप स्मृतिचा जळक्या जागीं दावित आतां राख ।। ९ ।।

प्रसंग नाना, सुगंधि सुमनें शिशुतालतिकेचीं ।।
दाव मनाचा फसर त्यांवर दुख हें असरची ।। १० ।।

फार सुगंधी अल्पजीवि तरि क्षणांत उडुनी जात ।।
स्मृतिरूपानें दिगंत पसरे मिसळुनि या पवनांत ।। ११ ।।

मायेची ही जादू जमवी त्या चंचल पवनास ॥
स्मरणसृष्टि ही दिसे एकमय चित्ताच्या नयनास ॥ १२ ॥

अहा ! तेच हे जीव लाडके ! जमुनी त्यांचा मेळ ।
अवकाशाच्या रंगावरि करि बाळपणाचा खेळ ॥ १३ ॥

स्मरणसृष्टिचा असा पसारा अद्‌भुत देवा फार ॥
जडसृष्टीचें जाळुनि गाळुनि काढियलें जणुं सार ॥ १४ ॥

अवकाशाचें राज्य तयांना; इच्छेचा अवतार ॥
जीव विदेही, खूण पटवि तरि वायूचा आकार ॥ १५ ॥

भूतकाळच्या रेषा गिरविति; एकच काळ तयांस ॥
एकच; तोही सान्त काळ; स्मृति अडवी त्याचे तास ॥ १६ ॥

उडविति घडलें जें जें, जोंवरि जीवाची हो सुटका
भविष्यकाळा वाव न; त्याचा कडा दिसतसे तुटका ॥ १७ ॥

जडसृष्टिचीं चित्रें वठलीं का हीं आकाशांत ॥
कीं वायूवर ठसा उमटवी घडलेला वृत्तान्त ॥ १८ ॥

अथवा प्रसंग ते नयनांनीं गिळिले जे घडतांच ॥
निजकिरणांनीं तेच उगळिले बसतां हृदया आंच ॥ १९ ॥

भिन्न काळिंचे, भिन्न स्थळिंचे जीव दिसति हे सांग ॥
ओळख त्यांची परस्परांना पटते का रे सांग ॥ २० ॥

अनुभविति का गतलीलांतें फिरुनि तेच हे जीव ॥
अवताराची अपुल्या त्यांना आहे का जाणीव ? ॥ २१ ॥

स्मरणसृष्टिला पटे खूण जरि तरि मजही दीनास ॥
स्मृतिरूपानें तींत रमूं दे; फिरुनि टाकि देहास ॥ २२ ॥

माझी सृष्टिच जातां झालों जिवंतपणीं मी भूत ॥
बांधितसे मज येथें नसत्या आशेचें हें सूत ॥ २३ ॥

तोडुनि त्यातें, ने मज देवा, त्या माझ्या मित्रांत ॥
नको जाळुं हा देह यावरी जगताच्या सत्रांत ॥ २४ ॥

## एकच मागणें !

आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे ॥
आहे जो सुखदुःखभोग नशिबीं, कोणास तो ना टळे ॥
आहे जीवित हा हिशेब सगळा—हा बोध चित्तीं ठसे ।
देणें हें गतकाळिंचें सकलही सव्याज देणें असे ॥ १ ॥

आशा मावळल्या; समूळ तुटले हृद्बंध नानापरी ।
इच्छा केवळ दुःखदा, अनुभवें हें बाणलें अंतरीं ॥
आतां एकच मागणें तव पदीं, देवा, असे एवढें ।
संसारीं मिळतां न तें, मन सदा शोकाग्नितापें कढे ॥ २ ॥

आतां दुःख नको, नकोच सुखही, होणार होवो सुखें ।
इच्छा वावरती मनांत, तरि हीं केलीं मुकीं तन्मुखें ॥
" जें कांहीं घडतें सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे "
ऐसें जाणुनि सोसण्यास मज तें सद्धैर्य दे तेवढें ॥ ३ ॥

## सुखदुःख

" सुखदुःखांच्या द्वैतामधुनी दुःख सदा वगळावें;
सुख सेवावें, " हीच वासना सामान्यांची धांवे. १

एक पायरी चढतां वरतीं मानवता मग बोले,
" सुखदुःखांची समता आहे; एकानें नच जग चाले. " २

सदा भरारी गगनीं ज्यांची ऐसे कविवरही वदती,
" संसाराच्या गाड्याचीं हीं दोन्हीं चाकें जणुं असतीं ! " ३

परि सुखदुःखां पुढें टाकुनी, वदतां " घे जें रुचे तुला, "
अचुक सुखाला उचली मानव; दुःखा त्याची न ये तुला. ४

यापरि जगतीं सुखदुःखांचें खरें मर्म ना कळे कुणा,
रुचे मला तर दुःख सुखाहुनि; वेडा वाटे तरी म्हणा ! ५

सुख निजभोगीं नरा गुंगवी विसर पाडितें इतरांचा,
दुःख विलगतें थेट जिवाला; ध्वज फडकवितें समतेचा. ६

सुख उद्दाम करी आत्म्याला ओळख ज्याची त्या नसते,
कोण कुणाला पुसतें जगिं या दुःख जरि सुखीं ना वसतें! ७

गर्भवालगत अंधपणानें दिशाभूल होवोनी,
परक्या ठायीं आत्मा आला स्वस्थानातें त्यजुनी. ८

परमात्म्यापर्यंत तयाला पुन्हां असे जें जाणें,
नांव तयाला दिलें शोडसें कीं 'जीवाचें जगणें.' ९

परि 'जगणें' ही मुदत ठरविली मूळपदा जायाची
सदा चालतां आत्मा तरिही मजल न संपायाची. १०

इष्ट पदा ने दुःखभोग हा प्रवास आहे आत्म्याचा
विश्रांतीचा मुकाम अगतिक काळ जात जो सौख्याचा. ११

दुःख असे कर्तव्य; तयाची जाणिव पटते जीवाला,
इंद्रियांस वरच्यावर शिवुनी सौख्य जातसे विलयाला. १२

मजल मारणें इष्ट जयाला ठरलेल्या मुदतीमाजीं
प्रवास दुःखांचा भोगाया त्यानें व्हावें राजी. १३

## अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस

[ मध्यरात्रींच्या सुमाराला कोकिळेचा शब्द, विषण्ण निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं. ]

अवेळ तरिही बोल, कोकिळे, अवेळ तरिही बोल!

रात्र पसरली जगतावरती,
शुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी—
खिन्नताच जरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया,
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथें उदासीनता
व्याकुळ करिते विषण्ण चित्ता,
तेथें त्याला द्याया समता—
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम !

बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी;
उडते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !

अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांहि !
अनुकंपेला नियम न कांहीं !
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !

खिन्न चांदणें दगांआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे---
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळीं --या एकान्तीं,
निद्रेची मिळवाया शांति,
थकुनी भागुनि पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास

हातीं संसाराची माती,
मातिंच्या आशा मनींच खाती,
भूतकाळचीं भूतें रडतीं !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वायां.
मशाल दिवसां लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !

पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता---
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूंच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
'गोविंदाग्रज' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !

कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

## ..ण एकान्त

शांत शांत अति बाह्यसृष्टि जरि चोंहिकडे शांत,
हृदयिं करी थैमान सारखा भयाण एकान्त.

क्षणामागुनी क्षण जाउनियां संतत वय वाढे;
देहहि वाढे त्यासहि परि नच हृदय तसें निधडें.

क्रमाक्रमानें नैराश्याचे कडे तयावरतीं
कोसळले किति, तरि, कोमलता होईना कमती.

एकामागुनि एक सारखे होउनि आघात
घाव तयांचे अजुनी ताजे तसेच हृदयांत.

महती आशा, तीव्र निराशा, द्वंद्व हृदयिं करिती;
एकीमधुनी दुसरी निपजे, खळ नाहीं कशि ती.

त्या दोघींचें हृदयभूमिवर समर सदा चाले;
काळ लागला जो त्या समरा जीवन तें झालें.

कडा कडा पडतांना तुटुनी आघातासरसें
हृदयाचें या झालें जाळें राम न त्यांत असे.

तुटतां तुटतां जाळें झालें; भिन्न भिन्न तारा;
तशांतुनीही जोडी त्यांना नशिबाचा तारा.

पुढें निराशा तोडित जाई हृदयाचें सूत;
निर्जिव तरि त्या बांधित मागुनि आशेचें भूत.

तुटतां तुटतां असें आजवर तुटे न कां पार ?
अशा घोंगडीवर हृदयाला कसला आधार ?

नव्या दमाची कोमलताही तशीच का राही ?
नैराश्याच्या दगडासम ती कठिण कां न होई ?

अजुनी पडतां नवा निराशातट हृदयावरतीं
पहिल्याइतके खोल घाव हे कां त्यावर बसती ?

जरा कुठेंसें कोमलतेहुनि हृदय होइ दूर,
तोंच कशाला प्रेमाची ही लागे हुरहूर ?

दुःखामागुनि दुःख भोगुनी मन फत्तर बनतां,
कधींच मेलें प्रेम; पुन्हां तें निपजे कां आतां ?

सहवासानें, अभ्यासानें तीव्र निराशेच्या,
विसरत होतें हृदय भावना सौख्यकल्पनेच्या.

हृदयशारदे ! तशांत टाकिसि उडी कशाला गे ?
भविष्यचिंतनिं मृत आशांची मना कशा लाते ?

न कळतांच मज कसें हृदयिं तूं बसविलेंस ठाणें ?
वश न कुणा जें मन तें वश तुज कसें कोण जाणे ?

पडक्या भिंताडावर हृदयीं कळस उंच असला;
कसें करावें ? हृदयशारदे ! बसूं नये बसला !

ढळला, चळला, तुटला, फुटला, कीं पडला झडला;
सहन करावा कसा पात तो ? जीव इथें अडला.

चढती, पडती; पुरे, सुखाचा पुरे पाठलाग;
नको दिवस तो रात्र धांवते ज्या मागोमाग.

तुझी उपजती आशा मनिंची मनींच चिरडावी ?
कीं विसरुनि अनुभवा, एकदां पुन्हां धांव घ्यावी ?

निराशेंतुनी प्रवास इतका पडला जो पार;
परतावें कां त्यांतुनि फिरुनी बिकट जरी फार ?

पूर्वसंचिता ! वद कायमचा का तो सरणार ?
किंवा नशिबीं पहिल्यापासुनि पुन्हांहि येणार ?

सहज जोडिला मित्र तोडितां कष्ट होति फार;
एक तोडितां सखा जिवाचा एक जीव ठार.

प्रेमाची एकदां पुरी जी झाली मनिं होळी,
विसरावी ती किंवा घ्यावी कायमची झोळी ?

भवाब्धिमधुंनी कशीबशी जी निघते वर मान
पुरती काढावी ती धरुनी असेंच अवसान ?

किंवा तळिंच्या रत्नांसाठीं द्विगुणित उत्साहें
पुन्हां बुडी मारावी खालीं ? शंका मनिं आहे.

सरतां प्रवास नैराश्याच्या भलाबुरा झाला;
म्हणविल का तो भावि काळचा परी बरा त्याला ?

अशा भावना जीवांभंवतीं घालितात वेढा;
कोण त्यांतुनी काढिल होतां ज्याचा तो वेडा ?

आधीं आशा तुटतां सुटलें बंधन जगताचें;
उदास हृदया वेड लागलें चढत्या कवितेचें.

शब्दशारदा परि तुज लाजुनि आज दूर झाली.
हृदयशारदे ! तुझ्या निशाणा प्रेम घाव घाली.

अशा विचारें तुझी मूर्तिही परि होतां दूर,
खराखुरा एकान्त करी हा हृदयाचा चूर.

कशा भोंवतीं तरि गुंगावें हा हृदयाचा धर्म;
कविता गेली, तूंही जासी, ओढवलें कर्म !

पूर्वी जग अंतरतां हृदयीं कांहिं तरी होतें;
परि या काळीं तूं त्यजितां मग काय तिथें उरतें ?

अनुभवितों हा, हृदयशारदे खराच एकान्त;
भीत भीत आत्माहि बावरे भयाण हृदयांत.

स्थापन करि तव मूर्ति पुन्हां ही हृदयमंदिरांत;
तुजवांचुनि एकटा फिरावा जीव कसा त्यांत.

एकान्ताचें हृदयिं माजलें, सखि ! जें थैमान,
जीव बिचारा जाइ न त्यामधिं; शून्य हृदय जाण

आण दया मानें हृदयशारदे, चल ये हृदयांत;
शंका विवेक दूर, मरूं दे; दे मजला हात.

चल धांवुनि ये; नको असा हा भयाण एकान्त;
'गोविंदाग्रज' वेडा तुजविण; करी तया शांत!

## प्रेमाखातर

[ प्रेमनिराशेमुळें हेतुशून्य व हताश झालेल्या मनुष्याला पुन्हां प्रेमाचा आधार सांपडला म्हणजे नवा जीव लाभतो. असा एक प्रणयी पुरुष पावसाळ्यांत आपल्या प्रेमळ संजीवनीला भेटावयास निघाला असतां त्याच्या मित्रानें त्याला न जाण्याचा उपदेश केला आहे, व त्या उपदेशाला त्या प्रणयी पुरुषाचें हें उत्तर आहे, अशी या गाण्याची कल्पना आहे. ]

प्रणयदर्शना जातां मित्रा, न करी उपहासा,
नको थांबवूं मजला, मानुनि खोल हृदयहासा.

कसले डोंगर? नद्या कशाच्या? हीं विघ्नें कसलीं?
प्रेमपथावर सारखींच हीं जरि असलीं नसलीं.

हृदयदेवतादर्शनिं आतां ओढ जिवा लागे;
चला थांबवा त्याला, पाहूं फिरतो का मागे.

मार्गी डोंगर नद्या पाहुनी घे पळता पाय;
असें निरर्थक निर्जिव माझें प्रेम असे काय?

नव्या दमाचा, नव्या जयाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार!

हटतिल डोंगर, तटतिल सरिता ना आपोआप,
झटतिल मेघहि साह्य कराया धरुनि इंद्रचाप!

गिरिशिखरांची पडेल खालीं मोडुनिया मान;
प्रेमापुढतीं सांग कुणाचा टिकतो अभिमान?

नव्या दमाचा, नव्या जमाचा, त्याचा अवतार
पाहुनि करितिल नद्याच त्याला स्वयें पैलपार.

जो निजहृदया फाडित चपलाप्रिया खेळवाया,
वृष्टि कशी ती मेघ करिल, वद, मला थांबवाया ?

तोच आपुल्या पंखांवरि मज वाहुनि नेईल;
निदान मार्गीं मला विजेचा दिवा दाखवील.

प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले;
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ?

गिरितट फोडुनि नद्या कशाला धांवतात ? सांग.
लता तरूविण सांग कुणाचे फेडितात पांग ?

संध्याहृदयीं रमावयाला सूर्य धांवतो ना ?
नातर गगनाच्या पडद्यावर भटकवेल कोणा ?

प्रेमासाठीं, रामापाठी सीता वनवासी;
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी.

रघुवीरांनीं जलनिधिवरती पर्वत नाचविले;
सांग कोणतें संकट दुसरें त्यावरि ओढवलें ?

गोपिजनांच्या करुणरवाच्या ऐकुनिया ताना,
कसा नखावरि गोवर्धन धरि गोकुळिंचा कान्हा ?

पुराणांतल्या कथा कशाला ? पहा आजकाल !
नाचतसेना हवें तसें जग प्रेमें बेताल ?

कां ब्राह्मणपदपादशहाला राणी मस्तानी ?
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं ?

व्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला;
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणीं हात दिला ?

नजर गुंतली तुझी तरी कां तिकडे त्या नयनीं ?
तसाच इकडे या नयनांस्तव मी बसलों ध्यानीं.

सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या;
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या ?

तलवारींच्या धारेवरतीं जीवांचा नाच,
रणशूरांनीं कां केला ? जा विचार त्यांनाच.

प्रेमाचा हा प्रभाव असला अखंड हा चाले;
तशांत हें तर निराशेंतुनी प्रेम जन्मलेलें !

नव्या दमाचा, नव्या जमाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?

## पुनर्जात प्रेमास

प्रेमा ! उठ— चल उघड, झाकली मूठ !

तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला ?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट—चल उघड, झाकली मूठ !

कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळतां स्थल तुज नाचायाला
करीं रे लूट— चल उघड, झांकली मूठ !

क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट ?— चल उघड, झाकली मूठ !

उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां,
प्राणजीवना, तुजही शिवतां,
मरण हें झूट— चल उघड, झाकली मूठ !

द्वेषावरतीं, दुःखावरतीं,
फिरवी तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वहि जगतीं,
धांव बेछूट— चल उघड, झाकली मूठ !

विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला !
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सब् झूट !—चल उघड, झाकली मूठ

तुझिया श्वासाच्या उद्‌गारें
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करूं आतां रे,
सुखाची लूट— चल उघड, झाकली मूठ !

मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हातां,
ऊठ रे ऊठ— चल उघड, झाकली मूठ !

## प्रेमाचा प्रलयकाळ

[ बुद्ध, तुकाराम, खिरस्त, नानक यांच्या मनाचें गाणें असेंच असावें.]

चला चला रे चला चला ॥ विसरुनि विश्वा चला चला ॥ ध्रु० ॥

पूर लोटला प्रेमाचा ॥ प्रलयकाळ हा विश्वाचा ॥
लोट सारखा उचंबळे ॥ आतां कसला ओघ खळे ॥
स्वार्थाचे तट हे फुटले ॥ चहूंकडे पाणी सुटलें ॥
फुटकी होडी ॥ टाका उपडी ॥
सोडुनि साऱ्या मोहाला ॥ चला मिळूं या ओघाला ॥ १ ॥

अलोट प्रेमाचा पूर ॥ धरणें करि सारीं चूर ॥
विश्व बुडालें पाण्यांत ॥ या प्रळयाच्या लाटांत ॥
अथांग पाण्याचा अंत ॥ जाणि एक तो भगवंत ॥
पाणी इकडे ॥ पाणी तिकडे ॥
पाणी पाणी चहूंकडे ॥ आतां लपवतां कुणीकडे ॥ २ ॥

खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे ॥
खंदक जिरले द्वेषाचे ॥ कडे मोडले त्वेषाचे ॥
जीव कोंडला आशेचा ॥ श्वासचि बंद निराशेचा ॥
प्रेमजलाचा ॥ हृदयरसाचा ॥
सागर करि तांडव नाच ॥ प्रलयकाळ तो या हाच ? ॥ ३ ॥

दिशा दहाही खळबळल्या ॥ सीमा त्यांच्या विरघळल्या ॥
त्रिवेणिसंगम काळांचा ॥ मार्गेपुढें न व्हायाचा ॥
रजनीचा पडदा धुतला ॥ दिवसाशीं तन्मय झाला ॥
पांचहि भूतें ॥ पंचत्वातें – ॥
गेलीं; गिळिलीं प्रेमजळें ॥ त्रिगुणांचा रंगहि निवळे ॥ ४ ॥

पाण्याच्या चढत्या लाटा ॥ उचंबळति बारा वाटा ॥
पृथ्वीसूर्य ग्रहगण तारे ॥ बुडबुडेच त्यांवर सारे ॥
प्रकाश वरचा फेस असे ॥ तिमिर नीलिमा आंत नसे ! ॥
एकाकारें ॥ विरलें सारें ॥
पहा पहा रे पहा पहा ॥ प्रळयाची ही मौज अहा ! ॥ ५ ॥

पाहणार परि कोण उरे ॥ जेथें सर्वचि विश्व मुरे
हृदयाचें पिंपळपान ॥ आत्मा माझा भगवान ॥
बाळरूप निजलें शांत ॥ उठविल त्याला कल्पांत ॥
चला तोंवरि ॥ आपण सारीं ॥
प्रेमाच्या या प्रळयांत ॥ उडी घालुं या निमिषांत ॥ ६ ॥

जन्म इथें मरणा जाई ॥ जन्म इथुनि मरणा नाहीं ॥
सर्वांवर फिरतां पाणी ॥ कोणास्तव रडणें कोणी ? ॥
हृदयसागराच्या लहरी ॥ पोहत आत्मा तयांवरी ॥

विश्व बहिरलें ॥ विश्व महिरलें ॥
प्रेमजलाचा भडिमार ॥ करि जीवा गारीगार ॥ ७ ॥

चिरविश्वाचा अवतार ॥ या पाण्यामधली गार ॥
विरुनि जाऊं द्या एकसरें ॥ जिरुनि जाऊं द्या प्रेमभरें ॥
'समा' होऊं द्या भरतीची ॥ एकसारखी चढतीची ॥
अखंड राही ॥ अखंड वाही ॥
प्रेमसागरा ! तव भरती ॥ चढवि सदा वरतीं वरतीं ॥ ८ ॥

प्रेमसागरा, तव लहरी ॥ उडवी अजुनी वरीवरी ॥
अफाट लाटा नाचीव ॥ ब्रह्मनाद तो ऐकीव ॥
लाटांचे देऊनि झोके ॥ काळाचीं मिळवी टोकें ॥
या बाजूला ॥ त्या बाजूला ॥
कुठेंहि मग मी पडे जरी ॥ सर्व सारखें मला तरी ॥ ० ॥

थांबवील असला पूर ॥ कोण असा आहे शूर ? ॥
अनंतास देउनी वळसा ॥ ब्रह्माच्या जाइन कळसा ॥
विश्व बुडे मम हृदयांत ॥ पूर्ण हरपलें अंशांत ॥
बोलत जय जय ॥ डोलत थय थय ॥
अनंततेच्या पलीकडे ॥ प्रेमप्रळया, जाच गडे ॥ १० ॥

गाणें माझें प्रळयाचें । कुठलें तें संपायाचें ॥
प्रळयाच्या लाटा उडती ॥ गाण्याचीं कडवीं चढतीं ॥
ब्रह्मस्थितिची शून्यगति ॥ तिच्यांतुनिहि गाणीं निघतीं ॥
स्वानंदाच्या— ॥ ब्रह्मपदाच्या— ॥
पूर्णपणाच्या पैलथडी ॥ गाण्याची जाईल उडी ॥ ११ ॥

ब्रह्महि स्वपदिं हालेल ॥ गाणें तरि हें चालेल ॥
शून्यकल्पनेहुनि खोल ॥ प्रेमप्रळयाचे बोल ॥
नका थांबवूं प्रेमाला ॥ नका थांबवूं गाण्याला ॥
हृदयचि हरलें ॥ शब्दहि सरले ॥
निःशब्दांच्या नादभरीं ॥ गाणें ऐकत रहा तरी ॥ १२ ॥

टाकुनिया चिद्राजीव॥ प्रळयामाजीं या जीव ॥
अचेतनाच्या गुंगींत ॥ ऐका प्रळयाचें गीत ॥
मृतविश्वाचें तेरावें ॥ कडवें चालें तेरावें ॥
कोणी निंदा ॥ कोणी वंदा ॥
प्रेमप्रळया प्रेमरसें ॥ 'गोविंदाग्रज' गात बसे ॥ १३ ॥

## लांडोर

[ मोर नाचतो तशी लांडोर नाचते याचा अनुभव बिचाऱ्या तेजस्वी मोराला येतच असतो; लांडोरीला त्या म्हणीचा अर्थ कळून चुकला तरी उपयोग होत नाहीं; एकूण हें गाणें फुकट आहे. ]

नाचतां मोर ॥ नाचते पहा लांडोर ॥ ध्रु० ॥

कोठें त्याचा भव्य पिसारा ॥ कोठें रंगाचाहि पसारा ॥
कोठें थाटमाट तो सारा ॥ कुठें ही चोर ॥ नाचते ...॥ १ ॥

त्याचा आनंदाचा नाच ॥ दिवे लाविले जाळुनि पाच ॥
कोठें हिरा कुठें ही कांच ॥ तरिहि समोर ॥ नाचते...॥ २ ॥

जगांत कसरत चाले थोर ॥ तारेवरतीं नाचत मोर ॥
पायीं अपुल्या कच्च दोर ॥ तरिहि छिचोर ॥ नाचते... ॥ ३ ॥

कच्चा कुचका तो आधार ॥ केव्हां तुटुनि जाइल पार ॥
फुटतां आब हसतिल चार ॥ नसे हा घोर ॥ नाचते ... ॥ ४ ॥

जेथें तेथें प्रकार हाच ॥ नाच न नुसत्या मोरांचाच ॥
नाचे मोर कुठें तो साच ॥ बढाईखोर ॥ नाचते ... ॥ ५ ॥

हलतां सजीव बळकट काया ॥ लागे नसतें झट चिकटाया ॥
भंवतीं भंवतीं छाया । जीव ना जोर ॥ नाचते ... ॥ ६ ॥

कला निसर्गामागें जाण ॥ माया ब्रह्मामागें घाण ॥
छाया देवाची सैतान ॥ थोरा पोर ॥ नाचते ... ॥ ७ ॥

सल्यामागें लागे भास ।। नक्कल अस्सलास हमखास ।।
तुटली मधें जरि दमसास ।। तरी बिनजोर ।। नाचते ... ।। ८ ।।

जमाव यांचा जमतां थोर ।। मोरावरही यांचा जोर ।।
चोरावरती होती मोर ।। अशी शिरजोर ।। नाचते ... ।। ९ ।।

कमअस्सल या अकरमाशा । ताज्या रक्ता जळवा बाशा ।।
करिती जगतीं स्वैर तमाशा ।। रूप अघोर ।। नाचते ... ।। १० ।।

खोटें नाटें जगीं पसरतें ।। फारपणानें खरेंहि ठरतें ।।
खरें बिचारें दिसतें भलतें ।। मग बिनघोर ।। नाचते ... ।। ११ ।।

बघुनी प्रकार उलटा असला ।। येत जगाचा वीट मनाला ।
वाटे विनवावें देवाला ।। नको तो मोर ।। आणि ही नको लांडोर
।। नाचते ...।। १२ ।।

## गोड निराशा !

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत;
तरी तिची न्यारी रीत;
कळी कोंवळी चांफ्याची
मिटलेली ती कायमची;
जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;

तशाच कोणी,
सुत्रावांचुनि
दिवल्या रचुनि

कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन !

नाहीं पाणी जरि भंवतीं
तरी दोन कमळें हंसतीं;
जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा;
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा!

तुमच्या जगतीं,
किरणें पडतीं,
कमळें फुलतीं,

परि माझीं कमळेंच बघा
निजकिरणीं खुलविती जगा

गुलाब होते दोन तसे,
आनंदाचे गोड ठसे;
कळयावांचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकती मौजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं!

गुलाब असले
हांसत बसले,
मनांत ठसले,

हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा!

परी फुलें तीं जादूचीं;
लपंडाव खेळति साचीं;
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार!

दिसतां हातीं लागत ना,
वेड लागलें तेंच मना;

क्षणांत फुलतीं,
क्षणांत लपतीं,
दिसतीं हंसतीं,

घेर घेतला गिर्कीचा
फेर थरकत्या फिर्कीचा
निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया;
तोंडानें उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा;
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;

परि तो कुठला
गवसायाला!
तसाच उरला,

अधिक पसरला चहूंकडे,
तीडितांच उलटा वाढे!

यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना;
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे;
गुलाब तर न मिळे मजला
परि कांटे मम देहाला!

त्या कुसुमाचे
संसर्गाचे
कांटे साचे

मांडिति अंगीं थैमान!
कांट्यांचें माजे रान!

कोण असा जादूगार
खेळ करी हा अनिवार ?
उघड्यावरती टाकुनियां
राखी ती फुलती दुनिया
चोरितांच वाटे ऐशी !
चोरीची थट्टा खाशी !
    चित्त शरमलें
    जरी विरमलें
    तरिही रमलें;
चोरी असली लाजेची
वाटे त्याला मौजेची !

अशी निराशा भरे मनीं
शरीर भरलें कांट्यानीं
गुलाब मज्ज हांसत बसला
हाताशीं नाहीं आला;
नवल तरी कैसें होई —
दुःख निराशा नच देई !
    न कळे कांहीं,
    हुरहुर कां ही ?
    वेचें मनही
कां विनवितसे देवासी ?—
निराशाच दे गोड अशी !

## स्मशानांतलें गाणें

[ बोलून चालून भुतांचेंच गाणें— त्यांत अर्थ तरी काय असावयाचा ? व राग तरी काय धरावयाचा ? ]

वाटे स्मशान शांतिस्थान ! ॥ ४० ॥
सजीवतेचा चाले चाळा,
कवीस त्याचा ये कंटाळा,

त्रास जगाचा चुकवायाला,
शांतपणाचें, रूप जगाचें, अशा स्मशानीं जात ॥ १ ॥

विश्रांतीस्तव निसर्गदेवी,
निजसदनींचा दीप मालवी,
( ज्यातें वदती अल्पधी रवी ! )
किंवा केल्या, तारा टिकल्या, फोडुनि झुंबर छान ! ॥ २ ॥

प्रकाश रवीचा यापरि मेला,
संध्यारक्षारूप पावला !
परी तिचाही शेवट झाला,
आकाशीं जी ' गंगामाई, ' पडे तिच्या तीर्थांत ! ॥ ३

अनंत-तारा-तारक-नयनीं
जरी यावया खुणवी रजनी
चंद्र न वरती परि ये भिउनी,
स्थिति जी रविची, तीच तयाची, होईल हें भय त्यास ! ॥ ४ ॥

दुष्कृत्यांचा बहर चालला,
जोड तयांच्या कृष्णत्वाला
द्याया, अंधारही पसरला,
दुष्टत्वाशीं, अंतरनाशी, मिसळुनि जाई त्यांत. ॥ ५ ॥

भयाण जागीं, भयाण काळीं,
भयाण वृत्ती होत निराळी;
भयाण झाली तों आरोळी !
जरा दचकला, कवि तो उठला, ऐके देउनि कान. ॥ ६ ॥

" शांतीची ही स्मशानकारा,
सजीवतेला इथें न थारा,
म्हणती मरुनी पडतो वारा !
प्रेम जगाचें, जर हें साचें, कसला मग हा नाद ? ॥ ७ ॥

पवन गातसे कां बेसूर ?
हंसें भुतांचें कीं भेसूर ?

प्रेतांचा चैापदरी सूर ?
कीं प्रेतांतुनिसुटला म्हणुनी आत्मा करि थैमान ? ॥ ८ ॥

तों सरणांतुनि अस्थिच उडती,
त्यांचीं तुटकीं प्रेतें होतीं,
स्कंधीं त्यांच्या भुतें बैसतीं !
करिती बडबड, शब्दही न धड, कवि बसवी अनुमान. ॥ ९ ॥

अणुरेणूंच्या अवकाशांत
प्रेतांचे कण हे शिरतात,
स्वैर घर्षणें ध्वनि करितात,
स्मशानांतलें, गाणें चाले; त्याचा पडसाद. ॥ १० ॥

रातकिड्यांचा किर्र शब्द या
निघे, सारखा सूर धराया,
श्वान रडे हें साथ कराया,
तुझिया हृदयीं, धडधड जी ही, धरि तबल्याचा ताल ! ॥ ११ ॥

कवि ऐकुनि हें स्तब्ध जाहला,
प्रकार सारा कळे तयाला,
मृत जिव्हेला फांटा फुटला !
ऐकायासी, त्या गानासी करि आत्म्याचा कान. ॥ १२ ॥

" धन्य धन्य ती स्मशानभूमि !
धन्य येथलीं भुतेंहि आम्ही !
सदाहि देवा या सुखधामीं—
घडवी वसती; सजीव जगतीं, नको नको आम्हांस ! ॥ १३ ॥

धन्य तशी ती मानवजाति !
श्रेष्ठपणा जी मिरवी जगतीं,
सजीवतेचा आव घालिती,
भुतें परांतें, वदतां भूतें, तिरस्कार ये फार ! ॥ १४ ॥

बाह्यरूप नच भुतांस म्हणुनी,
तुच्छ मानिती त्यां अवगणुनी,
द्विविधरूप जरि धरिती प्राणी—
तरि बाह्यांतर, रूपीं अंतर, जहनम्से अस्मान्! ॥ १५ ॥

देवनाम भूतांप्रति पळवी.
देवाची त्यां कळे थोरवी,
मानव नवसें परि त्यां फसवी!
कोणी म्हणती, 'ईश्वर नास्ति'—हाच तयाचा मान! ॥ १६ ॥

अनेक माता, एकचि वनिता,
न्यायमार्ग हा ऐसा असतां,
अनेक वनिता, एकचि माता।
व्यर्थ सारा, मांडिति पसारा, नीतीच्या जगतांत! ॥ १७ ॥

भुतें भुतांस कधीं न खाती,
बंधु बंधुच्या रंगत रक्तीं!
बाप मुलाची करितो माती!
हा जगताच्या मनुष्यतेच्या, प्रेमाचा बाजार! ॥ १८ ॥

नीतीसाठीं वपन मांडिती,
प्रेताहातीं नवरी देती,
अनाथ विधवा पदीं चिरडती!
सैतानावरि, ताण कसा करि, सृष्टीचा सुलतान! ॥ १९ ॥

शास्त्रांचे तोंडांत फवारे,
रूढीचे परि गुलाम सारे!
स्वतंत्रतेचें उसनें वारें;
पक्षी सदनीं, बसले कोंडुनि, गाति यशाचें गान! ॥ २० ॥

समानतेच्या मारी बाता,
वरच्या लत्ता झेलित माथां,
सर्वंच खालीं झाडी लाथा;
न ती निवारी, न ही आवरी, बेशरमी हैवान! ॥ २१ ॥

अन्नावांचुनी सपिंड मरती;
मरतां त्यांचे पिंड अर्पिती!
सजीव तोंवरि लत्ता देती
मरतां घेती, खांद्यावरती, उरफाटा सन्मान! ॥ २२ ॥

पुण्यविक्रया करि धनदानीं,
मांग बसे तो उच्च स्थानीं!
भाविकतेला शिवे न कोणी,
कपटी मांजर, दिलें तया घर, द्वारिं इमानी श्वान. ॥ २३ ॥

दोन पतींनीं विधवा न सती,
पतिव्रतेला परि पांच पती!
धर्म भाळला आईवरती;
परी आपुलें, तेंच चांगलें, विवेक झाला ठार! ॥ २४ ॥

देवद्वारीं बसला नंदी,
राजद्वारीं स्वारशिबंदी,
रक्ष्य जनांला होई बंदी,
रक्ष्य वस्तुला, धक्का अपुला, रक्षक राखी प्राण. ॥ २५ ॥

गर्भीं भार धरि तिजला भजती,
धेनु दुग्धदा, माता वदती,
भर वाहुनि आजन्म पोषिती!
मरतां उदरीं, मातृभूमि धरि; परी तिशीं बेमान! ॥ २६ ॥

विधवा मार्गीं मार्गे फिरवी,
मांजर अडवें कार्य बिघडवी,
कर्तृत्वाची हीच थोरवी!
प्रेता हंसतां, कार्यक्षमता, न धरी परीं गुमान. ॥ २७ ॥

भुतें बिचारीं रात्रीं फिरती,
म्हणुनी त्यांतें तिरस्कारिती;
रात्रीची तर गोष्ट दूर ती—
परि दिवसांही दुष्कर्मीहीं पाडिति जन अंधार! ॥ २८ ॥

केंसांनीं जे गळे कापिती,
स्त्रीच्या केंसांनीं ते तरती!
प्रायश्चित्त शुद्धहि होती.
शास्त्रें रडतीं, कराच सत्कृति तरिही हलते मान. ॥ २९ ॥

धर्मस्त्रीचा गळा कापुनी,
समाधान मग करि हिंडवुनि,
तुळशीभंवतीं, देवायतनीं,
विचित्र लीला दावुनि तिजला, दे दुःखावरि डाग! ॥ ३० ॥

गोपी सोळा सहस्र असती,
तरिही वृंदेसाठीं श्रीपति
निघे स्मशानीं; धीर न पोटीं;
तुळशीभंवतीं, विधवा करिती, काय न हाच विचार? ॥ ३१ ॥

वैराग्याच्या सोप्या गोष्टी!
राम रडे परि सीतेसाठीं!
ब्रह्मा लागे मुलिच्या पाठीं!
भोळा शंकर, स्त्री अंकावर, गणेश राखी दार! ॥ ३२ ॥

घरच्या देवा स्त्रिया न भजती,
पुराण-कीर्तन धुंडित फिरती,
देवहि त्यांचे वेश्यांभंवतीं,
विवाहकालीं, शपथ वाहिली, दोघे पाळिति छान! ॥ ३३ ॥

सुधारणेचे भक्त निपजती,
'स्वतंत्रता द्या स्त्रियांस' म्हणती,
पारतंत्र्य परि आपण वरिती
परानुकरणीं दंग; सोडुनी स्वत्वाचा अभिमान. ॥ ३४ ॥

कोणि काढितां नवी कल्पना,
करिती सारे वृथा जल्पना,
मिळतां यश त्या, देउनि माना—
पायां पडतां, लाज न चित्ता, म्हणतो तो अवतार! ॥ ३५ ॥

सफेत येतो रंग शिराला,
रंग आंतला तसाच काळा!
वृद्धपणा नच दुष्टत्वाला,
भय काळाचें, नच देवाचें, तेंहि परी देहास! ॥ ३६ ॥

चुना पांढरा, कातहि काळा,
रंग तयांतुनि निघे निराळा!
सहकार्यातें, असल्या ताळा!
दोघे मिळुनी, एक ठिकाणीं करिति परस्परनाश! ॥ ३७ ॥

मित्रपणानें पडे गळ्यांत,
गळफांसहि तो घालिन हात!
कुणी कुणाचा करणें घात—
नेम न याचा; उपकाराचा मोबदला अपकार! ॥ ३८ ॥

सुखदु:खांचा भावहि नसतां,
सुखदु:खांची दावी समता.
सुखी व्हावया भगवद्‌गीता
वेद मंथुनी श्रीकृष्णांनीं, हेंच काढिलें सार! ॥ ३९ ॥

बळी पोंचतां भुतें न छळिती,
अल्पतुष्टता हास्यास्पद ती
मानवतेची परी न रीती.
पिंड जयाचा खातो त्याचा करितो जगीं बोभाट! ॥ ४० ॥

म्हणती आम्हां भुतें बाधतीं
भूतांची परि नाहीं छाती—
जायाची या असल्या जगतीं!
भुतेंच भीती या भूतांप्रति, भुतें भुतां हीं खास! ॥ ४१ ॥

"मरतां मानव भुतें निपजतीं!"
बोलायाची परि ही रीती.
भांगेंतुनि कां तुळशी निघती?
कोठें आम्ही? कोठें तुम्ही? कशास कांहीं ठाव? ॥ ४२ ॥

ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो,
मरुनि जगाच्या स्मशानिं येतो,
मन मानव– छेः ! भूतचि होतो
चितेंत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम ! ॥ ४३ ॥

भुतें विदेही, मानव सुंदर,
दिव्य भूमिका स्मशान-मंदिर,
प्रवास येथें फारचि दुष्कर !
प्रेत आणितां बोले जनता, ' राम कहो, श्रीराम ! " ॥ ४४ ॥

इतकें गाउनि भूतें हंसलीं,
अखेरची जणुं तान घेतली,
तया वाहवा घुबडमंडळी—
घू घू ' शब्दें, देत मग वदे ' घ्या आतां आराम ! ' ॥ ४५ ॥

श्वानहि सांथ करोनी दमले,
विधवेनें मृत बालक त्यजिलें,
दूध तयाच्या मुखिं सांपडलें,
पिउनि तेवढें, बघुनि कविकडे, हांसत पडलें श्वान.॥ ४६ ॥

कवि हें पाहूनि विस्मित झाला,
म्हणे, " पात्र मी न या स्थळाला ! "
पळुनी पापी जगांत आला,
स्मशानांतलें, गाणें असलें, कवीस नुरवी भान ! ॥ ४७ ॥

म्हणे, " वरुनि जग दिसतें सुंदर—
' राम ' जाणतो ' क्या है अंदर ' "
स्मशानातलें गाणें सत्वर—
अमोल म्हणुनी, टाकि उधळुनी चहूंकडे जगतांत ! ॥ ४८ ॥

## घुबडास !

" या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ "

[ या प्रवचनाची आठवण घुबडाचा शब्द ऐकून होऊं नये असें त्या बिचाऱ्यानें कोणतें पाप केलें आहे बरें? आमच्या दृष्टीचा रंग त्यावर कां लावायचा? ]

घुबडा, बोल रे घू घू। नकोत चिमण्या राघू! ॥ ५० ॥

मातींत मिसळुनि झाली माती
धडपड असल्या फोलासाठीं
चिंवचिंव नुसत्या पोटासाठीं
ओवाळुनि टाकिलें जगीं तें मीं तूं कधिंहि न मागूं. ॥ १ ॥

आज आपला बोलति नाद
उद्यांच भलत्याचा पडसाद!
पोपटपंची पोकळवाद!
जळत्या खाईसाठिं म्हणाया मी तूं कधिंहि न मागूं. ॥ २ ॥

शंख कुणाचा पोटापाठीं!
गात कुणी तर तिसऱ्यासाठीं!
छाया जीवाची उफराटी.
"जो तो ज्या त्यासाठीं!" चल, हें मी तूं यांना सांगूं. ॥ ३ ॥

पोपट गातो मंगल नाम,
जळु दे;— कुठला तयांत राम?
उष्ट्या गुळणीचा तो 'राम!'
आपण आपुला राम रमवितां मी तूं कधिंहि न भागूं! ॥ ४ ॥

सताड उघड्या रविकिरणाच्या
प्रकाशांतला जो तो नाच्या,
नाचत तालावर इतरांच्या,
ताज्या घोड्यावर गोमाशा खुशाल दे या गुंगूं ॥ ५ ॥

पोपट चिमण्या या जाऊं दे,
खुशाल रडगाणें गाऊं दे,
गोष्पदिं मुंगीला न्हाऊं दे,
मार्ग आमुचा सडेतोड हा; जगास दे रे रांगूं ॥ ६ ॥

धनी जगाचा कुठला आला
तुम्हांअम्हांला शिकवायाला ?
निघेल तोची सूर आपुला !
माझें मजला, तुझेंहि तुजला, ' मी-तूं पण ' ना त्यागूं ॥ ७ ॥

मनांत माझ्या जी हुरहूर
जनांत काढिन तीचा सूर,
सांथ मला कर; जरि तूं दूर—
बेसूरानें, भेसूरानें, झोंप जगाची भंगूं ! ॥ ८ ॥

तुमची अमुची न्यारी रीत,
एकान्ताचे भालाईत,
काळोखावर लिहिलें गीत,
उचल जागत्या अशा जगाला चल, वाचाया सांगूं ! ॥ ९ ॥

ऐकूनि असल्या पिशाचगाना
कितीक मोडुनि पडतिल माना,
कितेक हलतिल ऐकुनि ताना,
तुला मला परि काय होय तें ? रंगाखातर रंगूं ॥ १० ॥

गगनाच्या उदरांत भरारा
काळोखावर घुमतो वारा
घो घो घो घो ओवचि सारा,
दक्षिण-उत्तर कापुनि अंतर नभास लागे लंघूं ॥ ११ ॥

वेताळाची येतां स्वारी,
भूत वाजवी काय तुतारी ?
भालदार कीं त्या ललकारी ?
मरत्या रात्रीचा हा श्वासचि लागे काय तरंगूं ? ॥ १२ ॥

वरतीं नभ हें, अरतीं भूतळ,
सटवीच्या जात्याचे हे तळ,
पीठ तयाचें गळतें भळभळ,
त्या जात्याची घरघर वारा; त्यावर गाया लागूं ॥ १३ ॥

अफाट वारा सुटला असला
काय कुणाला भिवबायाला ?
तसा घोगरा घसा आपला,
नच रिझवाया, नच खिजवाया; रंगाखातर रंगूं ॥ १४ ॥

मेघ मारुनी बरुनी गारा
काय कुणावर करिती मारा ?
त्यांतुनीच परि निघती धारा,
'गोड कडू ' चें गाणें असलें चल ये जगता सांगूं ॥ १५ ॥

गुरफटलें जग सारें मोहुनि,
कालतरंगावर परि वाहुनि,
बघ मी आलों त्यांतुनि पोहुनि,
फिरता फकीर तूं ; तव चरणीं जरा मला दे लागूं ॥ १६ ॥

संन्यासी तूं जन्माचा रे;
इतरांची तर कथाच विस
होतीं का परि मातापितरें ?
पूर्वाश्रमिंच्या संसाराचा थांग न देसी लागूं ! ॥ १७ ॥

प्रीति असे का ठाउक तुजला ?
जीव कधीं का दुःखें सुजला ?
प्रकाश नयना कांचे का दिसला ?
तुझ्यावाचुनी तुझ्या जगांत न देसी कोणा वागूं ॥ १८ ॥

व्याप कधीं जन्मामरणाचे
ओगिलेस का स्मरतें साचें ?
कीं संस्कारहि हे पूर्वींचे ?
येतां जातां किंवा प्राणा देह लागतो बिलगूं ? ॥ १९ ॥

एकान्ताला कां पतकरशी ?
समाधींत या कधिंचा रमशी ?
कुठें असा संन्यासहि शिकशी ?
"घू घू" वांचुनि दुसरें कांहीं तुझें न देशी उमगूं ॥ २० ॥

शिष्य तुझा मी झालों म्हणुनी,
निःसंगाची संगत धरुनी,
काळोखाची राख फांसुनी,
सांग तुझा गुरुमंत्र मला तो; करीं एकदां घू घू ॥ २१ ॥

ऐकुनि वाटे तव हें गाणें
निजल्या विश्वाचेंच घोरणें,
वाऱ्याचें बेछूट बरळणें,
किंवा काळोखाचें रडणें लागत काय तरंगूं ? ॥ २२ ॥

काळे डोंगर जिकडे तिकडे,
कडेकपारी त्यांचे जबडे,
काळोखामधिं असतां उघडे—
तुझा शब्द जणुं निघतो त्यांतुनि ' आ ' करितांना घू घू ॥ २३ ॥

नादब्रह्माचें हें प्रेत ?
कीं जीवाचा नाच हवेंत ?
मृत ओंकाराचा ध्वनि येत ?
तांडवकालीं कीं शंभूचा डमरू करि हा घू घू ? ॥ २४ ॥

भटक्या जीवा आला थकवा,
पाहुनि भुलावणीचा चकवा,
काळोखांतुनि घाली पकवा,
उलूनि काळिज ब्रह्मांडाचें लागे काय दुभंगूं ? ॥ २५ ॥

विश्वात्म्यानें शंख स्फुरिला,
विश्वहृदयीं तो घुमूं लागला
हृदयामाजीं या दुमदुमला,
फोडुनि हृदया गगनपथावर काय लागला वेंघूं ? ॥ २७ ॥

कीं वाऱ्याचे घुटके घेत,
रात्र करी प्रळयाचा बेत,
काळ तिला हुंकारा देत,
भीषण रव तो शब्दांवर लागत काय तरंगूं ? ॥ २७ ॥

बहिरासहिरा होतो जीव,
घुसघुसण्याची नच जाणीव,
कानावांचुनचें ऐकीव,
थरथरतो अंगांत जगाच्या एकांतांतिल घू घू ? ॥ २८ ॥

चोर मनाचे मनीं चरकती,
हलल्याविण मार्गीहि सरकती,
खुळीं दिलें भ्रमभरें थरकतीं,
घुम् घुम् घुम् घुम् एकसारखा घुमतो आता घू घू ॥ २९ ॥

असें असे जर गाणें भेसुर
ऐकाया तरि आत्मा आतुर,
कां न कळे तें लावी हुरहुर,
त्यांत काहिं तरि असे श्रेष्ठ जें जिवास लागे विलगूं ॥ ३० ॥

असल्या गाना तूं गातांना,
काळोखावर ठरतिल ताना,
रेषारूपें दिसतील नयनां,
तुझी तीव्रता ऐकुनि माझ्या हृदया दे या जागूं ॥ ३१ ॥

मीही मिळविन माझा सूर,
लाडें लाडें जें कसूर,
करुनी टाकूं त्यांचा चूर,
' गुळाचेच गणपती ' जगीं जे त्यां वेशीवर टांगूं ॥ ३२ ॥

खरें न कोणा कधींच दिसतें,
म्हणुनिच दिसतें तें तें पटतें,
चुकल्या चित्ता खरें वाटतें,
वस्तुवस्तुवर परि तेजाचा छाप लागतो रंगू ॥ ३३ ॥

मूळ रूप परि अंधारांत,
न फिरे त्यावर भलता हात,
तें तूं बसली सदा पहात,
तमोभेदिनी दृष्टि तुझी ती दे मम नयनीं तरंगूं ॥ ३४ ॥

दृष्टिस इतर न दिसतां कांहीं,
सैरावैरा हिंडत नाहीं,
जो तो ज्याचा त्याला पाही,
आत्मनिरीक्षण काळोखांतिल काम दृष्टिला सांगूं ॥ ३५ ॥

अहंपणाच्या गाऊं गाना,
मुक्या मनाच्या उघड्या ताना,
स्वानुभवानें हलवूं माना,
ठराविकाला लाथ मारुनी नभासही उल्लंघूं ॥ ३६ ॥

तुझी आपुली संगत छान,
एकान्ताचें गाऊं गान,
बाणा ज्याचा त्या अभिमान,
वेळ आपुली भरास आली चल ये गाया लागूं ॥ ३७ ॥

रात्र रंगली काळोखानें,
गेलीं संगीताचीं गानें,
विलया गेलीं उसनीं भानें,
कोणी निजलें, कोणी मेलें, आतां मी तूं जागूं ॥ ३८ ॥

वरती नभ हें खाया पाही,
खालीं काळ्याकभिन्न राई,
काळोखाच्या भकास खाई,
सळसळुनी काळोख उकळतो; पवनहि लागे झिंगूं ॥ ३९ ॥

तेजाची गंगाच आटली,
काळोखाची प्रभा दाटली,
भयानकाची सभा थाटली,
चिरंतनाचें प्रेतचि नाचे; लागे विश्व दुभंगूं ॥ ४० ॥

दिवे चमकती आकाशांतिल,
नसत्या चिरंतना ते गातिल,
अपुल्या काळोखाला खातिल,
जळत्या आशेच्या या ज्योती काळोखानें डागूं ॥ ४१ ॥

मरुं दे त्यांचें फसवें तेज,
खोट्या मोत्यावरचें वेज,
कृष्णनभाची अखेरशेज —
करुनि धोंगडी देउनि त्यांच्या अखंड वाती भंगूं ॥ ४२ ॥

पिळुनी पाणी काळोखांतिल,
दिवे मालवूं आकाशांतिल,
आले जेथुनि तेथें जातिल,
काळोखाची धूळ मिळुनि मग काळे काळे रंगूं ॥ ४३ ॥

शरीर काळें, जीवहि काळे,
बटवटीतसे काळे डोळे,
तारांच्या काजळिचे गोळे,
काळभैरवचि मी; तूं माझा गोजिरवाणा रावू ॥ ४४ ॥

घोर शब्द तूं करिं या काळीं,
—एकांताची जणुं किंकाळी,
शांतिब्रह्माची कीं उकळी,
स्वानुभवाचा तुझेपणाचा, दे रव भंवतीं पांगूं ॥ ४५ ॥

मध्यरात्रिच्या या अवकाळीं,
गात बसूं चल गाणीं काळीं,
काळीं किरणें नेत्र उगाळी,
सजीवतेच्या काळ्या काळ्या प्रेताला आलिंगूं ॥ ४६ ॥

ठराविकानें मग जें भरलें,
ठराविकचि तें आतां निजलें,
ठराविकचि रीतीनें मेलें,
स्मशानांतला जलसा अपुला; चला गावया लागूं ॥ ४७ ॥

ज्याच्या प्रेताच्या तोंडावर,
काळोखाची टाकूं चादर,
'राम' तयानें म्हटला, ये तर —
रामप्रहरच्या अशा भुपाळ्या आपण गाउनि रंगूं ॥ ४८ ॥

भूपाळ्यांचा विभास राग,
भयानकाला लाविल आग,
डवळुनि तमास जागोजाग,
काळोखाच्या लाटांवरती लाविल तेज तरंगूं ॥ ४९ ॥

आकाराविण जीव डोलती,
बोलावांचुनि भाव बोलती,
गाणीं त्यांचीं दूर खोल तीं,
अर्थ खोल ते करूं बोलते; चल ये, त्यांतच गुंगूं ॥ ५० ॥

काळोखाचे पीळ मोकळे,
गतकाळाचें गाणें सगळें,
घुमुनि सारखें त्यांत गोंधळे,
अर्थ तयाचा चल ये, आपण सर्वांआधीं उमगूं ॥ ५१ ॥

फुलें कालचीं काळवंडलीं,
नक्षत्रेंही नभीं झिरपलीं,
निःश्रेयाचीं बिजें करपलीं,
जित्या सुराचा जरा जिव्हाळा दे रे त्यांना लागूं ॥ ५२ ॥

ऐकुनि तव हें शांतरसाचें,
काळें गाणें करुणरसाचें,
उफळतील कण काळोखाचे,
प्रकाशबीजें गूढ लागतिल फुलुनी स्वैर तरंगूं ॥ ५३ ॥

स्वैर नाचतीं प्रकाशांतलीं
विश्वें सारीं बघ हीं सुकलीं,
उदास छाया त्यांवर भरली,
सूर खडा धर, ऐक तुझी ही; गूढ आपुलें सांगूं ॥ ५४ ॥

फुंक आपुलें भयाण शिंग,
काळोखाचें फोडुनि भिंग,
अज्ञेयाचें उकली बिंग,
पृथ्वीचें नारिंग फुंकरावर उडवाया लागूं ॥ ५५ ॥

नारिंगाच्या अशा शिरोऱ्या,
काळोखाच्या वळुं या दोऱ्या,
भुरक्या राहिऱ्या गोऱ्यामोऱ्या,
करितिल त्यांच्या आधारावर नाच उद्यांचे राघू ! ॥ ५६ ॥

जरी आपुलें गाणें काळें,
निघेल त्यांतुनि विश्व उजाळें,
चिरंमृतांना उठविल काळें
मरत्या ब्रह्मालाहि आजच्या होइल मात्रा लागूं ॥ ५७ ॥

झाडांच्या पानांची सळसळ,
मृतप्राय आत्म्यांची तळमळ,
विश्वाच्या हृदयांतिल खळबळ,
दूर कराया— दूर हराया चल ये, गाया लागूं ॥ ५८ ॥

काळोखांतुनि जग जें दिसतें,
परब्रह्म तें त्यावर बसतें,
काळें गाणें ऐकुनि हंसतें,
नित्यासाठीं साक्ष तयाची सुरासुरावर मागूं ॥ ५९ ॥

शांतरसाचा, एकान्ताचा,
स्वानुभवाचा, वैराग्याचा,
काळोखांतिल अज्ञेयाचा,
गीतझरा सोडुनी तयावर देऊं जगा तरंगू ॥ ६० ॥

शांत शांत मग जिकडे तिकडे
ब्रह्मजलाचे सडे चहुंकडे,
जें तें होइल तेव्हां उघडें,
परात्पराचें गीत रोकडें गातिल चिमण्या राघू ॥ ६१ ॥

घुबडा ! आतां वेळ न उरला,
जीव कधींचा गाया झुरला,
भाव तयाचा मनींच मुरला,
तोंड तयापरि फोडिलेंस तूं आतां दे त्या रंगूं ॥ ६२ ॥

काळोखाचें भिनतां वारें
शरीर सारें पहा थरारे
पंचप्राणहि थिजले सारे
सुन्न मस्तकीं घुमतो आतां एकसारखा घू घू ॥ ६३ ॥

काळीं गाणीं अशीं गाढ नीं
रसरसलीं हृद्यांत वाढतीं,
पिळुनी हृद्या सूर काढतीं,
' गोविंदाग्रज ' घुमवितात मग घू घू घू घू घू घू ॥ ६४ ॥

## कलगीचें गाणें

बोल बोलतों सलगीचे
गाणें माझें कलगीचें !
एक वेळ जी आवडती
सारंगी माझी होती,
नानापरिचे सूर तिचे
निघती कितितरि गमतीचे;
काळ पुढें तो परि गेला
आनंदहि कांहीं मेला
नवी नवाई– कायम नाहीं– थोडी राही
पुढें सुरानें नच रमवी
स्मृतिनें परि त्यांच्या भ्रमवी !

असाच बसलों कुठेंतरी
सारंगी घेऊन करीं;
खेद मना जरि बहु झाला
आशा होती फार मला—
थिन्ना थिन्ना थिन्नकना
प्रसन्न करिशील खिन्न मना
ही सारंगी– रंगुनि रंगीं– चित्ततरंगीं

हलविल मनिंच्या तारांना
काढिल नानापरि ताना !

ढोल नगारें मजभंवतीं
नाना नादें परि रडती;
त्यांची पोकळ ओरड ती
एकपणाची करि माती;
गरीब माझी सारंगी
मुळीं खुलेना हमरंगीं;
सूर जमेना– चित्त रमेना– मज करमेना,
विरमेना रव भंवतींचा,
खेदहिं माझ्या चित्तींचा !

दाटी केली तों गगनीं
कृष्ण भयंकर मेघांनीं,
स्वैरपणें हृदयीं शिरले,
मस्तकांतही ते भरले;
कडकडाट त्यांचा भारी,
धुकें पसरलें बाहेरी;
मन घाबरलें– बहु बावरलें– भटकत फिरलें.
कांहिं सुचेना, समजेना,
कांहिं रुचेना, उमजेना !

मेघांच्या छायेसरसें
काळोखाचें राज्य दिसे;
दाट तमाच्या तेजांत
नाहिंपणाचा गिरि दिसत;
काळोखाच्या किरणांचे
कांटे खुपती मग साचे;
वाटे क्षणें पर– गिरिशिखरावरि– बाळ एक धरि
मंजुळ गाण्याचे घेर
ऐकीवाच्या बाहेर !

मेघांच्या थैमानानें
क्षणांत विसरे परि गाणें;
कल्लोळाच्या मग नादीं
यत्न करीं मी संवादीं;
पडुनी भलत्या अशा भरीं
सारंगीं मी न धरिं करीं;
परि तें गाणें– मधुनि ऐकणें– पुनः विसरणें,
रचणें काळोखावरतीं
मग वाऱ्याच्या इमारती

मेघांच्या गर्जनेसवें
मीहि ओरडें दीर्घ रवें;
ढोल नगारे बेसूर
त्यांतच मी मिळवीं सूर;
आशा ऐशी मन भावी
सहसुरां मिळणी व्हावी;
अखेर फसलों– उगाच बसलों– भयाण हंसलों
सूर भिन्न एकेकाचा,
एक भाव तेथें कसचा !

यत्न करीं मग अखेरचा
सूर धरीं सारंगीचा;
भेसूराचें संगीत
ऐकाया आत्मा भीत !
संतापानें भूमिवरी
सारंगीचा चुरा करीं !
भान गळालें– ऐक्य पळालें– सूर जळाले,
झालें गोडीचें काळें
तारांचें झालें जाळें !

हृदयीं मेघांची गरदी
दंग असे भीषण नादीं;

नाहिंपणाचा डोंगर तो
अंधपणें पाहत होतों;
मधुनिमधुनि त्या बाळाचें;
गाणें चाले भासाचें;
वृत्ति बावरी– रडे बिचारी– ऐकाया तरि
नसत्या पडद्याआड
गमे बाळ दडलें द्वाड !

स्थितींत या त्या मेघांचा
कडकडाट हो शेवटचा;
तोंच कडकडे वीज भरे
अवसानाचें ये वारें;
धुकें पळालें फार जवें
मेघ जळाले जळासवें;
वृत्ति रंगली– फारच रमली– हर्षें रडली
उफराटी सारी सृष्टि
मेघाविण झाली वृष्टि

खरेपणाचा पाऊस
स्वच्छ धूत काळोखास;
दाट तमाचें तेज बने
गेलीं तीं काळीं किरणें;
सारंगी तों करीं हंसे
नवल, जशीच्या तशी असे !
समोर डोंगर– परि शिखरावर– बाळ मनोहर
स्वच्छंदें गाणें गाई
सूर सूर ऐकूं येई !

वृत्ति ऐकुनी थरारली
सारंगी वाजवुं सजली;
सात सुरांस्तव ती वेडी
मुदें तिच्या तारा छेडी !
सूर एकची निघे परी
पहिल्यापाहुनि किति गोड तरी !

सुराबरोबर– विरला डोंगर– शिखरतळावर
नाहींचें नाहीं झालें
बाळ गात पुढती बसलें !

ढोल नगारे ते पहिले
पहिल्यापरि चालू झाले;
गाण्याचे परि या सूर
पोकळ करिती चूर !
वृद्ध वधूचें हो खासें
बालवराशीं लग्न असें !
त्या जोडीचें– अपत्य साचें– गाणें असुचें
उपजे बाळपरी नादीं
पितराच्या जन्माआधीं !

ढोल नगारे एकसरी
त्या लग्नाचीं वाजंत्रीं;
सुमुहूर्ताचा क्षण फुटुनी
युगें निघालीं त्यामधुनी !
बाळचि तें गाई गाणें;
नवरामुलगा मंत्र म्हणे;
नव्या जुन्याचें– उण्यापुऱ्याचें– असेनसेचें
लग्न चाललें चौफेर
सारंगी मम आहेर !

साथ कराया गाण्याशीं
सारंगी घे हाताशीं;
" गा तूं, करील साथ, मुला !
माझी सारंगी तुजला. "
बाळ तें स्वच्छंद
गाणें करि अपुलें बंद !
बालक रुसलें– पळत चाललें– अंधुक झालें,
माझी सारंगी म्हणतां
मुकेपणा वरि तें नसता !

वेड लागलें गाण्याचें
आर्जव केलें बहु त्याचें
" बाळा गा रे! गाच पुन्हां,
गाण्यावांचुनि प्राण सुना!
माफ करीं कसलाहि गुन्हा,
गाच, गाच, परि गाच पुन्हां!"
पायां पडलों– "चुकलों!" वदलों– अखेर रडलों:
राग तयाचा जाईना!
कांहीं केल्या गाईना!
" जपलों जीतें जिवापरी
सारंगी ही तूंच धरीं!"
ऐकुनि आनंदें हंसलें
बाळ पुन्हां गाऊं सजलें;
एकपणा भिन्नत्वाचा
जीव तोच त्या गाण्याचा!
चिरकालींचे– मखमालीचे– मऊ गालिचे
केले माझ्या हृदयाचे
गाणें मग त्यावर नाचे.
बाळ सारखें गात पुढें
गाण्यामाजी जीव बुडे;
सर्वांगीं तें विष भिनलें;
सुख मरणाचें सांपडलें;
ऐकत असतां मी मेलों,
प्रेतावरि माझ्या बसलों!
भान न साचें– आज-उद्याचें– मग-आतांचें;
दिवस वाटले जायाचे
प्रेताच्या आयुष्याचे!
चहूंकडे गाणें भरलें;
सारंगी गाणें झालें;
मूर्त भाव ये गाण्याला
धरीनसें गमलें मजला;

धरावया जों हात हले
हाताचें गाणें झालें !
कानांचेंही– दृष्टीचेंही गाणें– होई !
मजला मी पाहूं गेलों
तों मीही गाणें झालों !

गाणें झालें सर्वांचें,
गाणें झालें काळाचें;
गद्याचें गाणें सगळें,
गाण्याचें गाणें झालें;
गाण्यानें मन त्या गाणें
गाण्यानें ऐकत बसणें !
नादब्रह्मीं– जिरलां ‘ तुम्हीं ’ – जिरलों ‘ आम्ही ’
ऐकतांच ऐके त्याचें
झालें जें ऐकायाचें.

स्वार्थ नसे, ना परमार्थ,
गाण्याला कुठला अर्थ ?
वृत्ति जाहली चवचाल,
गाण्याला नुरली चाल !
ध्रुवपदिं गाणें जें सारें
ध्रुवपद मग कसलें बा रे ?
गाण्यांतचि जिरतां काळ
गाणें सहजचि बेताल !
क्षणिं शब्द सुरे– क्षणिं राग हरे– मग नाद मरे,
फुकट नव्हे बा, तें गाणें,
कारेशिल मग “ गाणें गाणें ! ”

बोल बोललों सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !
तोच तयावरि करिल तुरा
वेडा जो मनिं खराखुरा
खराखुरा परि पुरापुरा

असला वेडा करिल तुरा !
गा जगतांना– गा मरतांना– मर गातांना,
मरुनि सदाही गाच परी
गाणें मरणें एक करीं !

स्वप्रेतावरि जो बसतो,
तुझ्याठायीं मजला बघतो,
गाण्यामाजीं दोघांना
पाहुनि घेइल तो ताना !
त्याका हें देतों गाणें
अर्थ जयाला मानिं बाणें;
आदिहि गाणें– मध्यहि गाणें– अंतहि गाणें,
असलें गाणें मिळे नवें,
काय याहुनी तुला हवें ?

होतें गाणें जरि माझें,
आतां झालें तेंच तुझें !
तुझें तरी परि तें कसचें ?
गाणें झालें सर्वांचें !
जाणे तें गाणें साचें
गाणें असलें कोणाचें ?
सवाल घ्यारे– पुढें सरारे– तुरा करारे !
बोल संपले सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !

*　　*　　*

( तमाशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जबाब मिळतो; जगाच्या तमाशांत तरी तसें कां नसावें ? )

## श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु० ॥

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा।
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा॥
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा।
शाहीरांच्या देशा, कर्त्यां मर्दांच्या देशा,॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा॥
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा॥ १॥

अपर सिंधुच्या भव्य बांधवा! महाराष्ट्रदेशा।
सह्याद्रीच्या सख्या! जिवलगा! महाराष्ट्रदेशा॥
पाषाणाच्या देहीं वरिसी तू हिरव्या वेषा।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची॥
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं......॥ २॥

भिन्न वृत्तिंचीं भन्न भिन्न हीं एक जीवसत्त्वें।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें।
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी॥
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर।
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं......॥ ३॥
ठावीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं॥

तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाहि ।
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाही ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगिं कांबळी उशाखालिं धोंडा ॥
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ॥
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल ।
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ शेखठोक ॥
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस-मावळचा श्रीबाजी, ती पावनखिंड ॥
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंडाण्याचा करि सिंहगड मालुसरा तान्हा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ६ ॥

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिलावहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला ॥
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ॥
अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ७ ॥

मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्रदेशा ।
कवि कृष्णाच्या* नियमका हे महाराष्ट्रदेशा ॥

---

* केशवसुत.

देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ॥
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं ।
तिथेंच खेळे श्रीपादांची† कलावती वाणि ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ८ ॥

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ॥
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा टाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ९ ॥

प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ॥
भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी ॥
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी ।
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव ॥
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव ॥
गोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।
जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ १० ॥

( अपूर्ण )

## अनामिकाचे अभंग

[ ज्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधुसंतांना तुमचा आमचा स्पर्श अनामिकापेक्षांहि अमंगळ आहे; शिवाय, मराठीचिये नगरीं या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली

† श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

तिच्या उष्ट्याखरकट्यासाठींच हात पसरण्याचा जिथें संकल्प आहे, तिथें नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला माझ्या अनामिक वृत्तीच्या पामर वाणीनें स्पर्शदूषित करणाऱ्या या अतिप्रसंगाची जनस्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे. ]

## मंगलाचरण

नमो पांडुरंगा ! नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ॥ १ ॥
सर्वा मंगळाचा एकरूप निधि । तूंच देवा विधि-हरिहर ॥ २ ॥
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ॥ ३ ॥
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोहीं ठायीं कीर्त एका तुझीं ॥ ४ ॥
म्हणे ' × × ' अगा पंढरीच्या देवा । अनामिक सेवा घ्यावी आतां ॥ ५ ॥

१

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायण तुझे पायीं ॥ १ ॥
गणांमात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ॥ २ ॥
विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन-कामाठी मांडिली हे ॥ ३ ॥
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ॥ ४ ॥
म्हणे ' × × ' जें जें मनीं मुखीं आलें । तें तें येथ झालें ब्रह्मार्पण ॥ ५ ॥

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंत ॥ १ ॥
मनाचा मुहूर्त साधुनि हा आज । सोडूनिया लाज बोलतों मी ॥ २ ॥
माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्यापायीं दाद मागावया ॥ ३ ॥
नका देवराया धरूं भीडभाड । कराल तो निवाड मान्य आहे ॥ ४ ॥
म्हणे ' × × ' देवा रखुमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ॥ ५ ॥

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवें ॥ १ ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥ २ ॥
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥ ३ ॥
नांवाचेच साव आम्ही थोरथोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥ ४ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे ' × × ' नाहीं भयभीत ॥ ५ ॥

४

मागायाची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुखदुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ? ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडी कांहीं तुझें गान ॥ ४ ॥
म्हणे '××' हीनदीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाहीं भक्तिभाव नीट । तरी हांक मोकली तो धीट ॥ १ ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरूप उजवाडावा ॥ ३ ॥
तुम्ही यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठीं ॥ ४ ॥
म्हणे '××' हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५ ॥

६

आला गोपगोपींसाठीं । देवा तुम्ही यमुनाकांठीं ॥ १ ॥
पुंडलिका द्याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥ २ ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकष्टीं । विठू धेड होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे '××' मायबापा । भीती काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपोआप ॥ १ ॥
माझ्या पातकांची रास । देवा पाडील इरेस ॥ २ ॥
"आजवरी थोरथोर । पार्यी नेले पतित घोर-॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार" ॥ ४ ॥
म्हणे '××' ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ? ॥ २ ॥
तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावे दांतओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलाविल्यावीण । हरी का तें माझा शीण ॥ ४ ॥
देवा तुझी घ्याया लाज ॥ '××' ठाकठासे आज ॥ ५ ॥

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वी नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥ २ ॥
दावि मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ग्वाही ॥ ३ ॥
देणेघेणें हातोहात । उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य '××' भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडी पाण्यापोटीं देणें ॥ १ ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥
काच बळीचा अगोचर । देवा झाला द्वारभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडला देवाजी ? ॥ ४ ॥
म्हणे '××' धीटपाठ । येथें अस्वलाशीं गांठ ॥ ५ ॥

निजलेल्या बालकवीस—

[ माझे परमप्रिय मित्र रा. त्र्यंबक बापूजी ठोमरे–महाराष्ट्र रसवंतीचे रसाळ बांधव—'आनंदीआनंद' करून सोडणारे सुप्रसिद्ध बाल-कवि एकदां प्रातःकाळ अतीत झाला तरी झोपेंतच गुंग होते; मध्यांत दोनतीनदां हांका मारून फुकट गेल्यावर पुढील गीतवादानें त्यांना जागें केलें. सदर पद्य फारच थोड्या वेळांत केलें असल्यामुळें बाल-कवींचें यथार्थ गुणवर्णन त्यांत कोठून सांपडणार ? त्यांच्या 'अरुण' व 'चौघडा' या दोन सुरलीगीतांचा प्रस्तुत गीतांत उडता उल्लेख केला आहे. ]

जगद्गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥
तूंच निजसि तरि कोण सांग मग जागवील जगता ? ॥ ध्रु० ॥
हा तुझा अरुण बघ उगवे पूर्वेकडे ॥
वद कोण तयाचें गाणें गाइल गडे ? ॥
हा देवद्वारीं चौघडाहि धडधडे ॥
करि कोण तुझ्याविण बोल तयाचे ग्वडे ? ॥
तव कवनाची वाट पाहतीं पहा उगवतीं किरणें ॥
गाउनि गाणीं प्रेमळ त्या उल्हास तूंच रे देणें ॥ १ ॥

बघ सृष्टीचे कवि कसे भरारति गगनीं ॥
गातात कोणत्या स्वैर सुरांचीं गाणीं ? ॥
चल एकजीव हो लौकर त्यांच्या गानीं ॥
स्वर्गीत सांग मग तेंच आमुच्या कानीं ॥
सौंदर्याची द्वाहि फिरविण्या बा तव अवतार ॥
मग ऊठ निजसि कां असा गड्या रे झोंप झालि फार ॥ २ ॥

बघ फुलें उमललीं आतां सारीं नवीं ॥
तव रसवंतीचीं फुलेंहि आम्हां हवीं ॥
तव रसाळ रसना-रससागरिं जग झुलवीं ॥
रस उधळुनि गगनीं लपल्या मुकुला खुलवीं ॥
नव्या सृष्टीच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार ॥
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ॥ ३ ॥

तव गान खळाला नेइल पुण्याकडे ॥
शिकवील यमाला सदयत्वाचे धडे ॥
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे ॥
नेईल सज्जना आनंदापलिकडे ॥
सूर खडा धर लावुनि गगनापलिकडे नक्की
करि पुढें खडा जगदीश देउनी प्रेमगांठ पक्की ॥ ४ ॥

भ्रमभरें विश्व हें सर्व जयांमधिं बुडे ॥
चल फोडुनि टाकूं ते फसवे बुडबुडे ॥
मग बसूं जाउनी काळाच्याही पुढें ॥
तव सुराबरोबर कोण न यापरि उडे ? ॥
' गोविंदाग्रज ' कविसि* तुजसवें ने देउनि हातां ॥
जगद्‌गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥ ५ ॥

---

* स्वतःकडे हा शब्द लावून घेतला याबद्दल उदार हृदयांकडून क्षमा होईलच अशी आशा आहे.

## अरुण ( दुसरा )

[ रा. ठोमरे यांची 'अरुण' या नांवाची एक कोमल कविता आहे. ती ऐकून अगदीं निराळ्या दृष्टीनें प्रस्तुत कवितेंत अरुणाकडे पाहिलें आहे. त्याच गोड गीताचा या कवितेंत शेवटीं उल्लेख केलेला आहे. यापूर्वीची या विषयावरील पहिली कविता रा. ठोमरे यांच्या वळणाची आहे. ]

पहा फडकला पूर्वदिशेवर रक्तरंग कसला ? ॥
अरुण हाच का ? उषा हीच का ? सांगा कुणि मजला ॥
लालभडक दिग्भाग जाहला मोदें वा खेदें ॥
अनुरागाचा कीं रागाचा रंग नभीं कोंदे ? ॥

विरहजागरण घडलें ज्यांना फार निशाकालीं ॥
त्या नयनांची एकवटुनि का ये सारी लाली ? ॥
रजनीच्या सहवासें सृष्टिंत घडलें जें पाप ॥
होत असे का सृष्टिस आतां हा पश्चात्ताप ? ॥

किंवा कोमल बाला मेली तीव्र निराशांनीं ॥
हृदया फोडुनि तिच्या प्रीतिची लाट चढे गगनीं ? ॥
दुखावलेल्या जळणाऱ्या परि हताश हृदयांचे ॥
जे रागाचे, जे मूडाचे, बेत निराशेचे— ॥
रात्रीं त्यांचे श्वास चालले मिटल्या डोळ्यांनीं ॥
देवपदीं मग दाद मागण्या रिघती का गगनीं ? ॥

आग लागली किंवा कोठें खालीं पाताळा ॥
उंच दूरवर काय भडकल्या तिच्या अशा ज्वाळा ? ॥
निशापाप निजहृदयीं धरिलें अवकाशें म्हणुनी ॥
पूर्वा जळते पुण्यरवीच्या का पहिल्या किरणीं ? ॥
अन्यायानें रक्त करपजा वाफ काय झाली ? ॥
रक्तनिधिस त्या जग बुडवाया कीं भरती आली ? ॥
मुक्याच इच्छा, आशा झाल्या कोणाच्या खाक ॥
रागानें ही लाल जाहली का त्यांची राख ? ॥
दिनरजनींची धडक मस्तकीं परस्परां बसली ॥
ही दिवसाच्या डोक्यावर का रक्ताची लाली ? ॥

कीं रजनीची टिकल्यासाठीं फाडुनि कांचोळी ॥
जरीपुराण्यासाठीं केली तारांची होळी ? ॥
रविकिरणांचे भाले शिरले आकाशापोटीं ॥
रक्ताचें शिंपणें करी का जखम अशी मोठी ? ॥
कीं पृथ्वीच्या पापश्वासें स्वर्गचि विरघळला ॥
निराधार रस जाउनि भिडतो आतां पाताळा ? ॥
निशा संपवुनि दिन आणाया सकल देव आले ? ॥
रात्र चालवूं या बाण्यानें दैत्य पुढें झाले ? ॥
त्या दोघांचें समर जुंपलें पूर्व दिशाप्रांतीं ॥
हा रक्ताचा सडा फडकवी कीं त्याची ख्याति ? ॥
मृत रात्रीची चिता उषा ही अरुणमया ज्वाला ॥
रविरूपानें प्राणगोल का हा वरतीं आला ? ॥
भ्रमण दिवसभर करुनी संध्यागर्भी हा प्राण ॥
शिरतां होईल मृतरजनीचा पुनर्जन्म जाण ॥
मरण सकाळीं; सायंकाळीं जन्म पुन्हां घेई ॥
रजनी यापरि भवचक्रावर सदा फिरत राही ॥
फार विचारें कविकल्पकता अति भ्रांत झाली ॥
बालकवींचें ' अरुणगीत ' तों मनीं उडी घाली ॥
जरा निवळवी रंग नभाचा अरुणतेज पार ॥
' अरुणगीत 'ही भीषणतेचा जिरवी हुंकार ॥
वसुंधरेशीं लग्न कराया सूर्य उत्तरंग ॥
ये अरुणाचें हें सोनेरी बांधुनि बाशिंग ? ॥
स्वर्भूसंगम त्या लग्नाचा शुभकर परिणाम ॥
पुण्यमया श्री-वसुधा होइल शुद्धप्रेमधाम ॥
दहा दिशांनो ! जरा जराशा बाजूला सरका ॥
दिशा नवी द्या कायमची या अरुणचित्रफलका ॥
जगन्नायका ! असा एकदां काळ येउं द्याच ॥
निशा नको; दिन नको; असावा अरुण सारखाच ॥
लाल नभांतुनि होइल तेव्हां प्रेमाची वृष्टि ॥
' गोविंदाग्रज ' गानिं रंगविल तीच प्रेमसृष्टि ॥

## एका बाल–कवीस

[ १४ वर्षे वयाच्या एका बाल-कवीची श्रुतिमनोहर, बऱ्याच प्रमाणांत अर्थशून्य, तथापि प्रतिभापूरित, अतएव गोड कविता वाचल्यानंतर मनाला वाटलेला आनंद पुढील शब्दांत अवतीर्ण झाला आहे. ]

गा रे गा रे गाच जरा ॥ माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ ध्रु० ॥
ठराविकाला, नियमांला ॥ बंधाला जड जगताला ॥
जीव पहा त्रासुनि जाई ॥ नको नकोसें त्या होई ॥
करी जराशी बा घाई ॥ रिझवाया त्याला गाई ॥
गोजिरवाणें । अमोल गाणें । हृदयीं बाणे ॥
अस्पष्टाचा सोड झरा । झटपट पळत्या मुशाफरा ॥ १ ॥

आम्ही गातों जें गाणें ॥ तें जगताचें रडगाणें ॥
हृदयीं जो भरला त्रास ॥ तो कविताचरणीं ग्रास ॥
शब्दापाठीं हपापले ॥ अर्थासाठीं जन टपले ॥
हृदय करपलें । रसहि हरपले । कवनचि खपलें ॥
गा तूं आतां गाच जरा ॥ रसगंगेच्या मुशाफरा ॥ २ ॥

नियमांनीं झालों ठार ॥ ठराविकानें बेजार ॥
हा जगण्याचा बाजार ॥ सजीवतेचा आजार ॥
अमुच्या कवनाचा पूर ॥ मरत्या जीवाचा सूर ॥
परि तव कवनें । हलतां पवनें । झुलतिल भवनें ॥
त्या कवनाचा सूर खरा ॥ गा, बागडत्या मुशाफरा ॥ ३ ॥

स्वैरवृत्ति कवितादेवी ॥ बालवृत्ति तूंही तेवीं ॥
ती सौंदर्याची छाया ॥ तव वदनींही ती माया ॥
गालावरची लाल मजा ॥ दावीं प्रीतिच्या यशोध्वजा ॥
कवनचि रदनीं । कवनचि वदनीं । कवनचि नयनीं ॥
झुलवी खुलवी जीव जरा ॥ सुंदरतेच्या मुशाफरा ॥ ४ ॥

हृदयाचे घुंगुर गोड ॥ सन्मनिंचे हरितिल कोड ॥
हृदयाच्या हृदयीं खोल ॥ ओत कवनरस बिनमोल ॥
फुललें विश्वाचें फूल ॥ वर आकाशाची झूल ॥

सुखदुःखांची । बाग जगाची । जरि कांट्यांची ।।
फुलांचाच तूं धनी खरा ।। फुलांत फिरल्या मुशाफरा ।। ५ ।।

चिखल दाट हा जगताचा ।। रूढीचा, निर्बंधाचा ।।
मम हृदयाचें कल्हार ।। पवनजलावर अवतार ।।
घेत असे करुनी धीर ।। तूंच तयाचा शाहीर ।।
त्यांतच राही । गुंगत कांहीं । दंग सदाही ।
गा हृत्कमलाच्या भ्रमरा ।। मनांतल्या तूं मुशाफरा ।। ६ ।।

हिमवंतीच्या कणांपरी ।। तव शब्दांची मजा खरी ।।
थेंब न बा ते पाण्याचे ।। खडेहि किंवा स्फटिकाचे ।।
अस्फुट त्यांचा आकार ।। वाऱ्यावर पळते स्वार ।।
अर्थ बोबडे । वेडे बगडे । बोल ते गडे ।।
उडवी त्यांना भराभरा ।। वाऱ्यावरच्या मुशाफरा ।। ७ ।।

अर्थकल्पनांसाठिं गडे ।। कां बघसी इकडे तिकडे ? ।।
अर्थशब्द सोंगें सारीं ।। बडेजाव हा बाजारीं ।।
धांव न कसली धरि हांव ।। धांवायासाठिंच धांव ।।
अर्थ मरूं दे । शब्द खरूं दे । काव्य झरूं दे ।।
परी भरूं दे नादभरा ।। चुकल्या मुकल्या मुशाफरा ।। ८ ।।

अर्थ कळेना जरी कुणा ।। तरि तो नशिबाचाच उणा ।।
मार्ग कुणा का दावाया ।। ढगांमधें चमके माया ? ।।
मूठ झांकली लाखाची ।। उघडतांच कुचकामाची ।।
अस्फुट गाना मिरक्या ताना । त्या वेतांना ।।
नाच बिजलिच्या धरुनि करा ।। मेघावरच्या मुशाफरा ।। ९ ।।

मुग्धापदिं घुंगुरवाळा ।। गायाचा त्याला चाळा ।।
स्वैराचें बंधन त्याला ।। खुला ताल त्या नाचाला ।।
रुम्झुम् शब्दा अर्थ नसे ।। थबथबती परि दिव्य रसें ।।
त्या स्वच्छंदा । त्या मकरंदा । त्या रसकंदा ।।
नाचूं दे कवनांत जरा ।। हृदयामधल्या मुशाफरा ।। १० ।।
मार भरारी नभाकडे ।। मेघावरतीं नाच गडे ।।
करि त्यांचे तुकडे तुकडे ।। उडवी जग जिकडे तिकडे ।।

कविताजल जें चहूकडे ॥ पडतां आत्मा थंड पडे ॥
'पाउसपाणी । अभाळदाणी ।' इकडे आणी ॥
शांत करी ही वसुंधरा आकाशांतिल मुशाफरा ॥ ११ ॥

ऐकवि गगनाचें गान ॥ जीव तुझ्यावर कुरबान ॥
सूर सारखा लाव चढा ॥ दिव्य नाद करि पुढें खडा ॥
शब्दा शब्दा मुशाफरा ॥ जिवाचाच देईन हिरा ॥
जीव किरकिरा । फारच अधिरा । बहिरासहिरा ॥
करावया मंजुळ मुखरा ॥ गा गगनांतिल मुशाफरा ॥ १२ ॥

अवकाशाच्या पानबुड्या ॥ तरल जलीं जा टाक उड्या ॥
आनंदाच्या पलीकडे ॥ काय मजा मज सांग गडे ॥
अज्ञेयाच्या परतीरा ॥ नाचत नाचत जाच जरा ॥
तसा तरंगत । तसाच रंगत । नसतां संगत ॥
हात घाल जा परात्परा ॥ अवकाशांतिल मुशाफरा ॥ १३ ॥

विश्वाचीं अवघड कोडीं ॥ कवनाच्या मंत्रें सोडी ॥
स्वानंदाच्या पैलथडीं ॥ ब्रह्माची चल उकल घडी ॥
सर्वच खालीं पहा बरें ॥ जगास विसरूं नको बरें ॥
परात्पराचा । भवरा साचा । विस्मरणाचा ॥
नको सांपडूं त्यांत जरा । स्वानंदाच्या मुशाफरा ॥ १४ ॥

परमात्म्याच्या भवऱ्यांत ॥ पडतां तूं गिरक्या खात ॥
त्या विस्मरणाची माती ॥ जमतां, मोरा तुजवरतीं ॥
फुंकर तीन्ही काळांचा ॥ मारुनि उडवूं थर वरचा ॥
झिम् झिम् मोरा । ये सामोरा । थोरापोरां —॥
वर न्याया कर देच खरा । चिरंतनाच्या मुशाफरा ॥ १५ ॥

थकतां मग कोमल काया ॥ घेच विसावा श्रम जाया ॥
विश्वकटाहावर पैस । पाय पसरुनी बा बैस ॥
शीळ वाजवुनि पवनांत ॥ समाधान मिळवी शांत ॥
तरि त्या स्थानीं । मधुनी मधुनी । रंगुनि कवनीं ॥
गा रे गा रे गाच जरा ॥ माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ १६ ॥

बा वाग्विलासा !

कांहीं लिहावें तुझ्यासाठिं हा विचार मनिं धरली ॥
लेखनसाधन घेउनि रात्रीं पडलों निज शयनीं ॥
वाम करावर मस्तक ठेवुनि, लेखनि अन्य करीं ॥
विषय कोणता घ्यावा याचा विचार फार करीं ॥
काठी, जोडा, छत्री, टोपी, ताट, तवा, पितळी ॥
कुत्रें, मांजर, दत्त म्हणोनि येति पुढें सगळीं ॥
पसंत न पडे परी एकही, सर्वां घालविलें ॥
श्रेष्ठ प्रतीच्या विषयास्तव मग मस्तक खाजविलें ॥
मूल, फूल, फळ, संध्या, रजनी, चंद्र, सूर्य, तरुणी—॥
समोर ठाके फौज अशी ही; रुचे न परि कोणी ॥
चर्वित चर्वण होईल, किंवा जुनी कल्पना ही ॥
" येउनि गेली कधींच ही तर, हींत मजा नाहीं ॥
संपादक टाकुनि देइल; ही न कुणास रुचे " ॥
अशा प्रकारें त्रासुनि गेलों; मुळीं मना न सुचे ॥
विषय शोधितां यापरी कवना, नव आले नाकीं ॥
गुंग होउनी नादीं मग मी उभय नेत्र झाकीं ॥
विचार करितां फार यापरि तन्मय होवोनी ॥
विचारब्रह्मीं लीन जाहलों नेत्रद्वय मिटुनी ॥
जागृत होउनि, नेत्र उघडुनी पाहीं मी नादी ॥
तों कळलें कीं रात्र सरोनी उजाडलें अगदीं ॥
लेखनसाधन पाहुनि शयनीं नीट उठुनि बसलों ॥
तैंच होउनी स्मृति रात्रीची स्वतःशींच हंसलों ॥
कशावशा मग लिहिल्या सत्वर ओळी या चार ॥
धाडित सांप्रत तुजसाठीं या; या तरि स्वीकार ॥

पांखरास—

पंख उभारुनि जरा ॥ भरारा ॥ जा जा उडुनी जा पांखरा ॥
निकट तरूच्या शाखेवरतीं नको बसूं खगवरा ॥ पंख...॥
गानमिषानें उडवुं नको रे रम्य नादनिर्झरा ॥
सहवासें तव नव शोभा या खास येत तरुवरा ॥
सुरासुराची लकेर चढतां जलसा येतो भरा ॥
एक एक हा सूर हालवी हृदयाला थरथरां ॥
हिरवी पानें; निळ्या नभाचा वर डोल्हारा खरा ॥
रंगवि संध्या तरल ढगींही, नाना रंगीं खरा ॥
केला देवें या घुमटाचा सोनेरी पिंजरा ॥
विश्वाचें हें पवनहृदय तें चिरित जाति चरचरा ॥
खिन्न मनीं मम गाणें हें तव वर्षि हर्षनिर्भरा ॥
वाटे हृदयीं ठिरवावा हा आनंदाचा झरा ॥
तन्मय होउनि विरुनि मिळावें चिन्मय मंगलवरा ॥
चढ्या लकेरीसरशीं जावें देवाजीच्या घरा ॥
सोडत ध्यावी तव पंखांची उडती पळती त्वरा ॥
क्षण-सहवासें जीव कोंडला होत असा बावरा ॥
परंतु सारा निर्धन मनिंचा स्वप्नभास हा खरा ॥
विषण्ण मानस; उदास जीवन; पीत निराशागरा ॥
हृदय तडफडे दुःखाग्नीनें मुकलें सुखसागरा ॥
चिरंमृताला गायन हें तव उगाच हलवि जरा ॥
चिरसहवासासाठीं परि मीं पसरितांच मम करा—॥
उडुनी जाशिल भुरंदिशिं गगनीं खालीं टाकुनि धरा ॥
विश्वगामि तूं चंचल लहरी पवनावर भोंवरा ॥
क्षणांत गिरक्या घेतां घेतां जाशिल रे गरगरा ॥
दूर दूर तें पळतें गाणें करिल मनाचा चुरा ॥
मिळतां लघु सुख अधिक सुखाचा जीव सदा हावरा ॥
तीव्र निराशा होतां होइल फार कि रे घाबरा ॥
ऐकुं न येतां सूर भासमय चिरितिल मग अंतरा ॥
क्षणही माझ्यासाठीं न बसशिल तूं उडत्या पांखरा ॥

इकडे तिकडे फिरशिल टाकुनि येथें या पामरा ॥
जड, निर्जिव मी शोधुं कुठें तुज धरुनि तुझा धोसरा ॥
फुंकर एकचि सृष्टीचा तुज दूरवील खगवरा ॥
क्षणपरिचय हा अशा स्थितीहुनि फारच बरवा खरा ॥
अपूर्व ऐकुनि हर्ष जाहला तोच लाभ मज बरा ॥
सहवासानें प्रेम जडायापूर्विंच पळ, करि त्वरा ॥
हेंच मागणें हात जोडुनी आनंदी पांखरा ॥ पंख... ॥

## हाय हाय!

दिक्कालांनीं, अज्ञातांनीं, बांधिताच पाय ॥
एकलकोंडें अनंत कविमन रडें धाय धाय ॥
वाहे वारा कसा भरारां, वातचक्र फिरतें ॥
नव्याजुन्या पानांचें विश्वचि तयांत गिरगिरतें ॥
कण धूळीचे उडुनी जाती त्या वाऱ्यासंगें ॥
हाय! हाय! परि ठायिंच ठरती माझीं जड अंगें ॥
या पृथ्वीचें आकर्षण हें मला तोडवेना ॥
पायांखालीं जरी तुडवितो परी सोडवेना ॥
जर इवल्याशा वाऱ्यावर हें जग गिरक्या खात ॥
मला न उडवी कसा मनींचा हा झंझावात? ॥
हा वाऱ्याचा दरिया पाहुनि तसेंच बसवेना ॥
परि पोहाया बघतां माझें अंगच हालेना ॥
वायुसागरावर फेनाचे थेंबचि शतधारा ॥
तशा उसळती वरती वरती लखलखत्या तारा ॥
किंवा वरुनी कुणि वाऱ्याची ही गंगा ओती ॥
नभोनिधीच्या उदरीं उडवी हे पळते मोती ॥
दिसतां मज तीं हवीं वाटतीं पुष्पें काळाचीं ॥
परी नयन इथुनीच टाकिती किरणें आशांचीं ॥
लाख तारका नभीं सहज या ठेविल्यांत देवा ॥
दोनच कां या नयनिं कोंडिल्या?—त्याहि तिथें ठेवा ॥

मनांत माझ्या कुणीं गातसे नवलाचे सूर ॥
मलाच ऐकूं येते न; नुसती लागे हुरहूर ॥
माझें गाणें तें ऐकुनि मी व्हाया बेभान ॥
एकसारखा कर्ती माझ्या जीवाचा कान ॥
हाय हाय तें ऐकूं येत न; झालों हैराण ॥
मलाच लागति तीव्र सुरांचे मनांतले बाण ॥
आग लागतां कुठं तेथुनी भडकतात ज्वाळा ॥
वाऱ्यावरती पळां पळत्रां भेटतात काळा ॥
किती भावना, किती श्वासही त्यांसह जातात ॥
हाय हाय कां मलच त्या मग इथें टाकतात ? ॥
देवा अंतरिं आगभडकुनी जळून जाऊं दे ॥
त्या ज्वालामधिं मही ज्वाला मिसळुन वाहूं दे ॥
मेघपृष्ठिवर चंद्रिकावर तेजा पाडी ॥
इथेंच राहुनि जीव बिचारा मना तिथें धाडी ॥
त्या तेजस्वी ओसाधर खेळे जों आशा ॥
पायांखालीं कठिण भूमि तों बांधित निजपाशा ॥
हाय हाय त्या मेघांमधली एकादी बिजली ॥
जागी होइ न; त्यांचिसारी सृष्टिच का निजली ? ॥
कडकडुनी पडतांच तरी सुटेल हा जीव ? ॥
हाय हाय परि कुणाला कशि येईना कींव ? ॥
येतें कांहीं जातें कांहीं-मी नुसता बघतों ॥
कोणीं येतां जातां मोठ्या आशेनें उठतों ॥
उडत्या पंखांचा जीवाला लागतांच वारा ॥
तिथल्या तिथेंच हालचालीचा खेळ होत सारा ॥
शरीर माझें, जग हें माझें परी जीव घेतें ॥
जिथें तिथें हें माझें मजला कसें आड येतें ॥
नको मला जें, दिसें न मज जें, तसेंच नाहीं जें ॥
तें आणाया, तेंच बघाया व न हा लाजे ॥

(अपूर्ण)

## कळयांची फुलें कशीं झालीं ?

( ला बाइला ० ही चाल-थोडा फेरफार करून )

बाळ कुणीं । संध्याकाळीं रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ अंगणीं हर्षें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोंके घेत ॥
तों दिसली ! सुंदरशी त्याला वेली ॥
देठ कोंवळे । हिरवे पित्रळे । नाजुक सगळे ॥
ती वेलीं । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥

परी तया । हवा सोबती खेळाया ॥
खेळगडी । मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे । परि वेलीला मूल नसे ॥
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत झुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ॥
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥ २ ॥

बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ॥
झोंपेंत । कितिदां गेला बागेंत ॥
धीर कुठें ? पहांट होतां बाळ उठे ॥
बागेंत । धांव तसाची तो घेत ॥
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हंसतीं ॥
बाळ झुले । चहूंकडे पाहून फुलें ॥ ३ ॥

आईला । शोधाया धांवत गेला ॥
मग बोले । " आई ! बघ हीं गोड फुलें ॥
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या ॥
कशा उमलल्या ? कुणीं हंसविल्या ? हांसत बसल्या ॥
कशा कळ्या ? आई सांग मला, सगळ्या ? " ॥ ४ ॥

मग आई । बाळाला उत्तर देई ॥
" खेळासी । जमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती । चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या । कळया बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या । फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसू पडले । ते दंव झाले । धांवत आले ॥
भुईवरी । पडले साऱ्या कळ्यांवरी ॥ ५ ॥

तो साचा । रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी । चहूकडे जाउनि पसरी ॥
मग हंसल्या । कळया फुलें हंसतां झाल्या " ॥
सर्व असें । आई बाळा सांगतसे ॥
ऐकुनि हें । बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे । मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळीं । आई आनंदें हंसली ॥
हंसता रडली । असवें पडलीं । त्याच्या गालीं ॥
तों साची । कळी उमलली बाळाची ! ॥ ६ ॥

## चेंडू

खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी ॥
पाहत होतों आम्ही दोघे आनंदें वरुनी ॥
अडगळ होती भंवती परि तो लक्ष्य न दे तिकडे ॥
हांसे, धांवे, खेळे, उडवी चेंडू चोंहिकडे ॥
तन्मय होऊनि खेळत होता यापरि स्वच्छंदें ॥
पाहत होतों आम्ही त्यातें तशाच आनंदें ॥
पाहि तिकडे कां न कळे तों हांसु येत मला ॥
परि तें कळुनी तिला तिच्याही खळी पडे गाला ॥
इतुक्यामध्यें चेंडु उडाला अडगळींत पडला ॥
बघे बाळ चहूंकडे जरी तरि मिळे न तो त्याला ॥

निराश झाला, थकुनी बसला, बाळ जरा रडला ॥
रडत रडतची फिरुनि लाडका लागे शोधाला ॥
लक्ष्य देउनी फार शोधितां अवचित सांपडला ॥
हंसत लाडका खेळामाजीं फिरुनी दंग झाला ॥
निःश्वासानें सोडित मी हा प्रकार पाहोनी ॥
पाहे ती मजकडे वदे मी तन्मन जाणोनी ॥
खेळत आहों असेंच आपण अतीव आनंदें ॥
बागडतो हा चेंडु आपुला असाच स्वच्छंदें ॥
परि संसारीं बहु दुःखांची अडगळ ही साच ॥
एके दिवशीं बाळहि जाइल चेंडुसारखाच ॥
रडत बसूं मग असेंच आपण प्रिय बाळासाठीं ॥
फिरुनि हंसूं का असेंच— परि छे; आशा ती खोटी ॥
तोंच वदे ती " पुरे गडे, हें बोलूं नये असलें " ॥
बघे मजकडे रागानें परि हसतहि प्रेमबळें ॥
पाहत होतों असेंच आम्ही कांहीं दिन जातां ॥
त्या दिवसाची स्मृति होऊनि ती भग्न करी चित्ता ॥
तशीच होती अडगळ सारी— चेंडुहि तो होता ॥
किती यमाची निष्ठुरता परि— बाळ तेथ नव्हता ! ॥
बघुनि वदे ती—" चेंडु हाच तो ! बाळ परी नाहीं " ॥
परस्परातें मिठी घालुनी रडलों दोघेही ॥

## ये ये ये कविते !

[ एका रविवारीं कांहीं मित्रांना एक कविता देण्याचें ठरलें होतें; मुदत सरत आली पण कविताच सुचेना ! तेव्हां कवितेस हें पाचारण केलें होतें. ]

ये ये ये, आतां ये कविते ! नको छळूं याहुनि मातें ॥ ध्रु० ॥
रसिक मित्र हे जमले भंवतीं रविवारहि गेला ॥
घटका घटका भरत चालली सरत वायदा आला ॥ १ ॥

पाहूं कोठें कविते तुजला; मुढासम झालों ॥
नेत्र मनाचे फाडुनि तुजला शोधाया मी झटलों ॥ २ ॥

गरगर गरगर नेत्र फिरति जणुं चंचलता फिरती ॥
तुज हुडकाया चहूंकडे कीं स्थाना सोडुनि निघती ॥ ३ ॥

ऊर धडधडे, हृदय मारि जणुं मुक्या मनाच्या हांका ॥
हृत्पटिं आत्मा नाचत थै थै हट्ट घेउनी तव का ? ॥ ४ ॥

काव्यशून्य देहाला विटला; ध्यास तुझा मोठा ॥
वायुरूप हा आत्मा श्वासें धांवत बारा वाटा ॥ ५ ॥

वस्तुवस्तुमधिं शोधुनिया तुज चित्त विचारें दमतें ॥
काव्यहीन परि चित्र आपुलें जगदादर्शी बघतें ॥ ६ ॥

कोठें वससी ? कैशी असती ? केव्हां येसी कविते ? ॥
ये ये, देतों मोबदला तुज वस्तु कोणती हवि ते ॥ ७ ॥

तारांमाजीं चंचलता जी चमकदार लुकलुकते ॥
तीच असलि, तरि हृदयभेद करि पडुनी उल्कापातें ॥ ८ ॥

चंद्रमया जरि क्षयकालीं कुठें जरि तरी जी दडसी ॥
तीच, निर्दये ! हपापलेल्या या हृदयिं न कां पडसी ? ॥ ९ ॥

रवींत असशिल तरि किरणांचे दोर सोडुनी खालीं ॥
नेत्रगवाक्षांतुनि आत्म्याच्या भरभर शीर महालीं ॥ १० ॥

फुलांत धरिशी सुगंधमय वा अदृश्यरूपा बरवी ॥
तरि वाऱ्याचा घोडा करि त्या हृदयरंगिं फिरवी ॥ ११ ॥

मेघमंडलीं जरि तूं बिजली; पड कडकडुनी माथीं ॥
नाद हवा जर नाचाया तर गडगडाट करि साथी ॥ १२ ॥

जरी पर्वतोदरीं दडालिस, तोंड तयाचें फोडी ॥
हो ज्वालेची लाट मानितों त्या रसिंही मी गोडी ॥ १२ ॥

स्त्री-हृदयीं जरि असती तरि धरिं रस्ता या हृदयाचा ॥
नेत्रकिरणिं तुज पूर देत हा प्रेमाच्या तारांचा ॥ १४ ॥

हाय ! हाय ! कां येशि न अजुनी ? त्रिखंड धुंडुनि झालें ॥
तुजविरहित मम हृदयिं रमाया परब्रह्म बघ भ्यालें ॥ १५ ॥

अंध, मूढतम, शून्यवृत्ति ही मानवता पाही ॥
कुठली वस्तु कुठें टाकिते भान न तिजला कांहीं ॥ १६ ॥

देव दडविला दगडाखालीं, भावा ज्ञानजलीं ॥
स्त्री-हृदयाला तसें दडपिलें सोन्या-मोत्याखालीं ॥ १७ ॥

तीच राक्षसी मानवता तुज न कळे टाकी कोठें ॥
विषय तुझा हुडकावा कैसा ? कोडें पडलें मोटें ॥ १८ ॥

देवामाजीं वससी तरि तो देव पसरला जगतीं ॥
तूंच न दिसती कां मग, देवी ? जीवन तुजविण जगती ॥ १९ ॥

शून्यामाजीं रमसि राक्षसी शून्यवृत्ति असती ॥
शून्यवृत्ति या मम हृदयीं मग कां नच वद तूं वससी ? ॥ २० ॥

( चाल ) तों नाद विलक्षण उठले ॥ हृदय मम भरलें ॥ चालही बदले ॥
खूण तों मनाला पटली ॥
कीं कवितादेवी हंसली ॥
की सदाच या हृत्पटलीं ॥
अंतर्दृष्टिसि दिसली देवी, फार मला हंसली ॥
त्या हंसण्याचे नाद निघाले; तन्मयता जमली ॥ २१ ॥

हृदयचि भरलें कवनरसानें, उचंबळुनि आलें ॥
रूप अश्रुमय भरुनि काढिलें नयनांचे प्याले ॥
कवनजलाचा ओघ चाढला विश्व त्यांत न्हालें ॥
नीरसतेच्या मालिन्याचें नाम नष्ट झालें ॥
वस्तुवस्तुमाधिं कवन दिसें मग गावें कवणाला ॥
भांबावुनि बहु जाई कवनीं गाई मीच मला ॥
हा हृदयवसंतचि भला ॥ काय बहरला । जीव उमलला ॥
हृदयांचा केला डोला ॥
कवितेनें आत्मा ओला ॥
त्यावरी बसुनि घे झोला ॥

खोला खोला हृदयपटा; घ्या कवितेचा पूर ॥
कवन भुवन हें कवनचि जीवन; घ्या महापूर ॥ २२ ॥

## ' वेषभूषा 'कारास सादरार्पित पद्यभूषा

रचिसि काव्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ध्रु ॥
मंजुल शब्दें, गूढार्थांनें, कवेराया ! जें झांकी,
चित्रकाव्य तव पाहुनि ऐसें प्रश्न मना पडला कीं —
रचिसि ' वेषभूषा ' ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ १ ॥

मंजुल गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग,
घालिसि कुंजसुखावरि रुंजी मृदुपदिं होउनि दंग,
रचिसि नादभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ २ ॥

शब्द तुझे व्यक्तार्थांखालीं दडविति गूढार्थांतें,
गूढभाव लक्षितां लक्ष्य मम भलत्या वेडा वरितें.
रचिसि शब्दभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ३ ॥

सुवेषभूषा लेख्यमिषानें योषिदंतरंगा —
शब्दचित्रिं अव्यक्त रेखुनी हसविसि चित्ततरंगा !
रचिसि चित्रभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ४ ॥

व्यक्त कल्पनांसह मम चित्ता प्रतिभा तव नेई,
अव्यक्ताच्या पटाआड त्या टाकुनि मागें येई.
रचिसि काव्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ५ ॥

पद्यावलिंतिल पद्पुष्पांच्या अर्थामोदानें
प्रीतिदेवता हृदयिं जागविसि उद्दीपनमोदानें.
रचिसि अर्थभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ६ ॥

अर्थ खरा हा कीं प्रतिबिंबा बिंब दावि तुजशीं,
निजार्थांच मन माझें तैसें पाहत काव्यादर्शीं.
रचिसि गूढभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ७ ॥

सुंदररमणीवर्णनपर हें पद्य न मज भासे,
मजसम वेडा भ्रमीं पडाया मद्यचि वाहे खासें !
रचिसि पद्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ८ ॥

[ एका तरुणीस आपल्या बालकाचें चुंबन घेतांना पाहून— ]

### उपजातिवृत्त

धवाननालोकनचुंबनातें ।
लज्जा, न आज्ञा जनिं देत तीतें, ॥
ही बालरूपा प्रतिमा तयाची ।
करोनि इच्छा पुरवी मनाची. ॥ १ ॥

## काय करावें ?

[ आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाहीं. ]

उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून । नदी वेगें जातां पळून ।
भक्कम दगडांचें धरण बांधून । तिला अडवितां येतसे. ॥ १ ॥
अगदीं आपला नेम धरून । तोफ सुटतां धडधडून ।
हळुच बाजूला सरून । मारा चुकवितां येतसे. ॥ २ ॥
अंतराळीं कडकडून । वीज घरावरि पडतां तुटून ।
उंच खांबांत बांधून । पाताळीं सोडितां येतसे. ॥ ३ ॥
सावकारांनीं वैर धरून । जप्ती आणितां दावा करून ।
मागील बाकी देऊन । तिला उठवितां येतसे. ॥ ४ ॥
अगदीं नीट रोंख धरून । म्हैस मार्गीं येतां धांवून ।
एकदम छत्री उघडून । तिला पळवितां येतसे. ॥ ५ ॥
जुन्यानव्याची चोरी करून । भिकार कवि येतां कविता घेऊन ।
कशी तरी एकदां वाचून । त्रास चुकवितां येतसे. ॥ ६ ॥

सर्वांस उपाय येत दिसून । परि एका गोष्टीस आहे न्यून ।
तोंडाळ बायको कडकडून । येतां, काय करावें ? ॥ ७ ॥

## सत्सुम-दाम

आर्या

ज्याच्या बोध-सुधेनें पावन झालें मदीय हीन मन ॥
श्रीज्ञानेश्वर-चरणीं प्रेमानें मी करीतसें नमन ॥ १ ॥

नमिला शिवरायगुरू परळीचा रामदास भक्तमणी ॥
यत्पद्कमलाधारें कालभयातें कधीं न विश्व गणी ॥ २ ॥

श्रीवर-कृपा जयावर श्रीवर ज्याचें न चित्त किमपी ही ॥
श्रीवरद-साधुवर्णी श्रीवरदा प्रणति एकनाथाही ॥ ३ ॥

शशि भगणीं, मन करणीं, साधुजनीं तेंचि हे तुकाराम ॥
तद्वचनपथक्रमणा त्यजुनि धरिल अन्य हेतु का ' राम ' ? ॥ ४ ॥

जरि यवन, कवनकरणीं स्मरणीं आणूं नको कबीर कसा ॥
भक्तिवधू धरि करि ज्या भगवज्जनकंकणांत हीरकसा ॥ ५ ॥

ज्या हीन हीन म्हणति प्रणति करिति सुमति ज्यास तो चोखा ॥
वंदावा न कसा म्यां ? इंद्रियहो तद्गुणाम्ररस चोखा ॥ ६ ॥

ज्यास्तव अंत्यज रूपा धरि हरि तो वंदिलाचि दामाजी ॥
कां थोरवी न यावी त्यातें म्यां कृपण देत दामाजी ॥ ७ ॥

यत्किंकर शंकरसख नमिला जगदेकविप्रवर नरसी ॥
तद्भक्तिदशमरस सुख देई जे दे कविप्रवर न रसीं ॥ ८ ॥

नमिला भक्तिरसाचें धाम श्रीनामदेव जरि शिंपी ॥
लोकीं काम्य न कां ती मोतिं जिच्या उदरिं कठिण वरि शिंपी ? ॥ ९ ॥

मान्य कसा न मला हो गोरा जरि होय हीन कुंभार ? ॥
भार जयाचा प्रभुवर वंद्य मला रोहिदास चांभार ॥ १० ॥

सत्सुमदामीं दासी म्हणुनि न गुंफावि कां जनाबाई ? ॥
अक्षरमालेंतुनि कशि वांकडि तरि टाकवे जना वा 'ई' ? ॥ ११ ॥

दासी श्रीसुखदासीं आम्हांसी मायसी मिरादेवी ॥
सकरण तनु तच्चरणीं त्यजुनि तुतामान कां न कवि ठेवी ? ॥ १२ ॥

वंदन नंद-सुनंदकुंद-सुकलिकालि तुलसिदासाला ॥
मजन्मग्रामस्था साधुवरा नमन टेलदासाला ॥ १३ ॥

वंदि विवेकानंदा जरि अर्वाचीन मान्य साधु सदा ॥
कुमतप्रस्तर दुरवुनि वाहविलें जगतिं आर्यधर्मनदा ॥ १४ ॥

हीं षोडश कुसुमें निजवासें निशिदिनिं करोत शुद्ध मला ॥
वंदुनि अर्पी 'सत्सुमदाम' विनत 'राम' ईशपदकमला ॥ १५ ॥

## लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद !

[ लो. टिळक स्वराज्याच्या मागणीसाठीं इंग्लंडास गेले त्या दिवसाकरितां ]

( चाल : चन्द्रकांत )

अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळे गाय ॥
" महाभाग जन ! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय ॥ "
जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं ॥
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ॥
अंधाराची वाट कंठिली फिरलों संकष्टीं ॥
चार युगांची रात्र भोगिली या दिवसासाठीं ॥
रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी ॥
आनंदें रवि आज उगवला या दिवसासाठीं ॥
दक्षिणसागर होउनि घटिकापात्र निरभिमान ॥
मोजित होता या दिवसांचें मंगल घटिमान ॥
पहिला वहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ॥
गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया ॥

या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया ॥
स्वस्ति वाचना सिंहगडावर चढला गगनांत ॥
थरथरुनी श्री तानाजीचा तो तुटका हात ॥
मंगल हृदया बघे पांचही करुनि प्राण गोळा ॥
पंजाबी सिंहाचा दुसरा फुटकाही डोळा ॥
व्यासवाल्मिकीकालिदास कवि आळवीत बसले ॥
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय तें तसलें ॥
योगिवृंदगिरिकंदरिं बसुनि लावुनि अवधान ॥
पाहत होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥
आर्यभट्ट मिहिरादि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें एकरास नांव ॥
सोरठचा श्री सोमनाथही या दिवसासाठीं ॥
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी ॥
तिष्ठत अठ्ठावीस युगांवर भीमेच्या कांठीं ॥
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं ॥
अठरा पद्में सेना योजुनि जलधीच्या पाठीं ॥
श्रीरामांनीं सेतु जोडिला या दिवसासाठीं ॥
अठरा अध्यायांची गीता एक मुक्तकंठीं ॥
रणीं गाइली श्रीकृष्णांनीं या दिवसासाठीं ।
चितुरगडावर आग लागली या दिवसासाठीं ॥
पानपतावर रक्त सांडलें या दिवसासाठीं ॥
पोटं बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठीं ॥
पुण्याई ती सर्वहि केवळ या दिवसासाठीं ॥
जन्मा येतो बाळ टिळकहि या दिवसासाठीं ॥
जन्मनि श्रीमान् पंचम जॉर्जहि या दिवसासाठीं ॥

* * *

तहनाम्यावर सही घालितां करि खालीं मान ॥
दुसरा बाजीराव बघे वर धरुनी अभिमान ॥

* * *

न लगे दौलत, न लगे बरकत, नको कोहिनूर ॥
स्वदेश न लगे स्वराज्य न लगे हो सर्वहि चूर ॥

एक सांगणें एक मागणें तेंच लाखवार ।।
" मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार ।।
स्वदेशभूषा, स्वराज्यजननी सकाळें दाखवावी ।।
दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशिं आणावी ।।
चहुं मुलखांतुनि नव खंडांतुनि मिरवित आणावी ।।
रायगडावर समाधिची मग पूजा बांधावी " ।।
म्हणेल जो तो ऐन जिवाचा देशभक्त कट्टा ।।
सर्वस्वाचा ताम्रपटचि तो, तोच अमरपट्टा ।।

( अपूर्ण )

## पांच देवींचा पाळणा

[ हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतें तरी एक जागृत दैवत असतें. इंग्रजी वाचकांना माहीत आहेच कीं, इंग्लंडभोंवतीं सेंट जॉर्ज, स्कॉटलंडभोंवतीं सेंट अँड्रयूज, आणि आयर्लंडभोंवतीं सेंट पॅट्रिक जागत्या डोळ्यांनीं नेहमीं पहारा करीत असतात. मराठेशाहीला अशा पांच देवी संरक्षक होत्या ! तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रताप-गडची भवानी आई, पुण्याची पर्वती, आणि पाराची वरदायी,—हीं तीं पांच पवित्र नांवें ! या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजविण्यासाठीं हा पाळणा श्रीजिजाऊसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधीं पाहण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे हें सर्वांस ठाऊक आहेच. ]

( चाल—अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला. )

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ? ।। नीज रे नीज शिवराया ।। ध्रु० ।।
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।। तरि डोळा लागत नाहीं ।।
हा चालतसे चाळा एकच असला ।। तिळ उसंत नाहिं जिवाला ।।
निजवायाचा हरला सर्व उपाय ।। जागाच तरी शिवराय ।।

चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरचाळा किंवा हटका ।
हा कष्टविशी तुझी सांवळी काया ? ।। नीज रे नीज शिवराया ।। १ ।।

ही शांत निजे बारा मावळ थेट ।। शिवनेरी जुन्नरपेठ ।।
त्या निजल्या ना तशाच घांटाखालीं ।। कोंकणच्या चवदा ताली ।।
ये भिववाया बागुल तो बघ बाळा ।। किति बाई काळा काळा ! ।।
इकडे हे सिद्दि–जमान ।
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया ।। नीज रे नीज शिवराया ! ।। २ ।।

(अपूर्ण)

## कारंजाचें चढतें पाणी

यंत्रबंधनीं तिर्यजलातें अवरोधुनि यापरी
चढविता, सांगा, कां हो वरी ?

प्रवहण भूपृष्ठावर ज्याचा सहजधर्म हा असे
स्वर्गी चढेल कां तें असें ?

क्षणैक चढलें तरी निदानीं मातीवरती पडे;
होइल चिखल मात्र चहुंकडे !

पाट बांधुनी मार्ग सुगम त्या करुनी दिधला जरी
जगतिल माळ मळे किति तरी !

कारंजाचें चढतें पाणी पडतां खालीं असें
उदास " गोविंदाग्रज " हंसे !

## प्रेमशोधन

कोणी एक कवि स्वकीय हृदया घेऊन आहिंडत ॥
प्रेमाचा करि शोध जें जगीं जना कष्टाविना लाभत ॥
विश्वाचें अति गूढ भाग धुंडुनि बघे ज्ञानाप्रती वास्तव ॥
होता प्राणहि द्यावया विनिमयें तो शुद्ध प्रेमास्तव ॥

( अपूर्ण )

## गाणें चांगलें कसें असावें ?

संगीताची करी योजना विधि का जगतींत ॥
हेंच कळेना पामर जीवां; हृदयिं न संगति ज्यांत ॥
भिन्नभिन्न हृदयांत भाव जे शब्दां पर असती ॥
संगीताच्या नादावरि ते बाहेरी येती ॥
पशूस मोही गीतध्वनि ही दंतकथा नच कांहीं ॥
पशु-मानव यांमधील सांधा ती जमवी पाहीं ॥

( अपूर्ण )

## काव्याची व्याख्या

शब्दांमध्यें, अर्थांमध्यें प्रासामध्यें काव्य नसे ।
नानारंगी वस्तूंतहि नच सौंदर्याचा लेख वसे ॥
सिंहाचें बळ अफाट म्हणजे शौर्याचें तें स्थानच कां ? ।
गोड सुरावट वेडू करिती; गाणें त्याला म्हणूं नका ॥
उंची इमला शिल्प दाखविल; शोभा म्हणजे काव्य नव्हे ।
काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें ! ॥

* * * *

काव्याची रचना नसे कठिण ही, अर्थास लागे कवि ।
आलीं वक्र जरी प्रकाशकिरणें तेजास दावी रवि ॥
अर्थांवाचुनि बोल सुंदर जरी शोभा न त्यातें असे ।
शृंगारूनि उगाच प्रेत, परि तें जीवंत का होतसे ? ॥ १ ॥

( अपूर्ण

## समशेर दुधारी दिसता— *

[ पद. चाल—उद्धवा शांतवन कर... ]

समशेर दुधारी दिसतां । कां भीसी ऐसा का रे ? ॥
मरणाची मिळकत लोकीं । तूं मी हें विश्वचि सारें ॥
या कीं त्या धारेवरती । मरणाचें लागे बा रे ॥
॥ चाल ॥ जरि शेवट एकचि साचा ॥
मग वृथा वाद दोघांचा ॥
कोणीही कोठें नाचा ॥
तो नाच जरि प्रेमाचा !
प्रेमांतचि होवो कांहीं । मग वादचि राहत नाहीं ॥ १ ॥

## गुलाबाच्या पाकळ्या

मैना भटके वनांत । वेडा राघू झुरतो मनांत ॥ ध्रु० ॥
विस्कळले पर, पिसें विखुरलीं, गळले दोन्ही पांख ॥
अखंड झरणी झुळझुळ लाविति अरधे उघडे आंख ॥ १ ॥

* ही कविता रा. के. मा. सोनाळकर यांच्या "द्वैत कीं अद्वैत" या कवितेस अनुलक्षून लिहिली होती.

हालचालही हरली सारी– कुठलें चारापाणी ? ॥
बसल्या ठायीं खिळून बसला चित्र रेखिल्यावाणी ॥ २ ॥
घुमे पारवा इकडे, तिकडे त्या घुबडाला घूत्रू ॥
जित्या जिवाची समाध बांधुनि मधेच बसला राघू ॥ ३ ॥

( अपूर्ण )

## दिवाळी

जी दुःखी कष्टी जीवां दुसरी माता ।
वाढत्या वयांतहि लोभ जिचा नच सरता ॥
त्या निद्रादेवीच्या मी मांडीवरतीं ।
शिर ठेउनि पडलों घ्यावया विश्रांति ॥
भोगितां या परि शांती । दिव्य ती ।
निजतात जगाचीं नातीं । जागतीं ।
जाळत्या मनाच्या वाती । लोपती ।
धडधडां भोंवतीं तोंच फटाके उडती ।
मी जागा होउनि पाहत बसलों पुढतीं ॥
तों कळे उगवला आज दिवस वर्षांचा ।
वर्षाव जगावर करीत जो हर्षाचा ॥ १ ॥
ही जुनी दिवाळी नव्या दमानें आली ।
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गालीं ॥
या नव्याजुन्याच्या मंगल संगमकालीं ।
जगिं आनंदीआनंद झुल जणु घाली ॥
चहूंकडे दिवे हे; दिवेच वरतीं खालीं ।
स्वर्गीय अग्नितेजानें जगतीं न्हाली ॥
काढिलें फोल विश्वाचें । चाळुनी ।
या रसांत नव तेजाचें । जाळुनी ।
ढीगच्या ढीग हीणाचे । गाळुनी ।

सत्त्वाचें बावनकशीच सोनें सारें।
टेविलें करा रे लक्ष्मीपूजन या रे ॥ २ ॥

ही त्रयोदशी धन पूजायाला असलें।
काढिलें जुन्यांतुनि नवें मनीं जें ठसलें॥
जरि घरोंघरीं नव धन हें हांसत बसलें।
नच परवा जरि लेणें जुनेंच असलें नसलें॥

तीं लेणीं गतकाळाचीं। सर्वही।
टाकिते गिळुनियां साची। जणुं मही।
उघडते नव्या खात्याची। ही वही।

जी झरली खरली शोभा वर्षाजाळीं।
ती पुन्हा लागली ल्याया सृष्टी सगळी ॥ ३ ॥

पालवी पळाली कधींच मधुमासाची।
धुंदीही नाहीं आतां वर्षावाची।
तरि साधीभोळी माता देवी सरला।
हें तत्त्व शिकविते चुकल्या मुकल्या बाळा॥

जें जुनें फार उपयोगें। जाहलें।
त्यांतुनी आपुल्या जोगें। जें भलें।
रंगवा नव्या नवरंगें। चांगलें।

प्रतिवर्ष नव्याला जन्म जुन्यांतुनि देई।
होळींत जाळितां शिशिर, वसंतचि येई ॥ ४ ॥

अति निर्मल जलयुत श्यामपुलिन सरिता या।
घनदाट तमांतुनि चिमणासा शशिराया॥
जें काल पेरिलें तेव्हां वाटे गेलें।
तें आज पिकाला आलें शतपट झालें।

(अपूर्ण)

## लक्ष्मीपूजन

ही सरती संध्या या सालाची जमली ।
तिजसवें दिवाळी ऐन भराला आली ॥
जनमनें उजळलीं; आनंदानें हंसतीं ।
प्रतिबिंबदर्शना लाख लाविल्या वाती ॥
नवनव्या परीचे दिवे भिन्न रंगाचे ।
मांडिलें प्रदर्शन तेजोमय सौंदर्याचें ॥

(अपूर्ण)

## पानपतचा फटका

( चाल : भल्या माणसा, दसलाखाची० )

कौरव-पांडव-संगर-तांडव द्वापर-कालीं होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ध्रु० ॥

जासुद आला कथी पुण्याला—" शिंदा दत्ताजी पडला;
कुतुबशहानें शिर चरणानें उडवुनि तो अपमानियला । "
भारतवीरा वृत्त ऐकतां कोप अनावर येत महा
रागें भाऊ बोले, " जाऊं हिंदुस्थाना, नीट पहा.
' काळा 'शीं घनयुद्ध करूं मग अबदलीची काय कथा ?
दत्ताजीचा सूड न घेतां जन्म आमुचा खरा वृथा."
बोले नाना, " युक्ती नाना करुनी यवना ठार करा;
शिंद्यांचा अपमान नसे हा; असे मराठ्यां बोला खरा. "
उदगीरचा वीर निघाला; घाला हिंदुस्थानाला;
जमाव झाला; तुंबळ भरला सेनासागर त्या काळा.
तीन लक्ष दळ भय कराया यवनाधीशा चालतसे;
वृद्ध बाल ते केवळ उरले तरुण निघाले वीररसें.

होळकराचे भाले साचे, जनकोजीचे वीर गडी,
गायकवाडी वीर अघाडी एकावरती एक कडी.

समशेराची समशेर न ती म्यानामध्यें धीर धरी;
महादजीची बिजली साची बिजलीवरती ताण करी.

निघे भोसले पवार चाले बुंदेल्यांची त्वरा खरी;
धीर गारदी न करी गरदी नीटनेटकी चाल करी.

मेहेंदळे अति जळे अंतरीं विंचुरकरही त्याचपरी;
नारोशंकर, सखाराम हरि, सूड घ्यावया असी धरी.

अन्य वीर ते किती निघाले गणना त्यांची कशी करा ?
जितका हिंदू तितका जाई धीर उरेना जरा नरां.

भाऊ सेनापती चालती विश्वासातें घेति सवें,
सूड ! सूड !! मनिं सूड दिसे त्या सूडासाठीं जाति जवें.

वीररसाची दीप्ती साची वीरमुखांवर तदा दिसे;
या राष्ट्राचे स्वातंत्र्याचे दृढस्तंभ ते निघति असे.

वानर राक्षस पूर्वी लढले जसे सुवेलाद्रीवरती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ. १ ॥

[ २ ]

जमले यापरि पानपतावरि–राष्ट्रसभा जणुं दुसरि दिसे;
वीर वीरमद्युक्त सभासद सेनानायक प्रतिनिधिसे.

अध्यक्ष नेमिले दक्ष भाउ अरि भक्ष कराया तक्षकसे;
प्रतिपक्षखंडना स्वमतमंडना; तंवू ठोकिति मंडपसे.

शस्त्रशब्द हीं सुरस भाषणें सभेंत करिती आवेशें;
रणभूमीचा कागद पसरुनि ठराव लिहिती रक्तरसें.

एका कार्या जमति सभा या, कृति दोघींची भिन्न किती !
बघतां नयनीं वाहतीलची पूर अश्रूंचे स्वैरगति.

पूर्ववीरबल करांत राहे, आहे सांप्रत मुखामधीं;
हाय ! तयांचे वंशज साचे असुनी झालों असे कुधी !

जमले यापरि पानपतावरि भारतसुंदरिपुत्र गुणी
युद्ध कराया, रिपु शिक्षाया, संरक्षाया यशा रणीं ॥ कौ० २ ॥

[ ३ ]

अडदांड यवन रणमंडपिं जमले; युद्धकांड येथोनि सुरू.
करिती निश्चय उभयवीर रणधीर " मारुं वा रणीं मरूं. "
पुढें पडे दुष्काळ चमूंमधिं अन्न न खाया वीरांना;
म्हणती, " अन्नावांचुनि मरण्यापेक्षां जाऊं चला रणा. "
मग सेनेनें एक दिलानें निश्चय केला लढण्याचा;
स्वस्थ होळकर मात्र नीचतर पगडभाई तो यवनांचा.
परधान्यहरणमिष करुनि रणांगणिं पडले आधीं बुंदेले;
श्रीशिवराया युद्ध पहाया हांक द्यावया कीं गेले ?
धन्य मराठे ! धन्य यवन ते रणांगणामधिं लढणारे !
आम्ही त्यांचे वंशज केवळ हक्कांसाठीं रडणारे
आवेश प्रवेशे दोन्ही सैन्यामधें कराया युद्धखळीं;
परि स्वार्थ अनिवार मार दे, आर्यजनांमधिं करि दुफळी.
आर्यजनांचें दैवहि नाचे अभिमानाचें रूप धरी;
करि वसति मनिं सदाशिवाच्या; होय अमुच्या उरा सुरी.
सुरासुरीं जणुं डाव मांडिला बुद्धिबळाचा भूमिवरी;
परि दुर्दैवें वेळ साधिली प्यादीं आलीं अम्हांवरी !
कलह माजला, झालि यादवी, नवीन संकट ओढवलें;
कारस्थानीं हिंदुस्थाना व्यापुनि पूर्णचि नागविलें.
कुणि यवनांचा बाप जाहला, ताप तयाचा हरावया,
नया सोडुनी जया दवडुनी कुणीं लाविला डाग वया.
कुणि दिल्लीची वाहि काळजी, कोणी तख्तासाठिं झुरे;
कुणा लागला ध्यास प्रीतिचा विचार सारासारिं नुरे.
" लालन लालन ! " करि कुणि, साधी मर्जीनेची कुणि मरजी;
असे घसरले, साफ विसरले युद्धरीति अति खडतर जी.

गारदीच मज फार रुचे जरि यवन न सोडी विश्वासा;
निजबंधूंची करणी ऐकुनि सोडिं, वाचका, निःश्वासा !

कलहा करिती काय विसरती क्षुद्र वस्तुच्या अभिमानें,
जसे हलिंचे लोक तोकसम कलहा करिती नेमानें.

नेमानेमाच्या या गोष्टी कष्टी होतें मन श्रवणीं
असो; बुडाली एकी, बेकी राज्य चालवी वीरगणीं.

सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची
शिपाइभाई परि नच चळले; रीति सोडिलि न मर्दांची.

नाहीं लढले, लढणारहि नच कुणी पुनरपि या जगतीं;
तसे मराठे गिलचे मोठे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ३ ॥

[ ४ ]

एके दिवशीं रवि अस्ताशीं जातां झाला विचार हा—
" प्रातःकालीं स्मरुनी काली युद्ध करूं घनदाट महा. "

निरोप गेला बादशहाला, " युद्ध कराया उद्यां चला;
समरांत मरा वा कीर्ति वरा जय मिळवुनि आम्हांवरि अचला."

सकल यामिनी आर्यवाहिनी करी तयारी लढण्याची;
वीरश्रीचा कळस जाहला परवा न कुणा मरणाची.

परस्परांतें धीर मराठे गोष्टि सांगती युद्धांच्या,
वीरश्रीच्या शस्त्रकलेच्या जयाजयांच्या अश्वांच्या.

बोले कोणी, " माझा न गणी वंशाचि मृत्यूभयासिं कधीं;
आजा, पणजा, बापहि माझा पडला मेला रणामधीं.

बापसवाई बेटा होई खोटा होइल नेम कसा ?
पोटासाठीं लढाइ नच परि मान मिळविण्या हवा तसा ! "

कुणी धरी तलवार करीं तिस पाहुनि आनंदें डोले,
फिरवी गरगर करि खालीं वर वीर मराठा मग बोले—

" अफाट वाढीची ही बेटी मोठी झाली लग्नाला
प्राणधनाचें व्याज घेउनी उद्यांच देइन यवनाला. "

अशी चालली गडबड सगळी निद्रा कोणा नच आली;
कोठें गेली कशी पळाली रात्र न कोणाला कळली.
प्रभातरूपें ईर्षा आली; भीति पळाली निशामिषें;
भय मरणाचें कैचें त्यांना ? काय करावें हरा विषें ?
शिंग वाजलें संगरसूचक कूच कराया मिळे मुभा;
धांवति नरवर समरभूमिवर; राहे धनगर दूर उभा.
हटवायातें देशदरिद्रा मुखा हरिद्रा लावुनिया,
कीर्तिवधूतें जाति वराया समरमंडपीं धांवुनिया.
शहावलीचा हलीसारखा अताइ नामा पुत्र बली
यवनदलीं मुख्यत्व घेत कीं पापावलिमधिं जसा कली.
प्रणव जसा वेदांस, सदाशिव तसा आर्यबलसेनानी;
विश्वासातें पाहुनि वदनीं अंगुलि घातलि यवनांनीं.
आले यापरि रणभूमीवरि; जसे गात कवि यापुढतीं,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ४ ॥

[ ५ ]

वाढे जैसा दिवस, वाढलें युद्ध तसें अतिनिकरानें
हातघाइला लढाइ आली; अंबर भरलें नादानें.
उभय वीरवर गर्जति ' हरहर ', ' अल्ला अकबर ' उल्हासें;
भासे आला प्रळय; यमाला दिली मोकळिक जगदीशें.
अश्ववीरगज भक्तमंडळी गोंधळ भारतदेवीचा;
तलवारींच्या दिवट्या केल्या; सडा घातला रक्ताचा.
धूळ उडाली गुलाल झाली; " उदे " गर्जती भक्तबळी,
परस्परांचे बळी अर्पिती भूमि तर्पिती शिरकमळीं.
रणवाद्य भयंकर भराड वाजे शुद्ध न कोणा देहाची;
रणमदमदिरामत्त जाहले, हले फणाही शेषाची.
मनुजेंद्रदला ह्णुं अंत न उरला देवेंद्राची नच परवा
म्हणुनि धूलिकण नभीं धाडुनी मेघसंघ कीं रचिति नवा ?

रक्तपाट आतदाट वाहती घाट बांधिले अस्थींचे;
मृतगजतुरंग मकर खेळती कृत्य अगाधचि वीरांचें.
घोर कर्म हें बघुनी वाटे रविहि धरी निजसदनपथा;
कांपे थरथर स्थीर न क्षणभर; इतरांची मग काय कथा !
यापरि चाले लढाइ; भ्याले दाढीवाले, मग हटले;
पळती, धांवति सैरावैरा; आर्यवीर त्यांवरि उठले.
आर्यजनां आवेश नावरे; भरे कांपरें यवनांला;
म्हणति " मिळाला जय हिंदूंला लढाइ आली अंताला ! "
तोंच अताई दूरदृष्टिचा धीर देत निजसैन्याल,
स्वयें धांवला, पुढें जाहला, स्फूर्ति पुन्हां ये यवनाला.
त्वरित पूर्ववत् समर चाललें, हले भरंवसा विजयाचा;
दाढी शेंडी एक जाहली खेळ शहाच्या दैवाचा.
करी अताई जबर लढाई नाहीं उपमा शौर्याला;
त्यावरि ये विश्वास, भासलें कीं खानाचा यम आला !
विश्वासानें अतिअवसानें खान पाडिला भूमिवरी
करिवरचरणीं मरण तया ये, शरश एक मग यमनगरी.
धीर सोडिती वीर शहाचे पळती आवरती न कुणा;
शहावलीची कमाल झाली यत्न तयाचा पडे उणा.
पहात होता शहा खेळ हा दुरुनी, तोही घाबरला,
म्हणे, " करावें काय ? न ठावें ! " दैव हात दे परि त्याला.
दक्ष वीर लक्षैकधीर तनुरक्षक सेनेसह धावे;
म्हणे चमूला, " पळति यवन जे कंठ तयांचे छेदावे. "
पुन्हां उलटले यवन लढाया हुकुम ऐकतां हा त्याचा;
शहा तयांतें सहाय होतां मारा करितो जोराचा.
जसे लढावे वीर संगरीं कविजन इच्छा मनिं करिती,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ।। कौ० ।। ५ ।।

[ ६ ]

नभोमध्यगत सूर्य होत मग युद्धहि आलें मध्याला;
हाय ! हाय ! या आर्यभूमिचा भाग्यसूर्य तो शेवटला !

सदा अम्हांला विजय मिळावा, प्रताप गावा जगतानें;
परि त्या काळीं फुटक्या भाळीं तसें न लिहिलें दैवानें !

सदाशिवाचा उजवा बाहू राहु रिपुस्त्रीमुखविधुचा,
बाऊ केवळ म्लेंच्छजनांचा, भाऊ माधवरायाचा,

बेटा ब्राह्मण बादशहाचा; पेटा साचा वाघाचा,
वीरफुलांतील गुलाबगोटा, वाली मोठा धर्माचा,

त्राण जयाची द्रौणीवर उद्राण आणितां आर्यांला,
विजयाचा विश्वास असा विश्वास—लागला शर त्याला !

मर्म हाणि तो वर्मी लागे कर्म आमुचें ओढवलें;
धर्म–सभेला आत्मा गेला, धर्मवधूकरिं शव पडलें.

अश्रू नयनीं आणी लक्ष्मी प्रिय भार्या त्या आर्यांची;
उतरे चर्या, अवा न मर्या, परि ये स्मृति तिस कार्याची.

करी विचारा वीराचारा दारा वीराची स्वमनीं—
" नाथघात सैन्यांत समजतां धीर उरेल न आर्यजनीं. "

छातीचा करि कोट, लोटिला दुःखलोट अनिवार जरी,
नीट बैसवी प्रेता देवी धनुष्य त्याच्या दिलें करीं.

धन्य सती ती ! धन्य तिचा पति ! धन्यचि जननीजनकाला !
धन्य कवीचें भाग्य असे या म्हणुनि मिळे हें गायाला !

परि जें घडलें लपेल कुठलें ? वेग फार दुर्वार्तेला;
अल्पचि काळें भाउस कळलें—" गिळिलें काळानें बाळा ! "

" हाय लाडक्या ! काय कृत्य हें ? घाय काय हा भान करी
गोंडस बाळा, तोंड पुण्याला दावुं कसें ? कधिं तोंड तरी, "
असा करी तो शोक ऐकुनी दुःख जाहलें सकलांला
अश्वावरती स्वार जाहला भाऊराया मरण्याला.

व्यंग समजतां भंग कराया आर्यांच्या चतुरंग बळा
सिद्ध जाहला शहा; तयाला दैवानें आधार दिला.

फिरनि मराठे आला बाटे अंत शिवाजीराज्याला;
भाऊराया योजि उपाया—तोही वायां परि गेला.

मान सोडिला, साम जोडिला; दूत धाडिला होळकरा;
प्रसंग येतां मत्त किंकरा धनी जोडिती असे करां.

दूत निघाला, सत्वर आला, होळकराला नमन करी;
म्हणे, " भाउचा निरोप ऐका—' साह्य करा या समयिं तरी.

उणें बोललों, प्रमत्त झालों, बहु अपराधी मी काका;
माफ करा, मन साफ करा, या आफतींत मज नच टाका.

मल्हाणाची नाहीं परवा बरवा समरीं मृत्यु हवा;
परी लागतो डाग यशाला शिवरायाच्या तो दुरवा.

देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी;
आलकी सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी.

राग नका धरूं; आग लागते यशा; भाग हा सर्वांचा;
शब्द मुलाचा धरितां कैचा ? हाच मान का काकाचा ?

साह्य कराया यवन वधाया धीर द्यावया या काका !' "
असें विनविलें, हात जोडिले, दया न आली परि काका.

रद्दा दे भूमातेला; धरि कट्टा वैरी मान तिची
बट्टा लावी वयास; केली थट्टा ऐशा विनतीची;

दुःखावरतीं डाग द्यायला करी होळकर हुकुम दळा—
" पळा, मिळाला जय यवनाला ! " काय म्हणावें अशा खळा ?

फिरले भाले-भाले कैचे ? दैवचि फिरलें आर्यांचें;
पाहे भाऊ, वाहे नयनीं नीर; करपलें मन त्याचें.

निरोप धाडी पुन्हा तयाश—" पळा वांचवा प्राण तरी
पळतांना परि कुटुंबकबिला न्यावा आमुचा सर्व घरीं "

घेत होळकर वीरवधूंतें; मग दक्षिणची वाट धरी;
देशहिताची करुनी होळी नाम होळकर सार्थ करी !

करी दुजा विश्वासघात हा; निजबंधूच्या दे साची
परवशतेची माथीं मोळी, हातीं झोळी भिक्षेची !

काय कथावी युद्ध-कथा ? मग वृथा भाउचा श्रम झाला;
धीर सोडुनी पळति मराठे, पूर्ण पराभव त्यां आला.

कोणी वेणीमाधव धांवे; वार तयाचा शिरीं जडे;
भारतरमणीकंठतन्मणी धरणीवरतीं झणीं पडे.

भूदेवीची तुटे गळसरी ! फुटे दैव कीं आर्यांचें
आकाशाची कुऱ्हाड पडली; कडे लोटले दुःखाचे !

सैरावैरा आर्य धांवती; हरहर ! कोणी नच त्राता !
यवन करिति ज्या मग प्रळय भयंकर; वदा कशाला तो आतां ?

वर्णन करितां ज्या रीतीनें कुंठित होइल सुकविमति,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ॥ ६ ॥

[ ७ ]

सन सतराशें एकसष्ट अतिनष्ट वर्ष या देशाला
हर्ष मरे, उत्कर्ष उरेना; सकळां आली प्रेतकळा.

फुटे बांगडी दीड लाख ती; राख जहाली तरुणांची
आग पाखडी दैव अरुहांवर; मूर्ति अवतरे करुणाची.

घरोघरीं आकांत परोपरि; खरोखरीचा प्रळय दिसे;
भरोभरीं रक्ताच्या अश्रू अबला गाळिति शोकरसें.

' दोन हरवलीं मोतिं; मोहरा गेल्या सत्तावीस तशा;
रुपये खुर्दा न ये मोजितां ' —वचना वदती वृद्ध अशा;

घोर वृत्त हें दूतमुखानें कानीं पडलें नानाच्या;
' भाऊ भाऊ ' करितां जाई भेटिस भाऊरायाच्या.

उघडा पडला देश तयातें हें नव संकट कां यावें !
दुःख एकटें कधिं न येत परि दुःखामागुनि दुःख नवें !

धक्का बसला आर्ययशाला; तेथुनि जाई राज्य लया,
रघुनाथाचें धैर्य हरपलें, जोड उरेना हिमालया.

" नाथ ! चाललां सोडुनि अबला ! पाहूं कुणाच्या मुखाकडे ? "
" बाळा ! कैसा जासि लोटुनि दुःखाचे मजवरतें कडे ? "

जिकडे तिकडे हंबरडे यापरी परिसती जन फिरतां;
कोणिकडेही तरुण दिसेना; सेनासागर होय रिता.

उडे दरारा, पडे पसारा राज्याचा; बळ घेत रजा;
उघडें पडलें मढें हत्तिचें बोल्हे त्यावरि करिति मजा !

भलते सलते पुढें सरकले, खरे बुडाले नीच-करीं.
मालक पडतां नीट बैसले पाटावरती वारकरी.

नडे आमुची करणी आम्हां ! खडे चारले यवनांनीं;
तडे पडोनी यशपात्राला रडे सदोदित भूरमणी.

गंजीफांचा डाव संपला दिली अखेरी यवनांतें
स्वातंत्र्यासह सर्वस्वातें दूर लोटिलें निज हातें.

रूमशामला धूम ठोकितां पुणें हातिंचें घालविलें;
दुग्धासाठीं जातां मार्गी पात्र टेवुनी घरिं आले !

करि माधव नव उपाय पुढतीं परि ते पडती सर्व फशीं;
परिटघडी उघडिल्या एकदां बसेल कैशी पुन्हां तशी ?

जसा नदीचा ओघ फिरावा पात्रीं पडतां गिरिशिखरें
पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे.

इतिहासाचें पान येथचें काळें झालें दैवबळें,
या देशावर अपमानाची स्वारी दुःखासहित वळे.

सर्वस्वाचा नाश जयानें वर्णुं तयातें अतां किती ?
व्यास वर्णितां थकेल यातें मग मी कोठें अल्पमति ?

जसें झगडतां त्वरित फिरावी सकल जगाची सरल गति
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ।। कौं० ।। ७ ।।

[८]

जें झालें तें होउनि गेलें फळ नच रडुनी लेशभरी;
मिळे ठेंच पुढल्यास मागले होऊं शहाणे अजुनि तरी.

पुरें पुरें हें राष्ट्रविघातक परपस्परांतिल वैर अहो !
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्या हो !

भारतबांधव ! पहा केवढा नाश दुहीनें हा झाला !
परस्परांशीं कलहा करितां मरण मराठी राज्याला.

हा हिंदु, हा यवन, पारशी हा, यहुदी हा भेद असा,
नको नको हो! एकी राहो! सांगुं आपणां किती कसा?
एक आइचीं बाळें साचीं आपण सारे हें स्मरुनी,
एकदिलानें एकमतानें यत्न करू तद्धितकरणीं.
कथी रडकथा निजदेशाची वाचुनि ऐसा हा फटका
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका!
कौरवपांडव-संगरतांडव द्वापरकालीं होय अती;
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ८ ॥

## कृष्णाकांठीं कुंडल

[ कुंडल कृष्णाकांठीं नाहीं; पण घटकाभर त्याला तेथें नेलें आहे. त्य वेळच्या गांवकऱ्यांचा थारेपालट आजच्या कुंडलकरांना दगदग देणार नाहीं, अशी आशा आहे. गांवठाणाच्या या हालचालीनें भूगोलाच्या भक्तांचीं थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकानें त्यांचें समाधान होण्यासारखें आहे. ]

### साक्या

—१—

मनांत माझ्या गुणगुणतें हें रसिका कोणी कांहीं ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥
नव्या भरानें जुन्या जिवाचें गाणें हृदयीं खवळे ।
फिरत्या भंवऱ्यावरी मनाच्या फेस भराभर उसळे ॥
उचंबळुनि येतील बोल ते उधळुनि देतों वरतीं ।
पढिकांची चतुराई सारी येथुनि झाली परती ॥
साधाभोळा मराठमोळा जोमदार घाटाचा ।
रानफुलांचा साज चढविला त्यास त्याच थाटाचा ॥

शाहीराच्या रसवंतीला भावभेटिचें लेणें ।
एकसुराच्या एकसराला बालेघाटी दाणे ॥
असेल रसिका, असलें कांहीं ऐकायाचा हेत ।
तरि ये; मनिंच्या मळ्यांत पिकलें हें शाळूचें शेत ॥
राखण करि त्या जीवासाठीं डोळ्यांचा हा माळा ।
तुझी बाहुली बसवि त्यांत; मग गोफण मारी काळा ॥
गोफणगुंडा फाडुनि टाकी पडदा काळाचाही ।
तुटती धागे तीन शेंकडा उणेपुरे हे पाही ॥
शिवनेरीचा हिरा चमकतो दख्खनच्या दरबारीं ।
रायगडाचें सदर्दीनें कोंदण साजे भारी ॥
सह्याद्रीभर चमके त्याचा जित्या जिवाचा जोर ।
तेजानें बघ पाजळल्या त्या राई काळ्याभोर ॥
त्याच लकाकीमधें तळपल्या त्या एका राईंत ।
कृष्णाकांठीं कुंडल शिकवी मायलेंकरां प्रीत ॥
त्या राईंतिल सगळ्या वेली एकच गाणें गाती ।
त्या गाण्यांतिल प्रेमकहाणी—वेड लाविते म्हणती ॥
प्रीतीचें तें गाणें होतें; सहज लागल्या नादीं ।
कोणी येतां जातां त्यासी तेंच सांगती आधीं ॥
झुळझुळत्या वाऱ्यावर त्यांचीं पानें हलतांनाही ।
गुणगुणती तें गाणें; त्यांना छंदच दुसरा नाहीं ॥
वाऱ्याची धुगधुगी हलवि तरि वेली तें कुजबुजती ।
सोंसाट्याचा सूर लागला तरी तेंच ओरडती ॥
तुझ्यासारख्या रसिकासाठीं त्या तें गाणें रानीं ॥
कळ्याफुलांच्या वेलपत्तिनें लिहिती पानोपानीं ॥
चल, तें वाचुनि पहा एकदां बोलशील मग तूंही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

— २ —

चलाच रसिका, माझ्याखातर त्या राईंत फिराया ।
भलत्या वेळीं, भरल्या ठायीं, भलती मौज पहाया ॥

सह्याद्रीच्या कडेकपारी कोठें मोठे घाट ।
दरीपठारीं धुंडित जाणें भारी अवघड वाट ॥

तशांत पसरुनि रात्र आपुली काळी काळी काया ।
दक्षिण-उत्तर झांकुनि टाकी हिरवी डोंगरमाया ॥

थकाल वाटे रसिका ! माझ्या रसवंतीच्या राया !
मनासारखें मोल न मिळतां कष्टहि जातिल वाया ॥

परंतु आतां नकाच मागें परतूं इतक्यासाठीं ।
मायेखातर भटकलाच ना कान्हा यमुनाकांठीं ? ॥

बारामावळ देश तुम्हीहि पायाखालीं घाला ।
—पहा पुण्याहून कृष्णाकांठीं सहजासहजीं आला ॥

मार्गी दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा ।
वाजवितांना फिरतां रानीं पायीं घुंगुरवाळा ॥

भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा ।
पुंडलिकाची मायमाउली श्रीमहाराष्ट्रगंगा ॥

साधी सुरती बाळजिवाची, डामडौलही नाहीं ।
बघून घ्या ही रसिका ! इकडे नाचे नीराबाई ॥

काळा दरिया काळोखाचा वरतीं भरून राही ।
काळ्या राईमधें खालती काळी कृष्णामाई ॥

काळोखाचें रान माजलें, चंदारागी नाहीं ।
तिच्याच मागें पळे तिचा तो चंदेरी दरियाही ॥

जिकडे तिकडे काळीं रानें हसरंगानें खुलतीं ।
निळ्या चांदण्यालागी नुसतीं झालरमोतीं झुलतीं ॥

राईमधली हिरवळ आतां काळ्या रातीं कुठली ?
माथ्यावरची तशी कोंवळी रंगसभाही उठली ॥

निजली दुनिया, निजला वारा, नव्हलें हालत पान ।
लाख जिभांची बडबड थांबुनि निजलें सारें रान ॥

मिटुनि फुलांचे डोळे निजल्या वनदेवीच्या बाळा ।
उभीं झोंपतीं झाडें; त्यांचा उचलजागता चाळा ॥

कुठें कळकबेटांतुनि निघतां सुरांत बारा वाहे ।
निजली राई मधुनी मधुनी वाटे घोरत आहे ॥

क्रूर पशूंची विनशब्दांची लपतीछपती चाल ।
तीं राईचीं हलतीं स्वप्नें भयाण बहु बेताल ॥

काळे बुंधे खालीं नुसते वरतीं पान दिसेना ।
ठाण मांडुनी जणूं ठाकली वेताळाची सेना ॥

त्यांतुनि चिमणे झरे चालतां झुळझुळ हळु करितात ।
भुताटकींतुनि जातां भिउनी रामनाम म्हणतात ॥

भयाण रानीं भयाण राई; भयाण जिकडे तिकडे ।
भयाण रात्री भीति नांदते बांधुनि काळे वाडे ॥

म्हणति अप्सरा आकाशांतुनि दुरून बघतांनाही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

थरथर कांपे वरती जी ती निळ्या रानची राणी ।
त्या तर इवल्या चिमण्या, परंतु देवहि पळति विमानीं ॥

" देवहि पळती विमानिं " म्हणसी शाहीरा ! तें नीट
कोण सांग मग कृष्णाकांठीं देवाहुनि हा धीट ?

पहा दिसे ती काळोखांतहि हलती काळी काया ॥
खास नसे ही नुसती तुमच्या चपळ मनाची माया ॥

* * *

[ त्या दोन जिवांची गांठ पडल्यावर ती त्याला विचारते—]

" कुठली दौलत या खांद्यावर मान टेवुनि निजते ?
कुण्या कुळाचें नांव उजळितें तलवारीचें पातें ? ॥

कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज ?
कुणीं चढविला लाजत मुरकत देहावर हा साज ? " ॥

[ तेव्हां तो सांगतो—]

" रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया ।
या देहाला, नांव साजणी, ' रायबागचा राया ' ॥

शिवरायाच्या शब्दांसंगें नाचतसे तकदीर ।
दोरीपासुनि सुटलेला हा वाऱ्यावरचा तीर ॥
मैदानावर बेलगाम कीं फिरे मोकळा वारू ।
भरदरियावर भरकटतां धरि फेर फिरंगी तारूं ॥
तलवारीच्या धारेवरतीं हा जीव बारगीर ।
भालफळावर दिलें टांगुनी हातांनीं तकदीर ॥
रायगडावर खडे पसरले शिवरायाच्या पायीं ।
हिरेमाणकें तीं; आम्हांला दुसरी दौलत नाहीं ॥
मैदानाचा सुभा मोकळा, दुनिया मातीमोल ।
जिवंत मुडदा दिला गाडुनी पाताळाहुनि खोल ॥
पळत्या पायावरचा इमला; हिरवा महाल माझा ।
रानगांवचे कांटे किल्ले; त्याच रानचा राजा ॥
एकमांड घोड्यावर जाणें उत्तर हिंदुस्थानीं ।
भीमथडीला भाकर; तोंवर गंगथडीला पाणी ॥
जंगलशाही मिरास सारी, हिरवी दौलत न्यारी ।
रायबागच्या बादशहाची फिरते बेगम प्यारी ॥
होइल असतां बालीउम्मर सूरत ऐसी न्यारी ।
कुंडलवाली बादशहाची बाली बेगम प्यारी ॥
जयवंतीशीं लग्न लाविलें जेव्हां शिवरायांनीं ।
तोरणगडिं तैं तोरण बांधिति साऱ्या कुंडलकरणी ॥
[ त्यानें मागें एकदां कुंडल प्रांतीं मुशाफरी केली. त्या वेळीं ]
" पायाखालीं घालुनि थकलों कुंडलचें हें सदर ।
दूरदेशच्या मुशाफराची कुणी न केली कदर " ॥
" एक जिवाविण सुनेंच तेव्हां कुंडलचें हें सदर " ॥
" आला नव्हता "–" काय साजणी " ? " नव्हता आला पदर ॥
गेल्या गोष्टी आज कशाला ? सोडा आतां राग ।
दूरदेशच्या मुशाफरा ! घ्या दिलादिलाचा बाग " ॥
कां वेलींचीं पानें फिरलीं; फुलें लाजलीं कां हीं ? ॥
हांसलीस कां झाडावरतीं तूंही, मैनाबाई ? ॥

[ तिनें ' बरोबर घेऊन चला ' असा हट्ट धरला तेव्हां तो म्हणतो, व ती त्याल उत्तर देते– ]

तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी।
करवंदीची कांटेजाळी, परी आमुच्या भाळीं ॥
रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी।
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी ॥
टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार।
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार ॥
प्रीतीच्या पंखांनीं येइल टाकुनि मागें गगना ॥
रायबागच्या राघूमागें ही मान्यांची मैना ॥
थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ।
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ ॥
शहरगांवच्या हिरव्या फिरत्या पोरी चुकल्यावाणी।
उजाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झुरणी ? ॥
चला विचारा त्या वाघाला, ' कधीं लागली पाठीं '।
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठीं ? ॥
वाघाची किंकाळी मोंगल घोड्याची कीं टाप।
ऐकुनि छातीवरच्या चोरा सुटेल ना थरकांप ॥
तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रेड ? ।
रायबागच्या रणमर्दाची जन्माची जी जोड ॥
शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच दिली कां शीक ? ।
रायबागचे राघू पडले पोपटपंची ठीक !
नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनिया ! ।
दुसरी ग्वाही गाते आतां, अलम दखनी दुनिया ॥

[ तरी तिचा निश्चय फिरविण्याकरितां तो सुचवितो– ]

फसाल पुरत्या; असल्या गांठीं जन्माच्या ठरलेल्या।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या ॥
" तेंच सांगतें – जिवा जिवाच्या आतां नजरा जमल्या।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या "

[ तिचा निरोप घेऊन स्वारींत गेला असतां- ]
फुलांफुलांतुनि रंगत होतीं मधुर सुगंधी स्वप्नें।
[ झाडावरच्या मैनेला दूती करून- ]
सखे, सवंगडी म्हणतिल ज्याला ' रानगांवचा राजा '।
खूणगांठ ती, मैनाबाई—तोच शिपाई माझा ॥
तोच दिलाचा दोस्त, जिवाचा माझ्या मालक तोच।
जें जें माझें त्याची त्याची झाली त्याला पोंच ॥
झाडावरचा राघू झाला जसा तुझा बेभान।
तसाच राघू रायबागचा, कापी माझी मान ॥
वाऱ्यावरतीं उडती फिरती असली मैनाराणी।
तुझ्या गळ्यानें परी सोडितां झालिस बापुडवाणी ॥
आणिक जें जें सुचेल तें तें सांग साजणी बाई।
पढवणूक ही नको, तुलाही कळतें सारें कांहीं ॥
भरकन गेली उडूनि मैना; उरे मराठी मैना।
हुरहुर करुनी जीव भागला काय सांगणें दैना ! ॥
[ पुढें तो घायाळ होऊन मेला तेव्हां- ]
जीव सांडुनी पडला माझा जीवाचा अलबेला।
तोंडीं माती पडुनि रंगला जोबनरसरंगेला ॥
शिवबांच्या शिरपेंचासाठीं-बोली ठरली होती-।
तोडुनि मंगलसूत्र जिवाचीं देणें माणिकमोतीं ॥
शिवनेरीच्या शिवा, कसा हो केला माझा घात ?
हातावरचा राघू नेला उडवुनि हातोहात ॥
घारीनें झडपिला हातिंचा बघतां बघतां हार।
पुढतीं केला हात जरा तों विरून गेली गार ॥
चुना लाविला पानाला तो अजुनि वाळला नाहीं।
विडा घेतल्यावांचुनि केली कां हो इतकी घाई ?
असें जसेंच्या तसेंच वठलें जातें पाउल तुमचें।
पाय काढिला इथून पुरता; पुन्हां न परतायाचें ! ॥

अखंड भरला नव रंगांनीं हा इष्काचा प्याला ।
दुनिया झुकती है ये हरदम; नहीं झुकानेवाला ! ॥

[ संदर्भ न लागणाऱ्या ओळी ]

जशी रानच्या पत्रीसाठीं रुसे मंगळागौर ।
रुसा साजणी; फुलते गुलशन दिलेचमनकी और ॥
लपंडाव हा सरला, राया, राज्य तुम्हांवर आलें ।
हंसेल बाई या बोला ही साधीभोळी राई ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

[ त्या शोकानें तिचा अंत झाल्यावर– ]

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

( अपूर्ण )

देवल

वंदन नाट्य-मिलिंदा, गोविंदा तव पदारविंदांना, ।
वंदन बलवच्चंदन, तेविं तुझ्या काव्य-सुंदरी-चरणा. ॥ १ ॥
आधीं कवित्व नाहीं; त्यांतहि कांहीं सुचूं न दे धाई,
परि उत्सुकता वदवी मजकरवीं बोल बोबडे पाही. ॥ २ ॥
वाही चार फुलें हीं प्रेमें हा बाल त्या तुम्हांलागीं, ।
ज्या तुम्हां उभयाथीं बलवद्गुरु सार्थ तेविं वश्या गी. ॥ ३ ॥
आहे धाष्टर्य बहुत हें कवि-कुल-गुरु-राज मजहि हें ठावें, ।
परि गुरु-जन-दर्शन-सुख रिक्त-करें म्यां वदा, कसें घ्यावें ? ॥ ४ ॥
ती धन्या तव कविता रवि तापवितां उटी जशी अंगीं, ।
खिन्न मना दंग करी गुंगवुनी स्वैर आपुल्या रंगीं. ॥ ५ ॥
हरि ताप ' शाप-संभ्रम ' संभ्रम निपजवि कवित्व रसिक-मनीं ।
येथुनि उचलुनि बसवुनि मनो-विमानीं तयास ने गगनीं. ॥ ६ ॥

बोलूं काय अधिक मी ? जरि असती कवि जगीं अमित साच, ।
तरि " देवल ते देवल " वदती ते मान्य कां न मजलाच ? ॥ ७ ॥
निर्मूनि ' शारदा ' परि कां तुमची शारदा उगी बसली ? ।
कसली भीति धरी ती शक्ति जिची दांडगी असे असली ? ॥ ८ ॥
जिज्ञासा अधिका ही--क्षमा करावी परी महाभाग, ।
अथवा क्षमा कशाला ? महज्जनांतें कधीं न ये राग ! ॥ ९ ॥
द्या रसिकांतें कांहीं अजुनी; घ्या मग सुखेन आराम,
विनवित सविनय कविवर, नमन करुनिया पुन्हां पढा ' राम '. ॥ १० ॥

## घरांत बसलेल्या काजव्यास—

( चाल : भक्ति ग वेणी । माझी गुंफा ग साजणी ॥ )

उडुनि जा स्वैर, । काजव्या, चमक बाहेर. ॥ ध्रु० ॥

वासरमणी अस्तासी गेला,
कृष्ण करी तम सर्व जगाला,
अजुनि चंद्रमा वरति न आला,
असे ही वेळ, । जा, जा, जा, तोंवरि खेळ ! ॥ १ ॥

दिवस तुझे हे फार मजेचे,
तेज तुला हें नित्य कशाचें ?
आठवलें तुज बसणें कैचें ?
अगदिंच गैर ! काजव्या, चमक बाहेर. ॥ २ ॥

दाट तरूंची ती बघ राई,
चमकत चमकत तिकडे जाई,
प्रेम जसें नव-रमणी-हृदयीं,
वीज मेघांत, । जा, तैसा चमके तींत. ॥ ३ ॥

वदसि काय " चिरसौख्य न माझें,
तेज खरें नच तें अस्थिर जें,

मिरवाया मी म्हणुनी लाजें, "
वेडा, वा रे, । हें वेड तुझ्या मनिं सारें. ॥ ४ ॥

वेद, पुराणें नच पढलासी,
न्याय, तर्कही नच शिकलासी,
म्हणुनिच ऐसा मूर्ख रहासी,
मानवी कावा । वेड्या, तुज नाहीं ठावा ! ॥ ५ ॥

असेल त्याचा गर्व धरावा,
अल्प-अधिक हा भेद नसावा,
स्थिरास्थिराचा विचार जावा,
सोडुनि जातां । धन, पुन्हां धरावी लघुता. ॥ ६ ॥

" ज्ञानवंत जगीं मनुजप्राणी,
क्षुद्र इतर " हें कोण न जाणी ?
म्हणुनी अमुच्या नियमा मानीं.
जगाची रीती । जा, ठेविं आपुल्या चित्तीं ॥ ७ ॥

## सांग कसे बसलों ?

[ आचरटपणाचाच आणखी एक मासला. ]

### अंजनीगीत

भेट जहाली पहिल्या दिवशीं
परिचित नव्हतों कुणी कुणांशीं,
लाजुनि तेव्हां परस्परांशीं,
दूर— दूर— बसलों. ॥ १ ॥

दिवस यापरी जातां चार,
लज्जा उरली नाहीं फार,
वास न होतां मग अनिवार—
जवळ जरा— आलों. ॥ २ ॥

यापरि गेले महिने कांहीं,
परिचयास मग पार न राही,
लज्जा नुरतां तिळभर पाहीं—
सांग कसे बसलों ? ॥ ३ ॥

## कवीचा वधूवरांस आहेर *

### शार्दूलविक्रीडित

श्रीमन्मंगल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा ।
मोदें तेविं सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्वदा, ॥
पद्माही करि सद्म ज्यास अपुलें त्या मंडपीं मंगल ।–
जोडी मंगल कार्य मंगलतरा चिन्मंगला मंगल ! ॥ १ ॥

गंगौघा यमुना, सुकीर्ति विजया, चंद्रास तारा रवा, ।
अर्थातें प्रतिभा, कवीस कविता, स्वर्गा धरा सुंदरा, ॥
आत्मारामपदासि मुक्ति मिळतां जो हर्ष वाटे जना, ।
देवो तेविं अपूर्व योग तुमचा तो सर्वथा सन्मना ! ॥ २ ॥

श्रद्धा साधुजनीं, नया गुरुजनीं नम्रत्व विद्वज्जनीं, ॥
सेवा सेव्यजनीं, दया निजजनीं, स्नेहार्द्रता सज्जनीं, ॥
माया दीनजनीं क्षमा परजनीं, सुप्रेम साऱ्या जनीं, ।
ऐशा निर्मल सद्गुणांप्रति सदा आधार द्या स्वा मनीं. ॥ ३ ॥

मातातात जगांत वागति, न तें होई तुम्हांतें पुरें, ।
तन्मार्गे क्रमिला यथाविधि, तरी कर्तव्य थोडें उरें. ॥
त्यांनीं वाढविलें तुम्हांस; ऋण हें तुम्हांवरी राहि; जें– ।
बाळें वाढवुनी तुम्हांसम गुणी, तें फेडिलें पाहिजे. ॥ ४ ॥

* ही कविता भाषांतर आहे.

आलें चालत जें क्रमागत कुळीं त्या सद्यशोवैभवा— ।
रक्षा दक्षपणें; सुलक्षणगणें लक्षैकधा वाढवा. ॥
ठेवा सुस्थिर वैभवा; परि करा त्या सद्यशा चंचल. ।
यावच्चन्द्रदिवाकरौ पसरुनी आसेतुहैमाचल ! ॥ ५ ॥

जैशा मस्तकिं या सुरक्तधवला मंत्राक्षता अक्षता ॥
तैशी सत्कृतिसंचवृष्टिकरणीं ठेवा सदा दक्षता. ॥
जैसा गर्जत वाद्यनाद सुयशा तैसें जगीं गाजवा ।
प्रेमें सुस्थिरशा चिरंतनयशा ऐशा ध्रुवा लाजवा ! ॥ ६ ॥

मालादान न हें; परस्पर परी सर्वस्व संतर्पण ! ।
केलें गुंफुनि सद्गुणांहिं सुमनें हें नित्य आत्मार्पण ! ॥
गंगायमुना ओघ भिन्न असतां एकत्र होती यथा ।
झालां त्यापरि एकरूप इथुनी; आतां न व्हा अन्यथा ! ॥ ७ ॥

जें जें सुंदर जें सुखप्रद तसें जें जें महन्मंगल ! ॥
जें जें वांच्छित जें अभंग जगीं तें देवो तुम्हां मंगल ! ॥
आशीर्वाद सहर्ष वर्षित असा ज्या मान्य आहे रसा ।
' गोविंदाग्रज,' शब्दहार करि हा सामान्य आहेरसा ! ॥ ८ ॥

प्रासंगिक--किंवा अप्रासंगिकच—

## श्लोक

[ एका सार्वजनिक समारंभांत, एका थोर गृहस्थाबरोबर आलेल्या त्याच्या उपवर कन्येच्या गळ्यांतहि इतरांप्रमाणें सहजगत्या व्यवस्थापकांनी पुष्पहार घातला; त्यावेळच्या त्या मुग्धेच्या वृत्तीस पाहून- ]

सन्मानार्थ सभेंत हार कुणिसा कंठीं तुझ्या घातला ।
तों झालें तुज कां कसेंच ? इतका संकोच कां वाटला ?

लोकांदेखत लाजसी नवल हें कांहीं न बाले ! परी ।
बाला पुष्पवती सलज्ज असते एकांतिंही यापरि ॥ १ ॥

पुणें.

[ विचार ज्याच्या त्याच्या पाठीस लागलाच आहे; त्याची ओळख कशाला करून द्यावयाला पाहिजे ? ]

विचार करितां तुजविषयीं
गुंग विचारा ! मन
होई. ॥ ध्रु० ॥
दिवसभरी करुनी धंदा
गुलाम पोटाचा बंदा
पडे न तो थकव्यासाठीं;
तोंच लागसी त्यापाठीं !
ताळतंत्र न तुला कांहीं
आदि अंत तुजला नाहीं !
दया न अंतरिं
करिसी स्वारी,
सदा तयांवरि—
खपती जे पोटावारी
या जगताच्या बाजारीं.

[ २ ]

तूं असती बहु नवलपरी,
विश्रांतीचा कामकरी;
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोंप जागती तयांप्रती,
ज्यांसीं तूं धरिसी हातीं.
नसत्या आधि
स्वैर शतावधि;
निर्मुनि आधी,
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

[ ३ ]

विपत्तिकाळीं आम्हांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र म्हणावें तुला जरी,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु म्हणावें जरि तुजशीं
यत्न हितास्तव तरि करिशी !
" कसें करूं मी ? "
" काय करूं मी ?
ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नांव न संकट जाण्याचें

[ ४ ]

करिसी एकान्तीं गर्दी,
एकान्तहि जनसंमर्दीं.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढचीं स्वप्नें दाखविसी !
निजतां कोणी त्याकरवीं,
करविसी तूं कामें बरवीं.
देइन म्हणशी,
सुंदर खाशी,
" उद्यां " नराशीं
" आज " हातिची परि हरिसी,
मृगजाळें मनुजा खेळविशी !

[ ५ ]
पुत्र भविष्यत्कालाचा,
जन्मसि त्याआधीं साचा.
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी.
वाढायाची गति अतुला,
काळाहुनि बहु वेग तुला.
दोन जनांवर,
लोभ अनावर,
करिसि निरंतर,
विचित्र लीला अशी तुझी
तशी नाढळे जगीं दुजी !

## घास

[ चाल : विडा घ्या हो नारायणा ]

घास घे रे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।
भरवी यशोदामाई । सांवळा नंदबाळ घेई ॥ ध्रु० ॥

घेई कोंडा कणी । त्रैलोक्याचा धणी ।
विदुराघरींचा । पहिलावहिला घास ॥ १ ॥
पोहे मूठभरी । क्षीराब्धीचा हरी ।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घास ॥ २ ॥
थाळी एक्या देठीं । ध्यावी जगजेठी ।
द्रौपदीमाईचा । आला तिसरा घास ॥ ३ ॥
उरल्या उष्टावळी । फळांच्या वनमाळी ।
शबरीभिल्लिणीचा । घ्या हो चवथा घास ॥ ४ ॥
टाकूं ओवाळून । मुखचंद्रावरून ।
" गोविंदाग्रजा " चा । उरलासुरला घास ॥ ५ ॥

## मोरपिसावरचा डोळा

डोळा साचा ॥ हा मोरपिसाऱ्यावरचा ॥ ध्रु० ॥
बुट्टे काळ्या शालूवरतीं । तारे निळ्या नभीं लकलकती ।
कृष्णजलावरी कमलें रमती । तसा डोळा हा ॥ मोरपिसावर पाहा ॥
दिसती रंग उघड नयनांतें । आहे विद्युत्-शक्तिहि यातें ।

ओठी वस्तुमात्र; जग म्हणतें ! खरें असावें ।। कां नाहीं उगिच म्हणावें ? ।।
मोहकता तर आहे खास । ओठी ती त्याजवळि जगास ।
वाटे सौंदर्याचा वास । असावा त्यांत ।। ग्रह पहिला बघतां होत ।।
दिसतें काय कुणा परि यानें । रुदना खुलवी कां हंसण्यानें ।
फुलतें कुठल्या कीं प्रेमानें ? क्षणमात्रांत ।। हे विचार येत मनांत ।।
सजीवतेचें निर्जिव फूल । नुसती सौंदर्याची भूल ।।
ईश्वरतेची पोकळ हूल । भिन्न रंगाची ।। ही बैठक भिन्नपणाची ।।
क्षणमात्राची मोहकता ही । चंचलतेनें चमकत राही ।
प्रेमाचें मुळिं पाणी नाहीं । कसला डोळा ? ।। हे रंग जाहले गोळा ।।
शोभा प्रेमावांचुनि फोल । जिणेंहि याचें कवडीमोल ।
अर्थाविण मेलेले बोल । टाकुनि द्याना ।। खेळणें मुलाबाळांना ।।
कितीक असले फसवे डोळे । रंगीबेरंगी जणुं गोळे ।
जगांत पाहुनि फसती भोळे । दे ही जोड ।। देवा ते डोळे फोड ।।

## रांगोळी घातलेली पाहून—*

" साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे;
नित्याच्या अवलोकनें परि किती होती जगीं आंधळे !
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तथीं शाहणें, "
रांगोळी बघुनीच केशवसुता हें आठवे बोलणें.
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्या ! मला वाटतो,
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य कथणें वाटे तुला काय तो ?
जो तूतें वदवे न अर्थ मनिंचा तोंडांत आला तरी,
तो मी बोलुनि दाखवीन अगदीं साध्याच शब्दीं परी.
चैत्रीं आंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर,
रांगोळीहि कुणीं तिथें निजकरीं ती घातिली त्यावर.

* केशवसुतांची 'रांगोळी घालतांना पाहून' ही उदात्त कविता ज्यांनीं वाचली आहे, त्यांनाच या कवितेचा अर्थ कळेल.

ज्यां आमंत्रण त्या घरीं मुळिं नसे ऐशा स्त्रियांलागुनी
त्या चिन्हांतुनि हा विशेष निघतो आहे गमे मन्मनीं—

या या ! आज असे सुरेख हळदीकुंकू पहा या स्थलीं
बत्तासे बहु खोबरें हरभरे खैरात ही चालली !

ठावें कोण न जात येत—दिधलें कोणास आमंत्रण;
नाहीं दाद घरांत ही मुळिं कुणा; दे धीर हें लक्षण.

संधी टाकुनि छान फौज तुमची कोठें पुढें चालली ?
बायांनो ! अगदीं खुबी विसरतां तैलंगवृत्तींतली !

नातें, स्नेह, निदान ओळख तुम्हां येथें न आणी तरी,
या; आमंत्रण राहुं द्या; परि शिरा साऱ्याजणीं या घरीं !

लाभे तें फुकटांतलेंच हळदीकुंकू तुम्हांला जरी,
होई काय नफा अचानक तयामाजीं न कित्तीतरी ?

ही आगंतुकवृत्ति आपण जरी धिक्कारिली यापरी,
प्राप्ती चार घरें उगीच फिरुनी होईल का हो तरी ?

चाले काय असें उगीच भिऊनी ? तुम्हींच सांगा खरें !
या डोळा चुकवून नीट; डरतां आतां कशाला बरें ?

कोणाच्या नजरेंत येइल तरी होणें असे कांहिं का ?
केला का खटला कुणावर कुणीं ऐसा अजूनी फुका !

बायांनो ! तर या, नकाच दवडूं संधी अशी हातची,
जा जें कांहीं मिळेल तेंच भरल्या रस्त्यांतुनी खातची !

कामें हीं असलीं हितावह कधीं होतील का लाजुनी ?
या-या-या तर धांवुनी; त्यजुं नका रीती पुराणी जुनी !

कोणाच्या घरचें असेल हळदीकुंकू कधीं नेमकें
ज्या बायांस नसेल हें धुकुनियां केव्हां जरी ठाउकें,

रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणें,
कोठें चालत काय काय अगदीं हें नेहमीं पाहणें !

## विराम-चिन्हें

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलती दृष्टी सदा बागडे,
तेव्हां ' स्वल्पविराम ' मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसे, दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तैं ' प्रश्नचिन्हां 'कित.
अर्धांगी पुढती करी वश मना शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला ' अर्धविराम ' तेथ; गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमविती; लागे मुळीं अंत न,
त्याकाळीं मग जाहलें सहजची ' उद्गार ' वाची मन ।
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश—
हीं एकेक समर्थ आज नसतीं चित्ता कराया वश ।
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! ' पूर्णविराम ' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

## बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास—

थांब जरासा बाळ ! ॥ ध्रु० ॥

सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पांखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं वसलीं ठाणीं,
खरें असे रे! तरी नको रे मारूं लाडक्या धांव!
थांब जरासा बाळ!

पाहुनि सौख्याचा ठेवा!
सृष्टि करीलचि माझा हेवा!
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं! भुलशिल तूं लडिवाळ!
थांब जरासा बाळ

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं,
रंगी बेरंगीहीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं;
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग?
थांब जरासा बाळ,

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा!
उडवुनि नेइल तुला भरारा!
दिगंतराला, जातां बाळा! पुन्हां कसा मिळणार?
थांब जरासा बाळ!

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनि वेड्या धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें!
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस!
थांब जरासा बाळ!

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडुन तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बा रे, लपाल सारे, काळाच्या उदरांत!
थांब जरासा बाळ!

फूलपांखरें हीं स्वछंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !
थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां ? लाडक्या सांग !
थांब जरासा बाळ !

शब्दावांचुनि मंजुळ गाणें,
अर्थ तयाचा देवचि जाणे !
गाइन माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार !
थांब जरासा बाळ !

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी जाशिल बाळा खास !
थांब जरासा बाळ !

जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार !
थांब जरासा बाळ !

## कवि आणि कैदी

[ संसृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एकादे वेळीं तरी आपल्या परिस्थितीच्या वर जाण्याचा विचार करितोच; पण मायावश आत्ममूढता त्याला खालीं ओढिते. अविकारी आत्म्याच्याच "कवि" व "कैदी" अशा दोन बाजू आहेत. ]

( चाल – एडका मदन० )

मार भरारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ध्रु० ॥
पायीं गंजत बेडी पडली,
नकळे कोणी केव्हां घडली;
पुढती चाल परी तव अडली,
ब्याद भिकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १ ॥

अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवांवरती हाय !
टाकुनि चिरडिसि कोमल काय,
निर्दय भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ २ ॥

नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी ?
करुनी निधडा निश्चय आधीं,
फटका मारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥

तुटतां असली भिकार बेडी,
हंसतिल तुजला अणंग वेडीं,
कोणी तुजशीं धरितिल तेढी,
तयां धिक्कारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ ४ ॥

मारी गरुडभरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा का जाणी !
जाई शेणामधेंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ५ ॥

असल्या शेणकिडयांच्या जाती,
जिकडे तिकडे बुजबुज करिती,
केवळ मरण्यासाठीं जगता;
येत ओकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ६ ॥

प्रकाश बघतां घुबडें दडतीं
एकांताची आवड धरिती,
रातींबेरातीं परि फिरती,
घाण ही भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥

भिडतो गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी !
लावुनियां टक तेजोराशी
बघती घारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥

जाऊं त्यांमागुनि धीरानें,
काहूं शोधुनि लपलीं भुवनें,
गगनामागुनि निघतिल गगनें,
करी तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ९ ॥

रविकिरणाचे दोर मोकळे,
बांधूं नवमेघांचे दोले,
वारा देइल त्यांतें झोले,
धन्य संसारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १० ॥

बसुनी तेथें तीन्ही काळीं,
पाहुनि मूर्खपणाच्या चाली,
जगता हंसूं गालिंच्या गालीं,
ब्रह्मानंदीं । रंगुनी स्वैर स्वच्छंदीं ! ॥ ११ ॥

केशवसुतांची कविता वाचून—

शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें,
तसेंच तुमच्या मागें आम्ही नवीन कविता करणें;
असेंच कांहीं कांहीं करुनी जीवित त्याला गणणें—
'गोविंदाग्रज' म्हणे असे हें आम्हां लाजिरवाणें.

रात्रसि ओरडणाऱ्या घुबडास

वसंततिलका

जेव्हां धरी निजनिभा रवि आवरोनी।
तिग्मांधकार करि कृष्ण जगा भरोनी॥
जेव्हां अशेष जग निद्रित नीडभागीं
जेव्हां सजीव जगता चलताहि त्यागी॥ १॥

जेव्हां न ये श्रुतिपथावरि शब्द कांहीं।
भावि स्थिती जग धरी जनुपूर्व वा ही॥
होई अशांत रव कर्कश तावकीन।
जो त्रास दे, खग मना करि भीतिदीन॥ २॥

आधींच भीषण निशा, तम त्यांत घोर।
चोंहींकडे वन भयंकर; भीति थोर
येतां अशांत तव तापद शब्द कानीं।
घोर स्थितीसि जणुं पूर्णदशेस आणि॥ ३॥

तो शांतिभंग करि कष्टवि लोकचित्ता।
होतां पुरी भयद ग्रंथिक रोगग्रस्ता॥
जैसा करी जनमनांप्रति भीतियुक्त।
"श्रीराम" शब्द शववाहकसंघ-उक्त॥ ४॥

प्रौढा रवासि ऐकुनि भीतचित्तें।
ऊरःस्थलीं दृढ धरी निज बालकातें॥

मुग्धा समीप शयितस्वधवांगभागीं।
वेष्टीत चंदनतरुप्रति जेविं नागी ॥ ५ ॥

चिंती धवा कुशल ती विरहार्त बाला।
तोडी तशी उपवरा स्वविचारमाला ॥
ऐसें खगा! तव रवा जन अज्ञ भीती।
भीती तसें तुज अमंगल मानिताती ॥ ६ ॥

आहेत अन्य खग जे तुजहूनि थोर।
कांहीं तुझ्याहुनि रवा करिती कठोर।
तूतेंच कां मग कथी जन सर्व भीती ?
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ? ॥ ७ ॥

केलेंस पातक असें वद काय बा रे।
किंवा गमे तव मना " जन मूर्ख सारे! " ॥
छे! लोक मूर्ख न; पडे तुजलागिं भ्रांती।
घूका! तुला जन सकारण निंदिताती ॥ ८ ॥

तूं घोर शब्द करिसी भलत्याच काळीं।
लोकांसवें नससि, रीति तुझी निराळी ॥
रात्रीस तूंच फिरसी खगजात्यमित्रा!।
सूर्यप्रकाश दिपवीत तुझ्याच नेत्रां ॥ ९ ॥

यानेंच लोक उलुका! तुजलागिं भीति।
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ॥
बा ठेव या सुनियमास सदैव चित्तीं।
" लोकानुसारि नसतां जन निंदिताती " ॥ १० ॥

## जीवितास–

[ ईश्वरकल्प सौंदर्याचा परिचय या लोकीं नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असें नेहमीं प्रत्ययास येतें या प्रतीतीनें ज्यांना खेद होत नाहीं ते एका अर्थी धन्यच! ]

—आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगतीं राहुनियां ? ।
असेंच जाणें असे सदा का काळौघावर वाहुनियां ? ॥
सौंदर्याच्या दर्शनमात्रें जागृत होत्या जीवांत ।
विकल चेतना नाचे नुसती स्वस्थानीं व्हाया श्रांत ॥
जनसंमर्दी अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकान्तीं तच्चिंतन करणें; दुःखावेगीं विस्मरणें ॥
दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सर्वच धुवुनी काढावीं ॥
अवश्य जीवश्वसनें निर्दय निःश्वासांनीं योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥
आद्यंतींचे क्षण सोडुनियां अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥
पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥
आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे ।
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर 'जीवन' हें ॥
रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी ।
स्थलकालांच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं ॥
क्षणाक्षणाला जनमरण हें प्राणिमात्र भोगित राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ॥
फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां ।
"गोविंदाग्रज" म्हणे जीविता ! लाभ तुझा नच यापरता ॥

"समसमां संयोग कीं जाहला !"

अशीं फुलें नेहमीं सांपडत नाहींत म्हणूनच जगांतले ग्रामोफोन कवि-हृदयाच्या नालायकीचीं गाणीं गात असतात. ]

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना ।
त्यानें हर्षति जीवमात्र, परि तो मातेंच दे यातना ॥
नित्याचा क्रम एक हा ठरविला कीं काळ जायाप्रती ।
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी, येणें घरा मागुतीं ॥ १ ॥

येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला ।
होती कांहिं फुलें तिच्यावर, मना आनंद तैं वाटला ॥
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणुनी जों जीव माझा भुले ।
वारा वाहुनियां जरा– भरभरा सारीं उडालीं फुलें ॥ २ ॥

वेलीचीं नव्हतीं फुलें– तिजवरी होतीं कुणीं टाकिलीं ।
( प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी, तें आठवे त्या स्थलीं ) ॥
कांहीं त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों ।
" याचें काय करूं ? " विचार करितां हा मी परि भागलों ॥ ३ ॥

कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमधें भेटला ।
प्रेमें ओढुनियां स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला ॥
माझें स्वागत तो करी बहुपरी खेदास न्याया लया ।
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ॥ ४ ॥

ज्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा ।
गाणाराहि —गळा किती मधुर तो ! —लोकींच या पारखा ॥
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा ॥
नाहीं एकच तेवढें हृदय तें; हा खेळ दैवा, कसा ! ॥ ५ ॥

ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां ।
फुलें तीं टाकुनी होई " गोविंदाग्रज " चालता ॥ ६ ॥

## गरिबीचें गाणें

कुणि ऐका हो ऐका एकच वेळ । हा दुर्दैवाचा खेळ ॥
मी शास्त्रांचा मोठा पंडित नाहीं । नच शिकलों पढलों कांहीं ॥
मृत हृदयाचें रडकें केविलवाणें । गरिबीचें माझें गाणें ॥
दैवाचे पाहुनि झगडे ॥
मम हृदय जाहलें उघडें ॥
मग गाई वेडें बगडें ॥
घ्या मानुनि हें; चुकलें मुकलें कांहीं । तरि उपाय माझा नाहीं ॥ १ ॥

दुर्दैवाची करणी अघटित कांहीं । दुष्काळ पसरला बाई ॥
निज बाळाला पाजीना ती आई । गोठ्यांत उडाल्या गाई ॥
चहुं मुलखीं हो एकच उपासमार। चिमणीला नाहीं चारा ॥
झाडावर नाहीं पान ॥
वैराणच रानोंरान ॥
दुनियेचा बदले वान ॥
लवलेश कुठें अन्नाचा न मिळावा ॥ पोटांत पेटला वणवा ॥ २ ॥

किति आड तळीं विहिरी गेल्या खोल । नांवाला नाहीं ओल ॥
जणुं प्रेतांच्या डोळ्यांच्या त्या खांचा । भेसूर भाव दोघांचा ॥
नदिनाल्यांना तापुनि रेतीचूर । मृगजळेंच आले पूर ॥
पाण्याविण होतां भडका ॥
दगडाला देती धडका ॥
परि पाझर कुठला खडका ॥
यमरायाचे दूत फिरति चौफेर । सर्वांचा उठला ज़ेर ॥ ३ ॥

( अपूर्ण )

प्रेमकाळ

संगम तीन्ही काळांचा ॥
प्रेमकाळ घडवी साचा ॥ ध्रु० ॥

हृदयदेवते, दे हाता ॥
प्रेमकाळ निर्मू आतां ॥
दृढ आलिंगन दे हृदया ॥
चुंबन देई नंतर त्या–॥
एक करूं जीवा भावा ॥
प्रेमकाळ चल करूं नवा ॥
प्रेमकामने । प्रेमचुंबनें ॥ जोडुं या मनें ॥
वर्तमानकाळीं करूं ती ॥ भूत-भविष्यांची भरती ॥ १ ॥

सोडुनि सारें घरदार ॥
चिंतेचाही बाजार ॥
चुंबनेंच घेऊं नुसतीं ॥
सखे ! सारखीं; सोडुं न तीं ॥
काम एवढें मनीं धरूं ॥
जीवन चुंबनमयचि करूं ॥
आतां चुंबन । नंतर चुंबन । चुंबन जीवन ॥
इच्छा-तृप्ति क्रिया तशी ॥ चुंबनमय चल करूं अशी ॥ २ ॥

भूतकाळची क्रिया अशी ॥
आणुं वर्तमानापाशीं ॥
वर्तमानिंची हीच क्रिया
भविष्यांतही नेऊं या ॥
झाल्याचें गोडें स्मरण ॥
होत्यांचे आशा-किरण ॥
असत्याच्या या कार्यांत ॥
जिरवुनि टाकूं निमिषांत ॥
चुंबन स्मरणीं । चुंबन करणीं ॥ आशास्फुरणीं-॥
चुंबन एकच राहूं दे ॥ कार्यांच्या प्रेमानंदें ॥ ३ ॥

आद्यंतीं तीन्ही काळीं ॥
इच्छा तृप्ति स्मृति सगळी ॥
एकरूप होतां कुठला ॥
काळभेद सखये ! उरला ? ॥
भेद असे जो कार्यांचा ॥
भेद तोच या काळांचा ॥
इच्छा चुंबन । आशा चुंबन ॥ स्मृतिही चुंबन ॥
विलय तीनही काळांचा ॥ प्रेमकाळ निर्भेद.चा ।
क्रिया एकची करूं सदा ॥
क्रिया एकची स्मरूं सदा ॥
मनांत आणूं कितीकदां ॥
क्रिया तीच, नच दुजी कदा ॥

भूतभविष्यत्कालां ।।
वर्तमान एकच सांचा ।।
हा ऐक्याचा । हा प्रेमाचा । हा जीवांचा ।।
चुंबनसंगमकाल गणा । प्रेमकाळ त्यालागिं म्हणा ।। ५ ।।

ओंठावरतीं ओंठ सदा ।।
कदा न सोडूं इष्टपदा ।।
चुंबनास आरंभ नसे ।।
अंतहि कुठला त्यास असे ।।
चुंबन एक अनाद्यंत ।।
सखये ! मरणापर्यंत ।।
ओंठ न हाले । चुंबन असलें । सदाहि चाले ।।
नव्हा जुन्याचा एक ठसा । प्रेमकाळ चल करूं असा ।। ६ ।।

लीला

( अनाथबालकाश्रमांतील एक पांच वर्षांची मुलगी. )

दिंडी

दिसे मजला हें पुढें गोड मूल ।
पडे कोमेजुनि रम्य तसें फूल ।।
एक निर्णय मनें होत नसे साच
विषय दृष्टीचा द्विविध हा तसाच ।। १ ।।

जसें वेलीचें दलितगलित फूल ।
बालविधवेचें तसें पतित मूल ।।
दिसति दोन्हीही सारखीं मलूल ।
कृपादृष्टीची कुणि न घालि झूल ।। २ ।।

पांच वर्षांची छबकडी सुरेख ।
जणूं चिमणीशी हिरकणीच देख ।।
कशी चित्रासारखी उभी राही ।
नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ।। ३ ।।

कुण्या ऋषिचे यानास अडखळून ।
पडे निखळुनी जणुं नीलपटांतून ॥
आलि खालीं ही चांदणीच एक ।
तरिच इतकी ही चमकते सुरेख ॥ ४ ॥

बाल अवयव रेखीव एवढाले ।
कल्पनेच्या जणुं श्रमें चित्र हाले ॥
काव्य तरळत जणुं हृदयिं कवेजनाचें ।
बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ॥ ५ ॥

बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ।
तरी वाटे हें स्वप्न निर्धनाचें ॥
यास कारण तें पाहतां दिसेची ।
जोड सौंदर्या उदासीनतेची ॥ ६ ॥

किती लीले ! तव वदन उदासीन !
सांग बाळे ! कां दिसशी अशी दीन ॥
बघावेंसें वाटतें जरी त्यास ।
तरी बघतां मन होतसे उदास ॥ ७ ॥

तोंच माझ्या लागलें कुणी काना ।
जन्मवार्ता कथि चित्तसमाधाना ॥
बालविधवेनें टाकिली अनाथ ।
मिळाली ती बालिका कंटकांत ॥ ८ ॥

जणु कळुनी ही जन्मकथा नीच ।
असे तेव्हांपासून ही अशीच ॥
किती हंसवावी तरी हंसत नाहीं ।
दृष्टि भूभागीं यापरी सदाही ॥ ९ ॥

## विश्वाची विजयादशमी

नवरात्राची रात्र संपली सण आला दसरा ॥
पडल्या प्रहरीं जनता सारी करी येरझारा ॥
सृष्टिदेवता उघडुनि रविचें मावळतें दार ॥

खुलें टाकितें हें सोनेरी संध्याभांडार ॥
तें दसऱ्याचें सोनें लुटणें कविचा अधिकार ॥
तयार झाला, पुढें निघाला; हौसच अनिवार ॥

शब्दांचा चढविला क्षणोक्षणिं फुलता पोशाख ॥
अहंपणाच्या मुर्दुमकीचे अलंकार लाख ॥
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा ॥

(अपूर्ण)

## अपराध यांत कोणाच

हा असे खेळ दैवाचा। अपराध यांत कोणाचा ॥ ध्रु० ॥

कमलिनी मनोहर बाला। कमलमुखी शोभा वाही ॥
गुणरूप रेखिल्याऐसें। कोठेंही न्यून न कांहीं ॥
मकरंदें रसपूर्णा ती। कोणाला ठाउक नाहीं ॥

पंकांत जन्म परि तिजला ॥
देतांना विधि का निजला ॥
हें पाहुनि जीवची थिजला ॥

परिणाम पूर्व जन्माचा। अपराध यांत कोणाचा ॥ १ ॥

उदयाचलिं श्रीमान् रवि ये। निज तेज त्रिजगीं पसरी ॥
अति पवित्र त्या स्पर्शानें। कमलिनी जाहली हंसरी ॥
कुरवाळी तिजला स्वकरीं। भाग्याला उरली न सरी ॥

तेजाला तेज मिळालें ॥
दोन जीव एकच झाले ॥

" मी कुठें, कुठें तूं " सरले ॥
हा धर्मचि सम हृदयांचा । अपराध यांत कोणाचा ! ॥ २ ॥

(अपूर्ण)

पुत्रशोक

### दिंडी

पूर सरितेला फिरुनि फिरुनि येत
फुटत गिरिचें पाषाणहृदय जेथ ॥
हृदय फुटतां हें, जरी दीनवाणी ॥
करुणरंगें रंगते " रामवाणी " ॥ १ ॥

पडुनि आकाशींच्याच कुऱ्हाडीचा ॥
घाव दैवाच्या सबळ तांतडीचा ॥
वंशतरुचा रोपटा कोंवळाच ॥
तोहि एकुलता तुटे आज साच ॥ २ ॥

हिरा जीवींच्या जिवाचाच माझा ॥
गगननगरा जातसे बाळराजा ॥
शोकमंगल गावया गोड गाणीं ॥
सजे राजस रसवती " रामवाणी " ॥ ३ ॥

उचंबळुनी रस करुण येत रंगा ॥
भरुनि दुथडी वाहते हृदयगंगा ॥
" रामरसवंती " रमे कालिं ऐशा ॥
साक्ष देई श्रीमहाराष्ट्रभाषा ॥ ४ ॥

हाय !—शोकाच्या भरें काय आज ॥
बोललों हें सोडुनी भीड लाज ॥
क्षमा करिं हा अपराध शब्द मातें ॥
मायभाषे ! मज मूढ बालकातें ॥ ५ ॥

कुठें देवी मंगला मायभाषा ॥
कुठें पामर मी: काय ही दुराशा ॥

थोरथोरांची मायमाउली ही ॥
बोल भलते बोललों तिला कांहीं ॥ ६ ॥

ज्ञानदेवाच्या हृदयिं बसुनि कोडें ॥
भाविकांचें जी उकलि गूढ कोडें ॥
मराठ्यांच्या मंडळामाजि भावें ॥
जिनें भगवद्‌गीतेस नाचवावें ॥ ७ ॥

जिच्या सामर्थ्यें सहज नामयातें ॥
साध्य झालें फिरविणें राउळातें ॥
एकनाथाचें देव आणि पाणी ॥
जिच्या ओघांतूनि ती हीच वाणी ॥ ८ ॥

गोकुळींच्या चोरास धरुनि पायीं ।
बसवि जात्यावर जेथवां जनाई ॥
दळण दळितां गावया गोड गाणीं
आळवी तो श्रीरंग हीच वाणी ॥ ९ ॥

फक्त नांवाची टेउनियां ठेव ॥
करी देवाशीं सदा देवघेव ॥
अभंगांनीं ही करि अभंग वाणी ॥
खरा देहूचा जातिवंत वाणी ॥ १० ॥

जिनें आतांही मारितां भरारी ॥
गूढ गगनें भेदुनी पार सारीं ॥
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्य खाणी ॥
तीच कृष्णाची * महाराष्ट्रवाणी ॥ ११ ॥

अशी थोरांच्या रमे हृदयधामीं ॥
बोल सलगीचे बोलिलों तिला मी ॥
मायभाषा म्हणुनीच सर्व साही ॥
बाळबोलाचा तिला राग नाहीं ॥ १२ ॥

अजुनि खेळत माझिया मनासंगें ॥
रंगवावी मीं तशी तीहि रंगे ॥

---

* कविवर्य केशवसुत

धीर येउनि यामुळें तुला माते ॥
बोलवी मी मजसवें रडायातें ॥ १३ ॥

हाय ! बघतां बघतांच काय झालें ॥
कुण्या जन्माचें पाप पुढें आलें ॥

( अपूर्ण )

## काळाला बजावणें

जबरदस्तिचा हुकूम माझा ऐकुनि काळा ! थांब जरा ॥
बजावणें हें माझें तुजला, शक्तीचा हा जोर खरा ॥
ऐकुनि जाशिल पुढें तसाची, तुझाच होइल तरि तोटा ॥
दटावणी ही फोल नसे; या शब्द एक नाहीं खोटा ॥
ब्रह्मचारि वैरागी बळकट शून्याच्या हातीं सोटा ॥
निःसंगाची सोबत माझी ब्रह्मांडाचा करिं लोटा ॥
गाणें माझें काळा ! पाडिल चराचराला भुलावणी ॥
जो तो होइल ठायिंच वेडा ओळखील ना कुणा कुणी ॥
अवसानाच्या भरांत घेइन रविचंद्रांची झांज करीं ॥
दिनरजनीची जोडी ही तव क्षणांत मूर्खा ! वांझ तरी ॥
गाणें ऐकुनि त्या सूर्याचा प्रकाश होइल गार अति ॥
विरतिल तारा; रस पाझरतां तशी चंद्रिका अखंड ती ॥
दिनरजनीची जोडि फोडिसी नीरस असती किती तरी ॥
एका काळीं, एका ठायीं दोघां मी रमवीन परी ॥
एकरूप तीं करितां यापरि झांज करीं रविचंद्रांची ॥
दिनरजनींचा खेळ बंद; जणू उघडझांप तव डोळ्यांची ॥
उभें टेचितां समोर माझ्या ब्रह्मांडा करुनी वेडें ॥
अंधा ! ऐसा एकटाच तूं जाशिल कोठें सांग पुढें ? ॥
म्हणुनि सांगतों हुकूम माझा ऐक, नको करुं वृथा त्वरा ॥
बजावणें हें माझें तुजला; शक्तीचा हा जोर खरा ॥

गेले गोपाळ कृष्ण– हा ! हाय !!

चल, ऊठ, कल्पने, जा बघ पाहूं आज जाहलें काय
कां श्रीभारतदेवी एकाएकीच मोकली धाय ?
जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी
ठेवी कां उतरोनि स्वभूषणें ? मूकवृत्ति कां सेवी ?
साऱ्या शहर पुण्याची पुण्याई काळवंडली कां ही ?
आनंदाची माया हांसत खेळत कुठेंच कां नाहीं ?
भारतसेवामंडलसदनाभवतीं उदास वदनांनीं
अश्रूंची पुष्करिणी केली कां ? काय जाहली हानि ?
श्री फर्ग्युसन मंदिरिं शोकाचा पूर लोटला कां हा ?
हे भिंतीचे दगडहि रडुनि म्हणति सारखेच कां ? हाहा !
म्हणतात झोंप आली शिक्षा ऐकिलि तरी त्वरित ज्यांस
ते धीर बाळ टिळकहि आज रडतात कां सनिःश्वास ?
हृदया ! धडधड न करी ! ऐक इथें कोण बोललें काय ?
नश्वर देहा त्यजुनी गेले गोपाळ कृष्ण–हा ! हाय ! !

(अपूर्ण)

वीणावती सुंदरीस—

घुमे नाद तो सुंदरींच्या करीं
मनीं अंतरीं ही विराल्या परी ॥
तशा हृदयिंच्या सर्व तारा त्वरें ।
म्हणूं लागल्यों गान एकस्वरें ॥ १ ॥

चढें दिव्य हृद्गान तें सारखें ।
करी बाह्य विश्वास तें पारखें ॥
क्षणार्धांत चिद्वृत्ति ही रंगली ।
स्वगीतांतची बालिका गुंगली ॥ २ ॥

अशा दिव्य त्या चित्तगीतापुढें ।
असे कायसें विश्व हें बापुडें ।

घुमे आंतल्या आंत गाणें असें ।
कळे तें जयाचें तयाला कसें ? ॥ ३ ॥

म्हणोनी करीं शांत झाली गती ।
विचारांतरीं लीन वीणावती ॥
तिनें उधळितां नादरत्नाकरा ।
मनोवृत्ति साऱ्याहि आल्या भरा ॥ ४ ॥

मनांतील तारा निजार्थध्वनि ।
खडा ठेविती गूढता टाकुनी ॥
मुक्या प्रीतिचे भावही बोलती ।
मनोवृत्ति त्यां ऐकुनी डोलती ॥ ५ ॥

मिटी नेत्र बाला पहाया मना ।
तशी गुंगली सर्वही चेतना ॥
मुकें गान अंतरीं पाझरे ।
विरे देहिंचा देहभाव त्वरें ॥ ६ ॥

जरासा तसा हात राही पहा ।
करी यौवनश्री असा खेळ हा ॥
खुले भाव सारा झुले जीवही ।
क्षणार्धांत झाली समाधिस्थ ही ॥ ७ ॥

## जिवास बोध

शिवोऽहं शिवोऽहं शिवः केवलोऽहम् !

( टिपणें )

जसें पाहिलें त्वां परा जीवजातां ।
तसें पाहणें आपणासीहि आतां ॥
तुला कर्मसाक्षित्व आलें निदानीं ।
शिवाचा करी बोध हा रामवाणी ॥ २ ॥

( अपूर्ण )

# परिशिष्टें

# परिशिष्ट : १

## नाटकांतील पदें

### संगीत गर्वनिर्वाण

(१)

प्रभुपदीं नमन तव पद तदधिक शतविधा मजसि
असत हे केकाकार आधीं। प्रभुपदीं ॥ धृ० ॥
अवगणी म्हणूनि झणिं, हरिहर विधितर न गणिति
अद्य—नग ही गतकवि, प्रभुबल तसा करिसि
जरि प्रसाद मजवरि असा पतित तरि।
प्रभुभयाहि गणिं निज मनिं नच कधिं ॥ १ ॥
विनवित नत्र कवि तूं करशिल प्रभुवरा, अमंगल
न जरि, सुमंगलचि तरि, अभंग निज
करि, वितरिशी सहज मजवरी निरवधि ॥ २ ॥

(२)

गगनांत कां राही धरा ही अनंत दीपका ॥
स्थिरताहि, फिरत राही,
आज कां तारका-मालिका ॥ धृ० ॥
स्वांतीं किति येति कल्पना,
भ्रांतिप्रति चित्त सोडिना ॥ १ ॥
भ्रम जरि नयनां, स्थिर बघतांना,
शांतिप्रभा दे न कां मना ॥ २ ॥

निरखुन बघतां, आधि अधिकता
अंतीं न कांहींच भावना ॥ ३ ॥

( ३ )

नगरी सारी नटुनी थटुनी सकलाभरणीं ।
सरितामुकुरीं पाही कां ही वदना रमणी ॥ धृ० ॥
दीप नयनिं बघतां पतिला । लाजुनि लपवाया तनुला ।
कृष्णतमाची शाल करी ॥ १ ॥
तुषार नच जलयंत्र जलीं । स्पर्शें आलिंगनकालीं
सगळी । घर्मजलें परि तनु भिजली । होती न हे
ध्वनि पटहें, धडधड हें करि हृदय परी ॥ २ ॥

( ४ )

प्रलयाग्नीची वृष्टिहि झाली । मत्तनुची जरि रक्षा केली ॥
टाकुनि दिधली जाळें पातालीं । वृत्ति मनीं शांत ॥ धृ० ॥
श्री जगदीशा प्रेमें गाइन । कल्पांतीं हा असाचि राहिन ।
राज्यपदाचा मोह न ठेविन । वृत्ति मनीं शांत ॥ १ ॥
राज्यलोभ भय धन सुत दारा । व्यर्थ तयांचा जगीं पसारा :
तारा अथवा क्रोधें मारा । वृत्ति मनीं शांत ॥ २ ॥

( ५ )

जगदीश-पदीं जा शरण
शरणपर अन्य जगांत न या !
तदितर इतर न दुरित हरित
हरि करील दया तरि हरिल भया ॥ धृ० ॥
भक्त जरि असे सहस्रधा अपराधी
ठेवि श्रीहरि सदा करुणापराधी ॥ १ ॥
कां भयासि अजुनी भाव हा न वधी ?
जाउया शरण त्या न करा अवधि ॥ २ ॥

( ६ )

अतुल तव कृति अति भ्रमवि मति ईश्वरा ॥ धृ० ॥
वर्षनी मेघजल, शांतविति भूमितल,

सलिल मग त्यजुनि मल जात सुरमंदिरा ॥ १ ॥
फिरविसी रविशशी, तेजविसि भूमिसी,
केवि जन सुखविसी, कळत नच पामरा ॥ २ ॥
करिसि गर्भावना, मग पयोयोजना,
पुढति अर्पिशि जनां पवन जल शुभकरा ॥ ३ ॥
श्रम जनां-दिनभरी । विश्रमा शर्वरी,
रमवि संध्या बरी । रंगवुनि अंबरा ॥ ४ ॥
दिङ्-मंडळावरति नित्य नव विहरती
तारकातति, हरति नयन मन सुखकरा ॥ ५ ॥
पक्षि लक्षावधि, श्रवणसुख निरवधि
प्रसरिती स्वन नाद रस निर्झरा ॥ ६ ॥
वाग्वैजयंतींत शब्दमणि अगणित
स्वीकरुनि कविरणित, हसुनि खुल्वी जरा ॥
गोविंद पूर्वपद अग्रज स्मरुनि पद
उधळि निज हृत्सुखद शब्दरत्नाकरा ॥ ८ ॥

(७)

माना वचना; मान्य न हें वच हरिचरणा ॥
आचरणा साच न या यश कधिं जागा ॥ धृ० ॥
अशरणशरणा, शरण न तरि मरणचि समजा,
स्वजना सकला न करि हरिपदावमाना ॥ १ ॥

(८)

प्रेमाविना । जगतीं गति ना ।
करिते धरा । ही पावना ॥ धृ० ॥
नसतां रवि । तरि कांहिसा ।
शशि भूषवी । सकला भुवना ॥ १ ॥
परि आटला । प्रेमांबुधि ।
तत्साम्यता । करवे न कुणा ॥ २ ॥

(९)

कां शंका । कराया सांग विकट अघटित अशि
कृति कोणतीहि जी छेदिल या भयपंका ॥

लत्ताघातें कठिण गिरितटा । मुष्टिविघातें तडित्पटा ।
दृक्पातें वर गगनकपाटा । फोडुनि दाखवुं संरुद्ध—
बला वद का ॥

( १० )

आनंदाच्या सागरिं वाही । सृष्टि अशी तर नवल न कांहीं ॥ धृ० ॥
रमवी स्वकरें नाथ सुतांसी । सुखविति बाळें नाथासही ॥ १ ॥
अशा सेवितां द्विविध सुखासी । मानिति अबला मोह
सदाही ॥ २ ॥

( ११ )

जगदीश तो विदेही । दिसला कुणासि नाही ।
तरि ही त्याविना न कांही ॥ धृ० ॥
दाही दिशांस राही । व्यापूनिया जगताही
भक्तास दूर न कांहीं तरि ही ॥ १ ॥
स्वजना सदाहि पाही । हृदयीं तयांच्या राही ।
विलया भयासि नेई तरि ही ॥

( १२ )

अनंत तेजांचा तूं राणा । विनवित देवा नारायणा ।
आणा करुणा करुणाघना ॥ धृ० ॥
कृति घोर बघुनि ही लाजवीत का दीना ?
घ्या झाकुनि आपुल्या सर्वसाक्षी नयनांना ॥ १ ॥

( १३ )

जगदीश वचनासी । करि पूर्ण करुणाराशी ॥ धृ० ॥
रक्षी तुझ्या ब्रीदासी । दे धन्यता निज दासासी ॥ १ ॥
कर हा अबल वचना या । देतां तुझ्या वाचुनिया ।
धरि कोण अभिमानासी ॥ २ ॥

( १४ )

कृतिच मात्र हो नच वचनापरि ।
निर्दयता आचरणी दिसे खरी ॥ धृ० ॥

करितां न दया आपण नाथा।
टाकिल कां जगदीश अनाथा॥
दीनजनां तो नुरतां त्राता।
सतत अवन करि॥१॥

(१५)

रम्य आनंदपद पाहतां कानना।
सहज सहवासपर हो मना कामना॥ धृ०॥
कांतार शांत करि, स्वांतास शांत जरि।
शांत तर अंत तरि, सहज वाटे मना॥ १॥

(१६)

हा नित मोद सकल भुवना। प्रभुवरि भाव धरा।
समजुनि, करि न कधिं नाश, कुणाप्रति जाणा॥ धृ०॥
येई धावुनि संकटसमया। भक्त जनांप्रति संरक्षाया।
सहज करी जी अघटित कार्यां। शक्ति न ही अवमाना॥

(१७)

उत्कंठा वैकुंठाची लावि मानसा।
मोह न तरि आवरतां खास हा असा॥ धृ०॥
शून्य भूमि पापवशा। शून्य तिला मीहि जसा॥
शून्य जशा दाही दिशा। शून्य मनीं वृत्ति तशा॥
आयुष्यास पळ ही नीरसा रसा। पळ जीवन सम गमतें;
नीरसा रसा॥

(१८)

पूर्णचंद्रबिम्बवदन एकदा पहा हो।
धूलिपुलिन मलिन कमल तेंच हें न कां हो?॥ धृ०॥
धूलिमिश्र अश्रुजला बघुनि तत्त्वतां।
चुंबनांनि मलिनांबुज मधुसि चाखितां।
त्यासमचि आमुचेहि अधर माखतां।
हांसलों परस्परांसि आठवतें कां हो?॥ १।

( १९ )

देई हीच जोड । आई । विष हें देइ गोड ॥ धृ० ॥
व्यर्थ हा पसारा सारा । मनिं न देह मोहा थारा
तुच्छ मानि या संसारा । माया सोड सोड ॥ १
हट्ट कधिंहि धरिला नाहीं । हाच आज शेवटचाही ॥
मागणें न याहुनि कांहीं । पुरवी हेंच कोड ॥ २ ॥
पुरवितां न आई ज्याला । कोण येई जवळी बाळा ?
धीर धरुनि मायाजाळा । आई तोड तोड ॥ ३ ॥

( २० )

पंचानन संचारुनि । भीषणरव करित वनीं ॥
नारायणनामध्वनि । त्यांतहि असे ॥ धृ० ॥
गुंगुनिया कमलदलीं । गुंजारव करित अलि ॥
नारायणनामावलि । त्यांतही असे ॥ १ ॥
वायु करूनि वनिं निनाद । मंडित जणु तरुसि वाद ॥
नारायण हाच नाद । त्यांतही असे ॥ २ ॥
चंडनाद सागरास । निर्झर करि मंद हास ॥
नारायणनामवास । त्यांतही असे ॥ ३ ॥
जनका निज ताराया । ब्रह्मार्पण करि काया ।
रक्त समूळ दुरिता या । धवल विमल करि निर्मला ॥
शुभ मुहूर्त शुभ घटिका
हा अपूर्व योग निका
पुण्यबळावाचुनि कां
बाळ तुम्हां लाभला ?
धन्य तुझी पुण्याई । नवलाची नवलाई ।
धन्य तुझी ही आई । धन्य जन्म जाहला ।
जन्म मरण मंगला । अमर बाळ जाहला ॥

## पुण्यप्रभाव

( १ )

प्रभुपदास नमित दास मंगलमात्रास्पदा । वरदा सदवनिं लव यदवलंब न करि हरि दुरिता सौख्य वितरि ॥ धृ० ॥ सारस्वत—

चरणकमल— । दलिं विहरत कविमंडल । दुर्लभ तें दिव्य स्थल । पंकनिरत । राम रत । धन्य तरी ॥ १ ॥

( मुंबई, ६-६-१९१६ )

( २ )

नच संभव ज्या कांहीं होत अकारण तेंही । कालहि त्या नाहीं ॥ धृ० ॥ कलिका नाहीं खुलली, करपत तों अकालीं । हरपत मोहर कां वनिं बाई ॥ १ ॥

( मुंबई, ११-५-१९१६ )

( ३ )

शिशुपणाहूनि परिचित जनांसि बघुनि दुःखि हो स्वसुख असुखमय कटुतर वाटे । मोदहि विषसम ॥ धृ०॥ मंद सदा आनंद विषादें । हृदयिं विरति खर वसवि निज धाम ॥ १ ॥

( मुंबई, १३-५-१९१६ )

( ४ )

व्याकुळ हें मन होई कां सतत कां त्यास छळ हा ॥ धृ० ॥ जगतिं न रंगे । विचारी परी तरंगे । नच त्या कांहि विसावा हा ॥ अनलज्वाला । जाळते अशी जिवाला । पसरी अंतरीं या दाहा ॥ १ ॥

( मुंबई, १४-५-१९१६ )

( ५ )

दशा आता अशापरी अजुनि जाईना । उपत्य कांहीं ना । मना तें साहीना ॥ धृ० ॥ प्रयास हा करि महा । योग तरी न पहा । तिळभर मान कसा तो राहीना ॥ १ ॥

( ६ )

अनुकार जना ने कालान्तरिं थोर पदा । छळि विहास हा असला । आधी जरि त्या सदा ॥धृ०॥ हा निश्चय कधि न ढळे । प्राणान्तहि आला जरि । न मन तिळमात्र चळे । ये त्याप्रति यश तोंवरि । करिन यत्न परि । कल्पान्त घडला तरि । ही तापवीन तनु ॥ १ ॥

( मुंबई, ४-६-१९१६ )

( ७ )

फसवित पुरुषाप्रति स्त्री खनि कपटाची ॥ धृ० ॥ दोषमात्र पूर्ण गात्र । विश्वासा कधिं न पात्र । मोहपाश वागुराचि ॥ १ ॥

( ८ )

प्रभुसम पतिपद अबलांना । न दैवत लोकीं तयांना । शुभगति पतिप्राणा ॥ धृ० ॥ निजपतिवांचुनि इतर जनांशीं । दर्शन भाषण सुकृतासि नाशी । ईशपदीं रतिही पापचि त्यांसी । भयद खरविषसमाना ॥ १ ॥

( ९ )

हाल्त वातें मृदु शान्ति ही । भासे हासे कीं चंद्रालोक तनुलकान्ति ॥ धृ० ॥ दशदिशा पुष्पपरागें दरवळुनि हसत जणुं असती ॥ १ ॥

( १० )

दावी निजकान्ति । वियतीं । शीतलमाया शान्त निशापति ॥ धृ० ॥ शान्त वैभवा कोमल किरणां । वितरि तरलतर धवलावरणा । दाहि दिशाप्रान्तीं ॥ १ ॥ विविध विरोधी भावांवरतीं । पसरी जणुं हा मुनि एकान्तीं । ज्ञानमया शान्ति ॥ १ ॥

( ११ )

नाचत ना गगनांत । नाथा । तारांची बरसात ॥ धृ० ॥
आणित होती । माणिकमोती । वरतुनि राजस रात ॥ १ ॥
नाव उलटली । माव हरपली । चंदेरी दरियांत ॥ २ ॥
ती ही बरची । देवाघरची । दौलत लोक पहात ॥ ३ ॥

( १२ )

विनाश कां सहगामीच सदा भोगसुखाला ॥ धृ० ॥ सुवास वाहात राही । नाश तदा पुष्पाचा । विचार हा करि आनंदकालिं खिन्न मनाला ॥ १ ॥

( १३ )

गौरवा प्रसरी प्रभूच्या भव्य पट हा नभाचा ।
जीवकोटिप्रचुर भू करि कुंठिता तेवि वाचा ॥ धृ० ॥

भ्रमति अवकाशांत अणु हे अलक्ष्यरूपें ।
पवन त्यांतुनि शीघ्र फिरतां नाद चाले तयाचा ॥ १ ॥
विस्मयाकुल मनुजमतिला तदा भास होई ।
हुंकृतिध्वनि कोशवासी विश्व करि हाच साचा ॥ २ ॥

( १४ )

भुलूनिया खलजनालापा । जरि दिला ताप निष्पापा । तरि निरयनिरति न दुरापा ॥ ध्रु० ॥ या सदर्पा । बघुनी सर्पा । जात कोपा ॥ १ ॥ तनु सकंप नय कुजनिं उचित जरि घडत न तरि मलिन करी सत्प्रतापा ॥ २ ॥

( १५ )

दुर्दैवें हेतु झाला तुम्हां याया ताप हा ॥ ध्रु० ॥ उपकार आजवरि केला । तो अकालिं विलया गेला । अपकारमात्रें याला । स्मरावें आतां पहा ॥ १ ॥

( १६ )

अंतरिं खेद भरे, दीनवदन बोलेना । शून्य आलोक शून्य जग शून्य हृदय डोलेना ध्रु० ॥ शुभदर्शन चरणाचें, नच आतां म्हणुनी । देह हा जड जाहला शोकविकल हालेना ॥ १ ॥ व्यर्थ जीवित यावरी । वज्र पडेना कां शिरीं । हें अपयश आजि या प्राक्तनीं हत आलें ना ॥ २ ॥

( १७ )

करा करुणामया क्षमा । विषमा जरि गमे कृति हतकामा तरि सुखधामा सुपरिणामा ॥ ध्रु० ॥ क्षणचि हृदय हें भरतां विकारीं । मोदभरें तव कृति न स्वीकरी । विसरुनि तें; अघ हें सहाया दे या शमा ॥ २ ॥

( १८ )

प्रलयाची जी हतदशा । आली ती कां आतां? ॥ ध्रु० ॥ रविकिरणां वाटे भय याया । बघुनिया ऐशा एकान्ता ॥ १ ॥

( १९ )

भारसंचय पहा नियमि चंचलपदा । जातमात्रास या कर्मबंधापदा ॥ ध्रु० ॥ शकटभर जड यथा । महोक्षहि पाहतां ॥ सुटत न कष्टतां । चक्रपद्धति कदा ॥ १ ॥ पूर्वकृत संचिता । जीव हा ओढितां ॥ नियतिरेखांकिता । मात्र गति तापदा ॥ २ ॥

( २० )

अघटित कृतिसी करिसी कां ॥ धृ० ॥ या पापातें कवण अशि ।
महती आशा वद करवि ॥ जाळि अंतरंग जें । तदुपरि आत्म-
नाश चिरन्तनचि करि सुकृत लव नुरवि ॥ १ ॥

( मुंबई, २१-५-१९१६ )

( २१ )

कधि वदे प्रणय का कठोर विकटहि वचना । रुचतसे तया
मृदुरचना । ध्वनि तिथें कलह तो माना ॥ धृ० ॥ कळे न
वळे न कुणासि जें । वच असेंहि वदतां लाजे । कुलीन
त्याप्रति जग समजे । पतित इतर जन मनीं गणना ॥ १ ॥

( २२ )

सदा हृदयीं या रंगे । तरंगे । प्रसन्न अंतरंगे । कदा न भाव
भंग ॥ धृ० ॥ मूर्तिसुंदरा । मदनमदहरा । गुंणां नटवि नटवरा ।
कुणा भुलवि न मधुरा । प्रणयरागें ॥ १ ॥ प्रेमविव्हला ।
हतबल अबला । प्रिया शरण पदतला । प्रिया हृदयिं द्या स्थला ।
न तरि भागे ॥ २ ॥

( मुंबई, २९-५-१९२६ )

( २३ )

अतिशय छळी दीन मनासि कां ? तापद असा हा ॥ धृ० ॥
विषमय गमे कां हृदयहि या संतत सुखाचा बिहार ॥ १ ॥

( २४ )

रंग अहा भरला । सुबक भला । नाचत चंचल हा वरवरला ॥ धृ० ॥
भुलवुनि खुलवुनि हांसत खेळत । भारुनि केलें गुंग जीवाला ॥ १ ॥
हंसवी फसवी नटवी माया । शोभत बाई ज्याची त्याला ॥ २ ॥
बांधुनि नजरा जादूगारा । दाखवितां हा खेळ कुणाला ॥ ३ ॥

( २५ )

चतुरा चातुरी । तुमची न्यारी । भुलावणी खरीखुरी ॥
परि मारी । जिव्हारीं । दुधारी सुरी ॥ धृ० ॥
भोळा भाव भुलाया टाकुनिया फांसा ।
केला डाव असा अवचित कां हो खासा ?

हा देव पावला आज कुणाच्या नवसा ?
रुसला कान्हा काय जिवाच्या रासा ?
तुटली सारी कां दिलदारी इतक्यावारी ?

( २६ )

आतां न करी हा चाळा । टाकि छंद बाळा ॥ धृ० ॥ शान्तिसुखाची झोप कशाची । भीति मजसि ही जाची घाली आळा ॥ १ ॥ धीर मला दे मंजुळ नादें । हास परतवी वीरा निर्दय काळा ॥ २ ॥

( २७ )

बोल ब्रिजलाला रे कांहीं हंसुनी बोल । भ्यालें जनाला । भ्यालें मनाला । सुटला माझा तोल ॥ धृ० ॥ करि उरिं धडपड रहा मनिंच तूं । हांसुनि भिरभिर वद नयनांनीं । नवलाखाचा बोल ॥

( २८ )

रणवीर कुमारा निकट विकट रण हो क्षणि सिद्ध तया । यदपि वय न तव, उघडि नयन निज, हरुनि भया मज दे अभया ॥ धृ० ॥ प्रसंग घोर पाहुनिया भीत माता । तुझाच एक धीर तिला आतां । तात तुझे त्यजुनि मला दूर जाता । प्रभुस्वरूप तूंच जगीं, तूंच त्राता ॥

( २९ )

धिक् जगति शतधा शुभयशा । त्या वीरकर्मा या परि जरी नरवर कृति करिति अधमाधमा ॥ धृ० ॥ अनाथ अबलाजनालागिं छळितें जें । शिशुवरि शस्त्र धरुनि जें हृदयीं लवहि न लाजे । तरि त्या धिक् ॥ १ ॥

( मुंबई १४-५-१९१६ )

( ३० )

अनुचित वचनें ऐशीं । सतीतें व्यर्थ वदुनि अवगणुनि तिस जोडितसां कां यापरि पातकराशी ॥धृ०॥ पतिव्रतेच्या मंगलधामा । पतिव्रतेच्या शुभ नामा । अभद्रवचनीं विषसम विषमा । विडंबितां कां जोडोनिया पापासी ॥ १ ॥

( ३१ )

जडताच गडे शोभते असा प्रसंग ये तदा। त्वरा, रुचे न तापदा। कुलीनतेसि ती कदा ॥ धृ० ॥ मंद पडत पद तरी। ओढ जिवा फार जरी। जड-पदाहि थोर पाहिं दाविती विषादा ॥ १ ॥

(३२)

मार्ग दुजा नच जगांत। अतुल पातक ना तरी आतां। घडवित पितरां निरयपात ॥ धृ० ॥ थोर कुलीं जन्म ज्यास। सौख्यलेश नाही त्यास। कष्टदशा त्याला। अशिच नशिबाला। ना तरी कुल तें विलया जात ॥ १ ॥

( मुंबई, २२-५-१९१६ )

(३३)

निज बाळा रे गाणें गाते आई। करि आतां जो जो गाई ॥ धृ०॥ तुज जन्म दिला बाळा त्यांची स्वारी। लाखांत शिपाई भारी। बघ गर्दी ही बुरुजांची तुजभंवती। दगडांची त्यांची छाती॥ कळिकाळाशीं झगडणार खंबीर। हे तुझेच हिरवे वीर॥ ( चाल ) जीवांच्या जळत्या ज्योती। आकाशीं तारा होती। मोलाची माणिकमोतीं ॥ त्या डोळ्यांनी देवराय तुज पाही। करि आतां जो जो गाई ॥ १ ॥ दो दिवसांची ही दुनियेची वसती। सारखीच असती नसती ॥ तुज ऐसा हा बाळ नऊ नवसाचा। हातचा कि रे जायाचा ॥ ऋणानुबंधाच्या तुटल्या आतां गांठी। मग कुठल्या भेटीगांठीं॥ ( चाल ) हें देवाघरचें लेणें। नशिबानें देणें घेणें। कुणितरी कुणास्तव रडणें। तीं रडणारी रडतील धाईधाई। करि आतां जो जो गाई ॥ २ ॥

( ३४ )

नीज गुणी बाळ क्षणीं शान्त यावरी।
गाऊं किती कुंठित मति नीज झडकरी ॥ १ ॥
हृदयाचा केला हो पाळणा नवा।
बांधाया ममतेचा पाश मग हवा।
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदुरवा।
ब्रह्मसगुण बाळरूप रमत अंतरीं ॥ २ ॥

जिवास वसुनि हा घाय। दयाघना। घडि घडि छळित कसा अजुनि रुजत ना। हृदय करिल हें काय ॥ धृ० ॥ निकटिं न तान्हा। फुटला स्तनिं पान्हा। आतां होई निरुपाय। नावरे मना ॥ १ ॥

(३६)

क्षणैकमात्र जरि हे संलग्न जीव झाले। तुटे परि प्रसंगीं संबंध अचिरकालें ॥ धृ० ॥ वसतिस्थल एक तरी असती दशा विविध तयां। भिन्नकार्य जीवजात भिन्नगतिहि जगतीं या। खिन्नता न उचित विरहिं, दुर्जय जरि माया। फसवीत मोहजालें ॥

(मुंबई, ५-६-१९१६)

(३७)

पुण्यमया तव मूर्ति पहातां खनि जी केवल तेजाची।
इंद्रहि झाकिल नेत्रसहस्र काय कथा मग इतरांची ? ॥
देवी त्रिपुरेश्वरी प्रतिष्ठा करि कां देहीं या साची।
दर्शनमात्रें जाळुनि टाकी विश्वें सारीं पापाचीं ॥

(३८)

प्राणनाथ नच परि जन्म नवा। या मरणें मिळवी फिरवी तेचि धन दिव्य पुण्यप्रभावा ॥ धृ० ॥ हृल्लाभाहुनि त्याग सुखाचा शतपट बरवा ॥

(मुंबई, २८-६-१९१६)

(३९)

हृदय कांपितसे तापद वच व्यापि तसें विप जिवासि ॥ धृ० ॥ देवि, उदार मनें दे आशा या जनासि ॥

(४०)

नाथ भय न राहि। मिळहि कांहीं दुरित हरिल तो हरि त्वरलाही ॥ धृ० ॥ माझ सदैव धरुनि झणि अंतरिं। जरि संकट घन धीर ये तरिहि ॥

(४१)

अभागी जीवा शोक आतां पुरे हा ॥ धृ० ॥ नशिबीं आलें। त्यापरी झालें। मन कां वृथा हे मनाशीं झुरे ॥ १ ॥ रडणें हसणें एकत्र जाणें नातें न आतां जगाशीं उरे ॥ २ ॥

( ४२ )

निरोप द्यावा आतां बाळा । टाकुनि जाते माता ॥ धृ० ॥
माझें माझें म्हणुनि आजवर जें लेणें ल्यालें ।
बाळ गुणाचें हाय कुणाचें आज परी तें झालें ॥ १ ॥
हे तारांनो, उचंबळूं द्या करुणारसरंगा ।
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा ॥ २ ॥
घटकेचा संसार संपला लटका ठावठिकाणा ।
वनदेवींनो पदरीं घ्या हा माझा राजस राणा ॥ ३ ॥
अनाथ दुबळा देह पडे हा आई नाहीं त्याला ।
फुलत्या फुलवंतीची यावर मायापांखर घाला ॥ ४ ॥
सुतें जागतां उठतां दचकुनि हृदयींचा हा ठेवा ।
काळ्या रातीं जित्या फुलांचा खडा पहारा ठेवा ॥ ५ ॥
कळतें तुम्हां सारें कांहीं अहां फुलांच्या माता ।
लोभ असूं द्या इथून पुढतीं बोलत नाहीं आतां ॥ ६ ॥

( ४३ )

घडे नाथा प्रमाद जरी आतां क्षमाच तरी हो तया । झुरे देह म्हणुनियां नुरे धीरच हृदया । हा जीव शरण चरणीं या । भ्रमुनिया दमुनिया श्रमुनिया ॥ धृ० ॥ हा सतत असो प्रेमभर असा । शुभ आनंदलाभ तसा हा । दासी सदाची करी याचना । प्राण पहा वाही । अचल करुनि मति पदिं सदया । तरि दया । करुनि ॥

( ४४ )

हे प्रभुवर धृतिबल वितरी लोकीं त्यागास्तव खरतर । सुखी तरी विहित शुभसमया ॥ धृ० ॥ आर्यावर्ती आर्या । मान्य गणाया । दे नयपर सुमति पुरुषां । विनवित सविनय ॥

भावबंधन

( १ )

करि नतिच ही स्तवनधी । प्रभुवर मौनमयचि पदिं । वचनें स्तवना क्षय ना साधी । दिव्य वितरिसी सहज सुगुणगण गूढ मनुज-हृदिं ॥ धृ० ॥ करावया प्रकट तया । शुभदा अवसंधा । निर्मिसि जरि वाटे खर आधीं ॥

( २ )

स्वजनकृतिचे गुरु दोष झाकुनीयां
घेति गुण लव जे गोड मानुनीयां
कृतज्ञत्वें त्यां नमन अष्ट अंगीं
महाराष्ट्राच्या रसिक जनांलागी ॥

( ३ )

कृपाचि ज्यांची कारण केवळ मम पामरवचनातें ।
वंदुनि त्या श्रीपादपदांप्रतिं याया यश कार्यातें ।
नवनाटकरचना । सादर करितों रसिकजनां ॥

( ४ )

करि मोहवश ना कसा । हा । नवकाव्यागम रसिकमानसा ॥धृ०॥
रमवि मुखि न त्या वरुनि मुखरता । शमवि न सुरसें कवण रसरता । हृदयपिपासा ॥

( ५ )

कठिण कठिण कठिण किती पुरुषहृदय बाई । स्त्रीजातीप्रति झटता अंत कळत नाहीं ॥ धृ० ॥ रंगुनि रंगांत मधुर मधुर बोलती । हसत हसत फसवुनि हृद्बंध जोडिती । हृदयांचा सुंदरसा गोफ गुंफिती । पदर पदर परि शेवटिं तुटत तुटत जाई ॥

( ६ )

विनति अंतिम असे ईशवर तव पदा ॥ धृ० ॥ भालिं मम रेखिला । अखिल सुखलेख जो । अंकित प्रीतिच्या चरणतलिं करि सदा ॥ १ ॥ दुःख खरतर वितरि । प्रभुवरा मम शिरीं । देइ इजसी परी । सकल सुख–संपदा ॥ २ ॥

( ७ )

मोह नसावा । त्याग ठसावा । भावहि हृदयिं विरावा ॥ धृ० ॥
आशामय हें । स्वप्नचि आहे । हा भविं अनुभव यावा ॥ १ ॥
जीव निदानीं । नयनजलांनीं । ब्रह्मार्पणचि करावा ॥ २ ॥

(८)

रमते सहवासें प्रीति विलासीं । परि विरहें येत भरासी ॥ धृ० ॥
चमके रवितेजें हीरशलाका । घन तिमरीं द्युति परि अधिका ॥
तळपे किरणीं त्या कांचहि तैशी । तमि विसरे परि तेजासी ॥
मिथ्या प्रीतीच्या चंचल जाति । विस्मरणें पावति विरति ॥

(९)

शांत मनि या । न धरि कधि दया । न धरि कधिं माया ॥ पदिं
तुझ्या विनति ही । न सखि मुख हें कधि पाहि बाई ॥ धृ० ॥ ही
कृतान्ताची । क्रिया ज्याची । सुता त्याची म्हणुनि याची ।
न सखि मुख हें कधि पाहिं बाई ॥

(१०)

सुखा पारखा झाला । अभागी जो या प्याला ।
भरला का प्रेमाचा हा विषारी ऐसा प्याला ॥ धृ० ॥
नवरसलीला कोमल जाळुनियाच रस हा भीषण केला ।
हृदयदहन करि दुरुनिच हा । पळभरि अधरिं न जो ठरला ।

## राजसंन्यास

(१)

### पांच देवींचा पाळणा

गुणि बाळ असा जागसि का रे वांया ।
नीज रे नीज शिवराया ॥ धृ० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।
तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला
तिळ उसंत नाहीं जिवाला ॥
निजवायाला हरला सर्व उपाय
जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका
हा असाच घटका घटका
कुरवाळा किंवा हटका ।

कां कष्टविशी तुझी सावळी काया
नीज रे नीज शिवराया ॥ १
ही शांत निजे बारा मावळ थेट ।
शिवनेरी जुन्नर पेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घाटाखाली ।
कोकणच्या चवदा ताली ॥
ये भिवबाया बागुल तो बघ काळा ।
किति बाई काळा काळा ॥
इकडे तो सिद्दि जमान ।
तो तिकडे अफझुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया
नीज रे नीज शिवराया ॥ २ ॥

(२)

तो एकच प्यारा बोल । मनीं या [illegible] नी बसला
हृदयावर कायम ठसला ॥ १ ॥

लाखाचें ज्याचें मोल । असा तो बोल । बोल या काळा ।
शोभलीस राजसबाळा ॥ २ ॥

तो डावा डोळा – अहा । पुन्हा हा पहा । झाकला अरधा ।
करि जिवास मोहनबाधा ॥ ३ ॥

भिवईची तिरपी तऱ्हा । मुरडुनी जरा । त्यावरी ढळली ।
टोंकाशीं कांहीं चळली ॥ ४ ॥

हंसतांना थोडें कुठें । गाल तो उठे । आणि त्या भारें ।
निपजली मजा परभारें ॥ ५ ॥

त्या रेषा चिमण्या भल्या । तोंच उमटल्या । तीन कीं दोन ।
डोळ्याचा साधुनि कोन ॥ ६ ॥

तो भरुन आला उर । रंगरसपूर । चालला श्वासें ।
ओंठावर अडलें हासें ॥ ७ ॥

भयभीत नवा आनंद । पदर बेबंद । कंप कटिबंधा ।
जिव झाला अरधा अरधा ॥ ८ ॥

नवतीची राजस लाज । गुलाबी साज । और तो कांहीं ।
गालांवर चढवी दोहीं ॥ ९ ॥

थरथरत्या ओंठावरी । प्रीत बावरी । बोल तो टाकी ।
नजरेचा पडदा झांकी ॥ १० ॥

तो एकच प्यारा बोल । जिवाचें मोल । घेउनी फिरुनी ।
एकदा ऐकवा कानीं ॥ ११ ॥

( ३ )

अडला रायगडींचा राणा । पडला आज शिपाईबाणा ।
ज्या राजवटी त्या रानवटीपरि जाणा ।
जन अवघे उघडे, नाहीं ठावठिकाणा ॥ १ ॥

बारा मावळ एकच दैना । चवदा ताल कोंकणीं रैना ।
गगनांत झांकिती देवदेवता नैनां ।
रानांतहि प्याला शेंदुर राघूमैना ॥ २ ॥

( ४ )

निव्रते घेऊनि तुमच्या नांवा ।
देवा शिवनेरीच्या शिवा ॥
जरि करीन सोव्रत भ्याल्या जिवा
पदराखालिं चिमुकला दिवा ॥
झड घालि तरि कसा वारा उजवा-डावा ।
घ्या सांभाळुनि, हा न्या आशेच्या गांवा ॥

( ५ )

आजवरि पाहुनि वाट सुंदरा देह कि रे झुरला ॥ जिवलगा रे
डोळ्यांत प्राण बघ उरला ॥

भरास आला खेळ— जाव हा कोणि तरि उकला ।
माझाच डाव कां हुकला ? ॥

पुरती झाली सांज, कळप हा विसांवत वसला ।
तो कीर कुणिकडे फसला ? ॥

घरिं घरिं चाले थाट देवावर फुलवरा कसला चढला।
हा एक हार कां पडला ? ।।
बहरुनि आला बाग, चहुंकडे रंगास झुकला
माझाच मोगरा सुकला ।।
(चाल) कां पाडिसि देवा, वज्रचुड्याला तडा ?
कुणिकडे उडाला मुद्रिकेंतला खडा ?
हरपला मणिच, मग उदास नागिणफडा ।
धरुनि भरंवसा जीव ज्यावरतिं आजवर ठरला ?
जिवल्गा रे, तो आज वायदा सरला । १

(६)

का सख्या शिणविशी अशी । आपुली दासी ।
मन होत हिंपुटी; तसा शीण जीवासी ।
तो तुझ्या मुखींचा बोल पडूं दे राया
पसरीन जिवाचें जाळें त्यासि झेलाया ।। धृ० ।।
फुलवंती राजसवाळी । तिचा तूं माळी ।
जिवलगा, तीनही काळीं ।
ही माळ धरा हृदयाशीं । वहा देवासी ।
परवा न सख्या आम्हांसी ।
देहाची नाहीं माया । जिवाच्या राया ।
शिवगंगा तुमची छाया ।
करुनिया मनाचा रमणा । अहो भगवाना ।
लुटवा या पंचप्राणां ।
तो बोल एकदां बोल, वाहते आणा ।
तूं सुखी तरी सुख मजला— हा एकच बाणा ।। १ ।।

(

साजणि बाई । सजबी मजसि करि घाई ।
लगिनघडि जाई । वेळ आली भरा
देव आले घरा । करी चतुराई ।। १ ।।
साजणि बाई । नटुनि थटुनि लवलाही ।
निघतें अगाई । राजराजेश्वरा ।
जवळि या हो जरा । बघिन मुख कांहीं ।। २ ।।

साजणि बाई । चपळ पळत मन पाही ।
जवळि नच राही । मंगलाचे सडे ।
टाकि चोंहीकडे । दावि नवलाई ॥ ३ ॥

# परिशिष्ट : २

[ टीप—या परिशिष्टांतील कविता 'समीक्षक' मासिकाच्या गडकरी विशेषांकांत फेब्रुवारी १९४४ मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. ]

## १. झडपिला घारिनें हार !

[ स्वर्गीय सुखाच्या पहिल्या रात्रीनंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं नववधू आपल्या मैत्रिणीशीं असेंच हितगुज करीत असेल काय ? ]

विरे जळिं गार । झडपिला घारिनें हार ?
गेल्या रात्रीं खेळत होती,
गालीं नयनीं हृदयावरती,
नाचत रोमारोमाभंवती,
सखे, ती लाज ! कुणिकडे पळाली आज ?
तुटुनी ज्याचें बंधन बाई,
लेश न बालपणाचा राही,
पडलें थोरपणाच्या डोहीं,
लज्जाजाल । हरपलें काल्च्या काल !
लाजवि स्मृति ही ज्या रात्रीची,
नुसत्या कल्पनेंत चित्रींची,
हरुनी लज्जा माझ्या मनिंची,
रात्र ती मेली । हें काय करोनी गेली ?

टीप — 'पुण्यप्रभावा'तील कांही पदांच्या खाली लेखनकाल दिला आहे तो अस्सल कागदपत्रांच्या आधाराने दिला आहे. —संपादक.

डोळा भिडतां त्या डोळयाला,
रंगवि बघतां बघतां गाला,
रोमांचाच्या कांट्यावरला,
सदाचा ताजा । कुणि गुलाब नेला माझा !
थरथर नाचत हृदयामंवतीं,
लवी नजरहि पायावरती,
खिळवी जागिंच भारुनि मज ती,
कुठें ग आज । चोरट्या मनाची लाज !
रात्रीं होतें अजाण पोर,
एका रात्रींत झालें थोर,
माझ्या बाळपणाचे चोर,
बाई फार, नवलाचे जादूगार !
हांसत हांसत मंदिरिं आले,
बाई मी तर फत्तर झालें,
हृदयावांचुन कांहिं न हाले,
चाले श्वास । हाल्वी फार हृदयास !
गालिं, नयनीं ओठांवरतीं,
नाचे मुक्या प्रीतिची भरती,
चमकति घर्मबिंदु तनुभंवतीं
नव लाखाची । लाज ती नव्या नवसाची !
लबाड हासूं फसवें तसलें,
माझ्या ओठावरतीं बसलें,
बाई तयानेंच मी फसलें,
कसें हें झालें । मी बाळपणाला मुकलें ।
नयनीं किरणांचे जे भाले,
मृदु परि तेही निर्दय झाले,
लागुनि जखमा गालहि न्हाले,
झाले लाल । लज्जेचा प्रातःकाल !
अघटित जादू केली बाई,
त्यांचे त्यासहि भान न राही,
बघतां बघतां होउनि जाई,
कांहींच्या कांही । मज माझें कळलें नाहीं !

ओठा ओठ लागल्या काळीं,
मिटल्या नयनीं रात्र पसरली,
फुलत्या वदनीं सकाळ आली,
रंगली फार। गालावर ऐन दुपार !

२. निर्दय देवीस—

हृदयशारदे ! निर्दय देवी ! ठेव मनीं खोल,
प्रेमशरांनीं मरणाराचे शेवटचे बोल !
नवकवनाची अफू खाऊनी गुंगच होतों मी,
बेसावध टाकिलास वेड्या प्रेमाच्या होमीं !
मारिलेंस जैं निजनयनांच्या किरणांचे भाले,
गुंग मनाला चैतन्याचें सौख्य तदा झालें !
ठाऊक नव्हतें परि मज जेव्हां भेदित तीं गेलीं
टोकें त्याचीं प्रेमविषांनीं होतीं भिजलेलीं !
झरत चाललें हृदय सारखे प्रेमविषें न्हालें,
नैराश्याचा धक्का बसुनी गमे ठार झालें !
नयनशरांनीं मम हृदयाच्या बघ चिंध्या केल्या,
फुटलें तुटलें सांधितात त्या आशाही मेल्या !
चिरविरहाच्या तापानें त्या विलयातें नेल्या,
रंगच्छायाही चिंध्यांच्या पार उडुनि गेल्या !
मेलेल्यां आशांची फासुनि राखचि निर्जीव !
पांघरतो हृदयाच्या चिंध्या हा वेडा जीव !
बडबडतो वाटेल मना तें प्रेमविषें भकला,
ज्या त्या वस्तूमध्यें दिससी वेड्या डोळ्याला !
या वेड्याला हासतात बघ हे सारे लोक
हंसोत– परि मग का उरतो हा वेड्या मनिं शोक ?
निर्दय देवी, हाय ! किती हा केला अविचार,
हृदयमंदिरा मोडूनि केलें प्रेमाला ठार !
नयनशरांनीं करितां तुकडे माझ्या प्रेमाचे,
अश्रुरूप नयनांतुनि वाहे रक्त पहा त्याचें !
प्रेमविषानें रक्त करपतां निःश्वासासरशीं
धगधगीत ही वाफ पसरते मिळते वाऱ्याशीं !

त्या वाऱ्यानें मोवतालचें जग हें होरपळे,
सजीव होतें काल मला तें जळे आज सगळें !
हे राखेचें चित्र जसेंच्या तसें पहा त्याचें !
वस्तुवस्तुला ग्याया बघतां राख करीं नाचे !
निर्दय देवी, हसतां हसतां केलें हें काय ?
आग लागली जगास माझ्या, विश्व लया जाय !
कोमल बाला सौंदर्याची प्रेमाची खाण,
जाणुनि हृदयीं झेलुनि घे मी तुझे नयनबाण !
प्रेमयाचना करितां देशी हातहि हातांत
गमलें नव्हतें की तूं करशिल असा पुढें घात !
त्या हृदयाची माती माती यापरि केलीस,
कल्पनेंत मम शिरुन आतां पाहत बसलीस !
कां हंससी निर्दये, दावुनी प्रीति अशी फसवी ?
तव शरिं मरणारांची तळमळ काय तुला हंसवी ?
करकमळांचीं दळें दळांशीं लावितांच अंग,
सर्वस्वाच्या भेटीचा तो गमे पूर्वरंग !
प्रेमांधाचा परि विश्वासें धरुनि असा हात,
टाकिलेंस त्या नैराश्याच्या भयाण डोहांत !
प्रेमयाचना परिसुनि हंसलिस गालींच्या गालीं
हृदयाच्या रंगाची आली गालावर लाली !
भावि भाग्यसूर्याची माझ्या उषाच ती गमली,
हाय ! निराशारात्रीची या परि संध्या ठरली !
भविष्यकाळामधून माझ्या दिवस पळालाच !
काळ्या रात्रीं काळोखाचा अखंड हा नाच !
आग लागतां हृदया निघती निःश्वासें ज्वाला,
तापुनि लागे काळोखाचा रस उकळायाला !
जळत्या जगांतलीं प्रेमाचीं भूतें हीं सारीं,
रसरसलेल्या काळोखामधि भाजतात भारी !
ऐक तयाच्या अखेरच्या या भयाण किंकाळ्या,
बहिरें होतें अंगचि सारें बसती कानठळ्या !
प्रेमहि माझें या हृदयींच्या स्मशानांत जळतां,
हें स्मरणाचें भूत नाचतें त्या जागीं आतां !

झाला माझ्या भोंवतालच्या विश्वाचा जाळ,
त्या राखेवर नाचाया मी झालों वेताळ !
जिथें जिथें ही पडते माझी सैतानी दृष्टि,
कांहींच्या कांहीच होतसे तिथें तिथें सृष्टि !
रम्य चंद्रिका करपुनि होतो तिचाहि काळोख,
आनंदाच्या या नजरेनें होत महाशोक !
जळती तारा, फुलें करपतीं, काय कथा यांची ?
निष्प्रेमानें राख जाहली श्रीजगदीशाची !
आग भडकतां हृदयामधला ईश्वरही मेला,
निर्दय देवी, खेळ एवढा पहा तूंच केला !
ही हृदयाची आग भडकती जरा विझायाला,
अश्रुजळांचा समुद्र गिळिला तरी न तो पुरला !
तुझा पूर्ण मुखचंद्र पाहुनी हृदयसागराला,
पूर्णानंदें भरती आली पूर्ण पौर्णिमेला !
परि तो निर्दय चंद्र न आतां करित रम्य हास्या,
नैराश्याच्या काळोखाची आज अमावास्या !
खळबळुनी हें आलें दुप्पट उधाण दरियाला,
चिरविरहाचा वडवानलही आज उचंबळला !
काळोखाचा अफाट दरिया आकाशीं वरतीं,
काळ्या पाण्याचा हा दरिया हृदयाच्या भंवतीं !
इकडे दरिया— तिकडे दरिया; कोण मूळ काया
कोण कुणाची छाया; खेळे लपंडाव माया !
विरहाग्नीनें हीं पाण्याचीं विश्वें सळसळतीं,
दोन्ही दरियांमधल्या लाटा धडाधडा जळती !
एकमेकिंवर आदळतांना किंवा जळतांना,
त्या लाटांतुनि भीषणतेच्या निघती या ताना !
झंझावातावरतीं त्यांचा नाद असा नाचे
सुरामागुनी सूर उसळती माझ्या कवनाचे !
असलीं कवनें गातां गातां निराशांधकारीं,
अर्धामेला येऊन पडलों मरणाच्या दारीं !
तुझा विषारी घाव यापरी अपुर्ताच राही,
सुख तर नाहीं— नसो, परी हा जीवहि नच जाई !

टाक विषारी नजर जराशी पुन्हां एकदांच–
पुन्हां एकदां–पुन्हां विषारी बाणांचा नाच !
काळमुखीं दे लोटुनि ! झालों बहु कासावीस !
हीच विनवणी तुझ्यासारख्या निर्दय देवीस !
तुफान दरिया असा तयाच्या हल्कल्लोळांत,
मरणकाळचीं गाणीं असलीं बसलों मी गात !
ये; कां लाविसि उशिर; एकदां करि पुरता ठार !
निज भक्ताच्या हत्येची तर हौस तुला फार !

## ३. शेवटची कविता

[ शेवटची कविता ! माझी शेवटची कविता ! तिला प्रस्तावना काय लिहूं ? कविता ! उद्यांची अनाथ कवितादेवी— देवि, तूंच काय लिहावयाचें तें लिही ! ]

शांत शांत दशदिशा, शांतवा तुमचे दशभाग,
शांत जरा व्हा सुरासुरांनो, सकळ महाभाग !
अवकाशांतिल वायुसागरा, लाटा करि बंद,
जलचक्रा, तव फिरत्या झुळुकी ठेव जरा बंद !
देवदूत हो पाउल वाजवुं नका, व्हाच शांत !
भूतांनो, क्षण बंद करा हा तुमचा आकांत !
प्रकाशांतल्या अणुरेणुंनो, बंद करा नाच !
काळोखाच्या रजःकणांनो करा सहन जाच !
नका सळसळूं देऊं तरु हो, तुमच्या पानांना,
श्वासहि सोडुं न द्या लतिकांनो, कोमल कुसुमांना !
फुलत्या कलिकांनो, ठेवा ग स्तब्ध हृदयपात्र,
अर्धीं उघडीं तोंडें तशींच ठेवा क्षणमात्र !
नक्षत्रांनो, चमकेची ही नकोच चाहूल,
काळा, पळत्या क्षणाक्षणाचें थांबवि पाऊल !
हृदया, धडधड करिशी कां रे, तूंच कसें फिरशा ?
कोंड झालि तरि, जीवा धडपड करी मुळीं न अशी !
महाभाग हो, या आशेचा मानुं नका राग,
आशा नच ही परी करपल्या आशेची आग !

स्वप्नामधल्या स्वप्नांतहि मज येत काळझोंप,
म्हणुनी हृदयांतुनी उपटितो नवलाचें रोप !
राग नका धरूं हतभाग्याचा ऐकुनि आकांत,
शांत शांत परि जिकडे तिकडे व्हा सारें शांत !
वाहूं द्या हा मम कवितेचा प्रवाह शेवटचा,
ऐकूं द्या हा तिजला माझा निरोप शेवटचा !
ऐकिलेंस ना— देवि, काय हें, कसला हा पूर ?
रडशी कां वद, तुझें हृदयहा झालें का चूर ?
होय देवते, कविते, करितों मीच तुझा घात,
हा मातेच्या पहा गळ्यावर बाळाचा हात !
सावध सावध देवि शारदे, क्षणभर दे कान,
चराचरांनो, निरोप ऐका, व्हाच सावधान !
गा विहगांनो, कवीश्वरांनो, गगनगायकांनो !
हंसा मुलांनो, हंसा फुलांनो, हंसा तारकांनो !
ऐकत नाहीं मी त्या तुमच्या मादक मुरलीला,
पाहत नाहीं सौंदर्याच्या मोहकतर लीला !
कुंदलते, करि कुंदकळ्यांनीं हंसुनी उपहास,
गड्या गुलाबा, झाडावरतिंच हवा तसा हांस !
मार भरारी गरुडा, गगनीं; मी येतच नाहीं,
हे प्रतिभेचे पंख कापितों माझ्या हातांहीं !
चमक सारखी इकडुन तिकडे तूं चंचल बिजली,
स्थिरावली कल्पना जागच्या जागीं ती थिजली !
फूलपांखरा, तुझी तरळता फुलांफुलांवरतीं—
नाचूं दे; परि तरळ मना मी खिळिलें जड जगतीं !
खुशाल आम्रा, मज मदनाचे पुष्पबाण मार,
ही सोनेरी ढाल रुप्याची हातीं तरवार !
आईच्या मांडीवर पाहुनि मेलेलें मूल,
पडावयाची नाहीं आतां मम चित्तां भूल !
नवयुवतींच्या नेत्रकिरणिं कुणि जरि केली जाळीं,
तोडिन तरि मी क्षणार्धांत तीं सारीं या काळीं !
राधारमणा श्रीकृष्णा, तूं बंद करी मुरली,
मनिंची मनांत जिरविन इच्छा जी उरलीसुरली !

कलगीसाठीं कुणी धांवला जरी तुरेवाला,
लागाबांधा तुटला आतां, सलाम हा त्याला !
मज रिझवाया कालिदास वा येऊं द्या बाण,
नीरसतेचें चिलखत करि मज अभेद्य पाषाण

( अपूर्ण )

## ४. जुन्या प्रेमास

प्रेमाचीं भाषणें परिसतां किंवा वदतां तद्विषयीं,
तुझी स्मृति क्षणमात्र होत मज, लहरी लाजवि जी हृदयीं !
तुटला आतां ऋणानुबंधचि—— कुणी कुणाचें जरि नाहीं,
तरी न विसरे जीव— आपुलें गूढ असे जें मनि कांहीं !
रविकिरणानें कमल विकसलें— कधीं कुठें तरि केव्हांही !
किरण मरे तें–कमलहि नाहीं– परि झालों तें नच "नाहीं !"
जें झालें तें चित्रगुप्तही लिहून ठेवी स्वर्गात,
स्वच्छंदाची जी देवी ती जलवंती ही तें गात !
नवीं बंधनें तुला लाभलीं— आणि लाभतिल तशीं मला,
परंतु गेली पहिली प्रीति— प्रीती प्रतिपद् चंद्रकला !
व्यवहाराची बुद्धि मन्मना तुजपासुनि ओढुनि नेई,
मदिरेची ही भ्रष्ट दिव्यता स्वतंत्रता मजला देई !
प्रेमाचें तें चरित्र जेव्हां आम्ही चालू केलें,
आम्ही रडलों— जग हसलें– परि जें झालें तें झालें !

## ५. हाय हाय !

( 'वाग्वैजयंती' चतुर्थावृत्ति—पान २२३ वर गोविंदाग्रजांची 'हाय हाय !' ही कविता छापलेली आहे. तिच्यांत चोवीस कडवीं आहेत. तथापि मूळ हस्तलिखितामध्यें अधिक कडवीं आहेत. तीं उरलेलीं अप्रकाशित कडवीं येथे दिलीं आहेत. हीं कडवीं मूळ प्रकाशित कवितेबरोबरच वाचावींत म्हणजे अधिक अर्थबोध होईल. )

इथें टाकुनी मला नजरही चहूंकडे फिरते,
दिसतें तितकें मला मिळेना, नको तेंच मिळतें !
निःश्वासाचें जीवन सारें; आशेची दृष्टि,
हाय हाय, ही येत कपाळीं मनांतली सृष्टि !
मला नकोसा मी, तो असतो नित्य मला मीच,
क्षणोक्षणीं उंचावत नभ कीं भूमि होत नीच !
देवा देवा, खेळ असा हा मांडिलास काय,
मनांतला हा कैदी करितो सदा हाय हाय !
पळत्यासह कधिं पळतें मन कधिं उडत्यासह उडतें,
कधि आकाशामागें दडतें, सागरिं कधि बुडतें !
कोण तयाला तिथून मागें ओढुनि आणीत ?
पुन्हां कोंडिते या देहाच्या असल्या घाणींत ?
कीं वाऱ्याच्या दोऱ्यासंगें वरतीं उडवाया,
जीव मनाचा पतंग उडवी फिरुनी ओढाया !
तोड तोड त्या दोऱ्या देवा, मन तरि जाऊं दे,
जीव मरूं दे, देह जळूं दे, कांहीं होऊं दे !
एका अंशाची तरि आशा पूर्ण करायास,
उरल्या सुरल्या माझ्या देवा, करि सत्यानाश !
फिरता फिरता, पुरा लहरिचा, स्वैर विश्वगामी,
जाग्या स्वप्नामधला माझा दाखवि मजला मी !
सारें विश्व हें टाक जाळुनी, स्वप्नसृष्टि देईं,
मिटल्या डोळ्या दिसे तेंच दे; दिसणारें घेईं !
वस्तुवस्तुचा नाद निघुनी वाऱ्यावर पळतो,
पळतां पळतां दूरदूर मग कुणीकडे जातो,
अट्टाहासें ओरडतां मज विरुन जाऊं दे,
नादरूप मज त्या नादासह झुकून वाहूं दे,
रवितापानें जलबिंदूंची विरल हवा होतें,
कुणीकडे ती पळते याचा विचार मन करितें !
संतापानें या देहाचें अश्रुच होऊं दे,
अश्रुजलाच्या हवेंत मजला फिरून येऊं दे !
बघतां वारा, बघतां तारा, हें सारें कांहीं
या माझ्या देहाचें कांहीं कसें होत नाहीं !

कराच मजला महाकवीची कल्पनाच अथवा,
त्याच्या प्रतिभेवरतीं मजला दे टाकुनी देवा!
दुर्दैव्याचें सुदैव करि, जें पळे सदा दूर,
निराश मनिंचें स्वप्न मला वा माझिच हुरहूर!
भाव कुणाचा, करि मज अथवा कोणाची आशा
उंच उंच ती जाइल तोडुनि बंधाच्या पाशा!
कुणा मुलाच्या मनांतली मज करि वा जिज्ञासा,
ज्या त्या वस्तूवर खेळूं दे मायामय भासा!
ज्या रमणीचा नाथ न कळतां चिरनष्टचि झाला,
तिच्या मनाची प्रेमाशा तरि करि देवा मजला!
अशक्य असतें, अतर्क्य असतें, अनंत जें असतें,
त्याच्या त्याच्या पलीकडे ही ती आशा जाते!
त्या आशेच्या रूपानें तरि फिरून येईन,
अमर्याद विश्वाला वळसा घालुनि येईन!
काय दया तुज नाहीं किंवा असस फार दूर!
शक्ति धाडिसी तिचा होतसे म्हणूनी कीं चूर!
शक्ति मला धाडिशी दुरूनी ती विरुनी जाते,
माझ्या जवळी येतां येतां इच्छामय होते!
ती इच्छा मग मनीं सारखी लावी हुरहूर,
त्या शक्तीचा जळत्या हृदयीं कीं होई धूर!

शक्तिहीनता दिली का अशी, असल्या इच्छा का?
अनोळखीला उच्छृंखल मन मारित कां हाका?
बघुनि बिजेच्या नव्या बांकड्या अंधुक चंद्राला,
वाटे त्याची करून द्यावी होडी जीवाला!
बसुन तीवर टाकुनि मागें भविष्यकाळाला
दिगंतिं जें जें, अनंत जें जें, धुंडाळावें त्याला!

## ६. कथाशेष

[ या नांवाचें एक प्रेमनिराशापूर्ण खंडकाव्य लिहिण्याचें गडकऱ्यांच्या मनांत असावें. ]

## उपोद्घात

देहाभंवतीं अंधाराची अर्धी काळी छाया,
व्यापि जिवाला आठवणीची अंधुक उदास माया !
उदास संध्याकाळ; भोवतीं वारा वाहे कुंद,
चढे शाहिरी शराब; झाला ' गोविंदाग्रज ' धुंद !
एक मनाच्या मरजीसाठीं प्रीतीचा इतिहास
लिहून केला, रसिक वाचका, खुशाल त्याला हांस !
प्रेमकथा ही ऐकायाला नको रिकामा कान,
ज्याची त्याला दस लाखांची मुक्या मनाची तान !

## संदिग्ध व्यक्ति

पुढें लकाकत वाजत गाजत आला पाउसकाळ,
हिरवळले त्या काळीं सगळे मिरजमळ्याचे माळ !
नाच परोपरि करि विजलीची वर लखलखती घाई,
भीतीनें डोळ्यांत तुझ्याही खेळे ती चपळाई !

शीतल जलकण तनुवरि उडवी शीतवात निजरंग,
किंचित् भिजलीं, गारठलीं हीं अपुलीं विव्हळ अंगें
निकट, निकटतर सरलीं—न कळत अंतर विलया गेलें.
उष्ण श्वासें परस्परांचें शीत निवारण केलें !
स्त्रीसहजा संकोचवृत्ति ही कोमल तितकी क्रूर,
प्रसंग साधुनि करी विरस मग लावि पुढें हुरहुर !
चुकल्या चित्ता चटपट लागे, हृदय संशयें हालें,
सीमारेषा निरखिल्या न तों इंद्रचाप मावळलें !
पुन्हा मनाच्या जगांत आली कितीकदा ती वेळ,
एकसारखा करी आपुला झाला तितका खेळ !
झालें असतें काय दुजा क्षणीं नव त्याची जाणीव,
अवघड कोडें हुडकायातें करित धडपड जीव !
क्षणचि आणखी एक, शब्द वा एक, एक दृक्पात,
जरी लाभतां तरि हा चुकता असा मनाचा घात !

उंच पठारावरी धांवतां फूलपांखरामागें,
हात सरकला पुढें—अरेरे—पंखहि हाता लागे.
तोंच तेथुनि कडा लागला—तें सरतें पाऊल,
वरुनि तरळतें फूलपाखरूं पाडी दृष्टिला भूल,
अधांतरीं तें भिरभिरतें मग—अंतर नसता फार,
जडावलेल्या जिवास भासे परि ते नानाकार !
निःश्वासाच्या लहरीवरतीं दूर तरंगत जाई,
उदास ओसाडीच पुढें ती वरतीं खालीं पाही !

(अपूर्ण)

## ७. अनंताचे सूर

गाण्याचा पाहुनि जलसा
मन रमलें नाहीं सहसा !
गोड सुरावट गायक ते,
गातां डुलती आयकते;
तालसुरांहीं ती मिळणी,
गुंगुनिया गेले कोणी;
परंतु माझें मन न वळे
कां माझें मजला न कळे !
सातसूर मिसळुनि नादीं,
तानांची झाली गरदी
भिन्नत्वा येई ऊत,
नादाचें नाचें भूत !

* * *

जनसंमर्दा पहावया,
गेलों मी मज विसराया,
भिन्न देश, भाषा भिन्न
कृत्रिमेंच सृष्टी छिन्न,
कंटाळा आला पुरता,
तेथुनिही झालों सरता

(अपूर्ण)

## ८. काव्याबद्दल

धनिक जनांच्या तनुवरि रत्नें नुसतीं बसतात
कविंच्या हृदयीं प्रभा पाहुनी परि तीं हंसतात !

* * *

ही अनवद्या, देवी आद्या हीच अनंता ही,
चिरकालाची समकाला ही स्वसा काय नाहीं ?
वाहत जें जें पात्र सारखें एक अनंताचें,
काल्कवन हें दोरंगाचें दोन ओघ त्याचे !
त्रिकाळ यमुना कृष्ण जलाची धवल कवनगंगा,
उधळित जाती एक सारख्या हृत्तरंगरंगा !
ब्रह्मतटावर नौका एकचि ही धडकायाची,
चिरंतनावर ध्वजा एवढी ही फडकायाची !

( अपूर्ण )

## ९. एका मित्रास

स्वस्त तुम्हांतें, मित्रा,–वदते सहज अशी वाचा—
द्या मज हा अधिकार तुम्हांला ' मित्र ' म्हणायाचा *
मित्र कृपेनें मित्रलाभ हा झाला मज तुमचा
किती वाढला तुमचा परिचय एकचि दिवसाचा !
थोर मनाशीं क्षणमात्राचा परिचय वर्षांचा
क्षण सहवासें ऋणानुबंधहि जमतो कायमचा !
अल्पकाळ जल वर्षुनि समयीं मेघ धन्य होती,
आणि आपुलें नांव करिति ना भूभागावरतीं !

( अपूर्ण )

* काशिनाथ रघुनाथ मित्र

## १० सोडुनि गेला प्रियजनका

सोडुनि गेला प्रियजनका, का प्रियतम बाळेला ?
भलत्या काळीं मुहूर्त निश्चय कां असला केला ?

किति हौसेनें विवाह कौतुक केलें हो माझें,
—आणि–पुढें परि चिंतनिंही हें वेडें मन लाजे !
शुभलग्नाचें शुभतर फल नच पाहिलेंत ताता,
कोणि करावें नव्या जिवाचें नव कौतुक आतां ?
करील त्याचे लाड बहुपरी माता–हा हाय—
मूर्ति परी ती दिसतां आतां हृदयिं बसे घाय !
शुभ सर्वस्वा मंगलधात्री सौभाग्याच्या जी,
—काय वदावें, कसें वदावें—केवि दिसत आजी !

( अपूर्ण )

## ११. अंतकाळची याचना

[ चाल— आम्रमंजरी तुला ]

प्रार्थितसे एवढें गडे ग ! पाहि जरा मजकडे गडे ग !
मृत्युलोकिंची वसती सरली
जीवन आशा वाटे गेली !
मर्यादेपलिकडे गडे ग !
इहलोका जरि होत पारखा,
तरि भेटीस्तव तुझ्या सारखा,
जीव पहा धडपडे ग !

( अपूर्ण )

## १२. विद्ध मृग

संगीत व्याधा, सुखद हें तव यापरी नच थांबवी,
या रसीं मरु दे मला रसिकत्व पूर्णचि दाखवी !

( अपूर्ण )

## १३. चुंबन

गाल रंगले चुंबनिं परि मुख सखये, होत मलूल
खुलवि त्याच किरणानें करपत जणुं जाईचें फूल !

( अपूर्ण )

# पहिल्या ओळींची सूची


| | पृष्ठ |
|---|---|
| अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी | ८९१ |
| अनंत नभ हें वरी पसरलें | ८७५ |
| अखेर झाली आतां घे हा प्रणाम जातां जातां | ८८६ |
| अंधपणें मी पाहत होतों माझ्या प्रेमाची मूर्ति | ८८९ |
| अभिनंदन करितों प्रांजलि | ८१० |
| अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळें गाय | ९७० |
| अवेळ तरिही बोल कोकिळे, अवेळ तरिही बोल ! | ९०५ |
| असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं | ८९४ |
| अहा ! उगवला पहा अरुण हा | ८५५ |
| आठवतो का सांग सखे तो काळ विवाहाचा ? | ८११ |
| आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगतीं राहुनिया ? | १०११ |
| आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो न कळे | ९०४ |
| उडुनि जा स्वैर। काजव्या चमक बाहेर | ९९६ |
| उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून | ९६८ |
| करमत नव्हतें म्हणुनि एकदा | ८४० |
| करितां कार्या । चुकचुकतें पाल ही वाया | ८१३ |
| काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रिचा शेवट | ९०१ |
| कांहीं गोड फुलें सदा विहरतीं | ८१६ |
| कांहि लिहावें तुझ्यासाठीं हा विचार मनिं धरुनी | ९५८ |
| कुठल्याशा जागीं देख। मैदान मोकळें एक । पसरलें ॥ | ८८२ |
| कुणि ऐका हो ऐका एकच वेळ | १०१२ |
| कोटें असे सकलपंडितमुख्य भोज | ८०२ |
| कोणी एक कवि स्वकीय हृदया घेऊन आहिंडत | ९७४ |
| कोवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना | ८६८ |
| कौरवपांडवसंगर तांडव द्वापरकाळीं होय अती | ९७८ |
| खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी | ९६३ |
| गा रे गा रे गाच जरा | ९५५ |

पृष्ठ

गिरिशिखरें खरतांना त्यांतुनि कण वाळूचे पडतात ८८५
गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ? ९७२
घास, घे रे तान्ह्या बाळा १००१
घुबडा, बोल रे घू घू ९२९
घुमे नाद तो सुंदरीच्या करीं १०२१
चल, ऊठ, कल्पने, जा बघ पाहूं १०२१
चल, सख्या जिवा रे, पुन्हां घरीं ८९२
चला आज हा आला दसरा ! ८४९
चला चलारे चला चला, विसरुनि विश्वा चला चला ९१४
चष्मा लावुनि डोळ्यां ८००
चाल्तसे सारखीच ही मुशाफरी ८७१
चित्तकोकिला ! प्रेमा गाया जगद्गायनाला ८३२
चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी ८८८
जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले ! ८०८
जगद्गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ९५१
जबरदस्तिचा हुकूम माझा ऐकुनि काळा थांब जरा १०२०
जसें पाहिलें त्वा परा जीवजाता १०२२
जादूची माझी बाग तींत फुलें जागोजाग ९१८
जिवलग हृदया ! मूढवृत्ति ही धारण केली कां असली ! ८८०
जी दुःखीकष्टी जीवा दुसरी माता ९७६
जें जें या समयीं मनांत ७९९
जे जे रोग मनास होति, हृदया संताप जो जाळतो ८७६
जें मनास शिवलें नाहीं ८१४
जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मी मांडिला १००४
जेव्हां धरी निजनिभा रवि आवरोनी १००९
ज्याच्या बोधसुधेनें पावन झालें मदीय हीन मन ९६९
ज्येष्ठ बंधो ! साष्टांग नमस्कार ८०४
डोळा साचा, हा मोरपिसाऱ्यावरचा १००१
डोळ्यांनीं बघतों, ध्वनीं परिसतों कानीं ८७८
तुज बघुनी वाटतें कीं ८०३
तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां ८८८
थांब जरा, तारके ! जरा तरि थांब ८७७

पृष्ठ
थांब जरासा बाळ १००४
दयाघना ! विनंति करित मन तुज हें ८६५
दिक्कालांनीं, अज्ञातांनीं, बांधितांच पाय ९६०
दिसे मजला हें पुढें गोड मूल १०१५
दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी ८५४
देवी दर्शनदुर्लभ झाली ८७६
धन्य ! धन्य ! बा, तव सुयशाची होता जाणीव ८४१
धन्य पंढरी धन्य भीवरा ८०३
धवाननालोकनचुंबनातें ९६८
नको तपेली फुटकी असली ८७२
नमो पांडुरंगा ! नमस्ते श्रीरंगा ९४९
नमोऽस्तु ते ! धन्य एक सकल जगीं तूंच ८५४
नवरात्राची रात्र संपली सण आला दसरा १०१७
नाचतां मोर, नाचते पहा लांडोर ९१७
नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा ८४४
नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता ८७७
नाहीं राहत वास लेश कुसुमीं कोमेजतां तें त्वरें ९०१
निजलें जग, कां आतां इतक्या तारा ८९३
नीज गुणी बाळ झणीं ८५८
पंख उभारुनि जरा भरारा ९५९
पदर आणिले तुझे कांहीं तूं ९००
पन्हाळगडचा पठार सगळा घालुनि पायाखालीं ८६३
पहा फडकला पूर्व दिशेवर रक्तरंग कसला ! ९५३
पाहसि आतां अंत असा कां ! ८७९
पिठांत पाणी घालुनि केलें दूध भलें निष्ठुर काळें ८८६
पूर सरितेला फिरुनि फिरुनि येत १०१८
प्रणयदर्शना जातां मित्रा, न करी उपहासा ९११
प्रेमा ! ऊठ—चल उघड झांकली मूठ ! ९१३
प्रेमाचे ते जीव, दयाळा आज कुठें दाखीव ९०२
प्रेमें जीं कुसुमें दिलींस मजला ८७८
बाळ कुणी, संध्याकाळीं रमे गुणी ९६२
बोल बोलतों सल्गीचे, गाणें माझें कल्गीचें ९३८

पृष्ठ


भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ८५९
भेट जहाली पहिल्या दिवशीं ९३७
मनांत माझ्या गुणगुणतें हें रसिका कोणी कांहीं ९८८
मंगलदेशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ९४५
मार भरारी, चल तोड बंधनें सारीं १००७
मैना भटके बनांत, वेडा राघू झुरतो मनांत ९७५
यंत्रबंधनीं तिर्यंजलातें अवरोधुनि यावरी ९७३
यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आतांप्रती नीटसें ८९९
ये, ये, ये, आतां ये कविते ९६४
रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिम दिग्भागीं ८१२
रचिसि काव्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ९६७
रमणि ! स्मरणीं आमरणाचि या हृदयपटावर ठसा ८७१
रानोमाळ, आंधळ्यांची चाले माळ ८१६
वंदन नाट्यमिलिंदा, गोविंदा, तव पदारविंदांना ९९५
वाजिव रे बाळा ! वेल्हाळा ! ८४४
वाटे स्मशान शांतिस्थान ९२१
विचार करितां तुजविषयीं गुंग बिचारा, मन होई १०००
विरहोत्सुक सागर झाला ८००
वेडा कोणी जगास सोडुनि पळे ८२२
शब्दांमध्यें, अर्थामध्यें, प्रासामध्यें काव्य नसे ९७४
शहाजहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची ८९४
शांत शांत अति बाह्यसृष्टि जरि चोहींकडे शांत ९०८
शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें १००९
श्रीमन्मंगल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा ९९८
श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें ८९६
सख्या सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा ८९०
संगम तीन्ही काळाचा प्रेमळ घडवी साचा १०१३
संगीताची करी योजना विधि का जगतींत ९७४
संध्याकाळ सदा उदास करतो माझ्या अभागी मना १०११
संध्यापट गगनीं पसरी ८६५
सन्मानार्थ सभेंत हार कुणिसा कंठीं तुझ्या घातिला ९९९
समशेर दुधारी दिसतां ! कां भीसी ऐसा बा रे ? ९७५

| | पृष्ठ |
|---|---|
| सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान | ८९७ |
| साध्य हि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे | १००२ |
| साऱ्या त्या कविता तशाच असती | ८९८ |
| सुखदुःखाच्या द्वैतामधुनी दुःख सदा वगळावें | ९०४ |
| हा असे खेळ दैवाचा, अपराध यांत कोणाचा ? | १०१७ |
| हा हार शुभ्र किति आई | ८०१ |
| ही एक आस मनिं उरलि | ८२४ |
| ही सरती संध्या या सालाची जमली | ९७८ |
| हृदयशारदे ! या कवनाचे बोल एक माझे ! | ८२९ |
| हें कोण बोललें बोला ? राजहंस माझा निजला | ८१७ |
| होता एक जुनाट झाड पडका | ८६० |
| क्षणभर वेड्या प्रेमा थांब | ८०७ |
| क्षमा करी, जिवलगे ! क्षमा करि ! | ८८१ |

## कवितांची सूची

| | |
|---|---|
| अनामिकाचे अभंग | ९४८ |
| अंधाला दृष्टिलाभ | ८८९ |
| अपराध यांत कोणाचा ? | १०१७ |
| अभिनंदनपर वर्धापन | ८४१ |
| अरुण | ८५५ |
| अरुण ( दुसरा ) | ९५३ |
| अल्लड प्रेमास | ८०७ |
| अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस | ९०५ |
| आंधळ्यांची माळ | ८१६ |
| इच्छा, उपभोग व विषय | ८९१ |
| एकच मागणें | ९०४ |
| एक शंका | ९०१ |
| एक समस्या | ८९४ |
| एका जुन्या श्लोकाची आठवण | ८७८ |

पृष्ठ


| | |
|---|---|
| एका तरुणीस...पाहून | ९६८ |
| एका बाल-कवीस | ९५५ |
| एका शब्दासाठीं विनंति | ८८१ |
| एखाद्याचें नशीब | ८१६ |
| ओसाड आडांतील एकच फूल | ८६० |
| कधीं ? | ८८८ |
| कलगीचें गाणें | ९३८ |
| कवि आणि कैदी | १००७ |
| कवितेसाठीं धडपड | ९५८ |
| कवीचा वधूवरांस आहेर | ९९८ |
| कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ? | ९६२ |
| काय करावें ? | ९६८ |
| कारंजाचें चढतें पाणी | ९७३ |
| काव्याची व्याख्या | ९७४ |
| काळ | ८०२ |
| काळाला वजावणें | १०२० |
| कांहीं इंग्रजी कविता वाचून | ८८६ |
| कृष्णाकांठीं कुंडल | ९८८ |
| केशवसुत मेले ? | ८०८ |
| केशवसुतांची कविता वाचून | १००९ |
| कोणी कोणास तरी | ८०३ |
| गरिबीचें गाणें | १०१२ |
| गाणें चांगलें कसें असावें ? | ९७४ |
| गीतविरक्ति | ८७६ |
| गुलाबाच्या पाकळ्या | ९७५ |
| गुलाबी कोडें | ८१२ |
| गेले गोपाळकृष्ण | १०२१ |
| गोड निराशा | ९१८ |
| गोफ | ९०० |
| घरांत बसलेल्या कावळ्यास— | ९९६ |
| घास | १००१ |
| घुंगुरवाळा | ८४४ |

| | पृष्ठ |
|---|---|
| घुबडास | ९२८ |
| चिन्तातुर जन्तु | ८९३ |
| चिमुकलीच कविता | ८४४ |
| चेंडू | ९६३ |
| जगाचें गाणें | ८५४ |
| जिवास बोध | १०२२ |
| जीवितास— | १०१० |
| जुन्या कवितांची आठवण | ८९८ |
| तडजोड | ७९९ |
| ती कोण ! | ८५४ |
| तीन तरी | ८९२ |
| त्याच तारकेस याचना | ८७७ |
| दसरा | ८४९ |
| दिवाळी | ९७६ |
| ' दिव्य प्रेमाची जाति ' | ८६५ |
| दुर्दर्शन | ८७७ |
| देवल | ९९५ |
| दैवाची निर्दयता | ८९६ |
| नट मित्रास पत्र | ८०४ |
| नदीस पूर आलेला पाहून | ८०० |
| निजलेल्या बालकवीस— | ९५१ |
| निद्रागीत | ८५८ |
| निर्दय बालेस | ८८६ |
| निर्वाणीची विनवणी | ८७९ |
| परमाणूंचें कार्यमाहात्म्य | ८८५ |
| पहिलें चुंबन | ८१४ |
| पाखरास— | ९५९ |
| पांच देवींचा पाळणा | ९७२ |
| पानपतचा फटका | ९७८ |
| पुत्रशोक | १०१८ |
| पुनर्जात प्रेमास | ९१३ |
| पुनर्विकसन | ८६७ |

| | पृष्ठ |
| --- | --- |
| प्रासंगिक–किंवा अप्रासंगिकच | ९९९ |
| प्रेमकाळ | १०१३ |
| प्रेम आणि मरण | ८८१ |
| प्रेमपाठ | ८३२ |
| प्रेमशोधन | ९७४ |
| प्रेमाखातर | ९११ |
| प्रेमाचा प्रलयकाळ | ९१४ |
| प्रेमाची प्रामाणिकता | ८९० |
| फणसाचें पान | ८९७ |
| फुटकी तपेली | ८७२ |
| फुलें वेचिलींप ण | ८६३ |
| फूल ना फुलाची पाकळी | ८९४ |
| बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास | १००४ |
| भयाण एकान्त | ९०८ |
| भीमकचाळा | ८५९ |
| मनांतली दिवसरात्र | ८७५ |
| मनांतली पाल | ८१३ |
| मागें पाहणें | ८७१ |
| माझा मृत्युलेख | ८९९ |
| माझी पहिली कविता | ८०० |
| मुरली | ८२४ |
| मोगऱ्याचा हार | ८०१ |
| मोरपिसावरचा डोळा | १००१ |
| ये ये ये कविते ! | ९६४ |
| रांगोळी घातलेली पाहून— | १०२२ |
| राजहंस माझा निजला ! | ८१७ |
| रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास | १००९ |
| लक्ष्मीपूजन | ९७८ |
| लांडोर | ९१७ |
| लीला | १०१५ |
| लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद | ९७० |
| वाचकांस विज्ञापन | ७९९. |

पृष्ठ


| | |
|---|---|
| विचार | १००० |
| विरामचिन्हें | १००४ |
| विश्वाची विजयादशमी | १०१७ |
| वीणावती सुंदरीस | १०२१ |
| वेडा | ८२२ |
| ' वेषभूषा 'कारास....पद्यभूषा | ९६७ |
| शेवटचें प्रेमगीत | ८८८ |
| श्रीमत्....राज्यारोहणानिमित्त पदें | ८१० |
| श्रीमहाराष्ट्रगीत | ९४५ |
| —स | ८७८ |
| सगुण स्वरूप | ८०३ |
| समशेर दुधारी दिसतां– | ९७५ |
| सत्सुमदाम | ९६९ |
| " समसमां संयोग कीं जाहला !' | १०११ |
| सांग कसे बसलों ? | ९९७ |
| सुखदुःख | ९०४ |
| सुभाषित | ८७६ |
| स्मरणसृष्टि | ९०२ |
| स्मशानांतलें गाणें | ९२१ |
| स्मृतिगीत | ८११ |
| हाय हाय ! | ९६० |
| हाल्ल्या पिंपळपानास | ८६८ |
| हा क्षण | ८७१ |
| हुकमेहुकूम | ८४० |
| हुरहूर | ९०१ |
| हृदयशारदेस | ८२९ |
| हृदयास | ८८० |

# परिशिष्टें

# परिशिष्ट १

## शिष्यानें लिहिलेल्या नाटकास गुरूची प्रस्तावना

प्रत्यक्ष संसारांत आपण पुष्कळ वेळां असें पाहतों कीं, एखाद्या माणसाला स्वतःचें मूल नसतें पण त्याला मुलांची फार आवड असते व हा त्या माणसाचा बालप्रिय स्वभाव जाणून मुलें त्याला 'बाबा बाबा' म्हणून बिलगतात, व आईबापही आपलीं स्वतःचीं मुलें या माणसाकडे आणून टाकतात आणि हा मनुष्य या सर्व मुलांचे लाड पुरवितो, त्यांच्याशीं हंसतो व खेळतो, त्यांच्यावर प्रेम करतो व तें इतकें कीं, तिऱ्हाइतास हीं त्याचीं मुलें नाहींत असें सांगितल्याखेरीज ध्यानांतही यावयाचें नाहीं. वाङ्मयरूपी संसारांत माझीही अशीच अवस्था होऊं पाहात आहे. मला स्वतःचीं वाङ्मयात्मक मानसिक मुलें नाहींतच म्हटलें तरी चालेल; पण दुसऱ्यांनीं आपलीं मानसिक मुलें माझ्या मांडीवर आणून टाकण्याची इच्छा दर्शविली व मीं तें नाकारलें नाहीं व याप्रमाणें आधींच दोनतीन मुलें माझ्या मांडीवर मीं घेतलीं आहेत व आज हें आणखी एक मूल मांडीवर घेत आहें. अलंकार टाकून बोलायचें म्हणजे आजवर दोनतीन ग्रंथकारांच्या विनंतीवरून मीं त्यांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत व आज प्रस्तुतच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचें मनांत आणलें आहे.

फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थी व माझे विद्यार्थीमित्र रा० राम गणेश गडकरी यांनीं ज्या नाटकाचें शेवटीं 'प्रेमसंन्यास' म्हणून नामाभिकरण केलें त्या

नाटकाला प्रस्तावना लिहिण्याबद्दल मला विनंती केली व त्यांच्या समानशील व समानविचार अशा स्नेहामुळें त्यांचें मन मला मोडतां येईना. कारण पुनर्विवाह हा माझा एक आवडता विषय आहे. याबद्दल कायावाचामनेंकरून, नव्या परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे विचार, उच्चार व आचार या मार्गत्रयीनें मीं थोडीफार खटपट केली आहे व यामुळें या विषयावर लोकमत तयार करण्यास आपल्या हातून होईल तितकी मदत करण्यास मी सदा तयार असतों. असो.

आधींच सामाजिक सुधारणाविषयक प्रश्न आमच्या पुराणप्रिय जनतेला अप्रिय ! त्यांतल्या त्यांत विधवाविवाहाबद्दल जनतेच्या मनांत विशेष प्रकारचा दुराग्रह व अढी; परंतु अर्वाचीन विचारांचा जोर व सजीवपणा असा आहे कीं, समाजाची इच्छा नसतांनासुद्धां या अप्रिय परंतु पथ्यकर सुधारणेवरच आतां मराठींत किती तरी नाटकें व कादंबऱ्या झाल्या आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वी झालेलें अण्णा मार्तंडाचें 'सौभाग्यरमा' हें नाटक व भाजेकर मुल्लाफ यांची 'मनोरमा' ही कादंबरी हीं दोन पुनर्विवाहविषयक पुस्तकें सोडून दिलीं, तरी पुनर्विवाह या विषयासंबंधीं मराठींत कादंबरी व नाटकें मिळून तीन ग्रंथ झाले आहेत व आतां रा० गडकरी यांचें 'प्रेमसंन्यास' हें नाटक प्रसिद्ध होत आहे.

या सर्व ग्रंथांकडे बारकाईनें पाहिलें म्हणजे 'निरंकुशाः कवयः' या म्हणीलाही कसा अपवाद आहे हें चांगलें दिसून येतें. कवीला कोणी दाबत नाहीं; कविप्रतिभेवर कोणाचें दाबदडपण चालत नाहीं; कविमनाला जें जें पटतें तें तें तो बेधडक-बेलाशक आपल्या काव्यांत आणूं शकतो असा सामान्य समज आहे; परंतु कवीवर सुद्धां जुन्या मताचें व लोकभीतीचें दडपण पडतेंच पडतें व याचा प्रत्यय वरील ग्रंथांवरून चांगला येतो. मराठींतील अत्यंत प्रतिभावान कादंबरीकार व ज्यांनीं आपल्या अनुपम कादंबऱ्यांनीं मराठी भाषेमध्यें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे त्या रा० हरिभाऊ आपटे यांची 'भयंकर दिव्य' ही कादंबरी घ्या. या कादंबरीच्या नांवावरून व तींतील नायिकेवरून रा० हरिभाऊ यांना पुनर्विवाहावर लिहावयाचें होतें असें दिसतें. कारण यांतील नायिका कमला ही एका पुनर्विवाहित कुटुंबाचें अपत्य कल्पिलें आहे; परंतु तिच्यावर आलेले प्रसंग, तिचा व तिच्या पतीचा झालेला बेबनाव व त्यांची झालेली ताटातोड वगैरे प्रसंग, यांचा कमलेच्या पौनर्भवसंभवाशीं कांहींच संबंध नाहीं. तसेंच पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा विशेष ऊहापोह या कादंबरींत मुळींच केलेला नाहीं. पुनर्विवाहित गृहस्थ बळवंतराव यांचें वर्णन फार खुबीदार

आहे; परंतु एकंदर प्रश्नच रा० आपटे यांनीं कादंबरीमध्यें मागें टाकल्या सारखा केला आहे व राजाराम नांवाच्या दुष्ट मनुष्याच्या आपमतलबी कारस्थानाला प्राधान्य दिलें आहे. थोडक्यांत असें दिसतें कीं, पुनर्विवाह विषयासंबंधीं जास्त लिहिल्यास कादंबरी अप्रिय होईल अशी भीति रा० हरिभाऊंच्या मनांत आली असावी व म्हणून त्यांनीं लांबून व अत्यंत अप्रत्यक्ष रीतीनें या विषयाला कादंबरींत जागा दिली असावी; परंतु पुनर्विवाहावर कादंबरी लिहिण्याचा संकल्प तरी हरिभाऊंनीं कोठें प्रगट केला नव्हता; परंतु प्रसिद्ध नाटककार कोल्हटकर यांनीं पुनर्विवाहावर म्हणून एक नाटक लिहिलें. विधुरविवाह, स्त्रीशिक्षण, मद्यपान व विधवाविवाह अशा चार सामाजिक विषयांवर आपण चार नाटकें लिहिण्याचा संकल्प केला होता व तद्नुरूप 'मतिविकार' हें पुनर्विवाहावरील अनुकूल नाटक आपण लिहिलें, असें रा० कोल्हटकर आपल्या प्रस्तावनेंत लिहितात; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, हा पुनर्विवाहाचा विषय एखाद्या पडदानशीन बाईप्रमाणें बुरख्यांत घालून या नाटकांत रा० कोल्हटकरांनीं आणिला आहे. पुनर्विवाह करणारा नायक या नाटकांत अगदींच फिका पडतो व त्याचा थोरला विधुर भाऊ-शिक्षण वगैरेंचा कैवारी—हाच नायक बनून त्याचें पवित्र चरित्र व त्याचें स्त्रीशिक्षणालय यांनीं बहुतेक नाटक व्यापून जातें. पुनर्विवाहाच्या विषयाला फारशी जागा मिळत नाहीं व पुनर्विवाहावरील नाटकाचा लोकमनावर परिणाम कांहींसा पुनर्विवाहाविरुद्धच होतो. तिसरें नाटक रा० सितारामपंत देवधर यांचें. हे गृहस्थ मागें कांहीं दिवस सुधारकाचे संपादक होते व हे स्वतः पुनर्विवाहित आहेत. रा० देवधरांचें 'सुविचारविजय' नाटक पुष्कळ अंशानें चांगलें साधलें आहे. तरीपण या नाटकाचा पहिल्या प्रथमचा बराच भाग शारदा नाटकाच्या विषयानें व्यापला आहे व शेवटीं या सामाजिक सुधारणेमध्यें श्रीमत् शंकराचार्यांचे शिष्य आणल्यामुळें नाटकाचा शेवट जरा निराळ्या तऱ्हेनें करावा लागला आहे.

या तिन्ही किंवा विशेषतः दोन्ही प्रयत्नांपेक्षां रा० गडकरी यांनीं पुनर्विवाह हा विषय फार जोरदार रीतीनें समाजापुढें आणला आहे हें कबूल करणें भाग आहे; परंतु त्यांच्या लेखणीलाही, लोकमताला म्हणा किंवा कंपनीच्या मालकाच्या मताला म्हणा कशी मान वांकवावी लागली आहे हें पुढें दिसून येईल.

या नाटकांतील संविधानक बरेंच चटकदार असून रा० गडकरी यांनीं

त्यांत अद्भुत व हृदयद्रावक असे बरेच प्रसंग आणले आहेत, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. संविधानकाकडे बारकाईनें पाहतां हें नाटक आनंदपर्यवसायी व्हावें असें दिसतें. परंतु ग्रंथकर्त्यांनीं त्याला मारून मुटकून दुःखपर्यवसायी केलें आहे; व म्हणूनच संविधानकांत व पात्रांच्या स्वभावांत बराच अस्वाभाविकपणा आला आहे. ज्याप्रमाणें संस्कृतांतील मृच्छकटिक नाटक हें स्वाभाविकपणें आनंदपर्यवसायी आहे व नाटकाच्या संविधानकाची घडणही त्याला अनुरूप आहे, तशीच गडकऱ्यांच्या नाटकाची स्थिति आहे. त्यांची पहिल्यापासूनची घडण आनंदपर्यवसायी नाटकाची आहे; परंतु नाटकांत पुनर्विवाह घडवून आणल्यास या काल्पनिक विधवाविवाहानें नाटक लोकांना अप्रिय होईल या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्या कारणानें म्हणा, रा० गडकरी यांनीं आपला पहिला बेत फिरवून नाटक दुःखपर्यवसायी केलें असावेंसें दिसतें; परंतु ज्या हिंदुसमाजांत दरवर्षी किती तरी पुनर्विवाह प्रत्यक्ष, बिनदिक्कत व राजरोस घडत आहेत त्या समाजांत एका काल्पनिक पुनर्विवाहामुळें क्षोभ उत्पन्न होऊन नाटक अप्रिय झालें असतें असें मानणें चुकीचें आहे. शिवाय या नाटकाचा एकंदर गुणसंनिपात इतका मोठा आहे व यांतला विनोद तर इतका उच्च दर्जाचा आहे कीं, त्या गुणसंनिपातांत पुनर्विवाह सहज बुडून गेला असता; परंतु रा० गडकरी हे भित्र्या सल्लागारांच्या भरीं पडले व त्यांनीं आपल्याला 'म्हातारा आणि त्याचा बैल' या गोष्टींतल्या म्हाताऱ्याच्या तोडीला आणून बसविलें, किंवा दुसऱ्या उपमेत सांगावयाचें म्हणजे एखाद्या एंजिनियरनें फार काळजीपूर्वक नकाशा काढून इमारत बांधण्यास सुरुवात केल्यानंतर आयत्या वेळीं इमारतीच्या रचनेंत घाईघाईनें फरक केला म्हणजे जसा इमारतीमध्यें वेडबंरपणा येतो तसा वेडबंरपणा रा० गडकरी यांनीं आपल्या नाटकांत आणला व या स्थान् बुद्धीमुळेंच रा० गडकरी हे पुनर्विवाहाला प्रतिकूल आहेत किंवा अनुकूल आहेत अशी कांहीं लोकांना शंका येते. परंतु हा आयत्या वेळीं नकाशा बदलल्यामुळें उत्पन्न झालेला दोष सोडून देऊन रा० गडकरी यांच्या नाटकाकडे पाहिलें म्हणजे रा० गडकऱ्यांचें साभिमान कौतुक केल्यावांचून राहवत नाहीं. कारण आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व नाटकांत रा० गडकऱ्यांचें नाटक सरस झालें आहे. वरवर पाहणारास जरी हें नाटक पुनर्विवाहाविरुद्ध आहे कीं काय अशी शंका आली तरी त्या नाटकाकडे व त्यायोगें दाखविलेल्या हिंदुसमाजाच्या चित्राकडे नजर

फेंकली म्हणजे कोणच्या सहृदय माणसाचें मन बालविधवांच्या दुःस्थितीनें कळवळणार नाहीं ! मनोरमा-जयंतासारखीं स्वभावविरोधामुळें विजोड झालेलीं जोडपीं आपल्या हल्लींच्या संक्रमणावस्थेंतील समाजांत हवीं तितकीं पहावयास सांपडतील व याबद्दलही माणसाच्या मनांत सुधारणा करण्याचें आल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच लीलेसारख्या प्रेमाच्या आधाराशिवाय पाण्यावांचून तडफडणाऱ्या माशासारख्या बालविधवा काय थोड्या आहेत ! पाऊल वांकडें पडल्यावर लोकलज्जेस्तव आपल्या पोटच्या गोळ्याच्या गळ्यास नख लावणाऱ्या दुमनसारख्या बालविधवाही समाजांत कांहीं कमी नाहींत ! सारांश रा. गडकरी यांनीं समाजांतील वस्तुस्थितीचें चित्र या नाटकांत हुबेहूब दाखविलें आहे, व यापासून समाजानें खरोखरीच धडा शिकण्यासारखा आहे. तो हा कीं, मनुष्य-स्वभावाविरुद्ध भलत्या कल्पनेवर बसविलेल्या नियमांपासून समाजावर संकटें व दुःखें आल्याखेरीज राहणार नाहींत. या नाटकाचें संविधानक ज्याप्रमाणें चटकदार, अद्भुत व मनाला चटका लावणारें आहे त्याप्रमाणेंच किंबहुना त्यापेक्षां जास्त या नाटकाची भाषा सरस, चटकदार व मनोहर आहे. रा० गडकरी हे मोठे प्रतिभावान् कवि आहेत व त्यांची या नाटकांतील भाषा म्हणजे एक गद्यकाव्यच आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. या भाषेपेक्षांही या नाटकांतील विनोद तर इतका उत्तम साधला आहे कीं, त्याची स्तुति करावी तितकी थोडीच होईल. या विनोदाची खुबी ही आहे कीं, त्यांत अश्लीलपणाचा, फाजीलपणाचा, बीभत्सपणाचा, कुत्सितपणाचा किंवा हिडिस-पणाचा अंशसुद्धां नाहीं. आजपर्यंतच्या बहुतेक नाटकांतील विनोदांत बऱ्यापैकीं कोणता तरी दोष आहेच; परंतु असा निर्दोष, असा आनंद देणारा व असा उच्च दर्जाचा विनोद क्वचित् दृष्टीस पडेल. या दृष्टीनें रा० गडकऱ्यांचें गोकुळ हें पात्र म्हणजे प्रतिभाशक्तीचा अद्वितीय मासला आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

रा० गडकरी यांची प्रतिभाशक्ति फार स्पृहणीय आहे. तसेंच त्यांचे विचार उदात्त आहेत. तेव्हां त्यांनीं प्रतिभाशक्तीनें निर्माण केलेल्या पात्रांना जसेंच्या तसें जगापुढें आणावें, त्यांनीं लोकमताच्या बागुलबोवाला भिऊं नये, आपल्या 'निरंकुशाः कवयः' या जुन्या उक्तीची सार्थकता आपल्या भावी कृतींत निदर्शनास आणून द्यावी व असें त्यांनीं केलें म्हणजे त्यांच्या कृति मराठी भाषेंतील अमोलिक रत्नें बनून त्यांचें नांव हरिभाऊ आपट्यांप्रमाणेंच अजरा-मर होईल. असें सांगून प्रेमसंन्यासाच्या सहवासानें आमच्या समाजांत न्याय-

बुद्धि व सदसद्विचार यांचा विकास होवो अशी आशा प्रदर्शित करून व शेवटीं प्रेमसंन्यासाला ' चिरं जीव ' असा आशीर्वाद देऊन ही प्रस्तावना संपवितों.

— गोविंद चिमणाजी भाटे

# परिशिष्ट २

## दिवंगत शिष्याच्या नाटकास गुरूनें लिहिलेली प्रस्तावना

माझे मित्र कै० राम गणेश गडकरी यांच्या 'प्रेमसंन्यास' या पहिल्या नाट्यकृतीला मीं त्यांच्या विनंतीवरून पहिली प्रस्तावना लिहिली होती. त्या गोष्टीला आतां दहावर वर्षें झालीं. त्यानंतर गडकऱ्यांच्या दुसऱ्या नाट्यकृति समाजापुढें येऊन गडकऱ्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें व त्यांच्या नाट्यसंसाराच्या अद्वितीय कारभारानें सर्वांचे डोळे दिपून जाऊं लागले, तोंच अकालीं, अल्पवयांत व आपल्या एका नाट्यरूपी अपत्याला जन्म दिल्याबरोबर त्यांचें देहावसान झालें. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या नाट्यकृतींची वाङ्मयावृत्ति काढण्याचें सरस्वती मंडळानें ठरविलें व पहिल्या नाटकाचा धर्मपिता या नात्यानें या नाटकाच्या दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना मींच लिहावी अशी त्या मंडळानें विनंती केल्यावरून कै० गडकऱ्यांच्या मृत्यूनें हळहळणाऱ्या मनानें मीं आज ही प्रस्तावना लिहावयास लेखणी हातीं धरली आहे.

कै० गडकऱ्यांच्या प्रतिभाशक्तीनें एकंदर पांच नाटकें निर्माण केलीं. त्यांची प्रतिभाशक्ति शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें सारखी वाढत होती व म्हणून त्यांच्या या पांच कृती म्हणजे चंद्राच्या पांच अवस्थांप्रमाणें जास्त जास्त आनंददायक होत गेल्या आहेत. त्यांचें 'प्रेमसंन्यास' हें नाटक प्रतिपच्चंद्राप्रमाणें आहे. या नाटकांत गडकऱ्यांच्या प्रतिभेचा उदय होऊन तिच्या

सुखद प्रकाशाच्या छटा व भावी वैभवाची साक्ष वाचकांच्या व प्रेक्षकांच्या नजरेस येते. त्यांचें दुसरें नाटक 'पुण्यप्रभाव' हें चतुर्थीच्या चंद्राप्रमाणें आहे. यांत गडकऱ्यांच्या प्रतिभेचा शीतळ व मनाला चकित करणारा प्रकाश दृष्टीस पडून वाचकांचें मन थक्क होतें. त्यांचें तिसरें नाटक 'एकच प्याला' हें अष्टमीच्या चंद्राप्रमाणें आहे. यांत गडकऱ्यांच्या प्रतिभेचा प्रकाश सर्वत्र पसरून दीर्घकाळ टिकणारा आहे असें नजरेस येतें. त्यांचें चौथें नाटक 'भावबंधन' हें द्वादशीच्या चंद्राप्रमाणें आहे. यांत त्यांच्या प्रतिभेच्या प्रकाशाचें पटल सर्व दशदिशांभर पसरलें आहे व जिकडे नजर फेंकावी तिकडे प्रकाशच प्रकाश वाचकांस दिसूं लागतो. रा० गडकऱ्यांचें पांचवें नाटक 'राजसंन्यास' हें पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें आहे. यांत गडकऱ्यांच्या प्रतिभेच्या दैदीप्यमान प्रकाशानें मनुष्याचें मन आनंदसागरांत पोहूं लागतें; पण पौर्णिमेचा चंद्र आकाशांत मध्यावर येण्याचे सुमारास जसें त्यास राहूनें ग्रासून खग्रास ग्रहण पाडावें त्याप्रमाणें 'राजसंन्यास' हें नाटक अर्धेमुर्धें तयार झालें नाहीं तोंच क्रूर मृत्यूनें गडकऱ्यांस ग्रासून त्यांच्या 'राजसंन्यासा'स कायमचें खग्रास ग्रहण लावलें हें मराठी भाषेचें व महाराष्ट्राचें केवढें दुर्भाग्य! पण ज्याप्रमाणें खग्रास सूर्यग्रहण किंवा खग्रास चंद्रग्रहण यांचे वेळीं ज्योतिषी आपल्या दुर्बिणींच्या साहाय्यानें सूर्याचें किंवा चंद्राचें सावकाश व सूक्ष्म निरीक्षण करून त्या त्या गोलाचें विशेष ज्ञान मिळविण्यांत उपयोग करतात, त्याप्रमाणें कै० गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नाटकांचा विशेष कोणकोणत्या बाबतींत आहे हें येथें सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. नाटकपंचकाचें सविस्तर परीक्षण करण्यास नाटकांइतकाच मोठा ग्रंथ लिहावा लागेल व तसें करण्यास सध्यां मला सवड नाहीं. या गेल्या पांच-पंचवीस वर्षांत महाराष्ट्रांत किती तरी नाटककार झाले आहेत व होत आहेत; कारण आमच्या महाराष्ट्राला हल्लीं नाटकांचा फार नाद लागलेला आहे. नाटकावर, नाटककार व नाटक मंडळी यांना खूप पैसा मिळतो. यामुळें हा धंदा हल्लीं डोळ्यावर येण्यासारखा झाला आहे. यामुळें किती तरी माणसें या नाटक लिहिण्याच्या नादीं लागलेलीं आहेत. तेव्हां नाटककारांच्या वाढत्या मालिकेंत कै० गडकऱ्यांना अल्पावकाशांतच अग्रपूजेचा मान कां मिळाला व गडकऱ्यांच्या निधनानंतर निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचे स्मृतिदिन कां पाळण्यांत येतात, अर्थात् गडकऱ्यांच्या नाटकांत इतकें अद्वितीयत्व काय आहे हें प्रस्तावनेंत सांगणें क्रमप्राप्त आहे; म्हणून थोडक्यांत तसा प्रयत्न येथें केला आहे.

कै० गडकऱ्यांच्या नाटकाचा पहिला विशेष कथानकाबाबत आहे. मराठी

भाषेंत निर्माण होणाऱ्या पुष्कळशा नाटकांकडे नजर टाकली तर असें दिसून येतें कीं, बहुधा नाटकाचें कथानक पुराणांतून घेतलेलें आहे किंवा महाराष्ट्रांतील व क्वचित् दुसऱ्या प्रांताच्या इतिहासांतलें आहे. पुराणांतील एखादें नाटकास सोइस्कर कथानक काढ किंवा इतिहासांतील एखादा प्रसंग घे, त्यांत थट्टा व विनोद उत्पन्न करण्याकरितां एखादुसरें पात्र निर्माण कर, लोकांना आवडणाऱ्या अशा कांहीं कल्पना किंवा लोकप्रिय नांवें यांचा ओढूनताणून उल्लेख कर; लोकांना नावडत्या गोष्टींची टवाळी कर; ऐतिहासिक कथानक असल्यास काल-विपर्यासाच्या दोषाकडे दुर्लक्ष करून लोकप्रिय राजकीय नव्या कल्पना त्या जुन्या काळच्या कथानकांत घुसडून दे! सारांश, इकडून तिकडून कांहीं तरी गोष्टी जमा करून मनरंजन होईल अशा तऱ्हेनें त्या गोष्टींची खिचडी बनव म्हणजे झालें नाटक तयार व झाला तो नाटककार! असाच प्रकार फार दिसून येतो. यामुळें त्या नाटकांत एखादें ध्येय नसावयाचें किंवा नाटकाचा विशिष्ट हेतु नसावयाचा, किंवा असल्यास निदान स्पष्टपणें दिसून तरी यावयाचा नाहीं; पण या बाबतींत गड-कऱ्यांच्या नाटकांमध्यें अद्वितीयत्व आहे. आधीं गडकऱ्यांचीं सर्व नाटकें सहेतुक आहेत. म्हणजे प्रत्येक नाटकांत समाजाला कांहीं तरी एका विशिष्ट बाबतींत उपदेश करण्याच्या हेतूनें तीं लिहिलेलीं आहेत. अर्थात् तो उपदेश गुरगुरणाऱ्या गुरू-प्रमाणें किंवा कर्कश आवाजानें कंठशोष करणाऱ्या गांवकाकाप्रमाणें नसून प्रेमळ प्रियवचन पत्नीनें केलेल्या उपदेशाप्रमाणें आहे. 'कांतासंमिततयोपदेशयुजे' हें काव्यप्रकाशांत घातलेलें काव्याच्या लक्षणांतील एक पद कै० गडकऱ्यांच्या सर्व नाट्यकृतींस अक्षरशः लागू आहे. उदात्त ध्येय व सदुपदेश देश-बांधवांपुढें मांडण्याकरितां कै० गडकऱ्यांनीं पुराणांतलीं कथानकें न घेतां तीं स्वतंत्रपणें आपल्या प्रतिभाशक्तीनें निर्माण केलेलीं आहेत. त्यांच्या शेवटच्या नाटकाखेरीज सर्व नाटकांचीं कथानकें काल्पनिक आहेत. त्यांपैकीं तीन तर 'आजकाल'च्या समाजांतील मध्यम वर्गाच्या सांसारिक प्रसंगांचीं आहेत. एक कथानक मात्र कोणच्या काळचें आहे हें समजण्यास साधन नाहीं. तें पूर्वकाळचें धरणें स्वाभाविक दिसतें व तें समाजांतील राजेरज-वाड्यांसारख्या वरिष्ठ दर्जांतील लोकांसंबंधीं आहे. त्यांच्या शेवटच्या नाटकाचा प्रसंग मात्र खरा ऐतिहासिक आहे. गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यासा'चा उद्देश हल्लींच्या समाजांतील बालविवाह, विषमविवाह, पुनर्विवाहप्रतिबंध वगैरे दोषांचें हृदयद्रावक तऱ्हेनें आविष्करण करून समाजाची सद्-सद्विवेकबुद्धि जागृत करण्याचा आहे. त्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकाचा उद्देश

स्त्रियांचें उदात्त चरित्र, पत्नी या नात्यानें त्यांचा समाजांतील दर्जा व निरतिशय सद्गुण आपल्या प्रखर प्रभावानें दुर्गुणी व दुष्ट माणसांनासुद्धां कसा ताळ्यावर आणूं शकतो याचें परिणामकारक चित्र जनमनाच्या हृत्पटलावर खोदण्याचा आहे. त्यांच्या 'एकच प्याला' या नाटकाचा उद्देश सध्यां समाजांत सरसहा पसरलेल्या एका व्यसनाचे भयंकर सामाजिक परिणाम काय होतात व होत आहेत हें दाखविण्याचा आहे. त्यांच्या 'भावबंधना'चा उद्देश समाजांतल्या व्यक्तीचा हटवादीपणा, वृथाभिमान, व्यावहारिक लुच्चेगिऱ्या, विवाहविषयक सौदेबजा कल्पना वगैरे दोषांचें आविष्करण करणें व अशा स्थितींत सुद्धां समाजांतील भावड्या प्रेमाचा, विनयाचा व दृढनिश्चयाचा शेवटीं विजय कसा होतो हें दाखविण्याचा आहे. त्यांच्या 'राजसंन्यासा'चा उद्देश राजानें आपलें कर्तव्यकर्म सोडल्यानें देशावर कसें संकट ओढवतें व त्या संकटाचे दुष्परिणाम सद्गुणी माणसांस सुद्धां कसे भोगावे लागतात, हें दाखविण्याचा आहे. सारांश, गडकऱ्यांच्या नाटकपंचकाचा पहिला विशेष म्हणजे सहेतुकता हा होय. कांहीं तरी एक हेतु मनांत धरून-तो निव्वळ जनमनरंजनाचा नव्हे, तर जनमनोन्नतीचा- त्याच्या सिद्ध्यर्थ गडकरी आपल्या नाटकाचें कथानक रचीत. अर्थात् तें स्वकपोलकल्पित असल्यामुळें व पुराणांतून किंवा ऐतिहासिक प्रसंगांतून घेतलें नसल्यामुळें गडकऱ्यांच्या कथानकांत स्वभावविपर्यास, कालविपर्यास वगैरे आमच्या विद्यमान नाटककारांच्या कृतींत दिसून येणाऱ्या दोषांस अवकाशच राहिलेला नाहीं. त्यामुळें नाटकाचें कथानक व नाटकांतलें मूलभूत तत्त्व अगर हेतु यांचा सुंदर मेळ गडकऱ्यांच्या सर्व नाटकांत दिसून येतो व म्हणून मराठी विद्यमान नाटकांत गडकऱ्यांच्या नाटकपंचकास अद्वितीयत्व आलें आहे.

गडकऱ्यांच्या नाटकांचा दुसरा विशेष, शेक्स्पीयरच्या रस्किननें दाखविलेल्या एका विशेषासारखा आहे. Shakespeare has no heroes, he has, all heroines in his dramas. रस्किनच्या म्हणण्याचा अर्थ हा कीं, शेक्स्पीयरचे नायक हे आदर्शभूत पुरुष नाहींत. प्रत्येक नायकांत कांहीं ना कांहीं तरी दोष-दुर्गुण आहेत; पण शेक्स्पीयरच्या नायिका मात्र आदर्शभूत स्त्रिया आहेत. त्या निर्दोष व सद्गुणी स्त्रिया आहेत व कथानकांतील प्रसंगांतून त्यांच्या गुणांनीं नायकांची सुटका झाली आहे. रा० गडकऱ्यांच्या नाटकांचा हाच एक विशेष आहे. गडकऱ्यांच्या नाटकांत नायिका व उपनायिका अशा जोड्या सर्वत्र आहेत. त्यांच्या लीला-सुशीला, कालिंदी-वसुंधरा, सिंधु-शरद,

मालती–लतिका व येसूबाई–शिवांगी या निरनिराळ्या नाटकांतील नायिकांनायिकांच्या जोड्या पहा! खरोखरीच हिंदुसमाजांतील आदर्शभूत स्त्रियांच्या या मूर्ति नाहींत असें कोण म्हणेल? या सर्व स्त्रियांची पतिनिष्ठा, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचा दृढनिश्चय, त्यांचा विनम्र करारीपणा, त्यांचा आत्मविश्वास, त्यांचें धैर्य इत्यादि गुण मनुष्याला आश्चर्यचकित करतात; इतकेंच नाहीं, तर न कळत या गुणांची छाप मनुष्यावर पडते व त्याची सद्गुणाकडे प्रवृत्ति वळते, इतकीं गडकऱ्यांचीं हीं चित्रें उठावदार उतरलीं आहेत. तेव्हां या बाबतींत गडकऱ्यांना शेक्स्पीयरच्या जवळ नेऊन बसविण्यास मला कांहीं एक हरकत वाटत नाहीं.

कै० गडकऱ्यांच्या नाटकपंचकांतला तिसरा विशेष म्हणजे त्यांचीं विनोदी पात्रें. गडकऱ्यांनीं नाटकाचा हेतु–निदान त्यांच्या लोकप्रियतेचें एक कारण तरी–मनोरंजन आहे, ही गोष्ट सर्वदा ध्यानांत ठेविली होती, यांत कांहीं एक शंका नाहीं. म्हणून त्यांच्या प्रत्येक नाटकांत एकापासून पांचापर्यंत विनोदी पात्रांची योजना केलेली आहे. मराठी नाटकांत हा अलीकडे सरसहा प्रघातच पडून गेला आहे व गडकऱ्यांनीं तो प्रघात चालू ठेवला; पण इतर नाटककारांचीं पात्रें नुसता पाचकळपणा करून किंवा धांगडधिंगा घालून किंवा शब्दावर शुष्क कोट्या करून व शेवटीं बीभत्स व अश्लील गोष्टींचा आश्रय करून प्रेक्षकांना हंसवितात; म्हणजे इतर नाटककारांचा विनोद फार हलक्या दर्जाचा आहे, तर गडकऱ्यांचा विनोद उच्च दर्जाचा आहे. गडकऱ्यांचा विनोद अर्थचमत्कृतीनें आनंद देतो; त्याला अश्लीलपणाचा किंवा बीभत्सपणाचा वास सुद्धां येत नाहीं. या बाबतींत मराठींतील इतर नाटककार व गडकरी यांमध्यें फरक आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्या ज्याप्रमाणें आबालवृद्धांनीं व आबालिकापुरंध्रींनीं वाचण्यास हरकत नाहीं, त्याप्रमाणें गडकऱ्यांचा विनोद खरोखर शुद्ध, सात्त्विक आनंद देणारा आहे. या बाबतींत गडकऱ्यांनीं शेक्सपीयरच्या वर कडी केली आहे असें मोठ्या अभिमानानें म्हणतां येतें. शेक्सपीयरच्या नाटकांत विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं न वाचण्यासारखे भाग पुष्कळ आहेत व म्हणूनच शेक्स्पीयरच्या नाटकांच्या, शाळेंत वाचण्यालायक अशा निराळ्या आवृत्त्या काढाव्या लागल्या आहेत. गडकऱ्यांच्या बाबतींत एखाददुसऱ्या ठिकाणाखेरीज अशा आवृत्त्या काढण्याची आवश्यकता वाटणार नाहीं असें वाटतें. शेक्स्पीयरच्या काळीं लोकांची अभिरुचि अश्लीलप्रिय होती म्हणून शेक्स्पीयरला अश्लील प्रकार

आपल्या नाटकांत नाइलाजानें आणावे लागले असें शेक्स्पीयरच्या तर्फेनें म्हणण्यांत येतें; पण तसें पाहिलें असतां महाराष्ट्रांतील लोकांची अभिरुची शेक्स्पीयरच्या काळच्या लोकांच्या अश्लीलप्रियतेपेक्षां कमी आहे अशांतील भाग नाहीं; पण शेक्सपीयर जसा त्या काळच्या अभिरुचीला खुषी राखण्याच्या मोहाला बळी पडला त्याप्रमाणें गडकरी मोहाला बळी पडले नाहींत, म्हणून गडकऱ्यांनीं शेक्स्पीयरवर कडी केली असें मला वाटतें. असो.

गडकऱ्यांच्या नाटकपंचकाचा शेवटचा विशेष म्हणजे गडकऱ्यांची भाषाशैली. आपलीं नाटकें वाङ्मयदृष्ट्या वरच्या दर्जाचीं व्हावीं याबद्दल त्यांनीं फार खबरदारी घेतलेली दिसते. त्यांनीं भाषेवर चांगलें प्रभुत्व मिळविल्यावरच नाटकें लिहिण्यास हातीं घेतलीं. यामुळें त्यांची भाषाशैली कमावलेली व बनलेली दिसते. त्यांची वाणी खरोखरीच ' परिणतप्रज्ञस्य वाणी ' भासते यांत कांहीं एक शंका नाहीं. त्यांच्या भाषेंत ओढूनताणून अनुप्रास आणलेले नाहींत तर भाषा अन्वर्थक असून अनुप्रासप्रचुर आहे. सारांश, त्यांची नाटकांतील भाषा गद्यमय काव्यच होय. त्यांनीं आपल्या एकाच ऐतिहासिक नाटकाकरितां त्या काळचे भाषाप्रचार आणण्याकरितां फार परिश्रम केले होते असें दिसतें. अर्थात् त्या भाषाशैलीचा पूर्ण मासला नाटक अर्धवट राहिल्यामुळें आतां दृष्टीस पडणें अशक्य झालें आहे, ही गोष्ट निराळी !

असे हे गडकऱ्यांच्या नाटकांचे विशेष आहेत. म्हणून हीं नाटकें मराठी भाषेचे कायमचे अलंकार बनले आहेत. भाषेचा अद्वितीय अलंकारकार कालानें अकालीं हरण करून नेला हें मराठी भाषेचें दुर्भाग्य ! पण गत गोष्टीला उपाय काय ? गडकऱ्यांच्या प्रतिभेनें जे हे अलंकार भाषेला लाधले आहेत त्यांचें निरीक्षण-परीक्षण करणें व त्यापासून आनंद, उपदेश व अनुकरणप्रवृत्ति आपल्या अंतःकरणांत बिंबविणें इतकेंच भावी पिढीचें काम आहे तें करण्याची बुद्धि महाराष्ट्रीयांस होवो अशी आशा प्रदर्शित करून ही घाईघाईनें लिहिलेली प्रस्तावना संपवितों.

— गोविंद चिमणाजी भाटे

# परिशिष्ट ३

## लेखन-गुरु कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी लिहिलेली 'भावबंधन' नाटकाची प्रस्तावना

ज्या नाटकांत, मजविषयीं एका स्थळीं प्रत्यक्षपणें सद्भाव दाखविला आहे, त्यांतील पद्यें व प्रस्तावना मींच लिहिणें सामान्य परिस्थितींत असदभिरुचीचें दर्शक मानलें जाईल; पण ज्या परिस्थितींत मला तीं लिहावीं लागलीं, तिचा विचार करतां तें क्षम्य वाटेल अशी आशा आहे.

ह्या नाटकाचे कर्ते कै. राम गणेश गडकरी यांचा व माझा परम व अकृत्रिम स्नेह होता. उभयतांनीं मिळून एखादें नाटक लिहून तें उभयतांच्या नांवांनीं प्रसिद्ध करावें व या रीतीनें नांवें धारण करणारांच्याप्रमाणें त्या नांवांचाहि दृढ संबंध जुळवून आणावा अशी उत्कट इच्छा त्यांनीं किती तरी वेळां प्रकट केली होती! ती इच्छा संकल्पित प्रकारापेक्षां अगदींच निराळ्या प्रकारानें पूर्ण व्हावयाची होती!

सन १९१८ सालचें नाताळांत रा. गडकरी पुणें येथें अत्यवस्थ असतां मी त्यांच्या भेटीस गेलों. आपण आतां फार दिवसांचे सोबती नाहीं हें त्यांस कळून चुकलें असल्यामुळें त्यांनीं त्या वेळीं आपल्या वाङ्मयविषयक संसाराची निरवानिरव चालविली होती. त्यापूर्वी त्यांनीं 'एकच प्याला' या नाटकाचें संपूर्ण गद्य, प्रस्तुत नाटकाच्या चार अंकांपेक्षां कांहीं अधिक भागाचें गद्य व

दोन्ही नाटकांतील कांहीं पदें स्वतः तयार केलीं होतीं. त्यांपैकीं कोणत्या नाटकांतील पद्यावलि पुरी करणें मला आवडेल असा त्यांनीं प्रश्न केला असतां मीं प्रस्तुत नाटकाचे प्रकाशक रा. कृष्णाजी सखाराम हर्डीकर यांच्या व माझ्या स्वतःच्या इच्छेस अनुसरून प्रस्तुत नाटकाची पद्यावलि पूर्ण करण्याची इच्छा व्यक्त केली व त्यांनीं तें काम मजकडे सोंपविलें. त्या वेळीं खुद्द रा. गडकऱ्यांचीं पदें माझ्या अवलोकनांत आलीं नव्हतीं. यानंतर लवकरच ते आपल्या प्रेमळ मातुःश्रीस, उभयतां बंधूंस व पत्नीस, अनेक स्नेह्यांस व व्यवसायबंधूंस आणि मराठी भाषेच्या असंख्य अभिमान्यांस शोकांत लोटून देऊन दिवंगत झाले. त्यांच्या मृत्यूमुळें मराठी भाषेचें व वाङ्मयाचें कधींहि न भरून निघण्यासारखें नुकसान झालें आहे. माझा व त्यांचा जो जिव्हाळ्याचा संबंध होता त्यामुळें माझी हानि त्यांच्या कुटुंबियांच्याइतकी नसली तरी त्यांच्यासारखीच अनन्यसाधारण वाटत आहे.

या नाटकांतील कांहीं पद्यें खुद्द कै. गडकऱ्यांच्या सरस लेखणींतून उतरलीं आहेत हें वर आलेंच आहे. तीं त्यांच्या रसाळ रचनेवरून रसिकांच्या तावडतोब लक्षांत येतील. तीं वरवर पाहणारांच्याहि नजरेस यावीं म्हणून त्यांच्या शिरोभागीं फुल्या केलेल्या आहेत. मीं करावयाच्या पदांचीं स्थानें व चाली कै. गडकऱ्यांनीं बळवंत संगीत नाटक मंडळींतील गानकुशल नटांच्या सल्ल्यानें मुकर केल्याच होत्या. तीं पदें भाषेच्या व कल्पनांच्या दृष्टीनें कोणत्या स्वरूपाचीं असावीं याचें स्थूल दिग्दर्शनहि कै. गडकऱ्यांनीं पुणें येथील भेटींत केलें होतें. त्यास अनुसरून बाकीचीं पदें रचण्याचा मीं प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न कांहीं स्थलीं विफल झाला असण्याचा संभव आहे. शिवाय मीं केलेल्या पदांतील बहुतेक साऱ्या कल्पना माझ्या स्वतःच्या असल्यामुळें त्यांत नाटककर्त्याचें हृद्गत उतरावें तितकें उतरलें नसल्याचाहि संभव आहे. माझ्या पदांत जे दोष आढळतील त्याबद्दल रसिकांनीं माझ्या हेतूकडे लक्ष देऊन मला क्षमा करावी अशी विनंती आहे. पदांतील कल्पना गद्यांतील कल्पनांहून बहुधा भिन्न असल्यामुळें बहुतेक सर्व गद्य अविकृत स्थितींत ठेवलां आलें आहे. दोनचार स्थळीं जरूर वाटल्यावरून एखादें वाक्य, शब्द किंवा शब्दसमूह अधिक घातला आहे व क्वचित् स्थळीं एखादा शब्द गाळिला किंवा बदलला आहे.

या नाटकाची प्रस्तावना ज्या गृहस्थांनीं लिहावी अशी कै. गडकऱ्यांची इच्छा होती त्यांस कांहीं कारणामुळें ती पूर्ण करतां आली नाहीं. यामुळें

और्ध्वदेहिक क्रियेइतकेंच दुःखद पण आवश्यक असें हें प्रस्तावनालेखनाचें कर्तव्य मलाच करावें लागत आहे. सुदैवानें नाट्यकर्त्याच्या असामान्य लोकप्रियतेमुळें तें काम अत्यंत सुलभ झालें आहे.

नवीन पद्यांच्या व प्रस्तावनेच्या लेखकाचें नांव गुप्त ठेवण्याचा प्रथम विचार होता; पण नाटकाची जाहिरात देणाऱ्या एका पुस्तकविक्रेत्यानें तें नांव प्रसिद्ध करण्याची घाई केल्यामुळें तो विचारहि बाजूस ठेवावा लागला.

येथपर्यंत पद्यांची व प्रस्तावनेची प्रस्तावना झाली. नाटकांतील संपूर्ण गद्यभाग खुद्द कै. गडकऱ्यांच्या लेखणींतून उतरला असल्यामुळें त्यांच्या इतर नाटकांतील गुण त्यांतहि उतरले आहेत. नाटक लिहिण्यास सुरुवात त्यांच्या मृत्यूच्या सुमारें एक वर्षापूर्वी होऊन त्याचे जवळ जवळ चार अंक व पाचव्या अंकाचा पहिला प्रवेश येवढा भाग सुरुवातीपासून सव्वा महिन्यांतच पूर्ण झाला. त्या वेळीं त्यांच्या शरीरांत क्षयानें जरी प्रवेश केला होता तरी विशेष निःशक्तता उत्पन्न केली नव्हती. यामुळें तो भाग त्यांच्या इतर नाटकांतील गद्यभागाच्या तोडीचा उतरलेला दिसून येईल; किंबहुना त्यांत कल्पनांचा व भाषेचा सरसपणा व नावीन्य रसिकांच्या बुद्धीस एकामागून एक चमत्कृतिरूप आघात देऊन तिला अंकित करण्याचें सामर्थ्य, विविध प्रसंगांस व भिन्न भिन्न पात्रांस कथानकाशीं एकरूप करण्याचें कौशल्य पात्रांच्या व प्रेक्षकांच्या स्वभावांशीं असलेला दृढ परिचय, रसिकांच्या हृदयांत व मुद्रांवर लागोपाठ अनुक्रमें शोकरसाच्या व हास्यप्रकाशाच्या लहरी उठविण्याची शक्ति इत्यादि जे अनेक गुण प्रतिभावान् कवि व यशस्वी नाटककार या नात्यांनीं कै. गडकऱ्यांच्या ठायीं वसत होते ते प्रस्तुत नाटकांत त्यांच्या इतर नाटकांतल्यापेक्षांहि अधिक प्रमाणांत व उज्ज्वल स्वरूपांत निदर्शनास येतील. नाटकांतील शेवटचा प्रवेश इतर भागांच्या मानानें योग्यतेंत कांहींसा कमी भरेल. नाटकांतील अत्यंत सुंदर अशा पहिल्या प्रवेशाच्या मानानें तर तो फारच फिका वाटेल; पण कर्त्याच्या या अखेरच्या नाटकांतील तो अखेरचा प्रवेश कर्त्याच्या आयुष्यांतील अखेरच्या दिवशीं व अखेरच्या प्रहरांत लिहिला गेला, या एका गोष्टीमुळें त्या प्रवेशास व त्याबरोबर संपूर्ण नाटकास कर्त्याच्या नाटकांतच नव्हे, तर एकंदर मराठी किंबहुना जगाच्या वाङ्मयांत अपूर्व महत्त्व आलें आहे. नाटकाचा व कर्त्याचा शेवट बरोबर झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. एका घटकेस नाटकाचें जनन व दुसऱ्या घटकेस कर्त्याचें मरण घडून आलें. नाटकाचा प्रवेश रंगभूमीच्या जगांत होतो न होतो तोंच जगाच्या रंगभूमीवरून कर्त्याचें निष्क्रमण

झालें. अपत्याला आयुर्दान करून चिरंजीव करणाऱ्या बाबर बादशहाप्रमाणें कर्त्यानें आपल्या कृतींत जीवन ओतलें. ती कृतीहि स्वतः जरा पत्करून पित्यास तरुण करणाऱ्या पुरुराजाप्रमाणें स्वतः वैगुण्य स्वीकारून व पित्याचा कीर्तिरूप देह सतेज करून पितृऋण फेडील अशी खात्री आहे. लढतां लढतां धारातीर्थी पतन पावण्याचें भाग्य अनेक वीरांच्या ललाटीं असतें; परंतु लिहितां लिहितां मृत्युमुखीं पडण्याचें व विधिलेखाबरोबरच स्वतःचा लेख संपविण्याचें सद्भाग्य फारच थोड्या ग्रंथकारांच्या वांट्यास येत असेल! 'भावबंधन' नाटक त्यांतील विपुल हास्यरसानें हजारों प्रेक्षकांस हंसवून त्यांच्या मुरकुंड्या वळवील; पण त्याबरोबरच त्यांस आपल्या जनकाच्या निधनाची उद्वेगजनक आठवण देऊन क्षणभर तरी तटस्थ केल्याशिवाय राहणार नाहीं. रसिकांच्या शोकरसास व हास्यरसास एकसमयावच्छेदेंकरून भरती आणून त्यांच्या दुःखाश्रूंचा संगम घडविणारें हें नाटक गंगायमुनांचा संगम घडविणाऱ्या प्रयाग तीर्थाइतकेंच पवित्र आहे.

हें नाटक कै. गडकऱ्यांनीं मुद्दाम बलवंत नाटक मंडळीकरितां लिहिलें. त्या मंडळीवर त्यांचें किती प्रेम होतें हें त्यांनीं तिच्या ऋणांतून उत्तीर्ण होण्याकरितां आपले प्राण खर्ची घातले या एकाच गोष्टीवरून उघड होईल. मंडळीस त्यांच्या प्रतिभेचा अधिक लाभ झाला नाहीं हें दुर्दैव होय.

प्रस्तुत नाटकाच्या मुद्राणाकरितां छापखान्याकडे त्यांच्या रंगावृत्तीची प्रत पाठविण्यांत आली होती. त्या प्रतीचें कै. गडकऱ्यांच्या मूळ प्रतीहून जें अंतर दिसून आलें तें पुरवणींत दिलें आहे. रंगावृत्तीची प्रत मूळ प्रतीशीं ताडतांना मला माझे व्यवसायबंधु व स्नेही रा. प्रभाकर गणेश धोपेश्वर व रा. केशव काशीनाथ जोशी यांचें जें अमोल साहाय्य झालें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

या नाटकावरुन कर्त्याचा एकदां हात फिरला असता तर तें झालें आहे त्यापेक्षांहि सरस वठलें असतें. नाटक छापत असतांहि त्यावरून त्याच्या जनकाची प्रेमळ नजर फिरणें इष्ट असतें; पण जन्मापासूनच जें अपत्य पितृप्रेमास आंचवलें त्याची पितृव्यादिकांनीं कितीहि प्रेमानें जोपासना केली तरी त्याची आबाळ व्हावयाची चुकत नाहीं. त्यांतील कोहींजण त्याच्या खाण्यापिण्याची तरतूद करतात तर दुसरे कांहींजण त्यास वस्त्रप्रावरणें पुरवितात व तिसरेच कांहींजण त्याचें लालन करतात. प्रेमानेंच का होईना, एकजण त्यास शक्ति आणण्याकरितां अजीर्ण होईपर्यंत खाऊं घालतो तर दुसरा त्याची प्रकृति निकोप राहावी म्हणून त्याची जवळ जवळ उपासमार करतो. एकजण

त्याला शुद्ध हवेचा लाभ मिळावा म्हणून उन्हातान्हांतून हिंडवितो तर दुसरा त्याजवर उबदार वस्त्रें लादून त्याचा कोंडमारा करतो. असाच कांहींसा प्रकार कै. गडकऱ्यांच्या या कृतीचा झाला आहे. नाटकाची मूळ प्रत, तिजवरून रंगभूमीकरितां तयार झालेली प्रत, तिजवरून छापखान्याकरितां तयार झालेली नक्कल, खिळे जुळविणारांनीं केलेली ही नकलेची नक्कल, स्थूल मुद्रितें अनेकांच्या हातून जातांना त्यांत त्यांनीं केलेला फेरफार या सर्वांचे छापील प्रतीवर बहुविध संस्कार झाल्याकारणानें तिच्यांत शब्दाअक्षरांसंबंधानें प्रमादबाहुल्य आणि शुद्ध-लेखनासंबंधानें व विरामांसंबंधानें बरेंच मतवैचित्र्य आढळून येईल. तथापि कै. गडकरी हयात असते तरीहि त्यांना ही कृतिकन्या अखेरीस ज्या कनवाळू रसिकवृंदरूपी पतीच्या स्वाधीन करावी लागली असती त्याच्या औदार्यावर भिस्त ठेवून व त्यानें तिला जनकनिर्विशेष प्रेमानें वागवावें अशी विनंती करून ती त्याच्याच चरणीं अर्पण करतों.

जळगांव, वऱ्हाड, ता. १५-८-२०

श्री. कृ. कोल्हटकर

# परिशिष्ट ४

# वेड्यांचा बाजार

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

**नमन**

अतुल तव कृति अति अमति मति ईश्वरा ! ॥ ध्रु० ॥ वर्षती मेघजल, शांतविति भूमितल, सलिल मग त्यजुनि मल जात सुरमंदिरा ॥ गोविंद पूर्व-पद-अग्रज स्मरुनि पद, उधळि निज हृत्सुखद शब्द-रत्नाकरा !

[ गोविंदाग्रज ]

( मधुकर व वसंत )

[ **स्थळ** :– रस्ता. ]

मधुकर : वेड्यांचा बाजार आहे आमचें घर म्हणजे ! वसंतराव, एकेकाचा प्रकार ऐकलात तर अक्कल गुंग होऊन जाईल तुमची ! नाहींतर उगीच वेणूताईचें लग्न इतकें लांबणीवर पडलें असतें का ! आज कांहीं नाहीं तरी सोळावें वर्ष असेल तिला ! पण आमचे तात्या पडले ज्योतिष्याच्या नादांत ! अण्णासाहेबांना सगळा वैद्यकाचा व्यापार आणि आईला देवधर्म पुरतात ! बरें दादाविषयीं

म्हणाल तर त्यानें संन्यासदीक्षा घ्यावयाची फक्त बाकी ठेविली आहे!

वसंत : खरेंच, माधवरावांच्या डोक्यांत हें वेड कसें काय आलें?

मधुकर : लग्न झालें तोंपर्यंत सर्व ठीक होतें; पुढें त्यांना कळलें कीं, वहिनीला लिहितां वाचतां येत नाहीं म्हणून; आणि हे म्हणजे पक्के सुधारणावादी! केला निश्चय कीं, पुन्हां म्हणून बायकोचें तोंड पहावयाचें नाहीं, आणि त्य सुमारास विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, हंसस्वरूप या मंडळींच्या व्याख्यानांचा प्रसार सुरू झाला होता. त्या वैतागांत आमच्या दादासाहेबांनींही परमार्थाची कास धरिली! इकडे बिचारी रमावहिनी माहेरीं चांगलें लिहायला वाचायला शिकली, पण उपयोग काय? इतक्या अवकाशांत दादासाहेब पूर्ण विरक्त बनले! वहिनींना घरीं आणावयाचें नांव काढलें कीं हे घर सोडण्याच्या प्रतिज्ञा करायला लागतात!

वसंत : पण, मधुकर, मला वाटतें कीं माधवरावाचें हें वैराग्य फार दिवस टिकणार नाहीं! हें दोन दिवसांचें वारें दिसतें सगळें! कांहीं प्रयत्न केला तर माधवराव अजून ठिकाणावर येतील!

मधुकर : येतील तेव्हां खरें! पण आज तर घरांत एका वेड्याची भर पडली आणि बाकीच्यांच्या वेडांना उठावणी मिळाली! तात्या म्हणतात त्याला साडेसाती आहे सध्यां; अण्णा म्हणतात, अभ्यासानें आणि जागरणानें त्याचें डोकें फिरलें आहे आणि आई म्हणते कुणी तरी जादुटोणा केला आहे!

वसंत : आणि तिघांचेही आपापल्या परीनें सारखे उपाय चालू असतील.

मधु : तें कांहीं विचारूं नका. त्यांच्या पत्रिकेचीं दर्षफळें काढण्यांत तात्या वर्षेच्या वर्षे घालवितात; अण्णांच्या औषधांनीं आणि काढ्यांनीं त्याची अन्न-पाण्याची सुद्धां गरज भागविली आहे आणि आईनें तर अंगाऱ्याधुपाऱ्यांनीं त्याला शुद्ध बैरागी बनविला आहे!

वसंत : काय विलक्षण मंडळी! हा प्रकार पाहून तुम्हाला अगदीं वेड्यासारखें होत असेल!

मधु : अहो, इतक्यानें कुठें आटोपतें आहे सारें? दादाच्या लग्नांत आपण चुकलों असें प्रत्येकाला वाटतें आहे आणि वेणूताईच्या लग्नाबद्दल फाजील सावधगिरी घेऊन मागच्या चुकीचा वचपा भरून काढण्याची तिघांनींही आपापल्या मनाशीं गांठ बांधून ठेविली आहे!

वसंत : आमची यमुताई मोठी भाग्याची म्हणून निर्विघ्नपणें तुमच्या पदरांत पडली म्हणायची!

मधु : त्यावेळीं आमच्या मंडळींत इतकी जागृति झाली नव्हती. नाहींतर माझ्या लग्नाचा प्रकारसुद्धां वेणुताईच्या लग्नासारखाच झाला असता. हल्लीं मात्र खरा तमाशा चालला आहे घरांत! वेणुताई आणि दादा यांच्या कल्याणासाठीं तिहेरी उपायांचा सारखा मारा सुरू आहे.

वसंत : यमुताई कधींकधीं या गोष्टी सांगते, पण इतका प्रकार असेल असें नव्हतें आम्हांला वाटत! मग कदाचित् ती मुद्दाम सांगत नसेल!

मधु : ती सांगणार किती तुम्हांला! अण्णांनीं या दोघांसाठीं औषधांचा असा सांठा करून ठेविला आहे घरांत कीं तो पाहून मुर्दी आंजल्याच्या वैद्यांनासुद्धां लाज वाटावी! आईनें दोघांच्या हातापायांत गंडेताईतांची इतकी गर्दी केली आहे कीं दोघांनींही ताबूतांत फकिरी घेतली आहे असा भास होतो. आणि तात्यांनीं तर या दोघांचीं वर्षफळें, पत्रिका यांच्या नकला करण्यासाठीं आणि टिपणें करण्यासाठीं वीस रुपये दरमहाचा एक स्वतंत्र कारकून ठेवून दिला आहे!

वसंत : आणि माधवराव हें सारें मुकाट्यानें सोशीत असतात वाटतें!

मधु : तो इकडे लक्षच देत नाहीं! भोंवतीं बैराग्यांचा एक तांडा असला म्हणजे झालें! त्यानें तर घराला धर्मशाळेची कळा आणून ठेवली आहे.

वसंत : अशा घोटाळ्यांत सारी जबाबदारी तुम्हांलाच संभाळावी लागते हें स्वाभाविकच आहे. मधुकर, मीं वेणूच्या लग्नाचा विषय आज मुद्दामच काढिला आहे हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

मधु : तुम्हीं न बोलतां तुमचा हेतु माझ्या डोळ्यांसमोर नेहमीं उभा असतो; पण ज्या गोष्टीचा इलाज आपल्या हातीं नाहीं तिचा नुसता उच्चार करण्यांत काय हांशील आहे या विचारानें मी नेहमीं स्वस्थ बसतों.

वसंत : तर काय आमच्या प्रीतिविवाहाची आशा मीं सोडून द्यावी म्हणतां? मधुकर, आमचा प्रीतिविवाह म्हणजे एखाद्या नाटकांतली नाहीं तर कादंबरींतील बडबड समजूं नका! तुमच्या लग्नांत वेणू मला देण्याबद्दल जी सारखी थट्टा चालली तिचा आमच्या दोघांच्याही मनावर अगदीं तात्पुरताच परिणाम झाला नाहीं. लग्नानंतर यमुताईबरोबर मी तुमच्या खेडेगांवीं एक महिनाभर होतों त्यावेळीं एकमेकांच्या अधिक परिचयानें तो परिणाम दृढ झाला. तुमच्या लग्नांतल्या थट्टेला आम्हीं लग्नापेक्षां जास्त महत्त्व देऊं लागलों. पुढें, तुम्हांला माहीतच आहे, मी जरी त्यानंतर कधीं तुमच्या घरीं आलों नाहीं तरी या तीन चार वर्षांत आमच्या यमुताईबरोबर वेणू आमच्या घरीं दोन चार

वेळां महिना महिना राहिली होती. या अवकाशांत आमच्या एकमेकांच्या गुणांची आम्हांला पारख पटून तुमच्या लग्नांतल्या थट्टेला आमच्या लग्नानें खरेपणाचें स्वरूप देण्याचा निश्चय केला आणि या कामांत माझी सारी भिस्त, मधुकर, एकट्या तुमच्यावरच आहे. आमच्या लग्नाला तुमची आडकाठी नाहीं ना ?

वसंत :

(राग-यमन. ताल-दादरा.)

वैवाहिक दीक्षा जधिं प्राप्त हो तुला ॥ प्रेमोत्सव होई कीं तंवि तो मला ॥ ध्रु० ॥
आप्तवर्ग बांधिति तीं सूत्र-बंधनें ॥ तींच करिति सुदृढ सुनव प्रेम-बंधनें ॥
अंकुरित प्रेमांकुर होइ त्या पळा ॥ १ ॥

मधु : असल्या अनुरूप विवाहाला दुर्दैवाखेरीज दुसऱ्या कोणाची आडकाठी असणार ? मी मागेंच एक दोन वेळां तुमच्याबद्दल गोष्ट काढिली होती; पण तात्या म्हणतात तुमचें टिपण जमत नाहीं, आई म्हणते परतवेल होते आणि अण्णा तर वैद्याच्या मुलाखेरीज कोणाचें नांव सुद्धां काढूं देत नाहींत. यंदा तात्यांनीं पुढल्या महिन्यांत वेणूचे ग्रह साधारण बरे आहेत तेव्हां तेवढ्यांत लग्न करून घ्यायला हरकत नाहीं म्हणून लग्नाला कशीतरी परवानगी दिली आहे एकदांची ! तेव्हां आतां लोकांचीं तोंडें बंद करण्यासाठीं निदान त्या बाळाभाऊशीं का होईना पण एकदांचें वेणूचें लग्न करण्याचा मी विचार केला आहे.

वसंत : बाळाभाऊ कोण हा !

मधु : अहो तो आमच्या गांवच्या वैद्यबुवांचा मुलगा ! वैद्यबुवांनीं अण्णांच्यावर आपल्या वैद्यकाचें चांगलेंच जाळें पसरलें होतें. अण्णा त्यांच्या अगदीं अध्यां वचनांत वागत असत. वैद्यबुवांच्या अंतकाळीं अण्णांनीं त्यांना वचन दिलें कीं वेणू बाळाभाऊला देईन म्हणून. आतां बाळाभाऊनें स्वतां नकार दिल्याखेरीज अण्णा म्हणतात मी कांहीं माझ्या वचनाला बाध आणणार नाहीं.

वसंत : बरें; निदान मुलगा तरी बरा आहे का ?

मधु : कसला बरा ? जाणून बुजून पोरीला विहिरींत लोटायची ! घरच्या माणसांनीं शिकण्यासाठीं इथं ठेवला आणि मुलानें नाटकाचा छंद धरिला ! उठतां बसतां नाटकाखेरीज बोलणें नाहीं ! नेहमीं नाटकवाल्यांत पडलेला !

वसंत : आणि अशा माकडाच्या पदरीं तुम्हीं असलें रत्न बांधणार ? मधुकर,

यापेक्षां वेणूला खरोखरीच एखाद्या —

मधु : वसंतराव, मला कांहींच कळत नाहीं असें समजूं नका ! पण हा लोकापवाद मोठा कठीण आहे! चवाठ्यावरचीं कुत्रीं भाकरीच्या तुकड्यानें तरी भुंकायचीं थांबतात; कावळा व्रण असेल तिथें तरी चोंच मारितो, विंचवाला छेडलें तरच तो नांगी चालवितो; पण लोकांच्या कुटाळकीची तऱ्हा या सर्वांच्या विरहित असते. तेव्हां असा देखतां डोळ्यांनीं आगींत पाय घालायला तयार झालों आहें. बरें दुर्दैवानें त्याचें टिपणही तात्यांच्या पसंतीस उतरलें आहे ! आज आतां तेवढयासाठींच निघालों आहें. कुठून तरी त्याला हुडकून काढून एकदां मुलगी समक्ष पहा म्हणजे शास्त्रोक्त झालें म्हणून सांगतों.

वसंत : धिक्कार असो आमच्या समाजाला ! बिचारी मनुष्याला असा अविचार करणें भाग पडतें आणि त्याबद्दल त्याला कोणी दोष देत नाहीं ! अरेरे असे प्रकार पहात बसण्यापेक्षां संन्यास घेऊन वनवास पत्करलेला बरा !

मधु : वसंतराव असं अगदीं निराश होऊं नका ! चला आज त्या बाळाभाऊला बोलावूं, त्याला दोन गोष्टी सांगून पाहूं ! मीही आज रात्रीं पुन्हां तुमच्याबद्दल गोष्ट काढून पाहतों ! पाहूं, प्रयत्नांतीं परमेश्वर ! नाहींतर होणाराला पाठ दिलीच पाहिजे. चला, त्या बाळाभाऊचा तपास काढूं.

वसंत : काशीच्या नव्या पाठशाळेंतून शिक्षण संपवून परीक्षा दिल्यानंतरसुद्धां तेथेंच राहिलों असतों आणि संन्यास घेतला असता —

मधु : बः मग दादाला हंसायला कुठें जागा उरली ? चला अहो, हातपाय गाळूं नका. चला.

मधुकर :

(**राग–बिहाग.** ताल–त्रिवट.)

सजुनि तुम्हा संन्यासी होतां तुरत तिळहि हंसण्या कारण इतरां कां तुम्ही हंसतां ॥ ध्रु० ॥ हा विषाद द्या त्यजुनि तुम्ही प्रयत्न करुनि वरा नव यश ॥ १ ॥

(जातात.)

## प्रवेश दुसरा

[ वेणू व यमुना ]

वेणू—[ यादवराय भाई यहो, ]

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ॥

निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ॥
विवाहकाळीं खळ तो आला तंव राजस बाळा ॥
शोकभरानें विव्हळ झाली दोष लावि भाळा ॥
" अजुनि तरी या दासीसाठीं याहो गोपाळा ॥
जवळी आली काळवेळ ही संकट हें टाळा ॥
ऐन समयिं कां निष्ठुर झालां ? काय असें केलें ॥
दीनावरिचें प्रेम सदाचें आज कुठें गेलें ॥
कधिं बाहिन ही काया माझी देवा तव पायां ॥
कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ॥
कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ॥
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ॥
नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ॥
वाट बघु किति घेउनि हातीं अश्रूंची माळा ॥
किती आळवूं परोपरीनें कंठ किं हो सुकला ॥
तरिहि यावया अजुनी माझा माधव कां चुकला ॥
सर्वसाक्षि भगवंता आतां अंत नका पाहूं ॥
कीं विपप्राशनीं प्राण तरी हा पदकमला वाहूं ॥
मीच अभागी, म्हणुनी आपण अजुनी नच आलां ॥
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां मिळे कसें मजला ॥
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई ॥
उर भरुनि ये, शब्द न चाले—

यमुना : हें हो काय वन्सं ? गाणं म्हणतां म्हणतां तुमची सुद्धां अगदीं तुमच्या गाण्यांतल्या भीमकबाळेसारखी स्थिति झाली !

वेणू : वहिनी, तुझें आपलें भलतेंच ! भीमकबाळेसारखी स्थिति व्हायला मला ग काय झालें आहे ! एकादें गाणें म्हणतांना मनुष्य तसें तद्रूप नाहीं का होत ?

यमुना : वेणू वन्सं ! पुरे झाली ही बतावणी; तुमच्यासारखी शिकलेली नसेन म्हणून काय झालें ! इतकें का मला कळत नसेल ? सांगा पाहूं तुमच्या मनांत काय असेल तें. वा: गडे, माझ्याजवळ सुद्धां आडपडदा ?

वेणू : वहिनी, रागावू नकोस अशी. बायकांच्या मनाला कुठें तोंड असतें का ? इतके दिवस तुला मीं माझें दु:ख मुद्दाम सांगितलें नाहीं. ते तरी काय करणार बापडी ! रमावहिनींचें दु:ख आपल्याला पुष्कळ माहीत आहे. पण काय

उपाय होतो आपल्या हातून तिथें तरी ? तीच माझी गत. एरवीं आडपडदा कशाचा ? फार झालें तर डोळे निपटीत बसावें हेंच बायकांचें समाधान.

यमुना : ( पदरानें तिचे डोळे पुसून ) नका रडूं, वन्सं. शपथ आहे तुम्हांला माझ्या गळ्याची. आजच तुम्हाला इतकें वाईट वाटायला काय झालें ? सांगा पाहूं मला ?

वेणू : सांगतें, पण वहिनी, ऐकून घेतल्यावर तूं माझी थट्टा नाहीं ना करणार ?

यमुना : काय बोलतां वन्सं ! चला. तुमचें बोलणें तुम्हांलाच शोभतें. हीच का माझी परीक्षा केलीत आजवर ? आम्हीं नांवाच्या नणंद-भावजयी; पण सख्या बहिणीप्रमाणें आतांपर्यंत वागत आलों आणि तुमचें हें बोलणें ? मग काय बोलायचें माणसानें पुढें !

यमुना :

(राग-देस. ताल-झपताल.)

अमुनी भगिनि-भाव, कां हा दुजा भाव ? मळवा न तें नांव ॥ धृ० ॥ कथुनि कारण मला, करूं नका शोक हा, मी देत वचनाला ॥ ठेवा न त्या नांव कां हा दुजा भाव ? ॥ मळवा न तें नांव ॥ १ ॥

वेणू : रागावलीस पुन्हां ! तसें नव्हे वहिनी, पण सुखांतल्या माणसाला दुःखी माणसाच्या दुःखाची चांगलीशी कल्पनाच करितां येत नाहीं. म्हणून मी तसें बोललें; तुला लावून बोलण्यासाठीं नव्हे ! वितीच्या यातना वितीलाच माहीत; दुसऱ्यांना तिचें दुःख हलकेंच आहे असेंच वाटायचें !

यमुना : बरें, तसें का होईना ? मी मुळींच बोलत नाहीं आतां ! आधीं मला सांगा आणि मग पहा. मी थट्टा करतें का काय तें ? हातच्या कांकणाला आरसा कशाला हवा ? सांगा पाहूं तुम्हांला का वाईट वाटलें मघाशीं.

वेणू : सांगायलाच कशाला हवें ? तूंच सांग बरें वहिनी, माझी स्थितिसुद्धां त्या भीमकबाळेसारखीच नाहीं का ?

यमू : ती कशी काय ?

वेणू : नीट आठवण कर म्हणजे तुझ्यासुद्धां तेव्हांच लक्षांत येईल.

यमू : ( थोडा वेळ विचार करून ) माझ्या नाहीं बाई कांहीं लक्षांत येत.

वेणू : असें वेड पांघरलेंस तर कुठून येणार लक्षांत !

यमू : वेड नव्हे वन्सं, खरेंच नाहीं आठवत मला कांहीं.

वेणू : बरें, तुझ्या लग्नांतली तरी तुला चांगली आठवण आहे ना ?

यमू : अगदीं चांगली आठवण आहे ! पण तिच्यावरून काय समजायचें इथें !

वेणू : बोहल्यावर तूं आणि मधुदादा होता ? मागें मी मुहूर्ताचा कऱ्हा घेऊन उभी होतें, आठवतें का तुला ?

यमू : हो, न आठवायला काय झालें ? डोळ्यांदेखतच्या गोष्टी ! त्यावेळीं जाऊबाईंनीं तुमच्या नी आमच्या वसंतदादाच्या पदराला गांठ मारली, मुलींनीं तुम्हांला वसंतदादाचें नांव घ्यायचा आग्रह केला, अखेर तुम्ही लाजून अगदीं रडकुंडीला आलां तेव्हां मींच ती गांठ सोडली, तेव्हांचीच गोष्ट ना ?

वेणू : तेव्हांचीच कशाला, तीच गोष्ट ! आतां तरी आलें ना सारें लक्षांत ?

यमू : अस्सं ! अस्सं ! आतां लक्षांत न यायला वेडी का आहें मी !

वेणू : वहिनी, कां बरें इतकी घाई केलीस, त्यावेळीं ती गांठ सोडायची ?

यमू : हें काय बन्सं ? [ तिचे डोळे पुसते ] या गोष्टी कुणाच्या हातच्या का असतात ! झालीं, पांच वर्षें होऊन गेलीं त्या गोष्टीला !

वेणू : पांच वर्षें झालीं का ग वहिनी तुझ्या लग्नाला ?

यमू: हो यंदाच्या श्रावणांतली माझी पांचवी मंगळागौर ना ? वर्षांना काय लागतें व्हायला ! आलीं–गेलीं वर्षें.

वेणू : मला ही गोष्ट अगदीं काल झाल्यासारखी वाटते. वहिनी, त्या दिवसापासून मला एवढ्या एकाच गोष्टीचा सारखा निदिध्यास लागला आहे. वहिनी, पुन्हां येईल का ग तशी वेळ कधीं ?

यमू : हो, देवाच्या मनांत आलें तर तसें सुद्धां घडून येईल.

वेणू : मला तुझे असे मोघम आशीर्वाद नकोत. तूं घेशील का मनावर माझें एवढें काम ? तुझी अगदीं जन्माची उतराई होईन.

यमू : हात्तिच्या, त्याला एवढी काकळूत कशाला करायला पाहिजे, मला नको का आहे असें झालें तर, एकदां मीं गोष्ट काढली सुद्धां होती जवळ ! आज पुन्हां काढीन.

वेणू : " पुन्हां काढीन " नाहीं ! एवढ्यानें नाहीं व्हायचें माझें समाधान. उन्हाच्या धारेंत उडत्या पाखराच्या सावलीनें काय विसांवा मिळणार ? तूं मधुदादाला अगदीं गळ घालून आणखी.

यमू : आणखी वसंतदादाला सुद्धां ना ?

वेणू : हो, दोघांकडे अगदीं आळ घेऊन बैस. कांहीं म्हटल्या कांहीं आपला हट्ट सोडूं नकोस. नाहीतर पहा, बाबा कांहीं करोत, माझ्या मनासारखें नाहीं झालें तर मी कांहीं माझ्या जिवाचें—

वेणू :

(**राग-यमन.** ताल-त्रिवट.)

सोसुनि दुःखा यापरि, ऐशी ॥ होऊं भार कां या जगतासी ? ॥ धृ० ॥ प्रिय गोष्टींचा त्याग करोनि, अप्रिय तेंही प्रिय मानोनि, घालूं माळा कां दुःखासी ? ॥ १ ॥

यमू : पुरे मेलें हें बोलणें. वन्सं, तुम्ही अगदीं बिनघोर रहा. मी काय पाहिजे तें करीन. पण तुमच्या मनासारखें घडवून आणीन. आतां तर झालें ना !

वेणू : तुझ्या तोंडांत साखर पडो म्हणजे झालें.

यमू : बरें, पण वन्सं, आजच तुम्हांला इतकें वाईट वाटून घ्यायला काय झालें ?

वेणू : आज दुपारीं जेवणावर बाबा काय म्हणाले तें सांगितलें नाहीं वाटतें मधुदादानें तुला ?

यमू : कुठून सांगणें होणार, तुमचें तरी काय विचारणें.

वेणू : हो, खरेंच, राजाराणीची गांठ पडायची ती मंचकावरच ! झालें, मुरड-लेंस नाक ! पोर व्हायची वेळ आली तरी आमच्या वहिनींचें पोरपण कांहीं गेलें नाहीं अजून.

यमू : बरें, काय म्हणत होते मामंजी ?

वेणू : बाबांनीं मधुदादाला सांगितलें कीं ते-ते हे आहेतना त्यांना म्हणावें उद्यां येऊन मुलीला शास्त्रोक्त पाहून जा एकदां म्हणून ! म्हणजे उद्यांच्या वैशाखांत घेऊं उरकून कार्य झालें !

यमू : कुणाला, आपल्या वैद्यबुवांच्या बाळाभाऊंना वाटतें ?

वेणू : हो.

यमू : मग त्यांच्या नांवाची लाज वाटायला लागली वाटतें इतक्यांत !

वेणू : बघ केलीस खरी भलतीच थट्टा, अग लाज कशाची ? जें नांव ऐका-यलासुद्धां नको तें कशाला तोंडावाटें काढूं उगीच ?

यमू : आणि उद्यांच बाळाभाऊ तुम्हाला पहायला येणार वाटतें ?

वेणू : हो. अन् हें ऐकल्यापासून माझा जीव कसा खालींवर होत आहे सारखा ! सांगशील ना तूं मधूदादाला आजच ?

यमू : सांगेन, सांगेन; अगदीं खचित सांगेन, तुम्ही कांहीं काळजी करूं नका.

[ सदाशिव येतो. ]

वेणू : या सदुभाऊ, इतक्या उन्हाचे कुणिकडे ?

सदा : ताईनें तुम्हांला बोलविलें आहे घरीं !

वेणू : कुणी ! रमावहिनीनें का ?

सदा : हो, तिला करमत नाहीं म्हणून तुम्हांला बोलविलें आहे घटकाभर बसायला.

वेणू : खरेंच, किती दिवसांत रमावहिनीकडे गेलें नाहीं. शनवार शनवार आठ, आदितवार नऊ आणि आजचा सोमवार दहा. चल वहिनी तूं पण.

यमू : अशा उन्हाच्या; अंमळशानें -

वेणू : गाडी आणवितें हवी तर, मग तर झालें ना ?

सदू : आणावयाला नकोच. मी आणलीच आहे आमची गाडी.

वेणू : झालें तर मग. गाडींत नाहींना झोंप लागणार उन्हाची आमच्या दादाच्या नाजूक राणीला ? चल.

यमू : दमा जरा. सदुभाऊ, चहा करतें आणि मग.

सदू : नको, आतां तुमच्या घरीं करा चहा. चला लौकर. यमू-बरें चला.

( जातात. )

## प्रवेश तिसरा

[ बलवंत प्रासादिक नाटकमंडळीचा दिवाणखाना. तालमीचा देखावा. कांहीं मंडळी जमली आहेत, कांहीं येताहेत, एकजण मध्येंच निजले आहेत. ]

काका : चलारे; कृष्णा, दे घंटा आणि हांक मार बऱ्या मंडळीला; दादा, पांडू, भाऊराव ( दोन तीन मुलें जातात. ) हें कोण निजलें आहे, देशपांडे का ? उठीव त्यांना !

कृष्णा : देशपांडे, अहो देशपांडे, उठा कीं.

देशपांडे : अरे वा त्रास देतोस मर्दा; आहे काय गडबड !

कृष्णा : अहो तालीम.

देश : तालीम नाहीं आखाडा.

कृष्णा : काय कोल्ह्यांचा नाद हा.

देश : नाद नाहीं आवाज.

काका : अहो, बस करा कीं; उठा. ( देशपांडे उठून बसतात. मुलें येतात. )

गोपाळ : काका, अण्णासाहेब गेले आहेत बाहेर. पंत म्हणतात माझी आहे पाठ नक्कल; आणि गणपतराव म्हणतात तुम्ही सुरू करा मी आलोंच. रघुनाथ,

भाऊराव म्हणतात मी भांग काढून येतों केंसांना ?

देश : भांग का गांजा ? ( दोघे तिघे जण येतात. )

पांडू : का काका, आम्हांला जरा उशीर झाला कीं कायदे आणि कलमें काढिलीं, आतां करा कीं दंड ?

देश : दंड का हात ?

काका : आम्ही कशाला बसतों कुणाला दंड करीत; मालक जाणे अन् तो दंड जाणे ! तो मालकांचा मान !

देश : मान का कंबर !

पांडू : हं, तें ठीकच आहे; मोठ्यांना कोण ठेवणार नांवं ?

देश : नांव नाहीं होडी.

तात्या : गप्प बैस कसा, पांडू; अरे, ती वडील मंडळी. आपण त्यांना असें बोलूं नये. त्यांनीं कांहीं केलें तरी आपल्याला तीं पूज्यच !

देश : पूज्य का शून्य.

काका : बस करा आपला फाजीलपणा, देशपांडे. नक्कल आहे का उद्यांची पाठ ?

देश : ( हळूच एकीकडे ) पाठ का पोट ?

काका : बरें भाऊराव येईपर्यंत तेवढें " जाऊं कामाला " घ्या बसवून ! पांडू, सूर धर काळ्या पांचव्याचा मध्यम.

देश : ( एकीकडे ) मध्यम का उत्तम. ( कांहीं मुलें पुढें येतात. )

मुलें : जाऊं कामाला ! चला ग दिवस किती आला ॥

काका : ए विन्या, नीट म्हण कीं लेका जा–ऊं.

विन्या : जाऊं [ त्याचा सूर चुकतो ]

काका : अरे लेका, जा-आ-आ ऊं.

विन्या : जा-आ-आ ऊं. [ सूर पुन्हां चुकतो. ]

काका : जा-आ-आ आ.

विन्या : जा-आ-आ-आ-आ.

काका : चार कशाला आकार घेतोस ? जा-आ-आ-आ. प, ध, प, सा.

विन्या : प, ध, प, सा.

देश : पसा कां मूठ ?

काका : आ-आ-आ-आ-प, ध, प, सा. ( काका व विन्या म्हणतात. )

गणू : [ एकीकडे ] तात्या हे कावळ्याची " सारीगम " करण्यापैकीच हं. ग्वालेरीस आपला मुकाम होता; तेव्हां एकदां सकाळीं कावळा ओरडत होता।

एक: काका पडले गाण्यांतले दरदी; केली सुरुवात त्याच्या ओरडण्याची सुरावट करायला. त्यांतलाच हा अव्यापारेषु व्यापार. या मूठभर पोराला काय कळणार यांचा ' पधपसा 'नि ' निरुधप '!

काका : जा, लेका, म्हण कसें तरी. [ मुलें पद म्हणतात. ]

शंकर : उपवन तरुवेलींना जल मी घालाया जातें ॥ जल मी घालाया जातें.

हरि : हरिण-शिशूंना कोमल पल्लव–काका, हरिण-शिशूंना म्हणजे काय ?

काका : यांत काय अवघड आहे; अरे वेड्या, हरिण म्हणजे हरणें आणि शिशू म्हणजे ससे ! हरिण शिशूंना म्हणजे हरिणांना अन् सशांना.

गणू : [ एकीकडे ] शाबास ! शिशू म्हणजे ससे नी विश्व म्हणजे विशवे.

हरि : हरिण-शिशूंना कोमल पल्लव चाराया जातें । पल्लव चाराया जातें ॥

गोपाळ : कादंबरीची कुसुम कंचुकी गुंफाया जातें । कंचुकी गुंफाया जातें ॥

काका : जरा चेहऱ्यांत मजा आणा कीं थोडी ! रडतोस कां असा.

दामू : पंजर शुकसारिकेस गायन शिकवाया जातें । सगायन शिकवाया ॥

काका : अरे खुळ्या सगायन काय ? आणि तूं काय गायन शिकविणार ! मांजर खाल्ल्यासारखा ओरडतो आहेस नुसता ! नाहीं आवाजांत प्रेम कीं नाहीं गाण्यांत ढंग ! आणि म्हणे गायन शिकवाया जातें.

[ भाऊराव येतात ]

दामू : काका, भाऊराव आले ?

काका : हं मग घ्या मुलींचा प्रवेश शारदेंतला !

रघु : काका, मी करूं वल्लरीची नक्कल ?

काका : लेका, आवाजाचें झालें आहे मडकें आणि वल्लरीची नक्कल कशाला ? बसत जा आजपासून आंतल्या पेटीवर !

शंकर : तात्या तुमचे बाळाभाऊ आले ! [ बाळाभाऊ दोघांशीं बोलत बोलत येतात. ]

काका : तात्या, हं, आज होऊन जाऊंदे याची गम्मत.

तात्या : ओ हो हो हो, बाळाभाऊ ? या, गुरू.

बाळा : गुरू ! कोण आम्ही का तुम्ही ? वाः भय्या !

तात्या : [ हसत ] भले ! आम्ही गुरू वाटतें ! आमची काय आहे योग्यता गुरू व्हायची !

देश : [ एकीकडे ] गुरू का जनावर !

बाळा : बनवा, बनवा बुवा आम्हांला !

तात्या : हें बनवणें वाटतें ! आतां मात्र हात जोडले; माफ करा. बाळाभाऊ;

तुमची काय गोष्ट; आज तुम्ही नाटकांत नाहीं, नाहींतर झुलवून सोडलें असतें लोकांना.

काका : काय, तात्या, बाळाभाऊ गातात वाटतें!

तात्या : गातात! तुम्हीं ऐकलें नाहींत कधी! किर्लोस्करांच्या भाऊरावामागें एवढा एकच प्राणी आहे आज! आपल्या इथें नेहमीं येतात तर खरें! तान तयारी भलतीकडे, गळा फिरता, आवाजांत झार अशी आहे अगदीं किनरी-सारखी! आतां गंधर्वांचा पाडा शिल्लक नाहीं. नाहींतर हे सव्वा, दीड, अडीच गंधर्वांपेक्षांही बालगंधर्व व्हावयाचे.

भाऊ : मग, तात्या, होऊंद्या आतां कांहीं!

काका : हो खरेंच, ऐकवा कांहीं आम्हांला!

तात्या : बाळाभाऊ, या पुढें! म्हणा एकच चीज, पण ऐशी झाली पाहिजे कीं अगदीं भलतीकडे! काका, सुरेलपणाबद्दल तर शिकस्त आहे! रहिमतखां झक मारतो, यांच्यापुढें!

बाळा : ए, तात्या! काय हें! आम्ही आपलें उगीच आ करणारे.

तात्या : आ करणारे! लोकांना आश्चर्यानें "आ" करायला लावाल! काका हें सारें उगीच वरवर बरें का? गृहस्थाच्या अंगांत इतके गुण आहेत पण कोणी स्तुति केली कीं बिघडलें अस्तान!

गण : हं, मग, तात्या, आतां उशीर कां!

तात्या : बाळाभाऊ करा सुरुवात. कृष्णा घे तबला.

बाळा : (गंभीर आवाजानें तात्याच्या कानाशीं लागून पण सर्वांस ऐकू येत जाईल अशा रीतीनें) अरे, तात्या, काय मांडलें आहे काय तुम्हीं हें इतक्या बड्या मंडळींत? आपण काय म्हणणार राव!

तात्या : (त्याच रीतीनें) बडी मंडळी? जाऊं द्या! तुम्ही एकदां चढ्या सुरांत दोन ताना फेंका कीं चिमणीसारखें तोंड होईल एकेकाचें! बडी मंडळी! देखनेमें दबू और चलनेमें शिवराई! (उघड) म्हणा, आपल्याला थोडाच रंग मारायचा आहे?

बाळा : पण-पण बुवा.

देश : (मध्येंच) पण कां पैज?

बाळा : तात्या, वेळ जातो आहे उगीच!

तात्या : बाळाभाऊ, हं, पांडू, धर सूर! [पांडू पेटीचा सूर धरतो.]

बाळा : (निरनिराळे सूर बदलून) आ-आ-आ-आ. हं ठीक आहे. नाहींतर

एक सूर चढा ध्या अजून. [ पांडू तसें करितो. ]

बाळा : मग काय, म्हणायचें तात्या ! [ बाळाभाऊ पुढील ठुंबरी वेड्या वांकड्या सुरांत ओरडतात; तात्या बढ़नाव भय्या म्हणून म्हणतात; मंडळी तोंडाला पदर लावून हंसतात व मधून मधून "वाहवा" देतात. बाळाभाऊ क्रमाक्रमानें आवाज चढवीत शेवटीं किंकाळ्या मारितात व ताल प्रथम सावकाश ( लय ) नंतर फार जलद ( दुगण ) व एकदम अगदीं सावकाश ( ठाय ) असा बदलून मधून मधून भरपूर ताना मारितात. मंडळी माना डोलावितात. ]

( चीज )

बाळा : जो तूं गुण समजत सुन हमरी ॥

काका : वाहवा: बाळाभाऊ, वाहवा तात्या खूप मजा केली.

भाऊराव : शिकले कुठें हें इतकें ?

बाळा : शिकण्यासारखें आहे काय त्यांत, उगीच आपुलें वेडें वांकुडें गाईन परी तुझा म्हणवीन.

तात्या : अहो खऱ्या हिऱ्याला उसनी चमक हवी कशाला ? हें सारें ऐकून ऐकून झालें आहे नुसतें.

( मुलें बाळाभाऊस मधून मधून ताना घ्यावयाला सांगतात, बाळाभाऊ, वेड्या-वांकड्या ताना मारितात, तात्या बोटानें गिरक्या घेऊन त्यांना सूचना देतात. )

रघु : बाळाभाऊ आतां फिरकीची तान,

शंकर : भले, आतां जिन्याची तान,

रघु : आतां चक्री तान,

तात्या : बाळाभाऊ, आतां लावणी 'नका टाकून जाऊं,'

काका : तात्या आतां जरा यंत्र थांबवा. हा ग्रामगीताचा प्रकार नको.

तात्या : यंत्र थांबवा कशाला, आतांशा गाणाऱ्या यंत्रांतून चांगले मोठे प्रतिष्ठित लोक सुद्धां ही लावणी बरोबर बिनदिक्कत ऐकत बसतात. मग आमच्या या यंत्रानेंच काय पाप केलें आहे, तें कांहीं नाहीं चलदेव. बाळाभाऊ अगदी हावभाव सुद्धां,

( तात्या शिकवितात बाळाभाऊ हावभावासकट वरील लावणी म्हणतात. )

काका : भले, बाळाभाऊ. खूप आहे !-हावभावाची तर शिकस्त आहे !

तात्या : नाटकांत येणार आहेत आपल्या ! चालेल का नाहीं ?

पंत : चालेल म्हणजे ? किर्लोस्करांतल्या बालगंधर्वावर आहे कडी !

देश : कडी का कुलूप ?

पंत : घाला कीं तुमच्या तोंडाला कुलूप एकदां !

काका : बरें तात्या, आणखी कांहीं सुनवा कीं ?

तात्या : बाळाभाऊ, होऊन जाऊं द्या एकदां अखेरचें ! काय पाहिजे मंडळी, 'नच सुंदरी करूं कोपा ?' 'कीं अरसिक किती हा शेला ?'

रघु : "अरसिक किती हा" च होऊं द्या !

कृष्णा : आणखी, तात्या, परवां रंगरटांत झालें तशा थाटानें !

तात्या : हरकत नाहीं, का बाळाभाऊ ?

बाळा : म्हणजे पदर घेऊन ? माफ करा भय्या ! बनवितां वाटतें आम्हांला ?

तात्या : बनवितों ? तुम्हांला वाटतें कां तसें खरोखरीच ? मग काय, राहिलें आमचें म्हणणें ! बाकी, बाळाभाऊ, आम्ही तुम्हांला मंडळींतले समजतों आणि तुम्हीं मात्र फटकून असतां बरें का ?

काका : बरें, बुवा गाणें आपलें असें तसें असतें तर मग भाग निराळा.

पंत : हो, पण आवाज जसा गळी; म्हणणें टंगदार ! मग बनविणार कसें इथें ?

तात्या : आणि मी तुम्हांला बनवीन ? आपल्या मंडळीला बनविलें म्हणजे झालेंच कीं मग ? तुम्हांला वाटलें का खरेंच तुमचा आवाज वाईट आहे आणि ही सारी थट्टा म्हणून ?

बाळा : नाहीं, पण उगीच बाहेरची मंडळी आली म्हणजे पंचाईत.

तात्या : बाहेरचें कोण येणार ? येवढी आपलीच मंडळी ! मी करतों सारी व्यवस्था.

पंत : नाहींतर त्यांना आवडत नसेल तर राहूं दे तात्या ? उगीच कशाला इतका खल !

देश : खल का बत्ता !

तात्या : नाहीं; नाहीं; म्हणावयाचें ना गुरू ?

बाळा : म्हणूं कीं ? पण बाहेरचें कुणि—

तात्या : मी तें करितों सारें ठीक ! अरे, कोणी तरी बसा आणि कुणी दारांत आलें तर एकदम कळवा पाहूं ? कोण बसेल बरं, कृष्णा ?

गणू : कृष्णा कशाला, मीच बसतों कीं; उगीच पोरासोरीं काम नको.

तात्या : बस, बस. सत्रा आणे काम ! ( गणू जाऊं लागतो. )

बाळा : गणपतराव, भय्या तसदी पडते आहे ? माफ करायची हं.

गणू : अरे दोस्त, तुमच्यासाठीं जान कुरबान आहे. ( एका टोंकाला जाऊन बसतो. )

तात्या : ठीक आतां उठा भय्या; रघु, जा त्यांना पदर दे पाहूं; हें घे माझें

उपरणें.

बाळा : तात्या पदरच कशाला पण नुसतं म्हणतो कीं.

तात्या : हं एकदां भाषा झाल्यावर बदलायचें नाहीं गुरु. जारे रघु; कर सांग तयार. या उपरण्याचा पदर दे. सदऱ्याच्या बाह्या चोळीवजा सरकीव म्हणजे झालें. टोपबीप नको आज.

रघु : पण तात्या चोळीला कापूस नाहींना इथें.

तात्या : अरे नसूं दे लेका कापूस. ते धाकटे रंगाचे रिकामे पेले आहेत ना कोनाड्यांत तेच घे लौकर जा.

पंत : ठीक रंग आहे. तात्या.

( बाळाभाऊ, रघु व एकदोन मुलें जातात. )

काका : खूप बनविला आहेस बुवा !

[ वसंत व मधुकर येतात. ]

गणू : ओहोहो ! कोण मधुकर आणि वसंतराव ! या बसा ! कोणिकडे आज वाट चुकलां ?

मधु : आमचे ते बाळाभाऊ वैद्य; त्यांना बोलवावयाला आलों.

गणू : होय का ? या मूर्तीशीं काय काम निघालें तुमचें ?

मधु : थोडेंच काम होतें; आहेत का ते ?

गणू : आहेत; पण जरा बाजूला उभे राहून थोडी मजा पाहा त्यांची, पुढें मात्र येऊं नका इतक्यांत; नाहींतर त्यांचा फिका पडेल.

( मधुकर व वसंत थोडे बाजूला सरतात. नंतर धोतराचा पदर घेतलेले स्त्रीवेषधारी बाळाभाऊ येतात. )

काका : तात्या सोंगांतसुद्धां प्रेम आहे, चालण्यांतसुद्धां लकब आहे थोडी.

पंत : हं हं बाळाभाऊ, खूप आहे बरें; चालू द्या आतां.

[ एका उपरण्याचा शेला घेऊन बाळाभाऊ वेड्यावांकड्या अभिनयांत "अरसिक किती हा शेला" हें पद म्हणतात. मंडळींचा गोंधळ चालूच आहे. ]

काका : शाबास गब्रू ! अगदीं सही भाऊराव कोल्हटकर !

देश : सही नाहीं शिक्का.

पंत : सवाई भाऊराव म्हणाना ! हा गुण नवीनच कळला !

तात्या : अहो, झांकलें माणिक आहे माणिक ! गाणें आहे; चेहरा आहे; अभिनय आहे; शिवाय कवि आहेत !

काका : काय सांगतोस !

तात्या : खरेंच; नाटक लिहिलें आहे त्यांनीं एक ! त्याचें नांव वैद्यनाटक !

बाळा : वः तात्या, वैद्यनाटक नव्हे; नाट्यवैद्यक !

काका : म्हणजे वैद्यकाची भानगड आहे वाटतें त्यांत ?

तात्या : म्हणजे-त्यांचे वडील मोठे प्रसिद्ध वैद्य होते ! आणि हे नाट्यभक्त; तेव्हां आपल्या वडिलोपार्जित धंद्याचें नांव गाजविण्यासाठीं तोच विषय घेतला नाटकाला ! हो, कवीला काय कमी ? " जहां न पहूंचे रवि; वहां पहूंचे कवि ! " त्यांत नायिकेला कामज्वर भरला होता तो पांचव्या अंकांत काडेचिराइताचा काढा देऊन हटविला असा भाग आहे एकंदर !

वंत : वाहवा ! ऐकायला मिळालें पाहिजे बुवा एकदां !

काका : बरें, तात्या, आतां अखेरचें एक; म्हणजे खेळ खलास !

तात्या : बाळाभाऊ ' जाई परतोनि ' आतां ! आणि शेवटीं म्हणत म्हणत आंत निघून जायचें !

[ कृष्णाला हरिण कल्पून बाळाभाऊ पद म्हणतात; मधून मधून बसा फोडून रडतात; मंडळी रडण्याचा आविर्भाव आणितात; तात्या तर ओक्साबोक्शीं रडतात. शेवटीं बाळाभाऊ झटक्यानें निघून खोलींत जातात, टाळ्यांचा गजर. ]

मधु : का हो, गणपतराव, अगदीं हुबेहूब माकडचेष्टा आहेत या !

गणू : तो मदारी आहेना आमचा तात्या ! असें हुरळलेलें तट्टू तात्याच्या तावडींत सांपडलें कीं त्यानें दनविलेंच त्याला ! जरा चढविलें कीं झालें काम !

वसंत : म्हणजे, ही काय जादू आहे तात्याजवळ !

गणू : उद्योग काय तात्याला दुसरा ! हा बाळाभाऊ अगदीं फटेल ना ! पण तात्याच्या अर्ध्या वचनांत अगदीं ! तात्याचें वाक्य त्याला प्रमाण !

मधु : फारच नवल म्हणायचें बुवा !

गणू : नवल कशाचें ! एकटा बाळाभाऊच आहे का असा ! मुक्कामाच्या दर गांवाला आमच्या तात्याचीं एक दोन कुळें आहेतच ! एरवीं ही मंडळी खूप हुषार; पण एवढ्या बाबतींत ढिसाळ ! चांगलें सात सात यत्ता शिकलेले लोक-सुद्धां आहेत तात्याच्या यादींत ! [ बाळाभाऊ बाहेर येतात. ] बाळाभाऊ, हे मधुकर आले आहेत तुमच्याकडे !

बाळा : [ गडबडीनें ] कसें काय मधुकर ! कुणीकडे आज ?

मधु : तुमच्याकडेच आलों आहे ! अण्णांनीं तुम्हांला बोलाविलें आहे घरीं. तुम्ही वेणूताईला एकदां शास्त्रोक्त पाहून जा म्हणजे बरें पडेल ! आज किंवा

उद्यां तुमच्या सवडीप्रमाणें येऊन जा.

बाळा : ठीक आहे ! चला ! आतां पाहतां कांहीं काम नसलें तर, नाहीं तर उद्यां येईन. चला, बरें आहे, मंडळी, जरा जाऊन येतों. [ मधु व वसंत नमस्कार वगैरे करितात व बाळाभाऊसह जातात. मंडळींत खूप हंशा होतो. ]

## प्रवेश चौथा

[ अण्णासाहेब; यशोदाबाई ]

अण्णा : काय करावें आतां प्रकृतीला ! अगदीं तीळ खपेनासा झाला आहे ! आज सकाळीं अग्निमांद्य झालें म्हणून चूर्ण आणिवलें वैद्यबुवांकडून तों लागलीच इतकी क्षुधा प्रदीप्त झाली कीं साऱ्या मुलखाची खाई खाई सुटली आहे ! काय ही भूक !

यशोदा : मग खायचें होतें कांहीं थोडेंसें ! देऊं का आणून कांहीं ?

अण्णा : अग, खायचें काय कराळ ! मागें त्या रामभाऊला असेंच अग्निमांद्य झालें; पुढें चूर्ण घेतल्याबरोबर अशीच खाई खाई सुटून त्या नादांत खाल्लेंहि त्यानें थोडेंसें ! झालें; सहा महिने खाटेला खिळून पडावें लागलें ! वैद्य तरी आतां कोणता आणावा ?

यशोदा : खरें तर काय ? इतके वैद्य झाले पण मेल्या एकाच्यासुद्धां हाताला गुण नाहीं. सारे मेले—

अण्णा : अग, वैद्याला शिव्या देऊं नयेत अशा ! वैद्यांच्या स्वाधीनच्या का या गोष्टी आहेत ? वैद्य काय करणार इथें ? आतांशा हवा पहा ना कशी असते ती ! सकाळीं सारें आभाळ झाकलेलें ! दुपारीं अंगाचीं कारंजी होतात आणि संध्याकाळीं गार वारा लागतो ! रात्रीं असाच वाऱ्याचा खेळ ! घटकेंत वारा इतका बंद होतो कीं श्वासोच्छ्वास सुद्धां बंद व्हावयाची वेळ येते, तर घटकेंत असा वारा सुटतो कीं घरें सुद्धां उडून जातील असें वाटतें ! घर पडेल म्हणून बाहेर यावें म्हटलें तर लागलीच सर्दी व्हावयाची ! काय–करावें काय या वाऱ्याला ?

यशोदा : असें वाऱ्याशीं भांडून काय होणार ? हें सारें बाहेरचें आहे आणि त्यानेंच इकडे असें वाटतें !

अण्णा : कसलें आलें आहे कर्माचें बाहेरचें ?

यशोदा : नाहीं म्हणून कसें चालेल? परवां का कालच वाटतें, कोपऱ्यांत तेलाचा डबा होता आणि सकाळीं बघतें तों डबा आपला आंगणांत !

अण्णा : अग, उडाला असेल या वाऱ्यानें !

यशोदा : तसेंच, परवां पहांटे पहांटेस गोठ्यांत सारखी खडबड आणि सकाळीं कपिलेनें दुधाचा एक थेंब दिला असेल तर शपथ !

अण्णा : वाऱ्यानें वासराचें दावें तुटलें असेल, नाहीं तर या उन्हानें गाय आटली असेल झालें !

यशोदा : कांहीं नाहीं, वेणूला पाहिलें तर काल आपली एकदम उचकीच लागली; घटका झाली, दोन घटका झाल्या, उचकी आपली तशीच ! नाना उपाय केले; पण ज्याचें नांव तें ! अखेर अंबाबाईच्या नांवानें अंगारा लावला; म्हटलें चुकलें, कांहीं चूक झाली असेल तर आईनें पदरांत घ्यावी ! झालें घटकेंत उचकी बंद !

अण्णा : बाकी ती आतांशा फारच झुरणीस लागल्यासारखी दिसते.

यशोदा : पहावत नाहीं पोरीकडे ! कसली गेंदासारखी पोर, पण फाट्यासारखी झाली आहे बघतां बघतां ! खाणें नाहीं, पिणें नाहीं ! इकडे पोरीची ही दशा आणि तिकडे लोकांचीं घालून पाडून बोलणीं ! नकोसा झाला आहे जीव ! कुणी म्हणतात पोरीनं लग्नाची धास्ती घेतली आहे तर कुणी म्हणतें तिचें मीठ तोडलें आहे !

अण्णा : धास्ती कसली आणि मीठ कसलें ? तिला मुळीं पहिल्यापासूनच क्षयाची भावना आहे !

यशोदा : आतां बोललें तर येईल राग ? क्षय नाहीं, खोकला नाहीं; हा सारा बाहेरचा आहे ! म्हणून हे सारे खेळ होताहेत.

अण्णा : पण बाहेरचा व्हायला आम्हीं काय कुणाचें खाल्लें आहे ?

यशोदा : आज सकाळींच मी पिलंभटाचा देव खेळविला, देवानें स्पष्ट सांगितलें, कीं करंजगांवच्या विहिरीवर तुझी मूल तिनीसांजची न्हाऊनमाखून, डोकींत गजरा घालून गेली होती तिथें तिला बाहेरचा पायरव झाला. तसा मागें मी एकदां अंबाबाईला गोंधळ बोललें होतें तो कांहीं अजून घातला नाहीं त्याची ही सारी घरांत नड आहे !

अण्णा : तुला नाहीं उद्योग आणि त्या पिलंभटालाहि नाहीं उद्योग ! घाला गोंधळ झालें; पण घरांत कुणाचें औषध मात्र बंद करूं नका !

[ मधुकर व पिलंभट येतात. ]

मधु : अण्णा, देऊन आलों वसंतरावांची पत्रिका आजोबांजवळ!

पिलं : हें पनवेलकरांचें क्षीणामृत वेणूताईसाठीं! या माधवरावाच्या कफपित्त-वातनाशक गोळ्या दिल्या आहेत भाऊशास्त्री घाट्यांनी! आणि हीं तुमच्या-काढ्यांचीं औषधें! पिंपळी, हिरडा, बेहडा, कोष्टिकोळिंजन, धमासा, पित्तपापडा, वावडिंग, डिकेमाली.

अण्णा : भले शाबास! पण, पिलंभट, जीर्णज्वर कांहीं हटत नाहीं अजून! पहा, बरें, आहे का आतां ताप!

पिलं : (नाडी पाहून) ओ, हो, हो, पुष्कळ ताप आहे अंगांत. काढा बदलला पाहिजे असें वाटतें!

यशोदा : (अण्णांच्या अंगाला हात लावून) कुठें, आहे कुठें ताप! उगीच पराचा कावळा करायचा झालें.

अण्णा : अग, नाही कसा ताप? काल्पासून अंगांत कणकण आहे नी म्हणे ताप नाहीं! काल रात्रीं आंचवायला बागेंत गेलों आणि जरा बोलत उभा राहिलों जरासा उघड्या अंगानें वाऱ्यांत; तेव्हां मन कचरलें! आणि म्हणे ताप नाहीं!

यशोदा : मग हाताला लागत नाहीं कुठें माझ्या?

पिलं : बाईसाहेब, हाडीज्वर हाताला कसा लागणार? बोलून चालून चोरटें दुखणें हें. त्यांतला दरदी असेल त्यालाच कळायचें!

अण्णा : (कण्हत) अहाहा, काय पाठींत कळ आली पाहा.

पिलं : ही झुळूक आली ही, वाऱ्याची, तिनें!

मधु : बरें; अण्णा, पत्रिकेचें तसेंच राहिलें! वसंतरावांची—

अण्णा : वसंतराव, वसंतराव, पाळ का करून घालायची आहे वसंतरावाची! छप्पन्न वेळा सांगितलें आणि आतां पुन्हां सांगतों एकदां, कीं तो सोन्यानें भरला असला तरी मला त्याला मुलगी द्यायची नाहीं!

यशोदा : पण उगीच का जिवाचें पाणी करून घ्यायचें तें! तिनें ज्याचे तीळ-तांदूळ खाल्ले असतील तो येऊन आपण होऊन घेऊन जाईल तिला. आपण कशाला उगीच संताप करून घ्यायचा?

अण्णा : तसें नव्हे; मीं एकदां सांगितलें कीं मीं वेणू बाळाभाऊला देणार, त्याच्या वडिलांना माझें वचन गेलें आहे तें कांहीं मी मोडणार नाहीं आणि बाळाभाऊनें आपण होऊन नको म्हटलें तर दुसऱ्या एखाद्या वैद्याच्या घरीं देईन! पोरीला क्षय आहे, तिला वैद्याच्याच घरीं दिली पाहिजे.

यशोदा : बाळाभाऊचें ठिकाण कांहीं वाईट नाहीं; आज इतके दिवसांचा नाद आहे आणि मुलगाही माहितीचा ! आतां अंमळ मुलगा आहे बसवया बांध्याचा आणि पोरीची जात पडली उफाड्याची. म्हणून वरणभात व्हायची भीति आहे थोडीशी, पण तेवढ्यावर कांहीं हातचें स्थळ घालवायला नको !

मधु : पण जें करायचें तें जरा विचारानें केलें तर बरें नाहीं का ?

यशोदा : अरे सारें खरें; पोरीला सुख लागलें पाहिजे; मुलगा हाताचा धड पाहिजे,—

पिलं : नाहीं तर आपली हातातोंडाशीं गांठ.

यशोदा : हो; सगळें खरें; पण करायचें कसें ! पोरीचें बाशिंगबळ असें कीं आजवर लग्नाचें नांव सुद्धां निघायची पंचाईत. आतां कुठें हातातोंडाश गांठ पडते तोंच हीं कुसपटें कशाला हवींत ? कुठून तरी पोरीला हळद लागली म्हणजे मिळविली असें झालें आहे. थोरापोरीं बोलबोलून नकोसें केलें आहे मला.

मधु : पण, आई, लोकांसाठीं का लग्न करायचें आहे ? उगीच एखाद्या उडाणटप्पूला धरला आणि दिली पदराला गांठ तर तिकडून पुन्हा लोक नांवें ठेवणारच.

अण्णा : आतांच्या लोकांना भारी समजायला लागलें. आम्ही यांच्या वयाचे होतों पिलंभट, पण वडिलांचे समोर बोलण्याची प्राज्ञा नव्हती कधीं. कांहीं मागणें-खवरणें झालें तर तें सुद्धां चिठ्ठीनें, तोंडांतून म्हणून ब्र निघायचा—नांव कशाला पाहिजे !

पिलं : हल्लीं सुद्धां आम्हीं पाहात नाहीं का प्रत्यक्ष ! तात्यासाहेबांच्या तोंडीं लागतांना आपण अण्णासाहेबांना अजून तर कांहीं पाहिलें नाहीं. अगदीं खांभाच्या पिंडीवर हात मारून सांगावें कुणी यांतलें एक अक्षर खोटें असेल तर !

अण्णा : तात्यांची मर्जी निराळी दिसली अंमळ कीं आमचें आपलें माघार घ्यायचें ठरलेलें; पण आमचे चिरंजीव पाहा.

मधु : अण्णा, तुम्हांला येतो राग, पण कांहीं वेळाच अशा असतात.

यशोदा : ऐक रे, मधु, भारी तोंड तुला, आपला साधारण कल पाहिला; सोडून दिली गोष्ट, सर घोड्या पाणी खोल, उगीच तोंड करायचें कारण काय ?

मधु : आई, आतां तोंड न केलें तर उद्यां लोक तोंड काढूं देणार नाहींत कुठें. तुला सांगितलें ना नाटकमंडळींत काय चाललें होतें तें, अशा वेड्यापिराच्या गळ्यांत पोर बांधली तर लोक काय म्हणतील ?

अण्णा : अरे, नाटकमंडळींत गेलें आलें एखादे वेळीं म्हणून काय होतें त्यानें? पोरपण आहे, होतोच असा हूडपणा थोडा माणसाच्या हातून! आम्ही लहान होतों तेव्हां किर्लोस्करांचें नाटक नवीनच निघालें होतें; आम्ही खुशाल जात येत होतों. अण्णा मोठा योग्य पुरुष! लाख मनुष्य! शरीरानें असा सुदृढ असे कीं हा एकेक दंड! कधीं ताप नाहीं, खोकला नाहीं; कांहीं नाहीं.

पिलं : बः अण्णाची गोष्ट कशाला! हजारों माणसांचा पोशिंदा तो! अत्तराचे दिवे जाळलेत त्यानें! भटाभिक्षुकाला मुठीनें पैसे द्यावे त्यानें. आल्यागेल्याला, गोब्राह्मणाला खेळ पहायची सदर परवानगी! आतांचे नाटकवाले कसले भुकेबंगाल! कुणाला फुकट सोडतील का नाटकाला? नांव कशाला? अण्णाची गोष्ट कशाला?

अण्णा : त्यांचा आमचा मोठा घरोबा! पण म्हणून माणसांतून का उठून गेलों होतों? त्यांतलेंच बाळाभाऊचें काम! आस्ते आस्ते संसाराचें ओझें पडूं लागलें कीं तितकें राहात नाहीं तें वारें. बरें, हा वसंतराव तरी काय असा लागून गेला आहे मोठा? त्याचे तरी काय हात लागले आहेत आकाशाला?

मधु : काय वाईट आहे वसंतराव? आपल्या दादासारखी त्याची सुद्धां वकिलीची परीक्षा झाली आहे!

यशोदा : मग यांनीं काय दिवे लावले एवढें शिकून, तर त्यानें लावायचे राहिले आहेत? शिवाय आमच्या मुलीला माहेरकरांचें वळणच निराळें! देव नाहीं, धर्म नाहीं; शिवण नाहीं टिपण नाहीं! त्या मुलाचे गुण तर कांहीं विचारूंच नका! तुम्ही पाहिलेच असतील आपल्या मधूच्या लग्नांत, पिलंभट!

पिलं : हो, न पाहायला डोळ्यावर भात का बांधला होता माझ्या? बाई, शिकलेले लोक ना हे!

यशोदा : अहो, शिकलेले झाले म्हणून काय झालें! आमचीं मुलें नाहींत का शिकलेलीं? पण शिकण्याशिकण्याच्या परी आहेत ना?

पिलं : आमच्या मुलांची गोष्ट कशाला पाहिजे? मधु-माधवांच्या एवढाल्या परीक्षा झाल्या पण कधीं बुवा पायरीला पाय लावतील? जीभ कापून देईन मी आपली हवी तर! लौकिक केवढा, अगत्य काय माणसाचें! केव्हांही पानतंबाखूला चार सहा आणे मागा; नाहीं म्हणून नाहींच निघायचें एकाच्या तोंडांतून! तेंच याच्या जवळ कधीं मागितलें—मागतो कोण आधीं. आपण तर त्यानें एकदां नाहीं म्हटल्यापासूनच कानाला खडा लावला आहे! पण एकदां म्हटलें संकल्प सांगतों, उदक सोडा; म्हणे, आम्हांला संकल्प नको; म्हटलें

तशीच दक्षणा द्या. धर्माला पाठ देऊं नये अशी! म्हणे, धर्म आंधळ्या-पांगळ्यांना करावा. तात्पर्य काय, अखेर दक्षणा दिली नाहीं, साफ नाहीं म्हटलें!

यशोदा : तें असो; पण मधूच्या लग्नांत वसंतराव करीत होता विडे आणि चुना होता थोडासा कोरडा. या मुलानें पाणी घेतलें हातीं तेव्हां म्हटलें मामाच्या भाच्यानें चुन्यांत पाणी घालूं नये; तर म्हणतो त्यानें काय व्हायचें आहे? खुशाल त्यानें पाणी टाकलें चुन्यांत! झालें, म्हटलें तर, शनवारीं आदरून दूध घ्यायचें, भरल्या घरांत दिवे लावतांना जेवायला बसायचें, असें नाहीं तें करायचें.

पिलं : तसेंच वरातीच्या वेळीं माझा देव खेळविला ना तुम्ही आणि देवानं मधुकरावरून उतरलेला नारळ, यानें घेतला तो हातीं. म्हटलें हा उतरलेला नारळ हातीं घेऊं नये, द्या इकडे, मी करतों त्याची व्यवस्था. त्यानें तिथल्या तिथें फोडला नारळ आणि हंसत हंसत खाऊन टाकला.

यशोदा : छे ग बाई, मी नाहीं द्यायची माझ्या पोरीला असल्या मुलाला! साराच मेला भ्रष्टाकार!!

अण्णा : आणि शरीरानें तरी काय आहे? बरगडीन् बरगडी मोजून घ्यावी मुलाची! मला वाटतें त्याला क्षयाची बाधा असावी!

पिलं : हो, हो, आहेच ना! कालच मीं त्याला खोकतांना पाहिला. खोकला म्हणजे क्षयाचें मूळ आहे. येरव्ही यायचाच नाहीं. (अण्णासाहेब खोकतात.) नाहीं तर हें खणखणीत खोकणें पाहा. खोकण्याखोकण्याच्या तरी परी आहेत. त्या पोराचें शरीर काय आणि खोकणें काय?

अण्णा : छे, हो, अगदींच पाप्याचें पितर. पोरीला काय डोळे झांकून विहिरींत का लोटावयाची आहे?

मधु : (स्व.) बिचाऱ्या वसंतरावाचे ग्रह कांहीं ठीक दिसत नाहींत! (पाहून) झालें, हे तात्या आलेच! यांचें कांहीं निराळेंच असेल आणखी.

[ तात्यासाहेब व माधव पत्रिकांचीं भेंडोळीं घेऊन येतात. ]

माधव : हं, हीं घ्या पत्रिकांचीं बिंडाळीं सारीं. (खालीं टाकतो.)

तात्या : अरे, अरे, माधव, पत्रिका ना त्या वेड्या! अशा टाकूं नयेत त्या!

पिलं : हो, जन्मजन्माचा संबंध त्यांत. एखाद्या पत्रिकेंतला एखादा ग्रह या घरांतला या घरांत लवंडला तर फट् म्हणतां ब्रह्महत्या व्हायची.

तात्या : वः पिलंभट, वसंतरावाची पत्रिका घेऊन मी तुमची वाट पाहात बसलों.

म्हटलें आतां याल, मग याल अखेर कंटाळून मीच आलों माधवाबरोबर पत्रिका घेऊन इकडे.

पिलं : मी गेलों अण्णासाहेबांचीं औषधें आणायला! त्यांचा जीर्णज्वर आज जरा बळावला आहे!

तात्या : आतां काय सांगावें या लोकांना? अरे, औषधं घेऊन काय होणार कपाळ? जीर्णज्वर नाहीं आणि विषमज्वर नाहीं; ही सारी ग्रहांची पीडा आहे! यंदा आण्णाला मुळीं शनीची महादशा आहे!

पिलं : हो, हो, तरीच शरीर काळें ठिक्कर पडत चाललें आहे! शनीखेरीज काळसरपणा नाहीं. जपजाप्य करायला हवें उद्यांपासून.

मधु : बरें, तात्या, त्या टिपणांचें काय झालें?

तात्या : आज इतके दिवस घालविले तेव्हां अखेर दोन टिपणें घेणूच्या टिपणाशीं जमतातशीं आढळलीं. अगदीं झाडून जुन्यापान्या साऱ्या कुंडल्या पालथ्या घातल्या! ही विक्रमाची; ही काशीकर गागाभट्टाची! ही थोडीबहुत जमते. पण त्याला मरून झालीं अडीचशें वर्षें! आतां ही हिंदुस्थान देशाची आणि ही बाळाभाऊची कुंडली. या दोन्ही मात्र जमतात.

पिलं : तेव्हां त्यांत बाळाभाऊच बरे. हो, हिंदुस्थान देशाशीं तर लग्न नाहीं लावतां येत.

मधु : पण ती वसंतरावाची नाहीं जमत कुंडली?

तात्या : मुळींच नाहीं. ती तर अगदींच जमत नाहीं. फारच भयंकर योगायोग!

मधु : साधारण जमत असेल तर पाहा. अगदींच फार बारकाईनें—

तात्या : छट्, वेड्या नांव सुद्धां काढूं नकोस त्या मुलाचें! त्याच्या लग्नीं राहू, केंद्रांत मंगळ, त्रिकांत शनि असे सारे ग्रह अनिष्ट पडले आहेत. काय सांगूं तुला, अरे, त्याच्या गळ्यांत लग्नाची माळ पडल्याबरोबर त्याला मृत्यु येणार. अगदीं मृत्यु ठेवलेला.

पिलं : मी म्हणतों निदान अपमृत्यु. अपमृत्यूला तर मरण नाहीं ना?

अण्णा : आणि हीं पाप्याचीं पितरें अपमृत्यूनें सुद्धां मरायचीं!

पिलं : तर काय? यांना मरायला मृत्यूच कशाला हवा! खरें कीं नाहीं माधवराव?

माधवराव : कशाचा मृत्यु आणि कशाचा जन्म. हे सारे या स्थूल देहाचे विकार आहेत. अंतवंतं इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः॥ आत्म्याला या उपाधि मुळींच नाहींत. आत्मा अविनाशी, अविकारी अनंत असा आहे. त्याला नाश नाहीं. नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः। न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति

मारुतः ॥ पंचवीस तत्त्वांचा मेळ म्हणजे देह. मात्र, वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥ तशांतला आत्मसंक्रमणाचा प्रकार. मायाभ्रमानें मूढ जीव त्याला मरण म्हणतात. बाकी खरें पाहतां, आत्मा अमर आहे. 'नायं हंति न हन्यते !'

यशोदा : माधव हें रे काय बडबडणें? एकुलत्या एक बहिणीच्या लग्नाचें घाटतें आहे आणि—

माधव : बहीण, भाऊ, आई, बाप सर्व भ्रम आहे हा. का तव कांता कस्ते पुत्रः संसारोयमतीव विचित्रः । कस्य त्वं त्वा कुत आयातः । मी कोण याचा विचार केला पाहिजे ! संसार मृगजलवत् आहे. गेल्या जन्मींचीं बहीणभावंडें कुठें गलीं; पुढल्या जन्मींचीं आतां कुठें आहेत; हा सारा मायेचा खेळ आहे. 'अहं ब्रह्मास्मि' मी ब्रह्म, तूं ब्रह्म, तात्या ब्रह्म, आण्णा ब्रह्म—

पिलं : मीही ब्रह्म आहें; पत्रिका ब्रह्म आहेत; पैसा ब्रह्म आहे.

माधव : एकं सद्‌विप्रा तद्बहुधा वदन्ति ! तें शोधून काढलें पाहिजे ! ब्रह्म हविर्ब्रह्म भोक्ता ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम् !

मधु : दादा, जरा थांब. मुख्य कामाचा ब्रह्मघोटाळा होतो आहे सारा. तात्या, पत्रिकेवर इतका भरंवसा ठेवून कसें चालेल ? वेळ थोडी चुकली तर लागलीच जमीनअस्मानाचें अंतर पडतं भविष्यांत.

पिलं : हो, सरासरी आणि शतमान.

मधु : म्हणून म्हणतां कीं पत्रिकेकडे थोडें दुर्लक्ष केलें तर नाहीं का चालणार ? मुलगा चांगला आहे.

तात्या : भरतेंच कांहीं तरी. मुलगा चांगला आहे; पण लाभला पाहिजे ना ? विषाची परीक्षा पहायची कीं काय ? खुळा नाहीं तर. आजन्म मुका राहीन माझें बोलणें खोटें झालें तर !

पिलं : भलतेंच ! होण्यमाण कुठें चुकतें काय ?

यशोदा : शिवाय परतवेल होईल तें निराळेंच.

मधु : मग काय हा नाद सोडून द्यायचा ? दैव पोरीचें; दुसरें काय ?

अण्णा : चला; मधु, जा आणि बाळाभाऊला आतांच घेऊन ये.

मधु : जातां. काय करायचें ? मर्जी प्रभूची !

माधव : मधु, वेड्या, असा हताश काय होतोस ? काय करायचें तें केलें पाहिजे ! परिणाम कांहीं का होईना ?

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥

[ पडदा पडतो. ]

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ भिंतीवरून उडी मारून बाळाभाऊ येतात. ]

बाळा : काल मधुकरानें वेणूला पाहायला येण्यासाठीं मला बोलाविलें; पण अशा राजरोस रीतीनें येण्यांत काय अर्थ ? कुठल्याही कादंबरींत, नाटकांत नायक-नायिकेला त्यांच्या भावांचें किंवा बापाचें साह्य किंवा संमति मिळाली आहे का ? असें साह्य मिळतें तर कित्येक कादंबऱ्यांचा पहिल्या प्रकरणांतच शेवट झाला असता आणि बहुतेक नाटकें नाटकांतल्या पांच अंकांऐवजीं उजळणींतल्या पांच अंकांतच आटोपलीं असतीं ! प्रेमाची खरी लज्जत चोरटेपणांतच आहे; पण या अरसिकांना त्याची काय किंमत ? तिच्या–नाहीं, माझ्या प्रियेच्या बापाची, भावाची निदान आईची जरी आमच्या विवाहाला आडकाठी असती तर आमच्या या प्रीतिविवाहाला नाटकाचें किती सुरेख स्वरूप आलें असतें. तरी माझ्याकडून मी किती सावधगिरी ठेविली आहे. मोहनतारेंतल्या मोहनाप्रमाणें, प्रियेची बागेंत चोरून भेट घेण्यासाठीं या भिंताडावरून उडी मारून मी आंत आलों. किती त्रास पडला मला. माझा ढोपर फुटून पाय अगदीं जायबंदी झाला. मोहनचा कांहीं ढोपर फुटला नाहीं. नाटकांतले नायक भाग्यवान् खरे ! उड्या मारतांना त्यांचे ढोपर फुटत नाहींत, कित्येक जखमा लागल्या तरी त्यांना दुःख होत नाहीं. जेवणाखाण्याची त्यांना ददात नाहीं ! नाहीं तर हल्लींचें नीरस जीवित ! लेखणी करतांना चाकूनें हात कापला तरी असह्य वेदना होतात. उडी मारतांना ढोपरं फुटतात. पण नाहीं, असें भिऊन उपयोग नाहीं. प्रेमांत संकटें

तर यायचींच. (पाहून) अरे, पण माझ्या येण्याचें सार्थक झालेंसें वाटतें. कारण—

* ही सुरसुंदरी जणुं खालीं । उतरोनी भूवरि आली ॥
तीच ही गगनिंची रंभा उर्वशिकीं ।

पण, ही सुंदरी केर टाकण्याकरितां येत आहे, त्या अर्थी ही ती नसावी. कुठल्याही नाटकांत, काव्यांत, कादंबरींत, नायिका केर वगैरे टाकितांना दृष्टीस पडली नाहीं. ही तिची एखादी मोलकरीण. चुकलों, मोलकरणींना काव्यांत जागाच नाही—तिची एखादी दासी किंवा निदान सखी असावी! (निरखून पाहून) पण, छे, माझी शंका निराधार आहे! हीच ती माझी प्रिया. कारण—

* सुवर्ण केतकी परि जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा ॥
सडपातळ हा नाजुक बांधा खचित त्याच मृदुदेहाचा ॥ वगैरे

अरेरे, कोण भयंकर हाल हे! कोणत्याही सुंदर स्त्रीवर असा दुर्धर प्रसंग आला नसेल. ही सुंदरी केर टाकणार! परमेश्वरा, हें पाहण्यापेक्षां मी अंध का नाहीं झालों? हें काय पहायाचें नशिबीं आलें! प्रभु विचित्र किती तव चरित्र तर्क न कोणाचा चाले॥ कोमल शकुंतलेला झाडांना पाणी घालायला लावणाऱ्या त्या थेरड्या कण्वापेक्षां हिचा थेरडा फारच अविचारी असला पाहिजे. करूं का सूड घ्यायची प्रतिज्ञा? लाडके, सुकुमार वेणू, टाक, टाक तो केर खालीं; पण हें काय? या केराकडेच माझी नजर इतकी कां बरें लागत आहे? हं, मोहन-तारेंत तारेच्या हातांतल्या घागरीप्रमाणें आपणही फुंकलों गेलों असतों तर फार बरें झालें असतें असें मोहनला वाटलें तसेंच मलाही वाटत असलें पाहिजे. अहाहा, मी जर असा केर होऊन झाडलों गेलों असतों तर आणखी काय पाहिजे होतें? बा केरा, धन्य आहेस तूं. हा केर ज्या उकिरड्यावर पडेल तो उकिरडा धन्य, त्याच्यावर लोळणारा गाढव सुद्धां धन्य धन्य! त्रिवार धन्य! त्या केरांतला कागदाचा फाटका तुकडा मला प्रणयपत्रिकेसारखा वाटतो; त्यांतली धूळ हीच अंगारा. (तिच्याकडे पाहात राहतो.)

वेणू: (स्वगत) जरा कुणाचें पाऊल वाजलें कीं कोणी मला पहायला येत आहे असें मला वाटतें. वहिनीनें मला इतका धीर दिला खरा, पण तिचें बापडीचें तरी काय चालणार? असो, नशीब आपलें, जें व्हायचें असेल तें होईल. आतां देवासाठीं चार कळ्या तरी काढून ठेवाव्या.

(राग–पिलु. ताल–त्रिवट.)

वेणू: * कलिका करिती केलि का गणिति न नाशास कां? ॥ धृ० ॥

आत्मार्पण करुनी ईशा मजही सूचवीति कां? ॥ १ ॥

( फुलें काढूं लागते. )

बाळा : ( स्वगत ) आतां पुढें कसें व्हावें? अशांत हिच्यावर एखादें संकट येईल तर काय बहार होणार आहे; पण संकट तरी कोणतें येणार? सौभद्राप्रमाणें घटोत्कचासारखे राक्षस या कलियुगांत नसल्यामुळें तशीं संकटें येण्याचे मार्गच बंद झाले आहेत. निदान वीरतनयांतल्या शालिनीप्रमाणें एखादा वाघ येईल म्हणावें तर त्याचाही कांहीं संभव नाहीं. या घराजवळच्या बागांतून अरण्यांतल्या सिंहवाघांबद्दलची भूक कुत्र्यामांजरांवरच भागविली पाहिजे. हां! निदान शाकुंतलासारखा एखादा भ्रमर मात्र या बागेंत असेल कुठें तरी; पण त्याला या आतांच्या पोरी भितात तरी कुठें? त्याच्या गुंजारवानें आतांशा कोणी गुंगतही नाहीं. प्रेमाच्या बाजारांतल्या साऱ्याच पदार्थांचा भाव उतरल्यासारखा दिसतो. प्रणयीजनांच्या या गैरसोई परमेश्वर कधीं दूर करील तो सुदिन! ( पाहून ) आहा, ती एक माशी तिच्या तोंडापुढें येत आहे. माशी का असेना? बुडत्याला काडीचा आधार. व्हावेंच आतां पुढें ( पुढें होऊन माशी हाकलतो. वेणू दचकते. ) सुंदरी, भिऊं नकोस. काय ही तुझी स्थिति? सुंदरि,

* वेडनि पंकजपत्राचा पंखा घालूं का शीत वारा ॥ वगैरे

वेणू : आहे काय हा गोंधळ? आणि तुम्ही इथें आलां कसे?

बाळा : कसा आलों हें भगवान् कामदेवाला ठाऊक!

वेणू : म्हणजे?

बाळा : त्या पडक्या भिंताडावरून. येतांना माझ्यावर काय काय संकटें आलीं याची तुला कल्पनाही नसेल. काय सांगूं सुंदरी, माझा सदरा फाटला, धोतराला आखूड भरला, हा पहा माझा ढोपरही फुटला आहे; पण त्याचें काय आहे. प्रणयीजनांनीं संकटें हीं सोसलींच पाहिजेत!

वेणू : इतके सायास घ्यायचें कारण?

बाळा : कारण? कारण तूंच. तुझ्याखेरीज दुसरें कोण?

वेणू : काय मी? मीं काय केलें यांत?

बाळा : काय केलेंस? तूंच पहा बरें, सुंदरी!

* हें काय बरें त्वां केलें ॥ मृणालसममुक्तालतिकेतें । दावुनि जैसें हंस
बरातें । तैसें मम मानसजन्म्यातें ॥ बहु दूर विलोभुनि नेलें ॥ १ ॥

वेणू : मोठाच चमत्कार म्हणायचा! बरें, तुम्हांला यायचेंच होतें तर इतर रस्ते

का थोडे पडले होते ? घरांत यायचें होतें नीट !

बाळा : घरांत ! छेः प्रणयीजनांची पहिली भेट अरण्यांत निदान एखाद्या बागेंत तरी पडावी असा सिद्धांतच आहे ! अर्जुन सुभद्रेला भेटला तो अरण्यांत ! मोहनाने तारेला पाहिलें तेंही बागेंत ! दुष्यंत-शकुंतलेची भेट पहा, अरण्यांतच ! कामसेन रसिकेला भेटला बागेंतच ! एवढी जहांबाज त्राटिका; पण प्रतापरावाला बागेंतच भेटली ! फार कशाला, मतिविकार अगदीं आजकालचें नाटक ना ? त्यांत सुद्धां चकोर-चंद्रिकेची भेट तुळशीवृंदावनांत होते !

वेणू : असेल; पण अशा रीतीनें येतांना तुम्हीं सारासार विचार पहायाचा होता थोडा ? लोक काय म्हणतील तुम्हांला—

बाळा : सुंदरी, प्रेमवेड्याला लोकांची भीति कधीं असते का ? सारासार विचार पहावयाला किंवा लोकांची बोलणीं ऐकायला मला अवकाश नाहीं. कारण—

* प्रणय तरंगांसचें । विवश वाहतां जवें । जलरवें पाहवे गतिमुळें न ऐकवे ॥ योगबलें जणुं यति । बाह्यउपाधींप्रती । प्रणयीजन निवारती । खेद मुळिं न त्यां शिवे ॥ १ ॥

वेणू : इतकें प्रेम आहे तुमचें माझ्यावर ? मला नव्हतें हें माहीत !

बाळा : इतकेंच काय ! यापेक्षांही जास्त ! वेणू, सुंदरी—

* तुजविण वृथा गमे संसार । संसार सौख्य कुठचें ॥ ध्वनि ॥

वेणू : बरें, पण इतके दिवस हा तुमच्या प्रेमाचा उमाळा असाच राहिला अणि आजच त्याला असा पूर कशानें आला ?

बाळा : इतके दिवसांची गोष्ट निराळी ! आतां तरुणपणाची गोष्ट निराळी ! बाळपणींचा काळ निघून गेला तो ! त्या वेळीं " जें ब्रह्म काय तें मायबाप ही जोडी ॥ खेळांत काय गोडी ॥ " पण आतां ते खेळ नकोत, त्या आट्यापाट्या नकोत, ते बैदूल नकोत, ती लंगडी घालणें नको असें झालें आहे ! आणि तें कां म्हणशील तर–आलि कालिं या मज तरुण दशा ॥ निःशंकपणें रमणें गेलें प्रणयकेलि मज सुचती ऐशा ॥ धात्रीपूर्वी निधि वाटे तो सांप्रत गणती तरुणी प्रियशा.

वेणू : बरीच मनोरंजक आहे तुमची कहाणी ! बरें, झालें ना तुमचें पहाणें ? जातें मी आतां.

बाळा : ( तिला अडवून ) वाः हें काय ? चाललीस कुठें अशी तूं ? मी तुला जाऊं देणार नाहीं. नुसता तुला पहावयास मी आलों हा तुझा संशय खोटा आहे. सुंदरी, भूमिजल तेज नभ... ! पाणि तुझा सखे ॥ ( तिचा हात

धरतो. ती रागानें दूर जाऊन उभी राहते. )

वेणू : हं; खबरदार! अंगाला हात लावाल तर!

बाळा : ( स्वगत, विस्मयाने ) मला वाटलें होतें कीं माझे श्रम जाणून ही आतां मला आलिंगन देऊन सुभद्रेप्रमाणें ॥ बहुत छळियलें ॥ पद म्हणणार! पण ही तर संतापून दूर उभी राहिली! नाटकांतल्या मुख्य मुख्य खुब्या हिला ठाऊक नाहींत असें दिसतें! आमच्याकडे स्त्रीशिक्षण नाहीं त्याचे हे दुष्परिणाम! आतां हिचें समाधान केलें पाहिजे. ( प्रकट ) सुंदरी, अशी रागावूं नकोस! अशा वेळीं रागावणें म्हणजे अगदीं अरसिकपणा आहे! एकसुद्धां नाटक पाहिलें नाहींस वाटतें तूं? तरीच. म्हणून म्हणतों—नच सुंदरि करुं कोपा। मजवरि करि अनुकंपा ॥ ( वगैरे ) काय, अजून तुला माझी दया येत नाहीं?–

वेणू : ( स्वगत ) काय म्हणावें आतां या मूर्खपणाला? ( प्र. ) तुमच्याकडे पाहील त्याला तुमची दया येणारच म्हणा—

बाळा : ( आनंदानें ) झालें तर मग; कर टाकि सखे ग या कंठीं ॥ फिरविन हनुवटी। शिणविन तनुकटी ॥ ( वगैरे )

वेणू : ( स्वगत ) या स्वारीला बेतानेंच जायला लाविलें पाहिजे. ( प्र. ) हें पहा, तुमच्या आवडत्या नाटकांतलाच मी तुम्हांला एक प्रश्न विचारतें! आतांच तुम्हीं म्हटलें ना कीं मीं एकही नाटक पाहिलें नाहीं म्हणून तें पुष्कळसें खरें आहे आणि तुम्ही तर असे रसिक! मग तुमची शारदा म्हणते त्याप्रमाणें रेशमाच्या शेल्याला सुताच्या दशीप्रमाणें मी तुम्हांला शोभलें तर पाहिजे ना? तेव्हां हा नाद तुम्ही सोडून द्या! तुमच्यासारखी एखादी रसिक मुलगी पाहून तिच्याशीं लग्न करा!

बाळा : ठीक विचारलेंस! असेंच शालिनीनें शूरसेनाला विचारिलें तेव्हांचें त्याचेंच उत्तर तुला देतों! वेडे.

* अशि ही सगुणखनि देह त्यजोनी। जगिं या दिसोनी न येईल कुणी। शरश्चंद्र अतिनिर्मल जैसा शोभवि तारागार ॥ विमल देहीं शुद्ध आत्मा तेविं करित सुविहार ॥ निरखोनी, विदेही मुनिही मतिहीन होई ॥१॥

असा मूर्ख-अंध-वेडा; पुढें शालिनीचें वाक्य आहे! दुसरी रसिक मुलगी आतां पाहणें म्हणजे प्रेमाला हरताळ लावण्यासारखेंच आहे! पुष्कळदां नायिके-पेक्षां दासींचीं सोंगें सुरेख दिसतात; परंतु कोणत्याही नाटकांतला नायक तिकडे ढुंकून पाहायचा नाहीं आणि प्रियेचे दोष त्याला गुणासारखेच वाटतात. कारण अनिवार मनुज करि अंतरीं ज्या वस्तुवरी प्रीति ( वगैरे ) म्हणून म्हणतों,

लाडके, आतां अंत पाहूं नकोस! ये अशी, बैस मजसरशी! नाहीं कुणी दुसरें ॥ कां शंका धरिशी बिंबाधरे ॥

वेणू : (स्व०) छेः हें वाढतच चाललें! आतां आटपतें घेतलेंच पाहिजे. (प्र.) मी मघापासून पाहतें आहें; लाज नाहीं वाटत तुम्हांला असें भलभलतें बोलायला! जनलज्जा, मनलज्जा कांहीं वाटूं द्या थोडी!

बाळा : सुंदरी, कां रागावतेस आतां उगाच? रागावण्याचा काळ गेला.

* जें जें तूं बोलसी तें मजला का श्रुत नसे ॥
परि त्याचें काय आतां मज भरलें स्मरपिसें ॥

म्हणून आतां मी तुझें मुळींच ऐकणार नाहीं! माडिवरि चल ग गडे जाऊं झडकरी! नाहीं तर हा अस्सा मी सोडीत नाहीं!

वेणू : चला, व्हा दूर! शरम नाहीं वाटत तुम्हांला! एवढें वय वाढलें त्याची कांहींच का लाज नाहीं?

बाळा : आतां मलाही राग आवरत नाहीं! फार वेळ तुझें बोलणें ऐकून घेतलें मी! तुझ्या बापानेंच मला इथें बोलाविलें आहे! पाहूं बरें आतां काय करतेस ती—वेणू—अजवरि हेका। धरुनि अनेका ॥ (वगैरे.) (तिचें चुंबन घ्यावयास जातो.)

वेणू : (घाबरून) धांवा हो धांवा! दादा, अहो अण्णा!

बाळा : बोलाव, कोणालःही बोलाव! मी सुद्धां आतां कीचकासारखा बेफाम झालों आहें! येऊं देत, तुझे दादा येऊं देत; अण्णा येऊं देत; भीम येऊं देत; अर्जुन येऊं देत!

* कोण येतो तो पाहतों मजसि माराया।
प्राण त्याचा प्रथम घेतों कोप शमवाया
युवतिकुंकुमतिलक पुसुनी पुसुनि नंतर या। (तिचें कुंकू पुसतो)
शुद्धबीजांकुर नर हा सिद्ध झाला या ॥

(एकदम थबकून) अरेरे, काय अविचार करीत होतों मी? कोणत्याही नायकानें अजून असा अत्याचार केला नाहीं! प्रणयिनीनें धिक्कार केला तर फार झालें तर मूर्छित पडायचें! नायिकेला त्रास प्रतिनायकानें द्यायचा! जा वेणू, जा. नाटकाच्या नियमाबरहुकूम मला आतां मूर्छितच पडलें पाहिजे. (ती जाते) हाय ॥ गेली प्रिया गेलि गेली प्रिया गेलि गेली ॥ हर हर! शेवटची साकी सुद्धां मला उंच सुरांत म्हणवत नाहीं.

* पाषाणापरि मस्तक झालें स्पष्ट दिसे ना कांहीं ॥

भ्रम पडलासे वाटे मतिला अंगहि हालत नाहीं ॥
जिव्हा जड पडली प्रिये ये— ॥ ( मूर्छित पडतो )

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ यमुना, मधु व वसंत ]

यमुना : मग काय ? हो म्हणायचें ना ? वसंतदादाचा विचार कांहीं वावगा नाहीं !

मधु : वावगा नाहीं खरा; पण जर बाजू अंगावर आली तर मात्र फजीतीला पारावार नाहीं ! बाळाभाऊची नाटकी तऱ्हाच ही ! चोंहीकडे हसें होईल फसगत झाली तर !

वसंत : समजलें ! प्रयत्न करून पाहायचा, बोलूनचालून वेड्यांचा बाजार हा ! साधलें नाटक; नाहीं तर प्रहसन आहेच पुढें !

मधु : साधला तर ठीक आहे प्रयत्न; पण—

यमुना : पण नको नी बीण नको ! घरांतल्या माणसांनाच काय हंसायचें ? इकडे सुद्धां संशयाचें वेडच आहे, नाहीं तर काय ?

वसंत : पहा, एका कामांत दोन कामें होत आहेत ! जबाबदारी सारी माझ्यावर !

मधु : तो नाटकांतला तात्या इतकें सारें करणार कसा ? त्याला असा मुलगा कोण मिळणार ?

वसंत : तें तर मी हां हां म्हणतां जमवून आणीन. पंचाईत आहे जरा या दुसऱ्या कामाची. रमाबाई गांवीं येणार कशा ?

यमुना : दादा, त्याची नको तुला काळजी ! तें माझ्याकडे लागलें. जाऊबाईंना मी सांगेन सारें समजावून, आपलें कल्याण होतें आहे तिथें अडथळा कोण करणार ?

मधु : मग काय ? करायचें म्हणतां असें ?

वसंत : अगदीं कांहीं हरकत नाहीं, पिलंभटाला पैशानें सहज विकत घेतां येईल.

मधु : पण मी त्याला नाहीं विचारणार. एखादे वेळीं तो कबूल न होतां, सा·. रहस्य उघडकीस आणूं लागला तर तोंड दाखवायची पंचाईत पडेल मला ! तो पुरा आपलासा होईपर्यंत या गोष्टींत माझें अंग आहेसें त्याला कळतां कामा नये.

( राग–बागेश्री. ताल–एकताल )

* सहजची तो भेद करील, मार्ग हा बरवा ॥ धृ० ॥

अतिलोभी भिक्षुक तो पाडिल फशिं-मजला ॥ १ ॥

यमुना : मग काय रे दादा, कसें करायचें ? इकडचा स्वभावच असा पडला.

वसंत : मी विचारतों त्याला; मग तर झालें ना ? त्याच्याकडे कामें दोन, एक ही घरांत उंदीर मेल्याची बातमी पसरवावयाची आणि दुसरें रमाबाईना घेऊन गुपचिप तुमच्या गांवीं जायचें. हो, आणखी मी बैरागीवेषानें तुमच्या गांवीं आलों म्हणजे माधवरावांजवळ, अण्णासाहेबांजवळ माझी निरनिराळी स्तुति करायची.

मधु : तुमच्या या घरगुती सौभद्रांतला गर्गमुनिच म्हणावयाचा ! त्या बाळा-भाऊला हसतां हसतां तुम्ही सुद्धां त्याच वळणावर जात चाल्लां हळूहळू !

वसंत : खरें म्हणाल तर सौभद्रावरूनच मला ही युक्ति सुचली. त्यांतल्या त्यांत म्हटलें माधवरावही ताळ्यावर आले तर पाहूं. रमाबाईची आणि माधवरावांची एकदां गांठ पडली म्हणजे माधवरावांचें वैराग्य खात्रीनें लटपटणार.

यमुना : खात्रीनें. बायकांचें बळच असें आहे.

( राग–हमीर. ताल–एकताल. )

* अबला आम्हीं प्रबला, चकुनि भ्रमुनि अलि येतां,
कमलिनि बद्धचि करि त्याला ॥ धृ० ॥
प्रेम-पाशबंधन-कर गळां पडतां, सुटका कधीं न कुणाला ॥ १ ॥

पुरुष एकदां का हातीं सांपडले म्हणजे सुटावयाची आशाच नको.

वसंत : मधुकरांना तर त्याचा अनुभव आहेच म्हणा !

यमुना : आणि तुला कुठें नाहीं ? बन्संसाठींच ना तुझी सारी खटपट ? इकडे संन्यास तर नाहीं ना घ्यावा लागत माझ्याखातीं ?

मधु : बरें, ठरलें ना सारें ?

वसंत : ठरलें, पण घरांत उंदीर पडल्याबरोबर अण्णासाहेब गांवीं जायला निघतील ना ?

मधु : अगदीं सहकुटुंब सहपरिवारें पहिपाहुण्यासुद्धां. घरांत पाणीसुद्धां पिऊं

देणार नाहींत मग ते कोणाला. तडक गांवचा रस्ता धरतील.

वसंत : आणि गांवीं पोचतांच तुम्हीं तें औषध खुबीनें त्यांच्या पायाला लावायचें म्हणजे आपोआप वळंधा येईल.

मधु : काय काय होतें बघूं या आतां ! घोडामैदान जवळच आहे.

वसंत : आपल्याला एखादा चाबकाचा फटका खाण्याची पाळी न येवो म्हणजे झालें. बरें जातों मी आणि करतों सारी व्यवस्था.

मधु : ठीक आहे. मला कळवा मात्र तावडतोब.

[ जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ पिलंभट प्रवेश करतो. ]

पिलंभट : ( स्वगत ) एकदां कुठें पार्वती रावणाच्या हवालीं केली म्हणून शंकराला लोक भोळा शंकर म्हणतात; पण त्यांत काहीं अर्थ नाहीं. स्त्रीदानांत खरीं भोळीं दैवतें दोन. एक विष्णु आणि दुसरें गणपती. एकानें लक्ष्मी आणि दुसऱ्यानें सरस्वती साऱ्या जगाची मालमत्ता म्हणून मोकळ्या सोडल्या आहेत. चोरापोरांच्या सुद्धां हातांत त्या सांपडावयाच्या ! माझीच गोष्ट पाहा ना, आज इतकीं वर्षें या इनामदारांच्या घरच्या लक्ष्मीशीं खुशाल हवी तशी धिंगामस्ती करतों आहें. पैसा, पैसा म्हणजे बिशाद काय ? आणखी चार वर्षांत सोन्याचीं कवलें घालीन घरावर. नाहीं तर आमच्या वडिलांची कारकीर्द. घराला सोन्याचांदीचा विटाळ नाहीं. आम्ही दोन सोन्यासारखीं मुलें, तो शिंगमोडका सोन्या बैल आणि तो परसदारांतला सोनचाफ्याचा खुंट याखेरीज सोनें दृष्टीस पडायचें तें दसऱ्याच्या दिवशीं आपट्याच्या पानाचें. याउपर सोन्याचें नांव नाहीं घरांत. नाहीं म्हणायला आमची आजी वारली तेव्हां मात्र कोणी कोणी म्हणाले कीं, " तिचें काय वाईट झालें ? सोनें झालें तिचें. " मग का ती सोनामुखी फार खात होती म्हणून म्हणाले कुणास ठाऊक. आम्ही लहान; गेलों तिसरे दिवशीं रक्षा उपासायला. पाहातों तों भट्टींत हीणकसच फार ! मूठभर अस्थि मात्र सापडल्या. त्या नेऊन वाईस पोंत्रविण्याच्या भानगडींत,

आटलेलें सोनें सांपडण्याऐवजीं खर्चाच्या पेचानें चांगली चांदी मात्र आटली! ही बाबांच्या संसाराची कहाणी! तेंच आतां पाहा! ज्योतिष, वैद्यक, देव खेळविणें; होय आहे, नाहीं आहे, निरनिराळ्या मार्गांनीं इनामदारांच्या घरांतून पैसा येतो आहे! समुद्राला जसे चहूंकडून नद्यांचे ओघ मिळायचे तसा संपत्तीचा ओघ निरनिराळ्या मार्गांनीं आमच्या घराकडे वाहतो आहे. येवढ्यानें इनामदारांच्या मनमुराद उत्पन्नाला तरी काय धक्का बसणार? कांहीं नाहीं; दर्यामें खसखस! भरल्या गाड्याला सुपाचा काय भार? आतां या वेणूताईच्या लग्नांत बरेंच चाचपडायला सांपडेलसें वाटतें. त्या वसंतरावाचें टिपणामुळें फिसकटलें–अरे वा! नांव काढल्याबरोबर स्वारी हजर [ वसंतराव येतो. ] या वसंतराव!

वसंत : पिलंभटजी, तुमच्याकडेच आलों आहें. थोडें काम आहे माझें.

पिलं : हं हं? काम आहे? मग आंधळयापांगळ्यांना बोलवा! दानधर्माला आंधळेपांगळे आणि कामाधामाला मात्र पिलंभटजी! असें रे कां बाबा? अरे, तुम्हां शिकलेल्या लोकांना लाजा नाहींत लाजा! साहेबलोकांच्या नादानें पूर्व विसरलांत! आतां काय काम अडलें आहे भटाभिक्षुकांशीं? जा, आतां जा साहेबांकडे, तेच तुमच्या पांचवीला पुजलेले.

वसंत : केलें आहे काय असें त्या साहेबांनीं तुमचें?

पिलं : काय केलें आहे? अरे पोथ्या नेल्या, पुस्तकें नेलीं, तुमच्या शेंड्या नेल्या, आणखी काय करायचें राहिलें आहे त्यांनीं? नाहीं म्हणायला तेवढा जानव्यांचा कारखाना कांहीं काढला नाहीं अजून! आतांशा तर म्हणतात, पापडलोणचीं सुद्धां येतात विलायतेचीं डब्यांतून! तेव्हां आतां कुठें तुमचे डोळे उघडताहेत! आतां भटजीची आठवण होते! म्हणे भटजी, माझें थोडेंसें काम आहे! लाज नाहीं वाटत तुम्हां लोकांना! बेशरम कुठले! तुम्हा शिकलेल्या लोकांना पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं एक कोरडा घेऊन मारावा फडाफड. ( वसंत कांहीं रुपये देऊं लागतो. ) तुमच्याबद्दल नाहीं म्हणत मी, या हुच्च शिकलेल्या लोकांची एक गोष्ट सांगितली! सारेच तसे नसतात! तुम्हीं झालां, आमचा मधु झाला, तुमची गोष्ट निराळी! तुमच्यासारखे धर्माचे आधार नसते तर ब्राह्मणत्व कधींच गेलें असतें रसातळाला! ( पैसे घेतो. )

वसंत : हा आपला नुसता विसार दिला तुम्हांला! देणगी अजून पुढेंच आहे! आतां होईल ना माझें काम?

पि लं : हें काय विचारणें ? झालेंच पाहिजे काम. नाहीं तर तुम्ही यजमान कशाचे आणि आम्ही आश्रित कशाचे ? आपल्या जिवावर आमच्या साऱ्या उड्या. गरीबांचे वाली आपण; आंधळ्यापांगळ्यांनाही पैपैसा दिला पाहिजे. आमच्या:-सारख्यांचाही हात भिजला पाहिजे. काम काय तें सांगा म्हणजे झालें. केलेंच म्हणून समजा.

वसंत : सांगतों, पण अगोदर यांतलें एक अक्षर कोठें बोलणार नाहीं अशी शपथ घ्या पाहूं !

पि लं : घेतों शपथ-पण-पण–

वसंत : कां घुटमळतां कां असे ? काम वाईटपैकीं असेल असें वाटलें कीं काय ?

पि लं : भलतेंच, वाईट काम आणि आपल्या हातून, असें कुठें झालें आहे ? तुम्हां शिकलेल्या लोकांच्या हातून वाईट कामें होणें नाहींत. साहेबलोकांच्या विद्येचा हा तर मोठा गुण. साहेबलोकांसारखे लोक मिळायचे नाहींत कुठें !

वसंत : मग काय अडचण आहे आतां ?

पि लं : अडचण एवढीच, बाकी अडचण कसली ती म्हणा ? आपण तेव्हांच तिचा निकाल कराल ! इतकेंच म्हणत होतों आतां ही जी कृपादृष्टि केली आणि पुढच्या देणगीबद्दल जो कांहीं मनांत संकल्प केला असेल, हो, आपण कुठले रहायला ? आणि तो संकल्पसुद्धां अव्वाच्या सव्वा असायचा हं, तर हें सारें काम करण्याबद्दल झालें ! आतां तें पुन्हां गुप्त ठेवण्याची जबाबदारी, भिक्षुकाची जीभ अंमळ लवचीकच ! काम करणें आमच्या मतें सोपें; पण तें गुप्त ठेवणें मोठें कठीण ! तेव्हां म्हटलें या दुसऱ्या अवघड कामगिरीबद्दल ?

वसंत : हं समजलों ! तुमचें तोंड बंद करण्यासाठीं पिशवीचें तोंड मोकळें करावें लागणार. ( पैसे देत ) बरें हें घ्या ! आतां झालें ना !

पि लंभट : आतां ही यज्ञोपवीताचीच शपथ ! या कानाचा शब्द या कानाला-सुद्धां कळणार नाहीं. कुणीं माझी जीभ तोडली तरी शब्द नाहीं निघायचा एक. सांगा खुशाल आपलें काम !

वसंत : करा कान इकडे, आजच्या आज घरांत एक मेलेला उंदीर टाकून त्याबद्दल बभ्रा करायचा ! आणखी दुसरें, एक दोन दिवसांत रमाबाईंना घेऊन करंजगांवीं जायचें. त्यांना अगदीं गुप्तपणें तुमच्याच इथें ठेवावयाच्या. ( भट तोंड वाईट करतो. ) खर्चाचा योग्य बंदोबस्त आम्हीं करूं. ( सुप्रसन्न होतो. ) पुढें लौकरच मी संन्याशाच्या वेशानें तुमच्या घरीं येईन. तेव्हां काय करावयाचें तें मधुकर, तुम्ही आम्ही मिळून ठरवूं.

पिलं : मधुकर आहेत ना या बाबतींत?

वसंत : तर, तुम्हीं बाईटरणाबद्दल शंकासुद्धां आणूं नका मनांत! इनामदारांच्या हितासाठींच ही खटपट आहे सारी. हं, मेलेल्या उंदराला शिवल्याबद्दल हें घ्या प्रायश्चित्तादाखल! ( रुपये देतो. )

'किती वैराग्य तुमचें! व्यर्थचि निंदा केली ॥ धृ० ॥
नच सौजन्यासि या तिळहि सीमा उरलि,
जगिं जन्मा-मृत्युसि जो ठेवी भेदा न मुळीं ॥ १ ॥

पिलं : [ घेत घेत ] आतां काय बुवा नाहीं कसें म्हणावें-शब्द कसा मोडावा?

वसंत : हं, लागा आपल्या कामाला! या गोष्टीची वाच्यता मात्र अगदीं बंद!

पिलं : हें पहा घातलें तोंडाला कुलूप!

वसंत : आतां तें चांदीच्या किल्लीनेंही उघडणार नाहीं ना! नाहीं तर कराल सारा घोटाळा, चला आतां लागा कामाला! ( जातात. पडदा पडतो. )

## प्रवेश चौथा

[ नाटक मंडळीच्या घरासमोरील रस्ता. तात्या व रघुनाथ. ]

तात्या : हे मधुकर म्हणायचे, ते त्या मुलीचे भाऊ आणि ते वसंतराव म्हणायचे, त्यांच्याशीं तिचें लग्न व्हायचें आहे! मुलगी आहे नक्षत्रासारखी आणि तिच्या बापानें तर बाळाभाऊला वचन दिलें आहे; तो "नाहीं" म्हणेल तेव्हां पुढची गोष्ट! आणि तो तर असा वेडापीर! म्हणून ही सारी खटपट करायची. नाहीं तर फुकट पोर बुडते बघ!

रघु : पण तात्या, हें मालकांना पसंत पडेल का? नाहीं तर म्हणतील तुला कोणी ही पंचाईत सांगितली होती म्हणून!

तात्या : अरे वेडाच आहेस! ते कशाला नको म्हणतात! यांत कांहीं वाईट का आहे? उलट परोपकार! आतां सांग येतल्यावर त्यांच्याशीं कसें काय बोलायचें हें सारें तुला सांगेन मग!

रघु : पण असें कसें बोलायचें बुवा भलतेंच!

तात्या : अरे लेका, रोज सोंगें नाहीं का घेत तुम्ही ? त्यांतलेंच हें एक सोंग. बरें ! जा तर आतां ! तो पाहा बाळाभाऊच येत आहे ! तर सोंगाची तयारी करून ठेव जा.

[ तो जातो व बाळाभाऊ येतो. तात्याला न पाहतां बाळाभाऊ विचार करतो. ]

बाळा : जगायचें कीं मरायचें ? हा एवढाच प्रश्न आहे ! जगणें-मरणें हीं दोन्ही सारखींच ! अखेर तिनें मला केराप्रमाणें झाडून लोटून दिला ना ? प्रियेनें माझा धिक्कार केल्यानंतर हें काळें तोंड कुठें दाखवूं ? कांचनगडच्या मोहनेंतल्या हंबीररावाप्रमाणें माझी दुर्दशा झाली आहे ! अरेरे, सुंदर वस्तूंची लयलूट कां बरें असूं नये ? नाहीं तर दुसऱ्या एखाद्या—काय हा पापी विचार ! हा अधम बाळाभाऊ आतां दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करणार ! धिक्, धिक्, काय करूं रे ? मला कोणी प्रतिस्पर्धीही नाहीं ! याही बाबतींत मी पुरा दुर्दैवी आहें ! परमेश्वरा, सूड घेण्याचें समाधानसुद्धां तूं मला देत नाहींस !

तात्या : बाळाभाऊ !

बाळा : ( दचकून, पण गंभीर आवाजानें ) कोणी हाक मारिली मला ? बोला, तुम्ही वेणू आहांत का ? ( पाहून ) कोण तात्या, माझा प्रिय मित्र तात्या ! ( त्याच्या गळ्याला मिठी मारतो. ! ) मित्रा, प्रियमित्रा तात्या, इतका वेळ कुठें रे होतास ? माझ्या कपिंजला ! या बाळाभाऊला—तुझ्या मित्र पुंडरीकाला विरहावस्थेंत टाकून तूं कुठें रे गेला होतास ? तात्या, प्राणमित्र तात्या ! अरे !

*कोण जगीं या तुजविण दुसरा मज विश्वासाचा ॥
मित्र जिवाचा कोण तुझ्याविण आश्रय शोधूं अन्य कुणाचा ॥
घालुनि पोटीं अपराधातें कोण करिल मज बोध हिताचा ॥

तात्या : बाळाभाऊ, काय हें ! धीर धरा ! धीर धरा गुरू, हें काय ?

बाळा : तात्या, आतां कशाचा गुरू. तात्या, तुमचा तो आनंदी, रंगेल बाळाभाऊ आतां कुठें आहे ? आतां मी गुरू नाहीं, कोणी नाहीं ! आतां धीर धरणार कशाच्या जीवावर ? शून्यचि भासे हें जग सारें नच उत्साह कसा तो ॥ ( वगैरे )

तात्या : या बोलण्यांत काय अर्थ आहे ? उठा ! हें शोभतें का तुम्हांला ?

बाळा : न शोभेना ! मला आतां त्याच्याशीं काय करायचें आहे ? मी आतां कोठेंतरी जाऊन आत्मघात करणार !

तात्या : काय आत्मघात ? महत्पाप, महत्पाप, महत्पाप !

बाळा : भगवान् नारदमुने–नाहीं, नाहीं प्रियमित्रा तात्या, आत्महत्या करूं नको तर काय करूं ? ठेवूनि प्राण करूं मी काय ! ऐसा हतभागी ॥

तात्या : पण काय झालें काय तें सांगा आधीं. माझ्यासारख्या मित्राजवळ सुद्धां सांगायचें नाहीं मग कुणाजवळ सांगणार ?

बाळा : ऐक तर मग ! मधुकर काळवरवां मला बोलविण्यासाठीं आला हें माहीत आहे ना ?

तात्या : हो, त्याच्या बहिणीला पाहण्यासाठीं तुम्हांला बोलावलें होतें ना त्यानें ?

बाळा : हो. पण मी तिला भेटतों तों निराळाच प्रकार ! मी तिचें पाणिग्रहण करतांच ती संतापली, तिनें माझा धिक्कार केला, मला दुरुत्तरें बोलली, माझ्या पवित्र प्रेमाला पायाखालीं तुडविलें !

तात्या : म्हणजे लाथ मारली कीं काय तुम्हांला ?

बाळा : नाहीं. माझा फार अपमान केला तिनें. अखेर मी मूर्छित पडलों हें पाहून ती राक्षसी बिनदिक्कत मनानें निघून गेली.

तात्या : अरेरे ! काय क्रूरपणा हा ! आणि तुम्ही ?

बाळा : मी तिथेंच मूर्च्छित पडून राहिलों ! त्या वेळीं मला तिथें वारा घालून सावध कोण करणार ? पुष्कळ वेळ वाट पाहिली कीं कोणी येऊन माझ्या हताश मनाचें समाधान करील म्हणून ! पण त्या भयाण वेळीं आणि भयाण अरण्यांत—

तात्या : अरण्यांत ?

बाळा : म्हणजे त्यांच्या त्या बागेंत कोण येणार ? मित्रा, तूं सुद्धां त्या वेळीं तिथें नव्हतास !

तात्या : पण अखेरीस उठलां कीं नाहीं ?

बाळा : अर्थात्; नाहीं तर इथें कसा आलों असतों ? उठलों खरा, पण तो कसा ? त्यांच्या माळ्यानें येऊन मला हांकलून दिलें; अगदीं हांकलून दिलें बरें ! तेव्हांपासून एक तासभर असा भटकत फिरतों आहें !

(तात्या डोळे पुसतात व रडतात.)

बाळा : पण तात्या, हें काय ? अरे बोलतां बोलतां–दृष्टि भरे जलभारें । का रे अनिवारे । सुहृदा रे ॥ वद कारण मजला सारें ॥

तात्या : हरहर ! इतका वेळ माझें लक्षच गेलें नाहीं ! काय दशा झाली आहे ही तुमची ! पंजर झाला अस्थींचा या सुरम्य देहाचा ॥

बाळा : (स्वगत) तर काय, मी रोडसुद्धां झालों आहें ! विरहावस्थेचीं सारीं

वर्णनें अक्षरशः खरीं आहेत तर मग! (प्रकट) काय म्हणतां मी रोड झालों आहे?

तात्या : रोड! अहो तुमच्या अंगांतून तुमचा सदरा कसा गळून पडला नाहीं याचेंच मला नवल वाटतें! कोदंड दोन तीन दिवसांत रोड झाला, शूरसेनाची "काय ही दशा" व्हायला एक दिवस लागला आणि पुंडरिकाचा वाळून कोळ व्हायला आठ प्रहर लागले; पण या सृष्टचमत्कारांवर तुमची ताण आहे! तुम्हीं एका तासांतच वाळून कोळ झालां! फिके तर इतके पडलां आहां कीं हे सारे नायक फिके पडतील तुमच्या दारुण विरहावस्थेपुढें. पण गुरु, तुमची टोपी कुठें आहे?

बाळा : मला माझ्या देहाचीही पर्वा नाहीं, मग टोपीची काय कथा? आतां मला टोपी काय करायची आहे?

तात्या : खरेंच! ती ठेवायची तरी कुठें? डोकें असेल तर ना ठिकाणावर? (स्वगत) डोकें मुळींच नाहीं, मग त्याचें ठिकाण कसें मिळणार?

बाळा : (स्वगत) टोपी मुद्दाम टाकून दिली तिचें सार्थक झालें! विरहावस्थेंत नायक नेहमीं बोडकाच असावयाचा! (प्रकट) तात्या, झालेल्या दुर्दैवी प्रकरणांत त्या माळ्यानें मला हांकलून दिलें याचें मला फार वाईट वाटतें! गुप्तमंजूषांत विलासाला नंदिनीचा बाप मेघनाथ स्वतः हांकलून देतो; अर्जुनाला हांकलणारा बलराम सुभद्रेचा वडिल भाऊ तरी होता! पण माझ्या वांट्याला तो भिकारडा माळी, वेणूच्या घरचा गडी यावा ना!

तात्या : मला वाटतें तिनेंच तुमचा अपमान करण्यासाठीं त्याला मुद्दाम पाठविलें असावें!

बाळा : असें तुम्हांलाही वाटतें ना? मलाही थोडासा असा संशय येतोच!

तात्या : संशय नकोच! एरवीं त्याची काय छाती होती तुम्हांला धक्के देण्याची!

बाळा : खरें आहे तुमचें म्हणणें? (एकदम आवेशानें) आतां असें करणार.

तात्या : कसें?

बाळा : * अंगिकार करुनि हिचा गर्व खंडितों ॥
अबलेचा पाड काय सहज जिंकितों ॥
श्रेष्ठ नरावीण यास काय भूषण ॥
कुशब्द बोलुनि मलाच लावि दूषण ॥

तिच्या बापानें तर आमच्या लग्नाबद्दल वचन दिलेलें आहे ना?

तात्या : (स्वगत) अरेच्या! हें भलतेंच होऊं पाहत आहे. (प्र.) नाहीं गुरु, या रीतीनें जाण्यांत मजा नाहीं. माझ्या मतें अशा उन्मत्त स्त्रीचा सूड दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर प्रेम करून घ्यावा! मानिनी स्त्रियांना यासारखें दुसरें मरण नाहीं!

बाळा : छे छे! दुसऱ्या स्त्रीवर प्रेम कधीं कोणी केलें आहे का? अनुरक्त पुरुषाला त्याच्या प्रणयिनीखेरीज गत्यंतरच नाहीं!

तात्या : तें कां? सत्यविजयांत नाहीं का सत्यविजयानें पहिली स्त्री टाकून दुसरी केली ती! वाः गुरु, विसरूं नका असे!

बाळा : हो हो ठीक आहे; पण हें जमणार कसें? अशी दुसरी स्त्री कोण मिळणार? वेणूसारखी योग्य?

तात्या : भय्या, हा तात्या बोलतो आहे म्हटलें! अर्धवट गोष्टी नाहींत आपल्याजवळ! तुमच्या योग्य अशी एक सुंदर तरुणी पाहून सुद्धां ठेविली आहे! उगीच नाहीं! अगदीं त्या वेणूपेक्षां सरस!

बाळा : कोण, कोण हो ती?

तात्या : आपला रघुनाथ आहे ना? त्याची हुबेहूब प्रतिमा! रूपानें, गुणानें, वयानें, उंचीनें अगदीं तशी!

बाळा : खरें? का थाप आहे झालें!

तात्या : थाप? दिली आहे का थाप कधीं तुम्हांला? शिवाय तुमच्यासारखाच नाटकाचा नाद आहे तिला! सारीं नाटकें पाठ!

बाळा : काय म्हणतां? सारें खरें हें?

तात्या : अक्षरशः खरें! आणि म्हणूनच तर ती एका संकटांत आहे.

बाळा : काय संकटांतसुद्धां आहे! मग तीच खरी नायिका!

तात्या : संकटांत आहे तर! तिच्या बापानें एका मनुष्याशीं तिचें लग्न ठरविलें; पण तिचें त्याच्यावर प्रेम नाहीं! म्हणून ही लग्नाला कबूल नाहीं! येवढ्यासाठीं तिच्या बापानें तिला एका खोलींत कोंडून ठेविली आहे! कोणाला तिकडे जाऊं देत नाहीं, कोणाशीं तिला बोलूं देत नाहीं!

बाळा : अरेरे, कोण भयंकर हाल हे!

तात्या : आणखी सांगितलें तर तुम्हांला खोटें वाटेल, तिचें तुमच्यावर थोडेंसें प्रेमही आहे!

बाळा : हॅट्! थाप आहे सारी!

तात्या : आतां काय सांगावें तुम्हांला? माझा तिचा स्नेह आहे! तुम्हांला

माझ्याबरोबर बरेच वेळां फिरतांना पाहून तिनें तुमची सर्व हकीकत मला विचारली! पण तिकडे जाणें मोठें कठिण आहे! मार्गांत शत्रू फार! एक उपाय आहे फक्त!

बाळा : बोला, कोणता तो. मला संकटाची मुळींच पर्वा नाहीं. हा मम तदर्थ त्यजीन प्राण ॥ (वगैरे)

तात्या : तिच्या घरीं जायचें तें रात्रीं वेषांतर करून, एका पेटाऱ्यांत बसून जावें लागेल! म्हणजे पेटारा तिच्या खोलींत पोंचविण्याची मी व्यवस्था करीन! आहे कबूल?

बाळा : कबूल! कबूल! पेटारा मात्र बुरुडी करा म्हणजे झालें!

तात्या : हो, म्हणजे वारा खेळता राहील म्हणतां!

बाळा : शिवाय शिवाजीमहाराजांचें अल्प अनुकरण केल्यासारखें होईल त्यांत. छत्रपति दिल्लीहून पळाले ते बुरुडी पेटाऱ्यांतूनच!

तात्या : उत्तम! करूं तर मग सारी व्यवस्था?

बाळा : अगदीं खुशाल! पण तिचें नांव नाहीं सांगितलेंत तुम्ही!

तात्या : सरोजिनी!

बाळा : वाहवा! नांवांत सुद्धां प्रणय आहे! सरोजिनी!

तात्या : जातों तर मग मी! दोनचार दिवसांत तुम्ही मला भेटा!

बाळा : बरें!

(तात्या जातो.)

बाळा : आतांच ती रात्र असती तर किती बरें झालें असतें! प्रत्येक क्षण मला युगासारखा वाटत आहे! प्रिया संकटांत, माझ्यावर तिचें प्रेम, मी रात्रीं तिला चोरून भेटणार! मी वेशांतर करणार! अहाहा, नाटकांत यापेक्षां काय जास्त असतें! नांव तरी किती गोड? सरोजिनी! काव्यमय, प्रेममय, सरोजिनी. नाहीं तर हीं गांवढळ नांवें; यमी, बगडी, गोदी, वेणू! शीः! त्या वेणूचें तर नांव सुद्धां नको! आतां एक सरोजिनी आणि बाळाभाऊ! बाळाभाऊ हें नांव जरासें बावळटच आहे. हरकत नाहीं! आपण तर नांव सुद्धां बदलणार! विक्रांत हेंच नांव सांगणार! झालें माझ्या भाग्याला तर पार नाहीं! हे छत्रपति शिवाजीराजा, मी आज तुझ्यासारखा बुरुडी पेटाऱ्यांत बसून जाणार, तर या कार्यांत यश दे! बोल शिवाजीमहाराजकी जय!

(उडी मारून निघून जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश पांचवा

[ अण्णासाहेब व यशोदाबाई. ]

अण्णा : तुला सत्रा वेळा सांगितलें तरी तुझ्या कांहीं ध्यानांत राहात नाहीं! औषधाची आबाळ करून माझा प्राण का घेणार आहांत तुम्ही? पहांटेस झोंप येत नाहीं म्हणून तें औषध शास्त्रीबुवांनीं मुद्दाम दिलें! तें कांहीं पहांटेस द्यायची आठवण राहिली नाहीं!

यशोदा : द्यायचें तरी कसें? पहांटेस आपल्याला लागली होती झोंप! म्हटलें चांगली झोंप लागली आहे ती कशाला मोडावी?

अण्णा : शिकस्त झाली आतां! झोंप येत नाहीं म्हणून मी औषधें आणितों आणि तुझें म्हणणें मला झोंप लागली होती! काय म्हणावें तुम्हांला आतां?

यशोदा : खरेंच झोंप लागली होती! खोटें कशाला सांगूं मी?

अण्णा : भलतेंच! झोंप नाहीं ती! ग्लानि असेल! औषधावांचून आजाऱ्याला झोंप येणार कशी? आली तरी ती खरी झोंप नाहीं, पुन्हा मला अशी झोंप लागली तर जागें करून औषध देत जा म्हणजे मी पुन्हां शास्त्रोक्त निजत जाईन! मला असली वेडीवांकडी झोंप नको!

यशोदा : बरें, आतां नाहीं विसरायची!

अण्णा : बरें, आतां आण!

यशोदा : आतां कशाला अवेळीं?

अण्णा : अवेळ कशाची? औषध केव्हांही घ्यावें आणि कितीही घ्यावें. जा, आण लौकर! जा! जा! लौकर! ( यशोदाबाई जातात. )

अण्णा : ( स्व. ) काय कटकट करावी लागते पहा! ही पुडी घ्यावी आतां! ( पुडी उलगडून पाहतो. ) पुरती चिमुट सुद्धा नाहीं. वैद्यलोक आतांशा पैशाकडे फार बारकाईनें पाहूं लागले; अगदीं सोन्यामोत्याच्या भावानें औषधें देतात! ( पुडींतील औषध तोंडांत टाकतो. ) बाकी शास्त्रीबुवांचीं औषधें रामबाण खरीं! त्यांनीं म्हटल्याप्रमाणें खरेंच हुशारी आल्यासारखें वाटूं लागतें! मला वाटतें दुसरी पुडी घेतली तर दुप्पट हुशारी येईल! पाहतोंच प्रचीति! ( दुसरी पुडी घेतो. ) अरेच्या हुशारी! वाहवा रे औषध! शाबास! रात्रीं खावें तूप आणि सकाळीं पहावें रूप! आपण तिसरीही पुडी घेणार! ( तिसरी पुडी घेतो. ) वाहवा, वाहवा, नवीन जन्म घेतल्यासारखें वाटतें! मला वाटतें चोवीस तास

या पुड्यांचाच खुराक चालू ठेवावा! पण पुड्या कुठें आहेत जास्त आतां? (फडकें झाडतो. कांहीं पुड्या पडतात.) अरेच्या! या पुड्या कसल्या? (पुडीवरील अक्षरें वाचतो.) अरे, हुशारीच्या पुड्या तर या! मग मी घेतल्या त्या कोणत्या आणि त्यांनीं हुशारी आली कशी! हां, आलें लक्षांत! पहांटेस खरी झोंप न येतां झोंपेचा भास झाला! तशीच आतां हुशारी आल्याचा सुद्धां हा भासच असावा! मला वाटतें माझा रोग फार बळावत चालला! त्यानें असे विलक्षण भास होतात! आतां खरें तरी कोणतें आणि भास तरी कोणता? सध्यां जें कांहीं दिसतें, त्यावर विश्वास ठेवतां कामा नये! बरें, पण मीं खाल्ल्या त्या पुड्या तरी कशाच्या? (त्या पुड्यांवरील अक्षरें वाचतो. घाबरून) अरे बाप रे, या तात्यांच्या नेत्रानंदकज्जलाच्या पुड्या! आणि त्यांत विष असेल तर! हो डोळ्यांच्या औषधांत विष असावयाचेंच! छेः आहेच! हें, माझें डोकें सुद्धां फिरूं लागलें! हें जिकडे तिकडे हिरवेंचार दिसूं लागलें! आतां कसें करावें? (मोठ्यानें ओरडून) अहो पिलंभट! धांवा! धांवा! पिलंभट! अहो घात! घात!

[ पिलंभट धांवत बावऱ्या बावऱ्या येतो. ]

पिलं : (स्व.) उंदीर मेल्याची थाप टोकावी आतां. (प्र.) घात, अण्णासाहेब, घात! अहो घात, घात!

अण्णा : अहो घात, भयंकर घात, घात!

पिलं : घात! भयंकर! घात.

अण्णा : अहो केवढा घात?

पिलं : अगदीं आपण म्हणतां येवढा घात, घात.

अण्णा : आतां कसें करावें?

पिलं : आतां कसें करावें? घात! अहो! घात!

अण्णा : अहो घात! घात! पण करायचें कसें आतां?

पिलं : करायचें काय दुसरें? आतांच्या आतां पळालें पाहिजे इथून!

अण्णा : पळून काय होणार? यमापुढें किती पळणार?

पिलं : मग दुसरा काय उपाय करणार इथें?

अण्णा : यावर कांहीं औषध नाहीं?

पिलं : कांहीं औषध नाहीं! घटकेचा उशीर केला तर निकाल लागायचा!

अण्णा : (खालीं बसतो) माझे हातपायच मोडले! आतां पळणार तरी कुठें? घात! औषध नाहीं ना कांहीं उपयोगी?

पिलं : नाहीं! पण आपल्याला कसें कळलें हें ?

अण्णा : अहो माझें मला कसें कळणार नाहीं ?

पिलं : म्हणजे ? ही गोष्ट प्रथम पाहिली मीं !

अण्णा : पण केली मीं ना! या पहा पुड्या हुशारीच्या! अन् या मी खाल्लेल्या नेत्रानंदकज्जलाच्या! भिनलें त्याचें विष!

पिलं : अहो हें निरालेंच! मी म्हणतों तें निराळें! अहो, आपल्या घरांत मेलेला उंदीर!

अण्णा : (ताडकन उठून) मेलेला उंदीर! अहो, कुठें ? पिलंभट कुठें ?

पिलं : अहो आपल्या माजघरांत, घात; माजघरांत!

अण्णा : माजघरांत; अहो घात! मघाच्याहून मोठा घात!

पिलं : म्हणून तर मी आपल्यापेक्षा मोठ्यानें ओरडत होतों!

अण्णा : तुम्ही पाहिलात स्वतः ?

पिलं : अगदीं या डोळ्यांनीं पाहिला. तो पहा तिथें आहे, चला.

अण्णा : अहो, नको, मी नाहीं यायचा त्याच्या जवळ. धांवा, मधूला बोलवा; माधवाला बोलवा; आतांच्या आतां करंजगांवीं चला सारे! धांवा; अहो धांवा म्हणतों ना ? करा तयारी निघण्याची! (पिलंभट धांवत जातो.) अरे मधू, माधवा, उठा! बांधा पेट्या; चला, गाड्या आणा, निघा पळा. [यशोदाबाई येतात.] उठा! बांधा पेट्या; चला, गाड्या आणा, पळा. (इकडून तिकडे धांवतो.)

यशोदा : (घाबरून) अग बाई ? असें काय करायचें हें ? हें काय बोलायचें असें ?

अण्णा : अग धांव, पेट्या बांध! ऊठ पळ. अरे, धांवा, पळा; गाड्या आणा.

यशोदा : (मोठ्यानें) अग बाई आतां काय करूं ? इतक्यांत कुणी कौटाळ केलें वाटतें! अहो पिलंभट धांवा हो धांवा! घात; अंगारा आणा. अहो पिलंभट, धांवा; अंगारा! अग बाई! आतां काय करूं ?

अण्णा : (स्व.) तिकडूनच आली ही वाटतें ? झाला घात! ताप वायु सुद्धां झाला वाटतें! झाली–बडबड सुद्धां करायला लागली! आतां काय करावें ? (प्र.) अहो पिलंभट! धांवा! घात. ही तिकडून आली. हिला ताप भरून वायुसुद्धां झाला! अहो धांवा घात! डागण्या आणा! घात! अरे, डागण्या आणा!

यशोदा : घात! सर्वस्वी घात! अहो पिलंभट इकडे बाहेर घात झाला इतक्यांत! काय ही बडबड! अहो धांवा! अंगारा आणा! घात; (अण्णासाहेब "वायू,

घात, डागण्या " असें ओरडतात व यशोदाबाई "बाहेरवा, घात, अंगारा," असें ओरडतात; मधू, माधव व पिलंभट येतात. )

पिलं : अण्णा, बाई, असें घाबरूं नका! कोणाला कांहीं झालें नाहीं अजून!

अण्णा : अहो नाहीं झालें कसें? मग ही ओरडते कां अशी?

यशोदा : आपण ओरडायचें म्हणून!

अण्णा : अग, घरांत उंदीर पडल्यावर कोण नाहीं ओरडणार?

यशोदा : असें! मला वाटलें आपल्याला बाहेरवा झाला म्हणून मी भिऊन हांका मारल्या पिलंभटांना.

अण्णा : मला वाटलें माजघरांतून तूं आलीस तेव्हां तुला ताप भरून वायु झाला. हं पिलंभट, पहा कुणाला झाला आहे का ताप आणि करा बांधाबांध लौकर.

मधु : अण्णा, अहो आहे काय हें? एकादा उंदीर मेला म्हणून झालें काय?

अण्णा : अरे बाबा, घात. या काळांत जीवंत सिंहापेक्षां मेलेल्या उंदरालाच जास्त भ्यावें लागतें, समजलास!

माधव : रास्त आहे. आत्मा म्हटला म्हणजे सर्वांचा सारखाच. सर्वत्र एकच ब्रह्म पसरलें आहे. मूळ ब्रह्म, तिथून पुढें ओंकारध्वनि निघून पुढें माया—

अण्णा : अरे, पुरे, बाबा तें राहूं दे आतां. पिलंभट उठा लवकर, धांवा, तांगे आणा, पहिलीच गाडी सांपडली पाहिजे. जा. मधु, पळ.

मधु : पण अण्णा—

अण्णा : सांगितलें ना आतां वेळ घालवूं नका म्हणून. गाड्या, बग्गया, छकडे, तांगे, दमण्या, बंड्या, खटारे, एक्के, फैटणी, जें सांपडेल तें घेऊन या!

माधव : त्यांत भेद तो काय पहावयाचा! हा तांगा, हा छकडा, ही बंडी, हा सारा स्थूल दृष्टीस भ्रम आहे. अंतर्दृष्टीला एकाकारानें एकाची शून्यांत आणि—

अण्णा : याला; मला वाटतें झालें आहे कांहीं तरी—

माधव : व्हावयाचें आहे काय? या साऱ्या उपाधि—

अण्णा : खरी उपाधि आहे बुवा तुझी! पिलंभट पळा; उगीच वेळ घालवूं नका!

पिलंभट : बरें, पण आपण त्या पुड्या खाल्ल्या त्यांचें काय?

अण्णा : अहो, त्याचें काय! मला तर विषसुद्धां चढेनासें झालें आहे. प्रकृति अगदीं अदशी होऊन बसली आहे! नसता भास होतो आहे!

माधव : अहाहा! हीच उन्मनी अवस्था. मुमुक्षेची तृष्णा लागण्यापूर्वी मुमुक्षु

जनाची हीच अवस्था होते. इथून पुढें तळमळ–पुढें पिपासा–पुढें साक्षात्कार–पुढें मुक्ति! अण्णा, धन्य, धन्य तुमची! तुर्यावस्था संपून तिच्या पुढची अवस्था तुम्हांला प्राप्त होणार! ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, विसोबा खेचर–

अण्णा : म्हसोबा गाढव–पुरे कर ही यादी! आणखी कांहीं वेळ असा घोळ घालून बसलास तर रोगानें माझी खरोखरीच पुढची अवस्था होणार! धन्य आहे तुझी! पिलंभट, उठा! मधु पळ! हे पहा तात्या आलेच! [ तात्या येतात. ]

अण्णा : तात्या, चला, घरांत उंदीर पडला! आतां इथें राहून उपयोगी नाहीं.

तात्या : नाहीं खरें; पण चालायचें कसें! घरांतून बाहेर पडायचें म्हटलें तर पूर्वाभिमुख गमन करावें लागेल आणि हा मुहूर्त तर पूर्वाभिमुख गमनाला विरोधी आहे! या वेळीं उत्तराभिमुख गमन लाभेल काय तें!

अण्णा : अहो, आतां मुहूर्त पाहावयाला तरी अवकाश कुठं आहे? हातघाईच्या वेळीं सारे मुहूर्त सारखेच!

माधव : हेंच खरें! हरीचिया दासा॥ शुभकाळ अवघ्या दिशा॥

अण्णा : माझी आई, तुला दहा दिशा मोकळ्या आहेत; पण आतां जीभ मोकळी सोडूं नकोस! काय तकलीफ आहे पहा! हं, तात्या, आतां निघालेंच पाहिजे!

तात्या : अरे काय म्हणणें हें, अण्णा? हें पहा, ( पंचांग दाखवितात. ) संकट होय, क्लेश उपजे; सुखनाश; मुहूर्तें चालेल तो सुख पावेल. गोरक्ष पुसे; मत्स्येंद्र सांगे; हा केवळ मुहूर्तराज होय! सहदेव म्हणे माडळीशीं—

अण्णा : आपली मति हरली बुवा आतां! हा प्राण जाण्याचा मुहूर्त दिसतो; मग तात्या, आतां करायचें तरी कसें?

तात्या : करायचें काय त्यांत? त्या उत्तरेकडच्या खिडकींतून सारे बाहेर पडा म्हणजे झालें!

यशोदा : त्यापक्षीं, मी म्हणतें, तेवढें परस्थान—

अण्णा : आतां पायांवर डोकें फोडून घेऊं का एकेकाच्या! आतां परस्थान नको, संस्थान नको; पिलंभट—

यशोदा : असें काय म्हणायचें भलतेंच? परस्थान ठेविल्यावांचून का कुठें निघणें म्हटलें आहे?

पिलंभट : आतां असें करूं द्या. परस्थान घेऊन मी त्या उत्तरेकडच्या खिडकीवाटे बाहेर पडतों आणि मग मंडळी येऊं द्या पुढल्या दारानें! म्हणजे साऱ्या

अडचणी भागतील !

अण्णा : शाबास. असेंच करा. चला, तात्या, पिलंभट, त्या विषाच्या पुड्या खाल्लया त्यांच्यावर उतारा पण आणा बरें का ? मला भलभलता भास होऊं लागला आतां !

पिलंभट : ( स्वतःशीं ) न होईल तर मग माझी करामत कुठें राहिली ? साऱ्या पुड्या इथून तिथून एक. घरचा वैद्य.

अण्णा : हां, निघा आतां.

पिलं : जातों, तांगे आणतों आणि आपल्यासाठीं उताऱ्याचें औषधहि आणतों.

अण्णा : औषध आणाच; तें घेईन आगगाडींत बसल्यावर ! आधीं तांगे आणा ! तांगे कांहीं आगगाडींत बसल्यावर मग उपयोगी पडायचे नाहींत. तेव्हां आधीं तांगे आणा. चला, एकएक क्षण म्हणजे वर्ष आहे आतां !

यशोदा : अंगारा तरी लावूं का कुळस्वामिणीचा सगळ्यांना ?

अण्णा : नको. अंगारा आणायला सुद्धां तिकडे जाऊं नकोस, चला. काय बांधाबांध करायची ती करून घ्या लौकर ! मी जाऊन बसतों सडकेवर.

( जाऊं लागतात. )

तात्या : अरे, पण त्या मुहूर्ताच्या खिडकींतून—

यशोदा : तेवढें तें परस्थान आधीं—

माधव : कशाला ? अण्णा, तुम्हींच जा म्हणजे झालें. अग, परस्थान आणि अण्णा यांच्यांत काय भेद आहे ? आणि या खिडकींत आणि त्या दारांत तरी काय भेद आहे ?

अण्णा : वेड्यांचा बाजार, खरा वेड्यांचा बाजार हा ! चला.

( सर्व जातात. )

मधु : ( जातां जातां ) शाबास, पिलंभट ! संपला हा प्रवेश; आतां चला, पुढच्या कामाला लागा.

( जातात. पडदा पडतो. )

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ यमुना व रमा भीत भीत येतात. माधवरावांची खोली ]

यमुना : हं, या आतां लौकर आणि घ्या पाहून सारी व्यवस्था !

रमाबाई : यमुनाबाई, माझ्या किनई उरांत धडकीच भरली आहे !

यमुना : जाऊबाई, भारीच भित्रा स्वभाव बाई तुमचा ! माधव भावोजी आतां इकडे मुळींच यायचे नाहींत.

रमा : त्याचा कुणी नेम सांगावा ! जर येणें झालें तर आणखी संतापायचें होईल ! कांहीं नाहीं तर आज सातआठ वर्षे नांव टाकिलें आहे; मग संतापाला कारण मिळाल्यावर तर काय होईल नी काय नाहीं ? म्हणून म्हणतें, अजून चला माघाऱ्या !

यमुना : कांहीं होत नाहीं नी जात नाहीं ! मला इकडून अगदीं चांगलें सांगणें झालें आहे कीं माधवदादाला बाबांच्याजवळ बसवून ठेवितों, घरांतील सारीं माणसें तिथेंच बसलीं आहेत, तेवढ्यां आतां रमावहिनीला नेऊन सारी जागा दाखीव म्हणून ! आतां तर झालें ना ? आणखी मी सुद्धां येतांना पाहिलें तर माधवभावोजी मामंजींच्या पायाला तेल चोळीत बसले आहेत ! ते कांहीं इतक्यांत इकडे येत नाहींत !

रमा : खरेंच, मामंजींची तब्बेत एकदोन दिवसांत इतकी कशी बरें बिघडली ? पुण्यास बरे होते ना अगदीं ?

यमुना : अहो, बिघडली कशाची? वसंतदादाची आणि इकडची सारी खटपट! वसंतदादानें दिलेलें कसलेंसें औषध इकडून मामंजींच्या तळपायाला लावायचें झालें! त्याचा मामंजींच्या पायांत आला बळंवा! झालें, पिलंभटानें मेलेला उंदीर घरांत टाकलाच होता, मामंजींना आणखी तें काय हवें! लागलीच ते घायकूत होऊन बसले! एकदां त्यांच्या मनांत संशयानें घर घेतलें कीं, झालें! इकडचा सूर्य तिकडे होईल पण त्यांचा संशय कांहीं दूर व्हावयाचा नाहीं!

रमा : पण इतकें करून पुढें काय करायचें तें नाहींच सांगितलें मुळीं!

यमुना : अहो, तें सारें सांगत बसलें तर भारत होईल आणि इथें तर कुडाला सुद्धां कान फुटायचे! वेणू वन्संनासुद्धां यांतलें अगदीं अवाक्षर माहीत नाहीं. त्या आहेत हळव्या मनाच्या! फटदिशीं बोलून जायच्या! वसंतदादाच बैरागी होऊन येणार आहे हें सुद्धां त्यांना ठाऊक नाहीं.

रमा : वसंतरावांचें करणें तरी अघटितच! बायकोसाठीं बैरागी होणार?

यमुना : आणि बैराग्यासाठीं बायको आणणार हें नाहीं म्हटलेंत कुठें! बरें, तें राहूं दे. सध्यां आपलें पायापुढचं पाहिलें म्हणजे पुरे झालें. ही पहा दाराची कडी; बाहेरच्या बाजूनें या बिजगऱ्या खिळखिळ्या केल्या आहेत. त्या फिरविल्या म्हणजे कोयंडा मोकळा होईल. तो सुटला कीं त्याला बांधलेला तो दोर सैल सोडा, म्हणजे कोयंडा हळूहळू खालीं येईल; घाई केलीत तर आवाज होईल! आलें लक्षांत! वसंतदादानें टाळी वाजवून खूण दिली कीं हळूच या युक्तीनें दार उघडून आंत शिरा. दार लावून घ्या आणि या पडद्यामागें उभ्या राहा. पुढें काय करायचें आणि कसें बोलायचें हें कांहीं सांगायला नको. भिऊंबिऊं नका म्हणजे झालें!

रमा : काय होईल तें खरें! माझें मन आपलें सारखें मागतें पाऊल घेतें.

यमुना : अहो, होणें जाणें दैवाधीन! प्रयत्न आपल्या हातीं, तेवढा करून पाहावयाचा झालें. चला आतां. सांगितलेलें नीट लक्षांत ठेवा. [ जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ पिलंभट व बैराग्याच्या रूपानें वसंत प्रवेश करितात. ]

पिलंभट : मग काय, इतक्यांतच हा वेड्यांचा बाजार आटोपता घ्यावयाचा

म्हणतां ?

वसंत : अजून सुद्धां इतक्यांतच का ?

पिलंभट : म्हणजे मला जारीची जुळवाजुळव करावी लागणार ?

वसंत : त्याला कसें करायचें ? गरज आपल्याला आहे ना ?

पिलंभट : बरें मग सांगा पाहूं काय काय करायचें तें ? या गडबडींत मी पूर्वानुसंधान बरेंचसें विसरून गेलों आहें. आधीं आतां काय करायचें ?

वसंत : अधींमधीं असें कांहीं नाहीं. संधि सांपडेल तसतसें एक एक काम हातावेगळें करायचें. तो नाटकी बाळाभाऊ आहेना, त्याच्याकडून आतां एक दोन दिवसांत पत्र येईल कीं मला कांहीं वेणूशीं लग्न करावयाचें नाहीं म्हणून !

पिलंभट : तें कशावरून आणि कां ?

वसंत : त्याचा खुलासा मी सावकाशीनें करीन. सध्यां तुम्हीं असें पत्र खात्रीनें येणार एवढें धरून चाला आणि हें यशोदाबाईजवळ देव खेळवितांना सांगा; तात्यासाहेबांजवळ भविष्यकथनाच्या नात्यानें सांगा; वाटलें तर माधवरावांजवळ त्रिकालज्ञानाच्या धोरणानें सांगा.

पिलंभट : आणि एखादे वेळीं बाळाभाऊचें असें पत्र न आलें म्हणजे ताडदिशीं माझ्या पदरीं खोटेपणा यायचा !

वसंत : पिलंभट, तुम्हांला खोटें पाडण्यासाठीं का आम्हीं या खटपटी करीत आहोंत ? अहो, उलट हें तुमचें भविष्य दोन दिवसांनीं अचूक खरें ठरलें म्हणजे तुमचा या लोकांत बोज मात्र वाढेल !

पिलंभट : मग कांहीं हरकत नाहीं; अशीं खात्रीनें घडून येणारीं भविष्यें मला जरूर सांगत चला. म्हणजे पहा मीं कशीं किफायतवार विकतों तीं ! अशीं भविष्यें माझा हातखंडा आहे अगदीं !

वसंत : पण ऐन वेळीं जिभेला खंड पडूं देऊं नका म्हणजे झालें. नाहीं तर आयत्या वेळीं कचराल. ररऽ कराल आणि सारेंच रस्त्यावर आणाल !

पिलंभट : ती धास्तीच सोडून द्या ! असा आडरस्त्यानें वावरण्यांत मीं अगदीं पटाईत झालों आहें; अहो, आतां तुमच्याजवळ म्हणून आपलें बोलायचें—हा जो द्रव्याचा ओघ माझ्या घराकडे चालला आहे हा का सरधोपट मार्गानें वाहतो आहे वाटतें; मुळींच नाहीं; निवळ आडवळणांनीं.

वसंत : बरें, तें असो. पुढें दुसरी गोष्ट. तात्यांच्या जवळ वेणूची पत्रिका आहे; ती कांहीं ते कोणाच्या नजरेस पडूं देत नाहींत. तेव्हां कशा तरी गफलतीनें ती पत्रिका तेवढी हस्तगत करून घ्यावयाची—निदान तिची नकल

तरी करून घ्यावयाची आणि आपल्या ओळखीच्या एखाद्या ज्योतिष्याजवळून तिच्याशीं बरोबर जमेल अशी एक पत्रिका माझ्यासाठीं—या माझ्या संन्याशी नांवासाठीं करून आणावयाची. आलें लक्षांत ?

पिलंभट : लक्षांत आलें, पण पटलें नाहीं इतकें. आतां तुमच्या या कारवाया आणि युक्त्या पाहून मी अगदीं सर्द झालों आहें खरा; पण ही युक्ति नाहीं इतकी आवडली मला; हें सारें तात्यासाहेबांना तुमची पत्रिका वेणूताईच्या पत्रिकेशीं जमते एवढें भासविण्यासाठींच ना ? मग असें केलें तर नाहीं का चालणार ? त्या बाळाभाऊची कुंडली तात्यासाहेबांना पसंत आहेच; तिचीच जवळजवळ नक्कल करून घेतली म्हणजे झालें कीं नाहीं ?

वसंत : ठीक आहे. कसें तरी करून पत्रिका जमवा म्हणजे झालें. नाहीं तर बैराग्याला मुलगी देते वेळीं पुन: वसंताचेंच नशीब आड यावयाचें. बरें, हें एक ठरलें. तसेंच मीं अण्णासाहेबांना औषध द्यायला उद्यांपासून सुरू करणार; तेव्हां आधीं त्यांच्याजवळ माझी वैद्यकीच्या ज्ञानाबद्दल स्तुति करा; तात्यासाहेबां-भोंवतीं ज्योतिषाचें जाळें पसरा आणि माधवरावांजवळ माझ्या योगसाधनाची तारीफ करा. मी तुमचा गुरु आहें असें सांगा. म्हणजे प्रत्येकाचा तुमच्या सांगण्यावर विश्वास बसेल. घटकाभर मला गुरु माना म्हणजे झालें.

पिलंभट : गुरु मानायला कशाला पाहिजे ? तुम्ही खरोखरीच माझे गुरु झालां आहां. मला हा लप्पन् छप्पन् करण्याचा थोडासा नाद पहिल्यापासूनच होता आणि त्याबद्दल मी माझ्या मनांत अगदीं मग्न असें; पण तुमचीं व मधुकरांचीं हीं शिकलेलीं कुलंगडीं पाहून मी अगदीं चीत झालों आहें. आम्हीं दशग्रंथी पाहिलेलीं माणसें या तुमच्या करामतीपुढें कुचकामाचीं ठरतों. आमच्या दशग्रंथीचीं सूत्रें ताणून धरलीं तरी त्यांचें असें सर्वस्वीं गुरफटणारें जाळें होणें शक्य नाहीं. या बाबतींत तुमचा शिकलासवरलेला हात धरण्याची आम्हां दशग्रंथ्यांची शहामत नाहीं; तुमचे पायच धरावयाला पाहिजेत. माझ्या गर्वाचें पाणी पाणी होऊन मी कधींपासूनच आपल्याला गुरुस्थानीं मानायला लागलों आहें.

वसंत : झालें तर मग; या भावनेनेंच माझी सर्वांजवळ स्तुति करीत सुटा. बाळाभाऊचें पत्र आलें म्हणजे आम्हां गुरुशिष्यांच्या जोडीवर बऱ्याच जणांचा विश्वास बसेल; नंतर अण्णासाहेबांचा हा आम्हींच उभारलेला आजार कमी होत चालला कीं यशोदाबाईच्या मनांत मुलगी देण्याचें भरवून द्या म्हणजे आटोपलें. बाळाभाऊनें वेणूशीं लग्न करण्याचें नाकारलें म्हणजे वचनमुक्त

झालेले अण्णासाहेब माझें वैद्यकज्ञान पाहून माझ्या उपकारांतून उतराई होण्यासाठीं आपण होऊनच मला मुलगी देऊं करतील. तात्यासाहेबांचा बंदोबस्त ठरविलाच आपण आतां. म्हणजे जमेल कीं नाहीं सारें ?

पिलंभट : अगदीं चोख ! पण, काय हो, माधवरावांची तुम्ही प्रथम योगसाधनाबद्दल खात्री कशी करून देणार ?

वसंत : त्याचा विचार मीं पूर्वीच करून ठेवला आहे. त्याला घटकाभर ब्रह्मस्थितीचाच अनुभव दिला म्हणजे सहज त्याचा माझ्या शक्तीवर विश्वास बसेल.

पिलंभट : पण ती ब्रह्मस्थिति कशी दाखविणार ?

वसंत : हें पाहिलेंत गुंगी येण्याचें औषध ? त्यांना जरा छां छूं करून याच्या वासानें घटकाभर गुंगी आणिली म्हणजे तावडतोब त्यांची अकल गुंग होईल कीं नाहीं ?

पिलंभट : जरूर; या नुसत्या कल्पनेनेंच माझी अकल गुंग झाली आहे.

वसंत : हं, तुम्ही मात्र अकल गुंग होऊं देऊं नका; उलट अगदीं सावध रहा आणि मीं पहिली टाळी वाजविली कीं रमाबाईंना त्या दारानें माधवरावांच्या खोलींत सोडा. राहील सारें नीट लक्षांत ?

पिलंभट : अगदीं. आतां एकदां माझ्या डोक्यावर आपला हात ठेवा म्हणजे मला चांगली तरतरी येईल.

वसंत : नको; डोक्यावर माझा हात ठेवण्यापेक्षां तुमच्या हातावर मी गुरु असूनहि गुरुदक्षिणा ठेवितों म्हणजे तर खरी तरतरी येईल. हा विवाह जमवून आणून त्याला आतां मान्यता मिळवून देणें देवा, आतां तुझ्या हातीं आहे.

(राग–काफी; ताल त्रिवट)

* मान्यता मिळो या जगीं मद्विवाहा ॥ धृ० ॥
सात्त्विक शुद्ध प्रेम मम होवो स्वजनांप्रति सुखवावया ॥
विनवी तुजला मी जगदीशा ॥ योग्य पथा लाभावया ॥ १ ॥

[ त्याला कांहीं रुपये देतो. दोघे जातात. ]

(पडदा पडतो.)

[ अण्णासाहेब, यशोदाबाई, मधुकर, वेणू, माधव. अण्णासाहेब आजाऱ्यासारखे उठून बसले आहेत. ]

अण्णा : ( कण्हत ) आई आई, शेवटीं प्रकृतीचें मान या थरावर येऊन पोंचलें! तरी मी रोज एकेकाच्या कानींकपाळीं ओरडत होतों कीं बाबा रे खाण्यापिण्याचा नीट बंदोबस्त ठेवा, सध्यां दिवस बरे नाहींत.

वेणू : अण्णा, खाण्यापिण्याचा काय संबंध या दुखण्याशीं? हें वाऱ्यासारखें दुखणें!

अण्णा : खुळी पोर कुठली? खाण्यापिण्यानें तर सारें होतें. वाग्भटानेंच रडून, ठेवलें आहे ना कीं "सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः" एरवीं माणसाला कांहीं व्हावयाचें नाहीं. हीं तुमचीं पक्कानें शेवटीं मला मात्र नडलीं!

वेणू : अशीं पक्वान्नें तरी कोणतीं केलीं? येऊन जाऊन कधींमधीं सणासुदीला घरांत कांहीं गोडधोड झालें असेल! तेवढेंच! पण तेवढ्यानें हें दुखणें आलें असें कसें म्हणतां अण्णा? या दुखण्याचा आणि खाण्यापिण्याचा काय संबंध?

मधुकर : आणखी अण्णा, या दुखण्याला सुद्धां आतां इतकें भिण्याचें कारण नाहीं. कारण एक तर तुम्हांला आज पांच दिवस झाले. ज्या अर्थीं या पांच दिवसांतहि या दुखण्यानें उग्र स्वरूप धारण केलें नाहीं, त्या अर्थीं हा अगदीं माइल्ड टाइपचा अटॅक असला पाहिजे.

माधव : अरेरे, मधु काय बोलतोस. हें? अरे रोगांतसुद्धां भेद पाडतोस! हा लहान, हा मोठा असें कधीं मनांतसुद्धां आणूं नये. "नोचार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः!"

यशोदा : माधवा, तूं गप बैस पाहूं! राहूं दे तें तुझें पुराण! मेल्यांनो, आजारी माणसाच्या जवळ असें बडबडतांना थोडा विचार करावा!

अण्णा : अगदीं खरें! मला वात झाल्यासारखें वाटत आहे! खूप मोठ्यांदां ओरडावेंसें वाटतें आहे. अग, माधवा, मधु, काय करूं? मला भ्रम झाल्यासारखें वाटायला लागलें आहे! आ! आ! ( आंग टाकून अंथरुणावर पडतो. सर्व धरतात. )

मधु : ( स्वगत ) तुम्हांलाच काय, अण्णा, इथें सर्वांनाच भ्रम झाला आहे!

यशोदा : ( पदराचा अंगारा सोडून ) अंबाबाई, आतां तूं आमची पाठराखी

आहेस. मला क्षमा कर! आई, तुझा गोंधळ या दुखण्यांतून उठल्याबरोबर मी घालीन ग! ( दुसरी मंडळी तोंडांत औषध घालतात. )

अण्णा : ( एकदम उसळून ) माझी आई, कां उगीच गोंधळ घातला आहेस! तुझी अंबाबाई कशाला पाहिजे इथं! हा बघ मी उठून बसलों! मला कांहीं होत नाहीं आतां! घाल गोंधळ पाहूं कसा घालतेस तो! ( उठून बसतात. )

यशोदा : आई अंबाबाई-( असें म्हणून हातावर अंगारा घेऊन चोंहोकडे फुंकते. )

अण्णा : कां ग? घाल कीं गोंधळ! म्हणे गोंधळ घालीन! घाल गोंधळ!

यशोदा : मधु, माधवा, अरे बाबांनो जा रे कुणी तरी त्या पिलंभटाला तरी घेऊन या! मला कांहीं हें चागलें चिन्ह दिसत नाहीं! हा गोंधळ; गोंधळ बरें हा! तेव्हांच म्हटलें मी; कीं दिवसगत लावूं नका! पण माझें ऐकतें कोण?

अण्णा : अग, कां उगीच गोंधळ घालते आहेस?

यशोदा : पाहिलेंस वेणू, आतां म्हणत होते कीं गोंधळ घाल! जा बाई देवीपुढचा थोडा अंगारा तरी घेऊन ये! जा!

वेणू : अग बाई, अण्णांना आतां बरें वाटत आहे!

अण्णा : काय बरें वाटतंय! हा गोंधळ चालला आहे तो मला बरा वाटतो आहे?

यशोदा : अग पोरी, जा. उगीच बोलत उभी राहूं नकोस! अरे मधु, माधवा तुम्हांला त्या पिलंभटाला मी बोलवायला सांगितलें आहे ना? मग असें तोंडाकडे काय पहात उभे राहिलां आहांत?

अण्णा : ए, माझ्याकडे पाहा पाहूं तूं जरा आतां! तूं काय चालविलें आहेस हें? तुझ्या या गोंधळानें मात्र माझें डोकें ठिकाणावर राहील असें कांहीं मला वाटत नाहीं! आतां तूं जर बडबड केलीस किंवा त्या अंबाबाईचें नांव काढलेंस तर पहा!

यशोदा : ( कपाळाला हात लावून मट्टदिशीं बसते. ) अग बाई, तरी मला वाटलेंच होतें. आईचें नांव सुद्धां नकोसें वाटूं लागलें हें कांहीं ठीक लक्षण नाहीं! आतां काय करूं? ए मधु, माधवा, जा–( केविलवाणी होते. )

अण्णा : कशाला, ए मधु, माधवा,—

यशोदा : ( त्याच्या कानांत सांगते ) बाबांनो तुम्हांला आतां माझी शपथ आहे येथें थांबाल तर, अरे त्यांची प्रकृति अशी झालेली आहे, आणि माधवा तूं हसतोस काय असा?

माधवा : अग आई, “ वादे वादे जायते तत्त्वबोधः ” अग, हा वाद म्हणजे सर्व विषयांचें मंथन ! यांतून जें सार निघेल त्याचेंच एक तत्त्व तयार होईल आणि पुढें तेंच जगाच्या उपयोगी पडेल !

मधु : दादा, तूं तरी असा काय गोंधळ चालविला आहेस ? तूं त्या पिलंभटाकडे जा, मी दुसऱ्या एखाद्या डॉक्टराला घेऊन येतों ! तूं प्रथम चल पाहूं माझ्याबरोबर ! ( त्याला आपल्याबरोबर घेऊन जावयाला निघतो. अण्णा मोठमोठ्यानें मधु, माधवा म्हणून ओरडतात, यशोदा त्यांना जा जा म्हणून सांगत असते. असा कांहीं वेळ गोंधळ चालतो. नंतर दोघेही जातात. )

अण्णा : आतां काय सांगूं तुला ? अग, मला खरोखरीच आतां बरें वाटत आहे.

यशोदा : एकदां बरें वाटतें आहे म्हणायचें आणि पांचच मिनिटांनीं एकदम उसळायचें !

अण्णा : अग, आतां माझी प्रकृति चांगली आहे; पण त्याला कारण तुझी अंबाबाई नसून त्या पिलंभटानें आज सकाळीं हिमालयांतील एका महान भिषग्वर्याचें औषध आणून दिलेंन् त्याचा हा परिणाम आहे, समजलीस ? आणि हेंच मी मघांपासून सांगणार होतों. पण माझें ऐकतें कोण ? इथून तिथून सारा एकच गोंधळ !

यशोदा : कुणाच्या हाताला का होईना, यश मिळालें म्हणजे झालें ! कुणाच्या रूपानें देवी उभी राहील कुणी सांगावें ? आणि म्हणूनच मी त्या पोरीला अंगारा आणायला पाठविली. मीं आज सकाळीं त्या पिलंभटाचा देव खेळविला.

अण्णा : अग तुझें हें देव खेळविणें पुरे कर पाहूं आतां. असे खेळखंडोबा करून रोग का कुठें बरे व्हायचे असतात. हे अंगारे, धुपारे,–( वेणू अंगारा आणते. )

यशोदा : ( तिच्या हातांतून अंगारा घेऊन त्यांच्या कपाळाला लावते व चोहींकडे फुंकते. )

अण्णा : कां ग तूं देवाला असें पोरासारखें ग कां खेळवीत असतेस ? इतकीं वर्षें मी आपलें रोज ऐकतों आहें, आज अमक्याचा देव खेळविला, उद्यां तमक्याचा देव खेळविला, आज अमक्यानें अंगारा दिला, उद्यां तमक्यानें मंतरलेला ताईत दिला अशा एक ना दोन, त्या देवाचें हें असें खेळणें करून तूं या वयांत जो हा पोरखेळ चालविला आहेस, त्या तुला आतां काय म्हणावें तेंच समजत नाहीं. बरें, मी नशीब समजतों कीं तुला लिहावयाला, वाचावयाला येत नाहीं. नाहीं तर या अलिकडच्या सिद्ध मांत्रिकाच्या आणि ताइतांच्या

जाहिरातींनीं आमचं घर म्हणजे एक मोफत वाचनालय तूं बनविलें असतेंस, आणि ताइतांच्या तोडग्यांनीं आपल्या या घराला धर्मशाळेची कळा आणली असतीस !

यशोदा : वेणू, पाहिलास मघाच्या बोलण्याला आणि आतांच्या बोलण्याला कांहीं तरी मेळ ! हा सारा त्या पिलंभटाच्या अंगाऱ्याचा प्रभाव बरें ! खरेंच सांगतें असें बोलूं नये. त्या पिलंभटाचे गुरु आतां आले आहेत येथें. त्यांनीं आज सकाळीं हा अंगारा देऊन मला किती तरी चांगल्या गोष्टी सांगितल्या ! हो, त्यानें आणखी आपल्या गुरूच्या पडताळ्याची एक गोष्ट सांगितली आहे; तिचा जर आपल्याला प्रत्यय आला म्हणजे मग तरी आपण माझ्या या देवीवर विश्वास ठेवाल ना ?

अण्णा : म्हणजे त्या पिलंभटाच्या गुरूकडून का आलेला हा अंगारा आहे ? अग, त्यांचेंच तर औषध मी आज सकाळपासून सुरू केलें आहे. त्यांच्या त्या हिमालयांतील वनस्पतींनीं तर माझ्या प्रकृतींत हा एकदम आज असा फरक पडला आहे. नाहीं तर अशा प्लेगसारख्या भयंकर रोगानें पछाडलेला रोगी कधीं जगायची आशाच करायला नको !

यशोदा : खरें ना पण हें ! आपला सुद्धां त्यांच्यावर विश्वास आहे ना ! मग कां बरें उगाच मघाशीं त्या अंगाऱ्याला आपण नांवें ठेविलींत ?

अण्णा : अग, पण हा गुण त्यांच्या औषधांचा असेल !

यशोदा : त्यांनीं पडताळा पहाण्यासाठीं आणखी असें सांगितलें आहे कीं तुमच्या मुलीचें पहिलें लग्न मोडेल आणखी—

अण्णा : आणखी काय ?

यशोदा : आणखी तिचा एका महाविद्वान पुरुषाशीं लग्नाचा योग आहे आणि ही गोष्ट या चार दिवसांत घडून येईल.

अण्णा : आश्चर्य आहे ! बाकी त्याच्या सांगण्याप्रमाणें तो जरी विद्वान असला आणखी त्याला वैद्यकाची माहिती नसली तर मी पोरीला तिथें मुळींच देणार नाहीं. बरें, तो माधव त्या पिलंभटाला आणायला गेला होता, तो तिकडेच रंगला वाटतें. ( माधव येतो. )

माधव : अहाहा, काय तें तेज, काय ती मुखमंडलावरची शोभा ! अण्णा, काय सांगूं तुम्हांला, आज माझा आनंद अनावर झाला !

अण्णा : तुझा आनंद अनावर झाला आहे, पण माझा राग आतां अनावर झाला आहे. काय रे हें ! अरे तुला त्या पिलंभटाला बोलवायला धाडलें

होतें ना ?

माधव : अहाहा ! धन्य तो पिलंभट, धन्य तें त्याचें घर ! आणि त्रिवार धन्य ते त्याचे सद्गुरु. अण्णा, तुमचा राग तर माझा आनंद ! केवढा भेद ! मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास ! वा रे वा ! कशाला राग, कशाला लोभ !

यशोदा : बाळ, तुला आनंद व्हायला झालें तरी काय ? त्या पिलंभटाच्या गुरूनें कांहीं चमत्कार केलान् का ?

माधव : चमत्कार ! काय सांगूं चमत्कार ? मी गेल्यावर पहातों तों त्या योगींद्राची समाधी लागलेली ! त्या स्थितींतच मीं त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलें, तों ते एकेक सूत्रवाक्य बोलूं लागले. खरेंच आहे. " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ! धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे " काय ती गंभीर वाणी ! अण्णा, आई, आज तुमचा माधव तुम्हांला निराळा दिसत असेल. त्यांनीं माझ्या मस्तकावर हात ठेवला, तोंडावरून हात फिरविला मात्र, तों एकाएकीं मी हें जग सोडून—

यशोदा : काय झालें बाळ ?

अण्णा : काय झालें माधव, तूं एकाएकीं असा गहिंवरून कां आलास ?

माधव : अहाहा ! तें चिन्मय स्वरूप, तो आनंद, तें ध्यान, " ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी ! तेथें कोण देहातें सांभाळी. " ज्या वेळीं चिकित्सक बुद्धि नष्ट पावून, जिज्ञासा जिथें संपते तिथेंच असे उद्गार बाहेर पडतात ! " कोण देहातें सांभाळी, तेथें कोण देहातें सांभाळी. " ( जोरानें टाळ्या पिटूं लागतो, अण्णा गोंधळांत पडतात. कांहीं वेळानें अंथरुणावर जाऊन पडतात. )

यशोदा : अग बाई ! पुन्हां असें कशानें झालें ! अरे माधवा, जा बाबा त्या गुरुमहाराजांना तरी इकडे घेऊन ये !

माधव : इकडे तिकडे हा भेदच आतां राहिला नाहीं ! अहाहा ! काय ती मूर्ति, काय तें रूप, काय तें चेहेऱ्यावरचें तेज ! अहं ब्रह्मास्मि ( ध्यान लावतो. )

यशोदा : अगबाई, आतां करूं तरी काय ? हे इकडे निपचित, याची इकडे समाधी ! अग वेणू, यमू, अग, कुणी तरी इकडे या ! ( त्या दोघी येतात. ) बाई, जा तो अंगारा तरी घेऊन ये. आणि तो मधु कुणीकडे गेला ? त्या पिलंभटाकडे कुणाला तरी धाड पाहूं ! ( पिलंभट येतो. )

पिलंभट : धाडतां कशाला बाईसाहेब, माझ्या गुरुमहाराजांनीं अंतर्ज्ञानानें हें सर्व ताडलें आहे. आतां इतक्यांत ते इकडे येतील. मधुकरही त्यांचेबरोबर आहेत !

श्रीमारुतीला तुम्ही अकरा अभिषेकांचा नवस बोला. इतक्यांत गुण!

यशोदा : (देवाला नमस्कार करून मनांत कांहीं पुटपुटते व पुन्हा नमस्कार करते.)

[ मधुकर बैरागी वेषांतल्या वसंताला घेऊन येतो. ]

वसंत : भजन

भजन विना एक जल गयो जिवना ॥ धृ० ॥ पर्वत सुना
एक बिरछ सुना, बिरछ सुना एक पात बिना ॥ १ ॥

माधव : अहाहा, हे चित्स्वरूप, महन्मंगल मायावतारी—

वसंत : (माधवाचे मस्तकावर हात ठेवून त्यास) सावध हो बाळा, सावध हो. अशी वारंवार समाधी लावून त्या चिरशक्तीला वारंवार त्रास कां देतोस? अशानें वारंवार दर्शन दुर्लभ होईल. (सर्व मंडळी त्यांच्या पायांवर डोकें ठेवतात. माधव सावध होऊन त्याचे पाय धरतो.)

माधव : गुरुमहाराज—

पिलंभट : माधवराव, थोडे थांबा. अगोदर अण्णासाहेबांच्या प्रकृतीकडे आपल्याला लक्ष पोचविलें पाहिजे. (त्याला अण्णांच्या पलंगाजवळ नेतात. तो त्यांची नाडी पाहून थोडें दूध आणावयाला सांगतो. दूध घेतल्यावर ते सावध होतात.)

अण्णा : स्वामीमहाराज—(असें म्हणून उठावयाला लागतात. माधव, मधु, पिलंभट भक्तजनांसारखे आ पसरून बसतात.)

वसंत : महाराज, आपल्याला क्षीणता आलेली आहे. आपण ही तसदी घेऊं नका! रोगाचें असें आहे कीं त्याला नेहमी विश्रांतीची आवश्यकता असते. त्याला उगीच छेडणें चांगलें नाहीं. बरें, सकाळीं दिलेलें औषध यांना किती वेळा दिलेंत?

यशोदा : चार वेळ. (तो परीक्षेला सुरुवात करतो.)

अण्णा : त्याच्यापासून मला थोडें बरें आल्यासारखें वाटतें!

पिलंभट : योजनाच तशी आहे!

अण्णा : ओकारी होईल असें वाटतें!

पिलंभट : योजनाच तशी आहे!

यशोदा : घटकेंत घाम येतो तर घटकेंत थंडी वाजल्यासारखें होतें!

पिलंभट : खरें ना पण? योजनाच तशी आहे!

यशोदा : मध्येंच भ्रम झाल्यासारखें करतात!

वसंत : सांग, योजनाच तशी आहे म्हणून !
अण्णा : एकदां खूप मोठ्यानें ओरडावेंसें वाटतें !
पिलंभट : योजनाच तशी आहे !
अण्णा : घटकेंत अगदीं शांत पडावेंसें वाटतें !
वसंत : योजनाच तशी आहे !
मधुकर : अशी योजना करण्याचें कारण काय गुरुमहाराज ! ( हंसतो. )
वसंत : त्याचें कारण असें कीं, उष्ण आणि शीत असे दोन प्रकार नेहमीं प्रकृतींत असतात, त्यांपैकीं एकाला कधीं छेडूं नये, एकदां याला, एकदां त्याला असें दोघांनाही छेडून प्रकृतीला आपल्या ताब्यांत आणायची आणि मग ज्याच्यावर स्वार व्हायचें असेल त्याच्यावर योजना करायची म्हणजे दुसऱ्याचा कांहीं अंमल चालत नाहीं.
अण्णा : अहाहा, काय हें ज्ञान, काय ही योजना, काय ही चिकित्सा !
वसंत : असें पहा तुम्हीं निसर्गाला सोडून नेहमीं वर्तन करतां. त्यामुळें अशा रोगांना थारा मिळतो ! दिवस, रात्र, उन्हाळा, थंडी, आग, पाणी, स्त्री, पुरुष या योजनाच मुळीं निसर्गसिद्ध आहेत; परंतु तुमचें वर्तन मात्र नेहमीं नियमबाह्य. आतां याच माधवरावांचें उदाहरण पहा, हा तरुण पुरुष, स्त्रीला सोडून —जाऊं द्या एकंदरींत काय कीं निसर्गाच्या विरुद्ध वर्तन कधीं करूं नये. निसर्गाला नेहमीं प्रसन्न ठेवलें पाहिजे. ( सर्व भक्तिभावानें डोलतात. )
मधुकर : पण गुरुमहाराज, आपण तर आजपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्यांत—
पिलंभट : ( मधुकराला दाबतो. ) अहो मधुकर—
वसंत : अरे थांब पिलंभट, अहो मधुकर, आम्हीही पण कांहीं दिवसांनीं या आश्रमाचा त्याग करून तुमच्या आश्रमांत येणार आहों. कारण आम्हांला तशी आज्ञा आहे. ज्याच्या आज्ञेनें आमचा जन्म झाला, ज्याच्या आज्ञेनें आम्ही आजपर्यंत या ज्ञानपर्वतावर आरूढ झालों, त्याच्याच आज्ञेनें या जगाच्या रहाटीकडे लक्ष देऊन आम्हांला वर्तन केलें पाहिजे.
माधव : योग्यच आहे. " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः "
वसंत : मग तुमचें वर्तन असें कां ? राहूं द्या आतां हा विषय ! महाराज, आज मी आपल्या प्रकृतीचें निदान करून एक वनस्पती देतों. तिचें तीन वेळ पोटांत सेवन करा व पायोला लावण्याला एका वेलीचा रस देतों तो लावा. उद्यां सकाळीं आपली कांहीं तक्रार राहणार नाहीं. पिलंभट, मातोश्रींना तो अंगारा देऊन तो अष्ट दिशांनीं नीट फुंकरायला सांग. ( अण्णा मधुकराच्या कानांत

काहीं सांगतो. मधुकर दबकांतून कांहीं रुपये आणून त्यांच्यापुढं ठेवतो. वसंत तिकडे पहातसुद्धां नाहीं. )

माधव : मी दर्शनासाठीं केव्हां येऊं?

वसंत : तुम्ही स्नान करून शुचिर्भूत अंतःकरणान आज सायंकाळीं आमचकडे या म्हणजे तुमच्या सर्व प्रश्नांचा आम्ही उलगडा करूं. ( सर्वजण पायांवर डोकीं ठेवतात. )

पिलंभट : महाराज, हे ( असं म्हणून रुपयांचं ताट त्याच्यापुढें करतो. )

वसंत : ( उसळून ) अरे, तूं इतके दिवस आमच्या संगतींत घालवून पुन्हां आम्हांला या मोहांत फसविण्याचा प्रयत्न करतोस ? तें तूं घे, नाहीं तर तिकडे टाकून दे. आम्हांला काय करायचं आहे ? ( पिलंभट खूष होतो, जय गुरु महाराज की जय म्हणून सर्वजण ओरडतात. वसंत पूर्ववत् भजन करीत जातो. )

समाप्त

---

* हीं पदें कै. गडकरी यांची नाहींत.

# गडकऱ्यांची हस्तलिखिते




'संगीत गर्वनिर्वाण' नाटकाचा आराखडा

(प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या सौजन्यानें)

42

<u>संगीत पुण्यप्रभाव</u>

<u>अंक पहिला.</u>

प्रवेश पहिला.

[ <u>स्थळ</u>:- अरुंधतीच्या महालांतील दिवाणखाना. इंदिर प्रवेश करितो. ]

<u>इंदिर</u>- (स्वगत) माझ्या प्रेम संन्यासानें मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखविला नसता तर अजूनही मन त्या वेड्यांच्या बाजारांतच रमत राहिलें असतें. परमेश्वरा, या हातानें स्वीकारलेलें हें संन्यस्त [illegible] नीरसपणें घडवून आण. [illegible] हृदयेश्वरी [illegible] तुझ्या [illegible] भक्तांच्या [illegible], [illegible] आणि स्वयंपूर्तीचें सामर्थ्य देऊन [illegible] पासून किंवा केसभरही [illegible] नकोस. भाग्यशाली भूपाला, वसुंधरेच्या प्राप्तीमुळें तुला मिळणाऱ्या तुझ्या संसारसुखाची हा संन्यासी इंदिर स्वप्नांतही अपेक्षा करणार नाहीं. पण या हृदयाची गडबड अजून शांत होत नाहीं. या द्विधा-[illegible] दरबाराबाहेर वसुंधरेच्या येण्याची वाट पाहत मी उभा राहिलों खरा, पण या-आपल्या [illegible] मुळें उद्भवलेल्या, [illegible]

'संगीत पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रारंभ

गळ्याची शपथ आहे तुम्हाला! तुमच्या [illegible]
प्रकारानें आपला घात आहे! पण असा प्रकार
पुढें [illegible] तुमच्या [illegible] अश्रूंनें हिरा
निघाला [illegible] मोठें [illegible] आहे!

शरद — नाहीं, [illegible] अश्रू बोलतोस? आपल्या दुःख
अश्रूंचे नाव —

सिंधू — या [illegible] असलें म्हणजे, माझ्या अश्रूंना
[illegible] नाही!

सुधा — सिंधू, अश्रू — [illegible] राहिलीस तूं! — [illegible]

सिंधू — (रडत — ) आतां प्राण हो जर [illegible] तर, माझ्या
गळ्याची शपथ आहे! [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] आहे! [illegible]
([illegible])

सुधा — [illegible]

तळी — आतां आहे पुढें कोणी? ([illegible] एकच प्याला!)

सुधा — [illegible] सिंधूच्या देहांत [illegible]
[illegible] एकच प्याला! ([illegible])

(पडदा पडतो.)

अंक तिसरा समाप्त.

रा. ग. गडकरी

१३/१२/१८
रात्रीं १० वाजतां
पुणें [illegible]

आज रोजी "एकच प्याला" हें नाटक लिहून
संपूर्ण झालें.

" [illegible]
[illegible] "

[illegible]
[illegible]

'संगीत एकच प्याला' या नाटकाचा शेवट

( अंक तिसरा सर्वांत शेवटीं लिहिला गेला. )



'पुष्पप्रभातां'तील एका पदाची रचना


प्रेमसंन्यास १
अंक पहिला
प्रवेश पहिला.

'संधिसाधन' नाटकाची सुरुवात

'प्रेमसंन्यास' नाटकाचें पहिलें नांव 'संधिसाधन' असें होतें.


(७२)
त्रिवांगी — राया, या आबासाहेबांच्या सांखळ्या या पायांत
घालूं नयेत ना? हे बघ, या हातांतच घातल्या
तर नाही का चालायचें? हे दुजेचे निर्मोल ...
दृष्टी कसें पाहायचें?
रायाजी — वेडी, माझी भाग्याची वेडी! देवाचें नांव घे आणि
खुशाल सांखळ्या पायांत घाल! रामाजीवर संकट
आलें तेव्हां भक्तांसाठी भगवंतांनी अपमानाचा
बोज घेतला; आज काळाची गंगा उलटी वाहत
आहे; देवाजनांचें संकटें दूर करण्यासाठी आज
भक्तांनी भगवंताचें नांव घ्यायचें आहे.
सर्वांचें सोंग घेतल्यावर, पाटलाची परवा
ठेऊन चालत नाही. मासाहेब, उगीच वेळ
जातो आहे-
त्रिवांगी — खरेंच बाई, घाई करा गडे. आम्ही राया इतके सांगतो
आहे - आपण जिवाभावाच्या मैत्रिणी - माझ्या
भाग्याची उजरी वेळ आली तरी तुझा हात
आपला नडच! रायाला राग येईल बरें!
[ साजिन होरे. ]
साजणि बाई, सजणी सजणी अरि बाई। लागीनघडि आई।
बेळ आली अब। देद आहे घना। क्यों चलताई ॥२॥

'राजसंन्यासा' च्या हस्तलिखितांतील एक पान.

११५

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] ...

२८६

४० रांजणांतील पाण्याकडे पाहून.

[illegible]
[illegible]

"[illegible]
[illegible]
[illegible]"

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

आयांनो, [illegible] रचवू तेथे उठली [illegible] ॥
[illegible] कोठे [illegible] स्वप्नांतूनी [illegible] ॥
[illegible] कधी [illegible] ॥
[illegible] उमजुनी; [illegible] पुरली [illegible] ॥ ६८
[illegible] कधी [illegible] ॥
[illegible] हे [illegible] कधी [illegible] ॥
[illegible] होवो [illegible] ॥
[illegible] हे [illegible]

---

४२ प्रेम-पाठ.

चिरयौवनीका मैना, मधुरा अनुरागवल्लरी ॥
पुंस्कोकिलांच्या संगत [illegible] कुठेही [illegible] ॥
हृदयवसंताही नवफुलला, झुळझुळ शीतल [illegible] वाहे ॥
[illegible] नवरसमय, फुलांनी विकसावे [illegible] ॥
प्रेमाश्रूंच्या मधुबिंदूंच्या कणां शिंपतसे ॥
संतोषाच्या श्वासांच्या या मंदमंद वाहे ॥
प्रेमरसाच्या या वर्षावें भरले हृदय ॥
तृणांकुरांच्या रोमांचांची पेरणीही झाली ॥
चला, मनाच्या मळ्यांत पेरू प्रीतीची बीजे ॥
चिरप्रीतीपुढे [illegible]; कोण [illegible] ॥